म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८९८७
REFBK-0022744

निबंध (वृत्तपत्रांतील संग्रह)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
२२८८४
२०६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 DEC 1979
30 DEC 1979
16 APR 1980
7 MAY 1980
11 MAY 1980
18 MAR 1981
18 MAR 1981
18 MAR 1981
22 JUL 1981
29 SEP 1982
1 FEB 1987
22 MAY 1988
25 MAY 1988

(क्र. मा. प.)

संदर्भ शाखा
निबंध
२७९८
२२७४४
१६/११/७९

# भाल्याची फेक

प्रो.वि.
[वृत्तपत्रातील लेखांचा संग्रह]

संपादक

श्री. पु. गोखले

REFBK-0022744

केसरी प्रकाशन, पुणें

प्रकाशक :

ज. श्री. टिळक
केसरी प्रकाशन
५६८ नारायण पेठ
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ :

अनंत सालकर

मूल्य २५ रुपये

मुद्रक :

ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणे ४११०३०



भास्कर बळवंत तथा भालाकार भोपटकर

जन्म : १० सप्टेंबर १८७४ मृत्यु : २७ डिसेंबर १९४८

# भाला

धर्मासाठीं मरावें। मरोनी अवघ्यांस मारावें। मारतां मारतां घ्यावें। राज्य आपुलें॥ १९

बुधवार चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८२७ तारीख ५ एप्रील सन १९०५.

## महाराष्ट्र बोर्डिंगहाउस, पुणें.

## आश्चर्यकारक गुणकारक औषधें.

## अटकेचा

हें ऐतिहासिक

## आर्यमित्र मासिक पु

पहिल्या अंकाचें छायाचित्र

# प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळांत भोपटकर बंधूंचें नांव पुण्यांतच नव्हे, तर सर्व महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध होतें. श्री. भास्कर बळवंत भोपटकर आणि त्यांचे सर्वांत कनिष्ठ बंधु लक्ष्मण बलवंत भोपटकर हे दोघेहि चांगले सुशिक्षित होते आणि दोघेहि व्यवसायानें वकील होते. राजकारणांत भाग घेणारे होते. दोघेहि उत्तम वक्ते होते. श्री. भास्कर बळवंत तथा भाऊसाहेब भोपटकर पुण्यामध्ये 'लॉ-क्लास' चालवीत असत आणि असंख्य विद्यार्थ्यांनी त्या काळीं त्यांच्या शिक्षणाचा लाभ घेतलेला होता. तसेच लक्ष्मण बळवंत तथा अण्णासाहेब भोपटकर वकिलीच्या व्यवसायांत अधिक लक्ष घालीत असले, तरी तेहि कायद्याचे शिक्षक म्हणून नांवाजलेले होते. ते पुण्याच्या 'लॉ-कॉलेज'मध्ये प्राध्यापक होते आणि व्हाइस प्रिन्सिपॉलहि होते. त्यांना दिनकर नांवाचे तिसरे बंधु होते, परंतु ते तरुण वयांतच मरण पावल्यामुळे त्यांचें नांव महाराष्ट्रांत फारसें ज्ञात नाही.

भोपटकर बंधु आपआपलीं मतें आग्रहानें प्रतिपादन करणारे होते. त्यामुळे त्यांनी 'आपल्या मतांचा प्रसार करण्यासाठी' 'भाला' नांवाचें नियतकालिक प्रसिद्ध करावयाचें ठरविलें. 'भाला' या पत्राचा पहिला अंक गुढीपाडव्याला म्हणजे दिनांक ५ एप्रिल १९०५ या दिवशीं मोठ्या दिमाखानें प्रसिद्ध करण्यांत आला. पहिलीं कांही वर्षें भाला महिन्यांतून तीन वेळा प्रसिद्ध होत असे, तर पुढे त्याला साप्ताहिकाचें स्वरूप आलें. त्यानंतर तो पाक्षिकाच्या स्वरूपांत प्रसिद्ध होऊं लागला. पुढे श्री. भाऊसाहेब आणि भाला हे एकमेकांस समान शब्द बनण्याइतके ते आपल्या पत्राशीं एकरूप झाले होते. भाऊसाहेब हे 'भालाकार भोपटकर' म्हणूनच ओळखण्यांत येऊं लागले व प्रसिद्धीस आले.

## 'भाला' पत्राची बिरुदावलि

'भाल्याची फेक' नांवाचा पहिल्या अंकांतील पहिलाच अग्रलेख आहे. त्यांत त्यांनी 'भाला' हें नियतकालिक काढण्याचे उद्देश स्पष्ट केले आहेत. पहिल्या अंकांत ते सांगणें योग्य आणि साहजिकच होतें. त्या काळांत लोकमान्य टिळकांचा 'केसरी' आणि 'मराठा' हीं दोन्ही पत्रें सिंहगर्जना करीत होतीं. लोकमान्यांच्या लेखणीच्या आणि वाणीच्या प्रभावाची कक्षा विस्तारलेली होती. त्या पुरुषसिंहाच्या गर्जनेपुढे भाल्याची फेक किती दूरवर जाऊं शकेल आणि कोणतें कार्य करूं शकेल, असा प्रश्न अनेक मंडळींच्या मनांत उद्‌भवणें साहजिकच होतें. इतर कार्यकर्त्यांच्याप्रमाणे तो प्रश्न भोपटकर बंधूंच्याहि मनांत आला. भोपटकर बंधु स्पष्टवक्ते होते. त्यामुळे त्यांनी पहिल्या अग्रलेखाच्या पहिल्याच वाक्यांत ही शंका उपस्थित केली. प्रत्येक मंगळवारीं केसरीची मेघगर्जना होत असतांना आणि दर शुक्रवारी 'काळ'चे

(शिवराम महादेव परांजपे यांचें 'काळ' पत्र दर शुक्रवारीं प्रसिद्ध होत असे.) काळ-स्वरूप नजरेस पडत असतांना भाल्याची जरुरी काय? भाल्याच्या संपादकांनी हा प्रश्न उपस्थित करून तितक्याच प्रांजळपणाने त्याचें उत्तरहि देऊन टाकलेलें आहे. ते लिहितात, "शंका योग्य व यथार्थ असून तिचें समाधान करणें अति दुर्घट आहे... आजपर्यंत न झालेलें असें एखादें अजब व अलौकिक कृत्य करणार आहे किंवा लोक-मताच्या प्रवाहाला एखादें नवीन हितकर व हिंमतदार वळण लावूं शकेल किंवा आसन्नमरण होत चाललेल्या सार्वजनिक संस्थांत नवीन जीव व जोम घालण्याचा त्याच्या अंगांत वकूब आहे, अशी मुळीच गोष्ट नाही. तसें घडवून आणण्याची 'भाल्यां'त युक्ति नाही व शक्तीहि नाही" असें प्रामाणिकपणें सांगून टाकल्यावर ते भाल्याचा उद्देश आणि तो सिद्धीस नेण्याचा सोपा, सरळ व सुखकर मार्ग सांगतात.

## हिंदु धर्माचा जाज्वल्य अभिमान

समर्थ रामदासस्वामींच्या बाणेदार शब्दांत ते आपला उद्देश मांडतात— "धर्मासाठी मरावें। मरोनी अवघ्यास मारावें। मारतां मारतां घ्यावें। राज्य आपुलें।।" ते पुढे प्रश्न विचारतात की, "या जीवट आणि जोमदार धर्मोपदेशाच्या विरुद्ध एक 'ब्र' तरी काढण्याची कोणाची छाती आहे का?" एवढेंच नव्हे तर, प्रत्येक जातिवंत हिंदु एक वेळ घरादाराची होळी झालेली पत्करेल किंवा सर्व ऐहिक सुखाची राखरांगोळी झाली तरी त्याला चालेल, पण तो वेदप्रणीत, व्यासांनी प्रवर्तित केलेला आणि रामदासस्वामींनी प्रज्वलित केलेला धर्म कधीहि सोडणार नाही" भाला-कारांचा हिंदुधर्माभिमान अत्यंत जाज्वल्य होता. ते भावनागर्भ भाषेंत म्हणतात की, "एक वेळ देदीप्यमान सूर्याचा प्रकाश लुप्त होईल, पाषाणांचे पर्वत लोण्याप्रमाणे वितळतील, अथांग सागर कोरडा पडून तेथे कोरडे ठणठणीत वालुकामय प्रदेश निर्माण होतील, पण आर्य भूमाता कधीहि गतप्राण होणार नाही. आपल्याकडे प्रलयकाळ येऊन सर्व चराचर सृष्टि नष्ट होणार आहे अशी एक कल्पना रूढ आहे. तशी वेळ आली, तर पृथ्वीतलावरील हिंदुस्थान देश सर्वांत शेवटीं बुडेल आणि त्यांतहि शेवटचा जिवंत प्राणी हा धर्मनिष्ठ हिंदु असेल." अशी भावना ते पहिल्याच अग्रलेखांत व्यक्त करतात.

## राजकीय महत्त्वाकांक्षेची सीमा

राजकीय महत्वाकांक्षेची धांव कोठपर्यंत असावी किंवा त्याची अंतिम सीमा कोणती असावी, हा प्रश्न महत्त्वाचा होता. सर्व भारत देश पारतंत्र्यांत खितपत अस-तांना तें जोखड फेकून देण्यासाठीच सर्व पुढारी आपापल्या परीनें झिजत होते. लोकमान्य टिळक 'केसरी-मराठा' यांतून गर्जना करीत भारतांत असंतोष निर्माण करीत होते. इतर मार्गांनीहि राजकीय चळवळीचा गाडा पुढे रेटीत होते. 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजचे यांचें हें ऐन उमेदीचें पर्व होतें. ते आपल्या वैशिष्टयपूर्ण

भाषाशैलीनें आणि वक्तृत्वानें क्रांतिकारकांना स्फूर्ति देत होते. अशा वेळीं 'भाला'चे राजकीय ध्येय कोणतें होतें हें आरंभींच स्पष्ट करणें उचित होतें. ते म्हणतात, "आमची तरी तूर्त राजकीय महत्वाकांक्षा म्हटली, तर हिंदुस्थानवासी जनास आंग्ल नागरिकत्व व स्थानिक स्वराज्य या दोहोंची जोड झाली म्हणजे बरेंच साधलें. उद्योगप्रवण कर्झनशाहीच्या अमलांत. . .आर्यभूमातेला स्थानिक स्वराज्य-भूषणानें सालंकृत करावयाचें असेल, तिच्या दीन व हीन लेकरांना उन्नत स्थिति प्राप्त करून द्यावयाची असेल तर. . .प्रत्येक धर्मनिष्ट व देशनिष्ठ आर्यपुत्रानें कंबर कसली पाहिजे."

समाजांत जें निराशेचें वातावरण होतें त्याबद्दल भालाकार लिहितात की, "आर्यभूवर कोणतेंच जिवावरचें संकट ओढवलेलें नाही. मारक असा कोणताच रोग तिला जडलेला नाही." अखेर ते लिहितात की, "आर्यभूला सुदिन आणि सुस्थिति प्राप्त व्हावयाची असेल, तर जनसमूहांत ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे. या कामांत भाला सदैव यथामति व यथाशक्ति प्रयत्न करील. . .निराशारूपी शूर्पणखेच्या काळजांत बेधडक प्रवेश करील. अज्ञान आणि आळस या दोन दुष्ट राक्षसांवर बेलाशक प्रहार करील."

## भारतीय वृत्तपत्रांचा विकास

भारतामध्ये १९ व्या शतकांत ज्या अनेक घडामोडी झाल्या त्यांत वृत्तपत्रांच्या कामगिरीलाहि महत्त्व द्यावें लागतें. या शतकाच्या पूर्वार्धांतील वृत्तपत्रें बाल्यावस्थेंत होतीं. तीं चारपानी साप्ताहिकाच्या स्वरूपांतच होतीं. जीं जन्माला आलीं तीं अल्पकाळांतच बंद पडलीं.

भारतांतील वृत्तपत्रांच्या विकासाचा विचार केला, तर त्यांचे दोन भाग पाडतां येतात. पहिला टप्पा इ. स. १८५७ ते १८८० असा पडतो. या कालखंडांत राजकारणापेक्षा प्रामुख्यानें धार्मिक आणि सामाजिक विषयांवरच नियतकालिकांत भर देण्यांत येत असे. इंग्रजांशीं संबंध ठेवणें दैवी तर आहेच, पण तें हितकारकहि आहे. इंग्रज सरकाराविषयी आदर आणि इमानदारपणा त्यांत दिसत असे. तरीहि क्वचित् प्रसंगीं त्यांत टीकात्मक भूमिकाहि घेण्यांत येई.

दुसऱ्या टप्प्यांत म्हणजे सन १८८० ते १९०५ या पंचवीस वर्षांत वृत्तपत्रांच्या भूमिकेंत बदल झालेला आढळतो. त्या वेळीं सामाजिक सुधारणांचा आग्रह मागे पडून, राजकारणाला जें महत्त्व येऊं लागलेलें होतें त्याचें चित्रण व प्रतिबिंब आपल्याला पाहवयास सापडतें. सुशिक्षित हिंदु आणि इंग्रज अधिकारी यांच्यांत पूर्वी वसत असलेले संबंध दुरावत चालले होते. भारतीय जनतेला इंग्रज सरकारच्या धोरणाविषयी संशय वाटूं लागला होता. या पाव शतकांत वृत्तपत्रांना राजकीय

संस्थांचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें. तीं थोडीफार निर्भय बनलीं आणि त्यांच्या टीकास्त्राच्या टप्प्यांतून लहानसान घटनाहि सुटेनाशा झाल्या.

## वृत्तपत्रांवरील निर्बंध :

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर सुरू झालेली वृत्तपत्रीय आघाडी साम्राज्य सरकारच्या स्वार्थी नजरेंतून सुटणें शक्यच नव्हतें. गव्हर्नर-जनरल लॉर्ड रिपन व त्यानंतर आलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांना देशी भाषांतील वृत्तपत्रांनी काळजी उत्पन्न केली नसली, तरी त्यांची वाढ त्यांना त्रासदायक वाटत होती. त्या वेळच्या इंग्रज संपादक असलेल्या पत्रांचा सूर भारतविरोधी असे. भारतीयांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांविषयी त्यांना सहानुभूति तर नसेच, पण तीं सरकारी धोरणाला जोरदार पाठिंबाच देत असत. अशा पत्रांची संख्या कमी होती. त्या मानाने देशी भाषांतील पत्रांची संख्याहि वेगाने वाढत होती. तीं राजकीय जागृति निर्माण करीत होतीं. राजकीय शिक्षण देत राष्ट्रीय भावना उद्दीपित करीत होतीं.

१८६१ च्या इंडियन कौन्सिल निर्बंधाने जनमतांत खळबळ उडून त्यांना राजकारणांत आणि वृत्तपत्रांविषयी आस्था वाटूं लागली होतीच. १८७५ सालीं बडोदा संस्थानचे महाराज मल्हारराव गायकवाड यांच्यावर दावा करून सरकारने त्यांना पदभ्रष्ट केलें. या कृत्याविरुद्ध वृत्तपत्रांतून टीका झाली. मुंबईच्या 'इंदुप्रकाश' नांवाच्या पत्राने ब्रिटिश सरकारच्या भारतीय संस्थानिकांवरील अधिपत्याविषयीच शंका उपस्थित केली. त्यामुळे सत्ताधारी वर्ग चिडला आणि त्यांनी देशी पत्रांतील राजद्रोही लिखाण दडपून टाकण्याची मागणी सुरू केली. वृत्तपत्रांच्या प्रभावाची जाण असलेल्या धूर्त इंग्रज सरकारने १८७८ सालीं व्हर्नॅक्युलर प्रेस अॅक्ट लागू केला. लॉर्ड लिटनच्या कारकीर्दीतील या कायद्यान्वये आपल्या पत्रांतून वृत्तपत्र संपादकांना सरकारविरुद्ध आक्षेपार्ह मजकूर लिहिला जाणार नाही किंवा वृत्तपत्रें छापण्यापूर्वी त्यांचीं मुद्रितें सरकारला दाखवूं, असा करारनामा करावा लागला.

## वृत्तपत्रांचें कार्य :

हा निर्बंध म्हणजे भारतीय जनतेचा अपमानच होता. त्यामुळे त्यावर सर्वत्र टीकांची झोड उठून, अनेक प्रगट सभा भरविण्यांत आल्या. अखेर १८८२ सालीं लॉर्ड रिपनच्या काळांत हा निर्बंध मागे घेण्यांत आला. अशा रीतीने वृत्तपत्रांच्या इतिहासांत एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला. त्यांत राजकारणाला प्राधान्य मिळण्यास सुरुवात झाली. भारतीय जनतेच्या गाऱ्हाण्यांची तड लावण्यासाठी त्या काळीं इतर प्रातिनिधिक संस्था नव्हतो. त्यामुळे वृत्तपत्रांना जनतेचें प्रतिनिधित्व लाभलें. वृत्तपत्रांना कायमच्या लोकसभेचें जणू स्थान प्राप्त झालें.

सरकारच्या कारभारांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत भारतीयांना प्रतिनिधित्व मिळेपर्यंत राष्ट्र-विमोचन व राष्ट्र-जागृतीच्या कार्यांत वृत्तपत्रांनी मोठा

हातभार लावला. तसें करतांना कायद्याची कक्षा फारशी न ओलांडतां त्यांनी हें कार्य केलें. कांही पत्रांनी त्या कामीं आपलें लेखनकौशल्य पणाला लावलें. काँग्रेसची नैमित्तिक चळवळ, क्रांतिकारकांचे उठाव यांना उत्तेजन मिळतें म्हणून वृत्तपत्रांवर सरकारने पुढे अनेक प्रकारचे निर्बंध लागू केले. प्रतिभू (जामीन) मागून, राजद्रोही लिखाण आहे असा आरोप करीत मुद्रणालयें व संपादकांवर दावे चालवून, सरकारने अनेक पत्रांची मुस्कटदावी करण्याचे प्रयत्न केले.

## भाऊसाहेबांना राजद्रोहासाठी शिक्षा :

'भाला' पत्र त्या दडपशाहींतून सुटणें शक्य नव्हतें. ११ ऑक्टोबर १९०५ या दिवसाच्या म्हणजे 'भाला'च्या २० व्याच अंकांतील 'नरकांतील दरबार' या 'श्रीकृष्ण' या टोपणनांवावर लिहिलेल्या लेखावर सरकारने राजद्रोहाचा आरोप ठेवून दावा केला. त्यांत सरकारची प्रच्छन्न निंदा होती. राजनीतीचें प्रतीक म्हणून लॉर्ड क्लाईव्हचे चित्र रेखाटण्यांत आलेलें होतें. हें खरें असलें तरी, त्या काळच्या विद्यमान सरकारविरुद्ध राजद्रोह पसरविणारा मजकूर मात्र त्यांत शोधूनहि सापडत नव्हता. परंतु कायदा करणारें सरकार आणि त्याचा अर्थ लावणारें सरकार एकच असल्याने, कायद्यांतील कलमांचा ओढूनताणून अर्थ लावून श्री. भाऊसाहेब भोपटकर यांना सहा महिने कारावासाची शिक्षा ठोठावण्यांत आली.

या काळांत श्री. अण्णासाहेबांनी तें पत्र चालविलें. तुरुंगांतून सुटल्यावर भाऊसाहेबांनी पुन्हा 'भाला'त लिहिण्यास जोमाने सुरुवात केली. तरी सरकारी दडपशाहीच्या वरवंट्यामुळे त्यांना १९१० सालच्या ऑक्टोबर महिन्यांत भाला हातांतून खाली ठेवावा लागला.

भाला हें नियतकालिक प्रथम सुरू झालें त्या वेळीं तीनहि भोपटकर बंधू त्यांत सहभागी होते. त्यांतले एक बंधु दिनकरपंत अकालीं निधन पावले. श्री. ल. ब. तथा अण्णासाहेब भोपटकर मतभेद झाल्यामुळे त्यांतून बाहेर पडले. अखेर भाला हें पत्र सर्वस्वीं भाऊसाहेब भोपटकर स्वतःच्याच जबाबदारीवर चालवीत होते. त्यामुळे 'भालाकार' भाऊसाहेब हें समीकरण पूर्णत्वाने सिद्ध झालें असें म्हणावयास हरकत नाही. पहिलीं पांच वर्षें तो कोणताहि खंड न पडतां नियमाने महिन्यांतून तीन वेळा लोकांच्या हातांत पडत असे. सहाव्या वर्षाचे अंक २१ ऑक्टोबर १९१० या दिवसापर्यंत नेहमीसारखे प्रसिद्ध झाले. त्यानंतर मात्र १४ वर्षांचा खंड पडला. या शेवटच्या अंकांत 'नाशिक कटाचा खटला' हा जॅक्सनच्या वधावरील खटल्याचा अग्रलेख भोपटकर यांनी लिहिला.

## 'भाला'चा पुनर्जन्म :

या चौदा वर्षांच्या काळांत राजकीय परिस्थितींत फार मोठें स्थित्यंतर झालेलें होतें. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर राजकीय क्षितिजावर म. गांधींचा उदय झालेला

होता. टिळक आणि गांधी यांची राजकीय मतप्रणालि फार भिन्न होती. लोकमान्यांनी गणपति आणि शिवाजी उत्सव राजकीय जागृतीसाठी सुरू केले असले, तरी त्यांनी धर्म आणि राजकारण यांची भेसळ केलेली नव्हती. 'गीतारहस्यां'त प्रतिपादिलेल्या कर्मयोगाचें पालन ते करीत होते. लोकमान्यांची स्वदेशी, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही चतुःसूत्री मागे सारून गांधीजींनी खादी, सत्य, अहिंसा, सत्याग्रह आणि कायदेभंग यांना महत्त्व देऊन भारतांतील चळवळीचें सूत्रचालन करण्यास प्रारंभ केला होता. भालाकार भाऊसाहेबांचीं स्वतःचीं अशीं ठाम मतें होतीं. भाला हें मुख्यतः मतपत्र होतें. ते स्वतःला लोकमान्य टिळकांचे घट्ट शिष्य म्हणून घेत असत आणि त्यांच्या विनोदी स्वभावामुळे ते आपल्याला टिळकांचे मठ्ठ शिष्य असेंहि संबोधित असत. गांधीजींचीं अनेक मतें भाऊसाहेबांना अमान्य होतीं. त्यामुळे १४ वर्षांनंतर त्यांनी ईर्षेनें भाला या पत्राचें पुनरुज्जीवन केलें. जणू हा खंड पडलेलाच नाही, असें मानून त्यांनी २० एप्रिल १९२५ या दिवशीं जो अंक प्रसिद्ध केला त्यावर 'सहावें वर्ष' असेंच छापलें.

या अंकापासून भाला पत्रांतील संपूर्ण लेखन भाऊसाहेब हें एकट्यानेंच करू लागलेलें स्पष्ट दिसतें. नव्हे १ जून १९२५ च्या अंकांत त्यांनी तसें स्पष्टपणें म्हटलेलेंहि आहे. खंडानंतरच्या पहिल्या अंकांत त्यांनी 'नमोनमः' या मथळ्याचा अग्रलेख लिहिला. त्यांत त्यांनी दासबोधाच्या 'मराठा तितुका मेळवावा' या पंक्तीच्या चालीवर पुढील ओळी प्रसिद्ध केल्या. "जहाल तितुका मिळवावा। लोकमान्य पंथ वाढवावा। याविषयी करिता थकवा। टिळक हासती।।" पूर्वी महिन्यांतून तीन वेळा प्रसिद्ध होणारा भाला त्यांनी साप्ताहिक स्वरूपांत प्रसिद्ध करावयास जोमानें प्रारंभ केलेला दिसतो. भालाकार या अंकांत ठणकावून सांगतात की, "लो. टिळकांनी घालून दिलेल्या मार्गानें स्वराज्य मिळेल." त्यासाठी गरज असेल तर रामसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याची जरुरी आहे. गांधींजींनी सुताने एका वर्षांत स्वराज्य मिळेल अशी प्रकट घोषणा केली होती. त्यांत सत्यापेक्षा किंवा वस्तुनिष्ठेपेक्षा प्रचाराचा फसवा भागच अधिक होता. सुतानें स्वराज्य मिळेल हें म्हणणें हा निवळ मूर्खपणा आहे, असें मत भालाकार निर्भीडपणाने आपल्या लेखांत व्यक्त करतात. गांधींच्या मतांचें वैयर्थ्य दाखविण्यासाठी ते उपहासाचा आश्रय करतात. सुतासाठी वर्गणी काढण्यापेक्षा सुंठीसाठी वर्गणी काढावी असें ते सुचवितात. सुतानें स्वराज्य मिळण्या-इतकें हें काम सोपें असेल, तर वर्गणी काढून सुताची गिरणी काढून भागेल, असें मांडण्यासहि ते कमी करीत नाहीत.

## गांधीजींशी मतभेद :

गांधीजींच्या खादीच्या आग्रहामुळे खेडोपाडीं व सामान्य जनतेला मिळूं शकणारे फायदे भाऊसाहेबांना दिसत नव्हते असें भाल्यांतील सर्व लिखाणाचा अभ्यास

केला तर अजीबात म्हणतां येणार नाही. त्याचप्रमाणे गांधीजींविषयी, त्यांच्या संघटन-कौशल्याविषयी भालाकारांना आदर होता हें स्पष्ट दिसतें. हा आदर ते वेळोवेळीं व्यक्तहि करीत असत. परंतु लोकमान्य टिळकांच्या तुलनेनें गांधीजी अत्यंत प्रचारकी पद्धतीनें वर्तत किंवा भाष्य करीत तें भालाकारांना अजीबात नापसंत होतें. गांधीजी वैयक्तिक प्रतिष्ठा वाढवीत असून राष्ट्राच्या प्रगतीला व ध्येयाला पोषक असे मार्ग चोखाळत नाहीत. खादी, सत्य (म्हणजे गांधीजी म्हणतील तें सत्य !), अहिंसा कायदेभंग, करबंदी यांच्यावर अतोनात भर देत. ते देशाला लाभदायक नाही, असें ते, अत्यंत तळमळीनें मांडीत हेंहि वाचकाच्या ध्यानांत येतें. गांधीजींच्या चळवळीच्या प्रारंभापासून 'चरख्या'चे अवास्तव गोडवे गाण्यांत येत. प्राथमिक अवस्थेंतल्या या यंत्राच्या अंगीं नसलेले गुण त्याला चिकटविण्यांत येत. प्रत्येकानें विशिष्ट तास चरखा फिरवून सूत कातावें असा त्या काळीं जोरात प्रचार चालू होता. आठ तास चरखा फिरविला, तर फक्त चार आण्यांची मजुरी मिळण्याइतकें उत्पादन होतें असें गणित भालाकार दुसऱ्याच अंकांत (२७-४-१९२५) मांडतात. चरख्याचा अवाजवी बडेजाव करण्यांत येत असे. चरख्यांतून मंजुळ आवाज निघतो, तो फिरविल्यानें चित्तशुद्ध होतें असें मांडण्यांत येई. अर्थात् वस्तुनिष्ठ विचार करणाऱ्या कोणाहि माणसाला हीं मतें पटणें शक्यच नव्हतें. भालाकार उपहास करण्यासाठी लिहितात, अहो, चरखा चावतो सुद्धा ! तेव्हा तो पोलिसांच्या ठाण्यावर पोलिसांच्या ऐवजीं ठेवावा. इतकेंच नव्हे तर, रानडुकरांना शेतांतून पिटाळून लावण्यासाठी त्याचा उपयोग करवा अशी हेटाळणीहि ते करण्यास मागेपुढे पाहत नाहीत.

गांधीजी क्रांतिकारकांचा उपहास करीत असत. ते वाट चुकलेले देशभक्त आहेत, ते खरे ब्रह्मचारी नाहीत असें म्हणत असत. फासावर जाणारे खरे ब्रह्मचारी नाहीत, असें गांधींनी मैमनसिंग येथील विद्यार्थ्यांना सांगितलें. त्यांनी गांधींना उत्तर दिलें की, चरखा फिरविण्यापेक्षा फासावर लटकण्याचें पत्करूं. तुम्ही रोज अर्धा तास चरखा फिरवा म्हणजे तुमच्या इंद्रियांचें दमन होईल, असा गांधीजींनी त्यांना उपदेश केला. त्यावर भालाकार म्हणतात की, गांधींना 'चरखावेड' लागल्यानें बॅ. रामराव देशमुख यांनी म्हटल्याप्रमाणे गांधींनी काँग्रेसची दगदग सोडून वर्षभर साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांत विश्रांति घ्यावी. गांधींच्या अहिंसेच्या आग्रहाबद्दल ते एके ठिकाणीं लिहितात की, "कर्म आमचें. गांधींनी 'अहिंसारहस्य' ग्रंथ लिहावा म्हणजे लोकांना त्यांचीं लोकविलक्षण मतें कळतील."

### करबंदीला विरोध :

काँग्रेसनें करबंदी करण्याची चळवळ सुरू केली होती. कर न देण्याचें जनतेला आवाहन करण्यांत फायद्यापेक्षा नुकसानच जास्त होईल, असें ते सतत लिहीत असत. कर वसूल करून घेण्यासाठी सरकार मालमत्तेचा लिलाव करतें. अशा

होता. टिळक आणि गांधी यांची राजकीय मतप्रणालि फार भिन्न होती. लोकमान्यांनी गणपति आणि शिवाजी उत्सव राजकीय जागृतीसाठी सुरू केले असले, तरी त्यांनी धर्म आणि राजकारण यांची भेसळ केलेली नव्हती. 'गीतारहस्यां'त प्रतिपादिलेल्या कर्मयोगाचें पालन ते करीत होते. लोकमान्यांची स्वदेशी, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही चतु:सूत्री मागे सारून गांधीजींनी खादी, सत्य, अहिंसा, सत्याग्रह आणि कायदेभंग यांना महत्त्व देऊन भारतांतील चळवळीचें सूत्रचालन करण्यास प्रारंभ केला होता. भालाकार भाऊसाहेबांचीं स्वतःचीं अशीं ठाम मतें होतीं. भाला हें मुख्यतः मतपत्र होतें. ते स्वतःला लोकमान्य टिळकांचे घट्ट शिष्य म्हणून घेत असत आणि त्यांच्या विनोदी स्वभावामुळे ते आपल्याला टिळकांचे मठ्ठ शिष्य असेंहि संबोधित असत. गांधीजींचीं अनेक मतें भाऊसाहेबांना अमान्य होतीं. त्यामुळे १४ वर्षांनंतर त्यांनी ईर्षेनें भाला या पत्राचें पुनरुज्जीवन केलें. जणू हा खंड पडलेलाच नाही, असें मानून त्यांनी २० एप्रिल १९२५ या दिवशीं जो अंक प्रसिद्ध केला त्यावर 'सहावें वर्ष' असेंच छापलें.

या अंकापासून भाला पत्रांतील संपूर्ण लेखन भाऊसाहेब हें एकटयानेंच करू लागलेलें स्पष्ट दिसतें. नव्हे १ जून १९२५ च्या अंकांत त्यांनी तसें स्पष्टपणें म्हटलेलेंहि आहे. खंडानंतरच्या पहिल्या अंकांत त्यांनी 'नमोनमः' या मथळयाचा अग्रलेख लिहिला. त्यांत त्यांनी दासबोधाच्या 'मराठा तितुका मेळवावा' या पंक्तीच्या चालीवर पुढील ओळी प्रसिद्ध केल्या. "जहाल तितुका मिळवावा। लोकमान्य पंथ वाढवावा। याविषयी करिता थकवा। टिळक हासती ।।" पूर्वी महिन्यांतून तीन वेळा प्रसिद्ध होणारा भाला त्यांनी साप्ताहिक स्वरूपांत प्रसिद्ध करावयास जोमानें प्रारंभ केलेला दिसतो. भालाकार या अंकांत ठणकावून सांगतात की, "लो. टिळकांनी घालून दिलेल्या मार्गानें स्वराज्य मिळेल." त्यासाठी गरज असेल तर रामसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याची जरुरी आहे. गांधींजींनी सुताने एका वर्षांत स्वराज्य मिळेल अशी प्रकट घोषणा केली होती. त्यांत सत्यापेक्षा किंवा वस्तुनिष्ठेपेक्षा प्रचाराचा फसवा भागच अधिक होता. सुतानें स्वराज्य मिळेल हें म्हणणें हा निवळ मूर्खपणा आहे, असें मत भालाकार निर्भीडपणाने आपल्या लेखांत व्यक्त करतात. गांधींच्या मतांचें वैयर्थ्य दाखविण्यासाठी ते उपहासाचा आश्रय करतात. सुतासाठी वर्गणी काढण्यापेक्षा सुंठीसाठी वर्गणी काढावी असें ते सुचवितात. सुतानें स्वराज्य मिळण्या-इतकें हें काम सोपें असेल, तर वर्गणी काढून सुताची गिरणी काढून भागेल, असें मांडण्यासहि ते कमी करीत नाहीत.

## गांधीजींशी मतभेद :

गांधीजींच्या खादीच्या आग्रहामुळे खेडोपाडीं व सामान्य जनतेला मिळूं शकणारे फायदे भाऊसाहेबांना दिसत नव्हते असें भाल्यांतील सर्व लिखाणाचा अभ्यास

केला तर अजीबात म्हणतां येणार नाही. त्याचप्रमाणे गांधीजींविषयी, त्यांच्या संघटन-कौशल्याविषयी भालाकारांना आदर होता हें स्पष्ट दिसतें. हा आदर ते वेळोवेळीं व्यक्तहि करीत असत. परंतु लोकमान्य टिळकांच्या तुलनेनें गांधीजी अत्यंत प्रचारकी पद्धतीनें वर्तत किंवा भाष्य करीत तें भालाकारांना अजीबात नापसंत होतें. गांधीजी वैयक्तिक प्रतिष्ठा वाढवीत असून राष्ट्राच्या प्रगतीला व ध्येयाला पोषक असे मार्ग चोखाळत नाहीत. खादी, सत्य (म्हणजे गांधीजी म्हणतील तें सत्य !), अहिंसा कायदेभंग, करबंदी यांच्यावर अतोनात भर देत. ते देशाला लाभदायक नाही, असें ते, अत्यंत तळमळीनें मांडीत हेंहि वाचकाच्या ध्यानांत येतें. गांधीजींच्या चळवळीच्या प्रारंभापासून 'चरख्या'चे अवास्तव गोडवे गाण्यांत येत. प्राथमिक अवस्थेंतल्या या यंत्राच्या अंगीं नसलेले गुण त्याला चिकटविण्यांत येत. प्रत्येकानें विशिष्ट तास चरखा फिरवून सूत कातावें असा त्या काळीं जोरात प्रचार चालू होता. आठ तास चरखा फिरविला, तर फक्त चार आण्यांची मजुरी मिळण्याइतकें उत्पादन होतें असें गणित भालाकार दुसऱ्याच अंकांत (२७–४–१९२५) मांडतात. चरख्याचा अवाजवी बडेजाव करण्यांत येत असे. चरख्यांतून मंजुळ आवाज निघतो, तो फिरविल्यानें चित्तशुद्ध होतें असें मांडण्यांत येई. अर्थात् वस्तुनिष्ठ विचार करणाऱ्या कोणाहि माणसाला हीं मतें पटणें शक्यच नव्हतें. भालाकार उपहास करण्यासाठी लिहितात, अहो, चरखा चावतो सुद्धा ! तेव्हा तो पोलिसांच्या ठाण्यावर पोलिसांच्या ऐवजीं ठेवावा. इतकेंच नव्हे तर, रानडुकरांना शेतांतून पिटाळून लावण्यासाठी त्याचा उपयोग करवा अशी हेटाळणीहि ते करण्यास मागेपुढे पाहत नाहीत.

गांधीजी क्रांतिकारकांचा उपहास करीत असत. ते वाट चुकलेले देशभक्त आहेत, ते खरे ब्रह्मचारी नाहीत असें म्हणत असत. फासावर जाणारे खरे ब्रह्मचारी नाहीत, असें गांधींनी मैमनसिंग येथील विद्यार्थ्यांना सांगितलें. त्यांनी गांधींना उत्तर दिलें की, चरखा फिरविण्यापेक्षा फासावर लटकण्याचें पत्करूं. तुम्ही रोज अर्धा तास चरखा फिरवा म्हणजे तुमच्या इंद्रियांचें दमन होईल, असा गांधीजींनी त्यांना उपदेश केला. त्यावर भालाकार म्हणतात की, गांधींना 'चरखावेड' लागल्यानें बॅ. रामराव देशमुख यांनी म्हटल्याप्रमाणे गांधींनी काँग्रेसची दगदग सोडून वर्षभर साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांत विश्रांति घ्यावी. गांधींच्या अहिंसेच्या आग्रहाबद्दल ते एके ठिकाणीं लिहितात की, "कर्म आमचें. गांधींनी 'अहिंसारहस्य' ग्रंथ लिहावा म्हणजे लोकांना त्यांचीं लोकविलक्षण मतें कळतील."

### करबंदीला विरोध :

काँग्रेसनें करबंदी करण्याची चळवळ सुरू केली होती. कर न देण्याचें जनतेला आवाहन करण्यांत फायद्यापेक्षा नुकसानच जास्त होईल, असें ते सतत लिहीत असत. कर वसूल करून घेण्यासाठी सरकार मालमत्तेचा लिलाव करतें. अशा

लिलावांत मालमत्तेला योग्य किमत मिळत नाही त्यामुळे मूळ मालकाचें विनाकारण नुकसान होतें आणि सरकार थकलेला कर मात्र वसूल करून जातें. म्हणजे करबंदीचें उद्दिष्ट साध्य होत नाही. या परिस्थितीवर टीका करतांना भालाकार म्हणतात की, "करबंदी म्हणजे दुप्पट चंदी." त्यांनी एकदा त्यावर 'करबंदी का भरचंदी' हा अग्रलेखहि (४–५–१९३१) लिहिलेला आहे.

त्याचप्रमाणे सत्याग्रहाबद्दलहि ते भाल्यांत अनेक प्रसंगीं आपली मतें व्यक्त करतात. ज्याच्याविरुद्ध सत्याग्रह करावयाचा त्याच्या मनांत मायेचा ओलावा पाहिजे. एरवी तो यशस्वी होणार नाही, असा मुद्दा ते आवर्जून मांडीत असत. सत्याग्रही धीट व स्वार्थत्यागी आहे हें मान्यच. पण आम्हांला लोकमान्यांचा बहिष्कार अधिक पसंत होता.

## खादी आणि गिरणींतील कापड :

कापड स्वदेशी असलें तरी पुरें. मग ते गिरणींतील मागावर तयार केलेलें असलें तरी चालेल, असें भालाकारांचें म्हणणें. उलट खादी वापरण्यावरहि गांधीजी अवास्तव जोर देत होते. त्यामुळे या विषयावर 'भाला'त आपल्याला अनेक अग्रलेख आणि स्फुट लेख वाचावयास सापडतात. खादी हवी का मागी हवी, असें ते विचारतात. भाऊसाहेबांना समसमान किंवा अनुप्रासादिक शब्द तयार करून, ते आपल्या लिखाणांत वापरण्याची भारी हौस होती. त्यामुळे त्यांनी यंत्रमागावर तयार केलेल्या कापडाला 'मागी' असें म्हणण्यास प्रारंभ केला. त्यावर अनेक लेख लिहिले आणि भाषणें दिलीं. खादी खरखरीत असते, तलम नसून जाडीभरडी असते, एकदा फाटली की ती शिवणें कठीण जातें आणि ती शिवलीच तरी शिवण टिकत नाही, असे अनेक आक्षेप ते घेत असत. खादीचीं पातळें बटबटीत दिसतात म्हणून ते त्या पातळांना खांदळें असें म्हणतात. खादीचें पातळ जाड असल्याने व तें अंगावर चापून-चोपून बसत नसल्याने एखाद्या कुमारिकेबद्दल गैरसमज व्हावयाचा, असें ते उपाहासाने म्हणत असत !

काँग्रेसच्या सभासदाला खादीचाच पोशाख करण्याची अट असूं नये असा त्यांचा आग्रह होता. त्यावरहि ते सतत टीका करीत. दोन-दोन रुद्राक्षांच्या माळा घालाव्या अशी एखादा माणूस खादीच्या कपड्यासारखीच अट घालूं लागला, तर तीहि पाळायची का, असा प्रश्न ते टाकीत असत. प्रत्येकाने खादीचें कापड वापरावें असा प्रचार चालू झाल्यावर त्यांनी कांही आकडेवारी पुढे मांडावयास सुरुवात केली. त्या वेळीं फार फार तर दीड कोटि रुपयांची खादी तयार होत असे आणि अखिल भारतांत चार-पांचशे कोटि रुपयांचें कापड लागत असे. तेव्हा सर्वांनी ठरविलें आणि नियम केला, तरी खादी वापरतां येणार नाही. कारण ती अपुरीच पडेल असेंहि त्यांनी मांडलें. त्या वेळीं विलायती कापड व सूत बरेंच आयात होत असे. त्यामुळे विलायती कापड

वापरण्यापासून लोकांना परावृत्त करण्यासाठी पिकेटिंग करण्यांत येत असे. अशा मार्गावरहि भालाकारांनी झोड उठविलेली आढळते. आयात केलेलें कापड वापरूं दिलें नाही किंवा तें जाळून टाकलें, तर त्यापासून फायदा कसा होईल, असा प्रश्न ते विचारीत. इंग्लंडमध्ये पैसा देऊन कापड घेतलें की तें भारताने वापरलें किंवा न वापरलें तरी त्यांचे पैसे वसूल झालेले असत. पण त्या काळीं गांधीजींच्या प्रचाराच्या जाळ्यांत भावनेने, सत्प्रवृत्तीने गुंतले गेलेल्या मंडळींच्या ध्यानांत या गोष्टी येत नसत. भालाकार म्हणत की, पिकेटिंग करण्यापेक्षा अशा मालावर बहिष्कार घाला म्हणजे इंग्लंडमधील गिरण्यांना त्याची आच पोचेल. भारतांत कापड खपेनासें झालें म्हणजे बेकारी निर्माण होऊन इंग्लंडमध्ये आपल्या चळवळीचे चटके बसूं लागतील.

## भारतीय कापड गिरण्यांवर कटाक्ष :

हा आग्रह धरीत असतांना भारतांतील गिरण्यांनी स्वतः उत्पादन केलेल्या मालावर फक्त सहा टक्के नफा घेतला पाहिजे आणि एका भागाला एकमत दिलें पाहिजे असें मत ते मांडीत असत. गांधींची खादी हातविणीची, तर भोपटकरी खादी गिरणीच्या सुताने विणलेली असते, असें त्यांचें मत होतें ! गिरणीचें कापड वापरलें तरी चालेल, तेंहि स्वदेशीच आहे, असें ते सतत मांडीत असत. सूत चरख्याचें आणि वीण हातमागाची या गांधीस्मृतिऐवजी सूत गिरणीचें व वीण हातमागी अशी भालाकार स्मृति हवी असें ते लिहीत असत. चरख्याचा धंदा जोडधंदा असला, तर मागाचा धंदा गोड आहे, असें सांगणारा त्यांचा एक अग्रलेख (२८–५–१९२८) वाचावयास सापडतो. कापडशहा इंग्रज आणि खादीराणी ही जोडी समान नाही, असें ते म्हणत असत. चरख्यावर सूत कातणाऱ्याला ते 'सुताळ' म्हणत आणि गांधीवाद्याला 'गांधाळ' असें गमतीने म्हणत. ज्यांना व्युत्पत्ति वगैरेचा आधार सापडणार असे नवे नवे शब्द तयार करून ते मांडण्याची त्यांना हौस होती. त्यांनी सुचविलेले अनेक सुटसुटीत अर्थयुक्त, कर्णमधुर शब्द मराठी भाषेंत रूढ झालेले आहेत. त्याची चर्चा पुढे करण्यांत आली आहे.

खादीचा शोध गांधीजींनी लावला आणि भारतांत गांधीजींनीच प्रथम खादीचा प्रारंभ केला असा मतप्रवाह त्यावेळीं प्रचलित होता. किंबहुना आजहि खादीचें जनकत्व गांधीजींना देण्यांत येत असतें, परंतु गांधींनी तिचा प्रसार सुरू करण्यापूर्वी अनेक वर्षें 'सार्वजनिक काका' या नांवाने प्रसिद्ध असलेल्या श्री. गणेश वासुदेव जोशी यांनी खादी वापरावयास सुरुवात केलेली होती असें भालाकारांनी मांडलें होतें (१३–७–१९३१).

## खादीचा अतिरेक :

खादी वापरण्याचे फायदे भालाकारांना कांही अंशी मान्य असले, तरी त्याचतेव्हा जो अतिरेक चालू होता त्यामुळे भालाकार खादीवर सतत टीका करीत असत

असें वाटतें. कै. रवींद्रनाथ टागोर यांनीहि खादीविरुद्ध मत प्रदर्शित केलेलें होतें. तें उद्धृत करून भालाकारांनी डॉ. रवींद्रनाथ व खादी या नांवाचें एक स्फुट (१८-५-१९३१) लिहिलेलें आहे. टागोर या बाबतींत जें मत स्पष्टपणें व्यक्त करतात तें येथे उद्धृत करण्यासारखें आहे. टागोर लिहितात, "खादीसारख्या खुळ्या चळवळीच्या मागे लागण्यापेक्षा दुसऱ्या विधायक चळवळी राष्ट्रानें हातीं घ्याव्या. नुसतें राष्ट्रीय निशाण व चरखा फिरवून स्वराज्य मिळण्याची आशा धरणें व्यर्थ आहे."

## गांधी-टोपी आणि टिळक-टोपी :

लोकमान्य टिळकांच्या आणि त्यांच्या पूर्वीच्या काळांत सर्वसामान्यपणें फेटा, पागोटें, पगडी किंवा काळी (क्वचित् जरीची, वेलबुट्टीची) टोपी घालण्याचा प्रघात होता. प्रेतयात्रेंतच माणसें बोडकीं जात असत. बोडकें जाणें अशुभ मानण्यांत येत असे. पांढऱ्या किंवा खादीच्या टोपीची सुरुवात गांधीयुगांत झाली. हळूहळू या टोपीला खळ लावून कडक इस्त्री करण्याचा प्रघात पडला आणि पुढे तिचा टोकदारपणा आणि कोन यांना महत्त्व येत गेलें. कॉंग्रेसवाल्यानें गांधीटोपी घातलीच पाहिजे अशी रूढि पडत गेली. परंतु सुरुवातीच्या काळांत पगडी नि पागोटें मागे पडत गेलें तशी काळी टोपीहि रूढ होत गेली. भालाकारांच्या काळांत काळ्या टोपीला गांधी विरोधाचें रूप चढत गेलें. पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रसार वाढला तसा लोकरीची काळी टोपी त्यांच्या गणवेशांत महत्त्वाचें स्थान पटकावून बसली. साहजिकच गांधी-टोपीविरुद्ध काळी टोपी असा एक प्रकारचा संघर्ष सुरू झाला. पांढऱ्या टोपीला गांधी-टोपी म्हणण्यास सुरुवात झाली तसें भालाकार भोपटकरांनी काळ्या टोपीला 'टिळक-टोपी', 'समर्थ-टोपी' असे संबोधण्यास प्रारंभ केला. हा वाद वाढत गेला तशा अनेक प्रसंगीं काळ्या टोप्या दंगेखोरांकडून जाळण्यांत आल्या.

या कृत्यामागे विरोधाप्रमाणेच काळी टोपी संपूर्ण स्वदेशी नाही अशी खोटी भावना होती. या भावनेंतील वैयर्थ्य दाखवीत गांधी-टोपीहि संपूर्णपणें स्वदेशी नाही असें भालाकारांनी सांगण्यास, लिहिण्यास सुरुवात केली. ते लिहितात की, सर्वजण समजतात तशी गांधी-टोपीहि स्वदेशी नाही. कारण ती यंत्रावर शिवलेली असते आणि शिवण्याचा दोराहि परदेशी असतो. इतकें सांगून ती सुबकहि दिसत नाही, असाहि त्यावर शेरा मारतात. तसेच डोक्यावर गांधी-टोपी घालून मिरविणाऱ्या लोकांना तोंडानें परदेशी सिगरेटचे धूम्रपान करणें कसें चालतें, असाहि ते प्रश्न विचारतात. ते असा तात्त्विक मतभेद दाखवीत असले, तरी मद्रास इलाख्यांतील गुंटूर जिल्ह्यांत वकिलांनी गांधी-टोपी घालूं नये असें सांगून, न्यायालयानें १४४ कलमान्वये बंदी केली तेव्हा गांधी-टोपीवर असा कटाक्ष का असा प्रश्न भालाकारांनी

उपस्थित करण्यास अनमान केला नाही (१८–८–१९३३). अर्थात् त्यांनी हें लिहिलें की, गांधी-टोपीच काय, पण कोणत्याहि टोपीवर वक्रदृष्टि ठेवूं नये.

### कायदेभंगापेक्षा फायदेभंग श्रेयस्कर :

गांधीजींच्या कायदेभंगाच्या चळवळीशींहि भालाकार सहमत नव्हते. कायदेभंग करून सरकारचा तोटा होत नाही, असें त्यांचें मत होतें. त्यासंबंधी आपलीं मतें व्यक्त करण्यासाठी त्यांनी 'कायदेभंग का फायदेभंग' या नांवाचा अग्रलेख लिहिला (३०–११–१९३१). त्यांत ते लिहितात की, कायदे मोडण्यापेक्षा (सरकारचे) फायदे तुटतील अशी चळवळ केली पाहिजे. तसेंच सत्याग्रह करण्यापेक्षा बहिष्कार घालणें अधिक परिणामकारक होईल असें ते प्रतिपादीत असत. गांधींनी मिठाचा सत्याग्रह केल्यामुळे अनेक लोकांनी तो मार्ग अनुसरला. मिठावर जो कर होता तो खरे तर क्षुल्लक होता. तो कर रद्द करून जनतेचा फारसा लाभहि होणार नव्हता. अर्थात् कायदेभंगाचें तें एक लाक्षणिक रूप होतें. पण सत्याग्रहाचा जणू प्रसाद म्हणून समुद्राच्या पाण्यापासून तयार केलेलें मीठ 'गांधीनु मीठू' या नांवानें एका तोळ्याला एक आणा (रुपयाचा सोळावा भाग) किमतीनें विकण्यांत येत असे. त्यावर भालाकार विचारीत की, हें मीठ गरिबांना कसें परवडणार? पूर्वी आगगाडींत युरोपीय लोकांसाठी वेगळा डबा राखून ठेवलेला असे. तो प्रवासी लोकांत नेहमी वादाचा आणि अपमानकारक असा मुद्दा असे. हें गार्‍हाणें रास्त आहे आणि त्या डब्यांत घुसलें म्हणजेच कायदेभंग केला, तर हा अन्याय दूर होण्याचा संभव भालाकार नाकारीत नाहीत. परंतु हेंहि स्पष्ट करतात की, कायदेभंग करून स्वातंत्र्याची पैदास होईल ही कल्पना बुद्धीस पटणारी नाही. महात्मा गांधींनी एका प्रसंगीं आपण परदेशी कापड-बहिष्कार समितीचे अध्यक्ष आहोंत अशी सबब पुढे करून खटला लढविला होता. सत्याग्रह्यानें स्वतःचा खटला लढवूं नये. हो, मी कायदेभंग केला. कायद्यान्वये जो शिक्षा असेल ती मी भोगण्यास तयार आहे असें प्रतिपादण्यांत येत असे. अनेक सत्याग्रह्यांनी हा मार्ग स्वीकारून शिक्षाहि भोगल्या होत्या. परंतु गांधीजींनी खटला लढविलेला पाहिल्यावर भालाकार गप्प बसणें शक्यच नव्हतें. त्यांनी गांधींवर जबर टोकास्त्र सोडलें. ते लिहितात की, "धड ना पुरुष, धड ना स्त्री, अशा तृतीय प्रकृतीच्या व्यक्तीप्रमाणे असलेला असहकारितेचा मार्ग गांधींनी नेहमी सोडावा. या मार्गानें स्वराज्य मिळेल अशी स्वप्नांतहि कल्पना करूं नये. त्यांनी असें लिहिलें असलें तरी, देशासाठी सोसलेले हाल आणि भोगलेला कारावास, हा काशी येथे वास करण्याइतका पावन व पुण्यकारक आहे असेंहि त्यांनी म्हटलेलें आहे. तुरुंगात कमखाना व गमखाना" असाहि ते उपदेश करतात.

### टिळकपक्षीयांवर टीकास्त्र :

गांधींच्या चळवळीशीं आणि ते प्रतिपादीत असलेल्या मार्गाशीं भालाकार

भाऊसाहेब भोपटकर यांचीं मतें पूर्णपणें विरुद्ध होतीं. टिळक-पक्षांतील अनेक धुरीणांनी आपद्धर्म म्हणून सत्याग्रहांत भाग घेतला, शिक्षा भोगल्या, खादीचा स्वीकार करून आपल्या डोक्यावर गांधी-टोपीहि चढविली. एके काळीं 'भाला' पत्र काढण्यांत सहभागी असलेले भालाकारांचे बंधु अण्णासाहेब भोपटकर यांनीहि सत्याग्रह केला, पण खटला चालविला. गांधी-टोपी त्यांनी घातली नाही, परंतु खादी वापरून डोक्यावर खादीचा फेटा चढविला. भावाचें हें वागणें नापसंत असल्यामुळे भाऊ-साहेबांनी त्यांच्यावर आणि इतर टिळकपक्षीयांवर टीकेचे बाण किंवा भाल्याच्या फेकी टाकण्याचें सोडलें नाही. अण्णासाहेबांच्या मस्तकावर त्यांनी प्रथम खादीचा मोठा फेटा पाहिला तेव्हा त्यांना काय वाटलें त्याचा भालाकार व्याख्यानांतून पुढे अनेक वर्षे उल्लेख करीत असत. आपले दोन्ही पंजे कानांच्या बाजूने धरून त्या अवजड, बोंगळ फेटयाचें तें वर्णन करीत आणि उपाहासाने म्हणत, "अरे अण्णा ! तुझं असं कसं रे झालं ?"

### गांधीवादाचे इतर टीकाकार :

भालाकारांचा हा स्पष्टवक्तेपणाच त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागण्यास कारणीभूत झाला असला पाहिजे. गांधींवर पुढे पुढे जरी अनेक प्रकारच्या टीका होत गेल्या, तरी प्रारंभीं गांधीयुगाची कमान चढती होती. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर भारताला एक महान् नेता लाभलेला होता. त्याने आम जनतेला सहभागी होता येईल असा सोपा, सुटसुटीत मार्ग पुढे ठेवला होता. मी एका वर्षांत स्वराज्य मिळवीन अशी गर्जनाहि त्यांनी केली होती. गांधींचा साधासुधा आणि बराच साधुत्वाकडे कलणारा वेश आणि त्यांची वर्तणूक याची जनतेवर मोठ्या प्रमाणांत मोहिनी पडलेली होती. अनेक मोठमोठे आणि नांवाजलेले पुढारी गांधीजींचें अनुयायित्व पत्करीत होते. एकदा भावना उद्दीपित झाली की तर्क मागे पडतो; परंतु भाऊसाहेब भोपटकर हे भावनाप्रधान नव्हते. ते रोखठोक व्यवहार करणारे आणि अत्यंत स्पष्टवक्ते होते. त्यांना जें मत पटेल तेंच बोलावयाचें आणि स्वमतानुसार वर्तन करावयाचें असा त्यांचा बाणा होता. १९४२ सालच्या चळवळीच्या वेळेला किंवा दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानंतर गांधीवादाला ओहोटी लागली. त्यांचेच अनेक पट्टशिष्य त्यांच्या विरुद्ध उभे राहूं लागले. त्या वेळीं विविध वृत्ताचे संपादक रामभाऊ तटणीस, आचार्य प्र. के. अत्रे यांनी भालाकारांपेक्षाहि अधिक प्रखर भाषेंत गांधीवादी विचारसरणीची वैचारिक स्तरावर चिरफाड केली. स्वातंत्र्यवीर वि. दा. तथा तात्याराव सावरकर यांनीहि आपल्या प्रखर वाणीने आणि दाहक लेखणीनें गांधीवादावर जबरदस्त तडाखे मारले. ही मंडळी भालाकारांपेक्षा सर्वच दृष्टींनी जबर होती आणि काळहि पालट-लेला होता. गांधीवादाचा बार फुसका ठरलेला होता आणि स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी त्या वादाच्या मर्यादाहि सर्व विचारवंतांच्या ध्यानांत आलेल्या होत्या.

## भाऊसाहेबांची चिकाटी :

भालाकार गांधीवादाविरुद्ध 'भाला' पत्रांतून मतप्रदर्शन करीत होते तेव्हा त्यांना साथ द्यायला कोणीहि समर्थ माणूस पुढे येत नव्हता. ते एकट्याच्या सामर्थ्यावर गांधींच्या विचारसरणीविरुद्ध वैचारिक लढा देत होते. वाणीनें आणि लेखणीनें एक लोकप्रिय लाट थोपवून धरण्याचा हा प्रयत्न होता. भालाकार एकाकी पडलेले असले, तरी अत्यंत चिवटपणें आणि चिकाटीनें आपलें काम करीत होते. स्वमताला ते अत्यंत प्रामाणिकपणें चिकटून राहिले. कठीण कार्य करतांना त्यांना उपहासाला आणि अवमानाला तोंड द्यावें लागलें. पण ते आपल्या मतापासून कधीहि विचलित झाले नाहीत.

भाऊसाहेबांसंबंधी विचार करूं लागलें म्हणजे त्यांची ती स्थूल आणि ठेंगणी मूर्ति नजरेसमोर उभी राहते. त्यांनी आपल्या अंगावर खादीची झूल कधी चढविली नाही. तसाच परदेशी कापडाचा किंवा वस्तूचाहि त्यांच्या शरीराला कधी स्पर्श झाला नाही. साधें किंवा दाभणकाठी धोतर, पांढरा सदरा आणि त्या काळीं प्रचलित असलेला बदामी रंगाच्या कापडाचा कोट, खांद्यावर रंगीत काठाचें उपरणें, डोक्यावर काळी, गोल आकाराची टिळकटोपी, डाव्या बगलेंत दाबून धरलेली छत्री व पायांत साध्या चपला, हा त्यांचा ठरलेला पोशाख होता. वय वाढल्यावर पुढे पुढे ते छत्री किंवा काठीचा आधार घेत रस्त्यानें जात असत. त्यांचा वर्ण काळाच होता आणि त्यांच्या चष्म्याच्या काड्याहि काळ्याच असत. हा त्यांचा वेश त्या काळांतहि वैशिष्ट्यपूर्ण होता. त्यांचे बंधु अण्णासाहेब हे लांब कोट घालीत व तुमान (पँट) वापरीत असत. त्यांना विडीचें व्यसन होतें, परंतु भाऊसाहेबांना कोणतेंच व्यसन नव्हतें. त्या काळांत बहुसंख्य लोकांची राहणी अगदी साधी असे. आज प्रकर्षानें आढळणारी आधुनिक राहणी व छानछोकी त्या काळांत नव्हती. आजच्यासारखा पाश्चात्त्य संस्कृतीचा आणि विचारसरणीचा पगडाहि सर्वसाधारण समाजावर बसलेला नव्हता. साधी राहणी आणि उच्च किंवा आदर्श विचारसरणी हें त्या काळचें ब्रीद होतें. भालाकार भाऊसाहेब भोपटकर हे परंपरागत वागणुकीचें एक प्रतीक होतें असें म्हणणें योग्य होईल.

## दरिद्री नारायणावरील टीकेची कारणमीमांसा :

याच्या सर्वस्वीं उलट गांधीजींचा वेश होता. गोलमेज परिषदेला जावें न जावें अशा दोलायमान परिस्थितींत ते असतांना त्यांच्या साध्या पोषाखाला, खाण्यापिण्याला प्रसिद्धि देण्यांत येऊं लागली. दरिद्री भारतदेशाचा हा दरिद्रीनारायण आहे, असें म्हणण्यांत येऊं लागलें. चर्चिलसारख्या कट्टर साम्राज्यवाद्यानें तर त्यांना 'नंगा फकीर' म्हणून पुढे हिणविलें. तसेंच भालाकारांनीहि 'हिंदुस्थानांतील नंगा फकीर' या नांवानें एक स्फुट लिहिलें. गांधीजींच्या पोषाखावर व खाण्यापिण्याच्या सवयी-

वर भाला पत्रानेहि शरसंधान केलें. भाल्याचे जुने अंक पाहिले, तर एका अंकांत गांधीजींचीं तीन छायाचित्रें आपल्याला दिसतात. इंग्रजी पद्धतीचा सूट आणि नेकटाय घातलेले, गांधी टोपी आणि सदरा घातलेले आणि गुडघ्यापर्यंत पंचा नेसलेले व अंगावर उपवस्त्र घेतलेले. त्यावर शीर्षक असतें – बापूजींचे तीन पोशाख.

म. गांधींच्या दैनिक आहारावर, त्यांच्या मोशी वॉटरवर आणि बदामाच्या तेलाने अंगमर्दन करण्याच्या रिवाजावर पुढे अनेक मंडळींनी प्रहार केले. हा कसला दरिद्रीनारायण असे लेख लिहिले. गांधीजी दररोज शेळीचें १ शेर दूध, गायीच्या तुपांत भिजवून ठेवलेल्या खजुराच्या २५ बिया, ६ मोसंबीं आणि बदामाचा शिरा खात असत. हा आहार पौष्टिक आणि सात्विक असला, तरी अत्यंत महागडा होता. ज्या देशांतील बहुसंख्य जनता अर्धपोटी किंवा उपाशी राहते त्या देशांत तर तो विसंगतच होता. तो एका दरिद्रीनारायणाचा आहार आहे, असा बडेजाव मारण्यासारखें किंवा त्याचा अभिमानाने प्रसार करण्यासारखें त्यांत कांही नव्हतें. अशा परिस्थितींत भालाकारच काय, पण कोणीहि टीका करणें साहजिकच होतें. गांधींच्या परिवारांत मोडणाऱ्या सौ. सरोजिनी नायडू यांनी त्यावर टीका केलेली होती. 'It is costly to maintain this poor man' अशा अर्थाचें त्यांचें एक वाक्य या संदर्भांत येथे उद्धृत करण्याजोगें आहे.

## गांधीजींच्या थोरपणाविषयी आदर :

भालाकारांनीहि टीकास्त्र सोडलें असलें, तरी त्यांना गांधीजींचें मोठेंपण मान्य होतें. ते म्हणतात की, ते महापुरुषांपैकी एक महापुरुष आहेत आणि ते थोर गृहस्थ आहेत याविषयी मतभेद नाही. लोकमान्यांच्या पश्चात् त्यांनी सर्वोत्कृष्ट देशसेवा केलेली आहे. त्यांचें कार्यहि मोठें आहे. त्यांच्याच प्रभावाने ६० हजार सत्याग्रह्यांनी तुरुंगवास पत्करला; परंतु त्यांचें सारें वागणें लोकविलक्षण असल्याने टीका करावी लागते. त्यांनी प्रकृति स्वास्थ्यासाठी रोज दहा रुपयांचे पदार्थ खाल्ले तरी हरकत नाही, परंतु खादीचा हट्ट धरतांना धोतराच्या काठांत परदेशी सुताचा एखादा धागा आला तरी ज्यांना चालत नाही त्यांना परदेशांतून येणारा खजूर कसा चालतो, हें समजूं शकत नाही. याच संदर्भांतील एका लेखांत भालाकार पुढील श्लोक लिहितात, "खजूर आहे परदेशी । गांधी खातात दर दिवशीं । परि सांगतात इतरांशीं । तुम्ही खादी वापरा ।।" गांधींच्या वर्तणुकीचा विचारवंताला अंदाज करतां आला नाही की त्यांत कधी सुसंगतता व तर्कशुद्धता दिसली नाही. गांधीशीं त्यांचे फक्त तात्त्विक मतभेद होते. त्यामुळे इंग्लंडमधील हवेंत थंडी होते तेव्हा गांधीजींनी तेथील वास्तव्यांत गरम बाराबंदी घालावी, असेंहि ते सुचवितात. पुण्यांत लक्ष्मी रस्ता तयार होत असतांना तेथे एक मनोरा उभारण्याचा बूट निघाला होता. तेव्हा भालाकारांनी

लिहिलें की, त्या कामासाठी कोणी पैसे देईल म्हणून कोणा पैसेवाल्याच्या नांवाने तो बांधूं नये. गांधींच्या नांवानें तो उभारला तरी चालेल.

**सनातनी सुधारक :**

'भाला' पत्रांत अनेक विषयांवर चर्चा व टीका-टिप्पणी करण्यांत येत असे. त्या काळांत डॉ. आंबेडकर हे पूर्वास्पृश्य पुढारी नुकतेच उदयास येत होते. ते दलित समाजाचें नेतृत्व करून चळवळी करूं लागलेले होते. रत्नागिरींतील स्थानबद्धतेच्या काळांत बॅ. सावरकर यांनी अस्पृश्यतानिवारणाची चळवळ हातीं घेतलेली होती. श्री. बापूसाहेब माटे व इतर अनेक मंडळींनी 'अस्पृष्टांचा प्रश्न' हातीं घेतलेला होता. त्यामुळे राजकीय चळवळीबरोबरच सामाजिक व धार्मिक चळवळींनाहि उधाण आलेलें होतें. जातवार मतदार-संघ स्थापन करण्याचा विचार सुरू झालेला होता. त्यामुळे स्पृश्य व अस्पृश्य हिंदु, हिंदु आणि मुसलमान यांच्यातील चळवळींना तेज चढूं लागलेलें होतें. त्यांच्यांत तेढहि वाढत होती. ब्रिटिश सरकार आणि परिस्थिति त्याला उत्तेजन देत होती, खतपाणी घालीत होती. फोडा आणि झोडा हीच त्यांची राजनीति होती.

ही परिस्थिति भाऊसाहेब भोपटकरांच्या दृष्टीने फार कठीण होती. ते सनातनी हिंदु होते. त्यांनी स्वतःच सांगितलें आहे की, मी राजकारणांत स्वराज्यध्येयी आणि धर्मकारणांत सनातनी आहे. ते पुढे म्हणतात की, मी सनातनी असलों, तरी २५ टक्के सुधारकहि आहे. शास्त्रापेक्षा रूढि श्रेष्ठ असते असें त्यांचें मत होतें. त्यामुळे त्यांना अस्पृश्यांवरील अन्याय दूर व्हावयास पाहिजे हें मनोमन पटत असलें, तरी ते इतर सुधारणावाद्यांसारखे एकदम पुढे पाऊल टाकावयास तयार नव्हते. सावरकरांसारखे रोटीबंदी, बेटीबंदी वगैरे हिंदु समाजाला जखडून टाकणाऱ्या बेडचा तोडून टाकण्यास तयार नव्हते. अस्पृश्यांशीं सार्वजनिक ठिकाणीं भेट व्हावयास हरकत नाही, इतकीच भालाकारांच्या सुधारणेची झेप होती. त्यामुळे सावरकरांनी आरंभलेलें सहभोजन त्यांना अमान्य होतें. ब्राह्मण सहभोजन करूं लागले की ते मांसाहारहि सुरू करतील अशी भीति त्यांना वाटत होती. हिंदु धर्मांत सुधारणा घडविण्यासाठी वीर सावरकर ज्या ज्या चळवळी करीत होते, त्या त्या कार्याला भालाकार कडाडून विरोध करीत होते. अस्पृश्यांनी मंदिरांत प्रवेश करायला ते विरोध करीत. या मंदिरप्रवेशासाठी पुणें व नाशिक इत्यादि ठिकाणीं सत्याग्रह होत होते. सर्व हिंदु समाज नव्या नव्या सुधारणांनी ढवळून निघत होता. या धर्ममंथनांतून एकसंध व बलिष्ट हिंदु समाजाचे अमृत बाहेर पडेल असें सुधारकांना वाटत होतें.

**सावरकरांशी मतभेद :**

वीर सावरकरांनी आणखी एक पाऊल पुढे टाकून रत्नागिरीमध्ये शेठ भागोजी कीर यांच्या मदतीने पतितपावन मंदिर बांधून त्यांनी तेथील मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

एका पूर्वास्पृश्य मुलाच्या हातून करविली. शंकराचार्य कुर्तकोटींच्यापासून अनेक मोठमोठे पुढारी रत्नागिरींत सावरकरांनी चालविलेली चळवळ प्रत्यक्ष पाहण्यासाठी रत्नागिरीस जाऊं लागले. पतितपावन मंदिरांत दर्शन घेऊं लागले. भालाकारांना ही चळवळ पसंत नव्हती. ते अस्पृश्यांना मंदिराच्या आवारांत येऊं द्यावयास तयार होते, पण एकदम त्यांना गाभाऱ्यांत प्रवेश देण्यास तयार नव्हते. 'शास्त्रात् रूढिर्बलियसी' असें त्यांचें प्रामाणिक मत होतें. विरोधी लोकांना सावरकर झिडकारीत नव्हते. त्यांच्याशीं युक्तिवाद व शास्त्रवाद करीत होते. तरीहि त्यांना सुधारणा पटल्या नाहीत, तर जुन्या सनातनी मंडळींना बाजूला ठेवून नव्या पिढीला आवाहन करीत आपली चळवळ पुढे नेत होते. भालाकार गांधींप्रमाणेच सुधारणावादी सावरकरांच्या विचारसरणीवर प्रहार करीत होते. त्यांना वेड लागलें आहे, त्यांच्या वेडगळ कार्याला लोकांनी पाठिंबा देऊं नये असें लिहीत होतें. शेठ भागोजी कीर यांनी सावरकरांच्या नादीं लागून लाख दीड लाख रुपये निष्कारण वाया घालवूं नयेत, असें त्यांना आवाहन करीत होते. हें पतितपावन मंदिर नसून, पतित करणारें मंदिर आहे असेंहि त्यांनी रागाने सांगितलें आहे.

सावरकरांनी गोमातेवर, गोमुत्रावर आणि गोपूजनावर घणाघाती प्रहार सुरू केले. त्या वेळीं अनेक हिंदूंप्रमाणे भालाकारहि अस्वस्थ झाले. सनातनी मंडळींना असा धक्का बसणें साहजिकच होतें. त्यामुळे सावरकरांचा हा 'नवमतवाद' (वरील टीका) नसून 'शवमतवाद' आहे, असें त्यांनी 'भाला'च्या वाचकांना सांगितलें. सावरकर आदि मंडळींना आचारप्रधान धर्म ठार करून, त्याला संघटनेच्या चितेवर जाळावयाचें आहे असें सांगून त्यांनी खेद व्यक्त केला.

### भालाकारांची हिंदूची व्याख्या :

सावरकरांनी हिंदुसंघटनेचें कार्य हातीं घेतलें तेव्हा त्यांनी निरनिराळे मार्ग चोखाळले. त्या मार्गांतील 'हिंदुत्व' हा तात्यारावांचा प्रबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. हिंदुसंघटनेच्या विशाल दृष्टिकोनांतून त्यांनी हिंदूची व्याख्या केली होती. हिंदुस्थानला जो पितृभू व पुण्यभू मानील तो हिंदु, अशी ती सर्वसंग्राहक व्याख्या होती. त्यांत शीख, जैन, लिंगायत वगैरे वेद न मानणारे पंथहि हिंदूंत सामावून घेण्याचा सावरकरांचा प्रयत्न होता. लोकमान्य टिळकांनीहि वेद मानणारा तो हिंदु अशी व्याख्या केली होती; परंतु 'हिंदु कोणास म्हणावें ?' या लेखांत (१२–११–१९२८) भालाकारांनी पुढील व्याख्या मांडली –

धेनुर्यस्य महामाता वेदा वै धर्मजीवनम् ।
प्रतिमापूजनं चैव स वै हिंदुरिति स्मृतः ।।

'गाय, गायत्री आणि गजानन' ही त्रयी मानेल ता हिंदु, मग तो हिंदुस्थानांत वा जगांत कोठेहि राहणारा असो, असें त्यांचें मत होतें.

वीर सावरकर, हिंदुमहासभा, आर्य समाज अशा अनेक मंडळींनी नि संस्थांनी इतर धर्मांत जाऊन बाटलेल्या लोकांचें शुद्धीकरण करण्यास सुरुवात केली. भालाकार त्याला विरोध करीत नव्हते; पण ते वेद व रूढि मानण्यावर भर देत असत. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करण्याची घोषणा केली, तर त्यांनी खुशाल बाटा असें लिहून टाकलें. थोडक्यांत सांगावयाचें तर ते स्वतःच म्हणत त्याप्रमाणे ७५ टक्के सनातनी होते.

## लोकमान्यपंथ :

लोकमान्य टिळकांच्यावर मात्र त्यांचें अतोनात प्रेम होतें. त्यांनी 'महाराष्ट्र धर्म व लोकमान्य धर्म' या नांवाचा अग्रलेख (५–१२–१९२७) लिहून पौर्णिमेपासून लोकमान्य धर्माची स्थापना केली. गाय, गायत्री व गजानन ही त्रयी समोर ठेवून त्यांनी या धर्माचीं वैशिष्टयें सांगितलीं. "पहिलें तें धर्मकारण। दुसरें तें राजकारण। तिसरें ज्ञानविज्ञान। सर्वविषयी॥" या धर्माची दीक्षा घेऊन उजव्या मनगटावर स्वस्तिक बांधलें पाहिजे असें सांगितलें. त्यांना पुढील महंतत्रयी महत्त्वाची वाटत असे : रामदास, शिवाजी व टिळक. या लोकमान्यपंथाचें लोकशिक्षण कसें करावें हें त्यांनी (३०–१–१९२८) लिहिलेलें आहे. त्यासाठी दर पौर्णिमेला भजन, भाषण आणि भैरवी या त्रयीचे साहाय्य घ्यावें असें सांगितलें. ते म्हणतात, "डफावर थाप पडली की लोकांची थाप जमलीच. तुणतुण्याच्या तारेबरोबर अंतःकरणाची तार हलू लागून श्रोत्यांची तन्द्री लागली म्हणजे व्याख्यानाची चिचुंद्री सोडावयाची." हें शिक्षण कोणाला देतां येईल याविषयी भालाकार जें मत व्यक्त करतात तें या सूचनांपेक्षाहि त्यांची विशिष्ट विचारसरणी स्पष्ट करणारे आहे. "मिशा काढलेले, तोंडांत पांढऱ्या विडचा व पोटांत ईशभक्ति नसलेले तरुण लोकशिक्षणास कुचकामी होत" असें ते सांगतात. (मिशा काढणें भालाकारांना त्या वेळीं अजीबात पसंत नसावें असें दिसतें. गामा आणि गुंगा नांवाचे त्या काळीं नांवाजलेले मल्ल होते. त्या गामाने झिस्को नांवाच्या पाश्चात्त्य मल्लाचा पराभव केला होता. त्या वेळीं त्यांनी विचारलें होतें की, मिशा काढूपणामुळे मिशावाढू गामापुढे झिस्कोचा पराभव झाला नाही ना?) एका अंकांत ते लिहितात की, "आधी परमेश भजन। मग विषयाचें विवरण। शेवटीं शाहिरी गायन। पोवाड्यांचें॥"

## धर्मकारण आणि राजकारण :

स्वतःच्या जीवनांत राजकारणापेक्षाहि धर्मकारणाला ते अग्रस्थान देत हें त्यांच्या पुढील श्लोकांवरून दिसून येतें. ते 'राष्ट्रीय सभा विरुद्ध वर्णाश्रम संघ' या लेखांत लिहितात, "आधी करावें धर्मकारण। मग पहावें राजकारण। नंतर ज्ञानविज्ञान। सर्व विषयी असावें॥ १॥ धर्मावाचून राजकारण। जैसें सकेशेचें आभरण। एका कुंकमतिलकाविण। व्यर्थ जिणें तयेचें॥ २॥ धर्म राखून राजकारण। केलें

तरीच तें भूषण । दुग्ध-शर्करामिश्रण । जणू अमृत दुसरें तें ।। ३ ।। श्रीसमर्थ हेंच वदले । मींही तेंच प्रतिपादिलें । अर्थ एकचि शब्द निराळे । वाचक चतुर जाणती ।। ४ ।। " यावरून त्यांच्या मताचा कल कसा झुकत होता हें ध्यानांत येतें. त्यामुळे लोकमान्यपंथ हें विसाव्या शतकांतील रामदासीपंथाचें नामांतर आहे असें ते मांडतात तेंहि साहजिकच वाटतें. ते धर्माभिमानी कसे होते हें त्यांनी लिहिलेल्या पुढील श्लोकावरूनहि ध्यानांत येतें : " धर्मासाठी जो कष्टला । तो मरोनी अमर झाला । धर्म सोडोनी जो जगला । तो संचरे प्रेतरूपें ।। "

**लोकमान्य-भोजन :**

परदेशांत निरनिराळ्या प्रसंगांनी मोठमोठ्या रकमा वर्गणी म्हणून घेऊन भोजनसमारंभ करावयाची पद्धत आहे. त्या कल्पनेवरून त्यांनी लोकमान्य भोजनाची कल्पना काढून त्यासंबंधी ५ जुलै १९२६ च्या अंकांत एक स्फुट लिहिलें. इंग्रजी तारखेप्रमाणे लोकमान्य १ ऑगस्टला मरण पावले. तेव्हापासून इंग्रजी तारखेप्रमाणेच त्यांची पुण्यतिथि साजरी करण्यांत येते. त्या कल्पनेला विरोध करून भालाकार सुचवितात की, ही पुण्यतिथी इंग्रजी तारखेनुसार न करतां आषाढ वद्य प्रतिपदेला करावी. हें लोकमान्य-भोजन कांही वर्षें चालू होतें असें दिसतें. कारण त्याचा उल्लेख व वर्णन 'भाला'च्या अंकांतून आपल्याला वाचावयास मिळतें. भालाकारांनीं कोणतीहि कल्पना काढली की तिची टर उडवायची असा कांही लोकांचा निश्चय असावा असें आढळतें. पण भालाकार अशा टिंगलखोरीला पुरून उरत असत. भाऊसाहेब म्हणजे भालाकार या समीकरणाप्रमाणेच भालाकार म्हणजे शिरा असें दुसरें समीकरणहि रूढ झालेलें होतें. लोकमान्य-भोजनाच्या कल्पनेची टर उडविण्याच्या हेतूनें भालाकारांना कोणीं तरी 'भोजनभूषण' अशी पदवी कुत्सितपणें बहाल केली. त्याला उत्तर देतांना ते लिहितात की, " माझ्या नांवांत 'भ' हे अक्षर असल्याने विनोदाने ही पदवी दिली असावी. मी त्यांत थोडी भर घालतो आणि मला 'भजन-भाषण-भोजन-भूषण भालाकार भास्करभाऊ भोपटकर' असें म्हणतों. लोकमान्यपंथाच्या वार्षिक भोजन-समारंभाची भलामण करतांना ते अभिमानानें लिहितात की, " लोकमान्य भोजनांत भाग घेणारा भोजनभाऊ न बनतां वीरबाहू बनतो. "

**भालाकारी शब्द :**

भाऊसाहेबांना नवे-नवे सुटसुटीत शब्द तयार करून आपल्या लेखांत मांडावयास हौस होती असें मागेच सांगितलें आहे. अर्थात् तो शब्द फारसी, उर्दू किंवा इंग्रजी नसावा, असा त्यांचा आग्रह होता असें दिसत नाही. वीर सावरकरांनी भाषाशुद्धीची चळवळ करून परकीय शब्दांवर बहिष्कार घालण्याचे प्रयत्न केले. तसें करण्याची भालाकारांची दृष्टि होती असें मात्र दिसत नाही. कारण त्यांच्या लिखाणांत इंग्रजी, उर्दू, मराठी अशा सर्व भाषांतील शब्दांचा भरणा दिसतो; परंतु

त्यांना अनुप्रास साधण्याची, रूढ शब्द असेल त्याचें विडंबन करण्यासाठी नव-शब्द तयार करण्याची हौस होती असें दिसतें. असे शब्द तयार करतांना ते भाषा, शास्त्र, व्युत्पत्ति यांचा विचार करून नवे शब्द वापरीत होते असेंहि दिसत नाही. असें असलें तरी सावरकरांप्रमाणेच त्यांनी वापरलेल्या अनेक शब्दांनी मराठी भाषा समृद्ध झाली आहे असें म्हणतां येईल.

त्यांच्या शब्दांचा विचार करूं लागलें, तर प्रथम शब्द दृष्टीपुढे येतात जे त्यांत टिळकाळ, गांधाळ, सुताळ, इंग्रजाई, जयंती, मयंती हे. टिळकांचा अभिमानी किंवा टिळकपक्षीय तो टिळकाळ. परंतु गांधाळ म्हटलें म्हणजे मात्र गांधीवादी असें रूप समोर न येतां त्यांतील रोष, विरोध व उपहास ध्यानांत येतो. मोंगलांची राजवट म्हणजे मोंगलाई. त्याप्रमाणे इंग्रजी अमदानी म्हणजे इंग्रजाई. जयंती म्हणजे जन्मतिथि, तर मृत्युतिथि म्हणजे मयंती किंवा पुण्यतिथि.

भालाकारांनी सुटसुटीत व नादमधुर अनुप्रासयुक्त मथळे व वाक्यें अनेक ठिकाणीं विखुरलेलीं आहेत. त्यांतील कांही येथे उद्धृत केलीं म्हणजे त्यांची लेखणी कशी होती हें सहज ध्यानांत येईल. भिणार का भिडणार? नेट धरा व थेट चला. ठेचता पण ठेचाळाल. गचाळ, मवाळ, जहाल व जलाल. घुसा आणि घासा. टगे अथवा टोणगे. हातांत चरखा का हाताला चरका. असहकारिता नव्हे असहच-कारिता. दसरा नव्हे फसरा. हाल सोसा पण हालूं नका. गप्पीदासांनी देशदास बनावें. एक घुसा नाही तर रुसा. विद्येंत आगासलेले, पण व्यापारांत मागासलेले. तरुण व वरुण (वृद्ध). बोलका बहिष्कार का बोचका बहिष्कार. बोलघेवडे का कृति-केवडे. सत्याग्रह सोडा बहिष्कार जोडा. कायदेभंग का फायदेभंग. हिंदु-मिंदूंची एकी.

भालाकारांच्या या लेखनशैलीने राजकारणांतील त्रिमूर्तीला जन्म दिला ती म्हणजे लाल, बाल आणि पाल.,

मुसलमानांचे बॅ. जिना तर आमचे बॅ. विना (म्हणजे वीर सावरकर!)

भालाकारांनी रूढ केलेले आणखी कांही शब्द उद्धृत करून हा मुद्दा पूर्ण करूं.

धडाडी व पडाडी – धडाडी म्हणजे शौर्य तर पडाडी म्हणजे जरूर तेव्हा पड खाणें.

आगासलेले – पुढारलेले, माघारलेले – मागासलेले. कॅलेंडर – कालदर्शक, दिनदर्शक. जो संपादक हातीं पडेल ते लेख छापतो तो भंपादक होय. देशाळ व राष्ट्राळ – राष्ट्रकार्यांत यथामति भाग घेणारे. देहाळ व पोटाळ – स्वतःच्या कुटुंबाच्या वर्तुळाबाहेर न पाहणारे. सुस्तपणा – सुस्ताई. वारकरी – धर्मकारण करणारा, टाळकुट्या. धारकरी – राजकारण आणि धर्मकारण करणारा. पिकेटिंग – नाकेबंदी. दुकानबंदी. गांवढळ व खेडवळ – यापेक्षा ग्रामिक, ग्रामस्थ शब्द बरे. चहा पितो तो चहाडा. बिस्किटें – यंतरपाळें (यंत्रावर होणारे शंकर-पाळ्यासारखें). टॉर्पेडो – पाणगोळा. बॅटस्‌मन – चेंडूझोडे, बोलर – चेंडूफेके,

विकेटकीपर – चेंडूधरे. सीझन तिकिट – सत्र मोसम परवाना. स्टेशन – तळ, अडाणी विरुद्ध सडाणी म्हणजे सज्ञानी. पोटगति – प्रगति, पाठगति – पीछेहाट.

नवे शब्द कसे असावे याविषयी ते स्वतःची कल्पना सांगतात. शब्द गुळी म्हणजे तोंडांत गूळ विरघळतो तसे सुलभ व समजावयास सोपे असावे. ते नारळी म्हणजे चावावे लागणारे नसावे. तसेच धेडगुजरी शब्द हे ठमी आणि टॉमी यांच्या विवाहासारखे होत. भालाकारांनीच सांगितलेल्या दृष्टिकोनांतून त्यांचे शब्द तपासून पाहणें मनोरंजक ठरेल. तें काम मराठी भाषाशास्त्रज्ञ व सुज्ञ वाचकांनी करावें.

वृत्तपत्राच्या संपादकाला त्या काळांत घडणाऱ्या सर्व गोष्टींवर मतप्रदर्शन करावें लागे. भालाकारांनी अनेक गोष्टींसंबंधी आपलीं मतें स्पष्टपणें व्यक्त केलेलीं आहेत. त्यांचा थोडक्यांत निर्देश करणें जरूर आहे असें वाटतें.

### नाटक आणि बालगंधर्व :

महाराष्ट्राला नाटकांचें मोठें आकर्षण आहे. ही रंगभूमि नारायणराव राजहंस यांनी व इतर अनेक नटांनी पूर्वी गाजविलेली होती. नारायणरावांना टिळकांनी बालगंधर्व ही पदवी दिली. भालाकारांनी 'नटसम्राट बालगंधर्व' असा अग्रलेख लिहून आपलीं मतें व्यक्त केलेलीं आहेत. ते म्हणतात की, "बासुंदी, बालगंधर्व आणि बाळ गंगाधर" या तीन गोष्टी महाराष्ट्राला आवडतात. नाटक कसें असावें याविषयी त्यांनी स्पष्ट केलेलीं मतें मनोरंजक आणि नवनाट्याचें समर्थन करणारांना आवडतील अशीं आहेत. ते लिहितात की, "लोक जमतील अशीं नाटकें असावीं. उदाहरणार्थ, 'एकच प्याला' ( गडकऱ्यांचें प्रसिद्ध नाटक ) व 'स्थानिक स्वराज्य' (माधवराव जोशी यांचे विनोदी नाटक.) नाटकांचा उद्देश थकल्याभागल्या जिवाची करमणूक करणें हा असतो. नाटकांत कोणताहि रस असला तरी चालेल, पण तें चित्त आकर्षून घेणारें हवें. त्याचा उद्देश लोकशिक्षण नसून, मनरंजन करण्याचा असतो. तें काम ज्या मार्गांनी साधेल, ज्या शब्दप्रयोगांनी व ज्या कथानकांनी साधून भरपूर पैसा मिळेल, अशा गोष्टी नाटककारांनी नाटकांत लिहाव्या आणि कंपन्यांनीहि उठवाव्यात. नाट्यप्रयोग आकर्षक असावेत उपदेशक नसावे."

### अनेकविध मतप्रदर्शन :

कोणाच्याहि कानावर फटका मारूं नये, तें घातक असतें.

क्रिकेटमध्ये तीन प्रकारचे खेळाडू असतात. क्रिकेटपटू, क्रिकेटतट्टू आणि क्रिकेटबट्टू.

कोणीं कोणते खेळ खेळावे याविषयीहि भालाकारांनी मत व्यक्त केलेलें

आढळतें. टेनिस बायकांचें, क्रिकेट पुरुषांचें, तर कुस्ती मर्दांची. टेनिस या खेळाचें भालाकारांनी उपहासात्मक वर्णन केलेलें आहे. टेनिसच्या रॅकेटला झारा म्हटलें आहे. ते पुढे सांगतात, टेनिसचा खेळ सुरू झाला की दोघांचे गुण शून्य असें म्हणत नाहीत. Zero हा पुरुषी शब्द न वापरता 'लव्ह' हा नाजूक शब्द उपयोगांत आणतात. त्यांत स्त्री-जातीचा नाजूकपणा दिसतो.

विद्यार्थ्यांनी कोणता व्यायाम करणें श्रेयस्कर हेंहि त्यांनी नमूद केलें आहे. त्यांच्या अंगीं किती शक्ति असावी यासंबंधांत ते सांगतात की, विद्यार्थ्यांनी पहिलवान होऊं नये. पंधरा वर्षांचें वय होईपर्यंत मैदानी खेळ खेळावे. विसाव्या वर्षापर्यंत ५ फूट ५ इंच ते पावणेसहा फूट उंची वाढली पाहिजे. ५ फूट उंची पोचेपर्यंत जोर-बैठका मारूं नये. प्रत्येक तरुणाने कुस्ती शिकावी. सकाळीं व्यायाम न करतां सायंकाळीं ६–६॥ या योग्य वेळीं व्यायाम करावा म्हणजे दिवसभर सुस्ती येत नाही.

१९३२ सालीं भारताचा क्रिकेट-संघ इंग्लंडमध्ये जावयाचा होता. त्या वेळीं प्रत्येक खेळाडूने दररोज दाढी केली पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला होता. सनातनी वृत्तीचे भाऊसाहेब त्याला मान्यता दर्शवितात. पण हिंदी टीम इंग्लंडमध्ये जाऊन कोणताहि राष्ट्रीय लाभ होणार नसल्यामुळे असा संघ तिकडे पाठवूंच नये असें सुचवितात.

पहिल्या बाजीरावांचा पुतळा शनिवारवाड्यासमोर बसवावा. मंडईपुढील मैदानाला 'टिळकमैदान' म्हणावे. विश्रामबागवाड्यापासून लकडीपुलापर्यंत लक्ष्मी-रस्त्याला समांतर जाणाऱ्या रस्त्याला सरस्वती-रस्ता नांव द्यावें.

पुण्याची वसंत व्याख्यानमाला आजहि एक महिना चालू असते. त्या वेळीं गावोगावीं या व्याख्यानमाला सुरू झालेल्या नव्हत्या आणि त्यांचा जिल्ह्यांच्या ठिकाणीं फायदा मिळत नव्हता. पुणें जिल्ह्यांत पांच ठिकाणीं एकेक व्याख्यान ठेवावें अशी त्यांनी सूचना केलेली होती.

लग्न-मुंजी यासारख्या मंगल कार्यांत आहेर देण्याची प्रथा वाढत चाललेली दिसते. अशा प्रसंगीं फक्त १ ते ५ रुपये रोख आहेर करावा.

त्या काळीं जेवणावळीसाठी पत्रावळी आणि द्रोण यांचा वापर होई. त्यावर भालाकर सुचवितात की, पत्रावळीच्या चोयट्या तोंडांत जातात आणि द्रोण कलंडून त्यांतील पदार्थ सांडतो. ते टाळण्यासाठी वाट्या वापराव्या !

संभाजीमहाराजांची तुळापूर येथील समाधि नुकतीच सापडलेली होती. भाऊसाहेबांना संभाजीबद्दल फार आदर होता. त्यांनी शिवाजी व संभाजी यांच्यावर अनेक अग्रलेख लिहिलेले आहेत. तेथे दरवर्षी जयंतीला समारंभ साजरा होऊं लागला होता. अशा एका प्रसंगीं भालाकारांनी एक भजनहि सुचविलेलें आहे –

" शिवाजी शंभू जाधवराव। बाजी नाना माधवराव। तात्या टोपे लक्ष्मीमाय।
वंदन करतो स्मरुनि पाय ।। "

कवि तोच गवी नसावा म्हणजे कवीने स्वतः गाऊं नये.

जोवर माती तोवर जाति.

**प्रभातफेरी :**

गांधीजींची चळवळ सुरू झाल्यावर त्याचा प्रचार करण्यासाठी प्रभातफेऱ्या काढण्यास प्रारंभ झाला. कांही स्वयंसेवक एकत्र येऊन कॉंग्रेसचा तिरंगा फडकवीत प्रचाराचीं गाणीं म्हणत या फेऱ्या काढीत असत. सत्याग्रहाच्या चळवळीचाच तो एक भाग होता. कायदेभंगाची चळवळच लाभदायक होणारी नाही, असें भालाकारांचें मत होतें. या फेऱ्यांत शिस्त, पदें म्हणण्याची पद्धत, तो गाणाराचा गोड गळा यांचा अभावहि असे. त्यामुळे सकाळची साखरझोप मोडण्याचें कार्य या प्रभातफेऱ्यांकडून होई म्हणून भालाकार लिहितात, प्रभातफेरीने जागृतीऐवजीं जागरण होतें ! सर्वसाधारण लोकांना फेऱ्यांपासून त्रास होणार नाही आणि त्यांतून प्रचार साधेल, असें त्यांचें आकर्षक स्वरूप असावें, असा त्यांचा आग्रह होता. या प्रचारफेऱ्या सकाळीं ७ ते ८, सायंकाळीं ६ ते ७, किंवा रात्रीं ९ ते १० या वेळांत काढण्यांत याव्या, असें त्यांनी सुचविलेले दिसतें. त्या फेऱ्यामध्ये गोड गळ्याचे गायक असावे. एकेका स्वयंसेवकाजवळ गळ्यात पेटी व तबला असावा. त्यांनी परिणामकारक पदें गात ठरविलेल्या रस्त्याने मंद मंद पावलें टाकीत शिस्तींत जावें. पळापळ करीत, घाईगर्दीनें जाऊं नये, असें त्यांनी सुचविलेलें होतें.

**सरकारी लॉटरी :**

पैसा उभा करण्यासाठी आणि कांही प्रमाणांत मटका व त्यासारखे इतर सट्टे यांना आळा घालण्यासाठी स्वतंत्र भारतांतील अनेक राज्य सरकारांनी आता मासिक, पाक्षिक, मिनी सोडती काढल्या आहेत, परंतु भालाकारांनी, 'दर वर्षी लॉटरी काढा ' असा १९३२ सालींच सल्ला दिलेला आढळतो.

**मांडी आणि भुरका :**

१९३२ सालीं इंग्लंडचे पंतप्रधान लॉईड जॉर्ज हे आगबोटीनें कोलंबोला जात होते. वाटेंत वादळ सुरू झाल्यामुळे त्यांना ( व इतर प्रवाशांना ) टेबल-खुर्च्यांवर बसणें अशक्य झालें. त्या प्रसंगीं त्यांना गांधींची मांडी घालून बसण्याच्या पद्धतीची आठवण झाली. त्यांनी त्या पद्धतीचें अनुकरण करून सैलसर चड्डी घालून बोटीच्या डेकवर ते मांडी घालून बसले. त्यामुळे सुख कसें मिळालें हेंहि लॉईड जॉर्ज यांनी त्या वेळच्या वर्तमानपत्रांत जाहीर केलें. भालाकार आपल्या पत्रांत भारतीय पद्धतीच्या यशाच्या बातम्या दिल्यावांचून राहणें शक्यच नव्हते.

तरीहि ही वार्ताच प्रसिद्ध करूनच भाऊसाहेब स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी लॉईड जॉर्ज यांना आणखी एका भारतीय पद्धतीचें अनुकरण करण्याचा सल्ला दिला ! पेय चमच्याने व भांड्याने न पितां सूपसारख्या पेयाचा भुरका मारून पाहावा. म्हणजे त्यांतील मजाहि त्यांच्या अनुभवास येईल !

**संस्थानिकांच्या छंदांवर टीका :**

१९२५ सालीं कोल्हापूरच्या महाराजांच्या 'गव्हर्नर' नांवाच्या एका घोड्याने एक शर्यत जिकल्याची बातमी आली होती. ती देऊन या घोड्यावर छत्रपतींनी किती खर्च केला तो जाहीर करावा, अशी भालाकारांनी मागणी केली. त्याचबरोबर हेंहि बजाविलें की, हा खर्च आम्ही खाजगींतून करतों असें म्हणून चालणार नाही. 'मराठा हा शिलेदार म्हणून जन्माला येतो' असा विश्वास ठेवून अश्वारोहण-शाळा काढावी अशी त्यांनी सूचना केली.

त्याच वर्षी पतियाळा संस्थानच्या महाराजांनी परदेशांतून तीन क्रिकेटपटू आणि अनेक कुत्रीं बरोबर आणलीं असल्याची वार्ता आली होती. त्यावर भालाकारांनी प्रश्न केला की, महाराजांना उद्योगपटू आणतां आले नसतें का ? या संस्थानाधिपतींना चांगल्या व उपयुक्त गोष्टी करण्याचें सुचत नाही हें दुर्भाग्य आहे.

**चहा, शिरा आणि पाव :**

गांधी-युगांत विशेषतः कीर्तनकार पटवर्धनबुवांसारखीं माणसें चहापाना-विरुद्ध प्रचार करीत असत. देशबंधूंनो, विचार करा, चहापेक्षा रस बरा. उसाच्या गुऱ्हाळांत लागलेल्या अशा पाट्या अनेक मंडळींना आठवत असतीलच. चहा प्यावा की नाही या मुद्द्यावरहि 'भाला'त भाऊसाहेबांनी आपलें मत व्यक्त केलेलें सापडेल. सकाळचा चहा प्यावा काय, आमचें पथ्य कोणतें, असें स्फुट लिहून ते म्हणतात की, अनशपोटी चहा घेऊं नये. साहेबाचें अनुकरण करून आपण चहा पिऊं लागलों. पण चहाबरोबर तो कांही ना कांही खातो हें विसरलों. तरी बशी-भर शिरा आणि कपभर चहा घ्यावा. शिरा खाणें परवडत नसेल त्यांनी पाव खावा. त्यासाठी ब्राह्मणेतरांनी भटारखाने उघडावेत.

नेहरू-घराणेंच काय, पण संजय गांधी या जवाहरलालांच्या नातवापर्यंत तें घराणें आता प्रसिद्धीस आलेलें आहे. परंतु एकेकाळीं 'नेहरू' हें नांवच महा-राष्ट्रांत अज्ञात होतें. त्यामुळे जी गंमत झाली होती त्यावरहि भाला पत्राच्या १९२९ सालच्या अंकांत एक स्फुट आढळतें. नेहरू-रिपोर्टावर श्री. बापट यांचें व्याख्यान व्हावयाचें होतें. सभेचें वृत्त जाहीर करण्यासाठी दवंडी पिटण्यांत येत होती. दवंडीवाल्याला नेहरू हें नांवच माहीत नव्हते. त्यामुळे 'नारू-रिपोर्टा'वर व्याख्यान अशी दवंडी तो पिटीत होता.

पोटावर सैन्य चालतें या इंग्रजी म्हणीसारखें एक वाक्य 'भाला'त सापडते तें असे : चण्याशिवाय चळवळ नाही.

**भाऊबोध :**

दासबोध आणि रामदासस्वामी यांच्यावर भालाकार भोपटकरांचें अतोनात प्रेम होतें. रामदास, शिवाजी आणि टिळक अशी त्रयी ते कशी मानीत याचा उल्लेख पूर्वीच आलेला आहे. दासबोधाच्या धर्तीवर आपण 'भाऊबोध' लिहीत असल्याचें ते वारंवार सांगत असत. त्यांच्या योजनेंतील कांही श्लोक लिहिलेली एक वही त्यांच्या घरांत होती असें त्यांची कन्या सुंदराबाई या सांगत असत. ती वही या ग्रंथाच्या वेळीं उपयोगांत आणावी, त्यांतील कांही श्लोक या पुस्तकांत उद्धृत करावे, अशी माझी फार इच्छा होती. पण पुष्कळ प्रयत्न करूनहि ती वही अज्ञातच राहिलेली आहे. दो या तीन बच्चे हा प्रचार, त्याचा लाल त्रिकोण आता सर्वांच्या परिचयाचा झालेला आहे. त्या संबंधांतला त्यांचा एक श्लोक मला आठवतो तो येथे देणें जरूर वाटतें. "पहिले दोन हक्काचे। दुसरे दोन टक्क्याचे। आणिक नको, नको, नको."

साम्यवादी विचाराचा प्रसार सुरू झाल्यानंतर 'धर्म ही अफूची गोळी आहे' असें प्रतिपादण्यांत येऊं लागले. धर्माभिमानी भाऊसाहेबांची त्यावरील ओवी अशी :–

धर्म नाही अफूची गोळी। धर्म आहे पुरणपोळी।
आचार तुपासह जो गिळी। भाग्यवान होईल तो।।

**दोन पंचांगांची गैरसोय :**

लोकमान्य टिळकांच्या नांवाने प्रसिद्ध असलेलें पंचांग तेव्हा नव्यानेच प्रचारांत येऊं लागलेलें होतें. जुनें निरयन पंचांग आणि नव्या गणितावर आधारलेलें अधिक अचूक असें टिळक पंचांग हीं दोन पंचांगें वापरांत येऊं लागलीं होतीं. दोन्ही पंचांगांतील अधिक महिना पुढे-मागे झाला की दोन-दोन सण आणि उत्सव येत असत. त्यामुळे कांही मंडळींचा दसरा सण असे तेव्हा दुसऱ्या मंडळींचा होऊन गेलेला असे, नाही तर तो व्हावयाचा असे. गणपति उत्सवहि दोन दोन येत. तसें आताहि होत असतें. हा गोंधळ किंवा संघर्ष थांबविण्यासाठी योग्य वेळ येईपर्यंत टिळक पंचांग थोपवून धरावें असें भालाकारांनी सुचविलेलें होतें. 'दोन दसरे व जनतेला घसरे'; 'हा दसरा नव्हे फसरा' असे भालाकारी पद्धतीचे लेख त्यांनी लिहिलेले आढळतात. आता तर सरकारमान्य असें तिसरें पंचांग प्रचारांत आलेलें आहे. पंचांगांचा घोळ एकदा संपविणें जरूर आहे असें सर्वांना पटत असलें, तरी अनेक मंडळींनी प्रयत्न करूनहि हा एकोपा करण्यांत यश आलेलें नाही व तें कधी होईल का, हेंहि कोणी सांगू शकणार नाही.

भालाकार आपल्या अंकांत वेळोवेळीं अनेक प्रकारचीं मतें व सूचना व्यक्त करीत असत. परदेशी मालावर बहिकार घालण्याची चळवळ सुरू झाल्यावर दिवाळींतील विदेशी फटाक्यांवरहि टीका सुरू झाली. ते लिहितात, मुलांच्या फटाक्यांच्या आनंदावर विरजण घालण्यापेक्षा पांढऱ्या फुलबाजा – म्हणजे सिगरेट – बंद केल्यास परदेशी जाणाऱ्या पैशांची अधिक बचत होईल.

राष्ट्रीय वाङमयाचा प्रचार व्हावा म्हणून माफक वटाव घेऊन तें वाङमय राष्ट्रीय पुस्तकालय काढून विकण्याचाहि भालाकारांनी प्रयत्न केलेला होता.

**राष्ट्रध्वज :**

आपल्याकडे जे अनेक वाद चालू असतात त्यांत निशाणाचाहि वाद जुनाच आहे. राष्ट्राचा ध्वज, वेगवेगळ्या पक्षांचा नि पंथांचा ध्वज असे अनेक ध्वज आजहि प्रचारांत आहेत. राष्ट्रीय निशाणाचा रंग कसा असावा याविषयी भालाकारांनी आपलें मत व्यक्त केलेलें आहे. तिरंगी ध्वज त्यांनाहि मान्य असावा असें दिसतें. त्यांतील भगवा रंग हिंदूंचा, हिरवा मुसलमानांचा आणि पांढरा हा खादी किंवा चित्तशुद्धीचा होय. शिख जमातीला त्यांत पिवळा रंग असावा असेंहि वाटत होतें. गांधींनी तो रंग कॉंग्रेसच्या झेंडयांत अंतर्भूत करण्याचें त्यांना कबूल केलें होतें. पण ही कल्पना कॉंग्रेसकडून मान्य करून घेणें त्यांना जमलें नाही. पांढऱ्या ध्वजावर मध्यभागीं भारतमातेचें चित्र असावें अशी भालाकारांची सूचना होती. मुख्य राष्ट्रीय ध्वजाबरोबर ज्या त्या पंथाने आपआपले ध्वज घेऊन सामील व्हावें असा मध्यम मार्ग त्यांनी सुचविलेला होता.

दि. ५ एप्रिल १९०५ सालीं प्रथम 'भाला' हें पत्र निघालें. या नियतकालिकाचा शेवटचा अंक दि. २९ ऑगस्ट १९३५ या दिवशीं प्रसिद्ध झाला. 'भाला'च्या १४ व्या वर्षी म्हणजे १९३३ सालीं ४३ अंक प्रसिद्ध झाले. १५ व्या वर्षी त्यांत पुष्कळच अनियमितपणा आलेला दिसतो. त्या वर्षांत फक्त २७ अंकच निघाले आणि अखेर १६ व्या वर्षी १५ अंक प्रसिद्ध होऊन हें पत्र बंद पडलें. भाऊसाहेबांनी एकूण सुमारे १६ वर्षें आपलें पत्र चालविलें. ते अत्यंत निर्भीडपणें व स्वतःची मतें अत्यंत परखडपणें मांडीत वाचकांच्या हातीं दिलें. या चारपानी नियतकालिकांतील सर्व लिखाण स्वतः भाऊसाहेबच एकटाकी करीत असत. त्यांत त्यांची जिद्द स्पष्टपणें दिसतें. या व्यवहारांत त्यांना कधी फायदा झाला असेल असें वाटत नाही. उलट त्यांत त्यांच्या पदरालाच खार लागत असे. अर्थात् या गोष्टीचें आज आश्चर्य वाटलें, तरी त्या काळचा विचार केला, तर तसें वाटण्याचें कारण नाही. वृत्तपत्र हा आता एक व्यवसाय झाला आहे. साहजिकच त्यांत ट्रेड युनियन उत्पन्न झाली आहे. मोठमोठे धनिक त्यांत पडलेले असून, त्यांची साखळीपत्रें प्रसिद्ध होत असतात; परंतु त्या काळीं तो एक धर्म म्हणून मानला जात होता.

त्यामुळे अशा पत्रांचे चालक व्यवहाराच्या दृष्टिकोनांतून त्याच्याकडे पाहत नसत. असें पत्र काढून आपण जनजागृतीचें राष्ट्रकार्य करीत आहों अशीच त्यांची भावना असे. भालाकारहि त्यांतलेच एक अग्रणी होते असें म्हटलें पाहिजे.

**भालाकारांचें मोठेपण :**

'भाला' हें भाऊसाहेबांचें स्वतःचें मत-पत्र होतें. भाला कसा असावा याविषयी त्यांनी आपलें मत लिहून प्रसिद्ध केलेलें आहे. ते म्हणतात, "अंक १० मिनिटांत वाचून संपावा ही आमची इच्छा आहे. त्यांतील लिखाण खुसखुशीत असल्याने 'ऊन ऊन भज्यांप्रमाणे' दर सोमवारीं भाला खपतो. तरी मजकुराची वाफ तीन दिवसांत जाईल', असें अंकाचें स्वरूप नसतें."

हें खरें असलें तरी 'भाला'तील लिखाण काँग्रेसची चळवळ आणि गांधींची विचारप्रणालि यास कडाडून विरोध करीत असे. त्यामुळे त्यावर बहिष्कार घालण्याचीहि टूम १९३० सालीं निघाली होती. अर्थात् कोठलीहि चळवळ तीव्र झाली की असे बहिष्कार घालण्याचे नारे उठतात हें आजहि आपण पाहतों; परंतु प्रत्येक पत्राचा एक विशिष्ट वाचकवर्ग तयार होत असतो; त्यामुळे असे बहिष्कार यशस्वी होत नाहीत. तसाच अशा प्रयत्नांनी भालाहि बंद होऊं शकला नाही. परंतु साप्ताहिक असलें तरी कोणतेंहि नियतकालिक एकाच माणसाला अनंत काळ चालवितां येत नाही. त्याशिवाय काळाच्या प्रवाहाचाहि परिणाम प्रत्येक गोष्टीवर होत असतोच. वाढत्या वयाबरोबर माणसाची जिद्द, आग्रहहि कमी होत जातो. भोवतालच्या परिस्थितीचाहि परिणाम कळत नकळत होत असतो. भाऊसाहेब भोपटकरांचीं मतें शेवटपर्यंत कायम होतीं. त्यांची जिद्द, त्यांचा विनोदी स्वभाव तसाच होता. त्यांनी भाला कां बंद केला, याची प्रस्तुत लेखकाला कल्पना नाही. कारणें कांही असलीं, तरी 'भाला' पत्राने महाराष्ट्राचें राजकीय आणि सामाजिक जीवन एक काळ गाजविलें होतें यांत तिळमात्र शंका नाही.

श्री. भाऊसाहेब आपल्या मतांशीं जीवनाच्या अखेरीपर्यंत प्रामाणिक राहिले. त्यांनी त्यासाठी उपहास, टिंगल, टवाळी, कांहीसा अज्ञातवासहि सहन केला. जनमताच्या तुफान लाटेविरुद्ध मान ताठ ठेवीत तरून जावयाचें काम अत्यंत कठीण असतें. लोकप्रियता किंवा पुढारीपण टिकविण्यासाठी मानवाच्या रूपांतलीं लव्हाळीं लाटेपुढे मान तुकवितात. ती ओसरली की पुन्हा मान वर काढतात. त्याचें समर्थन करतांना व्यवहारीपणाचा आश्रय घेतात. मुख्य जन-प्रवाहाबरोबर राहण्याचें तत्त्वज्ञान व महत्त्व सांगूं लागतात. कोणाला पटो अगर न पटो, लोकप्रिय लाटेसमोर मान तुकविण्याची भीरुता भाऊसाहेबांच्या वागण्यांत कधीहि दिसली नाही. इतकेंच नाही, तर त्यांनी उत्तरास प्रत्युत्तर आणि टोल्यास

प्रतिटोलाच हाणला. याचें रहस्य त्यांनीच रचलेल्या एका श्लोकांत आपल्याला पाहवयास मिळतें. ते म्हणतात –

ओवीस गावी ओवी । शिवीस द्यावी शिवी ।
बुक्कीस बुक्की चढवावी । तरीच जगाल या जगीं ।।

कै. भाऊसाहेब याच पद्धतीने जगले. यांतच त्यांचें मोठेपण आहे.

## निवडीचें धोरण

एकण सोळा वर्षे प्रसिद्ध झालेल्या अंकांतून लेख निवडण्याचें काम अवघड होतें. अशी निवड करतांना हा लेख कां घेतला व तो कां वगळला, असा मतभेद नेहमीच होतो; परंतु भाल्याच्या फेकीचें स्वरूप कसें होतें हें नव्या पिढीच्या ध्यानांत यावें, शक्यतों विविध विषयांवरील संपादकांचीं मतें स्पष्ट व्हावीं हा हेतू समोर ठेवून ही निवड केलेली आहे. ग्रंथाच्या पृष्ठांची मर्यादाहि ध्यानांत घ्यावी लागलेली आहे हे वाचकांनी विसरूं नये असें या संबंधांत सुचवावेसें वाटतें.

हा ग्रंथ नीटनेटक्या स्वरूपांत प्रसिद्ध व्हावयास माझे मित्र श्री. भास्करराव कुलकर्णी, चित्रकार अनंत सालकर आणि बारभाई यांचें चांगलें सहकार्य लाभलें. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

भाऊसाहेबांची कन्या व प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या कै. सुंदराताई भोपटकर यांनी 'भाला'तील लेखांचा ग्रंथ प्रसिद्ध करावा, अशी मी व श्री. जयंतराव टिळक यांच्याजवळ इच्छा व्यक्त केली होती. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचीहि त्यांनी व्यवस्था करून ठेवलेली होती. भालाकारांच्या शताब्दी वर्षात हा ग्रंथ प्रकाशित झाला असता, तर तें अधिक उचित झालें असतें. परंतु मध्यंतरीं लादलेली आणीबाणी आणि इतर अनेक अडचणी उद्‌भवल्यामुळे हें काम त्या वेळीं होऊं शकलें नाही. ते उशिरा कां होईना, पण आता पूर्ण होत आहे.

जणू त्या दिरंगाईची भरपाई म्हणूनच प्रतिवर्षी उत्कृष्ट वार्तापत्र लिहिणाऱ्या वार्ताहराला भालाकारांच्या नांवाने एक सहस्र रुपयांचे पारितोषिक देण्यासहि 'भाल्याची फेक' या ग्रंथाच्या प्रसिद्धीबरोबरच प्रारंभ होत आहे. तसेंच हा प्रकाशन समारंभ आणि पारितोषिक वितरणहि भालाकारांसारख्याच जिद्दीच्या, स्वतःच्या मताचा आग्रह धरून आयुष्यभर वर्तन करणाऱ्या भाषाप्रभु पु. भा. भावे यांच्या हस्तें होत आहे ही अत्यंत सद्‌भाग्याची गोष्ट आहे. या सुयोगाविषयी आणि गेलीं कांही वर्षे या कामांत मला जो आनंद मिळाला त्याविषयी आनंद व्यक्त करून हें प्रास्ताविक पूर्ण करतों.

पुणें
दि. ४ डिसेंबर १९७८

**श्री. पु. गोखले**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | भाल्याची फेक | १ |
| २ | हा तर असुरी उत्सव | ५ |
| ३ | आम्हीं एकदा असेंच केलें | १० |
| ४ | आधी धनुर्विद्या व मग वेदविद्या | १६ |
| ५ | या, पण कांही द्या | २३ |
| ६ | आता तें विसरा | २९ |
| ७ | पतितपरावर्तन | ३५ |
| ८ | पुन्हा '१८५७' | ४१ |
| ९ | भिणार का भिडणार | ४७ |
| १० | नरकांतील दरबार | ५३ |
| ११ | स्वदेशी विश्वविद्यालयाची आवश्यकता | ५६ |
| १२ | आम्ही राजनिष्ठ, पण तुम्ही मात्र आत्मनिष्ठ | ६१ |
| १३ | राष्ट्रदेवतेचें नवरात्र | ६६ |
| १४ | पूर्व बंगाल्यांतील बेबंदशाही | ७३ |
| १५ | ही सारी धडपड स्वराज्यासाठी | ७७ |
| १६ | सूर्याजी मालुसरे व सूर्याजी पिसाळ | ८२ |
| १७ | फक्त दोन शब्द | ८९ |
| १८ | प्रेताची गाडी | ९४ |
| १९ | तोफखाना व छापखाना | १०२ |
| २० | मात्रा लागू पडत चालली | १०७ |
| २१ | एका कोकणच्या मुलाची गोष्ट | १११ |
| २२ | 'स्वयंसेवकाचें ताम्हन | ११७ |
| २३ | पुण्यांतील धामधूम | १२२ |
| २४ | दारूची दंगल | १२८ |
| २५ | बॉम्बगोळा | १३४ |
| २६ | देशभक्त व भगवद्भक्त | १३८ |
| २७ | लॉर्ड कर्झन व लॉर्ड मोर्ले | १४३ |
| २८ | काळ व केसरी | १४८ |

| | | |
|---|---|---|
| २९ | हिंदुस्थाना, तुझी वाट काय? | १५३ |
| ३० | वन्देमातरम् | १५९ |
| ३१ | महार-मांग | १६५ |
| ३२ | हिंदुस्थानच्या उरावर नवी धोंड | १७० |
| ३३ | एक नोव्हेंबर | १७४ |
| ३४ | दोन जाहीरनामे | १७९ |
| ३५ | खंडूजी व सुभानजी | १८५ |
| ३६ | सन १९०८ | १९३ |
| ३७ | नमुनेदार खेडेगाव | १९९ |
| ३८ | घुसा | २०४ |
| ३९ | स्वातंत्र्याचा फसलेला प्रयत्न | २०८ |
| ४० | आनंदवनभुवन | २१४ |
| ४१ | मद्यपाननिषेधाची चळवळ | २१७ |
| ४२ | आम्ही व पांगारकर | २२४ |
| ४३ | नाटकें आणि नाटकगृहें | २३० |
| ४४ | ट्रान्सवाल व हिंदी लोकांचे हाल | २३५ |
| ४५ | मोरया व दुल्ला | २३९ |
| ४६ | भाल्याचें सहावें वर्ष | २४४ |
| ४७ | ऋषिप्रणीत राजधर्म | २४८ |
| ४८ | भिक्षेकरी | २५३ |
| ४९ | कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे | २५९ |
| ५० | टगे अथवा टोणगे | २६५ |
| ५१ | आर्यवैद्यक | २७१ |
| ५२ | आमचीं देवस्थानें | २७६ |
| ५३ | पतपेढ्या | २८२ |
| ५४ | शिकवा व पिकवा | २८६ |
| ५५ | ही स्वदेशी का स्वाहादेशी | २९० |
| ५६ | गायखाऊ व सायखाऊ | २९६ |
| ५७ | लाल-बाल-पाल | ३०२ |
| ५८ | माघ वद्य नवमी | ३०६ |

| | | |
|---|---|---|
| ५९ | एकशाही व लोकशाही तितक्याच वाईट | ३१२ |
| ६० | बाप राष्ट्रवीर तर लेक धर्मवीर | ३१६ |
| ६१ | पंढरी व परळी | ३२० |
| ६२ | बहिष्कार कशावर! विदेशी का विलायती कापडावर? | ३२३ |
| ६३ | बोलण्यांत गोड, पण वागण्यांत खोड | ३२६ |
| ६४ | हिंदु एकत्र कुटुंब व विद्याधन | ३२९ |
| ६५ | सांगलीची गिरणी | ३३१ |
| ६६ | हिंदु कोण? | ३३५ |
| ६७ | संत व महंत | ३३८ |
| ६८ | खेड्यांची संघटना | ३४१ |
| ६९ | कायदेभंग का फायदेभंग | ३४३ |
| ७० | वारकरी व धारकरी | ३४७ |
| ७१ | विद्यार्थी व धंद्यार्थी | ३५० |
| ७२ | बाल, लाल व पाल | ३५२ |
| ७३ | राष्ट्रीयत्व व जातीयत्व | ३५४ |
| ७४ | शाबास भीमराव | ३५७ |
| ७५ | महात्माजींचा कबुलीजबाब | ३६० |
| ७६ | वेताळ पूर्वपदावर आला | ३६४ |
| ७७ | मालक, मजूर व मालघेते | ३६७ |
| ७८ | बळी तो गिळी | ३७० |

# १ भाल्याची फेक

वाचकांनी भाला हातांत घेतल्याबरोबर त्यांच्या मनांत अशी शंका उत्पन्न होईल की, दर मंगळवारीं केसरीची मेघगर्जना होत असतां व प्रत्येक शुक्रवारीं काळाचें काळस्वरूप नजरेस पडत असतां या भाल्याची जरुरी काय ? शंका योग्य व यथार्थ असून तिचें समाधान करणें अति दुर्घट आहे. आमची तरी निदान अशी समजूत आहे की, भाला जन्मास येऊन तो म्हणजे आजपर्यंत न झालेलें असें एखादें अजब व अलौकिक कृत्य करणार आहे किंवा लोकमताच्या प्रवाहाला एखादें नवीन हितकर व हिंमतदार वळण तो लावूं शकेल किंवा आसन्नमरण होत चाललेल्या सार्वजनिक संस्थांत नवीन जीव व जोम घालण्याचा त्याच्या अंगांत वकूब आहे अशी मुळीच गोष्ट नाही. तसें घडवून आणण्याची भाल्यांत युक्ति नाही व शक्तीहि नाही. तरी पण एवढी गोष्ट खचित की, मायदेशहितरूपी गडाच्या भोवतीं केसरी-काळरूपी प्रचंड गुंडांनी बनलेल्या तटांत भाला हा पाचरीचें काम करणार व प्रति-पक्षांच्या तोफांच्या भडिमारापुढे हे दोन कणखर गुंड रतिभरहि स्थानभ्रष्ट होणार नाहीत ही गोष्ट जरी निर्विवाद आहे, तरी अशा धुमाकुळीच्या प्रसंगीं या बिचाऱ्या चिमुकल्या पाचरीची वाट कशी लागेल हा विचार मनांत येऊन मन उद्विग्न होतें. आमची तर प्रथमारंभीं त्या सर्व शक्तिमान् जगदीशाला करद्वय जोडून एवढीच विनंती आहे की, अशा प्रसंगीं स्वस्थानभ्रष्ट व स्वस्थलच्युत न होण्याची शक्ति तूं या माकुल्या पाचरीला दे. प्रार्थना करणें एवढेंच आमच्या हातांत आहे. ती सफल करणें ही त्या दीनदयाळ व भक्तवत्सल रघुपतीची मर्जी.

असो; या पहिल्याच अंकीं भाल्याचा उद्देश काय व तो सिद्धीस नेण्यास त्याच्या मताने सोपा, सरळ व सुखकर मार्ग कोणता यासंबंधाने दोन शब्द लिहिणें अप्रयोजक व अप्रासंगिक होणार नाही. भाल्याचा उद्देश श्रीसद्गुरु रामदासस्वामी म्हणतात त्याप्रमाणे " धर्मासाठी मरावें। मरोनी अवघ्यांस मारावें। मारतां मारतां घ्यावें। राज्य आपुलें ।। " असाच आहे. किती तरी सर्वांगसुंदर दासांचा हा उपदेश, किती तरी सतेज ही वाणी व किती तरी बाणेदार हें शिक्षण. खरोखर दासांच्या "धर्मा-साठी मरावें। मरोनी अवघ्यांस मारावें ।। " या जीवट व जोमदार धर्मोपदेशाच्या विरुद्ध एक ब्र तरी काढण्याची कोणाची छाती आहे ? एवढेंच नव्हे तर, प्रत्येक

जातिवंत हिंदूंच्या मनांतलें हृद्गत आम्हांस बिनचूक रीतीने सांगतां येत असेल तर तें हेंच की, एक वेळ घरादाराची होळी झालेली पत्करेल किंवा सर्व ऐहिक सुखाची राखरांगोळी झालेली चालेल अथवा पारतंत्र्यरूपी रवरव नरकांत अक्षय्य वास करण्यास तो तयार होईल, पण तो आपला वेदप्रणीत धर्म, आपला व्यासप्रवर्तित धर्म, आपला दासप्रज्वलित धर्म कधीहि सोडणार नाही. निराकार परमेश्वराच्या साकार प्रतिमेसाठी व टीचभर लांबीच्या शास्त्रविहित शिखेसाठी कोणताहि अस्सल हिंदु 'हर हर महादेव' गर्जत खुशाल तोफेच्या तोंडावर चाल करून जाईल किंवा अन्नान्नगत झाली असतां स्वतः व स्वतःचीं चार चिलिपिलीं घेऊन मुखावाटे 'राम राम' उच्चारीत आनंदाने प्राणोत्क्रमण करीत अथवा शरीराच्या प्रत्येक तंतूंत व नसांत असह्य वेदना करणाऱ्या यातना तो हौसेने सोशील; पण तो आपला हिंदुधर्म सोडणार नाही. कारण प्रत्येक हिंदूला त्याचा धर्म म्हणजे त्याचा प्रत्यक्ष जीवच आहे, तो त्याच्या हृदयाचा कलिजा आहे, तो त्याची वडिलार्जित अमूल्य देणगी आहे, तो त्याजपाशीं परमेश्वराचा अपूर्व ठेवा आहे. प्रत्येक हिंदूला धर्माशिवाय हें सारें जग जीर्णारण्य असून धर्मव्यतिरिक्त ऐहिक प्रगति त्याच्या मताने विगति अथवा अधोगतीच होय. सारांश, संतति व संपत्ति या दोहोवर पाणी सोडून स्वधर्मरक्षण करणें हेंच प्रत्येक धर्मनिष्ठ हिंदूचें परम पावन व पवित्र कर्तव्यकर्म आहे.

परंतु स्वधर्मरक्षण होऊन जर ऐहिक उन्नति होत असेल तर ती कोणास नको आहे? "आधी प्रपंच करावा नेटका" असा सोज्वळ व सर्वाधिक उपदेश करणारे समर्थ सांगतात की, बाबा रे, धर्मरक्षणासाठी तूं सर्वस्वाचा त्याग कर, पण नुसतें धर्मरक्षण झालें म्हणजे मनुष्याचें इहलोकीचें इतिकर्तव्य संपलें असें समजतां कामा नये. या जगतीतलावर मनुष्यास जीवयात्रा अजून कंठावयाची आहे, जोंपर्यंत राजकीय उन्नतीशिवाय मनुष्याच्या प्रत्येक गुणाचे मातेरें व खोबरें होत आहे व जोंपर्यंत स्वातंत्र्याशिवाय मानवजातीस पशुकोटींत गणलें जात आहे तोंपर्यंत प्रत्येक मनुष्याने, प्रत्येक माणुसकीच्या मनुष्याने, आपली राजकीय स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. धनुर्धारी क्षत्रियकुलोत्पन्न दाशरथी रामाचे पट्टभक्त रामदास म्हणतात, "मारतां मारतां घ्यावें। राज्य आपुलें।।" वाचकहो, दासांच्या या ओवीचा अर्थ शब्दशः घ्यावयाचा नाही. तो काळ निराळा, ती परिस्थिति भिन्न, ते लोक वेगळे. जर दासांच्या या ओजोमय ओवीच्या उत्तरार्धाचा अर्थ एखादा वेडापीर असा करील की, उद्या प्रत्येकाने उठावें व जें हातीं लागेल तें हस्तगत करून जो भेटेल त्याला ठोकीत चलावें, तर अशा बृहस्पतीच्या अकलेची जितकी तारीफ करावी तेवढी थोडीच. आपणांस सध्याच्या स्थितींत त्या ओवींतील अंतर्गत तत्त्व घ्यावयाचें आहे. दासांची ओवी "मारतां मारतां घ्यावें" अशी आहे. "रडतां रडतां घ्यावें" अशी नाही. दासांच्या मताने एवढीच गोष्ट निश्चित ठरतें की, मनुष्य मनापासून झटेल, तर स्वउन्नतीचें काम त्याच्या हातून हटकून उठेल. प्रत्येक मनुष्य आपलें नशीब बनवूं

शकेल किंवा बिनसवूं शकेल. सारांश, दास हे श्रमवादी आहेत, कर्मवादी नाहीत: "मारतां मारतां घ्यावें" म्हणजे श्रम करून, मेहनत घेऊन, दगदग सोसून प्रत्येकाने आपली उन्नति करून घ्यावी. भिक्षा मागणें, तोंड वेंगाडणें, हांजी हांजी करणें, मनधरणी करणें किंवा लाचारपणा करणें हे मार्ग देशोन्नतिकारक नसून उलट देशावनतिवर्धकच आहेत.

या ठिकाणीं असा प्रश्न उत्पन्न होईल की, आजमितीला आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेची धांव व अंतिम सीमा कोणती असावी व जरी ती सीमा एकदा कायम ठरली तरी सर्व परिस्थिति लक्षांत आणून आपली राजकीय उन्नति होऊं शकेल काय, हा दुसरा प्रश्न दत्त म्हणून उभा राहतोच. पहिल्या प्रश्नाचें उत्तर निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या व्यक्तींकडून निरनिराळ्या तऱ्हेचें येईल. प्रलयकाळापर्यंत जन्मास येणाऱ्या स्वतःच्या वंशजांच्या मतांबद्दल कोणीहि हमी घेऊं नये व जर एखादा कोणी तसें करूं लागेल तर तो आपल्या पदरीं मूर्खपणाचें माप मात्र घेईल. प्रत्येक मनुष्य फार झालें तर फक्त स्वतःबद्दल सांगूं शकेल व तेंहि फक्त कांही वर्षांपुरतें सांगूं शकेल. असो; आज कोणत्याहि सुशिक्षित एतद्देशियाला असा प्रश्न केला की, बा रे, तुझ्या राजकीय महत्त्वाकांक्षेची उडी कोठपर्यंत जाते आहे, काय प्राप्त झालें असतां तूर्त तुझें समाधान होईल, तर बहुतेक करून उत्तर असेंच येईल की, आर्यभूला जर स्थानिक स्वातंत्र्य मिळेल तर बराच कार्यभाग उरकला; परंतु हा हेतु, ही महत्त्वाकांक्षा, हें वांछित १९०५ सालीं बोलणाऱ्या व्यक्तींचें झालें; परंतु त्याच मनुष्याची राजकीय महत्त्वाकांक्षा १९५५ सालीं किंवा त्याच्या वंशजांची महत्त्वाकांक्षा २००५ सालीं तीच राहील असें कोण म्हणूं शकेल? असो; आमची तरी तूर्त राजकीय बाबतींत महत्त्वाकांक्षा म्हटली म्हणजे हिंदुस्थानवासी जनास आंग्ल नागरिकत्व व स्थानिक स्वराज्य या दोहोंची जोड झाली म्हणजे बरेंच साधलें. उपरिनिर्दिष्ट दासांच्या ओवींतील 'स्वराज्य' या शब्दाचा अर्थ देशकालस्थित्यनुरूप असाच केला पाहिजे. ही राजकीय महत्त्वाकांक्षा सध्याच्या अधोगतिप्रवण कर्झनशाहीच्या अमलांत सुलभ रीतीने सफल होईल असें दिसत नाही. तरी निराश व उदास होऊन नशिबावर हवाला टाकून बसतां कामा नये. कारण जर आर्यभूमातेला स्थानिक स्वराज्य भूषणाने सालंकृत करावयाचें असेल, जर तिच्या दीन व हीन लेकरांना उन्नत स्थिति प्राप्त करून घ्यावयाची असेल व जर हिंदुस्थानवासी 'नेटिव्हा'बद्दल परकीयांच्या मनांत प्रेम व आदर उत्पन्न करावयाचा असेल, तर प्रत्येक धर्मनिष्ठ व देशनिष्ठ आर्यपुत्राने आपली कंबर कसलीच पाहिजे. मांडीचा चौकडा घालून बसण्याचे हे दिवस नाहीत. रडत बसून कांही मिळत नसतें. तरी श्रम करा, मेहनत घ्या, दगदग सोसा आणि यशस्वी व्हा.

पण एखादा निराशावादी असें म्हणेल की, वरील गोंडस तत्त्व कितीहि परोपरीने कागदावर लिहिलें किंवा तोंडाने मोहक रीतीने उच्चारलें तरी वस्तुस्थिति

अशी आहे की, आपली दिवसानुदिवस प्रगति न होतां अधोगतीच होणार. व्यापार बुडाला, उद्योगधंदे ठार झाले, शेतकी डबघाईस आली. राजकीय सत्ता सर्वांशीं परकीयांच्या हातांत गेली, धर्मबंधनें शिथिल होत चाललीं, जातिमत्सर फोफाऊं लागला व आपआपसांतील कलहास ऊत येऊं लागला. अशी एकहि गोष्ट नाही की, जिच्या योगाने निराशेच्या ओझ्याखाली दडपून गेलेलें मन किंचित् वरती उचल घेऊं शकेल. जिकडे पाहवें तिकडे अंधार. सारांश, वर्षानुवर्षे हा देश खालावत जाऊन कालेकरून अजीबात ठार होणार.

वर निर्दिष्ट केलेलें नैराश्य-मत जमनसमूहांत इतक्या जोराने व झपाट्याने फोफावत आहे की, त्याच्या सत्यासत्याविषयी गंभीरपणाने व कळकळीने विचार केला पाहिजे. नैराश्यवादी म्हणतात की, कालांतराने हा देश ठार बुडणार व एका परमेश्वरी कृपेशिवाय त्याला तरणोपायाचा मार्ग कोणताहि नाही. आमचें स्वतःचें मत या नैराश्यवाद्यांच्या मताच्या अगदी सपशेल उलट आहे. एवढेंच नव्हे तर उलट आमच्या सर्व देशबंधूंस आम्ही अशी हमी देतों की, आर्यभूवर कोणतेंच जिवा-वरचें संकट ओढवलेंलें नाही. मारक असा कोणताच रोग तिला जडलेला नाही व तिचा अंतकाळ अजून लक्षावधि वर्षे लांब आहे. कारण सनातन धर्मानुयायी आर्यजन अचिरंजिव असूं शकतील काय ? मन्वादि स्मृतिकारप्रणीत नियमांनी बद्ध असा हिंदु समाज नष्ट होण्याचा अगदी दूरचा तरी संभव आहे काय ? श्रीमद्भगवद्गीता-मृताचें प्राशन करणारी मंडळी अजीबात निर्जीव होतील काय ? श्रीसमर्थविरचित दासबोधाचें पठन करणारे मराठे नामशेष होण्याची शक्यता आहे काय ? छेः अशी गोष्ट कधीहि झाली नाही व होणार नाही. एवढेंच नव्हे तर, एक वेळ देदीप्यमान तेजोराशी सहस्रदीदिति दिनमणि गतप्रकाश लुप्त होईल, कदाचित् पाषाणमय नगाधिराज नवनीताप्रमाणे होईल किंवा अगाधजलपरिपूर्ण रत्नाकर वालुकामय वनाप्रमाणे कोरडा ठणठणीत होईल, पण आर्यभूमाता कधीहि गतप्राण होणार नाही. आमची तर पूर्ण खात्री आहे की, प्रलयकाळाच्या वेळीं शेवटीं बुडणारा पृथ्वीचा प्रदेश हा हिंदुस्थान देशच होय. त्या वेळीं शेवटला जिवंत प्राणी हा धर्मनिष्ठ हिंदूच राहील व त्याजवळ शेवटीं असणारी वस्तु म्हणजे आर्यांचे पूज्य व पवित्र वेद-ग्रंथ हीच होय.

भालाकार हे पूर्ण आशावादी आहेत. आर्यभूमीला लवकरच सुदिन येतील अशी त्यांची पूर्ण खात्री आहे, पण तशी सुस्थिति प्राप्त होण्यास जनसमूहांत ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे. या कामांत भाला सदैव यथामति व यथाशक्ति प्रयत्न करील. जोंपर्यंत भाल्याच्या टोकांत अणुरेणुइतकी तीव्रता असेल तोंपर्यंत तो निराशारूपी शूर्पणखेच्या काळजांत बेधडक प्रवेश करील आणि अज्ञान व आळस या दोन दुष्ट राक्षसांवर बेलाशक प्रहार करील. तसें सदैव करण्याची बुद्धिस्थिरता बुद्धिदात्या

जगदीश्वराने त्याला द्यावी अशी त्याची मनोभावें प्रार्थना करून हा लेख आम्ही संपवितों.

— भाला, दि. ५ एप्रिल १९०५

---

## २ हा तर असुरी उत्सव

जेम्स टाऊन नांवाच्या ख्रिस्तधर्मी गौरकायाने अमेरिकेंत पहिली वसाहत तारीख १३ मे १६०७ रोजीं केली व त्या दिवसाच्या स्मारकाबद्दल सन १९०७ च्या मे महिन्याच्या तेराव्या तारखेस अमेरिकेंत मोठा राष्ट्रीय उत्सव करण्यांत येणार आहे असें प्रसिद्ध झालें आहे. अमेरिकेने जगांतील सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनी आपले प्रतिनिधि पाठवून तो उत्सव साजरा करावा अशी विनंती केली आहे. जगांतील सर्व लहानमोठीं राष्ट्रें या उत्सवांत सामील होतील यांत शंका नाही. अमेरिकेंत होणाऱ्या या उत्सवाची बातमी जर खरी असेल तर अमेरिकन लोकांच्या या कृत्यामुळे जगांतील विचारी मनुष्यांच्या मनांत नाना प्रकारचे तरंग उद्भवतील यांत शंका नाही. स्वभावतः उत्सवप्रिय मनुष्य कोणत्याहि उत्सवांत चार दिवस मौज मारण्यास मागेपुढे पाहत नाही. तरी प्रत्येक मनुष्याने किंवा राष्ट्राने एखाद्या उत्सवांत दंग होण्यापूर्वी त्या उत्सवाची पूर्वपीठिका व गतकालीन इतिहास हा नीट लक्षांत आणून अशा उत्सवाच्या मुळाशीं जर उच्च व उदात्त तत्त्वें दृश्य होत असतील तरच त्याच्याशीं आपला संबंध ठेवावा ही गोष्ट योग्य व रास्त आहे. परंतु उच्च व उदात्त तत्त्वाच्या विपरीत अशा नीच व नादान तत्त्वांच्या पायावर उभारल्या जाणाऱ्या उत्सवापासून प्रत्येक मनुष्याने व राष्ट्राने अलिप्त राहणें हें शहाणपणाचें द्योतक आहे. कारण पहिल्या तऱ्हेच्या उत्सवांत दैविक संपत्ति ओतप्रोत भरलेली असून, अशा प्रकारचे उत्सव ईश्वरीय गुणतंतूंनी विणून काढलेले असतात. हें दैविक विणकाम पाहिल्याबरोबर आपण या विणकामांत एखाद्या धाग्याची भर घालावी अशी सदिच्छा प्रत्येक सद्हेतू-प्रेरित मनुष्याला साहजिकपणें होते व ती इच्छा अमलांत आणल्यापासून सर्व जगाचें व मानव जातीचें कल्याण हें सहजच घडून येतें. परंतु दुसऱ्या तऱ्हेच्या उत्सवाच्या मुळाशीं दुष्ट कल्पना व दुर्विकार यांचा खच पडला असल्या कारणाने ते दुर्गंधीमय असून ते आपल्या दूषित वातावरणाने मनुष्यांचीं मनें बिघडून टाकतात व म्हणूनच ज्ञाते लोक अशा राक्षसी किंवा रावणी संपत्तीने पुष्ट झालेल्या उत्सवापासून पराङ्मुख होतात. पहिल्या वर्गांतले उत्सव हे सात्त्विक गुणसंपन्न आहेत. दुसऱ्या वर्गांतले उत्सव हे तामसी गुणप्रचुर आहेत. पहिल्या तऱ्हेचे उत्सव हे जणू काय दैविक गुणांचे जयस्तंभ आहेत. दुसऱ्या तऱ्हेचे उत्सव हें जणू काय असुरी दुर्गुणांच्या खोल दऱ्या आहेत.

पहिले उत्सव हे ह्या जगांत आजपर्यंत अवतीर्ण झालेल्या महात्म्यांच्या सद्‌गुणांचीं संस्मरणीय स्मारकें आहेत. दुसरे उत्सव हे सैतान-प्रेरित नीचात्म्यांनी केलेल्या दुष्कृत्यांचीं आगरें आहेत. परोपकारपरिप्लुत असे पहिले उत्सव हे सर्वांस प्रिय व संमत असतात. परोपकारप्रचुर असे दुसरे उत्सव हे सर्वांस अप्रिय व त्याज्य वाटतात. सारांश, पहिले उत्सव हे 'दैविक' आहेत. दुसरे उत्सव हे 'दानवी' होत. दैविक उत्सवाचीं कांही उदाहरणें म्हणजे शिवाजीमहाराजांच्या राज्यारोहणाचा उत्सव. आल्फ्रेडच्या निधन-तिथीचा उत्सव, नूतनलब्ध स्वातंत्र्याचा इटलींत होणारा उत्सव वगैरे होत. दानवी उत्सवाचीं उदाहरणें म्हणजे अमेरिकेंतील तांबड्या रंगाच्या मूळ रहिवाशांचें निर्दालन करून तेथे आपलें ठाणें निरंतन करणाऱ्या अमेरिकन लोकांनी केलेले उत्सव, पोलंड देशाचे तुकडे करून तो मटकावून टाकणाऱ्या झारने केलेले उत्सव वगैरे होत.

सन १९०७ च्या मे महिन्याच्या तेराव्या तारखेस अमेरिकेंत होणारा उत्सव हा दुसऱ्या वर्गांतील आहे, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. हा उत्सव असुरी, राक्षसी व दानवी असून अशा तऱ्हेच्या उत्सवाने सर्व मानव जातीला भलतेंच वळण मिळून परिणामीं सर्वांचें सारखेंच अकल्याण होईल. आज अमेरिका स्वतंत्र व संपन्न आहे. विद्या, कला, कौशल्य व आधिभैतिक सुधारणा ह्यांचे ती माहेरघर आहे. अमेरिकेचें सैन्य व आरमार उत्तम प्रतीचें असून, जगांतील बलाढ्य व प्रमुख राष्ट्रांत तिची गणना आहे. म्हणून दोन वर्षांनी अमेरिकेंत होणाऱ्या उत्सवांत वरवर पाहणाऱ्या मनुष्यास त्यांत दूषणीय व तिरस्कारार्ह असें कांहीच दिसणार नाही. परंतु ह्या उत्सवाचें आदि स्वरूप व अंतःस्वरूप पाहिलें म्हणजे त्याचें हीन व हिडीस स्वरूप कोणाच्याहि लक्षांत येईल.

ज्या वेळेस जेम्स टाऊनसाहेबांनी पहिल्या प्रथम अमेरिकेच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवलें असेल त्या वेळेस तेथें राहणाऱ्या रक्तवर्णीच्या इंडियन लोकांच्या मनांत त्या वेळीं अशी कल्पना आली तरी असेल का, की सुमारे तीनशे वर्षांनी त्यांचे वंशज आपल्या जन्मभूमींत परके होऊन त्यांची संख्या इतकी कमी कमी होत जाईल की ते बहुतेक नामशेष झाले असें म्हणावयास मुळीच हरकत राहणार नाही. त्या वेळेस जेम्स टाऊनला दिलेला आश्रय, त्याचें कलेलें आदरातिथ्य व वेळोवेळीं केलेली मदत याचे दुष्परिणाम आपल्या वंशजांना भोगावे लागतील, हे विचार त्यांच्या मनाला शिवले तरी असतील का? भोळेभाबडे बिचारे. त्यांना पाश्चिमात्य कुटिल राजनीतीचा काय अनुभव? भूतदयेने प्रेरित होऊन त्या तांबड्या रंगाच्या इंडियन लोकांनी श्वेतकायांना आपल्या जन्मभूमींत पाऊल ठेवूं दिलें. तेथे त्यांना वसाहत करूं दिली व आपलें ठाणें करूं दिलें. ओसरीवर पडशी ठेवूं दिलेले भटजीबुवा ज्याप्रमाणे खुद्द यजमानाविरुद्ध मसलत करूं लागले त्याप्रमाणे ह्या गौरवर्ण भटांनी आपलीं कृष्णकृत्यें करावयाला सुरुवात केली. तांबड्या वर्णाच्या लोकांच्या सह-

वासाने आपल्या पांढऱ्या कातडीवर तांबडे डाग पडूं नयेत म्हणून ह्यांनी त्यांचा नायनाट करण्याचा प्रारंभ केला. इंडियन लोकांच्या निरनिराळ्या जातींत वैमनस्यें मुद्दाम सुरू करून त्यांच्यांत कलह पिकवून दिले. शेवटीं आपल्या बंदुकींतील गोळ्यांनी हजारो इंडियन लोक ठार करून टाकले.

माणसें मारण्याच्या निरनिराळ्या युक्त्या ह्या ख्रिस्तानुयायी सुधारलेल्या वसाहतवाल्यांनी योजून काढल्या. तलवारी, बंदुका, तोफा, वगैरे घातुक आयुधें त्यांना पुरीं पडेनात, म्हणून त्यांनी अन्य उपायांचा आश्रय केला. ह्या दयाळू व परोपकारी वसाहतवाल्यांनी झऱ्याच्या व विहिरीच्या पाण्यांत मारक विषें कालविलीं व तें पाणी इंडियन लोकांच्या पोटांत गेल्यामुळे हजारो इंडियन हा लोक सोडून पर-लोकीं चालते झाले. ज्या जंगलांतून इंडियन लोकांच्या झोपड्या होत्या त्या जंगलांना आगी लावून दिल्या व त्यामुळे शेकडो इंडियन लोक व त्यांचीं बायका-पोरें ह्यांची होळी झाली. पण याहूनहि जास्त सैतानी उपायांची त्यांनी योजना केली. वरपांगी भूतदया व परोपकार दाखवून देवी आलेल्या मनुष्याने वापरलेले कपडे त्यांनी इंडियन लोकांना फुकट धर्मार्थ वाटले. अंतःस्थ हेतु हाच की, त्यांच्यामध्ये देवीची साथ पसरावी व ते मृत्युमुखीं पडावेत. हा त्यांचा शुभ हेतु उत्तम तऱ्हेने सिद्धीस गेला. इंडियन लोकांचीं शेकडो कुटुंबें नष्ट झालीं. या शेवटल्या अमानुष, असुरी, राक्षसी, दानवी व सैतानी करणीची हकीगत वाचून कोणाच्याहि अंगाचा भडका झाल्यावांचून राहणार नाही. माणसें मारण्याच्या कामांत या गौरकाय रहिवाशांची बरोबरी जगांतील दुसऱ्या कोणत्याहि लोकांना करतां यावयाची नाही. वरकांती परो-पकाराचें व सुधारणेचें पांघरूण घेऊन आंत लपवून ठेवलेलीं वाघनखें अचानक शत्रूच्या पोटांत खुपसून देण्याची ह्यांची हातोटी दुसऱ्या कोणासहि येणार नाही. आपल्या फायद्यासाठी दुसऱ्याच्या घरादाराची व जीविताची राखरांखोळी करण्याची निर्दयता ह्यांच्यासारखी दुसऱ्या कोणाच्याहि हृदयांत असूं शकणार नाही. ज्या जीजस ख्राइस्टने आपला देह लोकहितासाठी झिजवून शेवटीं आपणांस सुळावरहि चढवून घेतलें त्याचे आपण भक्त आहोंत असें म्हणविणाऱ्या या ख्रिश्चन वसाहतवाल्यांनी केलें नाही असें एकहि पातक किंवा दुष्कृत्य या जगतांत सापडणार नाही. बाबांनो, इंडियन लोकांनी तुमचा असा कोणता अपराध केला होता, की त्यामुळे तुम्ही त्यांचा पक्का छळ केलात. तुमच्या मूळच्या देशावर त्यांनी कधी तरी स्वारी केली होती काय ? तुमच्या जमिनीचा टीचभर तुकडा तरी त्यांनी बळकावला होता काय ? तुमच्या किंवा तुमच्या बायका-पोरांच्या रक्ताचा एक तरी थेंब त्यांनी जमिनीवर सांडला होता काय ? सर्व प्रकारें निरपराधी व निरुपद्रवी अशा तांबड्या रंगाच्या इंडियन लोकांवर परमेश्वराला न भितां, हृदयस्थ सदसद्विवेकबुद्धीची पर्वा न करतां व जनाची व मनाची लाज न धरतां तुम्ही बंदूक चालवून त्यांच्या प्रेतांचे ढीगच्या ढीग पाडलेत व ख्रिस्तप्रणीत बायबलांतील आज्ञा-दशकाला धाब्यावर बसवून जीजस

ख्राईस्टच्या कीर्तीला कलंक आणणारीं कृत्यें तुम्हीं केलींत याबद्दल इतिहास कंटरवाने तुमचा धन्यवाद यावच्चंद्रदिवाकरौ गात राहील यांत शंका नाही. वसाहतीवाल्यांनो, तुम्हीं केलेल्या अनन्वित पातकांबद्दल तुम्हांस इहलोकीं मुळीच शिक्षा झाली नाही. ही गोष्ट जरी खरी आहे तरी परलोकीं चित्रगुप्ताने तुमच्या पापपुण्याचा जमाखर्च तंतोतंत लिहून ठेवला आहे. तुमच्या पापाची सव्याज शिल्लक तुमच्या पदरांत यमलोकीं टाकली जाईल याबद्दल संशय नाही.

अमेरिकेंत दोन वर्षांनी होणाऱ्या उत्सवाला दोन तोंडें आहेत व त्या दोन तोंडांचा उपयोग तो निरनिराळ्या तऱ्हेने करील. तो एका तोंडाने हसेल व दुसऱ्या तोंडाने रडेल. हा उत्सव तेथे जमणाऱ्या प्रत्येक मनुष्याला आपल्या एका तोंडाने आनंदाची वार्ता सांगेल व दुसऱ्या तोंडाने त्याच्या पुढे दुःखाची कहाणी गाईल. तो असें म्हणेल की, तीनशे वर्षे चाललेल्या इंडियन लोकांच्या महासत्राची परिसमाप्ति आज होऊन अमेरिकन लोकांच्या राजसूय यज्ञाचा आरंभ झाला आहे. तो असें सांगेल की, अमेरिकन लोकांच्या उत्कर्षाची इमारत इंडियन लोकांच्या अपकर्षाच्या पायावर उभारली आहे. तो असें कथन करील की, अमेरिकन लोकांच्या भाग्योदयाच्या प्रकाशाची उत्पत्ति इंडियन लोकांच्या अधःपातापासून झाली आहे. हा द्विमुखी उत्सव जमलेल्या लोकांना आपल्या दुहेरी वाणीने कांहींना सुखवील व कांहींना दुखवील. तो कांहींच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु काढील व कांहींच्या डोळ्यांतून दुःखाश्रु ढाळील. तो कांहींचीं अंतःकरणें आनंदोर्मींनी शितळवील व कांहींचीं अंतःकरणें दुःखाग्नीने होरपळून टाकील. अशा या द्वितोंडी उत्सवापासून जगाला किती तरी बोध मिळेल.

"बळी तो कान पिळी" याच असुरी तत्त्वावर जगाचा व्यवहार चालला आहे. राजकीय सत्तेच्या सफेतीचे दोन हात दिल्यावर वाटतील त्या कृष्णकृत्यांचे काळे डाग इतिहासपटावरून धुतले जातात व कोणत्याहि समाजाला किंवा राष्ट्राला फक्त राजकीय स्वातंत्र्यामुळे जगांत अजूनहि मान मिळाला जातो वगैरे सिद्धान्ताची सत्यता हा उत्सव प्रत्येक विचारी मनुष्याच्या मनांत बिंबवून देईल.

या उत्सवापासून जर कोणाचीं मनें विशेष रीतीने पोळलीं जातील तर तीं ३०० वर्षे अनेक प्रकारे छळलेल्या लोकांची होत. त्यांच्या व त्यांच्या पितरांच्या आत्म्यांच्या दुःखाला सीमा नाही. अमेरिकेंत अवशिष्ट राहिलेले दुबळे इंडियन लोक आपल्या चिरानुभूत दुःखाचें परिमार्जन आपल्या झोपड्यांतून दारें लावून आपल्या अश्रुपाताने करतील पण त्यांच्या स्वर्गस्थ पितरांचे आत्मे मात्र स्वस्थ बसणार नाहीत. उत्सवाच्या दिवशीं अमेरिकेंत निरनिराळ्या देशांतून लाखो लोक जमल्यावर हे मृत इंडियन लोकांचे आत्मे जगदीशाच्या मंदिराभोवतीं जमून 'न्याय न्याय' अशा आरोळ्यांनी सगळा स्वर्ग दणाणून सोडतील व आपल्या लाडक्या वंशजांच्या भावी रक्षणार्थ त्या अनाथ व दीनदयाळू परमात्म्याजवळ दीनवाणीने करुणा भाकतील. अमेरिकन लोकांनो, तुम्हांला या उत्सवांत किती तरी चमत्कारिक गोष्टी आढळून

येतील. तुमच्या प्रत्येक भाषणांत, तुमच्या प्रत्येक कृतींत व तुमच्या प्रत्येक हालचालींत तुम्हांला इंडियन लोकांनी सोसलेलीं अनंत दुःखें प्रतिबिंबित झालेलीं दिसतील. खून केलेल्या माणसाचा आत्मा खुनी माणसाचा पिच्छा कधीहि सोडीत नाही त्याप्रमाणे तुमच्या पाठीमागे हजारो इंडियन लोकांचे चवताळलेले आत्मे लागतील. एवढेंच नव्हे तर, परराष्ट्रांनी धाडलेल्या प्रतिनिधींच्या सन्मानार्थ उडवलेल्या तोफांच्या 'बुम् बुम्' आवाजांत 'खून खून' असा मृत इंडियन लोकांनी केलेला ध्वनि तुम्हांला ऐकूं येईल. आनंद प्रदर्शित करण्याकरिता केलेल्या दीपोत्सवांत प्रत्येक दिव्याच्या ज्योतींत इंडियन लोकांच्या पेटवून दिलेल्या झोपडयांतून निघालेल्या ज्वाला तुमच्या दृष्टीस पडतील. सार्वजनिक मेजवानीच्या दिवशीं मांडलेल्या बशांतून ठेवलेल्या प्रत्येक खाद्य व पेय पदार्थाला आज तीनशे वर्षें कापलेल्या इंडियन लोकांच्या मांसाची व रक्ताची घाण येईल व जमलेल्या मंडळींना निरोप देण्यासाठी भरलेल्या सभेंत प्रेसिडेंट रूझवेल्टसाहेबांनी अमेरिकन लोकांची जगांत शांततेचा व सुधारणेचा प्रसार करण्याची इच्छा आज ३०० वर्षांपासून आहे असें म्हटल्याबरोबर त्या सभे-भोवतीं अंतराळांत घिरट्या घालणाऱ्या इंडियन लोकांच्या आत्म्यांच्या अदृश्य मुखांतून 'थाप थाप, निव्वळ थाप' असे त्वेषाचे शब्द जमलेल्या मंडळींच्या कानांवर येऊन आदळतील. अमेरिकन लोकांनो, असा हा असुरी स्वरूपाचा उत्सव तुम्ही करूं नका. जर तो करण्याचा तुमचा कायमचा निश्चय झाला असेल, तर तुमच्या वाडवडिलांनी केलेल्या असुरी कृत्यांनी बनलेल्या या उत्सवरूपी पुतळ्याला दैविकपणाचा सोनेरी मुलामा देण्यास तरी तुम्ही विसरूं नका. आजपर्यंत झालें तें झालें. सतराव्या, अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत जन्मलेल्या तुमच्या पूर्वजांनी केलेल्या पापाबद्दल तुम्ही जरी प्रत्यक्ष जबाबदार नाही, तरी ती जबाबदारी अप्रत्यक्ष रीतीने तुमच्या शिरांवर येऊन आदळतेच. तरी तुमच्या वाडवडिलांनी केलेल्या दुष्कृत्याबद्दल तुम्हांस जर मनापासून पश्चात्ताप होत असेल, सर्व मानव जातींचे रंगभेद व वर्णभेद लक्षांत न आणतां कल्याण व्हावें अशी जर तुमची कळकळीची सदिच्छा असेल व सुधारणेचा प्रसार सर्वत्र होऊन या भूतलावरील सर्व माणसांनी बंधुप्रेमाने राहवे असा तुमचा सद्हेतु असेल, तर तुम्ही अमेरिकेंत त्याच्याच जन्म-भूमींत अवशिष्ट राहिलेल्या इंडियन लोकांस अधिक न्यायाने व दयेने वागवा. त्यांना विद्यासंपन्न व धनसंपन्न करा. तुमच्या बरोबरीने त्यांना राजकीय हक्क द्या व रंगभेद मनांत न धरतां आपल्याप्रमाणेच त्यांना प्रत्येक बाबतींत वागवा. जर तुम्ही याप्रमाणे इमानेइतबारे वागलात, तर इहलोकीं तुमच्या पूर्वजांनी केलेलीं दुष्कृत्यें विसरलीं जातील व परलोकीं दयाळू व 'न्यायाळू' परमेश्वर तुम्हांवर सुप्रसन्न होईल. ईश्वर करो व अशी सुबुद्धि तुम्हांस लवकरच होवो.

– भाला, दि. ११ मे १९०५

---

# ३ आम्हीं एकदा असेंच केलें

व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय, दोहोंना षड्विकारांनी पछाडलें आहे. ज्याप्रमाणे एखाद्या मनुष्याची भरभराट व चलती होऊं लागली म्हणजे दुसऱ्यांना त्याच्याबद्दल हेवा उत्पन्न होतो, त्याप्रमाणे एखादें राष्ट्र वैभवसंपन्न होऊं लागलें म्हणजे त्याची स्पर्धा इतर राष्ट्रें करूं लागतात. कांही राष्ट्रांच्या मनांत नीच मनोविकारांची उत्पत्ति झाली म्हणजे तर कांहींच्या मनांत उच्च वृत्तींचा प्रादुर्भाव होतो. अशा वैभवशाली राष्ट्राची स्थिति आपणांस प्राप्त व्हावी अशा आशेचे अंकुर इतर राष्ट्रांच्या मनोभूमींतून उगवूं लागतात. एखादें राष्ट्र जगदीशकृपेने ऐश्वर्यसंपन्न झाल्यावर आपलीहि त्याप्रमाणे प्रगति व्हावी अशी इच्छा इतर राष्ट्रांना होणें साहजिकच आहे. आपल्या राष्ट्राचें वैभव वाढावें, त्याला जगांतील इतर राष्ट्रांकडून मान मिळावा व हरेक बाजूने त्याची प्रगति व्हावी अशी इच्छा कोणता मनुष्य करणार नाही ? तशांतून जे लोक एकाएकी वैभवगिरीच्या शिखरावरून ढासळून अधोगतीच्या खड्ड्याच्या तळावर जाऊन आदळले आहेत अशा लोकांनी दुसऱ्या लोकांना वरती येतांना पाहिलें असतां आपणांसहि तशी सुस्थिति प्राप्त व्हावी अशी इच्छा धरल्यास त्यांनी एखादें पापकर्म करण्याचें योजिलें आहे असें म्हणतां यावयाचें नाही. मनुष्याला काय किंवा राष्ट्राला काय, सुख हें सदैव पाहिजे असतेंच व तें सुख ज्या व्यक्तीला किंवा राष्ट्राला मिळत असेल त्याच्याबद्दल एक प्रकारची क्षम्य स्पर्धा उत्पन्न होणें हें इष्टच आहे. त्या स्पर्धेचें पर्यवसान ईर्षेत होऊन त्याचा परिणाम कृतींत झाला म्हणजे फलप्राप्ति हटकून व्हावयाचीच.

आजकाल जपानी लोकांवर परमात्म्याची बहाल मर्जी आहे यांत संशय नाही. प्रत्येक गोष्टींत त्यांचें पाऊल पुढे पडत आहे. अपयशाचें नांवहि त्यांना माहीत नाही. जलयुद्ध करा किंवा स्थलयुद्ध करा, एखादा नवीन उद्योग काढा किंवा दुसरें एखादें कृत्य आरंभा, त्यांत त्यांना यशप्राप्ति हटकून मिळावयाचीच. तीच हिंदुस्थानवासियांची स्थिति पाहा. कांही करा, कसेंहि झटा व कोणत्याहि प्रकारें वागा, कमनशीब, अपयश व फजिती ही त्रयी आमच्या पाठीमागे एकसारखी हात धुवून लागली आहे. जपान व हिंदुस्थान या दोन पौर्वात्य देशांच्या नशिबांतील हा भेद पाहून हिंदुस्थानांतील लोकांचीं अंतःकरणें दुःखाग्नीने करपून गेलीं, तर त्यांत नवल तें काय ! जर एखाद्या मनुष्याने जपानी लोकांच्या अंतःकरणाचे 'फोटो' घेतले तर किती तरी चित्ताकर्षक व मनमोहक दिसतील. आनंद, आशा, उमेद इत्यादि सुखकर मनोवृत्तीच्या रंगांनी ते किती तरी खुललेले असतील; पण त्याच मनुष्याने जर इंडियन लोकांच्या अंतःकरणांचे फोटो घेतले, तर ते अत्यंत विद्रूप व हिडीस दिसूं लागतील. दुःख, निराशा, नाउमेद इत्यादि दुःखकर मनोवृत्तीच्या काजळाने ते काळेकुट्ट झालेले दृष्टीस पडतील.

सारांश, जपानी लोकांच्या वांटचाला सुख व आमच्या वांटयाला दुःख, अशी योजना परमेश्वराने करून ठेवलेली दिसते. त्यांना सर्व जगांत मान, आमचा जेथे तेथे अपमान, त्यांची सर्व तऱ्हेने प्रगति, आमची प्रत्येक बाबतींत अधोगति, त्यांना सदोदित आनंद, आमच्या नशिबीं एकसारखी रड. परमेश्वराला फरक करण्याचें कारण काय, हें आम्हांस समजत नाही. आमच्या हातून व आमच्या पूर्वजांच्या हातून कांही लहानसहान पातकें घडलीं असतील. नसतील असें आम्ही म्हणत नाही, तरी पण त्यांचें इतकें कडू फळ आम्हांस मिळावें अशीं घोर पातकें तीं खात्रीने नसावींत, अशी आमची समजूत आहे. कसेंहि असो, दयासागर परमेश्वराने आमच्या व आमच्या पूर्वजांच्या लहानमोठ्या पातकांबद्दल आम्हांस क्षमा करून आम्हांस सुखाचे दिवस दाखवावेत अशी त्याजजवळ आमची प्रार्थना आहे.

गेल्या वर्ष-सव्वा वर्षांत जपानी वीरांनी जे अपूर्व जय मिळविले याबद्दल ते जगाच्या स्तुतीस व प्रशंसेस पात्र आहेत याबद्दल दोन मतें असणें शक्य नाही. पण जपानी लोकांच्या शौर्याबद्दल स्तुति करतांना तिला पूर्णतः किंवा झणझणीतपणा आणण्याकरिता स्वतःच्या देशबांधवांची निंदा करणें जरूर आहे असें आम्हांस वाटत नाही. त्यांच्या देशाभिमानाचें वर्णन करतांना आपल्या देशाभिमानशून्यतेची टिमकी जगासमोर वाजवलीच पाहिजे असें नाही. त्यांनी मर्दुमकीचीं कृत्यें केलीं म्हणून आमच्या नामर्दपणाचा डांगोरा सर्व जगभर आम्हींच पिटावा हें कांही श्रेयस्कर नाही. त्यांनी स्वार्थत्याग व स्वसुखत्याग करून आपल्या जन्मभूमीची सेवा केली म्हणून आमच्या स्वार्थसाधुपणाचें ढोलकें आम्हीं वडविलेंच पाहिजे अशांतली गोष्ट नाही. परनिंदा जितकी अयोग्य तितकीच आत्मनिंदा आहे असें आमचें मत आहे. तशांतून आत्मनिंदेच्या योगाने मनुष्याचा मनोभंग होऊन अवशिष्ट राहिलेल्या उत्साहाचे व व उमेदीचें वाटोळें होतें हें कोणीहि विसरतां कामा नये. आज ज्याने उठावें त्याने आम्हांस शहाणपण शिकविण्यास लागावें, आमचे दोष आमच्या पदरांत टाकण्याचा आव घालावा व आम्हांस सुधारणुकीचे मार्ग दाखविण्याचा डौल आणावा. पण अशा स्वबांधव निंदकांना आम्ही असे सांगतों की, तुमचें वाक्पांडित्य आम्हीं ऐकलें, आमचे दोष आमच्या निदर्शनास आले व आमच्या उन्नतीच्या मार्गाची आम्हांस पूर्ण ओळख झाली. पण इष्ट हेतु साध्य करून घेण्यास अनावश्यक असें जें सहानुभूतिपूर्ण सरकार तें तुम्ही आम्हांस मिळवून देऊं शकाल काय? अनुकूल सरकाराशिवाय कोणत्या राष्ट्राची सुधारणा झाली आहे? अनुकूल सरकार मिळाल्याबरोबर हिंदुस्थानची सुधारणा होणें अशक्य आहे काय? प्रतिकूल सरकार असल्यावर जपानी लोकांची हल्लीची उन्नत स्थिति टिकूं शकेल काय?

जपान व हिंदुस्थान या दोन देशांच्या स्थितींत जें अंतर आज दृष्टिगोचर होत आहे त्याचें कारण बादशहा मिकॅडो व बादशहा एडवर्ड यांच्या हृदयांमधील भिन्नत्व होय. बादशहा मिकॅडोच्या अंतःकरणांत जपानी लोकांबद्दल जी सहानुभूति

व कळकळ आहे तिच्या शतांश सहानुभूति व कळकळ जर बादशहा एडवर्ड यांच्या अंतःकरणांत उत्पन्न होईल तर याच नादांत हिंदुस्थानचे निराळे स्वरूप होईल. सारांश, आमच्या अवनतीचें खरें कारण न शोधतां किंवा तें कळलें असतां उघड बोलण्याची धमक नसल्यामुळे गरीब बिचाऱ्या सहनशील इंडियन लोकांवर वाटतील ते कुत्सित आरोप लादण्यास प्रवृत्त होणें यासारखा बेशरमपणा दुसरा कोणताहि नाही. आमच्या देशबांधवांसंबंधाने निःपक्षपातबुद्धीने आम्ही असें सांगू शकू की, जगांतील कोणत्याहि लोकांपेक्षा ते बुद्धीने, शक्तीने किंवा अन्य तऱ्हेने कमी दर्जाचे नाहीत. इतर लोकांप्रमाणे आमच्यांतहि कांही दोष आहेत. पण सर्व दोषविवर्जित असे लोक जगतांत कोण आहेत? एवढेंच नव्हे तर, इतर लोकांत नसलेला एक गुण आमच्या अंगांत विशेष रीतीने आहे. तो गुण म्हणजे आमचा टिकाऊपणा होय. परचक्राखाली बांगडीप्रमाणे भंगलेल्या राष्ट्रांचीं उदाहरणें इतिहासांतून पुष्कळ देतां येतील. पण हा देश एवढा जुनाट व वृद्ध असतां व परचक्रांचे एवढे जबर आघात त्याच्यावर झाले असतां त्याने इतका टिकाव धरला आहे ही गोष्ट खरोखर अभिमानाची व आनंदाची आहे. अशा राष्ट्रांतील लोकांना दूषणें लावणें म्हणजे आपल्या गुणग्राहकताशून्यतेचें हिडीस प्रदर्शन करणें होय.

आज पंधरा महिने जपानी वीरांनी जिंकलेल्या लढायांचीं वर्णनें ऐकून प्रत्येक हिंदुस्थानवासियाला आनंदाचें भरतें येत आहे. यालू, नॅश्नन, लेओटेंग व मुकडेन या चार ठिकाणीं जपानी शिपायांनी गाजविलेली मर्दुमकी खरोखरच अलौकिक होती यांत संशय नाही. आज जपानांत जिकडे-तिकडे स्वदेश, बादशहा व वांङ्मयी या त्रयीचा सारखा घोष चालला आहे. प्रत्येक जपानी पुरुष, स्त्री व मूल देशभक्ति-वारुणीने पुरी झिंगली आहे व या देशप्रेमाच्या उमाळ्यांत जपानी लोक मानव-शक्तीच्या आटोक्याच्या बाहेर अशीं कृत्यें प्रत्यहीं करीत आहे. विसाव्या शतकांत जगाच्या, निदान आशिया खंडाच्या इतिहासांत आपल्या पराक्रमाचा एक स्वतंत्र निराळा खंड जपानी शिपायांनी लिहून ठेवला आहे असें म्हणण्यास हरकत नाही. हा खंड लिहून ठेवण्याच्या कामीं या जपानी बखरीकारांनी अगदी निराळ्या सामग्रीचा उपयोग केला आहे. नेहमीप्रमाणे बोरूच्या लेखणीचा उपयोग न करतां त्याच्या जागीं त्यांनी बंदुकीच्या नळ्यांचा उपयोग केला आहे. हा खंड लिहितांना नेहमीची काळी शाई न वापरतां रशियन शिपायांच्या शरीरांच्या दौतींतून असलेली तांबडी शाई वापरण्यांत आली आहे. हा खंड चिंध्यांनी किंवा गवताने केलेल्या कागदावर न लिहितां जपानी लोकांच्या हृदयरूपी जाड कागदावर लिहिला आहे. आता यापुढे प्रत्येक जपानी पिढी हा खंड आनंदाने वाचील व जगाला वाचून दाखवील. पण हा खंड वाचून दाखवितांना जपानी मनुष्य जिभेचा उपयोग करण्याच्या ऐवजीं आपल्या हाताचा उपयोग करील. जपानी बखरीकारांनी लिहिलेला हा अत्युपयोगी खंड फार लांबलचक नसून त्यांच्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे तो अतिशय लहान आहे. किंबहुना तो फक्त एकाच

वाक्याने बनलेला आहे. पण त्या एका वाक्यांत मोठमोठ्या अगडबंब ऐतिहासिक पुस्तकांतील सार ओतलें आहे. तें वाक्य हेंच की, "सत्रीय देशाभिनाशिवाय देशोन्नति कधीहि व्हावयाची नाही." जपानी लोकांप्रमाणे मराठ्यांनी सतराव्या शतकांत आशिया खंडाच्या इतिहासांत एक खंड स्वहस्तें लिहून ठेवला आहे. त्या खंडांत आपल्या पराक्रमी पूर्वजांनी केलेलीं अचाट मर्दुमकीचीं कृत्यें सुरस रीतीने वर्णिलीं आहेत. त्यांपैकी एकाची हकीकत आज आमच्या वाचकांना देण्याचें आम्हीं योजिलें आहे. खाली वर्णन करण्यांत येणारी मराठ्यांनी जिंकलेली लढाई यालू नॅश्नन, मुकडेन वगैरे लढायांच्या तोडीची होती व त्या लढाईचा परिणामहि या लढायांसारखाच झाला.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांना रायगडीं अभिषेक होऊन नुकतींच चार वर्षे झालीं होतीं व हिंदुपदपादशाहीच्या छत्राच्या आश्रयाखाली चार-पांच शतकें त्रस्त व जमीनदोस्त झालेली हिंदु प्रजा नुकतीच वर मान काढूं लागली होती, गोवध बंद होऊन, हिंदूंचीं देवालयें दैविक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी पुनरपि आपलीं डोकीं वरती करूं लागलीं. सर्व महाराष्ट्रभर आशा व आनंद या मनोवृत्तीची लाट उसळून त्या लाटेवर धर्मवेडाने पछाडलेले गाजी व देशवेडाने बहकलेले बाजी हेलकावे खात इकडे-तिकडे अनिरुद्ध संचार करूं लागले. आता थोड्याच अवधींत सर्व महाराष्ट्रांत हिंदुत्वाचें पूर्ण साम्राज्य होऊन फार दिवस नष्ट झालेली शांतता पुन्हा नांदूं लागेल अशी आशा महाराष्ट्रियांना वाटूं लागली. पण या आशेचा भंग करण्यासाठी अहोरात्र टपलेले दोन चोर जिवंत राहिले होते. ते चोर म्हणजे एक विजापूरचें राज्य व दुसरें मोंगलांचें राज्य. मराठ्यांचा उत्कर्ष या दोन लुच्च्यांना सहन न होऊन त्यांपैकी विजापूरकरांनी मराठेशाही नामशेष करून टाकण्याचा निश्चय केला. सन १६७८ सालीं आपला युसूफखान नांवाचा सरदार कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांमधील मराठ्यांच्या ताब्यांतील प्रदेशावर स्वारी करण्यास पाठवून दिला. हा युसूफखान प्रसिद्ध अफझूलखानाचा कनिष्ठ बंधु शोभेल असा होता. गोवध करणें, देवळें जमीन-दोस्त करणें, घरेंदारें जाळणें, लुटालूट करणें इत्यादि राक्षसी दुष्कृत्यांत आनंद मानणारा हा नराधम मराठ्यांच्या मुलखावर स्वारी करून आला, पण मराठ्यांचे सरदार हंबीरराव मोहिते यांनी त्याचा पाडाव करून त्याला कैद केलें. ही बातमी विजापुरास कळतांच सूड उगविण्याच्या हेतूने विजापूराहून तीस-चाळीस हजार फौज रवाना झाली. फौजेची व हंबीररावांची गाठ सावनूर येथे पडली व लढाईला तोंड लागलें. हंबीररावाजवळील सरंजाम अगदी बेताबाताचाच होता. फार झालें तर तीन-चार हजार मराठे वीर असतील नसतील. अशा छोटेखानी फौजेनिशी विजापुराकडील चाळीस हजार फौजेशीं सामना देण्यास त्या मराठी वीरांनी दंड थोपटले आणि खरोखरच शिवबांच्या चाळीस वर्षांच्या अमदानीचें अवलोकन केलें तर असें कळून येईल की, दसपट किंवा वीसपट शत्रूंशीं टक्कर देऊन त्याचा चक्काचूर उडविण्याच्या कामांत शिवकालीन मराठी वीरांची बरोबरी जगांतील दुसऱ्या

कोणत्याहि लोकांना आजपर्यंत करतां आली नाही. सिंहगडावरील मर्दुमकीची तोड जगांतील कोणत्या देशाच्या इतिहासांत सापडूं शकेल ? पावनखिंडींत असिधारातीर्थी स्वतःला पावन करून घेणाऱ्या बाजीप्रभू देशपांड्यांसारखा पराक्रम आजपर्यंत कोणीं केला आहे किंवा आम्ही आता वर्णन करीत असलेल्या सावनूरच्या लढाई-सारखी दुसरी लढाई या घटकेपर्यंत कोणती झाली ? जग आज जपानी लोकांची स्तुति त्यांच्या शौर्याबद्दल करीत आहे तें योग्यच आहे. पण सतराव्या शतकांतील मराठे वीर जपानी वीरांपेक्षा जास्त स्तुत्यर्ह आहेत हें कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील.

चाळीस हजार विजापुरी फौजेचे व चार हजार मराठी फौजेचें लढण्याचें तोंड लागलें व कापाकापी, छाटाछाटी व तोडातोडी सुरू झाली. मुसलमानांच्या समशेरी व मराठ्यांचे भाले एकमेकांवर घासून त्यांतून ठिणग्या निघूं लागल्या. हजारो लोकांचीं शिरकमलें चेंडूप्रमाणे आकाशांत उडूं लागलीं. कोणाचे हात तुटले, तर कोणाचे पाय कापले गेले. कोणाच्या छातींत भाले खुपसले गेले, तर कोणाला समशेरीचे तीव्र वार लागले. याप्रमाणे एकच दंगल उडून गेली. 'दिन दिन' व 'हर हर' या आरोळ्यांनी दशदिशा दणाणून गेल्या. सकाळपासून एकसारखी धुमश्चक्री चालली असून आता टळटळीत दुपार झाली. भगवान् सूर्यनारायण आकाशमध्यांत आरूढ होऊन खाली चाललेल्या तुमुल रणाकडे आपल्या तेजःपुंज नेत्रांनी न्याहाळूं लागले. लौकरच सुग्रास पंचपक्वान्नी मेजवानी मिळेल या आशेने हिंस्त्र पक्षांच्या झुंडीच्या झुंडी सभोवतालील वृक्ष-शाखांवरून रणमैदानाकडे टक लावून बसल्या होत्या. हजारो आसन्नमरण वीर सूर्यतापाने विव्हळत. शेवटीं भगवा फडकतो की चांद चमकतो हें पाहण्याकरिता कसाबसा जीव धरून भूमातेच्या मांडीवर लोळत होते. सारांश, 'दिन दिन' दीन होऊन दातीं तृण धरून पळून जातो की 'हर हर'चा हुर्यो होऊन मराठ्यांची होळी होते इकडे नजर लागून राहिली होती. अशा समयीं मराठ्यांचे सेनापति हंबीरराव मोहिते यांच्या रणधुळीमलिन चेहऱ्यावर आशा व निराशा या दोहोंची छटा एकसमयावच्छेदेंकरून दिसूं लागली. क्षणोक्षणीं ते मागे उलटून पाहत व तितक्याच वेळांत ते 'हर हर' गर्जत शत्रूवर तुटून पडत. पण आता अगदी निकराची वेळ येऊन ठेपली. सकाळपासून लढणाऱ्या मराठी वीरांची संख्या कमी कमी होत चालली होती. त्यांच्याभोवतीं विजापुरी सेनेचा समुद्र एकसारखा खवळत होता व सेना-समुद्रांतून पैलतीरीं पोहून जाण्याची ताकत अवशिष्ट राहिलेल्या वीरांच्या अंगांत नव्हती. तरी अशा आणीबाणीच्या प्रसंगीं भगव्या झेंड्याचा आश्रय धरून मराठे वीर एकसारखे लढत होते. वाऱ्याच्या सोसाट्याने भगवा फडकूं लागला म्हणजे त्यांचीं अंतःकरणेंहि आशेने फडफडूं लागत. सर्वांची नजर त्या भगव्या झेंड्याकडे लागली होती व तशी त्याजकडे टक लागणें साहजिक होतें. त्या झेंड्याच्या प्रत्येक टोकाला मुसलमान लोकांनी कापलेल्या हजारो गायांच्या जिभा फाटून त्या

त्यांना सूड घेण्याकरिता हंबरडा फोडून सांगत होत्या. त्या झेंडयाचा भगवा रंग आपल्या देशबांधवांच्या शीखानष्टांनी सांडलेल्या रक्ताची आठवण त्यांना देत होता. तो भगवा झेंडा समर्थांच्या 'जीवित तृणवत् मानावें' या मर्दानी ओवीचा उपदेश आपल्या फडफडण्याने मराठी योद्धयांना करीत होता. असा तो भगवा झेंडा दृष्टिसमोर असतां कोणता अस्सल बीजाचा मराठा वीर लढण्यास कच खाईल? असो; आता एकाएकी लढाई थांबली. भगव्या झेंडयाभोवतीं आपल्या शरीराचा कोट करून लढणाऱ्या मराठे पठ्ठयांशीं झुंजणारे मुसलमान मर्द एकाएकी पळून जाऊं लागले. ते कां पळूं लागले? त्यांना मराठ्यांची भीति वाटली काय? लढाई पुढे चालू ठेवण्याची त्यांची इच्छा नव्हती काय? छे:, तसें कांही नव्हतें. ते एकाएकी पळून गेले ह्याचें कारण निराळेंच होतें. त्यांचा मोड झाला नसून उलट मराठ्यांचा पक्का नाश करून टाकण्याची त्यांची इच्छा होती. म्हणून आतापर्यंत लढून लढून थकलेले मुसलमान वीर एकीकडे सरले व पुढे लढण्याचें काम सकाळपासून स्वस्थ बसलेल्या ताज्यातवान्या दहा हजार घोडेस्वारांच्या टोळीकडे सोपविण्यांत आलें. ती दहा हजार घोडेस्वारांची मांड त्या भगव्या झेंडयाकडे चौरी दौखूडत येऊं लागली. ती आता अगदीच जवळ आली. थोडयाच वेळांत ती येऊन भिडणार असें पाहून हंबीरराव मोहित्यांनी पुन: एकदा पाठीमागे उलटून पाहिलें व लागलीच त्यांनी घोडयावरून खाली उडी टाकली. त्यांनी भगवा झेंडा आपल्या डाव्या हातांत घेतला.

भाला फेकून देऊन त्यांनी आता तलवार धारण केली व एकदा 'हर हर' शब्द मोठ्यांदा उच्चारून ते आपल्या टोळीच्या अग्रस्थानीं येऊन उभे राहिले. कदाचित् जो भगवा झेंडा आजपर्यंत शत्रूच्या छातीवर थयथय नाचला तोच कदाचित् आज शत्रूकडून तुडविला जाईल असा हृदयभेदक विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांचे डोळे पाण्याने डबडबून गेले. त्यांचे सर्व शरीर थरथर कापूं लागलें. आपल्या भोवतालील मराठे वीरांकडे एक क्षणभर दृष्टि फेकून त्यांनी एक लांब सुस्कारा टाकला व शिखानष्टांशीं लढतां लढतां भगव्या झेंडयाच्या शीतल छायेखाली सदैव निजण्याचा त्यांनी निश्चय केला. आता पुन्हा लढाई जुंपणार, इतक्यांत चकमक उडणार, लौकरच कत्तलीला सुरुवात होणार तों हंबीरराव ज्या दिशेकडे क्षणोक्षणीं उलटून पाहत होते तिकडून अस्पष्ट आवाज ऐकूं येऊं लागला. क्षणोक्षणीं तो जास्त स्पष्ट होऊं लागला.

जसजसा तो जवळ जवळ येऊं लागला तसतसा तो घोडयांच्या टापांचा आवाज आहे असें वाटूं लागलें. इतक्यांत धुळीचे पर्वतप्राय लोट आकाशांत पसरूं लागले. आता मात्र तो टापांचा आवाज अगदी जवळ आला व एकाएकी जवळच्या झाडींतून तीन हजार जवानमर्द घोडेस्वारांची टोळी दौडत बाहेर पडली. ती टोळी वायुवेगाने उधळत येत होती. तिने थेट भगव्या झेंडयाकडे आपला रस्ता धरला. आता ती अगदी जवळ आली व तिने एकाएकी 'हर हर महादेव' अशी आरोळी ठोकली. ती टोळी लागलीच दुभंगली व हंबीररावाच्या उजव्या व डाव्या बगलांकडून

वळून ती चित्त्याप्रमाणे त्या ताज्यातवान्या दहा हजार विजापुरी घोडेस्वारांवर तुटून पडली. ज्याची आपण क्षणोक्षणीं उलटून पाहून चातकाप्रमाणे वाट पाहत होतो तो वीर ऐन प्रसंगीं येऊन थडकला. हें पाहून हंबीररावानेहि आपली समशेर मुसलमानांवर यथेच्छ चालविली. एका निमिषांत त्या वीराचें नांव त्या रणभूमीवर दुमदुमूं लागलें. "धनाजी आला, धनाजी आला" असा एकच पुकारा जिकडे-तिकडे झाला. ज्याचें नुसतें नांव ऐकल्याबरोबर मुसलमानांचे घोडे सुद्धा भयभीत होऊन सैरावैरा पळत असत तो वीर प्रत्यक्ष धडकल्यावर कोणता मुसलमान शिपाई रण-भूमीवर टिकाव धरील? पुढे काय झालें हें सांगण्याची जरुरी नाही. मृगराजाची स्वारी आल्यावर ज्याप्रमाणे लांडग्यांची पळापळ होते त्याप्रमाणे विजापुरी फौजेची गत झाली. शिवदिग्विजयकार लिहितात, "आईस लेकरू, लेकरास आई ओळखीना, आपला जीव वांचला म्हणजे सर्व कांही मिळालें. पुन्हा मराठ्यांची लढाईची गाठ ईश्वरा घालूं नकोस म्हणून अंतःकरणीं विचार करते झाले." ह्या सावनूरच्या लढाईची बातमी रायगडीं महाराजांस लागतांच त्यांनी धनाजी जाधवरावांस रायगडीं बोलावून नेलें व हनाजी रंगनाथाच्या तोंडावाटे लढाईची सर्व हकीगत ऐकल्यावर महाराजांनी सिंहासनावरून खाली उडी टाकली. त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या व धनाजीला प्रेमालिंगन देऊन म्हणाले की, "हीं मनुष्यें प्रतिसृष्टि निर्माण करतील. आमच्या साह्यार्थ हे देवलोकीहून मनुष्यरूपी निर्माण झाले." खरोखर सतराव्या शतकांत मराठ्यांनी देवाप्रमाणे अतुल पराक्रम केले म्हणून ते आपल्या प्रेमास व आदरास पात्र आहेत.

—भाला, दि. १ जुलै १९०५

---

# ४ आधी धनुर्विद्या व मग वेदविद्या

नखांवाचून सिंह, सोंडेशिवाय हत्ती व शिंगाव्यतिरिक्त बैल ज्याप्रमाणे कुच-कामाचे त्याप्रमाणे हत्यारावांचून मनुष्यहि कुचकामाचा व कवडीमोल होय. व्यक्ति घ्या किंवा राष्ट्र घ्या, ती व्यक्ति किंवा तें राष्ट्र इतर गोष्टींत जरी संपन्न असलें, पण जर लष्करी शिक्षणांत मागासलेलें असलें तर अशा व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या सर्व गुणांवर पाणी पडलेंच म्हणून समजावें. एवढेंच नव्हे तर, सर्व कला अवगत असूनहि बिनहत्यारी व्यक्ति किंवा राष्ट्र हीं लवकरच धुळीस मिळाल्यावांचून राहणार नाहीत. या आमच्या म्हणण्याची सत्यता पाहवयास प्राचीन इतिहासाकडे धांव घ्यावयास नको. अलीकडलीं अगदी ताजीं उदाहरणें मिळूं शकतील. परवाची

तिबेटवरील मोहीम घ्या. त्या मोहिमेंत शेकडो निरपराधी तिबेटी लोकांची जी कत्तल झाली त्यांचें जें परमपवित्र लासा शहर विधर्मीय लोकांच्या हस्तगत झालें व त्यांच्या लामाला त्या शहरांतून पलायन करावें लागलें हें कशाचें फळ असावें बरें! तिबेटी लोक हे त्यांच्या अंगीं असलेल्या सात्त्विकपणाबद्दल जगात प्रसिद्ध होते ना? कमीजास्त प्रमाणाने त्यांच्यांत सुधारणा नव्हती काय? सगळ्या जगांत त्यांच्यासारखे अल्प समाधानी व निरुपद्रवी लोक जगांत दुसरे कोणते सापडतील? असें असतां त्यांच्या देशावर जेव्हा दुसऱ्यांनी स्वारी केली तेव्हा त्यांचा तो जगप्रसिद्ध सात्त्विकपणा व त्यांचा तो पिढीजात धार्मिकपणा त्यांना प्रसंगीं किती उपयोगी पडला? इंग्रजांच्या शिपायांकडून बंदुकींतून ज्या वेळेस भराभर गोळ्या सुटून त्या त्यांच्या शरीरांत घुसूं लागल्या त्या वेळेस त्यांचें तपोधन त्यांना कितीसें उपयोगी पडलें? इंग्रजांचें सैन्य विजयी होऊन ज्या वेळेस लासा शहरांत शिरलें त्या वेळेस त्यांचे सद्‌गुण त्यांना कितीसे फलदायक झाले? आजपर्यंत दुसऱ्यांच्या देशाकडे किंवा द्रव्याकडे पापबुद्धीने न पाहण्याबद्दल कोणतें पुण्य कठीण प्रसंगीं त्यांच्या मदतीला धांवलें? सारांश, एका लष्करी शिक्षणाशिवाय त्यांच्या सर्व सात्त्विक गुणांचें मातेरें झालें. भोळ्याभाबड्या तिबेटी लोकांना जगाचे डावपेच काय माहीत! जें कांही प्रभूच्या प्रसादाने मिळेल त्यांत समाधान मानून सर्व आयुष्य ईशचिंतनांत घालावें अशी त्यांची गुरुपरंपरागत चालत आलेली दिनचर्या होती व त्याप्रमाणे ते वागले व शेवटीं सपशेल फसले. जपतपांत घालविलेला वेळ त्यांनी जर युद्धकलेवरील ग्रंथांचें अध्ययन करण्यांत घालविला असता, तर परवाच्या मोहिमेचा कांही विपरीत परिणाम झाला असता. दानधर्मात खर्च केलेला पैसा जर बंदुका, तोफा, दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामानांची खरेदी करण्यांत त्यांनी लावला असता, तर कातड्यांच्या तोफांनी लढून त्यांनी आपली बकऱ्यांप्रमाणे कत्तल शत्रूंस कधीहि करूं दिली नसती. धर्मशाळा, विहिरी, कला वगैरे न बांधतां तो पैसा जर लासा शहराची तटबंदी करण्यांत खर्च झाला असता, तर आपल्या सोबत्यांच्या प्रेतांची सडक बांधल्याशिवाय त्यांच्या शत्रूच्या शिपायांना लासा शहरीं कधीहि प्रवेश करतां आला नसता. पण बिचारे फसले. भलत्याच मार्गाने गेले व सर्वस्वाला मुकले. ज्याप्रमाणे तिबेटी लोकांची स्थिति झाली त्याप्रमाणेच आफ्रिकेंतील मूळ रहिवाश्यांची होत आहे व तशी स्थिति जगांतील युद्धकला-अनभिज्ञ लोकांची सदैव होणार असें आम्ही खात्रीने सांगतों.

गत व वर्तमानकालाचा इतिहास सर्वांना हेंच ओरडून सांगतो की, बाबांनो, तुमच्या सद्‌गुणांना किंमत यावी अशी तुमची इच्छा आहे का, तर मग युद्धकलेचें ज्ञान अगोदर मिळवा. तुम्हांला इतरांनी योग्य मान द्यावा अशी तुमची मनीषा आहे का, तर मग तुम्ही पहिल्या प्रथम शिपाई बना. तुमचें राष्ट्र उत्तम राष्ट्रांत गणलें जावें अशी तुमची महत्त्वाकांक्षा आहे काय, तर मग तुम्ही आपलें सैन्य व आरमार उत्तम प्रतीचें करा. इतिहासरूपी शिक्षकाने केलेला हा उपदेश प्रत्येकाने आपल्या हृत्पटला-

वर सोनेरी अक्षरांनी खोदावा. सकाळ-संध्याकाळ त्याचें पारायण करावें व त्याप्रमाणे कृति करण्यास कधीहि चुकूं नये. इतिहासाने केलेला हा बहुमोल इतिहास जपानने सश्रद्ध व सावधान चित्ताने ऐकला त्याप्रमाणे त्यांनी आपली वागणूक ठेवली व त्याचें मधुर फळ त्याला खावयास मिळालें. ज्या जपानी लोकांची पन्नास वर्षांपूर्वी अर्धवट रानटी लोकांत गणना होत असेल त्यांचीच महती आज जगांत परोपरीने गायली जात आहे. पन्नास वर्षांच्या अवधींत त्यांच्या अंगभूत गुणांत फरक पडला असें मुळीच म्हणतां यावयाचें नाही. नाही म्हणावयास पूर्वी तीरकमठा घेऊन लढणारा जपानी वीर आज बंदूक घेऊन अचूक नेम ठोकतो आहे. पन्नास वर्षांपूर्वी एकहि लढाऊ जहाज नसलेल्या जपानजवळ आज पांच-पन्नास उत्तम प्रतीचीं लढाऊ जहाजें आहेत. आज जपानी सैन्याने अलौकिक पराक्रम गाजविले आहेत व त्यांच्या आरमाराने अद्वितीय जय मिळविला आहे. सारांश, जपानची लढाऊ शक्ति वाढल्याबरोबर इतर राष्ट्रांत जपानची योग्यताहि वाढूं लागली. जपानच्या युवराजाचा व युवराज्ञीचा आदरसत्कार खुद्द इंग्लंडच्या बादशहाकडून होऊं लागला व आज जगांतील प्रत्येक राष्ट्रांत जपानी मनुष्याचा मानसन्मान होत आहे. तेंच आपल्या हिंदुस्थानकडे पाहा. जो तो हिंदुस्थानांतील काळचा मनुष्याकडून तिरस्कारबुद्धीने चार पावलें दूर पळणार किंवा जवळ आलाच तर ठोठावणार. आमच्या देशांतील युवराजांची व युवराज्ञींची जवळ जवळ तीच स्थिति आहे. पण आमच्या हतभागी हिंदुस्थानची गोष्ट राहूं द्या. चीन देश बहुतांशीं स्वतंत्र असतां त्याचा आकार एवढा विस्तृत असतां व संपत्तीहि तशीच विपुल असतां, त्याला जगांत मोठासा मान आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. आमच्या देशांत चिनी मजूर नको अशी ज्या त्या देशाची एकसारखी ओरड चालली आहे. या सर्वांचें कारण चीनचें शक्तिहीनत्व होय. जर उद्या जपानच्या बादशहाप्रमाणे चीनचा बादशहा लष्करी खात्यांत सुधारणा करील व प्रसंग पडल्यास तीस लाख शिपाई व तीनशे लढाऊ जहाजें समरांगणावर आणूं शकेल, तर परवा चिनी मजुरांना धक्के मारून देशाबाहेर घालवून देण्याच्या ऐवजीं जो तो त्यांना प्रेमाने कवटाळील व आपल्या देशांत राहण्याविषयी त्यांना अत्याग्रह करील. सारांश, जें राष्ट्र लष्करी शक्तींत जास्त प्रबळ असतें तें राष्ट्र हरेक बाबतींत बलवान असणार, यांत संशय नाही.

आज हे विचार सुचण्याचें कारण बोअर लढाईंत प्रसिद्धीस आलेले लॉर्ड रॉबर्टस् यांनी इंग्लंडांतील तरुणांना लष्करी शिक्षण देण्याकरिता पार्लमेंटजवळ केलेली एक लाख पौंडांची मागणी होय. बोअर लढाईंत लॉर्ड रॉबर्ट यांना असा अनुभव आला की, नवीन भरलेल्या शिपायांचे लष्करी शिक्षण इतकें कमी दर्जाचें असतें की, अशा शिपायांचा समरभूमीवर मुळीच उपयोग होत नाही. खडें सैन्य अपुरें असतें व नवीन बनविलेलें सैन्य कुचकामाचें ठरतें, तरी एखाद्या राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगीं देशाला खड्या सैन्याप्रमाणे उपयोगी पडेल असें सैन्य थोड्या वेळांत तयार

करण्याची कांही तरी सोय असली पाहिजे. ही सोय म्हणजे देशांत स्वयंसेवकांच्या पलटणी बनवून त्यांना सर्व लष्करी शिक्षण देणें होय. हे स्वयंसेवक शिपाई धंदेवाईक शिपायांप्रमाणे आपल्या कामांत तरवेज राहून शांततेच्या दिवसांत त्यांना पोसण्याचा खर्च देशावर पडणार नाही. वास्तविक रीतीने पाहिलें असतां मायदेशावर एखादें संकट कोसळलें असतां त्याचा प्रतिकार करण्यास देशांतील सर्व आबालवृद्धांनी कंबर कसली पाहिजे. असें संकट निवारण्याचें काम देशांतील खड्या सैन्यावर टाकून इतर नागरिकांनी स्वस्थ बसतां कामा नये. परंतु अशा राष्ट्रीय संकटाच्या वेळीं देशाभिमानाने प्रेरित होऊन जरी लोक पुढे सरसावले, तरी हल्लीच्या काळीं समर-भूमीवर या युद्धकलाअनभिज्ञ लोकांचा उपयोग होणें शक्य नाही. म्हणून अशा लोकांस उत्तम प्रतीचें लष्करी शिक्षण देण्याची तजवीज होणें अति जरूर आहे.

लॉर्ड रॉबर्टस्‌साहेबांनी ही तजवीज करण्याच्या हेतूने अशी कल्पना काढली आहे की, शाळेंतील व पाठशाळेंतील विद्यार्थ्यांना इतर विषयांबरोबर नेम मारण्याचें शिक्षण देण्यांत यावें. लॉर्ड रॉबर्टस्‌साहेबांची सूचना सर्वोत्कृष्ट असून तिची अंमल-बजावणी जर करण्यांत आली तर इंग्लंडला परचक्रापासून भीति कधीहि बाळगावयास नको. आज इंग्लंडचें राज्य जगाच्या पाठीवर सगळीकडे पसरल्यामुळे त्यांना अनेक शत्रु उत्पन्न झाले आहेत व त्यांच्याकडून इंग्लंडला केव्हा व कोठे शह लागेल याचा नेम नाही. तरी इंग्लंडने सदोदित अशा प्रसंगास तोंड देण्याची जय्यत तयारी ठेवणें अत्यावश्यक आहे. असा एखादा प्रसंग उद्‌भवेल की, ज्या वेळीं खडें सैन्य अपुरें पडेल अशा प्रसंगीं गुलदस्त्यांत म्हणून कांही कसलेलें सैन्य शिलकी असल्यास फार उत्तम होईल. असें सैन्य शिलकी पडण्यास लॉर्डसाहेबांची युक्ति फारच उपयोगी पडेल. लहानपणीं प्रत्येक शाळेंत जाणाऱ्या मुलाला घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, भाला फेकणें, बंदुकीने नेम धरणें व तोफा डागण्यास शिकणें वगैरे सर्व लष्करी गोष्टींचें ज्ञान अवश्यमेव करून दिलें पाहिजे. एक वेळ दुसरा एखादा विषय गाळल्यास हरकत नाही, पण हें लष्करी शिक्षण आवश्यक विषयांपैकी एक विषय करणें अति अगत्याचें आहे. मुलगा पदवीधर झाला पण जर राजश्रींना घोड्याच्या रिकिबींत पाऊल ठेवल्याबरोबर घेरी येत असेल किंवा बंदुकीचा आवाज ऐकल्याबरोबर मूर्च्छा येत असेल, तर अशा कलमबहाद्दराची विद्वत्ता आमच्या मताने कवडीमोल आहे. उदार शिक्षण मिळाल्यास मनुष्याने मिळवावें. पण प्रत्येक मनुष्याने — मग तो कोणत्याहि दर्जाचा व कोणत्याहि योग्यतेचा असो — लष्करी शिक्षण अवश्यमेव संपादन केलें पाहिजे. एवढेंच नव्हे तर, प्रत्येक देशांत पहिल्या कायद्याचें पहिलें कलम हेंच पाहिजे की, प्रत्येक सोळा वर्षांपासून साठ वर्षांपर्यंत वयाच्या शारीरिक व्यंगरहित मनुष्याने लष्करी शिक्षण संपादन केलेंच पाहिजे व मायदेशाच्या रक्षणार्थ शिपायाचा पवित्र पेशा पत्करलाच पाहिजे. असा कायदा ज्या देशांत असेल व ज्या देशांत त्याची अंमल-बजावणी कडक रीतीने होईल त्या देशाविरुद्ध केवढेंहि मोठें काहूर उठलें किंबहुना

सर्व जगाने एकवटून त्याच्या स्वातंत्र्यापहारार्थ स्वारी केली तरी, असा देश सर्व जगाला भारी राहील. ग्रेट ब्रिटनांत आज निदान चार-पांच कोटि प्रजा आहे. त्या प्रजेपैकी पुरुषांची संख्या निदान दोन कोटि असण्यास हरकत नाही. या दोन कोटि लोकांपुढे कोणता शत्रु टिकाव धरूं शकेल? तरी विद्यार्थ्यांना नुसतें नव्हे, तर देशांतील सर्व पुरुषांना लष्करी शिक्षण प्रसंग पडल्यास बळजबरीने देणें हें सरकारचें आदि कर्तव्य आहे. हें कर्तव्य जर सरकार करीत नसेल, तर आपण होऊन आपला नाश करीत आहोंत असें म्हटल्यास कांही गैरवाजवी होणार नाही.

आज इंग्लंडांत स्वयंसेवक होण्याची इच्छा दिवसेंदिवस कमी होत चालली आहे व ती कमी होणें साहजिकच आहे. जसजसा मनुष्य सुखावतो तसतसा त्याला शारीरिक दगदगीचा मनापासून कंटाळा येतो. हाच नियम राष्ट्रालाहि लागू पडतो. आज इंग्लंडची सांपत्तिक स्थिति इतकी सर्वोत्तम आहे की, इंग्लंडच्या तोडीचें धनाढ्य राष्ट्र जगांत दुसरें नाही. आज कोणत्याहि आंग्ल जनाला फारसा शारीरिक व मानसिक त्रास न सोसतां गाडीघोडा सहज वापरतां येतो. 'सिव्हिल सर्व्हिस' परीक्षा पसार झाली असल्यास उत्तमच झालें. तिच्या अभावीं गोरा रंग आपल्या आश्रयदात्यांचें वाटेल तें कोड आज पुरवूं शकतो. थोडेसें मायभाषेचें ज्ञान असल्यास सरकारी कॉलेजांत प्रोफेसरांच्या जागा मिळतात. तेवढीहि अक्कल नसल्यास जरा शरीराची काठी उंच व धडधाकट असल्यास मायबाप पोलिसखातें अशा मनुष्यास कधीहि अंतर देत नाही. येथेहि नशिबाने वाकडी नजर केली तरी, गोऱ्या मनुष्याने भिण्यास नको. कारण सर्व गोऱ्या लोकांना जवळ जवळ मोफत सुग्रास अन्न घालण्यासाठी निरनिराळ्या रेल्वे-कंपन्यांनी अन्नसत्रें उघडलीं आहेतच. ही स्थिति आंग्लभूमिस्थ गौरकायांची आहे. तेथील मजुरांना सुद्धा आठवड्याचे चाळीस पासून पन्नास शिलिंग मिळतात. हें वेतन लढाऊ शिपायांना मिळणाऱ्या पगारापेक्षा जास्त असतें. म्हणून सैन्यांत शिरण्यास तेथील मजूरदारांची इच्छा नसते. यामुळे सैन्यांत भरती होण्यास इंग्लंडांत बरीच पंचाईत पडूं लागली आहे. इंग्लंडांत आज जो तो मिजासखोर व डौली होत चालला आहे. ज्याचा त्याचा देशाभिमान सभेस व्याख्यानें देऊन किंवा वर्गण्या देऊन व्यक्त होत आहे. पण प्रत्यक्ष खांद्यावर बंदूक टाकून समरभूमीवर शत्रूस तोंड देण्यासाठी कोणीहि घर सोडण्यास तयार नाही. आमच्या मतें असें होणें साहजिक आहे. देशांत संपत्ति वाढली की भुखेच्छा व श्रमविमुखता वाढल्याच पाहिजेत. असें होऊं लागलें म्हणजे देशांतील सर्वांची भिस्त खड्या सैन्यावर सहजपणीं असते. असें एकदा झालें म्हणजे सैन्यांतील अधिकाऱ्यांचें फाजील स्तोम माजतें. शिपाई लोक उद्दाम व शिरजोर होतात व लौकरच असा देश धुळीस मिळतो. हल्ली इंग्लंडची स्थिति या तऱ्हेची होण्यास सुरुवात झाली आहे. रोम शहराच्या पडत्या काळाच्या इतिहासांत व इंग्लंडच्या हल्लीच्या इतिहासांत अंधूक व अस्पष्ट का होईना, पण साम्य दिसूं लागलें आहे. रोम शहरीं पूर्वी एक वर्ष मुदतीचे 'कॉन्सल' नेमण्यांत

येत असत. पण पुढे ज्युलियस सीझरच्या कारकीर्दीपासून ते तहाहयातचें नेमण्यांत येऊं लागलें. हल्ली हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयांची मुदत दोन वर्षांनी का होईना, पण वाढण्यास सुरुवात झाली आहे. हीच पुढे दहा वर्षे किंवा वीस वर्षांपर्यंत वाढत जाण्याचा संभव आहे. प्रधानमंडळाला कायमची सुपारी दिल्यासारखी दिसतें आहे. लष्करी कामगारांचें प्राबल्य रोम शहराप्रमाणे हल्ली इंग्लंडांत व हिंदुस्थानांत स्पष्टपणें दिसूं लागलें आहे. इंग्लंडांत लॉर्ड रॉबर्ट याचें म्हणणें जो तो झेलतो आहे. हिंदुस्थानांत कर्झन-किचनेरच्या तंट्याचा शेवट लॉर्ड किचनेरसारखा झाला. दिवसें-दिवस इंग्लिश लोकांची स्वयंसेवक होण्याची नाखुषी स्पष्टपणें दिसत आहे. तरी या सर्व कारणांवरून इंग्लंडला आपली हल्लीची स्थिति कायम ठेवण्यास एकच उपाय आहे व तो लॉर्ड रॉबर्टस्‌साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे लष्करी शिक्षणांत पारंगत अशा स्वयंसेवक लोकांचें एक सैन्य बनविणें होय. रॉबर्टस्‌साहेबांची सूचना कितपत अमलांत येते इकडे सर्वांची नजर लागली आहे.

पण हा इंग्लंडसंबंधाने विचार झाला. आमच्या हिंदुस्थानांत अशाच प्रकारची कांही तरी तजवीज होणें इष्ट व आवश्यक आहे. आज इंग्लंडचा व हिंदुस्थानचा संबंध जडला आहे व त्यापासून त्या दोघांचेंहि हित व्हावें अशी आमची इच्छा आहे. असें असून जर या संबंधापासून फक्त इंग्लंडची पोळी पिकावी व हिंदुस्थानची खिचडी करपावी असाच परिणाम होत असेल किंवा होईल, तर मग हें ठीक नाही असें आम्हांस कष्टाने म्हणावें लागत आहे. सन १८५८ च्या जाहीरनाम्याच्या भाषेवरून त्या वेळीं विद्यमान असलेल्या लोकांच्या मनांत असे आशांकुर फुटले की, या इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानचें कोटकल्याण होईल; परंतु पन्नास वर्षांच्या अनुभवावरून सर्वांच्या ध्यानांत ही गोष्ट येऊन चुकली आहे की, त्या वेळीं लोकांनी केलेला अंदाज सर्वथैव चुकला. बंडानंतर स्थापित झालेल्या शांततेमुळे आमची सांपत्तिक स्थिति न सुधारतां दिवसेंदिवस खालावत चालली आहे. नुकतें कोठे शिक्षणाचा फैलाव होण्यास सुरुवात झाली होती तो 'युनिव्हर्सिटी अ‍ॅक्ट' पसार होऊन उदार शिक्षणाचें बहुतेक वाटोळें झालें. आता हिंदुस्थानच्या स्थितीचें वर्णन "बाहेर शांतता पण पोटांत आकान्त व डोक्यांत अंधार" या एका वाक्याने यथार्थ होण्यासारखें आहे. ही दुःस्थिति सुधारण्याची शक्ति सरकारच्या अंगीं असतां सरकार तिचा उपयोग कां करीत नाही हे एक मोठें कोडेंच आहे. हें कोडें उकलण्याचा आम्हीं प्रयत्न केला असता, पण प्रस्तुत लेखांत तो अस्थानीं होईल म्हणून त्या संबंधाने आम्ही आज कांही जास्त लिहूं इच्छित नाही. हल्लीचा प्रश्न आहे की, जर इंग्लंडांतील विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण देण्यांत यावें अशा सूचना होत आहेत, तर अशाच प्रकारचें लष्करी शिक्षण हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांना देण्यात यावें असें आमचें मत आहे. इंग्रज लोकांनी हिंदुस्थानवासियांच्या स्वयंसेवक पलटणी तयार कराव्या; पण आमचें हें म्हणणें सरकारास रुचेल असें आम्हांस वाटत नाही. हिंदुस्थानांत

हल्ली स्वयंसेवकांच्या पलटणी आहेत, पण त्यांत विवक्षित जातींच्या लोकांस घेतलें जातें. आम्हांस दुसरीकडील विशेष माहिती नाही. पण आमच्या पुणें शहरीं दोन-अडीचशे स्वयंसेवक शिपायांची एक 'कंपनी' आहे; पण त्या कंपनीत फक्त पारशी, ज्यू, ख्रिश्चन या जातींच्या लोकांस घेण्यांत येतें. पुणें शहरीं मुख्य भरणा हिंदूंचा असून, त्यांच्यापैकी एकासहि फक्त जातीमुळे स्वयंसेवक होतां येऊं नये हें सुधारलेल्या सरकारास सुधारलेल्या शतकांत शोभत नाही. फक्त गुणांवर सर्व कांही केलें जाईल असें इंग्रज सरकारचें ब्रीद आहे व तें त्यांनी जाहीरनाम्यांत स्पष्टपणें नमूद केलें आहे. असें असतां आपण प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याला आपणच आपल्या हाताने हरताळ लावावा हें कांही सरकारला शोभत नाही. स्वयंसेवक शिपाई होण्यास आवश्यक लागणारे गुण जर हिंदूंत किंवा मुसलमानांत नसतील, तर मग आमचे कांहींहि म्हणणें नाही. पण ज्याचा मेंदू बिघडलेला नाही असा कोणता मनुष्य असें म्हणूं शकेल की, शिवबांच्या अस्सल वंशजांत हे गुण वसत नाहीत? मुसलमान उत्तम शिपाई होऊं शकणार नाहीत असें म्हणणाऱ्या मनुष्यास मोकळे हिंडूं न देण्याची पहिल्या प्रथम खबरदारी घेतली पाहिजे. तरी हिंदूंत व मुसलमानांत शिपाईपेशाला लागणारे गुण असतां त्यांना स्वयंसेवक होण्याची परवानगी नाही या गोष्टींतील गुह्य कांही निराळें आहे व तें कोणासहि थोडया विचारांनी सहज कळण्यासारखें आहे. हिंदुस्थानांत हिंदूंची संख्या वीस कोटि व मुसलमानांची संख्या आठ कोटि आहे. सरकारास अशी भीति वाटते की, जर या लोकांस स्वयंसेवक होण्याची परवानगी दिली, तर कदाचित् आगेमागे हे लोक सरकारविरुद्ध बंड करतील व न जाणो, त्यांच्यापासून इंग्रजी राज्याला धोका पोहोचेल. म्हणून ज्या जातींच्या लोकांची संख्या अतिशय थोडी आहे अशाच लोकांस स्वयंसेवक होण्याची परवानगी देण्यांत आली आहे व जोंपर्यंत हिंदूंची व मुसलमानांची संख्या हल्ली आहे इतकीच किंवा जास्त राहील तोंपर्यंत त्यांना स्वयंसेवक होण्याची परवानगी मिळेल अशी आशा बाळगावयास नको.

सरकारची भीति एकार्थीं साधार व दुसऱ्या अर्थीं निराधार आहे. साधार अशी की, जर सरकार सवतीच्या पोरांप्रमाणे आम्हांस वागवील, तर सरकारास आम्ही सशस्त्र असलों तर भीति जरी नाही, तरी त्रास खचित सोसावा लागेल. पण जर सरकार पोटच्या पोरांप्रमाणे आमच्याशीं वर्तणूक ठेवील तर आम्ही सशस्त्र असल्यापासून सरकारचा तोटा न होतां उलट जास्त फायदा होईल. सवतीच्या पोराच्या हातांतल्या कटचारीची भीति फक्त सावत्र मातोश्रीस असते. सख्खी आई त्याच कटचारीच्या जिवावर खुशाल आपल्या मुलाच्या मांडीवर डोकें ठेवून घोरत पडते. कसेंहि असो, सरकार आम्हांस पोटच्या किंवा पोरक्या पोरांप्रमाणे वागवो, पण आमचें सरकारास असें नम्रपणें सांगणें आहे की, तुम्ही आम्हांस लष्करी शिक्षण द्याच द्या. एक वेळ उदार शिक्षण न दिलें तरी चालेल, पण लष्करी शिक्षण देण्याच्या कामीं मात्र टाळाटाळी करूं नका. वेदविद्येचें अध्ययन एक वेळ न झालें तरी चालेल, पण

धनुर्विद्या प्रत्येकास अवश्यमेव अवगत असली पाहिजे. ज्या मनुष्यास धनुर्विद्येचें ज्ञान नाही तो असून नसून सारखाच. आम्ही युद्धकलाभिज्ञ व सशस्त्र झालों म्हणजे इंग्रजी राज्याला धक्का पोहोचेल असें जरी घटकाभर धरलें तरी एवढ्याच कारणामुळे सरकारला तीस कोटि लोकांना नेभळे व कुचकामी करण्याचा हक्क कसा पोहोचतो हें आम्हांस कळत नाही. खऱ्या-खोट्या भीतीमुळे सरकार हिंदुस्थान देश हा 'षंढांचा आखाडा' बनविणार की काय? शस्त्रांच्या अभावीं हिंस्त्र पशूंच्या भक्षस्थानीं पडणाऱ्या साठ हजार लोकांची सांवत्सरिक कत्तल सरकार अशीच चालू ठेवणार काय? उद्या जर इंग्रज सरकारच्या कमनशिबाने रशियाने हिंदुस्थानवर स्वारी केली व त्यांत त्याला यश येत गेलें, तर इंग्रज सरकारच्या अभावीं आमची रशियन कोसॅकपुढे कशी दशा होईल याची कल्पना सरकारास येत नाही काय? म्हणून हिंदुस्थान सरकारने विलायत सरकारप्रमाणे येथेहि शाळांतून व पीठशाळांतून लष्करी शिक्षण देण्याचा उपक्रम करावा व हत्यारांचा कायदा रद्द करून हिंदुस्थानवासियांस 'मनुष्यें' करण्याचें श्रेय पदरीं घ्यावें. आपलें राज्य सुरक्षित राहवें म्हणून तीस कोटि प्रजेला निःशस्त्र व निःसत्त्व करणें हें कृत्य सर्व 'इस्टेट' आपल्याला मिळावी म्हणून भावाचा वंशखंडन करण्याच्या हेतूने त्याच्या अज्ञान मुलांचें पुरुषत्व नष्ट करण्याइतकें दुष्ट व नीच आहे.

— भाला, दि. ११ जुलै १९०५

---

## ५. या, पण कांही द्या

पिता आणि पुत्र या जोडीमध्ये जें मायेचें नातें असतें तसेंच नातें राजा व प्रजा यांच्यामध्ये असलें पाहिजे. बाप ज्याप्रमाणे आपल्या मुलांचें आपल्या ऐपतीप्रमाणे पालनपोषण करतो, त्यांस उत्तम शिक्षण देतो, त्याला सन्मार्गाला लावतो, कुटुंबपोषणाची शक्ति त्याच्या अंगांत उत्पन्न करतो व शेवटीं बरोबरीचा मुलगा झाल्यावर कुटुंबाचा सर्व कारभार त्याच्यावर टाकून आपण 'हरि हरि' म्हणत परमार्थसाधनाच्या मार्गाला लागतो, त्याप्रमाणेच राजाने देशांतील संपत्तीच्या मानाने प्रजेचें संगोपन केलें पाहिजे. स्वदेशांत किंवा इतरत्र मिळू शकणारें ज्ञान तिच्या आटोक्यांत आणून दिलें पाहिजे. राज्यशकट हाकण्याची कला तिला हळूहळू शिकवून व राज्यसूत्रें एकामागून एक तिच्या स्वाधीन करून आपला अधिकार, आपले हक्क व आपला दर्जा या सर्वांचा आपखुषीने त्याग करून आपण होऊन आपल्या प्रजेंत मिसळून गेलें पाहिजे. वरती लिहिल्याप्रमाणे सात्त्विक इच्छा धरणाऱ्या व त्याप्रमाणे दैविक स्वार्थत्याग करणाऱ्या महात्म्यालाच 'राजा' हें नामाभिधान शोभतें. याच्या-

विपरीत कृति करणाऱ्या राजाला पशूंचा राजा जो सिंह त्याची उपमा समर्पकतेने साजते. ज्याप्रमाणे मृगराज आपल्या तीक्ष्ण नखांच्या जोरावर रानावनांतून हिंडणाऱ्या चतुष्पादांवर स्वेच्छेनुसार झडप टाकतात व आपली क्षुधा तृप्त करतात, त्याप्रमाणे हे हिंस्त्र नृपराज आपल्या सैन्याच्या जोरावर प्रजेवर वाटतील तसे कर बसवून तिच्याजवळून बळजबरीने पैसे उकळून आपली मिजास चालवितात; परंतु अशा मृगराजामध्ये व नृपराजामध्ये एक मोठा फरक आहे तो हा की, केसरीमहाराजांची चतुष्पादांवरील सत्ता जगदुत्पत्तीपासून आजपर्यंत एकसारखी अखंडित चालत आली आहे व ती पुढेहि तशीच चालत राहणार; पण तत्समान नृपराजांचें अनियंत्रित प्रभुत्व सदैव टिकेलच असें नाही. उलट पुराणांतून व इतिहासांतून अशीं उदाहरणें सापडतात की, त्रस्त व ग्रस्त झालेल्या प्रजाजनांनी निरुपायास्तव आपल्या बकासुरी राजांविरुद्ध शस्त्र उचलून व त्यांना त्यांच्या दुष्कर्माबद्दल कडक शासन दिलें आहे.

पुराणांतरीं वनराजाला संतप्त झालेल्या ब्राह्मणांनी नुसत्या श्वासोच्छ्वासाने दग्ध करून टाकला. इंग्लंडच्या पहिल्या चार्लसला सतावलेल्या आंग्ल जनांनी फासावर चढविला. फ्रान्सच्या सोळाव्या लुईचें मुंडकें गांजलेल्या फ्रेंच लोकांनी बकऱ्याप्रमाणे छाटून टाकलें. हल्ली सर्व बाजूंनी भंडावलेले रशियन लोक झारच्या पाठीमागे हात धुवून लागले आहेत. सारांश, कांही मर्यादेच्या पलीकडे निर्बल प्रजाहि आपल्या सबल राजाविरुद्ध बंड करते व अनेक वर्षे जाळणाऱ्या दुःखाग्नीला जुलमी राजाच्या रक्ताने विझवून टाकते. परंतु अशी निकराची स्थिति येऊं देणें हें राजा व प्रजा अशा दोघांनाहि अहितकारक आहे. ज्या राजाने आपल्या प्रजाजनांशीं गोडीगुलावीने व मायाममतेने वागावें, त्यांच्या सुखदुःखांविषयी काळजी वाहावी व ज्याच्या योगाने त्यांचें कल्याण होईल अशी राज्यपद्धति सुरू करावी, त्यानेच केवळ स्वार्थावर नजर ठेवून फक्त आपली तुंबडी भरावी व प्रजाजनांच्या तोंडाला पानें पुसावीं हें धर्मदृष्टचा, नीतिदृष्टचा व व्यवहारदृष्टचा निंद्य व घातक आहे. तशांतून जगाच्या गतकालीन इतिहासाची इतकी खडखडीत शिकवणी असतां २० व्या शतकांत सुद्धा राजेलोकांच्या लोभाला ओहोटी न लागतां उलट त्याला भरभक्कम भरती यावी हें दुश्चिन्ह समजलें पाहिजे.

जगांतील इतर राजेलोकांबद्दल आपणांस कांही कर्तव्य नाही. आज ज्यांचा व आमचा संबंध ईश्वरेच्छेमुळे जडला आहे त्या इंग्रज सरकारासंबंधाने विचार करतां मनाला समाधान होईल असें आम्हांस वाटत नाही. शंभर वर्षांच्या अवधींत आम्ही सफई धुतले गेलों आहोंत. अन्नाला मोताद होऊन कफल्लक बनलों आहोंत. जवळ असलेली जुनी विद्या घालवून नव्या विद्येचें फोलकट चघळीत बसलों आहोंत व परतंत्रतेमुळे आम्ही जगांतून बहुतेक उठल्यासारखे झालों आहोंत. अशी आमची चोहो बाजूंनी विपन्नावस्था झाली असतां, उलट आम्ही राजद्रोही

असा पुकारा होत आहे. 'राजद्रोही कोण' हा प्रश्न मोठा नाजूक आहे. म्हणून त्याचें उत्तर अमळ विचार करून दिलें पाहिजे. अमुक मनुष्य किंवा अमुक लोक राजद्रोही आहेत हें ओळखण्याचा 'थर्मामीटर' आमच्याजवळ नाही. राजद्रोहरूपीहि नकस सोन्याची पारख करणारा कस आमच्या बटव्यांत नाही. राजद्रोहाची धाण शोधून काढण्यास लागणारें तीक्ष्ण घ्राणेंद्रिय आमच्या कम-पुण्याईने आमच्या वांट्यास आलें नाही; परंतु आमच्या अँग्लो-इंडियन बंधूसंबंधाने मात्र असें म्हणतां यावयाचें नाही. त्यांनी या राजद्रोह शास्त्राचा अभ्यास इतका कसून केला आहे की, या शास्त्रांत पारंगत व निष्णात असे महामहोपाध्याय त्यांच्यांत शेकडो आहेत. अशा विद्वान् आचार्यांनी ज्या लोकांना एकदा राजद्रोही ठरवलें असतें ते लोक त्या तऱ्हेचे नाहीत असें म्हणणें म्हणजे एकाच वेळीं दोन अपराध करणें होय. पहिला अपराध या उपयुक्त शास्त्राचें ज्ञान न मिळविणें हा होय व दुसरा अपराध ज्यांनी या शास्त्रांत भगीरथ श्रम करून पारंगतत्व संपादन केलें आहे अशा लोकांच्या म्हणण्यावर विश्वास न ठेवणें हा होय. असो.

या अँग्लो-इंडियन आचार्यांनी हिंदुस्थानांतील सुशिक्षित व आंग्ल विद्याविभूषित लोक राजद्रोही आहेत किंवा होत चालले आहेत, असा आपला अभिप्राय दिला आहे. हा अभिप्राय देतांना त्यांनी वरील राजद्रोहस्मृतींतील कोणकोणत्या वचनांचा आधार घेतला आहे हें सांगण्यांत आलें नाही. यामुळे जरी आपणांस वरील सिद्धान्ताचें यथार्थत्व सोपपत्तिक रीतीने कळत नाही, तरी त्यामुळे मूळ सिद्धान्ताला बाध येतो असें नाही. 'हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोक राजद्रोही आहेत' हा सिद्धान्त शब्दशः व अक्षरशः खरा आहे. कारण ज्या दयावंत सरकारने आपण होऊन आपणांस कारकुनी-दर्जाचे उदार शिक्षण दिलें त्या प्रजावत्सल सरकारच्या पाठीमागे आता शिक्षणासंबंधाने टुमणें लावणे हा धडधडीत राजद्रोह नाही असें कोण म्हणेल? ज्यांनी अश्रान्त श्रम करून हिंदुस्थानांतील दंगेधोपे मोडून, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अननुभूतपूर्व अशी शांतता करून सोडली त्यांच्या कानीं 'आम्हांस शस्त्रें द्या' अशी कटकट करणें यापरता कृतघ्नपणा तो कोणता?

आपली जन्मभूमि व इष्टमित्र यांस सोडून हजारो मैल लांब असलेल्या हिंदुस्थानच्या उष्ण हवेंत एतद्देशियांच्या हितासाठी जे करपून जात आहेत त्यांनी केलेल्या वेडयावाकडया लीलेचा बभ्रा सर्व जगभर करण्यासारखें राजभक्तिशून्यत्व तें कोणतें! रेल्वे व कालवे बांधून ज्यांनी दुष्काळाच्या दिवसांत हिंदुस्थानवासियांच्या संरक्षणासाठी उत्तम सोयी केल्या त्यांनी हिंदुस्थानांतील व्यापार सपशेल बुडविला असा गिल्ला करणें, हे स्वामीद्रोहाचें लक्षण नाही असें कोण म्हणेल? सारांश, या जगांत हिंदुस्थानांतील लोकांसारखे कृतघ्न, स्वामीद्रोही व निमकहरामी लोक सापडणें कठीण जाईल. अशा लोकांनी राजभक्ति किंवा अँग्लो-इंडियन भक्ति दाखविणें म्हणजे सुकाळ असो किंवा दुष्काळ पडो, खायाला मिळो किंवा न मिळो, कोणी बडवो

किंवा तुडवो, कर वाढोत किंवा कमी होवोत. सारांश, कांही होवो व राज्यकर्ते कसेंहि वागोत, यांनी गप्प बसून सर्व निमूटपणें सोसलें पाहिजे. कोणत्याहि तऱ्हेची कुरकूर किंवा धुसफूस करतां कामा नये. आम्ही देऊं त्यांत आनंद मानला पाहिजे. आम्ही घेऊं त्याबद्दल संतोष दाखविला पाहिजे. राजभक्तीची ही 'अँग्लो-इंडियनी' मीमांसा ज्या लोकांना कबूल नाही ते सर्व त्यांच्या मताने राजद्रोही होत.

वरती केलेली राजद्रोहाची 'अँग्लो-इंडियनी' मीमांसा ज्यांना संमत नाही अशा लोकांना हल्ली मोठी पंचाईत येऊन पडली आहे. हिंदुस्थानांत सर्व राजकीय सत्ता या अँग्लो-इंडियनांच्या हातांत वस्तुतः असल्या कारणाने, त्यांच्या मीमांसेला जास्त जोर आला आहे. परंतु वास्तविक रीतीने पाहिलें असतां राजद्रोहाचें अँग्लो-इंडियनप्रणीत तत्त्व सर्वांशीं चुकीचें आहे. सन १८५८ सालीं ख्रिस्तवासी महाराणी-साहेबांनी कोणत्या का हेतूने होईना, जी 'मोटी सनद' हिंदुस्थानांतील लोकांना दिली त्या सनदेच्या तत्त्वाशीं या अँग्लो-इंडियनी मनाचा पूर्ण विरोध आहे. त्या सनदेंतील मुख्य तत्त्व हेंच की, राणीसाहेबांच्या मताने हिंदुस्थानांतील लोक इंग्लंडच्या लोकांसारखेच आहेत. त्यांना जे हक्क तेच यांना हक्क आहेत. त्यांच्यांत व यांच्यांत राजकीयदृष्टचा मुळीच भेद नाही. असें जर आहे तर त्या सनदेच्या विरुद्ध आचरण करण्याचा हक्क राणी-सरकारच्या अधिकाऱ्यांना कसा पोहोचतो हें आम्हांस कळत नाही. त्या सनदेला आता कोणी 'अशक्य सनद' म्हणो किंवा 'अनिष्ट सनद' म्हणो, पण त्या सनदेचें अस्तित्व कोणास नाकबूल करतां यावयाचें नाही. त्या सनदेवर राणीसाहेबांची सही आहे. ही सनद सर्व जगाच्या समोर प्रसिद्ध झालेली आहे. ज्या उदार साध्वीने ती सनद आम्हांस दिली आहे तिने ती आपल्या आयुष्यांत रद्द केलेली नाही. एवढेंच नव्हे तर, राज्यपदावर आरूढ होतांना आम्ही आमच्या पूज्य मातोश्रीने दिलेलीं सर्व वचनें पाळूं असें वचन हल्लीच्या बादशहांनी दिलें आहे. असें जर आहे तर त्या सनदेच्या विरुद्ध जे आचरण करतात ते ख्रिस्तवासी राणीसाहेबांचा अपमान करतात. एवढेंच नाही तर, हेच लोक राजद्रोहाचें भयंकर पाप करीत आहेत असें म्हणण्यास मुळीच हरकत नाही.

रंगाकडे नजर देऊन सरकारी जागा कधींहि देण्यांत येणार नाही, असें स्पष्ट आश्वासन सनदेंत दिलें असतां, आज पांढऱ्या रंगाला कृत्रिम उपायांनी नसती किंमत देण्यांत येत आहे. हा राजद्रोह नाही काय? हिंदुस्थानांतील लोकांची आबादानी हेंच आमचें सुख, अशी इच्छा सनदेंत नमूद केली गेली असतां त्या इच्छेला तुच्छ समजून सर्व हिंदुस्थान देश मोठा थोरला 'भिकारखाना' बनवून टाकण्यांत राजद्रोहाचा गुन्हा होत नाही काय? जेणेंकरून तुमची सुधारणा व भरभराट होईल अशा पद्धतीच्या राज्यपद्धतीने तुमच्यावर आम्ही राज्य करूं असें अभिवचन सनदेंत दिलें असतां विगतिप्रवण राज्यपद्धति अमलांत आणण्यानें राज-भक्ति दाखविली जाते काय? सारांश, राणीसाहेबांनी सनदेंत दिलेल्या अभिवचनां-

विरुद्ध वर्तन हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचें आहे व दिवसेंदिवस तें जास्त विरुद्ध होत चाललें आहे. यावरून राजद्रोहाचा किंवा राज्ञीद्रोहाचा दोष त्यांच्यावरच येऊन पडतो हें उघड आहे. आज जर हिंदुस्थानांत राजद्रोह करण्यास सोकावलेले कोणी लोक असतील तर ते हिंदुस्थानांतील राणी-सरकारचे किंवा त्यांच्या चिरंजिवाचे गौरकाय चाकर होत. आम्ही या गौरकाय अधिकाऱ्यांस असें स्पष्ट व खडखडीतपणें सांगतों की, राजद्रोह करणें हें हिंदुस्थानांतील लोकांचें ब्रीद नाही. पण सनदेंतील हक्क सोडण्यास ते कधीहि तयार होणार नाहीत. हिंदुस्थानांतील लोक एडवर्ड बादशहाचे प्रजाजन राहतील. ते त्यांच्या अधिकाऱ्यांचे गुलाम कधीहि होणार नाहीत. आम्हीं एडवर्डद्रोह करणार नाही. पण अँग्लो-इंडियन द्रोह करण्यास कधीहि चुकणार नाही. आर्यभूमि ही आंग्लभूमीची दासी या नात्याने राहण्यास कधीहि खुषी नाही. पण ती आंग्लभूमीची ताई या नात्याने सोडण्यास कधीहि राजी नाही. सारांश, बरोबरीच्या नात्याने, समानत्वाच्या नात्याने, बंधुत्वाच्या नात्याने इंडियन लोक इंग्रज लोकांशीं सहवास करण्यास कधीहि कां-कू करणार नाहीत. पण हे बरोबरीचे किंवा बंधुत्वाचें नातें अँग्लो-इंडियन लोकांना रुचत नाही व पचत नाही आणि म्हणून नेहमी त्यांच्याकडून राजद्रोहाची तुतारी वाजवण्यांत येत असते. आमचें आमच्या सर्व देशबंधूंस असें सांगणें आहे की, या तुतारीच्या आवाजाने तुम्ही भेदरून जाऊं नका. जर कदाचित् तिच्या कर्कश आवाजाने तुमच्या कानठळ्या बसत असतील, तर 'मोठ्या सनदेच्या' गुड्या तुम्ही आपल्या कानांत घाला व खुशाल झोपी जा.

सन १८५८ च्या सनदेवर सर्वस्वीं भिस्त ठेवून अँग्लो-इंडियनांशीं लढणाऱ्या आम्हां इंडियन लोकांना सदरहू सनद देणाऱ्या राणीसाहेबांचे नातू येत्या नोव्हेंबर महिन्यांत हिंदुस्थानांत येणार आहेत हें ऐकून आनंद झाल्यावांचून राहणार नाही. कारण आजीबाईंनी दिलेलीं वचनें इमाने-इतबारे पाळलीं जावींत अशी इच्छा नातवास असणे अगदी संभवनीय आहे. परंतु हें आगमन ज्या तऱ्हेने होणार आहे ती तऱ्हा आम्हांस बिलकुल पसंत नाही. आजीबाईंनी दिलेल्या सनदेची पायमल्ली आज ४७ वर्षे कोणत्या तऱ्हेने होत आहे याची कल्पना दरबारी थाटाने व बादशाही झोकाने हिंदुस्थानांत हिंडल्यास कधी होणार नाही. कारण युवराजाभोवतीं जमलेला प्रत्येक संस्थानिक, जहागीरदार, सरदार किंवा दुसरा कोणीहि आपल्या चेहऱ्याने, बोलण्याने किंवा वागण्याने वस्तुस्थितीचा विपर्यास करून भलताच ठसा युवराजांच्या मनावर करून टाकील. युवराजांभोवतीं जमलेल्या मनुष्यांचें आनंदी व उल्हासी चेहरे हिंदुस्थानभर असलेल्या कोटयवधि दुःखी व दुर्मुखलेल्या चेहऱ्यांचे प्रतिनिधि खात्रीने असूं शकणार नाहीत. त्यांनी वापरलेले झोकदार कपडेलत्ते व मौल्यवान् दागदागिने रयतेच्या दारिद्र्यावर झिलई केल्याशिवाय राहणार नाही. भेटीनंतर देण्यांत येणाऱ्या जंगी मेजवान्यांनी अन्नावांचून मरणाऱ्या सात कोटि इंडियन लोकांच्या उपासमारीची कल्पना युवराजांना होणार नाही व निरोप देतेवेळीं केलेल्या

गुळचट भाषणांनी हिंदुस्थानवासियांच्या वास्तविक गरजांचें ज्ञान त्यांना मिळूं शकणार नाही. म्हणून युवराजांना आमची अशी नम्र विनंती आहे की, जर यावयाचेंच असेल तर राणीसाहेबांचे नातू, प्रजेचे राजे व रयतेचे मायबाप म्हणून या पोकळ बादशाही डामडौल झुगारून द्या. रयतेंत मिसळून त्यांचीं गाऱ्हाणीं स्वत: कानांनी ऐका व खऱ्या लोकनायकांकडून सुचविण्यांत येणारे उपाय अमलांत आणण्याची तजवीज करा. असें न करतां जर हिंदुस्थानांतील सरकारी अधिकारी नेतील तेथे आपण जाल, ते सांगतील ते बोलाल व तुमच्या नांवाने ते जें करतील त्यांस आपण आपली संमति द्याल, तर मग आपण इंग्लंडचा किनारा न सोडलेला बरा. जर आपलें आगमन फक्त औपचारिक असेल, तर मग या निष्फळ यातायातींत आपण स्वत:ला पाडून घेऊं नका व इतरांना व्यर्थ खर्चांत ढकलूं नका. कारण आपल्या चेहऱ्याच्या दर्शनाची इच्छा नसून, आपल्या हृदयाच्या दर्शनाची लालसा सर्वांना आहे. आपले चेहरे कागदी का होईना, पण येथे वाटतील तितके मिळूं शकतील; पण आपल्या अंत:करणाचे 'फोटो' मात्र बाजारांत मिळूं शकणार नाहीत. कारण फोटो काढण्यास फार निराळ्या तऱ्हेच्या सामग्रीची आवश्यकता आहे. नेहमीचे फोटो काढण्यास लाकडी 'कॅमेरा'ची जरुरी आहे. अंत:करणाचे फोटो काढण्याच्या कामीं उपयोगी पडणारा कॅमेरा म्हणजे दुसऱ्याच्या दु:खांच्या अवलोकनाने डोळ्यासमोर उत्पन्न होणारी अंधेरी होय. दुसरे फोटो कागदावर काढले जातात.

अंत:करणाचे फोटो सहानुभूतिपूर्ण सत्कृत्यरूपी पटावर उमटलेले असतात. इतर फोटोंच्या अगणित प्रती यांत्रिक कलेच्या साह्याने वाढवितां येतात. अंत:करणाच्या फोटोच्या प्रती विवक्षित संख्येच्या पलीकडे जाऊं शकत नाहीत. म्हणून हे अंत:करण-फोटो ऊर्फ सत्कृत्यें फारच दुर्मिळ आहेत. हे फोटो काढणाऱ्या फोटोग्राफरांची किंमत इतर फोटोग्राफरांपेक्षा लक्षपटींनी अधिक आहे. असा फोटोग्राफर होण्याची महत्त्वाकांक्षा मनांत धरली पाहिजे व अशी इच्छा जर आपल्या अंत:करणांत वसत असेल तरच आपण इतक्या दूरचा प्रवास करावा. आपण येथे आल्यावर आपल्या सन्मानार्थ उडविलेल्या तोफांचा आवाज "मी माझ्या आजीने दिलेल्या सनदेला अमलांत आणण्याचा प्रयत्न ईश्वर स्मरून करीन" असें अभिवचन भरसभेंत दिल्यानंतर कृतज्ञतापूर्वक वाजविल्या जाणाऱ्या टाळ्यांच्या गजरापुढे फिका पडेल. "माझ्या हातांत जी कांही नियंत्रित राजकीय सत्ता येईल तिचा उपयोग मी सदसद्विवेकबुद्धीला स्मरून तुमच्या हिताकरिता करीन" असें आश्वासन दिल्यानंतर सर्वतोपरी निराश्रित झालेल्या आमच्या नेत्रांतून वाहणारे आनंदाश्रु उंची अत्तरांपेक्षा जास्त शीतल व सुवासिक असणार. "माझ्या आगमनाचें स्मारक म्हणून मी माझ्या पूज्य पित्याकडून कांही राजकीय हक्क तुम्हांस मिळवून देण्याचा प्रयत्न मनोभावाने करीन" असे उद्गार आपल्या मुखावाटें निघाल्यावर प्रजाजनांकडून मानण्यांत येणारे आपले आभार औपचारिक मानपत्रापेक्षा जास्त प्रेमाने भरलेले राहणार.

महाराज, आपण हिंदुस्थानच्या भूमीवर आपली पायधूळ झाडा, पण त्याचबरोबर हिंदुस्थानवासियांच्या उत्पन्न होणाऱ्या निराशेची धूळहि झाडून टाका. खचत चाललेल्या आमच्या अंतःकरणांना आपल्या प्रामाणिक अभिवचनांनी ठेका द्या व जखमी झालेल्या आमच्या हृदयांना राजकीय हक्काच्या पट्टया मारा. असो; युवराजाच्या आगमनाप्रीत्यर्थ पौर्वात्य चालीरीतीप्रमाणे एखादा राजकीय हक्क आम्हांस पार्लमेंटकडून देण्यांत आल्यास नोव्हेंबर महिन्यांत होणाऱ्या युवराजांच्या आगतस्वागताला विशेष शोभा येणार आहे. आमच्या राजभक्तीला शोभतील अशा मेजवान्या आमच्याकडून देण्यांत येतील, पण उलटपक्षीं युवराजांच्या इभ्रतीला साजेल असा एखादा हक्क मिळणें रास्त आहे. असा हक्क न मिळाल्यास जरी हिंदुस्थानांत जिकडे-तिकडे राजभक्तीचें प्रदर्शन करण्यांत आलें तरी त्यांत विशेष असा 'राम' आहे, असें आम्हांस वाटत नाही. राजभक्तीचें मिश्रण सक्रिय – शाब्दिक नव्हे – प्रजाप्रेमाशीं झाल्यास ते फारच रुचकर लागतें असें आम्हांस वाटतें. आमची अशी इच्छा आहे की, युवराजांची इकडे रवानगी करण्याच्या अगोदर पार्लमेंटने हिंदुस्थानांतील लोकांना पार्लमेंटांतील कांही सभासद निवडून देण्याचा हक्क द्यावा किंवा अशाच तऱ्हेचा दुसरा एखादा उपयुक्त हक्क देण्यांत यावा. असें जर केलें जाईल, तर हें युवराजांचें आगमन हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहील. असें न करतां जर हें आगमन कोरडें राहिलें गेलें, तर चार दिवस कोठे कोठे 'टामटूम' होईल. पण युवराजांनी आपली पाठ हिंदुस्थानच्या किनाऱ्याकडे वळल्याबरोबर जिकडे-तिकडे सामसूम होईल व हा सर्व खटाटोप व्यर्थ केला असा पश्चात्ताप कदाचित् लोकांना होईल. म्हणून आमचें असें म्हणणें आहे की, आपण "या, पण कांही द्या."

– भाला, दि. १ ऑगस्ट १९०५

---

## ६. आता तें विसरा

प्राच्य व पाश्चात्त्य देशांकडे कोणीहि नुसती 'धां ती' नजर फेकली तर त्याला असें आढळून येईल की, त्यांच्यांत एक ठळक व ठसठशीत भेद आहे. बव्हंशीं या भेदामुळेच हल्ली जगांत पाश्चिमात्य देशांची आधिभौतिक प्रगति व प्राच्य देशांची आधिभौतिक अधोगति झाली आहे. ब्रह्मवादी प्राच्यांना हें सारें जग भासमय व नश्वर वाटत असून, हा सर्व मायेचा मिथ्या पसारा आहे अशी त्यांची वंशपरंपरागत समजूत आहे. आयुष्य हें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे क्षणभंगुर असून, आपण फक्त या जगावर प्रवासी या नात्याने चार दिवस मुक्काम करीत आहोंत. अशी एकहि

पार्थिव वस्तु मिळू शकणार नाही की, जिच्या योगाने मनुष्याला शाश्वत सुख मिळूं शकेल. या जगांत सुख पाहवयास गेलें असतां ते दंवाएवढें असून दुःख मात्र पर्वता-एवढें आहे. दुःख, विपत्ति, हाल, यातना यांनी हें जग तुडुंब भरलें असून, सुख व आनंद यांचा शाश्वतिक रजःकणहि मिळत नाही. सारांश, पंतांनी म्हटल्याप्रमाणे "दिसें क्षणिक सर्व हें भरवसा घडीचा नसे" अशी वस्तुस्थिति असून ज्या मुमुक्षु किंवा सुखेच्छु मनुष्याला नित्य, शाश्वत व चिरकालिक सुखाची अपेक्षा असेल त्याने या भासमय व मायामय जगावर व त्या जगांतील नश्वर व अशाश्वत वस्तूंवर प्रेम न ठेवतां सर्व जगाचें मूळ व आदिकारण जें परब्रह्म त्याच्या प्राप्तीसाठी झटून, त्याचें यथार्थ ज्ञान झाल्यावर त्या ज्ञानोदधींत सदैव डुंबत राहून, अज्ञानजन्य अंतःदाहाचा उपशम करीत राहवें. जन्मास येऊन मनुष्याने जें कांही करावयाचें आहे तें हें की, प्रारब्धाने किंवा प्रयत्नाने जी कांही ओली-कोरडी भाकरी मिळेल तिच्यावर समाधान मानून आयुष्याचा प्रत्येक क्षण व शरीराचा प्रत्येक अवयव ईशभजनीं लावून आपल्या जन्माचें साफल्य करावें. ईश्वरप्राप्ति ही जीविताची अंतिम महत्त्वाकांक्षा असावी. आत्मज्ञान हीच अविनाशी संपत्ति होय व जीवात्म्याचें परमात्म्याशीं तादात्म्य हेंच नरतनूचें उत्तम पर्यवसान आहे. प्राच्य लोकांच्या अशा उच्च व उदात्त कल्पना असल्याकारणाने त्याचा परिणाम जो व्हावयाचा तो झाला. त्यांची ऐहिक सुखा-पासून निवृत्ति व पारलौकिक सुखाकडे प्रवृत्ति होऊन त्यांच्या मतें आध्यात्मिक सुधारणेपुढे आधिभौतिक सुधारणा कवडीमोल ठरली. या मताचा फैलाव व प्रसार इतर प्राच्य देशांपेक्षा आर्यभूमींत फार झाला व त्याच्या योगाने हिंदु लोकांचीं अंतः-करणें एका विशिष्ट प्रकारचीं बनलीं. परमेश्वर ठेवील त्या स्थितींत सुखासमाधानाने दिवस काढून प्रभूचें नामस्मरण करीत आपल्या आयुष्याचा विनियोग करावा अशी सात्त्विक प्रवृत्ति त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न होऊन तिच्या अनुरोधाने त्यांचा वर्तनक्रम बदलला. वास्तविक रीतीने पाहिलें असतां या साधु-वृत्तीचा आविर्भाव होणें हाच खरा मोक्ष आहे व ज्या साधुसंतांनी या मोक्षप्राप्तीच्या मार्गाचा अवलंब केला ते खरोखरच अलौकिक पुरुष असले पाहिजेत यांत संशय नाही. पण या जगांत एकाचीच साधुवृत्ति असून चालावयाचें नाही. जर इतर लोक दुष्ट व दुराचारी असतील, तर साधुलोकांचें साधुत्व हें हितकारक न होतां तें प्रसंगविषेशीं आत्म-विघातक होतें. जोंपर्यंत या दुष्ट व आपमतलबी लोकांनी हें जग गजबजून गेलें आहे तोंपर्यंत सज्जन व सात्त्विक माणसांनी आपल्या साधुत्वाला कांही तरी सीमा ठरवलीच पाहिजे, नाही तर भलताच परिणाम घडून येतो.

शांतीचे प्रति हिमाचल नाथमहाराज गोदावरीहून स्नान करून परत येत असतां त्यांच्या अंगावर दुष्ट पठाण २१ वेळा थुंकला. 'विठ्ठल विठ्ठल' अशा नामोच्चारांत सदा झिंगलेल्या तुकारामबुवांची धिंड चार कुटाळ लोकांनी गर्दभाचार्यांना वाहन करून काढली व अशाच तऱ्हेचीं पुष्कळ उदाहरणें पूर्वकालीन

इतिहासांत सापडूं शकतील. ही जी परछलाची आवड प्राच्य देशांतील लोकांच्या ठिकाणीं दृष्टिगोचर होते तीच आवड पाश्चात्त्य देशांतील समाजाच्या ठिकाणीं नजरेस पडते. पाश्चात्त्य लोक जडवादी असल्याकारणाने त्यांच्या मताने जग हेंच सर्वस्व आहे व जगांतील प्रत्येक गोष्ट ही शाश्वत आहे. आधिभौतिक सुधारणादेवीचे हे कट्टे भक्त आहेत. पंचमहाभूतांत असलेल्या गूढ शक्तीचा शोध करून त्यांनी आपली भौतिक सुधारणा इतकी वाढविली आहे की, तिचा परिणाम पुढे काय होईल याचा अंदाज आज कोणालाहि करतां येत नाही. भौतिक सुधारणेच्या योगाने अंगांत मानवी शक्तीची वृद्धि झाल्याबरोबर या पाश्चात्त्य राष्ट्रांच्या लोभाला भरती आली व तिच्या योगाने पुष्कळ प्राच्य देश बुडाले गेले. ईश्वराने जो कांही पृथ्वीचा विशिष्ट भाग आपणांस दिला आहे व त्या भागांत जें कांही आपल्या नशिबाने पिकतें आहे तेवढचावर संतुष्ट व समाधानी न राहतां त्यांच्या परस्वहरणाच्या वासनेला पंख फुटले व त्यामुळे तिची धाड प्राच्य देशावर येऊन आदळली. पौर्वात्य लोकांप्रमाणे जर पाश्चिमात्य लोकांच्या अंगीं सात्त्विकपणा व सज्जनपणा असता, तर या जगांतील निम्मेंअधिक दुःख खात्रीने विलयास गेलें असतें.

या सात्त्विकपणाच्या प्रभावाने पाश्चिमात्य लोकांचा लोभ ओसरला असतां त्यांच्यामध्ये जास्त उपकारबुद्धि उत्पन्न झाली असती व जगांतील बऱ्याच अनिष्ट गोष्टी टळल्या असल्या. पण असें घडून येणें शक्य नाही. जोंपर्यंत पाश्चात्त्य लोकांची ओढ भौतिक सुधारणेकडे आहे, जोंपर्यंत त्यांच्यांत जडवादाला मान आहे व जोंपर्यंत त्यांना आध्यात्मिक ज्ञानाची चटक लागली नाही तोंपर्यंत त्यांच्या अंगांतील दुर्गुण नाहीसे होतील अशी आशा करणें म्हणजे मुसळाला अंकुर फुटतील अशी आशा धरण्याइतकेंच संमजसपणाचें होईल. अल्प समाधानी व ईश्वरपरायण प्राच्य लोक कोणीकडे व अतिलोभी व स्वार्थपरायण पाश्चात्त्य लोक कुणीकडे! वस्तुतः प्राच्य लोकांची त्यांच्या या गुणद्वयामुळे भरभराट व्हावयाला पाहिजे होती. निदान या गुणांबद्दल त्यांना बक्षीस म्हणून निर्भयता तरी प्राप्त व्हावयास पाहिजे होती; परंतु प्रत्यक्ष अनुभव या अपेक्षेच्या सपशेल उलट आहे. ईशभक्तींत सर्व प्राच्य देशांमध्ये अग्रेसरत्व पावलेला जो हिंदुस्थान देश त्याची दुर्दशा आज काय झाली आहे हें आमच्या वाचकांस सांगावयास नकोच. जगांत आम्ही जिवंत असून मेलों आहोंत एवढें लिहिल्यास बस्स होईल. तेच युरोपकडे पाहा. जिकडे-तिकडे चंगाळी व चलती. हा स्थितिभेद अवलोकन करून जर एखाद्या आर्यभूमिस्थ मनुष्याच्या मनांत जडवादाचें महत्त्व बिंबू लागलें तर त्यांत त्याचा दोष नाही. नीट विचार करून पाहिलें असतां निर्भेळ जडवाद किंवा निर्भेळ ब्रह्मवाद हे दोन्हीहि हितकारक नाहीत. निर्भेळ जडवादाने मनुष्य धर्महीन होऊन त्याच्या मनावर षड्विकारांचा पगडा बसतो व उलटपक्षीं निर्भेळ ब्रह्मवादाने मनुष्य पंगु होऊन तो जगाच्या दृष्टीने कुचकामी ठरतो. यासाठी उत्तम स्थिति तीच की, जिच्यामध्ये जडवादाचें व ब्रह्मवादाचें सम्यक्

मिश्रण होऊन मनुष्य दोन्ही पंथांचें आवश्यक तेवढें अवलंबन करतो. असें योग्य मिश्रण या महाराष्ट्रांत सतराव्या व अठराव्या शतकांत करण्यांत आलें व त्यामुळे तत्कालीन लोकांस सुखाचे व आनंदाचे दिवस उपभोगण्यास मिळाले.

हे विचार सुचण्याचें कारण थोडक्याच दिवसांपूर्वी तिबेटच्या स्वारींत प्रसिद्धीस आलेल्या यंगहजबंडसाहेबांनी एक व्याख्यान दिलें व त्यांत त्यांनी हिंदुस्थानांतील लोकांस खूष व संतुष्ट ठेवण्याचा मार्ग सुचविला आहे. साहेबमजकुरांनी हा मार्ग शोधून काढण्यांत बरीच कल्पकता दाखविली यांत संशय नाही; परंतु त्या मार्गाचें यथार्थत्व आमच्या देशबांधवांना कितपत पटेल याबद्दल आम्हांस जबर शंका वाटते. साहेबमजकुरांना असें वाटतें की, जर हिंदुस्थानवासियांना अध्यात्मिक उन्नति करण्याच्या कामीं सरकारने मदत केली, तर लोक सरकारवर खूष होतील व त्या योगाने हिंदुस्थानांत वाढणारा असंतोष कमी होईल. अशा मदतीने रयतेच्या मनांत सरकारविषयी नवीन प्रेम उत्पन्न होईल, असलेलें प्रेम वृद्धिंगत होईल व साहेबांच्या मताने असें ठरलें की, हिंदुस्थानांतील लोक अध्यात्मवादी असल्या कारणाने ऐहिक गोष्टींचा तिटकारा त्यांना मनापासून आहे. ऐहिक भरभराटीकडे त्यांचें लक्ष नाही व तिकडे ते न जाऊं देण्यांत एकच सुलभ मार्ग म्हणजे लोकांचीं मनें या मार्गाकडे जास्त वेधून टाकणें होय. साहेबमजकुरांस आमचें असें सांगणें आहे की, अध्यात्मिक गोष्टींकडे आमचेंच काय, पण सर्वांचेंच लक्ष गेलें पाहिजे. ज्या हतभाग्याचें लक्ष तिकडे जाणार नाही त्याचें दुर्दैव बलवत्तर आहे असें समजलें पाहिजे. पण हा मानभावी उपदेश करण्यांत साहेबांचा कांही तरी अंतःस्थ हेतु असला पाहिजे अशी शंका आम्हांस येते. थोड्या विचारांतीं ती शंका साधार आहे अशी कोणाचीहि खात्री होईल. कारण कांही असो, पण वस्तुस्थिति अशी आहे की, साहेबी वचनांवर पूर्ण श्रद्धा ठेवण्याचें धाडस हल्ली कोणी करीत नाही. एवढेंच नव्हे तर, जवळ जवळ अशी समजूत झाली आहे की, जें जें म्हणून साहेबांच्या मुखांतून पडेल त्याच्या विपरीत गोष्ट हितकर आहे असें बेलाशक समजावें. त्यांनी एखाद्या संस्थेला नांवें ठेवलीं की, ती संस्था देशहितकारक असें निःसंशय समजावें. त्यांनी ज्याला हाताशीं धरला त्याच्याशीं बेताबेतानेच वागावें. ते ज्याच्या पाठीमागे लागतील त्याला निर्भयपणें कवटाळावें. ही जी लोकांची समजूत झाली आहे तिच्यांत सत्याचा अंश बराच आहे व एखाद्या सार्वजनिक प्रश्नाचा वादविवादाच्या प्रसंगीं वरील समजुतीच्या कसोटीचा उपयोग केल्यास सहसा चुकीच्या मार्गाने जाण्याची भीति नको.

यंगहजबंडसाहेब म्हणतात की, ज्या अर्थी हिंदु लोकांचा ओढा आध्यात्मिक गोष्टीकडे आहे त्या अर्थी त्याच गोष्टींत त्यांचें मन गुंतून राहवें एतदर्थ सरकारने अशा प्रकारची व्यवस्था केली पाहिजे. त्यांना ज्या अध्यात्मिक गोष्टी आवडत असतील त्या त्यांना सुलभ व सुप्राप्य व्हाव्यात अशी योजना जर सरकार-कडून होईल, तर त्यांचें प्रेम सरकारवर जास्त बसेल व त्यामुळे ब्रिटिश

साम्राज्याची आयुर्मर्यादा वाढेल असा साहेबमजकुरांचा तर्क आहे. हा तर्क कितपत खरा आहे याबद्दल वादविवाद करण्यांत अर्थ नाही. पण ज्या अर्थी हा उपाय साहेबी डोक्यांतून जन्मला आहे त्या अर्थी त्याचा परिणाम कशा प्रकारचा होईल याची अटकळ आमच्या वाचकांनी केली असेलच. हिंदु लोक अध्यात्मिक ज्ञानाचे भोक्ते आहेत ही गोष्ट जरी खरी आहे, तरी सद्यःपरिस्थितीमुळे त्यांचे डोळे उघडले आहेत. मागील अनुभवांच्या ठेचा खाऊन त्यांचें डोकें ताळ्यावर आलें आहे व आजपर्यंत भोगलेल्या विपत्तींच्या पलिस्तराने ते चांगले शुद्धीवर येत चालले आहेत. त्यांना आता भ्रम कधीहि होणार नाही व आता ते कधीहि फसले जाणार नाहीत. हिंदु लोक पूर्वीप्रमाणे अध्यात्मिक उन्नतीकडे धांव घेतील, पण ते ऐहिक उन्नतीकडे कधीहि दुर्लक्ष करणार नाहीत. ऐहिक उन्नतीच्या पायावर आध्यात्मिक उन्नतीची भव्य इमारत उभारली जाते अशी त्यांची खात्री होत चालली आहे. भौतिक व अध्यात्मिक सुधारणा या परस्परावलंबी असून एकीशिवाय दुसरी सुखकारक होत नाही, असें त्यांच्या मनाने पक्कें घेतलें आहे. साहेबमजकुरांच्या उपदेशाचा अंत:स्थ हेतु हाच दिसतो की, राजकीय सुधारणारूपी तृष्णेने व्याकुळ झालेल्या हिंदु लोकांना जर अध्यात्मिक ज्ञानामृताच्या पाणपोई जागजागीं घालून दिल्या, तर ऐहिक उन्नतिरूपी झऱ्याकडे ते कधीहि ढुंकून पाहणार नाहीत. ज्या अध्यात्मिक गोष्टींवर त्यांचें प्रेम आहे त्या त्यांना सुलभ रीतीने प्राप्त होतील अशी तजवीज सरकारने अवश्य करावी. त्यांना हिंदुस्थानांत जागजागीं असलेलीं तीर्थें पाहण्याची गोडी आहे ना? तर त्या तीर्थांकडे जाण्यायेण्याचे मार्ग सरकारने नीट ठेवावेत.

ब्रह्म, माया, पुरुषप्रकृति, सगुण-निर्गुण, भक्ति इत्यादि अध्यात्मिक ज्ञानविषयक गोष्टी त्यांना आवडतात ना? तर सरकारने हें ज्ञान ज्या ठिकाणीं दिलें जाईल अशा शाळा व पाळशाळा स्थापन कराव्यात. त्यांच्या ठिकाणीं पुराणें, कीर्तनें श्रवण करण्याची भक्ति आहे ना? तर शास्त्री, पुराणिक, हरिदास यांचा एक वर्ग सरकारने काढावा व असे लोक तयार झाले म्हणजे पारलौकिक गोष्टींकडे लक्ष वेधून राजकीय बाबीं-संबंधाने सरकारच्या पाठीमागे असलेली टोचणी बंद पडेल व मग दुसऱ्या आर्यभूमातेचें आकंठ दुग्धपान करण्यास कोणाची शाब्दिक किंवा सक्रिय हरकत होणार नाही. मग सरकारने वाटतील तितके कर वाढवावेत व त्यांचा अत्यल्पअंश अध्यात्मिक बाबतींत खर्च करावा व बिनधास्त घोरत पडावें. असें झाल्यावर त्यांनी चाहतील ते कायदे पसार करावेत, पण ते त्यांच्या अध्यात्मिक समजुतीला टोचणार नाहीत अशी काळजी घ्यावी व स्वस्थ चित्ताने राहवें. इतकें केल्यावर त्यांनी रुचतील त्या घडामोडी कराव्यात, पण त्याचा परिणाम त्यांच्या ऐहिक स्थितीवरच होईल अशी खबरदारी घ्यावी व बिनघोर राहवें. अशा तऱ्हेची व्यवस्था केल्यावर हिंदुस्थानांतील लोकांच्या हृदयांत कधीहि राजकीय वैभव मिळविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न व्हावयास नको व आपल्या चाललेल्या चैनीला खळ पडावयास नको. यंगहजबंड-

साहेबांनी काढलेली ही युक्ति खरोखरच नवीन आहे व त्याबद्दल त्यांच्या बुद्धिमत्तेचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे. कारण आजपर्यंत राजकीय गोष्टींपासून हिंदुस्थानवासियांस परावृत्त करण्यासाठी योजलेल्या युक्त्या या अजब युक्तीपुढे फिक्या पडतील यांत संशय नाही. सामाजिक सुधारणेचें किंवा औद्योगिक सुधारणेचें घोडें पुढे ढकलल्यास सरकारचा कार्यभाग उरकेल अशी सरकारी अधिकाऱ्यांची आजपर्यंत कल्पना होती. पण अनुभवांतीं त्यांना असें कळून आलें की, ती सपशेल चुकली म्हणून आता हें अध्यात्मिक उन्नतीचें तट्टू पुढे ढकलण्यांत आलें आहे.

आनुवंशिक संस्कारामुळे निदान आम्हां हिंदु लोकांचें लक्ष अध्यात्मिक गोष्टींकडे असल्या कारणाने या गोष्टींत सरकारने मन घालून अल्पस्वल्पशी मदत केल्यास आमच्यापैकी कांही जणांना आनंदाची उकळी फुटेल. पण या खटाटोपांतील अंतःस्थ हेतु त्यांच्या ध्यानांत आल्यावर ती आपोआप दबून जाईल असें आम्हांस वाटतें. आम्हांस अध्यात्मिक उन्नति जरूर पाहिजे आहे, पण ती ऐहिक उन्नतीपासून विलग अशी आम्हांस नको आहे. उन्नतिरूपी सोपानाची पहिली पायरी ऐहिक उन्नति असून, तिची शेवटची पायरी अध्यात्मिक उन्नति आहे. शेवटल्या पायरीचें अस्तित्व व दृढत्व पहिल्या पायरीच्या अस्तित्वावर व दृढत्वावर अवलंबून आहे हें कोणीहि कबूल करील. अशी स्थिति आहे तर नुसती अध्यात्मिक उन्नति शक्य नाही व कदाचित् ती झाल्यास तसें होणें कोणाहि विचारी मनुष्यास इष्ट वाटणार नाही. अध्यात्मिक उन्नतीचें बीज ऐहिक उन्नतींत आहे. अध्यात्मिक उन्नति ऐहिक उन्नतीचें पर्यवसान आहे. अध्यात्मिक उन्नति ऐहिक उन्नतीचें अंतिम रूपांतर आहे. अशी ही भौतिक सुधारणा मूलभूत अध्यात्मिक उन्नति घडवून आणण्याची इच्छा जर सरकारच्या मनांत असेल, तर ती इच्छा फलित करण्याच्या कामीं कोणीहि हिंदुस्थानवासी सरकारला आनंदाने मदत करील. कारण अशा प्रकारची उन्नति इहलोकीं देह-मोक्ष व परलोकीं आत्म-मोक्ष देऊं शकेल. पण अशी सुधारणा घडवून न आणतां आम्ही मात्र फक्त विरक्त होऊन 'हरि हरि' म्हणत दिवस काढावेत व लोकांनी मात्र खुशाल राज्यें करावींत, अलोट संपत्ति मिळवावी, मनमुराद अधिकार चालवावा. आम्ही मात्र अल्पसंतोषी राहवें व यंग हजबंडसाहेबांच्या बंधूंनी मात्र अति लोभी बनावें. आम्ही असेल नसेल तें घालवावें व इतरांनी मात्र सर्व गुंडाळावें असाच जर साहेबमजकुरांच्या कळकळीचा गूढार्थ असेल, तर आम्ही त्यास असें स्पष्ट कळवितों की ते दिवस आता गेले. आता आमचे डोळे उघडले व उशिरा का होईना, पण खऱ्या उन्नतीच्या खऱ्या मार्गाचें ज्ञान आम्हांस झालें आहे. आम्ही 'हरि हरि' म्हणूं, पण तें अगोदर पोटभर जेवून मग म्हणूं. आम्ही ईशसेवा करूं, पण तिजबरोबर देशसेवाहि करूं. आम्ही आत्ममोक्षाच्या पाठीमागे लागूं, पण तसें आम्ही देह-मोक्ष झाल्यावर करूं. ऐहिक संपत्ति, ऐहिक वैभव व ऐहिक सुधारणा यांकडे लक्ष न देतां फक्त जगदीश-चिंतनांतच सदासर्वकाळ निमग्न राहून दुसऱ्यास मात्र आमच्या जन्मभूमींत वाटतील

ते स्वेच्छाचार करूं देण्याइतके साधु ऊर्फ दुधखुळे आम्ही जरी असलों, तरी आता असणार नाही. जगांतील इतर लोकांप्रमाणे सर्व ऐहिक सुखांचा उपभोग न्याय्य रीतीने घेऊन मग सर्व चराचर विश्वाचा मालक जो दीनदयाळ प्रभु त्याला अनन्यभावें शरण जाऊन आम्ही आपल्या देहाचें सार्थक्य करूं. पण जर यंगहजबंडसाहेबांची किंवा दुसऱ्या कोणाची अशी समजूत असेल की, आम्ही फक्त अध्यात्मिक उन्नती-साठी तळमळून ऐहिक भरभराटीकडे दुर्लक्ष करूं व लोकांस मात्र आमच्या या दुर्लक्षा-मुळे गैरवाजवी फायदा घेऊं देऊं, तर अशा लोकांस आमचें असें स्पष्ट सांगणें आहे की, "आता तें विसरा."

– भाला, दि. ११ ऑगस्ट १९०५

---

# ७. पतितपरावर्तन

चैत्र व वैशाख महिन्यांत शेतकऱ्यांनी जिवापाड मेहनत करून शेतें नांगरून तयार करून ठेवलीं आहेत. तृषार्त झालेल्या जमिनी पाण्यासाठी आ करून पसरल्या आहेत. लवकरच आकंठ जलपान मिळेल या आशेने वृक्ष-वेली आनंदाने फडफडताहेत. नद्यांनी लवकरच मिळणाऱ्या जलसंपत्तीच्या साठवणाकरिता आपआपलीं पात्रें रितीं करून ठेवलीं आहेत. मृगनक्षत्र लागलें आहे. नभोमंडळाकडे सर्वांची टक एकसारखी लागली आहे. प्रातःकाळीं उठून सूर्यनारायणाला नमन करतांना आज पाऊस पडेल असें आशांकुर प्रत्येकाच्या हृदयक्षेत्रांतून उत्पन्न होत आहेत. पण पर्जन्याच्या ओला-व्याने ते वाढीस न लागतां उलट सूर्याच्या चंड-किरणांनी ते प्रत्यहीं करपून जात आहेत. आज नाही उद्या पाऊस पडेल अशा आशेच्या मलमाने शेतकऱ्यांचीं निराशेने जखमी झालेलीं अंतःकरणें रात्रीच्या रात्री भरून येत आहेत. प्रभातकालीं चुकूनमाकून आकाशांत फिरणारा ढग पाहून हा कदाचित् पाठीमागून येणाऱ्या अलोट मेघसेनेच्या बिनीचा स्वार असेल म्हणून प्रत्येकजण त्याचें प्रेमपूर्वक आगतस्वागत करीत आहे. पण जसजशी सूर्यनारायणाची स्वारी नभोमंडळ आक्रमूं लागते तसतसे हा एकटा-दुकटा ढग आपलें काळें करून सर्वांचीं तोंडें काळींठिक्कर पाडीत आहे. अशा आशा-निराशाप्रचुर समयीं शेतकऱ्यांच्या मनाची स्थिति काय होत असेल याची कल्पना इतरांस होणें शक्य नाही. एका मेघराजाने अवकृपा केल्यावर वर्षभर आकाबाईचें ठाणें घरांत बसलेंच म्हणून समजावें. इतर मानवी राजे व महाराजे यांचा रोष झालेला एक वेळ पत्करेल, पण या मेघराजाची वक्रदृष्टि सहन करण्याचें सामर्थ्य कोणाच्याहि अंगीं नाही. मेघराजाशीं राजद्रोह करण्याची कोणाची छाती नाही. त्याचें साम्राज्य झुगारून देण्याची कोणाची शक्ति नाही. त्याचें चिरकालिक दास्यत्व

कोणासहि टाळतां यावयाचें नाही. मेघराजाची करडी नजर झालेल्या हतभागी देशाचें सर्वस्व बुडालें म्हणून समजावें. या मेघराजाची कृपा जगांतील इतर लोकांपेक्षा आम्हां हिंदु लोकांना फारच महत्त्वाची आहे. याची अवकृपा इतर देशांवर झाली असतां त्या देशांतील लोकांच्या, फार झालें तर, कांही दिवस हालहपेष्टा होतील व अति झालें तर, थोडीबहुत प्राणहानि होईल. पण आर्य-भूमींतून मेघराजाने आपला मोर्चा दुसरीकडे वळविला की आमच्या दुःखाला सीमा नाही. खायला अन्न नाही, कोणत्याहि प्रकारचें त्राण नाही, प्राण वांचविण्याचें जवळ साधन नाही, नुसती प्राणहानि होऊन आमच्या दुर्भाग्याचा शेवट होता, तर आम्ही हिंदु लोकांनी इतकें गयावया केलें नसतें. परंतु सर्व रत्नांपेक्षा जास्त मौल्यवान् व प्राणापेक्षा जास्त प्रिय असा जो आमचा हिंदु धर्म त्याची हानि मेघराजाच्या अवकृपेमुळे होते ही अतिशय झोंबणारी गोष्ट आहे. अशी धर्महानि इतर देशांत दुष्काळ पडला असतां होत नाही.

रशियांत पुष्कळ वेळा दुष्काळ पडतो व पुष्कळ रशियन लोक हा लोक सोडून परलोकीं जातात, पण ते कधीहि बाटत नाहीत किंवा बाटवले जात नाहीत. तेच आमच्या हिंदुस्थानकडे पाहा. पावसाने दगा दिल्यावर सर्वांचीं अंतःकरणें दुःखाने करपून जातात तर आमच्या परोपकारी मिशनऱ्यांचीं अंतःकरणें आनंदाने नाचूं-बागडूं लागतात. पर्जन्याच्या अभावीं आमचीं मुखकमलें सुकून जातात, तर मिशनऱ्यांचे चेहरे प्रफुल्लित होतात. पावसाच्या धारांच्या अभावीं आमच्या डोळ्यांतून धारा वाहूं लागतात, तर मिशनऱ्यांचे डोळे पुढे होणाऱ्या आनंदाने चमकूं लागतात. आता दिवस कठीण आले या दुःखद विचाराने आमचे कंठ दाटून आमच्या जिभा शिथिल पडतात. तर आता बाटविण्याच्या पवित्र धंद्याला उत्तम संधि मिळाली या सुखद विचाराने त्यांच्या जिभांना चापल्य येतें. एक पाऊस न पडला म्हणजे आमच्यावर किती तरी संकटांचा वर्षाव होतो. सारांश, हल्ली आमचा सखा, आमचा पाठीराखा एका पर्जन्याशिवाय दुसरा कोणी नाही. म्हणून हे प्रभो, हे मेघराजा, तुझे आम्ही दासानुदास आहोंत. तुला आम्ही अनन्यभावें शरण आलों आहोंत. तूंच आमचा त्राता, तूंच आमाचा पिता. तुझ्या कृपेची सावली नेहमी आमच्यावर असूं दे. मेघराजा, मृगनक्षत्र लागल्याबरोबर आम्हां दीनांसाठी तूं मृगाप्रमाणे धांवत ये. आर्द्रा नक्षत्रांत मनमुराद वृष्टि करून आमचीं अंतःकरणें आनंदाने आर्द्र करून टाक. हस्तनक्षत्रीं शेवटची कडकडून भेट देऊन मोत्यांच्या दाण्याप्रमाणे वाटणारे धान्याचे दाणे आम्हांस दिल्यावर स्वाती नक्षत्रांत खरोखरचे मोतीं तूं खुशाल समुद्रांत पेरून टाक.

दरवर्षी मेघराजाने आमच्यावर कृपादृष्टि ठेवून जर विपुल पर्जन्यवृष्टि केली, तर मग आम्हांला मिशनऱ्यांची भीति बाळगावयाला नको. कारण खावयास मिळत असून ख्रिश्चन धर्मांतील तत्त्वें हिंदु धर्मांतील तत्त्वांपेक्षा जास्त उदार व उदात्त आहेत अशी मनाची खात्री होऊन आजपर्यंत कोणीहि हिंदु ख्रिश्चन झाला नाही व पुढेहि होणार नाही. नाही म्हणावयास पंधराव्या व सोळाव्या शतकांत

पोर्तुगीज लोकांकडून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर राहणाऱ्या कांहीं हिंदूंना बळजबरीने तर कांहींना लबाडीने ख्रिश्चन करण्यांत आलें. पण इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर पहिल्या मार्गाचा अवलंब करण्यांत येत नाही, पण दुसऱ्या मार्गाचा स्वीकार अगदीच करण्यांत येत नाही असें नाही. हल्ली इंग्रजी राज्यांत मिशनऱ्यांची सर्व भिस्त दुष्काळावर येऊन पडली आहे व त्यांच्या पुण्याईने इंग्रजी अमलाचा चरक अशा खुबीने फिरविला जात आहे की, जरा पावसाने डोळे वटारल्याबरोबर कफल्लक रयतहि डोळे पांढरे करावयास लागते. अशा आणीबाणीच्या व निर्वाणीच्या वेळीं अन्नदानासारखें पवित्र व उपयुक्त दान नाही. अन्नावांचून प्राण कासावीस होत असतांना जो महात्मा निरपेक्ष बुद्धीने तोंडांत अन्नाचे दोन घास घालील तो प्रत्यक्ष ईश्वरांश आहे असें म्हणावयास कांही हरकत नाही. अशा महात्म्याची अक्षय संपत्ति म्हणजे क्षुधार्थ लोकांचे क्षुधातृप्तीनंतर देण्यांत येणारे आशीर्वाद होत. अशा मनुष्याचें खरें स्मारक म्हणजे दुष्काळांत त्याने वांचवलेलीं माणसें होत. या अन्न-दानासारखा यज्ञ नाही. यासारखें दुसरें सत्कृत्य नाही. अशा दानशूर मनुष्याला इहलोकीं कीर्ति व परलोकीं मुक्ति मिळाल्यावांचून रहात नाही. दुष्काळाच्या दिव-सांत आमचे धर्मबांधव अशा तऱ्हेने धर्मकृत्यें करतीलच अशी आमची पूर्ण खात्री आहे. पण परराज्यामुळे आमच्या धर्मबांधवांची इतकी कंगाल स्थिति झाली आहे की, स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबांतील माणसांचें पोट भरण्याची ताकद त्यांच्या अंगांत उरली नाही. यामुळे मनांत इच्छा असतांनाहि साधनांच्या अभावामुळे त्यांना आपले धर्मबांधव मिशनऱ्यांच्या जाळ्यांत सापडलेले पाहवें लागतें.

जोपर्यंत इंग्रजी अमलाच्या हजारो जळवा हिंदुस्थानचें रक्त हल्लीप्रमाणे प्राशन करीत राहणार तोंपर्यंत मिशनऱ्यांनी सुरू केलेले बाटविण्याचे कारखाने ऊर्फ मिशनें रात्रं-दिवस सुरू असणार. अशा प्रसंगीं आमच्या प्रत्येक धर्मबांधवाने व धर्मभगिनीने विलक्षण मानसिक धैर्य दाखविलें पाहिजे. अढळ निश्चयाने आपलीं हृदयें दृढ व कठीण केलीं पाहिजेत. "मी बाटणार नाही व दुसऱ्याला बाटूं देणार नाही" अशी भीष्मप्रतिज्ञा करून कांही झालें तरी तिचा भंग करतां कामा नये. धर्मवेडाची साथ जिकडे-तिकडे उसळून तिने प्रत्येकाला पछाडलें पाहिजे. 'आधी धर्मरक्षण व मग प्राणरक्षण' हे शब्द प्रत्येकाच्या कानांत घुमले पाहिजेत. "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" या भगवत् वचनाचा घोष सर्वत्र सुरू झाला पाहिजे. धर्मवेडाने प्रत्येकजण इतका बहकला पाहिजे की, तीन दिवस अन्नावांचून तडफडणाऱ्या पतीने मिशनऱ्याने दिलेल्या पावाचा तुकडा तोंडांत घातल्याबरोबर त्याच्या पतिव्रता स्त्रीने वाघिणीसारखें चवताळून जाऊन घशाखाली उतरणारा तुकडा, बाहेर ओढून काढला पाहिजे. भुकेने व्याकुळ झालेल्या धाकट्या भावाने मिशनऱ्याने दिलेला भाताचा गोळा घेण्याकरिता हात पुढे केल्याबरोबर त्याच्या वडील भावाने भ्रातृप्रेमाने मोहित होऊन तो हातावरचा गोळा थपडीने उडवून पायाखाली तुडविला पाहिजे. दोन महिन्यांचें

तान्हें लेकरूं दुधावांचून कंठशोष करीत असतां मिशनऱ्याने दिलेली दुधाची बाटली जमिनीवर ओतून त्याने दिलेले अंतःकाळचे झटके पाहून, त्याच्या पुत्रवत्सल मातेला दैविक आनंदाचें भरतें आलें पाहिजे. कारण धर्मरक्षणासाठी मरणाऱ्या मनुष्याचा आत्मा सायुज्य मुक्तीला जाऊन पोहोचतो.

धर्मांतर करणाऱ्या मनुष्याच्या दूषित आत्म्यासाठी पाताळांत अंधारमय जागा मुद्दाम राखून ठेवली जाते. खरोखर धर्मकुंडांत स्वदेहाची पूर्णाहुति टाकून जगदीशाला संतुष्ट करणारे ऋषि जगांतीलच नव्हे, तर स्वर्गांतील रत्नें आहेत. असे धर्मात्मे स्वर्गाची वाट दाखविणारे वाटाडे होत. तरी दुष्काळाच्या दिवसांत देह व देहीन या दोघांचा संयोग कायम ठेवण्यास जरूर तितकें अन्न न मिळाल्यास प्रत्येक जातिवंत हिंदूने मुखावाटें 'राम राम' म्हणत खुशाल प्राणोत्क्रमण करावें. यांत त्याचें, त्याच्या पुढील पिढीचें, त्याच्या मागील पूर्वजांचें व त्याच्या धर्मबांधवांचें व धर्मभगिनींचें कोटकल्याण आहे. धर्मासाठी प्राण दिलेल्या धर्मात्म्यांचे पुष्कळ दाखले हिंदुस्थानच्या इतिहासांत सापडूं शकतील. तब्बेतखोर टिपूच्या अमलांत दोन हजार वैष्णव ब्राह्मणांनी बिनधास्त विषप्राशन करून आपल्या धर्माचें रक्षण केलें. खदिरांगाराप्रमाणे लाल झालेल्या लोखंडी तव्यावर उभें केलें असतां, तप्त झालेल्या सांडसाने डोळे बाहेर काढले असतां, तीक्ष्ण सुरीने जिभेचा शेंडा छाटून टाकला असतां व शरीराच्या मांसाचे लचके तलवारीच्या पात्याने तोडले असतां, हिंदुधर्मसंस्थापक शिवरायाच्या हिंदुधर्मसंरक्षक पुत्राने मुसलमानी धर्माची दीक्षा घेतो असें नुसतें उच्चारून सुद्धा आपली हिंदु जीभ विटाळली नाही. "एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत समशेर" अशा थाटाने व तोऱ्याने येणाऱ्या इस्लामी योद्धयांशीं लाखो रजपूत वीरांनी सामना करून असिधारातीर्थीं आनंदाने बुचकळ्या मारून अनंत जन्मांचें साचलेलें पाप साफ धुवून टाकलें. सारांश, "धर्मासाठी मरावें" हा दासांचा उपदेश नेहमी हितपरिणामीच होणार.

दुष्काळांत आपल्या धर्मबांधवांचे व धर्मभगिनींचे प्राण वांचविणें हें जसें प्रत्येक हिंदूचें मुख्य कर्तव्य आहे त्याप्रमाणेच तें सरकारचेंहि आहे. सुकाळाच्या सालीं प्रजेपासून कर घेणाऱ्या सरकारवर ही जबाबदारी आपोआप येऊन पडते व ती सरकारला कधीहि टाळतां यावयाची नाही. सव्वाशे कोटि सालिना उत्पन्न असलेल्या सरकारने आपल्या प्रजाजनांपैकी जरी एक इसम अन्नावांचून मरूं दिला किंवा बाटूं दिला, तर त्याचें खापर सरकारच्या टाळक्यावर फुटल्यावांचून कधीहि राहणार नाही. प्रत्येक बाटलेल्या मनुष्याचें पाप सरकारच्या माथीं आहे असें आम्ही स्पष्ट म्हणतों. जर सरकार दुष्काळाच्या दिवसांत आपल्या प्रजेला पोटाला देत नाही, तर अशा सरकारास सुकाळाच्या दिवसांत प्रजेपासून कर घेण्याचा हक्क कसा प्राप्त होतो हें आम्हांस कळत नाही. हिंदु प्रजा आपल्या बांधवांस व भगिनींस आपल्या शक्त्यनुसार अन्न देण्याची तजवीज करील, पण कंगाल झालेल्या प्रजेकडून हें काम

पूर्णपणें उरकेल असा आम्हांस भरवसा वाटत नाही. अशा दिवसांत सरकारजवळून पोटभर अन्न मागण्याचा प्रजेचा हक्क जन्मसिद्ध आहे. तो हक्क कोणत्याहि कारणां-मुळे सरकारला प्रजेकडून काढतां यावयाचा नाही. एवढेंच नव्हे तर, प्रजेने हा आपला हक्क बजावण्याचा प्रयत्न जरूर जरूर करावा हें तिला उचित आहे.

धर्मांतर न होऊन धर्मरक्षण करण्याचे तीन मार्ग आम्हीं वरती नमूद केले आहेत. पहिला मार्ग धर्मवेड. दुसरा धर्मबांधवांकडून मदत व तिसरा सरकारकडून साहाय्य. ह्या तीनहि मार्गांपैकी एकाचीहि मदत आयत्या वेळीं न मिळून जर एखाद्या हिंदूस पूर्वपापाने धर्मांतर करण्याची इच्छा होऊन तो पतित झाला, तर त्याला पुन्हा पावन करून हिंदु धर्मांत घ्यावा किंवा नाही हा प्रश्न उपस्थित झाला आहे. हा प्रश्न इतका महत्त्वाचा आहे की, त्याची सांगोपांग चर्चा होऊन मग काय तो कायमचा निकाल लावण्यांत यावा, अशी आमची सर्वांस इशारत आहे. परधर्मांत गेलेल्या लोकांना कांही विवक्षित प्रायश्चित्तें देऊन पुन्हा हिंदु समाजांत त्यांचा समावेश करावा असें म्हणणाऱ्या लोकांच्या मनांत हिंदु धर्माबद्दल कळकळ व प्रेम वसत आहे, याबद्दल कोणास शंका नाही. दरवर्षी ख्रिश्चन समाजाला भरती व हिंदु समाजाला ओहोटी येत आहे हें पाहून कोणत्याहि हिंदु मनुष्याची छाती भावी भीतीने धडधडूं लागल्यास त्यांत मोठेंसें नवल नाही. हल्ली आहे असाच प्रकार कायम राहिल्यास हिंदु समाजाची संख्या लौकरच संपुष्टांत येईल, अशी भीति प्रत्येकास वाटूं लागली आहे. या अरिष्टाचा प्रतिकार करण्यासाठी परधर्मांत गेलेल्या लोकांना परत हिंदु धर्मांत घ्यावें अशी कल्पना निघाली आहे व इष्ट हेतु सिद्धीस नेण्यास तिचा बराच उपयोग होईल अशी बहुतेकांस आशा वाटत आहे. आर्य समाजाच्या मंडळींनी या कल्पनेला दृश्य स्वरूप देण्याची सुरुवात केली असून, थोड्या दिवसांपूर्वी त्या समाजाने सिंध प्रांतांतील सात मुसलमानी कुटुंबें परत हिंदु धर्मांत घेतलीं व द्वारका येथील मठाचे जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांनी धर्मांतर केलेल्या हिंदूंना प्रायश्चित्तें देऊन परत हिंदु धर्मांत घ्यावें असें आज्ञापत्र काढलें आहे, अशी बातमी पसरली आहे. श्रींचें आज्ञापत्र आमच्या दृष्टीस अजून पडलें नाही, पण त्यामुळे या प्रश्नाचा विचार करण्यास कोणतीहि नड नाही. या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी आमच्या वाचकांनी एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे की, आजपर्यंत हिंदु धर्माचा असा बाणा चालत आला आहे की, जन्मतः परधर्मी मनुष्य त्यांत येऊं शकत नाही किंवा त्यांतून एकदा फुटून गेलेल्या मनुष्याला या धर्मांत पुन्हा येण्याची पात्रता कधीहि येत नाही. किंवा थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे हिंदु जन्मावा लागतो व बाटलेला हिंदु कायमचा हिंदुत्वाला मुकतो. हा हिंदु धर्माचा बाणा त्याला वेळोवेळीं कसा उपयोगी पडला हें इतिहास आपणांस सांगत आहे.

आजपर्यंत हिंदु धर्मावर परधर्मीयांकडून जितके घाले घातले गेले तितके घाले जगांतील दुसऱ्या कोणत्याहि धर्मावर पडले नाहीत. असें असतां हिंदु धर्म या संकटांतून

सुरक्षितपणें पार कसा पडला याचें कारण जर एखादा जिज्ञासू मनुष्य शोधूं लागला, तर तें कारण वर नमूद केलेला हिंदु धर्माचा बाणा होय असें तो म्हणेल. हिंदु धर्माला चिरस्थायित्व वरील बाण्यामुळे प्राप्त झालें आहे व तें चिरस्थायित्व ह्याच बाण्यामुळे कायम राहणार आहे. सकृद्दर्शनीं हा बाणा विघातक स्वरूपाचा दिसतो. या बाण्याने बाटलेल्या मनुष्याला परत हिंदु धर्मांत येण्याचें द्वार बंद म्हणून कांही अदूरदर्शी माणसें असें प्रतिपादन करतात की, यामुळे हिंदु धर्माची हानि होत आहे. पण आम्हांस असें वाटतें की, या बाण्यामुळे जितक्या लोकांना या धर्मांत येण्याचा प्रतिबंध होतो त्यांच्या दसपट किंवा सहस्त्रपट लोकांना हा बाणा हिंदु धर्म सोडून देण्याच्या कल्पनेपासून पराङ्मुख करतो. या बाण्यानें हिंदु धर्मावर किती तरी उपकार केले आहेत. पारतंत्र्यांत राज्यकर्त्यांच्या धर्माची चलती असल्या कारणाने स्वार्थामुळे किंवा अनुकरण बुद्धीमुळे त्याच्याकडे पुष्कळांचा ओढा असतो व अशा वेळीं जर परतंत्र झालेल्या लोकांच्या धर्माच्या अंगीं हा बाणा नसेल, तर त्या धर्माचें वाटोळें झालेंच म्हणून समजा. या बाण्याने हिंदु धर्माला मुसलमानी अमलांत किती साहाय्य केलें याची कल्पना ज्यांना येत असेल ते कधीहि पतितपरावर्तनाला आपलें अनुकूल मत द्यावयाचें नाहीत. सरदारीच्या किंवा अमीरीच्या लोभाने त्या वेळेस फारच थोड्या हिंदूंनी आपल्या मायधर्माशीं हरामखोरपणा केला. याचें कारण वरील बाणाच होय.

आज स्वधर्म सोडून स्वार्थ साधून पुन्हा उद्या स्वधर्मांत शिरतां येतें अशी मोकळीक एकदा मिळाल्यावर मनुष्याच्या मनाची प्रवृत्ति सहजच स्वधर्मत्यागाकडे वळते व कदाचित् ती परधर्मींच स्थिरावते. म्हणून ही पतितपरावर्तनाची कल्पना त्याज्य आहे. तशांतून या मार्गाचें अवलंबन परतंत्रतेंत कधीहि करूं नये. ज्या वेळेस हातांत राजकीय सत्ता असते व यामुळे ऐहिक संपत्ति व वैभव यांनी लोक संपन्न असतात त्या वेळेस ही युक्ति हितकर होते. पतितपरावर्तनाची वेळ एकदा आपणास होती पण ती आपण घालविली. ती वेळ म्हणजे सन १७६१ साल होय. त्या वेळेस प्रत्येक गोष्ट पतितपरावर्तनास अनुकूल होती. हातांत राजसत्ता, जवळ मुबलक पैसा, अफाट सेना व चोहीकडे दरारा. अशा वेळेस श्रीमंत नानासाहेबांच्या डोक्यांत जर ही कल्पना आली असती, तर निदान नर्मदेच्या दक्षिणेस तरी एकहि मुसलमान किंवा एकहि मशीद दिसली नसती. पण हल्ली ज्या वेळेस ही कल्पना आमच्या डोक्यांत शिरली आहे त्या वेळेस जिकडे पाहवें तिकडे आनंद. परदास्याची पायांत जड बेडी, 'सुदामदेवी' दारिद्र्य व परकीयांकडून असह्य हेटाळणी. अशा वेळीं जर ही पतितपरावर्तनाची कल्पना अमलांत आणली तर नफा न होतां कदाचित् वरील बाण्याने आवरून धरलेलीं उच्छृंखल माणसें मोकळीं सुटतील व एकच अनर्थ उसळेल. ही कल्पना काढणाऱ्यांचा हेतु शुद्ध आहे यांत संशय नाही. तरी पण ही वेळ शुभ नाही असें आम्हांस वाटतें. तशांतून हिंदु समाजावर इतके दरवडे पडले असतां त्याजजवळ अजूनहि वीस कोटींच्यावर रत्नें आहेत. हींच रत्नें उजळलीं तर त्यांचा प्रकाश दश-

दिशा व्यापून टाकील. तरी आमच्या मताने पतितपरावर्तनाची कल्पना तूर्त तरी सोडून हिंदु समाजावर घाले घालणाऱ्या मिशनऱ्यांचा प्रतिकार करण्यासाठी सर्वांनी एकदिलाने व एकजुटीने प्रयत्न करावा व त्या प्रयत्नांत जर ईशकृपेने आपणांस यश आलें तर आज अनादि कालापासून चालत आलेल्या बाण्याला हरताळ न लागतां आपला इष्ट हेतु सिद्धीस जाईल. असें जर न घडलें तर पतितपरावर्तनासारखा शेवटला असुरी उपाय आहेच.

– भाला, दि. २१ ऑगस्ट १९०५

---

## ८. पुन्हा '१८५७'

सहनशीलतेला सीमा आहे, सोशिकपणाला कांही तरी मर्यादा आहे व भित्रे-पणाचा केव्हा ना केव्हा तरी अंत व्हावयाचाच. चोहोकडून वेढलेलें हरण आपल्यावर निष्कारण हल्ला करणाऱ्या शिकारी कुत्र्यावर तुटून पडतें, स्वभावत: गरीब अशी गाय काठ्यांचा मारा करणाऱ्या मनुष्याकडे शिंगें रोखून धांवते व दीनदुबळी प्रजा जुलमाच्या अनेक पराण्यांनी टोचली गेली असतां कायदेशीर किंवा बेकायदेशीर बंड करण्यास प्रवृत्त होते. अशा तऱ्हेची स्वसंरक्षण करण्याची व दुसऱ्यांनी दिलेल्या दु:खाचा प्रतिकार करण्याची बुद्धि एकदा मनांत उत्पन्न झाली म्हणजे अशक्त जीव सशक्त होतात. भित्रेपणाचें पर्यवसान शूरत्वांत होतें. सोशिकपणाच्या वृत्तीचा परिपाक प्रतिकार बुद्धींत होतो. चारी बाजूंनी कोंडलेलें हरिण भित्रेपणाला राम राम ठोकून जिवावर उदार होऊन लगट करणाऱ्या कुत्र्याचें पोट आपल्या तीक्ष्ण शिंगांनी फाडून टाकतें. काठ्यांच्या तडाख्यांनी जर्जर झालेली गाय ढुसणी देऊन स्वत:ला मारणाऱ्या मनुष्याला जमीनदोस्त करून टाकते. अनेक प्रकारांनी सतावलेली प्रजा आपल्या दु:खाच्या परिहारार्थ दंड ठोकून उभी राहते. आपल्या संतप्त लाथांनी जुलमी राजांचीं सिंहासनें उडवून देते. जगाच्या इतिहासाचा असा अनुभव असतां अजूनहि विसाव्या शतकांत जगांतील राजेलोकांचे डोळे न उघडावेत यासारखें दुर्दैव नाही. तशांतून सर्व जगांत अतिशय सुधारलेलें व फार नांवाजलेलें जें इंग्रज सरकार त्याने सुद्धा या अनुभवाचा फायदा न घेतां पंधराव्या किंवा सोळाव्या शतकांतील राजेलोकांप्रमाणे आपली राज्यपद्धति व वर्तनक्रम ठेवावा हें मोठें नवल आहे. इंग्रज सरकारच्या ठिकाणीं दिसणारी ही घातूक वृत्ति पाहून त्यांच्या स्वत:च्या इतिहासाचा कंठरव त्यांच्या कानावर आज दोन-तीनशे वर्षें व्यर्थ पडत आहे असें दु:खाने म्हणावें लागत आहे. ज्या बहादुरांनी आपल्या एका स्वजातीय राजाला राजद्रोहाबद्दल फासावर चढविला व दुसऱ्याला हद्दपार करून टाकला त्या इंग्रज

लोकांना स्वतःच्या मागील दुःखावरून आमच्या हल्लीच्या दुःखाची कल्पना अवश्य यावयास पाहिजे होती. पण प्रत्यक्ष अनुभव पाहतां तो कांही समाधानकारक नाही. जेथे तेथे आमची विटंबना, जागजागीं आमचा पाणउतारा व पदोपदीं आमच्यावर लहानमोठे जुलूम होत आहेत. आमच्या बोलण्याला किंमत नाही. आमच्या मताची सरकार पर्वा करीत नाही. सरकारच्या या बेपर्वाईच्या व अरेरावीच्या वर्तनाचीं कडू फळें नेहमी बळेबळें आमच्या घशांत कोंबलीं जात आहेत. या कडू फळांपैकी शेवटलें अतिशय कडू फळ म्हणजे सर्व वंग देश नको नको म्हणत असतां सरकारने केलेली बंगालची फाळणी होय. आठ कोटि बंगाली लोकांच्या ऐक्यमताला झुगारून देऊन आपलाच हेका पुरविण्यांत सरकारने कोणतें राजकीय धोरण किंवा शहाणपण दाखविलें हें आम्हांस कळत नाही. एवढ्या जनसमूहाचीं मनें असंतुष्ट व क्षुब्ध करून सरकारने कोणत्या कायद्याची जोड संपादन केली हें एक गूढच आहे. इतक्या लोकांचा मनोभंग करून त्यांचीं अंतःकरणें दुखविण्यांत सरकारने मोठीशी मुत्सद्दे-गिरी दाखविली असें म्हणतां यावयाचें नाही. नाही म्हणावयास मनुष्यमात्राच्या ठिकाणीं सदैव वसत असलेली प्रतिकार-बुद्धि किंवा सूड घेण्याची प्रवृत्ति सरकारने आपणहून पेटवून दिली. या सूड घेण्याच्या प्रवृत्तीने बंगाल्यांत व महाराष्ट्रांत पेट घेऊन ती सर्व हिंदुस्थानभर भडकण्याचा रंग दिसत आहे. या वणव्याचा पुढे काय परिणाम होईल हें आजच सांगतां यावयाचें नाही. हा वणवा सध्या सुरू असलेली 'स्वदेशी चळवळ' होय. ही चळवळ म्हणजे हें सरकारविरुद्ध कायदेशीर बंडच होय.

हें १९०५ सालचें बंड १८५७ सालच्या बंडाची कायदेशीर पुनरावृत्ति आहे असें म्हणणें असयुक्तिक होणार नाही. ५७ सालच्या बंडाचा प्रादुर्भाव उत्तर हिंदुस्थानांत झाला. १९०५ सालच्या बंडाचा जन्म बंगाल्यांत झाला. ५७ सालच्या बंडाची उत्पत्ति काडतुसांत झाली. १९०५ सालच्या बंडाचा प्रारंभ बंगालच्या फाळणींत झाला. त्या बंडाचें कारण सरकारने केलेल्या शिपायांच्या श्रद्धेची हेटाळणी होती. या बंडाचें कारण लोकांच्या देशभक्तीचा केलेला उपमर्द होय. त्या बंडांत शिपाई लोक पोलादी शस्त्रांनी लढले. या बंडांत लोक आपल्या देशभक्तिजन्य अढळ निश्चयाच्या साहाय्याने लढत आहेत व लढणार आहेत. त्या बंडांत गोऱ्या लोकांची कत्तल झाली. या बंडांत विलायती मालाची कत्तल होत चालली आहे. त्या बंडांत शेकडो गोऱ्या लोकांचीं प्रेतें कुजून गेलीं, तर या बंडांत गोऱ्या मजूरदारांनी बनविलेल्या विलायती मालाचे ढीगच्या ढीग कुजून जाणार. तें बंड एका वर्षांत मोडलें गेलें. हें बंड दिवसेदिवस फैलावत जाणार. हें बंड सत्तावन सालच्या बंडापेक्षा जास्त भयंकर आहे. त्या बंडांत फक्त कांही गोरे लोक कापले गेले, तर या बंडांत हजारो लोक अन्नावांचून तडफडून मरून जातील. सारांश, हें १९०५ सालचें बंड जास्त विस्तृत, जास्त मारक व जास्त काळ टिकणारें आहे. या बंडांतील बंडखोर त्या बंडांतील बंडखोरांपेक्षा जास्त दिलाचे, जास्त दमाचे व जास्त दानतीचे पाहिजेत. या बंडांत सामील होणाऱ्या देशभक्त

मनुष्याच्या ठिकाणीं किती तरी निश्चय, किती तरी करारीपणा व किती तरी स्वार्थत्याग पाहिजे. या बंडांत शिरणाऱ्या मनुष्याच्या अंगांत देशभक्तीचें वारें किती तरी भरलें पाहिजे. या बंडांतील प्रत्येक बंडखोराने या बंडाचा उद्दिष्ट हेतु सिद्धीस नेण्याकरिता तनमनधन खर्च करण्यास तयार झालें पाहिजे. वास्तविक रीतीने पाहिलें असतां हें बंड किती तरी उपयोगी आहे. हें बंड आत्मकार्य करील व देशकार्य घडवून आणील. हें बंड देशाला धनसंपन्न करील व लोकांना स्वार्थत्यागी बनवील. हें बंड लोकांच्या मनांत एकीचें बीज पेरील व सर्व हिंदुस्थानवासियांचीं अंतःकरणें एका विचाररज्जूने एके ठिकाणीं जखडून टाकील. हें बंड मायदेशरूपी देवतेचा पवित्र व मंगल उत्सव आहे. तरी या उत्सवांत सामील होऊन मायदेशाची सेवा करून आपल्या जीविताचें साफल्य करण्याची इच्छा नसणारा पापी व अधम मनुष्य कोण असूं शकेल ?

स्वदेशी माल वापरण्याच्या चळवळीला पहिला आरंभ सर्व राजकीय चळवळीचें केंद्रस्थान जें पुणें शहर त्या ठिकाणीं झाला व या चळवळीचें पहिलें निशाण पुण्यांतील सार्वजनिक काका यांनी उभारलें. त्यांच्या पश्चात् ही चळवळ बहुतेक नामशेष होण्याच्या रंगास आली होती. पण दहा वर्षांपूर्वी जेव्हा सरकारने देशी कापडावर ५ टक्के जकात बसविली तेव्हा या धुमसत असलेल्या चळवळीने पुन्हा पेट घेतला व कांही वर्षें ती बरीच जोरात होती. पण हल्ली या चळवळीला बंगाल्यांत जितकें व्यापक व विस्तृत स्वरूप आलें आहे तितकें तें पूर्वी कधीहि नव्हतें. पूर्वी या चळवळीच्या बुडाशीं स्वदेशबांधवांच्या होणाऱ्या उपासमारीबद्दल हळहळ व ती दूर करण्याकरिता मनांत उत्पन्न होणारी कळकळ या दोन मनोवृत्ति होत्या. परंतु हल्लीच्या चळवळीची जननी सरकारने केलेल्या राष्ट्रीय मनोभंगाबद्दल सूड घेण्याची बुद्धि होय. या चळवळीचा जन्म अशा जहाल जननीपासून झाला असल्याकारणाने आईचे गुण लेकीच्या अंगांत उतरावे हें साहजिक आहे. म्हणून ही हल्लीची चळवळ जीवट व जोमदार होऊन सरकारला व त्याच्या जातभाईंना विशेष रीतीने जाचक होईल यांत संशय नाही. या चळवळीचा उपयोग अनेक बाजूंनी आहे हें थोड्याच विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल. या चळवळीचा धार्मिकदृष्ट्या विचार केला असतां ती अतिशय ग्राह्य असें प्रत्येक धर्माभिमानी हिंदु आनंदाने कबूल करील. ज्या हिंदूंना परजातीच्या मनुष्याने शिजविलेलें अन्न किंवा त्याने स्पर्श केलेलें पाणी खपत नाही त्यांना परदेशी वस्तु मात्र जेथे तेथे ग्राह्य वाटाव्यात हें मोठें आश्चर्य आहे. शुचिर्भूत होऊन ध्यानस्थ बसणाऱ्या मनुष्याच्या हातांत विलायती कापडाची गोमुखी असावी यापरता विटाळ तो कोणता ? देव्हाऱ्यांत ठेवलेल्या गीतेच्या पोथीचें वेष्टण विलायती कापडाचें केलेलें असावें यासारखा अंगावर शहारे आणणारा भ्रष्टाकार नाही. एखाद्या पवित्र राममंदिरांत शिरून प्रभूला साष्टांग नमस्कार घालीत असतां त्या वेळेस शरीरावर विलायती कापडाचा कपडा असणें यासारखें धर्मनिषिद्ध कर्म

दुसरें कोणतेंहि नाही. ज्याप्रमाणे परजातीय मनुष्याने पक्व केलेल्या अन्नाच्या सेवनाने जिव्हा विटाळते त्याप्रमाणे परदेशीय लोकांनी विणलेल्या कपड्याने देह विटाळला जातो. जिव्हेची शुद्धता जितकी आवश्यक आहे तितकीच देहाची शुद्धताहि आहे. यासाठी स्वधर्मरक्षण करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक हिंदूने व त्याचप्रमाणे प्रत्येक हिंद्वेतराने परदेशी वस्तूंचा विटाळ आपल्या देहाला किंवा आपल्या गृहाला होऊं देतां कामा नये. सारांश, जी वस्तु आर्यभूमींत उत्पन्न झाली नाही, जिला या पुण्यभूमींतील पवित्र हवा लागली नाही व जी या भरतभूमीच्या लेकराच्या निरुपद्रवी घामाने पुनीत झाली नाही अशी प्रत्येक परदेशी वस्तु त्याज्य, अपवित्र, अमंगल व धर्मनिषिद्ध होय.

या चळवळीचा सांपत्तिकदृष्टया विचार केला असतां ती जणू काय सर्व मनोरथ परिपूर्ण करणारी कामधेनूच आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. या चळवळीमुळे देशांतील दारिद्र्य नाहीसें होईल व लोकांची उपासमार चुकेल. सगळयांना यथेच्छ खावयास मिळून देशांतील पैसा देशांत मुरेल. नवीन उद्योगधंदे अस्तित्वांत येतील व डबघाईला आलेल्या धंद्यांचें पुनरुज्जीवन होईल. ही चळवळ आक्काबाईला हिंदुस्थानच्या बाहेर हाकलून देईल व तिच्या धाकटया बहिणीचें साम्राज्य चोहीकडे करील. लोकांचें दारिद्र्यजन्य मनोदौर्बल्य नाहीसें करूनहि त्यांना स्वाभिमानी, स्वार्थत्यागी व स्वदेशाभिमानी करील. देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास या चळवळीसारखा रामबाण उपाय नाही. देशांतील उद्योगधंद्यांची वाढ करण्यास हिच्यासारखी देणगी (Bounty) नाही व दुष्काळरूपी रोगावर हिच्यासारखें जालिम औषध नाही. सारांश, ज्याला पोटभर खाण्याची इच्छा आहे, ज्याला पुढील पिढयांनी पोटभर खावें असें वाटतें आहे व ज्यांच्या मनांत आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनी व देशबांधवांनी पोटभर जेवावें असें वाटतें आहे त्या प्रत्येकाने स्वतः या चळवळींत सामील होऊन दुसऱ्यांना त्यांत सामील करण्याची खटपट करावी.

या चळवळीचा राजकीयदृष्टयाहि बराच उपयोग आहे. आपण सर्व एका आईचीं लेकरें आहोंत ही कल्पना ही चळवळ प्रत्येक हिंदुस्थानवासियांच्या मनांत उत्पन्न करील. ही एकमेकांबद्दल कळकळ व सहानुभूति वाढवील व प्रसंगीं एकमेकांस हरएक प्रकारची मदत करण्याची स्फूर्ति लोकांना देईल. ही चळवळ 'स्वदेशी' या शब्दांत एका विशिष्ट प्रकारची जादू भरील. ही हिंदुस्थानांतील सर्व पुरुषांना व बायकांना आपण एकमेकांचे देशबंधु व देशभगिनी आहोंत असें वाटावयास लावील. लोकांमध्ये एकी उत्पन्न करून स्वाभिमानाचें व स्वावलंबनाचें महत्त्व व उपयुक्तत्व त्यांच्या लक्षांत आणून देईल. सारांश, ही चळवळ हिंदुस्थानवासियांच्या अंतःकरणांत 'मनुष्यत्व' ओतून त्यांचा या जगांतील प्रवास सुखकर करील. याप्रमाणे ही 'स्वदेशी चळवळ' धार्मिकदृष्टया, सांपत्तिकदृष्टया व राजकीयदृष्टया अतिशय हितकर व पथ्यकर आहे.

या चळवळीच्या उपयुक्ततेविषयी जरी कोणाच्या मनांत शंका नसली, तरी

तिच्या चिरकालिकत्वाबद्दल पुष्कळांचीं मनें साशंक आहेत. आमच्या मतें लोकांची ही भीति साधार आहे. 'पोलिटिकल इकॉनॉमिक'च्या दृष्टीने उघडचा बाजारांत कोणत्याहि मालाचा टिकाव लागण्यास त्या मालाच्या अंगीं तीन गुण अवश्य असावे लागतात. बाजारांत येणारा माल दिखाऊ, टिकाऊ व स्वस्त असला पाहिजे. हे तीन गुण ज्या मालाच्या अंगीं नसतील असा माल आपल्या स्वतःच्या जिवावर बाजारांत कधीहि विकला जाणार नाही. देशाभिमानासारख्या अन्य कारणांनी जरी अशा मालाचा कांही दिवस खप झाला तरी तो खप स्वाभाविक नसून आगंतुक किंवा कृत्रिम होय. स्वदेशी मालाचा खप हल्ली कृत्रिम आहे हें कोणासहि नाकबूल करतां यावयाचें नाही. म्हणून या कृत्रिम खपाला स्वाभाविक खपाचें स्वरूप येण्याचे हे तीन गुण देशी कापडांत किंवा दुसऱ्या देशी मालांत आणण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक देशभक्ताचें कर्तव्य आहे. कोणत्याहि मागासलेल्या मालाचा स्वाभाविक खप होण्यास फक्त दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग हाच की, कायद्याच्या बंधनाने परदेशी माल स्वदेशांत येऊं द्यावयाचा नाही. हा मार्ग अतिशय सरळ, सोपा व शीघ्र फलदायी आहे. पण आपल्या कमनशिबाने या मार्गाचें अवलंबन करण्यास लागणारी राजकीय सत्ता आपल्या हातांत नसल्या कारणाने हा मार्ग असून नसून सारखाच आहे. दुसरा मार्ग देशांतील माल परदेशी मालापेक्षा स्वस्त पडावा या हेतूने असा माल उत्पन्न करणाऱ्या व्यापाऱ्यांना देणगीच्या रूपाने कांही मदत करणें होय. ही मदत अर्थात् सरकारकडून व्हावयास पाहिजे असते. पण हल्लीच्या पराधीन स्थितींत अशी अपेक्षा करणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा होय. पण ही मदत आज आपलें शाब्दिक सहानुभूति दाखविणारें मायबाप सरकार देण्यास तयार नाही. ती मदत 'स्वदेशी चळवळी'च्या रूपाने लोक देण्यास तयार झाले पाहिजेत. अशा मदतीचा फायदा घेऊन गिरणीवाल्यांनी वरती सांगितलेल्या तिन्ही गुणांनी युक्त असा स्वदेशी माल तयार करण्यास झटलें पाहिजे. सामान्यजन ज्या देशाभिमानाने प्रेरित होऊन स्वार्थत्याग करण्यास प्रवृत्त झाले आहेत तो देशाभिमान गिरणीवाल्या लोकांच्या अंगांत संचारला पाहिजे.

लोकांच्या देशाभिमानजन्य निश्चयाचा फाजील फायदा घेऊन जर ते विनाकारण मालाच्या किमती वाढवतील तर ते प्रत्यक्ष रीतीने लोकांच्या घरांवर दरवडे घालतात असें म्हणण्यास आम्हांस मुळीच दिक्कत वाटत नाही. कोणत्याहि मालाचा स्वाभाविक खप होण्यास लागणाऱ्या तीन गुणांपैकी एक गुण म्हणजे टिकाऊपणा हा स्वदेशी कापडांत किंवा दुसऱ्या स्वदेशी मालांत असतो याबद्दल मतभेद असूं शकणार नाही. दुसरा गुण 'दिखाऊपणा'. तो मात्र स्वदेशी मालांत नसतो ही गोष्ट कोणासहि नाकबूल करतां यावयाची नाही. पण हा गुण शोभेच्या दृष्टीने जरी आवश्यक आहे तरी उपयुक्ततेच्या दृष्टीने त्याची मोठीशी मातब्बरी नाही. टिकाऊपणा असूनहि दिखाऊपणा असल्यास दुधांत साखर पडल्यासारखें झालें. पण पूर्वोक्त गुण असून उत्तरोक्त नसल्यास फारसें नडत नाही. तिसरा गुण जो स्वस्तपणा तो मात्र देशी

मालांत नाही; म्हणूनच परदेशी मालापुढे त्याचा टिकाव लागत नाही. हा गुण देशी मालांत आणतां आल्यास किती तरी अद्भुत गोष्टी घडून येतील! देशी माल महाग असल्याचीं पुष्कळ कारणें आहेत. त्या कारणांतील प्रधान कारण सहज समजण्यासारखें आहे. देशी माल महाग आहे याचें मुख्य कारण देशी माल विकत घेणारे देशभक्त महाग आहेत. जर देशभक्त स्वस्त होतील तर देशी मालहि स्वस्त, अतिशय स्वस्त होईल. सारांश, देशी माल स्वस्त किंवा महाग होणें हें बहुतांशीं आपल्यावर अवलंबून आहे.

वरती नमूद केलेल्या गुणत्रयीने युक्त असा माल तयार करण्याचा प्रयत्न जर लोकांकडून होणार नाही, तर देशी मालाच्या व विशेषतः देशी कापडाच्या कमतरतेमुळे नाइलाजास्तव लोकांना विलायती मालाकडे पाहवे लागेल. ही स्थिति लक्षांत आणून बंगालच्या लोकांनी नवीन गिरण्या उभारण्याचा विचार केला आहे. पंचवीस हजार रुपये खर्चून धावत्या धोटयाचे हातमाग जपानहून मागविले आहेत. बंगाली लोकांनी पत्करलेली ही दिशा अगदी योग्य असून, या जोडगोळीच्या बंदुकांनी त्यांनी लढण्यास प्रारंभ केल्यास या युद्धांत यश आल्यावांचून राहणार नाही.

बंगाली लोकांनी सुरू केलेल्या या बंडांत मराठे लोक सामील होत चालले आहेत व थोडयाच दिवसांत हें बंड चोहीकडे भडकेल, अशी चिन्हें दिसूं लागलीं आहेत. या बंडाच्या ज्वाला इंग्रज मजूरदारांच्या पोटांत भडकूं लागल्या म्हणजे आपोआप सर्वांगाचा दाह होऊन ते आक्रोश करूं लागतील. मग राज्यमदाने धुंद झालेल्या त्यांच्या जातभाईंचे डोळे सहज उघडतील. आपणांप्रमाणे इंडियन लोकहि माणसें आहेत, त्यांना महत्त्वाकांक्षा आहे, त्यांना जगांत अब्रूने दिवस काढावयाची इच्छा आहे या गोष्टींचें ज्ञान होऊन कदाचित् ते आपलें हल्लीचें धोरण बदलतील. पण पुढे सरकार कांही करो, त्याचा विचार सध्या आपणांस कर्तव्य नाही. सध्या चालू असलेल्या या राष्ट्रीय बंडांत प्रत्येक इंडियनाने सामील होऊन आपल्या जन्मदात्या मायदेशाचें ऋण फेडण्याचा प्रयत्न मनोभावाने करावा हेंच उचित होय. हें ऋण न फेडण्याइतका नीच, आपमतलबी व मातृद्रोही मनुष्य असूं शकेल काय? जर असा कोणी हरीचा लाल असेल, तर त्याला खडयासारखा निवडून काढा व त्याला असें सांगा की, मूर्खा, भरतभूमींत व्यर्थ जन्म घेतलास. अपमानरूपी घणाच्या असंख्य ठोक्यांनी भंग न पावणारा पाषाण, तूं असाच सदैव बुटाच्या ठोकरा खाणार. कवडीचुंबका, अल्पस्वल्प नफ्यासाठी देशबांधवांतून फुटून जाऊन तूं आपल्या तोंडाला अक्षय्य कालिमा लावणार व जगांत आपलें हसूं करून घेणार. असो; कांही जण या राष्ट्रीय बंडांत सामील होवोत किंवा न होवोत इकडे कोणीं लक्ष देऊं नये. मी या बंडांत सामील होणार व माझ्या कच्च्याबच्च्यांना त्यांत सामील होण्यास लावणार अशी शपथ प्रत्येकाने घ्यावी व ती परमेश्वराच्या कृपेने व मातृभूमीच्या आशीर्वादाने

तडीस नेण्याचा निश्चय करावा. जर या बंडाच्या निशाणाखाली आमचे देशबांधव व देशभगिनी मनोभावे जमतील तर हें बंड १८५७ सालच्या बंडावर ताण करून टाकील

— भाला, दि. १ सप्टेंबर १९०५

---

# ९. भिणार का भिडणार

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।**
**तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥**

— श्रीमद्भवद्गीता, २–३७

ज्याप्रमाणे समुद्राला एकदा भरती येऊ लागली म्हणजे एकापाठीमागून एक पर्वतमय लाटा उसळूं लागतात किंवा ग्रीष्म ऋतूंत रानामध्ये एकदा वणवा भडकला असतां ज्वाळांचे लोटच्या लोट आकाशांत उडूं लागतात किंवा हस्त नक्षत्रांत वळवी पावसाला एकदा सुरुवात झाली म्हणजे सरीमागून सरी जमिनीवर कोसळूं लागतात त्याप्रमाणे या स्वदेशी चळवळीला ऊर्फ धामधुमीला एकसारख्या उकळ्या फुटत आहेत. दिवसेंदिवस ही चळवळ जास्त फोफावत जाऊन ही हिंदुस्थानांतील प्रत्येक शहर, गाव, व खेडेगाव व्यापून टाकील अशी आशा वाटूं लागली आहे. आज मद्रासेंत सभा भरली तर उद्या अलाहाबादेला भरली. परवा नागपुराला तर तेरवा सोलापुराला भरली. याप्रमाणे ही स्वदेशी चळवळ सर्व हिंदुस्थानभर थयथय नाचत आहे. या स्वदेशी चळवळरूपी सुंदरीचें मोहक सौंदर्य व तिचें मनोहर नृत्य पाहून प्रत्येक जण तिच्या ठिकाणीं लुब्ध होऊन गेला आहे. पण तृतीय प्रकृति नेमस्त लोकांच्या पुढे मात्र तिने हात टेकून हार खाल्ली आहे. या नेमस्त लोकांनी — या यल्लमांच्या भक्तांनी हातांत आकडेशास्त्राचें तुणतुणें घेऊन आपल्या कुलदेवतेभोवतीं फेर धरण्यास सुरुवात केली आहे. आपल्या भक्ताची ही निस्सीम व अव्यभिचारी भक्ति पाहून ह्यांच्या उपास्यदेवतेला भक्ताची करुणा येऊन ती त्यांना लौकरच सायुज्यता मुक्तीला नेईल असें आम्ही खात्रीने सांगतों. उपासकांचें उपास्यदेवतेशीं तादात्म्य झाल्यावर लवकरच त्यांचें तृतीय प्रकृतित्व नाहीसें होईल. त्यांना स्त्री-प्रकृतित्वाचा अलभ्य लाभ होईल. त्यांच्या अंगीं हल्ली असलेले स्त्रीजात्यनुरूप गुण — म्हणजे हृदयाची भीरुता, वाणीची मधुरता व कृतीची सौम्यता त्यांना फारच शोभूं लागतील. थोडेथोड का होईना, पण देशकार्य खात्रीने होईल. एकंदरींत जहाल लोकांच्या मार्गा-प्रमाणे या नेमस्त लोकांचा मार्ग बुळबुळीत नसून अति गुलगुलीत आहे. त्यांच्या मार्गाचें अवलंबन केलें असतां गुदगुदल्या होत होत राष्ट्रोन्नति सहज घडून येते असा

त्यांचा अनुभव आहे. म्हणूनच ते आपल्या मार्गाचें अवलंबन करण्यास इतरांना इतक्या आग्रहाने सांगत आहेत. नेमस्त लोकांचा अनुभव कांही असो, पण त्यांचा मार्ग दुसऱ्यांना खात्रीने रुचेल असें नाही. म्हणून ज्यांना त्यांचा सोपा व बिनधोक मार्ग आवडत नसेल त्यांनी जहाल लोकांच्या पौरुषेय मार्गाची कास धरावी. तो मार्ग हाच की, "जो आपल्याशीं जसें वागेल त्याशीं आपण तसें वागावें" किंवा इंग्रजींत ज्याला "an eye for an eye and a tooth for a tooth" (ज्याने आपला डोळा फोडला त्याचा आपण डोळा फोडावा व ज्याने आपला दात पाडला त्याचा आपण दात पाडावा) असें म्हणतात. हा मार्ग दुसऱ्याचा डोळा विनाकारण फोडण्यास कोणास शिकवीत नाही. पण दुसऱ्याने जर आपला डोळा फोडला, तर हा मार्ग डोळा फुटलेल्या मनुष्याला स्वस्थ बसूं देत नाही. तो अशा मनुष्याच्या कानांत ओरडून असें सांगतो की, बाबा, क्षमा हें भूषण नसून दूषण आहे. जर तूं चपराकीला चपराक लगावलीस तरच या जगांत तुझी डाळ शिजेल. स्वदेशी चळवळीचा मुख्य आधार हें तत्त्व आहे हें कोणी कबूल करील. नुसत्या व्यापारी तत्त्वाच्या पायावर ह्या चळवळीची इमारत बांधली नाही व यदाकदाचित् तसें करावयाचा जर प्रयत्न करण्यांत आला तर तो सपशेल फसेल, असें आम्ही खात्रीने सांगतों. स्वातंत्र्याशिवाय —पूर्ण स्वातंत्र्याशिवाय— कोणत्याहि देशाचा व्यापार कधीहि भरभराटीस येणार नाही. तशांतून जर राज्यकर्ते स्वत: व्यापारी असतील, तर परतंत्र राष्ट्राने आपला व्यापार वाढेल अशी कल्पना स्वप्नांतहि आणूं नये. म्हणून ह्या स्वदेशी चळवळीने आपला व्यापार वाढेल अशा आशेने जर लोक या चळवळींत सामील झाले असतील, तर पुढेमागे त्यांची निराशा होईल असें आम्हांस कष्टाने म्हणावें लागत आहे. ही स्वदेशी चळवळ आपला व्यापार मुळीच वाढविणार नाही असें आमचें मत नाही. हल्लीपेक्षा थोड्याबहुत प्रमाणाने आमची स्थिति सुधारून आमच्याजवळ दोन पैसे जास्त होतील व अर्धपोटी निजणाऱ्या देशबांधवांना दोन घास जास्त खावयास मिळतील ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. पण या चळवळीचा हा उपयोग अगदी गौण आहे, म्हणून तिकडे लक्ष देण्यांत अर्थ नाही.

स्वदेशी चळवळीचें मुख्य काम म्हणजे आपलें सजीवत्व सरकारच्या अंध नजरेस आणून देणें होय. हें काम जर पूर्णपणें सिद्धीस गेलें, तर त्यापासून आपलें व आपल्या भावी पिढीचें कल्याण होईल असें आमचें मन आम्हांस सांगतें. स्वदेशी चळवळीचें मुख्य कर्तव्य हें असतां त्याच्यासंबंधी आता मतभेद कां होऊं लागला आहे हें आम्हांस कळत नाही. कलकत्ता येथे नुकत्याच भरलेल्या सभेचे अध्यक्ष मि. लाल मोहन घोष असे म्हणाले की, "या चळवळीचा जन्म रागाच्या झटक्यांत किंवा सूड घेण्याच्या बुद्धीने झाला नसून तो जुन्या मृत झालेल्या धंद्यांना सजीव करण्याकरिता झाला आहे." मि. लाल मोहन घोष यांनी सांगितलेला हा हेतु अजीबात खोटा आहे. या चळवळीने जुने मृत झालेले धंदे पुन्हा सतेज व

सजीव होतील. पण या चळवळीचा जन्म उद्योगधंद्यांच्या पुनरुज्जीवनाच्या हेतूने झाला नाही हें आम्ही स्पष्टपणें सांगतों. वंगभंगामुळे उत्पन्न झालेला राग अथवा त्वेष हा या चळवळीचा पिता होय. सूड घेण्याची बुद्धि ही तिची जननी होय. राग व प्रतिकार-वृद्धि या दंपत्याचें औरस अपत्य भलत्याच बाईच्या मांडीवर देणें जरी हितकर असलें, तरी तें कायदेशीर नाही. ही चळवळ वंगभंगामुळे उत्पन्न झालेली, राग व प्रतिकार-बुद्धि यामुळे अस्तित्वांत आली हें सिद्ध करण्यास मुळीच जड जाणार नाही. "आधी हिंदुस्तानी माल घ्या, मग जपानी किंवा चिनी घ्या व नंतर लागलाच तर युरोपांतल्या इतर देशांतला घ्या. पण कांही झालें तरी विलायती घेऊं नका." असें या चळवळीचें मुख्य धोरण आहे. जर मृत किंवा मृतप्राय झालेल्या देशी धंद्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा फक्त या चळवळीचा एकेरी हेतु असेल, तर देशी मालाच्या अभावीं इतर देशांतील मालाप्रमाणे इंग्लंडमधील माल घेण्यास हरकत नाही. एवढेंच नव्हे तर, एका अर्थीं विलायती माल घेणें जास्त फायदेशीर होईल. कारण खुषीने जरी नाही तरी लाजून तरी कांही हक्क नव्हे सवलती इंग्लंड आपणांस देईल. पण जगांतील इतर राष्ट्रांचा माल प्रसंग पडल्यास व गरज लागल्यास घ्यावयाचा पण, कांही झालें तरी इंग्लंडांत पिकणाऱ्या मालाला स्पर्श करावयाचा नाही असा आग्रह जर फक्त मृत धंद्यांचें पुनरुज्जीवनच करावयाचें असेल तर कशाकरिता ? इंग्लंडेतर देश आपणांस कांही हत्ती-घोडे देणार नाहीत किंवा दुसरें कोणतेंहि साहाय्य करणार नाहीत. म्हणून आमचें असें मत आहे की, ही चळवळ प्रतिकारबुद्धिजन्य आहे. देशांतील मृत धंदे सजीव करण्याकरिता किंवा रोडावलेले धंदे सुदृढ करण्याकरिता ही चळवळ अस्तित्वांत आली नाही. या स्वदेशी चळवळरूपी जगदंबिकेचा अवतार भक्तांच्या घरीं धनधान्याची चंगळ करून टाकण्याकरिता झाला नसून, हल्ली सर्व हिंदुस्थानभर बोकाळणाऱ्या व सरकारकडून पदोपदीं दाखविण्यांत येणाऱ्या बेमुर्वतपणारूपी महिषासुराचा वध करण्याकरिता झाला आहे. अशी वस्तुस्थिति असतां मि. लाल मोहन घोष यांनी या चळवळीच्या जन्माचा हेतु भलताच सांगावा हें जरा चमत्कारिक आहे. तशांतून मि. लाल मोहन घोष यांचे उद्‌गार कलकत्ता येथे नुकत्याच भरलेल्या सभेचे अध्यक्ष या नात्याने निघालेले आहेत म्हणून त्यांना विशेष महत्त्व आहे. मि. लाल मोहन घोष यांनी या चळवळीच्या माथीं व्यापारी हेतु कां लादावा याचें कारण त्यांनीच पुढे दिलें आहे. ते असें म्हणतात की, ही चळवळ प्रतिकार-बुद्धीने अस्तित्वांत आली आहे अशी जर अँग्लो-इंडियनांची खात्री झाली, तर आपल्याबद्दल असलेली त्यांची सहानुभूति नष्ट होऊन आपलें पुष्कळ अहित होईल. मि. लाल मोहन घोष यांचे हे भाबडे विचार वाचून आम्हांस त्यांची कींव येते. आजपर्यंत अँग्लो-इंडियन लोकांच्या सहानुभूतीचा पूर्ण अनुभव आम्हांस आला आहे व म्हणून आता आम्हांस त्यांच्या सहानुभूतीची किंमत वाटत नाही. "सुसरबाई तुझी पाठ मऊ" म्हणून आमच्या जिव्हा कोरड्या ठणठणीत पडल्या तरी सुसर-

बाईची मर्जी प्रसन्न होत नाहीं. तरी आता निराळ्या उपायांची योजना केली तरच आपला कांही तरी निभाव लागेल अशी आमची समजूत आहे. 'स्वदेशी चळवळ' हा एक त्या तऱ्हेचा कायदेशीर व फायदेशीर उपाय असून, तो वर नमूद केलेल्या "सुसरबाई तुझी पाठ मऊ" या उपायापेक्षा जास्त फलदायी आहे. जर हा उपाय इमानेइतबारें अमलांत आला गेला तर, जरी सुसरबाईची पाठ मऊ झाली नाही तरी, तिची कणीक सपाटून मऊ होईल हें कोणास सांगावयास नकोच.

या चळवळीचें वास्तविक स्वरूप असें असल्याने ती पुष्कळांच्या डोळ्यांत सलूं लागली आहे. तिला हाणून पाडण्याचे गुप्त व उघड प्रयत्न सुरू झाले आहेत. पुढे केव्हा, कोणावर, कोणता कठीण प्रसंग गुदरेल याची कल्पना आज आम्हांस करतां येत नाही. या चळवळीमुळे इंग्लंडांतील मजूर उपाशी तरफडून मरूं लागले म्हणजे हिला हाणून पाडण्याचे प्रयत्न सुरू होतील अशी आमची अटकळ आहे. तरी आमच्या सर्व देशबांधवांस असा प्रश्न आहे की, जर तुम्हांवर वेडेवाकडे प्रसंग आले तर तुम्ही 'भिणार का भिडणार' या प्रश्नाच्या उत्तरावर सर्व कांही अवलंबून आहे. जरा कोठे कमीजास्त झाल्यावर जर 'क्षमस्व परमेश्वर' या वेतस-वृत्तीचा अंगीकार करावयाचा असेल, तर मग पहिल्या प्रथम उगीच मोठें अवसान घालूं नका व पुढे आपलें हसूं करून घेऊं नका. ही चळवळ सूड घेण्याच्या बुद्धीने अस्तित्वांत आली आहे म्हणून कोणालाहि कशाची भीति बाळगावयास नको असें जरी आहे, तरी हिला राजद्रोहाचें स्वरूप देण्याचा खटाटोप केला जाईल व कदाचित् या कायदेशीर चळवळीला बेकायदेशीर ठरविण्याचा प्रयत्नहि होईल. म्हणून पुढे जें जें होईल त्या सर्वांस तोंड देण्याची तयारी आतापासून प्रत्येकाने केली पाहिजे. या चळवळीचा राजद्रोहाशीं संबंध जोडून देण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न आतापासून होऊं लागला आहे. पूर्व बंगाल्यांत व आसामांत एक राजद्रोहात्मक पत्रक वांटलें जात आहे अशी अलाहाबाद येथे निघणाऱ्या पायोनिअर पत्राला बातमी लागली आहे. या पत्राची बातमी पश्चिम बंगाल्यांतील पत्रांना नसतांना इतक्या दूरच्या पायोनिअर पत्राला ती ऐकूं यावी यावरून त्या पत्राचे कान बरेच लांब झाले आहेत हें उघड आहे. आता यापुढे कांही वर्तमानपत्रकारांना अस्तित्वांत नसलेलीं राजद्रोहात्मक पत्रकें दिसूं लागतील, सभांतून केलेल्या भाषणांना राजद्रोहाचा वास येऊं लागेल व शांतपणें झालेल्या समारंभांत दंगेधोपे दिसूं लागतील. या स्वदेशी चळवळीने लोकांचें, विशेषतः विद्यार्थ्यांचें नुकसान होण्यास प्रारंभ झाला आहे.

मागील अंकीं उमरावती येथे झालेल्या शोचनीय प्रकाराची हकीगत देण्यांत आली आहे. येत्या अंकीं त्याच मासल्याची दुसरी हकीगत देण्याचें आमच्या नशिबीं आलें आहे. दक्षिण महाराष्ट्रांत कोल्हापूर नांवाचें एक संस्थान आहे. त्या संस्थानावरील अधिपति गोब्राह्मणप्रतिपालक शिवरायाचे एक वंशज आहेत. त्या शहरीं एक हायस्कूल असून त्यावर एक युरोपियन प्रिन्सिपाल व एक पारशी व्हाइस प्रिन्सिपाल आहेत. मॅट्रिक

क्लासची प्रिलिमिनरी परीक्षा चालली असतां पहिल्या दोन दिवशीं स्वदेशी कागद विद्यार्थ्यांना देण्यांत आले. तिसऱ्या दिवशीं स्वदेशी कागदांऐवजीं विलायती कागद देण्याबरोबर विद्यार्थ्यांनी त्या कागदांवर प्रश्न लिहिण्याचें नाकारलें. जाणूनबुजून व मुद्दाम विदेशी कागद विद्यार्थ्यांना देण्यांत सदरहू हायस्कूलच्या अधिकाऱ्यांना काय मोठेपणा वाटला असेल तो वाटो. विदेशी कागदावर प्रश्न लिहिण्यास हात ठेवल्याबरोबर विद्यार्थ्यांच्या हातांना चटके बसूं लागले व त्या चटक्यांनी हात पोळल्यामुळे कांही विद्यार्थ्यांनी खिडक्याबाहेर उडया घातल्या. शाळेच्या प्रिन्सिपालसाहेबांना व विशेषतः व्हाइस प्रिन्सिपालसाहेबांना विद्यार्थ्यांच्या या देशाभिमानामुळे किंवा त्याच्या मताने मूर्खपणामुळे राग येऊन विद्यार्थ्यांचीं देशाभिमानरूपी वारुणीने भडकलेलीं डोकीं ताळयावर आणण्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातावर सहा-सहा छडया जोराने देण्यांत आल्या व ६५ विद्यार्थ्यांना या वर्षी मॅट्रिक परीक्षेस बसण्याची बंदी करण्यांत आली. विद्यार्थ्यांबरोबर शाळेचे संस्कृतचे अध्यापक रा. रा. विजापूरकर यांना नोकरीवरून दूर करण्यांत आलें व कोल्हापूर शहरांत वाढणारी ही देशाभिमानाची विषवल्ली मुळापासून खणून काढण्यांत आली. अशी एक बातमी आहे की या ६५ विद्यार्थ्यांना दिलेल्या शिक्षेपेक्षा जास्त कडक शिक्षा देण्यांत येणार आहे. ही जास्त कडक शिक्षा कोणती होणार हें कांही प्रसिद्ध करण्यांत आलें नाही. देशाभिमानासारखा घोर गुन्हा करणाऱ्या या ६५ बंडखोर विद्यार्थ्यांना श्रीमहालक्ष्मीच्या देवळासमोर अंबिकेला साक्ष ठेवून येत्या दसऱ्याच्या शुभ दिवशीं फाशी देण्यांत येणार आहे किंवा कोल्हापूर संस्थानांतून हद्दपार करण्यांत येणार आहे हें कांही आम्हांस कळत नाही. स्वदेशी वस्तूंचा व स्वदेशी पादशाहीचा अभिमान बाळगणाऱ्या क्षत्रिय कुलावतंस शिवरायाचे – औरस जरी नव्हेत तरी – वंशज हल्लीचे महाराज आहेत. त्यांचें क्षत्रियत्व संकेश्वरच्या श्रीमज्जगद्गुरूंनी नुकतेंच कबूल केलें आहे. अशा क्षत्रियगुणसंपन्न महाराजांच्या प्रत्यक्ष नाकाखाली ६५ विद्यार्थ्यांनी देशाभिमानासारखें बदमाश कृत्य करावें हें महाराजांना सहन होऊं नये हें उचितच आहे. महाराजांनी या ६५ विद्यार्थ्यांची व त्यांना वाईट सल्लामसलत देणाऱ्या रा. विजापूरकरांची चांगली खोड मोडली याबद्दल महाराजांचें आम्ही अभिनंदन करतों. आता यापुढे कोल्हापूर संस्थानांत देशाभिमानाचा प्लेग उद्भवणार नाही व फैलावणार नाही असें अनुमान करण्यास हरकत नाही.

स्वदेशी चळवळीमुळे ओढवणाऱ्या संकटपरंपरेची पहिली सलामी उमरावती व कोल्हापूर या दोन ठिकाणीं झाली. आता पुढे कोणाची पाळी येते इकडे सर्वांची नजर लागली आहे. पहिल्या सलामींत उमरावतीस ३३ विद्यार्थ्यांचा, कोल्हापुरांत ६५ विद्यार्थ्यांचा चुराडा उडाला याबद्दल सर्व महाराष्ट्र हळहळत आहे. या चळवळींत पहिली गदा विद्यार्थ्यांवर आदळली याबद्दल कोणास आश्चर्य वाटावयास नको. कारण कोणत्याहि देशभक्तिपूरित चळवळींत विद्यार्थी हेच सर्वांच्या अगोदर

बळी पडावयाचे. असें होण्याचें कारण उघड आहे. तें हें की, विद्यार्थ्यांच्या मनासारखीं स्फटिकाप्रमाणे स्वच्छ मनें इतरांची असूं शकत नाहीत. विद्यार्थ्यांच्या निष्कलंक मनावर स्वार्थ, लोभ, मत्सर इत्यादि दुर्विकारांचीं काळीकुट्ट पुटें जडलीं नसल्या-कारणाने धर्माभिमान, देशाभिमान, स्वाभिमान इत्यादि गुणांची छटा त्यांजवर लवकर उमटते व म्हणून त्यांचीं मनें इतरांच्या अगोदर खुलूं लागतात व सुसंधाचे वारे लागताच त्यांच्या ठायीं असलेले वरील स्पृहणीय गुण पेट घेतात व लवकरच ते भडकूं लागतात. असें झालें असतां विरुद्ध पक्षाची नजर त्यांच्याकडे प्रथम जाते व त्यामुळे विद्यार्थीवर्ग इतरांच्या अगोदर बळी पडतो. पण असें होतें म्हणून विद्यार्थ्यांनी भिऊन जाऊं नये. पहिला घाव आपणावर पडून आपल्या इतर देशबांधवांचें त्यामुळे कांही काळपावेतों रक्षण होतें या गोष्टीबद्दल त्यांना अभिमान व आनंद वाटावयास पाहिजे. गतकालीन युगांत राक्षसलोक ब्राह्मणांचे बटु खात असत व अवरंगजेब बादशहा ब्राह्मणांचीं पोरें सर्वांच्या अगोदर बाटवीत असे याचें कारण हेंच होय. जीर्ण होत चाललेल्या खोडावर घाव मारण्याच्या ऐवजीं त्या खोडांतून फुटणारे कोवळे कोंब तोडून टाकण्याकडे आपमतलबी लोकांची प्रवृत्ति असते हें उघड आहे. आज तें संकट विद्यार्थ्यांवर आलें आहे व पुढे येण्यासारखें आहे. तेंच संकट निराळ्या रूपाने इतर लोकांवर येण्याचा संभव आहे. तरी असा प्रसंग आल्यास आमचे देशबांधव 'भिणार का भिडणार ?' ही स्वदेशी चळवळ एक प्रकारची लढाई आहे. खऱ्या लढाईंत रक्त सांडलें जातें. या लढाईंत रक्त शोषलें जाणार. खऱ्या लढाईंत धातूंच्या शस्त्रांचा उपयोग केला जातो तर ही लढाई देशभक्तीच्या समशेरीने लढावयाची आहे. खरी लढाई एका विवक्षित पटांगणावर लढली जाते, तर ही लढाई प्रत्येकाला आपल्या घरांत लढावयाची आहे. खऱ्या लढाईंत फक्त पुरुष लढतात, तर या लढाईंत पुरुष, बायका, मुलें या सर्वांना लढावयाचें आहे. जरी खऱ्या लढाईंत व 'स्वदेशी चळवळ'रूपी लढाईंत कांही फरक आहेत, तरी या लढाईंत दोन्ही प्रकारच्या लढायांचा एकच परिणाम आहे. तो हाच की, "हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्" जर मेलात तर स्वर्गाला जाल व जर जगलात तर इह-लोकीं सुख व ऐश्वर्य भोगाल. तरी अशा या दुहेरी नफ्याच्या लढाईंत हे देशबांधवहो, तुम्ही 'भिणार का भिडणार ?' जर भ्याल तर जग तुम्हांस भ्याड म्हणेल व तुमच्या अपकीर्तीची नौबत सर्व जगाला ऐकूं जाईल एवढ्या मोठ्याने वाजेल. जर तुम्ही लढाल तर खात्रीने यशस्वी व्हाल व सुख व ऐश्वर्य भोगाल. तरी हे आधुनिक कौंतेयांनो, उठा, एकमेकांना प्रेमाने भेटा व उद्दिष्ट कार्य सिद्धीस नेण्याकरिता मनोभावाने झटा, नाही तर कायमचे हटा.

— भाला, दि. १ ऑक्टोबर १९०५

---

# १०. नरकांतील दरबार

एकदा नरकांतील साम्राज्यांत एक मोठा दरबार भरावयाचा होता. त्याकरिता तेथे एक भव्य व विस्तीर्ण मंडप उभारला होता. मृत माणसांच्या अंगांवरील कातडीं सोलून काढून तीं सर्व एकत्र शिवून त्या मंडपाला एक छत घातलें होतें. जागोजागीं केळीच्या खांबाप्रमाणे माणसांचीं शिरें कापलेले कबंध उभे केले होते व कापून काढलेलीं अनेक मुंडकीं एकत्र करून त्यांचीं त्या मंडपास जागोजागीं तोरणें लावलीं होतीं. वाट दाखविण्याकरिता हल्ली ज्याप्रमाणे लाकडी पाटचांवर हाताचे पंजे काढलेले असतात त्याप्रमाणे प्रत्यक्ष हात तोडून ते मंडपाच्या प्रत्येक ठळक भागाच्या प्रवेशद्वाराला खिळचांनी ठोकले होते. मंडपाच्या अग्रभागीं आपल्या सुंदर वर्णाने सभासदांचे नेत्र तृप्त करण्याकरिता व आपल्या प्राशनाने त्यांची तृषा शांत करण्याकरिता त्या मृत माणसांच्या रक्ताची एक पुष्करणी बांधली होती. त्या पुष्करणींतील कांही लाल पाणी मंडपाकडे येणाऱ्या वाटेवरील धुळ वाऱ्याने उडूं नये म्हणून रस्त्यावर शिंपडण्यांत आलें होतें. सभामंडपाच्या अंतर्भागीं शोभेकरिता कित्येक सुंदर स्त्रियांचीं नग्न शरीरें ठिकठिकाणीं उभीं केलीं होतीं. अशा रीतीने त्या दरबाराकरिता आवश्यक अशा सर्व गोष्टींचा संग्रह केला होता.

इतक्यांत सभेची वेळ झाली व त्याबरोबर सर्व मंडळी भराभर येऊन स्वस्थानापन्न होऊं लागली. अग्रभागीं एका सिंहासनावर नरकांतील सार्वभौम राजा अधिष्ठित झाला होता. त्याच्या सर्व शरीराला मांसाच्या मसाल्याचा व रक्ताच्या अत्तराचा घमघमाट येत होता. मनुष्याच्या कातडचांचा केलेला एक छानदार झगा त्याने अंगांत घातला होता व त्याच्या गळचांत तोडलेल्या मनुष्यांच्या व कापलेल्या गायांच्या मुंडक्यांचा हार लोळत होता. असा तो पातालवासी सम्राट् स्वस्थानारूढ झाल्यावर तेथील चोपदारांनी मोठ्याने ललकारून तो दरबार भरविण्याचें कारण जाहीर केलें. सांप्रतचा सम्राट् वार्धक्याने क्षीण झाला असल्यामुळे व त्याला कोणी औरस वारस नसल्यामुळे आपल्या पाठीमागे आपल्या राज्यावर योग्य माणसाची नेमणूक व्हावी अशी त्याची आज्ञा आहे. तसा योग्य मनुष्य निवडून काढण्याकरिता आजचा हा दरबार भरविला आहे असें त्याने जाहीर केलें. या जाहीरनाम्यानंतर स्वतः नरकाधिपति टाळचांच्या गजरांत बोलावयास उठले. ते म्हणाले की, आजचा दरबार भरविण्याचें कारण सर्वांना विदित झालें आहे; परंतु एवढें सांगावयाचें राहिलें की, या सिंहासनाकरिता अंगीं लागणारे मुख्य व आवश्यक गुण म्हटले म्हणजे क्रौर्य व हृदयशून्यता हे होत. हे गुण ज्याच्या अंगीं उत्कर्षाने वास करीत असतील तोच ह्या सिंहासनाला शोभेल व त्यालाच मी तें आनंदाने देईन. तेव्हा आता ज्याने त्याने आपल्या गुणांचा पाढा वाचावा म्हणजे तुमच्यांतील योग्य मनुष्य निवडून काढून त्याला राज्याभिषेक करण्यांत येईल. त्याप्रमाणे त्या चक्रवर्तीचें भाषण संपल्या-

वर तेथे जमलेल्या सर्व सभासदांना स्फुरण चढलें व जो तो अहंमन्यतेने मी दुसऱ्याला हटवीन असा अभिमान बाळगूं लागला. जमलेले सभासद चित्रविचित्र व भयदायक वेश धारण करून आलेले होते. कोणाच्या चेहऱ्यावर मोठमोठाल्या मिशा व कल्ले होते. कोणाची दाढी छातीवर रुळत होती. कोणी डोक्याची स्मश्रू करून आले होते. कांहींनी डोक्यावर बोटभर व अर्धबोट लांबीच्या जटा ठेवल्या होत्या. महाराजांचें भाषण ऐकून सर्वांना आनंद झाला. प्रत्येकजण आपला बडेजाव सांगूं लागला. प्रथम डोक्याची सबंध हजामत केलेला व लांब दाढीचा एक पुरुष उभा राहून म्हणाला, "सरकार, आजपर्यंत मीं जीं जीं क्रौर्याचीं कृत्यें केलीं आहेत त्यांची बरोबरी कोणाच्यानं करवणार नाही. महाराज, मी आजपर्यंत अनंत गाई व माणसें कापलीं आहेत. कित्येकांच्या घरांना आगी लावल्या आहेत व पुष्कळांना निरर्थक सुळावर चढविलें आहे. खावंद, मीं शेकडो निरपराधी वायकांना भ्रष्ट केलें आहे व लक्षावधि पुरुषांचीं जानवीं तोडून टाकलीं आहेत. मीं अनेकांचीं घरें व गावें लुटून फस्त केलीं आहेत. कित्येक पुरुष आपल्या समोर उभे करून त्यांच्या अंगाचें कातडें सोलवून काढून मीं आपली करमणूक करून घेतली आहे. मीं अनेकांचीं मयूरासनें लुटून नेलीं आहेत व कित्येक दिवसपर्यंत आपल्या अनुयायांकडून त्यांच्या तलवारीस सतत रुधिरस्नान घालविलें आहे. मीं अनेक अर्भकांना चेंडूसारखें धोंड्यावर आपटून त्यांचीं टाळकीं फोडलीं आहेत. कित्येकांच्या शेंड्या उपटून त्यांचीं मस्तकें मीं आपल्याप्रमाणे गुळगुळीत करून ठेवलीं आहेत. तेव्हा सरकारने कृपाळू होऊन आपल्यामागे गादीचा अधिकार मला द्यावा हें उचित आहे."

नंतर दुसरा एक भव्य, उंच व लठ्ठ असा पुरुष उभा राहून म्हणाला, "सरकार, वरील सभासदाने केलेलें क्रौर्य कांहीच नाही असें क्रौर्य मीं केलें आहे. सरकारने श्रवण करावें. वरील सभासदाने आपल्या राज्यांतील लोकांना कधीच त्रास दिला नाही. पण मीं तर त्यांनाहि त्रास दिला आहे. मीं त्यांच्यावर अनेक प्रकारचे जुलूम केले आहेत. मीं त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध समरांगणावर पाठविलें आहे व तेथें त्यांना मारविलें आहे आणि उपाशी पाठविलें आहे. त्यांच्या घरीं त्यांच्या आप्त-मित्रांचीं हृदयें त्यांजबद्दलच्या शोकाने फोडलीं आहेत. लोकांच्याकडून अनेक तऱ्हांनी द्रव्यहरण केलें आहे. अशा प्रकारच्या जुलमाला कंटाळून ते मजकडे दाद मागावयास आले, तर एकदम त्यांच्यावर बंदुकीच्या गोळ्या झाडून व त्यांच्यावर तलवारीचे वार करून त्यांस या नरकाच्या साम्राज्यांत पाठविलें आहे. शिवाय जुलूम जितका जास्त केलेला असेल तितका तो मनुष्य अधिक योग्य ठरतो. तेव्हा अशा प्रकारचा जुलूम जास्त होण्याकरिता त्याला एक विशिष्ट प्रकारचें सुधारलेलें स्वरुप यावें लागतें. म्हणजे ज्यांच्यावर जुलूम करावयाचा त्यांना तो न कळल्यामुळे जास्त काल-पर्यंत करतां येतो. या पद्धतीला अनुसरूनच मीं आपला संप्रदाय ठेवला आहे. म्हणून मीच वरील सभासदापेक्षा श्रेष्ठतर ठरतों व म्हणून ती गादी मलाच योग्य आहे."

या त्याच्या भाषणाने नरकांतील सम्राट् थोडा जास्त खूष झालेला दिसला व विशेषत: सुधारलेल्या जुलमांची कल्पना ऐकून तर त्याने मानच डोलवली. तेव्हा इतर सभासदांना याला ही गादी मिळते की काय अशी धास्ती पडली. पण पुढे ती निराधारच ठरली. असो; याप्रमाणे वरील सभासदांच्या भाषणाने बऱ्याच सभासदांनी आपल्या मर्दुमकीचे पोवाडे गायले. शेवटीं एकच सभासद उरला होता. पण त्याच्या पोशाखावरून हा क्रौर्य कृत्यांत अग्रणी ठरेल असे कोणालाच वाटलें नाही. कारण त्याचा वर्ण अगदी मोहक म्हणजे रक्तगौर असा होता. त्याचा पोशाखहि अगदी साधा होता. पायांत विजार, बूट, अंगांत कोट व डोक्याला एका घमेल्याच्या आकाराचें पागोटें घातलें होतें. त्याच्या हातांत एक टोक वांकवलेली छडी होती व तोंडांत एक लाकडी नळी असून त्यांतून धूर निघत होता. अशा प्रकारचा तो सभासद उभा राहिला व बोलूं लागला – "सरकार, आतापर्यंत अनेकांनी आपल्या गुणांचें स्तोत्र गायलें, पण तें सर्व माझ्या गुणकीर्तनापुढे फिकेच पडणार आहे. महाराज, कांही वेळापूर्वी एका सभासदाने सुधारलेला जुलूम कसा असतो याची थोडीशी कल्पना आपल्याला दिली व त्या वेळीं आपण मानहि डोलविली. त्यावरून तर माझी पूर्ण खात्री झाली आहे की, आपलें राज्य मलाच प्राप्त होणार. कारण त्याच पद्धतीने मीं पूर्णांशाने आपल्या जुलमाची वहिवाट ठेवली आहे. त्याकरिता महाराजांनी माझ्या क्रौर्याचें श्रवण करावें.

प्रथमत: ज्या देशांत माझा कांही हक्क नाही व संबंध नाही अशा देशांत मी व्यापाराच्या मिषाने शिरलों व हलके हलके तेथील लोकांत दुही पाडून त्यांचें राज्य हरण करण्याचा आरंभ केला. पुढे "वळी तो कान पिळी" या न्यायाने मी राजा बनूं लागलों. मीं अनेक खोटे कागद केले. मीं तेथील राण्यांचे दात उपटले. त्यांना उपाशी ठेवून त्यांच्यापासून द्रव्यापहार केला. तेथील सावकारास कागदाच्या घोटाळ्याने नागवून त्यांस नरकास पाठविलें. नंतर मी राजा बनलों व अनेकांचीं राज्यें बुडवलीं. सर्वांच्या स्वातंत्र्याचा अपहार केला. त्यांचें द्रव्य तेथून दूर असलेल्या आपल्या देशांत नेलें. म्हणजे ते परत येण्याची भीति नाही. पुढे त्यांच्यावर निरनिराळे कर लादले. प्राप्तीवर कर ठेवला. त्यांच्या जीवनरसावर म्हणजे मिठावर कर बसवला. त्यांना पैशाची लाच देऊन देशद्रोही बनविलें. नंतर त्यांचीं शस्त्रें काढून घेतलीं. हिंस्त्र पशूंनी त्यांना फाडून खाल्लें तरी त्यांना स्वसंरक्षण करतां येऊ नये अशी व्यवस्था केली. त्यांच्यांतील अनेकांना फाशी दिलें व त्यांच्या बायकापोरांचे हाल केले. त्यांनी पवित्र मानलेल्या गाईचा फडशा उडविला. या दरबारासारखे अनेक निष्कारण दरबार भरवून त्यांत मीं आपला बडेजाव मिरवून घेतला. त्यांच्या अन्नांत माती कालवली. त्यांच्या शिक्षणाची दिशा बदलून अंगांतील स्वदेशाभिमानादि गुण घालवून टाकले व त्यांना ओझ्याचीं गाढवें बनवलीं. त्यांना आम्ही तुमच्या मदतीस येऊं असें सांगून त्यांच्या हातीं भिक्षेची नरोटी व भिकेची

झोळी दिली. त्यांना सारखे बुटाखाली तुडविलें व त्यांच्या पोटाला चिमटे घेऊन त्यांची भूक नाहीशी केली. त्यांच्या जीविताची, त्यांच्या द्रव्याची, त्यांच्या घरादारांची, त्यांच्या धर्माची, त्यांच्या अब्रूची, त्यांच्या मानाची, त्यांच्या सर्वस्वाची व स्वातंत्र्याची होळी केली. यापेक्षा आणखी सुधारलेला जुलूम तो कोणता ? सबब, राज्यपद मलाच योग्य आहे." हें ऐकून नरक-सम्राटाला फार आनंद झाला. त्याने उठून त्या सभासदाला दृढ आलिंगन दिलें. त्याच्या नांवाने त्रिवार जयजयकार केला व म्हणाला, "माझ्या पाठीमागे तूंच हें येथील राज्य हाकण्यास योग्य आहेस. आजपर्यंत तूं पुष्कळ क्रूर कृत्यें केलींस व त्यामुळेच तुला हें येथील राज्य हक्काने प्राप्त झालें आहे. तेव्हा लौकरच तुला अभिषेक करूं." याप्रमाणे त्या नरकाधिपतींचें भाषण झाल्यावर वेळ बराच झाल्या कारणामुळे तो दरबार समाप्त झाला.

– भाला, दि. ११ ऑक्टोबर १९०५

---

# ११. स्वदेशी विश्वविद्यालयाची आवश्यकता

**दास म्हणे ज्ञानाविण प्राणी जन्मला पाषाण ॥** – श्रीसमर्थ

**ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः ॥** – भर्तृहरि

ज्ञानशून्य मनुष्याला द्विचरण व पुच्छ-विषाणहीन पशु म्हणावयास कांही हरकत नाही. अशा ज्ञानविहीन पशूंस व चतुष्पाद पशूंत वास्तविक रीतीने पाहतां मुळीच अंतर नाही. एवढेंच नव्हे तर, एकार्थी मुका पशु बोलक्या पशूपेक्षा सहस्रपटींनी बरा होय. मुक्या पशूला फक्त आहार, निद्रा, भय व मैथून ह्याच काय त्या चार मनोवृत्ति असतात; पण या बोलक्या पशूंना या चार मनोवृत्तींशिवाय दुसऱ्या अनेक नीच वृत्तींनी पछाडलेलें असतें. लोभ, मत्सर, स्वार्थ, धर्मद्रोह व देशद्रोह हीं पंचमहापातकें अशा वाणीयुक्त पशूंकडून हरहमेशा घडतात. त्यामुळे त्यांच्या धर्मबांधवांचें व देशबांधवांचें अतर्क्य नुकसान घडून येतें. भर्तृहरीने अशा ज्ञानशून्य मनुष्यांना पशूंची उपमा देऊन त्यांच्या अंगीं असलेली चेतनाशक्ति कबूल केली आहे. पण श्रीसमर्थ त्याच्याहि पलीकडे गेले आहेत. ते म्हणतात की, असा 'ज्ञानाविण' जन्मलेला अधम नदींतील गोटा किंवा डोंगरावरील फत्तर होय. त्या गोट्याला किंवा फत्तराला वाटेल त्याने तुडवावें किंवा फोडावें. पण बिचाऱ्याला ज्याप्रमाणे त्याची मुळीच क्षिति वाटत नसते, त्याप्रमाणे या मनुष्य-जातींतील पाषाणांना वाटेल त्याने तुडवावें, बुडवावें व लुबाडावें, त्यांना त्याची मुळीच लाज नसते. जरी ज्ञानशून्य मनुष्य केवळ पाषाण होय, तरी या पाषाणावर ज्ञानाची टाकी चालवून त्याची

उत्तम मूर्ति बनविणारे मूर्तिकार भेटल्यास या पाषाणांना परमेश्वराची योग्यता आल्यावांचून राहत नाही. ज्या देशांत असे शेकडो मूर्तिकार असतात व ज्या देशांत अशा मूर्तिकारांच्या टाक्या तीक्ष्ण असतात त्या देशांत जन्मापासून पाषाणरूप बनलेले हतभागी कालेंकरून नारायणरूपी बनवून आपलें व आपल्या देशबांधवांचें कल्याण करून इहलोकीं व परलोकीं कीर्तिरूपाने निरंतर वास करतात.

कोणत्याहि खालावलेल्या देशाची उन्नति करावयाची असल्यास त्या देशांतील लोकांस ज्ञानामृताचें प्राशन यथेच्छ व आकंठ करावयास मिळालें पाहिजे. हें ज्ञानामृत नुसतेंच पोटभर उपयोगाचें नाही, तर हें अमृत जितकें निर्भेळ व धारोष्ण मिळेल तितकें तें प्रकृतीला जास्त मानवून तें प्राशन करणाऱ्या व पचविणाऱ्या पहिलवानांचें मन जास्त सुदृढ व सशक्त बनतें. एक वेळ शरीराला उपयोगी असें दुग्धामृत न मिळाल्यास चालेल, पण मनाच्या पुष्टीस अत्यावश्यक असें जें ज्ञानामृत तें न मिळाल्यास सर्व बाजार आटोपलाच म्हणून समजावें. ज्या देशांत या ज्ञानामृताचें अवर्षण पडलें आहे, त्या देशांतील लोकांसारखे हतभागी लोक साऱ्या दुनियेंत दुसरे कोणतेहि नाहीत. ज्या देशांत या ज्ञानामृताच्या विहिरी कोरडचा ठणठणीत पडल्या आहेत, त्या देशांत धान्याचीं कोठारें काठोकाठ भरलेलीं असलीं, तरी त्यांचा कांही एक उपयोग नाही. ज्या देशांत हे ज्ञानवृक्ष जळून खाक झाले आहेत, त्या देशांत इतर मळे व बगीचे असून नसून सारखेच. सारांश, ज्ञानाविण असलेली व्यक्ति जर पाषाण होय, तर ज्ञानाविण असलेल्या मनुष्यांनी गजबजलेला देश पाषाणमय अरण्य होय. अशा अरण्यवत् देशाचा खडकाळपणा व ओसाडपणा नाहीसा करून, त्यांत जागजागीं ज्ञानवृक्षाचें बीं पेरणें हें त्यांत निपजलेल्या प्रत्येक देशभक्ताचें आदि कर्तव्यकर्म आहे. आमच्या या हिंदुस्थानांत शेकडा ८८ लोक केवळ मूर्तिमंत पाषाण किंवा बोलकीं जनावरें आहेत, हें कोणास सांगावयास नको. ज्या १२ जणांना हें ज्ञानामृत थोडें-बहुत प्यावयास मिळत आहे ते गुणांत पाहिलें असतां अगदी कनिष्ठ प्रतीचें व भेसळीचें असतें, म्हणून हें ज्ञानामृत जेणेंकरून लहान पिढीला निर्भेळ व मनमुराद प्यावयास मिळेल अशा तजविजी जर लौकरच योजण्यांत आल्या नाहीत, तर लौकरच आम्ही पाषाण-स्थितीप्रत पोहोचूं व मनुष्यत्वाला कायमचें आंचवूं.

मनुष्याला मनुष्यत्वाची जोड करून देणारें जें ज्ञान तें आज आपणांस कोणत्या प्रतीचें मिळत आहे, ज्या संस्थांतून हें ज्ञान मिळणार आहे त्या हल्ली कशा आहेत, त्यांत कोणत्या सुधारणा करणें इष्ट आहे आणि हें शुद्ध व निर्भय ज्ञान देण्याच्या कामीं सदरहू संस्थांनी कोणत्या मार्गांचा अवलंब केला पाहिजे. इत्यादि प्रश्न हल्लीच्या काळीं इतके महत्त्वाचे आहेत की, जर त्याचा पोक्तपणें व पूर्णपणें विचार करण्यांत न आला तर आपण सर्वस्वीं बुडालों म्हणून खात्रीने समजावेंच. एक वेळ अन्न नसल्यास चालेल, पण शिक्षण हें मनुष्यास नसल्यास त्याचें घडीभरहि चालावयाचें नाही व त्याच्या अभावीं त्याला कवडीचीहि किंमत नाही. देशांत दुष्काळ पडून लाखो

अशिक्षित लोक मेलेले पत्करले; पण सुकाळ होऊन लाखो अशिक्षित लोक नुसते जगणें हें कधीहि श्रेयस्कर नाही. लाख अशिक्षित लोकांपेक्षा सात सुशिक्षित लोक जास्त देशहित करतील असा आमचा समज आहे; म्हणून प्रत्येक देशहितचिंतकाने आपले देशबांधव सुशिक्षित करण्याकडे आपल्या मेहनतीचा, पैशाचा व शरीराचा उपयोग करणें जरूर आहे. आपल्या देशबांधवांना सुग्रास अन्न देण्याच्या ऐवजीं सुशिक्षण देण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा. धनिक लोकांनी अन्नसत्रें घालण्याच्या ऐवजीं ज्ञानसत्रें उघडण्याकडे आपल्या द्रव्याचा उपयोग करावा. कारण ज्ञानाने अन्न मिळेल, पण नुसत्या अन्नाने ज्ञान मिळणार नाही. ज्ञानी मनुष्य सातासमुद्रापलीकडून वाटेल ती वस्तु मिळवूं शकेल, पण नुसता अन्नावर यथेच्छ ताव मारून गलेलठ्ठ बनलेला रेडा आपल्याजवळील प्रत्येक वस्तु गमावून उलट दुसऱ्याच्या लाथा खाऊं लागेल. म्हणून सर्व गोष्टींच्या पूर्वी प्रत्येक व्यक्तीने ज्ञानार्जन केलें पाहिजे. हें ज्ञानार्जन उत्तम प्रकारें झाल्यावर असा ज्ञानाढ्य मनुष्य सर्व जगाला भारी होईल व वाटेल तें इष्ट कार्य हटकून सिद्धीस नेईल.

हें अत्यावश्यक व अत्युपयोगी ज्ञान मिळण्याचीं ठिकाणें म्हणजे शाळा व पाठशाळा होत. या संस्थांतून जें शिक्षण दिलें जातें तें अशा प्रकारचें असावें की, ज्याच्या योगाने त्यांतील विद्यार्थी देवभक्त व देशभक्त निपजतील. या शाळांतून व पाठशाळांतून जर सकाळपासून संध्याकाळपर्यंत सरकारसेवेंत राहण्यास मजबूत व कणखर असे द्विपाद बैल निघत असतील, तर मग अशा शाळा व पाठशाळा जितक्या लवकर बंद होतील तितके अत्युक्त होय. ज्ञान तेंच की, जें सामर्थ्यवत् असतें व ज्ञानी तोच की, जो बलवान असतो. इंग्रजींत अशी एक म्हण आहे की, ‘ Knowledge is power ’ (ज्ञान ही एक शक्ति आहे). म्हणून ज्या शिक्षणापासून शारीरिक किंवा मानसिक शक्ति उत्पन्न होत नाही त्या शिक्षणापासून ज्ञानाची प्राप्ति होते असें म्हणतां यावयाचें नाही. शुद्ध ज्ञानाचें लक्षण हेंच की, त्याची जोड ज्या महात्म्याला होते त्याच्या अंगीं विलक्षण शक्ति प्रादुर्भूत होते. असें शक्तिमान ज्ञान जर आमच्या शाळांतून किंवा पाठशाळांतून देण्यांत येणाऱ्या शिक्षणापासून मिळूं शकत नसेल, तर त्या शिक्षणपद्धतींत कोठें तरी दोष असला पाहिजे. हे दोष नीट निरखून काढून त्यांचें निराकरण होण्याचे उपाय योजण्यांत आले पाहिजेत. हल्ली आमच्या शाळांतून व पाठशाळांतून देण्यांत येणारें शिक्षण कुचकामी व निरुपयोगी आहे, असा सर्वांचा अनुभव आहे. हल्ली देण्यांत येणाऱ्या शिक्षणाच्या योगाने देशभक्तीचे अंकुर फुटत नाहीत ही गोष्ट निर्विवाद आहे व चुकूनमाकून एखाद्या विद्यार्थ्याच्या मनांत या देशभक्तीच्या अंकुरांचा प्रादुर्भाव झाला, तर सरकारी देणगीने ओशाळलेले शिक्षक हे अंकुर स्वहस्तें तोडण्यास कमी करीत नाहीत. ह्या देशभक्तीच्या अंकुराची मेहनतमशागत करून त्यांना वरचेवर पाणी घालणारे शिक्षक पाहिजे आहेत; पण असे शिक्षक मिळण्याची सध्या फार पंचाईत पडली आहे. महिन्याच्या महिन्यास फीचा

तनखा वसूल करून थोडेसें शब्दज्ञान करून देणाऱ्या भाडोत्री शिक्षकांचा हल्ली सुकाळ आहे, पण 'दरमाहिक' गुरुदक्षिणेचा मोबदला शिष्य-वर्गांच्या मनावर देशभक्तीचें अमोलिक तत्त्व विववून देणारा सद्गुरु हल्ली परिसाप्रमाणे दुर्मिळ झाला आहे. कोवळ्या वयाच्या अर्भकांना शिक्षण देणाऱ्या शाळांचे हल्ली तीन वर्ग आहेत. पहिल्या वर्गांत सर्व सरकारी शाळा येतात व अशा शाळांतून शिक्षक म्हणजे सरकारास आपलें सर्वस्व विकत देऊन त्यांचे आपखुषीने झालेले बंदे गुलाम होत. अशा गुलामां-पासून देशभक्तीच्या ऐवजीं गुलामगिरीचीं तत्त्वें प्राप्त व्हावींत यांत कांही नवल नाही. दुसऱ्या वर्गांत खाजगी पण सरकारी मदत मिळणाऱ्या शाळा येतात; पण ज्या अर्थी अशा शाळांना सरकारांतून देणगी मिळत असते त्या अर्थी अशा शाळांतील सरकारी पैशाने भारलेले शिक्षक जवळ जवळ सरकारी शाळांतील शिक्षकांच्या मासल्याचे असतात. अशा खाजगी शाळांतील शिक्षकांचे हातपाय 'ग्रँटस्-इन्-एड कोडा'ने जखडलेले असून त्यांच्या तोंडांत सरकारी ग्रँटस्चे बोळे दिलेले असतात. म्हणून या शाळांतून जें शिक्षण दिलें जातें तेंहि सरकारी शाळांतून मिळणाऱ्या शिक्षणाप्रमाणे निर्जीव व नेभळें असतें. तिसऱ्या वर्गांत सरकारी मदत नसून स्वतःच्या पायाच्या जोरावर चालणाऱ्या खाजगी शाळा येतात. अशा शाळांतून जें शिक्षण दिलें जातें तें सामान्यतः सजीव व सतेज असून, या शाळांतून देवभक्तीचें व देशभक्तीचें बीं विद्यार्थ्यांच्या कोवळ्या अंतःकरणांवर पेरण्याचा प्रयत्न केला जातो. या शाळांना कोणत्याहि तऱ्हेचें अनिष्ट बंधन नसल्याकारणाने शिक्षणाचा प्रधान हेतु सिद्धीस नेण्याच्या कामीं त्यांचा पुष्कळ उपयोग होतो. पण आताच पसार झालेल्या 'युनिव्हर्सिटी अॅक्टा'ने अशा खरोखर खाजगी व स्वतंत्र शाळांना विश्वविद्यालयांत मज्जाव करण्याचा घाट घातला आहे. उदार शिक्षण देऊन हिंदुस्थानवासियांचीं अंतःकरणें उदार व उमदी करण्याचा जरी सरकारचा दिखाऊ हेतु आहे तरी निरनिराळ्या सरकारी खात्यांतून दुय्यम प्रतीचीं हलकीं कामें करण्यास लायक अशीं माणसें निर्माण करण्याचाच फक्त सरकारचा अंतःस्थ हेतु आहे, हें 'युनिव्हर्सिटी अॅक्टा'वरून कोणासहि कळून चुकेल.

तिसऱ्या वर्गांत येणाऱ्या शाळांतून चांगलें शिक्षण नसून तेथे उत्तम प्रतीचें शिक्षण मिळत नाही, अशी पोकळ सबब पुढे करून ह्या स्वतंत्र शाळा—ही स्वतंत्रता-देवीचीं माहेरघरें—जमीनदोस्त करण्याचा पक्का निश्चय झालेला दिसतो. अशा शाळांतून उत्तम प्रतीचें शिक्षण मिळतें हें विश्वविद्यालयाच्या परीक्षांच्या निकाला-वरून सहज कळण्यासारखें आहे. जर या खाजगी शाळांतून परीक्षेस बसलेले विद्यार्थी इतर शाळांपेक्षा जास्त प्रमाणाने पास होत नसतील, तर मग हें विधान सत्यमय आहे असें म्हणण्यास कांही तरी जागा आहे. पण तसा कांही अनुभव नसतां केवळ स्वकपोलकल्पित कारण पुढे ढकलून या स्वतंत्रतादेवीच्या मनोहर मंदिरावर चोरून गोळे सोडणें कधीहि मर्दपणाचें लक्षण होणार नाही. तिसऱ्या वर्गांत येणाऱ्या

शाळांची हल्ली तर अत्यंत जरुरी आहे. स्वदेशी चळवळींत सरकारी शाळांच्या किंवा 'निम-सरकारी' शाळांच्या विद्यार्थ्यांनी पडूं नये व जर कदाचित् शाळांतील विद्यार्थी या स्वदेशी चळवळींत पडले, तर त्यांना शिक्षा देण्यांत येईल, असा सरकारी वटहुकूम बंगाल्यांत सुटला आहे. स्वदेशी चळवळ औद्योगिक आहे व त्याप्रमाणेच ती राजकीयहि आहे. ही स्वदेशी चळवळ स्वदेशाच्या हितासाठी अवतीर्ण झाली आहे. म्हणून अस्सल बीजाच्या सर्व स्वदेशियांनी मग ते विद्यार्थी असोत किंवा गृहस्थ असोत—या चळवळींत सामील होणें अति जरूर आहे. किंबहुना एक वेळ जरठ झालेले, होण्याच्या पंथाला लागलेले गृहस्थ या चळवळींत न पडले तरी चालतील. कारण त्यांचा वास या जगांत फारच अल्प काळ व्हावयाचा असतो. पण ज्यांना बहुतेक सर्व आयुष्य या जगांत घालावयाचें असतें व ज्यांना या जगांतील सर्व राजकीय सुखें व दुःखें भोगावयाचीं असतात अशा विद्यार्थ्यांनी स्वदेशी चळवळींत पडूं नये. म्हणजे आपल्या हिडीस व ओंगळ स्वार्थ-बुद्धीचें प्रदर्शन करणें होय. विद्यार्थिदशेंतच विद्यार्थ्यांचा राजकीय गोष्टींत प्रवेश करून देणें जरूर आहे.

एवढेंच नव्हे तर, आठवें वर्ष लागलें म्हणजे ज्याप्रमाणे प्रत्येक अर्भकाचें धार्मिक मौंजीबंधन होतें त्याप्रमाणेच त्याचें राजकीय मौंजीबंधन झालें पाहिजे. देव व देश या दोहोबद्दल श्रद्धा उत्पन्न करणाऱ्या दोन गायत्रीमंत्रांचा संस्कार त्यांच्या मेंदूंना झाला पाहिजे. सारांश, घरीं, दारीं, शाळेंत व इतर ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या मनांत देवभक्ति व देशभक्ति उत्पन्न करण्याचा प्रयत्न आई-बापांकडून व शिक्षकवर्गाकडून होणें जरूर आहे. आज जो हुकूम बंगाल सरकारने बंगाल्यांत काढला आहे, तशाच प्रकारचे हुकूम इतर प्रांतिक सरकारांकडून सुटण्याचा पुष्कळसा संभव आहे. असे हुकूम सुटल्यावर निम-सरकारी शाळा केवळ सरकारी नोकर घडविण्याच्या गिरण्या होऊन बसतील; परंतु अशा निम-सरकारी शाळांपैकी ज्यांना हा सरकारी हुकूम अमलांत आणण्याची इच्छा नसेल अशा शाळांना देण्यांत येणाऱ्या देणग्या व विश्वविद्यालयांतील परीक्षांना बसण्याच्या परवानग्या त्यांच्याजवळून काढून घेण्यांत येतील. अशा स्थितींत फक्त दोनच मार्ग खुले आहेत. पहिला हा की, एकदम शाळा बंद करून देशद्रोहाच्या पातकापासून अलिप्त राहणें होय. किंवा दुसरा मार्ग म्हणजे एक लोकांचें 'स्वदेशी विश्वविद्यालय' स्थापन करणें होय. अशा स्वदेशी विश्वविद्यालयाची जरुरी हल्ली फार असून त्याची स्थापना करण्याचा अमृतसिद्धियोग हल्ली सर्वोत्कृष्ट आहे. ज्या शाळांना देशाशीं निमकहरामपणा करून सरकारी देणगीरूपी पिंडावर पुष्ट होऊन कावळ्याप्रमाणे बहुतकाल जगण्याची इच्छा नसेल अशा शाळा या स्वदेशी विश्व-विद्यालयाला जोडल्या जातील व स्वदेशी अंतःकरणाचे स्वदेशी विद्यार्थी या विद्या-लयाच्या परीक्षांना बसून स्वदेशाशीं इमानीपणा राखतील. या विश्वविद्यालयाला पैशाची कधीहि पंचाईत पडणार नाही. या विश्वविद्यालयाच्या परीक्षांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकऱ्या किंवा वकिलीचा धंदा करण्यास परवानगी

मळणार नाही हें खास; परंतु वैद्यकीचा धंदा व इतर व्यापारी धंदे उत्तम तऱ्हेने चालविण्यास लागणारें शिक्षण या विश्वविद्यालयाला जोडण्यांत आलेल्या शाळांतून व पाठशाळांतून उत्तम रीतीने देण्यांत येईल. सध्या असें विश्वविद्यालय सर्व हिंदुस्थानांत एकच असावें व त्याचा अनुभव पाहून मग त्यांची संख्या वाढविण्यांत यावी. सारांश, स्वदेशी चळवळीपासून विद्यार्थ्यांना परावृत्त करण्याऐवजीं एक स्वदेशी विश्वविद्यालय स्थापन करून त्यांच्या अंतःकरणांतून वाहणाऱ्या देशभक्तीच्या प्रवाहाला वाट काढून देण्याची तजवीज करणें हें आपल्या पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे.

– भाला, दि. १ नोव्हेंबर १९०५

---

## १२. आम्ही राजनिष्ठ, पण तुम्ही मात्र आत्मनिष्ठ

टाइम्सकारांना व त्यांच्या जातभाईंना युरोपांतील व इतर खंडांतील लोक कधी कधी प्रश्न करतात की, हिंदुस्थानांतील लोक खरोखर राजनिष्ठ आहेत का? जगांतील लोकांकडून विचारण्यांत येणाऱ्या या अति महत्त्वाच्या प्रश्नाला युवराज व युवराज्ञी यांच्या आगमनाची संधि पाहून टाइम्सकारांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. टाइम्सकारांचें हें उत्तर आमच्या वाचकांना कळविण्यापूर्वी हा प्रश्न परकीयांकडून आमच्या राज्यकर्त्यांना विचारण्यांत कां येतो हें अगोदर कळणें अति जरूर आहे. हिंदुस्थान देश हा हिंदी लोकांचा असून तो इंग्रज लोकांचा निःसंशय नाही, हें जगांतील सर्व लोक व इंग्रज लोकहि कबूल करतील. आजकाल जगाची अशी प्रवृत्ति होत चालली आहे की, ज्या त्या लोकांनी आपल्या स्वतःवर राज्य करावें व परकीय लोकांशीं संपर्क फक्त व्यापार वगैरे गोष्टींसंबंधाने मात्र ठेवावा. ही जी जगाची प्रवृत्ति होत चालली आहे तिचा विपर्यास सर्व जगांत विसाव्या शतकांत फक्त हिंदुस्थानांत मात्र दिसत आहे. आफ्रिकेंतील निग्रो लोकांच्या लहान लहान जाति वगळल्या असतां हल्ली जगांत तीस कोटि माणसांचें अति जुनें राष्ट्र परकीयांच्या ताब्यांत असलेलें दुसरें उदाहरण कोठेंहि सापडावयाचें नाही. नाही म्हणावयास कांही वर्षांपूर्वी चीन देशाची अशी शोचनीय स्थिति होते की काय, अशी भीति सर्वांना पडली होती. पण धन्य ते जपानी लोक की, ज्यांच्या उदाहरणाने चिनी लोकांचे डोळे उघडले व ते एकदाचे या काळजींतून मुक्त झाले. कोणत्याहि देशाची स्वतंत्रता कायम ठेवण्यास तेथील लोकांस सर्व कलांच्या अगोदर युद्धकला अवगत असली पाहिजे हें तत्त्व चिनी लोक रूसो-जपानी युद्धापासून शिकले व त्या तत्त्वाबरोबर त्यांनी कृति करण्यास आरंभ केला. हल्ली चीनमध्ये दहा लक्ष सैन्य नवीन पद्धतीप्रमाणे शिकून जय्यत तयार आहे. दहा वर्षांत त्यांची संख्या छत्तीस

लाखांपर्यंत जाईल असें चिनी सरकारने प्रसिद्ध केलें आहे. म्हणून आता परकीय अमलाखाली करपून जाण्याची पाळी चिनी लोकांना येणार नाही व ईशकृपेने ती त्यांना कधीहि न येवो. आफ्रिकेंतील हाटेन्टाट लोकांनी आपल्यावर गैरहक्काने राज्य करणाऱ्या जर्मन लोकांच्या विरुद्ध शस्त्र उचललें आहे. त्यांच्या मॅरेंगो नांवाच्या पुढाऱ्यास या पवित्र कामांत बरेंच यश येत चाललें आहे. पोलंड देशांतील लोकहि झार-साहेबांचें जड जूं फेकून देऊन स्वराज्याची स्थापना करण्यास उद्युक्त झाले आहेत. आगेमागे त्यांच्या प्रयत्नाला यश येईल असा रंग दिसत आहे.

सारांश, जगांतील प्रत्येक जित राष्ट्र पारतंत्र्याच्या बंधनापासून मुक्त होण्याकरिता धडपड करीत आहे. जगांत सर्वत्र दिसणारा हा देखावा पाहून हिंदुस्थानांतील लोकांच्या हृदयांत अशीच मनोवृत्ति खळबळत असेल, असें जर स्वतंत्रतादेवीच्या पवित्र मंदिरांत यथेच्छ विहार करणाऱ्या परकीयांनी अनुमान केलें, तर त्यांत त्यांची मोठीशी चूक आहे असें नाही. म्हणूनच हिंदुस्थानांतील लोक हे खरोखर राजनिष्ठ आहेत का, असा प्रश्न साहजिकपणे त्यांच्या तोंडांतून बाहेर पडत असेल. "हिंदुस्थानांतील लोक खरोखर राजनिष्ठ आहेत का?" हा प्रश्न विचारण्यांत ह्या परकीय लोकांकडून बरीच लबाडी होत आहे यांत शंका नाही. वरील अवतरणांतर्गत वाक्यांत घातलेला 'खरोखर' हा शब्द अति खोचदार आहे. हिंदुस्थानांतील लोक वरकरणीं राजनिष्ठ असतील, पण ते अंतःकरणापासून राजनिष्ठ नसतील, असा या प्रश्नाचा झोक दिसतो. सूक्ष्म रीतीने विचार केला असतां राजनिष्ठेचे दोन प्रकार आहेत. एक अस्सल राजनिष्ठा व दुसरी नकली राजनिष्ठा. अस्सल राजनिष्ठेचें वसतिस्थान अंतःकरण असून, तिची इमारत अकृत्रिम प्रेमाच्या भक्कम पायावर उभारलेली असते. ह्या राजनिष्ठेचा ओलावा कधीहि सुकत नाही. ही राजनिष्ठारूपी नदी कधीहि आटत नाही. नकली राज-निष्ठेचें वास्तव्य जिव्हाग्रावर असतें. या नकली राजनिष्ठेचा डोलारा स्वार्थ व भीति या दोन वाळूच्या ढिगाऱ्यांवर उभारलेला असून तो केव्हा ढासळून पडेल याचा नेम नसतो. या नकली राजनिष्ठेचा ओढा जोंपर्यंत स्वार्थाचा पाऊस पडत असतो तोंपर्यंत फों फों करीत वाहत असतो, पण हा पाऊस बंद झाल्याबरोबर तोहि कोरडा ठणठणीत पडून जातो. नकली राजनिष्ठेपेक्षा अस्सल राजनिष्ठा अतिशय उपयोगी व हितकर असते, हें कोणासहि सहज कळेल. या अस्सल राजनिष्ठेची मनोवृत्ति जोंपर्यंत कोण-त्याहि देशांतील लोकांत जागृत असेल तोंपर्यंत तें राष्ट्र ऐश्वर्ययुक्त व वैभवसंपन्न असतें. असली अस्सल राजनिष्ठा जपानी लोकांत होती, म्हणूनच त्यांना परवाच्या रूसो-जपानी युद्धांत जय आला. रशियन लोकांची राजनिष्ठा नकली असल्यामुळे सर्व युद्धसामग्रीची सिद्धता असतांहि त्यांना अनेक वेळा मार खावा लागला. या अस्सल राजनिष्ठेमुळेच इंग्रज लोकांना हल्लीचें स्पृहणीय राजकीय वैभव प्राप्त झालें आहे व जोंपर्यंत ही अस्सल राजनिष्ठा इंग्रज लोकांच्या हृदयांत वास करीत

आहे, तोंपर्यंत त्यांना जगांतील कोणत्याहि राष्ट्राची भीति बाळगावयास नको. ही अस्सल राजनिष्ठा हिंदुस्थानवासी लोकांच्या मनांत उत्पन्न करण्याचा प्रयत्न सरकारने अवश्य केला पाहिजे. नुसत्या नकली किंवा दिखाऊ राजनिष्ठेने सरकारचें कधीहि भागणार नाही. नकली राजनिष्ठा हें एक दारूचें कोठार आहे व तें केव्हा पेट घेऊन भडकेल याचा नेम नाही. पण अस्सल राजनिष्ठा हा एक अभेद्य खडक असून तो मोठमोठ्या सुरुंगालाहि दाद देणार नाही. हिंदुस्थान देश दारूचें कोठार किंवा अभेद्य खडक करणें हें सर्वस्वीं सरकारच्या हातीं आहे. हिंदी लोकांनी खरोखर राजनिष्ठ किंवा वरपांगी राजनिष्ठ होणें हें सरकारच्या कृतीवर अवलंबून राहील. आजपर्यंत हिंदुस्थानांतील लोक खरोखर राजनिष्ठ होते; पण यापुढे ते तसेच राहतील किंवा नाही हें निश्चयाने सांगतां यावयाचें नाही. जिव्हाळ्याची राजनिष्ठा उत्पन्न होण्यास व ती टिकण्यास जिव्हाळ्याची प्रजानिष्ठा पाहिजे. ज्या ठिकाणीं अस्सल प्रजानिष्ठा नाही त्या ठिकाणीं अस्सल राजनिष्ठा सापडूं शकणार नाही. अस्सल राजनिष्ठा व नकली प्रजानिष्ठा या एकत्र फार दिवस नांदणार नाहीत. म्हणून ज्या सरकारला 'खरोखर राजनिष्ठ' प्रजा पाहिजे असेल त्या सरकारने अगोदर स्वत: 'खरोखर प्रजानिष्ठ' बनलें पाहिजे. आत्मनिष्ठ सरकारने प्रजा राजनिष्ठ राहील अशी अपेक्षा कधीहि करूं नये. टाइम्सकारांना व त्यांच्या जातभाईंना Wheather the people of India are really loyal to British Rule? "हिंदी लोक इंग्रजी अमलाखाली खरोखर राजनिष्ठ आहेत का?" असा प्रश्न परकीयांकडून विचारण्यांत येतो. आमच्या मताने या प्रश्नाच्या पूर्वी दुसरा एक प्रश्न विचारण्यांत येत असून तो टाइम्सकारांनी गाळला असावा.

तो प्रश्न हा की, Wheather the Government of India is really loyal to the Indian Rayat? "हिंदुस्थान सरकार हिंदु प्रजेचें खरोखर कल्याण करतें का?" या शेवटच्या प्रश्नाचें उत्तर ज्याप्रमाणे मिळेल त्याप्रमाणे पहिल्या प्रश्नाचें उत्तर येईल हें उघड आहे. हिंदुस्थान सरकार जर प्रजानिष्ठ असेल, तर हिंदी प्रजाहि राजनिष्ठ असलीच पाहिजे. कारण प्रजानिष्ठ सरकारच्या अमलाखाली अराजनिष्ठ प्रजा कधीहि सापडावयाची नाही. टाइम्सकारांनी पहिल्या प्रश्नाचें उत्तर "हिंदी प्रजा राजनिष्ठ आहे" असें दिलें आहे व तें अगदी बरोबर आहे. पण दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर मात्र प्रत्येक नि:पक्षपाती मनुष्य असें देईल की, "हिंदुस्थान सरकार मात्र राजनिष्ठ नसून आत्मनिष्ठ आहे" हें उत्तर सत्यास धरून आहे, हें नेमस्त लोकांशिवाय कोणासहि थोड्या विचारांतीं कळेल. आज हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य सुमारे १०० वर्षें आहे. आमच्या महाराष्ट्रांत तें सन १८०८ सालापासून सुरू झालें आहे. हिंदुस्थानच्या इतर भागांत तें त्या सालाच्या पूर्वीपासून आहे. सन १८५७ सालीं बंड होऊन एका वर्षांत तें नाहीसें करण्यांत आलें व तेव्हापासून हिंदुस्थानांत सर्वत्र शांतता आहे.

या ५० वर्षांत हिंदुस्थानच्या राजकीय व औद्योगिक उन्नतीच्या जमाखर्चाच्या वह्या काढल्या, तर जमेच्या बाजूला बहुतेक पूज्य सापडून खर्चाच्या बाजूला लठ्ठ लठ्ठ रकमा सापडतील. या ५० वर्षांत देशांतील उद्योगधंदे फार होऊन आम्ही भीकेस लागलों. सरकार-साऱ्यामुळे व अवर्षणामुळे अन्नाला महाग झालों. हत्याराच्या कायद्यामुळे निःशस्त्र होऊन पौरुषत्वाला मुकत चाललों. युनिव्हर्सिटी ॲक्टासारख्या कायद्यांनी जखडले गेल्यामुळे लौंकरच सरस्वतीच्या कृपाप्रसादाला अंतरले जाऊं. जिकडे पाहवें तिकडे आमची अधोगति होत चालली आहे व सरकारचें राजकीय धोरण हल्लीच्याप्रमाणे कायम राहिल्यास कालेंकरून आम्ही गुलामांच्या अस्पृहणीय पदवीस पोहोचूं यांत संशय नाही. तेच जपानकडे पाहा. सर्व बाजूंनी त्यांची चलती व भरभराट. हरएक बाबतींत त्यांचें पुढे पाऊल. देशांतील उद्योगधंदे व कारखाने वाढत्या प्रमाणावर आहेत. शिक्षण जारीने सुरू आहे व धाडसी लोकांचा कोंडमारा जाणूनबुजून न करतां त्यांना जपानी सरकारकडून प्रोत्साहन मिळत आहे. ५० वर्षांत प्रजानिष्ठ जपानी सरकारने स्वतंत्र लोकांचें नवीन जपानी राष्ट्र तयार केलें आहे. तर तेवढ्या अवधींत आत्मनिष्ठ आंग्ल सरकारने तीस कोटि हिंदी लोकांना खच्ची करून त्यांचा एक जनानखाना बनविला आहे. टाइम्सकारांच्या मताने आम्ही राजनिष्ठ आहों. गोष्ट कबूल; पण आम्ही टाइम्सकारांना उलट असा प्रश्न विचारतों की, आमच्या या राजनिष्ठेबद्दल आपल्या जातभाईंनी आम्हांस कोणतें बक्षीस दिलें आहे? आमची उन्नति त्यांनी कोणती केली आहे? स्वतंत्रतादेवीच्या मंदिराकडे जाणारा रस्ता त्यांनी आम्हांस हातीं धरून कितीसा आक्रमिला आहे? आम्हीं देशांत शांतता केली. दंगेधोपे नाहीसे केले व देशांतील बंडाळी मोडून टाकली असें विधान मोठ्या कंठरवाने आंग्ल लोकांकडून करण्यांत येत असतें; पण हें विधान करण्यापूर्वी ते असा विचार करीत नाहीत की, हल्लीच्या जपानी शांततेपेक्षा पूर्वीचा मर्दानी दांडगावा सहस्रपटींनी अधिक श्रेयस्कर होय.

ज्या महाराष्ट्रांत लढाईचें शिंग वाजल्याबरोबर नऊ लाख घोडा हां हां म्हणतां जमत असे, त्याच महाराष्ट्रांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत शिंग नव्हे तर कर्णा फुंकला असतांहि नव्वद घोडा जमविण्याचीहि मारामार पडली आहे. सरकारच्या पगारी शिपायांशिवाय प्रसंग पडल्यास सरकारास एके काळीं परिप्लुप्त असा महाराष्ट्रांत एक तरी शिपाई हल्ली मिळूं शकेल काय? अशीहि शोचनीय स्थिति होण्याचें कारण सरकारचा आमच्यावर असलेला गैरविश्वास होय. वाटेल त्या आडमाडू गोऱ्या मनुष्याला हातांत बंदूक घेऊन नेटिव्हावर गोळ्या घालण्याची पूर्ण मुभा असावी, पण कितीहि मोठ्या दर्जाचा नेटिव्ह असला, तरी त्याला आत्मसंरक्षणार्थ तोडच्याची बंदूकहि वापरण्याची परवानगी नसावी, यापेक्षा जास्त गर्हणीय गोष्ट ती कोणती? परवा आपोलो बंदरावर बीदरच्या राण्याने युवराजांच्या पायांवर आपली समशेर अर्पण केली व त्या समशेरीचा उपयोग स्वामीकार्यार्थ करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली.

खुळा बिचारा राणा ! त्याच्या निष्कपटी रजपुती अंतःकरणाला इंग्रजी अंतःकरणाची ओळख कशी व्हावी ? हे बीदराधिपते, युवराजांना तुझ्या खड्ग हस्ताची जरुरी मुळीच नाही. आधी तुझ्या बोथट समशेरींत जोर तो काय असणार ? व यदाकदाचित् असल्यास तो तेथे कायम राहवा अशी इच्छा कोणाची आहे ? तुझ्या हातांतील समशेरीच्या जोरापेक्षा तुझ्या हातांतील स्नायूंच्या जोराची जरुरी जास्त आहे. कारण प्रसंग पडल्यास त्या हाताचा उपयोग छत्रधार सर भालचंद्रांच्या हाताप्रमाणे चामर धरण्याकडे करण्यांत येईल. बीदरच्या राण्याप्रमाणे जर तेथे जमलेल्या मंडळींच्या हातांत समशेरी असत्या, तर त्यांनीहि त्यांचा उपयोग स्वामीकार्यार्थ आम्ही करूं, अशा शपथा युवराजापुढे घेतल्या असत्या. पण धोरणी सरकारने अशा आणाभाका व शपथा घेण्याचा प्रसंग लोकांवर येऊं नये म्हणून कधीच हत्याराचा कायदा पसार करून ठेवला आहे. तीस कोटि प्रजेला निःशस्त्र करून त्यांना नामर्द बनवून त्यांनी संतुष्ट राहवें अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे. दीन प्रजा मुकाटयाने बसेल, आपलीं दुःखें गाईप्रमाणे मुकाटयाने सोशील व आंतल्या आंत झुरून जाईल, पण तिच्या ठिकाणीं जिव्हाळयाचें प्रेम कधीहि सापडूं शकणार नाही. जुनींपुराणीं हत्यारें वापरण्याची परवानगी देण्याइतका सरकारचा विश्वास आमच्यावर नाही. मग आम्हीं मात्र सर्व विश्वास सरकारवर टाकावा अशी इच्छा सरकारने कां बरें धरावी ? "प्रेमाने प्रेम वाढतें व विश्वासाने विश्वास बसतो" हें तत्त्व सरकारास कळावयास नको का ? लोकांनी राजनिष्ठ असावें अशी इच्छा जर मनांत धरावयाची असेल, तर ती राजनिष्ठा उत्पन्न होण्यासारखी करणी सरकारने करावयास पाहिजे.

राजनिष्ठा कायद्याच्या कलमाने उत्पन्न होत नाही, तर ती स्वतःच्या कृत्यांच्या ओलाव्याने उगवत असते व वाढत असते. हिंदी प्रजा आंग्ल प्रजेप्रमाणे आहे असें जर बोलण्यांत येत आहे, तर मग दोघांना वागविण्यांत हा पंक्तिप्रपंच कां ? पोटच्या पोराप्रमाणे आंग्ल प्रजेशीं वागणूक व सवतीच्या पोराप्रमाणे हिंदी प्रजेशीं वागणूक आहे. मग असा पक्षपात होत असतां सवतीच्या पोराने आपल्या सावत्र आईशीं फटकून किंवा तुसडेपणाची वागणूक ठेवली तर सावत्र आईने हाकाटी कां करावी ? अलीकडे सरकारचें वर्तन मायबाप सरकारास शोभण्यासारखें खात्रीने नाही. जेथे तेथे आमचा अपमान व पदोपदीं आम्हांस हिडीसफिडीस चाललेली आहे. आम्ही कितीहि काकुळतीने सरकारास कोणतीहि गोष्ट कळवा, तिच्याकडे नेहमी दुर्लक्ष व्हावयाचेंच. अशा स्थितींत लोकांच्या राजनिष्ठेला जर धक्का बसला, तर त्याचें कारण सरकारची बेपर्वाईची वर्तणूक होय. अशक्त व निराश्रित झालेली दीन प्रजा हे अपमान, ही हेटाळणी सोशील, पण सृष्टिनियमाप्रमाणे तिच्या अंतःकरणांत अस्सल राजनिष्ठेचे अंकुर कधीहि फुटावयाचे नाहीत. तिची जिव्हा राजनिष्ठेचें स्तोत्र गाईल, पण त्याच वेळीं तिचें अंतःकरण असंतोषाने खवळून जाईल. ती वरपांगी आपलीं दुःखें सोशील, पण अंतर्यामीं ती उबवून ठेवील. प्रजेच्या मनांत भडकणारा

अराजनिष्ठेचा वणवा प्रजानिष्ठेच्या नदीनेच विझेल. अलीकडे हिंदुस्थानवासी लोकांचीं अंतःकरणें पूर्वीप्रमाणे संतुष्ट नाहीत. याचें कारण ते राजद्रोही बनत चालले नसून, आपणांस आपल्या आंग्ल बांधवांप्रमाणे राजकीय हक्क मिळावेत अशी उत्कट इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली आहे. जर ही इच्छा पूर्ण करावयाचा उपक्रम सरकारने वेळींच केला नाही, तर उभयपक्षीं जड जाईल असें आम्हांस वाटतें. अज्ञान-दशेंतील राजनिष्ठा सज्ञानदशेंत कधीहि टिकावयाची नाही. कायद्याच्या धाकाने किंवा समशेरीच्या लकाकीने राजनिष्ठेचा वृक्ष कधीहि वाढणार नाही. त्याच्या वाढीस त्याच्या मुळाशीं सरकारने अकृत्रिम प्रेमाचें सिंचन केलें पाहिजे. हिंदुस्थानांत असलेल्या अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांच्या हातून हें अपेक्षित सिंचन होणार नाही. कदाचित् आळें भरून तर नव्हे, पण फक्त टवटवी येण्यापुरतें तरी सिंचन युवराजांच्या हातून होईल अशी आशा वाटत होती. पण हा भ्रमाचा भोपळा एकदाचा फुटला. मानपत्रें घेण्याशिवाय, मेजवान्या झोडण्याव्यतिरिक्त व गुळचट ठराविक औपचारिक भाषणें करण्यापलीकडे युवराजांच्या हातून त्यांच्या तीन महिन्यांच्या प्रवासांत कांही जास्त होईल असें वाटत नाही. आमच्यापैकी कांहींना लाखोगणती रुपये खर्च केल्यावर 'सरक्या' मिळतील तर कोणाला 'छत्रधरत्वा'चा दुष्प्राप्य मान मिळेल. पण सामान्य जनांना – राजनिष्ठ प्रजाजनांना – कांही विशिष्ट हक्क मिळण्याचा दूरचा सुद्धा संभव नाही व अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांच्या आत्मनिष्ठेला आळा बसण्याची आशाहि नको. सारांश, आपलें नशीब सरकारकडून उघडेल अशी अपेक्षा करावयास नको. असें जरी आहे तरी लोकांनी निराश व उदास व्हावयास नको. परमेश्वरावर सर्व भार टाकून दृढनिश्चयाचें अभेद्य कवच अंगांत घालून उजव्या हातांत देशाभिमानाचा भाला पेलून डाव्या हातांत राजनिष्ठेची ढाल धरून आशेच्या घोडीवर प्रत्येकाने स्वार होऊन पुरातनकालच्या 'नाईट लोकां'प्रमाणे देशकार्य करण्यासाठी प्रत्येकाने घराच्या बाहेर पडावें. अशा करारीपणाने व दृढनिश्चयाने आपण बाहेर पडल्यावर मंगलदायक दीनदयाळ परमात्मा आपल्या प्रयत्नांना यश दिल्यावांचून कधीहि राहणार नाही.

–भाला, दि. २१ नोव्हेंबर १९०५

---

## १३. राष्ट्रदेवतेचें नवरात्र

'नवरात्र' हा शब्द आमच्या वाचकांच्या परिचयांतला आहे; परंतु या शब्दाचा उपयोग आजपर्यंत निराळ्या तऱ्हेने करण्यांत येत आहे. आजपर्यंत हिंदु लोकांना जगदंबेचें नवरात्र कसें असतें तें माहीत असून, तें प्रत्येक धर्मनिष्ठ हिंदु

कुटुंबांत दरसाल आश्विनमासीं भक्तीने व श्रद्धेने करण्यांत येतें. पावसाळ्याचे दिवस संपून शरद ऋतूला प्रारंभ होऊन मनमुराद आलेल्या नाना प्रकारच्या पिकांनी शेतें डोलूं लागलीं आहेत. खवळलेले नदीनाले शांत होऊन आपल्या मोहक स्वरूपाने प्रेक्षकजनांच्या नेत्राची तृषा तृप्त करीत आहेत. मेघांचा गडगडाट, विजेचा कडकडाट बंद होऊन दशदिशा सुप्रसन्न व हास्यमुख दिसूं लागल्या आहेत. गवताची हिरवीगार पैठणी नेसून भूमाता थाटाने नटली आहे. जागजागीं लहानमोठे ओढे आनंदाने डोंगरावरून बागडत बागडत येऊन दऱ्याखोऱ्यांत उडचा घेत आहेत. काळवंडलेलें आकाश पुन्हा आस्तें आस्तें पूर्वस्वरूपाला येऊन पोहोचत आहे व चार महिने घरट्यांत व घरांत कोंडमारा होऊन बसलेले पक्षी व मनुष्यें उत्सुकतेने व उल्हासाने बाहेर पडूं लागलीं आहेत. अशा वेळीं मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति धर्मपर व्हावी हें उघडच आहे. या धार्मिक प्रवृत्तीला दृश्य स्वरूप येऊन, निराकार परमेश्वराला साकार रूप देऊन, भक्तजन त्या भक्तवत्सल प्रभूची भक्ति करण्यास प्रवृत्त झाले, तर त्यांत कोणत्याहि सदाचरणी व पापभीरु मनुष्याला आनंद वाटल्यावांचून राहणार नाही. अशा धर्मप्रचुर व आनंदप्रसंगीं भक्तजनांनी परमात्म्याला जें विशिष्ट रूप दिलें आहे तें फारच समर्पक आहे. उपलब्ध झालेल्या शांततेचें व वैभवाचें संरक्षण करण्यांत वीर्य, धैर्य व शौर्य या त्रयीची अत्यंत जरुरी आहे हें लक्षांत आणून भक्तजनांनी अशा शुभ व मंगल उत्सवांतील उपास्यदेवता मर्दानी पेशाची व बाण्याची योजली. या नवरात्रोत्सवांत योजलेल्या निराकार परमेश्वराचें हें साकार जगदंबा-स्वरूप किती पाणीदार व किती बोधप्रद आहे बरें !

हें स्वरूप आपल्या भक्तजनांना असें मूक व्याख्यान देतें की, अंगीं क्षात्रतेज असल्याशिवाय कोणत्याहि इतर गुणांचें तेज पडत नाही व त्याचें चीज होत नाही. जगदंबेचा हा उग्र व प्रखर अवतार आपल्या उपासकांना असें क्षणोक्षणीं सांगतो की, या लोकीं काय किंवा परलोकीं काय, सहनशीलतेपेक्षा तेजस्विता जास्त हितकर आहे. आदिमायेची ती सायुध व सशस्त्र मूर्ति सर्व जगाला असें कळवितें की, दुर्जनांचा नाश करण्यासाठी व सुजनांचें संरक्षण करण्यासाठी भगवंताला शेवटीं शस्त्र धारण करावें लागतें. सर्व जगाला त्रस्त करून सोडणाऱ्या महिषासुराचें निर्दालन करण्याकरिता जगदंबेने हें क्षात्रस्वरूप धारण केलें व त्याप्रमाणे त्या दुष्टाचें पारिपत्य करून भक्तजनांना पुन्हा शांतीची व सौख्याची जोड करून दिली. ज्या भक्तवत्सल आदिमायेने मानवजातीवर हे अनंत उपकार केले तिचा उत्सव करणें व अनन्यभावाने तिला शरण जाऊन तिच्या पदीं लीन होणें हें प्रत्येक कृतज्ञ भक्ताचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य बजावण्यासाठीच दरवर्षी आश्विनमासीं जगदंबेचें नवरात्र करण्यांत येत असतें व जोंपर्यंत एक तरी धर्मनिष्ठ हिंदु या भरतभूमींत शिल्लक राहील ( ईश्वरकृपेने तो प्रलयकालापर्यंत राहीलच ) तोंपर्यंत तें कधीहि खंड न पडतां करण्यांत येईल. हें जें वरील धार्मिक नवरात्र सांगण्यांत आलें व जी वरील देवता वर्णन करण्यांत आली

त्याप्रमाणे दुसरी एक देवता या जगावर वास करीत आहे व तिचेंहि नवरात्र कधी कधी करण्यांत येत असतें.

ज्याप्रमाणे आदिमाया निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळीं रूपें धारण करते त्याप्रमाणे ही देवता निरनिराळ्या स्थळीं निरनिराळीं रूपें धारण करतें. या देवतेचे भक्त तिला आपल्या आवडत्या स्वरूपांनी भजतात म्हणून कदाचित् भिन्न स्वरूपामुळे ही देवता एक नसून, त्या अनेक आहेत असें वाटण्याचा संभव आहे; परंतु हा केवळ मिथ्याभास आहे. ही दुसरी देवता सर्वत्र एकच असून, फक्त स्थलभेदामुळे तिला भिन्न भिन्न नांवें प्राप्त झालीं आहेत. जरी ही देवता सर्वत्र एकच आहे, तरी तिच्या निरनिराळ्या स्वरूपाची योग्यता निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळी आहे. या देवतेच्या निरनिराळ्या स्वरूपाचे भक्त निरनिराळे आहेत व जोंपर्यंत जगांत राहणाऱ्या षड्रिपुग्रस्त मानवांच्या मनोवृत्तींत फरक होणार नाहीत तोंपर्यंत हीं निरनिराळीं स्वरूपें हल्लीप्रमाणेच कायम राहतील व तिच्या भक्तजनांचे आखाडेहि निरनिराळ्या ठिकाणीं जमतील. अशी ही जगदंबेच्या खालोखाल दुसरी देवता म्हटली म्हणजे 'राष्ट्रदेवता' होय. ही राष्ट्रदेवता या जगांत एकच आहे; परंतु देशभेदामुळे तिच्या स्वरूपांत अनेक भेद झाले आहेत. ज्याप्रमाणे एकाच जगदंबेची लक्ष्मी, दुर्गा वगैरे निरनिराळीं रूपें आहेत त्याप्रमाणे या राष्ट्र-देवतेचींहि निरनिराळीं रूपें आहेत. ही देवता आंग्ल राष्ट्रदेवता, जर्मन राष्ट्रदेवता, जपान राष्ट्रदेवता अशीं निरनिराळीं रूपें धारण करते व त्यामुळे तिच्या भक्तांचे निरनिराळे मेळे झाले आहेत. तिच्या भक्तांच्या मेळ्यांत कांही मेळे जास्त स्वार्थी व अपमतलबी असल्याकारणाने ते दुसऱ्या मेळ्यावर तुटून पडतात व त्यांच्या उपास्यदेवतेची अभंग मूर्ति भंगून टाकण्याचा प्रयत्न करतात.

राष्ट्रदेवतांच्या या मूर्ति नेहमी अभंग आहेत. त्या कोणालाहि कधीहि फोडून टाकतां यावयाच्या नाहीत. या मूर्ति दुभंग झाल्या आहेत किंवा त्यांचा पक्का चक्काचूर करण्यांत आला आहे असें कांही जणांना वाटण्याचा संभव आहे; पण ही त्यांची समजूत निव्वळ खोटी आहे. ज्या वेळेस आपमतलबी लोकांकडून या मूर्तीवर घाव घालण्यांत येतात, त्या वेळेस या मूर्तीचा फक्त दृश्य आकार छिन्नविछिन्न होतो. पण आंतील जीवनसत्त्व तसेंच कायम राहतें. हें तत्त्व अविनाशी असल्याकारणाने तें दृश्य स्वरूप धारण करूं लागतें व योग्य समयीं तें पुन: पूर्ववत् साकार होऊन आपल्या निस्सीम भक्तांना आपल्या मनोहर दर्शनाने आनंद देऊं लागतें. या राष्ट्रदेवतेच्या कांही स्वार्थसाधू चेल्यांकडून आपल्या प्रिय मूर्तीशिवाय तिच्या इतर मूर्ति फोडण्यांत आल्या म्हणजे भग्न झालेल्या मूर्तीचे उपासक त्यांच्या नवरात्राला सुरुवात करतात. राष्ट्रीय देवतेचा नवरात्रोत्सव करण्याचा एकच हेतु हा की, आकारशून्य झालेल्या तिच्या देहाला पुन्हा साकारत्व प्राप्त करून द्यावयाचें. हा आकार प्रत्येक देशांत निरनिराळा असणार हें उघडच आहे. अष्टभुजा जगदंबेप्रमाणे या राष्ट्रदेवतेचा हात नियमित

नसून, त्यांची संख्या तिच्या उपासकांच्या हातांइतकी असते. ह्या देवतेला दोनच ठराविक डोळे नसून, तिच्या भक्तांच्या डोळ्यांइतके तिला डोळे असतात. तिच्या अंगांतील शक्ति, तिच्या पूजकांच्या एकीभूत झालेल्या शक्तीएवढी असते. अशा या राष्ट्रदेवतेच्या नवरात्राला तिच्या भगत मंडळींनी एकदा सुरुवात केली म्हणजे हा उत्सव – हा मंगल उत्सव – कार्यसिद्धि झाल्याशिवाय कधीहि थांबत नाही. अष्टभुजेचें नवरात्र फक्त नऊ दिवस होऊन दहाव्या दिवशींच विजयादशमी येऊन थडकते. पण या राष्ट्रदेवतेचें नवरात्र नऊ महिने, नऊ वर्षें किंवा नव्वद वर्षें सुद्धा चालतें. पण एकदा का हें नवरात्र सुरू झालें म्हणजे तें विजयादशमीने समाप्त होतें. अपजयानवमी करून हें नवरात्र कधीहि बंद पडत नाही. जगदंबेच्या नवरात्रांत एका अष्टमीला होम करण्यांत येतो, पण या नवरात्रांत पहिल्या माळेपासून होमाला सुरुवात होते. राष्ट्रदेवतेच्या नवरात्रांत हा होम एकदा पेटला म्हणजे तो एकसारखा धडधड जळूं लागतो व कांही केल्या तो विझत नाही. जगदंबेच्या नवरात्रांत केलेल्या होमांत भाताचे गोळे टाकले जातात व तुपाची धार धरली जाते. पण राष्ट्रदेवतेच्या नवरात्रांत पेटवलेल्या होमांत तिला छिन्नविछिन्न करणाऱ्याच्या मांसाचे गोळे टाकले जातात व त्यांत त्यांच्या रक्ताची धार धरली जाते. ह्या राष्ट्रदेवतेच्या होमाभोवतीं बसलेले ऋत्विज आपल्या हातांत दर्भाच्या ऐवजीं तीक्ष्ण शस्त्रें धारण करतात.

ते आपल्या मुखावाटे वेदांतील ऋचा म्हणण्याच्या ऐवजीं 'रणस्मृतीं'तील 'हर हर महादेव' 'दीन दीन', 'बॉन झाय' 'हुरे हुरे' या मंत्राचा घोष करूं लागतात. ही राष्ट्रदेवता देवळांत न राहतां ती रणमैदानावर वास करते म्हणून तिचा हा होम त्याच पवित्र भूमीवर करण्यांत येतो. ह्या होमांत पुढाकार घेणारे 'रणदीक्षित' होमास सुरुवात करण्याच्या पूर्वी देशभक्तीच्या पवित्र जलाने सचैल स्नान करून आपल्या पुनीत झालेल्या शरीरावर देशाभिमानरूपी भस्माचे पट्टे ओढतात. अढळ निश्चयाच्या कृष्णाजिनावर हे भट मांडी ठोकून बसले म्हणजे पेटलेल्या होमांतून राष्ट्रदेवतेची दिव्य मूर्ति बाहेर निघेपर्यंत ते तेथून हालत नाहीत. हा होम पेटून तो धडधड जळूं लागला म्हणजे राष्ट्रदेवतेची मूर्ति छिन्नविछिन्न करणारे स्वार्थी लोक तो हरप्रयत्नाने विझविण्यासाठी धडपड करूं लागतात. हे कमकुवत पतंग या होमांतील ज्वाला जोंपर्यंत लहान प्रमाणाने बाहेर निघत असते तोंपर्यंत ते ती विझवूं शकतात. पण त्याच्याच पंख्याच्या वाऱ्याने प्रफुल्लित झालेले होमांतील निखारे पुन्हा पेट घेतात. मग अशी एक वेळ येते की, ज्या वेळेस हे पंगु बनलेले पतंग ह्या होमांतून निघणाऱ्या ज्वालेने होरपळून जाऊन नामशेष होऊन जातात.

जगदंबेच्या नवरात्रांत माळ व नंदादीप पहिल्या दिवसापासून सुरू करण्यांत येतो. पण राष्ट्रदेवतेचा स्वातंत्र्यरूपी नंदादीप हा होम यथासांग सिद्धीस गेल्यावर पेटविला जातो व तो ह्या होमाच्या ज्वाळेने पेटविला जातो. हा होम संपल्यानंतर व हा नंदादीप पेटविल्यानंतर ह्या राष्ट्रदेवतेपुढे उन्नतीच्या माळा एकापाठीमागून

एक टांगल्या जातात. ह्या माळा फक्त नऊ दिवस टांगल्या जाऊन त्या फक्त नऊच नसतात. ह्या माळांच्या संख्येला सीमा नाही व त्या टांगण्याची मुदत नाही. असें हें राष्ट्रदेवतेचें नवरात्र यथासांग सिद्धीस गेल्यावर व त्यांतून राष्ट्रदेवतेची दिव्य व तेजःपुंज मूर्ति बाहेर निघाल्यावर त्या मूर्तीची मिरवणूक आनंदाने काढली जाते. ज्या दिवशीं हा छबिना काढण्याचा मंगल दिवस उगवतो तोच दिवस ह्या राष्ट्र-देवतेच्या नवरात्राची विजयादशमी होय. ह्या मिरवणुकींत राष्ट्रदेवतेला बसावयास दिलेली पालखी म्हणजे तिच्या उपासकांचें अंतःकरण होय. ही पालखी वाहून नेणारे भोई यांचे खांदे होत. अशी ही राष्ट्रदेवतेची जंगी मिरवणूक निघाल्यावर तिची प्राणप्रतिष्ठा तिच्या भक्तांच्या हृदयांच्या सिंहासनावर होऊन तिचें तेथे पूजन, अर्चन व भजन अहोरात्र चालतें. ज्या राष्ट्रांत या राष्ट्रदेवतेचें वरील नवरात्र करणारे भूत्ये निर्माण होतात तें राष्ट्र खरोखर नशीबवान होय. या भूत्यांनी राष्ट्रदेवतेपुढे घातलेला गोंधळ ऐकण्यास ज्या कानांना सापडते ते खरोखरच धन्य होत. ज्या डोळ्यांना हा अपूर्व देखावा पाहवयास मिळतो ते डोळे निःसंशय भाग्यशाली होत.

असें हें राष्ट्रदेवतेचें नवरात्र दोन वर्षांपासून जगांत दोन ठिकाणीं सुरू झालें आहे. एक आफ्रिकेंत व दुसरें रशियांत. आफ्रिकेंतील मूळ रहिवाशी जे हॉटेण्टाट लोक त्यांच्या राष्ट्रदेवतेची मूर्ति जर्मन लोकांनी फोडून टाकली. ती भंगलेली मूर्ति पुन्हा ओतवून तिची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी हॉटेण्टाट लोकांनी या नवरात्रांतील होमाला सुरुवात केली. हॉटेण्टाट लोकांच्या एकनिष्ठेने व धारिष्टाने ही राष्ट्रीय देवतेची मूर्ति या होमांतून बाहेर पडण्याच्या बेतांत आली होती. पण त्यांचें खडतर नशीब अजून न संपल्यामुळे त्यांच्या होमाला अडथळा येऊन स्थंडिलाभोवतीं जम-लेल्या सतरा ऋत्विजांसह इसॉक विटवोई यांस जर्मन लोकांस शरण जावें लागलें. आता यापुढे हॉटेण्टाट लोकांनी पेटवलेला हा होम धुमसत राहील, पण तो अजीबात विझून जाईल असें कधीहि होणार नाही. तसाच कांही कठीण प्रसंग आला असल्या-मुळे त्या अठरा गोंधळ्यांनी आपला राष्ट्रदेवतेपुढे चालविलेला गोंधळ बंद ठेवला असेल. या गोंधळ्यांचीं तोंडें तोफांच्या गोळ्यांनी बंद पडलीं असतील, पण त्यांच्या तोंडांतील जीभ पूर्वीप्रमाणेच शाबूत असेल. अनुकूल संधि मिळतांच धुमसत पडलेल्या होमांतील निखारे पुनरपि पेट घेतील व त्यांची बंद पडलेलीं तोंडें पुन्हा गोंधळ घालू लागतील. केव्हा तरी हॉटेण्टाट लोकांकडून पुन्हा त्यांच्या राष्ट्रदेवतेची प्राणप्रतिष्ठा झाल्याशिवाय राहणार नाही. जगांत सदैव परतंत्र व निरंतर स्वतंत्र असें एकहि राष्ट्र सापडावयाचें नाही. हा सिद्धान्त जगाच्या आजपर्यंतच्या इतिहासाने आपल्या हाताने लिहून ठेवला आहे व त्यांत पुढे कांही फरक होईल असें अनुमान काढण्यास कांही सबळ कारण नाही.

हॉटेण्टाट लोक केव्हा ना केव्हा तरी स्वतंत्र होणारच होणार. त्यांच्या स्वातंत्र्याचा जन्म एक एक दिवसाने जवळ जवळ येत चालला आहे व त्यांचें

पारतंत्र्य एक एक दिवसाने आपल्या अंताजवळ जाऊन पोहोचत आहे. असें जर आहे तर जर्मन लोकांनो, तुम्ही विनाकारण हें राक्षसी कृत्य कां बरें करतां? 'God is Love' (ईश्वर कारुण्यसागर आहे) अशी आपली धार्मिक समजूत आहे ना? ती जर तशी असेल, तर मग त्याच्या अस्सल संततीच्या अंगीं तें कारुण्य उतरूं नये काय? परमेश्वराच्या अंतःकरणांत साधलेल्या दयेच्या सागराचा एकहि तुषार तुमच्या कोरडया ठणठणीत अंतःकरणांना भिजवीत नाही ना? तुमच्या कृतीवरून तुम्हांस परमेश्वराची औरस संतति कां म्हणावी हा एक प्रश्न आहे. हें जग त्यावर राहणाऱ्या सर्व मनुष्यांना व इतर जिवांना पुरून उरण्यासारखें नाही काय? परमेश्वराने प्रत्येकाच्या पोटाची तजवीज केली असतां अजीर्ण होई-पर्यंत एकाने आकंठ भोजन करावें व दुसऱ्याने मात्र घेरी येईपर्यंत क्षुधेने मरावें अशी राक्षसी व सैतानी इच्छा तुम्ही मनांत कां धरतां? हॉटेण्टाट लोकांनी तुमच्या देशावर कधी स्वारी केली आहे काय? जर नाही तर मग त्यांच्या ईश्वरदत्त देशांत न बोलावतां तुम्ही घुसून त्यांच्या प्रेतांच्या ढिगाखाली त्यांच्या जन्मभूमीची कंबर तुम्ही कां बरें मोडून टाकतां? तुमच्या देशांतील एका कपर्दिकेला हॉटेण्टाट लोक आजपर्यंत शिवले आहेत का? जर नाही तर गलबतेंच्या गलबतें भरून तुम्ही त्यांचा पैसा कां बरें लांबवतां? तुमच्या देशबांधवांपैकी एकाला तरी त्यांनी या मितिपावेतों गुलाम बनविलें आहे का? जर नाही तर त्यांच्या पायांत, त्यांच्या बायकांच्या पायांत व त्यांच्या अर्भकांच्या पायांत गुलामगिरीचा सदैव रुतणारा खोडा तुम्ही कां बरें अडकवतां?

जर्मन लोकांनो, तुम्ही असें करूं नका. जर तुमच्या ठायीं परमेश्वरा-विषयी अकृत्रिम भक्ति असेल, तर त्याच्या लेकरांना सैतानाप्रमाणे तुम्ही छळूं नका. जर तुमच्या मुलाबाळांविषयी तुमचीं मनें प्रेमाने थबथबलेलीं असतील, तर हॉटेण्टाट अर्भकांना त्यांचें पालनपोषण करणारे बाप मारून रानोमाळ भटकावयास लावूं नका. जर तुमच्या मनांत तुमच्या बायकांविषयी खरी प्रीति वसत असेल, तर हॉटेण्टाट सुवासिनींचे चुडे फोडण्याचें पाप तुम्ही पदरीं साठवूं नका. जर्मन लोकांनो, ज्याप्रमाणे तुमचीं मुलें 'बाबा बाबा' म्हणून तुमच्या अंगाला लाडाने झोंबत असतील, त्याप्रमाणेच हॉटेण्टाट लोकांचीं अर्भकें आपल्या बापांना बिलगत असतील. ज्याप्रमाणे तुम्हांस पाहून तुमच्या बायकांना आनंद वाटत असेल त्याप्रमाणे हॉटेन्टाट बायकांनाहि त्यांचे पति पाहून आनंद होत असेल. मानवी धर्म जगांत सर्व ठिकाणीं एकच आहे, असें जर आहे तर स्वार्थाला भुलून जाऊन तुम्ही त्यांच्या सुखांत विष कां बरें कालवतां? सतरा सरदार व अठरावा त्यांचा सेनापति हे तुम्हांस नाइलाजास्तव शरण आले आहेत, तर तुम्ही आता मोठें मन करून त्यांचा देश त्यांच्या स्वाधीन करा व आपल्या मायदेशांत जाऊन सुखाने आयुष्याचे दिवस घालवा. असें जर न कराल, तर असा एक दिवस उगवेल व तो कधी ना कधी उगवणारच की, त्या दिवशीं हॉटेण्टाट अर्भकांनी गाळलेल्या प्रत्येक अश्रुबिंदूबद्दल

तुमच्या अर्भकांना ओंजळभर अश्रुबिंदु गाळावे लागतील. त्यांच्या बायकांनी टाकलेल्या प्रत्येक दुःखाच्या श्वासाबद्दल तुमच्या बायकांना आपल्या दुःखाबद्दल ढसढसा रडण्याचा प्रसंग येईल.

हॉटेण्टाट लोकांनी ज्याप्रमाणे राष्ट्रदेवतेच्या नवरात्राला सुरुवात केली होती त्याप्रमाणे त्रस्त झालेल्या रशियन प्रजेनेहि या नवरात्राला रूसो-जपान युद्ध सुरू झाल्यापासून सुरुवात केली आहे. या नवरात्रांत रशियन लोकांनी पेटवलेल्या होमाला बरेच विस्तृत व भयानक स्वरूप प्राप्त झालें असून, त्यांत झारसाहेबांची शेवटची आहुति पडण्याचा रंग आला आहे. या होमाच्या भोवतीं ऋत्विजांचें पवित्र काम करण्यास झारसाहेबांशिवाय व त्यांच्या विश्वासू पगारी मारेकऱ्याशिवाय प्रत्येक जण जमला आहे. दररोज अशा ऋत्विजांची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. रशियांत हल्ली अशी वेळ आली आहे की, एका घटकेंत काय घडून येईल हें निश्चितपणें सांगण्याची कोणाची छाती नाही. रशियन लोकांच्या असंतोषाचा ज्वालामुखी पर्वत इतका रसरसलेला आहे की, अगदी क्षुल्लक कारणांमुळे त्याचा स्फोट होऊन तो झारसाहेब, त्यांची आप्त मंडळी व या दोघांचे पगारी मारेकरी यांचा अल्प काळांत धुव्वा उडवून देईल. रशियन लोकांनी आरंभलेलें हें नवरात्र सिद्धीस जाऊन स्वातंत्र्याचा नंदादीप लावण्याचा सुयोग त्यांना लवकरच येईल असा रंग दिसत आहे. मध्यंतरीं झारसाहेबांनी एक जाहीरनामा काढून लोकांना मुख्य मुख्य हक्क दिले होते. पण रशियन लोकांची राजकीय क्षुधा फक्त सारभाताने तृप्त होत नाही. तिला पंचपक्वान्नें पाहिजे आहेत व रशियन लोकांनी असाच नेट धरल्यास तीं पक्वान्नें त्यांना निःसंशय मिळतील. रशियन लोकांनो, तुम्हीं आरंभलेल्या सत्कृत्यांत अनास्था करूं नका. जरा कळ सोसली असतां तुमच्या भावी पिढ्या आनंदसागरांत डुंबूं लागतील. जरा जास्त नेट धरल्यास तुमच्या राजकीय भुका कायमच्या शांत होतील. ह्या वेळीं जर तुम्ही कच खाल, तर ही वेळ, ही संधि पुन्हा येणार नाही. तुम्ही पेटवलेल्या होमाला जाज्वल्य स्वरूप येण्यास आता तुम्ही फक्त त्याला वारा घातला म्हणजे बस्स झालें. एकदा का हा होम विझून गेला म्हणजे पुन्हा तो पेटविण्यास फार दगदग पडेल. म्हणून रशियन लोकांनो, तुम्ही आता आपल्या कंबरा करकचून कसा. परमेश्वरावर हवाला ठेवून व हृदयस्थ सदसद्विवेकबुद्धीला स्मरून तुम्हीं हें सुरू केलेलें नवरात्र जोरांत चालू द्या. देशाभिमानाचा जळता पोत हातांत घेऊन 'राष्ट्रदेवतेचा उदय असो', 'राष्ट्रदेवतेचा विजय असो' अशा आरोळ्यांनी दाही दिशा दणाणून सोडा. एवढें केल्यावर लौकरच तुम्हांस विजयादशमीची राष्ट्रदेवतेची मनोहर व मर्दानी मिरवणूक पाहवयास सापडेल. ही मिरवणूक पाहवयास मिळाल्यावर या जगावर आणखी जास्त स्पृहणीय सुख तें कोणतें ?

— भाला, दि. ११ डिसेंबर १९०५

# १४. पूर्व बंगाल्यांतील बेबंदशाही

आठ कोट लोकसंख्येच्या लोकांवर एका गव्हर्नराचें राज्य असल्यास त्यांच्याकडून राज्यकारभार जितक्या सुव्यवस्थितपणें व्हावयास पाहिजे तितका व्हावयाचा नाही व प्रजेला सुखोत्पत्ति व्हावयास पाहिजे तितकी होऊं शकत नाही असें सोंग करून प्रतापी कर्झनसाहेबांनी लोकैक्य खच्ची करण्याकरिता स्टेट-सेक्रेटरीच्या मतालाहि काखेंत मारून सुशिक्षित, अशिक्षित लक्षावधि प्रजेचें रडणें-भेकणें न जुमानतां बंगाल्याचें अर्धे अंग कापलें व त्याची व्यवस्था लावण्यास स्वतंत्र सरकारची स्थापना केली; परंतु या नवीन अलग केलेल्या इलाख्यांची स्थापनेच्या दिवसापासून आजपर्यंतची स्थिति अवलोकन केली म्हणजे अशी सुखोत्पत्ति होण्यास सांप्रतच्या रशियांतील रहिवाशीपणा किंवा जुलमी अशा एखाद्या मोंगलाची रयत होऊन राहणें इत्यादिकांची निराळी अपेक्षा करणें नको असें कोणासहि वाटेल. विव्हल झालेल्या भागावर तो आपोआप कणखर किंवा निर्ढावलेला होईल; निदान तोंडाने तरी फुंकर घालण्यांत येईल असें पूर्वी वाटलें होतें; परंतु त्या ऐवजीं तोडलेल्या प्रांतावर मिठाच्या पाण्याचे शिडकाव होऊन दीनदुबळ्या केलेल्या प्रजेच्या हालांचें व यातनांचें प्रदर्शन मांडण्यांत येईल ही कल्पना इंग्रजांच्या शत्रूलाहि आली नसेल. पण ती आज प्रत्यक्ष अनुभवास येत आहे.

बारीसाल, रंगपूर, मिमेनसिंग, सिराजगंज इत्यादि ठिकाणीं चालू असलेले व बंगाली वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊन आलेले प्रकार वाचून आमच्या वरील विधानाचा यथार्थपणा सहज लक्षांत येईल. ह्यांपैकी कांही प्रकार आमच्या वाचकांना माहीत झालेच आहेत व कांही नवे नवे बाहेर येत आहेत. बंगाली पत्रांचे बातमीदार सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध बातम्या फुगवून गिल्ला करतात. वास्तविक प्रकार कांही तितका क्रूरतेचा व अन्यायाचा नाही अशी शंका नेमस्त प्रकृतींच्या मनांत येतें. परंतु कलकत्त्याच्या स्टेट्समन नांवाच्या इंग्रज पत्रकर्त्याने व मि. प्यूसारख्या ॲडव्होकेट जनरलने समक्ष जाऊन जे प्रकार नमूद केले आहेत ते वाचून तरी सर्व शंका फिटेल अशी आमची खात्री आहे.

कर्झनसाहेबांनी आपल्या दिव्य प्रभावाने जीं सूत्रें निर्माण केलीं त्यांच्यावर फुल्लर व जॅक प्रभृति—त्यांची शिष्य मंडळी यथाशक्ति भाष्यें करून ठेवत आहेत असें म्हणण्यास हरकत नाही. ज्या गोष्टी बीजरूपाने कर्झनसाहेबांनी घालून ठेवल्या त्याच वृक्षरूपाने त्यांचे फुल्लरखान प्रमुख हस्तक पसरवीत आहेत. दिल्लीस औट घटका बादशाही सुख भोगून घेणाऱ्या उल्लू गाझीच्या शाहिस्तेखानी सुभेदारांनी प्रजाजनांचे सोदाहरण व सचित्रक तमाशे मांडल्यास त्याविषयी नवल वाटण्याचें एक प्रकारे कांही कारणहि राहत नाही. तथापि आमच्या वाचकांना पूर्व बंगाल्यांत

आज काय धुमाकूळ चालू आहे याची थोडीशी कल्पना खालील संक्षिप्त हकीगती-वरून येईल.

पूर्व बंगाल्याचे अधिपति बनलेले फुल्लर यांनी इंग्रज मुत्सद्देगिरीच्या बाह्य स्वरूपास संपूर्ण फाटा देऊन आग्यावेताळाचें स्वरूप प्रकट केलें आहे व त्यांनी आपल्या साहाय्यास जॅक–क्लार्क–इमरसन–प्रभृति मॅजिस्ट्रेट पोलिस-सेनेसह घेऊन दीन बनलेल्या प्रजेच्या अंगांतून स्वदेशीचा रस काढून त्याची पेटविलेल्या होळींत आहुति करण्याचा निश्चय केला आहे. पोलिसांच्याने सर्व कार्य शेवटास जाणार नाही म्हणून गुरखे लोक मदतीस घेण्यांत आले आहेत. ह्या गुरखे लोकांनी तर आपल्या धन्याचा रोख ओळखून त्यांच्यावरहि ताण केली आहे. लोकांना छळण्याच्या मार्गाचें अवलंबन करण्याला त्यांना आता वरिष्ठ अंमलदारांच्या हुकमाची आवश्यकता उरलेली नाही. रस्त्याने जाणाऱ्या लोकांवर हल्ले करावेत, त्यांना मारावें, झोडपावें, त्यांना जखमा कराव्या हा स्वतंत्र हक्क त्यांनी संपादन करून घेतला आहे. रस्त्याने जाणाऱ्या स्त्रिया व मुलें यांच्यावरहि ते आपली शिपाईगिरी व पुरुषार्थ गाजवीत आहेत. रस्त्याने जाणें किंवा रस्त्याच्या कडेला उभें राहणें ह्या गोष्टी इंग्रज अधि-काऱ्यांनी प्रजेवर सोडलेल्या ह्या गुरखे-पेंढाऱ्यांनी महदपराध म्हणून ठरवून टाकल्या आहेत व त्याबद्दल सोडग्यांची बक्षिसी ते सर्वांना यथास्थित चारीत आहेत. कोर्टांत जाणारे मुनसफ, नेटिव्ह मॅजिस्ट्रेट, वकील, शाळेंत जाणारीं मुलें, पोस्टाचा शिपाई, इत्यादि विविध लोक सर्व बदमाष ठरून सोडग्यांचे रट्टे खात आहेत. 'वंदे मातरम्' हा पवित्र मंत्र घरांतून कोणीं उच्चारला किंवा लिहून ठेवला तर त्यावर ह्या दूतांची धाड पडून तो मंत्र म्हणणारांची व त्या मंत्राची गठडी पोलिस-ठाण्याकडे रवाना होत आहे. दुकानदारांचा हवा तो माल घेऊन त्यांच्या हातावर किमतीचा चतुर्थांश, अष्टमांश जो वाटेल तो टाकून चालते होण्याचा गुरख्यांनी क्रम ठेवला आहे. या धुमाकुळामुळे लोक दीन झाले आहेत. वकिलांनी कोर्टांत जावयाचें सोडून दिलें. शाळा बंद पडल्या व रस्ते सुक्क झाले. एखाद्याने हिय्या करून एखाद्या मुसलमान किंवा युरोपियन माजिस्ट्रेटपुढे कागाळी केली, तर त्याची तेथेच पूजा होते. माजिस्ट्रेटनी असल्या शुष्क फिर्यादी घेण्याचें साफ नाकारलें अशींहि उदाहरणें आहेत.

एका हलवायाच्या घरावर पोलिस-अधिकाऱ्यांनी व गुरख्यांनी हल्ला केला. त्याची फिर्याद एका वकिलांनी कोर्टांत गुदरली. ते वकील अंगावर व डोक्यावर जबर जखमा होऊन इस्पितळांत पडले आहेत. मुसलमानांना नाजूक हातांनी बाजूला सारण्यांत येत असून, खुद्द फुल्लरसाहेबांनी मुसलमानाविषयी आपलें फाजील प्रेम राजरोस प्रगट केलें आहे. पकडून जाण्यांत ज्यांची पाळी येत आहे त्यांत एखादा मुसलमान आला असल्यास त्यास मुकाट्याने सोडून देण्यांत येत आहे. लोक निःशस्त्र, गुरखे पोलिस व पोलिस-अंमलदार सशस्त्र, माजिस्ट्रेट फिर्याद घेत नाहीत, कोठे दाद लावावी म्हणून तार करावी म्हटलें, तर तारवाला तार घेत नाही, गरीब रयतेचा

२१००० रुपये पगार खात असलेले लॉर्ड मिंटो नुसते फुकटचें डेप्युटेशनहि पुढे येऊं देत नाहीत. अशा कोंडमाऱ्यांत दीन-दुबळ्या रयतेची काय स्थिति होत असेल याची कल्पना निदान आम्हांला तरी करवत नाही. ज्यांच्यापासून संरक्षणाची अपेक्षा करावयाची त्यांच्याच छळामुळे लोक त्राही भगवन् होऊन राहिले आहेत, असे प्रकार ज्या ज्या ठिकाणीं झाले आहेत तेथे सर्वत्र उदास व उजाड प्रेतकळा आल्यासारखें दिसत आहे. ठिकठिकाणच्या पुढारी गृहस्थांना व पांढरपेशा लोकांना पट्टे घालून पोलिस-शिपायांची कामें करावयास लावलीं आहेत. ज्यांनी ऐकलें नाही त्यांना सांप्रत माजिस्ट्रेटपुढे आरोपी म्हणून उभे केले आहे. आठ-आठ तास कचेऱ्यांतून काम करणाऱ्या कारकुनांना सकाळीं-रात्रीं रस्त्यावरून पहारे करण्याच्या ड्यूटीवर जावें लागतें. मोठमोठ्या प्रतिष्ठित लोकांची अशा प्रकारें इज्जत घेण्यांत येत आहे.

धाकदपटशा जोराने सुरू आहेत. गावांतले प्रतिष्ठित लोक बोलावून आणून त्यांना तुम्ही गाव सोडून चालते व्हा, असें माजिस्ट्रेटकडून स्पष्ट सांगण्यांत आलें आहे. "तूं सभेला जा अगर न जा, गावांत सभा झाल्यास त्या सभेवर गुरखे सोडण्यांत येतील व दंगा होईल, त्याबद्दल तुला जबाबदार धरण्यांत येईल" असें माजिस्ट्रेटकडून कित्येकांना चकचकीत बजावण्यांत आलें आहे. तुमच्या गुरख्यांनी कांही केल्यास त्याबद्दल आपण जबाबदार नाही असें खडसावण्यांत येत आहे. घरांत सुद्धा 'वंदे मातरम्' म्हणतां कामा नये, असें माजिस्टेट चापून सांगतो! कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी सभेला तर जावयाचें नाहीच, पण विवक्षित रस्त्याने सुद्धा जावयाचें नाही. गेल्यास त्यांना सरकारी नोकरी जन्मांत मिळावयाची नाही, असे हुकूम माजिस्ट्रेटकडून प्रिन्सिपालकडे येत आहेत. कॉलेजांतल्या व शाळेंतल्या विद्यार्थ्यांचीं नांवनिशीवार रजिस्टरें घेऊन पोलिस-चौकीवर हजर राहण्याविषयी शाळेच्या व्यवस्थापकांना नोटिसा मिळत आहेत. असा एकंदर थोडक्यांत पूर्व बंगाल्यांतील कांही ठिकाणच्या स्थितीचा वृत्तान्त तिकडील देशी वर्तमानपत्रांत आला, तसा आम्हीं वाचकांपुढे ठेवला आहे. हा सर्व प्रकार जर खरा असेल तर (प्यूसाहेबांसारख्यांच्या जबानीने तो खरा ठरला आहे) हिंदुस्थानच्या निदान एका कोनांत एक प्रकारची बेबंदशाही, अराजकता किंवा रशियनशाही सुरू झाली आहे, असें म्हणण्यास कांही हरकत नाही. आम्ही रशियाच्या हकीगती वाचतों, त्यांतील वर्णनांतलाच वरील प्रकार एक वारीकसा चुटका म्हणून खुशाल खपेल, असें आम्हांस तरी खास वाटतें. व देशबांधवांची दीन व हताश स्थिति पाहून मन अत्यंत उद्विग्न होतें. रशियामध्ये स्वराज्य आहे, उभयपक्षीं शस्त्रें आहेत, दारूगोळा आहे व तेथे ज्वाला मोठी भडकली आहे. येथे सर्व हुतुतू एकांगी असल्यामुळे पेट न घेतां सर्व दडपलें जात आहे. ब्रिटिश राज्यांत एका कोपऱ्यांत का होईना, असे प्रकार इतक्या लौकर व्हावयास लागतील असें आमच्या स्वप्नांतहि आलें नव्हतें. असो; दुःखांत सापडलेल्या बंधूंचें परिमार्जन आमच्याकडून कोणत्याच प्रकारें होणें शक्य नाही.

तथापि त्यांना बाहेर एक, तर आम्हांस आंत शत — कशा लागताहेत हें आम्हांस त्यांना सांगण्यास कशाचीहि भीति वाटत नाही. ईश्वर त्यांना लवकरच सुखसमाधान देवो.

इंग्रज सरकार रशियाच्या झाराइतके गैरहिशोबी झालें आहे असें अद्याप वाटत नाही. तेव्हा आपल्या अंमलदारांना, रयतेवर अशा प्रकारे जुलूम करूं देऊं नये असें त्यांस आमचें सांगणें आहे. शस्त्रें हिसकून घेऊन ज्यांना दीन करून सोडलें आहे, अन्नावांचून ज्यांच्यांतला बहुसमाज उपाशी मरतो आहे, अशा भणंग बनलेल्या व प्रकृतीने सात्त्विक असलेल्या प्रजेवर अधिकाऱ्यांना धुमाकूळ माजवूं देणें यांत कांही मोठा पुरुषार्थ नाही. इंग्रजी राज्यांत आम्ही सर्वस्वीं निःसत्त्व झालों आहों व जवळ जवळ मृत्युपंथास लागलों, तथापि आपण शांततेंत मरत आहोंत अशी आमची खात्री आहे, ती तरी विनाकारण कां घालवतां? तारायंत्रें व न्याय-कचेऱ्या या जर बंद व्हावयास लागल्या व इंग्रजी राज्यांतली अजब चीज जी शांतता, तीच जर नष्ट व्हावयास लागली, तर इंग्रजी राज्यांतला विशेष कोठें राहिला? मुसलमान लोक आमच्या हातांत शस्त्रें देऊन आम्हांला यथेच्छ खावयाप्यावयास घालून आमच्यावर हल्ले करीत, हें एक प्रकारे उदारपणाचें तरी होतें. करिता सरकारास आमची अशी विनंती आहे की, फुल्लर प्रभृतींचें पारिपत्य करून पूर्व बंगाल्यांतील प्रजेचें व त्यांच्या द्वारे सर्व हिंदुस्थानच्या प्रजेचें सांत्वन करावें. दुबळी झाली तरी तीस कोट प्रजा तिला नेहमी धागधुगीत व संशयांत ठेवणें योग्य नाही. आम्ही आज इंग्रज सरकारच्या तलवारीने त्यांचे दास बनून राहिलेलों नाहीत. लक्ष-दीड लक्ष तलवारी तीस कोटि लोकांमध्ये कित्येकांच्या वांटणीस येणार? हिंदुस्थानवरचा इंग्रजी अंमल हिंदुस्थानच्या रयतेचा इंग्रजी नीतीवर असलेल्या विश्वासावर अवलंबून आहे व ही गोष्ट ५७ सालच्या जाहीरनाम्यांत कबूल केलेली आहे. सरकार सर्वज्ञ व सर्व शक्तिमान आहे.

त्यांना सर्व दिसतेंच आहे; परंतु प्रजेच्या विकारांचे आदर्श म्हणून आम्हांला या गोष्टी सरकारला, स्वकर्तव्य स्मरून, दाखविणें भाग आहे. सांप्रतच्या प्रसंगाला व परिस्थितीला अनुसरून तें काम जितक्या सरळ रीतीने आम्हांस करतां येईल तितकें आम्ही करीत आहों. स्वजनांची शक्य असल्यास दाद लावणें यापलीकडे हें धांवणें करण्यांत दुसरा कोणताहि हेतु आम्हांला शिवत नाही. लोकांचा असंतोष दिवसें-दिवस वाढीवर आहे. त्याला कारण केवळ ब्रिटिश राजनीतीला सुलतानी वळण लागलें हें होय. नुसत्या दांडगट लोकांच्या जुलमांना ईश्वरनिर्मितच मर्यादा असते, पण सुधारलेला जुलूम त्याहूनहि भयंकर असतो, असा मेकॉलेने अनुवाद केला आहे त्याची आठवण आम्ही सरकारास देतों. इंग्रजी राज्यांत न्याय मिळेल अशी लोकांची खात्री उडत चालली आहे, हें सरकारला इष्ट नाही. एवढेंच नव्हे तर, आम्हांलाहि इष्ट नाही. या संशयित स्थितीच्या भयंकर यातना प्रजेलाच भोगाव्या लागणार आहेत. करिता गुण्यागोविंदाने आमच्याशीं वागून निदान स्वस्थपणें तरी आम्हांस पडूं द्या, मग त्यांतच आमची काय वाट लागावयाची असेल ती लागेल, एवढें लोकांच्या

तर्फे आमचें सरकारजवळ सांगणें आहे. पूर्व बंगाल्यांत लोक आज दुःखी आहेत. उद्या आमच्यावर कदाचित् असा प्रसंग येईल हें समजून आम्ही विनंती करीत आहों. ऐकणें न ऐकणें सरकारचें काम आहे.

शेवटीं आमच्या प्रांतस्थ मंडळींना एवढीच सूचना आहे की, पूर्व बंगाल्यांतील देशबांधवांना या प्रसंगीं दुसरी कोणतीहि मदत करणें आपणांस शक्य नाही, तर निदान त्यांच्या दुःखाचे व त्रासाचे आपण वांटेकरी आहों असें त्यांना कळवून त्यांचा अंशतः तरी दुःखोपशम करणें आपलें कर्तव्य आहे. तें आपण न करणें म्हणजे आपणांस कमीपणा आणण्यासारखें व निर्घृणतेने वागण्यासारखें आहे, याचा विचार आमच्या पुढारी मंडळींनी अवश्य करावा. मद्रास, लाहोर इत्यादिकांनी या बाबतींत आपली सहानुभूति प्रगट केली आहे, तेंच महाराष्ट्राने करणें आज त्यांचें आद्य कर्तव्य आहे.

– भाला, दि. २१ डिसेंबर १९०५

---

# १५. ही सारी धडपड स्वराज्यासाठी

परमेश्वरी संकेताप्रमाणे भरत-भूमीचा व आंग्ल-भूमीचा संबंध जडून एक शतकावर जास्त वर्षें होऊन गेलीं. एवढ्या अवधींत आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें, टपालखातें वगैरे पाश्चात्त्य सुधारणा इंग्रजी राज्याच्या स्थापनेबरोबर या देशांत सुरू झाल्या व त्यांच्या योगाने हिंदुस्थानवासियांचें पुष्कळ कल्याण झालें. या व अशाच प्रकारच्या पाश्चिमात्य सुधारणांबरोबर पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीहि येथे सुरू झाली व त्यामुळे जनसमूहांत ज्ञानाचा प्रसार वाढत चालला. जसजसें हें ज्ञान वाढत चाललें तसतसें लोकांचे पूर्वीचे विचारहि बदलत चालले. "राजा हा विष्णूचा अवतार आहे" ही प्राच्च कल्पना नष्ट होत जाऊन, उलट राजा हा प्रजेचा मोठ्या दर्जाचा चाकर आहे, अशी लोकांची समजूत होत चालली व ही समजूत आता हिंदुस्थानांत किंवा जगाच्या कोणत्याहि भागांत बदलणें शक्य नाही. देशांतील प्रत्येक व्यक्तीच्या जीवितावर व मालमत्तेवर पहिली सत्ता मायदेशाची असून, कांही विवक्षित कारणांमुळे ती सत्ता मातृभूमीने राजाजवळ म्हणजे तिच्या मुख्य प्रधानाकडे दिलेली असते. सारांश, जन्मभूमि ही मालकी नसून राजा किंवा सरकार तिचा प्रधान किंवा वजीर होय. या प्रधानाच्या किंवा वजिराच्या हातांतील सत्तेचे भागीदार होण्याचा हक्क तिच्या प्रत्येक औरस पुत्राला जन्मादारभ्य आलेला असतो. जर प्रजाजन हा आपला जन्मसिद्ध हक्क बजावूं लागले, तर त्यांत ते प्रधान-द्रोह करीत नसून, फक्त आपलें वाजवी येणें प्रधानाजवळ मागत आहेत, एवढेंच समजावयाचें. हिंदुस्थानांत इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यापासून इंग्रजी मुत्सद्द्यांनी

वरील विचारांनी परिप्लुत अशींच भाषणें वेळोवेळीं केलीं आहेत व तसें करण्यांत त्यांचा मुत्सद्दीपणा व दूरदृष्टि दिसून येते.

राणी-सरकारच्या पहिल्या व्हाइसरॉयांच्या आगमनापासून तों थेट परवा लॉर्ड कर्झनसाहेबांच्या प्रयाण स्थितीपर्यंत निरनिराळ्या इंग्रज अधिकाऱ्यांचीं भाषणें व लेख नीट न्याहाळून पाहिलें असतां एवढी गोष्ट प्रत्येकाच्या नजरेस येईल की, दिवसेंदिवस जास्त जास्त राजकीय हक्क, तुम्ही सत्पात्र झाला असतां, आम्ही तुम्हांस देऊं अशीं स्पष्ट किंवा मुग्ध अभिवचनें त्यांच्याकडून वारंवार देण्यांत आलीं आहेत. हीं उत्तेजक अभिवचनें लोकांनी वाचलीं व ऐकलीं व त्याप्रमाणें त्यांची राजकीय बाबतींत विचारसरणी बनली. जर विद्येच्यायोगाने किंवा सर्वसाधारण संस्कृतीच्या योगाने आपण आपल्या अंगांत जास्त पात्रता आणली, तर वेळोवेळीं दिलेल्या अभिवचनांप्रमाणें आपणांस जास्त राजकीय हक्क मिळतील व आपली हल्लीची खालावलेली राजकीय स्थिति सुधारेल अशी लोकांची समजूत झाली. तिला मुख्य कारण सरकारी अधिकाऱ्यांचीं हीं अभिवचनें होत. लोकांच्या मनांत प्रादुर्भूत झालेल्या राजकीय महत्त्वाकांक्षेचे हे अंकुर आता बाहेर पडत आहेत व थोड्याच अवधींत हे फोफावूं लागतील असा रंग दिसत आहे. अशा वेळीं हे अंकुर खुरडून किंवा कापून टाकण्यांत कोणत्याहि प्रकारचा मुत्सद्दीपणा नाही. उलट या अंकुरांना सक्रिय सहानुभूतीचें सिंचन करून त्यांना वाढूं द्यावेत व त्यांचे मोठमोठे वृक्ष बनल्यावर त्यांच्या शितल छायेखाली स्वस्थ घोरत पडून "आम्हीं आपलें कर्तव्य (mission) केलें या सात्त्विक व सगर्व आनंदांत तल्लीन राहवें यांतच खरा मोठेपणा व खरी मुत्सद्देगिरी आहे. परंतु हल्ली जी इंग्लंडांत 'साम्राज्यवादित्वा'ची अनावर लाट उसळली आहे त्या लाटेचे पुष्कळसे फेसाळलेले तुषार भरत-भूमीवर पडत आहेत. त्यामुळे फारा दिवसांनी उद्दीपित झालेला हिंदी लोकांचा उत्साह भिजून ओलाचिंब होत आहे. 'साम्राज्यवादित्वा'ची लाट आमची राजकीय महत्त्वाकांक्षा आपल्या जलसंचयाने बुडवून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळीं जर आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या कंबरेला दृढनिश्चयाचा एक व दीर्घो-द्योगाचा दुसरा असे दोन पळे आपण बांधले नाहीत, तर या उसळलेल्या लाटेचें पाणी नाकातोंडांत शिरून ती लौकरच गुदमरून मरून जाईल.

ज्या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या जीविताबद्दल आपणांस एवढी काळजी व खबरदारी बाळगली पाहिजे ती कोणत्या स्वरूपाची आहे हें अगोदर प्रत्येकाला स्पष्टपणें कळलें पाहिजे. नाही तर विनाकारण गैरसमज उत्पन्न होऊन एकापाठीमागून एक अनर्थाची परंपरा लागत बसण्याचा संभव आहे. आज जर कोणत्याहि सुशिक्षित माणसाचा हात एकदम अचानक जाऊन धरला किंवा तो गाढ झोपेंत घोरत पडला असतां, एकदम त्याला जागें केलें व असा प्रश्न केला की, "भल्या मनुष्या, तुझ्या राजकीय महत्त्वाकांक्षेची अंतिम सीमा कोणती आहे? काय प्राप्त झालें असतां राजकीय

बाबतींत क्षुब्ध झालेली तुझी क्षुधा तृप्त होऊन जाईल?" तर त्याचें झटकन् उत्तर हेंच येईल की, जर सरकारने उदार होऊन आम्हांस 'स्वराज्य' (Home Rule) दिलें, तर आमची राजकीय क्षुधा तृप्त होईल. हें जें चिरापेक्षित स्वराज्य प्रत्येक सुशिक्षित मनुष्याच्या डोळ्यासमोर रात्रंदिवस घिरट्या घालीत आहे, पण जें त्याच्या आटोक्याच्या बाहेर सदैव राहत आहे, तें स्वराज्य मिळण्यासाठी त्याच्या जिवाची तळमळ व देहाची धडपड एकसारखी चालू आहे. ही तळमळ किंवा ही धडपड राजद्रोहाच्या बुद्धीने अस्तित्वांत आलेली नाही हें कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. या तळमळीच्या व धडपडीच्या बुडाशीं राजनिष्ठाहि आहे व देशनिष्ठाहि आहे. आंग्ल साम्राज्याच्या छायेखाली हें स्वराज्याचें रोपटें लावून त्याची चांगली मेहनत-मशागत करून, त्याला उत्तम मधुर फळें आणावींत अशी प्रत्येक सुशिक्षित मनुष्याची हाव आहे व याबद्दल त्याला कोणीहि नांवें ठेवूं शकणार नाही. हें स्वराज्य आपणांस प्रयत्नांतीं मिळेल अशा आशेचे अंकुर सुशिक्षित लोकांच्या मनांत सन १८५८ सालच्या राणी-सरकारच्या जाहीरनाम्याने उत्पन्न केले आहेत. जोंपर्यंत तो जाहीरनामा रद्द न होतां आमच्या डोळ्यासमोर सजीव दिसत आहे तोंपर्यंत ही आमची राजकीय हाव आमच्या मनांतून कधीहि हालणार नाही.

स्वराज्य मिळविण्याची ही हाव आमच्या हाडामांसांत व रक्तांत दिवसेंदिवस जास्त मुरत चालली आहे. लौकरच असा एक दिवस उगवेल की, ज्या वेळेस ती हिंदी लोकांच्या रक्तांतील अनेक द्रव्यांपैकी एक द्रव्य होऊन बसेल. एकदा का ही राज-निष्ठ हाव आमच्या रक्तांत पक्की मिसळून गेली म्हणजे कलम १२४ (अ)च्या अनेक प्रयोगांनी ती त्या रक्तापासून पृथक होणार नाही. या उदात्त हावेचें बीज हिंदी लोकांच्या मनांत घालण्याचें सर्व श्रेय ख्रिस्तवासी राणीसाहेबांना आहे. या उदार साध्वीने जर ही १९५८ च्या जाहीरनाम्याची सनद आम्हांस देऊन आमच्या राजकीय हावेला योग्य मार्ग दाखविला नसता, तर ही स्वराज्याची कल्पना हिंदी लोकांच्या मनांत इतक्या लौकर प्रादुर्भूत झाली नसती व त्यांची राजकीय प्रगति वाट न मिळाल्यामुळे कुंठित झाली असती. पण आपल्या इतर लेकरांप्रमाणे आपल्या हिंदी लेकरांचीहि राजकीय उन्नति व्हावी अशी सदिच्छा त्यांच्या मनांत वसत असल्या-कारणाने या हिंदी लोकांच्या मोठ्या सनदेवर (Mangna Charta) त्यांनी आपली सही घातली व स्वराज्यासाठी आपल्या काळ्या रंगाच्या लेकरांनी झटत राहवें अशाबद्दल आपली पूर्ण संमति दिली म्हणून आता साम्राज्यवादित्वाच्या कल्पनेचा कितीहि जयजयकार झाला तरी, हिंदी लोकांच्या 'स्वराज्य' मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेला अल्पहि आळा बसण्याचा संभव नाही. आता ही महत्त्वाकांक्षा दिवसेंदिवस जास्त जोरावत जाईल, ती कांही केल्या दबणार नाही, ती भेवडावणी-मुळे नामशेष होणार नाही, ती निराशेने वठून जाणार नाही, उलट प्रत्येक भेवडावणीस ती जास्त जोराने तोंड देईल. प्रत्येक निराशामय प्रसंगाने ती जास्त

प्रफुल्लित होईल व वाढत्या वयाबरोबर तिचें तारुण्य एकसारखें वाढत राहील. अशी ही सोज्वल महत्त्वाकांक्षा चिरडून टाकण्यांत कांही अर्थ नाही व तसें करण्यांत साम्राज्यवादी लोकांना यशहि येणार नाही. वास्तविक रीतीने पाहिलें असतां हिंदी लोकांची ही महत्त्वाकांक्षा फलान्वित करण्याचें श्रेय सरकारने आपण होऊन ध्यावयास पाहिजे. सरकारास शहाणपण शिकविण्याची आमची योग्यता नाही; परंतु आमचें असें मत आहे की, सरकारकडून या महत्त्वाकांक्षेला साहाय्य देण्यांत येत नाही ही मोठी चूक आहे. सरकार या महत्त्वाकांक्षेला साहाय्य देवो किंवा न देवो, तरी या महत्त्वाकांक्षेंत असा अंगभूत व अदृश्य जीवटपणा आहे की, ती आपणहून बऱ्यावाईट प्रसंगीं सर्वत्र फैलावेल व सरतेशेवटीं विजयी व यशस्वी होईलच होईल.

वरती लिहिलेलें स्वराज्य इंग्रजी साम्राज्याच्या छत्राखाली सुखाने राहणाऱ्या गोऱ्या वसाहतींना मिळालें आहे व यामुळे या वसाहतींत कोणत्याहि प्रकारची धुसफूस किंवा कुरकूर नाही. इंग्रजी साम्राज्यांत अंतर्भूत असलेल्या फक्त दोन हतभागी देशांना या स्वराज्याचा मेवा खावयास मिळत नाही आणि म्हणूनच राजकीय क्षुधेने व्याकुळ होऊन हे दोन देश कंठशोष करीत आहेत. हे दोन देश म्हटलें म्हणजे आयर्लंड व हिंदुस्थान होत. या स्वराज्याबद्दल आयरिश लोकांची आज बरींच वर्षे धडपड चालली आहे व आज अशी सोन्याची वेळ आली आहे की, जर इंग्लंडचे नवीन झालेले प्रधान सर बॅनरमन हे आपल्या वेळोवेळीं केलेल्या भाषणाबरहुकूम अधिकारारूढ असतां आपलें वर्तन ठेवतील, तर इंग्लंडच्या कुशींत काट्याप्रमाणे सलणारा आयर्लंड देश त्या देशाच्या भोवतीं एक अभेद्य तट होऊन बसेल. ज्याप्रमाणे आयरिश लोकांची स्वराज्यासाठी धडपड आज इतकीं वर्षें चालली आहे त्याप्रमाणेच हिंदी लोकांच्या धडपडीला सुरुवात नुकतीच झाली आहे. भरतभूमीच्या जागजागीं विद्ध झालेल्या शरीराला निरनिराळ्या राजकीय सुधारणेच्या पट्ट्या मारून तिचे पूर्वीचें आरोग्य तिला पुनरपि प्राप्त होणार नाही अशी ठाम समजूत हिंदी लोकांची होत चालली आहे. राजकीय आरोग्याची जोड तिला पुनरपि करून देणें असल्यास 'स्वराज्या'चा सार्सापरिला तिला यथेच्छ व मनमुराद पाजला पाहिजे, असें राजकीय धन्वंतरी आपलें मत देऊं लागले आहेत. 'हा सार्सापरिला तिला द्या' हेंच तिचा प्रत्येक पुत्र सरकारजवळ मागत आहे व असें जर तो करीत आहे, तर त्यांत तो कोणताहि प्रकारचा राजद्रोह करीत नाही. "गोऱ्या वसाहतींप्रमाणे आम्हांस वागवा, त्यांच्याप्रमाणे आम्हांस स्थानिक स्वातंत्र्य द्या व त्यांच्याप्रमाणे आमची राजकीय उन्नति करा" असें रास्त व वाजवी मागणें केल्याबरोबर हें मागणारा मनुष्य राजद्रोह करतो अशांतली मुळीच गोष्ट नाही. असें मागणें केल्याबरोबर जर त्यांत राजद्रोहाची छटा दिसत असेल, तर मग हिंदी लोकांचा निरुपाय आहे. स्थानिक स्वातंत्र्याची ऊर्फ स्वराज्याची मागणी कितीहि राजद्रोहाची हाकाटी केली तरी, हिंदी लोक आता यापुढे करीत राहणारच. मग अशी मागणी केल्याबरोबर कॉटन-

साहेब रुसून जावोत किंवा दुसरे एखादे साहेब रागावून जावोत. हिंदुस्थानांत हिंदी लोकांचें पार्लमेंट वसून त्याने सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवावा व प्रत्येक स्थानिक पार्लमेंटने एक एक प्रतिनिधि निवडून देऊन त्यांचें एक मुख्य प्रधान मंडळ नेमून त्याने 'ग्रेट ब्रिटन'चा नव्हे तर 'ग्रेटेस्ट ब्रिटन'चा राज्यकारभार चालवावा अशी स्थिति येईपर्यंत, हिंदी लोक काय किंवा आयरिश लोक काय, एकसारखे सरकारपाशीं भांडत राहणारच. असें हें प्रधान-मंडळ निर्माण झाल्यावर त्याचा वटहुकूम सर्व ब्रिटिश राज्यांत शिरसावंद्य होऊन जाईल. असें हें प्रधान मंडळ हिंदुस्थानच्या सरहद्दीवर जाऊन उभें राहिलें म्हणजे त्याच्या पाठीवर तीस कोटि हिंदी लोक, चार कोटि इंग्लिश व स्कॉट लोक, पन्नास लक्ष आयरिश लोक व चार कॉलनींतील सर्व लोक उभे राहतील. या प्रधान मंडळापुढे रशियाचा झार किंवा जर्मनीचा कैसर थरथर कापून राहील. या प्रधान मंडळाकडे वक्र दृष्टीने पाहण्याची छाती जगांतील कोणत्याहि राष्ट्राची होणार नाही. म्हणून असें अति बलिष्ठ प्रधान-मंडळ निर्माण करण्याकरिता आयर्लंडला व हिंदुस्थानला स्वराज्य जरूर देण्यांत यावें. हें स्वराज्य आयरिश व हिंदी लोकांना दिल्यावर इंग्रज लोकांचें नुकसान होण्याचा बराच संभव आहे. पण हा विचार क्षुद्र अतएव त्याज्य आहे.

हें स्वराज्य प्राप्त करून घेण्यासाठी इंग्लंडांत एक हिंदी लोकांची 'होमरूल सोसायटी' स्थापन झाली आहे. ही सोसायटी ज्यांनी अस्तित्वांत आणली त्यांच्या दूरदृष्टीबद्दल व धाडसाबद्दल जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे. अशा तऱ्हेच्या मंडळ्या हिंदुस्थानांत जागजागीं स्थापन झाल्या पाहिजेत. ह्या मंडळ्यांतून सभासद होण्याची इच्छा प्रत्येक जातिवंत हिंदी मनुष्याने धरली पाहिजे. या मंडळ्यांच्या प्रधान हेतूचा प्रसार शहरांतून व खेड्यापाड्यांतून करण्यासाठी प्रत्येकाने कंबर कसली पाहिजे. अशा या मंडळ्या जागजागीं स्थापन होऊन त्यांनी आपल्या हेतूप्रमाणे काम करण्यास मनापासून सुरुवात केल्याबरोबर आपमतलबी साम्राज्यवादी लोक एकच काहूर उडवून देतील. मग राजद्रोहाची हाकाटी बऱ्याच जोराने करण्यांत येईल व राजनिष्ठ लोकांच्या विरुद्ध नसतीं कुभांडें रचण्यांत येतील. तरी अशा वेळीं लोकांनी परमेश्वरावर सर्वस्वीं भार टाकून आम्ही मागे एकदा लिहिल्याप्रमाणे "उजव्या हातांत देशाभिमानाचा भाला व डाव्या हातांत राजनिष्ठेची ढाल घेऊन खुशाल लढत राहवें." प्रयत्नास यश देणें किंवा न देणें हें त्या जगच्चालक प्रभूच्या मर्जीवर अवलंबून राहील.

हें स्वराज्य मिळविण्यासाठी कंबर कसण्यापूर्वी लोकांनी आपल्या अंगीं दोन कलांचें ज्ञान अवश्य साठवून ठेवलें पाहिजे. या दोन कला अवगत असल्याशिवाय त्यांच्या प्रयत्नांना यश येण्याची मुळीच आशा नको. या दोन कलांत पारंगतता असल्यावर दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची जरुरी नाही. या दोन कलांसारख्या फलदायी व बिनधोक कला दुसऱ्या कोणत्याहि नाहीत. त्या दोन कला म्हटल्या

म्हणजे ओरडण्याची कला (The art of shouting) व सोसण्याची कला (The art of suffering) होत. या दोन कलांचीं दोन आयुधें हातांत असल्यावर मग दुसऱ्या शस्त्रांची मुळीच जरुरी नाही. तलवार, बंदूक, तोफ, भाला, बरची वगैरे शस्त्रांपेक्षा हें शस्त्रद्वय जास्त मारक आहे. जें आपलें हृद्गत असेल तें स्पष्ट ओकून टाकावें व मग तें कोणास रुचो अथवा न रुचो. आपलें म्हणणें सफेती न करतां सरकारपुढे मांडावें, मग त्यांत सरकारला कांही दिसो. जर आपल्या रास्त म्हणण्याचा विपर्यास होऊन वेडावाकडा प्रसंग ओढवला, तर दीनदयाळ व अनाथनाथ प्रभूवर सर्वस्वीं भार टाकून स्वस्थ बसावें. जो कांही वेडावाकडा प्रसंग ओढवेल त्याला तयार होऊन राहवें. अंतःकरण शुद्ध असून, त्यांतून निघणारा हेतु जर त्याप्रमाणेच शुद्ध असेल तर हालअपेष्टांच्या खळखळाटाने तो जास्त शुद्ध होईल. सोसण्याच्या कलेने आजपर्यंत मोठमोठ्या प्रयत्नांना यश आलें आहे. ज्या वेळेस ख्रिश्चन धर्माचा नुकताच प्रादुर्भाव झाला होता त्या वेळेस आपल्या धर्माचा विजय व्हावा या हेतूने त्या वेळच्या ख्रिश्चनधर्मीय लोकांनी या कलेचा स्वीकार केला व त्यामुळे त्यांचा पक्ष जास्त जोरावत गेला. मुसलमानांच्या अमदानींत हिंदु लोकांनी या कलेचा पूर्ण अभ्यास केला व म्हणूनच त्यांचा धर्म अवरंगजेब बादशहाच्या कडव्या अमलांतहि जिवंत राहिला. आयरिश लोक या सोसण्याच्या कलेला इतके दिवस बिलगून राहिले म्हणूनच त्यांना स्वराज्य मिळण्याची वेळ आता आली आहे. म्हणून आमच्या सर्व देशबांधवांना आमचें असें अत्याग्रहाचें सांगणें आहे की, जर तुम्हांस स्वराज्य Home Rule) पाहिजे असेल, तर वरती सांगितलेल्या दोन कलांचें ज्ञान अगोदर पैदा करा व मगच पुढे पाऊल टाका. नाही तर नशिबावर हवाला टाकून स्वस्थ बसा.

– भाला, दि. १ जानेवारी १९०६

## १६. सूर्याजी मालुसरे व सूर्याजी पिसाळ

देशसेवेसारखें पुण्य नाही व देशद्रोहासारखें पाप नाही. ब्राह्मण-भोजनें घालणें, देवालयें बांधणें, धर्मशाळा उभारणें, वेदशाळा स्थापन करणें इत्यादि अनेक पुण्यकर्में निरनिराळ्या स्मृतिकारांनी सांगितलीं आहेत. हीं पुण्यकर्में केलीं असतां इहलोकांतील जीवनयात्रा सुखकर होऊन या मृत्युलोकांत देह ठेवल्यावर परलोकींहि अशा पुण्यकर्में करणाऱ्या विभूतीच्या आत्म्याला सद्गति मिळते. सुरापान, परस्वहरण, गुरु-स्त्रीगमन इत्यादि घोर पातकें केलीं असतां अशा नराधमाचें अंतःकरण या लोकीं तीळ तीळ झिजून पृथ्वीवरील मूळची शुद्ध हवा त्याच्या पापी श्वासोच्छ्वासांनी

दूषित होण्याचें बंद झाल्यावर परमेश्वरी दरबारांत त्याचा न्याय होऊन त्याच्या पापाप्रमाणे त्याला शिक्षा मिळते. पुण्यवान् मनुष्याला कवटाळतांना जगदीशाच्या हृदयांत जें प्रेम वसत असतें तें प्रेम पापी माणसाला झिडकारतांना पार नाहीसें होतें. तो पुण्यवान् महात्म्यांना स्वर्गीय सुखाचे वांटेकरी करतो. तर पापी दुरात्म्यांना 'नरकीय' यातनांनी जर्जर करून सोडतो. परमेश्वर न्यायी आहे, तो दयाळु नाही. मनुष्याच्या पाप-पुण्याप्रमाणे तो त्याला शिक्षा किंवा सुख देतो. पण तो कधी कोणावर दया करीत नाही. त्याच्या हातांत न्यायाचा काटा आहे. त्याचे हात दयेच्या नवनीताने माखलेले नाहीत. म्हणून पुण्यवान् मनुष्याला त्याच्या पुण्याप्रमाणे सुख मिळतें व पापी मनुष्याला त्याच्या पापाप्रमाणे शिक्षा होते. पुण्य व पाप हीं दोन्ही श्रान्त असल्याकारणाने त्यांच्याबद्दल मिळणारें सुख किंवा दुःख हीं सुद्धा मर्यादित आहेत. पुण्याला शेवट आहे व पापालाहि शेवट आहे. म्हणून पुण्यजन्य सुखाला व पापजन्य दुःखाला शेवट आहे. असें जरी आहे तरी असें एक पुण्य आहे की, जें साधलें असतां पुढे मिळणाऱ्या सुखाचा कधीहि अंत होत नाही, व असें एक पाप आहे की, जें केलें असतां भावी होणाऱ्या दुःखाचा कधीहि शेवट होत नाही. असें अंतरहित पुण्य म्हटलें म्हणजे देशसेवा होय व असें अंतरहित पाप म्हटलें म्हणजे देशद्रोह होय. देशसेवेच्या पुण्याबद्दल परमेश्वराकडून मिळणारें सुख अक्षय्य असतें. देशद्रोहाच्या पातकाबद्दल मिळणारें दुःख निरंतर असतें. जन्मास आल्यावर मनुष्याने हें देशसेवेचें पुण्यकर्म केल्याशिवाय राहूं नये व देशद्रोहाचें पापकर्म आपल्या हातून होऊ देऊं नये. जर हें पुण्यकर्म करण्याची व हें पापकर्म टाळण्याची पूर्ण खबरदारी त्याने घेतली, तर मग त्याला इहलोकीं किंवा परलोकीं कशाचीहि भीति बाळगावयास नको. इतर पुण्यकर्में किंवा पापकर्में स्थलविशेषाने, कालविशेषाने व व्यक्तिविशेषाने बदलतात; पण हें देशसेवेचें पुण्य व देशद्रोहाचें पातक कधीहि बदलत नाही. हीं त्रिकालाबाधित असतात.

परमेश्वराने जी कांही आयुर्मर्यादा आपणांस दिली आहे तींत ज्या भूमीने आपणांस जन्म दिला तिची मनोभावें व इमानेइतबारे सेवा करणें हें प्रत्येक जातिवंत पुत्राचें पहिलें व शेवटचें कर्तव्यकर्म आहे. आपल्या जन्मदात्या व अन्यदात्या माय-भूमीशीं मातागमनीपणा करून तिच्या मऊ मांडीवर ममतेने लोळण्याऐवजीं तिच्या छातीवर पिशाच्याप्रमाणे थयथय नाचणें हाच देशद्रोह आहे. हें देशद्रोहाचें पातक पंचमहापातकांपेक्षा जास्त घोर व अक्षम्य आहे. हें पातक करणाऱ्या नीचात्म्याला मिळणारी ईश्वरी शिक्षा कधीहि संपत नाही. अशा अधमाला कधीहि मुक्ति मिळत नाही व त्याच्या आत्म्याला छळणाऱ्या दैविक यातना कधीहि संपत नाहीत. उलट-पक्षीं देशसेवेचें अक्षय्य पुण्य ज्या भाग्यवान् मनुष्याने एकदा गाठीं बांधलें त्याने कायमचें ऋण जगदीशाच्या गळचांत बांधलें असें म्हणावयास हरकत नाही. "देश-सेवेचें हें भांडवल कितीहि स्वर्गीय सुखोपभोग मिळाला तरी एक पैनेहि कमी होत नाही. देशसेवेच्या भांडवलावरील व्याज फेडतां फेडतां परमात्म्याला जड जातें. हें

पुण्य पदरीं पाडण्यास पैसा लागत नाही व विद्वत्ता लागत नाही. याला कुलीन घराणें लागत नाही किंवा उत्तम पदवी लागत नाही. या पुण्याची जोड होण्यास फक्त देशभक्तीने थबथबलेल्या हृदयाची आवश्यकता आहे. असें हें ओलें हृदय असल्यास त्यांतून पसरणाऱ्या ओलाव्याने इतर इंद्रियांतील काठीण्य नाहीसें होऊन तीं कार्यक्षम होतात व मग ही देशसेवा घडून पदरीं अविनाशी पुण्याची साठवण होते. हें पुण्य एकदा पदरीं पडल्यावर कशाचीहि अपेक्षा नको. आत्म्याच्या नित्यत्वाप्रमाणे हें पुण्य नित्य आहे. असें पुण्य ज्या महात्म्यांनी आपल्या आयुष्यांत संपादन केलें ते खरोखरच भूदेव होत. त्यांच्या देशसेवेच्या कथा गंगायमुनांप्रमाणे पवित्र व पावन होत. या कथासरितांत गाढ अवगाहन करून भेकड माणसाने आपल्या भीरुत्वरूपी दोषांचें क्षालन करून टाकावें. देशसेवारत महात्म्यांच्या या उन्नतिकारक कथाश्रवणाने प्रत्येक मनुष्याने आपले कर्ण व हृदय पुनीत करून घ्यावें. या कथामृताने अमर झालेलीं हृदयें देशसेवेंत झिजवून आयुष्याचा शेवट गोड करून घ्यावा. देशभक्तांचीं जीवन-चरित्रें जितकीं गोड आहेत त्यापेक्षा देशभंजकांचीं जीवन-चऱ्हाटें जास्त कडू आहेत. पहिलीं मनें रिझवितात तर दुसरीं मनें झिजवितात. पहिलीं मनांत आशातंतु उत्पन्न करतात, तर दुसरीं मनांतील आशातंतु तोडून टाकतात. पहिलीं खरा मार्ग दाखवितात, तर दुसरीं तो मार्ग दडवून ठेवतात. पहिलीं हृदयें तोषवितात, तर दुसरीं हृदयें दूषवितात. सारांश, देशभक्तांचीं जीवन-चरित्रें तारक आहेत, तर देशभंजकांचीं जीवन-चऱ्हाटें मारक आहेत. हीं जीवन-चरित्रें वाचकांच्या मनांत नवीन जीव घालतात. तीं जीवन-चऱ्हाटें वाचकांच्या गळ्यांना गळफास लावतात. म्हणून प्रत्येक मनुष्याने पहिलीं चरित्रें वाचावींत व दुसरीं चऱ्हाटें टाळावींत. शिरोलेखांत लिहिलेल्या सूर्याजी द्वयांच्या कृतींकडे पाहिलें असतां देशभक्ताच्या व देशभंजकाच्या कृतींतील फरक आमच्या प्रिय वाचकांच्या तेव्हाच लक्षांत येईल. एकाने सिंहगड कमावला तर दुसऱ्याने रायगड गमावला. एकाने देशसेवा केली, तर दुसऱ्याने आत्मसेवा केली. एकाने देशकार्य केलें, तर दुसऱ्याने आत्मकार्य केलें. एकाने जन्मभूमीला हसविलें, तर दुसऱ्याने तिला ओक्साबोक्सी रडविलें. सारांश, एकाने 'महात्मा' या स्पृहणीय पदवीची जोड करून घेतली, तर दुसऱ्याने 'नीचात्मा' ही बिनतोड पदवी संपादन केली. एक देशाभिमानाचा रम्य पुतळा होय, तर दुसरा देशद्रोहाचा हिडीस ठोकळा होय. पहिल्याने आपले 'सूर्याजी' नांव सूर्याप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर चमकून सार्थ केलें, तर दुसऱ्याने आपलें 'पिसाळ' हें आडनांव पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे देवबांधवांच्या शरीराचे निष्कारण चावे घेऊन अन्वर्थक केलें. सारांश, या सूर्याजी द्वयांचीं चरित्रें अतिशय बोधपर व सन्मार्गदर्शक आहेत. त्यांच्या चरित्रापासून आपण कोणता बोध घ्यावा हें आम्ही आमच्या प्रिय महाराष्ट्रीय वाचकांस थोडक्यांत दाखविणार आहों.

सन १६७० नुकताच सुरू झाला होता. मराठी राज्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्र-

भूमींत ठोकून अजून पुरें पाव शतक झालें नव्हतें. महाराष्ट्र-भूमीच्या राजकीय नभोमंडळाच्या क्षितिजावर मराठ्यांचा स्वातंत्र्यरवि आता आपल्या बाल-किरणांनी प्रकाशूं लागला होता व इस्लामी सत्तारूपी मेघावडंबर लौकरच या सूर्याच्या चंड-किरणांनी वितळून जाऊन पारतंत्र्याने गारठलेल्या महाराष्ट्र-भूवर स्वातंत्र्याचें जीवनदायक ऊन पुनरपि पडण्याचा रंग येऊन ठेपला होता. या वेळीं महाराष्ट्रांत जागजागीं असलेल्या गडांच्या आधाराने मोंगली सत्ता जेमतेम तग धरून राहिली होती. या सत्तेला तेथून हुसकावून देऊन हे गड आपल्या हस्तगत करण्याचा उपक्रम शिवबाने सुरू केला होता. त्या कामीं त्यांना जगदंबेच्या कृपेने पूर्ण यश आलें. हे गड काबीज करण्याच्या कामीं ज्या मराठी वीरांनी आपल्या पराक्रमाची व मर्दुमकीची शर्थ केली त्या सर्वांत अग्रणी तानाजी मालुसरे होत. त्यांनी केलेल्या पराक्रमाला जगाच्या इतिहासांत तोड नाही व त्यांनी केलेल्या देशसेवेला माप नाही. सिंहगडावर मोंगलांचा रजपूत सरदार उदेभान याने आपल्या हाताखालील शूर वीरांच्या जोरावर मुसलमानांचें हिरवें निशाण उभारलें होतें. तर रायगडावर मराठ्यांचा भगवा झेंडा त्याची जागा पटकवण्यासाठी एकसारखा थयथय नाचत होता. पुण्यापासून दहा मैलांवर असलेल्या सिंहगडावर मुसलमानी चांद चमकतो आहे हें पाहून शिवबांच्या वीर्यशालिनी मातोश्रीला चैन पडेना व त्या शिवबाला स्वस्थ बसूं देईनात. वास्तविक रीतीने पाहिलें असतां त्या क्षत्रिय कुलोत्पन्न वीरप्रसू माउलीला प्रत्यक्ष आपल्या व वाडवडिलांच्या मालकीच्या देशांत असलेल्या गडांवर परकीयांच्या सत्तेचा अंमल सहन होऊं नये यांत कांही वावगें नव्हतें. रायगडाप्रमाणे सिंहगडावरहि मराठ्यांचा भगवा फडफडावा अशी त्या साध्वीची उत्कट इच्छा होती व ती तिने शिवबाला कळविली. आपल्या जन्मदात्या मातेचें कोड पुरविण्यास सदा तत्पर असणारे महाराज आईची इच्छा ऐकून स्वस्थ बसणारे नव्हते. त्यांनी लगेच आपल्या सरदारांपैकी अति शूर व अति धाडसी असा सरदार जो तानाजी त्याला बोलावून आणलें व सिंहगड जिकण्यास त्याला आज्ञा केली.

सतराव्या व अठराव्या शतकांत मर्दुमकीचें कृत्य करण्यास आज्ञा मिळाली असतां जितका आनंद मराठी सरदारांना होत असे तितका आनंद दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीने होत नसे. दुसरीं शेकडो कामें एकीकडे सारून मराठी वीर असे पराक्रम करण्यास उड्या घेत असत. मर्दुमकी गाजवून विजयश्रीच्या मर्दानी माळा गळ्यांत लटकावून ते एक तर धन्याला परत येऊन भेटत, नाही तर असिधारातीर्थी कायमची जलसमाधि घेऊन आपला व आपल्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करीत. सिंहगड हस्तगत करण्याची आज्ञा शिवबाकडून आल्याबरोबर चार दिवसांनी होणाऱ्या मुलाच्या लग्नाची पर्वा न करतां तानाजीने आपल्या हाताखालील हजार मराठी वीरांच्या तुकडीचे दोन भाग केले. एका भागाचें पुढारीपण त्याने स्वतः स्वीकारलें व दुसरा भाग त्याने आपला कनिष्ठ बंधु जो सूर्याजी त्याच्या स्वाधीन

केला. काळोखांतून मजल मारून मध्यरात्र उलटून गेल्यावर त्याने सिंहगडचा पायथा गाठला. घोरपडीच्या साहाय्यानें तटावर चढून आपल्या हाताखालील पांचशे वीर किल्यांत घेतले. पण इतक्या लोकांची चाहूल किल्ल्यावरील रखवालदारास लागली व त्यांनी भयसूचक कर्णा फुंकला. थोडयाच वेळांत किल्ल्यावरील मोंगली शिबंदीचें व त्या तानाजीच्या कुडीचें तुमुल युद्ध जुंपलें. उभय बाजूंच्या वीरांच्या मुखावाटें रण-गर्जना सुरू झाल्या. समशेरीवर समशेरी खणखणूं लागल्या व चेंडूप्रमाणे वीरांचीं मस्तकें धडापासून वर उडूं लागलीं. उदयभानूची व तानाजीची गाठ पडल्यावर ते एकमेकांवर चित्त्याप्रमाणे तुटून पडले. दोघांनीहि थोडयाच वेळांत आपले मर्त्य देह तेथे टाकून देऊन सूर्यलोकाची वाट धरली. आपला सरदार पडला हें पाहून मराठी वीरांचें धैर्य पळालें. त्यांच्याच्याने पुढे लढवेना व आपल्या तलवारी शत्रूंवर चालवेनात. भयाने त्यांचीं हृदयें कापूं लागलीं व त्यांनी शत्रूकडे पाठ वळवून पळावयास सुरुवात केली.

तानाजीच्या तुकडींत पळापळ सुरू होण्यापूर्वीच सूर्याजीची तुकडी तट चढून वरती आली होती. दुसऱ्या बाजूने हल्ला चढविण्याची सूर्याजीची तयारी झाली होती. आता तो हल्ला करण्याच्या पूर्वी 'हर हर महादेव' म्हणण्याच्या अगदी बेतांत होता. इतक्यांत आपण उभें आहोंत त्या दिशेने कोणी धावत येत आहे असा आवाज त्याला ऐकूं येऊं लागला. तो कानोसा घेत आहे इतक्यांत त्याला आपल्याकडे पळत येणारीं माणसें अस्पष्ट दिसूं लागलीं. आपल्या भावाच्या तुकडीने दाणादाण केल्यामुळे किल्ल्यावरील शिबंदींतील लोक सैरावैरा पळताहेत असें समजून त्याने आपली फार दिवस तान्हेलेली तलवार बाहेर काढली व ती पळत येणाऱ्या लोकांकडे दाखवून तो म्हणाला, "मराठ्यांनो, आताच तुमच्या शूरत्वाची पारख आहे. तृषार्त झालेल्या तुमच्या तलवारींना शत्रूंच्या रक्ताचें यथेच्छ प्राशन करवा." हे शब्द त्याच्या तोंडांतून पुरतेपणीं निघाले असतील किंवा नसतील तोंच ते पळत येणारे शिपाई आता अगदी जवळ येऊन ठेपले. त्याने आपली समशेर उभारली. आता तो 'हर हर महादेव' म्हणणार व तलवार चालवणार तोच त्याच्या डोळ्याला विलक्षण प्रकार दिसला व त्याच्या छातींत एकदम धसका बसला. त्याची उभारलेली समशेर आपोआप खाली आली व त्याच्या डोळ्यापुढे अंधारी आली. क्षणभर त्याने डोळे मिटले व पुन्हा ते तत्काळ उघडले. आपल्या डोळ्यापुढे जें दिसत आहे तें खरें आहे किंवा नाही हें ठरविण्यासाठी त्याने त्यांच्यावरून हात फिरविला व गाढ अंधारांत नीट न्याहाळून पाहिलें. कधीहि न घडलेली व कधी न घडणारी गोष्ट पाहून त्याला मनस्वी राग आला. त्याचे डोळे रागाने लालबुंद झाले. त्याचें सर्व शरीर आंत उसळणाऱ्या त्वेषाच्या लाटांनी थरथर कापूं लागलें. तो आपला ओठ क्रोधाने चावूं लागला व तो कर्दनकाळासारखा दिसूं लागला. सूर्याजीच्या चेहऱ्यांत हा फरक एकाएकी कशामुळे पडला बरें! 'हर हर महादेव' म्हणून समशेर चालविण्याच्या

ऐवजीं त्याला इतका अनावर राग येण्याचें कारण काय असावें बरें? त्याचे शिपाई शत्रूंवर तुटून पडण्यास मागेपुढे पाहूं लागले काय? छेः, तशांतला कांही एक प्रकार नव्हता. सूर्याजीसारखा पुढारी असतां ते कच खातील असें कधीहि घडून आलें नसतें. सूर्याजीच्या रागाचें कारण निराळेंच होतें. जे शिपाई त्याच्याकडे पळत आले व ज्यांचा खरपूस समाचार घेण्याकरिता तो इतका आतुर झाला होता ते मोंगलांकडील शिपाई नव्हते. ते त्याचेच जातभाई होते. त्याच्याच वडील भावाच्या हाताखालील शिपाई—ते महाराष्ट्र-भूमींत जन्मलेले व तिच्यावर पोसलेले मराठे होते. सूर्याजीने मराठे पळतांना आजपर्यंत कधीहि पाहिलें नव्हतें. तो स्वतः कधी पळाला नव्हता व त्याच्या युद्धकलेंतला गुरु श्रीछत्रपति महाराज हेहि कधी पळाले नव्हते. मराठ्यांच्या शुभ्र कीर्तीला काजळाप्रमाणे डाग लावणारे ते पळपुटे मराठे पाहून त्याच्या सर्वांगाचा भडका झाला. त्याच्या डोळ्यांत प्रकाशणाऱ्या क्रोधाग्नीच्या प्रकाशांत त्याला आता भयग्रस्त झालेल्या मराठ्यांचीं म्लान मुखें स्पष्ट दिसूं लागलीं. त्याला पळण्याचें कारण तावडतोब कळलें. तरी त्याला दुःख झालें नाही. त्याने एकहि सुस्कारा टाकला नाही. वीर लोक समरभूमीवरच कायमचे निजतात हें त्याला पूर्णपणें माहीत होतें. पण समरभूमीची मऊ हवेशीर शय्या सोडून देऊन मराठे वीर, शिवबाच्या तालमींत कसलेले वीर जेव्हा घरच्या राकट व कोंदट शय्येची इच्छा धरून पळतांना त्याने प्रत्यक्ष पाहिलें तेव्हा तो क्रोधाने धडधड जळूं लागला. खाली गळलेली तलवार वरती पेलून तो पळत येणाऱ्या मराठ्यांच्या वाटेच्या मध्यावर उभा राहिला व त्याने बोलण्यास सुरुवात केली. "षंढांनो, हंडग्यांनो, शेंदाड शिपायांनो, आपल्या बापाला किल्ल्यावर मेलेला टाकून तुम्ही पळतां तरी कुठे? हीं तुमचीं अपकीर्तीने काळींठिक्कर पडलेलीं तोंडें तुम्हीं शिवबाला कोणत्या तऱ्हेने दाखविणार. मृत्यूला भिणाऱ्या भेकडांनो, तुम्ही तटाकडे खुशाल पळा व खाली पडून खुशाल मरा. कारण तटावरील शिड्यांचे दोर मीं केव्हाच कापून टाकले आहेत. पण हें एवढें खूप समजा की, तुमच्या या पळण्याने, तुमच्या या नामर्दपणाने व तुमच्या या अक्षम्य भेकडपणाने तुम्ही स्वतःच्या व तुमच्या वाडवडिलांच्या शुभ्र कीर्तीला कायमचा व कधी न जाणारा असा काळा डाग लावीत आहां. पळपुट्यांनो, जोराने पळा व आपले कवडीमोल जीव कृपणाप्रमाणे खुशाल जतन करून ठेवा." सूर्याजीचें हें निर्भर्त्सनायुक्त भाषण ऐकल्यावर त्या पळणाऱ्या मराठी वीरांच्या अंगांत एकाएकी वीरश्री संचारली. त्यांच्या शौर्यागारावर साचलेली भीतीची रक्षा सूर्याजीच्या विरश्रीयुक्त भाषणाच्या वायूने पार उडून गेली व ते पुनरपि तेजःपुंज झाले. त्यांनी आपलीं तोंडें फिरवलीं व एकदा 'हर हर महादेव'ची गर्जना केली. ते व सूर्याजीच्या हाताखालील शिपाई किल्ल्यावरील शिबंदीवर लांडग्याप्रमाणे तुटून पडले व त्यांनी आपली एकसहा कत्तल करून टाकली. तो सिंहगड किल्ला त्यांच्या स्वाधीन झाला व मातोश्री जिजाबाईंचा फारा दिवसांचा हेतु सफल झाला.

शत्रूच्या किल्ल्यावर ऐन रात्रीचा प्रसंग असतां प्रत्यक्ष थोरला भाऊ मरण पावला असतां व त्या टोळींत पळापळ सुरू झाली असतां ज्याचें धैर्य रतिभरहि खचलें नाही व ज्याच्या मनांत देशसेवेशिवाय दुसरा विचार नव्हता अशा या महाराष्ट्रीय वीरांत सूर्याजीप्रमाणे प्रकाशमान होणाऱ्या सूर्याजी मालुसऱ्याचा अचाट पराक्रम पाहून त्याच्या कोणत्या सहृदयी महाराष्ट्रीय वंशजांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहणार नाहीत बरें? देशकार्यासाठी देह अर्पण करणाऱ्या मर्दांनी साधूंमध्ये सूर्याजीची गणना झाल्यावांचून कधीहि राहणार नाही. सूर्याजीराव इहलोकीं आपल्या सर्व आबालवृद्ध देशबांधवांस प्रिय झाले एवढेंच नव्हे, तर त्यांची ही देशनिष्ठा-पूरित सत्कृति पाहून स्वर्गी जगदीशाच्या हृदयांत सुद्धा आनंदोदधि उसळला असला पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकीय नभोमंडळांत आपल्या सत्कृतीने सूर्याप्रमाणे तळपणाऱ्या सूर्याजी मालुसऱ्याचें चरित्र जितकें बोधप्रद व आनंददायक आहे तितकेंच पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे आपल्या देशबांधवांस विनाकारण अल्पस्वल्प स्वार्थासाठी चावणाऱ्या सूर्याजी पिसाळाचें चरित्र कष्टप्रद व दुःखदायक आहे.

संभाजीमहाराजांचा अवरंगजेबाच्या हातून क्रूरपणें वध झाला व महाराष्ट्रांतील सर्व 'मराठ्यां'ची सुंता करण्याचा निश्चय त्या धर्मवेडचा व कडव्या बादशहाने करून आपल्या अफाट सेनेचा तळ त्याने भीमेच्या काठीं दिला. महाराष्ट्रांत जागजागीं मराठ्यांच्या ताब्यांत आलेले किल्ले सर करून त्यांचीं पाळेंमुळें खणून टाकण्याचा दुष्ट विचार मनांत धरून त्याने आपला शूर सरदार झुलफिकारखान रायगड किल्ला सर करण्यास पाठवून दिला. या वेळीं रायगडावर संभाजीची स्त्री येसूबाई व तिचा मुलगा शाहूमहाराज हे दोघे होते. किल्ल्याचें संरक्षण करण्याचें काम सूर्याजी पिसाळाकडे होतें. किल्ला इतका मजबूत होता व त्यांत धान्याची सामग्री इतकी भरपूर होती की, दहा महिने झाले तरी किल्ला हस्तगत होईना, पुढे होण्याचा रंग दिसेना. परंतु एखादा अभेद्य किल्लाच नव्हे, तर एखादें भक्कम राज्यहि शत्रूच्या स्वाधीन अनायासें करून देणारा देशद्रोह त्या किल्ल्यांत आपलें डोकें वर काढूं लागला. या देशद्रोहाने आजपर्यंत जितकीं दुष्ट व अनन्वित कृत्यें केलीं असतील तितकीं तीं दुसऱ्या कोणीहि केलीं नाहीत. हा देशद्रोह शत्रूच्या अफाट सेनेपेक्षा जास्त मारक आहे व तोफांपेक्षा जास्त घातक आहे. स्वदेशियांची जूट धडाक्यासारखी फोडून टाकणारा याच्यासारखा दुसरा सुरुंग नाही. स्वकीयांच्या स्वातंत्र्यमंदिराची बोल बोल म्हणतां होळी करून टाकणारा याच्यासारखा दुसरा वणवा नाही. आप्तेष्ट मंडळींच्या सुखामृतांत जहाल मारकपणा उत्पन्न करणारें या देशद्रोहासारखें दुसरें विष नाही. या देशद्रोहाला कोणत्याहि पापाची उपमा साजणार नाही. याच्यासारखें हें एकच पातक आहे व हें पाप करणारा मनुष्य पापकर्मांत अद्वितीय होय. असा एक घोर पातकी मनुष्य त्या किल्ल्यांत झुलफिकारखानाला सापडला. त्याने त्याच्याकडून आपला डाव साधला.

सूर्याजी पिसाळ हा वाई येथील देशमुख घराण्यापैकी असून तेथील देशमुखी आपणा एकट्यास मिळावी अशी त्याची फार इच्छा होती. किल्ला स्वाधीन केल्यावर बादशहाकडून वाईची देशमुखी देववितो अशी लालूच झुलफिकारखानाकडून आल्याबरोबर त्याच्या तोंडास पाणी सुटलें व त्याचें मन बिघडलें. आत्मकार्यापुढे तो देशकार्य विसरला व त्याने झुलफिकारखानाचें म्हणणें कबूल केलें. सूर्याजी पिसाळ, शेवटपर्यंत किल्ल्याचें संरक्षण इमानेइतबारें तूं केलें असतेस, तर तुला वाईची देशमुखी राजाराम-महारांकडून मिळाली नसती काय? झुलफिकारखानाप्रमाणे येसूबाईने तुझी शिफारस केली नसती काय? देशबांधवांच्या सर्वस्वाचा होम पेटवून आपल्या घरांत स्वार्थाचा दिवा लावतांना तुझें काळीज दुभंगलें नाही ना? आपल्या क्षुल्लक स्वार्थासाठी तूं शिवाजीमहाराजांच्या सुनेला व नातवाला शत्रूच्या स्वाधीन केलेंस ना? तुझ्या या अधम करणीने स्वर्गीय शिवबांच्या आत्म्याला किती दुःख झालें असेल, हा विचार तुझ्या मनाला शिवला नाही ना? जा, नीचा जा. या लोकीं तुला आपल्या दुष्कर्माचीं कडू फळें चाखावयास मिळालीं व पुढे सतरा वर्षांनी शाहूमहाराजांनी तुझा पक्का सूड घेतला हें योग्यच झालें. परलोकींहि तुझ्या आत्म्याला घोर यातना भोगाव्या लागतील. अधमा, तुझ्या या निंद्य करणीने तूं मराठ्यांच्या विमल नांवाला काळिमा आणलास. कोणीकडे देशभक्त सूर्याजी मालुसरे व कोणीकडे तूं देशभंजक सूर्याजी पिसाळ! श्वाना, तूं स्वार्थाच्या तुकड्यासाठी देशबांधवांस डसलास, पण वरती तुझ्या आत्म्याला हजारो यमयातना सदैव डसत राहतील. सूर्याजी मालुसऱ्याने सिंहगड कमावला व त्यामुळे त्या महात्म्याने येथे सुकीर्ति व वरती सद्गति कमावली. तूं रायगड गमवलास म्हणून तूं येथे दुष्कीर्ति व वरती दुर्गति संपादन केलीस.

— भाला, दि. २१ जानेवारी १९०६

---

## १७. फक्त दोन शब्द

इंडियन पिनल कोडांत असा एक गुन्हा आहे की, जो गुन्हा प्रत्येक बोलणारा किंवा लिहिणारा मनुष्य नेहमी करतो व जो गुन्हा कधींहि कोणी करीत नाही असा एक गुन्हा इंडियन पिनल कोडांत आहे की, जो गुन्हा शाबीत करण्यास इतर गुन्ह्यांप्रमाणे प्रत्यक्ष पुराव्याची मुळीच जरुरी लागत नाही. इंडियन पिनल कोडांत असा एक गुन्हा आहे की, ज्या गुन्ह्याबद्दल एकदा एखाद्याविरुद्ध खटला चालू झाला म्हणजे त्यांत तो कधींहि दोषमुक्त होऊं शकणार नाही. असा हा विलक्षण व विजातीय गुन्हा म्हटला म्हणजे राजद्रोह होय व ज्या कलमांत ह्या गुन्ह्याचा अंतर्भाव होतो तें कलम १२४ (अ) हें होय. वरती नमूद केलेलीं तिन्ही लक्षणें ह्या गुन्ह्याला

तंतोतंत लागतात. ह्या गुन्ह्याच्या बदललेल्या व्याख्येकडे नजर फेकली असतां कोणत्याहि व्याख्येचे मग तो कितीहि मवाळ बोलो – असें एकहि भाषण किंवा कोणत्याहि लेखकाचा – मग तो कितीहि सौम्य लिहो – असा एकहि लेख सापडावयाचा नाही, की ज्या भाषणाने किंवा लेखाने तो ह्या गुन्ह्याच्या कचाटींत सापडणार नाही. जिभेंतून शब्द निघाला किंवा लेखणींतून शब्द जन्मला की हा गुन्हा झालाच म्हणून प्रत्येकाने समजावें. असा हा नेहमी होणारा गुन्हा कोणीहि कधीहि करीत नाही. ह्याचें कारण फक्त सरकारची मर्जी होय. दररोज घडोघडीं चाललेले हे गुन्हे सरकार विशिष्ट प्रसंगाशिवाय कधीहि लक्षांत घेत नाही. म्हणूनच हे गुन्हे केल्याबद्दल वक्ते किंवा लेखक वारंवार न्यायाच्या कोर्टांत ओढले जात नाहीत. ह्या गुन्ह्याशिवाय अन्य गुन्हे शाबीत होण्यास बहुतेक प्रसंगीं प्रत्यक्ष पुराव्याची जरुरी लागते. उदाहरणार्थ, खोटा कागद तयार केल्याचा गुन्हा शाबीत करण्यास खोटा कागद कोर्टासमोर आणावा लागतो. चोरी किंवा दरवडा सिद्ध करण्यापूर्वी चोरलेला माल सापडावा लागतो. खुनाच्या खटल्यांत मारलेल्या मनुष्याचें प्रेत पुढे येतें. खोटया नाण्याच्या खटल्यांत कमी किमतीच्या धातूचें नाणें पुराव्यांत दाखल करण्यांत येतें. सारांश, प्रत्येक गुन्हा शाबीत करण्यास कमीजास्ती प्रमाणाने प्रत्यक्ष पुरावा द्यावा लागतो. पण राजद्रोहाच्या गुन्ह्याला हें तत्त्व लागू शकत नाही. बंड, मारामाऱ्या किंवा दंगे ह्यांसारखें कोणतेंहि दृश्य परिणाम न झाले तरी हा गुन्हा होऊं शकतो. ह्या गुन्ह्याची हल्लीची व्याख्या स्थूल मानाने अशी आहे की, जर कोणी लेखाने, भाषणाने सरकारविरुद्ध किंवा अन्य तऱ्हेने व्हाइसरॉयापासून तो थेट तुरुंगांतील कैदी-शिपायांपर्यंत ( Convict Warder) सर्व लहानमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध शत्रुभाव, द्वेष किंवा तिरस्कार उत्पन्न करील किंवा करण्याचा प्रयत्न करील, तर तो राजद्रोहाच्या गुन्ह्यास पात्र होईल. ही राजद्रोहाची नूतन व्याख्या इतकी व्यापक आहे की, त्यांत कोणताहि टीकात्मक लेख किंवा भाषण आलेंच पाहिजे. ह्या व्याख्येने स्पष्ट केलेला राजद्रोहाचा गुन्हा न करतां भाषण करणारा वक्ता किंवा लेख लिहिणारा लेखक प्रदर्शनांत ठेवण्यासारखी अजब चीज आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति केल्याचा दोष आम्हांस लागणार नाही. सारांश, ही राजद्रोहाची व्याख्या धड राहिल्यास कोणत्याहि वक्त्याचें किंवा लेखकाचें धड जिवंत राहण्याचा संभव नाही. वक्त्यांपेक्षा लेखकांना ही व्याख्या जास्त जाचते. इतर लेखकांपेक्षा राजकीय प्रश्नांची चरचरीत चर्चा करणाऱ्या वर्तमानपत्रांच्या संपादकांना ती सर्वांहून जास्त त्रास देते. वर्तमानपत्रांच्या संपादकांभोवतीं हा एक कायमचा गळफास असून, त्याचें दुसरें टोंक सरकारच्या हातांत आहे. हा गळफास वाटेल तसा झटका दिल्याबरोबर घट्ट होत जातो व त्यामुळे त्याने वेष्टिलेला गळा त्या प्रमाणाने दाबला जातो. दुःखांत सुख मानण्याची गोष्ट एवढीच की, हा झटका विशिष्ट प्रसंगाशिवाय देण्यांत येत नाही. आणि म्हणूनच संपादकाची बदली घरच्या

खोलींतून तुरुंगाच्या खोलींत वारंवार होत नाही. इंडियन पिनल कोडाचें १२४ (अ) कलम हें जणू काय डॅमोक्लिज राजाची तलवार होय. त्या तलवारीला आधार काय तो फक्त एका बारीक तंतूचा होता.

या राजद्रोहाच्या समशेरीला आधारहि सरकारच्या बारीक मेहरबानीचाच आहे. डॅमोक्लिज राजाची तलवार आपल्या बारीक धाग्यापासून तुटून कोणाच्या अंगावर पडलेली आमच्या ऐकिवांत नाही. पण या राजद्रोहाच्या तलवारीसंबंधाने मात्र तसें बोलतां यावयाचें नाही. ह्या तलवारीचा आधारभूत तंतु वारंवार तुटतो. आश्चर्याची गोष्ट हीच की, हा तुटण्याचा प्रसंग मुंबई इलाख्याच्या वांटणीस इतर इलाख्यांपेक्षा जास्त वेळा येतो. परवा तारीख १५ डिसेंबर १९०५ रोजीं एकाएकी या राजद्रोहाच्या लोंबत्या तलवारीला हेलकावा बसला. ती आपल्या आधारापासून तुटली व आमच्यावर येऊन कोसळली. तारीख १३ फेब्रुवारीला आम्ही ९ पंचांच्या मताने दोषी ठरलों व आम्हांस सहा महिने साधी कैद व हजार रुपये दंड अशी शिक्षा देण्यांत आली. दंड लागलीच भरण्यांत आला व कैदहि तारीख ११ ऑगस्टला संपली. या राजद्रोहाच्या तलवारीची व तिच्या आधारभूत तंतूंची ताटातूट झाल्यामुळे, आमची व आमच्या वाचकांची ताटातूट झाली होती; परंतु सहा महिन्यांच्या अवधीनंतर आमच्या वाचकांची भेट पुन्हा होण्याचा मंगल योग आला, हें पाहून आम्हांस अत्यानंद होत आहे व ज्या जगदंबेच्या कृपेने हा योग घडून आला त्या जगज्जननीचें भक्तिपूर्वक स्मरण करणें हें आमचें आदि कर्तव्य आहे. त्या भक्तवत्सल व दीनदयाळ मातोश्रीजवळ आमचें एवढेंच पदर पसरून मागणें आहे की, तुझ्या कृपेचें छत्र ह्या भरतभूमींतील मालकांवर सदोदित असूं दे. कारण वेडयावाकडया प्रसंगीं या समुद्रवलयांकित पृथ्वीवर आम्हांस व आमच्या देशबंधूंस तुझ्याशिवाय अन्य त्राता नाही. माते, आम्ही तुला "आई आई" म्हणून हाक मारूं. तूं मात्र आम्हांस "बाळांनो", म्हणून हाक मार म्हणजे या जगांत आम्हांस कोणाची जरुरी नाही.

'भाला' पुन्हा हातांत घेऊन त्याच्या फेकी करावयास लागण्यापूर्वी भाल्याचा पहिला उद्देश काय होता व यापुढे त्याचा उद्देश कोणता राहील यासंबंधाने दोन शब्द लिहिणें जरूर आहे. आम्हांस शिक्षा झाल्यावर आमच्या कित्येक पत्रकार देशबंधूंनी आमच्यावर शिव्यांचा बराच मोठा वर्षाव केला. परंतु हीं त्यांनी आमच्यावर फेकलेलीं सुमनें पार वाळून गेलीं असल्याकारणाने तिकडे आता आम्ही कानाडोळा करतों. सदरहू पत्रकारांना जातां जातां आम्ही एवढेंच सांगतों की, शिवीस शिवी देण्याची धमक आमच्या लेखणींत निःसंशय आहे; परंतु लेखणीचा उपयोग इतर कामाकडे केल्यास जास्त फायदा होईल, अशी आमची समजूत असल्यामुळे, सदरहू पत्रकारांच्या कोल्हेकुईकडे आम्ही बिलकुल लक्ष देऊं इच्छित नाही. उलटपक्षीं अशा पत्रकारांचे आम्ही एकार्थी आभारी आहोंत. ते जर अशा ऐन वेळीं गप्प बसले असते, तर आम्ही

धरलेला मार्ग चुकीचा आहे किंवा नाही हें समजण्यास आम्हांस बिलकुल सोय नव्हती. परंतु या पत्रकारांनी आपलीं नांवें उघडून त्यांतून तेजःपुंज मुक्ताफळें बाहेर फेकून दिल्यामुळे त्यांच्या उजेडाने आमचा मार्ग चुकला नाही अशी आमची खात्री झाली आहे. अशीं हीं दिव्य तेजाची वर्तमानपत्रें कोणतीं हें जाणण्याची जिज्ञासा जर आमच्या वाचकांस झाली असेल, तर ती तृप्त करून घेण्यास फारशी दगदग नको. एखाद्या सार्वजनिक वाचनालयांत जाऊन प्रत्येक वर्तमानपत्र उघडून अशा जिज्ञासूने तें आपल्या डोळ्यांनी हुंगावें म्हणजे लागलीच घाणणारीं वर्तमानपत्रें त्याच्या नजरेस पडतील. ईश्वर करो व हीं वर्तमानपत्रें सदैव अशीच घाणोत म्हणजे झालें!

'भाला' काढण्यांत आमचा मूळ हेतु हाच होता (व तो हल्लीहि आहे) कीं, भाल्याच्या योगाने आमच्या देशबांधवांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये 'आंग्ल नागरिकत्व' (ब्रिटिश सिटिझनशिप) व स्वराज्य (होमरूल) मिळविण्याची स्फूर्ति उत्पन्न करावी व ती उत्पन्न झाल्यावर तिची परिपूर्ति होण्यासाठी विद्यमान परिस्थित्यनुरूप मार्ग त्यांना वेळोवेळीं सुचवावेत. आमचा हा उद्देश अजून कायम आहे व तसा तो सदैव कोणत्याहि प्रसंगीं राहणारच. हल्ली हा एक वादच माजून राहिला आहे की, "भरतभूमीला सुराज्य पाहिजे की स्वराज्य पाहिजे?" सुराज्य-वाद्यांचे असें म्हणणें आहे की, या देशाला व्यवस्थित राज्यपद्धति मिळाली म्हणजे बस्स झालें. मग त्या राज्यपद्धतीमुळे इकडे एक हजार सिव्हिलियन मनमुराद चरोत किंवा दरवर्षीं चाळीस कोटि रुपये विलायतेला जावोत. यांच्या मताने देशांत शांतता असली म्हणजे सर्व कांही मिळालें. ही बाह्य शांतता मिळाल्यावर येथील लोकांच्या पोटांत भुकेची बंडाळी माजली तरी हरकत नाही. दंगा होऊन हात तुटण्याऐवजीं उपासमारीने तो हात अजीबात सुकून गेलेला पत्करेल किंवा दरवडा पडून घर सफा धुतलें जाण्यापेक्षा सरकारी कर देण्यासाठी त्याचा लिलाव झालेला चालेल. उलट-पक्षीं स्वराज्यवाद्यांचें असें म्हणणें आहे की, आम्हांस व्यवस्थित राज्यपद्धति पाहिजे. पण त्या राज्यपद्धतीचीं सूत्रें एतद्देशीय लोकांच्या हातांत पाहिजेत. आम्हांस हजार बड्या पगाराचे नोकर पाहिजेत; पण त्यांचा रंग काळा पाहिजे. आम्हांस बाहेर शांतता व घरांत धनधान्याची पूर्तता पाहिजे. आम्हांस दरवडे नकोत, तर आमच्यावर जबरदस्त करहि नकोत. सारांश, आम्हांस परकीयांनी चालविलेलें 'सुराज्य' नको, तर स्वदेशियांनी चालविलेलें 'स्वराज्य' पाहिजे. या दोन्ही मतांच्या लोकांचा इंग्रज साम्राज्य असण्याबद्दल वाद नाही. वाद काय तो फक्त हाच की, ही व्यवस्थित राज्यपद्धति गोऱ्या लोकांनी अमलांत आणावयाची की काळ्या लोकांनी अमलांत आणावयाची?

भालाकार हे स्वराज्यवादी होते व आहेत. आंग्ल साम्राज्यरूपी पांढरें पण पातळ वस्त्र परिधान केलेली स्वतंत्रतादेवी त्याचें उपास्यदैवत आहे व ते – तिच्या अनेक उपासकांपैकी एक गरीब, पण श्रद्धाळु उपासक आहेत. या आर्य-

भूमींत हिंदी स्वराज्यरूपाने स्वतंत्रतादेवी आगेमागे अवतरणार अशी त्यांची बालंबाल खात्री आहे व त्या अवताराची ते चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत. पश्चिम दिशेकडून स्वतंत्रतादेवीची मिरवणूक निघाली आहे व तिचें अगदी बिनीचें निशाण जें 'देशबंधुत्व' तें त्यांना अंधुक अंधुक का होईना दिसूं लागलें आहे. या मिरवणुकींतील अगदी आघाडीची नौबद जी 'एकराष्ट्रियत्वाची कल्पना' ती त्यांना ऐकं येऊं लागली आहे व या मिरवणुकींतील जय-गर्जना जी 'स्वदेशी चळवळ' ती ते आपल्या इतर देशबांधवांप्रमाणे स्वतः आनंदाने करीत आहेत. ही स्वतंत्रतादेवीची मिरवणूक भरतभूमींत येऊन पोहोचण्यास बराच काळ लागेल याविषयी वाद नाही. पण ती या पुण्यभूमीला येऊन पोहोचेल यांत संशय नाही. आंग्ल साम्राज्यरूपी रथांत आरूढ होऊन निघालेली स्वतंत्रतादेवी लौकर किंवा उशिरा येऊन पोहोचणार हें सर्वस्वीं तिच्या भक्तांच्या श्रद्धेवर व श्रमावर अवलंबून राहणार आहे. स्वतंत्रतादेवीने पूर्वदिशेकडे आपलें तोंड फिरवलें हें पाहून विलायतेंतील तिच्या अप्पलपोटच्या भक्तांची धाबीं दणाणूं लागलीं आहेत. स्वतंत्रतादेवीचा रथ मागे ओढून नेण्यासाठी त्यांनी कायद्याच्या दोऱ्या जाड केल्या आहेत. हा रथ एक वीतभर पुढे सरकूं नये अशा तऱ्हेचे प्रयत्न चालू आहेत. उलटपक्षीं तिच्या भारतीय भक्तांनी या रथाला स्वदेशी चळवळीचा भला मोठा साखळदंड लावून तो रथ ते नेटाने व प्रेमाने ओढीत आहेत. या ओढाओढींत कायद्याच्या दोऱ्या तुटतात किंवा स्वदेशी चळवळीचा साखळदंड तुटतो इकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे.

सृष्टिनियमाप्रमाणे वाख लोखंडाच्या अगोदर तुटेल हें सांगावयास नको. हा रथ ओढीत असतां किती तरी जड राज्य- द्रोहाच्या खड्यांत पडतील बरें! अशा खड्यांत पडून बाहेर आल्यावर पुन्हा स्वतंत्रतादेवीचा जयजयकार करून या साखळदंडाला आपला हात घालून हा रथ ओढण्यास पुनरपि लागणें हे प्रत्येकाचें आदि कर्तव्य आहे व हें कर्तव्य जगदंबेच्या कृपेने आमच्या हातून होईल अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. आंग्ल साम्राज्यरूपी रथांत आरूढ झालेल्या स्वतंत्रतादेवीची मिरवणूक काढण्याचा परवाना आम्ही ख्रिस्तवासी व्हिक्टोरिया राणीसाहेबांकडून काढला आहे व त्या परवान्यावर हल्लीच्या बादशहाची सही आहे. म्हणून ही मिरवणूक बेकायदेशीर आहे असें कधीहि म्हणतां यावयाचें नाही. अशा या मिरवणुकींत आर्यभूच्या प्रत्येक अस्सल पुत्राने अगोदर देशप्रेमाचा गुलाल हृदयाला फासून आनंदाने मिसळावें व आपल्या तनूचें सार्थक्य करावें अशी आमची सर्वांस आग्रहपूर्वक विनंती आहे.

स्वतंत्रतादेवीचें उपरिनिर्दिष्ट स्वरूप डोळ्यापुढे ठेवून व सर्व भार जगदंबेवर टाकून आम्ही स्वतंत्रतामातेची उपासना आमरण करणार. आम्हांस अशी आशा आहे की, भाल्याचे वाचकहि आमच्या मताचे आहेत. असें करण्यांत राजद्रोह नाही व देशद्रोह नाही. यांत सरकारचें हित आहे व आमचेंहि आहे. स्वतंत्रतादेवीच्या

रथाभोवतीं जमलेला जमाव पाहून सरकारने या रथाला मुळीच अडथळा करूं नये असें सरकारास आमचें नम्रतापूर्वक सांगणें आहे. एवढेंच नव्हे तर, आमच्या गौरकाय बंधूंनी आपणहून या रथाला हातभार लावावा. असें करण्यापासून त्यांना भूषण आहे व नफाहि आहे. समत्वाला पोहचविलेले कृष्णकाय बंधु आपल्या गौरकाय बंधूंचा उपकार फेडल्यावांचून कधीहि राहणार नाहीत. इतर वसाहतींना मिळालेलें स्वराज्य जर या भरतभूमीला देण्यांत आलें तर आंग्लभूमीवर पुढेमागे वेडावाकडा प्रसंग ओढवल्यास भरतभूमि पूर्वी केलेले उपकार स्मरून आपल्या धाकटया बहिणीच्या साहाय्यार्थ धांवेल हें आम्हीं सांगावयास नको. हें स्वराज्य इंग्रज लोक आपणहून देवोत किंवा तें हिंदी लोक स्वकष्टाने मिळवोत. कांही होवो, तरी तें आपणांस मिळणार एवढें मात्र खास. आपण प्रयत्न मात्र केला पाहिजे. हा प्रयत्न करण्याकडे आमच्या देशबंधूंची प्रवृत्ति होत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

भाल्याचा जो उद्देश वरती सांगण्यांत आला आहे त्या उद्देशाला डोळ्यापुढे ठेवून आमच्या सहा महिन्यांच्या गैरहजेरींत आमच्या बंधुद्वयाने भाला जोराने चालविला हें पाहून आम्हांस आनंद होत आहे. ‘नास्ति बंधुसमं बलं’ या कव्यूक्तीचें यथार्थत्व आता आमच्या हृदयांत पूर्णपणें बिंबलें आहे. पण यावरून कोणीं असें मात्र समजूं नये की, आम्हांस फक्त दोनच बंधु आहेत. तीस कोटि उणा एक इतका मोठा आमचा बंधु-भगिनींचा जमाव आहे व ‘भाला’ पत्र त्यांचें आहे. विशिष्ट परिस्थिती-मुळे फक्त आम्ही टिळ्याचे धनी झालों आहों. त्यांच्याच प्रेमामुळे अवघ्या दीड वर्षांत ‘शारदा’ छापखान्याच्या भट्टींतून दर दहा दिवसांनीं आमच्या कल्पनेच्या बाहेर ‘भाला’ निघूं लागला आहे. आमच्या देशबंधूंच्या वाढत्या प्रेमामुळे भाल्याची संख्याहि उत्तरोत्तर वाढत जाईल यांत शंका नाही.

शेवटीं आमच्या प्रिय वाचकांकडून आलेल्या दोन सूचनांपैकीं एक आम्ही कष्टाने नाकबूल करतों; पण दुसरीचा तितक्याच प्रेमाने आम्ही अंगीकार करतों. भाला नेहमी दाशाहिकच राहणार, तो कधीहि साप्ताहिक होणार नाही. पण दुसऱ्या सूचनेप्रमाणे प्लेगचे दिवस संपल्यानंतर आमच्या प्रिय वाचकांच्या हातांत वाढत्या आकाराचा भाला निःसंशय पडेल अशी तजवीज आम्ही मोठ्या आनंदाने व उत्सुकतेने करूं.

— भाला, दि. १ सप्टेंबर १९०६

---

## १८. प्रेताची गाडी

कार्तिक शुद्ध प्रतिपदेचा दिवस. संध्याकाळीं सहा वाजण्याचा सुमार होता. सहस्ररश्मी भगवान् सूर्यनारायण दिवसभर आकाशपथ चालून चालून दमले-

भागलेले असे विश्रांति घेण्यासाठी आपल्या घरांत शिरण्याच्या अगदी बेतांत होते. बारा तास आपल्या मांडीवर द्विपाद व चतुष्पाद प्राण्यांचा धांगडधिंगा सोसल्यामुळे थकलेली भूमाता काळोखाची काळी कांबळी पांघरून घेऊन निजण्याच्या तयारीला लागली होती. दिवसभर इगकडे-तिकडे भटकणारे उडाणटप्पू पक्षी निरनिराळ्या फळझाडांवरील स्वाभाविक अन्नावर यथेच्छ ताव मारून आपआपल्या घरट्याकडे लगबगीने धांवत होते. प्लेगच्या कहरामुळे पुणें शहर सोडून चतुःश्रृंगीच्या मैदानांत झोपड्यांतून राहिलेले लोक आपआपले कामकाज आटपून झोपड्याकडे रेंगाळत रेंगाळत चालले होते व दिवसभर जेमतेम अर्धवट जिवंत वाटणारे पुणें शहर पुन्हा बारा तास बेशुद्ध पडण्याच्या अगदी बेतांत आले होते. अशा दुःखदायक शांततेच्या वेळीं आम्हीं आमचें कामकाज आटोपून झोपडीचा रस्ता धरला होता. तो दिवस दिवाळीचा होता. तरी पण शहरांत फारच थोड्या घरांतून दिवे लकाकत होते. वर्षभर उदीम-व्यापार करून आढावा काढल्यानंतर कवडीचाहि नफा न होतां आपलें दिवाळें निघालें आहे हें पाहून ढसढसा रडणाऱ्या एखाद्या व्यापाऱ्याप्रमाणे पुण्यनगरीं ओक्साबोक्सी धायमोकलून रडत होती. तीन महिन्यांत आपल्या लेकरांबाळांची चांदी उडून आपलें बहुतेक दिवाळें निघालें आहे हें पाहून, तिची वृत्ति शून्याकार झालेली दिसत होती. दिवाळीच्या दिवसांत आनंदाने व हौसेने नटून-थटून वावरणारी पुण्यनगरी आज तीन महिने रडून रडून सुकून गेली होती व ती बोटासारखी वाळली होती. श्रावण शुद्ध प्रतिपदेला गोंडस दिसणारी पुण्यनगरी तीन महिन्यांनी कार्तिक शुद्ध प्रतिपदेला दुसरी यमनगरी बनून गेली. प्लेगराजाने आपल्या वडिलांची आज्ञा घेऊन चार पैसे मिळविण्याकरिता जेव्हा पृथ्वीपर्यटन करण्याचा बेत केला तेव्हा त्यांच्या अंगांत एवढी कर्तृत्वशक्ति असेल असें कोणाच्या ध्यानींमनीं किंवा स्वप्नींहि नव्हतें. पण या कर्तृत्ववान् कृतान्तपुत्राने दहा वर्षांच्या अल्पावधींत चाळीस लाखांची कमाई केली आहे. इतका हुशार व कर्तृत्ववान् मुलगा निघाला हें ऐकून यमपुरींत जयजयकार चालला असेल. पण त्या जयजयकाराबरोबर या महाराष्ट्रांत विशेषतः या पुण्यनगरींत जिकडे-तिकडे हाय हाय सुरू आहे. एका दशकांत चाळीस लाखांची कमाई करून सुद्धा या कृतान्ततनयाची काळभूक शांत होत नाही. या कुंभकर्णी उदरांत अजून किती आहुति पडावयास पाहिजेत, हें निश्चितपणें कळत नाही.

सन १६४६ पासून ते सन १८१८ सालापर्यंत या महाराष्ट्रांत जे वीर मायदेशाची सेवा करीत असतां असिधारातीर्थांत कायमचे बुडले गेले, त्यांची संख्या या चाळीस लाखांच्या संख्येहून निःसंशय कमी भरेल. देशांबेच्या नवरात्रांत पेटलेल्या होमांत त्या वीरांची होळी झाली. पण त्या होमांतून त्या वेळीं स्वतंत्रतादेवी याज्ञसेनेप्रमाणे बाहेर निर्माण झाली. स्मशानांत चितेपासून निघणारा हल्लीचा धूर व देशांबेच्या नवरात्रांत पेटलेल्या होमांतून त्या वेळीं निघणारा धूर ह्या दोहो-

मध्ये किती तरी अंतर – किती तरी जमीनअस्मानाचें अंतर – आहे बरें ! हल्लीच्या धुराने मागे राहिलेल्या आप्तजनांचीं मुखकमलें दुःखाने काळवंडून जात आहेत. त्या वेळच्या धुराने जिवंत राहिलेल्या नातलगांचे चेहरे अंतर्यामांतील उमेदीने उमदे होत जात होते. हल्लीच्या धुरांतून फक्त राखेचे कण बाहेर उडत आहेत. त्या वेळच्या धुरांतून सोन्यारुप्याचे कण बाहेर उधळत असत. हल्लीच्या धुरापासून इतर लोक लांब दूर पळत आहेत. त्या वेळच्या धुराच्या लोटांत इतर लोक हौसेने उड्या घालीत होते. महाराष्ट्र-भूला एवढा मोठा चट्टा बसून तिच्या पदरांत कोणताहि मोठा सट्टा पडला नाही. प्लेगराजाची नजर हल्लीप्रमाणे तिच्यावर जर आणखी दहा-वीस वर्षे राहील, तर ती लौकरच मरतवांझेच्या अस्पृहणीय पदवीला जाऊन पोहोचेल. ईश्वर करो व असला दारुण प्रसंग तिच्यावर न येवो !

ऐन दिवाळीच्या दिवशीं आम्ही रस्त्याने चाललों असतां नेहमीप्रमाणे प्रेत-वहनसूचक अमंगल शब्द आमच्या कानीं पडत होते. त्या वेळीं प्रेतांचा एक भला मोठा समारंभ रस्त्याने चालला आहे, असा आम्हांस भास झाला. आता आपल्या नवऱ्याच्या प्रेताच्या पाठीमागे हंबरडा फोडीत जाणारी एखादी हतभागी स्त्री दृष्टीस पडे. तर पाव घटकेने सख्ख्या भावाच्या तिरडीपुढे उजव्या हातांत मडकें धरलेला व डाव्या हाताने डोळे चोळीत असलेला भाऊ पाहण्यांत येई. मग थोड्याच वेळांत मृत झालेल्या बापाला खटाऱ्यांत घालून तो स्वतः हाकणारा व जेथून कधीहि कोणी परत येत नाही अशा लांब दूर जागीं गेलेल्या आपल्या बापाला हाका मारणारा मुलगा डोळ्यासमोरून जाई. असा हा हृदयविदारक देखावा पाहून ज्याचें हृदय भंगणार नाही, असा मनुष्य सापडणें कठीण जाईल. मृत्युलोकावरील हा दुःखदायक देखावा पाहून कोणाचें हृदय उकलणार नाही बरें ? "दिसे क्षणिक सर्व हें भरवसा घडीचा नसे" या पंतांच्या उक्तीचें सत्यत्व अशा वेळीं बिनतक्रार कबूल करावें लागतें. या प्लेगाने या तीन महिन्यांत शारीरिक शक्तीमुळे चिरंजीव वाटणाऱ्या किती तरी तरुणांना यमसदनीं धाडून दिलें बरें ! किती सधवा स्त्रिया याने विधवा केल्या असतील बरें ! हजारो पोरांना पोरकीं करून या दुष्ट प्लेगाने त्यांना अन्नाला महाग केलें असेल ! आजपर्यंत कोणत्याहि मानवी किंवा माधवी आपत्तीपेक्षा अभूतपूर्व हानि या प्लेगाने केली आहे. जिकडे-तिकडे रडारडी व भेकाभेकी एकसारखी सुरू आहे. सर्वांचीं तोंडें उतरलेलीं आहेत व जो तो उद्या कोणता दुर्घट प्रसंग ओढवेल या काळ-जीच्या चिंतेंत होरपळून जात आहे. या प्लेगाने शेकडो दारें लागलीं असतील व शेकडो कुटुंबें धुळीस मिळालीं असतील. अंतःकरणांत जन्मलेले शेकडो विचार जागच्या जागीं जिरले गेले असतील व अनेकांचे भावी आशांकुर निराशेच्या किडीने कुरतडून टाकले असतील. त्या दिवशीं जो एक हृदयभेदक व हृदयद्रावक देखावा आमच्या दृष्टीस पडला त्याची आठवण आमच्या स्मरणांतून कधीहि नाहीशी होणार नाही.

काळोखांतून मंद मंद पावलें टाकीत आम्ही चाललों असतां आम्ही एका बोळाच्या कोपऱ्यावर आलों नाही तोंच "बाळांनो, मला म्हातारीला सोडून एकटेच दोघेजण निघून गेलांत ना!" असें हें हृदय विरघळून टाकणारे शब्द आमच्या कानावर येऊन पडले. ज्या दिशेकडून हे हृदयद्रावक शब्द आले त्या दिशेकडे आम्हीं वळून पाहिलें नाही तोंच, आमच्या दृष्टीस एक साठ-पासष्ट वर्षांच्या भाराने वांकलेली व मृत्यूच्या दाराच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवलेली एक वृद्ध स्त्री आमच्या नजरेस पडली. तिला तिच्यापेक्षा दहा-पंधरा वर्षांनी लहान अशा दुसऱ्या एका बाईने सावरून धरलें असून ती त्या वृद्ध स्त्रीचें "राहूं दे. नको रडूं आता. रामाची मर्जी" अशा गोड शब्दांनी सांत्वन करीत होती. दहा-पांच हातांच्या अंतरावर एक बैलाची गाडी हलकें हलकें येत होती व त्या गाडीच्या पाठीमागे तीस-पस्तीस वर्षांचा मनुष्य चालला होता. नेहमीच्या अनुभवाने ती गाडी कशाची आहे हें आम्हीं केव्हाच ओळखलें. पण त्या वृद्ध स्त्रीची स्थिति त्या गाडींतील प्रेतांची जोडी व तो संध्याकाळचा समय या त्रयीने आमच्या मनाची अशी स्थिति करून टाकली की, ती प्रेताची गाडी पाठीमागे टाकून आमचे पाय आम्हांस कांही केल्या पुढे नेईनात. मुद्दाम जास्त सक्ती करून पायांना आपलें काम जोराने करण्यास लावण्याच्या भानगडींत न पडतां, आम्ही त्यांच्याच अनुरोधाने चाललों. पुत्र-शोकाच्या धक्क्याने पंगु बनलेल्या त्या वृद्ध आईला मुळींच चालवत नव्हतें. आपल्या मैत्रिणीच्या हातावर सर्व तोल टाकून ती जेमतेम एक-एक पाऊल टाकीत होती. तिच्या पाठीमागून ती प्रेंताची गाडी आंतील धष्टपुष्ट प्रेतांच्या ओझ्याखाली कण्हत कुंथत चालली होती व एका हाताने त्या गाडीचा मागील दांडा धरून तो तीस-पस्तीस वर्षांचा तरुण गृहस्थ झुकत झुकत चालला होता. असा हा प्रेत-समारंभ रस्त्याने आस्तें आस्तें चालला होता. ज्या बोळांतून ही गाडी निघाली त्या बोळापासून स्मशान-भूमि एक मैल लांब असल्याकारणाने तिला तेथे जाऊन पोहोचण्यास एका तासाच्यावर वेळ लागला. ज्या वेळेला हमरस्ता सोडून ती गाडी स्मशानाकडील आडरस्त्याला लागली व खडखड वाजूं लागली, त्या वेळेस त्या वृद्ध मातोश्रीचे पंचप्राण कासावीस झाले. रस्त्यावर पडलेल्या किंवा वरती आलेल्या दगडांवर गाडीचें चाक घासून जेव्हा तिला धक्का बसे त्या वेळेस पुत्रप्रेमाने थबथबलेल्या त्या आईच्या हृदयालाहि धक्का बसे व आंतील प्रेमरस डोळ्यांच्या गायमुखांतून भळभळ वाहूं लागे. कंठांत आलेला हुंदका मोठ्या प्रयासाने दाबून ती त्या गाडीवाल्याला केविलवाण्या स्वराने "बाबा, जपून हाक" असें म्हणे. खुळें बिचारें मातृप्रेम! आंधळी बिचारी आईची ममता! या मातृप्रेमाला तारतम्य नाही. या आईच्या ममतेला डोळे नाहीत. निर्जीव अतएव काष्ठवत झालेल्या प्रेताला धक्का बसला काय किंवा कोणी बुक्का मारला काय, यापासून त्या प्रेताला सुख नाही व दुःख नाही. पण या ज्ञानाच्या गोष्टी या मातृप्रेमाला कळत नाहीत व दिसत नाहीत. हें मातृप्रेम आपली आवडती वस्तु मातीआड होईपर्यंत

रतिभरहि कमी होत नाही व नंतरहि कमी न होतां दिवसेंदिवस जास्तच वृद्धिंगत होत जाते.

मातृप्रेमासारखें शुद्ध व निर्मळ प्रेम या जगतांत दुसरें सापडावयाचें नाही. इतर प्रेमांत स्वार्थाची भेसळ असते, पण हें मातृप्रेम निर्भेळ व नीरस असतें. पोटचा पोर रंक असो अथवा राव असो, तो साक्षर असो किंवा निरक्षर असो, तो अब्रूदार असो किंवा बेअब्रूदार असो, तो व्यंग्यरहित असो किंवा व्यंग्यसहित असो, तो सज्जन असो किंवा दुर्जन असो, हें मातृप्रेम उभय प्रसंगीं एकाच जातीचें व एकाच धर्तीचें असतें. निर्धन मुलाला मातृप्रेम हें अक्षय्य व अमोल खजिना आहे. निरक्षर पुत्राला मातृप्रेमासारखा अन्य शिक्षक नाही. बेअब्रूदार पोरट्याला आईची ममता हीच खरी सावली आहे व व्यंग्यसहित लाडक्याला आईच्या मायेसारखी दुसरी कुबडी नाही. असें दैविक मातृप्रेम ज्याच्या वांट्याला आलें नाही तो खरोखरच हतभागी होय. हेलकावे खात खात व आपटत-धोपटत ती गाडी एकदाची स्मशानभूमींला जाऊन पोहोचली. गाडीवाल्याने दोन हात व त्या तीस-पस्तीस वर्षांच्या तरुण मनुष्याने दोन्ही पाय धरून एक प्रेत गाडींतून बाहेर काढून टाकण्यास सुरुवात केली. गाडींतून प्रेत वरती उचलल्याबरोबर खाली लोंबणारी मान पाहून त्या आईच्या प्रेमाला पुन्हा पान्हा फुटला. तिने धडपडत जाऊन त्या लोंबणाऱ्या मानेला आपल्या सुरकुतलेल्या हाताचा मऊ टेका दिला. याप्रमाणे तीं दोन्ही प्रेतें वाळूवर ठेवण्यांत आलीं. प्रेतें अर्धवट पाण्यांत ठेवल्यानंतर ती आई त्या आपल्या दोन्ही मुलांच्यामध्ये जाऊन बसली. तिने आपले दोन्ही हात आपल्या दोघा लाडक्यांवर ठेवले. आपले ओले डोळे आकाशाकडे लावले व ती स्तब्ध बसली. सकाळपासून रडून-ओरडून तिचा आवाज बसून गेला होता. पुत्रशोकाच्या जबर धक्क्यामुळे तिची वृत्ति ठिकाणावर नव्हती व तिला या जगाला चिकटून राहवयास लावण्यासारखा आता कोणताहि पाश शिल्लक राहिला नव्हता.

जगांतील सर्व हिऱ्यांपेक्षा जास्त मौल्यवान् असे तिचे दोन हिरे निस्तेज होऊन तिच्यापुढे पडले होते व लौकरच ते रक्षामय होण्याच्या पंथाला लागले होते. तिच्या थरथर कापणाऱ्या जीविताला स्थिरता आणणारे हे दोन आधार ठार झाल्यामुळे, ते आता खाली पडून फुटण्याच्या रंगांत आले होते व हे दोन दोरखंड एकाएकी तुटल्यामुळे ती मृत्यूच्या दरींत धाडकन पडण्याच्या बेतांत होती. या वेळीं तिची जिव्हा मुकी होती. तरी तिचें हृदय एकसारखें ओरडत होतें. ती मधून मधून आपले आकाशाकडील डोळे आपल्या मुलांच्या तोंडांकडे वळवी व एक लांब दुःखाचा सुस्कारा टाकी. तिचें तोंड मिटलेले होतें, पण तिची छाती एकसारखी धडधड करीत होती. तिचें सर्व शरीर स्थिर होतें, पण ती आपल्या दोन्ही हातांनी आपल्या दोघा लाडक्यांना प्रेमाने कुरवाळीत होती. या वेळीं तिची ती हृदयद्रावक स्थिति पाहून रडूं न कोसळणारा अहृदय मनुष्य सापडणें कठीण जाईल. इकडे तिचा तो बाहेरून

मुका, पण अंतर्यामीं बोलका शोक चालू असतां दोघे भाऊ जवळ जवळ अघळ-पघळ निजतील एवढी लांब-रुंद चिता रचण्यांत आली. चिता पुरी झाल्यावर तिच्यावर उचलून ठेवण्यासाठी गाडीवाला व तो तरुण गृहस्थ त्या दोघांकडे आले. त्यांनी एक-एक प्रेत उचलून त्या चितेवर एकमेकांना लागून ठेवलें. ते त्या थंडावलेल्या प्रेतांवर गवऱ्यांची घोंगडी घालणार तोंच आतापर्यंत मुकाटचाने बसलेल्या त्या शोकविव्हल आईने हंबरडा फोडला. आपल्या जागेवरून ताडकन उठली व झट्‌दिशीं तिने आपल्या दोघा लाडक्यांना मिठी मारली. कांही केल्या ती ही मिठी सोडीना व ती चिता पुरी रचूं देईना. "नाही, कधी नाही, मी माझ्या सोनुकल्यांना कधीहि सोडणार नाही. मी यांच्याबरोबर येथे निजेन. मला थेरडीला आता मागे राहून काय करावयाचें आहे? दगडू, रामडू, मला म्हातारीला टाकून एकटेच कां रे जातां? मला म्हातारीला आता कोण रे सोबत आहे? नाही नाही, लुच्च्यांनो, मी अशी कधीहि फसली जाणार नाही." तिने हे शेवटले शब्द उच्चारले, एकदा आपल्या लाडक्यांकडे नीट न्याहाळून पाहिलें. त्यांच्या गळ्यांना घट्ट मिठी मारली व त्यांच्या छातीवर आपलें डोकें ठेवलें.

तिच्या सोबतिणीने "बाई, आता उगीच रडून काय उपयोग आहे? ते का आता परत येतात?" असें बोलून तिला ओढण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला. कारण तिच्या शरीरांतून शोक करणारा आत्मा केव्हाच निघून गेला होता. ज्या दक्षिण दिशेने तिच्या मुलांचे आत्मे धांवत गेले त्याच दिशेने तिचाहि आत्मा धांवत गेला व त्याने मातृप्रेमाच्या जोरावर त्यांना केव्हाच गाठून टाकलें. चितेवरच्या दोन प्रेतां-मध्ये तिचें प्रेत ठेवण्यांत आलें. एक हात तिच्या दगडचाच्या छातीवर व दुसरा हात तिच्या रामडचाच्या छातीवर ठेवण्यांत आला. अशा रीतीने घरच्याप्रमाणे दोन पोटच्या पोरांमध्ये निजण्याचा क्रम शेवटपर्यंत तिने अव्याहत चालविला. त्यांच्यावर गोवऱ्या रचण्यांत आल्या व चितेला आग लावण्यांत आली. "आणखी एका तासांत या तीन शरीरांची तीन चिमटचा राख होऊन जाईल. आता यापुढे हे तीन प्राणी कधीहि पाहवयास सापडावयाचे नाहीत." अशा खिन्न विचाराने आमचें मन गुंग झालें असतां आम्ही बसलों होतों त्या दगडावर आम्हांस अर्धवट डोळा लागला. स्मशानांतील ती रात्रीची शांतता, हा हृदयद्रावक देखावा पाहून मनांत उत्पन्न झालेली खिन्नता, एकदा मृत झालेले प्राणी पुन्हा कधीहि परत यावयाचे नाहीत या विचारामुळे जन्मलेली ती उद्विग्नता, या त्रयीतुळे आमचे इतका वेळ उघडे असलेले डोळे मिटले व अर्धवट जागृत आणि अर्धवट निद्रिस्त अशा स्थितींत आम्ही जाऊन पडलों. या स्थितींत आम्ही फार वेळ राहिलों नाही तोंच आमच्या कानावर पुन्हा एक हृदयभेदक हंबरडा येऊन पडला.

आमच्या अर्धवट मिटलेल्या व अर्धवट उघडलेल्या नेत्रांना पुन्हा एक दुसरी गाडी दिसूं लागली. ती गाडी एक वृद्ध व पोक्त माउली स्वतः आपल्या रोडक्या हाताने व कापऱ्या आवाजाने हाकीत होती. मधून मधून ती मागे वळून पाही व

आपल्या म्हातारीच्या वार्धक्यांतील दोन भंगलेल्या काठया पाहून ती दुःखाचा लांब सुस्कारा वारंवार टाकी. तिच्याजवळ कोणी सोबतीण नव्हती व त्या गाडीवर दुसरा कोणी हाकणारा नव्हता. दुःखातिरेकाने त्या माउलीचीं गात्रें शिथिल झालीं होतीं. गाडींतील प्रेतांच्या ओझ्याने ती गाडीहि रडत होती. या निर्जीव व सजीव सोबतिणींची जोडी कण्हत-कुंथत व विव्हळत-ओरडत त्या स्मशानभूमीकडे बऱ्याच लांबून येत होती. काळोख्या रात्रीच्या वेळीं स्मशानभूमीकडे एकटी येणारी ती वृद्ध स्त्री पाहून आमचें मन गहिंवरून गेलें. अशा विपन्न व निराश्रित स्थितींत पडलेल्या त्या माउलीला हातभार लावावा या हेतूने आम्ही आपल्या जागेवरून हाललों व लगबगीने त्या कण्हणाऱ्या गाडीजवळ येऊन ठेपलों. "बाई, त्या दोऱ्या माझ्या हातांत द्या, मी हाकतों ती गाडी." हे ममतेचे शब्द कानीं पडतांच तिने एकदम एक किंकाळी फोडली. ती मोठ्याने रडूं लागली व तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. मोठ्या प्रयासाने दुःखाचा उमाळा गिळून ती म्हणाली, "बाबा, या म्हातारीच्या कानावर असे गोड व मायेचे शब्द आज ८८ वर्षें पडले नाहीत. ८८ वर्षांपूर्वी जेव्हा माझ्या दोन लाडक्यांचा एकाएकी अंत झाला तेव्हापासून मी त्यांना या गाडींत घालून स्मशानाकडे एकटी आणीत आहे. तें स्मशान अजून किती लांब आहे?"

हे तिच्या तोंडचे शब्द ऐकून व ८८ वर्षें आपल्या पोरांचीं प्रेतें गाडींत घालून स्मशानभूमीकडे ती आणीत आहे ही अश्रुतपूर्व गोष्ट ऐकून आमची चित्तवृत्ति भांबावून गेली. ती माउली पुन्हा उसळलेल्या शोकसागरांत बुडून गेली होती व आम्ही इकडे तिच्या उद्‌गारांमुळे उत्पन्न झालेल्या विस्मयोदधींत गटांगळ्या खात होतों. शोकसागराच्या बुडाशीं जाऊन वरती आल्यावर तिने पुनः आक्रान्त मांडला. "माझ्या बाळांनो, माझ्या लाडक्यांनो, माझ्या म्हातारीच्या विसाव्यांनो! या हतभागीला, या भरतभूमीला टाकून तुम्ही कायमचे गेलात ना! धर्माभिमाना! जिवंतपणीं तुझी कृति किती तरी गोंडस होती बरें! देशाभिमाना! तूं डोळे मिटण्यापूर्वी माझी किती तरी सेवा केलीस बरें! आता तुम्ही दोघेजण गेल्यावर मला म्हातारीला कोण बरें आहे! उठा बाळांनो उठा, पुन्हा एकदा डोळे उघडा व या तुमच्या आईकडे प्रेमाने पाहा. तुम्ही बोलत कां नाही बरें! असें कां म्हणून तुम्ही रुसलांत! तुमच्या दोघांच्या जिवावर माझा किती तरी मान होता? पण आता तुमच्या दोघांच्या माना ढिल्या पडल्यामुळे माझीहि म्हातारीची मान ढिली पडण्याच्या बेतांत आली आहे. तान्हुल्यांनो, तुम्ही एकदा डोळे उघडा. तुमचे ते तेजःपुंज डोळे पाहण्यासाठी माझे डोळे तान्हेले आहेत. आता माझा असा छळ करूं नका. या भरतभूमीला तुमची पूर्वीची करणी पाहून पुन्हा आनंदाचें भरतें येऊं द्या. छेः, पण मी अगदी वेडी. मेलेलीं पोरें कोठें जिवंत होतात? कालत्रयीहि तसें होणार नाही. बाबा, मेहरबानी करून मला स्मशानभूमीची वाट दाखव." हे दुःखोद्‌गार आमच्या कानांवर पडल्याबरोबर एकदम एकाएकी सर्व गोष्टींचा खुलासा झाला.

सन १८१८ सालीं या भरतभूमीच्या 'धर्माभिमान' व 'देशाभिमान' या दोन पुरुषांचा शिरच्छेद झाला व त्या दिवसापासून ही माउली मातृप्रेमाने प्रेरित होऊन त्यांचा यथाशास्त्र दहनविधि करण्यासाठी त्यांना स्मशानभूमीकडे घेऊन चालली आहे; पण तिची ही समजूत खरी आहे काय? छे:, मुळीच नाही. हे मृत झालेले तिचे मुलगे पुन्हा खात्रीने जिवंत होतील व पुन्हा ते तारुण्याने मुसमुसूं लागतील. यांना जिवंत करणारी संजीवनी मात्रा आहे पण ती या माउलीला माहीत नाही म्हणूनच ती इतकी निराश झाली आहे व म्हणूनच ती त्यांना स्मशानभूमीकडे घेऊन चालली आहे. या प्रकारचे विचारतरंग आमच्या मनांत उत्पन्न झाल्यावर आम्ही त्या माउलीच्या पायाला घट्ट मिठी मारली. तिचे ओले डोळे कोरडे केले व मोठ्या कळकळीने तिला आपलें रडूं आवरण्यास विनविलें. "आई, अगं आई, तूं आता मुळीच रडूं नको. या तुझ्या निश्चेतन पुत्रांना सचेतन करणारें औषध मजजवळ आहे. या तुझ्या बाळांच्या निर्जीव शरीरांना सजीव करणारी मात्रा माझ्यापाशीं आहे. तरी माते, गाडी माघारी फिरव. स्मशानभूमीचा रस्ता सोडून तूं घरचा रस्ता धर. घरीं गेल्यावर हीं प्रेतें नीट जपून ठेव. प्रेताच्या सहाणेवर 'शिक्षणा'ची मात्रा उगाळून ती त्यांच्या जिभांना लाव. ही मात्रा पोटांत गेल्यावर तीं प्रेतें खडबडून जागीं होतील व पुन्हा तीं पहिल्याप्रमाणे तुझी सेवा करतील व तुला सुख देतील." हे शब्द आमच्या तोंडांतून निघाले नाहीत तोंच एकदम एक मोठा आवाज झाला व त्यासरशी अर्धवट लागलेली आमची झोप किंवा तंद्री नष्ट झाली. आम्ही डोळे उघडून पहातों तों तेथे ती वृद्ध भरतभूमि दृष्टीस पडेना व तिची प्रेताची गाडी आम्हांस दिसेना. झोप लागल्यामुळे हें निव्वळ स्वप्न असावें अशी आमची खात्री झाली; पण ज्या आवाजाने आमचें हें कांही अंशीं सुखद व कांही अंशी दु:खद स्वप्न लयास गेलें तो आवाज मात्र खरा होता. मायलेकरांची तीं प्रेतें अगदी जळून खाक होण्याच्या बेतांत होतीं व तीं चितेच्या तापाने तापलेलीं त्यांचीं डोकीं फुटलीं व त्यांतून हा आवाज झाला. त्या वेळेस अकरा वाजण्याचा सुमार होता. प्रेतांच्या गाडीबरोबर आलेली ती बाई व तो तरुण मनुष्य यांनी घरचा रस्ता धरला व आम्हीहि आपल्या जागेवरून उठून हळूहळू आपल्या घराकडे चालते झालों. मागे त्या जळलेल्या चितेंतील राखेची काय वाट झाली याची चवकशी आम्हीं केली नाही व ती आम्हांस पुढे कळलीहि नाही.

– भाला, दि. २१ ऑक्टोबर १९०६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २२०४४
२०६५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# १९. तोफखाना व छापखाना

ही सृष्टि निर्माण करण्यांत परमेश्वराचा हेतु काय आहे, हें निश्चितपणें कळण्यास मार्ग नाही. पण एवढी गोष्ट मात्र निर्विवाद आहे की, हिला अस्तित्वांत आणण्याच्या कामीं जगदीशाने आपलें बुद्धिसर्वस्व व सामर्थ्य विस्तृत प्रमाणावर खर्च केलें आहे. अंतराळांतील सूर्य-चंद्रादि तारे भूतलावरील नद्या-नाले, दऱ्या-डोंगर व वृक्ष-वेली इत्यादि वस्तु व सिंह-व्याघ्रादि चतुष्पाद प्राणी ह्यांच्याकडे नजर फेकली असतां जगज्जनकाच्या चतुराईने मन गुंग होऊन जातें. पण एवढ्या ह्या सृष्टींत जर एक वस्तु घडण्यांत आली नसती, तर परमेश्वराच्या चतुरस्रपणाला पुष्कळ उणेपणा आला असता. ही वस्तु म्हणजे मनुष्यप्राणी होय. हा मनुष्यप्राणी घडतांना विश्वकर्त्याने आपलें अद्वितीय कौशल्य प्रगट केलें, ह्यांत कांहीं संशय नाही. ह्या मनुष्यप्राण्याला बुद्धिरूपी देणगी देऊन दीनदयाळु परमेश्वराने आपलें अनुपमेय दातृत्व प्रगट केलें आहे. ह्या मनुष्यप्राण्याच्या अंगीं परमेश्वराने आपले सर्व गुण ओतून ठेवले आहेत, असें म्हणावयास हरकत नाही. जर हा मनुष्यप्राणी आपल्या ईश्वरदत्त बुद्धीचा सदुपयोग करील, तर तो परमेश्वरी पदवीला जाऊन पोहोचेल.

ह्या त्याच्या ठायीं असलेल्या बुद्धीच्या प्रभावाने तो या जगांतील इतर सर्व सजीव प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ होऊन बसला आहे. जोंपर्यंत ही निसर्गदत्त बुद्धि कोणत्याहि दुर्गुणाने दूषित झालेली नसते, तोंपर्यंत मनुष्यप्राणी हा निराकार परमेश्वराचा लहानसा साकार 'फ़ोटो' आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. पण ही स्फटिकाप्रमाणे मूळची स्वच्छ असलेली बुद्धि स्वार्थाच्या पटलाने वेष्टिलेली असल्यामुळे सर्व गोष्टींचा विघाड झाला आहे. ह्या स्वार्थामुळे मनुष्याचें मनुष्यत्व नष्ट होऊन त्याला 'सैतानत्व' प्राप्त झालें आहे. या स्वार्थामुळे मनुष्याच्या अंगीं असलेल्या दैविक गुणांचे खोबरें होऊन गेलें आहे. ह्या स्वार्थामुळे मनुष्यप्राण्याच्या हातून असुरीं कृत्यें झालीं आहेत व होत आहेत. जर मानवी बुद्धि स्वार्थरूपी राक्षसाच्या तडाख्यांत सापडली नसती, तर हें जग खरोखर अमृतमय बनून गेलें असतें. जर मूळचा मानवी बुद्धीचा प्रवाह ह्या स्वार्थाच्या कर्दमाने गढूळ झाला नसता, तर ह्या जगतांत जिकडे-तिकडे आनंदीआनंद होऊन गेला असता. पण हा स्वार्थ जगाच्या उत्पत्तीपासून इतका बलवत्तर होत गेला आहे की, हल्ली त्याच्या अंगीं असलेल्या शक्तीएवढी शक्ति दुसऱ्या कोणत्याहि विकारांत नाही. ह्या स्वार्थाने व्यक्तींना व लाखो व्यक्तींनी बनलेल्या राष्ट्रांना आपले बंदे गुलाम करून टाकलें आहे. ह्या गुलामांच्या हातून तो वाटेंतील तीं बरींवाईट कृत्यें करवींत आहे. हा स्वार्थ आपला दुष्ट हेतु तडीस नेण्याकरिता निरनिराळीं साधनें पैदा करतो व त्यांच्या मदतीने आपला तळीराम गार करतो. मानवी बुद्धीच्या पाठीमागे हा स्वार्थरूपी राक्षस लागला आहे हें पाहून परमेश्वराने मनुष्यप्राण्याला कोणतेंहि नैसर्गिक मारक शस्त्र दिलें नाही.

ज्या परमेश्वराने डासासारख्या अगदी क्षुल्लक प्राण्यापासून तों थेट मृगराजासारख्या श्रेष्ठतम प्राण्यापर्यंत सर्वांना नैसर्गिक मारक शस्त्रें पुरविलीं आहेत, त्या परमेश्वराने आपल्या आवडत्या मनुष्यप्राण्याला असल्या एखाद्या शस्त्राने युक्त करूं नये ह्यांतलें इंगीत हेंच आहे. पण परमेश्वराने आपल्याकडून होईल तितकें करून जरी मनुष्यप्राणी अगदी लुळा करून घडवला आहे, तरी त्याच्या अंतर्यामीं कायमचें ठाणें देऊन बसलेल्या स्वार्थाने ही नैसर्गिक उणीव कृत्रिम उपायांनी भरून काढली आहे. नैसर्गिक शस्त्रांच्या अभावीं त्याने कृत्रिम शस्त्रें घडविलीं आहेत व त्यांनी नैसर्गिक शस्त्रांवर ताण करून सोडली आहे. नैसर्गिक शस्त्रांपेक्षा तीं कृत्रिम शस्त्रें जास्त भयंकर आहेत. कारण नैसर्गिक शस्त्रें बदलतां येत नाहीत व ती एकदा बोथड किंवा नष्ट झालीं असतां दुसरीं मिळूं शकत नाहीत. एकदा टकरींत शिंगें मोडून गेल्यावर बैलाला दुसरीं शिंगें फुटत नाहीत. एकदा विषदंत उपटला गेल्यावर नागाला दात येत नाही. हाताचा तीक्ष्ण पंजा छाटला गेल्यावर सिंहाच्या दंडांतून दुसरा पंजा बाहेर निघत नाही. त्याच-प्रमाणे सिंहाला आपला पंजा टाकून हत्तीची सोंड मिळत नाही. टोणग्याला घोड्याचें चावरें तोंड मिळण्याची आशा नाही. सापाला विंचवाची नांगी उपलब्ध होण्याचा संभव नाही. सारांश, तीं नैसर्गिक शस्त्रें बदलतां येत नाहीत. तीं एकदा बोथट व नष्ट झाल्यावर दुसरीं नवीं किंवा तीक्ष्ण मिळूं शकत नाहीत. पण हा नैसर्गिक शस्त्रां-संबंधाने असलेला नियम कृत्रिम शस्त्रांना मुळीच लागू पडत नाही. स्वार्थाने शोधून काढलेलीं कृत्रिम शस्त्रें हवीं तेव्हा बदलतां येतात व तीं बोथटलीं असतां किंवा मोडलीं असतां दुसरीं मिळूं शकतात. दुभंग झालेल्या तलवारीची जागा दुसरी अभंग तलवार पटकूं शकते. मोडलेला भाला जोडलेल्या भाल्यासाठी आपली जाग खाली करतो व नादुरुस्त झालेली बंदूक नव्या बंदुकीला कधीहि मज्जाव करीत नाही. त्याचप्रमाणे तलवारीचें स्थान भाला पटकावतो व भाल्याची जागा प्रसंग-विशेषीं बंदूक व्यापून टाकते.

सारांश, हीं कृत्रिम शस्त्रें बदलतां येतात. कृत्रिम शस्त्रांच्या ठिकाणीं अस-लेल्या ह्या सोयीमुळे तीं नैसर्गिक शस्त्रांपेक्षा जास्त मारक झालेलीं आहेत त्यांतून ज्या वेळेस हीं शस्त्रें स्वार्थाच्या हातांत जाऊन पडतात, त्या वेळेस त्यांचा मार्ग वेसुमार होऊन प्रतिपक्षी अगदी वेमार होऊन जातो. जर ह्या जगांत स्वार्थाचा जन्म झाला नसतां, तर हीं कृत्रिम शस्त्रेंहि जन्मास आलीं नसतीं व यदाकदाचित् अन्य कारणांमुळे तीं अस्तित्वांत आलीं असतीं, तरी त्यांचा उपयोग भलत्याच मार्गाकडे करण्यांत आला नसता. पण या स्वार्थामुळे हीं शस्त्रें अस्तित्वांत आलीं व त्यांचा उपयोग पाप-कर्माकडे होऊं लागला. हातांत तलवार, खंजीर किंवा भाला घेऊन हा स्वार्थ दुसऱ्यांच्या देशांवर स्वाऱ्या करून त्यांना लुबाडूं लागला, तो दुसऱ्यांचे देश उद्ध्वस्त करूं लागला व त्यांच्या पायांत दास्याच्या शृंखला ठोकूं लागला. जोंपर्यंत ह्या स्वार्थाच्या हातांत फक्त पोलादाचीं हत्यारें होतीं तोंपर्यंत

त्याची शक्ति मर्यादित होती. पण अलीकडे त्याच्या पुण्याईने त्याला एक अतिशय घातुक शस्त्र सापडलें आहे. हें घातुक शस्त्र बंदूक होय. ह्या बंदुकीने ह्या जगांत जितकी उलथापालथ केली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि शस्त्राने केली नाही. बंदूक व तोफा ह्या सैतानाच्या औरस मुली आहेत, असें म्हणावयास कांही हरकत नाही. ह्या दोन मुलींमध्ये बापाचा गुण बराच आलेला आहे. निष्कारण दुसऱ्याचा झट्दिशी नाश करणें हा आनुवंशिक गुण त्यांनी आपल्या वडिलांपासून घेतला आहे. स्वार्थाला ह्या दोघी बहिणींची पूर्ण ओळख झाल्यापासून त्यांची शक्ति इतकी अवाढव्य झाली आहे की, तो जवळ जवळ अजिंक्य होऊन बसला आहे. बंदूक व तोफा ह्या जोडीच्या जोरावर ह्या स्वार्थाने ह्या १९ व्या व २० व्या शतकांत कहर करून सोडला आहे. ह्या बंदुकींच्या व तोफांच्या साहाय्याने हा स्वार्थ गरीब व सालस लोकांच्या शरीरांना भोकें पाडीत आहे व त्यांतून गळणारें रक्त यथेच्छ प्राशन करून तो धष्टपुष्ट बनत चालला आहे. जर हीं दोन घातुक शस्त्रें ह्या स्वार्थाला मिळालीं नसतीं, तर त्याच्या खाडादपणाला आळा बसला असता. पण त्याचें नशीब बलवत्तर म्हणूनच हीं शस्त्रें त्याला पैदा झालीं आहेत.

स्वार्थबुद्धीने प्रेरित होऊन ज्या अधाशी राजांनी आजपर्यंत दुसऱ्याच्या देशांवर दरवडे घातले, त्यांना जोंपर्यंत हीं दोन नवीं आयुधें मिळालीं नव्हतीं तोंपर्यंत त्यांचा अधाशीपणा कायमचा टिकला नाही. पादाक्रान्त केलेल्या लोकांनी उचल खाऊन अशा अधाशी व आपमतलबी राजांशीं दोन हात करून त्यांना आपल्या देशाच्या बाहेर हाकलून दिलें. पादाक्रान्त झालेल्या लोकांना पादाक्रांत करणाऱ्या लोकांशीं झगडण्याची इच्छा असली, तरी जेते लोकांच्या हातांतील या बंदुकी व तोफा पाहून जित लोकांची छाती दडपून जाते. असें होण्याचें कारण उघड आहे. बंदूकवाला एक इसम बिनबंदूकवाल्या हजार इसमांबरोबर आहे व एक मनुष्य तोफेच्या मदतीने दहा हजार माणसाला चीत करूं शकतो. पण त्याच मनुष्याजवळ कितीहि तीक्ष्ण तलवार किंवा कितीहि भक्कम भाला असला, तरी त्याला दहा मनुष्यांशीं झगडतां यावयाचें नाही. बंदूक व तोफ ह्या हत्यारांच्या अभावीं हल्ली जगांत असलेल्या परतंत्रतेचा अभाव निःसंशय झाला असता. पण हीं हत्यारें नामशेष न होतां त्यांच्यांत जास्त सुधारणा होत चालल्या आहेत. ह्या सुधारणा अशा तऱ्हेच्या होत आहेत की, हीं दोन हत्यारें आणखी वर्षांनीं कोणता भयंकर प्रलय करतील, ह्याचा अंदाज करणें शक्य नाही. आजपर्यंत लागलेल्या शोधांत एक शोध जर न लागतां, तर जगाचें कोटकल्याण झालें असतें. बंदुकींतील दारू हा पदार्थ जगाला माहीत नसता, तर जगाचें अकल्याण न होतां कल्याणच झालें असतें. ह्या दारूच्या शोधाने मानव जातींचें जितकें अहित झालें आहे तितकें दुसरें कशानेहि झालें नाही. ह्या बंदुकीच्या दारूने लाखो लोकांचीं दारें कायमचीं लावलीं आहेत. जर ह्या सटवीची उचलबांगडी ह्या जगांतून झाली, तर

ह्या पृथ्वीचा चेहरा कांहीं निराळ्या तऱ्हेने फुलूं लागेल. ही दारू नामशेष झाल्यावर जगांतील बहुतेक दुःख नाहीसें होईल. ह्या दारूच्या निधनाबरोबर परतंत्रतेचें शवहि ह्या जगाच्या सीमेच्या बाहेर जाऊन पडेल. म्हणून हे जगदीशा, परतंत्रतेमध्ये खिचपत पडणाऱ्या दीनांची जर तुला दया येत असेल, तर तूं हा एवढा पदार्थ जगांतून अजीबात नाहीसा कर. असें केल्यावर तुला 'दीनदयाळ' हें विशेषण जास्त शोभेल व तुझ्या दयेची नौवद सर्व जगभर दुमदुमूं लागेल. ही दारू अजीबात नष्ट झाल्यावर तिच्या जोरावर मारक झालेल्या बंदुकांना फुंकण्यांची योग्यता येईल व मग तोफा आटवून त्यांचे तवे करणें जास्त फायदेशीर होईल. ही बंदुकीची दारू नाहीशी झाल्यावर जुलमी राजांची त्रस्त प्रजा जुलमाचा प्रतिकार करण्यासाठी कंबर कशील व त्यांचे तलवारींनी लढणारे मारेकरी हां हां म्हणतां यमसदनाला पाठवून देईल.

सारांश, हल्ली या स्वतंत्र जगांत जे परतंत्र देश आहेत त्यांना आपली निसर्ग-निर्मित स्थिति प्राप्त होण्यास एकाच गोष्टीची जरुरी आहे. ती गोष्ट म्हणजे बंदुकींतील व तोफांतील दारूचा पूर्ण नाश होय. ही अपेक्षित गोष्ट होईल किंवा नाही याबद्दल पुष्कळ संशय आहे. कारण परमेश्वराचा असा एक नियम दिसतो की, जी वस्तु एकदा सापडली आहे ती कधीहि हरवत नाही. बंदुकीच्या दारूचा एकदा शोध लागला म्हणून आता तो शोध अजीबात विसरला जाणार नाही. पण एवढ्याच नियमावरून असें मात्र कोणी समजूं नये की, या दारूवर मुळीच उपाय नाही. ह्या दारूपेक्षा शत-पटींनी जास्त मारक वस्तु परमेश्वराने निर्माण करून ठेवली आहे. तोफखान्यापेक्षा जास्त भयंकर असा एक दुसरा कारखाना निघाला आहे. त्याच्या जोरावर परतंत्र राष्ट्रांनी स्वतंत्रतेची जोड करून घेतल्याचीं उदाहरणें इतिहास जगापुढें मांडीत आहे. असा हा दुसरा कारखाना म्हणजे छापखाना होय. तोफखाना व छापखाना ह्या जोडीमध्ये दुसरा 'खाना' जास्त जोरदार व जोमदार आहे. ह्या दुसऱ्या खान्याचा मारा सुरू झाल्यावर मोठेमोठे बलाढ्य जुलमी राजे भीतीने थरथरा कापूं लागतात. छापखाना व तोफखाना ह्या उभयतांची लठ्ठालठ्ठी सुरू झाल्यावर शेवटीं छापखान्याची छाप तोफखान्यावर बसते. जुलमी राजांच्याजवळ असलेल्या तोफ-खान्यांशीं सामना करण्यासाठी त्या जुलमाने त्रस्त झालेल्या प्रजेजवळ आता छापखाने आले आहेत. ह्या छापखान्यांचा मारा सुरू झाला म्हणजे ते कोणता प्रलय करतील ह्याचा अंदाज कसलेल्या मुत्सद्द्यालाहि करतां येणार नाही. ह्या छापखान्याने आपल्या ठिकाणीं असलेली ही अद्भुतपूर्व शक्ति जगाच्या निदर्शनास पुष्कळ वेळा आणून दिली आहे. हा छापखाना इंग्लंडांत चार्लस राजाच्या तोफखान्याशीं लढला व त्यांत तो यशस्वी झाला. ह्या छापखान्याने फ्रान्सांत सोळाव्या लुईच्या तोफ-खान्याशीं सामना देऊन त्याला सामसूम करून टाकलें. ह्या छापखान्याने अमेरिकेंत इंग्लिश तोफखान्यावर चढाई करून आपली बढाई सर्व जगास जाहीर करून टाकली. ह्या व आणखी असल्या शेकडो उदाहरणांवरून कोणीहि हें कबूल करील की, तोफ-

खान्यापेक्षा छापखाना जास्त मारक व भयंकर आहे. हें इतकें तीक्ष्ण शस्त्र परमेश्वराच्या दयेने दीन झालेल्या प्रजेला उपलब्ध झालें आहे. ह्यावरून परमेश्वराचें दयाळुत्व अगदी शंभर नंबरी आहे असें नास्तिकहि कबूल करील.

सर्व शक्तिमान प्रभूने हें नवीन शस्त्र निर्माण करून तें दीन झालेल्या लोकांच्या हातांत दिलें. ह्या एकाच गोष्टीवरून अशा लोकांनी आपली उन्नति व आपले स्वाभाविक स्वातंत्र्य त्याच्या साहाय्याने कमवावें अशी त्याची इच्छा दिसते. ही परमेश्वरी इच्छा परिपूर्ण करण्याचें काम त्रस्त झालेल्या प्रजाजनांचें आहे. हें नूतनोपलब्ध झालेलें शस्त्र नीट तऱ्हेने वापरणें किंवा न वापरणें, हें सर्वस्वीं प्रजाजनांच्या हातांत आहे. प्रजाजनांच्या ह्या तोफखान्याचा मारा नीट व्हावा एतदर्थ त्याच्यावर नेमलेले गोलंदाज हुशार व हिंमतवान असले पाहिजेत. प्रतिपक्षाचा मारा कितीहि असह्य झाला, तरी जोंपर्यंत पंचप्राणांचें ठाणें देहांत आहे, तोंपर्यंत आपली जागा न सोडण्याचा दृढनिश्चय ह्या गोलंदाजांमध्ये जरूर पाहिजे. एक वेळ गोलंदाज कमी हुशार असलेले पत्करतील, पण ते कमी हिंमतवान असून मुळीच चालणार नाही. कारण कमी हुशार गोलंदाजांचा मारा चुकेल, पण कमी हिंमतवान गोलंदाजांचा मारा अजीबात बंद पडेल. ज्या प्रजेमध्ये असले हिंमतवान गोलंदाज एकापाठीमागून एक निर्माण झाले ती प्रजा ह्या छापखान्याच्या तोफखान्यावर बलाढ्य होऊन आपल्यावर जुलूम करणाऱ्या राजाशीं झुंजली व शेवटीं स्वतः छत्रपति बनली असें समजावें. छापखान्याचें हें नवीन शस्त्र अस्तित्वांत आल्यामुळे आता आपण निःशस्त्र झालों आहोंत म्हणून जगांतील कोणत्याहि लोकांनी निराश होऊन स्वस्थ बसूं नये. हें नवीन शस्त्र हातांत घेऊन त्याचा उपयोग करण्यास त्यांनी सुरुवात करावी. जगाच्या इतर भागांत ह्या शस्त्राने जो पराक्रम पूर्वी केला तोच किंवा त्याच्यापेक्षा काकणभर जास्त पराक्रम हें हल्ली व यापुढे करील. ह्या शस्त्राची धार अजून पूर्वीप्रमाणे नुसती कायम आहे एवढेंच नव्हे, तर ती दिवसेंदिवस जास्त तिखट होत चालली आहे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत धरून पारतंत्र्याच्या तुरुंगांत कोंडलेल्या प्रजाजनांनी ह्या शस्त्राचा अंगीकार करून बेलाशक आपल्या उन्नतीच्या मार्गाने दौडत सुटावें. मग त्यांची दौड बंद पाडण्याची छाती कोणताहि बलाढ्य राजा करणार नाही. यदाकदाचित् असें करण्याची इच्छा अशा राजाला झालीच, तर त्या कामांत त्याला मुळीच यश येणार नाही. कारण प्रजाजनांच्या हातांतील ह्या सुदर्शनाच्या माऱ्यापुढे कोणता मर्त्य मनुष्य टिकाव धरूं शकेल !

— भाला, दि. १ नोव्हेंबर १९०६

# २०. मात्रा लागू पडत चालली

काय, तुम्ही जें करतां तें देशहितकारक आहे किंवा देशहितविघातक आहे, अशी शंका तुमच्या मनांत येते काय ? होय. तर मग या गोष्टीला सोपा उपाय आहे. परमेश्वराच्या प्रसादाने हें शंकेचें संकट निवारण होण्याचा सुलभ मार्ग तुम्हांस अनायासें लाभला आहे. त्या मार्गाने तुम्ही चला व या दुष्ट शंकेपासून तात्काळ मोकळे व्हा. तो मार्ग हाच की, तुम्हांस ज्या गोष्टीबद्दल शंका आली असेल त्या गोष्टीबद्दल मुंबईचा 'टाइम्स' काय म्हणतो तें पाहा व त्याच्या मताच्या उलट परिणाम घडून येईल असें निर्धास्तपणें समजा. हा नियम नीट लक्षांत धरून जर तुम्हीं आपला वर्तनक्रम ठेवला, तर तुमच्या हातून नकळत सुद्धा चुकी होण्याचा संभव नाही. टाइम्सकारांनी नांवाजलेली गोष्ट सोडून द्या व त्यांनी नांवें ठेवलेल्या गोष्टीचा खुशाल अंगीकार करा. वरती दिलेल्या या नियमाच्या आधारें राष्ट्रीय सभा ही संस्था उपयोगी किंवा निरुपयोगी होत चालली आहे या गोष्टीचा निर्णय करावा. राष्ट्रीय सभा स्थापन होऊन आज एकवीस वर्षें झालीं. एवढ्या अवधींत या सभेसंबंधाने जितके लेख 'टाइम्स'मध्ये आले असतील, त्यांच्यापेक्षा जास्त लेख या वर्षांत आले आहेत. या सर्व लेखांतील मथितार्थ असा आहे की, या सभेचें धोरण चुकत चाललें आहे. गेल्या वर्षापर्यंत सदरहू सभा शिस्तवार चालत असून, स्वदेशी चळवळ व बहिष्कारयोग सुरू झाल्यापासून ही संस्था भलतीकडे वाहवत चालली आहे. या संस्थेने हल्ली धरलेला मार्ग राजद्रोही व आत्मविघातक आहे. गेल्या वर्षा-पर्यंत नेमस्त लोकांकडून ही सभा नेमस्तपणें चालविण्यांत येत होती. पण ती दे. बिपिनचंद्र पालसारख्या जहाल लोकांच्या तावडींत सापडून बेताल होऊं लागली आहे. जर असा बेतालपणा राष्ट्रीय सभेकडून करण्यांत आला, तर तिचें अतिशय नुकसान होईल. आंग्ल लोकांची सहानुभूति तिला मिळणार नाही व यामुळे सरते-शेवटीं तिचे राजकीय उद्देश फलान्वित होणार नाहीत. टाइम्सकारांचा हा आपणहून दिलेला उपदेश राष्ट्रीय सभेच्या भक्तांना कितपत रुचतो हें लवकरच दृष्टोपत्तीस येईल.

जहाल पक्षावर ताशेरा उडविण्यापूर्वी टाइम्सकारांनी नेमस्तपक्षाला पोटाशीं घट्ट आवळून धरलें आहे. नेमस्त लोक जहाल लोकांपेक्षा फार चांगले आहेत व ते राजद्रोही नाहीत असें मत टाइम्सकारांनी धडकावून दिलें आहे. या सर्टिफिकिटाने मवाळ लोक फसले जाण्याचा संभव आहे. पण त्यांनी हें लक्षांत धरावें की, ही नेहमी-चीच युक्ति आहे. जोंपर्यंत मवाळ पक्षापेक्षा जास्त जोरदार व दिलदार पक्ष अस्ति-त्वांत आला नव्हता तोंपर्यंत याच मवाळ पक्षाला अँग्लो-इंडियन पत्रांनी राजद्रोही बनविलेलें होतें. पण राष्ट्रीय सभेंत जहाल पक्ष अस्तित्वांत आल्यापासून हा मवाळ पक्ष अँग्लो-इंडियन पत्रकारांच्या डोळ्यांना लोण्यापेक्षा जास्त मऊ लागत आहे.

जहाल पक्षाने बोलक्या राष्ट्रीय सभेला मारकी बनविण्याचा घाट घालतांच त्यांच्या पोटांत धसकी बसली आहे. आता त्यांना असें वाटूं लागलें आहे की, या मारक्या जहाल लोकांपेक्षा पूर्वीचे नुसते बोलके नेमस्त लोक पुरवले. वस्तुत: ही त्यांची भीति साधार आहे. राष्ट्रीय सभा यंदापासून मारकी होणार आहे हें निर्विवाद आहे. नुसते ठराव पसार करण्यापेक्षा कांही तरी जास्त भरीव काम करण्याची तिची इच्छा दिसूं लागली आहे. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत पसार झालेल्या ठरावाबरहुकूम कृति सरकारला करण्यास भाग पाडण्याच्या उद्देशाने तिने एका अतिशय मारक हत्याराचा उपयोग करण्याचें मनांत आणलें आहे. हें हत्यार जर नीट उपयोगांत आणलें गेलें, तर त्याच्या घावाने रक्त-बंबाळ झालेलें सरकार राष्ट्रीय सभेचे ठराव अमलांत आणील अशी आमची पूर्ण खात्री आहे. हें मारक हत्यार म्हटलें म्हणजे बहिष्कार-योग होय. या बहिष्कारयोगाने असा योग जुळून येईल की, त्यामुळे राष्ट्रीय सभेचा कार्यभाग हटकून सिद्धीस जाईल. या बहिष्काररूपी हत्याराची लकाकी व पाणी पाहून टाइम्सकारांच्या तोंडचें पाणी पळालें आहे. "स्वदेशी वस्तु वापरा. तसें करण्यास आमची मुळीच हरकत नाही. पण हा बहिष्कार मात्र घालूं नका" असें टाइम्सकार मोठ्या काकुळतीने राष्ट्रीय सभेच्या सभासदांना सांगत आहे.

या बहिष्कारयोगाचा अवलंब जर राष्ट्रीय सभेने केला, तर इंग्लिश लोकांची सहानुभूति तिला मिळणार नाही अशी धमकी टाइम्सकारांनी घातली आहे. पण अशा धमकीला आता भिण्याचे दिवस उरले नाहीत. एकवीस वर्षें सरकारला विनवून पाहिलें असतां इंग्रज लोकांची कितीशी सहानुभूति तिला आतापर्यंत मिळाली आहे, हें टाइम्सकार खुलासेवार सांगतील तर फार उत्तम होईल. जर सामोपचाराने सर्व गोष्टी घडून येत्या, तर हल्लीचा प्रसंग कधीच आला नसता. पाया पडा, हात जोडा, तोंड वेंगाडा, कांही करा, पण सरकारला मुळीच दया येत नाही हें पाहून, हें शेवटचें निर्वाणीचें शस्त्र म्यानांतून बाहेर काढण्यांत आलें आहे. 'खुल्या व्यापारा'चें तत्त्व प्रतिपादन करणाऱ्या इंग्लंड देशाच्या उघडया अंगावर हें हत्यार सफाईने चालेल असें आम्हांस वाटतें. बाजारांत स्वदेशी माल मिळाल्यास दुधांत साखर पडली. तो न मिळाल्यास इंग्लंडशिवाय सर्व जगाचा माल बाजारांत पडला आहेच. जगांतील इंग्लंडेतर देशांतील माल विकत घेऊन हिंदी लोकांना आपल्या गरजा भागवितां येतील. पण हिंदी लोकांनी असें केल्यावर इंग्लंडांतील मजुरांना आपल्या भुका कशा तृप्त करतां येतील हें आम्हांला कळत नाही. पोटांत क्षुधेचा डोंबाळा भडकल्यावर सध्या झाकलेले डोळे नि:संशय उघडतील. मग हिंदी लोकांच्या राजकीय गाऱ्हाण्यांचा नीटपणें विचार करण्यांत येईल. हें बहिष्काररूपी शस्त्र अतिशय मारक आहे हें पाहून, तें फेकून देण्याविषयी टाइम्सकार राष्ट्रीय सभेला सांगत आहेत.

राष्ट्रीय सभा इंग्लिश मालावर बहिष्कार घालणार नाही. पण असें होण्यास

एक अट आहे. ती ही की, इंग्रज लोकांनी हिंदी लोकांवर राजकीय बहिष्कार घालतां कामा नये. काळा व गोरा हा भेद यापुढे करण्यांत येतां कामा नये. वसाहतींना ज्याप्रमाणे वागविण्यांत येत आहे त्याप्रमाणे आर्यभूमीला वागविण्यांत आलें पाहिजे. असें जर होईल तरच हा बहिष्कारयोग बंद पडेल. नाही तर तो तसाच चालू राहील. ह्या बहिष्कारयोगाचा स्वीकार गेल्या वर्षी राष्ट्रीय सभेने गुळमुळीत रीतीने केला आहे. पण यंदा तिने त्याचा अंगीकार उघड व स्पष्ट रीतीने करावा अशी जहाल पक्षाची इच्छा आहे. जहाल पक्षाची इच्छा परिपूर्ण होऊं नये म्हणून अँग्लो-इंडियन पत्रांच्या खटाटोपी चालल्या आहेत; पण त्यांत त्यांना यश येईल असें आम्हांस वाटत नाही. "मागून कोणी देत नाही व घेतल्याशिवाय कांही मिळत नाही." हें तत्त्व जहाल पक्षाच्या निशाणावर ठळक लिहिलेलें पाहून, टाइम्सकार रागावून गेले आहेत.

या पक्षाचे मुख्य अध्वर्यु देशभक्त बिपिनचंद्र पाल यांनी चालविलेल्या 'न्यू इंडिया' पत्रांतील एक उतारा देऊन व 'इंग्लिश लोकांशिवाय हिंदुस्थान' या नांवाचें एक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. ही बातमी सांगून ते असें म्हणतात की, "The English are here and they propose to remain." (इंग्रज लोक हिंदुस्थानांत आहेत व त्यांचा येथे राहण्याचा विचार आहे.) टाइम्स-कारांनी हें आपल्या जातभाईंचें इंगित ओकून टाकलें याबद्दल हिंदी लोक त्यांचे अत्यंत आभारी आहेत. दे. बिपिनचंद्र पाल असें म्हणतात की, "हिसकावून घेतल्या-शिवाय इंग्लिश लोक कांही एक द्यावयाचें नाहीत." पण टाइम्सकार त्यावर असें उत्तर देतात की, त्यांना व त्यांच्या जातभाईंना हिंदुस्थानांत कायमचे राहवयाचें आहे. म्हणून हिंदी लोकांना कांही एक देण्याची त्यांची इच्छा नाही.

इंग्रज लोक हिंदुस्थानांत आहेत ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. सर्व राजकीय सत्ता त्यांच्या हातांत आहे, हें निर्विवाद आहे; पण त्यांनी सदोदित येथे राहवें व त्यांच्या हातांत राजकीय सत्ता नेहमी असावी, ही टाइम्सकारांची इच्छा हिंदी लोकांना पसंत पडेल असें आम्हांस वाटत नाही. त्यांनी कालांतराने येथून जावें व ज्याप्रमाणे ते वसाहतींत कधी कधी जातात त्याप्रमाणे त्यांनी हिंदुस्थानांत यावें, अशी हिंदी लोकांची इच्छा आहे व पूर्वीचे इंग्रज मुत्सद्दी याचप्रमाणे निदान तोंडाने तरी म्हणत होते; पण अलीकडे ही वरकांती ममताहि दाखविण्यांत येत नाही. इंग्रज लोकांनी नेहमी राज्यकर्ते म्हणून हिंदुस्थानांत राहवें व हिंदी लोकांनी त्यांचे बंदे गुलाम म्हणून अखंडित सेवा करावी. ही स्थिति इंग्रज लोकांना कितीहि रुचली, तरी ती हिंदी लोकांना कधीहि आवडणार नाही. सर्व लोक स्वतंत्र असतां फक्त हिंदी लोकांनी पारतंत्र्यांत खिचपत राहवें ही इच्छा ख्रिश्चनधर्मीय इंग्रज लोकांनी धरावी हें त्यांच्या नांवास लांछनास्पद आहे. दुसऱ्यांच्या देशांत परका मनुष्य किंवा परकें राष्ट्र कायमचें टिकल्याचें एकहि उदाहरण इतिहास दाखवीत नाही. म्हणून आज-

पर्यंत न घडलेली गोष्ट यापुढे कशी घडेल, हें आम्हांस कळत नाही. स्पष्ट बोलावयाचें म्हटलें म्हणजे आगेमागे इंग्रज लोकांना हिंदुस्थान हिंदी लोकांच्या स्वाधीन करणें भाग पडेल. हिंदुस्थानला मारलेली मगरमिठी न सोडण्याचा जरी इंग्रज लोकांचा मानस असला, तरी या मगरमिठींत सापडलेली भरतभूमि देशाभिमानाच्या मालपोव्याने इतकी पुष्ट व लठ्ठ होऊन जाईल की, ती अँग्लोभूच्या कवळचांत मावणार नाही. जर तिने ही मिठी आपणहून सोडली नाही, तर तिच्या हातांना वेदना होतील व न जाणो, कदाचित् तिच्या हाताचे सांधे उखडून जातील. असा दुर्धर प्रसंग न यावा यासाठी एकच उपाय आहे. तो हा की, लठ्ठ होत चाललेल्या भरतभूमीच्या कंबरेची मिठी हळूहळू ढिली करावी व शेवटीं आंग्लभूने आपणहून ती मिठी सोडून द्यावी. ह्यांत तिचा मोठेपणा आहे. ह्यांत तिचा सुरक्षितपणा आहे.

बहिष्कारयोगाची मात्रा लागू पडत चालली या गोष्टीला टाइम्सकारांचा रोष हाच पुरेसा पुरावा आहे. बहिष्कारयोगाने हिंदी लोकांचें नुकसान होईल असें टाइम्सकार म्हणतात. त्यावरून तो आपलें हित करील, असें लोकांनी बेलाशक समजावें. ही बहिष्कारयोगरूपी मात्रा राष्ट्रीय सभेंत राजरोसपणे उगाळण्यांत यावी. असें करण्यास भिण्याचें कांही एक कारण नाही. आपले मनोरथ परिपूर्ण करून घेण्याचा हा एकच कायदेशीर मार्ग आहे. जर हा मार्ग स्वीकारण्यांत आला नाही, तर नुसती शाब्दिक याचना करून कोणताहि राजकीय हक्क मिळणार नाही. जर या बहिष्कारयोगाला राष्ट्रीय सभेने राम राम ठोकला, तर लोकहि तिला राम राम ठोकतील. बहिष्काराच्या विरूद्ध असलेल्या नेमस्त लोकांनी जरा धीर धरावा. हे दिवस षंढपणाचे नसून पुंडपणाचे आहेत. 'अक्रिय प्रतिरोध' ( Passive resistance ) हा कायदेशीर असून तितकाच फायदेशीर आहे. बहिष्कारयोग हें या अक्रिय प्रतिरोधाचें एक विशिष्ट स्वरूप आहे. या अक्रिय प्रतिरोधाने सक्रिय प्रतिरोधासारखीं कामें होतात. या अक्रिय प्रतिरोधाच्या अंगांत ही शक्ति आहे, म्हणूनच तर टाइम्सकार इतके जळफळत आहेत. पण या जळफळाटाचा आता कांही एक उपयोग होणार नाही. दिवसेंदिवस राष्ट्रीय सभा जास्त जहाल होऊन ती बहिष्कारयोगासारखीं शस्त्रें धारण करूं लागेल. तिच्या अध्यक्षस्थानीं लो. टिळक लो. लाला लजपतराय ह्यांच्यासारखे अस्सल देशभक्त शोभूं लागतील. तिला नियमबद्धता मिळून तिच्या शाखा व उपशाखा प्रत्येक जिल्ह्यांत, प्रत्येक तालुक्यांत, नव्हे प्रत्येक खेडेगावांत पसरूं लागतील. राष्ट्रीय सभेचा हा वृक्ष इतका रुंदावेल की, तो आपल्या फांद्यांनी सर्व हिंदुस्थान देश व्यापून टाकील. तिच्या अंगीं ३० कोटि लोकांची शक्ति एकवटेल व ३० कोटि लोकांजवळील पैसा तिचा खजिना होईल.

अशा राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाच्या जिभेंतून ३० कोटि लोकांच्या मागण्या बाहेर पडतील व त्या मागण्या सिद्धीस नेण्याकरिता तीस कोटि अंतःकरणें एकजुटीने काम

करतील. ३० कोटि हिंदी लोकांच्या अंतःकरणांची अशी जूट झाल्यावर राष्ट्रीय सभा ही हिंदुस्थानची पार्लमेंट सभा होईल. सर्व राजकीय सत्ता तिच्या हातांत येईल व ज्याप्रमाणे इंग्लिश पार्लमेंट इंग्रज लोकांना सुख देत आहे, त्याप्रमाणे राष्ट्रीय सभा हिंदी लोकांना आनंद देईल. तिच्या अंगांत ही गुप्त शक्ति आहे, अशी आमची समजूत आहे. मात्र ह्या शक्तीचा स्फोट होण्यास तिने स्वावलंबी झालें पाहिजे. तिने जहाल झालें पाहिजे, तिने बहिष्कारयोगी झालें पाहिजे व तिने आणखी परिस्थित्यनुरूप निरनिराळ्या योगांची साधना केली पाहिजे. राष्ट्रीय सभा ज्या वेळेस असें वर्तन करूं लागेल त्या वेळेस तिच्या विरुद्ध ॲंग्लो-इंडियन पत्रांकडून एकच पुकारा करण्यांत येईल असें निःसंशय समजावें. अशी कोल्हेकुई सुरू झाली म्हणजे स्वीकृत मार्गापासून परावृत्त न होतां तसाच नेट पुढे धरावा. हल्ली अशा ओरडाओरडीला प्रारंभ झाला आहे. ह्या एकाच प्रमाणावरून राष्ट्रीय सभा जिवंत संस्थेप्रमाणे काम करण्याच्या बेतांत आहे, असें समजण्यास हरकत नाही. पहिल्या पहिल्यांदा तिच्या या भरीव कामाला सरकारकडून अडथळा येण्याचा संभव आहे. पण आपण करतों हें देशकार्य म्हणून देवकार्य आहे अशी पक्की खूणगाठ बांधून, प्रत्येक जातिवंत भरतपुत्राने मातृसेवा करण्यास प्रारंभ करावा. देशोन्नतीचा मार्ग मऊ व गुळगुळीत नाही; तो खडकाळ व खडबडीत आहे. ह्या मार्गांत खड्डे आहेत. प्रसंगविशेषीं पाय मुरगळण्याची किंवा अजीबात तुकडा पडण्याची भीति आहे. असें जरी आहे तरी हें पवित्र काम आहे असें समजून प्रत्येकाने आपलें कर्तव्यकर्म करीत असावें. आपल्या प्रयत्नांना यश येवो किंवा न येवो, काम करणें आपलें कर्तव्य आहे. यश देणें परमेश्वराच्या हातांत आहे. जगदीश्वर सत्कर्मांना यश देतो असें पुरातनकालांतील शेकडो दाखले आहेत, तरी त्या दाखल्यांवर सर्वस्वीं विश्वास ठेवून परमेश्वराला स्मरून देशकार्य करीत राहवें. आमची तर अशी श्रद्धा आहे की, देवाला स्मरून देशकार्य केल्यास यश हटकून यावयाचेंच.

— भाला, दि. ११ नोव्हेंबर १९०६

---

## २१. एका कोकणच्या मुलाची गोष्ट

मी कोकणचा राहणारा असून माझें मूळ गाव श्रीवर्धन होय. बाळाजी विश्वनाथ भट पेशवे ह्यांच्या घराण्यांत जरी माझा जन्म झाला नाही, तरी मी त्या गावीं पृथ्वीवरील पहिला श्वासोच्छ्वास केल्यामुळे बालपणापासून माझ्या मनांत पेशवाईबद्दल एक प्रकारची पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. या पेशव्याईचें मुख्य स्थान जें पुणें शहर तें जन्मास येऊन एकदा तरी पाहवें, अशी इच्छा लहानपणींच माझ्या

हृदयांत जन्मास आली. ती माझ्या वयाच्या वाढीबरोबर वृद्धिंगत होत गेली. जसजसें माझें वय मोठें होत गेलें तसतशी इतिहासाच्या वाचनानें माझी इच्छा अनावर झाली. केव्हा एकदा मी पुणें शहर पाहीन असा निदिध्यास मला रात्रंदिवस लागला. शाळेंतील अभ्यास मला सुचेना व संध्याकाळचे खेळ मला गोड वाटेनात. महाराष्ट्र-भूमीचे हृदय जें पुणें शहर तें पाहून आपल्या डोळ्यांचें सार्थक करून घ्यावें, अशी तळमळ माझ्या अंतःकरणाला एकसारखी लागून राहिली. बारा वर्षांच्या आंत पूर्व पुण्याईनें मला इतिहासाची गोडी लागली व त्यामुळें मी इतिहासावरील माझ्या गावीं उपलब्ध अशीं बहुतेक सर्व पुस्तकें वाचून टाकलीं. हिंदुस्थानांतील इतिहास-प्रसिद्ध दिल्ली आग्रा, विजापूर, कोल्हापूर, श्रीरंगपट्टण वगैरे शहरांपेक्षा पुणें शहर मला जास्त गोंडस व मोहक वाटूं लागलें. ज्या शहरीं एके वेळीं सर्व हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें हालत होतीं तें शहर अवलोकन करण्यासाठी माझें आतुर मन दिवसेंदिवस जास्त धडपड करूं लागलें. कांही होवो व कसेंहि होवो, पण एकदा पुणें शहर मी पाहीनच पाहीन, असा मनाचा निश्चय मीं करून टाकला.

कोकणांतून देशावर इतक्या लांब दूरवरचा प्रवास करण्यास बराच पैसा लागेल ह्या समजुतीनें मी हळूहळू पैसे दोन पैसे जमवूं लागलों व ज्या शहराच्या दर्शना-साठी मी इतका उतावीळ झालों होतों त्या शहरासंबंधानें पुस्तकांतून व तोंडीं जितकी माहिती मिळविण्यासारखी होती तितकी मी मिळवून ठेवली. जरी ऐतिहासिक पुस्तकें वाचण्याचा नाद मला लहानपणापासूनच होता, तरी त्या नादामुळें मी मराठी शाळें-तील अभ्यासाची हयगय कधी केली नाही. मराठी अभ्यासक्रम संपल्यावर इंग्रजी शिकण्याकरिता मी मुंबईस गेलों व आता माझी लहानपणापासूनची इच्छा परिपूर्ण होईल अशी आशा मला वाटूं लागली. दरवर्षी मी श्रीवर्धन सोडून मुंबईस जाई व पुन्हा परत गावीं येई. पण मुंबईहून पुण्यास जाण्याचा योग कांहीं केल्या जुळेना. कोणती ना कोणती अडचण उपस्थित होऊन पुण्यास जाण्याचा बेत रहित होत असे. एखाद्या गोष्टीविषयी हपापलेलें मन ती गोष्ट दूर दूर जाऊं लागली म्हणजे कसें चलबिचल होतें त्याची कल्पना प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय होणें शक्य नाही. ज्या वेळेस मुंबईस प्लेग सुरू होई त्या वेळेस सकाळ-संध्याकाळ परमेश्वराजवळ माझी एवढीच प्रार्थना असे की, "प्रभो, पुण्यनगरीचें दर्शन होण्यापूर्वी माझे डोळे तूं कायमचे मिटूं नकोस." माझी पामराची ही प्रार्थना दीनदयाळु जगदीशानें ऐकली व जरी मी कधी कधी महिना-दीड महिनाभर प्लेगांत मुंबईंत राहत असे तरी प्रभूच्या प्रसादानें मी प्लेगोबाच्या तडाख्यांत कधी सापडलों नाही. पुणें शहराच्या दर्शनाची इच्छा पुढे पुढे इतकी उत्कट व अनावर झाली की, कांही होवो पण यंदा मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर पुणें शहरास जाण्याचा मीं दृढनिश्चय केला. जसे जसे परीक्षेचे दिवस जवळ जवळ येत चालले, तसतसे माझ्या मनांत दोन प्रकारचे मनोविकार उत्पन्न होऊं लागले. परीक्षेंत यश येईल किंवा नाही याबद्दल मला भीति वाटूं लागली

व त्याप्रमाणेच पुणें शहराबद्दल माझ्या मनांत निरंतर वसत असलेली प्रचीति जास्त जास्त दुणावत चालली. परीक्षेच्या दिवसापूर्वी व परीक्षेच्या दिवसांत माझें मन ह्या एकाच विचाराने व्यापून गेलें होतें. परीक्षेच्या मंडपाकडे जात असतां मधेच रस्त्यांत एकाएकी माझें पाऊल थांबे व परीक्षेच्या मंडपांत उत्तरें लिहीत असतां कांही एक कारण नसतां एकदम टाक जागच्या जागीं अडून बसे. परीक्षेच्या मंडपांतून बाहेर पडल्यावर आपल्या मित्रांशीं बोलतांना मधेच माझी जीभ अडखळे व त्या वेळेपुरती माझी वृत्ति शून्याकार होऊन जाई. ह्याप्रमाणे माझ्या मनाची कांही अंशीं सुखद व कांही अंशीं दुःखद स्थिति झाली होती. एकदा पुण्यास गेल्याशिवाय माझी बावरलेली वृत्ति ताळ्यावर येणार नाही, असें माझ्या मनाने पक्कें घेतलें. अस्वस्थ झालेल्या मनाला स्थिरता आणण्याकरिता मीं मुंबईतील पुष्कळ प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. मीं राणीचा बाग पाहिला व भाऊचा धक्का पाहिला. राजाभाई टॉवरवर चढलों. बॅकबेवर हिंडून पाहिलें, पण कांही केल्या माझें मन स्थिर होईना व मला चैन पडेना. वास्तविक रीतीने पाहिलें असतां मुंबईतील हीं दर्शनीय स्थळें माझ्या अस्थिर मनाचें सांत्वन करूं शकलीं नाहीत. यांत त्यांचा कांही दोष नाही. मुंबईतील हीं दर्शनीय स्थळें ज्या ज्या वेळेस मी पाही त्या त्या वेळेस माझ्या मनांत कांही निराळेच विचारतरंग उद्भवत असत. हीं स्थळें माझ्या मनाचें समाधान कशीं करणार? विश्रामबाग पाहवयाला घोंघावलेलें मन राणीच्या बागेच्या दर्शनाने तृप्त कसें होणार? पर्वतीच्या पायऱ्या चढण्यास फुरफुरलेले पाय राजाभाई टॉवरच्या पायऱ्या चढून शांत कसें होणार? पर्वतीच्या रमण्यांतील शुद्ध हवा खाण्यास आतुर झालेलीं माझीं फुप्फुसें बॅकबेची हवा खाऊन समाधान कसें पावणार? राणीच्या बागेंत राम नाही, राजाभाई टॉवरमध्ये जीव नाही व बॅकबेच्या हवेंत 'तें' नाही.

असो; मी ज्या चाळींत राहत होतों त्या चाळींतील एक गृहस्थ पुण्यास जावयास निघाले व त्यांच्याबरोबर पुण्यास जाण्यास मीहि तयार झालों. माझ्या बालपणापासून खा-खा करीत असलेली माझी मनीषा आता कांही तासांनी तृप्त होणार हा सुखद विचार माझ्या मनाला गुदगुल्या करूं लागला. चाळींतील गृहस्थाबरोबर मी निघालों व तिकीट काढून आगगाडीच्या डब्यांत जाऊन बसलों. पण आता गाडी धावण्यास सुरुवात होण्यापूर्वीच माझें हावरें मन अगोदरच धांवूं लागलें. तें भराभर स्टेशनें गाठूं लागलें. तें बोरघाट केव्हाच चढूं लागलें. मनाच्या अशा उल्लू स्थितींत मी हेलकावे खात असतां घंटा होऊन गाडी चालूं लागली. आगगाडीची खडखड व मनाची धडधड यामुळे वाटेवर कोणतीं स्टेशनें व कोणकोणत्या वस्तु दृष्टीस पडल्या, हें मला सांगतां येत नाही. माझ्या मनाची तंद्री कांही दुसरीकडेच लागली होती. मी माझ्याच नादांत असतां गाडी उभी राहिली व स्टेशनावरील पोर्टर 'वडगाव वडगाव' असें ओरडला. हे शब्द कानीं पडतांच विजेचा धक्का बसलेल्या माणसाप्रमाणे मी दचकून उभा राहिलों. "काय, हें

इतिहासप्रसिद्ध वडगावच काय? सन १७७९ सालचें हें वडगाव काय? मराठ्यांच्या मर्दुमकीचें हेंच वडगाव ना!" असे उद्‌गार माझ्या मुखावाटे आपोआप व सहजासहजीं निघाले.

खरोखर 'वडगाव' हा चार अक्षरीं शब्द अस्सल मराठ्यांच्या हृदयांत किती तरी चेतना उत्पन्न करतो बरें? हा शब्द त्यांच्या हृदयाला त्यांच्या पूर्वजांच्या शौर्याची व युद्धचातुर्याची आठवण करून देतो. हा शब्द त्यांच्या अंतःकरणांत स्पृहणीय सगर्वतेची लाट उसळून देतो. हल्लीच्या कष्टमय परिस्थितींत हा शब्द त्यांच्या मनाचें अंशतः सांत्वन करतो. हा शब्द त्यांना धीर देतो व भावी आशेचें सुंदर व रमणीय चित्र त्यांच्या डोळ्यापुढे टांगून ठेवतो. प्रतापगड, साल्हेर, भोपाळ, वसई, राक्षसभुवन, खर्डे इत्यादि शब्दांपेक्षा 'वडगाव' हा शब्द मराठ्यांना जास्त प्रिय वाटतो. याचें कारण उघड आहे. वडगावची रणभूमि असें सांगते की, पौर्वात्य लोक पाश्चिमात्य लोकांपेक्षा युद्धकलेंत कमी वाकबगार नाहीत. हें रणमैदान असें मत देतें की, हुशार सेनापति मिळाल्यावर काळे लोक गोऱ्या लोकांना रणभूमीवर पिटाळूं शकतात. वडगावची लढाई सर्व जगाला असें जाहीर करते की' मराठे लोक कांही लेचेपेचे योद्धे नाहीत. या वडगावच्या स्टेशनवर गाडी पुष्कळ वेळ थांबावी असें मला वाटूं लागलें. मला तें मराठी वीरांच्या पायांनी पुनीत झालेलें रणमैदान पोटभर पाहण्याची लालसा उत्पन्न झाली. खाली उतरून त्या पावन क्षेत्रावर पसरलेल्या धुळींत लोळून आपल्या देहाला पवित्रपणा आणावा अशी सात्त्विक इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. ज्या झाडावरून 'इस्टूरफाकडचा'च्या शरीराचा मोधळा खाली पडला तें झाड, जवानमर्द हरिपंत फडके व महादजी शिंदे ज्या टेकाडावर उभे राहून आपल्या सैन्याला हुकूम सोडीत होते तें टेकाड व टोपीवाल्यांना पिटाळून लावल्यावर दमलेभागलेले मराठे वीर ज्या ओढ्यावर पोटभर पाणी प्याले तो ओढा पाहण्याची इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. पण त्याचा काय उपयोग!

घंटा होऊन गाडी सुरू झाली व माझ्या मनांतील इच्छा जागच्या जागीं जिरून गेली. कांही हरकत नाही. पुन्हा परत येईन व वडगावचें रणमैदान पोटभर डोळे भरून पाहीन असा निश्चय मीं आपल्या मनाशीं केला. आता गाडीचा वेग वाढूं लागला व त्यामुळे त्या मैदानाचें क्षेत्र कमी कमी होत जाऊन शेवटीं तें अजीबात दृष्टीच्या आड झालें. गाडीच्या खिडकीच्या बाहेर काढलेलें तोंड मीं आंत घेतलें व बाकावर जाऊन बसलों, पण त्या वेळीं माझ्या मनांत एकापाठीमागून एक अशी अशा शेकडो विचारांची शर्यत लागून राहिली. अवघीं सवाशे वर्षे आणि तेवढ्यांत इतका भयंकर राष्ट्रीय अधःपात व्हावा ना! हरिपंत फडक्यांच्या वंशजांना एका शतकांत 'हाय हाय' म्हणण्याची पाळी यावी ना! महादजी शिंद्यांच्या मर्द शिपायांचे वंशज दोन-चार पिढ्यांत इतके मठ्ठ व्हावेत ना! हा सर्व काळाचा

महिमा! ही सर्व प्रभूची लीला! हें पूर्वजन्मीचें प्राक्तन! अशा विचारांच्या भोवऱ्यांत माझें मन गरगर फिरत आहे इतक्यांत पुन्हा एकदा गाडी थांबली व स्टेशनवरील पोर्टरने मोठ्याने उच्चारलेला 'खडकी खडकी' आवाज माझ्या कानावर पडून मी खडबडून उभा राहिलों. 'खडकी' हीं तीन अक्षरें कानीं पडतांच शेवटल्या रावबाजींचें चित्र माझ्या डोळ्यासमोर उभें राहिलें. पेशवाईचें व मराठ-मंडळाचें जहाज फोडून टाकणाऱ्या खडकीच्या मैदानाचा खडक माझ्यापुढे दत्त करून उभा राहिला.

आतापर्यंत आशेच्या व उल्हासाच्या प्रकाशाने प्रफुल्लित झालेलें माझें मन निराशेच्या व निरुत्साहाच्या काळ्याकुट्ट काळोखाने शून्य झालें. सोळा मैलांच्या अंतरावर असलेल्या या दोन मैदानांची किती तरी विरुद्ध करणी बरें! एकाने मराठ्यांना जय दिला, तर दुसऱ्याने टोपीवाल्यांना विजयी केलें. एकाने पेशवाईचें संरक्षण केलें, तर दुसऱ्याने तिचें निर्मूलन केलें. एका मैदानावर मराठ्यांच्या स्वतंत्रतेचा छबिना निघाला, तर दुसऱ्यांत तिचें प्रेत गाडलें गेलें. वडगावचें रणमैदान पाहून माझे डोळे तृप्त झाले नाहीत, पण खडकीचें रणमैदान पाहून ते संतप्त झाले. केव्हा गाडी सुटेल व केव्हा हें मैदान दृष्टिआड होईल असें मला झालें. आतापर्यंत उड्या मारणाऱ्या माझ्या मनाच्या तंगड्या अजीबात गळून पडल्या असें मला वाटूं लागलें. पुण्यांत गेल्यावर आनंदाच्या एखाद्या किरणाची उष्णता माझ्या नैराश्याच्या गारठ्याने काकडलेल्या मनाला मिळेल का, असा प्रश्न मीं आपल्या मनाशीं केला. त्याचें उत्तर माझें मन 'होय' म्हणून देईना; आणि त्याने तसें उत्तर द्यावें तरी कसें? १८१८ सालचें पुण्यनगरीचें सौख्य १९०६ सालच्या पुणें शहरांत कोठून असणार? माझी खडकी सुटली व थोड्याच वेळांत गाडी पुण्याच्या स्टेशनांत येऊन थडकली. ती संध्याकाळीं ५ वाजण्याची वेळ होती. आमच्या चाळींतील गृहस्थ आपल्या वाटेने निघून गेले व मीहि आपला मार्ग धरण्याच्या पंथाला लागलों. स्टेशनच्या बाहेर येऊन मी एका टांगेवाल्याला सांगितलें की, "गड्या, मला श्रीमंतांच्या वाड्या-जवळ घेऊन जा." माझे हे शब्द त्याने ऐकतांच स्मित करून तो म्हणाला, "दादा, तुमचे कोठले हे श्रीमंत!" हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकून माझ्या मनाला दचका बसला. अजून पुरीं शंभर वर्षें झालीं नाहीत तोंच सर्व ओळख बुजाली अं! पण यांत त्यांचा काय दोष आहे बरें! आज तीन-चार पिढ्या जर पुण्यांत श्रीमंतांचें कोणतेंहि सजीव स्मारक डोळ्यांना दिसत नाही, तर मग तें ओळख बुजून गेले ह्यांत नवल तें कोणतें? पण रात्रीची दासी जी संध्याकाळ ती झपाझप पावलें टाकीत पृथ्वीवर उतरूं लागली व तिच्या आगमनापूर्वी पुणें शहर गाठून पुन्हा परत मुंबईस जाण्याचा माझा बेत होता. "बाबा रे, शनिवार पेठ तुला माहीत आहे का? त्या पेठेंत सभोवतालीं कोट असलेला वाडा तुला ठाऊक नाही का?" असा प्रश्न मी पुन्हा त्या टांगेवाल्याला केला. माझा प्रश्न ऐकतांच तो टांगेवाला झट्दिशीं म्हणाला,

"हं, शनिवारच्या वाड्यांत तुम्हांला जावयाचें का? चला उठा, गाडींत बसा." शनिवारचा वाडा तोच श्रीमंतांचा वाडा असला पाहिजे अशी माझी खात्री झाली. मीं तांग्यांत पाऊल टाकलें. अजून तिन्हीसांज होण्यास पुरे दोन तास होते. कारण ते उन्हाळ्याचे दिवस होते. ह्या दोन तासांत पुण्यांत पाहण्यासारखीं जीं दोन स्थळें आहेत तीं पाहून परतावें असा माझा निश्चय होता. हीं दोन स्थळें म्हणजे शनिवारचा वाडा व पर्वतीचें देऊळ होय. माझा तांगा रस्त्यांच्या नागमोडींतून जाऊं लागला. मी दोन्ही बाजूंना कौतुकाने पाहूं लागलों. वाडा केव्हा दृष्टीस पडेल असें मला होऊन गेलें. एका वळणावर तांगा वळला व एका भव्य पटांगणावर तांगेवाल्याने तांगा उभा केला. "दादा, तो पहा वाडा" असें बोलून त्याने आपलें बोट एका उंच दरवाज्याकडे केलें. त्या दरवाज्याचें बाह्य स्वरूप पाहून हा दरवाजा श्रीमंतांच्याच वाड्याचा असला पाहिजे अशी माझ्या मनाची खात्री झाली. तो अंबारीसकट हत्ती आंत जाईल इतका उंच दरवाजा, ते त्याला ठोकलेले पोलादाचे टोकाला निमुळते झालेले मोठमोठाले खिळे व दरवाज्यावरच्या भागांतून व दोन्ही बाजूंतून गोळ्या मारण्यासाठी ठेवलेलीं भोकें ह्यांनी ह्या वाड्याच्या पूर्वस्वरूपाची ओळख मला पूर्णपणें करून दिली. एखाद्या पहारेकऱ्याप्रमाणे आंतील वाड्याचें रक्षण करीत बसणाऱ्या त्या दरवाज्यांतून मी आंत गेलों व सभोवतालीं नजर फेकली. तों सर्वच उलटा प्रकार माझ्या नजरेस पडला. आंतील सात चौक कोठे दिसेनात, आरसेमहाल, मस्तानीमहाल माझ्या दृष्टीस पडेनात व श्रीमंतांच्या वाड्याचे सात मजले कोठेहि आढळेनात.

मेलेल्या वाघाच्या शरीरांतील अस्थि, मांस, मज्जा वगैरे काढून ज्याप्रमाणे त्याच्या कातड्यांत तूस भरून ठेवतात, त्याप्रमाणे त्या वाड्याच्या शरीराची दशा झाली होती. आंत पाहण्यासारखें कांही नव्हतें. "श्रीमंतांचा हा वाडा गेला तरी कोठे व त्यामध्ये राहणारे पेशव्यांचे वंशज आहेत तरी कोठे," असा प्रश्न मीं तेथे केला, पण त्यांचें उत्तर मला कोणी देईना. माझ्याशीं बोलण्यास आंत कोणी नाही हें पाहून मी बाहेर आलों व पूर्वीपासून तेथे हयात असलेला दरवाजा माझ्या प्रश्नाचें उत्तर देईल ह्या आशेने मी त्याच्या समोर जाऊन उभा राहिलों. पुन्हा मोठ्याने मी असा प्रश्न केला की, हे प्रासादरक्षका, तुझे धनी कोठे आहेत व तूं येथे एकटा राहून काय करतोस बरें? पण तो दरवाजाहि मुकाट्यानेच उभा राहिला. एकदा, दोनदा, तीनदा मीं वरील प्रश्न विचारला, पण त्याने एक अक्षरहि तोंडावाटे बाहेर काढलें नाही. मात्र हा प्रश्न विचारला म्हणजे तो कर्कश आवाज काढून रडूं मात्र लागे. तो रडूं लागलेला पाहून माझे डोळे पाण्याने डबडबून गेले. एकदम कंठ गहिवरून आला. माझ्या तोंडांतून शब्द निघेनात. बराच वेळ मी तसाच जागेवर स्तब्ध उभा राहिलों. पण आता संध्याकाळ होऊं लागली व रात्रीची अंधुक अंधुक छाया सर्वत्र पसरूं लागली. "पेशव्यांचे वंशज कोठे गेले व मराठे मंडळाची काय वाट झाली?" ह्या प्रश्नाचें उत्तर हा दरवाजा देत नाही, तरी पण त्याचें उत्तर खडकीचें मैदान निःसंशय

देईल असें माझ्या मनाने घेतलें. खडकीच्या मैदानाची गाठ घेऊन त्याला हा प्रश्न विचारण्यासाठी मी आपलें पाऊल उचललें. पण तोंड फिरविण्यापूर्वी मी त्या दरवाज्याची प्रार्थना केली की, हे लोभ्या, धनी गेल्यावर अजून तूं जिवंत कशासाठीं राहिलास बरें. प्रामाणिक चाकराप्रमाणे तूं धन्याच्या पाठोपाठ जाणें योग्य नव्हतें का?" माझी ही प्रार्थना ऐकून तो दरवाजा आपल्या फळ्याचे दोन ओठ उघडून बोलूं लागणार तोंच मीं तोंड फिरविलें व स्टेशनची वाट धरली. वाटेने खडकीच्या मैदानाला माझा प्रश्न विचारीन असा निश्चय मीं केला होता. पण पुण्याच्याच स्टेशनवर मला जी झोप लागली ती बोरीबंदरपर्यंत तशीच टिकली. खडकीचें मैदान केव्हा गेलें हें मला कळलें नाही व म्हणून माझा प्रश्न माझ्याजवळच राहिला.

– भाला, दि. १ डिसेंबर १९०६

---

## २२. 'स्वयंसेवकाचें' ताम्हन

आजचा दिवस चैत्री पाडव्याचा. नूतन वर्षाचा हा पहिला दिवस. वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे हा दिवस सुखाचा व आनंदाचा असावयास पाहिजे. पण भरतभूमीच्या खडतर नशिबाने तिच्या तोंडावरील आनंद व उल्हास आज एक शतकभर पार नाहीसा झाला आहे. सन १८१८ सालापासून दरवर्षीच्या पहिल्या दिवशीं पाडवा आला व लोकांनी त्या दिवशीं आपआपल्या घरीं गुडचा उभारल्या. पण आपण गुडचा कां उभारतों व आनंदसूचक व विजयदर्शक गुडचा उभारण्यासारखी आपली राजकीय स्थिति आहे किंवा नाही, ह्या गोष्टीचा कोणीं एक क्षणभर तरी विचार केला आहे काय? ज्यांना आनंद वाटतो त्यांनी गुडचा खुशाल उभाराव्या व जे सुखांत व स्वराज्यांत पोहत असतील, त्यांनी गोडधोड खाऊन वेलाशक चैन करावी. पण ज्या लोकांना स्वातंत्र्य नाही, ज्या लोकांना जगांत मान नाही व ज्या लोकांना चतुष्पाद प्राण्यांची स्थिति प्राप्त झाली आहे, अशा लोकांनी आपल्या घरांच्या ओटचांवर व गच्च्यांवर गुडचा-तोरणें उभारावींत ह्यासारखी निर्लज्जपणाची व बेशरमपणाची दुसरी गोष्ट नाही. बांधवहो, गुडचा उभारण्यासारखें आज तुमच्याजवळ काय आहे? स्वातंत्र्यशाली लोकांनी गुडचा उभारल्या तर त्यांत तथ्य आहे. कारण अशा गुडचा म्हणजे घरोघरीं स्वातंत्र्याचीं लहान लहान उभारलेलीं निशाणें होत. स्वातंत्र्यपूर्ण राष्ट्रांत हीं स्वतंत्रतादेवीचीं लहान लहान निशाणें वाऱ्याच्या झुळकेसरशीं नाचूं-बागडूं लागलीं म्हणजे त्या निशाणांच्या बरोबर अशा लोकांचीं अंतःकरणेंहि आनंदाने, उल्हासाने व उमेदीने नाचूं-बागडूं लागतात. पण हें स्वर्गीय सुख हिंदी लोकांच्या नशिबीं आजमितीस कोठें आहे!

हल्लीच्या चैत्री पाडव्याच्या गुडचा स्वतंत्रतादेवीच्या विजयरथाला चोहो बाजूंनी लावलेलीं निशाणें नसून, त्या ज्या थडग्यांत तिला शंभर वर्षांपूर्वी गाडून टाकण्यांत आलें त्या थडग्यावरील पताका होत. हल्लीच्या गुडचांच्या शेवटावर टांगण्यांत आलेल्या गाठ्यांना स्वतंत्रतेच्या साखरेची गोडी नसून, त्यांना पारतंत्र्याच्या विषाचा कडूपणा आहे. हल्लीच्या गुडचांना लोंबणाऱ्या भरजरी वस्त्रांच्या प्रत्येक धाग्यावर 'गुलाम, दास' हीं अक्षरें दृष्टिगोचर होत आहेत. अशा दास्यदर्शक गुडचा उभारण्यांत शहाणपणा नाही व त्यापासून उपयोगहि नाही. हिंदी लोकांचें प्रत्येक मागे गेलेलें वर्ष दुःखमय आहे व पुढे येणारें वर्ष मागच्या वर्षाहून जास्त कष्टमय होण्याचा संभव आहे. पूर्वी व पुढे, मागल्या सालीं व पुढल्या सालीं, काल व उद्या, ह्याप्रमाणे नेहमी दुःखाचें वातावरण सभोवतालीं दाट पसरलें असतां, आपण गुडचा उभाराव्यात ही जितकी खेदाची गोष्ट आहे तितकीच ती आश्चर्याची गोष्ट आहे. आपल्या स्वतंत्र पूर्वजांनी आपल्या आयुष्यांत गुडचा उभारल्या व ते त्यांनी सर्वोत्कृष्ट केलें. सन १६७४ सालीं श्रीशिवाजी-महाराजांना राज्याभिषेक झाल्यानंतर आपल्या पूज्य पूर्वजांनी सन १८१८ पर्यंत गुडचा उभारल्या व त्या गुडचांना साजेल अशी कृति केली. पण सन १८१८ साला-नंतर केवळ औपचारिक धर्मविधि म्हणून जर आपण गुडचा उभारीत असूं, तर ह्या अनावश्यक धर्मविधीला जितक्या लवकर फाटा देण्यांत येईल तितकें जास्त चांगलें होय. ज्या वेळेला भरतभूमीला स्वराज्याची जोड होईल, त्या वेळीं आपण गुडचा उभारूं व त्या कायमच्या वर्षभर ठेवूं. त्या वेळीं चैत्री पाडव्याच्या दिवशीं सकाळीं उभारण्यांत आलेल्या गुडचा संध्याकाळीं खाली पाडण्यांत येणार नाही, पण सध्याच्या कष्टमय राजकीय स्थितींत कोणीं कधीहि गुडचा उभारूं नयेत व जगांत आपलें हसें करून घेऊं नये.

यंदाच्या चैत्री पाडव्याला व स्वराज्याची प्राप्ति होईपर्यंत येणाऱ्या प्रत्येक पाडव्याच्या दिवशीं साखरेच्या गाठ्या, रुप्याचीं भांडीं व रेशमाचीं वस्त्रें असलेल्या गुडचा जरी उभारण्यांत येऊं नयेत, तरी पण ह्या दिवशीं दुसऱ्या कोणत्याच प्रकारच्या गुडचा उभारण्यांत येऊ नयेत असें मात्र कोणी समजूं नये. आजपासून प्रत्येक देशभक्त महाराष्ट्रियाने आपल्या घराच्या अतिशय उंच भागावर एक गुडी उभारावी व ती अडीच महिने म्हणजे दशाहार संपेपर्यंत तशीच कायम ठेवावी. ही नवीन तऱ्हेची गुडी आनंदसूचक नसून देशदर्शक आहे. ही उभारल्यावर ती उभार-णाऱ्या मनुष्याला घरीं स्वस्थ बसतां न येतां त्याला घराच्या बाहेर पडून देशबांधवां-साठी कष्ट करावे लागतील. अशी ही गुडी म्हटली म्हणजे 'मूठभराई'ची गुडी होय. ह्या मूठभराईच्या गुडचा महाराष्ट्रांतील किंबहुना हिंदुस्थानांतील सर्व शहरीं, गावोगावीं व खेड्यापाड्यांतून उभारण्यांत आल्या, तर हल्ली उत्तर हिंदुस्थानांत जो दुष्काळाचा वणवा भडकला आहे तो संपूर्ण विझून जाईल. दुष्काळाने उपाशी

मरणाऱ्या लोकांना वांचविण्याची जर एकच शीघ्र फलदायी युक्ति असेल, तर ती मूठभराई होय. 'पैसापट्टी' कालांतराने दुष्काळ नाहींसे करील, पण प्रत्यक्ष संहार करीत चाललेल्या दुष्काळरूपी महिषासुराचें निर्दालन करण्याची शक्ति जर कोणत्या एका देवतेच्या अंगीं असेल, तर ती सर्व शक्तिमान देवता 'मूठभराई' होय. या अष्टभुजा – नव्हे सहस्रभुजा जगदंबेचा एकदा अवतार झाला म्हणजे दुष्काळा-सुराचें ठाणें उठलेंच म्हणून समजावें. दुष्काळरूपी रोगावर मूठभराईसारखी दुसरी संजीवनी मात्रा नाही. दुष्काळ, दुर्भिक्ष, अवर्षण वगैरे शेकडो शत्रूंचें निर्दालन करणारी तोफ कोणास पाहिजे असेल, तर ती तोफ 'मूठभराई' होय. मूठभराई धान्याने वाहणारी व कधी न आटणारी नदी आहे. वाटेल त्या दुष्काळग्रस्त प्राण्याने तिच्यांत प्रवेश करावा व तिच्यांतील पाणी पोटभर प्यावें. मूठभराई ही साक्षात् कधी न आटणारी कामधेनु होय. मूठभराई ही सदासर्वकाळ धान्यांच्या घोसांनी लवलेली आंबराई होय. अशी सर्वतोपरी उपयुक्त मूठभराई हिंदुस्थानांत जागजागीं सुरू होईल, तर दुष्काळाने एकहि हिंदी मनुष्य मृत्युमुखीं पडणार नाही किंवा जीव वांचविण्याच्या लालसेने मिशनऱ्यांच्या तावडींत सापडणार नाही. बांधवहो, अशी ही मूठभराई तुम्ही सुरू कराच करा. ही मूठभराई तुम्हीं खालील गोष्टींसाठी सुरू केलीच पाहिजे व जर करतां कोणत्याहि कारणामुळे ती तुम्ही सुरू न कराल, तर बंधुद्रोहाचें पंचमहापातकांपेक्षा घोरतर पातक तुमच्या शिरावर येऊन आदळेल.

मूठभराई सुरू करण्याचें पहिलें कारण भूतदया होय. जीव येथून तेथून सर्वांचा सारखा आहे. क्षुधेच्या व तृष्णेच्या व्यथा सर्व प्राणिमात्रांना सारख्या होतात. आकस्मिक कारणांमुळे जर कोणा हतभाग्यांना क्षुधाशमनाचें साधन उपलब्ध नसलें, तर असलें साधन ज्या भाग्यवान् मनुष्यांपाशीं असेल त्यांनी इतर क्षुधापीडित लोकांना साहाय्य करण्याकरिता पुढे सरसावलें पाहिजे. "दया धरमका मूल है" हें तत्त्व सदासर्वकाळ एकसारखें सत्य आहे व या तत्त्वाबरहुकूम वागणाऱ्या महात्म्याला पुण्याची जोड होऊन व त्याची इहलोकची यात्रा सुखकर होऊन अंतीं त्याला स्वर्गाची प्राप्ति झाल्यावांचून कधीहि राहणार नाही. क्षुधेने व्याकुळ होऊन पडलेल्या प्राण्यांच्या तोंडांत अन्नाचे घास घालणाऱ्या महात्म्यांसारखे प्राणी त्रिभुवनांत दुसरे कोणतेहि नाहीत. अशा क्षुधाग्रस्त लोकांच्या तोंडांतून क्षुधेचें समाधान झाल्यावर जे स्वयंभू आशीर्वाद निघतात त्या आशीर्वादांसारखी मौल्यवान् संपत्ति या जगांत किंवा स्वर्गांत दुसरी कोणतीहि नाही. पाषाणमय किंवा धातुमय संपत्ति या जगांतल्या जगांत राहते; पण ही आशीर्वादरूपी संपत्ति प्रत्येक मनुष्याच्या बरोबर स्वर्गांत जाते व तेथे ती अशा धनाढ्य मनुष्याला नाना प्रकारें सुख देते. म्हणून प्रिय बांधवहो, जर तुमच्या कोवळ्या अंतःकरणांत भूतदयेचा पाझर असेल व जर तुम्हांला स्वर्गसुखाची लालसा असेल, तर अन्नदानासारखें पुण्यकारक कृत्य तुम्ही कराच करा. पाण्यांत बुडणाऱ्या मनुष्याला ज्याप्रमाणे हात, त्याप्रमाणे भुकेने मरणाऱ्या मनुष्याला भात

होय. हा भात तुमच्या ठिकाणीं ऐपत असेल तर कोणताहि क्षुल्लक विचार मनांत न आणतां तुम्ही तो आपल्या देशबांधवांना द्याच द्या. पण जर इतकी ऐपत तुम्हांला नसेल तर दहा घरीं मूठभराई मागून तो भात तुम्ही आपल्या मरणाच्या दारीं बसलेल्या बांधवांच्या तोंडांत घालाच घाला. जर तुमच्या हृदयांत भूतदयेचा कोवळेपणा नसेल व जर तुमचीं अंतःकरणें काळ्या फत्तराप्रमाणे कठीण झालीं असतील, तर निदान स्वार्थासाठी तरी तुम्ही मूठभराई मागा व ती दुष्काळग्रस्त लोकांना वांटा.

प्रभूच्या अवकृपेने आज जो खडतर प्रसंग दुसऱ्यावर आला आहे तो कदाचित् उद्या आपणावरहि येईल हा विचार मनांत धरून तरी तुम्ही घरांतून बाहेर पडा व मूठभराई मागा. उत्तर हिंदुस्थानांतील दुष्काळग्रस्त लोकांना हल्ली भुकेच्या कशा कशा यातना होतात याची तुम्हांस सध्या कल्पना नसल्यामुळे कदाचित् तुम्ही बेफिकीर व निष्काळजी बनला असाल तर देशबंधूंनो, असे निष्काळजी होऊं नका. तुमच्याकडे मूठभर भातासाठी दीन मुद्रेने पाहणाऱ्या आपल्या देशबांधवांची हेटाटळणी करतांना आज तुम्हांस गोड वाटेल. पण जर परमेश्वरी अवकृपेने तोच प्रसंग तुमच्यावर उद्या येऊन पडला, तर मात्र आताच्या निष्काळजीपणाबद्दल तुम्हांला त्या वेळीं पश्चात्ताप होईल व मग मात्र रडूं कोसळेल. उत्तर हिंदुस्थानांत आपल्या देशबांधवांची बायकापोरें व कच्चीबच्चीं अन्नावांचून उपाशी मरत असतां तुम्हीं मात्र महाराष्ट्रांत आपल्या बायकापोरांना पाडव्याचा सण करून लाडू चारावेत, हें कांही चांगलें नाही. भूतदयेसाठी जरी नाही, तरी केवळ स्वतःसाठी निव्वळ स्वार्थासाठी तुम्ही मूठभराई मागून उत्तर हिंदुस्थानांतील आपल्या देशबांधवांचे प्राण वांचवा. जर यंदा तुम्ही मूठभराई त्यांना पाठविलीत तर त्यामुळे त्यांच्यापासून पुढे मूठभराई मागण्याचा हक्क तुम्ही उत्पन्न करून ठेवला असें म्हणण्यास हरकत नाही. स्वतःचें घर पेटलें म्हणजे तें विझविण्याकरिता शेजाऱ्याने धांवून यावें या आपमतलबी समजुतीने तरी तुम्ही त्याचें जळतें घर विझविण्याकरिता धांवा. तुमच्या महाराष्ट्रांत नेहमीच सुकाळ राहील असें नाही. म्हणून फक्त स्वार्थासाठी तरी तुम्ही मूठभराई मागावी. ती मागेल त्याला ती वाढा. मूठभराई कां मागावी हें सिद्ध करण्यास तिसरें एक सबळ कारण आहे व तें कारण सर्व महाराष्ट्रियांनी नीट लक्षांत धरावें अशी त्यांना आमची विनंती आहे.

भरतभूमि जर सर्व हिंदी लोकांची सर्वसाधारण आई आहे व आपण जर तिचीं लेकरें आहोंत, तर देशबंधुत्वाचें नातें ओळखून तरी आपण उत्तर हिंदुस्थानांतील लोकांना मदत करण्यास तयार झालें पाहिजे. शाब्दिक देशबंधुत्वाच्या नात्याचा नुसता पुकारा करून एक महाराष्ट्रियत्वाची कल्पना हिंदी लोकांच्या मनांत जणार नाही. जर आपण एकमेकांना अडचणीच्या प्रसंगीं, सक्रिय – शाब्दिक नव्हे – मदत करूं, तरच हें नातें दृढ होऊन त्याचा देशकार्यीं अत्यंत उपयोग होईल. हें नातें दृढ करण्याच्या कामीं दुष्काळाचा अतिशय उपयोग आहे व या दृष्टीने दुष्काळ ह

एक आपला आवडता पाहुणा आहे, असें म्हणावयास हरकत नाही. एखाद्या प्रांतांत दुष्काळ पडल्यावर जर तेथील लोकांच्या तोंडांतून असे उद्गार निघाले की, "कांही हरकत नाही, आमचे देशबांधव ३० कोटि उणे आम्ही आहोंत व ते आम्हांला कधीहि मरूं देणार नाहीत." तर हे उद्गार जें कार्य करतील व जी देशोन्नति घडवून आणतील तें देशकार्य व ती देशोन्नति कोणत्याहि तऱ्हेने कमी दर्जाची नाही. मूठभराई मागून जर आपल्या देशबंधूंचे प्राण वांचविण्यांत आले, तर देशबंधुत्वाचें नातें दृढ होऊन त्यापासून राष्ट्राचें अतिशय हित आहे. या वरील कारणाशिवाय मूठभराई मागण्याचें चौथें अत्यंत महत्त्वाचें कारण आहे व या कारणासाठी तरी प्रत्येक हिंदुधर्माभिमानी हिंदूने मूठभराई मागावी व हिंदु धर्माचें संरक्षण करावें. "सबसे जीव प्यारा है" ही म्हण जर खरी आहे, तर "जीवसे प्यारा धरम है" हीहि म्हण त्यांच्यापेक्षा जास्त खरी आहे. जीव गेला तरी बेहेत्तर, पण मी आपल्या प्रिय हिंदु धर्माचा त्याग कधीहि करणार नाही. अशी बाणेदार वृत्ति प्रत्येक हिंदूची असावयास पाहिजे व ती बहुतांशाने आहेहि. पण असे कांही कमदमाचे लोक आहेत की, जे क्षुधेच्या व्यथेने व्याकुळ होऊन स्वधर्माचा त्याग करून परधर्माचा स्वीकार करतात. अशा लोकांना दुष्काळांत साहाय्य करून व त्यांना परधर्मापासून परावृत्त करून हिंदु धर्माचें संरक्षण करणें हें प्रत्येक हिंदुधर्मीय मनुष्याचें आद्य कर्तव्य आहे. हें कर्तव्य जो हिंदु मनुष्य बजावीत नाही तो धर्मऋणाची फेड न करणारा लुच्चा लबाड कर्जदार आहे, असें म्हणावयास हरकत नाही. ही लबाडी व लुच्चेगिरी आपल्या पदरांत येणार नाही याबद्दल प्रत्येक हिंदुधर्मीयाने पूर्ण खबरदारी घेतली पाहिजे. अंगीं सामर्थ्य नसेल तर दहा घरें भिक्षा मागून हें ऋण फेडलें पाहिजे. हें ऋण तो जर न फेडील, तर जितके धर्मबांधव धर्मांतर करतील, तितके प्रहार स्वधर्मावर केल्याचें पाप त्याच्या माथीं पडेल. म्हणून धर्मबांधवहो, भूतदयेसाठी किंवा स्वार्थासाठी अथवा देशभक्तीसाठी जर मूठभराई मागण्याची तुमची इच्छा नसेल, तर निदान हिंदु धर्मासाठी तरी तुम्ही घराबाहेर पडा. हल्लीच्या काळीं मिशनऱ्याच्या तडाख्यांतून हिंदु धर्माचें संरक्षण करणारी मूठभराईव्यतिरिक्त दुसरी युक्ति आम्हांस तरी सुचत नाही.

कोणालाहि जड न जातां व ओझें न वाटतां, ही मूठभराई जमेल व दुष्काळग्रस्त लोकांना वांचवून हिंदु धर्माचें संरक्षण करील. हिंदुधर्मसंरक्षक श्रीशिवछत्रपति महाराजांचे जर तुम्ही स्वतःस अस्सल वंशज म्हणवितां, तर परिस्थितीप्रमाणे त्या हिंदु धर्माचें संरक्षण करण्यास तुम्ही कच कां खातां बरें! पदराला एक पैचीहि चाट न बसतां एवढें मोठें धर्मकार्य होत असतां धर्मबांधवहो, तुम्ही आपला घराचा उंबरठा न ओलांडण्याचा निश्चय केला आहांत ना! कदाचित् तुम्हांस लाज वाटत असेल, तर आम्ही तुम्हांस एवढेंच सांगतों की, यांत कोणतीहि लाज नाही. स्वतःच्या पोटासाठी भिक्षा मागणें हें लाजीरवाणें आहे. पण स्वधर्मीयांसाठी भिक्षा मागणें हें दूषणास्पद नसून उलट भूषणास्पद आहे. हिंदु धर्माचें संरक्षण करण्यासाठी उजव्या हातांत

ताम्हन व डाव्या खाकेंत झोळी घालून घराबाहेर पडलेले विसाव्या शतकांतले महाराष्ट्रीय वीर सतराव्या व अठराव्या शतकांतील महाराष्ट्रीय वीरांपेक्षा रतिभरहि कमी दर्जाचे नाहीत. दोघांच्या मनांत एकाच प्रकारची धर्मभक्ति व देशभक्ति आहे. त्यांच्या रूपांत जो कांही दृश्य फरक दिसत असेल तो परिस्थितीमुळे झाला आहे. सतराव्या व अठराव्या शतकांत हिंदु धर्माचे रक्षण करण्यास तलवार पाहिजे होती तर हल्ली ताम्हन पाहिजे आहे. त्या वेळच्या वीराने उजव्या हातांत तलवार व डाव्या हातांत ढाल घेऊन हिंदु धर्माचें संरक्षण केलें, तर हल्लीचा वीर उजव्या हातांत ताम्हन व डाव्या खाकेंत झोळी लटकावून हिंदु धर्माचें संरक्षण करूं शकेल. मूठभराईच्या स्वयंसेवकाच्या हातांतील ताम्हन ही प्रत्यक्ष भूतदयेची पुष्करणी होय. ही पुष्करणी हजारो तान्हेलेल्या हिंदूंना पोटभर पाणी प्यावयास घालून त्यांच्या जिवांना आराम देईल. स्वयंसेवकाच्या हातांतील ताम्हन हा एक पाळणा आहे. या पाळण्यांत भरतभूमींत नुकतेंच जन्मास आलेल्या देशबंधूप्रेमाच्या बालकाने झोकेखात खात खुशाल वाढीस लागावें व स्वयंसेवकाच्या हातांतील ताम्हन म्हणजे एक अभेद्य गड होय. या गडाच्या तटबंदीच्या आंत हिंदुधर्मरूपी सम्राटाने विनधोक सिंहासनारूढ होऊन तटाबाहेर धडपडणाऱ्या मिशनऱ्यांविषयी बेफिकीर व बेगुमान असावें. असें हें सर्वांगसुंदर ताम्हन हातांत घेण्यास जो हिंदु लाजतो तो कमनशिबी व करंटा होय. उजव्या हातांत हिंदु धर्माचें रक्षण करणारें ताम्हन व डाव्या खाकेंत दुष्काळाची होळी करणारी झोळी, या शस्त्रद्वयाने सजलेले वीर ज्या दिवशीं महाराष्ट्रांत संचार करूं लागतील तो दिवस सोन्याचा होय. असल्या वीरांनी बारा महिने, वर्षारंभापासून तों वर्षान्तापर्यंत सज्ज असावयास नको. जन्मदात्री आई जी भरतभूमि ती अवर्षणाच्या रोगाने कांही काळ आटली म्हणजे तेवढ्या वेळेपुरतीच मूठभराईच्या दाईची मदत घेण्यांत यावी. ही मूठभराईरूपी अन्नपूर्णा एकदा का स्वयंसेवकाच्या ताम्हनांत अवतीर्ण झाली म्हणजे मग दुष्काळांत कोणीहि अन्नावांचून मरावयास नको. देशबांधवहो, तुम्ही या मूठभराईला आळवा व हिंदु धर्मावरील संकट टाळा !

— भाला, दि. २ एप्रिल १९०८

---

## २३. पुण्यांतील धामधूम

सन १९०५ सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या सोळाव्या तारखेपासून भरतभूमीच्या शरीरांत एक प्रकारची अपूर्व चेतना व चरचरीतपणा येऊं लागला आहे. त्या दिवसापूर्वी तिच्या अंगीं असलेली मेंदटपणा व शिथिलता लॉर्ड कर्झनसाहेबांच्या वंगभंगामुळे नाहीशी होऊन ती जगांतील इतर स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे थोडी थोडी

कृति करूं लागली आहे. वंगभंगामुळे वंगाल्यांत स्वदेशी देवी अवतीर्ण होऊन तिचा संचार काशीपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व हिंदुस्थानभर होऊं लागला. ह्या स्वदेशी चळवळीच्या बुडाशीं स्वराज्याची लालसा आहे, ही गोष्ट सर्वांना सारखीच कबूल आहे. स्वदेशी चळवळीची इमारत स्वराज्य लालसेच्या भक्कम पायावरच उभारली गेली असल्यामुळे ती सर्व हिंदी लोकांना विष वाटूं लागून तिच्यासाठी ते वाटतील ते शारीरिक व मानसिक हाल सोसण्यास तयार होऊं लागले आहेत. स्वराज्य-लालसेच्या पायावर रचली गेलेली ही स्वदेशी चळवळीची इमारत ढासळून टाकण्याचे प्रयत्न निरनिराळ्या प्रांतिक सरकारांकडून आज अडीच वर्षे चालू आहेत. पण कोणत्याहि प्रांतिक सरकारला त्यांत अजूनपर्यंत म्हणण्यासारखें यश प्राप्त झालें नाही व तें प्राप्त होण्याचा संभवहि नाही.

पूर्व बंगाल्यांत स्वदेशी देवीच्या पुष्कळ निस्सीम उपासकांना नाना प्रकारचे हाल सोसावे लागले, पण बंगाली भक्तांची आपल्या राष्ट्रदेवतेच्या ठिकाणीं इतकी प्रेमळ व निर्भेळ भक्ति आहे की, त्यांनी कोणत्याहि प्रसंगाला न जुमानतां आपली भक्ति तशीच अखंडित चालू ठेवली आहे. पूर्व बंगाल्यांतील स्वदेशीवाल्यांप्रमाणे पंजाबांतील, संयुक्त प्रांतांतील व अलीकडे मद्रासेंतील स्वदेशीवाल्यांचेहि कमीजास्ती प्रमाणाने हाल झाले, पण त्यांतून ते कसेबसे पार पडले. स्वदेशी चळवळीला प्रारंभ झाल्यापासून जरी ती इतर प्रांतांप्रमाणे महाराष्ट्रांतहि जोरांत आहे, तरी पण तिच्या महाराष्ट्रीय भक्तांना मुंबई सरकारकडून म्हणण्यासारखा त्रास पोहोचलेला नाही. नाही म्हणावयास स्वदेशी चळवळीला प्रारंभ झाल्यापासून येथे दोनच राजद्रोहाचे खटले झाले, पण ह्या दोन खटल्यांव्यतिरिक्त येथे दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेची उपाधि स्वदेशीच्या भक्तांना झाली नाही. हिंदुस्थानांतील इतर प्रांतांत स्वदेशीबद्दल धुमश्चक्री चालली असतां, मुंबई सरकारने आपली मानसिक शांतता भंग होऊं दिली नाही, हें त्या सरकारला अत्यंत भूषणावह आहे. पण गेल्या पंधरवड्यांत पुणें शहरीं जी धामधूम सुरू झाली आहे, त्यावरून आम्हांस अशी भीति वाटत आहे की, मुंबई सरकारने आपल्या स्थानिक अधिकाऱ्यांना वेळींच सक्तीचे हुकूम सोडले नाहीत, तर कदाचित् महाराष्ट्र पूर्व बंगाल होण्याचा संभव आहे.

इंग्रजी राज्यापासून कांही बारीकसारीक नफे हिंदी लोकांना मिळाले आहेत, पण एका पारड्यांत हे नफे व दुसऱ्या पारड्यांत त्यांचे झालेले भयंकर तोटे टाकले असतां, तोट्यांचें पारडें भुईवर येऊन ताडदिशीं आदळेल, याबद्दल मुळीच मतभेद नाही. इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानला शांतता मिळाली आहे, असें ह्या राज्याच्या चाहत्यांचें म्हणणें नेहमी ऐकूं येतें. एका अर्थी हें म्हणणें तंतोतंत बरोबर आहे. पण प्रश्न एवढाच आहे की, ही हिंदुस्थानला प्राप्त झालेली शांतता कोणत्या प्रकारची आहे? नांदत्या घरांतील ही शांतता आहे किंवा शुष्क असलेल्या स्मशानांतील ही

शांतता आहे? स्वातंत्र्यरूपी जीव शरीरांतून नाहीसा होऊन निश्चल झालेल्या भरतभूमीच्या राजकीय स्मशानांतील ही शांतता आहे? एवढी गोष्ट लक्षांत घेतली असतां ह्या शांततेचें कौतुक कोणालाहि वाटणार नाही. घर पोराबाळांनी भरलें असून जर शांतता असेल, तरच त्या शांततेचें कौतुक वाटतें. पण घरांतील सर्व मुलें-बाळें मृत्युमुखीं पडून जर घर शांत झालें, तर ज्ञाते व सुज्ञ लोक अशा घरांतील शांततेची प्रशंसा न करतां त्यांत वसत असलेल्या भयाणतेबद्दल मात्र हळहळतात. ह्या प्रकारची स्थिति हिंदुस्थानची झाली आहे. हिंदुस्थानांत हल्ली शांतता आहे, पण ती हिंदी लोकांच्या राजकीय मृत्यूमुळे उत्पन्न झालेली आहे. अशा शांततेची मातब्बरी आम्हांस तरी वाटत नाही व म्हणून हिंदुस्थानांत हल्ली दृष्टीस पडणाऱ्या शांतते-बद्दल इंग्रज सरकारची स्तुति करण्याची बुद्धि आम्हांस होत नाही.

इंग्रजी राज्यामुळे आगगाड्या, तारायंत्रें, पोस्टखातें वगैरे आधुनिक सुधारणेचीं अंगें हिंदुस्थानांत सुरू झालीं, असा एक मुद्दा ह्या राज्याच्या पक्षपाती लोकांकडून पुढे करण्यांत येत असतो. पण इंग्रजी राज्याची महती गाणारे लोक ह्या सुधारणांकडे आपलीं बोटें दाखवितांना हा विचार करीत नाहीत की, या सुधारणा इंग्रज सरकारने हिंदी लोकांच्या फायद्यासाठी घडवून आणल्या नाहीत किंवा जगांत फक्त एकाच इंग्रज सरकारने ह्या सुधारणा घडवून आणल्या नाहीत. जगांतील सर्व राष्ट्रांत ह्या आधुनिक सुधारणा दृष्टोत्पत्तीस येत आहेत व ह्या सुधारणा अमुक अमुक सरकारने घडवून आणल्या असें म्हणण्याच्या ऐवजीं त्या १९ व्या शतकाने घडवून आणल्या, हें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे. १९ व्या शतकांत इंग्रज सरकारच्या ऐवजीं जर दुसरें कोणतेंहि सरकार तेथे असतें, तर त्या सरकारनेहि वर निर्दिष्ट केलेल्या सुधारणा येथे घडवून आणल्या असत्या. म्हणून ज्या सुधारणा कालमाहात्म्याने आपोआप होतात त्या अमुकच सरकारने घडवून आणल्या, असें म्हणण्यांत मोठासा शहाणपणा नाही. इंग्रजी राज्यापासून हिंदी लोकांचा जर एखादा नफा झाला असेल तर तो हाच की, ह्या राज्यामुळे हिंदी लोकांच्या मनांत एकराष्ट्रियत्वाची कल्पना उत्पन्न झाली आहे. पंजाबी व पठाण, रजपूत व रोहिले, बंगाली व बुंदेले, मराठे व मद्रासी, काठेवाडी व कानडी वगैरे हिंदुस्थानांत राहणारे सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक एकाच मातृभूमीच्या पोटचीं लेकरें आहेत. ही भावना इंग्रजी शिक्षणामुळे हिंदी लोकांच्या मनांत उद्भवली आहे व हा एकच नफा इंग्रजी राज्यामुळे हिंदी लोकांना मिळाला आहे. ह्या एकट्या नफ्याशिवाय दुसरा कोणताहि नफा इंग्रजी राज्यामुळे हिंदी लोकांना झालेला नाही. उलट ह्या राज्यामुळे त्यांचे शेकडो भयंकर तोटे झाले आहेत. इंग्रजी राज्यामुळे हिंदी लोकांचें स्वातंत्र्य गेलें व हा तोटा इतका भयंकर आहे की, त्याची भरपाई हिंदी लोकांना स्वराज्य मिळाल्याशिवाय कधीहि होणार नाही.

स्वातंत्र्यनाशाशिवाय हत्यारांच्या कायद्यामुळे त्यांच्या अंगांतील मर्दानीपणा गेला. जंगलाच्या कायद्यामुळे त्यांच्या स्नायूंतील शक्ति नष्ट झाली व दरवर्षी चाळीसपासून

पन्नास कोटींची भली मोठी रक्कम हिंदुस्थानांतून इंग्लंडांत जात असल्यामुळे ते पुरे वैरागी व कफल्लक बनले आहेत. अशा रीतीने हिंदी लोक निर्धन, निर्बल व निःशस्त्र गुलाम बनले असतांहि जणु काय त्यांच्या अवनतीचा कडेलोट झाला नाही म्हणूनच त्यांना 'दारूबाज' करण्यासाठी दयाळु सरकारने अबकारी खातें उघडलें आहे. सुधारणेचा टेंभा मारणाऱ्या इंग्रज सरकारने अबकारी खात्यासारखें खातें चालू ठेवावें, हे त्या सरकारला खरोखर लांछनास्पद आहे. धर्मदृष्टचा, नीतिदृष्टचा व सर्व प्रकारांनी अबकारी खातें हें दोषार्ह आहे. हें अबकारी खातें हिंदी लोकांच्या अंगांतील प्रत्येक सद्गुणाचा फन्ना उडवीत आहे. या खात्यामुळे सरकारच्या तिजोरींत सालाचें सहा-सात कोटि रुपये पडत आहेत. पण केवळ पैशासाठी स्वतःच सुधारलेलें म्हणवून घेणाऱ्या व दुसऱ्यांना रानटी म्हणणाऱ्या सरकारने असलें – सर्व बाजूंनी निंद्य व त्याज्य – खातें चालू ठेवावें हें कांहीं सुधारणेचें लक्षण नाही.

दुष्काळाचा तडाखा बसल्याबरोबर एकदम रिलीफ कामावर जावयाची पाळी आलेल्या गरीब रयतेपासून सुधारलेल्या सरकारने दरसाल सात कोटि रुपये पिळून काढावेत व तेहि त्यांना दुर्व्यसनी करून काढावेत, ही गोष्ट अत्यंत संतापदायक आहे. इंग्रजाई सुरू होण्यापूर्वी पेशवाईंत दारूचें व्यसन महाराष्ट्रांत मुळीच नव्हतें. पेशवाईंत सबंध पुणें जिल्ह्यांत दारूचा एकहि गुत्ता नव्हता व कांही अगदी हलक्या दर्जाच्या लोकांशिवाय दारू पिणारे दुसरे कोणतेहि लोक नव्हते. १०० वर्षांपूर्वी असलेल्या या स्तुत्य व स्पृहणीय स्थितींत हल्ली भयंकर व अंगावर शहारे येण्यासारखें अंतर पडलें आहे. खुद्द पुणें शहरांत हल्ली दारूचे १४ गुत्ते आहेत व शनिवारवाड्यापासून एका हाकेच्या अंतरावर त्यांपैकी एक गुत्ता आहे. पुणें जिल्ह्याचें दारूचें उत्पन्न सुमारे १० लाख आहे व त्याच जिल्ह्याचें जमीनसाऱ्याचें उत्पन्न सुमारे १५ लाख आहे. म्हणजे इंग्रज सरकार जमीन-साऱ्याच्या दोनतृतीयांश उत्पन्न दारूपासून म्हणजे लोकांना दारूचें व्यसन लावून काढीत आहे.

ह्याप्रमाणे निरनिराळ्या रूपांनी रयतेपासून पैसा निघाल्यावर ती जर निःसत्त्व व निस्त्राण झाली, तर त्याचा दोष सर्वथैव सरकारवर आहे. सरकार प्रजेचे आईबाप आहे. आपली प्रजा निर्व्यसनी करण्याची जबाबदारी सर्वस्वीं सरकारच्या माथीं आहे. ही जबाबदारी सरकारला कधीहि टाळतां यावयाची नाही. जर करतां त्याने ती टाळली, तर त्याच्या पदरीं येणारा दोष कधीहि चुकावयाचा नाही. आपलें उत्पन्न वाढावें म्हणून जर एखादा बाप आपल्या पोटच्या पोरीला वाईट मार्गाला लावील, तर तो जितका दोषी ठरेल तितकेंच दोषी या कामीं सरकार ठरणार आहे. अबकारी खातें अजीबात बंद केल्यापासून सरकारच्या तिजोरीला सहा-सात कोटींचा चट्टा बसण्याचा संभव आहे, ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. पण केवळ पैशासाठी नीति-दृष्टचा निंद्य असें हें खातें चालू ठेवण्यास हें कांही सबळ कारण नाही. सरकारला

पैशाचीच जरुरी असेल, तर त्याने आणखी एखादा नवीन कर बसवावा व आपली तुंबडी काठोकाठ भरून घ्यावी; पण हें अबकारी खातें जरूर जरूर बंद करावें. जमिनीवरील कर वाढवा, मिठावरील कमी केलेला कर पुन्हा पहिल्यासारखा किंवा त्याच्या दुप्पट करा, इन्कम् टॅक्स वाढवा किंवा सरकारला अबकारी खात्याच्या सहा कोटींच्या उत्पन्नाची जरुरीच असल्यास नवीन डोईपट्टीचा कर बसवा. सरकारच्या सहा कोटींची भर करण्याकरिता हिंदुस्थानांतील तीस कोटि लोक सालाचे चार आणे देण्यास कधीहि कुरकूर करणार नाहीत, असें आम्ही खात्रीने सांगतों. सरकारला जर सहा कोटि रुपये आम्हां हिंदी लोकांनी दिलेच पाहिजेत, तर रयतेचे रुपये घेऊन त्यांच्या मोबदला 'दुर्व्यसन' देण्याची मेहरबानी मायबाप सरकारने करूं नये, अशी त्याला आमची विनंती आहे. केवळ सहा कोटि रुपयांची रक्कम मिळविण्याव्यतिरिक्त हें अबकारी खातें चालू ठेवण्यांत सरकारचा जर दुसरा अंतःस्थ हेतु नसेल, तर आम्हीं सुचविलेली वरील डोईपट्टीची युक्ति सरकारला पसंत पडलीच पाहिजे. आपले देशबांधव निर्व्यसनी करण्याच्या पवित्र कामीं कोणताहि कितीहि गरीब हिंदी मनुष्य वर्षाचे चार आणे देण्यास कुरकूर करणार नाही, हें आम्ही खात्रीपूर्वक सांगतों. कांहीहि करा, कोणत्याहि कराच्या रूपाने आपली रक्कम वसूल करून घ्या, पण लोकांना दारूबाज करूं नका, असेंच आमचें सरकारला आग्रहाचें सांगणें आहे.

लोकांचे दारूचें व्यसन बंद करण्याची शक्ति फक्त सरकारच्या अंगीं आहे. ही गोष्ट अशीच आहे की, ह्या कामीं लोकांनी कितीहि भगीरथ प्रयत्न केले, तरी त्यांना संपूर्ण यश येणें शक्य नाही. ज्यांच्या हातांत सत्ता असते, अशांनीच अशा गोष्टी केल्या पाहिजेत. दुर्व्यसनाच्या कामीं सक्तीच जास्त उपयोगी पडते. मनधरणी करून व मनें वळवून कांही कार्यभाग होईल, नाही असें नाही; पण मनधरणीच्या मार्गाने यावें तसें यश येणार नाही. "बाबा रे, दारू पिऊं नकोस, त्यापासून तोटे आहेत" असें सांगून सर्वच दारूबाज ऐकणार नाहीत. शेकडा दहा-पांच जण कदाचित् दारू सोडतील, पण बाकीचे नव्वद जण तल्लफ आली की गुत्त्याकडे धांव घेणारच. ही तल्लफ मनधरणीने नाहीशी होत नाही. तिचा नायनाट करण्यास सक्तीच पाहिजे. अट्टल दारूबाज लोक तुरुंगांत गेल्यावर त्यांना दारू पिण्याची तल्लफ येत असते, पण ती सक्तीने जिरवण्यांत येते. तुरुंगांत अमलांत आणलेला सक्तीचा मार्ग बाहेरहि अमलांत आणला पाहिजे. या कामीं सक्ती वापरण्याची अत्यंत जरुरी आहे. दारूचे गुत्तेच अजीबात बंद केले, तर विद्यमान असलेले दारूबाज मरतील अशांतली गोष्ट नाही. सर्व हिंदुस्थान चोवीस तासांत, अवघ्या एका दिवसांत निर्व्यसनी करण्याचा एकच खरा व अमोघ उपाय म्हटला म्हणजे कायद्याने व सक्तीने दारूचीं, भांगेचीं, गांज्याचीं व इतर सर्व मादक पदार्थांचीं दुकानें बंद करणें हा होय. जर हत्यारांच्या कायद्याने सरकारला सर्व हिंदुस्थान एका दिवसांत निःशस्त्र करतां आलें, तर त्याच

सरकारला एका दिवसांत सर्व हिंदुस्थान निर्व्यसनी करतां येईल हें उघड आहे. हत्यारावांचून माणसाचें नडतें, पण मादक पदार्थांची तशी गोष्ट नाही.

मादक पदार्थांच्या सेवनावांचून मनुष्य जगूं शकतो म्हणून जर सरकारने या कामीं एक कायदा केला, तर आम्ही व आमच्याबरोबर आमचे देशबांधव सरकारचे अत्यंत आभारी होतील. दारूसारखीं व्यसनें बंद करण्याचा वरील मार्ग जरी रामबाण आहे, तरी तो आपल्या हातीं नसल्यामुळे तो उपलब्ध होईपर्यंत दुसऱ्या कमी दर्जाच्या मार्गाचें अवलंबन करूं नये असें नाही. कायद्याची सक्ती नाही तर प्रेमाची मनवळवणी ही आहेच. हिला जिव्हेवर बसवून सर्व देशभक्तांनी प्रभूला स्मरून या कामाला लागावें अशी आमची आमच्या देशबांधवांना विनंती आहे. त्यांचें काम अवघड आहे व इष्ट हेतु साध्य होण्यास पुष्कळ यातायात पडेल व वेळ लागेल. तरी पण त्यांनी या योग्य कामापासून पराङ्मुख होऊं नये. ज्ञातिसभा करून त्यांच्या द्वारे निरनिराळ्या जातींच्या लोकांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न करावा. घरोघरीं जाऊन उपदेश करावा, हस्तपत्रकें वांटावीत. व्याख्यानें द्यावींत. जातींकडून ग्रामण्यें सुरू करावींत व अलीकडे पंधरा दिवसांपासून पुण्यास सुरू झालेल्या मार्गाचाहि अवलंब करावा. पुण्यांत सुरू झालेला मार्ग म्हणजे 'पिकेटिंग' ऊर्फ नाकेबंदी होय. दारूच्या गुत्त्यासमोर स्वयंसेवकांनी फिरते राहून गुत्त्यांत जाणाऱ्या इसमाचें मन वळविण्याचा प्रयत्न करावा व असें करण्यांत बेकायदेशीरपणा नाही.

मन वळविणें कायद्याच्या दृष्टीने गुन्हा नाही. मात्र असें करण्यांत कोणाच्या अंगचटीला जाऊं नये व कोणी दारूबाज हट्टाने जाऊंच लागला, तर त्याला प्रतिबंध करूं नये. या दोन गोष्टींबद्दल सावधगिरी ठेवली म्हणजे पिकेटिंग बेकायदेशीर नाही व त्यापासून कोणताहि त्रास होणार नाही. पिकेटिंग यशस्वी होण्यास हें निदानपक्षी पुरें एक वर्ष सुरू ठेवलें पाहिजे व तें अतिशय शिस्तीने व नेटानें चाललें पाहिजे. दोन दिवस 'दुल्ला' करून कार्यभाग साधावयाचा नाही. शांत व शिस्तवार रीतीने एक वर्षभर जर 'पिकेटिंग' सुरू राहिलें तर शेकडा ९० दारूबाज कमी होतील व या बाकीच्या दहा जणांबद्दल दुसरे मार्ग योजण्यास ठीक पडेल. दारूबाज लोक नेहमीं दहा-पंधरा रुपये कमावणारे मजूर असतात. अशांनी जर बऱ्याबोलाने दारू सोडली नाही, तर त्यांच्या पोटाला चिमटा बसेल अशा युक्त्या योजण्यांत आल्या पाहिजेत. दारूबाजांना नोकरीस ठेवूं नये व ठेवलें असल्यास त्यांना यापुढे राहूं देऊं नये. त्यांना उसनेपासने मिळूं देऊं नये. सारांश, जेणेंकरून त्यांचा कुचंबा होईल असे सर्व उपाय योजण्यांत आले पाहिजेत. सारांश, दारू बंद करण्याचे सर्व शक्य ते उपाय अमलांत आणण्याची मनोभावे खटपट झाली पाहिजे, नाही तर एका शतकाच्या अवधींत सर्व हिंदुस्थान दारूच्या पिपांत नखशिखान्त मरून जाईल.

– भाला, दि. ११ एप्रिल १९०८

शांतता आहे? स्वातंत्र्यरूपी जीव शरीरांतून नाहीसा होऊन निश्चल झालेल्या भरतभूमीच्या राजकीय स्मशानांतील ही शांतता आहे? एवढी गोष्ट लक्षांत घेतली असतां ह्या शांततेचें कौतुक कोणालाहि वाटणार नाही. घर पोराबाळांनी भरलें असून जर शांतता असेल, तरच त्या शांततेचें कौतुक वाटतें. पण घरांतील सर्व मुलें-बाळें मृत्युमुखीं पडून जर घर शांत झालें, तर ज्ञाते व सुज्ञ लोक अशा घरांतील शांततेची प्रशंसा न करतां त्यांत वसत असलेल्या भयाणतेबद्दल मात्र हळहळतात. ह्या प्रकारची स्थिति हिंदुस्थानची झाली आहे. हिंदुस्थानांत हल्ली शांतता आहे, पण ती हिंदी लोकांच्या राजकीय मृत्यूमुळे उत्पन्न झालेली आहे. अशा शांततेची मातब्बरी आम्हांस तरी वाटत नाही व म्हणून हिंदुस्थानांत हल्ली दृष्टीस पडणाऱ्या शांततेबद्दल इंग्रज सरकारची स्तुति करण्याची बुद्धि आम्हांस होत नाही.

इंग्रजी राज्यामुळे आगगाड्या, तारायंत्रें, पोस्टखातें वगैरे आधुनिक सुधारणेचीं अंगें हिंदुस्थानांत सुरू झालीं, असा एक मुद्दा ह्या राज्याच्या पक्षपाती लोकांकडून पुढे करण्यांत येत असतो. पण इंग्रजी राज्याची महती गाणारे लोक ह्या सुधारणांकडे आपलीं बोटें दाखवितांना हा विचार करीत नाहीत की, या सुधारणा इंग्रज सरकारने हिंदी लोकांच्या फायद्यासाठी घडवून आणल्या नाहीत किंवा जगांत फक्त एकाच इंग्रज सरकारने ह्या सुधारणा घडवून आणल्या नाहीत. जगांतील सर्व राष्ट्रांत ह्या आधुनिक सुधारणा दृष्टोत्पत्तीस येत आहेत व ह्या सुधारणा अमुक अमुक सरकारने घडवून आणल्या असें म्हणण्याच्या ऐवजीं त्या १९ व्या शतकाने घडवून आणल्या, हें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे. १९ व्या शतकांत इंग्रज सरकारच्या ऐवजीं जर दुसरें कोणतेंहि सरकार तेथे असतें, तर त्या सरकारनेहि वर निर्दिष्ट केलेल्या सुधारणा येथे घडवून आणल्या असत्या. म्हणून ज्या सुधारणा कालमाहात्म्याने आपोआप होतात त्या अमुकच सरकारने घडवून आणल्या, असें म्हणण्यांत मोठासा शहाणपणा नाही. इंग्रजी राज्यापासून हिंदी लोकांचा जर एखादा नफा झाला असेल तर तो हाच की, ह्या राज्यामुळे हिंदी लोकांच्या मनांत एकराष्ट्रियत्वाची कल्पना उत्पन्न झाली आहे. पंजाबी व पठाण, रजपूत व रोहिले, बंगाली व बुंदेले, मराठे व मद्रासी, काठेवाडी व कानडी वगैरे हिंदुस्थानांत राहणारे सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक एकाच मातृभूमीच्या पोटचीं लेकरें आहेत. ही भावना इंग्रजी शिक्षणामुळे हिंदी लोकांच्या मनांत उद्भवली आहे व हा एकच नफा इंग्रजी राज्यामुळे हिंदी लोकांना मिळाला आहे. ह्या एकट्या नफ्याशिवाय दुसरा कोणताहि नफा इंग्रजी राज्यामुळे हिंदी लोकांना झालेला नाही. उलट ह्या राज्यामुळे त्यांचे शेकडो भयंकर तोटे झाले आहेत. इंग्रजी राज्यामुळे हिंदी लोकांचें स्वातंत्र्य गेलें व हा तोटा इतका भयंकर आहे की, त्याची भरपाई हिंदी लोकांना स्वराज्य मिळाल्याशिवाय कधीहि होणार नाही.

स्वातंत्र्यनाशाशिवाय हत्यारांच्या कायद्यामुळे त्यांच्या अंगांतील मर्दानीपणा गेला. जंगलाच्या कायद्यामुळे त्यांच्या स्नायूंतील शक्ति नष्ट झाली व दरवर्षी चाळीसपासून

पन्नास कोटींची भली मोठी रक्कम हिंदुस्थानांतून इंग्लंडांत जात असल्यामुळे ते पुरे वैरागी व कफल्लक बनले आहेत. अशा रीतीने हिंदी लोक निर्धन, निर्बल व निःशस्त्र गुलाम बनले असतांहि जणु काय त्यांच्या अवनतीचा कडेलोट झाला नाही म्हणूनच त्यांना 'दारूबाज' करण्यासाठी दयाळु सरकारने अबकारी खातें उघडलें आहे. सुधारणेचा टेंभा मारणाऱ्या इंग्रज सरकारने अबकारी खात्यासारखें खातें चालू ठेवावें, हे त्या सरकारला खरोखर लांछनास्पद आहे. धर्मदृष्टचा, नीतिदृष्टचा व सर्व प्रकारांनी अबकारी खातें हें दोषार्ह आहे. हें अबकारी खातें हिंदी लोकांच्या अंगांतील प्रत्येक सद्गुणाचा फन्ना उडवीत आहे. या खात्यामुळे सरकारच्या तिजोरींत सालाचें सहा-सात कोटि रुपये पडत आहेत. पण केवळ पैशासाठी स्वतःच सुधारलेलें म्हणवून घेणाऱ्या व दुसऱ्यांना रानटी म्हणणाऱ्या सरकारने असलें – सर्व बाजूंनी निंद्य व त्याज्य – खातें चालू ठेवावें हें कांहीं सुधारणेचें लक्षण नाही.

दुष्काळाचा तडाखा बसल्याबरोबर एकदम रिलीफ कामावर जावयाची पाळी आलेल्या गरीब रयतेपासून सुधारलेल्या सरकारने दरसाल सात कोटि रुपये पिळून काढावेत व तेहि त्यांना दुर्व्यसनी करून काढावेत, ही गोष्ट अत्यंत संतापदायक आहे. इंग्रजाई सुरू होण्यापूर्वी पेशवाईंत दारूचें व्यसन महाराष्ट्रांत मुळीच नव्हतें. पेशवाईंत सबंध पुणें जिल्ह्यांत दारूचा एकहि गुत्ता नव्हता व कांही अगदी हलक्या दर्जाच्या लोकांशिवाय दारू पिणारे दुसरे कोणतेहि लोक नव्हते. १०० वर्षांपूर्वी असलेल्या या स्तुत्य व स्पृहणीय स्थितींत हल्ली भयंकर व अंगावर शहारे येण्यासारखें अंतर पडलें आहे. खुद्द पुणें शहरांत हल्ली दारूचे १४ गुत्ते आहेत व शनिवारवाड्यापासून एका हाकेच्या अंतरावर त्यांपैकी एक गुत्ता आहे. पुणें जिल्ह्याचें दारूचें उत्पन्न सुमारे १० लाख आहे व त्याच जिल्ह्याचें जमीनसाऱ्याचें उत्पन्न सुमारे १५ लाख आहे. म्हणजे इंग्रज सरकार जमीन-साऱ्याच्या दोनतृतीयांश उत्पन्न दारूपासून म्हणजे लोकांना दारूचें व्यसन लावून काढीत आहे.

ह्याप्रमाणे निरनिराळ्या रूपांनी रयतेपासून पैसा निघाल्यावर ती जर निःसत्त्व व निस्त्राण झाली, तर त्याचा दोष सर्वथैव सरकारवर आहे. सरकार प्रजेचे आईबाप आहे. आपली प्रजा निर्व्यसनी करण्याची जबाबदारी सर्वस्वीं सरकारच्या माथीं आहे. ही जबाबदारी सरकारला कधीहि टाळतां यावयाची नाही. जर करतां त्याने ती टाळली, तर त्याच्या पदरीं येणारा दोष कधीहि चुकावयाचा नाही. आपलें उत्पन्न वाढावें म्हणून जर एखादा बाप आपल्या पोटच्या पोरीला वाईट मार्गाला लावील, तर तो जितका दोषी ठरेल तितकेंच दोषी या कामीं सरकार ठरणार आहे. अबकारी खातें अजीबात बंद केल्यापासून सरकारच्या तिजोरीला सहा-सात कोटींचा चट्टा बसण्याचा संभव आहे, ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. पण केवळ पैशासाठी नीति-दृष्टचा निंद्य असें हें खातें चालू ठेवण्यास हें कांही सबळ कारण नाही. सरकारला

पैशाचीच जरुरी असेल, तर त्याने आणखी एखादा नवीन कर बसवावा व आपली तुंबडी काठोकाठ भरून घ्यावी; पण हें अबकारी खातें जरूर जरूर बंद करावें. जमिनीवरील कर वाढवा, मिठावरील कमी केलेला कर पुन्हा पहिल्यासारखा किंवा त्याच्या दुप्पट करा, इन्कम् टॅक्स वाढवा किंवा सरकारला अबकारी खात्याच्या सहा कोटींच्या उत्पन्नाची जरुरीच असल्यास नवीन डोईपट्टीचा कर बसवा. सरकारच्या सहा कोटींची भर करण्याकरिता हिंदुस्थानांतील तीस कोटि लोक सालाचे चार आणे देण्यास कधीहि कुरकूर करणार नाहीत, असें आम्ही खात्रीने सांगतों. सरकारला जर सहा कोटि रुपये आम्हां हिंदी लोकांनी दिलेच पाहिजेत, तर रयतेचे रुपये घेऊन त्यांच्या मोबदला 'दुर्व्यसन' देण्याची मेहरबानी मायबाप सरकारने करूं नये, अशी त्याला आमची विनंती आहे. केवळ सहा कोटि रुपयांची रक्कम मिळविण्याव्यतिरिक्त हें अबकारी खातें चालू ठेवण्यांत सरकारचा जर दुसरा अंतःस्थ हेतु नसेल, तर आम्हीं सुचविलेली वरील डोईपट्टीची युक्ति सरकारला पसंत पडलीच पाहिजे. आपले देशबांधव निर्व्यसनी करण्याच्या पवित्र कामीं कोणताहि कितीहि गरीब हिंदी मनुष्य वर्षाचे चार आणे देण्यास कुरकूर करणार नाही, हें आम्ही खात्रीपूर्वक सांगतों. कांहीहि करा, कोणत्याहि कराच्या रूपाने आपली रक्कम वसूल करून घ्या, पण लोकांना दारूबाज करूं नका, असेंच आमचें सरकारला आग्रहाचें सांगणें आहे.

लोकांचे दारूचें व्यसन बंद करण्याची शक्ति फक्त सरकारच्या अंगीं आहे. ही गोष्ट अशीच आहे की, ह्या कामीं लोकांनी कितीहि भगीरथ प्रयत्न केले, तरी त्यांना संपूर्ण यश येणें शक्य नाही. ज्यांच्या हातांत सत्ता असते, अशांनीच अशा गोष्टी केल्या पाहिजेत. दुर्व्यसनाच्या कामीं सक्तीच जास्त उपयोगी पडते. मनधरणी करून व मनें वळवून कांही कार्यभाग होईल, नाही असें नाही; पण मनधरणीच्या मार्गाने यावें तसें यश येणार नाही. "बाबा रे, दारू पिऊं नकोस, त्यापासून तोटे आहेत" असें सांगून सर्वच दारूबाज ऐकणार नाहीत. शेकडा दहा-पांच जण कदाचित् दारू सोडतील, पण बाकीचे नव्वद जण तल्लफ आली की गुत्त्याकडे धांव घेणारच. ही तल्लफ मनधरणीने नाहीशी होत नाही. तिचा नायनाट करण्यास सक्तीच पाहिजे. अट्टल दारूबाज लोक तुरुंगांत गेल्यावर त्यांना दारू पिण्याची तल्लफ येत असते, पण ती सक्तीने जिरवण्यांत येते. तुरुंगांत अमलांत आणलेला सक्तीचा मार्ग बाहेरहि अमलांत आणला पाहिजे. या कामीं सक्ती वापरण्याची अत्यंत जरुरी आहे. दारूचे गुत्तेच अजीबात बंद केले, तर विद्यमान असलेले दारूबाज मरतील अशांतली गोष्ट नाही. सर्व हिंदुस्थान चोवीस तासांत, अवघ्या एका दिवसांत निर्व्यसनी करण्याचा एकच खरा व अमोघ उपाय म्हटला म्हणजे कायद्याने व सक्तीने दारूचीं, भांगेचीं, गांज्याचीं व इतर सर्व मादक पदार्थांचीं दुकानें बंद करणें हा होय. जर हत्यारांच्या कायद्याने सरकारला सर्व हिंदुस्थान एका दिवसांत निःशस्त्र करतां आलें, तर त्याच

सरकारला एका दिवसांत सर्व हिंदुस्थान निर्व्यसनी करतां येईल हें उघड आहे. हत्यारावांचून माणसाचें नडतें, पण मादक पदार्थांची तशी गोष्ट नाही.

मादक पदार्थांच्या सेवनावांचून मनुष्य जगूं शकतो म्हणून जर सरकारने या कामीं एक कायदा केला, तर आम्ही व आमच्याबरोबर आमचे देशबांधव सरकारचे अत्यंत आभारी होतील. दारूसारखीं व्यसनें बंद करण्याचा वरील मार्ग जरी रामबाण आहे, तरी तो आपल्या हातीं नसल्यामुळे तो उपलब्ध होईपर्यंत दुसऱ्या कमी दर्जाच्या मार्गाचें अवलंबन करूं नये असें नाही. कायद्याची सक्ती नाही तर प्रेमाची मनवळवणी ही आहेच. हिला जिव्हेवर बसवून सर्व देशभक्तांनी प्रभूला स्मरून या कामाला लागावें अशी आमची आमच्या देशबांधवांना विनंती आहे. त्यांचें काम अवघड आहे व इष्ट हेतु साध्य होण्यास पुष्कळ यातायात पडेल व वेळ लागेल. तरी पण त्यांनी या योग्य कामापासून पराङमुख होऊं नये. ज्ञातिसभा करून त्यांच्या द्वारे निरनिराळ्या जातींच्या लोकांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न करावा. घरोघरीं जाऊन उपदेश करावा, हस्तपत्रकें वांटावीत. व्याख्यानें द्यावींत. जातींकडून ग्रामण्यें सुरू करावींत व अलीकडे पंधरा दिवसांपासून पुण्यास सुरू झालेल्या मार्गाचाहि अवलंब करावा. पुण्यांत सुरू झालेला मार्ग म्हणजे 'पिकेटिंग' ऊर्फ नाकेबंदी होय. दारूच्या गुत्त्यासमोर स्वयंसेवकांनी फिरते राहून गुत्त्यांत जाणाऱ्या इसमाचें मन वळविण्याचा प्रयत्न करावा व असें करण्यांत बेकायदेशीरपणा नाही.

मन वळविणें कायद्याच्या दृष्टीने गुन्हा नाही. मात्र असें करण्यांत कोणाच्या अंगचटीला जाऊं नये व कोणी दारूबाज हट्टाने जाऊंच लागला, तर त्याला प्रतिबंध करूं नये. या दोन गोष्टींबद्दल सावधगिरी ठेवली म्हणजे पिकेटिंग बेकायदेशीर नाही व त्यापासून कोणताहि त्रास होणार नाही. पिकेटिंग यशस्वी होण्यास हें निदानपक्षी पुरें एक वर्ष सुरू ठेवलें पाहिजे व तें अतिशय शिस्तीने व नेटानें चाललें पाहिजे. दोन दिवस 'दुल्ला' करून कार्यभाग साधावयाचा नाही. शांत व शिस्तवार रीतीने एक वर्षभर जर 'पिकेटिंग' सुरू राहिलें तर शेकडा ९० दारूबाज कमी होतील व या बाकीच्या दहा जणांबद्दल दुसरे मार्ग योजण्यास ठीक पडेल. दारूबाज लोक नेहमी दहा-पंधरा रुपये कमावणारे मजूर असतात. अशांनी जर बऱ्याबोलाने दारू सोडली नाही, तर त्यांच्या पोटाला चिमटा बसेल अशा युक्त्या योजण्यांत आल्या पाहिजेत. दारूबाजांना नोकरीस ठेवूं नये व ठेवलें असल्यास त्यांना यापुढे राहूं देऊं नये. त्यांना उसनेपासने मिळूं देऊं नये. सारांश, जेणेंकरून त्यांचा कुचंबा होईल असे सर्व उपाय योजण्यांत आले पाहिजेत. सारांश, दारू बंद करण्याचे सर्व शक्य ते उपाय अमलांत आणण्याची मनोभावे खटपट झाली पाहिजे, नाही तर एका शतकाच्या अवधींत सर्व हिंदुस्थान दारूच्या पिपांत नखशिखान्त मरून जाईल.

– भाला, दि. ११ एप्रिल १९०८

---

## २४. दारूची दंगल

कोणत्याहि काळांत, कोणत्याहि देशांत व कोणत्याहि धर्मांत दारूच्या व्यसनाचा पूर्ण निषेध केलेला आढळतो. दारू प्राशन करणाऱ्या पापी मनुष्याच्या घशांत तीच दारू आधणाची करून ओतावी किंवा काचेचा रसरसणारा रस त्याच्या तोंडांत ओतावा, अशी वेदाची आज्ञा आहे. दारूचा थेंब जर चुकूनमाकून अंगावर पडला, तर अशा थेंबाने व्यापलेली जागा चाकूने कापून काढावी असें मुसलमानी धर्माचें कुराण म्हणतें. बायवलांत दारूचा जरी पूर्ण निषेध केलेला नाही, तरी ती प्यावीच अशी आज्ञा बायबलने ख्रिस्ती लोकांना दिलेली नाही. सारांश, कोणत्याहि धर्मांत ती निषिद्धच मानली गेली आहे. महंमदी धर्म असें सांगतो की, शराब ( दारू) व द्युत ही दोन पापें सर्व पापांत अतिशय भयंकर आहेत. हिंदु धर्मांतहि सुरापानाची गणना पंचमहापातकांत झाली आहे. दारूला इतकें हीनत्व येण्याचीं कारणें अगदी उघड आहेत. या मादक पेयाच्या अंगीं असा कोणताहि गुण नाही की ज्या गुणाच्या आधाराने सुराभक्तांना आपल्या इष्ट देवतेची थोरवी गातां येईल. दारू ही सर्व तीक्ष्ण शस्त्रांपेक्षा जास्त दारुण आहे. इतर शस्त्रें सजीव प्राण्यांना फक्त एकदाच चिरतात, पण ही दारू आपल्या भक्तांना एकसारखी चिरीत असते. इतर शस्त्रें त्यांचा ज्यावर प्रहार होईल त्यांनाच फक्त ठार करतात, पण हा सुरारूपी सुरा तिचें प्रत्यक्ष प्राशन करणाऱ्या इसमांशिवाय इतर शेकडो लोकांना ठार करतो. दारूबाज बदमाश दररोज आपले व आपल्या बायकापोरांचे खून करतात, असें म्हणावयास हरकत नाही. या सटवीच्या पायीं आजपर्यंत शेकडो सुखी कुटुंबें धुळीस मिळालीं व शेकडो धष्टपुष्ट जवान तिच्यामुळे अकालीं मृत्यूच्या जबडयांत जाऊन पडले आहेत.

दारूच्या व्यसनाने राष्ट्रेंच्या राष्ट्रें नामशेष झालीं आहेत व ज्या मनुष्यांना व ज्या ज्या राष्ट्रांना दारू पिण्याची घातूक सवय एकदा लागली त्या मनुष्यांनी किंवा त्या राष्ट्रांनी फार दिवस जगण्याची आशा कधीहि धरूं नये. अंगांत इतर शेकडो गुण असून त्या गुणांची माती करून घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी बाटलादेवीची आराधना सुरू करावी म्हणजे त्यांचे इच्छित मनोरथ पूर्णपणें सिद्धीस जातील. दारूबाज मनुष्यांचें निम्में आयुष्य बेशुद्धींत जातें. दारूबाज मनुष्य निशेंत आला म्हणजे त्याचें मनुष्यत्व नष्ट होऊन तो पशु बनतो. एकदा मनुष्य दारू पिऊन 'राव' बनला म्हणजे तो कोणतें पाप करण्यास तयार होईल ह्याचा नेम कोणीहि सांगूं शकणार नाही. दारू ही सर्व व्यसनांची जननी होय. ह्याच माउलीच्या उदरीं इतर सर्व व्यसनें जन्मास येतात. दारूबाज मनुष्य चोऱ्या करील, दरवडे घालील, खून पाडील व आपलें व्यसन तृप्त करण्याकरिता पैशासाठी जिव्हेने बोलवणार नाहीत अशीं अनन्वित पापकर्में करील. ह्या जगांत ही दारू ज्या चांडाळाने पहिल्या प्रथम अस्तित्वांत आणली तो प्रत्यक्ष सैतानाचा पहिला अवतार होय. पिण्याची दारू व

बंदुकीची दारू ह्या सख्ख्या बहिणी होत. ह्या दोन्ही बहिणींनी ह्या जगांत हल्ली धुमाकूळ उडवून दिला आहे. पिण्याच्या दारूने जर लोकांना पशु बनविलें आहे, तर बंदुकीच्या दारूने मनुष्यांना गुलाम केलें आहे. बंदुकीच्या दारूशीं सध्या आपणांस कांही एक करावयाचें नाही म्हणून तिच्याबद्दल जास्त लिहूं इच्छित नाही. पण ह्यावरून असें मात्र कोणीं समजूं नये की, बंदुकीची दारू पिण्याच्या दारूपेक्षा कमी घातुक आहे. एक वेळ पिण्याची दारू पत्करेल, पण ही बंदुकीची दारू एक क्षणभरहि सहन करवणार नाही. पिण्याची दारू मनुष्याला फक्त कांही काळ गुलाम करते, पण बंदुकीची दारू सबंध राष्ट्राला कायमचे गुलाम बनवून टाकते. बंदुकीची दारू जर अस्तित्वांत आली नसती, तर हल्लीप्रमाणे एका व्यक्तीच्या हातांत हजार व्यक्ति मारण्याची शक्ति आली नसती. अशी आगंतुक पण घातुक शक्ति बंदुकीच्या दारूमुळे एका व्यक्तीच्या हातांत आल्यामुळे पतित राष्ट्रांना वर डोकें काढण्याची सोय उरलेली नाही. तलवार हातीं असलेल्या यजमानाशीं कोणताहि गुलाम नुसत्या काठीने स्वातंत्र्यासाठी लढूं शकेल, पण हातांत बंदूक असलेल्या मनुष्यापुढे कसलाहि धिप्पाड शरीराचा गुलाम गोगलगाय होऊन जातो. असो; पिण्याच्या दारूच्या व्यसनाचे परिणाम सर्व जगाच्या समोर ढळढळीत दिसत असल्यामुळे हें व्यसन कमी करण्याकरिता किंवा अजीबात नाहीसें करण्याकरिता जगांतील सर्व राष्ट्रांत एक-सारखे जारीने प्रयत्न चालू आहेत.

अमेरिकेंतील सात संस्थानांत हें व्यसन कायद्याच्या बंधनाने अजीबात नष्ट करण्यांत आलें आहे. इंग्लंडांतहि ह्या वाढत्या व्यसनाला आळा घालण्याच्या उद्देशाने एक नवीन कायदा लौकरच होणार आहे. चिनांत दहा वर्षांच्या अवधींत अफूचें व्यसन निर्मूल करण्यासाठी चिनी सरकारची आटोकाट खटपट चालू आहे. सारांश, जगांतील सर्व राष्ट्रांत दारू, अफू व इतर मादक पदार्थांचा खप बंद करण्याचे स्तुत्य प्रयत्न चालले असतां हिंदुस्थान सरकारने मात्र या कामीं मुळीच हालचाल करूं नये, ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. सहा-सात कोटींच्या उत्पन्नासाठी हिंदुस्थान सरकार शहरांतून व खेड्यापाड्यांतून दारूच्या पाणपोया उघडीत आहे. खरें म्हटलें म्हणजे इंग्रजाई होण्यापूर्वी हिंदुस्थानांत दारूचें व्यसन मुळीच नव्हतें. हें व्यसन हिंदुस्थानांत फैलावण्याचें पुण्य जर कोणाला हक्काने प्राप्त व्हावयाचें असेल, तर तें हिंदुस्थान सरकारच्याच वांट्याला जाईल. हिंदुस्थान सरकारच्या दृष्टीला फक्त पैसा दिसत आहे. मग तो पैसा कोणत्या का मार्गाने प्राप्त होवो! दारूचें व्यसन जर इतकें घातूक आहे तर खरें म्हटलें म्हणजे चिनी सरकारप्रमाणे हिंदुस्थान सरकारने तें दहा वर्षांच्या आंत अजीबात बंद करण्याच्या प्रयत्नाला लागावयास पाहिजे होतें. **अशा कामीं सक्ती—निर्दय सक्ती** पाहिजे. या कामीं जर हिंदुस्थान सरकारने सक्ती केली, तर त्याला कोणीहि शहाणा मनुष्य नांवें ठेवणार नाही.

दारूबाजांना दारू प्यावयास न मिळाली तर ती न मिळूं द्या व ती न मिळाल्या-मुळे त्यांनी जर पटापट प्राण सोडले, तर त्यांना खुशाल मरूं द्या. पण सरकारने एक कायदा करून दारूचें व्यसन अजीबात बंद करावें. दारू बंद करण्याचा हाच एक रामबाण उपाय आहे. ह्या उपायाशिवाय बाकीचे उपाय हीनकस आहेत. सक्ती सोडून मनधरणीच्या उपायाने दारूबाजांची संख्या कांही कमी होईल, पण हा लंगडा उपाय आहे. मनधरणीच्या उपायाने जे वळणार नाहीत त्यांना सक्तीच्या उपायानेच वठणीवर आणलें पाहिजे. चोरी करूं नये असा उपदेश करून कांही चोऱ्या कमी होतील, पण चोरी केली असतां शिक्षा होते अशी दहशत पोटांत असल्यामुळे जितक्या चोऱ्या कमी होतात तितक्या चोऱ्या नुसत्या नैतिक उपदेशाने कमी व्हावयाच्या नाहीत. गुत्ते बंद करा व कोणी चोरून दारू प्यायलेला सापडला की त्याला शिक्षा ठोठावा. हा दुहेरी उपाय अमलांत आणला गेला म्हणजे एका महिन्यांत ही अनीति बंद पडेल व मग जिकडे-तिकडे आनंदीआनंद होऊन जाईल. दारूच्या कामांत हिंदुस्थानसारख्या निर्धन देशांत सक्तीच करण्यांत आली पाहिजे. ज्या देशांतील लोकांना पोटभर खावयास मिळत नाही त्या देशांतील लोकांना व्यसनें असल्यास त्यांची नीट धडगत नाही. इंग्लंडांत हें व्यसन असल्यास एकपरी चालेल; कारण तेथील लोकांजवळ बाजवीपेक्षा फाजील जास्त पैसा आहे. सधन माणसांना व्यसन असलें पाहिजे असें नाही. परंतु अशा सधन माणसांना एखादें व्यसन असलें, तरी त्यापासून त्यांच्या कुटुंबांतील माणसांना फारशी अन्नाची व वस्त्रप्रावरणाची ददात पडत नाही. परंतु ज्या देशांतील शेकडा ९० लोकांना दोन वेळचें पुरेसें अन्न सुद्धा मिळत नाही त्या लोकांना जर एखादें व्यसन व त्यांतल्या त्यांत दारूचें व्यसन जडलें म्हणजे मग असें पक्कें समजावें की, अशा लोकांचे व त्यांच्या बायकापोरांचे हाल कुत्रा देखील खाणार नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत रक्ताचें पाणी करून चार आण्यांचा खुर्दा जेमतेम मिळवावयाचा व त्या खुर्द्यांतील जर दोन आण्यांचे पैसे दारूच्या पाण्यांत गेले, तर रात्रभर अशा दारूबाजांच्या बायकापोरांच्या डोळ्यांतून पाणी वाहत राहिलें, तर त्यांत आश्चर्य तें कोणतें! ज्या हिंदुस्थानांत दारिद्र्य म्हणजे अठराविश्वें झालें आहे त्या हिंदुस्थानांत कोणतेंहि व्यसन असतां कामा नये व जर यदाकदाचित् तें असलें, तर मग तें समूळ उपटून काढण्यांत आलें पाहिजे.

दारूच्या व्यसनाचा विषारी वृक्ष तोडून काढण्याच्या कामीं सक्तीची कुऱ्हाडच चालविली पाहिजे. हा वृक्ष तोडण्याच्या कामीं मनधरणीची सुरी कुचकामाची होय. मनधरणीच्या सुरीने फार झालें तर ह्या वृक्षाच्या वरवरच्या सालीं सोलल्या जातील. पण आंतील गाभा तसाच कायम राहील. म्हणून सरकारला आमची अशी विनंती आहे की, त्याने या कामीं जरूर जरूर सक्ती करावी. अशा कामीं स्वावलंबनाचे गोड गोड पोवाडे गाऊन कार्यभाग होणार नाही. सरकारला दारूच्या कामीं सक्ती करण्यास जरी आम्ही सांगत आहोंत, तरी सक्तीने दारूचे गुत्ते बंद न करतां, जे

स्वयंसेवक गुत्त्यासमोर उभे राहून आपल्या व्यसनी देशबांधवांना दारूच्या व्यसनापासून परावृत्त होण्यास उपदेश करतात, त्यांच्यावर मात्र स्थानिक सरकारकडून सक्ती होण्यास सुरुवात झाली आहे. एकटे उभे राहा किंवा नेहमी फिरते राहा, कोणत्याहि गोष्टीचा उपयोग न होतां 'इदरसे जाव' असा काळा डगलेवाल्याचा हुकूम होणार व तो हुकूम सुटल्याबरोबर पिसाळलेलें कुत्रें डसावयास आलें म्हणजे ज्याप्रमाणे मनुष्य पळतो त्याप्रमाणे जोडा, छत्री, टोपी ह्यांची पर्वा न करतां जर स्वयंसेवकाने गुत्त्यासमोरून धूम ठोकली नाही की तो गोत्यांत आलाच म्हणून निखालस समजावें.

डि. पोलिस अॅक्टाच्या ६५ व्या कलमाप्रमाणे पोलिसांचा हुकूम अमान्य करण्याचा आरोप अशा गुत्त्यासमोर रेंगाळणाऱ्या स्वयंसेवकावर लादला जाऊन त्याला त्याच्या पुण्य कृत्याबद्दल पांच-दहा रुपयांची चाट बसल्यावांचून राहवयाची नाही, असा अनुभव गेल्या पंधरवडयांत पुण्यांतील लोकांना आला आहे. रस्त्यावर उभें राहून उपदेश करणें म्हणजे सार्वजनिक रस्ता अडवणें, असा डिस्ट्रिक्ट पोलिस अॅक्टाचा अर्थ करणें म्हणजे न्यायबुद्धीचा, तारतम्यभावाचा व सारासार विचाराचा खून करणें होय. डि. पोलिस अॅक्ट अशा पुण्यकामीं खो आणण्याकरिता केलेला नाही, हें दंड ठोठावणाऱ्या मॅजिस्ट्रेटने लक्षांत आणावयास पाहिजे. पण ज्या अर्थी पोलिसांची बाजू उचलून धरण्याचा कृतसंकल्प झालेला दिसतो त्या अर्थी डि. पोलिस अॅक्टाच्या व त्यामुळे अकलेच्या चिंधडया झाल्यास मोठेसें नवल नाही. डि. पोलिस अॅक्टाप्रमाणे पुण्यांतील पोलिसांनी स्वयंसेवकांवर खटले केले. येथील मॅजिस्ट्रेटने त्यांना दंड ठोठावले व बिचारे स्वयंसेवक दंडाच्या माराखाली जेरीस येऊन पिकेटिंग बंद पडलें. पिकेटिंग बंद पडल्यामुळे दारूचे गुत्ते पूर्ववत् जोरांत आले व पिकेटिंगमुळे ज्या गुत्त्याची दोनशेची विक्री दोन रुपयांवर आली होती ती पुन्हा शंभरदीडशेवर येऊन धडकली. दारूबाज लोक पूर्ववत् दारू पिऊं लागले व कांही काळ बंद पडलेलें व्यसन पुनरपि जोरांत आलें. सरकारी अधिकाऱ्यांच्या या धोरणामुळे कोणीं जर असें प्रतिपादन केलें की, सरकारच्या मनांत दारूचें व्यसन वाढावें असेंच आहे, तर अशा मनुष्याचें मत सर्वथैव चुकीचें आहे असें कधीहि म्हणतां यावयाचें नाही. उत्पन्नाची सबब पुढे करण्यांत अर्थ नाही. कारण अबकारी खातें बंद केल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई करून घेण्यास दुसरे अन्य मार्ग आहेत. म्हणून सरकारला आमची अशी विनंती आहे की, अन्य मार्गाने तुम्ही आपली तिजोरी काठोकाठ भरून घ्या, पण अबकारी खात्याला अजीबात फाटा द्या. आम्हीं सरकारला कितीहि परोपरीने विनविलें तरी सरकार आमच्या म्हणण्यास भीक घालील अशांतली गोष्ट नाही. प्रजेचा धाक सरकारास असल्याशिवाय कोणतेंहि सरकार प्रजेच्या म्हणण्याचा विचार करीत नाही. हिंदुस्थानांत तर अशी स्थिति आहे की, सरकारचा धाक प्रजेला आहे, पण प्रजेचा धाक सरकारला मुळीच नाही. हिंदी प्रजेच्या या कमकुवतपणामुळे

# २५. बॉम्बगोळा

वंगाल्यांत मुझफरपूर येथे ता. १ मे सन १९०८ शुक्रवार रोजीं एक बॉम्ब-गोळा फेकण्यांत आला. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या हकीगतीवरून हा बॉम्बगोळा फेकणारे दोन गृहस्थ खुदिराम बोस व दिनेशचंद्र हे आहेत असें प्रसिद्ध झालें आहे. या दोघांपैकी दिनेशचंद्र याने स्वतःची आत्महत्या करून घेतली व स्वतःला व आपल्या देशबांधवांना पुढे ओढवणाऱ्या दगदगीपासून व यातनांपासून मुक्त केलें. खुदिरामला पकडल्यानंतर त्याने सर्व गोष्टींचा उलगडा केला व त्यामुळे कलकत्त्यांत राहणारे हे दोन तरुण गृहस्थ मुझफरपूराला कोणत्या उद्देशाने गेले या सर्व गोष्टींचा स्पष्ट उलगडा झाला आहे. या दोघा तरुण गृहस्थांचा अंतःस्थ हेतु मि. किंग्जफोर्ड यांना ठार मारण्याचा होता. मि. किंग्जफोर्ड यांना ठार मारण्याचा बेत त्यांच्या डोक्यांत कां शिरावा व स्वतःचें शिरकमल हातांत घेऊन त्यांनी या घोर कृत्याला कां प्रवृत्त व्हावें, हे प्रश्न गंभीरपणाने विचार करण्यासारखे आहेत. एके दिवशीं मुझफरपूर येथे मि. किंग्जफोर्ड यांच्या राहण्याच्या बंगल्यासमोर एक बॉम्बगोळा फुटला व त्याने मि. किंग्जफोर्ड हे मरण्याच्या ऐवजीं दोन युरोपियन स्त्रिया व एक हिंदी घोडेवाला मरण पावले. या खुनाबद्दल एका किंवा अनेक लोकांना पुढे फाशी देण्यांत येईल एवढाच विचार करून या प्रकरणाचा नीट सांगोपांग निकाल लागावयाचा नाही, असें आमचें मत आहे. पैशासाठी, खाजगी सूड उगवण्यासाठी किंवा इतर कारणां-साठी जर हे खून झाले असते, तर तिकडे कोणी विशेष लक्ष दिलें नसतें व त्याची विशेष चर्चा कोणीं केलीहि नसती. पण मुझफरपूर येथे झालेले खून खाजगी स्वरूपाचे नसून ते सार्वजनिक स्वरूपाचे आहेत. ते काळ्या मनुष्याने काळ्या मनुष्यांचे केलेले नसून ते काळ्या मनुष्यांनी गोऱ्या मनुष्यांचे केलेले आहेत. या दोन कारणांमुळे या खुनांकडे सरकारचें व रयतेचें विशेष लक्ष लागलें पाहिजे व त्याप्रमाणे तें लागलें आहेहि. हिंदुस्थानांत सरासरीने दररोज एक खून होत असेल व त्याबद्दल एक खुनी मनुष्य फासावरहि चढत असेल. पण मुझफरपूर येथील खुनामुळे युरोपियन लोकांत व हिंदी लोकांत जी विशेष चळवळ उडून गेली आहे त्यावरून हा खून इतिहासप्रसिद्ध होऊन तो उभय पक्षांना बोधप्रद व हितकर होण्याचा रंग दिसत आहे. या एकाच खुनामुळे जर आमच्या दयाळु सरकारच्या राजकीय धोरणांत बदल झाला, तर त्यामुळे आमचें व सरकारचें पुष्कळ हित होणार आहे.

मुझफरपूर येथील खुनाची राजकीय मीमांसा करण्याची या वेळीं अत्यंत जरुरी आहे व त्या मीमांसेमुळे आमच्या सरकारचें कोटकल्याण होईल हा विचार मनांत धरून या खुनाच्या राजकीय स्वरूपाबद्दल दोन शब्द लिहिण्याचें आम्हीं या अंकीं योजिलें आहे. ज्या दिवशीं सन १९०५ सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या सोळाव्या तारखेस लॉर्ड कर्झन यांनी बंगाली लोकांच्या संयुक्त मताला धाब्यावर

बसवून भंग केला. त्याच दिवशीं बंगाली लोकांच्या मनांत सरकारविषयी असलेल्या प्रेमाचा भंग झाला, असें म्हणावयास हरकत नाही. सगळा बंगाल देश आरडून ओरडून 'वंगभंग' करू नका, असें सांगत असतां, लॉर्ड कर्झनसाहेबांनी आपलाच हेका चालवून बंगालची फाळणी केली. ही त्यांनी आपल्या कारकीर्दींत सर्वांत मोठी चूक केली. ही चूक ब्रिटिश साम्राजाला मागेपुढे धोका आणील असें त्याच वेळीं आम्हीं सरकारला बजावलें होतें. अडीच वर्षांपूर्वी हिंदुस्थान सरकार नुसताच वंगभंग करून स्वस्थ बसलें नाही, तर त्या वेळेपासून तें पदोपदीं हिंदी लोकांचा मनोभंग करीत आहे. अडीच ,वर्षाच्या पूर्वीचा मनु निराळा होता व हल्लीचा मनु निराळा आहे, ही गोष्ट सरकारने कधीहि विसरूं नये. आपण माणसें आहोंत व स्वराज्याचा हक्क हा आपला ईश्वरदत्त व जन्मसिद्ध हक्क आहे. ही समजूत हिंदी लोकांची होत चालली आहे व या समजुतीला मान देऊन सरकारने हिंदी लोकांना राजकीय हक्क देण्यास सुरुवात केली पाहिजे. आता दिरंगाई करून चालावयाचें नाही व नुसत्या गोड अभिवचनांनी कोणी फसावयाचें नाही.

जसजशी लोकांची जागृति जास्त जास्त होत चालली आहे, तसतशी सरकारची दडपशाहीहि जास्त जास्त होत चालली आहे. लोकांच्या जागृतीचें व सरकारच्या दडपशाहीचें प्रमाण सम होत चालल्याकारणाने काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत असंतोषाचा वणवा एकसारखा भडकत चालला आहे. हा वणवा हिंदुस्थानांतील इतर प्रांतांपेक्षा बंगाल्यांत जास्त भडकला आहे. त्यांच्या असंतोषाची आग जास्त प्रमाणाने भडकण्याचें कारणहि तसेंच मोठें आहे. प्रत्येक बंगाली तरुणाच्या डोळ्याला त्याची देशमाता दुभंग होऊन पडलेली दिसत आहे. आपल्या देशमातेच्या छिन्नविच्छिन्न झालेल्या शरीराकडे पाहून तो वेडा होऊन गेला आहे. बंगाली लोकांच्या अंतःकरणाच्या ह्या स्थितीकडे सरकार मुद्दाम कानाडोळा करीत आहे हें चांगलें लक्षण नाही. सरकारला वंगभंग पुरा जाचल्याशिवाय राहणार नाही; किंवा स्पष्ट रीतीने बोलावयाचें म्हटलें म्हणजे वंगभंग इंग्रजी साम्राज्याचा भंग केल्याशिवाय राहणार नाही. म्हणून आम्ही सरकारला अशी विनंती करतों की, त्यांनी इभ्रतीला भीक न घालतां बंगालची फाळणी रद्द करून पूर्व व पश्चिम बंगालची जुळणी करावी व इंग्रजी साम्राज्याच्या आयुष्यांत थोडी जास्त भर घालावी. वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे सरकारने वरती सुचविलेल्या रीतीने वागावयास पाहिजे. पण जेथे तेथे व जेव्हा तेव्हा सरकारला आपल्या इभ्रतीचें फाजील स्तोम वाटत आहे आणि त्यामुळे नसते अनर्थ उद्भवत आहेत. सरकार आपणांस नुसत्या शाब्दिक अभिवचनांशिवाय भरीव असें कांही देत नाही असें पाहून हिंदी लोक दुःखाचे सुस्कारे टाकीत आहेत. पण त्यांच्यापैकी जे कोणी ताज्या रक्ताचे व तापट स्वभावाचे आहेत ते नुसते सुस्कारे टाकण्याच्या ऐवजीं सूड घेण्याच्या मार्गाला प्रवृत्त झाले आहेत. खुदिराम, दिनेशचंद्र, वीरेंद्रकृष्ण, उल्हासकुमार, दत्त उपेंद्रनाथ वगैरे मंडळींनी

केलेल्या खुनांबद्दल किंवा गुप्त कटाबद्दल त्यांना कोणी कितीहि दोष देवोत, तरी पण प्रत्येकाला व त्यांच्या पक्क्या हाडवैरी शत्रूलाहि ही गोष्ट कबूल केली पाहिजे की, मि. किंग्जफोर्ड यांचा खून करण्याचा प्रयत्न करण्याच्या कामीं त्यांचा स्वार्थमूलक कोणताहि हेतु नव्हता. पंचविशीच्या आंतील तरुणांनी – विद्या व वित्त यांनी युक्त अशा तरुणांनी – बॉम्बगोळे फेकण्याच्या कृत्याला प्रवृत्त व्हावें, ही शोचनीय गोष्ट आहे. तरी पण ह्याचें कारण सरकारची सहानुभूतिशून्य राज्यपद्धति होय.

इंग्लंडांतील तरुण लोक अशा कामाला प्रवृत्त होत नाहीत व रशियांतील तरुण लोक हें काम बरींच वर्षें करीत आहेत. हिंदुस्थानांतील तरुणांनी या कामाला सुरुवात करावी ह्याचें कारण इंग्लंडच्या राज्यपद्धतींतील व रशिया आणि हिंदुस्थान या दोन देशांच्या राज्यपद्धतींतील अंतर होय. इंग्लंडांत प्रजासत्ताक आणि नियंत्रित राजपद्धति चालू आहे, तर रशियांत व हिंदुस्थानांत राजसत्ताक व अनियंत्रित राज्यपद्धति अस्तित्वांत आहे. जोंपर्यंत दुसऱ्या तऱ्हेची अनियंत्रित राज्यपद्धति एखाद्या देशांत चालू राहील, तोंपर्यंत हे असले प्रकार मधून मधून व्हावयाचेच. त्यामुळे सरकारने किंवा सरकारपक्षीय लोकांनी आपलीं डोकीं निष्कारण भणाणून घेऊं नयेत. मुझफरपूर येथील खून पडल्यापासून सरकारपक्षीय वर्तमानपत्रें व लेखक आपल्या अकलेचे देदीप्यमान तारे तोडूं लागले आहेत. हे सर्वच तारे तेजःपुंज आहेत. पण त्यांपैकी दोन जास्त प्रकाशमान असल्यामुळे ते आम्ही आपल्या वाचकांच्या अवलोकनार्थ सादर करतों. कलकत्त्यांत उघडकीस आलेला गुप्त कट जहाल पत्रांतील लेखांनी व जहाल वक्त्यांच्या भाषणांनी अस्तित्वांत आला. म्हणून जहालपत्रें अजीबात बंद करण्यांत यावींत अशी सूचना सरकारपक्षीय वर्तमानपत्रांतून येऊं लागली आहे. या सूचनेप्रमाणे भेदरलेलें व भांबावलेलें सरकार कदाचित् एक 'प्रेस अॅक्ट' पसार करून जहाल पत्रें सर्वांशीं किंवा अल्पांशीं जखडून टाकील. सरकारच्या अंगीं ही शक्ति आहे ह्याबद्दल कोणालाहि तिळमात्र संशय नाही, पण जहाल पत्रें बंद केल्यावर हे असले गुप्त कट कसे नामशेष होणार, हें आम्हांस कळत नाही. एका दृष्टीने जहाल पत्रें गुप्त कट होण्याच्या आड येत आहेत, असें म्हटलें तरी चालेल. पोटांतील धुमसणारा असंतोषाग्नि जर जहाल लेखणीवाटे बाहेर न पडला, तर तो गुप्त कटाच्या रूपाने बाहेर पडेल, ही साधी गोष्ट जहाल पत्रांच्या उलट टीका करणाऱ्या मंद मेंदूच्या डोक्यांत न यावी हें साहजिक आहे. अशा मठ्ठ लोकांना आम्ही उलट असें सांगतों की, कागदावर निघणारीं जहाल पत्रें बंद करण्यास सरकारला सांगण्याच्या ऐवजीं सरकारच्या जहाल कृतींतून अदृश्य स्वरूपाचीं निघणारीं जहाल पत्रें सर्वांच्या अगोदर बंद करण्यास त्यांनी सरकारला विनंती करावी. अशी विनंती सरकारने मान्य केली तरच त्यापासून कांही थोडाबहुत नफा होण्यासारखा आहे. पण सरकारला अशी विनंती करण्याची या भेकड लोकांची छाती नाही व यदाकदाचित् उसनें धैर्य बळेंच आणून त्यांनी जर तसें केलें, तर सरकार त्यांच्या विनंतीला

मुळीच भीक घालणार नाही. स्वतःच्या केसालाहि धक्का न लागतां वर्तमानपत्रांतून गाजणाऱ्या या शिष्टांच्या म्हणण्याला कोणतेंहि जहाल पत्र कवडीचीहि किंमत देणार नाही, हें आम्हीं सांगावयास नको.

कांही शिष्ट व स्वार्थसाधू लोकांनी वरती लिहिलेली सूचना सरकारला केली आहे, तर दुसऱ्या कांही शिष्टांनी राजभक्तीच्या भरांत अशी सूचना केली आहे की, प्रत्येक गोऱ्या मनुष्याच्या जिवाबद्दल शंभर काळ्या लोकांचे जीव घेण्यांत यावेत. ही सूचना करणाऱ्या महात्म्यांच्या खाटकी अंतःकरणांचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच होय. एका गोऱ्या मनुष्याच्या जिवाची किंमत शंभर काळ्या मनुष्यांच्या जिवांइतकी आहे हें प्रमाण या लोकांनी कोणत्या गणिताच्या आधाराने काढलें हें जर कळेल तर फार उत्तम होईल. गोऱ्या मनुष्याचें शरीर रक्तमांसाने बनलेलें नसून तें कांही अपूर्व वस्तूंनी बनलें आहे की काय किंवा एका गोऱ्याबद्दल शंभर काळे फासावर चढविण्याचें कारण हिंदी लोकांच्या पोटांत दहशत बसविणें हें जर असेल, तर मग हाहि हेतु सिद्धीस जाणें शक्य नाही. कारण जुलमाने दहशत न बसतां उलट जास्त दम येतो असा मागील इतिहास सोदाहरण रीतीने सांगत आहे. यासाठी आमची सरकारास अशी विनंती आहे की, कोठें एक बॉम्बगोळा फेकण्यांत आला म्हणून त्यांनी जहाल पत्रांवर करडी नजर करूं नये किंवा निरपराधी माणसांना निष्कारण सतावूं नये. मुझफरपूर येथे बॉम्बगोळा फेकला गेला नसता, तर फार उत्तम झालें असतें. पण बॉम्बगोळा न फेकण्याची प्रवृत्ति उत्पन्न करण्याचें श्रेय सरकारच्याच पदरीं येत आहे. सरकार नेहमी प्रजाजनांच्या अंतःकरणांत असंतोषाचे बॉम्ब फेकीत आहे म्हणूनच मुझफरपूरचा बॉम्बगोळा फेकण्यांत आला. असो; झाली ती गोष्ट घडून गेली. आता यापुढे सरकारचें धोरण बदलून असला प्रकार पुन्हा घडणार नाही अशी आम्हांस आशा आहे. विसाव्या शतकांत एकहि दुसरा बॉम्ब न उडतां किंवा बंदुकींतून एकहि गोळी एखाद्यावर न सुटतां हिंदी लोकांना स्वराज्याचा हक्क मिळावा अशी आमची इच्छा आहे. जगाच्या इतिहासांत अशी अश्रुतपूर्व गोष्ट घडवून आणण्याचें सरकारच्या हातीं आहे. यामुळे इंग्रज लोकांची कीर्ति जगाच्या इतिहासपटावर अक्षय्य अक्षरांनी लिहिली जाणार आहे. पैशापेक्षा सहस्रपटींनी जास्त मौल्यवान् अशी ही कीर्ति इंग्रज लोकांनी संपादन करावी व त्याबरोबर हिंदी लोकांचा दुवा मिळवावा अशी आमची त्यांना विनंती आहे. असें न करतां केवळ साम्राज्यासाठी इंग्रज लोक हिंदुस्थानवर कायमची सत्ता चालविण्याची अस्पृहणीय हाव मनांत धरतील, तर इंग्रज लोकांच्या या हावेने दररोज हिंदी लोकांच्या अंतःकरणांत असंतोषाच्या बॉम्बगोळ्याचा ध्वनि उमटेल व त्याचा प्रतिध्वनि दारूचा बॉम्बगोळा मधून मधून करील.

– भाला, दि. ११ मे १९०८

## २६. देशभक्त व भगवद्भक्त

देशभक्त व भगवद्भक्त या दोन शब्दांचे अर्थ अगदी सोपे आहेत. देशाची भक्ति करणारे ते देशभक्त होत व भगवंताची भक्ति करणारे ते भगवद्भक्त होत. दोन्ही जातींच्या भक्तांचीं अंतःकरणें शुद्ध व प्रेमळ असतात याबद्दल वाद नाही. दोन्ही तऱ्हेचे भक्त आपआपल्यापरीने मनुष्यजातीचें कल्याण करण्याकरिता अहर्निश झटत असतात हेंहि खरें आहे. तथापि या दोन जातींच्या भक्तांपैकी कोणता भक्त जगाला जास्त उपयुक्त आहे याची चर्चा या लेखांत करण्याचें आम्हीं योजिलें आहे. देशभक्तांचें आराध्यदैवत त्यांची जन्मभूमि असते. या आराध्यदेवतेव्यतिरिक्त इतर देवता त्याला तुच्छ वाटतात. आपल्या जन्मभूमीसाठी अस्सल देशभक्त वाटेल तें करण्यास तयार होईल. तो आपल्या मायदेशासाठी उपाशी राहील व तो आपल्या जन्मभूमीकरिता उन्हातान्हांत आनंदाने उभा राहील. तो आपल्या राष्ट्रदेवतेसाठी वाटेल तो स्वार्थत्याग करील व तसाच प्रसंग पडल्यास तो आपल्या उपास्यदेवतेचें चरण आपल्या रक्ताने धुवून त्यांच्यावर आपलें शिरकमल अनन्यभावाने अर्पणहि करील. अंतरंगी व बहिरंगी राष्ट्रदेवतेची अनन्यभावे भक्ति भिनल्यावर अशा देशभक्ताला एका राष्ट्रदेवतेशिवाय दुसरी कोणतीहि पूज्य वस्तु जगांत दिसत नाही. तो राष्ट्रदेवतेचा भक्त व ती त्याची देवता! तो राष्ट्रदेवतेचा दास व ती त्याची यजमानीण! तो राष्ट्रदेवतेचा गुलाम व ती त्याची मालकीण! राष्ट्रदेवता व राष्ट्रभक्त यांच्यामधील सेव्यसेवकांचा संबंध सकाम नसून तो निष्काम असतो. तो पगारी नसून चिरकालीन असतो. असें हें सेव्यसेवकांचें नातें जगांत दुसरीकडे कोठेहि सापडावयाचें नाही.

एक वेळ पोटचा मुलगा आपल्या बापाला सोडील किंवा पाठचा भाऊ आपल्या वडील भावाचा त्याग करील किंवा पदरचा नोकर आपल्या धन्याला सोडून जाईल, पण देशभक्त चाकर आपल्या जन्मभूमीरूपी मालकिणीला कधीहि अंतर देणार नाही. जगांत जितके म्हणून चाकर आहेत तितके सर्व लोभामुळे व स्वार्थामुळे आपआपल्या धन्याची नोकरी करीत असतात. पण देशभक्ताची आपल्या जन्मभूमीची सेवा अशा अमंगल विकारांनी विटाळलेली नसते. पैशासाठी नव्हे, कीर्तीसाठी नव्हे किंवा इतर अन्य कारणांसाठी नव्हे, तर केवळ एका प्रेमाने वेडापिसा होऊन देशभक्त आपल्या देवतेची आराधना निष्काम अंतःकरणाने व निरपेक्ष बुद्धीने करीत असतो. आपल्या इष्ट देवतेची आराधना करीत असतांना तो पैशाची पर्वा करीत नाही. तो नांवलौकिकाला भीक घालीत नाही किंवा तो शारीरिक व मानसिक यातनांची फिकीर करीत नाही. अशा अस्सल देशभक्ताची संपत्ति मायदेशसेवा, त्याचा लौकिक मायदेशसेवा व त्याचें सुख मायदेशसेवा होय! ‘माझी जन्मभूमि’ हे शब्द तोंडावाटे निघाल्याबरोबर किंवा कानावर येऊन पडल्याबरोबर

देशभक्ताच्या अंतःकरणांत ज्या मनोवृत्ति उचंबळतात त्याची कल्पना इतरांना येणें शक्य नाही. देशभक्ताचा आनंद देशभक्त जाणतात. मायदेशाची सेवा केल्या-मुळे देशभक्ताच्या अंतःकरणांत उत्पन्न होणारा आनंद ब्रह्मानंदापेक्षा शतपटींनी जास्त आहे. ब्रह्मानंदाचा एक वेळ वीट येईल, तो एक वेळ नकोसा वाटेल किंवा तो एक वेळ अपुरा भासेल; पण देशभक्तीच्या आनंदाचा वीट कालत्रयीहि येणार नाही. तो कधीहि नकोसा वाटणार नाही व तो केव्हाहि अपुरा भासणार नाही. अद्वितीय व अनुपमेय असा देशभक्तीचा आनंद ज्या पुण्यवान् व भाग्यवान् महात्म्याच्या वांटचाला येईल, तो खरोखर धन्य होय.

देशभक्तीच्या पांढऱ्या स्वच्छ स्फटिकाप्रमाणे असणाऱ्या आनंदांत स्वार्थाचा अल्पहि गढूळपणा नसतो. देशभक्तांसारखे निस्पृह लोक या जगांत दुसरें सापडणार नाहीत. भगवद्भक्तांची थोरवी कोणी कितीहि गावोत, तरी पण त्यांना देशभक्तांची सर येणार नाही. भगवद्भक्त आपल्या देशबांधवांना सदुपदेश करतात, त्यांना सदाचरणाच्या मार्गाने जाण्याकरिता वारंवार विनंती करतात व ईश्वरभक्ति करून आपल्या देहाचें सार्थक करून घेण्याकरिता त्यांना परोपरीने विनवतात. भगवद्भक्त या गोष्टी करतात याबद्दल कोणीहि शंका घेणार नाही. भगवद्भक्त स्वतः ईशभक्ति करतात व दुसऱ्यांना ती करावयास सांगतात. पण ते इष्ट हेतूंची जोड आपल्या देशबांधवांना आपण स्वतःहून करूं देत नाहीत. ते ईशभक्तीचा मार्ग बोटाने दाख-वितात, पण ह्याच्या पलीकडे कांहीहि करीत नाहीत. नवविधा भक्ति करून भगवंताची प्राप्ति करून घ्या, एवढाच शाब्दिक उपदेश करून भगवद्भक्त स्वस्थ बसतात. पण देशभक्तांची गोष्ट अगदी निराळी आहे. राष्ट्रदेवतेची अनन्यभावे सक्रिय सेवा करून देह-मोक्षाची म्हणजे स्वातंत्र्याची जोड करून घ्या. असा सर्वांगसुंदर उपदेश देशभक्त आपल्या देशबांधवांना करून स्वस्थ बसत नाहीत. या उपदेशालीपकडे ते जातात व आपल्या समदिलाच्या व कमशीलाच्या देशबांधवांकरिता झटून व झगडून त्यांना देह-मोक्षाची प्राप्ति स्वतःच्या कर्तबगारीने करून देतात व ह्या उपकाराबद्दल ते आपल्या देशबांधवांकडून कोणताहि मोबदला घेत नाहीत.

भगवद्भक्तांमध्ये व देशभक्तांमध्ये हाच मोठा फरक आहे. त्यामुळेच भगवद्भ-भक्तांपेक्षा देशभक्तांची योग्यता जास्त आहे. आजपर्यंत असा एकहि भगवद्भभक्त झाला नाही की ज्याने आपल्या स्वतःच्या भक्तीच्या जोरावर आपलें सर्व राष्ट्र मोक्ष-पदाला नेलें आहे. पण आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर असे शेकडो देशभक्त जन्मास आले आहेत की, ज्यांनी आपल्या आयुष्यांत आपल्या सर्व देशबांधवांच्या पायांतील गुलाम-गिरीच्या बेड्या स्वतःच्या पराक्रमाने व कर्तबगारीने तोडून टाकून त्यांच्या ठिकाणीं स्वातंत्र्याचे तोडे घातले आहेत. सुखकर व स्पृहणीय स्थित्यंतर घडवून आणण्याच्या कामीं देशभक्तांना त्यांच्या देशबांधवांकडून नेहमीच साहाय्य मिळतें असें नाही, उलट कांही कांही वेळा तर असा शोचनीय प्रकार दृष्टीस पडतो की, मदत मिळ-

ण्याच्या ऐवजीं त्यांना आपल्या देशबांधवांकडून अडथळा होतो. तरी पण आपल्या देशबांधवांची अशी निंद्य कृति विसरून जाऊन ते त्यांना आपल्या आनंदाचे वांटेकरी करतात. आत्म-मोक्ष मिळविणारे रामभक्त व देह-मोक्ष मिळविणारे राष्ट्रभक्त ह्यांच्यामध्ये हा ठळक भेद आहे. आपल्याच महाराष्ट्राचें उदाहरण घ्या. ह्या महाराष्ट्रांत गेल्या तीनशे वर्षांत पुष्कळ साधुसंत उत्पन्न झाले व त्यांनी आपआपल्या परीने आपल्या देशबांधवांना उपदेश केला. पण त्या साधुसंतांमध्ये असा एकहि साधु झाला नाही की ज्याने आपल्या भक्तीच्या बलाने आपल्या सर्व देशबांधवांना मोक्षपदाला नेलें आहे. ह्या दृष्टीने विचार केला असतां भगवद्भक्त हे आप्पलपोटे तरी असले पाहिजेत किंवा त्यांच्या भक्तीचें बळ मर्यादित असलें पाहिजे. ज्या वेळीं आम्ही असें मत प्रतिपादन करतों की, भगवद्भक्तांपेक्षा देशभक्त जास्त श्रेष्ठ होत. त्या वेळीं असें कोणी क्षणभरहि समजूं नये की, आम्ही भगवद्भक्ताची योग्यायोग्यता समजत नाही. भगवद्भक्त हे श्रेष्ठ पुरुष तर खरेच, पण देशभक्त हे श्रेष्ठतर पुरुष होत. ह्याचें कारण आम्हीं वरती दिलेलेंच आहे. भगवद्भक्तांपेक्षा देशभक्त श्रेष्ठतर आहेत हें मत जर कोणास संमत नसेल, तर त्यांनी क्षणभर शांत मनाने व निःपक्षपात अंतःकरणाने विचार करावा म्हणजे त्यांना आमच्या मताची सत्यता पटेल.

फार लांब कशाला, सतराव्या शतकांतील दोन जगप्रसिद्ध भगवद्भक्तांचें व देशभक्तांचें उदाहरण घेऊं या. म्हणजे या मताची सत्यता उत्तम तऱ्हेने स्थापित होईल. देहूचे तुकारामबुवा हे पहिल्या प्रतीचे भगवद्भक्त होते हें कोणालाहि कबूल आहे. आमरण त्यांनी पांडुरंगाची भक्ति केली व शेवटीं देहासकट विमानांत बसून वैकुंठाला चालते झाले. तुकारामबुवा वैकुंठाला गेले, पण ते एकटे गेले. त्यांनी आपल्याबरोबर एकहि शिष्य नेला नाही किंवा एकहि देशबांधव घेतला नाही. ह्या जगांत असेपर्यंत तुकारामबुवांनी आपल्या देशबंधूंना परमार्थाचा उपदेश केला ही गोष्ट खरी आहे, पण त्यांचा उपदेश ज्या हतभाग्यांच्या मनावर ठसला नाही अशा लोकांना त्यांनी कोणत्याहि तऱ्हेची प्रत्यक्ष मदत केलेली नाही. असे हतभागी लोक तुकारामबुवांच्या उपदेशाप्रमाणे वागले नाहीत व त्यामुळे ते संसारसागरांतून तरले नाहीत. आपल्या मूढ देशबांधवांना बळेंच खांद्यावर घेऊन संसारसागरांतून पोहून जाण्याची इच्छा तुकारामबुवांना किंवा इतर साधूंना झाली नाही किंवा यदाकदाचित् झाली असल्यास त्याप्रमाणे त्यांच्या हातून कृति घडली नाही. सारांश, साधुसंत व भगवद्-भक्त हे नुसते उपदेशक होते. ईशभक्तीच्या जोरावर स्वतः कृति करून आपल्या देशबांधवांना मोक्षपदाला न नेण्यांत त्यांचा आप्पलपोटेपणा असो किंवा त्यांचें दौर्बल्य असो, पण वस्तुस्थिति अशी आहे की, त्यांच्या हातून अशी कृति झाली नाही. ही झाली भगवद्भक्तांची गोष्ट. पण तेच देशभक्तांकडे पाहा. देशभक्ति करून देह-मोक्ष करावा असा नुसता शाब्दिक उपदेश आपल्या देशबांधवांना करून ते स्वस्थ

बसले नाहीत. तर जे हतभागी अथवा कुचर देशबांधव देशभक्तीपासून पराङमुख झाले त्यांना सुद्धा देशभक्तांनी स्वातंत्र्याची जोड करून दिली.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनी बालपणापासून तो आमरण देशभक्तीचें कीर्तन आपल्या देशबांधवापुढे गाइले, पण तें सर्वांनीच ऐकलें नाही. शिवाजीमहाराजांच्या वेळींहि असे पुष्कळ हरीचे लाल होते की, ज्यांच्या अंतःकरणांना शिववांच्या उपदेशाने भंग झाला नाही व जे नेहमीच देशभक्तिशून्य राहिले. पण ज्या वेळीं छत्रपतींनी स्वतःला रायगडावर अभिषेक करवून घेऊन हिंदुपदपादशाहीची संस्थापना केली त्या वेळीं प्रतापगडच्या रानांत, सिंहगडाच्या आवारांत, पावनखिंडीच्या पोटांत व इतर शेकडो ठिकाणीं लढणाऱ्या देशभक्त मराठी वीरांबरोबर त्यांच्या सर्व देशबांधवांना स्वातंत्र्याची जोड झाली. रायगडावर शिवबांना राज्याभिषेक होऊन ज्या वेळीं आनंददर्शक तोफा दणाणूं लागल्या त्या वेळीं महाराष्ट्रांतील सर्व मराठ्यांच्या, एकूण एक सर्व मराठ्यांच्या दास्याच्या बेड्या खळकन् तुटून पडल्या. जरी सन १६७४ सालीं महाराष्ट्रांतील सर्व मराठ्यांना स्वातंत्र्यसुखाची जोड मिळाली, तरी सन १६४२ पासून तो सन १६७४ पर्यंत महाराष्ट्रांतील सर्वच मराठे स्वातंत्र्यासाठी लढले असें कांही नाही. त्या वेळीं विद्यमान असलेल्या मराठ्यांपैकी स्वातंत्र्यासाठी फार थोडे लढले, पुष्कळ कुचरपणाने घरीं घोरत पडले व बरेचसे 'देशभंजका'ची किळसवाणी पदवी पैदा करून मायदेशाशीं निमकहरामी ठरले. जरी अशी वस्तुस्थिति होती, तरी १६७४ सालीं महाराष्ट्र-भूमीच्या पृष्ठभागावर असलेल्या सर्व महाराष्ट्रियांच्या घरावर स्वातंत्र्यसूर्याचीं किरणें सारखींच पडलीं व त्यांनी सर्वांना सारखेंच सुखविलें. सारांश, देशभक्त शिवबांनी स्वतः स्वातंत्र्याची जोड करून घेतली व ती आपल्या तत्कालीन सर्व देशबांधवांना करून दिली. पण अशी स्थिति भगवद्भक्तांची नाही. श्रीज्ञानेश्वरांपासून तों तुकारामबुवांपर्यंत असा एकहि साधु निर्माण झाला नाही की ज्याने आपल्या समकालीन देशबंधूंचा पारमार्थिक उद्धार एकसमयाच्छेदेंकरून केला. भगवद्भक्तांना तसें करण्याची शक्ति नाही, पण देशभक्तांच्या अंगीं ही शक्ति आहे म्हणूनच आम्ही असें पुन्हा एकवार म्हणतों की, भगवद्भक्त व देशभक्त हे दोन्ही श्रेष्ठ आहेत, पण दोहोंत देशभक्त भगवद्भक्तापेक्षा श्रेष्ठतर आहेत. देशभक्तांना वरची पदवी देण्याचें आणखी एक सबळ कारण आहे. तें हें की, रामभक्त हा हटकून राष्ट्रभक्त असतोच असा कांही नियम नाही. पण राष्ट्रभक्त हा रामभक्त असलाच पाहिजे. देशभक्त हा धर्मलंड कधीहि असूं शकणार नाही. धर्मलंड देशभक्ताच्या हातून कांहीहि व्हायचें नाही. आपण करीत आहों हें परमेश्वरी कार्य आहे अशी भावना अंतःकरणांत असल्याशिवाय कोणत्याहि देशभक्ताला कोणतेंहि महत्त्वाचें देशकार्य करतां यावयाचें नाही. ईश्वरभक्तिजन्य परमेश्वरी प्रेरणेचा संचार अंगीं झाल्याशिवाय देशभक्ताच्या अंगीं जोम यावयाचा नाही व त्याच्या हातून कोणतेंहि देशकार्य उठावयाचें नाही.

जगांत आजपर्यंत असा एकहि देशभक्त झाला नाही की जो नास्तिक होता व ज्याने परमेश्वराचें अस्तित्व नाकबूल केलें होतें. परमेश्वराची भक्ति ही देशभक्तांची मुख्य शक्ति आहे. याच शक्तीच्या जोरावर देशभक्त स्वातंत्र्याची प्राप्ति करून घेण्याच्या प्रयत्नाला लागतो व याच शक्तीच्या जोरावर त्याला यशःप्राप्ति होते. ही शक्ति ज्या देशभक्ताच्या अंगीं नाही तो पंगू व लुळा होय. राष्ट्रभक्त देशभक्त हा रामभक्त असतोच असतो. देशभक्त या जगाला मिथ्या समजत नाही व तुच्छ मानीत नाही. ज्या जगांत आपलें आयुष्य काढावयाचें आहे तें जग तुच्छ व मिथ्या मानण्यांत शहाणपणा व हितकरपणा नाही, अशी देशभक्ताची समजूत असते आणि ती यथार्थ नाही असें कोणताहि शहाणा मनुष्य म्हणणार नाही. देशभक्त ईश्वर सत्य समजतो व त्याप्रमाणे हें जगहि मिथ्या समजत नाही. पण भगवद्भक्ताची तशी गोष्ट नाही. 'जग मिथ्या आहे' हें घातुक तत्त्व तो आपल्या उराशीं घट्ट आवळून धरतो व त्यामुळे तो जगाला निरुपयोगी ठरतो. परमेश्वराशिवाय त्याला दुसरें कांही दिसत नाही. 'मायदेश, देशभक्ति' वगैरे गोड शब्दांची गोडी भगवद्भक्ताला माहीत नसते. यामुळे त्याने स्वतःची आत्मोन्नति जरी करून घेतली, तरी त्याच्या आत्मोन्नतीपासून जगाला काडीचाहि नफा नसतो. रामभक्त व राष्ट्रभक्त असलेले श्रीरामदासांसारखे कांही साधु वगळले म्हणजे असेंच कष्टानें म्हणावें लागतें की, भगवद्भक्त बहुतेककरून देशभक्त नसतात. पण देशभक्त हे मात्र एकूण एक रामभक्त असतात. याप्रमाणे देशभक्तांच्या ठायीं दोन्ही गुणांचें अस्तित्व असल्यामुळे ते भगवद्भक्तांपेक्षा श्रेष्ठतर होत. सर्व बाजूंनी श्रेष्ठ असे अस्सल देशभक्त म्हणजे मनुष्यखाणींतील तेजःपुंज रत्नें होत. ते पृथ्वीवर चमकणारे तारे होत. ते परमेश्वराचे अल्प प्रमाणावरील छोटेखानी अवतार होत. रामसेवा व राष्ट्रसेवा करून इहलोकीं देहमोक्ष व परलोकीं आत्ममोक्ष संपादणाऱ्या देशभक्तांना कशाची उपमा द्यावी हें आम्हांस कळत नाही. देशभक्त छत्रपति शिवाजीमहाराजांचें, देशभक्त वॉशिंग्टनचें देशभक्त गॅरिबाल्डीचें, देशभक्त मॅझिनीचें, देशभक्त वॉलेसचें व आणखी शेकडो देशभक्तांचीं जीवन-चरित्रें वाचलीं असतां असेंच म्हणावें लागतें की, त्यांनी या जगावर जितके उपकार करून ठेवले आहेत तितके उपकार दुसऱ्या कोणत्याहि लोकांनी केलेले नाहीत. या परतंत्रता-राक्षसीच्या पिढीजाद शत्रूंच्या अपूर्व गुणांचें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच होय. स्वतंत्रतादेवीचे किंकर, सर्व गुणांचें अगर व परमेश्वरी शक्तीचे रत्नाकर अशा देशभक्तांचे पोवाडे गाण्यास कोणती जिव्हा आतुर होणार नाही! देशभक्तांनो, परमेश्वराच्या खालोखाल, पूज्य, वंदनीय व स्तुत्यर्ह असे जर कोणते महात्मे असतील, तर ते तुम्हीच आहांत. अशा तुमच्या चरणारविंदीं आमचे सहस्र प्रणाम व अखंड दंडवत असो.

— भाला, दि. २१ मे १९०८

# २७. लॉर्ड कर्झन व लॉर्ड मोर्ले

लॉर्ड कर्झन यांनी हिंदुस्थानच्या गव्हर्नर-जनरलच्या जागेचा राजीनामा दिल्यावर पार्लमेंटांत न शिरण्याचा त्यांचा मानस होता व तो मानस जर त्यांनी कायम ठेवला असता, तर फार उत्तम झालें असतें. लॉर्डांच्या सभेमध्ये बसून हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीसंबंधाने त्यांनी अलीकडे भलभलतीच विधानें करण्याचा धुमधुडाका चालविला आहे. हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयच्या पदावर आरूढ असतां ते बोलतील तें सत्य व ते करतील तें सत्कृत्य, अशी स्थिति होती. पण इंग्लंडांत गेल्यावर त्यांचा हा अपूर्व अधिकार नष्ट होऊन ते राजकीयदृष्टया थोटे व लुळे झाले आहेत. जरी त्यांचे हातपाय लुळे झाले आहेत, तरी त्यांची जीभ चुरूचुरू बोलण्यास कमी करीत नाही. जेव्हा जेव्हा त्यांची जिव्हा चुरूचुरू बोलूं लागते तेव्हा तेव्हा त्यांना चरचरीत उत्तर मिळतें, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. असाच एक प्रसंग नुकताच लॉर्ड-सभेंत घडून आला. जून महिन्याच्या तिसाव्या तारखेस लॉर्ड लोकांच्या सभेंत कर्झनसाहेबांनी हिंदुस्थानांतील व सरहद्दीवरील राजकीय स्थितीकडे विशेष लक्ष पोहोचविण्याचा ठराव आणला व त्या ठरावावर एक लांबलचक भाषण केलें. त्या भाषणांत त्यांनी बऱ्याच वादग्रस्त गोष्टींचा समावेश केला. त्यांच्या या भाषणांतील कांही मुद्द्यांचा विचार करणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें. मोहंमद लोकांनी केलेल्या स्वारींत अफगाण लोकांचा विशेष भरणा होता व अमीरसाहेबांनी या गोष्टीचा प्रतिकार जितक्या लौकर करावयास पाहिजे होता तितक्या लौकर केला नाही, अशी कर्झनसाहेबांची पहिली तक्रार आहे. कर्झनसाहेबांची ही तक्रार मोर्लेसाहेबांच्या मनाला रुचली नाही व त्याबद्दल त्यांना कोणताहि समंजस मनुष्य दोष देणार नाही. कारण मोहंमद लोकांना अफगाण लोकांची आंतून मदत आहे, अशी तक्रार इंग्रज सरकारकडून अमीरसाहेबांकडे गेल्याबरोबर त्यांनी या तक्रारीची योग्य चौकशी करून अफगाण लोक मोहंमद लोकांना कोणत्याहि प्रकारे मदत करणार नाहीत, असा पक्का बंदोबस्त केला. अमीरसाहेबांनी आपल्याकडून शक्य तितकी जलदी करून इंग्रज सरकारच्या तक्रारीची व्यवस्था केली असतां, कर्झनसाहेबांचें नाक असंतोषाने आखडलेलें पाहून, मोर्लेसाहेबांना तें पसंत न पडावें हें योग्य आहे. आपल्या प्रजेपैकी कांही लोक आपल्या धर्मबंधूंना मदत करतील असा तर्क आपल्या मनाशीं करून अमीरसाहेबांनी अगाऊ बंदोबस्त करावयास पाहिजे होता, असें जर लॉर्ड कर्झनसाहेबांचें म्हणणें असेल, तर त्यांच्या हातून मोठी चूक होत आहे.

राज्यकारभार चालविण्यांत किती अडचणी असतात हें लॉर्डसाहेबांच्या अनुभवास हिंदुस्थानांत व्हाइसरॉय असतांना आलें असेलच. तशांत अफगाणिस्तानसारख्या देशांत राज्यकारभार चालविणें किती धोक्याचें व जोखमीचें आहे, याची

कल्पना लॉर्डसाहेबांना असणें शक्य नाही. शंभर वर्षांच्या परकीय अमलामुळे खच्ची झालेल्या हिंदी लोकांवर राज्य करणें व स्वतंत्रतेच्या वातावरणांत पुष्ट होऊन डुरकावण्या फोडीत असलेल्या अफगाण लोकांवर राज्य करणें यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. लॉर्डसाहेबांनाहि हा अनुभव आला आहे. एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेने जिवंत झालेल्या बंगाली लोकांना दाबांत ठेवतांना त्यांची व त्यांचे पट्टशिष्य जे फुल्लर-साहेब त्यांची जी तिरपीट उडाली ती सर्व जगाला जाहीर आहेच. म्हणून अमीर-साहेबांना दोष देण्यापूर्वी त्यांनी जरा पोक्त विचार करावयास पाहिजे होता. पण अंगीं अहंमन्यतेचें व सर्वज्ञतेचें वारें संचारलें असल्यामुळे या गोष्टींकडे त्यांचें लक्ष जात नाही. परराष्ट्राच्या वर्तनावर टीका करतांना अतिशय सावधगिरी बाळगली पाहिजे, ही इशारत जी मोर्लेसाहेबांनी कर्झनसाहेबांना दिली, ती अत्यंत योग्य व समर्पक होती, असें म्हटल्यावांचून आमच्याने राहवत नाही. "शेळी जाते जिवा-निशी व खाणारा म्हणतो वातड" अशांतली आपली स्थिति आहे, अशी समजूत जर अमीरसाहेबांची झाली, तर त्यापासून हिंदुस्थान सरकारला फार त्रास होईल ही साधी गोष्ट कर्झनसाहेबांसारख्या मुत्सद्द्याच्या ध्यानांत येऊं नये, ही आश्च-र्याची गोष्ट आहे. अफगाणिस्तानच्या अमीरावर एक ताशेरा उडवून लॉर्ड कर्झन-साहेब मग हिंदुस्थानवर घसरले आहेत. हिंदुस्थानांतील असंतोषाचीं कारणें त्यांनी देण्यास आरंभ करून त्या कारणांतील मुख्य व प्रधान कारण त्यांनी देण्यास आरंभ करून, त्या कारणांतील मुख्य व प्रधान कारण त्यांनी असें सांगितलें आहे की, येथील शिक्षणपद्धति सदोष आहे. कर्झनसाहेबांनी दिलेलें हें कारण त्यांच्याप्रमाणे पुष्कळां-कडून देण्यांत येतें म्हणून त्याचा थोडासा जास्त विस्तृत विचार करणें जरूर आहे.

जपानी लोकांनी रशियन लोकांवर अश्रुतपूर्व जय मिळविला हेंहि एक येथील असंतोषाचें कारण आहे, असें लॉर्डसाहेबांचें मत आहे. जपानी लोकांनी म्हणजे पौर्वात्य लोकांनी रशियन लोकांवर म्हणजे पाश्चिमात्य लोकांवर जय मिळविल्या दिवसापासून प्राच्य लोकांच्या मनांत स्वतःविषयी जास्त आदरभाव उत्पन्न झाला आहे, ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. पाश्चिमात्य लोकांना मिळत असलेलें शिक्षण जर मिळालें, तर हरएक बाबतींत आपण प्रगति करून दाखवूं, अशी समज हिंदी लोकांची झाली आहे व ती तशी होणें अगदी साहजिक आहे. शारीरिक किंवा मानसिक बाबतींत हिंदी लोक जपानी लोकांपेक्षा कमी दर्जाचे नाहीत किंवहुना ते जास्त दर्जाचे आहेत. तरी पण जी राजकीय प्रगति जपानी लोकांनी, ४० वर्षांत करून दाखविली तितकी प्रगति किंवा तिच्या निम्म्यानेहि प्रगति हिंदी लोकांना शंभर वर्षांच्या अवधींत करून दाखवितां आली नाही, हा दोष त्यांचा नसून, हिंदुस्थान सरकारचा आहे. जपानी लोकांकरिता जपानी सरकार जी जी खटपट करीत आहे तितकी खटपट जर हिंदुस्थान सरकार हिंदी लोकांसाठी करील, तर हिंदी लोक जगांतील कोणत्याहि लोकांना हार जाणार नाहीत. आपण स्वभावतः कमी दर्जाचे

नाही अशी हिंदी लोकांची समजूत होण्यास त्यांना मिळत असलेलें शिक्षण कारणीभूत झालें आहे. त्यामुळे त्यांच्या मनांत असंतोष उत्पन्न झाला आहे. पन्नास वर्षांपूर्वी आपणांस परमेश्वराने कमी दर्जाचें उत्पन्न केलें आहे अशी हिंदी लोकांची कल्पना होती. त्यामुळे ते आपल्या हीन स्थितींत संतोष मानून स्वस्थ होते. पण पन्नास वर्षांत मिळालेल्या शिक्षणामुळे ही कल्पना नाहीशी होऊन आपण कोणत्याहि बाबतींत इंग्रज लोकांपेक्षा कमी नाही ही जाणीव त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाल्यामुळे त्यांचीं मनें असंतुष्ट झालीं आहेत व तीं दिवसेंदिवस जास्त असंतुष्ट होण्याचा संभव आहे ज्या शिक्षणामुळे हिंदी लोकांच्या अंतःकरणांत ही जाणीव उत्पन्न झाली तें शिक्षण निःसत्त्व करण्याच्या उद्देशाने येथील शिक्षणपद्धति सदोष आहे, अशी हाकाटी स्वार्थ-बुद्धीने प्रेरित होऊन, आपमतलबी मुत्सद्द्यांकडून करण्यांत येत असतें. तिचाच अनुवाद कर्झनसाहेबांनी लॉर्ड लोकांच्या सभेंत नुकताच केला आहे. या हाकाटींत सत्याचा अंश किती आहे हें ठरविण्याची सध्याच्या काळीं अत्यंत जरुरी आहे.

युनिव्हर्सिटी ॲक्ट पसार होण्याच्या दिवसापर्यंत जें कांही वेडेंवाकडें शिक्षण येथील शाळांतून व कॉलेजांतून मिळत गेलें त्या शिक्षणाचा परिणाम असा झाला की, हिंदी लोकांच्या मनांत एकराष्ट्रियत्वाच्या कल्पनेचा प्रादुर्भाव होऊं लागला. या कल्पनेमुळे हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या हिंदी लोकांचीं मनें एकविचाराच्या व एकहेतूच्या रज्जूने एके ठिकाणीं जखडलीं जाऊं लागलीं. ही स्थिति सरकारच्या नजरेला इंग्रजी साम्राज्याच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीने सहन करवेना व म्हणूनच युनिव्हर्सिटी ॲक्ट अमलांत आणला गेला. येथील शिक्षणपद्धति सदोष आहे अशी जी हाकाटी अँग्लो-इंडियन मुत्सद्द्यांकडून करण्यांत येत असते तिचें कारण हेंच की, तिच्यामुळे हिंदी विद्यार्थ्यांच्या मनांत स्वदेशभक्तीची ज्योत पेटली जाते. ही ज्योत पेटली जाऊं नये व शिक्षणामुळे येथील सुशिक्षित लोक फक्त शिकलेले हमाल तेवढे बनावेत ही दृष्टि डोळ्यापुढे ठेवून युनिव्हर्सिटी ॲक्ट पसार करण्यांत आला. पण त्या ॲक्टानेहि हा कार्यभाग होत नाही व कधीहि होणार नाही. जोंपर्यंत इंग्लंडचा इतिहास व जगांतील इतर स्वतंत्र देशांचे इतिहास हिंदी विद्यार्थ्यांस वाचावयास मिळत आहेत व जोंपर्यंत हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रें अजीबात बंद करण्यांत आलेलीं नाहीत तोंपर्यंत युनिव्हर्सिटी ॲक्टासारखे शेकडो कायदे अमलांत आणले गेले, तरी हिंदी विद्यार्थ्यांच्या मनांत देशभक्तीची ज्योत पेटल्यावांचून राहणार नाही. ही ज्योत कितीहि जड दडपणाने दवली जाणार नाही किंवा मालवली जाणार नाही. देशभक्तीची ज्योत एकदा पेटली म्हणजे क्षणाक्षणाला व दिवसा-दिवसाला तिचें क्षेत्रफळ वाढत जाऊन शेवटीं तिचा भडका होतो. हिंदुस्थानांत अशा तऱ्हेची देशभक्तीची ज्योत पेटली आहे हें कोणालाहि कबूल केलें पाहिजे. या ज्योतीचा नीट उपयोग करून घेऊन तिच्या साहाय्याने आपलें व हिंदी लोकांचें कल्याण करून घेणें हें सर्वस्वीं सत्ताधीश इंग्रजी मुत्सद्द्यांच्या हातांत आहे. पण

दु:खाची गोष्ट ही की, इंग्रज मुत्सद्द्यांच्या डोक्यांत ही साधी गोष्ट येत नाही व म्हणून अलीकडे येथे त्यांच्या हातून चुकापाठीमागून चुका होऊं लागल्या आहेत. येथील असंतोषाचें दुसरें जें एक कारण लॉर्ड कर्झनसाहेबांनी दिलें आहे तें तर विशेष गमतीचें आहे. ते असें म्हणतात की, पार्लमेंट ही या असंतोषाचें एक कारण आहे. लॉर्डसाहेबांना असें वाटतें की, पार्लमेंटचे सभासद हिंदुस्थानविषयक गोष्टींबद्दल पार्लमेंटात प्रश्न विचारून येथील असंतोष वृद्धिंगत करतात. आपल्या वतीने पार्लमेंटांत भांडणारे कांही सभासद आहेत अशी मनाची खात्री असल्यामुळे येथील लोकांना उत्तेजन येतें व त्यामुळे ते हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचा द्वेष करतात असा लॉर्डसाहेबांच्या बोलण्याचा रोख दिसतो. या विधानावरून त्यांनी असें ध्वनित केलें आहे की, हिंदुस्थानविषयी पार्लमेंटात चर्चा होऊं नये. अशा चर्चेमुळे हिंदी लोकांना फूस मिळते व ती इंग्लंडांतील फिरत्या वक्त्यांच्या भाषणामुळे वृद्धिंगत होते. अशा वक्त्यांच्या भाषणांना जर वेळींच आळा घालण्यांत आला नाही, तर हिंदुस्थानांतील असंतोष कोणत्या थरावर जाईल याचा नेम नाही. अलीकडे नेव्हिनसन, केरहार्डी वगैरे उदार अंत:करणाचे सभासद हिंदुस्थानांत येऊन त्यांनी येथील कष्टमय स्थिति प्रत्यक्ष डोळ्यांनी अवलोकन करून ती सुधारण्याविषयी इंग्लंडांत लेख लिहिले व भाषणें केलीं. ही गोष्ट कर्झनसाहेबांच्या मताने अत्यंत वाईट झाली. हिंदुस्थानविषयी कोणींहि एक चकार शब्द सुद्धा काढूं नये असें लॉर्डसाहेबांचें मत आहे. लॉर्डसाहेबांचें हें मत जर अमलांत आणलें गेलें तर येथील अधिकाऱ्यांना पार्लमेंटचा जो थोडाबहुत धाक आहे तोहि नाहीसा होऊन मग हिंदुस्थानांत पुरी सुलतानी माजून राहील. अशी सुलतानी माजल्यास कांही हरकत नाही. एवढेंच नव्हे तर, त्यामुळे इंग्रजी साम्राज्याला जास्त बळकटी येईल असें लॉर्डसाहेबांचें मत आहे व तें त्यांनी स्पष्ट-पणें बोलून दाखविलें आहे. येथील अनियंत्रित सत्ता उपभोगणाऱ्या अधिकाऱ्यांना पार्लमेंटची अडचण व्हावी ही गोष्ट अगदी उघड आहे. पार्लमेंट ही अशीच पवित्र जागा आहे की, तिच्यांत प्रवेश केल्यावर सर्वांचा दर्जा समसमान होतो.

लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानांत असतांना व्हाइसरॉयच्या पदावर आरूढ होते व त्या वेळीं त्यांच्या हातांत कर्तुमकर्तुम् शक्ति होती. पण तीच त्यांची हल्लीची स्थिति पाहा. आता ते अगदी साधारण दर्जाचे गृहस्थ बनले आहेत. हल्ली त्यांच्या प्रत्येक शब्दाला मान नसून त्यांच्या फक्त योग्य शब्दांकडेच लक्ष देण्यांत येत आहे. ही स्थिति त्यांच्या अंत:करणाला झोंबत असावी असें त्यांच्या भाषणावरून दिसतें. हिंदुस्थानां-तील प्रश्नांची चर्चा पार्लमेंटांत करण्यांत यावी किंवा न यावी हें कर्झनसाहेबांच्या हातांत मुळीच नाही व म्हणून त्यांच्या पंगु मताचा विचार करण्याची जरूरीहि नाही. पण जर करिता पार्लमेंटांत हिंदुस्थानविषयी प्रश्न विचारण्याची मनाई करण्यांत आली, तर हिंदी लोकांचें नष्टचर्य पुरें ओढवलें, असेंच म्हणणें भाग आहे. मग येथील अधिकाऱ्यांवर कोणाचाच दाब न राहिल्यामुळे त्यांना वाटेल तें करण्याची

पूर्ण मुभा मिळण्याचा संभव आहे. पार्लमेंटांतील प्रश्नोत्तरांमुळे हिंदुस्थानचा नफा होत आहे अशांतली गोष्ट नाही. पण अशा प्रश्नोत्तरांमुळे एवढेंच होतें की, आपल्यावरती कोणी तरी आहे ही भावना अधिकाऱ्यांच्या अंतःकरणांत नेहमी जागत राहते व तीमुळे ते अगदीच मन मानेल तसें वागत नाहीत. असो; लॉर्ड कर्झनसाहेबांना जागच्या जागीं लॉर्ड मोर्लेसाहेबांनी उत्तर दिलें व ते उदारमतवादी मुत्सद्द्याच्या तोंडांतून जसें उठावयास पाहिजे तसें जरी नाही तरी तें अगदीच टाकाऊ नाही. मोर्लेसाहेबांनी आपल्या भाषणांत शेवटीं शेवटीं असें म्हटलें आहे की, We have no choice but to preserve in the path of reform (सुधारणा करण्याच्या मार्गावरून जाण्याशिवाय आपणांस गत्यंतर नाही.) लॉर्ड मोर्ले यांचें हें मत सर्वोत्तम आहे. पण आमची हिंदी लोकांची अशी तक्रार आहे की, ते म्हातारपणामुळे या सुधारणेच्या मार्गावरून फारच मंद मंद पावलें टाकीत चालले आहेत. अशा प्रगतीच्या काळांत त्यांनी पायांनी चालण्याचा बेत करावा ही गोष्ट इष्ट नाही. अशा दिवसांत राजकीय मोटारगाड्यांतून प्रवास करणें हें हरएक बाजूंनी सोयीचें व सुखाचें आहे. सल्लामसलतगारमंडळें नेमणें किंवा कायदेकौन्सिलांतील सभासदांची संख्या वाढविणें वगैरे पोकळ व टाकाऊ सुधारणा करण्यांत लॉर्ड मोर्ले यांनी आपलें अवशिष्ट अमोल आयुष्य व्यर्थ दवडूं नये, अशी आमची त्यांना विनंती आहे. त्यांनी आपल्या राजवटींत एकच सुधारणा करावी व आपला आजपर्यंत कमावलेला लौकिक कायम राखावा. स्वराज्याचा हक्क तूर्त एका बाजूला ठेवून त्या हक्काची प्रस्तावना म्हणून त्यांनी हिंदी लोकांना शंभर सभासदांचें पार्लमेंट द्यावें. या पार्लमेंटांतील सर्व सभासद हिंदी लोकांनी निवडून द्यावेत व प्रत्येक कायदा या सभेंत पहिल्या प्रथम पसार झाला पाहिजे व प्रत्येक पै कशी खर्च करण्यांत यावी हें या सभेंत अगोदर ठरलें गेलें पाहिजे, असा नियम करण्यांत आला पाहिजे. जे जे कायदे ही सभा पसार करील व जे जे ठराव ही सभा मंजूर करील त्या त्या कायद्यांना व ठरावांना येथील वरिष्ठ शंभर अधिकाऱ्यांनी बनलेल्या सभेची मंजुरी पाहिजे असेंहि ठरविण्यांत यावें. सारांश, लोकांनी निवडलेल्या शंभर सभासदांच्या सभेला 'हाऊस ऑफ कॉमन्स' व येथील वरिष्ठ शंभर अधिकाऱ्यांनी बनलेल्या सभेला 'हाऊस ऑफ लॉर्डस' असें म्हणण्यांत येऊन कोणताहि कायदा व कोणताहि ठराव या दोन सभांत पसार झाल्याशिवाय अमलांत येऊं नये. अशा तऱ्हेने दोन्ही सभांत पसार झालेल्या कायद्याला व ठरावाला स्टेटसेक्रेटरीची मंजुरी मिळालीच पाहिजे हें सांगावयास नको. कायदे करण्याची ही पद्धत अमलांत आणल्यास इंग्लंडांतील राज्यपद्धतीचा लहानसा नमुना हिंदुस्थानांत अस्तित्वांत येऊन त्यामुळे येथील असंतोष बहुतांशी कमी होईल. ही राज्यपद्धतीची तऱ्हा अमलांत आणल्यास सर्व सत्ता हिंदी लोकांच्या हातांत जाईल असें नाही व सर्व सत्ता अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांच्या हातांत राहील असेंहि नाही. राज्यकर्त्यांवर रयतेचा व रयतेवर राज्यकर्त्यांचा दाब राहून राज्यकारभाराचा गाडा सुरळीत

चालेल. लॉर्ड मोर्लेसाहेबांना जर एखादी भरीव सुधारणा करावयाची असेल, तर ती हीच सुधारणा होय. या सुधारणेशिवाय बाकीच्या सुधारणा कवडीमोल होत. त्या करून न करून सारखेंच होय. येथील असंतोष कमी करण्याचा आम्हीं सुचविलेला उपाय लॉर्ड मोर्ले नीट विचारांत घेतील अशी आशा प्रदर्शित करतो.

- भाला, दि. ११ जुलै १९०८

---

## २८. काळ व केसरी

यंदाचा जुलै महिना महाराष्ट्राला अत्यंत अनिष्ट गेला. पंधरा दिवसांच्या अंतराने महाराष्ट्र-भूमीच्या राजकीय नभोमंडळांत प्रकाशमान होणारे चंद्र-सूर्य कांही काळपावेतों अस्तंगत झाले आहेत. चंद्रप्रभेप्रमाणे आपल्या लुसलुशीत लेखांच्या प्रभेने महाराष्ट्र-वाचकांचीं मनें परोपरीने रिझविणारे काळकर्ते ठाण्याच्या तुरुंगांत कुजत पडले आहेत, तर सूर्यकिरणांच्या चंडप्रकाशाप्रमाणे आपल्या या झणझणीत लेखांच्या प्रखर प्रकाशाने महाराष्ट्रीय वाचकांचीं अंतःकरणें तापविणारे केसरीकर्ते साबरमतीच्या तुरुंगांत अंदमानकडे जाणाऱ्या आगबोटीची मार्गप्रतीक्षा करीत बसले आहेत. हे दोन राजकीय चंद्र-सूर्य मावळल्यामुळे यापुढे कांही काळ महाराष्ट्राच्या राजकीय पृष्ठभागावर अंधकाराचें साम्राज्य माजेल यांत संशय नाही. त्यांच्या पश्चात् कांही कांही ठिकाणीं लहानमोठे राजकीय तारे लुकलुकतील, तरी पण त्यांच्या अल्प प्रकाशांत चंद्रप्रभेचें मनोहारित्व दृष्टीस पडणार नाही किंवा सूर्यप्रकाशाचें प्रखरत्व आढळून येणार नाही. जरी महाराष्ट्रांतील हे दोन हिरे आमच्यांतून हिरावन नेले गेले आहेत, तरी पण त्या दोघांपैकी एकाबद्दल आम्हांस विशेष काळजी वाटत नाही.

लोकमान्य परांजपे यांची जरी चाळीशी उलटली आहे, तरी अजून त्यांना पन्नाशी लागली नाही. त्यांची शरीरयष्टि एखाद्या असाध्य रोगाने पोखरली गेली नाही. त्यांची कारागृहवासाची मुदतहि त्या मानाने लहान आहे. म्हणून १९ महिन्यांच्या वियोगानंतर लो. परांजपे आमचे आम्हांस मिळतील व पुनरपि आपल्या महाराष्ट्रीय देशबांधवांमध्ये पूर्वीप्रमाणे चमकूं लागतील. पण जगन्मान्य बळवंतरावजींसंबंधाने तशी आशा बाळगण्यास मन धजत नाही. आधीच पन्नाशी उलटून गेलेली, मधुमेहाच्या भुंग्याने सर्व शरीर नखशिखान्त पोखरून ठेवलेलें व एक नाही, दोन नाही तर संबंध सहा वर्षांचा देशांतरवास, या व आणखी इतर शेकडो गोष्टी डोळ्यापुढे उभ्या राहिल्या म्हणजे ज्या दिवशीं जगन्मान्य

बळवंतरावजी पुन्हा या हतभागी पुण्यनगरीला आपल्या आगमनाने हसवतील तो पुण्य व पवित्र दिवस त्यांच्या पुनर्जन्माचा दिवस होय. जगन्मान्य बळवंतरावजींचा हा पुनर्जन्माचा दिवस उगवावा अशी सर्वांचीच इच्छा आहे. तरी पण सध्या आम्ही त्यांना अंतरलों आहोंत व ते आपल्या जन्मभूमीला अंतरले आहेत. जगन्मान्य बळवंतरावजींची नैसर्गिक योग्यता, त्यांनी महाराष्ट्राची किंबहुना सर्व हिंदुस्थानची केलेली निष्काम सेवा व निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या परिस्थितींत त्यांनी आरंभिलेले निरनिराळे उद्योग, या सर्वांचें वर्णन जर आम्ही करूं लागलों, तर त्याला भाल्याचे शंभर रकानेहि पुरणार नाहीत. थोडक्यांत बोलावयाचें म्हटलें म्हणजे बळवंतराव हे विधात्याने अनेक गुण एके ठिकाणीं आटवून ठेवलेला एक जिवंत पुतळा होय. पण दैवाची विचित्र करणी अशी आहे की, असा अनेक गुणरत्नांनी खचलेला पुतळा इंग्रजी राज्यांत लोखंडाच्या भावाने विकला जात आहे. वास्तविक रीतीने म्हटलें म्हणजे बळवंतरावजींसारख्या महात्म्याचें वसतिस्थान अंदमान बेट नसून, व्हाइसरॉयसाहेबांची खुर्ची होय; व खरोखर म्हटलें म्हणजे त्यांची योग्यता तशीच आहे. असा कोणता ठळक सद्‌गुण आहे की तो आमच्या बळवंतरावांमध्ये सापडत नाही. बुद्धिमत्ता व विद्वत्ता या तर बळवंतरावजींच्या अष्टौप्रहर हात जोडून सेवेला उभ्या असलेल्या दासी होत. स्वार्थत्याग हा तर त्यांचा बंदा गुलाम आहे. देशाभिमान हा त्यांचा जिवलग सखा आहे व देशसेवा ही तर त्यांची दुसरी अर्धांगी होय. वाणीने रसाळ, अंतःकरणाने प्रेमळ व करणीने निर्मळ असे श्यामसुंदर बळवंतराव गोकुळांत श्रीकृष्ण जसे गोपांना प्रिय होते त्याप्रमाणे महाराष्ट्रियांना प्रिय आहेत. बळवंतरावजींच्या अंगीं अशीच एक मोहिनी आहे की, त्यांना पाहिल्या-बरोबर कोणीहि मोहून गेलाच पाहिजे. आपल्या जिवंत, सतेज व अधिकारयुक्त वाणीने बळवंतराव घरीं किंवा सभेंत बोलूं लागले की श्रोता तल्लीन झालाच म्हणून समजावें. बळवंतरावांत जितके गुण एकवटले आहेत तितके गुण एकाच्याच अंगीं एकवटलेला मनुष्य महाराष्ट्रांतच नव्हे, तर साऱ्या हिंदुस्थानांत सापडणें अशक्य आहे. त्यांच्या ठायीं असलेल्या गुणांपैकी एखादा गुण अंगीं असलेला सापडूं शकेल, पण त्यांच्याइतके गुण अंगीं असलेला मनुष्य तूर्त तरी हिंदुस्थानांत नाही. सारांश, हल्ली बळवंतरावांसारखे बळवंतरावच होत. टिळकांना दुसरा जोडीदार नाही.

बळवंतरावजींच्या अंगीं असलेल्या गुणांपैकी दोन गुण तर विशेष प्रामुख्याने दृष्टीस पडत आहेत. ते त्यांचा निर्भेळ देशाभिमान व निधडी छाती होत. निष्काम बुद्धीने फलाची आकांक्षा मनांत न धरतां कर्तव्य म्हणून देशसेवा करावयाची हा जो मनाचा कल तोच निर्भेळ देशाभिमान होय. कसलाहि बिकट प्रसंग ओढवला किंवा ओढ-वण्याचा संभव असतांहि कर्तव्यापासून पराङ्मुख व्हावयाचें नाही हा जो अंतःकरणाचा निश्चय, तीच निधडी छाती होय. हे दोन गुण बळवंतरावजींच्या अंगीं ओतप्रोत वसत आहेत हें त्यांचा भक्त नव्हे, तर कट्टा शत्रूहि बिनतक्रार कबूल करील. वरील

गुणद्वयांमुळेच त्यांनी जगन्मान्यत्व कमावलें आहे. बळवंतरावजींच्या अंगीं असलेल्या गुणांचें वर्णन कितीहि केलें तरीहि तें अपुरेंच पडणार असल्यामुळे आम्ही थोडक्यांत एवढेंच लिहितों की, जर बळवंतरावजींचा जन्म सन १६२७ सालीं झाला असतां, तर त्यांनी आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं तोरणा किल्ला घेतला असता व जर शिवाजीमहाराजांचा जन्म १८५५ सालीं झाला असता, तर त्यांनी केसरी पत्र काढून परिस्थित्यनुरूप लेखच लिहिले असते. श्रीछत्रपति शिवाजीमहाराज व बळवंतरावजी या दोन विभूतींमधील फरक त्यांच्या अंगांतील गुणभिन्नत्वामुळे नसून, तो परिस्थितीच्या भिन्नत्वामुळे झाला आहे. सरतेशेवटीं आम्हांस एवढेंच म्हणावयाचें आहे की, जगन्मान्य टिळकांसारखे महात्मे हे दरवर्षी किंवा दरपिढीला निपजत नसून, ते फक्त एखाद्या भाग्यवान् शतकाच्याच वांटचाला येतात. अशी थोर विभूति सहा वर्षें हद्दपार करण्यांत आली ही बातमी ऐकून जर प्रत्येकाचें अंतःकरण दुःखाग्नीने करपून गेलें, तर त्यांत मोठेंसें नवल नाही. असें झालें नसतें तरच आश्चर्य वाटण्याचें कारण होतें.

तारीख २३ गुरुवारीं ही बातमी पुणें शहरांत येऊन धडकल्यावर पुण्यनगरीची जी स्थिति झाली ती शब्दांनी वर्णन करणें शक्य नाही. आपला प्राणप्रिय पति एकाएकीं मरण पावला ही अशुभ बातमी ऐकली असतां ज्याप्रमाणे एखादी पतिव्रता ओक्साबोक्सी रडूं लागते किंवा आपला एकुलता एक व करता-सवरता मुलगा एकाएकीं दुष्ट काळाने ओढून नेला ही दुःखद वार्ता ऐकून ज्याप्रमाणे त्याचीं वृद्ध माता-पितरें दुःखातिरेकाने हंबरडा फोडतात, त्याप्रमाणे पुण्यपत्तनस्थ लोकांना रडूं कोसळलें. महाराष्ट्रांतील व हिंदुस्थानांतील इतर ठिकाणच्या लोकांना महत् दुःख झालें असेल यांत संशय नाही. पण त्यांतल्या त्यांत पुण्यपत्तनस्थ लोकांना तें विशेष झालें व असें होणें अगदी साहजिक होतें. कारण त्यांचा व बळवंतरावजींचा संबंध गेल्या पंचवीस वर्षांचा आहे.

बळवंतराव म्हणजे पुणेकरांचा पंचप्राण होय. हे पंचप्राण पुण्यनगरीच्या शरीरांतून ओढून नेल्यावर तिचा जीव कासावीस व्हावा हें अगदी साहजिक आहे. गुरुवारच्या दिवशीं पुण्यनगरीला स्मशानभूमीची प्रेतकळा आली होती. जिकडे-तिकडे दुकानें लागलेलीं, शाळा बंद झालेल्या, लोकांचीं तोंडें सुकलेलीं व ज्याच्या त्याच्या डोळ्यांतून दुःखाश्रूंचे थेंब गळत असलेले! याशिवाय त्या अशुभ दिवशीं येथे दुसरें कांही दृष्टीस पडलें नाही. आज आपला कोणी तरी जवळचा—अगदी जवळचा मनुष्य काळ्यापाण्यावर धाडण्यांत आला असें प्रत्येकाला वाटत होतें. बळवंतरावजींना झालेल्या भयंकर शिक्षेमुळे जितकें महाराष्ट्रियांना दुःख झालें, तितकें आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि कारणांमुळे झालें नाही. या ठिकाणीं असा प्रश्न उपस्थित होतो की, मुंबई इलाख्यांत सर्वत्र सामसूम असतां, राजद्रोहाचे खटले एकामागून एक करण्यांत मुंबई सरकारास कोणतें कारण पडलें होतें? कलकत्त्याकडे कांही लोकांनी

बॉम्बगोळे तयार केले व फेकले म्हणून तिकडे राजद्रोहाचे खटले करण्यांत कांही तरी कारण होतें; परंतु मुंबई इलाख्यांत तसा कोणताच प्रकार झालेला नाही. बळवंतरावजींनी आपल्या बचावाच्या भाषणांत म्हटल्याप्रमाणे बॉम्ब फेकण्याचा मार्ग हा कोणत्याहि वर्तमानपत्रकर्त्यास मान्य व पसंत नाही. जहाल पत्रांनी त्या मार्गाचें अनुकरण करण्यास अजून कोणास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने सांगितलें नाही व तीं पुढे तसें करण्यास कोणास सांगणार नाहीत. भरतभूमीची उन्नति करुन घेण्यास जहाल पत्रांचे उपाय ठरलेले आहेत. त्या उपायांत बॉम्ब फेकण्याचा उपाय येत नाही. असा वास्तविक प्रकार असतां जहाल पत्रांचा व बॉम्ब फेकणारांचा संबंध जोडून देणें हें खऱ्या मुत्सद्देगिरीचें लक्षण नाही असें आम्हांस वाटतें. जहाल वर्तमानपत्रांतील लेखांमुळे बॉम्ब फेकण्याकडे कांही लोकांची प्रवृत्ति झाली या खोटया, चुकीच्या व भ्रामक समजुतीमुळेच मुंबई इलाख्यांतील जहाल पत्रांवरील राजद्रोहाचें सत्र चालू झालें आहे व सरकारच्या या चुकीच्या समजुतीलाच टिळकांचा बळी पडला आहे.

असो; झाली ती गोष्ट होऊन चुकली. मुंबई सरकारने येथे राजद्रोहाचे खटले करावयास नको होते. निदान तो केसरीकर्त्यावर तरी करावयास नको होता; परंतु केसरीकारांवर खटला करण्यांत आला व त्यांना जबर शिक्षाहि झाली. अशा वेळीं जर मुंबई सरकार मनाचा उमदेपणा व मोठेपणा दाखवून ही शिक्षा बऱ्याच अंशाने कमी करील, तर नामदार क्लार्कसाहेब हल्ली आहेत त्याच्यापेक्षा शतपटींनी जास्त लोकप्रिय होतील. सरकार बळवंतरावांना सहा वर्षांची मुदत संपण्यापूर्वी सोडो किंवा पुरी मुदत भरल्यानंतर त्यांची सुटका होवो, पण एवढें मात्र खचित की आमचे बळवंतराव आम्हांस निःसंशय पुन्हा भेटतील. महाराष्ट्राला किंबहुना सर्व हिंदुस्थानला त्यांची अत्यंत जरुरी आहे व त्यांनी अंदमानहून परत येऊन पुन्हा आपलें पुढारीपण पत्करावें, अशी त्यांच्या देशबांधवांची मनापासून इच्छा आहे. ही इच्छा सफल होण्यासाठी सहा वर्षे सर्व महाराष्ट्रीय लोक परमेश्वराचा अनन्यभावे धांवा करतील. दयाघन परमात्मा इतक्या भक्तांची ही अल्प इच्छा परिपूर्ण न करण्याइतका अजून तरी कठोर हृदयाचा खचित झाला नाही. बळवंतरावांच्या अंदमान बेटावरील कष्टमय स्थितीसंबंधाने विचार करूं लागलों म्हणजे अंतःकरण दुःखाच्या जडपणाने पिचून जातें. वार्धक्याच्या दिवसांत बायको-पोरांपासून वियोग, कैदी मनुष्याला मिळणारा जाडा-भरडा कपडा व अर्धवट शिजलेलें अन्न, नेहमी अष्टौप्रहर सक्तीचा एकान्तवास व दोन भयंकर रोगांची व्यथा, ह्या इतक्या असह्य यातना बळवंतरावांना सहा वर्षे सोसाव्या लागणार ना !

बळवंतराव, आपल्या ह्या कष्टमय स्थितीसंबंधाने आपल्या देशबांधवांचीं अंतःकरणें पिळून जात आहेत. आपल्या सहा वर्षांच्या देशांतरवासांत आपणांस अल्प-स्वल्प तरी सुख व्हावें अशी आपल्या देशबांधवांची इच्छा आहे, पण ती सफल करण्याचें कोणतेंहि साधन त्यांच्याजवळ नाही. तरी पण आपणांस

मिळणारी ओली-कोरडी भाकरी घशाखाली उतरावी म्हणून तिला कुसकरण्यासाठी लागणारें दूध आपल्या देशबांधवांनी येथे गाळलेल्या अश्रूंमुळे आपणांस सहा वर्षें एकसारखें मिळत राहील. आपल्या अंगावरील जाडचा-भरडचा व अंगाला सुई-प्रमाणे टोचणाऱ्या कैदी कपडचाला आपल्याविषयी असलेल्या देशबांधवांच्या आपल्या निर्भेळ प्रेमाने मऊपणा येईल व आपल्या रोगांवर आपल्या ठिकाणीं असलेल्या पूज्य बुद्धीचा चिंतामणी मात्रेप्रमाणे उपयोग होईल. अंदमान बेटावर आपल्या चर्मचक्षूंना येथील कांही एक दिसणार नाही हें खरें; पण आपल्या ज्ञानचक्षूंना अदृश्य असें कांही एक असणार नाही. अंदमान बेटावरील आपल्या लहानशा खोलींत आपल्या ज्ञान-नेत्रांना गायकवाडांचा वाडा व त्यांतील भाद्रपद मासांतील गणपत्युत्सव आणि मेळे स्पष्टपणें दिसतील. अंदमान बेटावरील आपल्या खोलींत आपल्या ज्ञानचक्षूंना लकडीपुलाजवळील विठ्ठल मंदिर व तेथील शिवजयंत्युत्सव दृष्टीस पडेल. अंदमान बेटावर आपल्याला हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभा पाहवयास मिळेल. आपल्या सोबतीला आपले राष्ट्रोन्नतीचे विचार नेहमी सन्निध राहतील. आपल्या मनाच्या स्वाभाविक व नैसर्गिक मोठेपणामुळे आपण आपला देशांतरवास आनंदाने काढाल व हिंदुस्थानांतील आपले असंख्य देशबांधव आपला विरह नाइलाजास्तव मुकाटयाने सहन करतील. सहा वर्षांनंतर आपले पाय पुनरपि हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर लागतील व आपले देशबांधव पुन्हा आपल्या कच्छपी लागतील. असें झालें म्हणजे आपण व आम्ही मागील सर्व दुःखें विसरून जाऊं; पण एक गोष्ट मात्र आपल्या व आमच्या स्मृतींतून कधीहि जाणार नाही. आपल्या व आमच्या हृदयांत ती गोष्ट दिवसेंदिवस जास्त जास्त खोल जाऊं लागेल व ती गोष्ट मात्र आपल्या व आमच्या अंतःकरणांना सदैव दुःखाची टोचणी करीत राहील. अशी ही गोष्ट म्हटली म्हणजे आपल्या देशभक्तीसंबंधाने जस्टिस दावर यांनी काढलेले अनुदारपणाचे उद्‌गार होत.

ज्या निर्मळ देशभक्तीबद्दल सारें हिंदुस्थान—नव्हे अखिल जग—टिळकांचा धन्यवाद गात आहे, त्या त्यांच्या देशभक्तीला 'वरपांगी' म्हणून जस्टिस दावरांनी नाक मुरडलें आहे. जस्टिस दावर हे असें म्हणाले की, "टिळक यांनी देभभक्तीचा नुसता आव आणला आहे. खरी देशभक्ति त्यांच्या ठायीं नाही." जस्टिस दावर यांचे हे मत्सरयुक्त उद्‌गार ऐकून त्यांच्या मानसिक क्षुद्रपणाबद्दल त्यांचा कोणत्याहि निःपक्षपाती मनुष्याला तिटकाराच येईल. देशभक्ति आणि ती बळवंतरावांत नाही? मग ती आहे तरी कोणांत? दावरसाहेब, मेहरबानी करून खऱ्या देशभक्तीच्या गड्यांचीं एकदोन नांवें तुम्ही आम्हांस सांगाच सांगा. आपल्या मताने खरे देशभक्त जे कोणी असतील ते असोत, पण आपल्या देशभक्तीवर तुमच्या मुखावाटें छाप मारून घेऊन तिला शंभर नंबरी व बावन्नकशी ठरवून घेण्याची इच्छा बळवंतरावांनी कधीहि प्रदर्शित केली नव्हती. आपण मात्र हा नसता लांडा कारभार करून साऱ्या हिंदुस्थानांत आपली छीःथू मात्र करून घेतलीत. बळवंतराव आपल्या मताने

देशभक्त नसतील तरी पण जन्मभर बॅरिस्टरचा धंदा करून म्हातारपणीं सरकारी नोकरीची रुपेरी बेडी पायांत अडकवून घेणाऱ्या आशाळभूत मनुष्याची गणना देशभक्तांत निःसंशय, होणार नाही. अस्सल देशभक्तांना नांवें ठेवून कोणी स्वतः देशभक्त बनू शकत नाही, हें जस्टिस दावर यांनी नीट लक्षांत धरावें.

दावरसाहेब, आम्ही आपणांस एवढेंच सांगतों की, जर जॉर्ज वाशिंग्टन देशभक्त नसेल, जर गॅरिबाल्डी देशभक्त नसेल, जर हॅमडन देशभक्त नसेल, जर शिवाजीमहाराज देशभक्त नसतील, तर बळवंतरावजी देशभक्त नाहीत. दावरसाहेब, आपल्यासारख्या थोर विभूतींच्या शेजारीं बसवून 'अस्सल देशभक्त' म्हणवून घेण्यापेक्षा वॉशिंग्टन, हॅमडन, गॅरिबाल्डी व शिाजीमहाराज ह्यांच्या पंगतीला बसवून 'नकली देशभक्त' म्हणवून घेणें हें बळवंतरावांना जास्त गोड वाटेल. दावरसाहेब, आपण कायद्याच्या कलमावर आपली अक्कल चालवावी. देशभक्ति हा आपला विषय नाही व त्या विषयावर बोलण्याचें आपण यापुढे तरी धाडस करूं नये. आरोपी बळवंतरावांना आपण वाटेल ती शिक्षा द्यावयाची होती, पण त्या शिक्षेला तिखटपणा आणण्याकरिता आपण जें बरळलांत तें जर तुम्ही बरळला नसता, तर फार उत्तम झालें असतें. असो; तुमच्या मर्मभेदक शब्दांमुळे बळवंतरावजींची योग्यता एका अंशानेंहि कमी न होतां ती उलट पुष्कळ पटींनी वृद्धिंगत झाली आहे. आमचे बळवंतराव सहा वर्षांनी सुटून येतील. लोक त्यांना झालेली शिक्षा हळूहळू विसरूं लागतील; पण आपले निरर्गल प्रलाप मात्र कोणाच्याहि स्मृतींतून नाहीसे होणार नाहीत. असो; देव करो व काळकर्ते लोकमान्य परांजपे व केसरीकर्ते जगन्मान्य टिळक सुरक्षितपणें कारागृहांतून सुटून येवोत !

— भाला, दि. १ ऑगस्ट १९०८

---

## २९. हिंदुस्थाना, तुझी वाट काय ?

कोणताहि लहानमोठा समाज सुव्यवस्थित व सुयंत्रित रीतीने चालण्यास व्यक्तीच्या किंवा व्यक्ति-समुदायाच्या हातांत सत्ता व अधिकार असावयास पाहिजे. कोणत्याहि समाजांत किंवा राष्ट्रांत जर एखादी अधिकारसंपन्न व्यक्ति किंवा व्यक्ति-समुदाय नसेल, तर असा समाज किंवा असें राष्ट्र बेबंदशाहीमुळे धुळीस मिळाल्याशिवाय राहणार नाही. जेव्हा एखाद्या राष्ट्रांत एकाच व्यक्तीच्या हातांत सर्व राजसत्ता एकवटलेली असते तेव्हा अशा पद्धतीला राजसत्तात्मक पद्धति म्हणण्यांत येते. जेव्हा एकाहून अनेक व्यक्तींच्या हातांत राजसत्ता संयुक्त रीतीने वसत असते तेव्हा त्या पद्धतीला प्रजासत्तात्मक पद्धति अशी संज्ञा देण्यांत येते. जगांतील पूर्व-

कालीन राष्ट्रांत व अलीकडे अठराव्या शतकापर्यंत बहुतेक ठिकाणीं राजसत्तात्मक पद्धति अमलांत होती; पण अलीकडे बहुतेक राष्ट्रांत प्रजासत्तात्मक पद्धतीचाच प्रचार सुरू झाला आहे. वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे कोणत्याहि राष्ट्रांत प्रजासत्तात्मक पद्धतीच सुरू झाली पाहिजे. राजसत्तात्मक पद्धति व प्रजासत्तात्मक पद्धति या दोहोंत जर तुलना केली, तर कोणत्याहि समंजस मनुष्याचें मत प्रजासत्तात्मक पद्धतीलाच अनुकूल होईल.

एखादा राजा कितीहि उत्तम असला तरी त्याचे सर्वच वंशज सद्‌गुणी निपजतील असें खात्रीने सांगतां येत नाही. उलट जगाच्या इतिहासाकडे नजर फेकली असतां असा अनुभव येतो की, सद्‌गुणी राजांपेक्षा दुर्गुणी राजांचीच संख्या अतिशय जास्त आहे. मनुष्यप्राण्याचा दुर्गुणाकडेच स्वभावतः जास्त ओढा आहे. तशांत ज्या व्यक्तीच्या हातांत अमर्यादित सत्ता केंद्रीभूत झालेली असते अशी व्यक्ति राजसत्तेच्या जोरावर जास्त दुर्गुणी बनते व आपल्या प्रजाजनांना त्रस्त करून टाकते. कोणत्याहि देशांतील दुर्गुणी राजांची संख्या सद्‌गुणी राजांच्या संख्येपेक्षा पुष्कळ पटींनी जास्त भरेल. राजेलोकांत राम, युधिष्ठिर, विक्रम, नल, अकबर, शिवाजीमहाराज, बाजीराव वगैरे पुण्यश्लोक राजे निर्माण होतात, पण अशांची संख्या बोटावर मोजण्याइतकी अल्प असते. बहुसंख्या ( मेजॉरिटी ) बहुतेककरून दुष्ट व दुर्गुणी राजांचीच असते, म्हणून प्रजाजनांच्या दृष्टीने राजसत्ताक पद्धति ही कधीहि हितावह नाही. अशा राज्यपद्धतींत प्रजेच्या हातांत मुळीच काडीचीहि सत्ता नसल्यामुळे तिची राजकीय अवस्था गोठ्यांतील दीनदुबळ्या धेनूप्रमाणे असते. यजमान जें देईल तें खावें व जेथे बांधील तेथे राहवें अशी ज्याप्रमाणे गोठ्यांतील गाईची अवस्था असते त्याचप्रमाणे राजा बसवील ते कर द्यावेत व तो करील ते कायदे निमूटपणें पाळावेत अशी स्थिति सत्ताविहीन प्रजेची असते.

पुरातनकालापासून राजसत्तात्मक पद्धति चालू झाल्यामुळे राजाच्या अंगीं दैवीपणाचा आरोप करण्यांत आला. राजा हा विष्णूचा अवतार असतो ही खुळचट कल्पना राजेलोकांनी व त्याच्या सल्लामसलतकारांनी लोकांच्या मनांत इतक्या सफाईने ठसवून दिली आहे की, परवा-परवापर्यंत ही कल्पना इंग्लंडांतील लोकांच्या मनांत रूढ होती व अजूनहि ती कल्पना कांही कांही राष्ट्रांत प्रचलित आहे. खरें पाहिलें म्हणजे राजा विष्णूचा अवतार नसून तो प्रजेचा चाकर आहे. प्रजा ही मालकीण व राजा हा चाकर हीच खरी स्थिति होय. प्रजा व राजा यांच्यामध्ये सेव्य व सेवक यांचें नातें वास्तविक रीतीने असावयास पाहिजे. राजसत्तारूपी नदीचा उगम प्रजारूपी सरोवरांतून आहे म्हणून राजसत्ता ही राजेलोकांजवळची प्रजादत्त मिळकत होय. जोंपर्यंत ही मिळत राजेलोक न्यायाने व निर्लोभाने वहिवाटींत आहेत तोंपर्यंत तिची व्यवस्था त्यांच्याकडे राहणार हें उघड आहे. आपल्या हातांतील सत्ता जर राजेलोक भलत्या मार्गांनी उपयोगांत आणूं लागले, तर ती सत्ता त्यांच्या हातांतून काढून घेऊन

स्वत: तिचा उपयोग करणें हा प्रजेचा हक्क आहे आणि हा हक्क जगांतील बहुतेक राष्ट्रांतील प्रजाजन अमलांत आणूं लागले आहेत. जगाच्या या विद्यमान स्थितीकडे नजर फेकली, तर अशा रीतीने वरवर पाहणाऱ्यांच्या नजरेस एक गोष्ट येईल की, जगांतील बहुतेक राष्ट्रांत प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू असून, ज्या ज्या राष्ट्रांत अजूनहि राजसत्ताक अंमल आहे त्या त्या राष्ट्रांतहि प्रजेच्या हक्कांचें दडपण त्याच्यावरती आहे. अनियंत्रित राजसत्ता साऱ्या दुनियेंत कोणत्याहि राष्ट्रांत नाहीं असेंच म्हटलें असतां चालेल. केवढा जर्मनीचा बलाढ्य केसर, पण त्याच्यावरहि राईस्टॅगचा ( जर्मन पार्लमेंटचा ) दाब आहे. एवढा रशियाचा शिरजोर झार पण त्याचेंहि शिर ड्यूमाच्या भाराने वाकलेलें आहे. युरोप खंडांतील इतर देशांचे राजे जवळ जवळ बुद्धिबळांतील लाकडी राजांइतकेच सत्ताधारी आहेत.

अमेरिकेंत प्रजासत्ताक राज्यपद्धति आहे व आफ्रिकेंतील गोऱ्या वसाहतींत अनियंत्रित राजसत्तेचे राजे राज्य करीत नाहीत. राहतां राहिलें आशिया खंड व त्या खंडांतील राजांचीहि सत्ता नियंत्रित झाली आहे असें म्हणावयास हरकत नाही. जपानच्या बादशहाच्या हातांत अनियंत्रित सत्ता नाही. चिनी बादशहालाहि चिनी लोकांच्या मताप्रमाणे सुधारणा घडवून आणणें भाग पडत आहे. पर्शियाच्या बादशहाने आपल्या लोकांना पार्लमेंट दिलें आहे व ज्या ज्या ठिकाणीं अनियंत्रित राजसत्ता दृष्टीस पडत आहे तेथे तिला क्षयाची भावना झाली आहे. विसावें शतक अनियंत्रित राजसत्तेला पथ्यकर नाही. या शतकाची हवा अशी कांही विलक्षण आहे की, तिच्या प्रभावामुळे जगांतील लठ्ठ लठ्ठ राजसत्ता क्षयाच्या पंथाला लागल्या आहेत. ज्याप्रमाणे विसाव्या शतकांतील हवा राजसत्तेला अनिष्ट आहे, त्याचप्रमाणे ती हवा प्रजासत्तेला अत्यंत पथ्यकर आहे. विसाव्या शतकाची हवा वहावयास लागून अजून पुरीं ८ वर्षे झालीं नाहीत तोंच तिने दोन राष्ट्रांतील धष्टपुष्ट राजसत्ता जवळ जवळ नामशेष केल्या. युरोपांतील तुर्कस्तानच्या सुलतानांची सात-आठ शतकांची अनियंत्रित राजसत्ता एकाएकीं नष्ट होऊन तिच्या जागीं प्रजासत्तेची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. आश्चर्याची गोष्ट ही की, ही नवीन प्राणप्रतिष्ठा रक्तजलाच्या अभिषेकाशिवाय घडून आली आहे. जो अभूतपूर्व प्रकार युरोपांतील तुर्कस्तानांत झाला, तसाच प्रकार आशियांतील पर्शियांत झाला आहे. तेथे हें स्थित्यंतर होण्यास थोडाबहुत रक्तपात व्हावा लागला; परंतु तो म्हणण्यासारखा झाला नाही.

विसाव्या शतकांत दोन पौर्वात्य राष्ट्रांत या ज्या दोन बिनरक्ती राज्यक्रांत्या झाल्या, त्या आमच्या मताने अतिशय बोधप्रद आहेत. त्यांनी केलेला उपदेश जर इतर राष्ट्रांतील सत्ताधीश लोक व प्रजाजन मन:पूर्वक ऐकतील व त्याप्रमाणे वागतील, तर त्यामुळे दोघांचेंहि कोटकल्याण होईल. आजपर्यंत कधीहि न झालेली व कदाचित् पुढेहि न होणारी गोष्ट करून तुर्कस्थानच्या सुलतानाने पाश्चिमात्य राष्ट्रांतील राजांना आपल्या माना खाली घालावयास लाविलें आहे. सुधारणेचा

टेंभा मिरविणाऱ्या राजांनी जो मनाचा उदारपणा व दिलदारपणा दाखविला नाही तो उदारपणा व दिलदारपणा दाखवून तुर्कस्थानच्या सुलतानाच्या सुलतानांनी स्वार्थत्याग व प्रजावत्सल आधुनिक राजांत पहिला नंबर पटकाविला आहे. राजांपासून राजकीय हक्क तलवारीच्या जोरावर मिळविणें प्रजेला भाग पडणें, ही गोष्ट प्रजेपेक्षा राजाला जास्त लांछनास्पद आहे. जर राजा हा बाप व प्रजा ही त्याची औरस मुलगी, असें मायेचें नातें दोघांत असल्याचें प्रतिपादन करण्यांत येतें, तर मग राजकीय हक्कासाठी मागणी केल्याबरोबर बापाने सुरा उपसणें हे न्याय्य नाही. राजा व प्रजा ह्यांच्यामध्ये बाप-लेकीचें मायेचें नातें असो अथवा नसो, पण त्यांच्यामध्ये यजमानीण व चाकर हें नातें मात्र निःसंशय आहे. राजाजवळ असलेला प्रत्येक राजकीय हक्क व अल्प-स्वल्प राजसत्ता ही प्रजेच्या मालकीची ठेव आहे. ही ठेव वाटेल त्या वेळेस मागण्याचा प्रजेला हक्क आहे. हा हक्क कितीहि लांबच्या मुदतीने नष्ट होत नाही. प्रजेचा हा हक्क राजेलोक तिला फक्त मनगटाच्या जोरावर मिळूं देत नाहीत.

ज्याप्रमाणे एखादा अप्रामाणिक पालक आपल्या ताब्यांतील अज्ञानाची मिळकत मधेच दाबून टाकतो, त्याप्रमाणेच राजेलोकांनी प्रजाजनांची सत्ता अन्यायाने बळकावलेली असते. ही सत्ता आपल्या हातांत पुनरपि यावी अशी इच्छा जर एखाद्या राष्ट्रांतील सज्ञान प्रजेने दर्शविली, तर अशा राष्ट्रांतील राजाने आपणहून विनतक्रार ही सत्ता आपल्या प्रजेच्या स्वाधीन करून मोकळें होणें हीच रास्त गोष्ट आहे; परंतु स्वार्थामुळे व लोभामुळे राजेलोकांच्या हातून हा स्वार्थत्याग होत नाही व म्हणून राजे व प्रजाजन ह्यांच्यांत खटका उडतो. इंग्लंडचेंच उदाहरण घ्या. पहिल्या चार्लसने जर इंग्रज लोकांना त्यांचे नैसर्गिक हक्क देऊन टाकले असते, तर त्याच्यावर पुढे फाशी जाण्याची पाळी आली नसती. पण दुसऱ्याची वस्तु एकदा हातीं आल्यावर ती गुण्यागोविंदाने परत देण्याची सुबुद्धि मनुष्याच्या अंगीं राहत नाही व म्हणूनच जगाचा इतिहासपट रक्ताच्या रंगाने रंगीबेरंगी झाला आहे. तुर्कस्थानच्या सुलतानासारखे राजे जर आजपर्यंत जगांत झाले असते, तर जगांतील पुष्कळ प्राणहानि वांचली असती. असो; तुर्कस्थानच्या सुलतानांनी घालून दिलेला कित्ता जगांतील इतर राजे गिरवतील अशी आम्हांस आशा आहे. निदान हा कित्ता इंग्रज सरकार हिंदुस्थानांत गिरवील अशी आशा आम्हीं प्रगट करतों.

इंग्रज लोक नेहमी असें प्रतिपादन करतात की, त्यांचा हिंदुस्थानवर राज्य करण्यांत स्वार्थमूलक कोणताहि हेतु नाही. त्यांचें हें म्हणणें जर अंतःकरणापासून असेल, तर आम्ही त्यांना एवढीच विनंती करतों की, उक्तींत असलेलें हें विधान कृतींत उठवून द्या. जर येथील लोकांना स्वतःचा राज्यकारभार चालविण्यास पात्र करून परत इंग्लंडला जाण्याची इंग्रज लोकांची खरोखरची—मानभावी नव्हे—इच्छा असेल, तर मग त्यांना आम्हीं अशी विनंती

करतों की, बाबांनो, ही इच्छा सफल करण्याचा उपक्रम करा. तुर्कस्थानच्या सुलतानाने एका दिवसांत लेखणीच्या फटकाऱ्यासरशी आपल्या प्रजेला सर्व राजकीय हक्क देऊन टाकून त्याने प्रजेच्या ऋणांतून स्वतःला मुक्त करून घेतलें. 'अजून तुम्ही सत्पात्र झाला नाहीत' ही नेहमीची आपमतलबी सबब पुढे करून त्याने आपल्या प्रजेला हक्क देण्याचें काम दिरंगाईवर टाकलें नाही. मनांत नसलें तर प्रजाजन केव्हाहि पात्र होणार नाहीत. पात्रापात्रत्वाची सबब पुढे करून राजकीय हक्कांची ठेव प्रजेची प्रजेला देण्यास विलंब लावणें हें जरी राज्यकर्त्यांना हितकर असलें, तरी तें न्यायाच्या दृष्टीने रुजू नाही. तुर्की प्रजेमध्ये व हिंदी प्रजेमध्ये जर तुलना करावयासच लागलें, तर तुलनेचा काटा हिंदी प्रजेकडे जरा जास्त ढळेल असें आम्ही बिनधास्त म्हणतों.

आमच्या अंगावर राज्यकारभाराचा भार टाकून देण्यांत आल्यास सर्वच गोंधळ उडून जाईल अशी राज्यकर्त्यांनी आपली भ्रामक समजूत करून घेऊं नये. अंगावर पडलें म्हणजे सर्व कांही ठीक चालतें. म्हणून सर्व हिंदी लोकांच्यातर्फे आमची सरकारास अशी नम्र पण न्याय्य विनंती आहे की, जगांत बहुतेक सर्व राष्ट्रांत प्रजाजनांना राजकीय हक्क मिळाले आहेत व मिळत चालले आहेत व प्रजाहि राजसत्तेची मालकीण आहे हें तत्त्व सर्व देशांत अमलांत येऊं लागलें आहे. पौर्वात्य देशांतहि हें तत्त्व सानुभव रीतीने प्रत्ययास येऊं लागलें आहे. सर्व जग याप्रमाणे एका मार्गाने चाललें असता इंग्रज सरकार हिंदुस्थानच्या बाबतींत उलट मार्गाने जाणार की काय ? अतिशय बलाढ्य अशा इंग्रज सरकारने हट्टच धरला तर हिंदी लोकांना राजकीय हक्क मिळण्यास जरा जास्त जड जाईल, पण अशा हट्टापासून जरी इंग्रज लोकांचा द्रव्याच्या दृष्टीने नफा असला तरी लौकिकाच्या दृष्टीने अत्यंत भयंकर तोटा होणार आहे. ज्या इंग्रज लोकांचा असा बाणा आहे की, "Britons can never be slaves" (इंग्रज लोक कधीहि गुलाम होणार नाहीत.) त्या स्वातंत्र्यप्रिय इंग्रज लोकांनी पारतंत्र्य-पंकांत रुतलेल्या हिंदी लोकांना तेथेच कायमचें गाडून ठेवूं नये. एकदा चुकून चिखलांत गाडलेल्या माणसाला वर येऊं न देणें अगदी सोपें आहे. पण खरा पुरुषार्थ त्यांत नाही. खरी मर्दुमकी अशा मनुष्याला वर काढण्यांतच आहे. म्हणून आमची इंग्रज लोकांना पुनः पुन्हा अशी विनंती आहे की, केवळ स्वार्थासाठी तुम्ही जगांत तीस कोटि लोकांचा मेंढवाडा करूं नका.

जगाच्या राजकीय अंतरिक्षांत स्वातंत्र्यरवीचा उदय होऊन त्याचीं सुखकर किरणें सर्व राष्ट्रांवर पसरत आहेत. हीं किरणें आपल्या प्रजाजनांच्या अंगांवर पडून त्यांना राजकीय ऊब यावी म्हणून टर्कीच्या व पर्शियाच्या सुलतानांनी प्रजाजनांच्या माथ्यांवरील आपआपलीं सत्तारूपी झाकणें काढून घेतलीं आहेत. सर्व जग याप्रमाणे आनंदसागरांत पोहावयास लागावें व फक्त एकट्या हिंदुस्थानाने दास्य-

पंकांत गुदमरत राहवें हा खरोखर परमेश्वराच्या घरचा न्याय्य नाही. आम्हांस अशी भीति वाटते की, "इंग्रज लोक कधींहि गुलाम व्हावयाचे नाहीत." असा ज्यांचा बाणा आहे तेच लोक आपल्या बाण्याला एक नवीन शेपूट लावून असें म्हणणार काय की, 'Indian's can ever be slaves ( हिंदी लोक सदैव गुलाम राहतील ? ) अलीकडे अँग्लो-इंडियन पत्नकारांच्या लेखणींतून जीं मुक्ताफळें बाहेर पडूं लागलीं आहेत त्यांवरून ती भीति कमी न होतां उलट अधिक दुणावत आहे. "We have come here to stay & we will stay here forever." (आम्ही हिंदुस्थानांत राहण्याकरिता आलों आहोंत व म्हणून आम्ही येथे कायमचें राहणार.) अशा बढाया अँग्लो-इंडियन पत्नकार मारूं लागले आहेत. कोणी असें म्हणतात की, "आम्हीं हिंदुस्थान तलवारीच्या जोरावर जिंकलें आहे व ते आम्ही तलवारीच्या जोरावर आपल्या ताब्यांत ठेवणार." खुद्द मोर्लेसाहेब असें बेलाशक बोलून गेले आहेत की, 'यावच्चंद्रदिवाकरौ' हिंदुस्थानांत निरंकुश सत्ताच चालणार. निरनिराळ्या इंग्रज पत्नकारांचे व मूतसद्द्यांचे वरच्यांप्रमाणे उद्‌गार वाचले म्हणजे "हिंदुस्थाना, तुझी वाट काय" असाच प्रश्न आपोआप तोंडांतून बाहेर पडतो व त्याचें समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे मन खिन्न व उद्विग्न होऊन जाते. सारें जग स्वतंत्र व तूं तेवढा परतंत्र राहणार ना ? हिंदुस्थाना, तुझ्या मानेवरील दास्याचें जूं कायम असणार ना ? स्वतंत्रतादेवीच्या अति पवित्र मंदिरांत जाण्याची तुला यावच्चंद्रदिवाकरौ मनाई होणार ना ! हतभाग्या हिंदुस्थाना, यापेक्षा तूं कायमचा नामशेष कां होत नाहीस ! दीनदयाळा परमेश्वरा, जर तुला हिंदी दुबळ्या लोकांची करुणा येत असेल, तर तूं हिंदी लोकांना स्वराज्याची जोड तरी करून दे, नाही तर त्यांना या जगांतून कायमची मुक्ति तरी दे. तूं मनांत आणलेंस तर या दोहोंपैकी कोणतीहि गोष्ट निमिषार्धांत होऊन जाईल.

नोव्हेंबरची पहिली तारीख दोन महिन्यांनी आली आहे. बुद्धिदात्या जगदीशा, तूं इंग्रज लोकांना अशीच बुद्धि दे की, त्यांनी त्या दिवशीं एक जाहीरनामा काढून उदार अंतःकरणाने हिंदी लोकांना स्वराज्य देऊन टाकावें. जर त्यांना अशी सुबुद्धि देण्याची तुझी इच्छा नसेल, तर मग तूं निदान एवढें तरी कर—पंचमहाभूतें तुझ्या सर्वस्वीं अंकित असल्यामुळे तूं पृथ्वीमातेला आपल्या अंगाला एक जोराचा हिसका द्यावयास सांग व हतभागी हिंदुस्थानांतील दुर्दैवी हिंदी लोकांच्या दुःखाचें कायमचें परिमार्जन कर. तीं हें काम करण्यास तयार नसलीं, तर हिंदी महासागराला आपल्या पोटांत या कमनशिबी भरतभूमीला कायमची जागा देण्याची तूं आज्ञा कर. कांही कर व कोणाकडूनहि कर. पण कृपासागरा, तूं आमच्यावर एवढीच कृपा कर की, तूं आम्हांस या जगांत यापुढे जिवंत ठेवूं नकोस. कारण जिवंत राहून गुलाम असण्यापेक्षा मृत होऊन स्वतंत्र राहणें हें जास्त इष्ट आहे. जगदीशा, जगांतून एकटा परतंत्र हिंदुस्थान नष्ट झाल्यामुळे पृथ्वीचें क्षेत्र व लोकसंख्या म्हणण्यासारखी

कमी होणार नाही. हिंदुस्थान नामशेष झाल्यामुळे शिल्लक राहिलेल्या जगाचें मात्र कोटकल्याण होईल. कारण हिंदुस्थान नामशेष झाल्यामुळे जगांतील दास्य नष्ट होईल व मग जगांत जिकडे तिकडे कोनाकोपऱ्यांत स्वतंत्रतादेवीचें साम्राज्य चालू लागेल. म्हणून प्रभो, तुला आमची अत्याग्रहाची अशी विनंती आहे की, तूं आम्हांस स्वातंत्र्य तरी तर दे, नाही कायमची मुक्ति तरी दे. या दोहोंपैकी कांही एक न करतां जर तूं कानावर हात ठेवून स्वस्थ बसलास, तर मग पुन्हा असा प्रश्न उपस्थित होतो की, "हिंदुस्थाना, तुझी वाट काय?" या प्रश्नाचें सरळ व स्पष्ट उत्तर हेंच की, "तुझ्या नशिबीं कायमचें दास्य व कायमचें दैन्य!"

— भाला, दि. १ सप्टेंबर १९०८

---

# ३०. वंदे मातरम्

परमेश्वराच्या संकेतानुरूप भरतभूमीवर इंग्रजी सत्तेचें निशाण फडकत असो, किंवा येथील लोकांच्या देशाभिमानशून्यतेमुळे त्यांच्या मानेवर पारतंत्र्याचें जड जूं ठेवलें गेलें असो, अथवा इंग्रज लोकांनी तलवारीच्या जोरावर हिंदुस्थानचें राज्य कमावलें असो; ह्या प्रश्नांची चर्चा व ऊहापोह करण्यांत सध्या कांहीं अर्थ नाही. कारण कोणतेंहि असो, पण एवढा परिणाम मात्र खचित आहे की, आज हिंदुस्थानावर इंग्रजी सत्ता गाजत आहे. ह्या इंग्रजी सत्तेच्या इमारतीचा पाया लॉर्ड क्लाईव्ह-साहेबांनी प्लासीच्या रणमैदानावर सन १७५७ सालीं घातला असून, तिचा अगदी वरचा मजला लॉर्ड कॅनिंगहॅमसाहेबांनी सन १८५८ सालीं बांधून टाकला. हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्तेची घडण बरोबर शंभर वर्षे एकसारखी चालली होती व ती सन १८५७ सालीं बंडाच्या भट्टींतून तावून-सुलाखून बाहेर पडली. सन १८५८ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस ज्या वेळीं ख्रिस्तलोकवासी राणी-साहेबांच्या येथील प्रतिनिधीने सर्व हिंदी लोकांपुढे आपला जगप्रसिद्ध जाहीरनामा वाचला, त्या वेळीं इंग्रजी सत्ता येथे प्रस्थापित झाली व ती लोकांनी कबूल केली, असें धरावयास हरकत नाही.

इंग्रज सरकारचा व हिंदी लोकांचा 'राजा व प्रजा' हा संबंध सन १८५८ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत पहिल्या प्रथम सुरू झाला असेंच म्हणणें सयुक्तिक होईल. उभय पक्षांच्या संबंधाचा पाया म्हटला म्हणजे सन १८५८ सालचा जाहीरनामा होय. हा जाहीरनामा म्हणजे इंग्रज लोक व हिंदी लोक ह्यांच्या-मधील करार होय. इंग्रज सरकारने हिंदी लोकांना दिलेला हा एक ताम्रपट आहे.

इंग्रज सरकारकडून हिंदी लोकांना मिळालेली ही एक सनद होय. ह्या सनदेंत जीं कलमें घालण्यांत आलीं आहेत त्या सर्वांचा मथितार्थ एवढाच आहे की, जसे जसे हिंदी लोक स्वतःचा राज्यकारभार चालविण्यास सत्पात्र होत जातील, तसे तसे त्यांना सरकारकडून राजकीय हक्क देण्यांत येऊन शेवटीं इंग्रज सरकार आपणहून ह्या देशाला गुण्यागोविंदाने व सुखासमाधानाने रामराम ठोकील. जाहीरनाम्यांतील अशा प्रकारच्या आश्वासनांवर हिंदी लोकांचा विश्वास बसला व आपल्या अंगीं राज्यकारभार हाकलण्यास आवश्यक लागणारी पात्रता आणण्याकरिता निरनिराळ्या बाजूंनी त्यांनी प्रयत्न चालविले. हे प्रयत्न सन १८५८ सालापासून तो राष्ट्रीय सभेची सन १८८५ सालीं स्थापना होईपर्यंत एकसारखे चालले होते. हिंदी लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार बराच होऊन त्यांच्या अंगीं स्वतःचा राज्यकारभार चालविण्याची पात्रता येत चालली, असें सरकारच्या नजरेस आणण्याकरिता त्या वेळच्या सुशिक्षित लोकांनी राष्ट्रीय सभेची स्थापना केली व तिच्या द्वारें इंग्रज सरकारकडे निरनिराळ्या राजकीय हक्कांची मागणी केली. याप्रमाणे बावीस वर्षें इंग्रजांच्या न्यायबुद्धीला खुलविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पण कोठे विनसलें असेल तें असो. पण कांही केल्या इंग्रज-न्यायबुद्धीला पाझर फुटेना व हिंदी लोकांना एकाहि राजकीय हक्काची पैदास होईना !

सन १८८५ सालापासून तो सन १९०५ सालापर्यंत अर्जद्वारा व मुखद्वारा शेकडो सुशिक्षित लोकांनी इंग्रज लोकांची मनधरणी व पायधरणी केली. पण जाहीरनाम्यांत देण्यांत आलेल्या अभिवचनांपैकी एकहि अभिवचन अंशतः देखील परिपूर्ण करण्यांत आलें नाही. आपणांस मिळालेली मौल्यवान् सनद कवडीमोल असून तिच्यामुळे कोणतीहि कार्यसिद्धि व्हावयाची नाही, अशी हिंदी लोकांची आस्ते आस्ते खात्री होत चालली व ज्या वेळीं आठ कोटि बंगाली लोकांच्या मताला झुगारून देऊन सरकारने वंगभंग केला, तेव्हा तर हिंदी लोकांचा इंग्रज न्यायबुद्धीवर उरलासुरला विश्वास पार नाहीसा होऊन गेला. वंगभंगापासून हिंदी पुढाऱ्यांच्या विचारांत एक भयंकर क्रांति झाली व ती क्रांति सरकारच्या ४७ वर्षांच्या कंजूसपणामुळे झाली आहे. सन १८५८ सालापासून तों सन १९०५ सालापर्यंत ४७ वर्षांच्या एवढ्या मोठ्या अवधींत जाहीरनाम्यांत अभिवचन दिल्याप्रमाणे सरकारने हिंदी लोकांना एकहि राजकीय हक्क दिला नाही. सरकार बोलल्याप्रमाणे कृति करीत नाही, अशी हिंदी लोकांची दिवसेंदिवस खात्री होत जाऊन, तिचा कडेलोट सन १९०५ सालीं झाला. त्या सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या सोळाव्या तारखेस कर्झनसाहेबांनी वंगभंग केला व त्याबरोबरच त्यांनी इंग्रज सरकारविषयी हिंदी लोकांच्या अंतःकरणांत असलेला प्रेमाचाहि भंग करून टाकला. १९०५ सालापासून इंग्रज न्यायबुद्धीवरील हिंदी लोकांची असलेली श्रद्धा पार ढासळून गेली व आपली स्वतःची उन्नति करून घेण्यासाठी निराळ्या मार्गांचा अवलंब केला पाहिजे, असें त्यांच्या

मनाने घेतलें. राजकीय बाबतींत कोणी कोणाला आपणहून कांही एक देत नाही, तर ज्याने त्याने स्वतः प्रत्येक हक्क स्वतःच्या कर्तबगारीवर कमावला पाहिजे, अशी दृढ कल्पना हिंदी लोकांची झाली व त्याप्रमाणे ते गेल्या तीन वर्षांपासून स्वावलंबनाच्या मार्गाने जाऊं लागले आहेत. ४७ वर्षे सरकाररूपी दैवताची आराधना करून कांही एक निष्पन्न झालें नाही, हें पाहून हिंदी लोकांनी निराळ्या देवतेची उपासना सुरू केली आहे. ही निराळी देवता म्हटली म्हणजे राष्ट्रदेवता होय.

आपला राजकीय उद्धार जर कोणत्या एका उपायाने होण्यासारखा असेल, तर तो राष्ट्रदेवतेची निस्सीम व सप्रेम आराधना करून होईल असें हिंदी लोकांचें ठाम मत बनल्यामुळे त्यांनी बंगभंगापासून त्या देवतेची आराधना करण्यास प्रारंभ केला आहे. राष्ट्रदेवतेची भक्ति करण्याचे त्यांनी चार प्रकार शोधून काढले आहेत. ही चतुर्विधा भक्ति केल्यावर राष्ट्रदेवता प्रसन्न होऊन आपलें राजकीय दैन्य नाहीसें होईल, असें हिंदी लोकांना वाटत आहे. राष्ट्रदेवतेची भक्ति करण्याचे हे चार मार्ग म्हणजे स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व अप्रत्यक्ष प्रतिकार हे होत. आपल्या न्यायबुद्धीवरील असलेला विश्वास नष्ट होऊन हिंदी लोक भलत्याच देवतेच्या नादीं लागलेले पाहून सरकाररूपी देवतेच्या अंगाचा तिळपापड झाला आहे. कसेंहि करून व वाटतील ते दडपशाहीचे प्रकार अमलांत आणून राष्ट्रदेवतेच्या मंदिरांत जमलेल्या भक्तजनांचे थवे उधळून द्यावेत, हा वाईट हेतु मनांत धरून सरकारने दंडेलीच्या व दडपशाहीच्या उपायांचा अवलंब केला आहे. गेल्या वर्षापासून जिकडे-तिकडे, सर्व हिंदुस्थानभर स्वदेशीचे व राष्ट्रद्रोहाचे खटले चालू आहेत. शिक्षणाच्या बाबतींत विशेष कटाक्ष दाखविला जात आहे व जेणेंकरून लोकांनी आरंभलेली नवीन चळवळ बाल्यावस्थेंत नामशेष होईल, असे उपाय प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने योजले जात आहेत.

वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे सरकारने या नवीन चळवळीला फारसे ध्यान द्यावयास नको होतें. कारण तिच्यांत राजद्रोहाचा अल्पहि अंश नसून, फक्त आत्मोन्नतीची लालसा आहे. इंग्रज लोकांप्रमाणे आपणांसहि राजकीय स्थिति प्राप्त व्हावी, ह्याच हेतूने ही नवीन चळवळ अस्तित्वांत आली आहे. असें असतां सरकारने तिच्या पाठीमागे हात धुवून कां लागावें, हें आम्हांस समजत नाही. सरकारने पाहिजे तर आम्हांस कोणत्याहि प्रकारची मदत करूं नये, पण लोक स्वतःच्या जिवावर एखादी चळवळ करीत असतां, सरकारने मध्ये पडून तिच्यांत मोडता घालू पाहणें, हें प्रजावत्सलतेचें किंवा मुत्सद्दीपणाचें लक्षण नाही. सरकार मनास वाटेल तें करो, तिकडे आपणांस लक्ष देण्याची जरुरी नाही. हिंदी लोकांनी राष्ट्राभिमानाचा नवीन राजकीय धर्म अस्तित्वांत आणला आहे व या अभिनव महाराष्ट्र-धर्माचें मुख्य दैवत जी राष्ट्रदेवता तिची आराधना करण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. सरकार जर या आराधनेंत विघ्न आणण्याचा प्रयत्न करील, तर निर्बल व निःसत्त्व झालेल्या हिंदी

लोकांना एका मंत्राशिवाय दुसरा तरणोपाय नाही. सरकारने सहानुभूतिपूरित किंवा त्याच्या विपरीत धोरण धरलें तरी ह्याहि संकटांतून पैलतीरीं नेण्यास पूर्ण समर्थ असा मंत्र परमेश्वराच्या कृपेने हिंदी लोकांना लाधला आहे. ह्या मंत्रामध्ये अशीच अपूर्व शक्ति व सामर्थ्य आहे की, तो त्याचें पठन करणाऱ्या देशभक्तांच्या अंतःकरणांत विलक्षण जोम उत्पन्न करतो. असा हा अश्रुतपूर्व मंत्र म्हटला म्हणजे 'वंदे मातरम्' हा होय.

हा ओजस्वी मंत्र म्हणण्यास हिंदी लोकांनी सुरुवात केली आहे व म्हणून त्यांच्या चळवळीला यश हें हटकून आलेंच पाहिजे. देशबांधवहो, हा मंत्र म्हणण्यास सुरुवात केल्याबरोबर तुम्ही आपल्या शिरावर पांच भयंकर जबाबदाऱ्या घेतल्या आहेत हें मात्र कधीहि विसरूं नका. निव्वळ औपचारिक रीतीनेच जर या महाराष्ट्र-धर्मांतर्गत महामंत्राचा घोष तुम्हांस करावयाचा असेल, तर तुम्हांस आमची करद्वय जोडून अशी विनंती आहे की, या मंत्राचा उच्चार करून त्याचें पावित्र्य तुम्ही दूषित करूं नका. पुढील पांच कर्तव्यें, निदान त्यांच्यापैकी एक तरी कर्तव्य, परमेश्वराला स्मरून व पूर्वजांना आठवून जर तुम्हांस मनोभावें करावयाचें असेल तरच तुम्ही हा दिव्य मंत्र आपल्या जिव्हेवाटे बाहेर काढा, नाही तर मौनव्रत धारण करून स्वस्थ बसा. या मंत्राचा घोष करणें म्हणजे मारूनमुटकून नित्य-नैमित्तिक कर्म करणें नव्हे. 'वंदे मातरम्' हा मंत्र सजीव आहे म्हणून सजीव वृत्तीच्या देशभक्ताने त्याचा उच्चार करावा. केवळ शिष्टाचार म्हणून या मर्दानी मंत्राची गर्जना कोणीहि करूं नये. बांधवहो, जर या मंत्राने घालून दिलेल्या पंचकर्तव्यांपैकी एकहि कर्तव्य करण्याची तुमची इच्छा किंवा शक्ति नसेल, तर कृपा करून एवढेंच करा की, तो तुम्ही म्हणूं नका. पण तो तुम्हीं एकदा का उच्चारला की खाली दिलेल्या पांच जबाब-दाऱ्या तुमच्यावर येऊन आदळल्याच, हें तुम्ही निःसंशय समजा !

'वंदे मातरम्' हा मंत्र तोंडावाटे काढल्याबरोबर अशा मनुष्यावर येऊन पडणारी पहिली जबाबदारी ही की, त्याने सर्व गोष्टींच्या अगोदर शारीरिक बळ कमावलें पाहिजे. या जगांत सर्व सुधारणांचा पाया शारीरबल होय. कितीहि सुधारणा झाल्या, पण शरीर जर का मातीच्या ढेकळाप्रमाणे भुसभुशीत किंवा पोह्याच्या पापडाप्रमाणे कुडकुडीत असलें, तर त्या सर्व सुधारणा निरुपयोगी होत. बालपणीं पंचवीस वर्षांपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्यव्रत पाळून निरनिराळ्या व्यायामांच्या योगाने शरीरसंपत्तीची कमाई करणें हेंच 'वंदे मातरम्' हा मंत्र उच्चारणाऱ्या देशभक्ताचें आद्य कर्तव्य आहे. शरीरसामर्थ्याविषयी इतकी आतुरता असावी की, जर फासावर चढविण्यापूर्वी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी 'तुझी शेवटची इच्छा कोणती आहे' असा प्रश्न एखाद्या कैद्याला केला, तर 'मला जोर व बैठकी मारण्याची परवानगी द्या' अशीच इच्छा 'वंदे मातरम' हा मंत्र म्हणणाऱ्या कैद्याने प्रदर्शित केली पाहिजे. ज्या हतभाग्याजवळ शारीरिक बलाची गंगाजळी भरलेली नसते तो करंटा होय. अशा

शरीरबलविहीन दुबळ्याकडून कोणतेंहि देशकार्य व्हावयाचें नाही; म्हणून देशबांधवहो, कांही करा, कांही खा, कांही प्या, पण शारीरिक बलाची जोड जरुर करून घ्या. कर्मधर्मसंयोगाने व पूर्वपापाच्या प्रभावाने शारीरिक बल संपादन करण्याकडे तुमच्या मनाचा ओढा होत नसेल तर तो न होऊं द्या. पण पुढे सांगण्यांत येणारी गोष्ट तुम्ही कराच करा.

नुसतें शरीर बळकट करून भागावयाचें नाही. शारीरिक बळाला योग्य किंमत यावी अशी जर तुमची इच्छा असेल, तर त्याच्यासाठी तुम्हांस पुढील गोष्ट केलीच पाहिजे. ही दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे स्वतः ज्ञान मिळविणें व तें दुसऱ्यांना देणें होय. नुसता शारीरिक बलाने संपन्न असा द्विपाद टोणगा बनणें हें केव्हाहि इष्ट व हितकारक नाही. द्विपाद टोणग्यामध्ये व चतुःष्पाद टोणग्यामध्ये जर भेद असावयास पाहिजे, तर तो भेद ज्ञानामुळेच होणार आहे. जर ज्ञानसंपन्न नर प्रत्यक्ष नारायण होय, तर ज्ञानशून्य मनुष्य निव्वळ मर्कट होय. म्हणून शारीरिक बळाच्या प्राप्तीनंतर 'वंदे मातरम्' हा मंत्र उच्चारणाऱ्या प्रत्येक देशभक्ताने स्वतः ज्ञानार्जन केलें पाहिजे व आपल्या देशबांधवांना ज्ञानदान केलें पाहिजे. एक वेळ शारीरिक बळाकडे दुर्लक्ष झालेलें पत्करेल, पण मानसिक बळाकडे दुर्लक्ष होऊन कधीहि चालावयाचें नाही. ज्ञानशून्य पहेलवान द्विपाद बलिवर्द होय. पण ज्ञानसंपन्न सुदामदेवासंबंधाने तसें विधान करतां यावयाचें नाही. म्हणून सांगावयाचा मुद्दा हाच की, पहिल्या प्रथम शारीरिक बळ संपादन करा व तें संपादन करून ज्ञानार्जन करा व दोन्ही गोष्टी एकदम साधत नसल्या, तर पहिली सोडून देऊन दुसरी कराच करा. शरीर अशक्त असलें तर असूं द्या, पण मन मात्र अशक्त व शक्तिहीन राहूं देऊं नका. ज्ञानामृताचा खुराक लावून मनाला धष्टपुष्ट करा व असें केलें तरच 'वंदे मातरम्' हा मंत्र उच्चारल्याचें चीज होणार आहे.

बांधवहो, या दोन गोष्टी केल्यानंतर तुमची जबाबदारी येथेच थांबत नाही व तुमच्या कर्तव्याची संख्या येथेच संपत नाही. हीं दोन कर्तव्यें करूनहि तुम्हांस आणखी तीन कर्तव्यें करावयाचीं आहेत. एक वेळ हीं मागील दोन कर्तव्यें तुम्हीं न केलींत तरी चालेल, पण हें तिसरे कर्तव्य कराच करा. राहूं द्या तुमचें शरीर अशक्त. नसूं द्या तुम्हांला ज्ञान. पण तिसरें कर्तव्य केल्याशिवाय मात्र तुम्हांला गत्यंतर नाही. ज्या वेळीं तुम्ही स्वमुखाने 'वंदे मातरम्' अशी गर्जना करतां त्या वेळीं तुम्ही अशी शपथ घेता की, मी हें तिसरें कर्तव्य करण्यास चुकणार नाही. हें तिसरें कर्तव्य म्हणजे 'स्वदेशी माल वापरणें' होय. निर्बल शरीराच्या व ज्ञानशून्य मनाच्या देशभक्ताने ही जबाबदारी पार पाडलीच पाहिजे. ज्या देशांत जन्म घेतला त्या देशाच्या चतुःसीमेंत उत्पन्न होणाऱ्या मालावरच मी शक्य तितका निर्वाह करीन अशी शपथ प्रत्येक देशभक्ताने, 'वंदे मातरम्' हा मंत्र जपणाऱ्या प्रत्येक हिंदी मनुष्याने घेतली पाहिजे. पहिलीं दोन कर्तव्यें एक वेळ न केलीं तरी तें क्षम्य आहे, पण तिसऱ्या संबंधाने

मात्र क्षमा नाही. परदेशांचा माल वापरून स्वतःच्या देशबांधवांना उपाशी मारणाऱ्या खाटकाला क्षमा नाही. स्वदेशांत माल मिळत असतां परदेशी माल वापरणारे निमकहराम लोक हे दुष्काळाचे सख्खे सासरे होत. हे सासरे आपली स्वार्थबुद्धि दुष्काळाच्या हवालीं करून त्याला आपला जावई करून टाकतात. म्हणून शरीर व मन यांच्या पुष्टीकडे दुर्लक्ष केलें तरी एक वेळ चालेल, पण स्वदेशी माल प्रत्येक 'वंदे मातरम्' म्हणणाऱ्या देशभक्ताने वापरलाच पाहिजे. देशबंधूंनो, जर तुम्हांस आतापर्यंत सांगितलेल्या गोष्टींपैकी एकहि गोष्ट करतां येत नसेल तर करूं नका, पण ही चौथी गोष्ट मात्र केल्याशिवाय कधीहि राहूं नका. मागलें कर्तव्य किंवा मागलीं कर्तव्यें न करण्यांत आलीं तरी चालेल, पण प्रत्येकाने पुढील कर्तव्य हें केलेंच पाहिजे. शरीराकडे दुर्लक्ष करा, ज्ञानार्जन व ज्ञानदान करूं नका व देशी माल वापरूं नका. पण हें चौथें कर्तव्य करण्यास मात्र चुकूं नका. हें चौथें कर्तव्य म्हणजे वर्षांतून एक दिवसाची मिळकत मायदेशाच्या उद्धाराकरिता काढलेल्या सार्वजनिक पट्टीला देणें होय. कमी किमतीमुळे किंवा सुबकपणामुळे जर तुमचें चैनी मन परदेशी मालावर लुब्ध झालें तर तें होऊं द्या, पण तुम्ही आपलें एक दिवसाचें उत्पन्न राष्ट्रार्पण कराच करा. या राष्ट्रनिधीमुळे जें राष्ट्रकार्य होईल त्या तुमच्या स्वार्थत्यागाचा दिवसाच्या उत्पन्नाप्रमाणे तुम्हांला अंश निःसंशय मिळेल. देशी माल वापरण्याची बुद्धि न झाली तर निदान वर्षांतून एक दिवसाचें उत्पन्न राष्ट्राला अर्पण करण्यास तुम्ही मागेपुढे पाहूं नका. एक वेळ या चारी गोष्टी तुम्हीं न केल्या तरी चालेल, तरी पण पांचवें कर्तव्य करण्यास तुम्ही केव्हाहि कोणत्याहि स्थळीं व कसल्याहि प्रसंगीं चुकूं नका. शारीरिक बल, ज्ञानदान, देशी माल वापरणें व स्वार्थत्यागाच्या दिवसाचें उत्पन्न देणें या चार कर्तव्यांपैकी एकहि गोष्ट तुम्हीं न केली, तर त्यापासून तुम्हांला फारसा दोष लागणार नाही. पण जर पांचवें कर्तव्य करण्यास तुम्ही विसरला तर मात्र तुम्हांस परमेश्वराच्या दरबारीं कडक शासन झाल्यावांचून राहणार नाही. 'वंदे मातरम्' हा मंत्र मुखावाटें काढणाऱ्या देशभक्ताने हें पांचवें कर्तव्य अवश्य – अवश्यमेव केलें पाहिजे. तें कर्तव्य हें की, त्याने केव्हाहि देशद्रोह करतां कामा नये. मागील चार कर्तव्यें न करून जर देशसेवा करण्याची त्याची इच्छा नसेल, तर निदान त्याने देशद्रोह तरी करतां कामा नये. मागील चार कर्तव्यें न करण्यापासून त्याला जितकें पाप लागेल त्या पापाचें हें निरसन हें एकच कर्तव्य करून होण्यासारखें आहे.

आजपर्यंत हिंदुस्थानवर जीं जीं संकटें आलीं त्या सर्व संकटांचें आदिकारण देशद्रोह होय. म्हणून कांही करतां न आलें तरी निदान हा देशद्रोह तरी करूं नका. ज्या वेळीं 'वंदे मातरम्' असा पंचाक्षरी मंत्र तुम्ही आपल्या मुखावाटें उच्चारतां त्या वेळीं वरती नमूद केलेलीं पांच कर्तव्यें इमानेइतबारें करण्याची तुम्ही शपथ घेतां असें म्हणण्यास हरकत नाही. हीं पांच कर्तव्यें करून जर तुम्ही माणुसकीस जागला तर 'वंदे मातरम्' हा मंत्र उच्चारल्याचें श्रेय व सार्थक झालें. नाही तर एरवी

तुमचा वंदे मातरम्‌चा घोष व फाल्गुन मासांतील अज्ञान बालकांचा फाल्गुनी मंत्राचा घोष या दोहोंची किंमत एकसारखी होय. पण आमचे देशबांधव 'वंदे मातरम्'चा घोष व वरील पांच कर्तव्यें करून भरतभूमीची सेवा करतील अशी आम्हांस बळकट आशा आहे. देव करो व आमच्या आशेची निराशा न होवो !

– भाला, दि. ११ सप्टेंबर १९०८

---

## ३१. महार-मांग

पुरातन काळापासून हिंदी समाजांत चार अथवा पांच मुख्य जाति आहेत. त्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अतिशूद्र होत. पहिल्या चार जातींत जरी उच्चनीच भाव आहेत, तरी त्यांच्यांत स्पर्शास्पर्शासंबंधाने कोणत्याहि प्रकारची भानगड नाही. वेदशास्त्रसंपन्न रामभटजींना नागरबहादूर रामजी पाटलाचा स्पर्श होतांच ते डोक्यावरील पागोटें फेकून देऊन नदीची वाट धरीत नाहीत व त्याचप्रमाणे रामराव किंवा रामशेटहि शूद्राचा विटाळ धरीत नाहीत. मला रस्त्यांत कुणबी शिवला म्हणून आजपर्यंत कोणींहि आंघोळी केलेल्या नाहीत. जरी हिंदु समाजांतील या चार जातींत रोटी-व्यवहार व बेटी-व्यवहार होत नसला, तरी त्यांच्यांत विटाळाचें खेंगटें अजून-पर्यंत तरी शिरलें नाही व तें पुढे शिरण्याचीहि भीति नाही. हिंदु समाजांतील या चार जातींत व इतर गोष्टींत कितीहि उच्चनीच भाव असला, तरी विटाळाच्या बाबतींत त्यांना तक्रार करण्यास मुळीच जागा नाही. पण अतिशूद्रासंबंधाने मात्र तसें म्हणतां यावयाचें नाही. त्यांच्या सामाजिक स्थितीचें चित्र डोळ्यापुढे उभें राहिलें म्हणजे कोणत्याहि सहृदय मनुष्याचें अंतःकरण कळवळल्यावांचून राहणार नाही.

अतिशूद्राचा नुसता स्पर्श झाला की आपला पवित्र देह विटाळतो, अशी कल्पना पहिल्या चार जातींची आहे. नुसता स्पर्शच नव्हे, तर अंत्यज लोकांची सावलीहि आपल्या पुनित देहावर पडूं नये, अशी खबरदारी पहिल्या चार जातींच्या लोकांकडून घेण्यांत येते. महार, मांग, चांभार वगैरे अंत्यज लोकांना इतकें हिडीस समजलें जातें की, एक वेळ रक्तपीति भरलेल्या मनुष्याला वरील चार जातींपैकी कोणताहि मनुष्य शिवेल, पण तो एखाद्या अंत्यजाचें वारेंहि आपल्या अंगावरून फिरूं द्यावयाचा नाही. मनुष्य शौचकूपांत गेला तर अंघोळ करीत नाही, पण जर का त्याला एखाद्या महाराचा स्पर्श झाला, तर मात्र तो मनुष्य सचैल स्नान केल्यावांचून राहत नाही. यावरून शौचकूपांपेक्षाहि महार-मांग लोक नीच ठरले, असें म्हणावयास हरकत नाही. अंत्यज जातींना इतके अंगावर शहारे येण्यासारखें नीचत्व कां आलें हें आम्हांस

कळत नाही. त्यांच्या अंगीं तसेच कांही विशिष्ट दुर्गुण आहेत असें आम्हांस तरी वाटत नाही. अंत्यज लोक माणसें आहेत व त्यांच्यांत पुष्कळ गुणहि आहेत असा वास्तविक प्रकार असतां, त्यांच्या कपाळीं एवढें हृदयविदारक नीचत्व कां आहे, हें एक आमच्यापुढे कोडेंच आहे. अंत्यज लोकांना हें नीचत्व येण्याचीं दोन-तीन कारणें देण्यांत येतात, पण तीं आमच्या मताने समर्पक व समाधानकारक नाहीत.

पहिलें कारण असें सांगण्यांत ये तें की, ते येथील पुरातन अनार्य लोकांचें वंशज आहेत व आर्य लोकांनी त्यांना जिंकल्यापासून जिंकलेले लोक म्हणून त्यांना तुच्छ व अस्पर्श गणण्यांत येऊं लागले. कदाचित् अंत्यज लोक पूर्वीच्या अनार्य लोकांचे वंशज असून ते आर्य लोकांकडून जिंकलेले असतील. पण एवढ्याच क्षुल्लक कारणांवरून त्यांचा स्पर्शहि अपवित्र गणण्यांत यावा, हें माणुसकीचें लक्षण नाही. दुसरें कारण असें देण्यांत येतें की, ते लोक घाणेरडे धंदे करतात व म्हणून त्यांची सावली कोणी घेत नाही. अंत्यज लोकांच्या वांट्याला अत्यंत घाणेरडीं कामें आलीं आहेत ही गोष्ट खरी आहे. पण त्यामुळे त्यांना अस्पर्श कां समजण्यांत यावें बरें ? ही घाणेरडीं कामें कोणीं तरी केलींच पाहिजेत व त्या कामांचा घाणेरडेपणा हीं कामें करीत असेपर्यंतच असतो. मेलेलें जनावर गावाबाहेर ओढून टाकणारा महार तें ओढीत नेत असतांना अस्पर्श धरला गेल्यास त्यांत कांही वावगें नाही. पण जनावर ओढून टाकल्यानंतर व आंघोळ करून स्वच्छ झाल्यावर तो कायमचा अस्पर्श कां राहवा, हें आम्हांस कळत नाही. तिसरें एक कारण असें देण्यांत येते की, हे लोक मेलेल्या गाईचें मांस खातात, म्हणून त्यांना अस्पर्श धरलें आहे. गाय हिंदु धर्माप्रमाणे अत्यंत पवित्र आहे, म्हणूनच कोणत्याहि जातीच्या मनुष्याने तिचें मांस -- मग ती मारलेली असो अथवा मेलेली असो – खातां कामा नये. या नियमाचें उल्लंघन करणारा मनुष्य नुसता अस्पर्श नव्हे, तर त्याज्य होय.

महार-मांग लोक कांहीं कांहीं प्रसंगीं व वेळीं मेलेल्या गाईचें मांस खातात ही खरी गोष्ट आहे. पण ह्यामुळे त्यांना अस्पर्श धरण्यापेक्षा त्यांच्या मनोवृत्ति अशा मांसाचें भक्षण करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणें हेंच जास्त हितकर व श्रेयस्कर आहे. निसर्गनियमाप्रमाणे मेलेल्या गाईचें मांस खाणारे महार-मांग लोक जर अस्पर्श धरले जातात, तर मुद्दाम चैनीसाठी किंवा पोटाची आग विझविण्याकरिता मुद्दाम मारलेल्या गाईचें मांस खाणारे लोकहि अस्पर्श धरले जावेत. पण प्रत्यक्ष अनुभव कांही निराळाच आहे. जर मेलेल्या गाईचें मांस खाणारा रामा महार अस्पर्श धरला जातो, तर मारलेल्या गाईचें मांस मिटक्या मारून खाणारा रहिमुल्लाखान किंवा रॉबर्ट यालाहि तसें कां धरलें जाऊं नये ? रामा महारापेक्षा हे दोघे जास्त गुन्हेगार आहेत. पण प्रत्यक्ष अनुभव असा कांही विलक्षण आहे की, रामा महाराचा धक्का लागतांच 'शिचा शिवला' म्हणून टुण्दिशीं चार हात लांबीची उडी मारणारा शामभटजी रहिमुल्लाखानाला किंवा रॉबर्टसाहेबाला बेलाशक

खेटून जातो. तेव्हा मेलेल्या गाईचें मांस अंत्यज लोक खातात म्हणून ते अस्पर्श धरले गेले आहेत. हें कारण आमच्या मताने चुकीचें आहे. आमच्या मताने या गोष्टीचें खरें कारण फार दिवसांपासून चालत आलेली रूढि होय. आजपर्यंत आपले वाडवडील अंत्यजाचा विटाळ मानीत आले म्हणून आपणहि विटाळ धरावा याच खुळचट समजुतीमध्ये हिंदु समाजांत ही हृदयभेदक व संतापजनक रूढि अजून जिवंत राहिली आहे. जे अंत्यज नसतील त्यांना या रूढीचें विशेष कांही वाटत नसेल; पण त्यांच्या अंत:करणांना या रूढीची तापलेली सळई अहोरात्र पोळीत आहे. त्यांच्या जिवाची तळमळ कशी होत असेल त्याची कल्पना आम्हांस होत नाही व जरी कल्पनाशक्तीच्या साहाय्याने आम्ही ती करूं शकलों, तरी तिचें यथार्थ वर्णन करण्याची शक्ति आमच्या लेखणींत नाही.

हिंदु समाजांतील अंत्यज लोकांच्या स्थितीचा विचार करण्यास सुरुवात केली म्हणजे अंत:करण कळवळतें व त्यांच्याबद्दल एक प्रकारची अभिमानपूरित पूज्य बुद्धि उत्पन्न होते. अंत्यजांनो, महार-मांगांनो व इतर अस्पर्श मानलेल्या लोकांनो, हिंदु धर्माच्या ठिकाणीं तुमची असलेली अढळ श्रद्धा पाहून तुमची जितकी स्तुति करावी तेवढी थोडी होय. हिंदु धर्माच्या ठायीं श्रद्धा राखण्यासारखें हिंदु समाजाने तुमच्याशीं कोणतेंहि वर्तन केलें नसतां तुम्ही त्या धर्माला चिकटून राहिलात हें तुम्हांला अत्यंत भूषणावह आहे. हिंदु समाजांतील इतर जातींनी तुम्हांस तुच्छ लेखिलें असतां तुमचा स्पर्श म्हणजे विटाळ धरला असतां व इतर नाना प्रकारांनी तुमची अवहेलना केली असतां, तुम्ही आपल्या हिंदु धर्माची कास सोडली नाही याबद्दल तुमची प्रशंसा कितीहि केली तरी ती कमीच होणार आहे. धर्मबांधवहो, आजपर्यंत तुमच्याविषयी झालेला अन्याय तुम्ही मोठेंपण करून विसरून जा. मागील काळ तसाच होता म्हणूनहि उघड उघड गोष्ट इतर हिंदु जातींच्या लक्षांत आली नाही. पण आता विसाव्या शतकांत हा अन्याय पूर्वीप्रमाणेच अस्तित्वांत राहील अशी कल्पना तुम्ही स्वप्नांतहि आणूं नका. तुम्ही हिंदुधर्मीय आहांत म्हणून तुम्हांस परधर्मीयांपेक्षा जास्त समतेने व ममतेने वागविलें पाहिजे ही जाणीव इतर जातींच्या मनांत उद्भवूं लागली आहे. पूर्वीच्या साधुसंताच्या मनांत हा ढळढळीत अन्याय आला व म्हणून त्यांनी त्या दिशेने बराच प्रयत्न केला.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या व तुकारामबुवांच्या पालख्यांच्या अग्रभागीं चोखामेळचाची दिंडी असते व या दिंडींत असणाऱ्या अंत्यज लोकांना शिवण्याची खंत इतर जातींना वाटत नाही. पंढरीस जाणाऱ्या पालख्यांच्या समारंभाच्या वेळीं पाळलें जाणारें हें उदार वर्तन इतर प्रसंगीं दाखविलें गेलें नाही ही खेदाची गोष्ट आहे. पूर्वी ज्या कांही चुका झाल्या असतील त्या असोत. पण आता तरी यापुढे अशा चुका न होण्याची खबरदारी इतर हिंदु लोकांनी घेतली पाहिजे. नुकत्याच झालेल्या श्रीगणेशोत्सवांत यंदा ज्या दोन नवीन सुधारणा घडून आल्या आहेत त्या लक्षांत

घेतल्या म्हणजे अंत्यज लोकांना न्याय मिळेल व तो जरूर जरूर मिळालाच पाहिजे असें आम्हांस वाटतें. यंदाच्या श्रीगणेशोत्सवांत पहिली घडलेली गोष्ट म्हटली म्हणजे दे. सय्यद हैदर रेझा यांची गजाननासमोर नाशिक व पुणें येथे झालेलीं व्याख्यानें होत. एका मुसलमानाने – एका परधर्मीयाने श्रीगजाननाच्या मंडपांत व्याख्यान द्यावें व त्याला हिंदुधर्मीयांनी आपली संमति द्यावी ही सुधारणा राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत हितकर आहे. जर श्रीगजाननाच्या मंडपांत अन्यधर्मीय लोकांना मज्जाव नाही तर तो स्वधर्मीय अंत्यजांना नसावा असें आमचें मत आहे. सार्वजनिक उत्सवांत महार-मांगादि लोकांशीं मिळून-मिसळून वागण्यास कांही एक हरकत नाही. हा धडा सोदाहरण रीतीने कोल्हापूरच्या महाराजांनी गेल्या गणेशोत्सवांत घालून दिला आहे. सदरहू उत्सवांत कोल्हापूरच्या महारांच्या गणपतीच्या मंडपांत महाराज आपल्या सर्व सरदार, दरकदार व मानकरी यांसह पानसुपारीस गेले व त्या ठिकाणीं 'विटाळ-विटाळ' ही गोष्ट लक्षांत न घेतां ते मंडपांतील महारांशीं सलोख्याने वागले. कोल्हापूरच्या महाराजांनी हा उत्तम धडा घालून दिला असें म्हणावयास हरकत नाही. हाच धडा इतर ठिकाणीं गिरवीत गेला पाहिजे. यंदा जर श्रीगणेशोत्सवांत एका मुसलमानाचें व्याख्यान होतें तर पुढल्या वर्षीं श्रीगजाननाच्या समोर एखाद्या अंत्यज जातीच्या वक्त्यांचीं भाषणें जरूर झालीं पाहिजेत. मुसलमानांपेक्षा महार-मांगांचा हक्क हिंदु समाजावर जास्त आहे. पण जरकरिता अन्य धर्मीयांना सवलती मिळून त्या स्वधर्मीयांना न देण्यांत आल्या तर मात्र त्यापासून हिंदु समाजाची अत्यंत हानि होणार आहे.

मिशनरी लोकांना येशूच्या कळपांत कोकरें धरून न्यावयास जीं मिळालीं तीं आजपर्यंत बहुतेक अंत्यज जातींतील होत व जर यापुढे या जातींना जास्त उदारपणाने वागविण्यांत न आलें तर बहुतेक करून पांच-पन्नास वर्षांत या जाति हिंदु धर्मांतून अजीबात उठून जातील. कारण हिंदु धर्मांत राहून जो रामा महार अस्पर्श असतो तोच बाप्तिस्मा घेऊन रॉबर्ट हें नामाभिधान पावला की, त्याला मिठ्या मारण्यास कोणत्याहि हिंदु मनुष्याला लाज वाटत नाही. अंत्यज जातींना परधर्मीय लोकांपेक्षा किती कमी उदारपणाने वागविलें जातें याचें एक प्रत्यक्ष उदाहरण आम्हीं डोळ्याने पाहिलें आहे. पुण्यास एक पर्वतीचें देऊळ आहे. हें देऊळ डोंगराच्या माथ्यावर असून पर्वतेश्वराच्या देवळाभोवतीं एक मोठा प्राकार ऊर्फ भिंत आहे. सदरहू भिंतीच्या आंत वाटेल त्या जातीच्या मनुष्याने जोडा, बुट, वहाणा वगैरे घालून बेलाशक आंत जावें, त्याला कोणाचीहि मनाई नाही. नाही म्हणावयास फक्त एका विशिष्ट जातीच्या लोकांनाच मनाई आहे. ब्राह्मणांनी, मराठ्यांनी, कुणब्यांनी, मुसलमानांनी, पारशांनी, ख्रिश्चनांनी सारांश, वाटेल त्या जातीच्या लोकांनी सदरहू हिंदूंच्या देवालयांत बेधडक जावें व त्याला कोणतीहि हरकत नाही. मात्र हिंदुधर्मीय महार-मांगादि लोकांना सदरहू प्राकाराच्या आंत जाण्याची पूर्ण बंदी आहे. केवढा

ह्या अन्याय व 'किती तरी तो असह्य.' गेल्या श्रावणमासीं एका सोमवारीं सदरहू पर्वतेश्वराचें दर्शन घेण्याकरिता आम्ही गेलों असतां पुढील प्रकार आमच्या दृष्टीस पडला व या अन्यायाचें परिमार्जन जर लौकर करण्यांत न आलें तर थोड्याच वर्षांत हिंदु समाज अंत्यज जातींना कायमचा मुकेल, अशी भीति आम्हांस वाटत आहे.

पर्वतीच्या पायऱ्या चढत असतां आमच्यापुढे दोन मुसलमान चालले होते व आमच्या मागून तीन महार येत होते. सदरहू प्राकाराच्या पायऱ्यांपाशीं आम्ही साहीजण आलों. पण तेथे आल्याबरोबर भलतीच गोष्ट नजरेस पडली. केवळ मौजेखातर आलेले ते दोघे मुसलमान बेलाशक आंत शिरले व दरवाज्यावर असलेल्या देवडीवाल्याने त्यांना मज्जाव केला नाही. मात्र आमच्या पाठीमागून येणारे महार पायरीपाशीं थबकले व त्यांनी भक्तिभावाने आपलीं डोकीं पायरीवर ठेवलीं. "अरे, आंत या. तुम्ही हिंदु धर्माचे व पर्वतेश्वर हिंदु धर्माचा. असें असतां तुम्ही येथेच कां थबकतां? ज्यांना हिंदु धर्माविषयी काडीचाहि अभिमान नाही किंवा श्रद्धा नाही असे मुसलमान आंत शिरले असतां तुमचेच पाय पायरीपाशीं कां अडखळताहेत? चला, आंत चला. हिंदूंचा देव सर्व हिंदूंकरिता – मग तो मराठा असो अगर महार असो, ब्राह्मण असो, अथवा चांभार असो." आमच्या तोंडांतून वरील वाक्य ऐकून त्या तीन महारांनी त्या देवडीवाल्याकडे पाहिलें व हिरमुसलीं तोंडें करून ते तसेंच उभे राहिले. आमच्या लक्षांत सर्व कांही ताबडतोब आलें. आम्हीं देवडीवाल्याला सवाल केला व त्याचें उत्तर असें मिळालें की, "महाराज, आंत येण्यास पंतांचा हुकूम नाही." बिचारे ते महार त्या पर्वतेश्वराचें दर्शन न होतां तसेंच माघारे गेले व ते दोन मुसलमान आंत जाऊन खुशाल हवा खात उभे राहिले! हिंदूंच्या देवालयांत हिंदुधर्मीय अंत्यजांना परधर्मीय लोकांप्रमाणे सुद्धा वागविण्यांत येऊं नये, हा ढळढळीत व असह्य अन्याय आहे. धर्माच्या दृष्टीने महार-मांगादि लोक अस्पर्श होत. तर परधर्मीय लोक शतपटींनी जास्त अस्पर्श होत. अस्पर्श मानलेल्या महार-मांगांनी आजपर्यंत हिंदु देवतेची एकहि मूर्ति फोडली नाही व हिंदु धर्मांतील एकहि मनुष्य परधर्मांत नेला नाही. थोडक्यांत लिहावयाचें म्हटलें म्हणजे अंत्यज लोक आपले आहेत व अन्यधर्मीय लोक परकी होत. यामुळे अंत्यजांशिवाय इतर जातींनी त्यांना यापुढे जास्त सढळतेने व सदयतेने वागविलें पाहिजे. त्यांना शिक्षण देण्याचा उपक्रम करून त्यांच्यांत खरा मनुष्यपणा आणण्याची खटपट केली पाहिजे. निदानपक्षीं त्यांना यापुढे अस्पर्श तरी समजतां कामा नये. हिंदुधर्मीय इतर जातींकडून असें वर्तन न झाल्यास अंत्यज लोकांनी अन्य धर्माचा अंगीकार करण्याचा संभव आहे. आजपर्यंत ह्या जातींतील पुष्कळ लोक ख्रिश्चन धर्मांत शिरल्यामुळे या जाति बऱ्याच पातळ झाल्या आहेत. म्हणून जोंपर्यंत सर्वस्वीं नाश झाला नाही तोंपर्यंत डोळे उघडून ही सुधारणा करण्यांत आली पाहिजे. आमचे धर्मबांधव ही गोष्ट लक्षांत घेऊन आम्हीं

वर नमूद केलेली सुधारणा वेळींच घडवून आणतील, अशी आशा प्रदर्शित करून आम्ही या नाजूक विषयाचें विवेचन येथेच थांबवितों.

– भाला, दि. २१ सप्टेंबर १९०८

---

## ३२. हिंदुस्थानच्या उरावर नवीन धोंड

ईस्ट इंडिया कंपनीकडून राणीसाहेबांनी हिंदुस्थानचा राज्यकारभार आपल्या हातीं घेतल्यापासून हिंदी लोकांचा एका बाबतींत अतिशय फायदा झाला आहे. राणीसाहेबांच्या मुत्सद्द्यांनी जाणूनबुजून तो फायदा करून दिला किंवा त्यांच्या हातून तो नकळत झाला, हा प्रश्न सध्या अप्रासंगिक असल्यामुळे, त्याचा विचार करण्याची तूर्त जरुरी नाही. तरी पण इंग्रजी राज्यामुळे एका गोष्टींत आमचा नफा झाला आहे हें कोणालाहि नाकबूल करतां यावयाचें नाही. त्या राज्यामुळे आम्हांस अशी एक वस्तु पैदा झाली आहे की, तिच्या जोरावर आज नाही उद्या, आम्ही आपला राजकीय उद्धार खास करून घेणार व पूर्वीप्रमाणे आर्यभूला ऐहिक सुखसाधनांचें व पारमार्थिक उन्नतीचें माहेरघर बनविणार ! ही वस्तु म्हटली म्हणजे एकराष्ट्रीयत्वाची कल्पना होय. ही कल्पना पूर्वी आमच्यामध्ये नव्हती. निदान ती इतक्या प्रामुख्याने व स्पष्टपणाने तरी वास करीत नव्हती. ह्या कल्पनेने हिंदी लोकांच्या मनोवृत्तींत व महत्त्वाकांक्षेंत प्रचंड क्रांति उडवून दिली आहे. पूर्वी शीख, पंजाबी, मराठे, मद्रासी, बंगाली वगैरे लोक एकमेकांना शत्रुभावाने लेखून फार झालें तर, एखाद्या बुद्धिमान् व कर्तृत्ववान् इसमाच्या नायकत्वाखाली आपआपल्या प्रांताची राजकीयदृष्टच्या प्रगति करण्याविषयी झटत असत. तर हल्ली तेच लोक आपणांस हिंदमातेचीं लेकरें समजून तिच्या भालप्रदेशावर स्वराज्याचा सौभाग्यसूचक कुंकुमतिलक लावण्याकरिता जिवापाड मेहनत करीत आहेत. सारांश, पूर्वीच्या काळीं जर 'व्यक्तिविषयक प्रेमाची व एकनिष्ठेची कल्पना' (Personal attachment) लोकांच्या ठायीं बाणून गेली होती तर अलीकडे तिचें उच्चाटण होऊन 'देशाभिमानाने' (Territorial patriotism) लोकांच्या हृदयमंदिरांत अधिष्ठान केलें आहे. आमच्या मतें हा सर्व इंग्रजी राज्याचा किंवा अगदी बरोबर लिहावयाचें असल्यास पाश्चिमात्य सुधारणेच्या संसर्गाचा परिणाम होय. इंग्रज लोकांनी सुरू केलेल्या शिक्षणपद्धतीमुळे पूर्वकालीन विचारांचा संकुचितपणा व एकदेशीयत्व नाहीसें होऊन त्यांना विशालत्व प्राप्त होऊं लागलें असून देशबंधुत्वाची आणि खंड-बंधुत्वाची कल्पना लोकांच्या मनांत जागृत झाली आहे.

ह्याबद्दल एक प्रकारे आपण इंग्रजी राज्याचे आभार मानले पाहिजेत. पण अशा रीतीने हिंदी लोकांचा इंग्रजी राज्यामुळे जरी नफा झालेला आहे, तरी इतर अनेक बाबतींत त्यांचें अपरिमित नुकसान झालें आहे. त्याला वेळींच आळा न बसल्यास तें राष्ट्र या दृष्टचा नामशेष होऊन जाण्याचा संभव आहे. ह्या नफ्याच्या उलट पारड्यांत तोटयाचें वजन इतकें झालें आहे की, हें पारडें राजकीय अधःपाताच्या खडकावर दाणदिशीं आदळून नफ्याचें पारडें भिंगरीसारखें हवेंत उडून गेलें आहे. "भीक नको पण कुत्रा आवर" असें म्हणण्याची हिंदी लोकांना पाळी आली आहे. जमिनीवरचा जबर कर, देशी उद्योगधंद्यांची अवनति, अधिकारीवर्गाचे उच्छृंखल स्वैराचार, लोकांची उपासमार, युरोपियन कंपन्यांनी चालविलेलें द्रव्यशोषण वगैरे शेकडो गोष्टींमुळे हिंदी लोक चोहोकडून भंडावले असून, कर्झनशाहींतल्या पीछेहाटीच्या कृत्यांनी व वंगभंगापासून अधिकाऱ्यांनी माजविलेल्या दंडेलीने तर लोकांच्या वैतागांत बरीच भर टाकली आहे. एकंदरींत पूर्वी कधीहि झाली नसेल इतकी निकृष्ट अवस्था हिंदी लोकांची सुद्धा झाली असून, दाही दिशांस पसरलेला निराशेचा घनदाट अंधकार त्यांच्या अंतःचक्षूंना दिसत आहे. ह्या अंधकारांत अलीकडे आशेचे किरण चमकूं लागले आहेत. पण लोकांच्या दुर्दैवाने ते दडपून टाकण्याविषयी जारीने प्रयत्न चालले आहेत. ह्याला उपाय काय व ह्या दुःखवीणांतून आपणांस पैलतीरीं नेणार कोण, ह्याविषयी प्रत्येक जण आपल्या मनाला प्रश्न विचारीत आहे.

इंग्रजी राज्यामुळे आपले जे अनेक तोटे झाले आहेत त्यांपैकी सर्वांत मोठा तोटा लष्करी खात्याने केला आहे. येथील लष्करी खात्याचें पोट इतकें अगडबंब आहे की, त्यांत कितीहि पदार्थ कोंबले तरी त्याची खायखाय जिरत नाही. दुष्काळां-तून ओढून काढलेल्या लोकांप्रमाणे त्या खात्याला इतका अधाशीपणा कोठून आला हें आम्हांस कळत नाही. जगांतील इतर राष्ट्रांत लष्करी खातीं आहेत व तीं अंगा-पिंडानेहि चांगलीं दणकट व व मजबूत आहेत. पण तीं इतकी खादाड असल्याचें आमच्या ऐकिवांत नाही. पण येथील लष्करखातें हाडापेराने व प्रकृतीने पिचकट असतांहि खाण्यापिण्याला मात्र गिधाडी असावें हें नवल होय! ज्या ठिकाणीं सुव्यवस्थित समाजव्यवस्था असते तेथे त्या समाजाचें अंतःशत्रूंपासून किंवा पर-चक्रापासून संरक्षण करण्याकरिता लष्करी खातें असलेंच पाहिजे. ह्या नियमाला अनुसरून तेथे तें खातें स्थापन केल्याबद्दल कोणाचाहि मतभेद असूं शकणार नाही. सर्व राष्ट्रांमध्ये हें खातें अस्तित्वांत असून त्याप्रीत्यर्थ लोकांना बराच खर्च सोसावा लागतो. तेव्हा इंग्रज लोकांनी तें सुरू केल्याबद्दल कोणालाहि योग्य व न्याय्य रीतीने त्यांना दोष लावतां येणार नाही. पण येथील लष्करी खात्याच्या आवश्यकते-विषयी जरी मोठासा वाद नसला, तरी त्याची रचना व त्याच्यासाठीं होणारा खर्च ह्याबद्दल मात्र राज्यकर्ते व प्रजाजन ह्यांच्यामध्ये पुष्कळ दिवसांपासून खडाजंगी तंटा माजून राहिला आहे. लष्करी खात्याच्या रचनेकडे नुसती वरवर दृष्टि फेकली

तरी ती इंग्रजी राज्याच्या वारंवार कंठरवाने सांगितलेल्या न्यायबुद्धीवर व समदृष्टीवर कलंक आणणारी आहे असें म्हणावें लागतें. ईस्ट इंडिया कंपनीच्या अमदानींत गोरें व काळें सैन्य ह्यांचें प्रमाण साधारण १:५ ह्याप्रमाणे होतें. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पार्लमेंटच्या कागदपत्रांत १८५६ सालीं गोरें सैन्य ४५१०४ व काळें सैन्य २३५२२१ असलेलें दिलें आहे. पण तेंच गोरें सैन्य वाढतां वाढतां व काळें सैन्य कमी होतां होतां १९०८ सालीं गोऱ्या शिपायांचा आकडा ७५७०२ व काळ्या सैनिकांचा आकडा १४८९९६ असा झाला आहे. म्हणजे पूर्वी एकास पांच ह्या प्रमाणाऐवजीं एकास दोन हें प्रमाण बसविण्यांत आलें आहे.

१८५६ सालाच्या पूर्वी म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकीर्दींत देशांत एकसूत्री राज्यव्यवस्था नसतांना व परचक्राची भीति असतांना त्या वेळच्या इंग्रज मुत्सद्द्यांनी काळ्या-गोऱ्यांत पांचास एक ह्याप्रमाणे प्रमाण ठेवलें होतें. तर हल्ली हिंदुस्थान देश म्हणजे एक भला मोठा 'जनानखाना' झाला असतां व जपान, रशिया, अफगणिस्थान वगैरे राष्ट्रांशीं सलोख्याचे तह झाल्यामुळे परचक्राचा दूरचाहि संभव नसतां, हल्लीच्या मुत्सद्द्यांनी तेंच प्रमाण दोहोस एक इतक्यावर आणून ठेवावें. तेव्हा 'वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा' असेंच म्हणावयास नको काय? ह्यावरून एवढें निखालस सिद्ध होत आहे की, राज्यकर्त्यांच्या मनांत आमच्याविषयी गैरविश्वास उत्पन्न झाला आहे. त्यांचीं मनें इतकीं साशंक कां व्हावींत हें त्यांचें त्यांनाच माहीत; पण आमच्या देशबांधवांच्या हातून राज्यकर्त्यांचा विश्वास उडून जाण्यासारखें एखादें कृत्य झाल्याचें निदान आम्हांस तरी ठाऊक नाही. ज्या लोकांच्या बापजाद्यांनी नुसती भाताची पेज पिऊन व कोणत्याहि गोष्टीचा विचार न करतां साहेबाने हुकूम केल्यावरोबर समोरून येणाऱ्या लोकांवर गोळ्या झाडण्यास कमी केलें नाही, त्यांच्याबद्दल राज्यकर्त्यांच्या मनांत अविश्वास उत्पन्न व्हावा तेव्हा "शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड कशी?" ह्या महाराष्ट्रीय म्हणीची आम्हांस आठवण होते. शिवाय हिंदी सैनिकांची संख्या कमी कमी करण्यांत राज्यकर्त्यांच्या हातून कळत किंवा नकळत हिंदुस्थानचे कधीहि भरून न येणारे नुकसान होत आहे ह्याचाहि त्यांनी विचार करावयास पाहिजे. एखाद्या राष्ट्रांतील संपत्ति धुपून गेली, उद्योगधंदे ठार झाले व त्यामुळे लोकांची अन्नान्नगत झाली तरी एक वेळेस पत्करेल, पण राष्ट्राचा मर्दपणा व पौरुष (Manhood) नाहीसें झालेलें मात्र कधीहि पुरवणार नाही. कारण पहिल्याने राष्ट्राचें शरीर झिजतें, तर दुसऱ्याने राष्ट्रीय मन कुजतें. पहिल्याने राष्ट्राची ऐहिक अवनति होते, तर दुसऱ्याने राष्ट्राची मानसिक अधोगति होते! या दृष्टीने पाहिलें असतां राज्यकर्त्यांचें या बाबतींत गेल्या ५० वर्षांचें धोरण सर्वथैव अक्षम्य ठरत आहे.

काळ्या-गोऱ्या सैनिकांतील प्रमाण जरी दोहोंस एक याप्रमाणे आहे, तरी त्यांच्या खर्चाचें प्रमाण मात्र फारच निराळें आहे. हिंदुस्थानांतील गोरें सैन्य अवघें

पाऊण लक्ष आहे, पण त्याच्याप्रीत्यर्थ दरसाल क्रोडो रुपये उधळले जात आहेत. मनुष्य आपल्या जावयाचा थाट ठेवणार नाही अशा रीतीने सरकार गोऱ्या शिपायांचे चोचले पुरवीत आहे. दुष्काळामुळे प्रजा संत्रस्त होऊन गोळाभर अन्नालासुद्धा महाग झाली असतां, सरकारने तिच्या अंगाला लावलेला लष्करी खात्याचा चरक तसाच चालू ठेवावा हें प्रजावात्सल्याचें लक्षण नाही. सरकारला आम्ही असें विचारतों की, हिंदुस्थानचें संरक्षण करणें एवढीच तुमची इच्छा आहे ना? तर मग आम्ही हिंदी लोक तें काम मोठ्या हौसेने व आनंदाने आपल्या शिरावर घेतों. तुम्ही देशांतील व्यवस्था पहा व आम्ही बाहेरील शत्रूंचा समाचार घेतों व तो आता होत आहे त्याच्या निम्म्या खर्चांत घेतों. हत्यारांचा कायदा रद्द करून तुम्ही हें काम आमच्यावर सोपवून द्या. हत्यारें बाळगण्याची परवानगी दिल्यास आम्ही एक-मेकांचे गळे कापूं या म्हणण्यांत जीव नाही. पूर्वी ज्या वेळेस आमच्याजवळ हत्यारें होतीं त्या वेळेस आम्हीं विनाकारण रक्तपात व कापाकापी केल्याचें इतिहास सांगत नाही. मग जी गोष्ट पूर्वी घडली नाही ती पुढे घडेल असें समजण्यास आधार काय? वरील जबाबदारी आम्ही आपल्याकडे घेतों. तिजमुळे तुमचा त्रास चुकेल व आमच्यांतील नष्टप्राय होत असलेलें तेज पुन्हा चमकूं लागेल. पण आमचें हें म्हणणें सरकारला पसंत पडणार नाही हें दारिद्र्याच्या पंकांत आधीच गळ्यापर्यंत बुडा-लेल्या हिंदुस्थानच्या गळ्यांत जी नवीन धोंड बांधण्यांत आली आहे तिजवरून दृष्टोत्पत्तीस येईल.

हिंदुस्थानचें संरक्षण करण्यासाठी इंग्लंडमध्ये सोजिरांची भरती करण्यांत येऊन त्यांना लष्करी शिक्षण देण्यांत येतें. त्याप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाच्या वांटणी-बद्दल स्टेट-सेक्रेटरी व इंग्लंडचे लष्करी खातें यांच्यामध्ये बराच वांधा पडला होता. हिंदुस्थानने दरवर्षी दीड कोट रुपये दिले पाहिजेत असें लष्करी खात्याचें म्हणणें होतें, तर भारतांतील सोजिरांचा खर्च इंग्लंडने सोसावा असें स्टेट-सेक्रेटरींनी त्याला कळविलें. अशा रीतीने अनेक वेळा पूर्वपक्ष व उत्तरपक्ष झाल्यावर हा वाद मिटविण्याकरिता गेल्या हिवाळ्यांत रोमर कमिटीची योजना करण्यांत आली व त्या कमिटीने हिंदुस्थानवर दरसालचा ४५ लक्षांचा बोजा लादल्याविषयी व मोर्ले-साहेबांनी तो कबूल केल्याविषयी प्रसिद्ध झालें आहे. एवढेंच नव्हे तर, आता कितीहि जंगजंग पछाडलें तरी तो एका पैनेहि कमी केला जाणार नाही, असेंहि जाहीर करण्यांत आलें आहे. गरीब बैलाच्या पाठीवर आणखी दोन गोण्या लादण्यांत येतात असा जरी जगाचा न्याय असला, तरी मिल्ल, मिल्टन, ग्लॅडस्टन वगैरे लोकांच्या संगतींत आयुष्याचीं बहुतेक वर्षे घालविलेल्या पंडित, तत्त्वज्ञानी व उदारमतवादी मोर्लेसाहेबांना या प्रकरणांतील ढळढळीत अन्याय दिसून येऊं नये व तो त्यांनी मुकाट्याने कबूल करावा हें आश्चर्य होय. पण यांत आश्चर्य तरी कसलें? हिंदुस्थानचा सांपत्तिकदृष्ट्या निचरा करावयाचा असाच जेथे उद्देश, तेथे त्याच्या उरावर ही

४५ लाखांची नवीन धोंड ठेवण्यांत यावी हें अगदी साहजिक आहे! पण या व असल्याच प्रकारच्या दुसऱ्या अनेक कृत्यांवर तोड काय? आमच्या मताने यावर एकच तोड आहे व ती 'स्वराज्याची प्राप्ति' ही होय. आमची अशी बालंबाल समजूत आहे की, आमच्या देशबांधवांना स्वराज्य संपादन झाल्याशिवाय त्यांना सुखाचे दिवस दिसावयाचे नाहीत व त्यांच्या मातृभूमीची चाललेली दैना बंद पडणार नाही व हें केव्हाहि ठरलेंच आहे की, साहसावांचून संपत्ति मिळत नाही व स्वार्थ-त्यागावांचून स्वराज्य प्राप्त होत नाही! म्हणून बांधवहो, स्वार्थत्याग करा, दगदग सोसा व स्वराज्याची जोड करून घ्या.

– भाला, दि. १ ऑक्टोबर १९०८

---

## ३३. एक नोव्हेंबर

सन १८५८ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस हिंदुस्थान-वासी लोकांना इंग्रज सरकारकडून एक राजकीय हक्कांची सनद अथवा ताम्रपट मिळाला आहे. हिंदी लोकांना हा ताम्रपट मिळण्याचें कारण जगविख्यात आहे. सन १८५७ सालीं उत्तर हिंदुस्थानांत बंडाचा वणवा भडकून तो नऊ महिने एक-सारखा धडधडत जळत होता. हा वणवा पुरा विझवून टाकण्याच्या उद्देशाने ह्या सन-देची मुसळधार त्याजवर धरण्यांत आली व सरकारने मनांत योजल्याप्रमाणे कार्य-भाग उरकून गेला. अगोदरच्या वर्षभर संतप्त झालेलीं लोकांचीं मनें ह्या सनदेंतील आश्वासनांनी व अभिवचनांनी शांत झालीं. शांततेच्या मार्गांनी आपली राजकीय उन्नति घडून येईल अशी लोकांना आशा वाटली. ह्या आशेच्या जोरावर लोकांनी पुरीं पन्नास वर्षें कंठलीं आहेत. आज नाही उद्या, उद्या नाही परवा, परवा नाही तेरवा, यंदा नाही पुढच्या वर्षी सरकार आपली आशा सफल करील अशी हिंदी लोकांची समज होती. पण दुःखाची गोष्ट ही की, सरकारी सहानुभूतीच्या अभावामुळे ह्या आशेची वल्ली करपून गेली. जाहीरनाम्यांत म्हटल्याप्रमाणे सरकारने गेल्या पन्नास वर्षांत हिंदी लोकांना कांही विशेष भरीव हक्क दिले आहेत, असें सरकारचीं तरफ-दारी करणाऱ्या इसमालाहि म्हणतां यावयाचें नाही. 'देऊ' ह्या दोन अक्षरांनी सर-कारच्या गेल्या पन्नास वर्षांतील राजकीय धोरणाचें उत्तम तऱ्हेने वर्णन करतां येण्या-सारखें आहे. भविष्यकाळ सरकारला इतका प्रिय आहे की, तें नेहमी त्याच काळांत बोलतें व लिहितें. ज्या लोकांना कधीहि कांही दुसऱ्याला द्यावयाचें नसतें, त्यांचा जीवश्चकंठश्च मित्र म्हटला म्हणजे भविष्यकाळ होय. सावकाराचें कर्ज न देऊं

इच्छिणाऱ्या कुळाचा मित्र हा भविष्यकाळ आहे. " अरे, माझें मुद्दल व व्याज देतोस ना, " असा प्रश्न सावकाराने केल्याबरोबर तें देण्याची अंतर्यामीं इच्छा नसलेला ऋणको नेहमी भविष्यकाळाची कास धरतो. " अरे, परीक्षा जवळ आली, म्हणून अभ्यास करतोस ना, " असा प्रश्न शिक्षकाने केल्यावर मनांत अभ्यास न करण्याची इच्छा असलेला विद्यार्थी भविष्यकाळाच्या पाठीशीं जाऊन लपतो. त्याचप्रमाणे " मायबाप सरकार, बोलल्याप्रमाणे आम्हांस हक्क देतां ना, " असें टुमणें लावणाऱ्या प्रजेला मनांत कांही एक देण्याची इच्छा नसलेलें सरकार 'देऊं' ह्या द्वयाक्षरी मंत्राचा जप करून भविष्यकाळची उपासना करतो. सारांश, ज्याप्रमाणे न कर्त्याचा वार शनिवार त्याप्रमाणे न देणाराचा काळ भविष्यकाळ होय ! आमचें दयाळु व प्रजावत्सल सरकार या भविष्यकाळावर इतकें फिदा झालें आहे की, तुम्ही त्याच्याजवळ कांही मागा, तें आपलें ह्या काळांत नेहमी उत्तर देणार. वास्तविक रीतीने प्रजावत्सल सरकारच्या भविष्यकाळपूर्ण उत्तरांवर विश्वास ठेवून राज्यनिष्ठ हिंदी प्रजेने स्वस्थ बसावयास पाहिजे. पण हिंदी लोक अलीकडे पाश्चात्त्य विद्येच्या संस्काराने लबाड झाले असल्याकारणाने त्यांचा भविष्यकाळावरील विश्वास उडाला असून ते सरकारला वर्तमानकाळांत बोलण्याचा आग्रह करूं लागले आहेत. सरकारच्या 'देऊं' ह्या उत्तराचा त्यांना वीट आला असून ते सरकारला 'द्या' असें म्हणत आहेत. सरकारचा वर्तमानकाळ विशेष लाडका नसल्यामुळे किंबहुना तो नावडता असल्यामुळे तें प्रजाजनांवर नाखूष झालें आहे. उलटपक्षीं प्रजाजनांचा सरकारच्या अभिवचनांवरील विश्वास उन्हांत ठेवलेल्या बर्फाप्रमाणे विरघळून गेला आहे. तीन वर्षांपूर्वी उभय पक्षांची मानसिक स्थिति अशी झाली असल्यामुळे सरकार व प्रजाजन ह्यांच्यामध्ये प्रत्यक्ष खटका केव्हा उडून जाईल ह्याचा कांही नेम नव्हता. दोन्ही पक्ष अगदी हातघाईवर आले होते. अशा स्थितींत लॉर्ड कर्झनसाहेबांना कुबुद्धि झाली व त्यांनीं वंगभंगाचा ठराव प्रसिद्ध केला.

ग्रीष्म ऋतूंतील उन्हाने तापलेल्या दारूवर ठिणगी पडली असतां ती जशी एकदम भडकते, त्याप्रमाणे पन्नास वर्षांच्या नैराश्याच्या उन्हाने तापलेलीं हिंदी लोकांचीं मनें एकदम भडकलीं. ह्या भडक्याचा परिणाम उभय पक्षांना अनिष्टकारकच झाला. सरकारचें तर ह्या भडक्यामुळे अतिशय अकल्याण झालें आहे. इंग्रजी राज्याचा मुख्य पाया जो प्रजेचा संतोष तो ह्या भडक्यामुळे पार खचून गेला आहे. उलटपक्षीं सरकारचा रोष प्रजाजनांवर होऊन ते त्याच्या माऱ्याखाली दीन झाले आहेत. सन १९०५ सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या सोळा तारखेस हिंदुस्थान सरकारने नुसताच वंगभंग केला नसून, त्याच्याबरोबर त्याने हिंदी लोकांच्या मनांत सरकारविषयी वसत असलेल्या प्रेमाचाहि भंग करून टाकला. वंगभंगामुळे आठ कोटि बंगाली लोकांचींच मनें असंतुष्ट झालीं नसून, सरकारच्या बेगुमानपणाच्या वर्तनामुळ सर्व हिंदी लोकांची मनें असंतुष्ट व संतप्त झालीं आहेत. उभयपक्षीं असा

प्रकार झाल्यामुळे राजा व प्रजा यांच्यांत जर वारंवार खटके उडाले, तर त्यांत नवल नाही. ज्याप्रमाणे लॉर्ड डलहौसीसाहेबाने संस्थानिकांच्या जुन्या घराण्यांचा भंग करून सन १८५७ सालाच्या बंडाला आमंत्रण केलें त्याप्रमाणेच कर्झनसाहेबाने वंग देशाचा भंग करून सन १९०५ सालाच्या दुसऱ्या बंडाला आमंत्रण केलें. सन १८५७ चें बंड व सन १९०५ सालचें बंड, ह्या दोहोंत जमीनअस्मानाचें अंतर आहे. पन्नास वर्षांच्या पूर्वीचें बंड बहुतांशीं धर्मवेडामुळे झालें, तर हें हल्लीचें बंड देश-वेडामुळे सुरू झालें आहे. सन १८५७ सालचें बंड सशस्त्र होतें, तर सन १९०५ सालाचें बंड निःशस्त्र आहे. तें बंड कांही विवक्षित संस्थानिकांनी सुरू केलें, तर ह्या आधुनिक बंडाचा झेंडा सुशिक्षित देशभक्तांनी उभारला आहे. तें बंड ९ महिन्यांनी मोडलें गेलें, तर हें बंड स्वराज्यप्राप्तीशिवाय शांत होण्याचा संभव नाही. त्या बंडांतील बंडखोरांचा इंग्रजी सत्तेचें जूं झुगारून देण्याचा बेत होता, तर ह्या बंडांतील लोकांचा त्या जोखडाखाली स्वराज्याची मऊ गादी घालण्याचा बेत आहे. त्या बंडांत समशेरी, भाले व तोफा ह्यांचा उपयोग करण्यांत आला, तर ह्या बंडांत स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ह्यांचा उपयोग करण्यांत येत आहे. सारांश, इंग्रजी कायद्याच्या दृष्टीने तें बंड पूर्ण बेकायदेशीर होतें, तर त्याच कायद्याच्या दृष्टीने हें बंड पूर्ण कायदेशीर आहे. तीन वर्षांपूर्वी सुरू झालेलें, हल्ली चालू असलेलें व स्वराज्याची प्राप्ति होईपर्यंत चालू राहणारें असें हें लाडकें बंड मोडणें किंवा तें हल्ली आहे तसेंच चालू ठेवणें, ही सर्वस्वीं सरकारच्या हातांतील गोष्ट आहे. बरोबर पन्नास वर्षांपूर्वी सन १८५८ च्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस सरकारने इतिहासप्रसिद्ध जाहीरनामा काढून १८५७ सालाच्या बंडाचा बीमोड करून टाकला, तर येत्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस पुन्हा दुसरा एक जाहीरनामा काढून सरकारने प्रस्तुत बंडाचीं पाळेंमुळें खणून टाकावींत. हल्लीचें कधी न मोड-णारें बंड अजीबात मोडून टाकण्याची सुसंधि सरकारला अनायासें मिळाली आहे. येत्या नोव्हेंबरची पहिली तारीख ही बरोबर पन्नास वर्षांनी आली असल्यामुळे १८५८ सालाच्या जाहीरनाम्याची जयंती सरकारने अवश्य करावी, अशी आमची सरकारला विनंती आहे.

जाहीरनाम्याची जयंती करण्यासाठी कोठे राजनिष्ठ भोजनें करण्याची तर कोठे राजनिष्ठाप्रदर्शक सभा भरविण्याची खटपट चालू आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेस लष्कराच्या कवायती होतील, तोफा सुटतील, बंदुकीच्या फैरी झडतील, औपचारिक तारा होतील व सुग्रास पण बेचव मेजवान्या झोडल्या जातील, पण जाहीरनाम्याची जयंती साजरी करण्याची ही खरी तऱ्हा नाही. नुसता सुंठवडा फाकून ज्याप्रमाणे खरी रामनवमी साजरी होत नाही, त्याप्रमाणे नुसतीं दारूचीं ग्लासें झोकून जाहीरनाम्याची जयंती खऱ्या रीतीने साजरी होणें शक्य नाही. ही जयंती होऊन इंग्रजी न्यायबुद्धीचा जयजयकार व्हावा अशी जर इंग्रज लोकांची

इच्छा असेल, तर त्यांनी ह्या वेळीं मोठें मन करून हिंदी लोकांना कांही तरी भरीव हक्क दिले पाहिजेत. असें जर होईल तरच ह्या जयंतीचा कांही तरी उपयोग आहे, नाही तर विनाकारण तोफांच्या धुरांत व दारूच्या बाटल्यांच्या फेसांत पैशाचा अपव्यय होऊन जाईल. मोर्लेसाहेब या जयंतीच्या दिवशीं कांही सुधारणा करणार आहेत, अशी फार दिवसांपासून बोलवा आहे. या सुधारणांचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे हें अजून बाहेर आलें नाही. पण त्यांच्या स्वरूपाचें जें वर्णन चोरून-मारून बाहेर पडलें आहे त्यावरून त्या सुधारणा ऐकून लोकांची निराशा होण्याचा वराच संभव आहे. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांत कांही जास्त सभासद नेमणें किंवा प्रांतिक सरकारांना किंवा हिंदुस्थान सरकारला सल्लामसलत देण्यासाठी सल्लागार मंडळें नेमणें वगैरे सुधारणा खऱ्या नाहीत व त्यांपासून हिंदी लोकांचें खरें हितहि होणार नाही, असें आमचें स्पष्ट मत आहे. ज्या सुधारणांमुळे सरकारी अधिकाऱ्यांच्या अनियंत्रित सत्तेला आळा बसण्याचा संभव नाही अशा सुधारणा झाल्या काय किंवा न झाल्या काय, सारखेंच ! लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांत लोकांना जास्त सभासद निवडून देण्याचा हक्क द्यावयाचा व या सभासदांनी कौन्सिलांत जाऊन फक्त बडबड करावयाची यापासून हल्लीपेक्षा हिंदी लोकांचें जास्त हित कोणतें होईल याची कल्पना आम्हांस होत नाही. अशा पोकळ हक्कांनी कांही दुधखुळ्या हिंदी लोकांचें समाधान होईल; पण त्यामुळे चौकस हिंदी देशभक्तांचें अल्पहि समाधान होणार नाही. जर मि. मोर्ले यांच्या मनांतून हिंदी लोकांना अंतर्यामीं संतुष्ट करावयाचें असेल, तर त्यांनी आम्हीं खाली नमूद केलेल्या तीन सुधारणा घडवून आणाव्यात व हिंदी लोकांचा दुवा संपादन करावा.

जाहीरनाम्याच्या जयंतीच्या दिवशीं सर्वांच्या अगोदर सरकारने एक गोष्ट करावी. गेल्या तीन वर्षांपासून पुष्कळ हिंदी देशभक्त कारागृहांत गेले आहेत व त्यामुळे लोकांचीं मनें असंतुष्ट झालीं आहेत. वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे या देशभक्तांना विनाकारण तुरुंगांत कोंवण्यांत आलें आहे. जर जाहीरनाम्याची जयंती हिंदी लोकांना सुखविण्याकरिता साजरी करण्यांत येणार असेल, तर तें सुख त्यांना अशा देशभक्तांना सोडून देण्यांत आल्यापासून निःसंशय होईल. आपल्यासाठी कायावाचामनेंकरून धडपडणारे पुढारी कारागृहांतून सुटलेले पाहून कोणास आनंद होणार नाही बरें ? दे. लियाकत हुसेन, दे. चिदंबर पिले, दे. फडके, लो. परांजपे व ज. बळवंतरावजी टिळक वगैरे लहानमोठ्या देशभक्तांना पंक्तिप्रपंच न करतां व अटी न घालतां या जयंतीच्या दिवशीं मुक्त करण्यांत यावें. मि. मोर्ले यांनी उदारपणा दाखवून जर हें सत्कृत्य घडवून आणलें, तर पुढील इतिहासांत त्यांचें नांव उदारपणाबद्दल सुप्रसिद्ध राहील. हल्ली तुरुंगांत कुजत पडलेले देशभक्त सोडून दिल्यावर इंग्रजी राज्यावर एखादा मोठा अनर्थ कोसळेल असें कांही नाही. उलट मायेच्या माऱ्याने मनुष्य इतका चीत होतो की, असा मारा सुरू झाला म्हणजे वर डोकें काढ-

ण्याची सोय नसते. ज. टिळकांना इतर कैद्यांप्रमाणे साबरमतीच्या तुरुंगांत राबविण्यांत आलें नाही ही बातमी ऐकल्याबरोबर त्यांच्या देशबांधवांना किती तरी बरें वाटलें ? म्हणून अशा आनंदाच्या दिवशीं सर्व राजकीय कैद्यांना सोडण्यांत येऊन सरकारने जिकडे-तिकडे आनंदीआनंद करून टाकावा. राजकीय कैद्यांची मुक्तता केल्यावर सरकारने उदार होऊन व मनांत कोणताहि किंतु न धरतां हत्यारांचा कायदा रद्द करून टाकावा. जे लोक निःशस्त्र आहेत ते कुचकामाचे होत. निःशस्त्र अतएव नादान लोकांच्या हातून कोणतीहि प्रगति होऊं शकत नाही. हत्यारांचा कायदा रद्द करण्यांत यावा असें आम्हीं म्हटल्याबरोबर कोणीहि गडबडावयास नको. प्रजा सशस्त्र झाली म्हणजे ती बंडखोर होऊन सरकारच्या उलट उठेल असाच कांही नियम नाही. उलट सशस्त्र प्रजा एक प्रकारें सरकारचें आयत्या वेळीं उपयोगी पडणारें शिलकी सैन्य होय. म्हणून सरकारने कोणतीहि अढी मनांत न धरतां हत्यारांचा कायदा रद्द करून मनुष्यांतून उठलेल्या हिंदी लोकांना पुनरपि मनुष्यांत आणून सोडावें. या दोन सुधारणा केल्यावर सरकारने भावी स्वराज्याचा बयाणा म्हणून हिंदी लोकांना शंभर प्रतिनिधींचें एक पार्लमेंट द्यावें. या पार्लमेंटच्या हातांत लागलीच सर्व राज्यसत्ता देण्यांत यावी असें आमचें म्हणणें नाही. सरकारने लष्कर आपल्या ताब्यांत ठेवावें, पण कायदे करण्याचा व कर बसविण्याचा अधिकार या पार्लमेंटला देण्यांत यावा.

इंग्लंडांत ज्याप्रमाणे सामान्य लोकांची सभा आहे त्याचप्रमाणे हें हिंदी पार्लमेंट असावें. सरकारी अधिकाऱ्यांची हिंदुस्थानांतील 'बड्या लोकांची सभा' करण्यांत यावी व या बड्या लोकांच्या सभेची व स्टेट सेक्रेटरीची संमति मिळाल्याशिवाय हिंदी पार्लमेंटने पसार केलेले कायदे अमलांत येऊं नयेत. याप्रमाणे जर व्यवस्था करण्यांत आली, तरच जाहीरनाम्याची जयंती समर्पक रीतीने साजरी करण्यांत आली असें म्हणतां येईल. असें करण्यांत आलें म्हणजे सरकारला असें म्हणतां येईल की, सन १९०८ सालाच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस स्वराज्याचे हक्क देण्यास आम्हीं सुरुवात केली आहे व १९५८ सालाच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस हिंदी लोकांना पूर्ण स्वराज्य आम्ही आनंदाने देऊं. येत्या नोव्हेंबरांत हक्क देण्यास सुरुवात करा व १९५८ च्या नोव्हेंबरांत त्याची समाप्ति करा. मि. मोर्ले आपल्या उदारमतवादित्वाला जागून असा उपक्रम करतील अशी आम्हांस आशा आहे. जर त्यांनी या आशेचा भंग केला तर हिंदी लोकांना स्वराज्याची प्राप्ति होईल. पण इतिहास असें म्हणेल की, हिंदी लोकांना स्वराज्य मिळालें नसून तें त्यांनी मिळविलें आहे !

— भाला, दि. २१ ऑक्टोबर १९०८

# ३४. दोन जाहीरनामे

किती तरी आतुरतेने हिंदी लोकांचे डोळे नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस प्रसिद्ध झालेल्या जाहीरनाम्याकडे लागले होते. लोकांना असें वाटत होतें की, बादशहाकडून या वेळीं तरी कांहीं भरीव हक्कांची प्राप्ति होईल, पण अथपासून इतिपर्यंत सबंध जाहीरनामा वाचला, तरी त्यांत एका गोष्टीशिवाय दुसरी कोणतीहि गोष्ट निश्चितपणें नमूद केली नाही. ५८ सालीं प्रसिद्ध झालेला जाहीरनामा ज्याप्रमाणे मोघम स्वरूपाचा होता, तितकाच किंबहुना काकणभर जास्त मोघम ८ सालाचा बादशाही जाहीरनामा अथवा निरोप आहे. नुसत्याच शब्दसंपत्तीने ज्या लोकांचीं मनें संतुष्ट होत असतील, त्यांना या दोन्ही जाहीरनाम्यांपासून शाब्दिक संपत्तीचा मोठा लाभ होईल. पण नुसता "बोलाचा भात खाऊन व बोलाची कढी ओरपून" ज्या हिंदी लोकांच्या राजकीय क्षुधा शांत होत नाहीत, त्यांची या जुन्या जाहीरनाम्याच्या नव्या सुधारलेल्या आवृत्तीने पूर्ण निराशा झाली आहे. इंग्रज लोकांच्या स्वभावाचें यथार्थ ज्ञान ज्या वेळीं हिंदी लोकांना झालें नव्हतें त्या वेळीं असले जाहीरनामे उपयोगी पडत असत. पण पन्नास वर्षांच्या निकट परिचयामुळे असले जाहीरनामे असंतुष्ट अंत:करणें संतुष्ट करूं शकणार नाहीत. ५७ सालचें बंड बहुतेक मोडलें गेलें होतें, तरी ज्या वेळीं लोकांचीं क्षुब्ध झालेलीं मनें पुरी शांत झालीं नव्हतीं, अशा वेळीं ५८ चा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला व तसला जाहीरनामा पहिलाच असल्यामुळे त्या वेळच्या लोकांचीं अंत:करणें एकाएकी शांत होऊन भावी उन्नतीची आशा त्यांना वाटूं लागली. ५८ सालाच्या जाहीरनाम्याच्या शेवटीं जीं तीन उदात्त तत्त्वें गोवण्यांत आलीं आहेत तीं जर पूर्णपणें नव्हे, पण अंशत: तरी पाळण्यांत आलीं असतीं, तर त्या जाहीरनाम्याच्या ज्युबिलीच्या दिवशीं हिंदुस्थानांत जिकडेतिकडे आनंदीआनंद झाला असता. लोकांनी आपणहून – मारून-मुटकून नव्हे – दीपोत्सव केले असते व आभारदर्शक सभा भरविल्या असत्या. पण ५८ सालापासून तो आठ सालापर्यंत पन्नास वर्षांचा अनुभव गोड नसून तो अत्यंत कडू आहे. ५८ सालाच्या जाहीरनाम्यांतील ज्या तीन तत्त्वांचा उल्लेख आम्हीं केला आहे तीं तत्त्वें ही की, "हिंदी लोकांची भरभराट हीच आमची शक्ति होय, त्यांचा संतोष हाच आमचा सुरक्षितपणा व त्यांची कृतज्ञता हेंच आमचें उत्तम बक्षीस

होय." किती तरी उदात्त हीं तत्त्वें ! पण तत्त्वें नुसतीं उदात्त असून उपयोग नाही. उदात्त तत्त्वांबरहुकूम उदार कृति जर असेल तरच उत्तम कार्यनिष्पत्ति होईल. पण खरें व स्पष्ट लिहावयाचें म्हटलें म्हणजे ख्रिस्तलोकवासी राणीसाहेबांच्या अंत:करणांतील हेतु त्यांच्या हाताखालील प्रधानांनी व अधिकाऱ्यांनी तडीस नेलेला नाही. ५८ सालाच्या जाहीरनाम्यांत प्रदर्शित केलेले हेतु सिद्धीस गेले आहेत, पण त्यांचीं कारणें फार निराळीं आहेत.

इंग्रज सरकारची शक्ति अत्यंत वाढली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण या वाढीचें कारण हिंदी लोकांची भरभराट नसून आधुनिक मारक हत्यारांचा शोध होय. इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत निर्भय व निर्धास्त झालें आहे. पण हा परिणाम हिंदी लोकांच्या संतोषाचा नसून त्यांच्या राष्ट्रीय दुबळेपणाचा आहे. इंग्रज लोकांना हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याबद्दल बहुमोल बक्षीस मिळत आहे, पण हें बक्षीस हिंदी लोकांची कृतज्ञता नसून त्यांच्यापासून हरप्रयत्नाने व हरतऱ्हेने दरवर्षी मिळणाऱ्या ५०–६० कोटि रुपयांची रक्कम होय ! ५८ सालच्या जाहीर-नाम्यांत कोमल अंत:करणाच्या राणीसाहेबांनी प्रदर्शित केलेल्या इच्छा कोणीकडे व त्या इच्छांविरुद्ध गेल्या ५० वर्षांतील येथील अधिकाऱ्यांचें वर्तन कोणीकडे ! १८५८ सालाच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेपर्यंत हिंदी लोकांच्या राजकीय जमाखर्चाचा हिशेब केला तर, जमेच्या बाजूस फक्त एकच रक्कम आढळून येईल व खर्चाच्या बाजूच्या रकमांना अंतच नाही. जमेच्या बाजूच्या रकमेपासून तूर्त प्रत्यक्ष फायदा नाही, तरी पण कालेकरून तो होण्यासारखा आहे. ही जमेच्या बाजूची रक्कम म्हटली म्हणजे एकराष्ट्रीयत्वाची कल्पना होय. इंग्रजी राज्यामुळे काश्मीर-पासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत मायदेशाची कल्पना येऊं लागली आहे व भावी उन्नतीची जी कांही थोडीबहुत अंधुक अंधुक आशा हिंदी लोकांना वाटत आहे ती या कल्पनेच्या जोरावर होय. जमेच्या बाजूला ही एवढीच रक्कम असून खर्चाच्या बाजूच्या रक्कमा एवढ्या अगडबंब व असंख्यात आहेत की, त्या सर्वांचा नामनिर्देश करणें अशक्य आहे. त्या सर्वांची कल्पना सम्यक् तऱ्हेने कोणास पाहिजे असेल, तर आम्ही एवढेंच सांगतों की, खर्चाच्या बाजूला 'गुलामगिरी'ची रक्कम पडली आहे. या एका रकमेंत किती पोटरकमा साठविल्या आहेत हें जाणून घेण्याचें काम ज्याच्या त्याच्या कल्पनाशक्तीचें आहे.

हिंदी लोक 'गुलाम' आहेत असें म्हटल्याबरोबर त्यांच्या राजकीय दु:खांची व व अवनतीची कहाणी साद्यंत सांगत बसण्याची जरुरी नाही. गुलाम बनविण्यांत आलेल्या हिंदी लोकांना हळूहळू स्वतंत्र लोकांच्या पदवीला आम्ही नेऊं अशीं आश्वासनें आज ५० वर्षें देण्यांत आलीं आहेत. पण लिहिण्यास दु:ख वाटतें की, ती एकलक्षांशाने देखील कृतींत उठलेलीं नाहीत. जाहीरनाम्यांत दिलेल्या आश्वा-सनांप्रमाणे कृति केली जाईल अशी आशा धरून हिंदी लोकांनी कशीबशीं ५० वर्षें

कंठलीं आहेत. पण ५० वर्षांच्या अवधीनंतर लोकांची निराशा अत्यंत तीव्र झालेली आहे. अशा आणीबाणीच्या वेळीं बादशहाकडून येणारा निरोप स्पष्ट व निश्चित स्वरूपाचा असावयास पाहिजे होता; पण सर्व निरोप अथपासून इतिपर्यंत वाचून पाहिल्यानंतर त्यांत रोखठोक व खडखडीत असें कांहीच नाही. नाही म्हणावयास एका गोष्टीसंबंधाने मात्र मुळीच मोघमपणा नाही. हा स्पष्टपणा फक्त कटवाल्यां-संबंधाने मात्र आहे. त्यांना सरकारकडून त्यांच्या गुन्ह्याच्या मानाने कडक शासन दिलें जाईल एवढी गोष्ट मात्र स्पष्टपणाने नमूद केलेली आहे. एवढ्या एका गोष्टी-शिवाय बाकी सर्व गोष्टींबद्दल अघळपघळ मोघमपणा व दिखाऊ मोहकपणा दिसत आहे. कटवाल्यांना उचित दिसेल तें शासन करा, पण बिनकटवाल्यांना आतापर्यंत काय देण्यांत आलें व पुढल्या ५० वर्षांत काय देण्यांत येईल, हें जर स्पष्ट रीतीने नमूद करण्यांत आलें असतें, तर फार उत्तम झालें असतें. १९५७ सालीं ज्या वेळीं १८५७ सालाच्या जाहीरनाम्याचा शतसांवत्सरिक उत्सव करण्यांत येईल त्या वेळेपर्यंत इतके इतके हक्क आम्ही हिंदी लोकांना देऊन टाकू असें जर बादशहांच्या निरोपांत नमूद केलें असतें, तर या निरोपाचें महत्त्व हिंदी लोकांना कांही तरी वाटलें असतें. पण अशा तऱ्हेचें निरोपांत एकहि अवाक्षर नाही. "हिंदी लोकांना वसाहतीचें स्वराज्य १९५७ च्या आंत देण्याचा आमचा दृढनिश्चय आहे" असें एकच कलम या निरोपांत असतें तरी असा एककलमी निरोप बाराकलमी निरोपापेक्षा हिंदी लोकांना गोड वाटला असता व प्रिय झाला असता. पण बाराहि कलमें वाचवाचून वाचक थकला, तरी त्याला स्वराज्याचा मागमूस कोठेहि लागत नाही. यावरून हिंदी लोकांनी समजावयाचें तरी काय? ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानने नेहमी 'डिपेंडन्सी' म्हणून राहवयाचें की काय? स्वराज्याचा हक्क हिंदी लोकांना काल-त्रयीहि मिळावयाचा नाही काय? असें जर असेल व तें निःसंशय आहे, तर मग बादशहांना व सर्व इंग्रजी मुत्सद्द्यांना व बिनमुत्सद्द्यांना आम्ही असें स्पष्ट सांगतों की, हिंदुस्थानांतील असंतोष एका रतीनेहि कमी व्हावयाचा नाही व हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत अकल्पित अडचणी उद्भवल्यावांचून राहवयाच्या नाहीत.

मि. मोर्ले यांनी एकदा असें स्पष्ट बोलून दाखविलें आहे की, "कल्पनाशक्तीच्या आटोक्यांत जितका काळ येण्यासारखा आहे तितक्या काळपर्यंत हिंदुस्थानवर अनियंत्रित सत्ता चालणार." मि. मोर्ले हे उदारमतवादी आहेत व त्यांनीच सदरहू बादशाही संदेश लिहिला आहे. यामुळे सदरहू निरोपांत 'स्वराज्या'चा उल्लेखहि नसावा हें ओघानेच घडलें आहे. स्वराज्याशिवाय बाकी पुष्कळ सटरफटर गोष्टींचा उल्लेख निरोपांत केला आहे; पण असले पोकळ उल्लेख आमच्या वाचकांच्या नेह-मीच्या सरावांतील असल्यामुळे त्यांची चर्चा करीत बसण्यांत अर्थ नाही. तरी पण सदरहू निरोपांतील दोन तीन गोष्टी बऱ्याच महत्त्वाच्या असल्यामुळे त्यासंबंधाने दोन शब्द लिहिणें जरूर आहे. निरोपांतील पहिली महत्त्वाची गोष्ट ही आहे की,

गेल्या ५० वर्षांत हिंदुस्थानांत कोठेहि बंडाळी अथवा लढाई होऊन अंतःस्थ शांतता भंग पावली नाही. ५८ च्या जाहीरनाम्यापासून एकाहि तलवारीने म्यानांतून बाहेर उडी घेतली नाही किंवा एकहि गोळी बंदुकींतून सुटली नाही ही गोष्ट खरी आहे. पण यामुळेच जर कोणी असें अनुमान काढील की, प्राणहानीच्या दृष्टीने हिंदुस्थानचें विशेष नुकसान गेल्या ५० वर्षांत झालें नाही तर मात्र अशा मनुष्याच्या हातून चूक होईल. स्वाभाविक मरणाने होणारी प्राणहानि वगळली तरी दुष्काळामुळे व प्लेगमुळे आजपर्यंत येथे किती माणसें मेलीं याची मोजदाद करणें जवळ जवळ अशक्य आहे. उपासमारीने प्लेगचा प्रादुर्भाव झाला हें मत झुगारून देऊन तो ईश्वरी क्षोभामुळे झाला असें जरी धरून चाललें, तरी एका दुष्काळाने भयंकर प्राणहानि केली आहे. हिंदुस्थानांतले दुष्काळ धान्याचे नसून पैशाचे आहेत हें आता सर्वसंमत होऊन बसलें आहे. पैशाचे दुष्काळ हिंदुस्थानांतून दरवर्षी इंग्लंडांत जाणाऱ्या ५० कोटि रुपयांच्या निचऱ्यामुळे पडूं लागले आहेत हें कळण्यास फारशी अक्कल नको. लढाईमुळे जरी हिंदुस्थानांत प्राणहानि झालेली नाही, तरी या प्राणहानीपेक्षा दुष्काळामुळे झालेली प्राणहानि किती तरी पटींनी जास्त आहे! सरकार जर ५० वर्षांत इंग्लंडांत गेलेले पंचवीसशे कोटि रुपये परत हिंदुस्थानांत आणण्याची व मागल्याप्रमाणे पुढे दरवर्षी ५० कोटि रुपये इंग्लंडांत न जाण्याची तजवीज करील, तर त्यामुळे हिंदुस्थानांत पैशाचे दुष्काळ पडणार नाहीत व त्यामुळे येथील प्राणहानि व द्रव्यहानि बंद पडेल. असें जर घडून येईल, तर इंग्रजी राज्यामुळे हिंदुस्थानांत नांदत असलेल्या शांततेची थोरवी व महती सर्वांच्या आधी आम्ही प्रेमाने गाऊं, पण हल्ली हिंदुस्थानांत पाहवें तों जिकडे-तिकडे 'स्मशानी' शांतता दृष्टिगोचर होत आहे. अशा तऱ्हेची शांतता मोठीशीं स्पृहणीय आहे असें निदान आम्हांस तरी वाटत नाही.

राजेसाहेबांनी आपल्या निरोपांत हिंदी सैनिकांच्या शिपाईगिरीची व इमानदारीची बरीच स्तुति केली आहे व त्या स्तुतीस हिंदी सैनिक पात्र आहेत. पण फक्त शाब्दिक स्तुतीपलीकडे राजेसाहेब गेले नाहीत ही दुःखाची गोष्ट आहे. येत्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस कांही शौर्यशाली हिंदी सैनिकांना किताब व चांद देण्यांत येतील हें खरें आहे, पण एवढ्यामुळे हिंदी सैनिकांच्या गुणांचें चीज राजेसाहेबांनी केलें असें म्हणतां यावयाचें नाही. जर हिंदी सैनिक शूर व इमानी आहेत, तर मग त्यांना वरिष्ठ प्रतीच्या हुद्द्याच्या जागा कां बरें देण्यांत आल्या नाहीत? जातीचा, रंगाचा व धर्माचा भेद लक्षांत न धरतां जर मुलकी व लष्करी जागा देण्याचा सरकारचा हेतु आहे, तर गेल्या ५० वर्षांत एकहि हिंदी मनुष्य गव्हर्नरच्या जागेवर किंवा जनरलच्या जागेवर कां बरें नेमण्यांत आला नाही? योग्य व सत्पात्र माणसांना लहानमोठ्या सरकारी जागा द्यावयाच्या असें तोंडाने प्रतिपादन करावयाचें व कृतीने मात्र आपल्या म्हणण्यावर हरताळ फासावयाचा, असाच प्रकार आज ५० वर्षें सर-

कारच्या हातून घडत आहे. सरकार बोलण्यापलीकडे कांही एक करूं इच्छित नाही असा जर लोकांचा समज झाला आहे तो नाहीसा व्हावा अशी जर सरकारची इच्छा असेल, तर त्यांनी यंदाच्याच वर्षी एक गव्हर्नरची जागा एका हिंदी मनुष्याला मुद्दाम द्यावी व एका हिंदी लष्करी कामगाराची जनरलच्या जागीं मुद्दाम नेमणूक करावी. असें जर सरकार करील, तरच ह्यापुढे लोक सरकारच्या आश्वासनांवर विश्वास ठेवतील. नुसत्या शाब्दिक आश्वासनांनी फसण्याचे दुधखुळे दिवस १९ व्या शतकांत निघून गेले. २० व्या शतकांत अंगीं दुर्बलता असल्यामुळे हिंदी लोक मनांतल्या मनांत झुरत बसतील, पण या स्वस्थतेमुळे ते संतुष्ट आहेत असें मात्र सरकारने समजूं नये. राजेसाहेब यांनी धाडलेल्या निरोपांतील सार इतकेंच दिसतें की, हिंदी लोकांनी स्वराज्याची हाव कधीहि करूं नये. हिंदुस्थानने नेहमीच 'डिपेंडन्सी' म्हणजे 'परतंत्र राष्ट्र' म्हणून राहिलें पाहिजे. ह्या परतंत्र स्थितींत इंग्रजी साम्राज्याला व इंग्रजी हिताला लवमात्र धक्का न वसतां जें कांही देण्यासारखें असेल, तेवढेंच फक्त सरकार हिंदी लोकांना देईल. त्याच्या पलीकडे हिंदी लोकांनी जास्त कांही मिळण्याची हाव धरूं नये. ५० वर्षांनी सरकारने प्रगति न करतां वरीलप्रमाणे अधोगतिप्रचुर धोरण स्वीकारलें आहे. ह्या धोरणाबद्दल सरकारला आम्ही अल्पहि दूषण देण्यास तयार नाही. कारण व्यक्ति काय किंवा राष्ट्र काय, स्वार्थ हा कोणालाहि सुटला नाही. हिंदी लोकांना स्वराज्य देऊन इंग्रज लोकांना फाका मारीत बसावयाचें नाही.

इंग्रज लोक लग्नें करतात व त्यांना पोरेंबाळें होत आहेत. ५० किंवा १०० वर्षांनी इंग्रज लोकांची जात नामशेष होणार आहे अशांतला मुळीच प्रकार नाही. हिंदी लोकांना वसाहतीचें स्वराज्य म्हणजे नव्व्याण्णव-शंभरांश निर्भेळ स्वातंत्र्य देऊन त्यांना आपल्या हातांतील भरतभूमिरूपी दुभती गाय गमवावयाची नाही. इंग्रज लोकांच्या दृष्टीने ते जें कांही करीत आहेत तें योग्यच आहे. त्यांच्या जागीं दुसरें कोणी असतें, तर त्यांनी असेंच केलें असतें. इंग्रज लोक देवदूतांप्रमाणे किंवा साधुलोकांप्रमाणे वागत नाहीत, ते माणसाप्रमाणे वागत आहेत. पण आम्ही हिंदी लोक मात्र मनुष्याप्रमाणे नव्हे, तर चतुष्पाद जनावरांप्रमाणे वागत आहोंत. इंग्लिश लोकांसारखे सद्गुरु परमेश्वराच्या कृपेने आम्हांस लाभले असतां व त्यांच्या सहवासाचा लाभ आज आम्हांस जवळ जवळ शंभर वर्षे झाला असतां आमची पशुवृत्ति अल्पांशाने सुद्धा कमी होऊं नये, हेंच जगांतलें आठवें आश्चर्य होय. जगांत कोणी कोणाला देत नसतो. ज्याला जें पाहिजे तें त्याने स्वतःच्या कर्तबगारीवर मिळविलें पाहिजे. हिंदी लोकांना जर स्वराज्यच पाहिजे असेल, तर त्याच्या प्राप्तीसाठी इंग्रज लोकांच्या तोंडाकडे न बघतां त्यांनी स्वतःच्या कर्तबगारीकडे पाहवें. कोणत्याहि राष्ट्राची उन्नति व्हावयास त्या राष्ट्रांतील सरकारची सहानुभूति व साहाय्य तेथील लोकांना पाहिजे हें उघड आहे. पण ज्याला उपाय नाही, त्याबद्दल हळहळत बसण्यांत अर्थ नाही.

सरकार कांही एक आपल्यासाठी करणार नाही, अशी मनाशीं खूणगाठ बांधूनच आपण आपली उन्नति करून घेण्याच्या प्रयत्नास लागलें पाहिजे.

सन १९५७ सालापर्यंत आम्ही वसाहतींतील स्वराज्याला पात्र होऊं अशी महत्त्वाकांक्षा मनांत बाळगून या वर्षापासून प्रत्येक जातिवंत हिंदी मनुष्याने कंबर कसली पाहिजे. स्वतःच्या अंगीं पात्रता आणून व रक्ताचा एक थेंब न सांडून आजपर्यंत न झालेलें अपूर्व राष्ट्रकार्य आपणांस करावयाचें आहे व तें अवघ्या ५० वर्षांच्या अवधींत करावयाचें आहे. १९०८ सालीं जर हिंदुस्थानांतील इंग्रज साम्राज्याचा कळस झाला, तर सन १९५८ सालीं हिंदी स्वराज्याचा अभ्युदय झाला पाहिजे. इंग्रज़ साम्राज्याच्या छत्राखाली हिंदी स्वराज्याचा अभ्युदय करण्यास जर हिंदी देशभक्त कायावाचामनेंकरून झटतील, तर तो खात्रीने होईल. काम बिकट आहे व रस्ता खडकाळ आहे. पण जितकें जितकें काम कठीण असतें, तितकें जास्त भूषण तें करण्यांत आहे. स्वराज्याची प्राप्ति होण्यास तूर्त निदान दहा वर्षे आपणांस खालील गोष्टी केल्या पाहिजेत. हिंदुस्थानांतील शेकडा ८८ अशिक्षित लोकांना शिक्षण देऊन त्यांना द्विपाद जनावरांच्या कोटींतून काढून मनुष्यजातींत आणून टाकलें पाहिजे. सर्वांच्या अगोदर ही गोष्ट झाली पाहिजे. स्वदेशी माल वापरून स्वदेशांतील द्रव्याचा प्रवाह स्वदेशांतच साठविला पाहिजे. जर ह्या दोनच सुधारणा येत्या दहा वर्षांत करण्यांत आल्या, तर पुढे काय करावयाचें ह्याचा विचार सन १९१८ सालीं करण्यांत यावा. तोंपर्यंत हजारो गोष्टी एकदम हातांत घेऊन कोणतीच गोष्ट धड न करण्यापेक्षा ह्या दोनच गोष्टी जर संपूर्णतेने करण्यांत आल्या, तर अंतिम साध्याकडे जाणाऱ्या मार्गाचे दोन टप्पे आपण ओलांडले असें म्हणण्यास हरकत नाही. म्हणून सन १८५८ च्या जाहीरनाम्याच्या ज्युबिलीच्या सालीं प्रत्येक हिंदी देशभक्ताने वरील दोन सुधारणा यथामति व यथाशक्ति घडवून आणण्याचा निश्चय करावा. स्वदेशाच्या उन्नतीसाठी आम्हीं कोणत्या गोष्टी कराव्यात असा प्रश्न जर कोणी आम्हांस करील, तर त्याला आम्ही असेंच उत्तर देऊं की, "अशिक्षित देशबांधवांना शिक्षण द्या व स्वदेशी माल वापरण्याकडे त्यांचीं मनें वळवा." वरील दोन सुधारणा घडून जर हिंदी लोक ज्ञानसंपन्न व धनसंपन्न झाले, तर पुढील मार्ग आक्रमण्यास फारसें अवघड जाणार नाही, असें आम्ही खात्रीपूर्वक सांगतों.

– भाला, दि. ११ नोव्हेंबर १९०८

# ३५. खंडूजी व सुभानजी

सन १६९९ होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्यरवीवर उसळलेलीं मेघावडंबरें पार वितळून जाऊन तो थोरल्या महाराजांच्या कारकीर्दीतल्यापेक्षाहि जास्त प्रखरतेने व तेजस्वीपणाने तळपूं लागला होता. स्वराज्य, स्वधर्म व स्वजन ह्यांचें संरक्षण करण्याकरिता अतर्क्य व अनन्वित आग सोसून कडव्या व सैतानोपम अवरंगजेबाच्या क्रोधाग्नींत आनंदाने आपल्या प्राणाची आहुति देणारा गोब्राह्मण-प्रतिपालक शिवरायांचे सुपुत्र संभाजीमहाराज ह्यांच्या वधाने मराठी राज्याची घडी जरी विस्कळीत झाली होती, तरी पूर्वी कधीहि प्रार्दुभाव झाला नव्हता इतका आवेश, करारीपणा व अवरंगजेबाची हड्डी नरम करण्याचा जोम प्रत्येक स्वातंत्र्य-भक्त मराठ्याच्या ठायीं पूर्णपणें बाणून गेला होता. मराठ्यांची मूर्त स्वातंत्र्यश्री जे राजाराममहाराज त्यांची जिंजीच्या सहा रथांच्या बेड्यांतून सुटका होऊन सातारा मुक्कामीं छत्रपति म्हणून पुन्हा प्राणप्रतिष्ठा झाली होती. संताजी व धनाजी ह्या अद्वितीय दुकलीच्या झंजावाताप्रमाणे होणाऱ्या मारामुळे अवरंगजेब अगोदरच चिडून गेला होता. त्यांत आपल्या मनोराज्याची इमारत लाथाडून देऊन व जिंजीचा वेढा फोडून राजाराममहाराजांनी साताऱ्यास मराठेशाहीची संस्थापना केली. एवढेंच नव्हे तर, पारनेर मुक्कामीं हुसेनअल्लीखानाचा पुरा मोड करून मराठे सरदार उत्तरेकडील आपल्या मुलखांत लूट मारीत व चौथाई आणि सरदेशमुखी हे हक्क बजावीत चालले आहेत. ही बातमी त्याला समजतांच तो अर्धवट खेचलेल्या नागाप्रमाणे खवळून गेला व मराठ्यांना नामशेष करीन, नाही तर मी जगांतून कायमचें काळें करून तरी जाईन, अशी त्याने घोर प्रतिज्ञा केली. अवरंगजेब म्हटला म्हणजे मराठ्यांचा कट्टा दुष्मन. त्याच्याजवळ अपार संपत्ति व अगणित सेना आणि त्यांतल्या त्यांत मराठ्यांना काबीज करण्याचें काम पूर्वीप्रमाणे आपल्या हाता-खालील खानदानीच्या व चुकारतट्टू सरदारांच्या अंगावर न सोपवितां प्रत्यक्ष आपल्या शिरावर घेण्याचा त्याने केलेला पक्का निर्धार. ह्यामुळे मराठे मंडळींना मोठी धास्ती पडली आणि नागोजी मान्याच्या खाजगी वैराला संताजी घोरपड्या-सारख्या एकनिष्ठ जवानमर्द व रणझुंझार मराठे वीराचा बळी पडून, मोंगली

सैन्यावर अचानक हल्ले करून, बादशहाला सळो का पळो करण्याची कामगिरी सर्वस्वीं एकट्या धनाजीवरच पडल्यामुळे, राजाराममहाराजांपासून तों तहत साधारण सैनिकापर्यंत सर्व मंडळी जराशी चिंताक्रांत झाली. पण श्रीसद्‌गुरु रामदासस्वामींच्या महाराष्ट्र-धर्माची दीक्षा घेऊन स्वदेशाकरिता, स्वधर्माकरिता आणि स्वातंत्र्याकरिता फकीर बनलेल्या व त्यांचे पट्टशिष्य जे शिवाजीमहाराज त्यांच्या तालमींत कसलेल्या मराठ्यांची ती चिंता फार वेळ टिकली नाही; आणि खरोखर पाहिलें असतां ती टिकावी कां? कारण कोणत्याहि व्यक्तीने किंवा व्यक्ति-समुदायाने स्वतंत्रता संपादन करण्याचा एकदा का ठाम निश्चय केला की तो हाणून पाडणें कोणत्याहि प्रचंड शक्तीला किंवा बलाढ्य बादशहाला शक्य नसतें.

मनुष्याने किंवा राष्ट्राने स्वतंत्र असावयाचें का पारतंत्र्यांत कुजत पडावयाचें हें दुसऱ्याच्या कर्तबगारीच्या व त्याच्या मनाच्या प्रवृत्तीवरच नेहमी जास्त अवलंबून असतें. आपण नादान, दुबळे व कमकुवत असल्याविषयीची भावना मावळून तिच्या जागीं स्वतःच्या शौर्याची, सामर्थ्याची व कार्यक्षमतेची आत्मप्रचीती अधिष्ठित झाली की लोक आज नाही उद्या स्वतंत्र झाले असें खुशाल समजावें. स्वतंत्रता कमावण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी हा आत्मप्रत्यय लोकांच्या ठायीं अवश्य जागृत झाला पाहिजे व त्यांच्या हृदयांत या 'भगवंताचें आधी अधिष्ठान' झालें पाहिजे. परतंत्रता ही जनतेच्या मनावरील निवळ भुरळ असल्यामुळे ती नाहीशीं होऊन मन स्वतंत्र झालें की शरीरहि आगेमागे स्वतंत्र झाल्याविना राहत नाही. १७ व्या शतकांतील मराठ्यांच्या मनावरील बादशाही सत्तेची मोहिनी दूर होऊन त्यांच्या ठायीं हा आत्मप्रत्यय व आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. म्हणूनच अवरंगजेबाने केलेल्या प्रतिज्ञेची त्यांना विशेषशीं फिकीर वाटली नाही व त्यांच्या सेना-समुद्राला चौफेर तंग देऊन 'तोबा तोबा' करीत त्याला दिल्लीच्या बाजूला पिटाळून लावण्याची त्यांनीहि तयारी चालविली. केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणे १६९९ सालांत अवरंगजेब बादशहा मराठ्यांच्या सत्तेचीं केंद्रस्थानें जे किल्ले, ते काबीज करून मराठ्यांना रानोमाळ हुसकावून लावण्याच्या इराद्याने ब्रह्मपुरी सोडून जातिनिशीं निघाला व साताऱ्च्या दक्षिणेस सुमारे तीस मैलांवर असलेल्या वसंतगडाखाली आपल्या अलोट सेना-समुद्राचा तळ देऊन बसला. कित्येक मैलपर्यंत पसरलेल्या बादशहाच्या सैन्याचा तो विस्तार पाहून गडावरील किल्लेदाराचें व शिबंदीचें तर धाबें दणाणून गेलें. आपल्या मूठभर शिबंदीनिशीं किल्ला लढविण्यांत परिणामीं हित होणार नाही असा दूरवर विचार करून, त्या किल्लेदाराने अंधेऱ्या रात्रीं किल्ल्यावरील सर्व लोकांना बरोबर घेऊन तो मोकळा केला. दुसऱ्या दिवशीं किल्ला हस्तगत केल्यावर बादशहाची स्वारी संतोषित मनाने मिरज येथे येऊन दाखल झाली. कांही दिवसांनी शहाजादा अजिमशहा त्यास येऊन मिळाला. त्याच सुमारास राजाराममहाराजांनी उत्तरेकडील स्वारी जिंकली असल्यामुळे महाराष्ट्रांतील

किल्ल्यांचा व मराठेशाहीचा सांभाळ करण्याची सर्व जोखीम रामचंद्रपंतांवर येऊन पडली होती. त्याप्रमाणे पन्हाळा किल्ला मिरजेच्या नजीक असल्यामुळे बादशहाच्या सैन्याची धाड त्या किल्ल्यावर जाऊन आदळेल, अशा अदमासाने पंतांनी त्याचा उत्तम बंदोबस्त केला होता; पण अवरंगजेब कांही लहानसहान धोरणी व चाणाक्ष नव्हता. आपल्या सैन्याशीं टक्कर देण्याकरिता मराठ्यांचें सैन्य पन्हाळ्यावर एकीकृत झालें असून, इतर ठिकाणांविषयी तें गाफील राहिलेलें पाहतांच बादशहाची स्वारी एकदम झुकांडी देऊन साताऱ्याकडे वळली व किल्ल्याजवळ आल्याबरोबर चोहो बाजूंनी मोर्चे लावून उत्तरेस आपली छावणी, पश्चिमेस अजिमशहाचें सैन्य व दुसऱ्या दोन बाजूंस तर्बीयतखान व सर्जेखान, अशी आपल्या सैन्याची विभागणी करून त्याने किल्ल्याची नाकेबंदी केली.

त्या अफाट बादशाही सैन्याचा गराडा पाहून किल्ल्याचा हवालदार सुभानजी लावंघरे याची छाती फाटून गेली व कांही झालें तरी किल्ला निकराने लढवावयाचा किंवा मुकाट्याने तो अवरंगजेबाच्या स्वाधीन करून दुसऱ्या एखाद्या बंदोबस्ताच्या जागीं निघून जावयाचें, याविषयी सल्ला विचारण्याकरिता त्याने रामचंद्रपंतांकडे जासूद पाठविले. आपल्या अंदाजाप्रमाणे बादशहाने पन्हाळ्याचा रोख धरून कूच न करतां साताऱ्याला वेढा दिल्याचें वर्तमान पंतांना समजतांच त्यांनी त्या प्रांताचा सुभेदार प्रयागजी अनंत याला निकडीने निवडक फौजेसुद्धा साताऱ्यास जाण्याचा हुकूम केला व सुभानजीने धाडलेल्या जासूदांना ती हकीगत कळवून किल्ला शर्थीने व शिकस्तीने झुंजविण्याविषयी त्याला निरोप पाठविला. रामचंद्रपंतांच्या आज्ञेप्रमाणे प्रयागजी अनंत मजल दरमजल करीत सुभानजीच्या मदतीकरिता आपल्या कणखर व रणशूर फौजेसह किल्ल्यावर येऊन पोहोचला व पाहतो तों किल्ल्यावरील अन्नपाण्याची सामग्री संपुष्टांत आली असून तटबंदीहि नीटशी नसलेली त्याच्या दृष्टोपत्तीस आली. तथापि संकटें व खडतर अनुभव यांच्या शाळेंत त्याचें मन सुसंस्कृत झालें असल्यामुळे तो रतिभरहि डगमगला नाही. आपल्या जन्मभूमीचें स्वातंत्र्यरूप सौभाग्य हिरावून नेणाऱ्या परकीयांच्या राजसत्तेविरुद्ध श्रीशिवरायांनी आपल्या सवंगड्यांसह बंडाचें निशाण उभारल्यादिवसापासून तों त्या वेळपर्यंत त्याने अनेक बिकट प्रसंगांतून मराठ्यांचा भगवा झेंडा स्वातंत्र्याच्या पैलतीरीं नेण्याच्या मंगल कार्यास हातभार लावला असल्यामुळे, ती एकंदर स्थिति अवलोकन करून प्रयागजीला अधिक स्फुरण चढलें व मराठ्यांच्या अंगचें तेज, पराक्रम, चिकाटी, स्वातंत्र्यप्रियता वगैरे सद्‌गुणांचें प्रत्यंतर बादशहाच्या प्रत्यक्ष नजरेस आणून देण्याचा दृढ संकल्प करून त्याने सामानसुमानाची जुळवाजुळव करण्यास प्रारंभ केला.

मराठ्यांच्या इतिहासाच्या पूर्वार्धाचा विशेष म्हटला म्हणजे त्यांची अत्युत्कट स्वातंत्र्यलालसा व तत्सिद्ध्यर्थ अलौकिक धाडसांचीं व छातीठोक कामें करण्याची

त्यांची तत्परता हा होय. स्वराज्यसंपादनार्थ त्यांनी विजापूरच्या किंवा दिल्लीच्या बादशहांजवळ तोंड वेंगाडलें नाही. तर तें मिळविण्याकरिता त्यांनी जिवापाड मेहनत केली आणि सत्कार्याला आपल्या कृपेचें पाठबळ देणाऱ्या परमेश्वराने त्यांचे सर्व प्रयत्न यशस्वी केले. परमेश्वराप्रमाणे स्वातंत्र्य हें प्रत्येक मनुष्याजवळच आहे. मात्र हें साध्य करून घेण्याकरिता त्याने संकटरूपी टाकीचे घाव सोसण्यास तयार झालें पाहिजे व असे घाव सोसल्याशिवाय तें कधीहि चिरंजीव स्वरूपाचें होणार नाही, अशी इतर मराठे स्वातंत्र्यभक्तांप्रमाणे प्रयागजी अनंत याचीहि समजूत असल्यामुळे त्याच्या अंगांत विलक्षण वीरश्री संचारली व किल्ल्याच्या संरक्षणाचें काम त्याने फारच चतुराईने चालविलें. उभय पक्षांकडील अशा रीतीने जय्यत तयारी झाल्यावर लढाईला तोंड लागलें व स्वतंत्रतादेवीचे निस्सीम उपासक मराठे वीर व पारतंत्र्याच्या नरकांत ढकलूं पाहणारे बादशहाचे पगारी मारेकरी यांच्या-मध्ये तुमुल घनचक्कर जुंपली. हल्ला करून किल्ला सर करण्याकरिता बादशहाच्या फौजेने आपली शिकस्त केली. खुद्द अवरंगजेब आपल्या शिपायांना किल्ल्यावर चढाई करून जाण्याविषयी एकसारखा प्रोत्साहन देत होता.

पण किल्ल्यावरील मराठे पठ्ठ्यांनी त्याची दाद लागू दिली नाही. मोंगली सैन्य नेट धरून वर येऊं लागतांक्षणींच प्रयागजी अनंताचे नेकजात व धाराशूर अनुयायी त्यांच्यावर दगडांचा व गोळ्यांचा इतक्या कडाक्याचा वर्षाव करीत की, त्यांना नाइलाज होऊन मागे हटावें लागत असे. एवढेंच नव्हे तर साप, विंचू, नाग इत्यादि विषारी प्राण्यांनी भरलेले रांजण गडावरील लोकांनी मोंगली सैनिकांवर फेकून ते जमिनीवर आपटून आंतील प्राणी सैरावैरा धांवूं लागले की, त्यांना पळतां भुई थोडी होत असे. मोंगलांचे हल्ले मागे परतविण्याचा क्रम गडावरील शिबंदीने एकी-कडे चालू ठेवला असतां दुसरीकडे परशुराम त्रिंबक प्रतिनिधि यांच्या हाताखालील लोकांनी किल्ल्याच्या भोवतालचा वीस कोसांपर्यंत सर्व प्रदेश उद्ध्वस्त करून व मोंगलांच्या छावणींत येणारी रसद लुटून फस्त करून बादशहाला जेरीस आण-ण्याचा प्रयत्न चालविला होता. गडावरील धान्य सरत आल्यामुळे प्रयागजी अनंतहि मेटाकुटीस आला होता. परंतु पश्चिमेकडील मोंगली सरदाराला फितूर करून परशुराम त्रिंबक यांनी जेव्हा किल्ल्यावर धान्याच्या गोण्या चढविल्या तेव्हा किल्ल्या-वरील मराठ्यांस नवा दम येऊन ते मोठ्या आवेशाने लढूं लागले. समोरून हल्ले करून किल्ला ताब्यांत येत नाही, मराठ्यांच्या गनिमी काव्यामुळे आपल्या छावणींत धान्यसामग्रीचा तुटवडा पडत चालला आहे, पावसाळा तर जोराने सुरू झाला आहे व वेढ्याचें काम लवकर फत्ते न झाल्यास आपणांवर उपासमारीने मरण्याची पाळी निःसंशय येणार असा विचार करून, बादशहाने सुरुंग लावून किल्ला जमीन-दोस्त करण्याची युक्ति काढली व त्याप्रमाणे तर्बीयतखानाने मंगळाईच्या बुरुजा-खाली दोन मोठाले सुरुंग तयार केले. ही बातमी किल्ल्यावरील लोकांना समजतांच

त्यांची पांचावर धारण बसली व आपण सर्वजण किल्ल्याखाली गारद होऊन जाणार अशी त्यांची खात्री झाली.

आपल्या देशबांधवांवर वरील प्रकाराने येणारें मरण चुकविण्याच्या इराद्याने इतर मराठ्यांनी बादशहाच्या सैन्यावर वारंवार छापे घालून त्यांचें मन सुरुंग उडविण्याच्या कृत्यापासून दुसरीकडे आकर्षून घेण्याचे भगीरथ प्रयत्न केले, पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. सुरुंग तयार झाल्यावर त्यांना बत्ती लावण्यास अवरंगजेबाने इशारा दिला व किल्ल्यांतील लोकांच्या कशा ठिकऱ्या उडतात ही मौज पाहण्यासाठी तो सुरक्षित जागीं उभा राहिला. सुरुंगाला बत्ती दिल्याबरोबर आकाशमंडळ भेदून टाकण्यासारखा भयंकर आवाज झाला. धुळीचे पर्वतमय लोट हवेंत उसळले व डोंगराचा एक भला मोठा कडा वरील बुरुजासह एकदम जोराने वर आकाशांत उडून किल्ल्यांत पडला. त्यामुळे शेकडो मराठे प्राणास मुकले व बाकीच्यांत धावपळ सुरू झाली. ती संधि साधून मोंगली फौज वर जाण्याकरिता पुढे घुसली. पण तितक्यांत दुसरा सुरुंग उडून डोंगराचे मोठमोठाले खडपे तिच्यावर येऊन आदळले व दोन हजार मुसलमान लोक जागच्या जागीं गतप्राण झाले. पहिल्या सुरुंगामुळे प्रयागजी अनंत मातीच्या व दगडांच्या ढिगाखाली सापडला; परंतु पूर्व पुण्याई जबर होती म्हणा किंवा मराठ्यांवर परमेश्वराचें कृपाछत्र होतें म्हणून म्हणा, त्याला विशेषशीं दुखापत झाली नाही. त्यामुळे मराठ्यांना पुनरपि हुरूप येऊन ते बादशहाला झुंज देण्याकरिता सज्ज जाहले. सुरुंगाच्या युक्तीमुळे मराठ्यां-पेक्षा आपलेंच जास्त नुकसान होऊन आपल्या तंगड्या आपल्याच गळ्यांत अडकल्या गेलेल्या पाहून अवरंगजेब मनांत खट्टू झाला व त्याची कंबर खचून गेली. तरी पण आपणच नामोहरम झाल्यास सर्व फौज बेदिल होऊन आपणास अपकीर्तीने कलंकित झालेल्या तोंडाने दिल्लीची वाट सुधारावी लागेल असा विचार करून त्याने आपल्या सैन्यास व सरदारांस चार धीराच्या गोष्टी सांगितल्या व त्यांना लढण्यास उद्युक्त केलें. शिवाय जो किल्ला प्रत्यक्ष सुरुंगाने देखील कोसळला नाही व त्यावरील जे रणबहाद्दर मराठे धातूच्या शस्त्रास्त्रांनी सुद्धा घायाळ झाले नाहीत तो किल्ला फितुरीच्या सुरुंगाने भग्न करण्याची व तेथील मराठ्यांना फितुरीच्या गुप्त कट्यारीने विदीर्ण करण्याची त्याने खटपट सुरू केली व त्याच्या नशिबाने आणि मराठ्यांच्या दुर्दैवाने त्याला गडावर एक फितुरी इसम सापडला! गडाचा हवालदार सुभानजी लावंघरे याला परळीजवळील सगळ्या प्रांताची देशमुखी देण्याचें अवरंगजेबाने आमिष दाखविल्याबरोबर त्या निमकहरामाच्या तोंडाला पाणी सुटलें व दोघांमध्ये फितुरीची वाटाघाट सुरू झाली. तितक्यांत मराठ्यांच्या प्रगतीला व वैभवाला ओहोटी लागून अवरंगजेबाच्या सत्तेची व ऐश्वर्याची चढती कमान व्हावयाची होती की काय, कोण जाणे.

राजाराममहाराज नवज्वराच्या आजाराने सिंहगडावर परलोकवासी झाले.

रडून आकान्त केला. त्यांचा तो आर्त स्वर ऐकून व केविलवाणी स्थिति पाहून अवरंगजेबाच्या मुलीच्या अंतःकरणांत दयेचा पाझर फुटला व शाहूस किंवा इतरांस बाटविल्यास मी आत्महत्या करीन असें तिने आपल्या बापास सांगितलें.

अवरंगजेब जरी अत्यंत हेकेखोर व कठोर हृदयाचा होता, तरी आपल्या लाडक्या मुलीचा तो निर्धार पाहून त्यासहि द्रव आला. तथापि शाहूच्या ऐवजीं त्याच्या कोणा तरी तरुण मानकऱ्यास मी आज मुसलमान केल्याशिवाय राहणार नाही असा त्याने हेका धरला. त्याची मुलगीहि आपला हट्ट सोडीना. बापलेकीमध्ये अशा रीतीने चुरस लागली असतां, तो लढा मिटविण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्यभक्त प्रतापराव गुजराचा स्वामीभक्त वडील पुत्र खंडेराव, ज्या धर्माची संस्थापना करण्याकरिता आपल्या वडिलांनी व बाजी प्रभु, मुरारबाजी वगैरे महात्म्यांनी समरभूमीवर शयन केलें, त्या हिंदु धर्माचा नाइलाजास्तव त्याग करण्यासाठी पुढे झाला. बादशहाच्या मर्जीप्रमाणे इस्लामी धर्माची दीक्षा घेतली व शाहू आणि इतर मराठे मंडळी यांच्यावर धर्मांतर करण्याचा गुदरलेला प्रसंग त्याने टाळला.

आपले मालक जे शाहूमहाराज व इतर शेकडो धर्मबांधव यांचा धर्म बचावण्याकरिता नाखुषीने आपला प्राणप्रिय हिंदु धर्म सोडून व पुराणाच्या ऐवजीं कुराण हातांत घेऊन मुसलमानी धर्माचे सोहाळे चालले असतांना त्या देशभक्त, धर्मभक्त व स्वामीभक्त खंडेरावाच्या अंतःकरणांत किती तरी कालवाकालव झाली असेल बरें! सर्व मराठे मंडळींना त्याच्या या अतुल स्वार्थत्यागाची व लोकोत्तर स्वामीभक्तीची केवढी धन्यता वाटली असेल? सर्वस्वावर पाणी सोडून हिंदु धर्माची अपूर्व सेवा करणाऱ्या खंडेरावाची ही उज्ज्वल निःस्वार्थतता कोणीकडे व परळीच्या देशमुखीची पैदास करण्याकरिता शत्रूच्या स्वाधीन मंगळाईचा किल्ला करून मराठेशाही उद्ध्वस्त करूं पाहणाऱ्या सुभानजी लावंघऱ्याचा नीचतम आप्पलपोटेपणा कोणीकडे! पहिल्याने आपल्या इमानाला जागून देशाची व धर्माची अत्युत्तम कामगिरी बजावली, तर दुसऱ्याने आपल्या स्वार्थाच्या कुंडांत स्वराज्याची होळी करण्याचा प्रयत्न करण्याचा अधमपणा व सैतानीपणा केला! एकाने देशभक्तीचा व स्वामीभक्तीचा उत्कृष्ट धडा आपल्या भावी पिढ्यांना घालून दिला, तर दुसऱ्याने देशद्रोह व स्वामीद्रोह करून मराठ्यांच्या ओजोमय व स्फूर्तिकारक इतिहासांत आपलें नांव कायमचें बद्ध करून टाकलें! याबद्दल खात्रीने न्यायनिष्ठुर परमेश्वराने सुभानजीला रौरवनरकाच्या यातना भोगावयास लावल्या असतील व खंडेरावाला स्वर्गीय सुखाची जोड करून दिली असेल! एवढेंच नव्हे तर, या लोकींहि त्याच्या कृतकर्मानुसार बक्षीस किंवा शासन मिळाल्याचें इतिहास सांगत आहे.

अवरंगजेबाच्या मरणानंतर शाहूमहाराजांची सुटका झाल्यावर त्यांनी देशद्रोह करून गबर बनलेल्या लोकांना कडक शिक्षा करण्यास जेव्हा आरंभ केला, तेव्हा सुभानजी लावंघरेहि त्यांच्या तडाख्यांतून सुटला नाही. सूर्याजी पिसाळाला तर

त्यांनी हालहाल करून ठार मारण्याची योग्य शिक्षा दिली. पण सुभानजीचा गुन्हा त्याच्याइतका अक्षम्य नसल्यामुळे त्यांनी त्याची परळीची वतनदारी काढून घेऊन ती खंडेरावाला मोठ्या कृतज्ञतेने व मानमरातबाने अर्पण केली. त्याच्या गुणाचें चीज केलें व अशा रीतीनें गुणग्राहकता दाखवून त्यांनी देशद्रोही पापात्म्यांना कडक शासन व देशभक्त पुण्यात्म्यांना योग्य वेतन दिलें! सदरहू खंडेरावाचे मुसलमानी धर्म पाळणारे वंशज परळीनजीकच्या प्रांताचे वतनदार असून, ते सांप्रत कामती येथे राहतात व आपल्या पूर्वजांनी इस्लामी धर्माचा कोणत्या कारणामुळे स्वीकार केला याची त्यांना पूर्ण जागृति असल्यामुळे ते नुसते नांवाला मात्र मुसलमान असून, इतर हिंदु धर्माप्रमाणेच नांवें ठेवतात व हिंदूंचे सर्व सण पाळतात असें समजतें. असें असल्यास त्यांना आम्ही सर्व हिंदु समाजातर्फे अशी नम्र विनंती करतों की, त्यांनी हिंदु धर्मांत येऊन नाइलाजास्तव मुसलमान बनलेल्या खंडेरावाचा वर स्वर्गांत तळमळत असलेला आत्मा शांत करावा. शाहूमहाराजांवरील धर्मांतराचा प्रसंग टाळण्यासाठीच खंडेरावाने मुसलमानी धर्माचा अंगीकार केला, हें सर्व हिंदु समाज जाणत असून, त्याबद्दल त्याला स्वाभिमान व कौतुकहि वाटत आहे. असा वास्तविक प्रकार असतां कामती येथील खंडेरावाच्या वंशजांनी यवनी धर्माचा त्याग करून व आपल्या पूज्य पूर्वजांना प्राणापेक्षाहि पलीकडे असलेल्या हिंदु धर्मांत उघडपणें येऊन त्यांनी हिंदु धर्माची सेवा अखंडपणें चालवावी व खंडेरावाचे वांछित मनोरथ तडीस न्यावेत, अशी त्यांना आमची विनंती आहे. या विनंतीप्रमाणे वागण्यास ते तयार झाल्यास हिंदु समाज त्यांना मोठ्या आनंदाने आपल्या पोटांत घेईल अशी आशा आम्ही प्रदर्शित करतों.

— भाला, दि. १ डिसेंबर १९०८

---

## ३६. सन १९०८

हें साल जगाच्या इतिहासांत महत्त्वाचें आहे. या एका सालांत जगांतील जितक्या राष्ट्रांना स्वातंत्र्यसुखाचा आस्वाद कमीजास्त प्रमाणाने घ्यावयास मिळाला, तितक्या राष्ट्रांना यापूर्वी कोणत्याहि वर्षी असा आस्वाद मिळालेला नाही. कांही तत्त्ववेत्ते असें प्रतिपादन करतात की, वर्षानुवर्षें जगाची अवनति होत चालली आहे व हल्ली कलियुग असल्यामुळे पूर्वीच्या तीन पुण्यमय युगांतील जगाची उन्नति व त्या काळच्या लोकांनी उपभोगिलेलें सुख कलियुगांत पुनरपि मिळणें अशक्य आहे. जगाचें निरीक्षण वरवर करणाऱ्या लोकांना वरील मत ग्राह्य वाटेल, पण

जो कोणी किंचित् खोल विचार करील त्याला हें हटकून कबूल करावें लागेल की, जगाची अवनति होत चाललेली नसून, उलट त्याची उन्नति व प्रगतीच होत चाललेली आहे. उन्नतीच्या इतर बाबी वगळून जरी प्रजाजनांच्या फक्त राजकीय हक्कांचाच विचार केला, तरी प्रत्येक मनुष्याला हें कबूल केलें पाहिजे की, जग मागे हटत नसून तें पुढे झटकत आहे. १९ व्या शतकाच्या पूर्वी जगांतील प्रत्येक राष्ट्रांत राजसत्ता प्रचलित होती. 'राजा' या नांवाच्या एका व्यक्तीने लाखो लोकांवर आपले प्रजाजन या नात्याने अंमल गाजवावा, त्यांच्यापासून मनाला वाटतील तितके कर घ्यावे व त्यांना मर्जीप्रमाणे पसार केलेल्या कायद्यांनी पिळून काढावें. राजा ही एक केवळ बलाढ्य व्यक्ति नसून, तो साक्षात् परमेश्वराची विभूति आहे अशी खुळचट व आत्मघातकी समजूत कलियुगाच्या पूर्वी तीन युगांत व कलियुगांत १८ व्या शतकांपर्यंत प्रचलित होती. या सर्वभक्षक कल्पनेचें उच्चाटण पहिल्या प्रथम इंग्लंडांत झालें. राजा हा ईश्वरांश नसून तो प्रजेचा वरिष्ठ दर्जाचा नोकर आहे ही सोज्वळ व सर्वसाधक कल्पना इंग्रज लोकांच्या मनांत झपाट्याने पसरत गेली व त्याचा सुखकर परिणाम असा झाला आहे की, ते हल्ली हरएक बाजूंनी सुखी झाले आहेत. इंग्लंडांत हल्ली राजा आहे, पण नुसता शोभेला आहे. त्याच्या हातांत सत्ता नाही व पैसा नाही. नेमून दिलेला तनखा त्याने वर्षभर पुरवावा व पार्लमेंट जे जे कायदे करील त्यांना मुकाट्याने आपली संमति द्यावी. 'राजा ईश्वरांश आहे' या कल्पनेचें उच्चाटण पूर्वी रोमन लोकांनी केलें होतें. पण ती गोष्ट फार वर्षांपूर्वीची असल्याकारणाने व पुन्हा रोमन लोकांवर बादशाही अंमल सुरू झाल्यामुळे या कल्पनेचें निर्मूलन करण्याचा मान आम्हीं इंग्लिश लोकांना दिला आहे व तो त्यांना हक्काने प्राप्त होत आहे. 'राजा हा प्रजेचा नोकर आहे' या कल्पनेचा जन्म पहिल्या प्रथम इंग्लंडांत झाला व तेथून तिचा प्रसार फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांत झाला. १९ वें शतक पुरें होऊन जरी विसाव्या शतकाचीं आठ वर्षें लोटलीं, तरी जगांतील बहुतेक राष्ट्रांत राजेलोकांची ब्याद अजून नामशेष झाली नाही. जर कराचे पैसे प्रजेला द्यावयाचे असतात व कायदे तिलाच पाळावयाचे असतात, तर न्याय्य रीतीने म्हटलें म्हणजे ते कर खर्च करण्याची व कायदे पसार करण्याची सत्ता प्रजेच्याच हातीं असली पाहिजे. मूळचे प्रजाजनांचे नोकर, पण कालेंकरून त्यांचे यजमान बनलेल्या राजेलोकांनी सर्व सत्ता फार वर्षांपासून बळकावली आहे व आपल्या हातांतून गेलेली सत्ता पुन्हा मिळविण्यासाठी निरनिराळ्या राष्ट्रांतील प्रजाजनांचे प्रयत्न चालले आहेत. प्रजाजनांच्या या प्रयत्नांना सर्व राष्ट्रांत यश आलेलें नाही. पण आनंदाची गोष्ट ही की, नुकत्याच मावळलेल्या वर्षांत या प्रयत्नांना बरेंच यश आलें आहे. गेल्या वर्षी कोणकोणत्या देशांत प्रजेच्या सार्वभौम हक्काची स्थापना झाली हें थोडक्यांत सांगण्याचें आम्हीं या अंकांत योजिलें आहे.

१. पोर्तुगाल देशाच्या राजाने एका सेनर फ्रँको नांवाच्या प्रधानाच्या

साहाय्याने तेथील प्रजेच्या हक्काची पायमल्ली करून सर्व सत्ता बळकावून टाकली. प्रजाजनांनी नाना प्रकारचे अर्ज केले, सभा भरविल्या व इतर शेकडो प्रयत्न केले, पण ते सर्व व्यर्थ गेले. शेवटीं त्रस्त झालेल्या प्रजाजनांपैकी एकाने आपलें शिरकमल हातांत घेऊन पोर्तुगालचा राजा व युवराज गाडींत बसून लिस्बन शहरांतील एका रस्त्याने चालले असतां त्यांच्यावर एक बॉम्ब फेकला व त्या दोघांना यमसदनीं पाठवून आपल्या देशबांधवांच्या हक्काची प्राणप्रतिष्ठा आपल्या मस्तकाच्या सिंहासनावर केली. हल्ली पोर्तुगालच्या गादीवर अल्पवयस्क राजा आहे, पण सर्व सत्ता पोर्तुगीज लोकांच्याच हातांत आहे.

२. टर्कीच्या सुलतानाने लोकांना सन १८७६ सालीं नियमबद्ध राज्यपद्धति ( Constitution ) दिली होती. पण हळूहळू सुलतानाने सर्व सत्ता बळकावून आपल्या प्रजाजनांना गुलामाच्या पदवीला नेऊन पोहोचविलें होतें. पण हलकें हलकें आपल्या नैसर्गिक हक्कांची जाणीव तुर्की लोकांना व विशेषतः तुर्की शिपायांना झाली. त्यांनी आपल्या हक्काची मागणी सुलतानापाशीं निकराने केली. प्रजेच्या मागण्या धुडकावून देण्यास राजेलोकांना मुख्य बळ सैन्याचें असतें. हें बळ टर्कीच्या सुलतानांना नसल्यामुळे त्यांनी आपल्या प्रजेचें मागणें बिनतक्रार कबूल केलें व गेल्या वर्षाच्या जुलै महिन्याच्या २४ व्या तारखेस टर्कीच्या सुलतानांनी आपल्या लोकांना नियमबद्ध पद्धतीचा हक्क देऊन टाकला.

३. टर्कीतील लोकांना हक्क मिळलेले पाहून टर्कीच्या साम्राज्यांत मोडणाऱ्या बल्गेरियाने स्वातंत्र्याचा झेंडा उभारून आपण स्वतंत्र असून टर्कीच्या अंकित नाही असें सर्व जगाला जाहीर करून टाकलें. स्वातंत्र्यसंपादन करण्यास उद्युक्त झालेल्या राष्ट्राला जगांतील सर्व स्वातंत्र्यशाही राष्ट्रांची सहानुभूति मिळते व ती या नियमाप्रमाणे बल्गेरियन लोकांना मिळाली आहे. स्वतंत्र बनलेल्या बल्गेरियन लोकांच्या मानेवर पारतंत्र्याचें जोखड पुन्हा ठेवण्याचें धारिष्टच टर्कीला झालें नाही व म्हणून परतंत्रतेच्या दलदलींत रुतून पडलेलें जगांतील एक राष्ट्र स्वातंत्र्यरवीच्या किरणांत पुन्हा सुखावूं लागलें आहे.

४. जर्मनीचे हल्लीचे कैसर हे अहंमन्य व सत्ताभिलाषी असल्याकारणाने त्यांनी जर्मन रिच्स्टॅगला जवळ जवळ धाब्यावर बसविलें होतें. पण जर्मनीचे मुख्य प्रधान मि. बुलो यांनी कैसरसाहेबांची कानउघाडणी नुकतीच केली व ती कैसरसाहेबांनी मुकाट्याने सहन केली. कैसरसाहेबांनी या वेळीं जर सहनशीलता दाखविली नसती, तर जर्मनीमध्ये कोणता गोंधळ उडून गेला असता हें सांगतां येणें कठीण आहे. कैसरसाहेबांना राजकीय गुप्त गोष्टी जगजाहीर करण्याचा हक्क नाही व त्यांनी प्रत्येक गोष्टींत रिच्स्टॅगची संमति घेतली पाहिजे असें आता ठरलें आहे व म्हणून जर्मनीच्या कैसरची सत्ता संपुष्टांत येऊन जर्मन लोकांची सत्ता वाढली आहे.

५. चीनचे परलोकवासी बादशहा यांनी एक बादशाही खलिता काढून आपल्या लोकांना नियमबद्ध पद्धति देण्याचा आपला विचार गेल्या वर्षी प्रगट केला. पण चिनी लोकांच्या दुर्दैवाने बादशहा व बादशहांची मातोश्री मरण पावल्यामुळे त्यांचे हेतु त्यांच्या हयातींत तडीस गेले नाहीत. तरी पण चीन देशांत जी जागृति झाली आहे, तिजवरून असें अनुमान काढण्यास हरकत नाही की, लौकरच चिनी लोकांच्या हातांत खरी राजसत्ता जाईल. जर चिनी लोकांत एकराष्ट्रियत्वाची कल्पना प्रादुर्भूत झाली, तर मग तिचे लचके गोऱ्या राष्ट्रांना तोडतां यावयाचे नाहीत व जगांतील एक प्राचीन राष्ट्र अबाधितपणें स्वतंत्र राहील.

६. वर नमूद केलेल्या पांच ठिकाणीं प्रजेच्या हातांत सत्ता गेली आहे किंवा जाण्याच्या पंथाला लागली आहे. पण गेल्या सालीं अशीं कांही उदाहरणें घडून आलीं आहेत की, जेथे राजेलोकांनी आपल्या पायाखाली आपल्या प्रजेला पुन्हा दडपून टाकलें आहे. या उदाहरणांपैकी पहिलें उदाहरण रशियाचें होय. सन १९०६ व १९०७ सालीं रशियन लोकांनी राजकीय हक्क संपादन करण्यासाठी जितके प्रयत्न केले तितके सर्व व्यर्थ जाऊन आजमितीस झारसाहेबांचा अंमल रशियन लोकांवर करडया रीतीने बसला आहे. रशियन लोकांची डयुमा सभा भरत आहे, पण तिच्या सभासदांच्या हातांत हिंदुस्थानांतील, कायदेकौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांच्या हातांतील सत्तेइतकी सत्ता आहे. थोडक्यांत व स्पष्ट बोलावयाचें म्हणजे रशियाचे झारसाहेब पूर्णपणें अनियंत्रित आहेत. ते रशियन प्रजेचे नोकर नसून, उलट रशियन प्रजाजनच झारसाहेबांचे बंदे गुलाम आहेत.

७. आपल्या प्रजाजनांना नियमबद्ध राज्यपद्धति एकदा देऊन ती पुन्हा परत घेण्याचा लोभीपणा पर्शियाच्या शहाने केला आहे. आपल्या अंगावर ज्या अर्थी बॉम्बगोळा फेकण्यांत आला त्या अर्थी पर्शियन लोक राजसत्ता चालविण्यास नालायक आहेत अशी लंगडी सबब पुढे आणून पर्शियाच्या शहाने गेल्या जूनमध्ये पर्शियन लोकांची पार्लमेंट मोडून टाकून ती ज्या इमारतींत भरली होती ती इमारत जमीन-दोस्त करून टाकली. टेब्रिझ शहरीं राष्ट्रीय पक्षाचे लोक जमले आहेत हें पाहून शहाने आपले पगारी मारेकरी त्या शहरावर चाल करून धाडले व राष्ट्रीय पक्षाची एकसहा कत्तल करून टाकली. या घटकेस पर्शियांत पूर्वीप्रमाणे बादशाही अंमल चालू असून पर्शियन लोक पुरे चीत झाले आहेत. तुर्की लोकांना नियमबद्ध पद्धति मिळाल्यामुळे त्यांच्या अंतःकरणांत नवीन जोम उत्पन्न झाला आहे. अशा नवीन जोमाच्या तुर्की लोकांपैकी कांही जण पर्शियांत घुसले आहेत. त्यांच्या शिकवणीने व सहवासाने पर्शियन लोक सत्ता मिळविण्याचा फिरून प्रयत्न करतील व त्यांत त्यांना आगेमागे खात्रीने यश आल्यावांचून राहणार नाही. राजेलोक व प्रजाजन यांच्यामधील तंटयांत सत्य व न्याय प्रजेकडे असतो म्हणून जरी पहिल्यापहिल्यांदा

सैन्याच्या जोरावर राजेलोक प्रजाजनांना चीत करूं शकतात, तरी सरतेशेवटीं प्रजाजन या लढयांत विजयी व यशस्वी होतातच !

८. सत्ता मिळविण्याचा आणखी एक प्रयत्न फसतो आहे व तो खुद्द इंग्लंडांत फसत आहे. तेथे जरी सर्व सत्ता प्रजाजनांच्या हातीं आहे तरी ती फक्त पुरुषांच्या हातीं आहे. पार्लमेंटांत सभासद निवडून देण्याचा हक्क इंग्लंडांतील बायकांना नाही. एखादी स्त्री कितीहि विद्वान् व श्रीमंत असली, तरी कायद्यामुळे त्या स्त्रीला पार्लमेंटांत सभासद निवडून देण्याचा हक्क नाही. हा ढळढळीत अन्याय असून त्याचें निराकरण झालें पाहिजे असें तेथील समजूतदार स्त्रियांचें मत असून, त्या मत देण्याचा हक्क संपादन करण्याकरिता अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करूं लागल्या आहेत. नुसत्या अर्जांनी कोणताहि हक्क प्राप्त व्हावयाचा नाही हें जाणून पार्लमेंटांतील सभासदांचें लक्ष आपल्या मागण्यांकडे वळावें या हेतूने त्यांनी दोन-चारदा पार्लमेंटाच्या सभेंत घुसण्याचा प्रयत्न केला. ते सर्व प्रयत्न फसले जाऊन पुष्कळ स्त्रियांवर कारागृहांत जाण्याची पाळी आली. यासंबंधाने विशेष लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही की, स्त्री-स्वातंत्र्याचे पोवाडे हिंदी लोकांपुढे गाणारे इंग्रज लोक आपल्याच देशभगिनींना मत देण्याचा हक्क देण्यास तयार नाहीत. वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे पुरुषांना मत देण्याचा हक्क प्राप्त होण्याकरिता जी पात्रता लागते ती पात्रता ज्या बायकांच्या अंगीं असेल त्यांना मत देण्याचा हक्क असावा. पण स्वार्थाला व पूर्वपरंपरेला लुब्ध झालेले इंग्रज लोक हिंदी लोकांपुढे स्त्री-स्वातंत्र्याच्या महतीबद्दल कितीहि बडबडले, तरी स्वतःवर पाळी आली म्हणजे ते माघार घेतात, हें निःसंशय सिद्ध झालें आहे. गेल्या वर्षभर इंग्लंडांतील मताभिलाषी स्त्रियांनी आकांडतांडव केलें, पण त्यांच्या मागणीला कोणींहि भीक घातली नाही. सत्ता एकटया राजाच्या हातीं असली काय किंवा ती थोडयाशा सरदार लोकांच्या हातीं असली काय, किंवा ती नुसत्या पुरुषाच्या हातीं असली काय, तिला कोणत्याहि तऱ्हेने मर्यादित लोकांच्या हातीं राहूं दिल्यास तिजपासून अनर्थ जरी झाले नाहीत, तरी अहित हें झालेंच पाहिजे. आमच्या मताने त्याच राष्ट्राची राजकीय स्थिति उत्तम होय, की ज्या राष्ट्रांत जातीकडे, धर्माकडे, वयाकडे किंवा लिंगाकडे लक्ष न देतां सर्वानुमताने किंवा बहुमताने ठरलेली पात्रता अंगीं असलेल्या सर्व व्यक्तींच्या हातीं सत्ता असते. असें राष्ट्र जगाच्या पाठीवर सध्या एकहि नाही. पण असें एक तरी राष्ट्र निर्माण केल्याशिवाय विसावें शतक मावळणार नाही, अशी आम्हांस आशा आहे.

९. वरील आठ उदाहरणें परकीय देशांसंबंधाने झालीं. खुद्द हिंदुस्थानचा विचार केला असतां विशेष आनंद मानण्यासारखी एकहि गोष्ट नाही. गेल्या वर्षी पुष्कळ दडपशाहीचे कायदे पसार होऊन सरकारने राष्ट्रीय पक्षावर करडी नजर ठेवली आहे. क्राइम्स ॲक्ट, प्रेस ॲक्ट, सभाबंदीचा कायदा वगैरे कायद्यांच्या धोंडी हिंदी लोकांच्या उरावर ठेवल्या असून त्यांच्या दडपणाखाली हिंदी लोकांचा चक्काचूर

होऊन जातो की काय, अशी भीति हिंदी देशभक्तांना पडली आहे. बॉम्बमुळे जरी सरकारने हें दडपशाहीचें धोरण स्वीकारलें आहे, तरी त्याचा तिखटपणा नाहीसा करण्याकरिता लॉर्ड मोर्ले यांनी आपल्या सुधारणांच्या काकवीचें गोड बोट हिंदी लोकांच्या जिभांना लावलें आहे. लॉर्ड मोर्ले यांच्या सुधारणांच्या गोडीने मवाळ मंडळींना इतका आनंद झाला आहे की, ते आनंदाच्या भरांत नाचूं-बागडूं लागले आहेत. या नाचांत एका कवीने वर्णिलेल्या "करिष्यन्ति प्रायो वसनरहिताः तांडव विधीम्" या स्थितीप्रमाणे त्यांची स्थिति होते की काय, अशी शंका प्रेक्षकजनांना आली आहे. लॉर्ड मोर्ले यांच्या सुधारणांचें पृथःकरण केलें, तर त्या हवेने भरलेल्या फुग्याप्रमाणे नुसत्या 'दिसनेमे ढब्बू' आहेत, हें कोणताहि साधारण अकलेचा मनुष्य कबूल करील. अति हवा बाहेर पडत असतांना लहान मुलांच्या हातांतील फुग्याप्रमाणे ह्या सुधारणा थोडासा गोड आवाज करतील. पण ज्याप्रमाणे आंतील हवा संपली म्हणजे टर्र फुगलेला फुगा पार सुरकुतून जाऊन मुका पडतो, त्याप्रमाणे कांही वर्षे लोटल्यावर ह्या सुधारणांचें नावीन्य नष्ट होऊन त्यांच्यांत कोणत्याहि प्रकारचा अंगभूत भरीवपणा नसल्यामुळे त्या झाल्या तरी असून-नसून सारख्याच होतील.

सन १८५८ च्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस इंग्रज लोकांचें हिंदुस्थानवर निर्वेध सार्वभौमत्व स्थापन झालें असें म्हणावयास हरकत नाही. ह्या गोष्टीस आज ५० वर्षें झालीं आहेत. ह्या ५० वर्षांच्या अवधींत सर्व राजकीय सत्ता इंग्रज लोकांच्या म्हणजे राज्यकर्त्यांच्या हातांत आहे. वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे ही सत्ता एव्हाना हिंदी लोकांच्या हातांत यावयास पाहिजे होती. कोणत्याहि देशांतील लोकांच्या हातांत जर एखाद्या राजाला त्यांना सत्पात्र करून राजसत्ता द्यावयाची असेल, तर त्याला ५० वर्षांचा अवधि पुरा आहे. जपानने एवढ्याच काळांत आपली उन्नति करून घेतली, पण हिंदी लोकांच्या स्थितीकडे जर पाहिलें तर त्यांची राजकीय स्थिति सुधारण्याच्या ऐवजीं ती जास्त निकृष्ट मात्र झाली असून, दिवसेंदिवस ती खालावत चालली आहे. हिंदुस्थानांत शेकडा फक्त पांच जणांना लिहितां-वाचतां येतें. ५० वर्षांच्या अवधींत निदान शेकडा ५० लोकांना तरी लिहितां-वाचतां येऊं लागलें असतें. पण सरकारकडून तसा प्रयत्न करण्यांत आला नाही व लोकांनीं तो आपणहून केला नाही. हिंदुस्थानांतील लोक शिक्षणाच्या बाबतींत इतके मागासलेले असल्याकारणाने हिंदुस्थानच्या भूमींत स्वाभिमानाचें व देशाभिमानाचें बीं रुजूं नये यांत मोठेसें नवल नाही. एवढ्या प्रतिकूल परिस्थितींत कोठे कोठे स्वाभिमानाचे व देशाभिमानाचे अंकुर फुटूं लागले नाहीत तोंच, सरकारने त्यांच्यावर कायद्याचा विळा चालविण्यास सुरुवात केली आहे. चोहो बाजूंनी असा कोंडमारा झाला असल्यामुळे हिंदी लोकांचीं हृदयाकाशें नैराश्याच्या अभ्राने काळीं-ठिक्कर पडून जावींत, ह्यांत नवल वाटण्यासारखें कांही नाही. पर्शिया व रशिया या दोन देशांतील लोकांच्या हातांत जरी सत्ता नाही, तरी त्या देशांतील सत्ताधीश राजे

प्रजाजनांच्याच धर्माचे, जातीचे व हाडामांसाचे आहेत. म्हणून सदरहू दोन देशांतील राजांनी जरी सर्व सत्ता आपल्या हातांत बळकावून ठेवली असली, तरी तेथील राजे व प्रजाजन ह्यांच्यामधील पुष्कळ गोष्टींतील हितैक्यामुळे त्या देशांतील प्रजाजनांना त्यांचा दुबळेपणा विशेष रीतीने भासत नाही व जाचत नाही. पण हिंदी लोकां-संबंधाने मात्र तशी गोष्ट नाही.

हिंदुस्थानांतील राज्यकर्ते इंग्रज लोक व स्वतःवर राज्य करून घेणारे हिंदी लोक ह्यांच्यामध्ये दोन ध्रुवांमधील भेदाइतका भेद आहे. दोघांचे धर्म निराळे, दोघांचे देश निराळे व दोघांचे हेतु निराळे! एकाला हिंदुस्थानवर सदैव साम्राज्य गाजविण्याची इच्छा आहे, तर दुसऱ्याला स्वराज्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षा आहे. ह्या दोन भिन्न स्वरूपाच्या इच्छांमुळे येथील राज्यकर्ते व प्रजाजन ह्यांच्यांत वितुष्ट पडलें आहे व तें लॉर्ड मोर्ले ह्यांच्या दिखाऊ व कुचकामी सुधारणांमुळे नष्ट होण्याचा संभव नाही. हिंदी लोकांना संतुष्ट करण्याचा एकच उपाय म्हटला म्हणजे त्यांना स्वराज्य देणें हा होय. आजच स्वराज्याचे सर्व हक्क देऊन टाका, असें हिंदी लोकांचें म्हणणें नाही. पण खरे व भरीव हक्क देण्यास सुरुवात करा, एवढेंच त्यांचें म्हणणें आहे. आपल्या प्रजाजनांना नियमबद्ध पद्धति द्या असा खलिता पर्शियाच्या शहराला पाठविणारें इंग्रज सरकार स्वतःच्या हिंदी प्रजेला कोणताहि भरीव हक्क देत नाही. हें पाहून मानवी धर्माच्या स्वार्थीपणाचें कौतुक करण्याशिवाय अन्य मार्ग नाही. सरकार जरी कांही देत नाही, तरी हिंदी लोकांनी नाऊमेद होऊं नये.

हिंदुस्थानांत एकराष्ट्रियत्वाच्या कल्पनेच्या उदरांतून नवीन राष्ट्र उत्पन्न झालें आहे. हें राष्ट्र सध्या बाल्यावस्थेंत आहे. पण जर ह्या कोवळ्या बाळाला देशाभिमानाचें धारोष्ण दूध व स्वार्थत्यागाचें बालामृत मनमुराद पाजण्यांत आलें तर कालेंकरून तें बाळ पूर्ण वाढीला जाऊन पोहोचेल व मग तें स्वराज्याची कमाई करूं शकेल. ज्या अर्थी हें नवीन बाळ जन्मास आलें आहे, त्या अर्थी आता कोणीहि निराश व्हावयास नको. हिंदी लोकांना स्वराज्य हटकून मिळणार, प्रश्न काय तो काळाचाच आहे! तो काळ लवकर येणार किंवा उशिरा येणार, हें हिंदी लोकांच्या देशाभिमानावर, स्वार्थत्यागावर व कर्तबगारीवर सर्वस्वीं अवलंबून आहे.

– भाला, दि. २१ जानेवारी १९०९

---

# ३७. नमुनेदार खेडेगाव

आज तीन वर्षे जहाल-मवाळांत रण माजून राहिलें आहे. या रणाचा परिणाम असा झाला आहे की, सन १९०७ सालीं मवाळांनी भाडोत्री गुंडांकडून जहालांची

डोकीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत फोडवली व सन १९०८ सालच्या डिसेंबर महिन्यांत त्यांनी आपली जहालांच्या स्पर्शाने न बाटलेली अशी सोवळी सभा भरवून घेतली. सन १९०५ सालच्या बनारसच्या राष्ट्रीय सभेपासून जहाल-मवाळांत सुरू झालेल्या तंटयांचा निकाल तीन वर्षांनी कायमचा लागला, असें म्हणण्यास हरकत नाही. आता यापुढे जहाल-मवाळांत एकी होणें किंवा यदाकदाचित् ती मारूनमुटकून घडवून आणल्यास ती टिकणें शक्य नाही. दोन्ही पक्ष भिन्न-विचारी व भिन्न-मार्गी आहेत. भिक्षा मागून जें कांही मिळेल तेवढयावरच संतुष्ट राहणारे मवाळ लोक आहेत. तर अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या तत्त्वावर राजकीय हक्कांची पैदास्त करूं इच्छिणारे जहाल लोक आहेत. दोघांनाहि वसाहतींचें स्वराज्य पाहिजे. पण तें स्वराज्य प्राप्त करून घेण्याकरिता मवाळ भिक्षेपलीकडे जाण्यास तयार नाहीत. तर स्वराज्य प्राप्तीसाठी नाना प्रकारचे कष्ट सोसण्यास जहाल लोक सज्ज आहेत. दोन्ही पक्षांचीं वरीलप्रमाणे तत्त्वें असल्याकारणाने मवाळांची सभा यापुढे कोणत्या स्वरूपाची राहील व जहालांच्या राष्ट्रीय सभेचें धोरण कोणत्या प्रकारचें असेल, याची कल्पना आमच्या वाचकांना सहज येईल. प्रागतिक मवाळांची राष्ट्रीय सभा सरकारपुढे दीन स्वराने आपलें रडगाणें गाईल, तर प्रागतिक जहालांची राजकीय सभा आपल्या कर्तबगारीने सरकारला राजकीय हक्क देण्यास भाग पाडील. रडणाऱ्या लोकांची संख्या अल्प असली तरी चालेल, पण स्वतःच्या कर्तबगारीवर राजकीय हक्क संपादन करणारांची संख्या अल्प असून चालावयाचें नाही. साधारण प्रमाणाने पाहिलें असतां शेकडा ७५ लोक "खाना-पिना और चमन करना" या पशुवृत्तीचे असतात. या ७५ लोकांची नजर आपल्या स्वतःच्या व स्वतःच्या कुटुंबाच्या पालन-पोषणापलीकडे जात नाही. जे २५ लोक राजकीय कामांत मन घालतात, त्यांपैकी निदान ५ तरी लोक मवाळ असतात. बाकीचे राहिलेले २० लोक लोक स्वतःच्या कर्तबगारीवर आपली राजकीय उन्नति करून घेणारे असतात.

हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीचें अवलोकन केल्यास असें कोणालाहि कबूल करावें लागेल की, स्वतःच्या कर्तबगारीवर आपली उन्नति करून घेऊं इच्छिणारे शेकडा २० लोक नाहीत. अशा कार्यक्षम लोकांची संख्या वाढविणें हें हिंदी पुढाऱ्यांचें मुख्य कर्तव्य आहे. ज्या वेळेला हिंदुस्थानांत शेकडा २० कर्तबगार माणसें सापडूं शकतील त्या वेळेस हिंदुस्थानची स्थिति सुधारण्यास फार वेळ लागणार नाही. ही शेकडा २० माणसें वर्षांतून फक्त तीन दिवस राष्ट्रीय सभा भरवून निपजूं शकणार नाहीत. हीं माणसें उत्पन्न करावयाचीं असल्यास सबंध वर्षभर सर्व हिंदुस्थान देश घुसळून काढला पाहिजे. नुसत्या मोठमोठ्या शहरीं व गावीं खटपट करून भागावयाचें नाही. राष्ट्राचा घटक जें खेडेगाव तेथून जर प्रारंभ करण्यांत आला, तरच या अपेक्षित प्रमाणाला जाऊन पोहोचतां येईल. ज्या वेळेस जहालांचीं मतें खेडेगावांत शिरून तेथे रुजूं लागतील, त्या वेळेस जहालांची संख्या शेकडा २० या प्रमाणांत जाऊन

पोहोचेल. आपली संख्या शेकडा २० या प्रमाणापर्यंत वाढविण्याची खटपट जहाल पुढाऱ्यांनी व जहाल लोकांनी अवश्य केली पाहिजे. प्रत्येक राष्ट्रपक्षीय मनुष्यानें स्वतःचें म्हणून एक खेडेगाव पसंत करावें व त्यांत आम्ही खाली देणार आहोंत त्या दहा गोष्टी अमलांत आणण्याचा प्रयत्न करावा. खेडेगाव गाठल्याशिवाय हिंदुस्थानचा तरणोपाय नाही व खेडेगावांतील लोकांनी नागरिक या नात्याने आपलीं राष्ट्रीय कर्तव्यें ओळखावींत म्हणून त्यांच्यांत खालील गोष्टींचा आरंभ करण्यांत यांवा. ज्या खेडेगावांत आम्ही देणार आहोंत त्या दहा गोष्टी करण्यांत येतील त्या खेडेगावांतच राष्ट्रीय पक्षाचे लोक आपोआप निपजूं लागतील. याप्रमाणे प्रत्येक खेडेगावांत राष्ट्रीय लोक निघूं लागले म्हणजे हिंदुस्थानची सुधारणा अल्पावकाशांत होईल. म्हणून ज्यांना बोलके जहाल म्हणून न राहतां कर्ते जहाल बनावयाचें असेल त्यांनी एकेक खेडेगाव हातीं घेऊन त्यांत खालील दहा गोष्टी घडवून आणाव्यात.

१. पहिली गोष्ट ही की, प्रत्येक खेडेगावांत एक मारुतीचें देवालय असावें. जर जुनें देऊळ असेल, तर त्याचा जीर्णोद्धार करून त्याला नीटनेटकें करावें किंवा जर जुनें देऊळ नसेल, तर नवीन देऊळ बांधून काढावें. जरी दुसरीं देवळें असलीं, तरी मारुतीचें देऊळ असण्यांत पुष्कळ अर्थ आहे. बजरंग ही शारीरिक बलाची देवता आहे. या देवतेची आराधना इतर सर्व देवतांच्या अगोदर करण्यांत आली पाहिजे. शरीर पुष्ट तर मन पुष्ट ! मन पुष्ट तर सर्व गुण पुष्ट ! गुण पुष्ट तर राष्ट्र पुष्ट ! शरीर-पुष्टतेमध्ये व राष्ट्र-पुष्टतेमध्ये हा परस्पर-संबंध असल्याकारणाने प्रत्येक राष्ट्रीय मनुष्याने स्वतःचें शरीर पुष्ट करून आपल्या इतर देशबांधवांचीं शरीरें पुष्ट व पिळदार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नुसती बलभीमाची स्थापना करून दर शनिवारीं त्याच्या मस्तकावर लोटाभर पाणी घालून व चिमूटभर शेंदूर फासून शरीराची पुष्टि होणें शक्य नाही. बजरंगबलीच्या साहाय्याने शरीराची पुष्टि करावयाची असल्यास दुसरी गोष्ट अवश्य केली पाहिजे.

२. ही दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे मारुतिरायाच्या देवालयाच्या शेजारीं तालमीची स्थापना करणें होय. ही तालीम जुन्या पद्धतीची असावी. हींत जोडी, मल्लखांब, काठी, दांडपट्टा, फरीगदगा, कुस्ती वगैरे मर्दानी खेळ तरुण लोकांना शिकवून त्यांचीं शरीरें सकस व ताकदवान करण्यांत यावींत. तालीम हवेशीर असून तिजपुढे एक पटांगण असावें. या पटांगणांत खुल्या हवेंतील खेळ म्हणजे चेंडू-दांडू, आट्यापाट्या, खो-खो वगैरे खेळण्याची गोडी तरुण पिढीला लावण्यांत यावी. शारीरिक बलाची महती आम्ही एका वाक्यांतच अशी सांगतों की, "ज्याचा सदरा लाल, तो एक मौल्यवान् लाल होय."

३. वरील दोन गोष्टी केल्यावर शारीरिक बलाला मानसिक बलाची जोड मिळावी म्हणून शेजारींच एक मराठी राष्ट्रीय शाळा स्थापण्यांत यावी. या शाळेंत फक्त बाळबोध लिहावयास व वाचावयास शिकवावें. हल्ली वर्तमानपत्रें व पुस्तकें

बाळबोध लिपींत असल्यामुळे नुसती बाळबोध लिपी अवगत असली म्हणजे ज्ञानार्जनाचें मुख्य साधन हस्तगत झालें असें म्हणावयास हरकत नाही. हिंदुस्थानांत हल्ली शेकडा १० लोकांना लिहितां-वाचतां येतें. आमच्या म्हणण्याप्रमाणे जर खेडेगावांत व्यवस्था करण्यांत आली, तर अवघ्या पांच वर्षांच्या आंत खेडेगावांत औषधाला सुद्धा निरक्षर मनुष्य मिळणार नाही. बाळबोध लिहावयास व वाचावयास शिकविल्यानंतर पाढे व साधारण हिशोब करण्यास शिकविलें तर उत्तम होईल.

४. चौथी गोष्ट ही की, शाळेला जोडून एक वाचनगृह असावें. यांत सर्व प्रकारचीं मायभाषेंत चालविलेलीं वर्तमानपत्रें असावीत. वर्तमानपत्राबरोबर तेथे मायभाषेंत लिहिलेलीं पुस्तकेंहि असावीत. हल्लीच्या काळीं दररोज मायदेशांत कोणकोणत्या घडामोडी चालल्या आहेत हें कळण्यास वर्तमानपत्राशिवाय दुसरें साधन नाही. म्हणून प्रत्येक खेडेगावांत एक वाचनगृह असावें.

५. पांचवी गोष्ट ही की, वाचनगृहाच्या शेजारीं गावांतील लोकांच्या समाईक भांडवलावर चालविलेलें एक स्वदेशी दुकान असावें. या दुकानांत फक्त स्वदेशी माल असून तो गावांतील लोकांना फारच अल्प नफ्यावर विकण्यांत यावा. स्वदेशी मालाचा खप वाढविण्यास प्रत्येक खेडेगावांत एक स्वदेशी दुकान निघालें पाहिजे. खेडेगावांतील लोकांच्या गरजा फार थोडद्या असल्याकारणाने या स्वदेशी दुकानांत मुख्यत्वेंकरून स्वदेशी साखर, स्वदेशी कापड, आगपेटचा, धुण्याचा स्वदेशी साबण वगैरे मुख्य मुख्य जिनसा ठेवाव्यात.

६. अलीकडे खेडेगावांतील लोकांना हलक्यासलक्या गोष्टींवरून आपआपसांत भांडून कोर्टांत जाण्याची खोड लागली आहे. नफ्याकडे नजर न देतां फक्त चुरशीमुळे ५० रुपये किमतीच्या जमिनीच्या तुकडचासाठी ते १,०० रुपये खर्च करण्यास तयार होतात. आधीच जमिनी पूर्वीप्रमाणे पिकत नाहीत व तशांत आपआपसांत क्षुल्लक कारणांवरून भांडण्याची खोड जडल्यामुळे खेडेगावांतील लोकांची सांपत्तिक स्थिति इतकी खालावली आहे की, सबंध गाव झोडपून काढला तरी १,०० रुपयांची रोकड मिळण्याची पंचाईत पडते. यासाठी लोकांचे भांडणापायीं पसे खर्च होऊं नयेत म्हणून प्रत्येक खेडेगावांत एक पांच जणांची पंचायत स्थापन करण्यांत यावी व तिच्या द्वारें गावांतील शक्य तितके तंटे आपसांत मिटविण्यांत यावेत.

७. सातवी गोष्ट ही की, प्रत्येक खेडेगावांत सार्वजनिकरीत्या दोन राष्ट्रीय उत्सव करण्यांत यावेत. पहिला उत्सव श्रीगणेशाचा होय. दरवर्षी भाद्रपद मासीं श्रीगजाननाची प्राणप्रतिष्ठा करून मंगलमूर्तीचा उत्सव तीन दिवस उत्तम तऱ्हेने करण्यांत यावा. गावांत एक मेळा काढून ताल-सुरावर त्याने फक्त धार्मिक पदें म्हणावींत. गणपत्युत्सव हा फक्त धार्मिक स्वरूपाचा ठेवावा व त्यांत फक्त धार्मिक गोष्टींचा विचार करावा. उदाहरणार्थ, पतितपरावर्तन हा विषय धार्मिक स्वरूपाचा

असल्याकारणाने गावांतील लोकांनी तीन दिवस एकत्र जमून या प्रश्नाचा नीट विचार करावा. परधर्मांत स्वधर्मीय जाणार नाहीत व जे कोणी गेले असतील त्यांना परत स्वधर्मांत घेणें वगैरे धार्मिक विषयावरील पदें मेळचाने म्हणावींत व त्यांचा जमलेल्या लोकांनी मनःपूर्वक विचार करावा. गणपत्युत्सव धार्मिक स्वरूपाचा ठेवूनहि त्याचा सार्वजनिक उपयोग पुष्कळ करून घेतां येईल.

८. दुसरा उत्सव श्रीशिवाजीमहाराजांचा होय. ज्या महात्म्याने महाराष्ट्रियांचें हिंदुत्व रक्षण करून त्यांना स्वातंत्र्याची जोड करून दिली त्या नरशार्दुलाचा उत्सव स्वराज्याभिलाषी लोकांनी हटकून केला पाहिजे. हा उत्सव राजकीय आहे म्हणून त्यांत सर्व राजकीय गोष्टींची चर्चा झाली पाहिजे. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व इतर प्रचलित राजकीय विषयांवर या उत्सवांत ऊहापोह होऊन त्यांचें ज्ञान खेडेगावांतील स्त्री-पुरुषांना देण्यांत यावें. वरील दोन उत्सवांच्या प्रसंगीं शहरांतील विद्वान् लोकांना व्याख्यानें व पुराणें यांच्यासाठी आमंत्रणें करण्यांत यावींत व त्यांच्या ज्ञानाचा फायदा घेण्यांत यावा.

९. वरील आठ गोष्टी अमलांत आणण्यासाठी एक नियमबद्ध संस्था स्थापन करण्यांत यावी. या संस्थेला ज्या खेडेगावांत ती असेल त्या खेडेगावाचें नांव देण्यांत यावें. उदाहरणार्थ, गाणगापूर येथील संस्थेला ‘ गाणगापूर वंदे मातरम् सांप्रदायिक मंडळी ’ असें म्हणण्यांत यावें. अशीं सोपीं व स्थलसूचक नांवें दिल्यापासून कोणतीहि संस्था कोणत्या गावची आहे याचा बोध झटदिशीं होऊं शकतो. उगीच भलतींसलतीं नांवें देण्यांत येऊं नयेत.

१०. अशी संस्था प्रत्येक खेडेगावांत स्थापन झाल्यावर तिच्या खर्चास व इतर बाबतींत होणाऱ्या खर्चास लागणारी आवश्यक रक्कम जमविण्याकरिता मूठभराईचा अवलंब करण्यांत यावा. ती खेडेगावांत जमविण्यास फारशी यातायात पडणार नाही व ती देण्यास कोणास फारसें जड जाणार नाही. जवळ रोकड पैसा नाही अशीं निर्धन कुटुंबें खेडेगावांत असू शकतात. पण घरांत मूठभर धान्य नाही असें निर्धान्य कुटुंब जवळ जवळ एकहि नसतें, असें म्हणण्यास हरकत नाही. म्हणून मूठभराई मिळण्यास कोणत्याहि खेडेगावांत कठीण पडणार नाही.

वरील दहा गोष्टी असलेलीं खेडीगावें निर्माण करणें हें जहालांचें कर्तव्य आहे. नुसते शाब्दिक जहाल आता उपयोगाचे नाहीत. तर कर्तृत्ववान् जहालांची आता जरुरी आहे. मवाळांचे मार्ग चुकीचे व कुचकामाचे आहेत हें आता पक्कें ठरून गेले आहे. म्हणून त्यांच्यावर यापुढे घाव घालीत बसण्यांत अर्थ नाही व पुरुषार्थ नाही. मवाळांनी उभारलेले आपल्या घाणेरड्या विचारांचे शौचकूप पार जमीनदोस्त झाले असून, त्यांच्याखालील घाणेरडी जागा जहालांच्या विचारसरणीच्या आगीने जाळूनपोळून स्वच्छ झाली आहे. याप्रमाणे स्वच्छ झालेल्या जागेवर जहालांनी आपल्या राष्ट्रीय स्फूर्तीचीं मंदिरें बांधण्यास यापुढे सुरुवात केली पाहिजे. प्रत्येक

जहालाचा कोणत्या ना कोणत्या तरी खेडेगावाशीं संबंध असतोच, म्हणून असला संबंध असलेलें खेडेगाव त्याने आपल्या हाताशीं घेऊन त्यांत वरील दहा गोष्टी घडवून आणाव्यात. या दहा गोष्टी एकदम एका वर्षांत होणें शक्य नाही. म्हणून जरी १० वर्षांत वरील १० गोष्टी घडून आल्या तरी कांही हरकत नाही. वेळ कितीहि लागो, पण प्रारंभ हा लौकरच झाला पाहिजे. या गोष्टी साध्य करून घेण्याच्या कामीं अडचणी येतील, पण त्या सर्वांना तोंड देऊन हें एक मायदेशाचें ऋण आहे, अशी भावना मनांत धरून व फलाची अपेक्षा न करतां प्रत्येक जहालाने वरील १० गोष्टी करण्याची सात्विक हाव धरावी व आपले जन्मसिद्ध राष्ट्रीय ऋणाची अंशत: तरी फेड करावी. आता कृतीचे दिवस आले आहेत, म्हणून आमचे जहाल बांधव यापुढे कृति करून दाखविणार की नुसती वायफळ वडबड करीत राहणार? ते कृति करून दाखवतील अशी आम्हांस उमेद आहे व आमची ही उमेद खचवूं नका अशी त्यांना आमची साग्रह विनंती आहे.

— भाला, दि. १ फेब्रुवारी १९०९

---

## ३८. घुसा

हिंदुस्थानची राजकीय स्थिति सुधारण्यासाठी आजपर्यंत नाना तऱ्हेचे उपाय सुचविण्यांत आले व त्याप्रमाणे थोडीबहुत कृतीहि करण्यांत आली. सामाजिक सुधारणावाल्यांनी सामाजिक सुधारणा कमीजास्त प्रमाणाने घडवून आणली, औद्योगिक सुधारणावाल्यांनी लहानमोठे उद्योग-धंदे काढले व राजकीय सुधारणा-वाल्यांनी हरएक तऱ्हेची चळवळ यथामति व यथाशक्ति करून पाहिली. पण काय झालें असेल तें असो व घोडे पेंड खातें तें खावो, आम्ही राज्यकर्त्यांच्या दृष्टीने सत्पात्र ठरत नाही व कांही केल्याने आमची राजकीय सुधारणा घडून येत नाही. दिवसें-दिवस आमची स्थिति खालावत चालली आहे, निदान ती सुधारत तरी चालली नाही. "हें असें कां होत आहे" हा एक मोठा बिकट प्रश्न आहे. हा प्रश्न जर योग्य रीतीने सोडवला गेला तर पुढील मार्ग आक्रमण्यास सोपें जाईल. हिंदी लोकांची स्थिति सुधारण्याच्या हेतूने मवाळांनी भिक्षांदेहीचा मार्ग शोधून काढला व जर तो मार्ग यशस्वी झाला असता, तर त्यांच्या मार्गासारखा गुलजार मार्ग दुसरा कोणताहि नव्हता. नुसते अर्ज करून स्वराज्यप्राप्ति झाली असती, तर जगांत आठवें आश्चर्य घडून आलें, असेंच लोकांनी म्हटलें असतें. भिक्षांदेहीच्या मार्गाने हिंदी लोकांना स्वराज्याची जोड झाली असती, तर या मार्गाचा अपूर्व शोध लावल्याचें श्रेय मवाळांच्या पदरीं पडलें असतें व भिकमाग्यांना स्वराज्य देण्याचा उदारपणा

इंग्रज लोकांच्या वांट्याला आला असता. पण दोघेहि वेटे कमनशिबाचे पडले, म्हणून भिक्षांदेहीच्या वृक्षाला कांही केल्याने फळ येईना व मवाळांना कल्पकपणा व इंग्रजांचा उदारपणा हिंदी लोकांच्या अनुभवास येईना.

मवाळांचा भिक्षांदेहीचा मार्ग जितका गुलजार आहे तितका तो जर फलदायी असता, तर आम्ही स्वत: व आमचे सर्व जहाल बंधु आनंदाने मवाळ बनले असते. कोणतीहि शारीरिक किंवा मानसिक यातना न सोसता जर स्वराज्याची प्राप्ति होत असेल, तर ती फेटाळून देण्याइतका महामूर्ख जहाल कोणीहि नाही. आम्ही हें कबूल करतों की, मवाळांचा भिक्षांदेहीचा मार्ग बिनधास्त व बिनधोक आहे. त्या मार्गाने वाट चालल्यास राजद्रोहाच्या खटल्याच्या खड्डयांत पडण्याची भीति नाही. पण त्या मार्गाने गेल्यास स्वराज्याच्या नंदनवनास जाण्याचीहि आशा नाही. ज्याला 'सहारा डेझर्ट'मध्ये भटकण्याची इच्छा असेल, त्याने खुशाल भिक्षांदेहीच्या मार्गाने जावें. शतकाचीं शतकें भटकत बसलें तरी ज्याप्रमाणे 'सहारा डेझर्टां'त वाटसरूला पाण्याचा थेंब मिळण्याची आशा करावयास नको, त्याप्रमाणे भिक्षां-देहीच्या मार्गाने रखडत गेल्यास राजकीय प्रवाशाला राजकीय हक्काच्या पाण्याचा एकहि थेंब मिळण्याची आशा धरावयास नको. सारांश, भिक्षांदेहीचा मार्ग खोल आहे व त्याने कांहीहि साधावयाचें नाही. इतकेंहि असून जर मवाळांना त्याच मार्गाला बिलगून बसावयाचें असेल, तर त्याने तसें खुशाल करावें. त्याला आमची ना नाही. आम्हां जहालांना तर असें प्रामाणिकपणें वाटतें की, स्वत:च्या कर्तबगारीशिवाय आजपर्यंत कोणतेंहि राष्ट्र उदयास आलें नाही व पुढेहि येणार नाही. स्वावलंबन-मार्ग हाच जहालांचा खरा मार्ग आहे. हा मार्ग थेट स्वराज्यांत नंदनवनांत जाऊन पोहोचत आहे. हा मार्ग मवाळांच्या भिक्षांदेहीच्या मार्गाप्रमाणे गुलजार व गुळ-गुळीत नाही. हें आम्हांस कबूल आहे. पण मवाळांच्या मार्गाप्रमाणे तो फोलपणाच्या 'सहारा डेझर्ट'मधून जात नसून तो स्वराज्यांत नंदनवनाकडे जात आहे. म्हणून जहालांचा मार्ग कितीहि खडकाळ असला, तरी तोच अपेक्षित स्थलाकडे नेणारा असल्यामुळे त्याच मार्गाने जाणें हें सर्वस्वीं हितकर आहे. स्वावलंबनाच्या मार्गाची कार्यक्षमता पटून त्या मार्गाने जाण्याचा निश्चय पुष्कळ लोक करूं लागले आहेत ही अत्यानंदाची गोष्ट आहे. या मार्गाच्या अनुरोधाने निरनिराळे देशी धंदे अस्तित्वांत आले आहेत. याच मार्गाच्या अनुरोधाने बंगाल्यांत, महाराष्ट्रांत, मद्रासेंत व इतर प्रांतांतून राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत. याच मार्गाच्या अनुरोधाने बहिष्काराचा बडगा हातांत घेऊन त्याचा मारा परदेशी मालावर हिंदी लोकांनी चालविला आहे. याच मार्गाच्या अनुरोधाने शेकडो हिंदी देशभक्त कमी-जास्त शिक्षा खाऊन तुरुंगाच्या आवारांत हिंदी स्वराज्याच्या इमारतीचा पाया घालीत आहेत. स्वावलंबनाचा मार्ग हाच खरा मार्ग आहे. या मार्गानेच जगांतील पतित राष्ट्रें वरती आलीं. या मार्गाचें सत्यत्व व हितकरत्व जगाच्या इतिहासाने

सप्रमाण सिद्ध केलें असतां मवाळांना हा मार्ग पटू नये, हें त्यांच्या वुद्धिहीनत्वाचें नव्हे – भित्रेपणाचें लक्षण आहे. असो; भित्रे लोकांना धीट करणें शक्य नाही, म्हणून कमनशिबी मवाळांना सोडून देऊन जहालांनी स्वीकृत मार्गाने जाण्याचा आपला निश्चय कायम ठेवावा.

आम्हीं वर सांगितलें आहे की, स्वावलंबनाचा मार्ग हाच स्वराज्यप्राप्तीचा खरा मार्ग आहे व त्या मार्गाच्या अनुरोधाने आमच्या जहाल बंधूंनी हिंदुस्थानांत निरनिराळ्या चळवळी चालविल्या आहेत, हें त्यांना अत्यंत भूषणावह आहे; पण येथील चळवळींनीच आपला कार्यभाग साधेल, असें आम्हांस वाटत नाही. हिंदुस्थानांतील चळवळींना बाहेरील चळवळीची पुस्ती देण्यांत यावी असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थानांत हल्ली चालू असलेल्या चळवळी तशाच चालू ठेवून किंवहुना त्यांचा जोर व संख्या वाढवून त्यांना भरतीदाखल जगाच्या इतर स्वतंत्र राष्ट्रांतहि आपणांस प्रयत्न केले पाहिजेत. जगाच्या प्रत्येक राष्ट्रांत हिंदी जहाल लोकांनी आपली एक वसाहत स्थापन करावी. अशा वसाहतींचा अंतिम हेतु तेथील लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा नसणार, हें उघड आहे. केवळ स्वतंत्र देशांतील लोकांची सहानुभूति मिळविण्याकरिता व आपल्याविषयी स्वतंत्र लोकांच्या मनांत आदर व स्नेहभाव उत्पन्न करण्याकरिताच या वसाहती करावयाच्या आहेत. अमेरिकेंत किंवा फ्रान्सांत अथवा जपानांत याप्रमाणे वसाहती स्थापन करण्यांत आल्या, तर आमच्या मताने राजकीयदृष्ट्या बराच कार्यभाग होणार आहे. अमेरिकेंत हिंदी लोकांच्यासाठी एक 'होम' स्थापन करण्यांत आलें आहे. याच 'होमा'ची एक वसाहत झाल्यास फार उत्तम होईल. वसाहत करावयाची म्हणजे परदेशांत जाऊन कायमचे तेथे राहवयाचें असें मात्र कोणीं समजूं नये, तर तेथे जाऊन, निरनिराळे उद्योगधंदे करून, जन्मभर तेथे पोट भरून व शिल्लक साठविलेला पैसा पदरीं बांधून म्हातारपणीं देह टाकण्याकरिता मायदेशीं परत यावयाचें. अशा तऱ्हेने जर जगांतील स्वतंत्र राष्ट्रांत वसाहती करण्यांत आल्या, तर त्यापासून अनेक फायदे आहेत.

पहिला फायदा हा आहे की, त्यापासून मनामध्ये 'आत्मविश्वास' उत्पन्न होईल. आपण निसर्गतः कमी दर्जाचे नसून केवळ आगंतुक परिस्थितीमुळे आपली राजकीय अवनति झाली आहे, अशी मनाची खात्री झाल्यावर, आपण मनोभावें झटलों, तर आपली उन्नति पुनरपि होईल, अशी भावना मनांत उत्पन्न होईल. या भावनेलाच 'आत्मविश्वास' म्हणतात. हा आत्मविश्वास एकदा उत्पन्न झाला म्हणजे राजकीय उन्नतीची किल्ली सापडली असेंच म्हटलें पाहिजे. हिंदी लोकांना ही दीन स्थिति येण्याचें कारण त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वासाचा अभाव होय. या आत्मविश्वासाच्या अभावींच आम्ही दिवसेंदिवस खंगत चाललों आहोंत. हा आत्मविश्वास उत्पन्न होण्यास स्वतंत्र देशांतील स्वतंत्र विचारांची हवा अत्यंत उपयोगी होय. परदेशांत जाऊन व तेथे वसाहती करून राहण्यापासून आम्हांस जो

एकच फायदा हवा आहे तो हाच होय. थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे स्वतंत्र राष्ट्रांत राहणारांचीं मनें स्वतंत्र होतात व स्वतंत्र मनें परतंत्र शरीरांत कधीहि कायमचा वास करीत नाहीत. परदेशांत जाऊन तेथे वसाहती करण्यापासून दुसरा फायदा हा आहे की, निरनिराळ्या उद्योगधंद्यांचें सशास्त्र ज्ञान कमावण्याची संधि त्यामुळे मिळेल. हल्लीच्या काळीं उद्योगधंद्यांची आवश्यकता वाढलेली आहे हें आम्हीं सांगावयास नको. जर हिंदी लोकांनी हिंदुस्थानांतील व्यापार स्वतःच्या हातीं घेतला, तर निम्माअधिक कार्यभाग झाला असें म्हणावयास हरकत नाही. तिसरा फायदा हा की, वसाहतवाल्यांचीं पोटें परस्पर परदेशांत भरून तितकेच दोन घास जास्त देशबांधवांच्या पोटांत जाण्याचा संभव आहे. या तीन फायद्यांशिवाय आणखी इतर पुष्कळ फायदे आहेत, पण ते सर्व येथे सविस्तर रीतीने सांगण्याची जरुरी नाही.

आता आपणांस परदेशीं गेल्याशिवाय गत्यंतर नाही. पण जरकरिता जगांतील इतर स्वतंत्र देशांत तूर्त जातां येत नसेल, तर निदान एका देशांत तरी घुसाच घुसा. तो देश म्हणजे इंग्लंड देश होय. इंग्लंडांत घुसण्याबद्दल आमचा विशेष आग्रह आहे. हल्ली इंग्रज लोक हिंदुस्थानांत राज्यकर्ते असल्याकारणाने त्यांच्याविषयी हिंदी लोकांच्या मनांत विशेष दरारा आहे व तो कां नसावा बरें? खोलीतून साहेब बाहेर पडल्याबरोबर जर 'हुशार' म्हणून चोपदार ललकारतो, तर मग त्यांचा बाऊ हिंदी लोकांना वाटल्यास नवल तें कोणतें? आज हिंदुस्थानांत जो साहेब पाहवा तो अधिकारी सगळ्यांना लठ्ठ पगार व सगळ्यांचा बडेजाव. याचा परिणाम असा झाला आहे की, साहेबलोक जात्या श्रेष्ठ असून, आपण स्वभावतः कनिष्ठ आहोंत, अशी हिंदी लोकांच्या मनाची भावना झाली आहे. ती भावना हिंदी लोकांच्या प्रतीला घातूक असल्यामुळे इंग्रज लोकांशीं जितकें दळणवळण जास्त होईल, तितकें जास्त चांगलें होय. 'अतिपरिचयात् अवज्ञा' या नियमाचा उपयोग शक्य असल्यास करण्यांत यावा, पण हा 'अतिपरिचय' हिंदुस्थानांत होणें शक्य नाही. आम्हीं कितीहि सलगी केली, तरी हिंदुस्थानांतील साहेब ती आम्हांस करूं देण्यास राजी होणार नाही. म्हणून ही सलगी व अतिपरिचय होण्यास आम्हांस इंग्लंडच गाठलें पाहिजे. इंग्लंडांत गेल्यावर तेथे साहेब अधिकारी व साहेब भिकारी आपल्या दृष्टीस पडतील. तेथे गेल्यावर साहेब हुजूर व साहेब मजूर पाहवयास मिळतील. साहेब हजाम, साहेब धोबी, साहेब मोलकरी, साहेब भंगी, साहेब झाडूवाले, साहेब चोर, साहेब दरोडेखोर याप्रमाणे अपूर्व देखावा दृष्टीस पडला म्हणजे येथेच राहिल्याने साहेबांविषयी जो बाऊ, जो धाक व जो दरारा वाटतो तो कमी झालाच पाहिजे. नुसती सलगी करणें हाच इंग्लंडांत घुसण्याचा हेतु नसून, त्यापासून इंग्लंडांतील लोकांच्या मनांतहि हिंदी लोकांविषयी आदर वाटूं लागेल. डॉक्टरकीचा किंवा बॅरिस्टरीचा धंदा इंग्लंडांत जाऊन केल्यापासून पैशाच्या दृष्टीने जरी अल्प फायदा झाला, तरी इभ्रतीच्या दृष्टीने मोठा नफा आहे. गोरे रोगी व गोरे पक्षकार असले

म्हणजे काळ्या रंगाबद्दल हल्ली जो तुच्छपणा आहे, तो नाहीसा होऊन त्यांच्या ठिकाणीं आदर उत्पन्न होईल. "काळा आदमी म्हणजे बोलका बैल होय" ही कल्पना हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत कमीजास्त प्रमाणाने वसत आहे. तिचें उच्चाटन झालें म्हणजे हिंदी लोकांचा निम्मा कार्यभाग झाला. एडनच्या पलीकडे गेल्यावर साहेबलोकांचा हिंदुस्थानांतील अरेरावीपणा नष्ट होतो, असें इंग्लंडांत जाऊन आलेले लोक सांगतात. आम्हांस जरी याचा प्रत्यक्ष अनुभव नाही, तरी वस्तुस्थिति तशी असली पाहिजे असा आमचा तर्क आहे. इंग्लंडांत जाऊन जो साधेल तो धंदा करून तेथील लोकांत मिसळणें, हें आमच्या दृष्टीने अत्यंत हितावह आहे. साधल्यास तेथे निरनिराळ्या खात्यांत नोकऱ्या पत्कराव्यात.

सारांश, शक्य त्या तऱ्हेने इंग्लंडांत जाऊन तेथे पोट भरण्याची तजवीज करावी. हल्ली हिंदुस्थानांत अदमासे २ लक्ष गोरे लोक आहेत. म्हणून तितक्या तरी हिंदी लोकांनी इंग्लंडांत घुसावें. इंग्लंडांत हिंदी लोकांची गर्दी उसळून गेली म्हणजे स्वच्छतेच्या नांवाने तेथे एखादा मज्जावाचा कायदा पसार होण्याचा संभव आहे. पण तसा कायदा पसार होईपर्यंत इंग्लंडांत घुसण्यास कांही हरकत नाही. २ लक्ष हिंदी लोक जर इंग्लंडांत घुसले, तर इंग्रज लोकांविषयी असलेला फाजील दरारा नाहीसा होईल. त्यांच्या मनांत हिंदी लोकांविषयी वसत असलेली क्षुद्र बुद्धि नष्ट होईल, तितक्या हिंदी लोकांचें पोट परस्पर इंग्लंडांत भरेल व इंग्लंडच्या स्वतंत्र हवेंतील विचार पोटांत गेलेल्या हिंदी लोकांचा उपयोग परत हिंदुस्थानांत आल्यावर उत्तम तऱ्हेने होईल. वरील चार नफ्यांची पैदास तर व्हावी, म्हणून आता हिंदी लोकांना आमचा असाच उपदेश आहे की, "बांधवहो, इंग्लंडांत घुसा."

— भाला, दि. ११ फेब्रुवारी १९०९

---

# ३९. स्वातंत्र्याचा फसलेला प्रयत्न

"Be just and fear not.
Let all the ends thou aim'st at
Be thy Country's, thy God's and Truth's!
Then if thou fallest, O Cromwell,
Thou fallest a blessed martyr."

"न्यायाने वाग, म्हणजे मग तुला कशाचीहि भीति बाळगावयास नको. देशाचा, सत्याचा व परमेश्वराचा जयजयकार होण्याविषयी मनापुढे स्पष्ट उद्देश मांडून तो तडीस नेण्याकरिता सतत परिश्रम कर आणि ते करीत असतां, क्रॉमवेला,

जरी तुझ्या पदरीं अपयश येऊन तुला मृत्यु आला, तरी तुझी गणना वीरांच्याच कोटींत होऊन तुला स्वर्गीय सुखाची निःसंशय प्राप्ति होईल."

वरील अवतरण एका अतिशय विख्यात अशा इंग्रज कवीच्या ग्रंथांतील आहे. त्यांत नमूद केलेले विचार इतके सत्य व उपयुक्त आहेत की, त्याप्रमाणे हातून आचरण झाल्यास राजकीयदृष्टचा अधोगतीस पावलेल्या कोणत्याहि राष्ट्राची उन्नतावस्था आगेमागे झालीच पाहिजे. मनुष्यप्राणी उत्क्रांतितत्त्वाचा अत्युच्च परिपाक होय. त्याची रचना अशाच रीतीने झाली आहे की, निसर्गांतील प्रत्येक सचेतन प्राण्यावर त्याला आपली सत्ता गाजवितां यावी. इतर सर्व प्राण्यांप्रमाणे त्याच्या ठायीं कित्येक प्रवृत्ति आढळून येतात. पण त्या प्रवृत्तींना योग्य मर्यादेंत ठेवून त्याने जगाला वरच्या पायरीस न्यावें व परमेश्वराचा हेतु थोड्या प्रमाणाने तरी साध्य करावा, असा परमेश्वरी संकेत दिसतो. नाही तर मनुष्यप्राण्याचें मन, बुद्धि, आत्मा, वगैरे गोष्टींचें प्रयोजनच राहत नाही. मनुष्याचा स्वार्थ साधण्याकडे साहजिक ओढा असावा, यांत मुळीच वावगें नाही. कारण विश्वाचें अस्तित्व तुलनात्मकदृष्टचा शाश्वत करणारी व त्याला उन्नत स्वरूपाला पोहोचविणारी एकच गोष्ट म्हटली म्हणजे ही स्वार्थी प्रवृत्ति होय. मनुष्याने आपला स्वार्थ साधला पाहिजे व संसार केला पाहिजे. साधुसंत कांहीहि म्हणोत, पण जोंपर्यंत दुपारचे बारा वाजल्याचा ठोका पडला की मनुष्याच्या क्षुधेने बारा वाजण्याची पाळी येत आहे व बायका-मुलांच्या प्रेमयुक्त सहवासाने मन आनंदलें व रिझवलें जात आहे, तोंपर्यंत संसार हा असार आहे, मायेचा बाजार आहे किंवा मोहाचा पसारा आहे म्हणणें साधारण मनुष्याला कधीहि पटणार नाही व पटल्यास तें कृतींत कदापीहि वठणार नाही.

अमेरिकन कवि लाँग फेलो म्हणतो त्याप्रमाणे संसार सत्य आहे असेंच म्हटलें पाहिजे. आपला व आपल्या पोराबाळांचा योगक्षेम उत्तम रीतीने चालावा, याबद्दल प्रत्येकाने अवश्य प्रयत्न केला पाहिजे. पण हा प्रयत्न केल्यावर मनुष्याच्या कर्तव्याची सीमा संपली असें मात्र नाही. बुद्धिहीन व उदात्त मनोविकारविरहित जनावरेंहि आपला व आपल्या कच्च्याबच्च्यांचा संसार करीत असतात, आणि मनुष्यप्राणी जर आपल्या कुटुंबापलीकडे नजर फेंकूं न लागला, तर त्याच्यांत व इतर प्राण्यांत अंतर तें कोणतें राहिलें! मनानें, बुद्धीने व आत्म्याने विशिष्ट असलेल्या मनुष्य-प्राण्याला उत्पन्न करण्यांत विश्वकर्म्याचा खास इतका संकुचित हेतु नसला पाहिजे. तसा तो असतां, तर खात्रीने त्याने मनुष्यप्राणी निर्माण करून प्राणिमात्रांच्या संख्येंत उगीच भर घातली नसती. स्वार्थ साधून किंवहूना प्रसंगानुसार स्वार्थावर पाणी सोडून मनुष्याने इतर वरिष्ठ दर्जाचीं कर्तव्यें केलीं पाहिजेत. या हेतूनेच परमेश्वराने या विश्वांत मनुष्यरूपी आपली प्रतिमा उत्पन्न केली आहे. कौटुंबिक कर्तव्यापेक्षा ही उच्च प्रतीचीं कर्तव्यें कोणतीं, त्याचें दिग्दर्शन कवीने वरील अवतरणांत फारच

उत्कृष्ट रीतीने केलें आहे. तो म्हणतो की, मनुष्याने राष्ट्रार्थ व परमार्थ साधण्यासाठी आणि सत्याचा व न्यायाचा विजय करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे व तो करीत असतां जरी त्याला मरण आलें, तरी इहलोकीं त्याचा नांवलौकिक होऊन परलोकीं त्याला सद्‌गति मिळाल्यावांचून राहणार नाही.

भगवंतांनी भगवद्‌गीतेच्या द्वारें देखील जगाला असेंच उपदेशिलें आहे की, "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" मनुष्य कर्माचा अधिकारी आहे, फलाचा नाही. उदात्त उद्देश डोळ्यापुढे ठेवून तो साध्य करून घेण्याकरिता अश्रान्त व अविरत श्रम करणें इतकेंच मनुष्याचें कर्तव्य होय. तें यशस्वी करावयाचें की नाही ही सर्वस्वीं परमेश्वरी इच्छेची व कृपेची गोष्ट होय. मी किंवा माझें कुटुंब एवढेंच माझ्या कर्तव्याचें क्षेत्र नसून तें माझा देश, हें जग किंबहुना हें विश्व इतकें विस्तीर्ण आहे व त्या देशाच्या, जगाच्या व विश्वाच्या प्रगतीच्या मार्गांत आडव्या येणाऱ्या अडचणींचा नाश करणें माझें आद्य व परमपावन कर्तव्य होय. अशी मनुष्याच्या अंगीं वृत्ति संचारून तो तिजप्रमाणे कृति करूं लागला, तरच तो आपल्या जीविताचें साफल्य व देहाची सार्थकता सिद्ध करून दाखवणार आहे. आपलें व आपल्या कुटुंबाचें पालनपोषण करून स्वस्थ बसणाऱ्या इसमाची योग्यता उकिरडा फुंकून गुजारा करणाऱ्या कोंबड्यापेक्षा जास्त आहे, असें म्हणतां येत नाही. तर ज्या देशांत व धर्मांत ईश्वरी संकेतानुरूप आपण जन्मास आलों आहोंत, त्या देशाला परवशतेच्या नरकांतून वर काढून स्वतंत्रतेच्या पोषक हवेंत नेण्याविषयी व त्या धर्माला इतर धर्मरूपी राहूच्या जबड्यांतून सोडविण्याविषयी झटणारा इसमच 'नर' होय. अशा इसमालाच 'मनुष्य' असें म्हणतां येईल. बाकी सर्वजण स्वार्थाच्या कुपांत लोळणारे निवळ मंडुक होत. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी किंवा धर्मस्थापनेसाठी केलेले सर्व प्रयत्न यशस्वी होतात असें नाही. त्यांपैकी पुष्कळसे प्रयत्न निष्फळ होऊन ते करणाऱ्या इसमांना इहलोकीं अत्यंत हाल सोसावे लागतात. तरी पण त्यांना परलोकींहि यातना भोगाव्या लागतात, असें समजणें चुकीचें होय. यशस्वी किंवा अयशस्वी प्रयत्नांचे भिन्न भिन्न परिणाम या लोकींच घडून येऊन परलोकीं दोन्ही प्रकारचे प्रयत्न एकाच मापाने मोजले जातात. परमेश्वरी दरबारांतील न्यायाचा काटा प्रयत्नांचें दृश्य परिणाम तोलीत नसून, त्यांतील अंतःस्थ हेतु तोलीत असतो व त्याप्रमाणे तो तें करणाऱ्या इसमांना स्वर्गीय सुखाचें बक्षीस किंवा नरकीय यातनांचें शासन देतो. अशा पवित्र हेतूने प्रेरित होऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सतराव्या शतकांत करण्यांत आलेल्या, पण दुर्दैवाने फसलेल्या एका प्रयत्नाची हकीगत आम्ही वाचकांच्या माहितीकरिता पुढे देत आहोंत.

विजापूरचा बादशहा महंमद मरण पावून व त्याच्या जागीं अल्ली आदिलशहा तख्तनशीन होऊन ६ वर्षें झालीं होतीं. मुसलमानांच्या धर्मछळामुळे सर्व प्रजा संत्रस्त झाली होती. हिंदु राजांचीं भंगलेलीं सिंहासनें व उद्ध्वस्त केलेलीं देवालयें

यवनी राज्याच्या जुलमाची व बेफामपणाची साक्ष पटवीत होतीं. मुसलमान सरदारांनी जबरदस्तीने जनानखान्यांत ओढून नेलेल्या हिंदु स्त्रिया वरकरणी मंद व स्मित हास्य करून आपलें पातिव्रत्य हिरावून नेणाऱ्या त्या सैतानांची आपल्या क्रोधाग्नींत राखरांगोळी करून टाकण्याविषयी कारस्थानें रचीत होत्या. योग्यतेने कमअस्सल ठरलेल्या, पण धर्माच्या जोरावर वरिष्ठ पदवीला चढलेल्या मुसलमानी मानकऱ्यांना व दरकदारांना पाहून, दरबारांतील हिंदु सरदारांचा आंतून तिळपापड चालला होता. हिंदु राज्याची पुनः स्थापना झाल्याशिवाय आपल्या गुणांचें चीज होणार नाही, अशा राजद्रोही विचारांनी त्यांच्या मनांत काहूर उसळून दिलें होतें. तोरणा किल्ल्यावर शिवाजीमहाराजांनी स्वातंत्र्याचा भगवा झेंडा उभारून त्याच्या शीतल, पोषक व उन्नतिकारक छायेखाली स्वातंत्र्यभक्तांच्या झुंडीच्या झुंडी जमूं लागल्या होत्या. महाराजांचे प्रयत्न बाल्यावस्थेंतच हाणून पाडून त्याने रोविलेला स्वराज्याचा झेंडा जमीनदोस्त करण्याविषयी अल्ली आदिलशहाने आपल्या सरदारांकरवीं धडपड चालविली होती. पण शिवाजीमहाराजांच्या हाताला दिवसेंदिवस जास्त जास्त यश येऊन विजापुरी राज्याला ओहोटी लागली होती. आपण बादशहाचे निमक खात असून, त्या निमकाला जागणें आपलें ब्रीद व कर्तव्य होय. या विलक्षण व आत्मघातकी कल्पनेमुळे कित्येक मराठे सरदारांनी भरदरबारांत चंग बांधून महाराजांना व त्यांच्या मूठभर अनुयायांना चौगार्द तंग देऊन ताणून फाडण्याची शिकस्त केली होती. पण त्यांचीं मनें स्वातंत्र्यभक्तीने बेहोष झालीं असल्यामुळे व महाराजांच्या प्रयत्नावर परमेश्वरी कृपेची सावली असल्याकारणाने त्या राजनिष्ठ व मातृद्रोही मराठे सरदारांची महाराजांनी डाळ शिजूं दिली नाही. मध्यंतरीं सिद्दीजोहार ऊर्फ सलाबतखान नांवाच्या विजापुरी सरदाराने बंड करून विजापुरी राज्याचीं हाडें बरींच खिळखिळीं केलीं होतीं. विजापूरच्या राज्याचे अशा रीतीने आंतून व बाहेरून लचके तोडले जात असतां, बंड करून स्वराज्याची दक्षिण हिंदुस्थानांत स्थापना करण्यास ही उत्तम संधि होय, असा विचार करून बेदनूरच्या भद्रनायकाने बंडाचें निशाण उभारलें व विजापुरी मुलखांत धुमाकूळ उडवून देण्यास सुरुवात केली. त्याकरिता भद्रनायकाने बेदनूर येथे युद्धाची सामग्री, दारूगोळा व फौजफाटा जमवून जय्यत तयारी केली होती.

भद्रनायकाच्या बंडाची बातमी समजतांच अल्ली आदिलशहा अतिशय चिंतातुर झाला व अशा प्रकारे चोहो बाजूंनी आपली लांडगेतोड झाल्यास आपली खास धडगत नाही, अशा घोर विवंचनेंत तो पडला. पण अल्ली आदिलशहाची ही चिंता व विवंचना फार वेळ टिकली नाही. भद्रनायकाशीं सामना करून त्याला राजनिष्ठेच्या मार्गावर आणावें या हेतूने त्याने मुल्लाखुरम याला मध्यस्थीकरिता बेदनूरला पाठविलें व हिंदु धर्माचा त्याग करून मुसलमानी धर्माची दीक्षा घेतल्यास सर्व अपराध माफ होतील असा निरोप कळविण्याविषयी त्याला सांगितलें. बाद-

शहाच्या हुकमाप्रमाणे मुल्लाखुरम बेदनूर मुक्कामीं येऊन दाखल झाला व त्याने गाठ घेण्याविषयी भद्रनायकाला निरोप धाडला. त्याप्रमाणे भद्रनायकाने आपला दरबार भरवून व मुल्लाखुरम याला त्यांत मानमरातबाने बोलावून आणून उच्चस्थानीं बसविलें. आपला सन्मानपूर्वक पाहुणचार केलेला पाहून मुल्लाखुरमला आपली कामगिरी फत्ते होईलशी आशा वाटूं लागली. त्याने बादशहाचा निरोप भद्रनायकाला मोठ्या ऐटीने निवेदन केला. आपला प्राणप्रिय हिंदु धर्म सोडून इस्लामी धर्मांत येण्याविषयीचा बादशहाचा तो निरोप ऐकून भद्रनायकाच्या अंगाचा संतापाने भडका उडाला. त्या भरांत त्याने बादशहाची सडकून निंदा केली. एवढेंच नव्हे, तर क्रोध अनावर झाल्यामुळे त्याने मुल्लाखुरमला बेदम चोप देऊन दरबारांतून हाकलून दिलें. बिचारा मुल्लाखुरम तेथून जो तडक निघाला तो थेट विजापुरास येऊन दाखल झाला. त्याने बादशहास इत्थंभूत सर्व हकीगत कळविली. ती ऐकून बादशहा रागाने लालबुंद झाला व भद्रनायकाचीं पाळेंमुळें खणून काढण्याविषयी त्याने आपल्या मनाचा पक्का निर्धार केला. त्याप्रमाणे १६५५ सालीं तो आपल्या अफाट सेनासमुद्रासह भद्रनायकाच्या पारिपत्यास निघाला. त्याने आघाडीस सय्यदअल्ली व सर्जाखान या दोन प्रबल योद्धयांस पाठवून दिलें आणि कर्नाटकांतील मोहिमेवर गेलेल्या बहिलोलखान व शहाजीराजे यांना बेदनूरवर ताबडतोब चाल करून जाण्याविषयी हुकूम केला. सय्यदअल्ली व सर्जाखान या सरदारांनी भद्रनायकाच्या ताब्यांतील बंकापूर किल्ल्याला वेढा देऊन त्याच्यावर असा जोराचा हल्ला चढविला की, त्यांनी एका तडाख्यासरशी तो सर केला. नंतर त्यांनी निन्हा नांवाच्या किल्ल्यावर चढाई करून तो काबीज केला. ते दोन किल्ले हस्तगत करून सय्यदअल्ली व सर्जाखान आपल्या सैन्याला थोडी विश्रांति देत आहेत-नाहीत तोंच, बादशहाची स्वारी अब्दुल महंमद, मुल्ला अहंमद, मुजफरखान वगैरे रणझुंजार सरदारांसह व असंख्य फौजेसह तेथे येऊन पोहोचली.

बादशहाने तेथून जें कूच केलें तें मुलूख मारीत मारीत व किल्ले सर करीत करीत तो सौंब्यास आला व तशीच नेटाने चाल करीत जाऊन त्याने भद्रनायकाचें मुख्य ठिकाण जें बेदनूर त्याला अचानक वेढा दिला. बादशहाची दिमाखी व डामडौली फौज इतक्या लौकर येऊन पोहोचेल अशी नायकाला कल्पना नव्हती. म्हणून बेदनूरच्या आसपास बादशहाचा सेनासागर खवळलेला पाहून त्याचें सर्व अवसान गळालें व पुढे काय करावें हें त्याला बिलकुल सुचेना. त्याच्या सरदारांनी त्याच्या अधीर झालेल्या मनाला वीराच्या चार गोष्टी सांगून त्याला कर्तव्योन्मुख करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण बेदनुरास राहिल्यास बादशहाच्या त्वेषाला आपला खास बळी पडणार असें वाटून तो काबूलदुर्गाच्या किल्ल्यांत पळून गेला. बेदनूर सोडून भद्रनायक काबूलदुर्गांत गेल्याची वर्दी बादशहास लागतांच तो आपल्या सैन्यासह तिकडे गेला. त्याने त्या किल्ल्याला सर्व बाजूंनी जेरबंद लाविले. बादशहाच्या कांही

लोकांनी किल्ल्यावर हल्ले करण्याचा सपाटा चालविला व बाकीच्यांनी किल्ल्याच्या आसपासचा सर्व प्रांत बेचिराख करून गडावर दाणागोटा जाणार नाही असा बंदोबस्त केला. बादशाही सैन्याने लागोपाठ चालविलेल्या हल्ल्यामुळे गडावरील शिबंदी पातळ होत चालली. धान्याचा तुटवडा पडल्यामुळे भद्रनायकाच्या लोकांची अन्नान्नदशा झाली.

अशा रीतीने चार-दोन महिने काढावे लागल्यास आपणा सर्वांस गडावर निःसंशय स्थलसमाधि मिळणार, हा विचार भद्रनायकाच्या मनाला विंचवाप्रमाणे नांगी मारूं लागला व तो सर्वस्वीं हतबुद्ध झाला. वास्तविक रीतीने भद्रनायकाने स्वतःस काबूलदुर्गाच्या किल्ल्यांत कोंडून न घेतां बादशहाशीं गनिमी काव्याने त्याच्याच प्रांतांत लढावयास पाहिजे होतें. महाराष्ट्रांत शिवाजीमहाराजांनी या मार्गाचाच अवलंब केला म्हणून ते विजापूर सैन्याच्या कचाटींत विशेषेकरून सापडले नाहीत. दक्षिण हिंदुस्थानांत भद्रनायकाने ही धूर्तता व हा पोच दाखविला नाही, म्हणूनच त्याच्यावर वरीलप्रमाणे घोरतर प्रसंग गुदरला. किल्ल्यासभोवार विजापुरी सैन्यरूपी मृत्यूचा जबडा दूरवर पसरलेला पाहून त्यांत आज नाही उद्या सर्व कोंबले जाणार अशी बालंबाल खात्री होऊन, भद्रनायकाचा निरुपाय झाला व शहाजीराजे यांच्यामार्फत त्याने बादशहाशीं तहाचें बोलणें लाविलें. आपलें हिंदुत्व कायम राखण्याविषयी बादशहाने अभिवचन देऊन वेढा उठविल्यास आपण त्याचे मांडलिक होऊं व दरसाल त्यास अमुक रक्कम खंडणीदाखल देत जाऊं, अशी त्याने बादशहास विनंती केली व शहाजीराजे यांच्या भिडेखातर आणि लढाईचा कंटाळा आल्यामुळे बादशहाने ती तत्काळ मान्य करून आपल्या फौजेचा मोर्चा परत विजापुराकडे वळविला. अशा रीतीने भद्रनायकाने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केलेल्या प्रयत्नाचा शेवट झाला. या प्रयत्नाच्या अखेरीस भद्रनायकाने जरी वीराला अनुचित असा मार्ग स्वीकारून स्वहस्ताने आपल्या पायांत गुलामगिरीच्या शृंखला अडकवून घेतल्या, तरी तो प्रयत्न स्वातंत्र्याच्या कमाईबद्दल असल्यामुळे स्तुत्यर्ह होता यांत मुळीच संदेह नाही. बादशहाला शरण जाण्याऐवजीं जर त्याने स्वातंत्र्याचा व स्वधर्माचा गजर करीत मरण पत्करलें असतें, तर इतिहासांत त्याच्या नांवाभोवतीं धैर्य, धाडसीपणा, धर्मभक्ति, स्वातंत्र्यलालसा वगैरे सद्गुणांची देदीप्यमान प्रभा फाकलेली दृष्टीस पडली असती; पण ती मुळीच फाकलेली नाही असें मात्र नाही. शिवाजीमहाराजांप्रमाणेच स्वराज्याची व स्वधर्माची स्थापना करण्याविषयी त्यांचा प्रयत्न होता. महाराजांच्या अंगीं अद्वितीय धोरणीपणा, आटोकाट प्रसंगावधान व लोकोत्तर छातीठोकपणा असल्यामुळे त्यांचा प्रयत्न यशस्वी होऊन महाराष्ट्रभूच्या पांढऱ्या फटफटीत भालप्रदेशावर ते स्वातंत्र्याचा तिलक लावण्यास समर्थ झाले.

भद्रनायकाच्या ठायीं वरील सद्गुण वास करीत नसल्यामुळे त्याचा प्रयत्न

फसला जाऊन, दास्याच्या दडपणाखाली स्वातंत्र्याची ज्योत विझवून टाकणें त्याला भाग पडले. ऐहिकदृष्ट्या या दोन प्रयत्नांचे जरी दोन भिन्न भिन्न परिणाम झाले तरी परमेश्वरी कायद्याप्रमाणे दोघांनाहि स्वर्गांत एकाच प्रकारचें परंतु कमीअधिक प्रमाणाने पारितोषिक खास मिळालें असलें पाहिजे. कारण परमेश्वराला अत्यंत प्रिय असें स्वातंत्र्य कमावण्याविषयी दोन्हीहि प्रयत्न झालेले होते.

– भाला, दि. १ मार्च १९०९.

---

# ४०. आनंदवनभुवन

पंचवटीपासून तो थेट कोल्हापुरापर्यंत पसरलेल्या प्रदेशाला श्रीसमर्थांनी 'आनंदवनभुवन' असें गोड नांव दिलें व तें नांव किती तरी सार्थ होतें बरें? जो पुण्य व पावन प्रदेश मोंगली व विजापुरी सत्तेच्या कैचींत सापडून 'दुःखवनभुवन' बनला होता त्या प्रदेशाला श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनी आपल्या भवानीच्या प्रभावाने आनंदमय करून टाकलें. १६ व्या शतकांत महाराष्ट्रांत जिकडे-तिकडे यावनी सत्ता प्रस्थापित झाली होती. हिंदुत्व अजीबात नामशेष होऊन जातें की काय, अशी घोर भीति सर्वांस येऊन पडली होती. त्या वेळीं महाराष्ट्रांत जिकडे-तिकडे कापाकापी, फोडाफोडी व रडारडी सुरू होती. हजारो हिंदु व गाई विनाकारण कापल्या जात व शेकडो देवळें फोडलीं जाऊन जमीनदोस्त करण्यांत येत. दाढीवाला पाहिला की घरांतील माणसेंच नव्हे, तर देवळांतील देवहि भीतीने थरथर कापत असत. आणखी शंभर वर्षें महाराष्ट्रांत येथून तेथून इस्लामी धर्म, अशी स्थिति होण्याचा रंग दिसू लागला होता. एकीकडे विजापूरची मुसलमानी सत्ता हिंदूंना सतावीत होती, तर दुसरीकडे मोंगली अंमल मराठ्यांच्या पाठीमागे राहूप्रमाणे लागला होता. महाराष्ट्राची वरच्याप्रमाणे नाजूक व भयंकर स्थिति झाली होती. तरी त्या वेळीं लोकशिक्षणाचें काम आपणहून अंगावर घेतलेले व देशबांधवांच्या अंतःकरणांत विठूरायाच्या भक्तीचें माहात्म्य बिंबविणारे संत पंढरीला जाऊन भुईमूगाच्या दाण्यांचा चक्काचूर उडविण्याच्या बायकी कामांत दंग झाले होते. मुसलमानांचा मर्दानी चांद सगळीकडे तलवारींच्या चकचकाटांत दुल्ला व हैदोस करीत होता, तर संतांची जनानी पताका आपल्या बायकी अश्रूंनी चंद्रभागेला पूर आणीत होती. त्या वेळीं जिकडे-तिकडे लुळ्या, पांगळ्या, थोट्या व आंधळ्या भागवत धर्माचें साम्राज्य माजून मर्द महाराष्ट्र धर्म दडी देऊन बसला होता. त्याने तरी कोणाच्या जिवावर बाहेर उजेडांत यावें?

महाराष्ट्र धर्माचे आवडते भक्त 'संत' नसून 'पंत' होते. टाळकुटयांचीं हृदयें त्याचीं आवडतीं वसतिस्थानें नसून तो 'टाळकीकुटया'च्या अंतःकरणाची वाट चातकाप्रमाणे पाहत होता. त्याला वारकरी पंथ संमत नसून धारकरी पंथच त्याने विहित ठरविला होता. सबंध १६ व्या शतकांत व १७ व्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांत महाराष्ट्रीय धर्मांचें नांवहि ऐकू येत नव्हतें. पण दाशरथी रामाची कृपा होऊन महाराष्ट्र धर्माला दोन अनन्यभावाचे भक्त मिळाले. या दोन भक्तांच्या जोडीसारखी अपूर्व जोडी साऱ्या दुनियेंत आजपर्यंत झाली नाही व पुढे होईल किंवा नाही, हें त्या जगच्चालक प्रभूला माहीत होय. महंमदी धर्माच्या तिखट तलवारीवर महाराष्ट्र धर्माच्या भरभक्कम भाल्याचाच भडिमार केला पाहिजे व अशा माऱ्यानेच दुःखमय झालेल्या महाराष्ट्रांत आनंदाचें साम्राज्य पुनरपि स्थापिलें जाईल. ही खुबीदार गोष्ट त्या अद्वितीय जोडीच्या लक्षांत आली व त्याबरहुकूम त्या जोडीने कृति करण्यास सुरुवात केली. त्या जोडीपैकी एकाने आपल्या तेजस्वी वाणीने व दुसऱ्याने आपल्या अमोघ भवानीने गोदावरीपासून तो कृष्णेपर्यंत सर्व महाराष्ट्र देश जागृत केला व त्याच्या अंगांत महाराष्ट्र धर्माची विद्युत् ठासून भरली. अशी ही अलौकिक जोडी म्हटली म्हणजे श्रीसद्गुरु रामदासस्वामी व श्रीछत्रपति शिवाजीमहाराज हे होत.

१५ व्या व १६ व्या शतकांत पंढरींत जरी संतांचें पेव फुटलें होतें व महाराष्ट्रांत त्या वेळीं जरी 'विठ्ठल-रखुमाई'चा गजर एकसारखा पाळला होता तरी, जर १७ व्या शतकांत सद्गुरुराज व महाराज यांचे अवतार झाले नसते तर पंढरपूर एखाद्या बादशहाचें दौलताबाद बनून तेथील राउळांत काझींनी निजाम पढण्यास खात्रीने सुरुवात केली असती. आम्ही म्हणतों हें केवळ कल्पनेच्या जोरावर म्हणतों असें नाही. त्याला इतिहासांत पुरावा आहे. ज्या वेळीं विजापुराहून अफजुलखान निघाला त्या वेळीं प्रतापगडला येऊन ठेपण्यापूर्वी त्याने आपला मोर्चा पंढरपुराकडे वळविला होता. त्या वेळीं पंढरीनाथाचे वारकरी व भजनी भक्त महाराष्ट्रांत निदान पांच लक्ष तरी असले पाहिजेत. पण अफजुलखानाच्या जबड्यांतून विठोबाला सोडविण्यास एकहि वारकरी पुढे सरसावला नाही किंवा त्या दुष्ट लांडग्याचा सूड घेण्यास प्रतापगडीं शिवबाला जाऊन मिळाला नाही. अनाथ पडलेल्या पंढरीनाथाचें संरक्षण करण्यास दामाजीपंतांच्या मंगळवेढ्याहून, एकनाथांच्या पैठणहून, ज्ञानेश्वरमहाराजांच्या आळंदीहून, तुकारामबुवांच्या देहूहून किंवा इतर लहानमोठ्या संतांच्या गावाहून वारकरी धांवून आले नाहीत. आषाढीला चंद्रभागेचें पाणी बुचकळ्या मारमारून गढूळ करणाऱ्या संतांपैकी कोणी धांवला नाही, हें पाहून बडव्यांनी पंढरीनाथाला चंद्रभागेच्या वाळवंटांत खोलवर गाडून टाकलें व अफजुलखानाच्या तडाख्यांतून त्याचें कसेबसें संरक्षण केलें. कदाचित् असें म्हणावें की, पंढरींत त्या वेळीं कोणी चांगला शूर नायक नव्हता म्हणून वारकरी लोक त्या वेळीं गप्प

बसले. पण आपल्या आराध्यदेवतेवर हात टाकण्यास तयार झालेल्या राक्षसाचा सूड घेण्याकरिता तरी वारकऱ्यांनी प्रतापगडावर जावयाचें होतें की नाही ? तेथें अफजुलखानाशीं दोन हात करण्यास दंड थोपटून शिवबा सज्ज होते ना ? पण शपथ, पंढरीनाथांची शपथ, एकहि चुकार वारकरी घराच्या बाहेर पडेल तर ! तिकडे चंद्रभागेच्या वाळवंटांतील खड्डयांत खुली हवा न मिळाल्यामुळे विठोबा कासावीस झाले, तर महाराष्ट्रांत दर गुरुवारीं "सुंदर तें ध्यान विटेवरी उभें" याचा जयघोष मारे आर्त स्वरांत चालला होता. पण असें झालें म्हणून कोणीं आश्चर्य करावयास नको. ज्या वारकरी धर्माचे गुरु एकवीस वेळा पठाण अंगावर थुंकला असतां पुन्हा एखाद्या निरभिमानी मवाळासारखे त्याचेच आभार मानतात, ज्या वारकरी धर्मरूपी मंदिराचा कळस बनलेले महात्मे चार चावट लोकांनी गाढवावर धिंड काढली असतां खुशाल फिदी-फिदी हसतात व ज्या वारकरी पंथाचें मुख्य धर्मतत्त्व 'दिधलें दुःख पराने उसनें फेडूं नयेचि सोसावें" असें आहे, त्या वारकरी लोकांनी आपल्या आराध्यदेवतेचा छळ झाला असतांहि भजन व एकादशी करीत व रताळी व भुईमुगाचे दाणे खात घरीं स्वस्थ घोरत पडावें यांत आश्चर्य तें कोणतें ? पंढरीला अफजुलखान येतो व विठोबा वाळवंटांत गाडले जातात, तर परळीच्या तटाच्या माथ्यावर उभें राहून व हातांत आंत गुप्ती असलेली कुबडी घेऊन श्रीसमर्थ त्याला उद्देशून तोंडावाटे काय म्हणतात, तर "समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।।" अफजुलखानाचा प्रतिकार करण्यास जर त्या वेळीं महाराष्ट्रधर्मीय शिवबा नसते, तर हिंदु धर्माची व त्याबरोबर वारकरी पंथाची इतिश्री केव्हाच झाली असती. पण जगदंबेची इच्छा निराळीच होती. हिंदु धर्माचें संरक्षण करून त्याचें सनातनत्व तिला सिद्ध करावयाचें होतें. या हेतूच्या सिद्ध्यर्थ तिने समर्थांची व महाराजांची जोडी महाराष्ट्रांत उत्पन्न केली व त्या जोडीने दुःखपुरींत झालेले महाराष्ट्र 'आनंदवनभुवन' करून सोडलें.

क्षत्रियकुलवतंस श्रीशिवाजीमहाराज यांनी महाराष्ट्र धर्मप्रणीत तत्त्वाप्रमाणे हातांत भवानी घेऊन ज्या वेळीं सन १६४६ सालीं स्वराज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला त्या वेळेपासून तो सन १६७४ सालीं त्यांना रायगडावर राज्याभिषेक होईपर्यंत समर्थांचे व महाराजांचें मन एकसारखें चिंतेने त्रस्त झालें होतें. प्रारंभ तर केला, पण पुढे काय होतें व काय होत नाही, याची काळजी दोघांनाहि लागली होती. पण ज्या वेळीं हिंदुपदपादशाहीची स्थापना रायगडावर झाली, त्या वेळीं दोघांच्याहि अंतःकरणांत आनंदसागर खळवळूं लागला व हृदयांतील मनोवृत्तीला शाब्दिक नांव देण्याकरिता समर्थांनी महाराष्ट्राला 'आनंदवनभुवन' या गोड नांवाने संबोधिलें. हिंदुपदपादशाही झाल्यावर पहिला मोठा नफा समर्थांच्या मताने हा झाला की, "बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळाविले ।। अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभुवनीं ।। " पुढे आणखी संतोषपूर्वक रीतीने समर्थ असें सांगतात की,

"बुडाला अवरंग्या ( अवरंगजेब ) पापी । म्लेंछ संहार जाहला ।। मोडलीं मांडलीं क्षेत्रे । आनंदवनभुवनीं ।। उदंड झालें पाणी । स्नानसंध्या करावया । जपतप-अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ।।" महाराष्ट्र धर्माचा विजय झाल्यामुळे हिंदु धर्माचें रक्षण होऊन स्नानसंध्या करण्याला उदंड पाणी झालें व ज्याला त्याला आपआपलीं धर्मकृत्यें करण्याची सवड मिळाली. दासांचें हें वर्णन अक्षरशः खरें आहे. हिंदु-पदपादशाही स्थापन झाल्यामुळे पंढरीच्या विठोबावर खळग्याचें अक्षय्य सुख अनुभवण्याची पाळी आली नाही. जर १७ व्या शतकांत महाराष्ट्र धर्माचें पुनरुज्जीवन झालें नसतें, तर विठोबाला अजूनपर्यंत तरी बाहेर येतां आलें असतें किंवा नाही याची शंकाच होती. महाराष्ट्र धर्माच्या प्रभावाने नुसतें धर्मसंरक्षण झालें नाही, तर दास लिहितात की, "सर्व सद्या कळा विद्या । न भूतो न भविष्यति ।। वैराग्य जाहले सर्वे । आनंदवनभुवनीं ।।" महाराष्ट्र हें सर्व विद्यांचें व कलांचें माहेरघर बनून आध्यात्मिक व आधिभौतिक अशा दोन्ही तऱ्हेचें वैराग्य महाराष्ट्रियांच्या मनांत संचारूं लागलें. महाराष्ट्राचें असें सुखकर व आनंदमय स्थित्यंतर होण्यास तुकारामांच्या वारकरी पंथाचा उपयोग न होतां रामदासांचा धारकरी पंथच कारणीभूत झाला आहे. ज्या या दोन अद्वितीय माहात्म्यांनी महाराष्ट्रावर कल्पनातीत उपकार करून ठेवले आहेत त्यांचे उत्सव दरवर्षी करणें प्रत्येक महाराष्ट्रियाचें कर्तव्यकर्म आहे. समर्थांचा दासनवमीचा उत्सव व महाराजांचा वैशाख शुद्ध द्वितीयेचा उत्सव, असे दोन उत्सव महाराष्ट्रांतील प्रत्येक शहरीं व गावीं साजरे करण्यांत आले पाहिजेत. त्यांचे उत्सव करण्यांत आले म्हणजे त्यांची योग्यता वाढते असें कांही नाही. कारण त्या नरशार्दुलांची योग्यता इतिहासाने केव्हाच करून ठेवली आहे. त्यांचे उत्सव करण्याचें मुख्य कारण आपल्या अंतःकरणाची कृतज्ञता दाखविणें हें होय. वैशाख शुद्ध द्वितिया उद्या पडत आहे, यासाठी महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं भीति व भीड यांस न जुमानतां शिवजंत्युत्सव साजरा करण्यांत येईल अशी आम्हांस उमेद आहे.

– भाला, दि. २१ एप्रिल १९०९

---

## ४१. मद्यपाननिषेधाची चळवळ

व्यक्ति काय किंवा राष्ट्र काय, तिने अथवा त्याने सन्मार्गी व सदाचरणी असावें, अशी इच्छा प्रत्येक माणसाची असावी व त्या इच्छेच्या परिपूर्तीसाठी त्या यथामती व यथाशक्ति खटपट करावी. देशबांधवांनी कोणत्याहि व्यसनापासून

अलिप्त असावें व जरकरतां पूर्वपरिपाठामुळे त्यांच्या अंगांत एखादें भयंकर व्यसन मुरलें असेल तर तें अजीबात नष्ट व्हावें, असा हेतु मनांत धरून, जर कोणी एखाद्या दिशेने खटपट करील, तर अशा सत्कृत्याबद्दल तो स्तुतीस पात्र आहे. पण मनांत नुसता सद्हेतु बाळगून कोणतीहि चळवळ करण्यास उद्युक्त होणें हें शहाणपणाचें काम नाही. आपल्या श्रमाच्या मानाने आपण आरंभलेल्या खटपटींत आपणांस यश येईल किंवा नाही, या गोष्टीचा दूर व पोक्त विचार करून मगच एखाद्या चळवळीला हात घालण्यांत यावा. खडकांत खळगे खणून, त्यांत शेतांतील माती घालून व डोक्यावरून घागरीने पाणी वाहून जर एखादा वेडापीर त्यांत कलमी आंबे लावूं लागला, तर कदाचित् त्या आम्रवृक्षापासून त्याला पाटी दोन पाट्या आंबे मिळण्याचा संभव आहे. पण श्रमाच्या व खर्चीं पडलेल्या पैशाच्या मानाने त्याला तितक्या किमतीचे आंबे मिळतील असें नाही. खडकावर आंब्याचीं झाडें लावणारा मनुष्य जर अशी वढाई मारूं लागला की, मी माझ्या मायदेशांतील बागाइताचें उत्पन्न वाढविण्याची चळवळ करीत आहे, तर अशा मनुष्याच्या चळवळीबद्दल ज्याप्रमाणे सुज्ञ माणसांना हसूं कोसळेल त्याचप्रमाणे मद्यपान-निषेधाची चळवळ करून आम्ही आपल्या दारूबाज देशबांधवांची नीति सुधारण्याची व त्यांचा पैसा वांचविण्याची खटपट करीत आहोंत, असें प्रतिपादन करणाऱ्या इसमांच्या विधानाबद्दल हसूं येण्याचा संभव आहे.

दारू पिणें हें एक व्यसन आहे व तें एक भयंकर व्यसन आहे हें प्रत्येक जण कबूल करील. सुरापान हें पंचमहापातकांपैकी एक पातक गणण्यांत आलें आहे. हें महापातक नामशेष होऊन देशबांधवांनी सदाचरणी व्हावें अशी इच्छा धरणें जरी सात्त्विकपणाचें आहे, तरी मद्यपाननिषेधाच्या चळवळीसारख्या प्रयत्नाने त्याचें उच्चाटन होईल अशी समजूत असणें हें बावळेपणाचें लक्षण होय. व्यसनें बंद करण्याचा मुख्य उपाय म्हटला म्हणजे सक्ती होय. उपदेशाने असली कामें होत नसतात. आपल्या धर्मशास्त्रांत हेंच तत्त्व मनांत धरून दारूबाजाच्या तोंडांत ताप-लेली दारू ओतावी असा निर्बंध घालण्यांत आला आहे. मुसलमानी धर्माप्रमाणे दारू-बाजाच्या उघड्या पाठीवर चाबकाचे ८० फटके मारावेत अशी आज्ञा आहे. हिंदु व इस्लामी धर्मांनी घालून दिलेल्या वरील शिक्षा अमलांत आणण्याचा अधिकार धर्माधिकाऱ्यांच्या हातीं नसल्यामुळे दारूचें व इतर व्यसनें हल्ली बोकाळलीं आहेत. शिक्षा देण्याचा सर्व अधिकार हल्लीच्या काळीं सरकारच्या हातीं आहे. पण सरकार सुरापान हा गुन्हा समजत नाही. दारू पिऊन व तर्र होऊन जर एखादा दारूबाज रस्त्यावर पडेल, तरच पोलिसलोक त्याला मॅजिस्ट्रेटपुढे उभे करतात व मग त्याला थोडासा दंड होतो. पण दारूची बाटली घरीं नेऊन ती पोटांत सबंध रिचवून देणाऱ्या मनुष्याला कोणत्याहि प्रकारचें शासन इंग्रजी कायद्याने ठेवलेलें नाही. सुरापान हें नीतिशास्त्राने जरी 'पातक' ठरविलें आहे तरी ज्या अर्थी त्याला कायद्याने

'गुन्हा' ठरविलेला नाही त्या अर्थी त्याला उपदेशाच्या योगाने थोडासा तरी आळा बसेल, असें आम्हांस वाटत नाही.

कोणतेंहि पातक गुन्हा ठरविल्याशिवाय त्यापासून बहुजनसमाज पराङमुख होत नाही. घटकाभर आपण असें धरूं की, उद्यापासून चोरी ही गुन्ह्याच्या यादींतून काढण्यांत आली व ती नामशेष करण्याकरिता एक 'चौर्यनिषेधक मंडळी' स्थापण्यांत आली. अशा मंडळीचा हेतु हाच की, उपदेश करून चोरी करण्यापासून चोरीवाजांना पराङमुख करावयाचें. असें जर घडून आलें, तर आमच्या समजुतीने असा अनिष्ट प्रकार ओढवेल की, प्रत्येक जण दुसऱ्याची चोरी करूं लागेल. कांही सभ्य व सुशिक्षित लोक पैसा दोन पैशांची किंवा हजार-पांचश्याची चोरी करणार नाहीत. पण खास रुपयांच्या नोटांचे पुडकें मिळत आहे व सापडल्यास कायद्याने शिक्षाहि मिळणार नाही अशी जर स्थिति असेल, तर सुशिक्षित लोकहि चौर्यकामास प्रवृत्त होतील. सारांश, लिहिण्याचा मुद्दा हाच की, शिक्षेची भीति असल्याशिवाय कोणताहि मनुष्य – मग तो सुशिक्षित असो किंवा अशिक्षित असो – पापकर्मापासून पराङमुख होत नाही. आम्ही असें स्पष्ट सांगतों की, सुरापानाबद्दल हल्ली शिक्षा नसल्यामुळे तें नुसत्या उपदेशाने कधीहि बंद किंवा कमी व्हावयाचें नाही. सुरापान किंवा दुसरें कोणतेंहि व्यसन बंद होण्यास खरा उपाय म्हटला म्हणजे सरकारी कायद्याची किंवा पिकेटिंगची भीति होय. अशा भीतीची आग लावल्याशिवाय व्यसनांचें काटेरी जंगल खाक होऊन कधीहि जावयाचें नाही. पण दुःखाची गोष्ट ही की, सरकार स्वतः कायदा करीत नाही व लोकांना पिकेटिंग करूं देत नाही. चोहो बाजूंनी असा कोंडमारा झाल्यामुळे पुढाऱ्यांना नुसत्या उपदेशावर भिस्त ठेवावी लागली आहे. पण नुसत्या उपदेशाने अशीं कार्यें होत नसतात. उपदेशाचा परिणाम फार झाला तर शेकडा एकावर कांही काळपावेतों झाला तर होईल. उपदेशाने पुष्कळ कार्य होतें, पण ते ज्या वेळीं उपदेशिलेल्या माणसाच्या अंगीं उपदेश केलेल्या गोष्टीबद्दल अज्ञान असतें तेव्हा होय. पण असें अज्ञान दारूबाजाच्या ठिकाणीं असतें असें नाही. दारू-पासून शरीराची व पैशाची खराबी होऊन बायकामुलांना उपाशी मरण्याची पाळी येते, ही गोष्ट दारूबाजाला कळत नसतें असें नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंतच्या काबाडकष्टांनी चार-पांच आण्यांचे पैसे कमावून त्यांपैकी दोन आणे स्वतःसाठी व दोन आणे सोबत्यांसाठी गुत्त्यांत खर्च केल्यावर व खिशांत एक आण्याचा खुर्दा राहिल्यावर दारूपायीं पैशाची खराबी होते, असा उपदेश त्या दारूबाजाला करण्याची कोणती आवश्यकता आहे हें आम्हांस कळत नाही. त्याचप्रमाणे दारू पिऊन तर्र झाल्यावर व गटारांत पडून कपाळमोक्ष झाल्यावर ज्या वेळीं दुसऱ्या दिवशीं अंग ठणकूं लागतें त्या वेळीं दारूपासून शरीराची खराबी होते. ही साधी गोष्ट सानुभव-पूर्वक अशा दारूबाजाला कळत नाही काय? दारूच्या रूपाने मजुरीचे पैसे एकटयाच्याच पोटांत ढोसल्यावर व घरीं संध्याकाळीं भुकेच्या दुःखाने बायका-पोरें

रडूं लागल्यावर दारूने बायका-मुलें उपाशी मरतात, ही गोष्ट दारूबाजाच्या डोळ्यापुढे प्रत्यक्ष मूर्तिमंत राहत नाही काय? जो उपदेश लोक त्याला शब्दाच्या द्वारे करतात, तो उपदेश त्याच्या अनुभवास प्रत्यहीं येत असतो. आदल्या दिवशीं गुत्त्यांत घालविलेल्या चार आण्यांची आठवण त्याला होत असते. आदली सबंध रात्र आपल्या कच्च्याबच्च्यांनी उपाशी काढली, ही गोष्ट त्याच्या लक्षांत असते. आदल्या संध्याकाळीं कपाळाला व शरीराच्या इतर ठिकाणीं पडलेल्या त्याच्या खोका ठणकत असतात. तरी पण तो संध्याकाळीं सहा वाजतां कामावरून सुटला की पुन्हा गुत्त्यांत शिरतो व पाठीमागे अनेक वेळा झालेला प्रकार घडून येतो. असे कां होतें याचें कारण दारूबाजाला दारूबाजीचें अनिष्ट परिणाम ठाऊक नसतात हें नसून त्याला आलेली तल्लफ ताब्यांत ठवतां येत नाही हें होय. आम्ही खात्री-पूर्वक सांगतो की, दारूबाजांना अंतःकरण असतें व दारूपायीं आपल्या बायका-पोरांचे होत असलेले हाल पाहून त्यांचें अंतःकरण द्रवहि पावतें. 'मी उद्या दारू पिणार नाही' असा निश्चय तो करतो. मग अजिक्य तलफेच्या माऱ्यापुढे त्याच्या निश्चयाचा ढिसूळ किल्ला ढासळून पडतो. वस्तुस्थिति अशी असल्यामुळे जेणेंकरून त्याच्या तलफीवर पूर्ण ताबा चालेल, असा एखादा उपाय शोधून काढण्यांत आला पाहिजे. दर एकादशीला किंवा दर दिवशीं पेटीच्या सुरांत वेडयावाकडया रीतीने गाइलेल्या पदांनी किंवा ओबडधोबड शब्दांनी गुंफलेल्या व्याख्यानांनी दारूबाजाची तल्लफ त्याच्या हिंदी लोकांच्या ताब्यांत राहणें शक्य नाही. निर्जीव उपदेशाने दारूबाजाची तल्लफ आवळून टाकणें म्हणजे कच्च्या सुताने एखाद्या सिंहाला जखडून टाकण्या-इतकेंच शहाणपणाचें आहे. तलफीची वाफ दारूबाजाच्या अंतःकरणरूपी बाटलींत दाबून ठेवावयाची असल्यास त्या बाटलीच्या तोंडाला कायद्याचें किंवा पिकेटिंगचें बूच मारण्यांत आलें पाहिजे. हें बूच मद्यपाननिषेधक मंडळींच्या संग्रहीं नाही. बाटलीचें तोंड बंद करण्यास त्यांच्याजवळ फक्त उपदेशाचा मऊ व जाळीदार मलमलीचा तुकडा आहे. या तुकडयाने आंतील तलफेची वाफ बाहेर पडण्यास थोडासा प्रतिबंध होईल, पण त्याचा उपयोग दारूबाजाला दारूपासून पराङ्मुख करण्याच्या कामीं किती होईल याची कल्पना मद्यपाननिषेधक मंडळीच्या सभा-सदांनी आपल्या मनाशींच करावी. तलफेच्या पायीं दारूबाजाची दारू सुटत नाहीं व मद्यपाननिषेधक मंडळीच्या सभासदांजवळ ही तल्लफ ताब्यांत ठेवण्याचें साधन नाही. या दृष्टीने विचार केला म्हणजे या मंडळ्या अगदी निरुपयोगी आहेत, असेंच मत द्यावें लागतें. व्यसनें बंद होण्यास कायदाच पाहिजे.

पूर्वी रोमन लोकांत अनेक व्यसनें माजलीं होतीं व त्या वेळच्या रोमन बादशहांनी निरनिराळे सौम्य व किंवा कडक कायदे करून आपल्या व्यसनी प्रजा-जनांना निर्व्यसनी करण्याचे प्रयत्न केले. हल्ली चिनांत चिनी लोकांचें अफूचें व्यसन

f
निर्मूल करण्याचा स्तुत्य प्रयत्न चालला आहे. पण तसें घडून आणण्यास तेथे अफू-निषेधक मंडळी निघाली नसून, चिनी सरकारने कायद्याचाच अवलंब केला आहे. दरवर्षीं अफूच्या खपाचा एकदशांश खप कमी करून दहा वर्षांत अफूचें व्यसन अजीबात बंद करण्याचा बेत चिनी सरकारने केला आहे. आज असा अंदाज आहे की, दहा वर्षांत चिनी लोक अफूच्या व्यसनापासून मुक्त होतील. कोणतेंहि व्यसन बंद करण्याचा हाच खरा मार्ग आहे. पण आमचें सरकार आमच्या कमनशिबाने 'दारूचा कायदा' पसार करण्यास तयार नाही. सरकार कायदा करण्यास मुळीच तयार नाही. म्हणून इष्ट हेतूच्या सिद्धीसाठी भलत्याच मार्गाचें अवलंबन करणें कधीहि शहाणपणाचें होणार नाही. दारूचें व्यसन बंद करण्यासाठी आणखी एक उपाय अमलांत आणला जातो. हा उपाय दारूबाजांकडून शपथा घेणें होय. या शपथा भलभलत्या तऱ्हेच्याच दिल्या व घेतल्या जातात. नुकतेंच असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे की, गुजरातेंतील खेडा येथील भंग्यांनी दारू न पिण्याच्या शपथा घेतल्या असून, जो शपथ मोडून दारूचें प्राशन करील त्याला त्याच्या बायकोने पांच जोडे सर्वांच्या समक्ष मारावेत. अशा शपथा घेणें आमच्या मताने मूर्खपणाचें आहे. अशा शपथा पाळणें शक्य नाही. तलफेच्या भरांत दारूचें प्राशन झाल्याबरोबर कोणताहि मनुष्य आपल्या बायकोपुढे आपला गाल करील व त्यावर तिला पांच जोडे मारूं देईल, हें आम्हांस असंभवनीय दिसतें. ज्या शपथा पाळणें शक्य नाही त्या शपथा घेणें शहाणपणाचेंहि होणार नाही. मागे एकदा एके ठिकाणीं (आम्ही गावाचें नांव विसरलों आहोंत) अशी एक विलक्षण शपथ घेण्यांत आली होती की, जो दारू पिईल त्याची एक मिशी काढण्यांत यावी. या व अशाच तऱ्हेच्या शपथा देऊन व घेऊन दारूचें व्यसन बंद पाडण्याची हाव धरणें म्हणजे मातीचें ढेकूळ आडवें टाकून नदीचा प्रवाह बंद करूं इच्छिण्यासारखें होय. सारांश, वरील विवेचनावरून एवढें सिद्ध होतें की, दारूचें किंवा इतर कोणतेंहि व्यसन बंद पाडण्यास 'सक्ती'चा उपाय करण्यांत आला पाहिजे.

बरें, हिंदुस्थानांत व्यसन तरी फक्त एकट्या दारूचें आहे असें नाही. दारू-बाजीबरोबर रंडीबाजी, गांजेबाजी, भांगबाजी, विडीबाजी, चहाबाजी वगैरे शेकडो व्यसनें प्रचलित आहेत. या सर्व व्यसनांच्या पाठीमागे लागल्यास दुसरें सार्वजनिक कृत्य करण्यास वेळ व पैसा सापडावयाचा नाही. वर नमूद केलेल्या व्यसनांपैकी एकहि व्यसन नसलेले लाल शेकडा दहा-पांच सापडले तर सापडतील. बाकी राहिलेल्या नव्वद जणांना कोणतें ना कोणतें तरी व्यसन असतेंच. विडी व चहा हीं दोन व्यसनें हल्ली इतकीं संभावीत झालीं आहेत की, विडीबाज व चहाबाज लोकांना आपण व्यसनी आहोंत असें वाटत नाही व कोणी त्यांना तसें मानीतहि नाही. असो; राष्ट्राला अजीबात निर्व्यसनी करणें शक्य नाही. यदाकदाचित् तसें करणें शक्य असल्यास तें राजसत्तेशिवाय होणें संभवनीय नाही. दारूच्या व्यसनामुळे राष्ट्राची

अधोगति होते की काय, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचें विवेचन मुळापासून करण्याची आमची मुळीच इच्छा नाही. आम्ही या संबंधाने एवढेंच म्हणूं शकतों की, जगांत दारूबाजीबद्दल प्रख्यात असलेलीं राष्ट्रें राजकीय बाबतींत सर्वांच्या पुढे आहेत.

इंग्लंड पक्कें दारूबाज आहे, तरी त्याचा हल्ली बोलबाला चालला आहे. अमेरिका अट्टल दारूबाज आहे, तरी जगांतील प्रमुख राष्ट्रांत तिची गणना आहे. दारूबाजीचें व्यसन नसतां हीं राष्ट्रें हल्लीपेक्षा जास्त पुढे सरसावलीं असतीं. तरी पण एवढें खचित ठरतें की, दारूबाजीपासून राजकीयदृष्टचा फारसा तोटा नाही. दारूबाज देशभक्त असूं शकतो. पण प्रत्येक बिनदारूबाज देशभक्त असतोच असें मात्र नाही. निर्व्यसनी व देशभक्त लोकांची सरशी व्यसनी पण देशभक्त लोकांवर होईल, हें निर्विवाद आहे. पण जोंपर्यंत हिंदुस्थान निर्व्यसनी करण्यास आवश्यक लागणारी राजसत्ता हिंदी लोकांवर नाही, तोंपर्यंत हिंदुस्थान निर्व्यसनी करण्याच्या भानगडीस हिंदी लोकांनी लागू नये. हल्ली पुण्यांत मद्यपाननिषेधक मंडळींची व इतर ठिकाणीं दुसऱ्या लोकांची मद्यपानाला आळा घालण्याची खटपट चालू आहे. पण आमच्या मताने या चळवळीची गत गोरक्षणाच्या चळवळीसारखी लौकरच होऊन जाईल. पैसा पैसा गोळा करून ५० रुपये जमवावेत व निष्ठुर खाटकाच्या तावडींतून एक गाय एकीकडे सोडवावी, तर दुसऱ्या दिवशीं त्याच ५० रुपयांच्या दोन गायी विकत घेऊन तो कसाई आपला कार्यभाग उरकून घेतो. त्याचप्रमाणे दारोदार हिंडून व दहा-पांच रुपये गोळा करून एक व्याख्यान एकादशीला करावें व त्याच्यामुळे एखादा-दुसरा दारूबाज दारू न पिण्याचा निश्चय करतो, तर त्याच दिवशीं संध्याकाळीं प्रत्येक गुत्त्यांत निदान दोन-चार नवीन उमेदवारांना दारूची दीक्षा देण्यांत येते. म्हणजे मद्यपाननिषेधाने दारूबाजाची संख्या जितक्या प्रमाणाने कमी होण्याचा संभव आहे त्याच्या शंभर पटींनी त्यांची संख्या वाढण्याचा सपाटा चालला आहे. असें जर आहे, तर मग भलत्याच दिशेने वेळेचा, पैशाचा व कर्तृत्व-शक्तीचा दुरुपयोग करण्यांत कोणता अर्थ आहे बरें? यापेक्षा ज्या चळवळीपासून श्रमाच्या मानाने नफा होईल, अशी चळवळ करणें जास्त शहाणपणाचें नाही काय? आम्हांस तर असें बालंबाल वाटतें की, दारूचें व्यसन व इतर लहानमोठीं व्यसनें एकसारखीं वाढत जाणार. जगांतील सर्व लोक कालेंकरून दारूबाज होणार व "एरवी घोटभर व सणावारी पोटभर" अशीच तऱ्हा हिंदुस्थानांतच नव्हे, तर जगांतील प्रत्येक राष्ट्रांत होऊन जाणार. यासाठी दारूचें व्यसन उपदेशाने बंद करण्याच्या नादी कोणींहि लागू नये.

इतर स्वतंत्र राष्ट्रांत दारूचें व्यसन असूनहि तीं स्वतंत्र आहेत व हिंदुस्थानांत तें व्यसन म्हणण्यासारखें विस्तृत प्रमाणावर नसतांहि भरतभूमि परतंत्र आहे, यावरून एवढें सिद्ध होतें की, स्वतंत्रतेचा व सुरेचा अर्थाअर्थी संबंध नाही. दारूबाज

असतांहि राष्ट्रें स्वतंत्र असण्याचें कारण एवढेंच आहे की, दारूच्या व्यसनाबरोबर त्यांना दुसरेंहि एक व्यसन असतें. या दुसऱ्या व्यसनाच्या प्रभावानेच तीं राष्ट्रें दारूबाज असतांहि स्वतंत्र राहिलीं आहेत. हें दुसरें व्यसन आपल्या देशबांधवांना लावून देण्याची खटपट जर मद्यपाननिषेधक मंडळीचे सभासद करतील, तर त्यांना त्यांच्या कामांत शतपट जास्त यश येईल. या नवीन व्यसनाची भर पूर्वीच्या इतर व्यसनांत पडली, तर इतर व्यसनांपासून जो तोटा होईल त्याच्या शतपट जास्त नफा या नवीन व्यसनापासून होईल. असें हें नवीन स्वतंत्र देशांत असलेले व हिंदुस्थानांत नसलेलें व्यसन म्हटलें म्हणजे देशभक्तीचें व्यसन होय. देशभक्तीचें व्यसन इतर व्यसनांप्रमाणे जोराने फैलावतें व जो एकदा त्या व्यसनाच्या आधीन झाला त्याचें तें व्यसन कधीहि सुटत नाही. दारूचें व्यसन आपल्या देशबांधवांनी अजीबात सोडून द्यावें म्हणून खटपट करण्याऐवजीं देशभक्तीचें व्यसन देशबांधवांना लागावें म्हणून खटपट करणें जास्त हितावह आहे. शंभर व्याख्यानांनी जर एकहि दारूबाज बिनदारूबाज झाला नाही, तर एका व्याख्यानाने शंभर बिनदेशभक्तीबाज देशभक्तीबाज होऊं शकतील. पुण्यांत मद्यपाननिषेधक मंडळी स्थापन होण्याऐवजी एक देशभक्तशून्यतानिषेधक मंडळी स्थापन झाली असती, तर फार उत्तम झालें असतें. अशा मंडळीपासून पुष्कळ नफाहि झाला असता. दारू पिऊं नका असा उपदेश करण्यासाठी मद्यपाननिषेधक मंडळी स्थापन करण्याऐवजीं परदेशी साखर खाऊं नका, असा उपदेश करण्यासाठी 'विदेशी शर्करानिषेधक मंडळी' स्थापन करण्यांत आली असती, तर याहून उत्तम झालें असतें.

हल्ली दारूचें उत्पन्न पांच-सहा कोटि आहे. तर परदेशी साखर सात-आठ कोटि रुपयांची खपत आहे. दारूच्या व्यसनापेक्षा परदेशी साखरेचें व्यसन लौकर सुटेल व त्यामुळे देशभक्तीचें व्यसन लौकर जडेल. दारूचें व्यसन न सुटण्यास तल्लफ आडवी येते. पण विदेशी साखर खाण्यांत तल्लफ नसते. विदेशी साखर खटपट केल्यास हां हां म्हणतां सुटेल. विदेशी साखरेच्या ऐवजीं स्वदेशी साखर मिळूं शकते. स्वदेशी साखर विकत घेण्यास जरा जास्त पैसा लागतो. पण तल्लफ सोडणें जितकें अवघड आहे तितकें पैसा सोडणें नाही. ज्याप्रमाणे दारूचें व्यसन वाढत्या प्रमाणावर आहे त्याप्रमाणे विदेशी साखर खाण्याचें व्यसनहि वाढत्या प्रमाणावर आहे. म्हणून कधीं न सुटणारी दारू सोडून देण्याकरिता देशबांधवांचीं मनें वळविण्याचा निष्फळ प्रयत्न करण्याऐवजीं झटदिशीं सुटणारी विदेशी साखर खाण्याचें सोडून देण्याकरिता त्यांचीं मनें वळविणें जास्त सोपें व हितकर आहे. मद्यपाननिषेधक चळवळ केल्यामुळे ज्याप्रमाणे सरकारचा रोष होण्याची भीति नसते त्याचप्रमाणे विदेशी शर्करानिषेधक चळवळ केल्यापासूनहि सरकारी रोष होण्याचा संभव नाही. म्हणून निष्फळ मद्यपाननिषधक चळवळ सोडून देऊन शीघ्र फलदायी विदेशी शर्करा-

निषेधक चळवळ आजच्या परिस्थितींत सुरू करणें हें अत्यंत निकडीचें व तातडीचें कर्तव्य आहे.

— भाला, दि. १ मे १९०९

---

## ४२. आम्ही व पांगारकर

ता. २१ एप्रिलच्या भाल्याच्या अंकांत 'आनंदवनभुवन' ह्या मथळ्याखाली आम्हीं जो लेख लिहिला, तो वाचून 'वंदे मातरम्'कर्ते भागवत व विठ्ठलभक्तिपरायण मुमुक्षुकर्ते पांगारकर ह्यांच्या पायाची आग मस्तकाला गेलेली दिसते. आमच्या लेखाने पिसाळून जाऊन वरील दोघा सद्गृहस्थांनी आमच्यावर शिव्यांची लाखोली वाहिली आहे. वरील दोघा धनकोंनी आम्हांस दिलेल्या कर्जाऊ शिव्या सव्याज परत न देण्याइतके लुच्चे व लबाड ऋणको आम्ही नसल्यामुळे, त्यांनी आमच्या पदरांत टाकलेल्या शिव्यांची रक्कम दामदुप्पट त्यांची त्यांस परत करणें हें आमचें कर्तव्य आहे. वरील भगवद्भक्तांपैकी दे. भागवत ह्यांची भगवद्भक्ति उसनी असल्यामुळे व ते हल्ली संकटांत असल्यामुळे त्यांची रक्कम आम्ही आपल्याकडे तशीच ठेवून घेतों. पण भगवद्भक्तशिरोमणि व धर्ममार्तंडचूडामणि पांगारकर ह्यांच्या संबंधाने मात्र आम्हांस तसें करतां येत नाही. एक वेळ आम्हांस असें वाटलें होतें की, आम्हां स्वतःवर झालेल्या अपशब्दांच्या वर्षावाकडे कानाडोळा करून फक्त सत्यान्वेषण करण्याकरिता पुन्हा या वादग्रस्त विषयाचें विवेचन शांतपणें व स्पष्टपणें करावें. पण सोपानकाकांच्या पुण्यतिथीची हकीगत देतांना व दे. गोखले ह्यांच्या "गीता प्रक्षिप्त आहे काय ?" ह्या विषयावर झालेल्या व्याख्यानावर टीका करतांना या २० व्या शतकांतील सोपानकाकांच्या मुखांतून जो मुखरस पाझरला, त्याची असह्य घाण नाकांत शिरल्याबरोबर आम्हांस अशी भीति पडली की, जर वेळींच औषधोपचार करण्यांत न आला, तर वरील दुर्गंधीमय मुखरसाच्या प्रसवस्थानाचें क्षेत्र विस्तृत होऊन, तें आमच्याप्रमाणे इतर व्यक्तींना त्रास व उपद्रव दिल्यावांचून राहणार नाही. संतदास पांगारकरांना पहिल्या प्रथम आमचें असें सांगणें आहे की, आम्हीं स्वतःची तुलना एकनाथ, तुकारामादि साधुसंतांबरोबर कधीहि केली नाही. त्यांच्या किंवा समर्थांच्या अंगांतील एकहि गुण आमच्या ठिकाणीं वसत नाही, हेंहि आम्ही प्रांजलपणें कबूल करतों. वारकरी पंथाची व धारकरी पंथाची तुलना करण्यांत आमचा मुख्य नि प्रधान हेतु हाच होता, आहे व असणार की, वरील दोन्ही पंथांपैकी कोणत्या पंथाने राजकारणाच्या बाबतींत सतराव्या शतकांतील महा-

राष्ट्रियांना खरी मदत केली ? या मुद्द्याचें विवेचन करतांना आमचें असें म्हणणें नाही की, साधुसंतांच्या उपदेशाचा दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत मुळीच उपयोग झाला नाही. साधुसंतांच्या उपदेशाचा एका गोष्टींत उपयोग झाला, पण ती गोष्ट राजकारण नव्हती. ज्ञानेश्वरांपासून तों तुकारामांपर्यंत झालेल्या संतमालिकेचा उपयोग कोणत्या बाबतींत किती व कसा झाला, ह्याचें पूर्ण निष्पाप व निःपक्षपात विवेचन आम्ही पुढील एका अंकांत करणार असल्यामुळे, त्या प्रश्नासंबंधाने आम्ही आजच्या लेखांत कांही एक लिहूं इच्छित नाही. आज आम्हांस जें कांही करावयाचें आहे तें एवढेंच की, हरिभक्तिपरायण पांगारकर ह्यांनी आम्हां स्वतःवर जे चार-पांच घाणेरडे आरोप लादले आहेत, त्याचें निराकरण करणें होय.

हरिभक्तिपरायण पांगारकर ह्यांचा आमच्यावरील पहिला आरोप असा आहे की, आम्ही नास्तिक व धर्मलंड आहोंत. हा आरोप त्यांच्याच गोड भाषेंत देण्यांत आला म्हणजे वाचकांना तो उत्तम रीतीने कळेल. ते असें लिहितात की, "भोपटकरांना देव नको, धर्म नको, स्नानसंध्या नको, पोथ्या-पुराणें नकोत, एकादशीचा उपवास करणें नको, श्राद्ध-पक्ष नको, प्रार्थना नको, जपतपानुष्ठानादि नको, तीर्थयात्रा नको, मनोनिग्रह नको, सहनशीलता नको, दयाशीलता नको, हे सर्व बायकी व जनानी प्रकार त्यांना आवडत नाहीत." ह. भ. प. पांगारकरांनी आमच्यावर लादलेला वरील आरोप वाचून आम्हांस त्यांच्या बुद्धिशून्यतेची अत्यंत कींव वाटते. वेळीअवेळीं बेताल सुरांत व भसाड्या आवाजांत गोड हरिनामाचा कटु उच्चार करण्यांत आला, म्हणजे परमेश्वराची इतराजी होऊन त्याने दिलेल्या बुद्धीचा नाश कसा होतो ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण कोणास पाहवयाचें असेल, तर आम्ही ह. भ. प. पांगारकर ह्यांच्याकडे बेलाशक बोट दाखवूं. पांगारकरांच्या अंतर्यामीं त्यांना असा गर्व झाला आहे की, सर्व कांही धार्मिकत्वाचा मक्ता त्यांना एकटयालाच मिळाला आहे. त्यांच्या मताच्या विरुद्ध जो कोणी बोलेल किंवा वागेल, तो त्यांच्या मताने नास्तिक, धर्मलंड आणि अधार्मिक होय. त्यांनी म्हटलें की, वारकरी पंथ उत्तम होय, की ज्याने त्याने त्यांच्या म्हणण्याची री ओढलीच पाहिजे. नाही तर त्यांच्या कपाळावर हे भक्तशिरोमणि नास्तिकपणाचा छाप झटदिशीं ठोकून देणार ! त्यांनी म्हटलें की, पंढरीस जाऊन विठूरायाच्या नामाचा गजर करणें हाच मोक्षप्राप्तीचा मार्ग आहे, की जो त्यांच्या म्हणण्याला मान तुकविणार नाही, त्याला हे धर्मशील महात्मे धर्मलंडाच्या वर्गांत ढकलून देणार. सारांश, ह. भ. प. पांगारकर यांच्या मनाविरुद्ध व कलाविरुद्ध जो बोलेल किंवा वागेल, त्याला स्वतःला नास्तिक बनवून घेतल्याशिवाय दुसरें गत्यंतर नाही. ह. भ. प. पांगारकर नेहमी सभांमधून असें सांगतात की, त्यांनी ज्ञानेश्वरी अकरा वेळा, एकनाथी भागवत २२ वेळा व दासबोध ४४ वेळा वाचला आहे. तुकारामाच्या अभंगांविषयी तर बोलण्याची सोयच नाही. एरवी मनांत व कोणी जवळ आले की,

भसाडच्या आवाजांत, ह्याप्रमाणे तुकारामाच्या अभंगांची लौकिकास्तव त्यांनी पारायणें केलीं आहेत. पायांत खडावा घालून, कटीला पीतांबर कसून, अंगावर शालजोडी पांघरून, हातांत रुप्याचा पेला घेऊन व तोंडावाटे जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांच्या कानावाटे आपला आवाज जाईल एवढ्या मोठ्याने अभंग म्हणतांना लोकांनी त्यांस पाहिलें आहे. एवढा अगडबंब ज्यांचा धर्म-ग्रंथांचा अभ्यास व एवढें अजस्र ज्यांचें पठन त्या पांगारकरांना नास्तिक व आस्तिक ह्यांमधील फरक कळूं नये हें त्यांच्या बुरणुस-बुद्धीचें द्योतक आहे. "माझ्याइतकें वाचन तुमचें नाही" असें पांगारकर ज्याला त्याला हिणवीत असतात व ह्याचा अनुभव आम्हांला स्वतःला खाजगी रीतीने व देशभक्त सीताराम केशव दामले ह्यांना चारचौघांत आला आहे. पांगारकरांइतकें आमचें अगाध वाचन नाही, हें आम्ही त्यांना गोड वाटण्याकरिता पाहिजे असेल तर कबूल करतों. पण जरी त्यांच्या मताने आमचें वाचन बेताबाताचेंच असलें, तरी आस्तिक व नास्तिक ह्यांतील भेद न कळण्याइतकी बुरणुस-बुद्धि जगदंबेने आम्हांला दिली नाही, असेंहि आम्ही स्पष्ट सांगतों. आमचा असा समज आहे की, जो परमेश्वराचें अस्तित्व कबूल करतो तो आस्तिक होय व जो कबूल करीत नाही तो नास्तिक होय. आता परमेश्वराचीं रूपें अशीं अनेक आहेत, त्याप्रमाणे त्याची भक्ति करण्याचे मार्गहि अनेक आहेत. परमेश्वराच्या अमक्या एका विशिष्ट अवतारालाच व अमक्या एका विशिष्ट पद्धतीनेच भजलें पाहिजे, असा कांही परमेश्वराने नियम घालून दिलेला नाही. जर पांगारकर तसा नियम घालून देऊं इच्छित असतील, तर त्यांच्या नियमाला कोणीहि भीक घालणार नाही. पंढरीला जाऊन विठोबाच्या चरणावर जे लोटांगण घालणार नाहीत व तोंडावाटे 'विठ्ठल-रखुमाई'चा गजर करणार नाहीत ते सर्व नास्तिक होत, असें जर पांगारकरांचें मत असेल तर तो त्यांचा खुळेपणा आहे. त्यांची उपास्यदेवता जशी 'विठोबा' आहे, तशी दुसऱ्यांच्या 'राम', 'जगदंबा' वगैरे असतील व वारकऱ्यांच्या भजन-पद्धतीचा अंगीकार न करतां दुसऱ्या पद्धतीने इतर लोक आपआपल्या उपास्य-देवतांचें भजनपूजन करीत असतील, म्हणून आपल्या उपास्यदेवतेला न भजणारा व आपल्या पद्धतीने ईशोपासना न करणारा मनुष्य नास्तिकच असला पाहिजे, असा कांही नियम नाही.

ह. भ. प. पांगारकर यांनी आम्हांस नास्तिक म्हटलें आहे तें कोणत्या आधारावरून आहे हें जर ते जगजाहीर करतील, तर फार उत्तम होईल. आम्ही विठूरायाचे उपासक नाहीत हें आम्ही उघडपणें कबूल करतों. पण त्याचप्रमाणे आमची उपास्यदेवता महिषासुरमर्दिनी जगदंबा आहे हेंहि आम्ही उघडपणें सांगून ठेवतों. पांगारकर यांच्या 'मुमुक्षु' कचेरींत कटेवर दोन्ही हात ठेवलेली विठूरायाची गोजिरी तसबीर आहे, तर भाला कचेरींतहि सिंहारूढ झालेली व आठ हातांत आठ निरनिराळीं शस्त्रें धारण करून महिषासुराचें मर्दन करण्यास उद्युक्त

अशी जगदंबेची मर्दानी तसबीर आहे, हें आस्तिक पांगारकरांना नास्तिक असें आम्ही कळविण्याची परवानगी घेतों. नास्तिकाला विठूराया कशाला पाहिजे किंवा अष्ठभुजा देवी काय करावयाची आहे? पण अलीकडे असा एक वेडगळ प्रघात पडून गेला आहे की, जो रूढिसंमत, पण निरुपयोगी आचारांना फाटे देईल त्याच्यावर नास्तिकपणाचा व धर्मलंडपणाचा आरोप करावयाचा! पांगारकरांना आम्ही असा प्रश्न करतों की, फार लांबच्या नाही, पण अगदी अलीकडच्या सोळाव्या शतकांत राहणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणे आपला वर्तनक्रम आहे काय? किंवा सोळाव्या शतकांतील ब्राह्मणाची गोष्ट राहूं द्या. पण हल्लीच्या काळीं नरसोबाच्या वाडीसारख्या एखाद्या क्षेत्रांत राहणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणेहि पांगारकरांची दिनचर्या सापडावयाची नाही. असें जर आहे, तर मग एखाद्या क्षेत्रांतील ब्राह्मण जर पांगारकरांना नास्तिक म्हणूं लागेल, तर तें म्हणणें कितपत शोभेल? असो; आमच्यावर केलेल्या नास्तिकपणाच्या आरोपाबद्दल आम्हांस जें कांही लिहावयाचें होतें तें आम्हीं वर लिहिलें आहे.

पण बहकलेल्या व आढ्यतेखोर पांगारकरांनी आमच्यावर जो दुसरा आरोप केला आहे तो वाचून केवळ रागाच्या भरांत जर आमच्या लेखणींतून कडक शब्द प्रसवले, तर त्याचा दोष पांगारकरांच्या माथीं आहे. पांगारकरांना आम्ही असें स्पष्ट कळवितों की, हिंदु धर्माचा त्यांना जितका अभिमान आहे, तितकाच नव्हे, तर त्यांच्यापेक्षा शतपट जास्त अभिमान आम्हांस आहे. भाल्याच्या लेखांत व सभांतील भाषणांत आम्हीं अनेक वेळा असें प्रतिपादन केलें आहे की, एकदा गेल्यावर पुन्हा न मिळणारी वस्तु जगांत एकच आहे व ती वस्तु हिंदु धर्म होय. म्हणून आपले इतर बाबतींत कितीहि नुकसान झालें, तरी तें सर्व सोसून आपण आपला हिंदु धर्म कधीहि गमावतां कामा नये. हल्ली हिंदु धर्माला मुख्य भीति मिशनऱ्यांकडून आहे व तिजपासून हिंदु धर्माचें रक्षण करण्यास प्रत्येक हिंदु धर्माभिमान्याने मनोभावें खटपट केली पाहिजे असें आम्हीं आपल्या धर्मबांधवांना अनेक वेळा उपदेशिलें आहे. 'पतितपरावर्तन, छाती फाटून जाते, मूठभराई' वगैरे लेखांतून आम्ही मिशनऱ्यांपासून हिंदु धर्माचें रक्षण करण्याच्या प्रश्नाची चर्चा केली आहे. हें सर्व पांगारकरांना माहीत असतां वस्तुस्थितीचा विपर्यास करून त्यांनी आम्हांस मिशनऱ्याच्या पंगतीला नेऊन बसवावें यापरता नीचपणा व निर्लज्जपणा दुसरा कोणताहि नाही. पांगारकर असें लिहितात की, "आमच्या हिंदु समाजाची सर्व शक्ति त्याच्या धर्मश्रद्धेंत आहे व ती डळमळावी यासाठी आजपर्यंत मिशनऱ्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. मिशनऱ्यांनी आपला वरदहस्त सुधारकांवर ठेवला व त्यांनी आपला अनुग्रह प्रो. गोखल्यांसारख्या शोधकांवर व रा. भोपटकरांसारख्या राष्ट्रियावर केला आहे." म्हणजे जें काम मिशनरी करीत आहेत तें काम आम्ही करीत आहोंत असें पांगारकरांच्या म्हणण्याचा इत्यर्थ आहे. पांगारकरांच्या या खोटचा विधानाला काय उत्तर द्यावें याची आम्हांस

पंचाईत येऊन पडली आहे. पांगारकरांच्या या विधानाला आम्ही एवढेंच उत्तर देतों की, ते पुरे निर्लज्ज व बेशरम आहेत. नाही तर त्यांनी आम्हांस अप्रत्यक्ष रीतीने मिशनरी बनविलें नसतें. मिशनऱ्यांपासून हिंदु धर्माचें संरक्षण होण्यासाठी आम्हीं आजपर्यंत इतके लेख लिहिले आहेत की, चार वर्षांतील भाल्याच्या लेखांपैकी निम्म्यांहून अधिक लेख हिंदु धर्माच्या संरक्षणासंबंधाचे आहेत. दुष्काळांत अनाथ व पोरकीं पोरें मिशनऱ्यांच्या जाळ्यांत सापडून ख्रिश्चन धर्मांत जातात हें अनिष्ट टळावें म्हणून आम्हीं 'मूठभराई'चा उपाय सुचविला होता व त्या उपायाची अंमलबजावणी गेल्या वर्षी आम्ही एकट्याने पुण्यांत केली होती. पांच-पन्नास लहान लहान मुलें गोळा करून व त्यांच्या साहाय्याने दर रविवारीं घरोघरीं मूठभराई मागून आम्हीं उत्तर हिंदुस्थानांतील आमच्या दुष्काळग्रस्त धर्मबांधवांना मदतीदाखल पांचशेपन्नास रुपये पाठवून दिले, ही गोष्ट सत्यप्रिय पांगारकरांना माहीत नाही काय ? त्या वेळीं एखाद्या रविवारीं तरी पांगारकरांनी आम्हांस मदत करावयाची होती ! पण कदाचित् पांगारकर त्या वेळीं हरिभजनांत गुंतलेले असल्यामुळे त्यांना घराच्या बाहेर पडण्यास व दहा घरें हिंडण्यास वेळ सापडला नसावा ! पांचशेपन्नास रुपये जमवून देणारे आम्ही मिशनऱ्यांच्या कोटींतील व घराचा उंबरठा न ओलांडणारे पांगारकर मात्र प्रति शंकराचार्य व तुकोबा ना ! एकंदरींत गाजरपारख्या पांगारकरांच्या अकलेची जितकी तारीफ करावी तेवढी थोडीच होय.

विठ्ठलोपासक पांगारकर आम्हांस एकट्यासच मिशनऱ्यांच्या वर्गांत ढकलून स्वस्थ बसले नाहीत. जें पूर्वापार चालत आलेल्या रूढींच्या व कल्पनांच्या विरुद्ध एखादा शब्द काढतील, ते या दांभिक व बेगडी धर्ममार्तंडांच्या मताने प्रच्छन्न मिशनरी होत. दे. गोखले हे गृहस्थ इंदूर कॉलेजांत एक प्रोफेसर होते. त्यांनी पुण्यास 'गीता प्रक्षिप्त आहे काय ?' या विषयावर दोन व्याख्यानें दिलीं. हीं व्याख्यानें देण्यांत त्यांचा हेतु गीतेची टवाळकी किंवा निर्भर्त्सना करण्याचा नव्हता. खरी गोष्ट काय आहे हें सांगण्याचीच फक्त त्यांची इच्छा होती व आपला मानस त्यांनी उघड रीतीने जाहीर केला होता. पण 'गीता प्रक्षिप्त आहे काय ?' असा प्रश्न उपस्थित केल्याबरोबर दे. गोखले मिशनऱ्यांच्या पंक्तींत ढकलले गेले व सतराव्या शतकांतील राजकारणाच्या कामीं वारकरी पंथाचा मुळीच उपयोग झाला नाही. असें म्हटल्याबरोबर आम्हीहि गुप्त मिशनरी ठरलों. वाहवा रे या आधुनिक भगवद्भक्ताची अक्कल ! पांगारकर म्हणतात की, हिंदु समाजाची हिंदु धर्मावरील श्रद्धा डळमळावी, एतदर्थ आमचे प्रयत्न चालले आहेत. विठ्ठलभक्तांना असत्य बोलण्याचें पाप लागत नाहीसें दिसतें किंवा चंद्रभागेच्या पाण्यांत वर्षांत केलेल्या पापांचें क्षालन करण्याची शक्ति असल्यास न कळे ! हिंदु लोकांची हिंदु धर्मावरील श्रद्धा डळमळून त्यांनी ख्रिश्चन धर्माची दीक्षा घ्यावी असा आमचा अंतःस्थ हेतु आहे, असलें निराधार,

मत्सरयुक्त व असत्यमय विधान करण्याइतका नीचपणा, अधमपणा व बेशरमपणा पांगारकरांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीच्या हातून होणें शक्य नाही.

पांगारकर ह्यांचे आम्हांवर आणखी दोन-तीन आरोप आहेत. आम्हीं वर्तमान-पत्राचा धंदा पोट भरण्याकरिता काढला आहे, असा त्यांचा आमच्यावर आरोप आहे. आम्हांस पोट आहे व त्या पोटांत नुसती हवा भरून आमचें चालत नाही. पण तें पोट आम्ही इतर धंदे करून भरीत असतों, हें पांगारकरांना माहीत नाही असें नाही. परंतु लोकांची नालस्ती करणें हाच ज्यांचा धंदा व धार्मिकपणा, त्या पांगार-करांना लिहिण्याच्या भरांत शुद्ध राहवी कशी ? ह्या गोष्टीची छाननी केली असतां पोटभरूपणाचा आरोप आमच्यापेक्षा रा. पांगारकर ह्यांना जास्त लागू पडेल, असें आम्हांस वाटतें. 'मुमुक्षु' काढण्यांत पांगारकरांचा पोट भरण्याचा हेतु नाही हें जें त्यांनी अप्रत्यक्ष रीतीनें ध्वनित केलें आहे, त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. पण आम्ही त्यांना एवढाच प्रश्न करतों की, ते, त्यांची पत्नी व दोन-तीन मुलें ह्यांचें पोट कसें चालतें बरें ? का पांडुरंग वाण्याचें रूप धारण करून, त्यांच्या घरीं संसारास लागणाऱ्या जिनसांचा पुरवठा करतो ! तसा कांहीं प्रकार असल्यास त्यांनी आम्हांस कळवावें, म्हणजे आम्ही तरी त्यांच्या मध्यस्थीनें पांडुरंगाची गाठ घेऊं व मग आम्हांस वकिलीचा धंदा करण्याची यातायात तरी पडणार नाही ! ह. भ. प. पांगारकरांनी आमच्यावर आणखी कांही आरोप केले आहेत; पण हाच लेख फार लांब झाल्यामुळे बाकीच्या आरोपांसंबंधाने आम्हांस सध्याच विचार करतां येत नाही. असो; पांगारकरांना आम्ही अशी सूचना करतों की, त्यांनी आमच्यावर पुन: लेखणी चालविण्यापूर्वी सत्याची जरा जास्त चाड धरावी. वारकरी पंथाची महती किंवा उपयुक्तता आमच्यावर व्यक्तिविषयक व खरी नव्हे तरी खोटी टीका करून, कधीहि स्थापन व्हावयाची नाही. धर्माच्या व देशाच्या दृष्टीने वारकरी पंथाचीं तत्त्वें किंवा धारकरी पंथाचीं तत्त्वें जास्त हितकर आहेत, हा वादाचा मुद्दा आहे. त्याचा निकाल शांतपणें व नि:पक्षपाताने लागणें जरूर आहे. ह्यासाठी आम्हांस शिव्या देण्याच्या ऐवजीं राजकारणाच्या बाबतींत निवृत्तिप्रचुर वारकरी पंथ कसा उपयोगी पडला, हें त्यांनी मुद्देसूद रीतीने सिद्ध करून द्यावे. भोपटकर ह्या व्यक्ती-वर टीका करण्यांत 'मुमुक्षु'चे रकाने व्यापून टाकण्याऐवजी वारकरी पंथासंबंधाने माहिती देण्यांत त्यांनी त्यांचा उपयोग करावा.

– भाला, दि. ११ मे १९०९

---

# ४३. नाटकें आणि नाटकगृहें

**नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ।**

— मालविकाग्निमित्र

कविकुलगुरु कालिदास यांनी नाटयशास्त्राची जी वर थोडक्यांत व्याख्या दिली आहे ती सर्वसंमत आहे. कोणत्याहि रुचीचा, कोणत्याहि मताचा अथवा कोणत्याहि मनोप्रवृत्तीचा मनुष्य असो, नाटकापासून त्याला सारखेंच सुख प्राप्त होतें. करमणुकीचीं साधनें या जगांत शेकडो आहेत, पण तीं सर्व सर्वांनाच आवडतात अशी गोष्ट नाही. उदाहरणार्थ, शिकार ही एक मनोरंजनाचें साधन आहे; पण ती जशी धाडसी व धांगडधिंग्या स्वभावाच्या मनुष्याला आवडेल, तशी ती शांत व भित्र्या स्वभावाच्या मनुष्याला आवडणार नाही. पोहणें, घोडयावर बसून फेरफटका करणें, पत्ते किंवा बुद्धिबळें खेळणें, आटयापाटया किंवा क्रिकेट वगैरे शेकडो जुने व नवे खेळ आहेत, पण ते सर्वांना सारखेच आवडतात असें मात्र खात्रीने सांगतां येत नाही. करमणुकीच्या इतर साधनांपासून जरी सर्वांना सारखेंच सुख प्राप्त होत नाही, तरी नाटक मात्र हें मनोरंजनाचें असें एक साधन आहे की, जें सर्वांना सारखेंच रिझवितें. विद्वान् व अविद्वान्, शूर व भित्रा, शांत स्वभावी व धाडसी, रंगेल व विरक्त अशा सर्व तऱ्हेच्या व दर्जाच्या लोकांना नाटक हें सारखेंच प्रिय आहे. नाटकाच्या अंगीं हा अद्वितीय गुण असल्यामुळे प्राचीन काळापासून नाटयकलेकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें आहे. आपल्या या आर्यावर्तांत एके काळीं नाटयकला पूर्ण ऊर्जितावस्थेला जाऊन पोहोचली होती. कालिदास, भवभूति वगैरे नाटयाचार्यांनी आपलें बुद्धिभांडार तिच्यापायीं खर्च करून तिला उत्तम तऱ्हेने नटवून सजवून ठेवली होती. पण कालाच्या ओघांत येथील इतर सर्व कला ज्याप्रमाणे बुडून गेल्या त्याप्रमाणे नाटयकलेचाहि ऱ्हास झाला. जोंपर्यंत भरतभूमींत ,गिर्वाण भाषा ही बोलण्याचालण्याची भाषा होती तोंपर्यंत कालिदास, भवभूति वगैरे नाटककारांची संस्कृत नाटकें पुष्कळ प्रचारांत होतीं. निरनिराळया उत्सव-प्रसंगीं किंवा यात्रांच्या वेळीं संस्कृत नाटकें त्या वेळच्या लोकांपुढे करण्यांत येत असत. पण जसजशी संस्कृत भाषा मागे मागे पडून लोक व्यवहारांत ती बोलेनासे झाले, तसतशी संस्कृत नाटकें मागे पडत चाललीं. संस्कृत भाषेच्या ऐवजीं ज्या वेळीं दुसऱ्या इतर स्थानिक भाषा

प्रचारांत आल्या त्या वेळीं संस्कृत नाटकांना रंगभूमीवरून गचांडी मिळून त्यांना फक्त ग्रंथांत आसरा घेऊन दडून बसावें लागलें. नाट्य हें दृश्य, काव्य असल्याकारणाने नाटकें पाहण्यांत जी मौज आहे ती वाचण्यांत नाही. म्हणून जीं नाटकें रंगभूमीवर कोणत्याहि कारणामुळे येऊं शकत नाहीत तीं कालेंकरून मागे पडतात व त्यांची हक्काची जागा जी रंगभूमि ती भलत्याच गोष्टी बळकावून बसतात. संस्कृत नाटकांची अशीच गत झाली. रंगभूमीवरून त्यांचें उच्चाटन होऊन त्यांची मिराशीची व हक्काची जागा तमाशे व ललितें बळकावून बसलीं. या क्रांतीमुळे भारतीय रंगभूमीचा पहिला सभ्यपणा व पवित्रपणा नष्ट होऊन तिच्या अंगीं हिडीसपणा व अश्लीलपणा मात्र आला.

कै. अण्णासाहेब किर्लोस्कर हे संगीत नाटकाची नवी टूम काढीपर्यंत तमाशे व ललितें यांशिवाय सभ्य लोकांना सार्वजनिक करमणुकीचें दुसरें साधन नव्हतें. तमाशांत अश्लीलपणाचा किती हिडीस रंग उडून जातो याची नीट कल्पना प्रत्यक्ष तमाशा पाहण्यास गेल्याशिवाय होणें नाही. तमाशांतील अश्लीलपणाचा अतिरेक ललितांत नसतो; पण तो मुळीच नसतो असें मात्र नाही. ललितांत दशावतारांचीं सोंगें आणण्याचा प्रघात आहे व तीं बहुतेककरून धार्मिक उत्सवांच्या परिसमाप्तीप्रीत्यर्थ होतात. यावरून ती सुरू करण्यांत मूळ उत्पादकाचा असाच हेतु असावा की, करमणुकीच्या द्वारें बहुजनसमाजाला धर्माचें ज्ञान व्हावें. पण खेदाची गोष्ट ही आहे की, ललितांत सुद्धा भद्रावतीचीं व शीलवतीचीं सोंगें शिरून त्यांनी मूळच्या हेतूचा विपर्यास करून टाकला. नाच्यापोऱ्या तर तमाशांतला जीव आहे व त्याशिवाय तमाशा होणें शक्यच नाही. हा नाच्यापोऱ्या ललितांतहि घुसला आहे. विशेष बहार उडवून देण्याकरिता ललितांत लावण्या म्हणण्याचाही प्रघात पडला आहे. कांही कांही लावण्या अशा आहेत की, त्यांत श्रृंगाररस माफक रीतीने व भारदस्त शब्दांत ओतलेला आहे. महाराष्ट्र भाषेंतील प्रसिद्ध लावणीबाज होनाजी बाळा व सगनभाऊ यांच्या कांही लावण्या इतक्या सभ्य व बहारीच्या आहेत की त्या सभ्य मंडळींतहि म्हणण्यास कांही हरकत नाही. पण त्यांच्या पाठीमागून जे पुढे अशिक्षित तमासगीर उत्पन्न झाले, त्यांनी लावणी छंदाचा इतका विचका करून टाकला की, तमाशांतील लावणी म्हणजे एक लाल तापलेली सळईच होय. तापलेली सळई कानांत घातल्यापासून जें सुख प्राप्त होतें तेंच सुख लावणी ऐकल्यापासून होतें. लावणी चालली असतांना किंवा तमाशांतील एखाद्या सोंगाची बतावणी चालली असतांना जर एखाद्या सभ्य मनुष्याला तेथे नेऊन बसविलें, तर तो नव्या नवरीप्रमाणे आपली मान खाली घालून ठेवील. तमाशांतील अश्लीलपणाइतका अश्लीलपणा ललितांत नसतो; पण मुळीच नसतो असें मात्र नाही. त्यांतून ललितांतलें संविधानक एकच नसल्याकारणाने मागील सोंगांचा पुढील सोंगांशीं संबंध नसतो. त्यामुळे खऱ्या रसिकाला अशा ललितांपासून आनंद होण्याचा संभवहि तितकाच

असतो. तमाशांत व ललितांत असलेल्या वरील दोषांमुळे कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी काढलेली संगीत नाटकांची नवीन टूम रसिक व सभ्य लोकांना पूर्णपणें पसंत पडून संगीत नाटकांवर लोकांच्या उड्या पडूं लागल्या. पहिल्या पहिल्यांदा तर असा प्रकार झाला की, विद्यार्थ्यांनी आपली अभ्यासाचीं बुकें विकलीं, भिक्षुकांनी आपले मुकटे विकले, न्हाव्यांनी आपल्या धोपटचा विकल्या, पण किर्लोस्कर कंपनीचें संगीत शाकुंतल व संगीत सौभद्र पाहण्याचें सोडलें नाही. पुणें शहरांत असें कांही वृद्ध कपि निघतील की, ज्यांनी निदान एकशेआठ वेळा संगीत शाकुंतल व त्याच्या दुप्पट वेळा संगीत सौभद्र पाहिलें असेल.

कै. अण्णासाहेबांच्या हयातींत व त्यांच्या पाठीमागे पुष्कळ संगीत नाटककार झाले आहेत. त्यांचीं नाटकें कमीजास्त मानाने चांगलीं आहेत. पण खेदाची गोष्ट ही की, अलीकडे कांही संगीत व कांही गद्य नाटकांतील कांही प्रवेश इतके अश्लील झाले आहेत की, त्या वेळीं प्रेक्षकजनांना आपण एखादा तमाशा पाहत आहोंत की काय, असा भास होतो. नाटककारांनी श्रृंगाररसाचा परिपोष करतांना विशेष खबरदारी बाळगली पाहिजे. आम्हांस ही गोष्ट कबूल आहे की, सर्व रसांत श्रृंगाररस प्रेक्षकांना जास्त प्रिय व गोड वाटतो. पण एवढ्याच कारणामुळे त्या रसाची फाजील रेलचेल उडवून देणें कधींहि हितकर नाही. नाटक गद्य असो किंवा पद्य असो, नाटककारांना अलीकडे अशी सवय लागून गेली आहे की, कांही तरी बादरायण संबंध लढवून पतिपत्नीमधील रंगमहालांतील श्रृंगाररस रंगभूमीवर आणून सोडावयाचा. आधुनिक कवींच्या या घातुक रुचीचा समाजावर किती घातुक परिणाम होईल याची आम्हांस कल्पना करवत नाही. तारुण्याने मुसमुसणाऱ्या सोळा-सोळा वर्षांच्या पोरी व वीस-वीस वर्षांचे पोरगे यांच्यापुढे अंतर्महलांतील देखावा दाखविणें म्हणजे अप्रत्यक्ष तऱ्हेने त्यांना वाईट मार्गाने जाण्याचा उपदेश करण्यासारखेंच आहे.

नाटकांची अशी स्तुति करण्यांत येते की, त्यांच्या प्रेक्षणाने मनोरंजन होऊन व्यवहाराचें शिक्षणहि मिळतें. रंजनाच्या द्वारें शिक्षण देण्याचा एकच मार्ग म्हटला म्हणजे नाटक होय, असें नाटकांच्या पक्षपाती लोकांचें म्हणणें आहे. या म्हणण्यांत सत्याचा अंश जर असेल, तर तो फारच अल्प प्रमाणांत आहे असें आम्हांस कष्टाने म्हणावें लागतें. रंजन ही एकच गोष्ट डोळ्यापुढे ठेवून जर नाटकांची स्तुति करावयाची असेल, तर मग आमचें कांही एक म्हणणें नाही. नाटकांमुळे रंजन होतें तर तें आणखी दुसऱ्या शेकडो गोष्टींमुळे होण्यासारखें आहे. पण नाटकांपासून शिक्षणाचाहि लाभ होतो असें जर कोणी प्रतिपादन करील, तर त्याला आमचें उत्तर असें आहे की, तें फारच थोडे व अत्यंत सूक्ष्म प्रमाणावर आहे.

नाटकांपासून नितिसंपन्नतेपेक्षा नीतिभ्रष्टताच जास्त उत्पन्न होते. नाटक पाहण्यासाठी जो मनुष्य किंवा जी स्त्री घराच्या बाहेर पडते, तो किंवा ती शिक्षण

मिळविण्याच्या हेतूऐवजीं करमणुकीचा हेतु मनांत ठेवून नाटकगृहाकडे आपलें तोंड फिरवितें. आमच्या म्हणण्याचें सत्यत्व पाहणें असल्यास ज्या नाटकांत जास्त चटोरपणा असतो अशावरच प्रेक्षकांच्या उड्या जास्त पडतात. दंडधारी नाटकांत शिक्षणाचा भाग कोणता आहे? पण पुणें शहरांत असा कोणता पुरुष किंवा कोणती स्त्री आहे, की ज्याने किंवा जिने बेळगावकर स्त्री संगीत मंडळीचें दंडधारी नाटक पाहिलें नाही. सारांश, लोक जे नाटक पाहवयास जातात तें शिक्षणासाठी नसून फक्त करमणुकीसाठी जातात. हल्ली होत असलेल्या नाटकांत शारदा, कांचनगडची मोहना वगैरे नाटकें लोकशिक्षणाच्या दृष्टीने चांगलीं आहेत. पण आम्हांस असें वाटतें की, शिक्षणाच्या बाबतींत नाटकाचा आसरा धरणें हितकर नाही.

नाटकाच्या स्वरूपांत शिक्षण देण्यास सुरुवात केल्यास मुख्य हेतु एका बाजूस राहून भलत्याच गोष्टीला प्राधान्य येतें. शारदेसारखें सर्वोत्कृष्ट नाटक, पण तें पाहून आल्यावर कोणी म्हणतो, कोदंडाचें काम चांगलें झालें, तर दुसरे म्हणतात की, कांचनभटजींनी बहार उडवून दिली. कोदंडाने आपली पदें चांगलीं म्हटलीं किंवा नाही किंवा कांचनगडच्या मोहनेंत प्रतापरावाचा आवाज चिरकला किंवा नाही या गोष्टी गौण आहेत. 'जो लोककल्याण' हें पद कोदंड वाईट म्हणो किंवा चांगलें म्हणो, पण त्यांतील अर्थ जर प्रेक्षकजनांच्या मनावर बिंबला व त्याप्रमाणे कृति करण्याची त्यांची प्रवृत्ति झाली, तर शारदा नाटक पाहिल्याचें किंवा वरील पद म्हटल्याचें चीज आहे, नाही तर व्यर्थ खटाटोप होय. पण नाटक संपल्यावर नाटकगृहांतून बाहेर पडणाऱ्या लोकांचीं संभाषणें ऐकावींत तर भलत्याच गोष्टी अनुभवास येतात. कोणी गळ्याच्या माधुर्याची तारीफ करतो, तर दुसरे म्हणण्याच्या ढबीची वाहवा करतो. पण पदांतील अर्थाची प्रशंशा कोणीहि सहसा करीत नाही. सारांश, नाटकें पाहण्यास जाण्याचा मुख्य व प्रधान हेतु करमणूक आहे. नाटकापासून शिक्षणाची प्राप्ति होते. निदान ती हल्लीच्या काळीं होते हें म्हणणें म्हणजे वाईट गोष्टीवर झिलई देण्यासारखें आहे. हल्ली लोकशिक्षणाची इतकी निकडीची जरुरी आहे की, तें कोणत्याहि मार्गाने मिळालें तरी तें आम्हांस पाहिजे. जबर तहान लागून पंचप्राण व्याकुळ झाले म्हणजे मनुष्य ज्याप्रमाणे मडक्यांतूनहि पाणी पिण्यास तयार होतो त्याप्रमाणे शिक्षणाची तहान हिंदी लोकांना लागली असल्यामुळे तें शिक्षण त्यांना कोणत्याहि मार्गाने मिळालें तरी आमची हरकत नाही. परंतु नाटकांपासून शिक्षण मिळण्याच्या ऐवजीं हिंदी लोकांचीं मनें भ्रष्ट मात्र होत चाललीं आहेत. हल्ली नाटकें करमणुकीसाठीच होत असल्याकारणाने पतित व परतंत्र राष्ट्राला असली करमणूक पथ्यकर आहे किंवा नाही हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे.

ज्या वेळीं राष्ट्र स्वतंत्र व संपन्न असतें त्या वेळीं नाटकांची करमणूक एक प्रकारें क्षम्य आहे. पण परतंत्र व कफल्लक राष्ट्राला नाटकांची करमणूक सर्वथैव घातुक आहे. अशा जनानी करमणुकीने परतंत्र लोकांचीं मनें जास्तच जनानी होतात

परतंत्र राष्ट्रांत मर्दानी नाटकें करूं देण्याची परवानगी मिळणें शक्य नाही व अशीं नाटकें रंगभूमीवर न आल्यास नुसत्या संगीत नाटकांतील पदांनी लोकशिक्षण होणेंहि शक्य नाही. या कारणामुळे नाटकासारख्या करमणुकी जितक्या लौकर बंद पडतील तितकें राष्ट्राच्या दृष्टीने जास्त हितावह आहे. इंग्लंडांत नाटकें झालीं तर कांही बिघडत नाही. तेथे सर्व गोष्टींची संपन्नता आहे व जगांत जी एक गोष्ट अवश्य पाहिजे आहे ती गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य त्यांना मिळालेलें आहे. यामुळे इंग्रज लोक नाटकें करतात व पाहतात म्हणून आपण तीं करावीं‌त व पाहवींत हें शोभत नाही. सारांश, जर प्रचलित राजकीय विषयांवर नाटकें करण्याची परवानगी येथे हिंदी लोकांना असती, तर गोष्ट निराळी होती. जर्मनीचें आरमार वाढून त्याच्या योगाने इंग्लंडच्या साम्राज्याला भीति उत्पन्न झाली आहे, असें इंग्लंडांतील लोकांचें मत झाल्याबरोबर, त्यांनी स्टेजचा आश्रय करून लोकांपुढे 'जर्मनीची इंग्लंडवरील स्वारी' या नांवाचें नाटक करून दाखविण्यास सुरुवात केली. त्या नाटकाचा परिणाम असा झाला की, सगळीकडे इंलंडच्या आरमाराच्या कमकुवतपणाबद्दल चर्चा सुरू होऊन प्रधान-मंडळाला त्या गोष्टीची चवकशी करण्याकरिता कमिशन नेमावें लागलें. पण जर उद्या हिंदुस्थानांत 'राजद्रोहाचे बळी' या नांवाचें एखादें नाटक रंगभूमीवर येऊन त्याच्या योगाने राजद्रोहाच्या कायद्याचा व्यापकपणा व विक्षिप्त-पणा लोकांच्या नजरेपुढे आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तर अशा नाटककाराची उचलबांगडी येरवड्याच्या तुरुंगांत झालीच म्हणून समजावें. परतंत्र राष्ट्रांत देशाला किंवा समाजाला हितकर नाटकें रंगभूमीवर आणतां येणें शक्य नाही व बाकी दुसरीं अलबतीं-गलबतीं नाटकें रंगभूमीवर आलीं काय किंवा न आलीं काय, दोहींचा उपयोग सारखाच. किंबहुना अशा नाटकांमुळे नुकसान मात्र होतें. म्हणून आमचें असें मत आहे की, जोंपर्यंत भरतभूमीला स्वराज्याची जोड झालेली नाही तोंपर्यंत तमाशे, ललितें किंवा नाटकें यांच्यासारख्या जनानी करमणुकी जितक्या प्रचारांत न येतील तितकें जास्त चांगलें होय. आपण नाटकें करूं व तीं दररोज करूं, पण तीं स्वराज्य मिळाल्यावर करूं. सध्या हिंदुस्थानांत 'स्वराज्यप्राप्ती'चें जें राष्ट्रीय नाटक चाललें आहे तें सर्वजण मिळून प्रथम तडीस नेऊं व मग संगीत सौभद्र, संगीत शाकुंतल व संगीत दंडधारी यांच्या नादीं लागूं. परतंत्र राष्ट्रांत रंगेलपणाचा जितका नायनाट करावा तितका जास्त हितकर होय. या दृष्टीने सध्याच्या नाटचकलेच्या भरभराटीबद्दल आम्हांस आनंद न होतां उलट खेदच वाटत आहे.

— भाला, दि. १ सप्टेंबर १९०९

---

# ४४ ट्रान्सवाल व हिंदी लोकांचे हाल

**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।**

होय! जन्मभूमि ही प्रत्येकाची जननी आहे. नव्हे ती आदिजननी आहे. जन्म देणाऱ्या मातोश्रीपेक्षा जन्मभूमि ही शतपटींनी जास्त योग्यतेची जननी आहे. जन्मदात्री जननीपेक्षा अन्नदात्री जननी सहस्रपटींनी जास्त पूज्य आहे. जन्मदात्री जननी फक्त कांही विवक्षित मुलांना जन्म देते, तर अन्नदात्री मायभूमि आपल्या अमर्यादित लेकरांना अमर्यादित कालपर्यंत अन्नाचा पुरवठा करते. जन्म देणाऱ्या आईचेंहि अन्न देणारी मायभूमि पोषण करीत असल्यामुळे मायभूमीची योग्यता मातेपेक्षा किती तरी जास्त आहे. जन्मभूमीची योग्यता वरच्याप्रमाणे अपरंपार असल्यामुळे तिची थोरवी प्रत्यक्ष स्वर्गापेक्षाहि जास्त आहे. ज्या भाग्यवान लोकांची जन्मभूमि स्वातंत्र्य-संपन्न आहे ते लोक प्रत्यक्ष स्वर्गांतच वास करतात, असें म्हणावयास हरकत नाही. स्वतंत्र जन्मभूमि व स्वर्ग यांची तुलना केली असतां जन्मभूमीचें पारडें ती भूतलावर असल्याकारणाने खाली जाऊन स्वर्गाचें पारडें वरती असल्याकारणे निःसंशय वरती जाईल. स्वर्गांत नानाविध सुखांची रेलचेल आहे व तेथे दुःखाचें नांवहि ऐकूं येत नाही असें सांगण्यांत येतें; पण त्याचा प्रत्यक्ष अनुभव मानवी देहाला तरी येत नाही. स्वर्गाचें सुख स्वर्गस्थ झाल्याशिवाय मिळूं शकत नाही. मनुष्य एकदा स्वर्गस्थ झाला म्हणजे तो पुनरपि खाली येत नाही. म्हणून स्वर्गांत जरी अनेकविध सुखें खेचून भरलेलीं असलीं, तरी त्यांचा प्रत्यक्ष अनुभव नसल्याकारणाने तीं वस्तुतः आहेत किंवा नाहीत याची खात्रीपूर्वक माहिती नाही. जरी यदाकदाचित् तीं असलीं तरी त्या सुखाचा आस्वाद मानवदेहाला मिळूं शकत नाही. स्वर्गाचीं सुखें प्रत्यक्ष अनुभवण्यास मानवी देहाची जरी पात्रता नाही, तरी स्वातंत्र्यसंपन्न जन्मभूमींतील स्वर्गीय सुखें उपभोगण्यास मानवी देहांत पूर्ण पात्रता आहे. मानवी देहाच्या वरील पात्रतेमुळेच "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" या अवतरणाचें सत्यत्व मनाला बिनतक्रार पटतें. थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे स्वतंत्र जन्मभूमि हा भूलोकावरील स्वर्ग होय. जर स्वर्गांत धनधान्याची रेलचेल असते, तर स्वतंत्र जन्मभूमींत पोटापाण्याचे कधीहि हाल नसतात. स्वर्गाचें वातावरण जर उच्च व पवित्र उच्चारांच्या सुगंधाने दरवळून गेलेलें असतें, तर स्वतंत्र मायभूमींतीलहि वातावरण उदात्त व

पावन कल्पनांच्या सुवासाने सुगंधित झालेलें असतें. जो कायिक, वाचिक व मानसिक पवित्रपणा स्वर्गस्थ पुण्यवान् माणसांच्या ठायीं आढळण्यांत येतो तशाच प्रकारचा कायिक, वाचिक व मानसिक पवित्रपणा स्वातंत्र्यशाली देशांतील लोकांच्या ठिकाणीं दृग्गोचर होतो. स्वर्ग व स्वतंत्र देश या द्वयींत वरच्याप्रमाणे साम्य असल्यामुळे व स्वतंत्र देशांतील सुखांचा अनुभव मानवी देहाला प्रत्यक्ष येथे घेतां येत असल्याकारणाने स्वर्गापेक्षा स्वतंत्र जन्मभूमि गरीयसी म्हणजे श्रेष्ठ आहे. पण जरकरिता जन्मभूमीच्या मानेवर पारतंत्र्याचें जड जोखड बसलें असेल, तर मात्र सर्व प्रकार विपरीत होऊन जातो. ज्याप्रमाणे स्वतंत्र जन्मभूमि स्वर्गाहून श्रेष्ठ आहे त्याप्रमाणे परतंत्र जन्मभूमि पातालाहून कमी दर्जाची आहे. परतंत्र देशांतील वास्तव्यापेक्षा पातालवास शतपटींनी जास्त बरा होय. पंत देखील असें म्हणतात की, "फारच बरी निरयगती परवशता शतगुणे करी जाच" हें पंतांचें मत अक्षरशः खरें आहे. तरी पण या ठिकाणीं एक गोष्ट नीट लक्षांत धरली पाहिजे की, पातालाचा स्वर्ग कधीहि होऊं शकत नाही. पण परतंत्र जन्मभूमि स्वतंत्र होऊं शकेल. हें जर शक्य आहे, तर पारतंत्र्यामुळे पातालवजा बनलेल्या जन्मभूमीला स्वातंत्र्याच्या जोरावर स्वर्गाच्या पदवीला सहज नेतां येईल. कोणत्याहि परतंत्र देशांतील हतभागी लोकांना आपला जन्मदेश स्वातंत्र्यसंपन्न करतां येणें शक्य असल्यामुळे कांही काळ पातालाच्या दर्जाला पोहोचलेल्या जन्मभूमीची योग्यता सर्वांपेक्षा जास्त आहे. हरएक बाबतींत स्वर्गाची बरोबरी किंबहुना त्याच्यावर सरशी करणाऱ्या जन्मभूमीला सोडून कोणी कधीहि परदेशीं जाऊं नये हेंच सर्वतोपरी हितावह आहे. जी कांही वेडीवाकडी स्थिति मायदेशांत प्राप्त झालेली असेल, तिच्यांत सुधारणा करण्याची प्रयत्नपूर्वक हाव धरून जन्मभूमीला कधीहि अंतर न देण्याचा निश्चय प्रत्येकाने केला पाहिजे.

वरील विचार सुचण्याचें कारण आमच्या देशबांधवांची ट्रान्सवालांत होणारी गांजणूक होय. ट्रान्सवालांत बोअर लढाई होण्यापूर्वी अदमासे १५ हजार हिंदी लोक होते. पण हल्ली त्यांची संख्या फारच कमी म्हणजे सहा हजारांपेक्षा कमी झाली आहे. थोड्याच वर्षांत ती या संख्येहूनहि पुष्कळ कमी होईल. ट्रान्सवालांत हिंदी लोकांचे हाल होण्याचें कारण ते तिकडे गेले म्हणून होय. जर हिंदुस्थानांतून निघून हिंदी लोकांनी ट्रान्सवालांत पाऊल ठेवलें नसतें, तर आज जो विलक्षण प्रश्न उपस्थित झाला आहे तो निःसंशय झाला नसता. कोणतेहि लोक स्वदेश सोडून परदेशीं गमन करतात याचें कारण स्वदेशांत पोट भरण्याची पंचाईत अथवा स्वदेशांत होणारा जुलूम होय. येथे दुसरें कारण संभवत नाही. कारण धर्मासाठी किंवा इतर कोणत्याहि गोष्टीसाठी ट्रान्सवालांतील हिंदी लोकांचा येथे छळ होत होता असें नाही. परकीय अमलामुळे जे सर्व हिंदी लोकांचें कमीजास्ती नुकसान झालें व होत आहे तेंच नुकसान ट्रान्सवालांतील हिंदी लोकांचें झालें व होत आहे. यापरती त्यांच्यावर विशेष मोठी धोंड येऊन पडली आहे असें नाही. हिंदुस्थानांतून उठून आमचे देशबांधव ट्रान्सवालांत

कां गेले, त्याचें आम्हांस राहून राहून आश्चर्य वाटत आहे. हिंदुस्थानांत पोटभर खावयास मिळत नाही म्हणून उदरभरणार्थ ते परदेशीं गेले असें म्हणावें, तर या म्हणण्यांतहि विशेष तथ्य नाही. ट्रान्सवालांतील सहा हजार लोकांचें पोट हिंदुस्थानांत भरणार नाही असें आमचें मन तरी आम्हांस सांगत नाही. जेथे तीस कोटि लोक जगतात तेथे आणखी सहा हजारांची भर पडली म्हणजे सर्वांची अन्नान्नदशा होईल अशांतली गोष्ट नाही. भरतभूमीच्या शरीरांतून परदेशी मालाच्या द्वारा जो द्रव्याचा ओघ परदेशीं वाहत आहे त्याला अडविण्याकरिता जर स्वदेशीची ताल बांधण्यांत आली, तर अशा तालीमुळे द्रव्यरूपी पाण्याचें एवढें मोठें अगडबंब तळें साचेल की, त्यांतील पाण्याने ३० नव्हे तर ३३ कोटि हिंदी लोकांची क्षुधेची तहान भागून जाईल.

ज्या देशांत धान्याचा तुटवडा असेल अशा देशांतील लोकांनी पाहिजे तर क्षुधाशमनार्थ परदेशीं गमन करावें; पण जेथे धान्याचा पुरवठा मनमुराद आहे तेथील लोकांनी परदेशीं जाऊन लाथा खात बसण्यांत अर्थ नाही. मायदेशांत असलेल्या संपत्तींत भर टाकण्याकरिता एक वेळ परदेशीं गेलेले चालेल व असें करण्यास एका गोष्टीची अत्यंत जरुरी आहे. त्यांनीच फक्त परदेशीं गमन करावें की, ज्यांचा मायदेश स्वतंत्र आहे. स्वतंत्रतेशिवाय हातीं सत्ता नसते व सत्तेशिवाय परदेशीं कुत्राहि पुसत नाही. आमच्या म्हणण्याची प्रचीती पाहणें असल्यास आमच्याच देशबांधवांची ट्रान्सवालांतील स्थिति पाहा. कोण त्यांचे हाल! बदमाशांप्रमाणे हातांच्या बोटांचे ठसे द्यावे लागतात. रक्तपिती भरलेल्या माणसांप्रमाणे गावाच्या बाहेर लांब दूर राहवें लागतें. ट्रामगाडींत बसतां येत नाही. फुटपाथवरून चालतां येत नाही. ट्रान्सवालांतील हिंदी लोकांची इतकी दुःसह स्थिति कां बरें झाली आहे? आमच्या मताने याचें कारण एकच आहे व तें हें की, त्यांना स्वतंत्र देशबांधवांचा पाठिंबा नाही. नेहमी असेंच असतें की, जे परदेशीं जातात त्यांची संख्या अल्प असते. अशा लोकांना त्यांच्या देशबांधवांकडून साहाय्य मिळालें पाहिजे. नाही तर परदेशीं गेलेल्या हतभाग्यांचे हाल कुत्रा देखील खाणार नाही. ट्रान्सवालांत गेलेल्या हिंदी लोकांनी वरील विचार केला नाही म्हणूनच त्यांना सध्याची स्थिति प्राप्त झालेली आहे. आपण ब्रिटिश प्रजाजन आहोंत म्हणून आपल्या हक्कांचें संरक्षण परदेशी इंग्रज लोकांकडून करण्यांत येईल अशी बावळी आशा ट्रान्सवालांतील हिंदी लोकांना वाटत आहे. पण त्या दुधखुळ्यांच्या लक्षांत ती गोष्ट आली नाही की, "जाळावांचून कढ येईना, मायेवांचून कोण रडतें!" ब्रिटिश सरकारकडून त्यांना मदत केव्हाच मिळाली असती; पण तसें होण्यास त्यांच्या कातड्याचा रंग पांढरा असला पाहिजे होता. काळ्या कातडीचे वसाहतवाले व गोऱ्या कातडीचें सरकार हा विजोड आहे. अशा विजोडापासून कधीहि कार्यनिष्पत्ति होऊं शकणार नाही. आपल्या गोऱ्या देशबांधवांच्या हक्कांच्या रक्षणार्थ ब्रिटिश सरकारने बोअर लोकांशीं युद्ध केलें, पण

तेच हिंदी लोकांच्या नैसर्गिक हक्कांच्या संरक्षणाचा प्रश्न उपस्थित झाल्याबरोबर तेंच सरकार वसाहतीच्या सरकारकडे बोट दाखवीत आहे. हल्लीच्या प्रसंगीं जर हिंदी लोक स्वतंत्र असते, तर दुसरें बोअर युद्ध खास जुंपलें असतें. आपल्या देशबांधवांचे ट्रान्सवालांत हाल चाललेले पाहून जें तीव्र दुःख हिंदी लोकांना होत आहे त्यांच्या शतांशानेहि दुःख इंग्रज लोकांना होत नाही; आणि ते कां व्हावें? इंग्रज लोक माणसें आहेत म्हणून मानवी स्वभावाप्रमाणे त्यांचें वर्तन घडत आहे. आपल्याला सर्व शक्तिमान सरकारचा पाठिंबा नाही व देशबांधव तर पुरे दुर्बल आहेत अशा कठीण प्रसंगीं खरा शहाणपणाचा मार्ग म्हटला म्हणजे स्वदेशीं परत येणें हा होय.

आजपर्यंत ट्रान्सवालांतील हिंदी लोक अडीच हजार वेळा तुरुंगांत गेले, पण त्याचा उपयोग कोणता झाला म्हणाल, तर त्यांच्या शिक्षेचें प्रमाण वाढत चाललें व तुरुंगांत त्यांना जास्त जाच होऊं लागला. आपल्याला मदत मिळावी म्हणून त्यांनी आपला एक प्रतिनिधि हिंदुस्थानांत पाठविला आहे. आता कदाचित् हिंदुस्थानच्या निरनिराळ्या शहरीं टोलेजंग सभा भरविण्यांत येऊन, त्यांत निषेधप्रदर्शक ठराव पसार करण्यांत येतील. पण हे निर्बल ठराव कोणती मदत करूं शकतील हें एका परमेश्वरालाच माहीत होय. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जरी सर्वांनी एकच आरडाओरडा सुरू केला, तरी जोंपर्यंत या आरडाओरडीला तोफांच्या आवाजाचा पाठिंबा मिळणार नाही तोंपर्यंत हिंदी लोकांची आरडाओरड फाल्गुन महिन्यांतील मुलांच्या शंखनादाप्रमाणे निष्फळ होईल. ट्रान्सवालांतील हिंदी लोकांनो, तुम्हांला कोणाचा पाठिंबा आहे म्हणून तुम्हीं बोअर सरकारशीं झगडा करण्याचा उपक्रम केला आहे? आजपर्यंत तुमच्यांतील पुढारी पुष्कळ वेळा तुरुंगांत गेले, पण त्याच्या योगाने बोअर सरकार कितीसें वंगलें आहे. अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करून तुम्ही तुरुंगांत जातां ना? तर बोअर सरकार असें म्हणेल की, तुम्ही खुशाल जा. हल्ली देण्यांत येणाऱ्या शिक्षेपेक्षा जर जास्त शिक्षा देण्यांत आल्या, तर त्यापासून सार्वजनिक फायदा न होतां तुरुंगांत जाणाऱ्या व्यक्तीचे शारीरिक हाल मात्र होतील. म्हणून आमची ट्रान्सवालांतील हिंदी लोकांना अशी विनंती आहे की, अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गाचा त्याग करून शक्य असल्यास दुसरे उपाय करावेत. बोअर सरकारला अर्ज करून तें सरकार ऐकत नाही व सार्वभौम इंग्रज सरकार तिकडे दुर्लक्ष करीत आहे. अर्ज करून कार्यसिद्धि होत नाही व अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गानें बोअर सरकार अल्पहि प्रमाणाने माघार घेत नाही. अशा कैचींत तिसरा उपाय आम्हांस सुचतो तो असा की, सर्वांनी ट्रान्सवाल सोडून एकदम मायदेशीं परत यावें. येथे सर्वांची सोय होईल. स्वार्थाला सदा टपलेले गोरे लोक काळ्या हिंदी लोकांची संख्या ट्रान्सवालांत वाढू देणार नाहीत व आपल्या पोळीवरचें तूप कमी होऊं देणार नाहीत. बोअर लोकांच्या हृदयांत जितकी स्वार्थबुद्धि आहे तितकीच त्यांच्या मनगटांत शक्ति आहे. त्यांच्या ठिकाणीं वरील दोन्ही गोष्टी

असल्याकारणाने हिंदी लोकांची ट्रान्सवालांत स्थिति सुधारेल अशी आशा करणें व्यर्थ आहे. म्हणून पुनरपि एकवार आमच्या ट्रान्सवालांतील हिंदी लोकांना आम्ही असा आग्रह करतों की, "बांधवहो, परत मायदेशीं या" आपण हिंदुस्थानच्या सीमेच्या बाहेर जाऊं. पण तें केव्हा म्हणाल, तर ज्या वेळीं हिंदुस्थानला इंग्लंडसारखी राजकीय स्थिति प्राप्त होईल तेव्हा. तोंपर्यंत आपण बरे व आपले हिंदुस्थान बरे! हल्लीच आपली येथील स्थिति काय थोडी शोचनीय आहे, की तींत परदेशीं जाऊन आणखी भर घालावयाची आवश्यकता आहे? सध्या आपलें नशीब लंगडें आहे तोंपर्यंत आपण हिंदुस्थानांतच राहूं या. आपल्या नशिबाला पाय फुटले म्हणजे मग काय तो आपण पुढचा विचार करूं.

— भाला, दि. २१ सप्टेंबर १९०९

---

## ४५. मोरया व दुल्ला

हिंदु समाजाकडे नजर फेंकली तर आम्हांस मोठ्या कष्टाने असें म्हणावें लागतें की, त्या समाजाची अवनति हरएक बाजूने झालेली आहे. ती सार्वत्रिक अवनति केव्हापासून व कां सुरू झाली आहे, याची चर्चा करीत बसण्याचा हा प्रसंग नाही. सर्वसंमत गोष्ट ही आहे की, राजकीय बाबतीप्रमाणे धार्मिक, सामाजिक व औद्योगिक बाबतींतहि हिंदु समाज अवनतीच्या दरींत घरंगळत जात चालला आहे. जर वेळींच त्याला सावरून धरण्याचा प्रयत्न मनोभावें करण्यांत आला नाही, तर तो कालेंकरून अवनतीच्या दरीच्या तळावर जाऊन आपटल्याशिवाय राहणार नाही. राजकीय बाबतींत हिंदु लोक सावध झाले आहेत असें म्हणावयास हरकत नाही. इंग्रज सरकारने दिलेल्या पाश्चिमात्य शिक्षणाच्या प्रभावाने त्यांच्या अंतःकरणांत एकराष्ट्रीयत्वाची कल्पना प्रादुर्भूत होऊं लागली आहे. त्या कल्पनेच्या प्रभेने त्यांना खऱ्या आत्महिताच्या गोष्टी स्पष्ट दिसूं लागल्या आहेत. देशाभिमानाचा वारा भरतभूमीच्या सपाटीवरून इतस्तः संचार करूं लागला आहे व त्यामुळे हिंदी लोकांच्या गुदमरलेल्या अंतःकरणांत किंचित् आराम वाटूं लागला आहे. भविष्य करणें हें नेहमी धोक्याचें आहे. तरी पण आम्हांस असें वाटतें की, हिंदी लोकांच्या हातांत वसाहतीच्या स्वराज्याचा प्रसाद ठेवल्याशिवाय विसावें शतक अंतर्धान पावणार नाही. यासाठी राजकीय बाबतींत काळजी वाहण्यासारखें आता कांही एक उरलें नाही. खुळचा व माथेफिरू लोकांनी केलेल्या अत्याचारामुळे सरकारचें डोकें भणाणून ते दडपशाहीचे उपाय अमलांत आणण्याच्या पंथाला लागले आहेत.

ह्या अनिष्टामुळे फक्त हिंदूनीच नव्हे, तर सर्व हिंदी लोकांनी चालविलेली चळवळ उलथून पडेल अशी भीति बाळगण्याचें कांही एक कारण नाही. असें म्हणतात की, जों जों वादळ जास्त होतें तों तों ओक नांवाच्या झाडाचीं मुळें जमिनींत जास्त जास्त खोल जातात. वरचा नैसर्गिक नियम राजकीय चळवळींनाहि लागू पडतो. न्यायाच्या, नीतीच्या व देशभक्तीच्या पायावर चालू असलेल्या चळवळी कोणत्याहि प्रतिकूल प्रसंगांत तग धरून राहतात. थोडासा अनुकूल वारा सुटूं लागल्याबरोबर त्या पुनरपि पहिल्याच्या दुप्पट जोराने फोफावूं लागतात.

हिंदी लोकांनी चालविलेल्या स्वराज्यप्राप्तीच्या चळवळीची इमारत न्यायाच्या व देशभक्तीच्या पायावर उभारलेली असल्यामुळे तिचा पाया इतका खंबीर आहे की, तो कोणत्याहि आघाताने डळमळावयाचा नाही. असो; राजकीय चळवळी-संबंधाने चर्चा करण्याचा उद्देश आजच्या लेखाचा नाही. आज आम्हांस जें कांही लिहावयाचें आहे तें हिंदी लोकांच्या नव्हे, तर हिंदु लोकांच्या धार्मिक अवनती-संबंधाने होय. हिंदु लोकांना इतर बाबतींत कितीहि दूषणें देतां आलीं तरी धार्मिक बाबतींत त्यांना नांवें ठेवण्यास यत्किंचितहि जागा नाही, असें पुष्कळ लोकांचें मत आहे. हें मत सर्वांशीं जरी नाही तरी बहुतांशीं चुकीचें आहे. हिंदु लोक जात्या धार्मिक आहेत ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. पण आम्हांस लिहिण्यास अत्यंत वाईट वाटतें की, पारतंत्र्यामुळे हिंदु लोकांत एक दुर्गुण शिरला आहे. तो दुर्गुण त्यांच्या ठिकाणीं मोंगलाईंत होता व हल्ली इंग्रजाईंतहि तो त्यांच्यांत आहे. तो दुर्गुण म्हटला म्हणजे लोकधार्जिणेपणा हा होय. हिंदु लोकांनी असेंच वागावयाचें की, ज्याच्यापासून त्यांचा नव्हे, तर इतरांचा नफा व्हावयाचा. धर्मासारखी अत्यंत महत्त्वाची व आवडीची बाब घ्या. त्यांत सुद्धा हिंदु लोकांकडे पाहिलें असतां आनंद मानण्या-सारखें कांही नाही. हिंदूंच्या वांट्याला हिंदु धर्मासारखा देवताप्रचुर धर्म आला आहे. तरी सुद्धा त्यांची इतर धर्माकडे धांव आहे ती आहेच. दुसऱ्या धर्माचे लोक हिंदु धर्माकडे ढुंकून सुद्धा पाहत नाहीत. पण हिंदु लोकांकडे पाहिलें म्हणजे विपरीत प्रकार दृष्टीस पडतो. मोहरम आला की हिंदु लोक त्यांत नाचावयास एका पायावर तयार व ख्रिस्तमस आला की ख्रिश्चन लोकांप्रमाणे तो सण साजरा करण्यास हिंदु लोकांची पूर्ण तयारी असते. या लोकधार्जिणेपणाचा दुर्गुण नुसत्या धर्माच्या बाब-तींतच नसून, तो इतर बाबतींतहि आहे. वरील दुर्गुण हिंदु लोकांत कसा शिरला याचें कारण जर शोधूं गेलें तर असें म्हणावें लागतें की, या दुर्गुणाचें कारण त्यांच्या वांट्यास फार दिवसांपासून आलेली परतंत्रता होय. मोहरमांत हिंदूंना भाग घेणें परिस्थितीमुळे आवश्यक झालें असें कांही लोकांचें म्हणणें आहे. जिकडे-तिकडे यावनी अंमल सुरू असल्यामुळे मोहरमचा सण चौदाव्या, पंधराव्या, सोळाव्या व सतराव्या शतकांत हिंदुस्थानांत जिकडे-तिकडे गाजत होता. ठिकठिकाणच्या बादशहांना खूष करण्याकरिता ठिकठिकाणचे हिंदु लोक त्या सणांत सामील झाले.

आम्ही हें म्हणणें खरें आहे असें घटकाभर धरून चालतों. पण परिस्थिति बदलल्यावर तरी हिंदूंनी या इस्लामी सणांतून आपलें अंग काढून घ्यावयास पाहिजे होतें की नाही? मोंगलाई नामशेष होऊन मराठेशाही स्थापन झाल्यावर मग हिंदूंना या सणांत पडण्याची कोणती जरुरी होती? स्वतःचें राज्य व स्वतःचा धर्म असल्यावर परधर्मावर हिंदु लोक एवढे फिदा कशाकरिता झाले बरें?

श्रीछत्रपति शाहूमहाराजांच्या अमदानींत व श्रीमंत पेशवे सरकारच्या राजवटींत सातारा येथे व पुणें मुक्कामीं जर हिंदूंनी मोहरमचा सण साजरा केला नसता, तर त्या अक्षम्य अपराधाबद्दल त्यांचीं डोकीं उडविण्यास एखादा सुलतान त्या ठिकाणीं नव्हता ना! किंवा हल्ली जर हिंदूंनी मोहरमचा सण न केला, तर त्यांना शासन होण्याची भीति नाही ना! तर मग हिंदु लोक मोहरमच्या सणांत फकीर बनून 'दुल्ला हैदोस' कां म्हणून करतात? धर्माभिमानासाठी गाजलेल्या पुणें शहराकडे मोहरमच्या दहा दिवसांत पाहिलें तर असें दिसून येतें की, येथील टोलेजंग उत्सव मुसलमानांऐवजीं हिंदूंकडून साजरा करण्यांत येतो. पुणें शहरांत जवळ जवळ शंभर ताबूत होतात, पण त्यांपैकी निम्मेच्यावर ताबूत हिंदूंकडून बसविण्यांत येतात. मोहरमच्या दहा दिवसांत ब्राह्मणांशिवाय असें एकहि इतर जातीचें हिंदु कुटुंब सापडावयाचें नाही, की ज्या कुटुंबांत एक तरी लहान पोर फकीर बनलें नाही व एका तरी बाईने घोडेपिरावर रेवडचा उधळल्या नाहीत.

हल्ली पुण्यांतील गणपति-उत्सव आज बारा वर्षांच्यावर पाहत आहोंत. कसब्याच्या गणपतीसारखें पुण्यांत दुसरें दैवत नाही. त्या गणपतीची पालखी मिरवत चालली म्हणजे कोठे एखाद-दुसरा बत्तासा चुकूनमाकून त्याच्यावर येऊन पडतो. पण तोच नानाच्या घोडेपिराचा ताबूत रस्त्याने चालला की त्याच्यावर दोहो बाजूंनी रेवड्यांचा वर्षाव एकसारखा चाललेला असतो. आश्चर्याची गोष्ट ही की, ह्या रेवडचा हिंदु पुरुषांकडून व हिंदु बायकांकडून फेकण्यांत येतात. कसब्याच्या गणपतीची पालखी पाहिल्यावर जें प्रेम हिंदु लोकांच्या अंतःकरणांत उचंबळत नाही त्याच्या शंभरपटींनी प्रेम नानाचा घोडेपीर पाहिल्याबरोबर त्याच लोकांच्या अंतःकरणांत उचंबळूं लागतें. कत्तलच्या रात्रीच्या दिवशीं तर नानाच्या घोडेपिरापुढील देखावा मनाला थक्क करून सोडणारा आहे. ज्या दिवशीं रात्रीं हिंदूंना घराच्या बाहेर पडण्याची वास्तविक रीतीने जरुरी नाही त्या रात्रीं प्रत्येक हिंदु घोडेपिराला हटकून जाऊन यावयाचाच. मोहरमच्या दिवसांत इतर ठिकाणचे हिंदु लोक कशा तऱ्हेने वागतात याची आम्हांस प्रत्यक्ष माहिती नाही; परंतु ऐकीव माहितीवरून इतर ठिकाणींहि पुण्यांतील प्रकाराची आवृत्ति घडून येत असावी असा आमचा अंदाज आहे. हिंदु लोक मोहरमच्या सणांत मिसळतात म्हणून गणपतीच्या उत्सवांत मुसलमान लोक मिरवत असतील असें मात्र नाही. कोणताहि मुसलमान एखाद्या गणपतीच्या दर्शनाला गेला आहे व त्याने एखाद्या गणपतीवर

वत्तासे उधळले आहेत असें आम्हीं प्रत्यक्ष पाहिलेलें नाही किंवा कानांनी ऐकलेलें नाही. निर्लज्ज हिंदूंना एवढा तरी अभिमान असावयास पाहिजे होता की, जे मुसलमान आपल्याशीं इतकें फटकून वागतात त्यांच्याशीं आपणहि तितकेंच फटकून वागावें. का हिंदु धर्मांत देवांचा तुटवडा आहे व गणपतीच्या उत्सवांत दहा दिवस नाचावयास सापडत नाही? का हिंदु धर्मांत आणखी इतर शेकडो उत्सव नाहीत, की हिंदूंनी धर्माभिमानाला पायाखाली तुडवून मुसलमानांच्या मोहरमच्या सणांत नाचलेंच पाहिजे? बा हिंदूंनो, जर हिंदु धर्मांत मोहरमच्या सणासारख्या सणाची उणीव असली, तर तुम्ही तसा एखादा उत्सव नवीन सुरू करा. पण तो हिंदु देवतेच्या नांवाने सुरू करा व त्यांत वाटतील ते नाना प्रकारचे ढंग करा. नाचण्याबागडण्याची तुमची हौस एका गणपति-उत्सवाने पुरी होत नसली, तर दहा-दहा दिवस लांबणारे उत्सव वर्षांतून तुम्ही चार करा. त्यांत मनसोक्त नाचा व बागडा. पण हिंदूंनो, ते हिंदु देवतांच्या नांवाने करा. हिंदूंनी मुसलमानांच्या उत्सवांत सामील व्हावें ही गोष्ट कोणत्याहि दृष्टीने संमत नाही.

परधर्मीय देवतांना भजणें व परधर्मीयांच्या उत्सवांत सामील होणें म्हणजे अप्रत्यक्ष रीतीने स्वधर्मीय देवतांचा उपमर्द करणें होय. ज्या हिंदूने फकीर बनून गळयांत नाडा घातला त्याने अप्रत्यक्ष रीतीने हिंदु धर्माच्या गळयाला नाडा बांधला असेंच म्हटलें पाहिजे. आम्हांस या ठिकाणीं एक जबर शंका उत्पन्न झाली आहे. ती ही की, हिंदु मुलें फकीर बनविण्यांत कां येतात? त्यांना फकीर बनविण्यांत आलें म्हणजे तीं प्रौढ वयांत अमीरउमराव खात्रीने बनतात किंवा तीं दीर्घायुषी हटकून होतात! आमच्या अनुभवास यांपैकी एकहि गोष्ट आलेली नाही. असें जर आहे, तर मग निष्कारण हिंदूंनी गळयांत नाडा घालावा त्यापरता मूर्खपणा व धर्मलंडपणा दुसरा कोणताहि नाही. परधर्मीयांच्या देवतांना भजण्याची व त्यांच्या उत्सवांत सामील होण्याची सवय एकदा अंगीं मुरली म्हणजे ती एकाएकी निघत नाही व तशी स्थिति एकदा घडून आली म्हणजे स्वधर्मावरील श्रद्धेला धक्का बसल्यावांचून राहत नाही.

हिंदु लोकांची वागणूक अलीकडे विचित्र व विलक्षण झाली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज व तुकारामबुवा यांच्या पालख्या ज्येष्ठमासीं पंढरीला जावयास निघाल्या की गळयांत तुळशीच्या माळा लटकावून व हातांत टाळ घेऊन मुखावाटे 'ज्ञानोबा तुकाराम' म्हणत हिंदु लोक भजन करण्यास तयार. भाद्रपद महिन्यांत श्रीगणपति उत्सव आला की मेळे काढून 'मोरया मोरया' अशी गर्जना करण्यास हे लोक तत्पर. पुढे पौष मासीं मोहरम आला की फकीर बनून व गळयांत नाडे घालून 'दुल्ला हैदोस' करण्यास याच मंडळीचा पुढे पाय! हें विलक्षण वागणें अवलोकन केलें म्हणजे अशा हिंदु लोकांना कशाची उपमा द्यावी हें आम्हांस कळत नाही. धर्माच्या दृष्टीने हा प्रकार चांगला नाही. तो हटकून अहितकारक आहे. या प्रकाराला वेळींच

आळा न बसला, तर हल्लीच्या धर्मलंडपणाच्या दिवसांत त्याचें भलतेंच रूपांतर होऊन हिंदु धर्मावर भलतेंच संकट ओढवण्याचा संभव आहे. परधर्मीय उत्सवापासून हिंदूंना परावृत्त करण्यास अनेक उपाय आहेत; पण ते सर्वच येथे सांगण्याची जरुरी नाही. हल्ली प्रत्येक जातीची व पोट-जातीची एकेक परिषद निर्माण झाली आहे. या परिषदेने हा प्रश्न हातीं घेऊन त्याची योग्य तजवीज लावावी. या ठिकाणीं आम्हांस लिहिण्यास आनंद वाटतो की, वरील दोषापासून ब्राह्मण जात अलिप्त आहे. गेल्या मोहरमांत एकहि नाडेवाला ब्राह्मण किंवा त्याचे नाडेवाले पोर आमच्या दृष्टीस पडलें नाही. ब्राह्मणाचें पोर फकीर केलें जात नाही व ब्राह्मणेतराचें पोर फकीर केलें जातें. याचें कारण ब्राह्मणांच्या हृदयांत हिंदु धर्माबद्दल वसत आलेलें प्रेम व आदर ब्राह्मणेतरांच्या हृदयांत वसत नाही. हल्ली ब्राह्मणेतरांची खटपट ब्राह्मणांची बरोबरी किंबहुना त्यांच्यावर सरशी करण्याकडे चालली आहे. आम्हांस ही गोष्ट संमत आहे. ब्राह्मणांचे तीन गुण जर ब्राह्मणेतरांनी आपल्या अंगीं आणले तर त्यापासून ब्राह्मणांचें नुकसान न होतां राष्ट्राचा नफाच होईल. नुसता ब्राह्मणांच्या नांवाने शंख करण्यांत अर्थ नाही. आपल्या अंगीं असलेल्या दोषांचें निरीक्षण करून ते घालविण्याचा प्रयत्न जर ब्राह्मणेतर करतील तरच त्यापासून त्यांचा खरा नफा आहे. हिंदु धर्म हा तर एकट्या ब्राह्मणांचा नाही ना? तो ज्याप्रमाणे ब्राह्मणांचा आहे त्याचप्रमाणे तो ब्राह्मणेतरांचा आहे. असें जर आहे, तर त्या धर्माबद्दल ब्राह्मणेतरांनी आदर व आस्था बाळगावयास नको काय? "मी जर हिंदु, तर मग माझ्या किंवा माझ्या पोराच्या हातांत नाडा कां म्हणून," असा प्रश्न प्रत्येक ब्राह्मणेतराने स्वतःला किंवा स्वतःच्या पोराला मोहरमांत फकीर बनविण्याच्या वेळीं करावा व जर त्याचें उत्तर स्वतःला देतां आलें नाही, तर दुसऱ्या शहाण्या माणसाला विचारावें.

असो; निरनिराळ्या जातींनी खटपट करून सोडविण्यासारखा हा एक प्रश्न आहे. हा प्रश्न राजकीय नसून धार्मिक आहे. हा प्रश्न धार्मिक स्वरूपाचा असून, तो अगदी निरुपद्रवी स्वरूपाचा आहे. दुसऱ्या धर्मातील लोकांना हिंदु धर्मांत ओढून घेण्याचा हा प्रश्न नाही; तर हिंदु लोकांनी अन्यधर्मीय उत्सवांत न पडण्याचा हा प्रश्न आहे. कोणत्याहि दृष्टीने या प्रश्नाकडे पाहिलें, तर त्यांत आक्षेपार्ह असें कांही नाही, असें जर आहे, तर मग त्याकडे सर्वांचें लक्ष जाणें जरूर आहे. जर जातिजातींनी हा प्रश्न हातीं घेतला, तर त्यांना आस्तें आस्तें यश आल्यावांचून राहणार नाही. पुढल्याच वर्षीं हा अनिष्ट प्रकार एकदम बंद होईल असें आम्ही म्हणत नाही. पण निरनिराळ्या जातींच्या परिषदा मनोभावें खटपट करतील, तर त्यांच्या प्रयत्नाला कमीजास्त यश आल्यावांचून राहणार नाही. 'मोरया' व 'दुल्ला' या नांवाचा घोष व्हावा, पण तो योग्य रीतीने व्हावा. हिंदूंनी 'मोरया'चा घोष करावा व मुसलमानांनी 'दुल्ला'चा घोष करावा. पण

हिंदूंनी ‘दुल्ला दुल्ला’ म्हणावें हें मात्र आमच्या कानास गोड लागत नाही. या कामीं हिंदूंनी मुसलमानांपासून थोडीशी अक्कल शिकावी. जर मुसलमान ‘मोरया मोरया’ म्हणत नाहीत तर हिंदूंनी तरी ‘दुल्ला दुल्ला’ कां म्हणावें? असो; वारकरी पंथ हा धार्मिक पंथ आहे व त्या पंथाचे निरनिराळ्या जातींतील साधु गावोगावीं व गल्लोगल्ली पसरलेले आहेत. त्यांच्यापासून इतर प्रकारचा उपयोग नसला तरी, जर या कामीं त्यांचा उपयोग झाला, तर त्यांचे आम्ही मनापासून आभार मानूं.

भाला, दि. १ फेब्रुवारी १९१०

---

## ४६. भाल्याचें सहावें वर्ष

भाल्याचा जन्म शके १८२७ च्या चैत्र महिन्याच्या प्रतिपदेला झाला व आजच्या अंकाबरोबर त्याला पांच वर्षें पुरीं होणार आहेत. भाल्याचा जन्म ऐन धामधुमीच्या दिवसांत झाला असून, त्याच्या जन्माबरोबर जन्मास आलेली राजकीय धामधुम पांच वर्षांच्या अवधीनंतर शांत झाली नसून, ती निरनिराळ्या रूपांनी धुमाकूळ घालीत आहे. भाला जन्मास येऊन पुरे सात महिने लोटले नाहीत तोंच बंगालची फाळणी होऊन हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत व विशेषत: बंगाल्यांत जी दंगल उडून गेली, तिच्या तावडींत सर्वांच्या अगोदर भालाकार सापडून त्यांना १२ फेब्रुवारी सन १९०६ ते ११ ऑगस्ट १९०६ पर्यंत सहा महिने राजद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल कारागृहवास भोगावा लागला. यानंतर आजपर्यंत जगदंबेच्या कृपेने त्यांच्यावर कोणत्याहि प्रकारचा वाईट प्रसंग आला नाही. ह्याबद्दल ते त्या जगज्जननीचे अत्यंत आभारी आहेत. भाला जन्माला आला त्या वेळीं त्याचें जें राजकीय ध्येय व तें साध्य करून घेण्याचे जे मार्ग होते, तेंच ध्येय व तेच मार्ग हल्लीहि त्याला पूर्ण संमत आहेत. भाल्याचें राजकीय ध्येय हल्ली व पूर्वी हेंच होतें की, हिंदी लोकांना वसाहतीच्या स्वराज्याचे पूर्ण हक्क मिळावेत. निर्भेळ स्वातंत्र्याचें ध्येय भाल्याने पूर्वी कधीहि प्रतिपादिलें नाही व हल्लीहि तो तें प्रतिपादूं इच्छित नाही. निर्भेळ स्वातंत्र्याचें ध्येय हिंदी लोकांनी आपल्या डोळ्यापुढे ठेवावें किंवा नाही, हा प्रश्न उपस्थित होण्याची किंवा करण्याची ही वेळ नसून, ती वेळ वास्तविक रीतीने म्हटली म्हणजे स्वराज्यप्राप्तीनंतरची होय.

आज कशास कांही ठावठिकाण नसतां भलतेच नाजूक प्रश्न उपस्थित करून सरकारचें मन साशंकित करून घेण्यांत मुत्सद्देगिरी नाही, असें आमच्या अल्प मतीला वाटतें. चिरंजिवाच्या पुऱ्या बाराखड्या झाल्या नसतां त्याला आर्टस्

कॉलेजांत घालावयाचें किंवा सायन्स कॉलेजांत घालावयाचें याबद्दलचें त्याच्या आई-बापांतील भांडण ज्याप्रमाणे हास्यास्पद होय, त्याप्रमाणेच अजून कशास कांही थांग नसतां, वसाहतीचें स्वराज्य राजकीय ध्येय असावें किंवा निर्भेळ स्वातंत्र्य हें राजकीय ध्येय असावें, हा वादविवाद निष्फळ होय. राजकीय ध्येयें परिस्थितीप्रमाणे बदलत जातात, म्हणून तीं कायमचीं ठरविण्यांत शहाणपण नाही. आमच्या मताने राजकीय ध्येयें फार लांबचीं नसावींत व तीं अतिशय जवळचीं नसावींत, तीं दिसण्यास डोळे फाकण्यास लागावें, पण ते फाटण्याचा प्रसंग मात्र येतां कामा नये. शक्यता, इष्टता व सुरक्षितता या तीन प्रकारच्या दृष्टीने विचार केला म्हणजे वर्तमान परिस्थितींत 'वसाहतीचें स्वराज्य' हेंच श्रेयस्कर आहे व तेंच आम्ही आज पांच वर्षें आमच्या प्रिय वाचकांपुढे ठेवीत आलों आहोंत. आम्ही या ठिकाणीं असें सांगून ठेवतों की, वसाहतीचें स्वराज्य हें ध्येय डोळ्यापुढें ठेवल्याने कोणाचीहि दिशाभूल होण्याचा संभव नाही. ज्यांना निर्भेळ स्वातंत्र्याचा टप्पा गाठावयाचा आहे, त्यांना सुद्धा स्वराज्याच्या अलीकडच्या टप्प्यावरून गेलें पाहिजे. हा अलीकडचा टप्पा गाठल्यावर तेथेच थबकून राहवयाचें किंवा पुढे धूम ठोकावयाची, हा प्रश्न स्वराज्याच्या टप्प्यावर जाऊन पोहोचल्यानंतरचा आहे. म्हणून वसाहतीच्या स्वराज्याचें ध्येय कोणत्याहि दृष्टीने फारसें कमी दर्जाचें नाही. हें स्वराज्याचें ध्येय साध्य करून घेण्याच्या मार्गांपैकी अगदी शेवटचा मार्ग आमच्या मताने अप्रत्यक्ष ऊर्फ अशस्त्र प्रतिकाराचा होय. ह्याच्या पलीकडचा मार्ग आम्हांस बिलकुल पसंत नाही. एवढेंच नव्हे तर, तसल्या भलत्या-सलत्या मार्गापासून नफ्याऐवजीं नुकसानच जास्त होण्याचा संभव आहे. बहिष्कार, अशस्त्रप्रतिकार वगैरे कायदेशीर व त्याचप्रमाणे फायदेशीर मार्ग आम्हांस जितके पसंत आहेत, तितकाच अत्याचाराचा मार्ग आम्हांस नापसंत आहे. आमची अशी प्रामाणिक समजूत आहे की, नुसत्या एकटच्या बहिष्काराने आपला कार्यभाग सिद्धीस जाणार आहे.

बहिष्काराच्या भोपळ्यांचा आश्रय घेऊन आपणांस अवनतीच्या खाडींतून पैलतीरीं पोहन जातां येणें शक्य आहे. या ठिकाणीं आणखी एका मुद्द्याचा थोडासा विचार करणें जरूर आहे. कांहींकांची अशी समजूत होत चालली आहे की, हिंदुस्थानला जगांतील प्रमुख राष्ट्रांची बरोबरी कालत्रयींहि होणें शक्य नाही. फारच झालें तर, इंग्रज लोकांच्या मेहेरबानीने हिंदी लोकांना थोडेसें जास्त हक्क प्राप्त होतील. पण इंग्रज मनुष्याबरोबर हिंदी मनुष्याला समानत्वाचा हक्क प्राप्त होणें जवळ जवळ अशक्य आहे. परमेश्वरानेच मनावर घेतल्याशिवाय हिंदी लोकांची राजकीय स्थिति म्हणण्यासारखी सुधारावयाची नाही. यासाठी त्या परमेश्वराच्या दयालुत्वावर सर्वस्वीं भार टाकून हिंदी लोकांनी स्वस्थ बसावें व जें जें परमेश्वराच्या कृपेने घडून येईल किंवा इंग्रज सरकाराकडून देण्यांत येईल त्याचा स्वीकार करून त्यांतच आनंद मानून राहवें हा दैववाद एकपक्षीं बिनचूक आहेसा वाटतो.

तीस कोटि हिंदी लोकांमध्ये निरनिराळ्या प्रकारचे इतके दुर्गुण वसत आहेत की, सदैव दास्यांत राहण्यास पूर्णपणें पात्र असे लोक जगांत हल्ली कोणी असतील, तर ते हिंदी लोक होत. धर्मसंबंधाने कांही कांही विलक्षण व वेडगळ समजुती, कांही कांही घातूक सामाजिक रूढि, राजकीय शिक्षणाचा जवळ जवळ अभाव, एक-राष्ट्रियत्वाच्या कल्पनेचें ब्राह्मणवर्गाशिवाय इतर वर्गांमध्ये दिसून येणारें 'नास्तत्व', अल्पस्वल्प दीडदमडीच्या स्वार्थासाठी देशद्रोह करण्याची बहुतेकांच्या ठायीं दिसून येणारी आतुरता वगैरे अक्षम्य दुर्गुण दृष्टिगोचर झाले म्हणजे वरील निराशामय दैववाद सयुक्तिक आहे, असें एक वेळ मनास वाटतें. हिंदुस्थानच्या तरणोपायाची आशा नाही, असे उद्‌गार कानावर पडले म्हणजे अंतर्यामीं जरी दुःख झालें, तरी कांहीकांच्या मनांना त्यांची सत्यता पटून जाते. या निराशावादावर आमचें एवढेंच उत्तर आहे की, अशी निराशा उत्पन्न होणें हा व्यक्तिविषयक मनाचा कमकुवतपणा आहे. ज्यांचीं मनें स्वभावतः उतावीळ असतात त्यांना वरच्याप्रमाणे वाटणें साहजिक आहे. अशांनी एवढें लक्षांत धरावें की, "राष्ट्रें एकदम पडत नाहीत किंवा तीं एकदम चढत नाहीत." ज्याप्रमाणे अवनति हळूहळू होते त्याचप्रमाणे उन्नतीहि आस्ते आस्तेच होते. भरतभूमीची अवनति जर शंभर वर्षांची आहे, तर तिची उन्नति होण्यास निदान तितकींच वर्षें पाहिजेत. नेहमीचा नियम असा आहे की. अवनति होण्यास जितका काळ लागतो त्याच्या चौपट काळ उन्नति होण्यास लागतो. वैद्य लोक असे म्हणतात की, दुखणें हत्तीच्या पायाने येतें व तें मुंगीच्या पायाने जातें. आम्ही या म्हणींत थोडासा फरक करून असें म्हणतों की, राष्ट्राची अवनति विद्युत् वेगाने होते व त्याची उन्नति मात्र गोगलगाईच्या गतीने होते.

अलीकडे जपानची उन्नति ४० वर्षांच्या अवधींत झाल्याकारणाने वर्तमानपत्रें वाचणाऱ्या हिंदी लोकांचीं मनें हिंदुस्थानच्या उन्नतीबद्दल उतावीळ झालीं आहेत. त्यांना असें वाटतें की, जर जपानची उन्नति ४० वर्षांच्या अवधींत झाली, तर हिंदुस्थानची उन्नति तितक्याच काळांत होण्यास कोणती अडचण आहे ? पण अशा विचारसरणीने सिद्धान्त काढणारे लोक हा मुद्दा विसरतात की, ४० वर्षांत जपानची जी उन्नति झाली त्याचें कारण जपान स्वतंत्र आहे व एका शतकांत हिंदुस्थानची उन्नति होत आहे, याचें कारण हिंदुस्थान परतंत्र आहे. परतंत्र राष्ट्राची उन्नति वायुवेगाने होत नसून, ती गोगलगाईच्या गतीने होत असते हें कोणींहि विसरूं नये. परतंत्र राष्ट्राची उन्नति होण्यास वेळ लागतो, पण हेंहि त्याबरोबर त्यांनी लक्षांत धरावें की, एकराष्ट्रियत्वाची कल्पना प्रादुर्भूत झाल्यास अशा पतित व परतंत्र राष्ट्राची उन्नति उशिरा कां होईना, पण ती हटकून झालीच पाहिजे. ज्या पतित राष्ट्रांत ज्ञानरवीच्या प्रकाशाने एकराष्ट्रियत्वाच्या कल्पनेची प्रभा फाकूं लागण्यास सुरुवात होते, तें राष्ट्र कालेंकरून वैभवसंपन्न झालेंच पाहिजे. या दृष्टीने विचार केला म्हणजे नैराश्यवादाला मुळीच जागा उरत

नाही. जर १९ वें शतक भरतभूमीच्या अवनतीचें शतक होतें तर विसावें शतक तिच्या उन्नतीचें शतक निःसंशय होणार आहे.

सन १९०५ सालापासून व वंगभंगाच्या दिवसापासून हिंदुस्थानांतील अज्ञानाचाहि भंग होऊं लागला आहे व जहालपणा जन्मास आला आहे. जहालपणाचा जन्म म्हणजे हिंदुस्थानच्या भाग्याचा उदय होय. जसजसा जहालपणाचा प्रसार वाढत जाईल तसतसें हिंदुस्थानच्या भाग्याचें घनत्वहि वाढत जाईल. जहालपणाच्या वाढीवर हिंदुस्थानच्या उन्नतीची वाढ अवलंबून आहे. जहालपणाचा मुख्य जीवनरस ज्ञान होय. म्हणून हें ज्ञान वृद्धिंगत व विस्तृत होण्यास ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्या सर्व गोष्टी घडवून आणण्याचे प्रयत्न करण्यांत आले म्हणजे मग हिंदुस्थानच्या भावी स्थितीविषयी निराश होण्याचें कारण नाही. आम्ही आमच्या देशबांधवांना असें स्पष्ट सांगून ठेवतों की, निराश होण्याचें कांही एक कारण नाही. राष्ट्राची प्रगति दरवर्षी न मापतां तिचा आढावा दरपिढीला म्हणजे दर २५ वर्षांनी काढला पाहिजे. आम्हीं वरती लिहिलेंच आहे की, विसावें शतक हिंदुस्थानच्या भाग्याचें शतक आहे. या शतकांतील अवघीं ९ वर्षें गेलीं आहेत. अजून पहिल्या २५०० वर्षांतील १६ वर्षें जावयाचीं आहेत. १६ वर्षें गेल्यावर मग त्यांनी हिंदुस्थानच्या उन्नत्यवनतीच्या जमाखर्चाचा आढावा काढावा.आम्हांस तर असें वाटतें की, १९२५ अखेर जमेच्या बाजूला शंभरांतील २५ हून अधिक गुण निःसंशय पडतील. हिंदुस्थानला दरवर्षी एक एक गुण मिळून दोन हजार सनाच्या शेवटीं त्यांच्या जमेच्या बाजूला शंभराचा आकडा निःसंशय पडेल. आणखी ९१ वर्षांनी अशी स्थिति प्राप्त होण्यास हल्लीच्या ९१ पट जहालपणा वाढला पाहिजे. जहालपणा वाढण्यास राष्ट्रीय शिक्षण पाहिजे व तें शिक्षण आपल्या अल्प समजुतीप्रमाणे भाला गेलीं पांच वर्षें देत आला आहे व पुढेहि परिस्थितीप्रमाणे देण्याचा त्याचा संकल्प आहे. हल्ली राष्ट्रीय पत्रांवर मोठें संकट ओढवलें आहे. तें संकट कोणतें आहे हें आमच्या वाचकांना माहीत असल्यामुळे त्याचा पुनरुच्चार आम्ही करूं इच्छित नाही.

वर्तमानपत्रांची सर्व मदार त्यांच्या वर्गणीदारांवर असते. लोकांना राष्ट्रीय शिक्षण देण्याची जबाबदारी जर वर्तमानपत्रकर्त्यांवर आहे, तर अशा पत्रांना आश्रय देण्याची जबाबदारी लोकांवर आहे. दोघा पक्षांनी आपआपली जबाबदारी ओळखून जर आपआपला वर्तनक्रम ठेवला, तर त्यापासून उभयतांचें हित होणार आहे. पुढील सालांत भाल्याचें धोरण कसें राहणार आहे याचें दिग्दर्शन आम्हीं वरती केलेंच आहे. पुन्हा थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे भाल्याचें धोरण राष्ट्रीय ऊर्फ जहाल राहणार. भाल्यांत धार्मिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक व इतर हरएक विषयांवर त्याच्या समजुतीप्रमाणे व मताप्रमाणे लेख येतील. भाल्याला कोणाची प्रीति किंवा अप्रीति मुद्दाम व जाणूनबुजून संपादन करावयाची नाही. भाल्याचीं मतें हरएक बाबतींत जहालपक्षीय इतर पत्रांशीं जुळतील असें कांही नाही. यंदाच्या

वर्षापासून भाल्यांत थोडी थोडी वैद्यकीय माहिती येत जाईल. गरीब लोकांकरिता व आर्यवैद्यकाच्या उद्धाराच्या कामीं थोडासा हातभार लावण्याच्या हेतूने आम्ही 'भाला भेषजालय' या नांवाची संस्था काढली आहे. ही संस्था चालवीत असतांना आम्हांस जो आर्यवैद्यकाचा अनुभव येणार आहे, तो आम्ही आमच्या वाचकांना सादर करण्याचें योजिलें आहे. पुढील सालापासून भाल्याची वर्गणी टपालहशिला-सह दोन रुपये केल्यामुळे दरअंकीं आम्ही चित्रें देणार आहोंत. ऐतिहासिक गोष्टी चटकदार रीतीने देण्याचा प्रयत्नहि आम्ही पुढील सालापासून करणार आहोंत. सारांश, भाला हातीं आल्यानंतर एक तासभर ज्ञानभरीत करमणूक होईल. अशी व्यवस्था पुढील सालापासून करण्याचें आम्हीं योजिलें आहे. योजना व बेत करण्याचें काम आमचें आहे, पण तो तडीस नेण्याची शक्ति फक्त जगदंबेच्या हातीं आहे. त्या जगज्जननीच्या कृपेकरूनच सर्व गोष्टी होणाऱ्या आहेत. म्हणून त्यासंबंधानें जास्त लिहिण्यांत अर्थ नाही. असो; गेलीं पांच वर्षे महाराष्ट्रीय वाचक जसा भाल्यावर लोभ ठेवीत आले तसाच ते पुढेहि ठेवतील अशी आशा प्रगट करून व जिच्या कृपे-मुळेच भाला गेलीं पांच वर्षे सुरक्षितपणें चालला त्या जगज्जननी जगदंबेला नमन करून आम्ही हा लेख संपवितों.

—भाला, दि. २१ मार्च १९१०

---

## ४७. ऋषिप्रणित राजधर्म

अलीकडे हिंदुस्थानांत अराजक मतांचा व कृतीचा प्रादुर्भाव झाल्यापासून त्यांचीं कारणें शोधून काढण्याविषयी व त्यांचें उच्चाटन करण्याचे योग्य उपाय योजण्याविषयी पुष्कळ लोक आपआपल्या रीतीने खटपट करीत आहेत. राष्ट्रीय विचारांचा चोहोकडे फैलाव होत जाऊन, राष्ट्राच्या विचारसरणींत राष्ट्रहिताच्या दृष्टीने इष्ट व आवश्यक क्रांति घडून येण्याचा सुयोग प्राप्त झाला असतां, कांही अविचारी माथेफिरू व अपनीत बुद्धीच्या लोकांच्या आतताई कृत्यामुळे राष्ट्रोन्नतीच्या भट्टींत मिठाचा खडा पडल्यासारखा व्हावा, ही खरोखर अत्यंत शोचनीय गोष्ट होय. अराजकत्व मग तें हिंदुस्थानांत उद्भवो किंवा रशियांत उत्पन्न होवो, राष्ट्राच्या भावी कल्याणाचा विघात केल्यावांचून कधीहि राहत नाही. मनुष्याची पूर्ण वाढ होण्यास ज्याप्रमाणे त्याचें शरीर रोगमुक्त असावें लागतें त्याचप्रमाणे राष्ट्राचा विकास होण्यास त्यांत शांतता नांदून तें अराजकत्वाच्या महाव्याधीपासून अलिप्त असावे लागतें. मनुष्याप्रमाणेच राष्ट्रालाहि अंतःजन्य उष्णतेची आवश्यकता आहे; परंतु व्यायामादि कारणांनी उत्पन्न न होतां तापामुळे वाढलेली उष्णता जशी

मनुष्याचें शरीर कृश व निःसत्त्व केल्याशिवाय राहत नाही तशीच अराजकपणाची; कृत्रिमपणाची उष्णता कालेंकरून राष्ट्रपुरुषाचा देह करपवून टाकण्यास कमी करणार नाही. सारांश, विध्वंसकपंथीय लोकांचे अत्याचार हरएक दृष्टीने अनिष्ट असल्याकारणाने त्यांच्याविषयीं श्रीशंकराचार्यांसारख्या जगद्वंद्य धर्मगुरूपासून तों नुकतीच रावबहादुराची पदवी मिळालेल्या इसमापर्यंत सर्व सूज्ञ व समंजस माणसांनी आपला कळकळीचा निषेध व्यक्त करावा हें यथायोग्य आहे. तथापि तो प्रदर्शित करतांना कित्येकांनी वाहत्या गंगेंत हात धुवून घेऊन राष्ट्रीय पक्षावर शिव्याशापांचा जो वेलभंडारा उधळला आहे त्याविषयी सर्वांचें मतैक्य होईल असें मात्र नाही.

सध्या राष्ट्रीय पक्षाची स्थिति "चुकला-माकला घाव ऐरणीच्या माथीं" या म्हणीप्रमाणे झाली आहे. राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने गालीप्रदान करणें हा राजनिष्ठा दर्शविण्याचा एक राजमान्य मार्गच होऊन बसला आहे. त्या कामीं कांही जणांमध्ये प्रचंड अहमहमिका लागलेली देशाच्या दुर्दैवाने दृष्टोपत्तीस येत आहे. कायदेशीर मार्गांचा अवलंब करून मायदेशाची प्रगति करण्याबद्दल राष्ट्रीयांनी अनेक वेळा स्पष्ट उद्गार काढलेले असतांना व अराजकत्वास प्रवृत्त झालेल्या तरुणांच्या घोर कृत्याचा त्यांनी – मवाळांनी – किंबहुना खुद्द अधिकाऱ्यांनी केला नसेल इतका; अतःकरणपूर्वक निषेध केला असतांनाहि सर्व दोषाचें खापर त्यांच्या माथ्यावर फोडलें जावें हें त्यांच्या खडतर नशिबाचें व त्याबरोबरच तत्प्रतिपक्षीयांच्या तिर्यग्बुद्धीचें निदर्शन नव्हे काय? तसेंच ही संधि साधून कित्येकांनी लोकांना प्रजेचे धर्म शिकविण्याचाहि प्रयत्न केलेला आहे. हिंदुस्थानसारख्या शिक्षणाच्या बाबतींत मागासलेल्या देशांतील बहुजन समाजाला वेळोवेळीं 'प्रजाधर्म' शिकविला जाऊन तद्द्वारा शासित-शास्त्यांत सख्य जोडलें जावें याबद्दल कोणाचाहि मतभेद असू शकणार नाही. हिंदी लोकांना शिक्षणाची अत्यंत जरुरी असल्यामुळे त्याचें एक प्रमुख अंग जें 'प्रजेचीं कर्तव्यें' हीं मूढ समाजाच्या मनांत ठसविण्याचे प्रयत्न केव्हाहि प्रशंसनीयच असणार. पण प्रजेच्या कर्तव्याबरोबर 'राजाची कर्तव्यें' हि सांगण्याचें जर त्यांनी धाडस केलें असतें, तर खात्रीने तें अधिक स्तुत्य झाले असतें. आजकाल हिंदुस्थानला जर कशाची अधिक आवश्यकता असेल, तर ती प्रजेच्या कर्तव्याबरोबरच राज्यकर्त्यांची कर्तव्यें सांगणाऱ्या इसमाचीच आहे. या दोन प्रकारांच्या कर्तव्यांपैकी पहिल्या प्रकारचीं कर्तव्यें आमच्या कांही देशबंधूंनी अगोदरच सांगून ठेवलीं असल्यामुळे दुसऱ्या प्रकरणाचें दिग्दर्शन करून विवेचन करण्याचें आज आम्हीं योजिले आहे.

परंतु तसें करण्यापूर्वी एक सूचना करून ठेवणें आमच्या मतें जरूर आहे. ती ही की, आजच्या लेखांत आम्ही जीं राजांचीं कर्तव्यें दिग्दर्शित करणार आहोंत तीं आमच्या पदरचीं नसून मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, वाशिष्ट-धर्मशास्त्र, इत्यादि धर्म-ग्रंथांतूनच देणार आहोंत. मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायांत याज्ञवल्क्यस्मृतीच्या

आचाराध्यायाच्या शेवटल्या प्रकरणांत व वासिष्ट-धर्मशास्त्राच्या २९ व्या प्रकरणांत राजधर्माबद्दल सविस्तर विवेचन केलेलें आढळतें. त्या विवेचनाचा गोषवारा देण्यापूर्वी मनु-याज्ञवल्क्य वगैरे शास्त्रकारांच्या वेळीं राजाविषयी कोणती कल्पना प्रचलित होती, हल्ली तींत कोणतें अंतर पडत चाललें आहे व तिच्याशीं पाश्चात्त्य कल्पना कितपत जुळते याचा थोडासा विचार करणें अवश्य आहे. पाश्चिमात्य राष्ट्राकडे दृष्टि फेकली असतां त्यांनी "राजा हा प्रजेचा मालक नसून केवळ वरिष्ठ दर्जाचा नोकर होय" ही भावना प्रत्येकाच्या मनांत पूर्णपणें रुजून गेलेली आहे व म्हणून प्रजाद्रोही राजास प्रजेने फासावर चढविल्याची किंवा कात्रीने त्याचें शिर कापल्याचीं दुःखदायक व अंगावर रोमांच उठविणारीं उदाहरणें पाश्चात्त्य इतिहासांतून आपल्या वाचनांत येतात. "राजा हा विष्णूचा अंश असल्यामुळे तो सर्व चराचरांचा मालक होय" ही कल्पना पौर्वात्य राष्ट्राप्रमाणे तिकडेहि एके काळीं अतिशय बोकाळलेली होती; परंतु ज्ञानाच्या प्रसारामुळे तिचा लोप होऊन पूर्वोक्त कल्पनेने तिच्या जागीं आपले अधिष्ठान केलेलें आहे. आपल्या धर्मशास्त्रांतून असें स्पष्ट लिहिलेलें आहे की, इंद्र, वायु, यम, सूर्य, अग्नि, वरुण, चंद्र व वितेश यांचे सारभूत असे अंश काढून त्यांच्या योगाने प्रभूने राजास बनविलें आहे. सदरहू देवश्रेष्ठांच्या अंशापासून राजास निर्माण केलेलें असल्यामुळेच तो सर्व प्राण्यांहून अधिक बलाढ्य समजला जावा. राजा जरी बालक असला तरी तो सामान्य मनुष्य आहे असें समजून त्याचा कोणींहि अपमान करूं नये; कारण ती एक मोठी देवताच मनुष्यरूपाने राहिलेली असते. (महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति। मनु. अ. ७). हें जग राजावांचून होऊन बलाढ्यांच्या रीतीने सर्वत्र हाहाकार उडाला असतां या सर्व चराचराच्या संरक्षणार्थ प्रभूने राजास निर्माण केलें आहे. (अराजके हि लोकेस्मिन्सर्वतो विद्रुतेभयात्। रक्षार्थमस्य सर्वस्य राजानमसृज प्रभुः।। मनु. अ. ७). अशा रीतीने प्राच्यांच्या व पाश्चात्त्यांच्या राजाविषयीच्या कल्पना परस्पर-विरोधी आहेत. पहिल्यांच्या मताने राजा जर देशांतील सर्व चराचर वस्तूंचा मालक आहे, तर दुसऱ्यांच्या समजुतीप्रमाणे प्रजेचा नोकर होय. पूर्वेकडील लोक राजाला देवासमान मानतात, तर पाश्चिमात्य लोक त्याला आपला बंदा गुलाम म्हणून समजतात. सर्व सत्ता व अधिकार वस्तुतः राजाचे होत, अशी जर हिंदु लोकांची रूढ भावना, तर राजसत्तेचें वास्तविक उगमस्थान प्रजाजन असून, राजा निवळ एक मोठ्या पगाराचा व वरिष्ठ दर्जाचा तिचा वहिवाटदार होय, अशी पाश्चात्त्यांची पूर्ण समजूत. इकडील कल्पनेप्रमाणे प्रजेच्या नैसर्गिक हक्कांवर अतिक्रमण करणारा राजाहि जर अल्प शिक्षेस प्राप्त होत नाही, तर तिकडे अशा राजाला वेळेनुसार प्रजा देहान्त शासन देण्यासहि मागेपुढे पाहत नाही.

इंग्रजी शिक्षणामुळे गेल्या ३०–४० वर्षांत हिंदी लोकांच्या समजुतींत बराच फरक पडत चालला आहे व तो तसाच होत गेल्यास पाश्चात्त्यांप्रमाणे त्यांचेंहि

कल्याण होण्यास कधीहि चुकणार नाही. तात्त्विकदृष्टया पाहतां पाश्चात्त्य कल्पनाच अधिक हितावह व श्रेयस्कर होय, असें म्हणणें भाग पडतें. जर प्रजेने कर द्यावयाचे व कायदे जर प्रजेने पाळावयाचे, तर ते कर खर्चण्याचा व कायदे करण्याचा अधिकार वस्तुत: तिलाच असला पाहिजे. एकटा राजा आपल्या पैशाने राज्यकारभार चालवूं शकत नाही किंवा स्वतःच्या जोरावर लाखो प्रजाजनांना कायद्याच्या बंधनाने बांधूं शकणार नाही. राजा किंवा राजदास प्राप्त झालेले मूठभर राज्यकर्तेहि प्रजाजनांच्या हातांतील निवळ बाहुलीं होत. ते नाचवतील त्याप्रमाणे त्यांनी नाचलेंच पाहिजे. राजा व प्रजा यांच्यामध्ये एक प्रकारचा करारमदार झालेला असतो. प्रजेने तो मोडल्यास जर तिला शिक्षा करावयाची, तर राजाहि त्याप्रमाणे न वागल्यास तोहि दोषास प्राप्त होत नाही काय ? असो; वरीलप्रमाणे प्राच्य व पाश्चात्त्य कल्पनांमध्ये विरोधित्व असल्याकारणाने हिंदी लोकांच्या अंत:करणांत धर्मग्रंथांच्या आधाराने त्याच्या कर्तव्याची जाणीव उत्पन्न करूं पाहणाऱ्यांनी त्या ग्रंथांतील ध्येय व विचार प्रागतिक मानवी बुद्धीला किती पटणारे आहेत ? सद्य:स्थितीच्या मानाने त्यांच्यांत फेरबदल होणें व होत असल्यास तिकडे लक्ष देणें जरूर आहे की नाही वगैरे गोष्टींकडे कानाडोळा बिलकुल करतां कामा नये.

राजा हा ईश्वरी अंश होय या कल्पनेपासून प्रारंभ करून मनु-याज्ञवल्क्य इत्यादि स्मृतिकारांनी राजधर्माचे स्वत:विषयीचे, प्रजेविषयीचे व शत्रूविषयीचे असे स्थूलमानाने तीन विभाग केलेले आहेत. राजा कसा असावा, याबद्दल मनुस्मृतींत अतिशय उत्कृष्ट वर्णन दिलेलें आहे. मनूने दिलेली राजाची दिनचर्या राजेलोकांनी तरी लक्षांत बाळगण्यासारखी आहे. प्रतिदिवशीं प्रात:काळीं उठून व शौचमुखमार्जनादि विधींनंतर अभ्यंगस्नान करून राजाने वेदत्रयामध्ये अति निपुण व नीतिशास्त्रज्ञ ब्राह्मणांची उपासना करावी. कारण तो राजा ब्राह्मणांची सेवा करतो. त्यांच्या आज्ञा हिंस्र पशूहि मानतात. वेदवेत्त्या व पवित्र ब्राह्मणांपुढे नेहमी विनय धारण करावा. कारण पृथु यांस विनयामुळेच राज्य मिळालें. कुबेर धनाध्यक्ष झाला व विश्वामित्रास ब्राह्मण्यपदाची जोड झाली. तज्ज्ञ लोकांपासून वेदविद्या, अर्थशास्त्र, दंडनीति, आत्मविद्या व लोकव्यवहार यांचे धडे शिकावेत. आपण प्रजेचे रक्षक असून भक्षक नाही ही बुद्धि आपल्या ठायीं संचारून घ्यावी. व्यसनापासून अलिप्त राहवें व विशेषत: काम, क्रोध यांचा त्याग करावा. द्युत, मद्यपान, परस्त्री संभोग, मृगया, वृथाभ्रमण, सदाचरणी लोकांचा छळ, परद्रव्यापहार, वाक्पारुष्य वगैरे दुर्गुण टाळावेत. कारण दुर्व्यसनी राजाच्या अर्थाची व धर्माची हानि होते. धार्मिक कृत्यें करण्यांत त्याने योग्य वेळ घालवावा. राज्यांत जे कांही तंटेबखेडे झाले असतील त्यांचा मंत्री-सचिवांच्या सल्ल्याने निर्णय करून अपराध्यास दंड करावा. दंड सर्व प्राण्यांचें रक्षण करणारा धर्मस्वरूपी व ब्रह्मतेजाने निर्मिलेला असा आहे. वस्तुत: दंडच राजा आहे. तोच पुरुष कार्यकर्ता व चारी वर्णांच्या धर्माचा जामीन होय.



(stamp)

राजा जर दंडास योग्य असलेल्या इसमास शासन करणार नाही, तर बलवान दुर्बलास पिडा करतीलच व प्रजा कुमार्गगामी होईल. दंड हें एक अति असह्य तेज आहे. अपराधी आपले भाऊबंद आहेत असें पाहून जर राजा त्यांना न्याय्य शिक्षा करण्यास कचरेल, तर प्रजाजन नाराज होतील. दंडाचा उपयोग जर मुळीच न केला किंवा अयोग्य उपयोग केला, तर ब्राह्मणादि वर्णांचा संकर होईल. सर्व शास्त्रीय मर्यादा सुटतील व चोरादिकांच्या योगाने सर्व लोक अतिशय क्षुब्ध होतील. राजाने धनदुर्ग, महिदुर्ग, अब्दुर्ग, वार्क्षदुर्ग, नृदुर्ग, गिरिदुर्ग यांपैकी शेवटल्या दुर्गाचा नेहमी आश्रय करावा. कारण डोंगरी किल्ल्यावर शत्रूस चढून जातां येत नाही व वरून एखादी शिला फेकली की खालचे अनेक शत्रु मरण पावतात.

राज्याचा बंदोबस्त करण्यासाठी निरनिराळ्या अधिकाऱ्यांची योजना करावी व ते आपआपलीं कामें चोख रीतीने बजावतात की नाही हें पाहण्यासाठी चतुर व दक्ष दूत नेमावेत. कापटिक, उदास्थित, गृहपति, वैदेहिक व तापस या पांच प्रकारांच्या गुप्तहेरांचा संग्रह करून त्यांच्याकरवीं प्रजेच्या व शत्रूंच्या हालचालींवर देखरेख ठेवावी. दुसऱ्याचें मर्म जाणणाऱ्या कपटाचरणी पुरुषास कापटिक म्हणतात. उदास्थित म्हणजे सन्यासापासून भ्रष्ट झालेला, गृहपति याचा अर्थ क्षीणवृत्ति झालेला शेतकरी, वैदेहिक म्हणजे क्षयीणवृत्ति झालेला वाणी आणि मुंडन केलेला किंवा जटाधारी पुरुष वृत्तिशून्य झाला असेल व वृत्तीची इच्छा असेल त्याला तापस म्हणावें. ही सेवक परंपरा पदरीं ठेवण्यासाठी राजाने प्रजेपासून कर घ्यावा. प्रजावात्सल्यामुळे मुळीच कर न घेणें किंवा अतिशय कर घेणें या दोन्ही गोष्टी उच्छेद करणाऱ्या होत. पहिलीने राजाचा उच्छेद होईल तर दुसरीने प्रजा नाश पावेल. राजाचा उच्छेद झाल्यास कोशक्षय होतो. प्रजेचा उच्छेद झाल्यास ती पीडित होते. व्यापार, शेती इत्यादि कर्में करणारांना त्यांच्या मेहनतीचें फल मिळेल अशा बेताने राजाने कर घ्यावा. म्हणजे शेताच्या मगदुराकडे किंवा पिकाकडे लक्ष देऊन उत्पन्नाचा सहावा, आठवा किंवा बारावा भाग घेण्यांत यावा. व्यापारांत जो नफा असेल त्याचा पन्नासावा भाग वसूल करण्यांत यावा. यापेक्षा जास्त कर वसूल करणारा राजा स्वतःस लोकांच्या अप्रीतीला पात्र करून घेतो, असें म्हणण्यास चिंता नाही.

अशा रीतीने राज्यांत उत्तम व्यवस्था लावल्यानंतर जर बाहेरील शत्रूंनी त्याच्यावर स्वारी करण्याचा घाट घातला, तर सामदामादि उपायांनी राजाने परचक्रापासून निवारण करावें. परंतु तसें करण्यांत त्याने आपली किंवा आपल्या प्रजेची हानि होऊं देऊं नये. तसा प्रसंग आल्यास अपयशाने मरण्यापेक्षा मरण शतपट बरें, असा विचार करून त्याने शत्रूस तोंड द्यावें व सर्व योद्धयांनी मिळून जिंकलेलें सामान व द्रव्य त्या सर्वांस त्यांच्या पराक्रमाप्रमाणे वांटून द्यावें. राजांचीं कर्तव्यें एका श्लोकांत सांगावयाचीं असल्यास असें म्हणतां येईल की, " संग्रामेष्वनिवर्तित्वं प्रजानाम चैव पालनम् । शुश्रूषा ब्राह्मणानां च राज्ञां श्रेयस्करं परम् ॥ " (संग्रामां-

तून पराङमुख होऊन परत न फिरणें, प्रजेचें पुत्रवत् पालन करणें व ब्राह्मणांची शुश्रूषा करणें हें राजास अतिशय श्रेयस्कर होय.) शत्रूला पाठ दाखविण्याचा कुप्रसंग न यावा एतदर्थ राजाने प्रजेला लष्करी शिक्षण दिलें पाहिजे. त्यांच्या मनांत आपणाविषयी प्रेम व आदरबुद्धि असावी म्हणून त्याने तिचें सतत अनुरंजन करावें आणि राष्ट्राची प्रगति होण्यासाठी त्याने ब्राह्मणांना म्हणजे राष्ट्रपोषक विचारांच्या प्रवर्तकांना द्रव्यद्वारा व अन्य तऱ्हेने प्रोत्साहन द्यावें, हें राजधर्म पाळणारा इसमच वास्तव राजा होय. मनु-याज्ञवल्क्य वगैरे ऋषींनी आपआपल्या स्मृतींतून केलेला हा उपदेश किती तरी बहुमोल आहे बरें! या उपदेशाप्रमाणे पूर्वकालीन राजांनी आपला वर्तनक्रम ठेवल्यामुळे त्यांची कारकीर्द त्यांच्या प्रजाजनांना किती तरी सुखप्रद झाली आणि याप्रमाणे वागण्याचें सर्व राज्यकर्त्यांनी मनांत आणल्यास या भूतलावर नंदनवनाचा आनंदमय व सुखशांतियुक्त देखावा दृष्टीस पडण्यास असे कितीसे ते दिवस लागतील? देव करो व असली सदिच्छा आधुनिक राजेलोकांच्या मनांत उत्पन्न होवो!

— भाला, दि. २१ एप्रिल १९१०

---

## ४८. भिक्षेकरी

परमेश्वराने मनुष्यजाति उत्पन्न केली त्या वेळीं सर्वच माणसें धडधाकट व निर्व्यंग केलीं नाहीत. मनुष्यजाति अस्तित्वांत आल्यादिवसापासून निरनिराळ्या व्यंगांनी ग्रस्त अशीं हतभागी माणसें निपजूं लागलीं आहेत. अशा कमनशिबी माणसांबद्दल दया उत्पन्न होऊन त्यांना हरएक प्रकारची शक्य तेवढी मदत करण्याची बुद्धि हृदयांत उत्पन्न होणें हें मानवी स्वभावास अनुसरूनच आहे. आंधळा होणें, ऐकूं न येणें, हातपाय लुळे होणें, अंगावरून वारे जाणें, रक्तपिती भरणें व आणखी शेकडो व्याधि जडणें हें पूर्वकर्माचें फळ किंवा परमेश्वराच्या गैरमर्जीचें फळ होय. वर नमूद केलेल्या व्यंगांपैकी एखादें व्यंग जडणें हा त्या मनुष्याचा दोष नसून, ती त्याच्या इच्छेपलीकडील व शक्तिबाहेरील गोष्ट आहे. कोणत्याहि मनुष्याला एखादें मोठें व्यंग झालें म्हणजे तो पंगु होऊन स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास कमीजास्त प्रमाणाने असमर्थ होतो. अशा स्थितींत जर त्याला मायेच्या माणसांचा आधार मिळाला, तर त्याची धडगत असते. नाही तर त्याचे हाल कुत्रा देखील खात नाही. कधी कधी अशी वेळ येते की, जवळचें मायेचें माणूस कोणी नसल्यामुळे अशा हतभागी मनुष्यांना अन्नपाण्याची व वस्त्रप्रावर्णांची पंचाईत पडते.

अशा कष्टमय स्थितींत पंगु मनुष्याचें दु:ख निवारण करून त्याच्या उदरनिर्वाहाची सोय करून ठेवणें हें त्यांच्या देशबांधवांचें व विशेषत: राज्यकर्त्यांचें मुख्य कर्तव्य आहे. आपल्या राज्याच्या चतु:सीमेंतील कोणताहि पंगु व व्यंगी मनुष्य उपासमारीने व वस्त्राभावाने मरणार नाही अशी व्यवस्था करून ठेवणें, हें प्रत्येक राजकर्त्यांचें पहिलें कर्तव्य आहे. ही सोय करून ठेवली म्हणजे राज्यकर्ता अशा मनुष्यावर उपकार करतो असें नसून तो फक्त आपलें कर्तव्यकर्म करतो असेंच म्हणणें जास्त सयुक्तिक होईल.

प्रजेच्या जिवावर व जिनगानीवर जर राजकर्त्याची सत्ता असते व पिनल कोडाप्रमाणे जीव देण्याचा प्रयत्न केल्यास जर अशा मनुष्याला शिक्षा होते, तर आपल्या जिवाचें रक्षण करण्यास लागणारें अन्नवस्त्र राजाजवळून मागून घेण्याचा हक्क प्रत्येक व्यंगी मनुष्याला आहे. हा हक्क फक्त व्यंगी मनुष्यांनाच नसून, तो धडधाकट मनुष्यांनाहि आहे. दुष्काळामुळे वा अन्य कारणांमुळे मनुष्य आपलें पोट प्रामाणिकपणाने काम करून भरण्यास तयार असतां जर त्याला काम मिळत नसेल व त्यामुळे त्याला उपाशी मरण्याची पाळी येत असेल, तर तशा स्थितींत राजाजवळ पोटापुरतें अन्न-वस्त्र मागण्याचा हक्क त्याला निर्विवादपणें आहे. जो अन्नवस्त्राचा हक्क धडधाकट मनुष्यांना कारणपरत्वें व प्रसंगविशेषीं प्राप्त होतो तो पंगु मनुष्यांना सदासर्वकाळ असतो. कुटूंबांत जो हक्क अज्ञान मुलांना असतो तोच हक्क पंगु मनुष्यांना स्वदेशांत असतो. भुकेने मी मरणार नाही व थंडीने मी कुडकुडणार नाही असें म्हणण्याचा हक्क प्रत्येक पंगु मनुष्याला स्वदेशांत आहे. या हक्काची अंमलबजावणी करण्याच्या कामीं जर राजा किंवा सरकार कसूर करील तर त्यामुळे तो दोषास पात्र होईल. पंगु लोकांचा हा हक्क पूर्वीपासून हिंदु राजे मानीत आले आहेत. अनाथ लोकांच्या पोटापाण्याची सोय व्हावी म्हणून जागजागीं पूर्वीच्या राजांनी अन्नछत्रें घालून ठेवलीं आहेत. इतिहास असें सांगतो की, एकट्या अहिल्याबाईने साडेतीनशे अन्नछत्रें स्थापन करून ठेवलीं आहेत. पूर्वीच्या राजांनी त्या वेळेच्या कल्पनेप्रमाणे अनाथ लोकांच्या पोटापाण्याची सोय करून ठेवली होती. त्यांनी करून ठेवलेल्या व्यवस्थेसंबंधाने या लेखांत आम्हांस कांही एक लिहावयाचें नाही. सध्या अनाथ लोकांची सोय करण्यांत येते की नाही याविषयी व इतर एक-दोन मुद्द्यासंबंधाने आम्हांस लिहावयाचें आहे.

आम्हांस असें वाटतें की, जेथे जेथे समाज आहे तेथे तेथे अनाथगृह असलेंच पाहिजे. अनाथगृहाशिवाय समाज असणें म्हणजे अशा समाजांतील व्यक्तीच्या हृदयांतील कठोरपणाचें प्रदर्शन करणें होय. ज्या समाजांत सार्वजनिक अनाथ-गृहाची सोय नसते त्यांतील अनाथ पोरांनी व पंगु माणसांनी जावें कोठे ? अशा पोरांची व पंगूंची सर्व व्यवस्था समाजाने करावी या म्हणण्यांत अर्थ नाही. जर कराचा पैसा सरकार घेते व जर अशा माणसांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न

केला, तर सरकार त्यांना शासन करतें, तर अशा माणसांच्या पोटापाण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी सर्वांशीं सरकारवर आहे. ही जबाब्रदारी सरकार हल्ली पूर्णपणें ओळखीत नाही व त्याप्रमाणे व्यवस्था करीत नाही. दुष्काळांत आई-ब्राप मरण पावल्यावर रस्त्यांतून हिंडणाऱ्या पोरांची सोय ज्यांत लागेल अशीं अनाथगृहें सरकारी पैशावर चाललेलीं दिसत नाहीत. अशा प्रसंगीं पोरक्या पोरांना मिशनरी लोकांचा आश्रय धरावा लागतो व स्वधर्माला मुकावें लागतें. सरकारी अनाथगृहें स्थापण्यांत सरकारकडून अक्षम्य कसूरपणा होत आहे व सरकारचें मन अशीं अनाथगृहें स्थापन करण्याकडे वळविण्याचा प्रयत्न करणें हें पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. सरकारने जर अनाथगृहें स्थापन न केलीं, तर तीं तुमची तुम्ही करा असें म्हणण्यांत अर्थ नाही. अशा कांही गोष्टी असतात की, ज्या सरकारनेच केल्या पाहिजेत. अनाथगृहें कायमची चालण्यास त्यांना पैशाचा झरा पाहिजे व तो नेहमी वहात राहिला पाहिजे. वर्गणीचें पाणी हें वळवाच्या पावसाच्या पाण्याप्रमाणे आहे. तें कांही काळ वाहील, पण तें एकाएकी बंद पडेल. सरकारी तिजोरी ही कधीहि आटत नाही. म्हणून अशा तिजोरींतून वहाणाऱ्या झऱ्याच्या पाण्यावर अनाथगृहें उगवलीं पाहिजेत.

कोणत्याहि देशांत अन्नावांचून कोणी मरतां कामा नये. ज्याप्रमाणे राष्ट्र-रक्षणार्थ सैन्याची जरूरी आहे, त्याप्रमाणे पोरक्या पोरांचें व पंगूंचें रक्षण होण्यास अनाथगृहांची आवश्यकता आहे. सार्वजनिक अनाथगृहें स्थापन झाल्यावर जाति-जातींनी आपलीं स्वतंत्र गृहें पाहिजे असल्यास काढावींत, पण अशा कामीं लोकांकडे बोट दाखवून सरकारने गप्प बसतां कामा नये. सार्वजनिक अनाथगृहें स्थापन करण्याची कल्पना १९ व्या शतकांतील आहे. पूर्वी हिंदुस्थानांत जरी अन्नछत्रें होतीं तरी तशा अन्नछत्रास अनाथगृहें असें कधीहि म्हणतां यावयाचें नाही. जो दाराशीं आला त्याच्या पात्रतापात्रतेविषयी विचार न करतां शक्तीप्रमाणे त्याला भिक्षा घालावयाची, अशी जुन्या लोकांची कल्पना असल्यामुळे अन्नछत्रांत कोण आला व कोण गेला याची बारीक चौकशी पूर्वी कोणीं केली नाही व हल्ली कोणी करीत नाही. जी छत्रांतील स्थिति असते तीच प्रत्येक घरीं दृष्टीस पडते. दान कोणास करावें व कोणास करूं नये याचा विचार करण्याचें सोडून देऊन जो याचक दाराशीं आला त्याला बिनतक्रार भिक्षा घालीत राहवयाचें. या दातृत्वाच्या खोट्या व घातुक कल्पनेमुळे हिंदुस्थानांत आळसाला व याचकवृत्तीला इतका ऊत आला आहे की, वेळींच या प्रश्नाचा नीट विचार करण्यांत आला नाही तर हल्लीच्या खडतर दिवसांत हिंदु समाजाची अतिशय भयंकर हानि होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानचें कमनशीब असेंच आहे की, तेथे जें असावें तें नाही व जें नसावें तें आहे. अनाथगृहें असावींत तर तीं सरकारचीं नाहीत किंवा लोकांचीं नाहीत. मिशनऱ्यांचीं आहेत, पण तीं नसतीं तर अत्युत्तम झालें असतें. अनाथगृहासंबंधाने वरच्याप्रमाणे स्थिति आहे.

आता दानधर्मासंबंधाने पाहवें तर ज्यांना धर्म करावयाला नको त्यांना बिनतक्रार धर्म केला जातो. सारांश, येथे प्रत्येक गोष्टीत हा प्रकार नजरेस पडतो की, लोक प्रत्येक गोष्ट डोळे मिटून करतात. वाडवडील जसें करीत आले तसें पुढे करीत राहवयाचें एवढेंच काय तें मुलाला माहीत असतें. अमुक गोष्ट वाडवडील कां करीत आले, ती आता यापुढे केलीच पाहिजे की काय, त्यांत कोणते फेरबदल करण्यांत आले पाहिजेत या प्रश्नांचा विचार मुलगा मुळीच करीत नाही. मनाची अशी शोचनीय स्थिति घडून आली म्हणजे सर्व कारभार निर्जीव रीतीने चालतो. आपल्या दानधर्मांत अशाच प्रकारचा निर्जीवपणा दृष्टिगोचर होतो. दाराशीं कोणी येऊन भिक्षा मागो, त्याला आपले मूठभर तांदूळ वाढावयाचें या तारतम्यशून्य पद्धतीमुळे हिंदुस्थानांत धडधाकट भिक्षेकऱ्यांची संख्या इतकी फुगली आहे की, तिला वेळींच आळा घालण्यांत आला नाही, तर थोड्याच वर्षांत लोकसंख्येंत शेकडा ५० भिक्षेकरी आढळून येतील. जो दाराशीं येईल त्याला मूठ-मूठ भिक्षा घालीत गेल्यास सकाळपासून संध्याकाळपर्यंत एका कुटुंबास तीन पायली तांदूळ म्हणजे दोन रुपये लागतील. भिक्षेकऱ्यांनी सुद्धा आपआपल्या वेळा आखून ठेवल्या आहेत. पहाटे चारास पांगुळ, पांच वाजतां वासुदेव, सहापासून दहापर्यंत काशीविश्वेश्वराय नमः म्हणून भिक्षा मागणारे ब्राह्मण, दहाला तुकारामबुवांचे अभंग म्हणून मृदंगटाळाच्या आवाजाबरोबर भिक्षा मागणारे वारकरी, दहाच्या पुढे ९ महिन्यांच्या गर्भार बायका व त्याच्या पुढे १२ दिवसांच्या कोवळ्या बाळंतिणी याप्रमाणे संध्याकाळपर्यंत भिक्षेकऱ्यांची मालिका एकसारखी चालू राहते. भिक्षेकरी आला की त्याला मूठभर धान्य घालावयाचें व त्याने कपडा मागितला की त्याला फाटकेंतुटकें वस्त्र द्यावयाचें असा एखाद्या दानशूर मनुष्याने निश्चय केल्यास, आम्ही असें म्हणतों की, त्याला महिन्याचे कमीत कमी तीस रुपये तरी हटकून लागतील. एवढे नसले तरी हिशेबच ठेवल्यास प्रत्येक कुटुंबांतून भिक्षेकऱ्यांसाठी म्हणून कमींत कमी दोन रुपयांपासून पांच रुपयांपर्यंत खर्च लागतो. एवढा पैसा प्रत्येक कुटुंबांतून खर्च होऊन त्याचा उपयोग म्हटला म्हणजे जवळ जवळ पूज्य होय. यांपैकी पंगु लोकांना एक थोडा पैसा मिळत असेल. हिंदुस्थानांतील भिक्षेकरी अवलोकन केलें म्हणजे शे. ८० धट्टेकट्टे असतात. जे कोणी पंगु असतात त्यांचें पोट त्यांचे नातलग भरण्याऐवजीं तेच अशा पंगु मनुष्याच्या जिवावर चैन करतात. वर निर्दिष्ट केलेल्या भिक्षेकऱ्यांशिवाय आणखी एक भिक्षेकऱ्यांचा वर्ग आहे. त्यांच्याविषयी लिहावयास लागलें, तर पुष्कळ लिहावें लागेल. तो वर्ग बैराग्यांचा होय.

या बैराग्यांची संख्या जवळ जवळ ५० लक्ष आहे. यांना प्रत्येकी पांच रुपये महिना धरले तरी दरमहिना अडीच कोटि रुपये म्हणजे सालाचे तीस कोटि रुपये यांच्याप्रीत्यर्थ लोकांकडून खर्च होतात. अशा रीतीने विचार केला म्हणजे आपला पैसा दानधर्माच्या खोट्या कल्पनेमुळे किती उधळला जातो याची अटकळ वाचकांना

येईल. अगदी कमींत कमी आकडा घेतला तरी निरनिराळ्या भिक्षेकऱ्यांप्रीत्यर्थ हिंदुस्थानांत तीस कोटि रुपये दरवर्षी खर्ची पडतात. हीच रक्कम जर नीटपणें व अकलेने खर्च करण्यांत आली, तर तिच्यापासून शंभर अनाथगृहें तरी उत्तम रीतीने चालू शकतील. दानधर्म करण्यापूर्वी प्रत्येक दात्याने एवढा विचार अवश्य करावा की, याचक पंगु आहे किंवा धडधाकट आहे. ज्यास कोणतेंच शारीरिक व्यंग नसेल अशा भिक्षेकऱ्यांना भिक्षा घालावयाची नाही. एवढा एकच नियम ध्यानांत धरून जर दानधर्म करण्यांत येईल, तर प्रत्येक कुटुंबाचा बराच पैसा शिल्लक राहील व बरेच धष्टपुष्ट व आळशी भिक्षेकरी कामाला लागतील.

तारतम्यशून्य दानधर्म म्हणजे आळसाला प्रत्यक्ष उत्तेजन होय. बैराग्यांचीच गोष्ट घ्या. घी-शक्कर खायला व गांजा ओढायला, याप्रमाणे लाखो बैरागी लोकांकडून व विशेषतः गुजराथ्यांकडून पोसले जातात. हे लोक देशाचें कोणतें हित करतात बरें ? या प्रश्नाचें उत्तर नकारात्मकच येईल. इतर गोष्टींत राहो, पण प्लेगसारख्या साथींतहि यांचा उपयोग काडीचाहि होत नाही. सर्वसंगपरित्याग केलेल्या बैराग्यांना मृत्यूची भीति वाटत नसावी व म्हणून हे लोक हॉस्पिटलमधून रोग्यांना उपयोगी पडतील अशी आशा कोणी करील, तर त्याची फसगत होईल. बैराग्यांना पैसा देणें म्हणजे तो समुद्रांत फेकून देण्यापेक्षाहि वाईट आहे. समुद्रांत फेकून दिलेल्या पैशाने आळसाची किंवा व्यसनाची बृद्धि होत नाही, पण बैराग्यांना दिलेल्या पैशाचें मात्र तसें नाही. दरवर्षी यांच्या संख्येंत भर पडत आहे व ती त्यांना फुकट मिळत असलेल्या पैशामुळेच होय. ही झाली बैराग्यांची गोष्ट.

आपल्या इकडचे रामदासी घ्या. दररोज चार तास भिक्षा मागून प्रत्येक रामदासी रुपयाचे तांदूळ मिळवूं शकतो. समाजाकडून महिना २५–३० रुपयांची प्राप्ति होत असतां हे समाजाचे कोणतें काम करतात असा प्रश्न मनाशीं केल्यास त्याचें उत्तर कांही नाही असेंच येईल. वरती जीं दोन उदाहरणें घेतलीं आहेत त्याप्रमाणे आणखी शेकडो उदाहरणें दाखवितां येतील. आम्हांस जें कांही सिद्ध करावयाचें आहे तें एवढेच की, पंगु मनुष्याशिवाय इतरांना धर्म करणें म्हणजे आळसाला उत्तेजन देण्यासारखें आहे. आळशी लोकांना पोसण्यांत खर्च होणाऱ्या पैशाचा जर नीट उपयोग करण्यांत आला, तर त्याच पैशांत किती तरी अनाथगृहें शानदार रीतीने चालू शकतील बरें ! तें कसें करावें याचें थोडेसें दिग्दर्शन करून आम्ही आजचा लेख संपविणार आहोंत.

धडधाकट भिक्षेकऱ्यांच्या संख्येला आळा पडण्यास सर्वांत सुलभ उपाय म्हटला म्हणजे ' भिक्षेकऱ्यांचा कायदा ' होय. कोणतेंहि व्यंग नसतां जो कोणी भिक्षा मागेल त्यास पकडून त्याजवर फौजदारी खटला भरण्याचा अधिकार पोलिस लोकांना देण्यांत यावा. असा कायदा झाल्यादिवसापासून एक महिन्याच्या आंत एकूण एक भिक्षेकरी नाहीसा होईल. बैरागी, संन्यासी, रामदासी, वारकरी, पांगुळ, वासुदेव,

बाळसंतोष, नंदीबैलवाले व इतर अनेक प्रकारचे भिक्षेकरी हां हां, म्हणतां या कायद्याच्या प्रभावामुळे नाहीसे होतील. असा कायदा करण्यांत यावा हें सुचवितांना खऱ्या हतभागी पंगु लोकांना आम्ही विसरून जात आहोंत असें मात्र कोणीं समजूं नये. गलेलठ्ठ भिक्षेकऱ्यांबद्दल जितका कठोरपणा दाखविण्यांत आला पाहिजे तितकाच किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त कनवाळूपणा पंगु लोकांविषयी दाखविण्यांत आला पाहिजे. धट्टाकट्टा भिक्षेकरी भेटला, तर ज्याप्रमाणे त्याला तुरुंग, त्याचप्रमाणे लुळापांगळा व्यंगी भिक्षेकरी भेटला, तर त्याच्यासाठी अनाथगृहाची व्यवस्था झाली पाहिजे. भिक्षेकऱ्यांच्या कायद्याबरोबर पंगु लोकांचा कायदाहि पसार करण्यांत यावा. हे दोन कायदे पसार झाले म्हणजे कोणाहि धडधाकट मनुष्याला फुकट बसून खावयास मिळणार नाही व कोणत्याहि पंगु मनुष्याला उपाशी मरण्याची पाळी येणार नाही. ज्या देशांत धट्टयाकट्टया मनुष्याला फुकट खावयास मिळत नाही किंवा पंगु मनुष्यावर उपाशी मरण्याची पाळी येत नाही तो देश वर्षानुवर्षे धनसंपन्न होत गेला आहे. सरकार जर भिक्षेकऱ्यांचा कायदा पसार करील, तर हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति निःसंशय सुधारेल. असा कायदा वास्तविक रीतीने कोणालाच जाचक होणार नाही. भिक्षेकऱ्यांचा कायदा काय म्हणेल ? तर तो इतकेंच म्हणेल की, बाबांनो, भीक न मागतां मिळवून खा. यांत काय वाईट आहे व अशा कायद्यांत कोणता दोष आहे ? सरकारने असा कायदा करावा अशी आमची कळकळीची सूचना आहे. पण खेदाची गोष्ट ही आहे की, असा हितकर कायदा पसार करण्यास सरकार लागलीच तयार होणार नाही. प्राथमिक शिक्षण सक्तीने द्या व भिक्षेकऱ्यांचा कायदा लौकर पसार करा असा मेघनाद जरी प्रजेकडून करण्यांत आला तरी सरकारची तशी मर्जी लागणार नाही.

असो; जरी सरकार या बाबतीत मुगाचे लाडू खाऊन गप्प बसलें, तरी लोकांनी मनांत आणल्यास बराच कार्यभाग उरकणार आहे. आम्ही हें कबूल करतों की, कांही कांही गोष्टी अशा स्वरूपाच्या असतात की, त्या सरकारनेच केल्या पाहिजेत. पण सरकार वळेना म्हणून लोकांनीहि स्वस्थ बसावें हें उचित नाही. सरकार भिक्षेकऱ्यांचा कायदा पसार करणार नाही असें धरून, लोकांनी कोणत्या मार्गाचें अवलंब केलें पाहिजे याचा विचार करणें जरूर आहे. या कामीं प्रत्येकाने स्वतःपुरता भिक्षेकऱ्यांचा कायदा पसार करावा. दाराशीं कोणी येवो, कितीहि बडबडो, पण जरकरतां तो धट्टाकट्टा असेल, तर त्याला भिक्षा घालावयाची नाही, असा प्रत्येकाने आपल्या मनाशीं निश्चय करावा व त्याप्रमाणे वर्तन करावें. धंदेवाईक भिक्षेकरी चिकट असतात. जा म्हणून सांगितलें तरी ते जात नाहीत. तरी अशा वेळीं घरवाल्याने आपला निश्चय ढासळूं देऊं नये. दार लावावें, अंगावर खेकसावें, डोळे वटारावेत, हातीं धरून बाहेर घालवावें किंवा आणखी एखादा उपाय करावा. पण कांही केल्या भिक्षा घालूं नये. याप्रमाणे निश्चय झाल्यावर व भिक्षेकऱ्यांना

लागोपाठ दहा-वीस घरांत भिक्षा न मिळाल्यावर दहा-पांच दिवसांत ते हटकून कामाचा शोध करूं लागतील व उद्योगी नागरिक बनतील.

आमच्या एका मित्राने भिक्षेकरी पिटाळून लावण्याचा एक सोपा उपाय शोधून काढला आहे. तो हा की, भिक्षेकरी आला की त्याला जा म्हणून सांगावयाचें व जर तो गेला नाही, तर पिचकारीने त्याच्या अंगावर पाणी उडवायचें. पहिल्या-पहिल्यांदा त्याला शिव्या खाण्याचा प्रसंग आला, पण आठ दिवसांत खऱ्या पंगु भिक्षेकऱ्यांशिवाय त्याच्या दारासमोर इतर भिक्षेकरी येईनात. धडधाकट भिक्षेकऱ्यांची हकालपट्टी केल्यावर खऱ्या पंगु भिक्षेकऱ्यांना आस्थेने व ममतेने मदत करावी. जोंपर्यंत अनाथगृहें स्थापन झालीं नाहींत तोंपर्यंत अशा व्याधिग्रस्त भिक्षेकऱ्यांना मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे व तें बजावतांना कोणींहि कंजूषपणा करूं नये. महाराष्ट्र-कवि अनंतफंदी असें म्हणतात की, "आल्या अतिथा मूठभर द्याया मागे-पुढती पाहूं नको." फंदीच्या या उपदेशाचा अर्थ पंगु अतिथी असाच घेतला पाहिजे. रिकामटेकडे सोटभैरव घरीं आल्यावर जर त्यांच्या पदरांत धान्य किंवा पैसा पडूं लागला, तर सोटभैरवांची संख्या हल्लीपेक्षां किती तरी पटींनी वाढेल ! शिवाय पंगु लोकांना व्यक्तिशः मदत करण्याऐवजीं ती संघशः करणें जास्त हितावह आहे. अनाथगृहें स्थापन झालीं म्हणजे त्यांत ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे ज्याला त्याला काम देतां येऊन प्रत्येक पंगु मनुष्य कांही तरी मिळवूं शकेल. उदा., आंधळा दळूं शकेल, पांगळा सूत कातूं शकेल व आणखी इतर व्यंगी माणसें इतर कामें करूं शकतील. सारांश, सरतेशेवटीं आम्हांस जें कांही सांगावयाचें आहे तें एवढेंच की, सोटभैरव भिक्षेकऱ्यांना भिक्षा घालू नका व व्यंगी भिक्षेकऱ्यांना ती घालण्यास कां-कूं करूं नका. भिक्षेकऱ्यांनी आपले पोट अंशतः भरावें अशी तुमची इच्छा असल्यास अनाथगृहांची स्थापना करा. पण जोंपर्यंत अनाथगृहें स्थापन झालेलीं नाहीत तोंपर्यंत त्यांना घरीं भिक्षा घाला व त्यांचा दुवा मिळवा.

— भाला, दि. १ मे १९१०

---

## ४९. कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे

जगांतील कोणत्याहि देशांतील समाजाकडे नजर फेकली, तर प्रत्येकाच्या नजरेस ही गोष्ट येईल की, एकट्या हिंदुस्थानशिवाय दुसरीकडे कोठेहि जातीचें अस्तित्व दृष्टीस पडत नाही. बिद्वत्तेमुळे, वित्तामुळे किंवा अन्य कारणांमुळे प्रत्येक समाजांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होतात ही नैसर्गिक गोष्ट आहे. जोंपर्यंत सर्वांच्या

बाळसंतोष, नंदीबैलवाले व इतर अनेक प्रकारचे भिक्षेकरी हां हां, म्हणतां या कायद्याच्या प्रभावामुळे नाहीसे होतील. असा कायदा करण्यांत यावा हें सुचवितांना खऱ्या हतभागी पंगु लोकांना आम्ही विसरून जात आहोंत असें मात्र कोणीं समजूं नये. गलेलठ्ठ भिक्षेकऱ्यांबद्दल जितका कठोरपणा दाखविण्यांत आला पाहिजे तितकाच किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त कनवाळूपणा पंगु लोकांविषयी दाखविण्यांत आला पाहिजे. धट्टाकट्टा भिक्षेकरी भेटला, तर ज्याप्रमाणे त्याला तुरुंग, त्याचप्रमाणे लुळापांगळा व्यंगी भिक्षेकरी भेटला, तर त्याच्यासाठी अनाथगृहाची व्यवस्था झाली पाहिजे. भिक्षेकऱ्यांच्या कायद्याबरोबर पंगु लोकांचा कायदाहि पसार करण्यांत यावा. हे दोन कायदे पसार झाले म्हणजे कोणाहि धडधाकट मनुष्याला फुकट बसून खावयास मिळणार नाही व कोणत्याहि पंगु मनुष्याला उपाशी मरण्याची पाळी येणार नाही. ज्या देशांत धट्टयाकट्टया मनुष्याला फुकट खावयास मिळत नाही किंवा पंगु मनुष्यावर उपाशी मरण्याची पाळी येत नाही तो देश वर्षानुवर्षे धनसंपन्न होत गेला आहे. सरकार जर भिक्षेकऱ्यांचा कायदा पसार करील, तर हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति निःसंशय सुधारेल. असा कायदा वास्तविक रीतीने कोणालाच जाचक होणार नाही. भिक्षेकऱ्यांचा कायदा काय म्हणेल ? तर तो इतकेंच म्हणेल की, बाबांनो, भीक न मागतां मिळवून खा. यांत काय वाईट आहे व अशा कायद्यांत कोणता दोष आहे ? सरकारने असा कायदा करावा अशी आमची कळकळीची सूचना आहे. पण खेदाची गोष्ट ही आहे की, असा हितकर कायदा पसार करण्यास सरकार लागलीच तयार होणार नाही. प्राथमिक शिक्षण सक्तीने द्या व भिक्षेकऱ्यांचा कायदा लौकर पसार करा असा मेघनाद जरी प्रजेकडून करण्यांत आला तरी सरकारची तशी मर्जी लागणार नाही.

असो; जरी सरकार या बाबतीत मुगाचे लाडू खाऊन गप्प बसलें, तरी लोकांनी मनांत आणल्यास बराच कार्यभाग उरकणार आहे. आम्ही हें कबूल करतों की, कांही कांही गोष्टी अशा स्वरूपाच्या असतात की, त्या सरकारनेच केल्या पाहिजेत. पण सरकार वळेना म्हणून लोकांनीहि स्वस्थ बसावें हें उचित नाही. सरकार भिक्षेकऱ्यांचा कायदा पसार करणार नाही असें धरून, लोकांनी कोणत्या मार्गाचें अवलंब केलें पाहिजे याचा विचार करणें जरूर आहे. या कामीं प्रत्येकाने स्वतःपुरता भिक्षेकऱ्यांचा कायदा पसार करावा. दाराशीं कोणी येवो, कितीहि बडबडो, पण जरकरतां तो धट्टाकट्टा असेल, तर त्याला भिक्षा घालावयाची नाही, असा प्रत्येकाने आपल्या मनाशीं निश्चय करावा व त्याप्रमाणे वर्तन करावें. धंदेवाईक भिक्षेकरी चिकट असतात. जा म्हणून सांगितलें तरी ते जात नाहीत. तरी अशा वेळीं घरवाल्याने आपला निश्चय ढासळूं देऊं नये. दार लावावें, अंगावर खेकसावें, डोळे वटारावेत, हातीं धरून बाहेर घालवावें किंवा आणखी एखादा उपाय करावा. पण कांही केल्या भिक्षा घालूं नये. याप्रमाणे निश्चय झाल्यावर व भिक्षेकऱ्यांना

लागोपाठ दहा-वीस घरांत भिक्षा न मिळाल्यावर दहा-पांच दिवसांत ते हटकून कामाचा शोध करूं लागतील व उद्योगी नागरिक बनतील.

आमच्या एका मित्राने भिक्षेकरी पिटाळून लावण्याचा एक सोपा उपाय शोधून काढला आहे. तो हा की, भिक्षेकरी आला की त्याला जा म्हणून सांगावयाचें व जर तो गेला नाही, तर पिचकारीने त्याच्या अंगावर पाणी उडवायचें. पहिल्या-पहिल्यांदा त्याला शिव्या खाण्याचा प्रसंग आला, पण आठ दिवसांत खऱ्या पंगु भिक्षेकऱ्यांशिवाय त्याच्या दारासमोर इतर भिक्षेकरी येईनात. धडधाकट भिक्षेकऱ्यांची हकालपट्टी केल्यावर खऱ्या पंगु भिक्षेकऱ्यांना आस्थेने व ममतेने मदत करावी. जोंपर्यंत अनाथगृहें स्थापन झालीं नाहींत तोंपर्यंत अशा व्याधिग्रस्त भिक्षेकऱ्यांना मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे व तें बजावतांना कोणींहि कंजूषपणा करूं नये. महाराष्ट्र-कवि अनंतफंदी असें म्हणतात की, "आल्या अतिथा मूठभर द्याया मागे-पुढती पाहूं नको." फंदीच्या या उपदेशाचा अर्थ पंगु अतिथी असाच घेतला पाहिजे. रिकामटेकडे सोटभैरव घरीं आल्यावर जर त्यांच्या पदरांत धान्य किंवा पैसा पडूं लागला, तर सोटभैरवांची संख्या हल्लीपेक्षां किती तरी पटींनी वाढेल ! शिवाय पंगु लोकांना व्यक्तिशः मदत करण्याऐवजीं ती संघशः करणें जास्त हितावह आहे. अनाथगृहें स्थापन झालीं म्हणजे त्यांत ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे ज्याला त्याला काम देतां येऊन प्रत्येक पंगु मनुष्य कांही तरी मिळवूं शकेल. उदा., आंधळा दळूं शकेल, पांगळा सूत कातूं शकेल व आणखी इतर व्यंगी माणसें इतर कामें करूं शकतील. सारांश, सरतेशेवटीं आम्हांस जें कांही सांगावयाचें आहे तें एवढेंच की, सोटभैरव भिक्षेकऱ्यांना भिक्षा घालू नका व व्यंगी भिक्षेकऱ्यांना ती घालण्यास कां-कूं करूं नका. भिक्षेकऱ्यांनी आपले पोट अंशतः भरावें अशी तुमची इच्छा असल्यास अनाथगृहांची स्थापना करा. पण जोंपर्यंत अनाथगृहें स्थापन झालेलीं नाहीत तोंपर्यंत त्यांना घरीं भिक्षा घाला व त्यांचा दुवा मिळवा.

— भाला, दि. १ मे १९१०

---

## ४९. कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे

जगांतील कोणत्याहि देशांतील समाजाकडे नजर फेकली, तर प्रत्येकाच्या नजरेस ही गोष्ट येईल की, एकटया हिंदुस्थानशिवाय दुसरीकडे कोठेहि जातीचें अस्तित्व दृष्टीस पडत नाही. विद्वत्तेमुळे, वित्तामुळे किंवा अन्य कारणांमुळे प्रत्येक समाजांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होतात ही नैसर्गिक गोष्ट आहे. जोंपर्यंत सर्वांच्या

अकला व नशिबें एकसारखीं नाहीत तोंपर्यंत सर्वांची बौद्धिक व सांपत्तिक स्थिति एकसारखी सापडणें शक्य नाही. समाजांत जे लोक बुद्धिमान असतात ते मोठमोठ्या हुद्द्याच्या जागा पटकवतात व जे बुद्धिहीन असतात त्यांच्या कपाळीं लहान लहान दर्ज्यांच्या जागा येतात. जे उद्योगशील व मेहनती असतात ते स्वसामर्थ्यानें संपत्तिवान होतात व जे आळशी असतात त्यांना पोट भरण्याकरिता काबाडकष्ट करावे लागतात. निरनिराळ्या लोकांच्या अकलेंत, उद्योगशीलतेंत व नशिबांत कमीजास्त फरक असल्यामुळे त्यांच्या ऐहिक स्थितींत निरनिराळे फरक पडतात. याच फरकामुळे कोणत्याहि समाजांत वर्ग उत्पन्न होतात व ते उत्पन्न होऊं न देणें हें कोणाच्याहि हातीं नाही. जोंपर्यंत समाजांत लहानमोठेपणाची कल्पना असते तोंपर्यंत त्या कल्पनेपासून निरनिराळे वर्ग उत्पन्न झालेच पाहिजेत. उदाहरणार्थ, आपण एखादें दिवाणी कोर्ट घेऊं. अशा कोर्टांत तीन वर्ग अस्तित्त्वांत आलेले असतात. मुन्सफ व वकील लोकांचा एक वर्ग, कारकून लोकांचा दुसरा वर्ग, बेलिफ व इतर नोकरांचा मिळून तिसरा वर्ग होय. हे तीन वर्ग उत्पन्न होणें व टिकणें हें स्वाभाविक आहे. कारण जोंपर्यंत सर्वच मुन्सफ नाहीत किंवा सर्वच चपराशी नाहीत तोंपर्यंत एकाच कोर्टांत तीन वर्ग उत्पन्न होणें साहजिकच आहे. जी स्थिति एखाद्या कोर्टांत अवलोकनांत येते तीच स्थिति मोठ्या प्रमाणावर समाजांत दृष्टीस पडते.

कोणत्याहि समाजांत विद्वान व हुद्देदार लोकांचा एक वर्ग बनतो. व्यापारी लोकांचा दुसरा वर्ग बनतो. कारागीर लोकांचा तिसरा वर्ग होतो व शुद्ध मजुरी करणाऱ्या लोकांचा चौथा वर्ग बनतो. हे चार वर्ग मुख्य वर्ग आहेत. यांच्यांत आणखी शेकडो पोटवर्ग निर्माण होतात. असे वर्ग जरी प्रत्येक समाजांत निर्माण होतात व अशा निरनिराळ्या वर्गांतील लोकांमध्ये रोटीव्यवहार व बेटीव्यवहार सढळ प्रमाणाने होत नसला, तरी तो अजीबात होत नाही असें मात्र नाही. असा एखादा प्रसंग येतो की, ज्या वेळीं एका वर्गांतील लोक दुसऱ्या वर्गांतील लोकांशीं रोटीव्यवहार करण्यास एका पायावर तयार होतात. पण असा प्रकार जातीसंबंधाने सापडूं शकत नाही. प्रत्येक समाजांत निरनिराळे वर्ग सापडूं शकतील, पण अशा समाजांत निरनिराळ्या जाति असतीलच असें मात्र नाही. जात व वर्ग यांच्यांत एक मोठा भेद आहे व तो हा की, जात जन्मसिद्ध असते व वर्ग परिस्थितिजन्य असतो. जात केव्हाहि बदलतां येत नाही. वर्ग वाटेल त्या वेळीं बदलूं शकतो. बारा रुपयांवर रखडणारा कारकून वकिलीची परीक्षा देऊन व वकील बनून आपला वर्ग बदलूं शकतो. पण असा कारकून जरी हायकोर्टांतील न्यायाधीश झाला, तरी त्याला आपली जात बदलतां यावयाची नाही. म्हणून जरी इतर समाजांत वर्ग आढळून येतात तरी त्यांच्यांत व जातींत जमीनअस्मानाचें अंतर आहे. कनिष्ठ वर्गांतून स्वकष्टाने कोणत्याहि मनुष्याला वरिष्ठ वर्गांत जातां येतें. पण कांही केलें तरी एका जातींतून दुसऱ्या जातींत जाणें हें कोणालाहि शक्य नाही.

इंग्लंडांत व अमेरिकेंत अशीं उदाहरणें घडून आलेलीं आहेत की, जे कांही काळापूर्वी मजूर होते ते पुढे 'मिनिस्टर्स' बनले आहेत. मि. केरहार्डी हे खाणींत काम करीत असत व त्यांची मजूरवर्गांत गणना होत असे. तेच केरहार्डी आता मजूर पक्षाचे पुढारी बनले आहेत व त्यांचा वर्ग वरिष्ठ प्रकारचा समजण्यांत येत आहे. वर्ग बदलण्याची अशी सोय आहे तशी जात बदलण्याची सोय नाही. एखादा मराठा जरी छत्रपति झाला तरी त्याची जात ब्राह्मण कधीहि व्हावयाची नाही. एवढे अलौकिक कृतीचे शिवाजीमहाराज होते, पण ते शेवटीं मराठेच राहिले. ब्राह्मणवर्गात त्यांचा समावेश कोणीं केला नाही. वर्ग व जात यांच्या रूपांत व परिणामांत वरच्याप्रमाणे भेद असल्यामुळे जात ही संस्था कधी कधी अहितपरिणामी होते. जात जन्मसिद्ध असल्यामुळे तींत बदल करणें हें मनुष्याच्या हातीं नसतें. यामुळे निरनिराळ्या जातींत द्वेष व वैमनस्य वाढण्याचा पुष्कळ संभव असतो. हा जातिद्वेष हिंदुस्थानांत इतक्या तीव्र स्वरूपाचा होऊन बसला आहे की, स्पष्टपणें लिहावयाचें म्हणजे तो जागजागीं आम्हांस नडत आहे. जातिद्वेष नसतांना जर जाति असू शकतील, तर मग त्यांच्यापासून फारसा तोटा नाही. पण जर जातींच्या अस्तित्वापासून जातिद्वेष माजत असेल, तर तो शक्य तितक्या उपायांनी अजीबात नाहीसा, निदान पुष्कळ अंशीं कमीं करण्याचा प्रयत्न करणें राष्ट्रीयदृष्ट्या हितावह आहे. जाति अजीबात नाहीशा करून एका झटक्यासरशी सबगोलंकार करण्यांत यावा असें कोणताहि शाबूत मेंदूचा मनुष्य प्रतिपादन करणार नाही.

हिंदुस्थानांत जातीची संस्था अनादि कालापासून चालत आलेली आहे व ती नष्ट होण्यास तिला मागल्याइतकाच काळ पुढे लागेल. तितकाहि काळ लोटत गेल्यावर जात अजीबाबत नष्ट होईल किंवा नाही याची वानवाच आहे. जातीची संस्था अजीबात नष्ट झाली किंवा नाही या नाजूक प्रश्नाची चर्चा करण्याची आमची इच्छा नाही. मुख्य मुख्य जातींमध्ये ज्या पोटजाति आहेत त्यांचें एकीकरण करणें इष्ट व शक्य आहे किंवा नाही, या प्रश्नाचीच चर्चा करण्याचें आम्हीं या अंकीं योजिलें आहे. मथळ्याला जरी ब्राह्मण जातीच्या पोटजातींचीं नांवें दिलीं आहेत, तरी आम्ही या अंकीं ब्राह्मण जातीविषयी विचार करणार आहोंत असें मात्र नाही. ब्राह्मण जातींतील पोटजातींविषयी जें जें आम्ही लिहिणार आहोंत तें तें इतर सर्व जातींतील पोटजातींनाहि लागू पडण्यासारखें आहे. असो; या लेखाचा पुढील भाग वाचावयास लागल्यापूर्वी प्रत्येकाने हें लक्षांत बाळगिलें पाहिजे की, मुख्य मुख्य जाति हल्लीप्रमाणे अस्तित्वांत असाव्या असें आमचें स्वतःचें मत आहे. मिश्रण किंवा एकीकरण जें कांही व्हावयाचें असेल तें फक्त पोटजातींचेंच व्हावें. आमच्याप्रमाणे ज्यांचें मत नसेल त्यांना आमच्या पुढील विवेचनापासून काडीचाहि फायदा होणार नाही. पोटजाति असाव्यात असें जुन्या लोकांप्रमाणे आमचें मत नाही व जाति अजीबात नसाव्यात असें सुधारक लोकांप्रमाणे आमचें मत नाही. जाति असाव्यात

पण त्या मुख्य मुख्य असाव्यात असेंच आमचें स्वतःचें मत आहे. आमच्या मताच्या समर्थनार्थ आम्ही दोन शब्द पुढे लिहीत आहोंत.

जाति कशा निर्माण झाल्या या वादांत पडण्याची आमची इच्छा नाहीं. विराट् पुरुषाच्या निरनिराळ्या अवयवांपासून या निर्माण झाल्या किंवा निरनिराळ्या धंद्यांच्या अनुरोधाने त्या जन्मास आल्या या वादांत पडण्याची आमची इच्छा नाही. कोणत्याहि कारणामुळे का होईना, पण त्या अस्तित्वांत आल्या ही गोष्ट कोणास नाकबूल करतां यावयाची नाही. विराट् पुरुषाच्या शरीरापासून ज्या जाति निर्माण झाल्या त्यांची संख्या अवघी चार होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. या जातीविषयक चार नांवांवरून असें अनुमान काढण्यास हरकत नाही की, ज्या वेळीं जाति निर्माण झाल्या त्या वेळीं त्यांची संख्या अगदी अल्प म्हणजे चार होती. डोक्याचें काम करणारांची ब्राह्मण जात झाली. बाहूचें क्षात्रकर्म करणारांची क्षत्रिय जात बनली. उदीम-व्यापार व इतर बारीकसारीक कारागिरीचे धंदे करणारांची वैश्य जात पडली. ज्यांचा समावेश वरील तीन जातींत झाला नाही ते शूद्र गणले गेले. एके काळीं अस्तित्वांत आलेल्या या चार जातींना जर कालेंकरून निरनिराळ्या असंख्य फांद्या फुटल्या नसत्या, तर पोटजातींचें एकीकरण करा, असा उपदेश करण्याची पाळी कोणाला आली नसती. हल्ली पोटजातींची संख्या इतकी फुगली आहे की, चारपासून पांच हजारांवर गेलेली आहे. एवढ्या लहान लहान जाति असणें हें कधीहि इष्ट व हितावह नाही. चार किंवा चाळीस किंवा फार झालें तर एकशे-चाळीस जाति असणें निराळे व मनुष्यागणिक जात निराळी असणें हें निराळें होय.

जातीपासून नफा आहे, पण असंख्य जातींपासून नफ्यापेक्षा तोटाच फार जास्त आहे. ब्राह्मण जातीची विद्यमान स्थिति घ्या. तींत कमींत कमी दहा-पंधरा पोटभेद आहेत. ते म्हणजे कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, यजुर्वेदी, देवरुखे, किरवंद, खोत वगैरे होत. हे भेद होण्याची कारणें कोणतीं का असेनात, तीं धुंडाळून काढण्याच्या अनावश्यक कामांत वेळ व शक्ति खर्च न करतां या पोटजातींचें एकीकरण होऊं शकेल की नाही व तें होणें शक्य असल्यास तें घडवून अणण्याची दिशा कोणती, या प्रश्नाचा ऊहापोह करणें सध्याच्या स्थितीस जास्त हितावह आहे. ब्राह्मणांच्या जातींत जसे पोटभेद आहेत तसे ते इतर जातींतहि आहेत. गौड सारस्वत ब्राह्मणांत ते आहेत, प्रभु जातींत ते आहेत, दैवज्ञ जातींत ते आहेत, लोहारांत, कासारांत, भंडाऱ्यांत एकूण एक सर्व जातींत पोटजाति आहेत. या पोट-जातींचें एकीकरण होणें समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत इष्ट आहे. पोटजातींचें एकीकरण करण्यापूर्वी एक गोष्ट सर्वांनी लक्षांत ठेवली पाहिजे की, ज्या जातींचें एकीकरण करणें असेल त्यांची मायभाषा एक असली पाहिजे. ब्राह्मण जातींतील पोटजातींचें एकीकरण करणें म्हणजे दक्षिणी ब्राह्मणांचें व गुजराती ब्राह्मणांचें एकीकरण करणें नव्हे.

हिंदुस्थान हा एक देश व आपण सर्व देशबांधव आहोंत. हें मत राजकीयदृष्टचा कितीहि हितावह असलें, तरी तें सामाजिकदृष्टचा तितकें हितावह नाही, हें कोणीं विसरतां कामा नये. हिंदुस्थानांत जितक्या भाषा आहेत तितके निरनिराळे देश आहेत असें म्हणावयास हरकत नाही. म्हणून ज्या पोटजातींचें एकीकरण करणें असेल त्यांची मायभाषा एक असलीच पाहिजे. बंगाली, कनोजी, गुजराती, दक्षिणी व मद्रासी ब्राह्मणांचें एकीकरण आम्हांस नको आहे; कारण त्यांची मायभाषा एक नाही. ज्यांच्या मायभाषा भिन्न भिन्न असतात त्यांच्या आचारविचारांत तीव्र भिन्नत्व असतें. अशा भिन्न विचारांच्या व भिन्न आचारांच्या लोकांत एकीकरण करणें शक्य नाही व हितकारक नाही. बंगाली ब्राह्मणाचा वर व दक्षिणी ब्राह्मणाची वधू असा विवाह आम्हांस गोड वाटत नाही. म्हणून कोणत्याहि पोटजातींचें एकीकरण करण्यापूर्वी पहिली गोष्ट ही पाहिली पाहिजे की, त्यांची मायभाषा एक आहे किंवा नाही. मायभाषा एक असल्यावर मग त्यांचें एकीकरण होण्यास त्यांच्यांत आचारांचें साम्य आहे किंवा नाही ही दुसरी गोष्ट होय. इतर जातींविषयी आम्ही या लेखांत लिहीत नसल्यामुळे त्यांच्याविषयी विचार करण्याचें सध्या आम्हांस प्रयोजन नाही. ब्राह्मण जातींतील पोटजातींविषयी विचार केल्यास आम्हांस असें वाटतें की, त्यांच्यांत पोटजातींचें मिश्रण होण्यास कोणतीहि हरकत नाही.

कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे हा भेद वेदसंमत नाही. वेदकालीन भेद ऋग्वेदी, यजुर्वेदी असे आहेत. ऋग्वेदी, यजुर्वेदी यांच्यांत एकीकरण व्हावें किंवा नाही हा मुद्दा सध्या एका बाजूस ठेवून आम्ही एवढेंच म्हणतों की, ऋग्वेदी ब्राह्मणांत बेटीव्यवहार होण्यास कोणतीहि हरकत नाही. असें करण्यास शास्त्राचा निषेध नाही. कोकणस्थांत, देशस्थांत व कऱ्हाडचांत ऋग्वेदी ब्राह्मण आहेत. अशा लोकांत बेटीव्यवहार सुरू झाल्यास त्यापासून ब्राह्मण जातींतील पोटजातींचा एकजीव होऊन त्यापासून त्या जातींचें पुष्कळ हित होईल. ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी व अथर्ववेदी ब्राह्मणांची आपआपसांत लग्नें होण्यास विशिष्ट वेदाच्या अध्ययनाची आडकाठी कां यावी, हें आम्हांस कळत नाही. आर्टस् कॉलेजांत शिकलेल्या व सायन्स कॉलेजांत शिकलेल्या ब्राह्मणांत ज्याप्रमाणे हल्ली बेटीव्यवहार होतो त्याप्रमाणे निरनिराळ्या वेदांचें अध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांमध्ये बेटीव्यवहार होण्यास आमच्या मतें कोणतीहि हरकत नाही. आम्हांस लिहिण्यास आनंद वाटतो की, ब्राह्मण जातींतील सर्व पोटजातींत रोटीव्यवहार चालू राहतील. रोटीव्यवहाराप्रमाणेच जर बेटीव्यवहार सुरू करण्यांत आला, तर त्यापासून ब्राह्मणाला यत्किंचित कमीपणा येणार नाही, असें आम्ही खात्रीपूर्वक सांगतों.

अमुक अमुक एखादी पोटजात ब्राह्मण जातींतील आहे किंवा नाही असा वाद उपस्थित झाल्यास त्याचा निकाल श्रीशंकराचार्यांकडून लावून घ्यावा, पण ज्या पोटजातींच्या शुद्ध ब्राह्मणत्वाबद्दल वाद नाही अशा पोटजातींत बेटीव्यवहार सुरू

करण्यास ब्राह्मणांनी कां-कूं कां करावी, हें आम्हांस आश्चर्यकारक वाटतें. ब्राह्मण जातींतील कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे या फक्त तीनच जाति घेतल्या, तर या पोटजातींच्या ब्राह्मणत्वाबद्दल कोणालाहि शंका नाही. म्हणून या तीन पोटजातींत बेटीव्यवहार सुरू कां होऊं नये, याचें सकारण कारण आम्हांस तरी सापडत नाही. देशावर देशस्थ व कऱ्हाडे आणि कोकणांत कोकणस्थ व कऱ्हाडे यांच्यांत क्वचित् प्रसंगीं बेटीव्यवहार झाल्याचीं कांही उदाहरणें आहेत. अशा मिश्र विवाहापासून झालेली संतती ब्राह्मणत्वापासून च्युत झालेली आहे असें कधीहि समजण्यांत आलें नाही. म्हणजे असले मिश्र विवाह शास्त्रसंमत व लोकसंमत आहेत. पण हे असले मिश्र विवाह सर्वसाधारण नाहीत हें कबूल केलें पाहिजे. असें होण्याचें चारण आमच्या मताने एकच आहे व तें म्हणजे आमच्या हाडींमासीं खिळलेली रूढिबद्धता होय. आज कोणत्याहि ब्राह्मणाला विचारलें की, तूं कोकणस्थ-देशस्थांत बेटीव्यवहार होण्यास अनुकूल का प्रतिकूल आहेस, तर तो या प्रश्नाचें उत्तर अनुकूल म्हणून देईल. यावर त्याला प्रश्न करण्यांत आला की, तूं स्वतः असें लग्न करण्यास तयार आहेस का ? तर मात्र त्याची जिव्हा घोटाळूं लागेल. सारांश, ब्राह्मणवर्गांतील पोटजातींत विवाह करण्यास जरी कोणत्याहि ब्राह्मणाचें प्रतिकूल मत नाही, तरी असले विवाह घडून न येण्याचें कारण रूढिबद्धता होय. या रूढिबद्धतेवर एक उपाय म्हटला म्हणजे तिच्या उलट जाणें हा होय. रूढीला 'उलट करा' याशिवाय दुसरा कोणताहि उपाय नाही. पहिल्यापहिल्यांदा तुमचा उपहास होईल. लोक तुमची थट्टा करतील व तुम्हांस थोडाबहुत त्रास सोसावा लागेल. तरी पण थोड्याच अवधींत जाति-मत तुमच्या बाजूचें होऊन तुम्ही सुरू केलेली रूढि प्रचारांत येईल.

कोणतीहि नवीन सुधारणा अमलांत आणण्याची जोखीम सुशिक्षित लोकांवर आहे. त्यांनीच अशा कामांत पुढाकार घेतला पाहिजे. एखादी नवीन सुधारणा सर्वच एकदम करूं लागतील हें कधीहि संभवत नाही. बहुजनसमाज हा नेहमी एखादी नवीन गोष्ट सुरू करण्यास भितो एवढेंच नव्हे, तर तो जे कोणी अशी गोष्ट करण्यास प्रारंभ करतात त्यांच्या मार्गांत नसत्या अडचणी उत्पन्न करतो. नवीन सुधारणा अमलांत आणणाऱ्या लोकांची संख्या कमी असते. त्यांना प्रतिरोध करणाऱ्या जुन्या लोकांची संख्या अडगबंब असते. यामुळे अशा अल्प लोकांचें धैर्य गळून जातें व ते वारंवार माघार घेतात. "जाऊं द्या, आपल्या एकट्याच्याने काय होणार" असा विचार करून अशा कामीं पुढे पाऊल टाकण्यास उद्युक्त झालेले लोक मागे वळतात व बहुजनसमाजांत जाऊन मिसळतात. अशा वेळीं मानसिक धैर्याची अत्यंत आवश्यकता आहे. मी म्हणतों, तें न्याय्य, सत्य व पथ्य आहे, अशी मनाची बालंबाल खात्री झाल्यावर, तें करण्यास जो गृहस्थ कोणत्याहि प्रसंगीं माघार घेत नाही, त्याला 'वीर' ही पदवी देण्यास कोणतीहि हरकत नाही. मृत्तिकामय रणांगणावर दुष्ट शत्रूंशीं दोन हात करणारा योद्धा व मनोमन रणांगणावर दुष्ट

रूढींशीं दोन हात करणारा योद्धा हे आमच्या मताने एकाच प्रतीचे 'वीर' आहेत. पहिल्या प्रकारच्या रणांगणावर लढणाऱ्या योद्ध्याला जर शारीरिक जखमा सोसाव्या लागतात, तर दुसऱ्या प्रकारच्या रणांगणावर लढणाऱ्या योद्ध्याला मानसिक जखमा सोसाव्या लागतात. असो; कोणतीहि नवीन सुधारणा, मग ती धार्मिक असो, सामाजिक असो, वाङ्मयात्मक असो, औद्योगिक असो किंवा इतर कोणत्याहि प्रकारची असो, ती अमलांत आणण्याचें कर्तव्य सुशिक्षितांनी सर्वांच्या अगोदर बजावलें पाहिजे. म्हणून आमची ब्राह्मणजातीय सुशिक्षितांना अशी विनंती आहे की, त्यांनी पोटजातींत विवाहपद्धति सुरू करण्याचा उपक्रम करावा. "मी करीन, मग दुसरा करो अथवा न करो" हें तत्त्व मनाने बाळगून त्यांनी अशा कामीं पुढाकार घ्यावा.

सारांश, पोटजातींचें एकीकरण होणें इष्ट आहे व तें सुशिक्षितांनी सोदाहरण-पणाने घडवून आणलें पाहिजे. पोटजातींचें एकीकरण सामाजिकदृष्टया हितावह आहे व त्याचप्रमाणे तें राष्ट्रीयदृष्टया हितावह आहे, हेंहि प्रत्येकाने लक्षांत ठेवलें पाहिजे. ब्राह्मण जातींतील पोटजातींचें एकीकरण होऊन पुढील २५ वर्षें लोटल्या-नंतर मी कोकणस्थ ब्राह्मण, देशस्थ ब्राह्मण किंवा कऱ्हाडा ब्राह्मण असें कोणताहि ब्राह्मण न म्हणतां, मी नुसता ब्राह्मण आहे, अशी आपली जात सांगूं लागेल, अशी आम्हांस आशा आहे.

— भाला, दि. २१ मे १९१०

---

## ५०. टगे अथवा टोणगे

**आहार निद्रा भय मैथुनं च। सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ॥**
**ज्ञानं हि तेषांधिको विशेषो। ज्ञानेन हीनः पशुभिःसमानः ॥**

— भर्तृहरि

भर्तृहरि असें म्हणतात की, ज्ञानहीन नर पशुसमान आहेत. जगाला पशूंचा जितका उपयोग होत आहे तितकाच उपयोग त्याला ज्ञानहीन नरांचा होत असतो. एखाद्या देशांत जितकीं ज्ञानशून्य मनुष्यें असतील तितके त्या राष्ट्रांत जास्त पशु आहेत, असें म्हणण्यास हरकत नाही. चतुष्पाद पशूंमध्ये व ज्ञानशून्य अतएव द्विपाद पशु बनलेल्या मनुष्यांमध्ये यत्किंचितहि फरक नाही. राष्ट्राच्या दृष्टीने दोन्ही प्रकारचे पशु एकाच मासल्याचे होत; किंवा एका अर्थीं चतुष्पाद पशूंपेक्षा द्विपाद पशु कमी दर्जाचे होत. चतुष्पाद पशूंच्या हातून निरनिराळीं व्यक्तिक किंवा राष्ट्रीय

पापें होत नाहीत, तर स्वार्थामुळे ज्ञानशून्य मनुष्याच्या हातून अक्षम्य व अगणित पापें होतात. म्हणून एखाद्या देशांत चतुष्पाद पशूंची संख्या जास्त वाढली असतां त्यापासून अशा देशाचें नुकसान न होतां उलट त्या देशांतील शेतीचा नफाच होण्याचा संभव आहे. पण जरकरिता अशा राष्ट्रांतील ज्ञानशून्य द्विपाद पशूंची संख्या फुगली, तर त्यापासून अशा हतभागी राष्ट्राचें वाटोळें झालेंच म्हणून निःसंशय समजावें. ज्ञानशून्य माणसासारखी घातुक व हिंस्र जनावरें पत्करलीं, पण ज्ञानशून्य टोणगे मात्र कधीहि सहन करतां यावयाचे नाहीत. ज्ञानशून्य टोणगे आपल्या पोटाची खळगी भरण्याकरिता आपल्या शिगांनी कोणाला व केव्हा हुंदडून देतील याचा नेम नाही.

निसर्गदेवाचीं हिंस्र जनावरें मनुष्यवस्तीपासून लांब दूर रानांत राहतात, पण ज्ञानशून्य टोणगे हे इतर माणसांच्या वस्तींत नेहमी राहून सदोदित त्यांच्याकडे आपलीं शिगें त्यांना मारण्याकरिता रोखून ठेवतात. ज्ञानहीन टोणग्यांची प्रवृत्ति नेहमी वरच्याप्रमाणे घातुक असल्यामुळे ती सुधारून त्यांना सुवृत्त माणसें करण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक सुशिक्षिताचें आद्य कर्तव्य आहे. नैसर्गिक हिंस्र जनावरांचा हिंस्रपणा त्यांच्या हाडींमासीं खिळलेला असल्याकारणाने तो अजीबात किंवा कांही प्रमाणाने नाहीसा करणें हें मनुष्याच्या आवाक्याच्या बाहेर आहे. पण परिस्थितीमुळे ज्ञानहीनता अंगीं मुरल्यामुळे आलेला हिंस्रपणा हा आगंतुक स्वरूपाचा होय. म्हणून तो अजीबात किंवा कांही प्रमाणाने नाहीसा करणें प्रयत्नाधीन आहे. यासाठी ज्ञानहीन टोणग्यांना ज्ञानपूर्ण मनुष्याच्या कोटींत आणण्याचा प्रयत्न करणें व नेहमी शक्य व त्याचप्रमाणे राष्ट्राच्या दृष्टीने हितकर आहे. ज्ञानशून्यताजन्य हिंस्रपणा नष्ट करण्यास रामबाण उपाय म्हटला म्हणजे शिक्षण होय. जसजशी शिक्षणाची मात्रा अंतःकरणांत मुरली जाते तसतसा त्यांतील हिंस्रपणा कमी कमी होत जातो. म्हणून ज्या सुशिक्षितांना व देशभक्तांना या कामीं प्रयत्न करावयाचे असतील त्यांनी इतर सुधारणांच्या अगोदर शिक्षणाला हातीं घ्यावें व त्याचा शक्य तितका फैलाव करण्याचा प्रयत्न करावा. हल्ली हिंदुस्थानांत अशा ज्ञानशून्य टोणग्यांची संख्या शेकडा ८० आहे. कमींत कमी चोवीस कोटि टोणगे या भरतभूमींत हुंदडत आहेत. या टोणग्यांच्या वरील अगडबंब संख्येमुळे हिंदुस्थानची लोकसंख्या ३० कोटीपर्यंत गेलेली दिसते; पण आमच्या मताने तो भ्रम आहे. ज्ञानशून्य टोणग्यांना आकारसादृश्यामुळे मनुष्यें म्हणण्यास आम्ही तरी तयार नाही. मनुष्यत्व प्राप्त होण्यास नुसती मनुष्याकृति असून उपयोग नाही, तर मनुष्याच्या कोटींत समावेश होण्यास ज्ञानपूर्ण हृदय असावें लागतें. अशी ज्ञानपूर्ण हृदयें ज्यांच्या फुप्फुसांत टकटक करीत असतील तीच खरी माणसें होत व त्यांच्याचपासून राष्ट्राचें किंबहुना सर्व जगाचें हित असतें. अशीं ज्ञानपूर्ण हृदयें उत्पन्न करण्यास सुलभ उपाय म्हटला म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. हें प्राथमिक

शिक्षण राष्ट्रांतील यच्चयावत् लोकांना, पुरुषांना व स्त्रियांना देण्यांत आलें पाहिजे, नव्हे तें त्यांच्या घशांत गोडीने, लवाडीने किंवा थपडीने ओतलें गेलें पाहिजे. प्राथमिक शिक्षणाचा अमृततुल्य रस राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या हृदयांत ओतला जाईल यासाठी जो वाटेल तो सक्तीचा किंवा खुषीचा उपाय योजला गेला, तरी त्याबद्दल कोणालाहि वाईट वाटण्याचें किंवा कुरकूर करण्याचें कारण नाही.

प्राथमिक शिक्षणाची निकडीची आवश्यकता आहे याबद्दल मतभेद नाही. नुकताच हा प्रश्न ना. गोखले यांनी वरीष्ठ कौन्सिलांत काढला होता व जरी त्याचा निकाल समाधानकारक रीतीने लागला नाही, तरी प्राथमिक शिक्षणाबद्दल सरकारची पूर्ण सहानुभूति आहे, ही गोष्ट उत्साहकारक आहे. जर पुरेसा पैसा मिळेल तर सरकार सर्वांना प्राथमिक शिक्षण देण्यास एका पायावर तयार आहे. पण सरकारला जी कांही अडचण येऊन पडली आहे ती पैशाची आहे. सरकारला ही अडचण सहज दूर करतां येण्यासारखी आहे. निरनिराळ्या खात्यांत होणाऱ्या खर्चांत काटकसर करून शिक्षणाला लागणारा पैसा सरकारला सहज मिळवतां येईल. पण इतर खात्यांत काटकसर करून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यास सरकार तयार नाही. जर सरकारला दुसऱ्या कोणत्याहि मार्गाने पैसा मिळू शकला, तर सरकार सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न हातीं घेण्यास तयार आहे. पैसा मिळवण्याचा आम्हांस एक मार्ग दिसत आहे. पण तो उपाय अमलांत आणण्यापूर्वी आम्हीं सुचविलेल्या मार्गापासून उत्पन्न होणारा पैसा शिक्षणाकडेच खर्चला जाईल अशाबद्दल सरकारने प्रजाजनांना अभिवचन दिलें पाहिजे. कांही लोकांनी असा एक मार्ग सुचविला आहे की, दारूपासून उत्पन्न होणारा पैसा शिक्षणाकडे लावा. ही सूचना बहुमोल आहे, पण ती सरकारास पसंत पडत नाही. दारूचें ९–१० कोटींचें उत्पन्न सरकार आपल्या हातचें गमावूं इच्छित नाही. असो; सरकारच्या हल्लीच्या उत्पन्नांतून एकहि दमडी न मागतां आम्ही सरकारजवळ जे कांही मागत आहोंत तें एवढेंच की, त्याने प्रजाजनांना वरील प्रकारचें स्पष्ट अभिवचन द्यावें. पैसा मिळण्याचा आम्ही जो मार्ग सुचविणार आहोंत तो कराच्या स्वरूपाचाच असणार हें उघड आहे. पण त्या कराचा उपयोग शिक्षणासारख्या पवित्र कार्याकडे होणार आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे तो कर देण्यास कोणी कां-कूं करणार नाही, अशी आमची समजूत आहे. आम्हांस ही गोष्ट कबूल आहे की, लोकांना दिवसेंदिवस दारिद्र्य येत चाललें आहे व त्यांच्यावरील करांचा बोजा वाढत आहे. तरी पण त्या बोजावर आम्ही म्हणतों तें लहानसें गाठोडें लोकांनी आनंदाने घ्यावें अशी त्यांना आमची अत्याग्रहाची विनंती आहे.

प्राथमिक शिक्षणाला अवश्य लागणारा पैसा वसूल करण्यास आमच्या मताने माणशीं एक रुपयाचा वार्षिक डोईपट्टीचा कर बसविण्यांत यावा. माणशीं रुपया याप्रमाणे डोईपट्टी जर वसूल करण्यांत आली, तर एकदशांश उत्पन्न खर्चासाठी कमी

करून दरसाल २५ पासून २७ कोटि रुपये सहज जमूं शकतील. एवढी मोठी रक्कम दरसाल जमल्यावर प्राथमिक उच्च प्रतीचें शास्त्रीय व आणखी हरएक प्रकारचें शिक्षण देण्यास पैशाचा तुटवडा कधीच पडणार नाही. यावर कोणी अशी शंका घेतील की, प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत सरकारच्या तोंडाकडे न बघतां लोकांनी स्वतःच कंबरा कसाव्यात. वर्गण्या करून लोकांनी पैसे गोळा करावेत व त्यांतून खाजगी शाळा चालवाव्यात. सूचना वाईट नाही, पण ती अमलांत आणणें शक्य नाही. प्राथमिक शिक्षणाच्या शाळा सरकारने चालविल्या काय किंवा त्या लोकांनी चालविल्या काय, दोहोपासून परिणाम एकच होणार आहे. लोकांनी स्वतःच्या शाळा चालवाव्यात व त्यांच्या खर्चासाटी स्वतःस स्वतःवर डोईपट्टी बसवून घेऊन तिच्या उत्पन्नांतून अशा शाळांचा खर्च भागवावा. ही सूचना दिसण्यांत सयुक्तिक दिसते, पण तींत एक गोम आहे ती ही की, सरकारने डोईपट्टीचा कायदा केला म्हणजे तो मनुष्य ती वेळेवर विनतक्रार देईल. पण लोकांचे पुढारी डोईपट्टीची रक्कम 'वर्गणी' म्हणून मागण्यास गेले म्हणजे मग अनेक सबबी व शेकडो तक्रारी पुढे करण्यांत येतील. या फरकामुळे लोकांनी प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापन केल्यास त्यांना पैशाचा तुटवडा पडेल व त्यामुळे त्या स्थापन झाल्यापासून वर्ष-दोन वर्षांच्या आंत बंद पडतील. प्राथमिक शिक्षणाची एक शाळा चालविण्यास दरमहा पंधरा रुपयांचा खर्च आहे. एका शिक्षकाचा पगार दरमहा १० रुपये व अवांतर खर्च दरमहा ५ रुपये. म्हणजे एखाद्या खेडेगावांत एक प्राथमिक शिक्षणाची शाळा चालविणें म्हणजे दरसाल १८० रुपयांपासून २०० रुपयांपर्यंत खर्च करण्यासारखे आहे. कोणत्याहि खेडेगावांत दोनशे लोकांची वस्ती असूं शकते. म्हणजे सालाची एक रुपया डोईपट्टी बसविण्यांत आली म्हणजे प्रत्येक खेडेगाव आपल्या प्राथमिक शिक्षणाची सोय सहज करूं शकेल. इतर प्रकारच्या शिक्षणाला थोडीबहुत मदतहि देऊं शकेल. सरकारने डोईपट्टीचा कर बसविल्यावर २०० रुपये जमिनीच्या साऱ्याबरोबर मिळूं शकतील. पण तीच रक्कम लोकांचे पुढारी 'वर्गणी' म्हणून मागूं लागतील, तर ती दरसाल राहोच, पण दहा वर्षांनी तरी जमेल किंवा नाही याची आम्हांस शंका आहे. या गोष्टीचा आम्हांस प्रत्यक्ष अनुभव आला आहे.

आमच्या पुणें जिल्ह्याच्या हवेली तालुक्यांत सिंहगडच्या पायथ्याशीं 'आर्वी' म्हणून एक गाव आहे. त्या गावीं दर माणशीं दर महिना १ पैसा वसूल करून त्या रकमेंतून एक प्राथमिक शाळा चालविण्याचा प्रयत्न करण्याचें आम्हीं मनांत आणलें. गावीं जाऊन चार-चौघांचीं मतें घेतलीं. कोणीहि आमच्या सूचनेस मान्यता देईना. 'आम्ही गरीब' म्हणून कांहींनी तक्रार केली, 'आम्हांस शिक्षण कशाला' म्हणून कांहींनी सबब सांगितली व त्यांतहि जे कोणी वस्ताद होते त्यांनी आमच्यावरच कुरघुडी करून "दादा, तुम्ही एकटेच कां खर्च करतां ? तुम्हांला काय भीक लागली आहे, वकिलींत मस्त पैसा मिळतो आहे" असे उद्‌गार काढून त्यानी आमच्या

तोंडाला कुलूप लावलें. सारांश, डोईपट्टी वर्गणीच्या रूपाने कधीहि वसूल व्हावयाची नाही. ती कराच्याच रूपाने वसूल करण्यांत आली पाहिजे. प्रत्येक खेडेगावांत शाळा असलीच पाहिजे व अशी स्थिति ज्या दिवशीं हिंदुस्थानांत दृष्टीस पडेल तो दिवस भाग्याचा होय. प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यापूर्वी तें मिळण्याची सोय प्रथम झाली पाहिजे. ही सोय कशी करण्यांत यावी हें आम्हीं वर दाखविलेंच आहे.

प्रत्येक खेडेगावांत शाळा घालून तिचा खर्च चालविणें हें वर्गणीच्या पैशाने होणें शक्य नाही. जिल्ह्यांत दहा तालुके व प्रत्येक तालुक्यांत शंभर खेडेगावें याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यांत कमींत कमी हजार खेडेगावें असतात. प्रत्येक खेडेगावांत एक शाळा व तिला अगदी कमींत कमी शंभर रुपयें खर्च म्हणजे लोकांकडून प्राथमिक शिक्षण मिळण्यास प्रत्येक जिल्ह्यांत दरसाल कमींत कमी १ लाख रुपये वर्गणीच्या द्वारें वसूल झाले पाहिजेत. आमच्या मताने हें शक्य नाही. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होण्यास तें सरकारनेच आपल्या हातीं घेतलें पाहिजे व तें सरकारने सक्तीचेंच केलें पाहिजे. हे दोन मुद्दे लक्षांत घेऊन बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव यांनी आपल्या राज्यांत प्राथमिक शिक्षण सुरू केलें आहे व त्यांच्या प्रयत्नाला बरेंच यश येऊं लागलें आहे. प्राथमिक शिक्षणाच्या कामीं लोकांकडे बोट दाखवून त्यांना स्वावलंबनाचें तत्त्व सांगण्यांत अर्थ नाही. अशा कांही गोष्टी असतात की, ज्या सरकारनेच केल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, लष्करखातें, पोलिसखातें, पोस्टखातें वगैरे खातीं होत. त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षणाचें खातें सरकारनेच आपल्या हातीं घेऊन तें चालविले पाहिजे. फार झालें तर लोक एखादें कॉलेज चालवतील, पण हजारो शाळा चालविणें हें लोकांच्या शक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे. लोकांनी ती न केली तर त्यांना दोष देण्यांत अर्थ नाही.

प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्यास अनेकांनी अनेक उपाय सुचविले आहेत. कोणी असें म्हणतात की, रामदासी लोकांनी किंवा समाजाच्या दातृत्वावर उपजीविका करणाऱ्या इतर लोकांनी हें हातीं घ्यावें. रामदासी काय किंवा वारकरी काय किंवा इतर संभावीत अथवा असंभावीत भिक्षेकरी काय, सर्व एकाच माळेचे मणी असून, कोणाच्याहि अंतःकरणांत देशभक्तीचा यत्किंचितहि ओलावा नसतो. हे लोक धार्मिक पैशाचा दुभत्या गाईप्रमाणे उपयोग करतात. रामदासी भगवीं वस्त्रें परिधान करतो त्याचें कारण त्याला निरनिराळ्या विषयांचा वीट आला नसून, तीं वस्त्रें त्याचें फुकट पोट भरतात हें होय. हीच स्थिति इतरांची होय. दिवसभर टाळ कुटीत बसण्याऐवजी व 'ज्ञानोबा-तुकाराम' यांचा गजर करण्याऐवजीं दिवसांतून एक तासभर तो बंद ठेवून तो वेळ शिक्षणाच्या कामीं लावल्यास हरिभजनाचें पुण्य निःसंशय पदरीं पडेल, अशी आमची समजूत आहे. पण आमच्या भरतभूमीचें दुर्भाग्य असेंच आहे की, येथे हितकर अशी गोष्ट कोणास करावयाची नाही, असें जणू काय ठरल्यासारखेंच झालें आहे. निरनिराळ्या मठांतील

बुवांनी भजनाबरोबर जर शिक्षण देण्याचें काम केलें, तर त्यांच्या आयुष्याचा हल्लीपेक्षा जास्त उपयोग होईल, असें आम्हांला वाटतें. साधु-संतांच्या पुण्यतिथि पाहव्यात तर सर्व पैसा जेवणांत खर्ची पडतो. कोणती पुण्यतिथि चांगली झाली तर जींत जास्ती पानें जेवलीं व जेवण्याचा बेत उत्तम राहून, तुपाचा तोटा शेवटल्या पंक्तीपर्यंत आला नाही ती. मग मठाच्या भोवतीं दहा-वीस कोस पसरलेल्या मुलखांत अज्ञानरूपी दाट व निबिड अरण्य माजून राहिलें तरी त्याची पर्वा नाही. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत, रामदासी, वारकरी किंवा इतर भोजनभाऊ यांचा उपयोग होईल, अशी कोणींहि आशा करूं नये.

प्राथमिक शिक्षण देण्याची कल्पना नवीन आहे व ती नवीन विचारांच्या लोकांच्या हातूनच अमलांत येण्याचा संभव आहे. या बाबतींत रामदासी कुचकामी व वारकरी साधु-संत कवडीमोल होत. हें शिक्षण पदवीधरांनी हातीं घ्यावें अशी सूचना कांही लोक करीत आहेत. आम्हांस या सूचनेचा अर्थच कळत नाही. पदवीधरांचा उपयोग 'बेकंबे' शिकविण्याच्या कामी करण्यांत यावा अशी सूचना करणाऱ्या माहात्म्यांची व अकलेची ताटातूट फार दिवसांपासून झालेली असावी, असें अनुमान करण्यास कोणतीहि हरकत नाही. तिसरी एक अशी सूचना आहे की, प्रत्येक खेडेगावांत कांही ब्राह्मण निरुद्योगी असतात. अशांच्या गळचांत हें काम घालण्यांत यावें म्हणजे फारसा पैसा न पडतां हें कार्य होण्यासारखें आहे. सूचना चांगली आहे, पण ती अव्यवहार्य आहे. ज्या गावचा मनुष्य त्याच गावीं नेमण्यांत आला म्हणजे मग त्याची चैन होईल, पण तो आपलें काम किती इमानेइतबारें करील, याबद्दल आम्हांस शंका आहे. दरमहिना पहिल्या तारखेस पगाराचे पांच रुपये बिनतक्रार घरीं चालत येतात हे पाहून अशा स्वारीच्या चंचीला मात्र बाळसें येईल व त्याचबरोबर शाळेला क्षयाची भावना येईल. नेहमी व उत्तम तऱ्हेने काम करून घ्यावयाचें असेल, तर त्याला भरपूर पगारावर पगारी माणसेंच नेमण्यांत आलीं पाहिजेत व त्यांच्याकडून बरोबर रीतीने काम करून घेण्यास इन्स्पेक्टर्स नेमण्यांत आले पाहिजेत. अशी चोख व्यवस्था न करतां सर्वच कारभार भोंगळपणें करण्यांत आला, तर थोड्याच दिवसांत ओंफस झाल्याशिवाय राहणार नाही.

आम्हीं दोन वर्षांपूर्वी एक मार्ग सुचविला होता, पण तोहि यशस्वी झाला नाही. प्रत्येकाने पांच किंवा निदान एका मनुष्याला प्राथमिक शिक्षण द्यावें व मी दुसऱ्या पांचांना निदान एकाला प्राथमिक शिक्षण देईन अशी त्याच्याजवळून शपथ घ्यावी. हा उपाय बिनखर्चाचा आहे, पण तो त्रासाचा आहे. या उपायांत अंगमेहनत जास्त पडते. पण ती घेण्यास हल्लीच्या काळीं कोणी तयार नाही. मायभाषा लिहावयास व वाचावयास शिकविणें यालाच आम्ही प्राथमिक शिक्षण म्हणतों. हें शिक्षण आमच्या उपायाने बिनखर्चाचें होण्यासारखें आहे. पण याला जी अंगमेहनत लागते ती करण्यास कोणी तयार नसतो. वर्गणी मागावी तर गरिबीची सबब पुढे येते.

सारांश, प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न लोकांकडून सुटण्यासारखा नाही. मग ना. गोखले तो हातांत घेवोत अगर ना. जोशी तो हातांत घेवोत. मेहनत करणारे किंवा वर्गणी देणारे लोक दुर्मिळ आहेत. यासाठी हा प्रश्न सरकारनेच हातीं घेतला पाहिजे. याला लागणारा पैसा कसा वसूल करावा याबद्दल आम्हीं एक उपाय सुचविला आहेच. शेवटीं सरकारास आमची अशी विनंती आहे की, "प्राथमिक शिक्षण सक्तीचें करा व तें देण्यास लागणारा पैसा अन्य मार्गानें मिळत नसल्यास डोईपट्टी बसवा, पण प्राथमिक शिक्षण द्याच द्या. तें देण्याचें लांबणीवर टाकूं नका. कारण हरएक प्रकारच्या सुधारणांचा पाया शिक्षण आहे. तोच जर रचण्यांत आला नाही, तर वरील इमारत बांधण्याचें काम तहकूब पडेल." प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होऊन टोणगेवजा असलेले पंचवीस कोटि हिंदी लोक 'टगे' बनले म्हणजे मग भरतमभूमीचें भाग्य हां-हां म्हणतां उजाडेल हें आम्हीं सांगावयास नको. हिंदी लोकांना टोणग्याचे टगे करण्यास प्राथमिक शिक्षणाशिवाय आम्हांस अन्य मार्ग तूर्त तरी दिसत नाही.

– भाला, दि. १ जून १९१०

---

## ५१. आर्य वैद्यक

मनुष्यजाति अस्तित्वांत आल्यापासून तिच्यापाठीमागे अनेक रोगांचा ससेमिरा लागलेला आहे. हे रोग बरे करून प्रकृतीला आरोग्य व स्वास्थ्य देण्याच्या हेतूने वैद्यकशास्त्र अस्तित्वांत आलें. मनुष्यजातीला वैद्यकशास्त्राची आवश्यकता व महती इतर शास्त्रांपेक्षा शतपटींनी जास्त आहे. इतर शास्त्रें अस्तित्वांत न येतीं किंवा त्यांची वाढ न होती, तर मानवजातीचें तितकें अडून राहिलें नसतें. पण जर-करिता वैद्यकशास्त्राची प्रगति हल्लीइतकी झाली नसती, तर मनुष्यजातीच्या व्याधि-जन्य दुःखाला सीमा राहिली नसती. असें समजा की, कोणतेंहि भौतिकशास्त्र आज पृथ्वीतलावर अस्तित्वांत नाही. अशी स्थिति असती तर एवढेंच झालें असतें की, सुधारणेचीं कांही कांही अंगें आज दृष्टीस पडलीं नसतीं. आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें, दुर्बिण्या, मशिन-तोफा, बिनतारेचें तारायंत्र, बिनधुराची दारू व आणखी शेकडो लहानमोठ्या गोष्टी तशा स्थितींत आज दृग्गोचर झाल्या नसत्या. पण असें झालें असतें, तर त्यापासून एवढाच परिणाम झाला असता की, मनुष्यजातीच्या सुखांत थोडी कमी भर पडली असती. पण त्या गोष्टींच्या अभावामुळे मनुष्यजातीला

दुःख सोशीत बसावें लागतें असें कांही नाही. पण जर वैद्यकशास्त्राचा जन्म व वाढ झाली नसती, तर मात्र मनुष्यजातीवर रडत बसण्याचा प्रसंग सदैव आला असता.

आगगाडीची सोय नसती, तर लोकांनी पायांनी किंवा बैलगाड्यांनी प्रवास केला असता. पण जर बस्तीची युक्ति माहीत नसती, तर पोट फुगून रोग्याला तळमळून मरण्याची पाळी आली असती. जर तारायंत्राचें ज्ञान जगाला नसतें, तर जासुदाच्या किंवा सांडणीस्वाराच्या हातून निरोप पाठविले गेले असते. पण लघवी बंद झाल्यावर 'कॅथिटर' घालून ती खुली करण्याचें ज्ञान जर उपलब्ध नसतें, तर अगं आई करून विवळत विवळत मरण्याचा प्रसंग पुष्कळ रोग्यांवर आला असता. मूतखडा काढणें, काचबिंदु काढणें, सरकलेलें हाड मूळच्या जागेवर बसविणें व आणखी शेकडो वैद्यकीय शोधांमुळे मानवजातीवर अनंत उपकारच झाले आहेत. वैद्यकशास्त्रासारखें उपकारी शास्त्र दुसरें कोणतेंहि नाही. म्हणून या शास्त्राची जितकी वाढ होईल, तितकें तें जास्त हितावह आहे. वैद्यकशास्त्र निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या पद्धतीने अवतीर्ण झालें आहे. आपल्या हिंदुस्थान देशांत तें वात, पित्त व कफ या त्रयीच्या पायावर रचलेलें आहे. अश्विनीकुमारापासून आर्य वैद्यकाचें ज्ञान ऋषींना झालें आहे असा इकडे लोकांचा समज आहे. हा समज खरा असो वा खोटा असो, त्याची चर्चा करण्याची जरुरी आज आपणांस नाही. आपणांस सध्या जे कांही पाहवयाचें आहे तें हें आहे की, या भरतभूमींत आज हजारो वर्षें आर्य वैद्यक शिकलें व शिकविलें जात आहे. हजारो वैद्यांनी त्याचा जन्मभर अभ्यास करून त्याच्या साहाय्याने लाखो रोग्यांना आरोग्याचा लाभ करून दिला आहे. अशा या प्राचीन कालापासून चालत आलेल्या आर्य वैद्यकाची वाढ व भरभराट जेणेंकरून होईल असे उपाय योजणें हें लोकांचें व त्याचप्रमाणे सरकारचें कर्तव्य आहे.

इंग्रजी राज्याला प्रारंभ होण्यापूर्वी हिंदुस्थानांतील रोगी वैद्यांच्या व क्वचित् प्रसंगीं हकिमांच्या हातूनच बरे झालेले आहेत. आर्य वैद्यकाचा व आंग्ल वैद्यकाचा अभ्यास जो कोणी काळजीपूर्वक करील, त्याला एवढें कबूल करावें लागेल की, औषधाच्या बाबतींत आर्य वैद्यक आंग्ल वैद्यकाला कोणत्याहि प्रकारें हार जाणार नाही. शस्त्रप्रयोगाच्या ज्ञानांत आंग्ल वैद्यकाची आर्य वैद्यकावर सरशी आहे, ही गोष्ट प्रत्येकाला कबूल आहे. पण आंग्ल वैद्यकाची ही सुधारणा १९ व्या शतकांतील आहे. १८ व्या शतकांतील दोन्ही वैद्यकांची तुलना केल्यास प्रत्येक बाबतींत आर्य वैद्यकाचीच सरशी दृष्टीस पडेल. पण १९ व्या शतकांत हा मनु पालटला व इतर बाबतींप्रमाणे आर्य वैद्यकाचीहि पीछेहाट झाली आहे. आर्य वैद्यकाची पीछेहाट होण्याचें कारण सरकारी आश्रयाचा अभाव होय. स्वदेशी राजसत्तेच्या लयाबरोबर स्वदेशी आर्य वैद्यकाचाहि लय झाला. हा एक सार्वत्रिक व सर्वकालीन नियम आहे की, ज्या गोष्टीला राजाश्रय नसतो, ती गोष्ट रोडावणीस लागते. तशांत जर अशा गोष्टीची जागा भरून काढण्यास राजे लोकांची दुसरी गोष्ट असली म्हणजे मग अशा

स्वदेशी गोष्टीची नुसती पीछेहाट होऊन न राहतां ती जनसमुहाच्या दृष्टीने तिरस्करणीय होऊं लागते. हाच नियम आर्य वैद्यकाच्या बाबतींत खरा झाला आहे.

राजाश्रयाच्या अभावामुळे आर्य वैद्यकाची अवनति झाली व आंग्ल वैद्यकाच्या चढत्या कमानीमुळे तें लोकांना तिरस्करणीय वाटूं लागलें आहे. राजाश्रयाच्या अभावामुळे वैद्य लोकांचा चरितार्थ उत्तम तऱ्हेने न चालल्यामुळे ते लोक पूर्वीप्रमाणे त्या शास्त्रांत पारंगत होईनात. या कारणामुळे आर्य वैद्यकाची व त्याचप्रमाणे युनानी वैद्यकाची गेल्या शतकांत पुरी पीछेहाट झाली आहे. हल्लीच्या स्वदेशी चळवळीच्या दिवसांत आर्य वैद्यकाची ऊर्जितावस्था होईल अशी अल्पशी आशा वाटावयास लागली होती, पण दुःखाची गोष्ट ही आहे की, त्यांतहि आशेची निराशा झाली आहे. आधी आर्य वैद्यक खालावलें आहे व त्यांत आणखी खालावलें जाण्याचा रंग दिसूं लागला आहे. ही भीति वाटण्याचें कारण मुंबईंतील डॉक्टर लोकांनी मुंबई सरकारला डॉक्टर लोकांचीं नांवें रजिस्टर करण्यांत यावीं, अशी केलेली विनंती होय. आजकाल डॉक्टर लोकांची अशी समजूत झालेली आहे की, वैद्यकशास्त्रांत त्यांच्याशिवाय इतरांना शास्त्रीय ज्ञान बिलकुल नाही. वैद्य, हकीम वगैरे लोकांचें ज्ञान सशास्त्र रीतीने व सोपपत्तिक रीतीने मिळविलेलें नसते, असें डॉक्टर लोकांचें म्हणणें आहे. डॉक्टर लोक, वैद्य व हकीम लोकांना 'क्वॅक्स' (quacks) म्हणतात. कोणत्या तरी दोन-चार वनस्पति एके ठिकाणीं करून व रोगाची कांही तरी परीक्षा करून औषधयोजना करावी, मग गुण आल्यास रोग्याचे नशीब, या पद्धतीला 'क्वॅकरी' म्हणतात. वैद्य व हकीम लोक या पद्धतीचे अनुयायी आहेत, असा अहंमन्य एल्. एम्. अँड एस्. पसार झालेल्या डॉक्टरांचा वैद्यांवर आरोप आहे. हा आरोप सर्वथैव निराधार आहे, हे सिद्ध करण्यास फारसें विवेचन लागणार नाही. कांही कांही बाबतींत डॉक्टरांचें ज्ञान वैद्यापेक्षा जास्त असतें हें आम्हांस कबूल आहे. पण त्याचप्रमाणे दुसऱ्या कांही बाबतींत त्यांचें ज्ञान वैद्यांच्या ज्ञानापेक्षा कमी असते, हेंहि सिद्ध करून देतां येईल. वैद्य व हकीम हे लोक म्हणजे अगदी टाकावू अशांतला भाग नाही. जे रोग असाध्य म्हणून डॉक्टर लोकांनी आपलीं मतें दिलीं होतीं असे पुष्कळ रोग वैद्यांनी व हकीमांनी आश्चर्यकारक रीतीने बरे केल्याची उदाहरणें प्रत्येकाचीं थोडीबहुत असतीलच. यासाठी वैद्य लोकांबद्दल व हकीमांबद्दल डॉक्टर लोकांच्या मनांत जो क्षुद्र भाव आहे, तो आमच्या मताने रास्त नाही. ज्याप्रमाणे आर्य वैद्यक पद्धति कांही कांही बाबतींत सदोष आहे, त्याचप्रमाणे आंग्ल वैद्यक पद्धतहि सर्व बाबतींत निर्दोष आहे असें नाही. हें कोणासहि कबूल करावें लागेल की, वैद्य लोक देशी औषधे वापरतात व त्यामुळे ते देशाचा पुष्कळ नफा करतात. हा गुण डॉक्टर लोकांत नाही. वैद्य लोक आपली औषधें स्वतः देशांतच तयार करतात. डॉक्टरांना ती परदेशांतून आयतीं तयार केलेलीं आणावीं लागतात. जरकरिता डॉक्टरांची औषधें परदेशांतून इकडे येण्याची बंद झालीं, तर त्यांना

आपला गाशा गुंडाळावा लागेल. वैद्य लोकांचा तिसरा गुण हा आहे की, ते येथीलच वनस्पति औषधांत वापरीत असल्यामुळे त्यांच्या औषधांपासून गुण येण्याचा जास्त संभव आहे. असा गुण भिन्न हवेच्या व भिन्न उष्णतेच्या देशांत वाढलेल्या वनस्पतींपासून येण्याचा कमी संभव आहे.

सारांश, उत्तम रीतीने पढलेल्या व चौकस बुद्धीच्या वैद्यांपासून रोगी लोकांना जितका नफा होण्यासारखा आहे, तितका डॉक्टर लोकांपासून नाही. वैद्यलोक डॉक्टर लोकांपेक्षा वास्तविक रीतीने श्रेष्ठ असतां, लोकांची भक्ति त्यांच्यावरून उडली जाण्याचीं कारणें आमच्या मताने दोन-तीन आहेत. सर्वांत पहिलें कारण हें की, राज्यकर्त्यांच्या मताने आर्य वैद्यकाला मुळीच किंमत नाही. "राजा कालस्य कारणम्" या न्यायाने जी गोष्ट किंवा जें शास्त्र शास्ते लोकांना पसंत नसतें ती गोष्ट व तें शास्त्र जित लोकांनाहि आवडत नाहीसें होतें. त्यामुळेच वैद्याला कोणी सुशिक्षित मनुष्य पाचारण करीत नाही. जवळ दोन पैसे जास्त असले की, त्याने सिव्हिल सर्जनकडे धांव घेतलीच म्हणून समजावें. हें जरी मुख्य कारण आहे, तरी दुसरें एक तितकेंच मोठें कारण आहे. तें हे आहे की, हल्ली जो उठतो तो 'जगप्रसिद्ध' वैद्य बनतो. "मागतां येईना भीक, तर वैद्यकी करायला शीक" ही म्हण हल्ली पुष्कळ प्रमाणाने खरी ठरूं पाहत आहे. आर्य वैद्यकावर अगदी लहान ग्रंथ वाग्भटाचा आहे ना, तरी पण त्याचा साग्र अभ्यास केलेले वैद्य फारच थोडे आढळून येतात. जे कोणी वैद्य पढलेले आहेत, त्यांना सुशिक्षित लोकहि प्रसंगीं पाचारण करतात. पण वैद्य होण्यास कोणतीहि परीक्षा द्यावी लागत नसल्यामुळे ज्याने त्याने उठावे व वैद्याची पाटी दरवाजावर टांगावी व जें वाटेल तें औषध द्यावें असा गोंधळ होण्याचें कारण आर्य वैद्यकाचें अज्ञान नसून, तें आर्य वैद्यांचें अज्ञान होय.

जर एखादा मनुष्य चरक, सुश्रुत, माधव, वाग्भट या चार सर्वमान्य ग्रंथांचें अध्ययन न करतां वैद्य म्हणून मिरवूं लागला व लोक त्याच्याजवळून औषधें घेऊन फसूं लागले, तर तो दोष आर्य वैद्यकाचा निःसंशय नाही. वरती निर्दिष्ट केलेल्या ग्रंथांचें परिशीलन जर काळजीपूर्वक करण्यांत आलें, तर असा पढलेला वैद्य एल्. एम्. अ‍ॅण्ड एस्.ची परीक्षा दिलेल्या डॉक्टरांपेक्षा शस्त्रप्रयोगाशिवाय इतर बाबतींत कमी ठरेल, असें आम्हांस वाटत नाही. ज्या रोगांत शस्त्रप्रयोग करावे लागतात, असे रोग शेकडा दहाच असतात. बाकीच्या ९० रोगांत नुसत्या पोटांत घेण्याच्या किंवा वर लावण्याच्या औषधांचीच जरूरी पडते. तिसरें कारण असें आहे की, लोकांना घरीं औषधें करण्याचा हल्ली मनापासून कंटाळा आहे. बाटलींत आयतें तयार केलेलें औषध त्यांना हवें आहे. ही सोय आर्य वैद्यकांत जशी पाहिजे होती तशी नाही. आर्य वैद्यकांत सर्व मारा काढ्यांवर आहे, पण काढे आयते मिळत नसून ते रोग्यांना घरीं तयार करावे लागतात. ही उणीव जर दूर होईल, तर आर्य वैद्यकीला बरीच तेजी

येईल. चौथें कारण असें आहे की, वैद्यांत जो तो 'भिषग्वर्य' म्हणून मिरवतो. शास्त्रीय लोकांत असा जो तो प्रतिबृहस्पति बनतो, तोच नियम वैद्यांनाहि लागू पडतो. पूर्वी शास्त्री लोकांप्रमाणे वैद्यांच्या परीक्षा असत. परीक्षांच्या कमीजास्ती दर्ज्याप्रमाणे वैद्यांना मान मिळत असे. परराज्यामुळे तो प्रकार बंद झाला व म्हणून जो तो वैद्यराज बनूं लागला आहे. परीक्षा असती तर व ती द्यावयाची म्हणजे उमेदवारांना लक्षपूर्वक अभ्यास करावा लागतो व ती उत्तीर्ण झाली म्हणजे त्यांच्या श्रमाचें चीज होतें. पण जेथे परीक्षा नाहीत, तेथे घोडा व खेचर दोन्ही एकाच भावाने मिळूं लागतात. असाच प्रकार वैद्यांचा झाला आहे. तशांत लोकांचा असा वेडगळ समज झाला आहे की, जो वैद्य जितका जास्त घाणेरडा व बावळट असतो, तितकी त्याला जास्त चांगली परीक्षा असते.

पांचवें कारण असें आहे की, वैद्य लोकांना शोधक-बुद्धि मुळीच नसते. वैद्यक-ज्ञान परिपूर्णदशेस गेलें आहे व त्याची वाढ इतःपर होण्यास वाव उरला नाही, असा मिथ्या समज वैद्यांचा झालेला आहे. कोणतेंहि ज्ञान कधी परिपूर्ण नाही. ज्ञानतरूची वाढ एकसारखी चाललेली आहे, या नियमाप्रमाणे वैद्यकशास्त्रहि परिपूर्ण दशेस गेलेलें नसून, त्याची वाढ एकसारखी चालली आहे, ही गोष्ट लक्षांत धरून वैद्य लोकांनी नवे नवे शोध करण्याच्या मार्गाला लागलें पाहिजे. वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे एतद्देशीय डॉक्टरांनी ही गोष्ट हातांत घ्यावयास पाहिजे होती. आर्य वैद्यकाचा व आंग्ल वैद्यकाचा तुलनात्मक अभ्यास करून डॉक्टरांनी आर्य वैद्यकाचा उद्धार व प्रगति करावयाची, ती न करतां ते उलट त्याची टवाळी करतात., हें पाहून डॉक्टर लोकांच्या अभिमानशून्यतेची किळस येते. टवाळकी करण्यासारखें आर्य वैद्यकांत कांही नाही. उलटें मनाला थक्क करून सोडणारीं औषधें व रसायनें वैद्यकांत आहेत, हें आम्ही स्वानुभवावरून सांगतो. डॉक्टर लोकांनी हे लक्षांत धरावें की, त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आर्य वैद्यकाचा नायनाट करण्याकडे करावयाचा नसून तो त्याचा उद्धार करण्याकडे करावयाचा आहे.

प्रत्येक डॉक्टराने एकेक रोग हातांत घेऊन त्याच्यावर आर्य वैद्यकांत कोणती माहिती व औषधें दिलीं आहेत व आंग्ल वैद्यकाच्या साहाय्याने त्यांत कोणत्या सुधारणा करतां येण्यासारख्या आहेत, याचा जर खल केला, तर आर्य वैद्यकांत निःसंशय जास्त भर पडण्यासारखी आहे. हें करावयाचें सोडून देऊन त्यांनी विपरीत मार्गाचें अवलंबन केलें आहे. आपली फी व औषधांची किंमत वसूल करण्याकरितां कोर्टांत दावे आणण्याचा हक्क फक्त आपणांस असावा व आजारीपणाचीं व मृत्यूचीं व इतर प्रकारचीं सर्टिफिकिटें देण्याची परवानगी फक्त आपणांसच असावी, अशा मतलबाचा अर्ज मुंबईच्या डॉक्टरांनी सरकारकडे केला आहे. या अर्जावर सरकारचें उत्तर अजून आलें नाही. सरकारचें उत्तर कांही येवो., तरी पण डॉक्टर लोकांची वरील दुहेरी मागणी ऐकून आम्हांस त्यांच्या एककल्ली स्वार्थनिष्ठपणाची तारीफ

करावीशी वाटते. आम्हां औषधें देणाऱ्या सर्व लोकांची फी वसूल करण्यासाठी कोर्टांत दावे आणण्याच्या विशेष सवलती द्या, अशी जर डॉक्टर लोकांनी मागणी केली असती, तर त्यांच्या मागणीला सर्वांची पुष्टी मिळाली असती. पण डॉक्टर लोकांची मागणी कांही विचित्र प्रकारची आहे. आम्हांलाच तेवढी तूपपोळी वाढा व शेजाऱ्याला तसेंच शंखध्वनी करावयास लावा, अशाच प्रकारची हल्लीची डॉक्टरांची मागणी आहे. आमची अशी खात्री आहे की, सरकार ही खुळचट मागणी कबूल करणार नाही. पण आपण असें धरून चालू की, डॉक्टर लोकांची मागणी सरकारने कबूल केली आहे. सरकारकडून असें जरी झालें, तरी त्यात वैद्यांचा फारसा तोटा नाही. वैद्यांना औषधांच्या किमतीबद्दल कोर्टांत दावे आणतां आले नाहीत, तरी त्याला उपाय म्हणजे रोखीचा व्यवहार करणें होय.

वैद्यकीचा धंदा हा एक अत्यंत पवित्र धंदा आहे. इतर धंद्यांची व या धंद्याची तुलना करणें रास्त नाही. आधी पैसा व मग औषध हा नियम पाळला गेल्यावर दाव्याची व कोर्टाची जरुरी नाही. यदाकदाचित् औषधें घेऊन पैसा न देणारा बांडा रोगी मिळाल्यास 'धर्मार्थ' म्हणून त्याच्यावर दिवाणी दावा आणण्याच्या भानगडींत वैद्यांनी पडू नये. वरील दोन नियम लक्षांत ठेवून जर वैद्य लोकांनी आपला वर्तनक्रम ठेवला, तर डॉक्टर लोकांनी मेडिकल रजिस्ट्रेशन कायद्याचा नफा मिळविला तरी त्यापासून वैद्यांचा अल्पहि तोटा नाही. त्यांनी एवढें मात्र करावें की, आपलें एक विश्वविद्यालय स्थापून आर्य वैद्यकाचा सशास्त्र रीतीने व पद्धतशीर अभ्यास करण्याचा उपक्रम करावा. वैद्य व डॉक्टर यांच्या तंट्यांत गुणांच्या दृष्टीने शेवटीं डॉक्टरांनाच हार खावी लागेल. मात्र वैद्य लोकांनी आपलें ज्ञान जास्त वाढविलें पाहिजे.

– भाला, दि. २१ जुलै १९१०

---

## ५२. आमचीं देवस्थानें

हिंदु धर्म पुरातन व त्याप्रमाणे तो सनातन आहे. जगांतील इतर कोणत्याहि धर्मापेक्षा तो पुरातन आहे व आमची अशी खात्री आहे की, त्याचें सनातनत्व कधीहि असत्य होऊं शकणार नाही. हिंदु धर्मानुयायी लोकांची राजकीय स्थिति वर्तमानकाळीं खालावली असल्यामुळे त्या धर्माचें तेज इतर धर्माप्रमाणे चमकत नाही. चीन, जपान, सयाम वगैरे स्वतंत्र देशांत बौद्ध धर्म प्रचलित असल्यामुळे त्या धर्माला म्हणण्यासारखी ग्लानि आलेली नाही. पर्शिया, अफगाणिस्तान, टर्की वगैरे

स्वतंत्र देशांत इस्लामी धर्माचा अंमल असल्यामुळे तो धर्म पूर्वीप्रमाणे जरी नाही, तरी बऱ्याच अंशीं तेज:पुंज दिसत आहे. ख्रिश्चनधर्माविषयी तर सध्या बोलण्याची सोयच नाही. त्या धर्माचा बोलबाला हल्ली इतका वाढला आहे की, जगांतील सर्व सुधारलेलीं राष्ट्रें त्या धर्माची पूर्ण अनुयायी बनलीं आहेत. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका वगैरे सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत ख्रिश्चन धर्म चालू आहे. जगांतील वरील तीन प्रमुख धर्मांची वरच्याप्रमाणे सर्वोत्कृष्ट स्थिति आहे. राहतां राहिला खाली हिंदु धर्म. या धर्माच्या अनुयायांची संख्या तूर्त तरी कमी नाही. जगांत उणेपुरे वीस कोटि हिंदु लोक आहेत. सध्या ही संख्या इतकी अगडबंब दिसत आहे, पण या धर्माला लागलेली गळती जर सध्याप्रमाणे कायम राहिली, तर एक-दोन शतकांत ही संख्या इतकी कमी होईल की, पारशी लोकांच्या धर्माप्रमाणे हिंदु धर्म दुय्यम प्रतीचा होऊन बसेल. पारशी लोकांची संख्या अवघी एक लाख आहे. एक लाख लोकांच्या धर्माला मोठीशी महती नसावी यांत आश्चर्य नाही. हिंदु धर्माला गळती लागलेली आहे म्हणून आम्हीं जें वरती लिहिलें आहे तें निराधार नाही, हें जरा खोल पाहणाऱ्या इसमाच्या लक्षांत सहज येईल. हिंदुस्थानांत ख्रिचन लोकांची संख्या झपाट्याने वाढत आहे व त्याचप्रमाणे हिंदु लोकांची संख्या इतक्या झपाट्याने कमी होत आहे की, ही वाढ व ही ओहोटी हल्ली तासी एक प्रमाणे आहे. एक तास गेला व साठ मिनिटें भरलीं म्हणजे एक हिंदु कमी होतो व एक ख्रिश्चन वाढतो. हें प्रमाण अत्यंत भयंकर आहे हिंदुस्थानांत ख्रिश्चन धर्माची वाढ होत आहे याचें एकच कारण त्या धर्मालि राजसत्तेचा अप्रत्यक्ष का होईना, पण पाठिंबा आहे. हिंदु धर्माला तसा पाठिंबा कोणत्याहि सत्तेचा नाही. हिंदुस्थानांत हिंदु राजे आहेत, पण त्यांची राजसत्ता बरीच परावलंबी असल्यामुळे हल्ली हिंदु धर्म अनाथ व बिनवारसी पडला आहे, या म्हणण्यांत अल्पमात्र अतिशयोक्ति नाही. संकटसमयीं एखाद्याची पाठ धरतां येईल असा आधार हिंदु धर्माला नाही. कोणत्याहि धर्माची वाढ होण्यास निदान त्याची स्थिति कायम राहण्यास त्याला राजसत्तेचा आधार अवश्यमेव पाहिजे. पायावांचून मनुष्य जसा पंगु बनतो तसा राजसत्तेशिवाय धर्म पंगु बनतो. धर्माचा मुख्य आधार राजसत्ता आहे. ज्या धर्मांना राजसत्तेचे आधार नव्हते ते पूर्वी नामशेष झाले आहेत. ज्यांचा हा आधार तुटेल तेहि त्याच मार्गाला निःसंशय लागतील. आमच्या पूज्य पूर्वजांनी हिंदु धर्माला सनातन व गोड विशेषण दिलें आहे व आम्हांस असें वाटतें की, वरील विशेषण देण्यास त्यांनी सत्याचा अवलंब केला आहे. अनादि कालापासून हिंदु धर्म अस्तित्वांत आहे व यापुढे तो प्रलयकालापर्यंत तसाच कायम राहणार आहे. तरी पण एवढें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाही की, हल्ली हिंदु धर्माला वाईट दिवस आले आहेत. हिंदु धर्म नुसता सनातन राहून उपयोगी नाही, तर तो सनातन राहून त्याबरोबर तो धष्टपुष्टहि राहिला पाहिजे. आपण असें धरूं की, हिंदु लोकांची संख्या धर्मांतरामुळे कमी कमी होत चालली आहे ( परमेश्वर

तसा प्रसंग कधी न आणो!) व हिंदुस्थानांत हिंदु धर्म बौद्ध धर्माप्रमाणे अल्प प्रमाणावर शिल्लक राहिला आहे. अशी स्थिति प्राप्त झाल्यास हिंदु धर्माचें सनातनत्व नष्ट होत नाही. तरी पण त्याचें महत्त्वहि राहत नाही. दहा-पांच लक्ष लोकांच्या धर्माला मग त्यांत मोठमोठालीं तात्त्विक तत्त्वें असलीं तरी जगांत मोठीशी किंमत मिळेल असें आम्हांस वाटत नाही. कोणत्याहि धर्माला महत्त्व येण्यास त्या धर्मांत मोठमोठीं तत्त्वेंच असावीं लागतात असें नसून, त्या धर्मांच्या अनुयायांची संख्याहि मोठी असावी लागते. ज्याच्या अनुयायांचा जमाव मोठा असतो तो धर्म मोठा होय. वरील विचारसरणीप्रमाणे विचार केला, तर हिंदु धर्म हल्ली स्पृहणीय स्थितींत नाही, असें कष्टाने म्हणावें लागतें.

हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या प्रमाणाकडे नजर फेकली असता हिंदु धर्माची पीछेहाट होत चालली आहे हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. या सालाच्या अखेर येथील लोकसंख्येची मोजणी होणार आहे. त्या मोजणीच्या आकड्यांवरून असें सप्रमाण सिद्ध करून देतां येईलच की, दिवसेंदिवस हिंदु धर्माची पडती कमान व ख्रिश्चन धर्माची चढती कमान होऊं लागली आहे. ख्रिश्चन धर्माला बाळसें येऊं लागलें आहे. पण त्याला बालामृत हिंदु धर्माच्या शरीरांतून मिळत आहे. अनेक कारणांमुळे हिंदु धर्माचा त्याग करून किंवा त्याग करण्यास भाग पाडून लोक भराभर ख्रिश्चन धर्माकडे धांव घेत आहेत. एकीकडे हिंदु धर्माला ओहोटी लागली असतां त्यांत भर पडण्याला कोणताहि मार्ग नाही. नाही म्हणावयास आर्य समाजाने कांही शुद्धि-सभा स्थापून परधर्मीयांना हिंदु धर्मांत घेण्याचा उपक्रम केला आहे' पण अजून त्यांच्या प्रयत्नांना यावें तसें यश येत नाही. हिंदुधर्मीय लोकांत बाहेरून भर घालण्याचा प्रश्न तूर्त एका बाजूला ठेवला, तरी त्याची संख्या कमी न होऊं देण्याचा प्रयत्न जितका लवकर सुरू करण्यांत येईल तितकें जास्त चांगलें होय. या कामीं सरकारकडून मदत मिळण्याची आशा कोणी धरूं नये. 'ज्याचा तो' हें त्रिकालाबाधित तत्त्व लक्षांत धरून आपणच या कामीं शक्य तो प्रयत्न करण्यास लागणें हें उचित होय. आपण मनोभावें दीर्घ प्रयत्न केल्यास बरेंच यश येण्याचा संभव आहे.

वरील विचार सुचण्याचें कारण पुरीच्या जगन्नाथाची दुसरीकडे दिलेली हकीगत होय. ही हकीगत दै. ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेली आहे. या हकीगतींतील प्रत्येक विधान जरी खरें नसलें, तरी ठोकळमानाने तरी त्यांत सत्य आहे, असें आम्हांस वाटतें. लोकांच्या भोळ्या भावामुळे, पुजारी लोकांच्या लुच्चेगिरीमुळे व चिकित्सक बुद्धीच्या पूर्णाभावामुळे धर्माच्या नांवाखाली हल्ली इतके अनिष्ट प्रकार सुरू आहेत की, ते अवलोकन करून मन आपोआप मागे मुरडतें. पुरीचा जगन्नाथ हा हिंदु धर्माची एक अनादिसिद्ध देवता आहे. त्याचें दर्शन घेऊन देहाचें सार्थक करण्याकरिता लाखो लोक दरवर्षी पुरीला जातात. जगन्नाथपुरी पूर्व दिशेकडील

हिंदु धर्माचें एक अत्यंत पवित्र स्थान आहे. अशा पवित्र क्षेत्रांत धर्माच्या नांवाखाली कोणतीहि अपवित्र गोष्ट घडूं नये हें वाजवी आहे. पण खेदाची गोष्ट ही की, जगन्नाथाच्या नांवाने तेथे हजारो हिडीस प्रकार प्रत्यहीं होत आहेत. कलावंतिणी, पंक्तिपठाण, पुजारी, भोजनभाऊ व ऐतगब्बू संन्याशी व आणखी शेकडो तऱ्हेचे इतर दुर्वृत्त लोक यांची चंगळ उडाली आहे. वरील लोकांपासून धर्माची सेवा काय होत असेल हें त्या जगन्नाथालाच माहीत होय. आम्हांस तर असें वाटतें की, हिंदुधर्मरूपी आम्रवृक्षावर वाढलेलीं हीं बांडगुळें होत. ज्याप्रमाणे बांडगुळें आम्रवृक्षांतील रस शोषून घेऊन ती वठवून टाकतात त्याचप्रमाणे वरील लोक हिंदु धर्माचा चांगुलपणा शोषून घेऊन तो निस्तेज करून टाकीत आहेत. एखाद्या पंड्याला जगन्नाथाचा तात्पुरता बाप समजणें व त्या जगन्नियंत्याच्या मातेचा मान एखाद्या क्षुल्लक कलावंतिणीला देणें म्हणजे आपणच होऊन आपल्या हातांनी आपल्या धर्माची विटंबना करणें होय. जगन्नाथ रथांत बसून बाहेर निघाले आहेत, ते आपल्याबरोबर आपल्या प्रिय पत्नीला घेत नाहीत व नवऱ्यावर सक्रिय रुसवा काढण्याकरिता पंडे जगन्नाथाच्या पवित्र व पूजनीय मूर्तीला लक्ष्मीच्या तर्फे वेताच्या छड्यांनी बडवितात ही हकीगत वाचून कोणत्याहि खऱ्या धार्मिक अंत:करणाच्या हिंदूच्या अंगावर शहारे आल्यावांचून राहणार नाहीत. वरील प्रकार यापुढे चालू ठेवणें गर्हणीय आहे.

आजपर्यंत वरील प्रकार करण्यांत आले याबद्दल दोष देण्यांत अर्थ नाही. पण जरकरितां ते यापुढे चालू ठेवण्यांत आले, तर मात्र ते क्षम्य होणार नाही. वरच्यासारखे प्रकार प्रचारांत येण्याचें मुख्य कारण लोकांची अंधश्रद्धा होय. पण पंडे लोकांनी हें नीट लक्षांत घ्यावें की, या शतकाच्या आरंभापर्यंत अंध असलेल्या श्रद्धेला आता थोडे थोडे दिसू लागलें आहे. कालेंकरून तिला पूर्ण दृष्टि येईल व मग ती वरच्यासारख्या ओंगळ प्रकाराकडे ढुंकून सुद्धा पाहणार नाही. पण तशी वेळ येण्यापूर्वीच पंडे लोकांनी आपलें वर्तन सुधारावें हेंच चांगलें होय. ओरिसा प्रांतांतील पंडे लोकांनाच नांवें ठवण्यास जागा आहे व हिंदुस्थानांत दुसरीकडे शंभर नंबरी पवित्रपणा भरला आहे असें नाही. ओरिसा प्रांतांत जशी पुरी आहे तशी आपल्या महाराष्ट्रांत पंढरी आहे. भजनाच्या दिंड्यांतील लोक बायकांप्रमाणे फुगड्या खेळतात व नाच्यापोराप्रमाणे हातवारे करतात हें सर्वांनी पाहिलें असेलच. असल्या अश्लील प्रकारांनी सात्त्विक भक्तीला भरती येते अशी जर कोणाची समजूत असेल, तर ती चूक आहे. क्षेत्रें हीं हिंदु धर्माचे जागजागीं बांधलेले गड आहेत. संकटसमयीं या गडांचा उपयोग हिंदु धर्माला व्हावा अशी ते बांधणाऱ्या विभूतीची इच्छा होती. पण खेदाची गोष्ट ही आहे की, उपयोग राहिला बाजूलाच, पण उलट त्यापासून अपाय मात्र होत आहे. क्षेत्राचा व तेथील मुख्य देवतांचा खर्च अखंडपणें चालावा या हेतूने निरनिराळ्या धर्मात्म्यांनी निरनिराळ्या वेळीं देणग्या, दानें व वर्षासनें देऊन ठेवलीं आहेत. या देणग्यांचा व वर्षासनांचा उपयोग हल्ली फक्त देवांच्या

नैवेद्याकडे व पुजाऱ्यांच्या भोजनाकडे होत असतो. निरुद्योगी पुजारी व आणखी भटभिक्षुक यांची रेलचेल क्षेत्राच्या ठिकाणीं किती उडून राहिली असते याची कल्पना कोणास करून घेणें असेल, तर त्याने काशी, नाशिक वगैरे क्षेत्रांत जाण्याची तसदी घ्यावी. जर महाराष्ट्रांत असलेल्या धार्मिक वर्षासनांची बेरीज केली, तर ती कांही लहानसहान भरणार नाही. खुद्द पर्वतीवर दरमहा अठराशे रुपयांचा चक्काचूर उडत आहे. पुण्यापासून पांच कोसांच्या अंतरावर असलेल्या चिंचवड येथील श्रीमोरयाच्या देवालयाला दरसाल तीस हजारांची नेमणूक आहे. महाराष्ट्रांत असें एकहि देवालय नाही की, ज्याला वर्षासन नाही. पण या साऱ्या वर्षासनांचा उपयोग फक्त पूजेकडे व नैवेद्याकडे होत असतो. आम्ही असें म्हणत नाही की, या गोष्टींकडे एक पैहि खर्ची पडू नये. देवता असली की तिला पूजा, नैवेद्य, नंदादीप, एक वार्षिक सर्वसाधारण उत्सव वगैरे उपचार पाहिजेत. पण सर्वच पैसा असल्या कामीं खर्च करणें हें गैरवाजवी आहे.

वरील उपचारांबरोबर हिंदु धर्माला जेणेंकरून सक्रिय व प्रत्यक्ष साहाय्य होईल अशी एखादी संस्था प्रत्येक सार्वजनिक देवस्थानांत जरूर असली पाहिजे. कांही देवस्थानांत अन्नसत्रें आहेत, पण तीं आपला खरा उपयोग करून दाखवीत नाहीत. अतिथी व अभ्यागत आला, तर त्याची परक्या व अनोळखी जागीं भोजनाची योग्य सोय व्हावी हा एक अन्नसत्रांचा रास्त व मोठा उपयोग आहे. पण चूक होते ती ही की, अतिथी व अभ्यागतांची निवड करतांना नीटपणें विचार करण्यांत येत नाही. जो दाराशीं आला तो अतिथी नव्हे व जो अन्न मागूं लागला तो अभ्यागत नव्हे. आपण ज्याला अन्नदान करतो तो सत्पात्र मनुष्य आहे किंवा नाही याचा विचार करून मग अन्नदान करण्यांत आलें पाहिजे. असें सांगण्यांत येतें की, काशी क्षेत्रीं ३६० अन्नसत्रें आहेत. कोणत्याहि निरुद्योगी माणसाला वर्षांतून एकहि दिवस काम न करतां दररोज पोटभर खाण्यास मिळण्यास काशी क्षेत्रीं मुळीच पंचाईत पडत नाही. काशीमध्ये असे पुष्कळ बैरागी आहेत की, ज्यांनी स्वतःच्या निढळाच्या घामाने एकहि पैसा जन्मांत मिळविला नाही. सकाळीं गंगेंत आंघोळ करावयाची, दोन प्रहरीं अन्नसत्रांत ताव मारायचा व संध्याकाळीं घोटा पिऊन एखाद्या देवळांत घोरत पडावयाचें, असा दिनक्रम धरून आयुष्याचीं आयुष्यें घालविलेले बैरागी काशींत व इतर प्रमुख क्षेत्रीं आहेत. अशा लोकांना पोसणें म्हणजे धर्म करणें नव्हे, तर पदरीं पापाचा संचय करणें होय. अशा विपरीत मार्गांनी पैशाचा खर्च झाल्यास त्यापासून धर्माला जोर न येतां त्याला कीड लागते. हिंदु धर्माला मुख्य कीड ही आहे.

आमच्या लोकांचा व देवस्थानांचा पैसा मुबलक खर्च होत आहे. पण तो खोटचा व अपायकारक मार्गांनी होत आहे. देवस्थानांना दरवर्षीं मिळत असलेल्या उत्पन्नांत काटकसर करून त्यांतील कांही भाग शिल्लक टाकून त्याचा उपयोग जर

धर्मविद्येकडे किंवा अनाथ बालसंगोपनाकडे करण्यांत आला, तर एका दगडाने दोन नव्हे, तर दोनशे पक्षी मारतां येण्यासारखे आहे. पूजेअर्चेकडे माफक पैसा खर्च झाल्यास पुजारी लोकांची संख्या आपोआप कमी होईल. जगन्नाथाच्या देवस्थानांत एकंदर बाराशे लोकांची वर्णी चालते. या बाराशे लोकांकडून हिंदु धर्माला उपयोग म्हणाल, तर काडीचाहि नाही. बाराशेच्या आंकडचावरून ही संख्या बारावर आणून ठेवल्यास तितका पैसा वांचला जाईल व त्याचा अन्य तऱ्हेने उपयोग करतां येईल. पुरीच्या जगन्नाथाच्या संस्थानाला जोडून जर एक बाराशे अनाथ अर्भकांची सोय असलेलें अनाथगृह चालविण्यांत आलें, तर त्या धर्माचा केंवढा तरी मोठा फायदा होईल बरें? अशा संस्थेला यात्रेकरू लोक आनंदाने वर्गण्या देतील व मग त्यांचा सत्कार्यीं उपयोग होईल. आम्हांस असें वाटतें की, प्रत्येक मोठ्या देवस्थानाला जोडून एक संस्कृत पाठशाळा व एक अनाथगृह काढण्यांत यावें. पंक्तिपठाण पंड्यांना पोसण्याऐवजीं उत्तम तऱ्हेने पढलेले पंडित निर्माण करणें व अनाथ हिंदु अर्भकांचें संगोपन करणें हीं दोन कार्यें जास्त पुण्यप्रद आहेत. देवस्थानांची उत्पत्ति कांही लोकांची मूर्तीच्या नांवाखाली चैन चालविण्यासाठी झालेली नाही. देवस्थानें हिंदु धर्माचे आधारभूत स्तंभ आहेत. हे खांब जितके मजबूत राहतील तितका हिंदु धर्माला जास्त जोर आहे. या स्तंभांना चैनीची कीड व आळसाचा भुंगा लागू देतां कामा नये. म्हणून अशा देवस्थानांचें जितकें बारकाईने निरीक्षण होण्यासारखें आहे तितकें करून, त्यांच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यांत यावा. रूढिबद्ध झालेलीं मनें लवकर वळणार नाहीत, तरी पण त्यावर सत्याचे ठोके मारण्यास कच खाऊं नये. टीका व धर्म करण्याच्या वेळीं, तारतम्यभाव हीं दोन साधनें हातीं धरल्यास देवस्थानांची सुधारणा होऊन हिंदु धर्माला तितकें जास्त तेज चढेल. हिंदु धर्माचें संरक्षण करण्याच्या उपायांपैकी देवस्थानांची सुधारणा हा एक उपाय आहे व तो बहुतांशीं लोकांच्या हातांत आहे. दानधर्म कोणास करणें हें लोकांच्या मर्जीवर अवलंबून आहे. म्हणून तो करण्याच्या वेळीं प्रत्येकाने लांबचा मुद्दा डोळ्यापुढे ठेवून आपल्या हातांतील पैसा दुसऱ्याच्या हातावर ठेवावा. मी एकटा काय करणार व माझ्या अल्प दानाने काय होणार, अशी आत्मघातकी विचारसरणी करून या कामीं कोणीहि दुर्लक्ष करतां कामा नये. हिंदुस्थानचें पुष्कळ नुकसान या दुर्लक्षानेच झालें आहे. म्हणून दानधर्माच्या वेळीं प्रत्येकाने नीट विचार करून मग कोणत्याहि देवस्थानाला देणगी द्यावी. पूर्वी देण्यांत आलेल्या देणग्यांचा दुरुपयोग करण्यांत येत असल्यास टीकाशस्त्राचा प्रयोग बेसुमार करण्यांत यावा. कारण जिवावर येऊन ठेपल्यामुळे आता गय करण्याची सोय नाही. विसाव्या शतकांत हरएक तऱ्हेची सुधारणा झाली पाहिजे व ती करण्यास सुशिक्षित लोकांनीच कंबरा कसल्या पाहिजेत.

– भाला, दि. १ सप्टेंबर १९१०

# ५३. पतपेढ्या

हिंदुस्थानांतील लोक दिवसेंदिवस दरिद्री होत चालले आहेत व त्यांतल्या त्यांत येथील शेतकरीवर्ग तर फारच कंगाल दशेला जाऊन पोहोचला आहे. ह्या लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारावी ह्यासाठी निरनिराळे उपाय सुचविण्यांत येत आहेत. शेतकऱ्यांचा कायदा वरील हेतूनेच प्रेरित होऊन पसार करण्यांत आला. तीस वर्षांच्या अनुभवानंतर ही गोष्ट निर्विवादपणें सिद्ध झाली आहे की, वरील कायद्याचा शेतकरी लोकांना म्हणण्यासारखा उपयोग झाला नाही. शेतकऱ्यांच्या कायद्याचा परिणाम थोडक्यांत वर्णावयाचा असल्यास, तें वर्णन असेंच होईल की, "त्या कायद्याने सावकार व शेतकरी दोन्ही बुडून गेले." पहिले दारिद्र्यांत बुडाले, तर दुसरे पूर्वीप्रमाणे कर्जांत नखशिखान्त बुडून राहिले आहेत. एखाद्या कर्जबाजारी मनुष्याची स्थिति सुधारावयाची असल्यास त्याला कृत्रिम उपायाने एकदा ऋणमुक्त करून, ती कायमची सुधारावयाची नाही. ज्या कारणांनी अशा मनुष्याच्या डोक्यावर कर्जाचा बोजा चढत असेल, तीं कारणें समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न जर करण्यांत आला, तरच कांही कायमचा नफा आहे. शेतकऱ्यांच्या कायद्याने त्यांच्या दारिद्र्यतेचीं कारणें कायमचीं नाहीशीं झालीं नाहीत. दारिद्र्याचा झरा त्यांच्या घरांत पूर्वीप्रमाणेच वहात आहे. मात्र सरकारने शेतकऱ्यांच्या कायद्याच्या सुपाने त्या झऱ्याचें पाणी बाहेर उपसून टाकण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. सरकारने हें पाणी उपसून गटारांत फेकून देण्याच्या ऐवजीं तें सावकारांच्या घरांत फेकून दिलें आहे. त्यामुळे असा परिणाम झाला आहे की, शेतकरी लोक कर्जाच्या दलदलींत पूर्वीप्रमाणेच कुजत आहेत व सावकारांच्या घरांच्या जमिनीला कर्जाचा शेंदावा येऊं लागला आहे.

शेतकऱ्यांची कर्जापासून मुक्तता करण्यासाठी व त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठी आता एक नवीन उपाय योजण्यांत येऊं लागला आहे. तो उपाय पतपेढ्यांचा होय. अलीकडे शेतकऱ्यांचा कायदा मागे पडून पतपेढ्यांवर जास्त जोर झाला आहे. नामदार गव्हर्नरसाहेब आपल्या भाषणांत म्हणतात त्याप्रमाणे १९०९ अखेर पतपेढ्यांची एकंदर संख्या दोन हजारांवर गेली आहे व त्यांत एकंदर पांच लाख पौंड म्हणजे पाऊण कोटि भांडवल लोकांनी व सरकारने घातलें आहे. पत-

पेढ्या काढण्याचा मुख्य हेतु हा आहे की, शेतकरी लोकांना हलक्या व्याजाने भांडवल मिळण्याची सोय व्हावी. पतपेढ्यांचा हा हेतु अत्यंत स्तुत्य आहे. शेतकरी लोक ह्या सोयीचा नीट उपयोग करून घेतील, तर त्यापासून त्यांचा पुष्कळ नफा आहे; परंतु पतपेढ्यांविरुद्ध पुष्कळ आक्षेप घेण्यासारखे आहेत, असें आम्हांस वाटतें. त्यांच्यापासून जितका नफा होईल असा पुकारा करण्यांत येत आहे, तितका तो होईल किंवा नाही, ह्याची आम्हांस जबर शंका आहे. एखाद्या मनुष्याला कर्ज लागलें व तें त्याला हलक्या व्याजाने मिळण्याची सोय झाली म्हणजे त्यापासून त्याचा नफा आहे, हें कोणीहि कबूल करील. पण हलकें व्याज म्हणजे किती ह्याचा उलगडा झाला पाहिजे. हल्लीच्या परिस्थितींत अगदी हलक्या व्याजाचा दर म्हटला म्हणजे दरमहा दर शेकडा ४ आणे होय. जर या दराने पतपेढ्या शेतकऱ्यांना कर्जाऊ भांडवल देऊं लागल्या, तर त्या फारच उपयुक्त आहेत असें आम्ही निःसंशय म्हणूं. व्याजाचा दर शेकडा चार आणे व मुद्दलाची फेड हप्त्याहप्त्याने, हीं दोन तत्त्वें डोळ्यापुढे ठेवून जर पतपेढ्या शेतकऱ्यांना रकमा देऊं लागल्या, तर शेतकऱ्यांचें नशीब सबंध नाही तरी अर्धेअधिक उघडलें, असें आम्ही आनंदाने म्हणूं. पण खेदाची गोष्ट ही आहे की, पतपेढ्यांकडून मिळणाऱ्या भांडवलावरील व्याजाचा दर दरसाल दर शेकडा १२ रुपये ८ आणे आहे. हा दर सर्व पतपेढ्यांचा आहे किंवा नाही, हें आम्हांस निश्चितपणें सांगतां येत नाही. तरी पण पुणें जिल्ह्यांतील पतपेढ्यांकडून वरील दर आकारण्यांत येतो अशी आमची बातमी आहे.

व्याजाचा वरील दर लक्षांत घेतला म्हणजे पतपेढ्यांमुळे हलक्या व्याजाने कर्जाऊ रक्कम मिळण्याची सोय झाली, ह्या म्हणण्यांत आम्हांस कांही अर्थ दिसत नाही. दरसाल दर शेकडा १२॥ रुपये हा व्याजाचा दर जबर आहे. ह्या दराच्या निम्मे दराने म्हणजे दरसाल दर शेकडा ६। रुपयांप्रमाणे खाजगी लोकांकडून शेतकऱ्यांना वाटेल तितके भांडवल मिळण्याचा संभव आहे. पूर्वीचे रुपयास आणा किंवा अर्धा आणा हे व्याजाचे दर आता नाहीसे झाले आहेत. एकोत्रा हा व्याजाचा दर सर्वसाधारण होऊन बसला आहे. एकोत्र्याप्रमाणे लोक शेतकऱ्यांना भांडवल देण्यास एका पायावर तयार होते व आहेत. पण अलीकडे शेतकऱ्यांना कर्जाऊ रकमा मिळण्याची पंचाईत पडूं लागली आहे. ह्याचें कारण शेतकऱ्यांचा कायदा होय. पदरचे शंभर रुपये एका मुठीने द्या व त्याच्या कवडचारेवडचा करून ते परत घ्या, हा तुकारामी व्यापार लोकांना पटत नाही व त्यांत त्यांचा दोष नाही. आज एखाद्याजवळ शंभर रुपये शिलकी पडले, तर ते कोठे व्याजी लावावे, ह्याची त्याला पंचाईत येऊन पडते. शेतकऱ्याला द्यावेत तर तो बेटा व्याज वेळेवर द्यावयाचा नाही च मुद्दलाला तर कधी ठिकाणाच नाही. व्याजाची रक्कम साचत जाऊन ती मुद्दलाइतकी झाली की दामदुपटीचा कायदा अमलांत आलाच. दिवाणी कोर्टांत रक्कम वसूल करण्याकरिता दावा आणावा, तर वकिलांपासून तों तहत् बेलिफापर्यंत सर्वांचे

अर्जव व पाद्यपूजा करावी लागते. इतकेंहि करून हुकूनमनामा मिळवून दरखास्त दिली व एकदा मामलेदाराकडे बजावणीला गेली की ती कधी बजावली जाईल, हें एका परमेश्वराला माहीत होय. पंचनामा होऊन लिलाव होण्याला मधे हजार विघ्नें उपस्थित होतात. शेतकऱ्याच्या पोटांत पैसा गेला की तो मगरीच्या पोटांत गेला असें निखालस समजावें. शेवटीं अनुभव असा येतो की, व्याज तर राहिलेंच, परंतु सबंध मुद्दलसुद्धा पदरीं पडेल किंवा नाही ह्याची पंचाईत पडते. तांबड्या-साठी पांढरा गमावण्याची पाळी आल्यावर, असा हतभागी पण प्रामाणिक सावकार अप्रमाणिक मार्गाचा अवलंब करूं लागतो. शंभर रुपये देऊन दोनशेचा कागद लिहून घेणें, व्याजाचा दर रुपयास दोन पैशांप्रमाणे धरणें, वसूल आला असतां थापा देऊन त्याच्याबद्दल पावती न देणें व पुढे तो नाकबूल करणें वगैरे शेकडो लबाडीचे प्रकार अमलांत आणण्याची कुबुद्धि अशा सावकाराला मग सुचूं लागते.

शेतकऱ्यांना रुपये देण्यास लोक कचरतात व आपले पैसे चार आण्यांच्या व्याजाने बँकेंत ठेवतात ह्याचें मुख्य कारण हें आहे की, त्यांच्याकडून वेळेवर बिन-तक्रार पैसे वसूल होत नाहीत. सुशिक्षित लोकांच्या मनांत शेतकऱ्यांना मदत करण्याची बुद्धि आहे व त्यांच्याजवळ थोडाबहुत पैसाहि आहे; पण सभांतून किंवा लेखांतून शेतकऱ्यांबद्दल सहानुभूति दाखविण्यांत आली, तरी अशा शाब्दिक सहानु-भूतीचें रूपांतर कृतींत होत नाही, ह्याचें कारण शेतकऱ्यांच्या दानतीबद्दल संशय होय. शेतकऱ्यांची दानत बिघडली आहे म्हणून सुशिक्षित लोक त्यांच्या वाऱ्याल उभे राहत नाहीत. धंदेवाईक सावकार त्यांच्याशीं व्यवहार करतात, पण तो वरच्या-प्रमाणे होय. शेतकऱ्यांची दानत बिघडली आहे, ह्याबद्दल दोन मतें असणें शक्य नाही. ही दानत कां बिघडली, ह्याचें कारण शोधूं गेल्यास आमच्या मताने तें त्यांचें दारिद्र्य होय. 'दारिद्र्यदोषो गुणराशिनाशी' ही कव्युक्ति अक्षरशः खरी आहे. शेतकरी कितीहि शेतांत राबला तरी सरकारपट्टी व सावकारपट्टी ऊर्फ व्याज देऊन सबंध वर्षभर साधारणपणें संसार चालेल इतकें उत्पन्न शेतांतून अलीकडे निघत नाही. गरिबीमुळे प्रामाणिक शेतकरी थोड्याच वर्षांत अप्रामाणिक बनून त्याची दानत बिघडते. असा दारिद्र्यपंकांत रुतलेला शेतकरी कर्जापासून सुटका होण्यास वाटतील त्या शपथा वाहण्यास व लबाड्या करण्यास तयार होतो. म्हणून शेतकऱ्यांचें दारिद्र्य जेणेंकरून नष्ट होईल असा उपाय सर्वांच्या अगोदर योजण्यांत आला पाहिजे. पतपेढ्या तें काम करूं शकणार नाहीत. कारण त्यांच्या अंगीं शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढविण्याची शक्ति नाही. दरसाल १२॥ रुपये व्याजाचा दर हा हलका दर नाही. जर पतपेढ्या चार आणे मित्तीने कर्जाऊ पैसे देऊं लागल्या, तर त्यांच्यापासून शेतकऱ्यांना कांही तरी फायदा होईल. पण आमच्या मताने अशीच व्यवस्था करण्यांत आली पाहिजे की, जेणेंकरून शेतकऱ्यांना कर्ज काढण्याची पाळी येणार नाही. आधी कर्ज काढण्याचा प्रसंग यावा व मग हलक्या व्याजाने कर्जाऊ रुपये

मिळविण्यासाठी पतपेढ्या काढण्यांत याव्यात, ही खरी सुधारणा नाही. कर्ज काढण्याचा प्रसंग अजीबात न येणें हीच खरी व टिकाऊ सुधारणा आहे. हलक्या व्याजाने कर्जाऊ रकमा मिळाल्या म्हणजे शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारावयास लागेल, अशी आशा करणें व्यर्थ होय.

शेतकऱ्यांना अजीबात ऋणमुक्त करून टाकण्याचे कांही उपाय आम्हांस सुचत आहेत. ते उपाय आम्ही सरकारच्या कानावर घालण्याची परवानगी घेतों. पहिला उपाय हा आहे की, प्रांतिक सरकारांनी आपआपल्या प्रांतांतील शेतकऱ्यांच्या कर्जाची एकंदर रक्कम ठरवून ती त्यांनी सावकारांना देऊन टाकावी व ती रक्कम शेतकऱ्यांजवळून बिनव्याजाने व हप्तेबंदीने वसूल करून घ्यावी. सावकारांच्या कर्जांचा बोजा आपल्या शिरावर घेतल्यावर असा एक कायदा पसार करण्यांत यावा की, कोणीहि शेतकऱ्यांना जमिनीवर कर्ज देऊं नये व कोणत्याहि कर्जाबद्दल जमिनी विक्रीस पात्र होणार नाहीत. याप्रमाणे कायदा केल्यास शेतकरी लोक कर्जांत बुडण्याची पुन्हा पाळी येणार नाही. कर्ज मिळण्याची बंदी झाल्यावर व शेतकरी लोक कर्जमुक्त झाल्यावर पुन्हा कर्जबाजारी कसे होणार! शेतकऱ्यांची स्थिति वरच्याप्रमाणे झाल्यावर 'सरकारी सारा दिल्यावर शेतकीच्या उत्पन्नावर दुसरा कोणताहि बोजा राहणार नाही. आम्हीं वर सांगितलेला उपाय अमलांत आणण्यास सरकारास जड पडणार नाही. सगळ्या प्रांतांतील शेतकऱ्यांना एकदम कर्जमुक्त करतां येण्यासारखे नसल्यास, एक एक जिल्हा, निदान एक एक तालुका, हातीं घेण्यांत यावा. प्रत्येक तालुक्याला पांचपासून दहा लक्ष रुपये पुरे होतील असा आमचा अंदाज आहे. वरील उपायाशिवाय दुसरा कोणताहि उपाय योजण्यांत आला, तरी तो इष्ट कार्य घडवून आणील, असें आम्हांस वाटत नाही. वरील उपाय अमलांत आणतां येत नसल्यास आम्ही खाली नमूद करीत असलेल्या गौण उपायांचा अनुभव घेऊन पाहवा.

पहिला उपाय म्हटला म्हणजे फॉरेस्टचा कायदा एकदम रद्द करणें होय. कायदे-बुकांतील जर कोणता एक कायदा शेतकऱ्यांना जाचक असेल, तर तो जंगल-खात्याचा कायदा होय. जंगल बंद झाल्यामुळे गुरांची उपासमार होऊं लागून त्यांची संख्या कमी कमी होत चालली आहे. गुरें कमी झाल्यामुळे खत कमी झालें आहे व खतमूत कमी झाल्यामुळे शेतकीचें उत्पन्न कमी झालें आहे. शेतकऱ्यांचें उत्पन्न कमी झाल्यामुळे त्यांचें दारिद्रच वाढूं लागलें आहे. जंगलखातें व शेतकऱ्यांचें दारिद्रय यांचा वरच्याप्रमाणे कार्यकारणभाव असल्यामुळे जर त्यांचें दारिद्रच कमी करावयाचें असेल, तर फॉरेस्ट ॲक्ट अजीबात निदान बहुतांशीं रद्द करण्यांत आला पाहिजे. फॉरेस्ट ॲक्ट रद्द केल्यामुळे सरकारी तिजोरीचें होणारें नुकसान अन्य मार्गांनी भरून काढतां येण्यासारखें आहे. शेतकीच्या संबंधाने कितीहि सवलती दिल्या, तरी सुद्धा हिंदुस्थानांतील वाढत्या प्रजेचा निर्वाह नुसत्या शेतकीवर होणें

शक्य नाही. शेकडा ८० लोक निवळ शेतकीवर उदरनिर्वाह करून राहवेत, हें देशाच्या संपन्नतेचें लक्षण नाही. खेडेगावांतील प्रजा आपल्या गावांतून बाहेर पडलीच पाहिजे. खेडेगावांतून बाहेर पडून शहरांत शिरलेल्या लोकांचा चरितार्थ चालावा, यासाठी शहरांतून निरनिराळ्या धंद्यांच्या गिरण्या व कारखाने निघाले पाहिजेत. कोणत्याहि देशांतील कारखाने ऊर्जितावस्थेस येण्यास तेथील सरकारची व लोकांची त्यांना एकसमयावच्छेदेंकरून मदत पाहिजे. लोकांनी अशा कारखान्यांतून निघणारा वेडावाकडा माल विकत घेऊन त्यांना मदत करणें जरूर आहे व सरकारने परदेशांतील मालावर जबर आयात जकात बसवून बाजारांत परदेशांचा माल स्वदेशी मालापेक्षा महाग करून सोडला पाहिजे. सरकार असें न करतां स्वस्थ बसेल, तर स्वदेशी मालाला उत्तेजन मिळणार नाही व पोटासाठी शहरांत येणाऱ्या शेतकऱ्यांची पोटाची सोय होणार नाही. एक प्रधान व दोन गौण उपाय, असे तीन उपाय अमलांत आणले गेल्यास, शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न केव्हाहि उपस्थित होणार नाही. आम्हीं सुचविलेले तीन उपाय वगळून पतपेढ्यांसारख्या उपायाच्या पाठीमागे लोक व सरकार धांवूं लागलें, तर ग्रीष्म ऋतूंत मृगजळाच्या पाठीमागे धांवणाऱ्या हरणाच्या स्थितीप्रमाणे त्यांची स्थिति होईल.

— भाला, दि. ११ सप्टेंबर १९१०

---

## ५४. शिकवा व पिकवा

**जें जें आपणांस ठावें । तें तें हळूहळू शिकवावें ।**
**शहाणें करूनी सोडावें । सकळ जण ॥**

— श्रीसमर्थ रामदासस्वामी

**देवभक्ति आणि देशभक्ति । या मनाच्या दोन वृत्ती ।**
**सहजासहजीं उत्पन्न होती । शिक्षणाच्या योगें ॥**

— भालाकार भोपटकर

भरतभूमीची लोकसंख्या बत्तीस कोटि आहे, असें खानेसुमारीच्या आधारें वारंवार सांगण्यांत येतें, पण या विधानावर आमचा मुळीच विश्वास नाही. बत्तीस कोटि प्राण्यांवर दोन लक्ष लोकांनी एक शतकावर राज्य करणें हें कालत्रयीहि शक्य नाही. एवढेंच नव्हे तर, बत्तीस कोटि मेंढरें ताब्यांत ठेवणें ही गोष्ट सुद्धा दोन लक्ष धनगरांच्या शक्तीच्या बाहेर आहे. कोणत्याहि गोष्टीला कांही तरी प्रमाण असतें. योग्य प्रमाणाबाहेर कांही घडत नाही किंवा एखादी प्रमाणरहित गोष्ट क्षणभर

घडली, तर ती फार दिवस टिकत नाही. पण हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याला सुरुवात होऊन दीडशे वर्षांच्यावर व्हावयास आलीं असतां, त्यांची पूर्वीची अनियंत्रित सत्ता आजहि पूर्णपणें अबाधित आहे. या एका विलक्षण देखाव्यावरून दोन गोष्टींपैकी एक गोष्ट निःसंशय खरी असली पाहिजे. एक तर इंग्रज लोक या पृथ्वीवरील इतर माणसांप्रमाणे माणसें नसून ते प्रत्यक्ष देवदूत तरी असले पाहिजेत किंवा आम्ही हिंदी लोक खरोखरीचीं माणसें नसून मनुष्यासारखीं तोंडें असलेलीं व दोन पायांनीं उभ्याने चालणारीं वानरें तरी असलों पाहिजेत. यांपैकी पहिली गोष्ट खरी नाही. कारण इंग्रज लोकांशीं बरोबरीच नव्हे, तर त्यांच्यावर सरशी करणारे इतर लोक या पृथ्वीवर निःसंशय आहेत. समरांगणावर त्यांच्याशीं दोन हात करून त्यांच्याजवळून स्वतःचें स्वातंत्र्य हिसकावून घेणारे अमेरिकन लोक हल्ली विद्यमान आहेत. परवा महायुद्धांत पहिलीं चार वर्षे त्यांना चांगलाच हात दाखविणारे जर्मन लोक अजून नामशेष झालेले नाहीत. गेलीं पांचशे वर्षे त्यांच्याशीं बरोबरीने टक्कर देणारे फ्रेंच लोक अजून फ्रान्स देशांत हयात आहेत व आपल्या सुधारणेने सर्व जगाला आश्चर्यचकित करून सोडणारे व त्यांच्याशीं बरोबरीच्या नात्याने तह करणारे जपानी लोक आशिया खंडांत आजमितीला स्वतंत्रतेने नांदत आहेत. सारांश, इंग्रज लोक देवदूत नसून त्यांच्याशीं सर्व बाबतींत समतोल व समगुणी लोक या जगांत निदान पांच देशांत तरी निःसंशय आहेत. तर मग आम्ही हिंदी लोक माणसें नसून मनुष्यरूप धारण करणारीं माकडें तरी असलों पाहिजे. पण हेंहि विधान खरें नाही. ज्या पुण्यभूमींत व्यास, रामदास, लोकमान्य यांसारखे ज्ञानी पुरुष जन्मास आले, ज्या भरतभूमींत राम व परशुराम, शिवाजी व संभाजी यांच्यासारखे समर-धुरंधर वीर निर्माण झाले व ज्या राष्ट्रांत पूर्वकालीं इतर अनेक गुणी नररत्नें चमकून गेलीं, त्याच हिंदुस्थानांत हल्ली वास्तव्य करणारे त्यांचे वंशज माणसें नसून माकडें आहेत, असें म्हणणें शुद्ध वेडेपणाचें होईल. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, इंग्रज लोक देवदूत नसून माणसें आहेत व आम्ही हिंदु लोक माकडें नसून माणसें आहोंत, तर आमची अशी राजकीय हलाखी कां? बत्तीस कोटि वस्ती असलेला हिंदुस्थान देश असा नादान कां झाला आहे? कोणीकडेहि नजर फेकली तरी सगळीकडे अंधीअंधकार दिसत आहे. या अवनत स्थितींतून वर डोकें कधी काळीं निघेल, अशा आशेचा किरण या निबिड अंधकारांत कोठेहि दृष्टिगोचर होत नाही. अवनति, जास्त अवनति, जोराची अवनति, याशिवाय आमच्या नजरेस दुसरें कांही एक पडत नाही. दिवसेंदिवस आम्ही जास्त जास्त खोलांत चाललों आहोंत. दारिद्र्य वाढत्या प्रमाणावर आहे. आपआपसांतील भांडणें जोरांत आहेत. जातिद्वेष वाढीस लागला आहे. स्वराज्य मिळण्यापूर्वीच आप्पलपोटेपणा बोकाळूं लागला आहे व नसते वाद उकरून काढून जो तो दुसऱ्याचे पाय खाली ओढूं लागला आहे. अशा शोचनीय व कष्टमय स्थितींतून वर डोकें काढून आपण हिंदी लोक इंग्लिश लोकांच्या

बरोबरीचे कधी काळीं तरी होऊं का ? हा प्रश्न डोळ्यांपुढे साहजिक उभा राहतो. वरील प्रश्न कठीण आहे व त्याचें उत्तर देण्यासाठी उघडलेल्या तोंडावरील जिव्हा स्तब्ध व निश्चल होऊन जाते. नाही म्हणावयास एका वर्षांत स्वराज्य हटकून मिळवून देतों असें म्हणणारे महात्मे मात्र अशा वेळीं अस्तन्या वर सारून पुढे सरसावतात. पण या भलत्या अवसानांत राम नाही. मागलापुढला पोच लक्षांत न घेतां, सर्व बाजूंनी लागलेला पेच विचारांत न आणतां आपल्या देशबांधवांच्या मनांत भलतीच अशक्य आशा उत्पन्न करून त्यांची सरतेशेवटीं फसगत करणें हें देश-बंधूप्रेमाचें व मुत्सद्दीपणाचें खास लक्षण नाही. स्वराज्य मिळविणें ही अशी साधी गोष्ट आहे काय, की जी नुसत्या चुटक्या वाजवून चुटकीसरशी मिळवतां येईल ! आम्ही आमच्या देशबांधवांना असें स्पष्ट सांगून ठेवतों की, स्वराज्य एका वर्षांत गेलें नाही म्हणून तें एका वर्षांत कधीहि मिळणार नाही. तें कधी मिळेल हें सर्वव्यापी व सर्वज्ञानी जगाच्या सूत्रचालकालाच फक्त माहीत आहे. इतरांनी हें भविष्य वर्तविण्याच्या भानगडींत पडण्याचें धारिष्टच करूं नये.

देशबांधवहो, आज जरी सगळीकडे निराशामय परिस्थिति दिसत आहे तरी, तीमुळे निराश न होतां प्रत्येकाने शक्यतों प्रयत्न यथाशक्ति केला पाहिजे. समर्थ रामदासस्वामी दासबोधांत असें लिहितात की, " चवथा तो अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।। " समर्थांच्या म्हणण्याचा भावार्थ एवढाच आहे की, नुसतें रडत बसण्यांत मोठासा पुरुषार्थ नाही. परिस्थिति बदलणें जरी आपल्या हातीं नसलें, तरी ती बदलण्याचा प्रयत्न करणें एवढी तरी आपल्या हातांतील गोष्ट आहे. यासाठी राष्ट्रप्रेमी माणसाने परिस्थितीशीं सदोदित झगडत राहून योग्य दिशेने प्रयत्न करणें हाच खरा पुरुषार्थ आहे. पण हा प्रयत्न योग्य दिशेने झाला तरच तो परिणामीं हितकर होतो, नाही तर त्याचीं कडू फळें चाखण्याचा प्रसंग राष्ट्रावर ओढवतो. गेल्या पांच वर्षांचा असा कटु अनुभव हिंदुस्थानला आलाच आहे. आजपर्यंत पतित व परवश राष्ट्रांनी स्वराज्य कमावण्याचा जो धोपट मार्ग चोखाळला, त्या सरळ व कायदेशीर मार्गाने तोंडासमोर न जातां असहकारितेच्या खड्डयाच्या व खडकाळ मार्गांवरून राष्ट्राला फरफटत ओढण्यांत आलें व अशा वेडगळ प्रयत्नाचा जो साहजिक परिणाम व्हावयाचा तो जनतेच्या अनुभवास आला. सर्वच कांही विलक्षण सांगण्यांत आलें व त्यामुळे विलक्षण करण्यांत आलें. खादी वापरा म्हणजे स्वराज्य मिळेल. शाळा सोडा म्हणजे स्वराज्य लाभेल. कोर्टावर बहिष्कार घाला म्हणजे स्वराज्याचा लाभ होईल. वकिली सोडा म्हणजे सरकार खात्रीने वाकेल व सत्याग्रह करा म्हणजे सर्व कांही मिळेल. अशा अनेक अव्यवहार्य गोष्टी उपदेशण्यांत आल्या व सगळीकडे एकच वावटळ उठवून देण्यांत आली. पण या वावटळींत बडबडीच्या धुळीच्या कणांशिवाय दुसरें कांही एक जास्त जड नव्हतें हें सरकारच्या तावडतोब लक्षांत आलें. या चळवळीच्या धुळीच्या लोटाच्या पोकळ

अगडबंबपणामुळ सरकार व जनता पहिल्या प्रथम दिपून गेली, पण लौकरच या चळवळींतील कुसकेपणा दोघांच्याहि नजरेस येऊन तिला दोघांनीहि झिडकारून टाकण्यास सुरुवात केली. हें झालें तें यथायोग्यच झालें. असहकारिता ही नकारात्मक, कांही एक न करण्याची चळवळ आहे व म्हणून सर्वथैव त्याज्य आहे. हा असहकारितेचा मार्ग सोडून दिला म्हणजे खाली फक्त कायदेशीर असहकारितेचा मार्ग शिल्लक राहतो. या मार्गाचा अवलंब करण्यास लोकांनी प्रवृत्त व्हावें, अशी इच्छा असल्यास त्याला एकच, फक्त एकच उपाय आहे. तो उपाय म्हणजे लोकांच्या अंतःकरणांत देवभक्ति व देशभक्ति या दोन मनोवृत्ति उत्पन्न करणें होय. या दोन सजीव मनोवृत्तींशिवाय राष्ट्राचा गाडा स्वतंत्रतादेवीच्या मंदिराकडे एकसारखा अव्याहत रीतीने ढकलला जाणें शक्य नाही. सदर गाडा कोणत्या तरी आगंतुक कारणांमुळे कांही काळ पुढे गेला असें वाटण्याचा संभव आहे; पण हा देखावा केवळ भासमय होय. कोणत्याहि पतित राष्ट्राची खरी व टिकाऊ प्रगति वरील दोन मनोवृत्तींशिवाय होणें शक्य नाही. या दोन मनोवृत्तींचे अंकुर देशबांधवांच्या अंतःकरणांत उत्पन्न करणें असेल, तर त्याला एकच युक्ति आहे. ती युक्ति त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार करणें होय. राष्ट्रोन्नतीचा पाया कोणता असा प्रश्न आम्हांस विचारल्यास त्याचें उत्तर आम्ही त्रिवार असेंच देऊं की, "शिक्षण. शिक्षण, शिक्षण." शिक्षणाशिवाय देवभक्ति नाही व शिक्षणाशिवाय देशभक्ति नाही. देवभक्तीशिवाय व देशभक्तीशिवाय स्वराज्य नाही असें हें अत्यंत आवश्यक शिक्षण देशबांधवांना कसें द्यावें, याचाहि थोडासा विचार करणें जरूर आहे.

प्राथमिक शाळा काढून सर्वांना सक्तीने शिकविण्यांत यावें हा एक मार्ग आहे. पण तो मार्ग फार खर्चाचा असून तो दीर्घकालानंतर फलदायी होणार आहे. त्या मार्गाचें आक्रमण खुशाल सुखाने करावें. पण आम्ही सुचवितों तो मार्ग शीघ्रफलदायी असून बिनखर्चाचा आहे. या ठिकाणीं प्रत्येकाने हा सिद्धान्त पक्का लक्षांत धरला पाहिजे की, राष्ट्रांतील झाडून सर्व लोक देवभक्त किंवा देशभक्त होत नाहीत. ज्याप्रमाणे "शतेषु जायते शूरः" शंभरांत एकच शूर निपजतो, त्याच न्यायाने शंभरांत एकच देशभक्त निपजतो. बाकी नव्व्याण्णव लोक 'पोटाळ' वर्गांतील असतात. खावें, प्यावें, लग्न करावें, संतति वाढवावी व शेवटीं केव्हा तरी मरून जावें. अशाच वृत्तीचे शेकडा नव्वद लोक असतात. बाकीच्या राहिलेल्या दहा लोकांपैकी नऊ लोक शाब्दिक, फार झालें तर सांपत्तिक सहानुभूति दाखविणारे असतात. अंग मोडून व शारीरिक हाल सुद्धा सोसून देशकार्य करणारा जातिवंत 'जहाल' शंभरांत एकच असतो. पण असा "शतेषु जायते एकः" जहाल निवडून काढण्याकरिता कार्यकारी पुढाऱ्यांना सगळ्या शंभरच्या शंभरांना पारखावें लागतें. ही परीक्षा पसार होऊन तींतून जहाल देशभक्त 'बिचवा' बाहेर पडण्यापूर्वी सर्व शंभर देशबांधवांना सारखेंच शिक्षण देणें जरूर आहे. अशा शंभर देशबांधवांपैकी कोणत्या व्यक्तीच्या

हृदयांत जहाल देशभक्तीचें बीज परमेश्वराने घातलें आहे, हें कळण्यास शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही.

देशभक्ति ही ईश्वरदत्त देणगी आहे. ही कोणाला कमावतां येत नाही व ही कोणाला गमावतां येत नाही. पोटाळाला कितीहि थोपटला व "बच्चा ऊठ" असें म्हटलें तरी तो जमीन सोडणार नाही व जहालाला कितीहि जमिनीवर दडपला व म्हटलें की, "बिचव्या बस" तरी तो उठल्याशिवाय राहणार नाही. असा शंभरांतील एक जहाल निवडून काढण्याकरिता निरनिराळचा ठिकाणच्या पुढाऱ्यांनी खेडीं गाठून तेथे व्याख्यानांचा धूमधडाका उडविला पाहिजे. शहरांत व्याख्यानांची गर्दी करून उपयोग नाही. खेडीं हादरलीं पाहिजेत. आमच्या मतें राजकीय शिक्षणाचा शीघ्र फलदायी मार्ग हाच होय. याच हेतूने आम्ही "महाराष्ट्र सेवक संघ" या नांवाची संस्था गेल्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्ताने पुणें येथे स्थापन केली आहे. या नवीन संस्थेच्या शाखा व उपशाखा सर्व महाराष्ट्रभर स्थापन केल्या जातील, अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. या संघाचा सभासद कोणालाहि होतां येतें. या संघांतील सभासदाला वर्गणी द्यावयाला नको किंवा देणगी द्यावयाला नको. आपला तालुका किंवा जिल्हा सोडून दुसरीकडे जावयास नको. फक्त एकच अट अशा सभासदाने पाळली पाहिजे. ती अट अशी आहे की, अशा सभासदाने वर्षांतून निदान एक तरी व्याख्यान एखाद्या खेडेंगावांत स्वतःच्या खर्चाने जाऊन दिलें पाहिजे. असे संघ जागजागीं स्थापन झाल्यास खेडेंगावांतून बीजरूपाने पण अदृश्य असलेले जहाल ठिकठिकाणीं दृष्टिगोचर होतील व त्यांच्या साहाय्याने राष्ट्रोन्नतीची वाढ झपाटचाने होऊन जाईल. सारांश, मथळचांत आम्ही लिहिल्याप्रमाणे भरतभूमीला स्वराज्याची जोड लवकर व्हावी, अशी इच्छा असल्यास आपल्या अज्ञ व अडाणी देशबांधवांना व्याख्यानांच्या द्वारें शिकवा व अशा शिक्षणाने त्यांच्या अंतःकरणांत देवभक्ति व देशभक्ति पिकवा.

– भाला, दि. २७ एप्रिल १९२५

---

## ५५. ही स्वदेशी का स्वाहादेशी ?

शेवटल्या रावबाजीने स्वराज्याचें तिलोदक मालकमसाहेबांच्या हातावर सोडून ब्रह्मवर्ताकडे उत्तरेकडील वाट धरली, त्या वेळेपासून किंवा त्याच्या अगोदरपासून सुद्धा हिंदुस्थानच्या व्यापाराने येथील आपलें बिऱ्हाड मोडून पश्चिमेकडे असलेल्या इंग्लंडचा रस्ता सुधारला. मुसलमानी बादशाही भरतभूमींत स्थापली

गेली. या राज्यक्रांतीचा परिणाम फक्त एवढाच झाला की, हिंदु लोकांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन त्यांना गुलामांची अस्पृहणीय स्थिति प्राप्त झाली. पण मोगल बादशहांनी आपली वस्ती येथे कायमची केल्यामुळे इकडील व्यापार परदेशी गेला अशी तक्रार करण्यास त्या काळीं जागा नव्हती. त्या वेळीं देशांतील व्यापार देशांतच राहिला व म्हणून भरतभूमींतील संपत्ति येथल्या येथेच मुरली. आधीच येथील जमीन अत्यंत सुपीक असल्यामुळे व त्यांत व्यापाराच्या पैशाची भर पडल्यामुळे, येथे संपत्तीचा इतका भला मोठा साठा होऊन गेला की, या हिंदुस्थान देशाचें मूळचें भरतभूमि हें नांव मागे पडून तिला सुवर्णभूमि हें यथार्थ नांव देण्यांत आलें. इंग्रजी अंमल येथे होण्यापूर्वी येथील लोकांची सांपत्तिक स्थिति इतकी उत्तम होती की, "दुर्लभं भारते जन्म" हें मोहक वचन आबालवृद्धांच्या तोंडावाटें निघूं लागलें. पण हें सर्व सुखस्वप्न गेल्या शंभर वर्षांत पार लयाला जाऊन प्रत्येकाला अशी विवंचना पडली आहे की, दोन प्रहरच्या गोळाभर अन्नाची सोय कशी करावयाची. पर्जन्याचा लहरी स्वभाव व गुरांढोरांचा कहरी संहार, या कारणांमुळे येथील जमिनी पूर्वीप्रमाणे पिकें देइनाशा झाल्या आहेत. त्याचप्रमाणे येथील हरएक प्रकारचा व्यापार परदेशी लोकांच्या हातांत गेल्यामुळे दरवर्षी भरतभूमीच्या हल्लक झालेल्या शरीरांतून अजमासें शंभर कोटि रुपयांचा निचरा होत आहे. अशी स्थिति आणखी शंभर वर्षें राहिल्यास येथील लोकांवर एक दिवसाआड जेवण्याचा प्रसंग आल्याशिवाय राहणार नाही. येथील व युरोपांतील जनतेकडे नुसती धांवती नजर फेकली तरी कोणीहि असेंच म्हणेल की, कोणीकडे हिंदी हाडांचे सापळे व कोणीकडे इंग्रज लोकांचे मांसाचे भोपळे! ही दुःखमय स्थिति सुधारून हिंदी लोकांच्या पोटांत अन्नाचे दोन घास जास्त पडावेत अशी इच्छा असल्यास, त्याला एकच एक उपाय म्हणजे येथील व्यापाराची सुधारणा होय. पण हें घडून यावयाचें कसें!

बालवैधव्य प्राप्त झालेल्या हतभागी अबलेचे मनोरथ ज्याप्रमाणे जागच्या जागीं जिरून जातात, त्याचप्रमाणे परवशतेच्या आगीच्या डोंबांत सापडलेल्या राष्ट्राच्या योजना जागच्या जागीं होरपळून जातात. कोणत्याहि अवनत राष्ट्राची उन्नति होण्यास, तशा राष्ट्राला अल्पस्वल्प तरी स्वातंत्र्य पाहिजे. हिंदुस्थानप्रमाणे सर्व बाजूंनीं परतंत्र झालेल्या राष्ट्राला कोणत्याहि दिशेने हातपाय हलविण्यास जागा राहिली नाही. कांही करा, अपयश हें हटकून यावयाचेंच. नवी हुन्नर निघत नाही व जुनी हुन्नर टिकत नाही. नवा व्यापार सुचत नाही व जुना व्यापार चालत नाही. नवा धंदा माहीत नाही आणि जुना धंदा टिकत नाही. अशा विलक्षण कात्रींत हा देश सापडल्यामुळे ज्याच्या त्याच्या तोंडावर प्रेतकळा आली आहे व कोणाचेंहि तोंड हसतमुख दिसत नाही. घरांत एखादा मनुष्य मेल्यावर ज्याप्रमाणे अशा घरांत दुःखी शांतता जिकडे तिकडे दिसूं लागते, त्याचप्रमाणे हिंदुस्थानांत काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व द्वारकेपासून डाक्यापर्यंत जिकडे-तिकडे सुतकी शांतता दृग्गोचर होत

असल्यामुळे भरतभूमीला सुवर्णभूमि असें म्हणण्याऐवजीं तिला यापुढे 'स्मशानभूमि' असें म्हणणें जास्त शोभेल ! हे वरील विचार सुचण्याचें कारण मुंबईत हल्ली कापडाच्या गिरण्यांची झालेली दुर्दशा होय. ही दुर्दशा नाहीशी व्हावी या हेतूने आम्ही जे उपाय या लेखांत सुचविणार आहोंत, ते सहृदय अंतःकरणाने सुचविलेले आहेत, असें आम्ही अगाऊच 'ईशारून' ठेवतों. आम्हीं सुचविलेले उपाय अमलांत आणले न गेल्यास, त्याचा परिणाम असाच होईल की, एकामागून एक एक गिरणी बंद करण्याची पाळी गिरणीवाल्यांवर हटकून येईल. देव करो व हें अनिष्ट टळो.

एकट्या मुंबई शहरांत कापसाच्या गिरण्या शंभराच्यावर असून अशा सर्व गिरण्यांतून काम करणाऱ्या मजुरांची संख्या साडेतीन लक्षांच्यावर आहे. या घटकेस हिंदुस्थानांत जितकें कापड खपतें त्याच्या फक्त निम्में कापड येथील गिरण्यांत उत्पन्न होतें व बाकीचें निम्में कापड इग्लंड व जपान देश आपणास पुरवीत असत. इंग्लंड व जपान हे देश झपाट्याने प्रगति करीत असत. हें कळून येण्यास एकच आकडा बस्स आहे. सन १९०३ सालीं एकतीस लक्ष पौंड वजनाचें जपानी कापड येथे खपलें, तर सन १९१३ सालीं जपानी कापडाचा येथील खप एक कोटि अडतीस लक्ष पौंड झाला. जपानी देशाची दहा वर्षांतील ही प्रगति लक्षांत घेतली म्हणजे पुढील दहा वर्षांत येथील गिरण्यांची केवढी कल्पनातीत दुर्दशा होईल, याचें भेसूर चित्र लोकांच्या नजरेसमोर येईल. वास्तविक रीतीने हा प्रश्न भांडवलवाल्यांपेक्षा कामकरी लोकांनाच जास्त जाचक होईल. हा प्रश्न साडेतीन लक्ष मजुरांचा, त्यांच्या पोराबाळांच्या पोटापाण्याचा आहे, म्हणून त्याचा विचार शांतपणें व निर्विकार मनाने करण्यांत आला पाहिजे. बाकी मुंबईतील किंवा अन्य ठिकाणच्या गिरणीवाल्यांना सहानुभूति किंवा साहाय्य करावें, अशी वागणूक त्यांच्या हातून महायुद्धांत झालेली नाही.

स्वदेशीच्या प्रश्नाला तोंड सन १८९४ सालीं लागलें. जेव्हा येथे पैदास होणाऱ्या कापडावर साडेतीन टक्के जकात बसविण्यांत आली, तेव्हापासून झीज सोसून सुद्धा स्वदेशी कापड वापरण्याचा निश्चय महाराष्ट्रांतील लोकांनी केला व तो त्यांनी अजूनपर्यंत कायम ठेवला आहे; परंतु हा निश्चय यापुढे पूर्वीप्रमाणे कायम ठेवावा की नाही, याबद्दल पुष्कळ लोकांच्या मनाची चलबिचल होऊं लागली आहे व याचें कारण गिरणीवाल्यांनी स्वदेशी तत्त्वाकडे कानाडोळा करून — नव्हे त्या तत्त्वाला पायाखाली तुडवून — आपली स्वतःची तुंबडी भरण्याकरितां गेल्या महायुद्धांत केलेलें देशाभिमानशून्यतेचें वर्तन होय. गिरणीवाल्यांच्या पडत्या काळांत त्यांना स्वदेशीने हात दिला असतां, महायुद्धांत विलायती कापड हिंदुस्थानांत येण्याचें बंद झाल्या-बरोबर, लोकांच्या अडचणींचा गैरफायदा घेऊन, त्यांनी बेसुमार नफा मिळविला व त्या नफेबाजीमुळे गिरण्यांच्या शेअरांचे भाव अठरा-वीस पटींनी वाढले. आम्हांस व आमच्या वाचकांना ही गोष्ट माहीत आहे की, सन १९२० सालीं कांही कांही

गिरण्यांनी एक हजार रुपये किमतीच्या शेअरांवर एक हजार व बाराशे रुपये व्याज (डिव्हिडंड) एका वर्षात दिलेलें आहे. आम्ही यावर असा सवाल करतों की, हें दसपट-बारापट व्याज कोठून आलें ! याला एकच उत्तर हें आहे की, हें डोईजड व्याज लोकांच्या शिखांतून किमतीच्या फाजील वाढीच्या रूपाने बाहेर ओढण्यांत आलें. जनता ही नेहमी विसरभोळी असते म्हणून बरें आहे. नाही तर, जर तिची आठवण टिकाऊ असती व तिच्याबरोबर जर जनतेच्या मनांत सूडबुद्धि वास करीत असती, तर येथील गिरण्यांची स्थिति झाली आहे तिच्यापेक्षा शतपट जास्त वाईट झाली असती. आम्ही म्हणतों की, लोकांनी यापुढे स्वदेशी कापड कां विकत घ्यावें ?

सन १९१४ सालापूर्वी तुमचें महाग व ओबडधोबड कापड स्वदेशीच्या तत्त्वामुळे लोकांनी विकत घेतलें. हा त्यांनी मूर्खपणा केला काय ? लोकांच्या या स्वार्थत्यागाचें चीज तुम्ही गिरणीवाल्यांनो, महायुद्धांत स्वदेशी कापडाच्या किमती मनसोक्त वाढवून केलें ना ! शाबास तुमच्या कृतज्ञतेची ! आता तुमचा कटु अनुभव एकदा आल्यावर लोकांनीं तुमच्याशीं संबंध न ठेवला, तर त्यांत त्यांचा दोष काय आहे बरें ? महायुद्धांत तुम्हीं त्या वेळचा बाजारभाव घेतलांत, बरें आहे; लोकहि हल्लीं तुमच्या मालाला बाजारभावच देण्यास तयार आहेत. तुम्ही आपला माल बाजारांत मांडा व खुल्या चढाओढींत तुम्ही कसा टिकाव धरतां, हें तुम्हांस तावडतोब कळेल. आम्ही या ठिकाणीं हें स्पष्ट लिहून ठवतो कीं, हिंदी गिरण्यांतील कापड स्वदेशीच्या तत्त्वामुळेच खपतें, ते आपल्या अंगभूत गुणांमुळे खपत नाही. ही उघड गोष्ट येथील गिरणीवाल्यांना माहीत असतां, त्यांनी महायुद्धांत बेपर्वाईचें व बेगुमानपणाचें वर्तन केलें, हे भावी परिणामाकडे लक्ष ठेऊन खास केलेले नाही. स्वदेशी फक्त लोकांना पाहिजे आणि ती गिरणीवाल्यांना नको आहे काय ? असें असेल, तर त्यांनी तसें उघडपणें जाहीर करावें म्हणजे लोकांनाहि आपलें वर्तन बदलावयास ठीक पडेल. आम्हांस हें पक्कें माहीत आहे की, आंबट तोंडें करून व जास्त पैसा देऊन लोक स्वदेशी म्हणून येथील गिरण्यांतील कापड विकत घेतात. अशा लोकांच्या मनावरील स्वदेशीचा दाब काढून टाकण्यास फारसें जड जाणार नाही. वक्त्याची वाणी व लेखकाची लेखणी ही गोष्ट झटक्यांत करून टाकील; पण एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरूं मारणें चांगलें नाही. गिरणीवाल्यांनी गेलीं दहा वर्षे लोकांकडून पिळून पैसा काढला, पण लोक त्यांना तो गिळून बसूं देण्यास तयार नाहीत. गिरणीवाल्यांनी गिळलेला फाजील नफा त्यांनी तो गिऱ्हाइकाच्या खिशांत परत ओतलाच पाहिजे. या एकाच अटीवर आम्ही स्वदेशीचा पुरस्कार करीत आहोंत व पुढे करीत राहणार.

कोणतेंहि दुसरें-तिसरें तत्त्व विचारांत घेतलें नाही, तर कोणताहि माल उघड्या बाजारांत आपल्या स्वतःच्या जोरावर विकला जाण्यास त्याच्या अंगीं

मुख्यत्वेंकरून तीन गुण असावे लागतात. ते गुण दिखाऊपणा, टिकाऊपणा व स्वस्ताऊपणा हे होत. कोणताहि माल पाहिल्याबरोबर तो मोहक दिसला तरच गिऱ्हाईक त्याच्यावर उडी घेईल. स्वदेशी कापडाच्या अंगीं हा गुण बेताबेताचाच आहे. त्याच जातीच्या परदेशी कापडापेक्षा स्वदेशी कापड जास्त ओबडधोबड दिसतें. स्वदेशी कापड परदेशी कापडापेक्षा कमी सफाईदार असतें, ही गोष्ट सिद्ध करण्यास फारसें विवेचन नको. कोणत्याहि कापडाच्या दुकानीं जा व उदाहरणासाठी दोन्ही तऱ्हेच्या मलमली पाहा. कमी भावाची पण जास्त सफाईची मलमल परदेशी असते. साधारणरीत्या मनुष्याच्या मनाची प्रवृत्ति अशी असते की, एखादा माल एकदा मनांत भरला व तो किमतींत बेताबाताचा असला म्हणजे गिऱ्हाइकाची प्रवृत्ति असाच माल विकत घेण्याकडे होते. हाच नियम परदेशी कापडाला लागू पडतो. स्वदेशी कापड ओबडधोबड व महाग असलें, तरी तें परदेशी कापडापेक्षा जास्त टिकाऊ असतें, असा एक मुद्दा नेहमी पुढे करण्यांत येतो. या म्हणण्यांत थोडासा अर्थ असेल, पण माल घेण्याच्या वेळीं गिऱ्हाईक एवढा लांबचा विचार करीत नाही. सारांश, मनाची सहाजिक ओढ परदेशी कापडाकडे असतां तिला आवरून धरून तिला स्वदेशीकडे वळविण्यांत येते, याचें कारण अशा गिऱ्हाइकांच्या अंतःकरणांतील राष्ट्रीयत्वाची भावना होय. हेंच राष्ट्रीयत्व ओबडधोबड स्वदेशी कापडाचा खप करवितें. हेंच राष्ट्रीयत्व महाग स्वदेशी कापड विकत घेण्यास गिऱ्हाइकाला आंतून प्रोत्साहन देतें.

सारांश, स्वदेशी कापडाच्या अंगांत तें फक्त 'स्वदेशी' असतें, याशिवाय दुसरा गुण नाही; किंवा अन्य तऱ्हेने बोलावयाचें म्हणजे स्वदेशी कापडाचा खप स्वदेशी तत्त्वामुळे आहे. ही उत्तान गोष्ट गिरणीवाल्यांना एक तर माहीत नसावी किंवा माहीत असूनहि ते तिच्याकडे जाणूनबुजून कानाडोळा करीत असावेत. असें नसतें तर ज्या गिऱ्हाइकांनी आपल्या मालाला सन १८९४ पासून झीज सोसूनहि पाठिंबा दिला, त्या गिऱ्हाइकांपासून त्यांनी महायुद्धांत दुप्पट-तिप्पट व दसपट सुद्धा किमती खचित घेतल्या नसत्या. महायुद्ध संपून गेलें व यामुळे बदललेली स्थिति पूर्ववत् होऊं लागली व आता त्यांचे डोळे उघडूं लागले. स्वदेशी कापडाचें गिऱ्हाईक कमी पडलें व त्यामुळे कापडाचे ढीग दिवसेंदिवस वाढूं लागले. बत्तीस कोटि लोकांना जेवढें कापड लागतें त्याच्या निम्में कापड येथील गिरण्यांत पैदा होत असतां, तें गिऱ्हाइकांच्या अभावीं कुजत पडावें हें कशाचें द्योतक आहे बरें? याचें एकच कारण, स्वदेशी कापड मुळांत कमी दर्जाचें असल्यामुळे उघडया बाजारांत त्याला परदेशी कापडाशीं टक्कर देतां येत नाही. स्वदेशी कापड बहुतेक करून चाळीस नंबराच्या आंतील असतें, म्हणजे त्यांत तलमपणा मुळीच नसतो. याचा अर्थ असा आहे की, जर एखाद्या हिंदी गिऱ्हाइकाला तलम कापड वापरावयाची इच्छा झाली, तर त्याची भूक भागविण्यास महाग सुद्धा स्वदेशी कापड निपजत नाही. तलम कापड सोडून

दिल्यास चाळीस नंबराखालील जाडेंभरडें कापड बहुतेक अलम म्हणजे सर्व दुनिया वापरीत असते व हेंच 'अलम' कापड गोरगरीब लोक वापरतात व ते कापड स्वदेशी गिरण्यांतून विणलें जातें. या कापडाला मुख्य प्रतिस्पर्धी म्हणजे जपान देश होय.

जपानी गिरण्यांतून फक्त चाळीस नंबराखालील 'अलम' कापड बाहेर पडतें. जपानांत कापूस पिकत नाही. जपानी व्यापारी हिंदुस्थानांतून कापूस विकत घेऊन तो जपानांत धाडतात. तेथे त्याचें 'अलम' कापड बनतें. तें हिंदुस्थानांत परत येतें व तें मुंबईंतील कापडापेक्षा स्वस्त विकलें जातें. ही स्थिति पाहून आम्ही पूर्ण आश्चर्यचकित झालों आहोंत. हें असें होतें तरी कसें, हा प्रश्न आमच्या तरी पुढे दत्त म्हणून उभा राहतो. आमचाच कापूस व आमच्याच येथे स्वस्त परदेशी कापड ही परमेश्वराची अजब करणी होय. काय, येथील गिरणीवाल्यांना अक्कल नाही? आमच्यांत नाही तरी काय, की ज्याच्यामुळे अलम कापडांत सुद्धा हिंदी कापडाला परदेशी कापडाशीं स्वतःच्या जोरावर टक्कर मारण्याची ताकद नसावी? वास्तविक रीतीने पाहिलें म्हणजे येथून जपानांत कापूस नेण्याची वाहतूक व जपानांतून येथे कापड आणण्याची वाहतूक या दोन खर्चांच्या बाबी लक्षांत घेतल्या म्हणजे जपानी कापड येथे येऊन महाग पडलें पाहिजे. पण प्रत्यक्षांत अनुभव पाहतां, तो निराळाच दृष्टीस पडतो. मुंबईच्या बाजारांत हिंदी कापडाला गिऱ्हाईक नाही व जपानी कापड शिल्लक राहत नाही. मुंबईच्या गिरण्या बंद होत आहेत. अशा बातम्या दररोज वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. ही स्थिति सुधारावी म्हणून दोन-तीन उपाय सुचविण्यांत येत आहेत. पहिला उपाय असा आहे की, हिंदी कापड महाग पडतें, कारण त्याच्यावर साडेतीन टक्के जकात आहे. ही जकात बंद केल्याशिवाय हिंदी कापडाला आपलें डोकें वर काढतां यावयाचें नाहीं. हें कारण साधार आहे व तें नाहीसें करण्याचा मार्ग म्हणजे एक असेंब्लींतील ठरावाची चळवळ, नाही तर असेंब्लीबाहेर बहिष्काराची चळवळ होय. निदान चाळीस नंबराखालील 'अलम' कापडावर साडेतीन टक्के जकात घेऊं नये, असा मर्यादित ठराव जर असेंब्लींत कोणी सभासदाने आणला, तर तो पसार होऊन सरकारला मान्य होईल, असा आमचा अंदाज आहे. कारण त्यामुळे विलायती तलम कापडाला कोणत्याहि प्रकारचा धोका नाही अशा ठरावाने जर कोणाचें नुकसान झालें तर तें जपानचें होय. जपानासंबंधाने विशेष प्रेम इंग्रज मुत्सद्द्यांच्या अंतःकरणांत हल्ली वसत नाही. हिंदी कापडाची किंमत कमी होण्याचा दुसरा उपाय म्हणजे कामकरी लोकांचे कामाचे तास वाढविणें किंवा त्यांची मजुरी कमी करणें. हे दररोज फक्त आठ तास काम व रविवारची सुट्टी व वर्षांतून बारा सणांच्या बारा सुट्ट्या. यापेक्षा जास्त काम कामकरी लोकांपासून घेतां कामा नये. गिरण्यांतून उभें राहून व कापसाच्या खकाण्यांत काम करावें लागतें, ही गोष्ट नेहमी नजरेसमोर ठेवली पाहिजे. मजुरीसंबंधाने म्हटलें, तर ती बाजारभावाप्रमाणे कमीजास्त करणें योग्य आहे. सन १९२० सालीं जी मजुरी देत

असत, तितकीच मजुरी सन १९२५ सालीं देणें परवडणार नाही. मजुरी कमीजास्त करा, पण काम ठराविक घ्या. आठ तास भरपूर काम केल्यावर पोटभर खाण्यास ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणे मिळावें, हाच आमच्या मनाने खरा 'सोशियालिझम' आहे. वरील दोन उपायांचा विचार केल्यावर, आम्हांस एक तिसरा उपाय सुचवायचा आहे. हा तिसरा उपाय इमानेइतबारें व मायभूमीला स्मरून गिरणी-वाल्यांकडून आचरण्यांत न आल्यास स्वदेशी कापडाविरुद्ध आम्ही बेशकपणें लिहीत जाऊं, हें आम्ही आगाऊच लिहून ठेवतों.

हिंदी व्यापाराची भरभराट करण्याचा बोजा, जनता, कामकरी व गिरणी-वाले या तिघांवर सारखा आहे. झीज सोसून स्वदेशी कापड विकत घेण्यास लोकांची तयारी आहे. पोटापुरती मजुरी मिळाल्यास आठ तास काम करण्यास मजूर राजी आहेत. त्याचप्रमाणे आपल्या भांडवलावर सहा टक्के व्याजावर संतुष्ट राहण्याची भांडवलवाल्यांची तयारी असली पाहिजे. जर या दरापेक्षा जास्त व्याज ते घेतील किंवा भागीदारांना देतील, तर अशा गिरण्या स्वदेशी नसून त्या 'स्वाहादेशी' म्हणजे हिंदी गिऱ्हाइकांचा आपल्या इंजिनाच्या होमांत स्वाहाकार करणाऱ्या आहेत, असेंच आम्ही म्हणूं. अशा सहा टक्क्यांच्यावर डिव्हिडंड देणाऱ्या 'स्वाहादेशी' गिरण्या व परदेशी गिरण्या या दोहोंत आमच्या दृष्टीला कोणताहि फरक दिसत नाही. हेंच आमचें ठाम मत आहे की, स्वार्थत्यागी लोकांनी दुसऱ्या स्वार्थत्यागी लोकांना मदत करावी. स्वार्थसाधु लोकांना मदत करण्यासारखें महापाप नाही. अशा लोकांना मदत केली, तर तिचा उपयोग न होतां, उलट दुरुपयोग होण्याचा संभव जास्त आहे. महायुद्धांत गिरणीवाल्यांनी सहा टक्क्यांच्यावर नफा खाल्ला, पण तो मोटारींच्या रूपाने व अन्य रूपाने परदेशीं गेला. सारांश, सहा टक्क्यांपर्यंत भागीदारांना नफा देणारी गिरणी तीच स्वदेशी होय व अशा गिरणीचा माल लोकांनी पैशाची झीज सोसूनहि घ्यावा, अशी 'स्वदेशी' या शब्दाची व्याख्या करून आम्ही हा लेख संपवितों.

— भाला, दि. १५ जून १९२५

---

## ५६. गायखाऊ व सायखाऊ ?

हिंदु कोणास म्हणावें, असा प्रश्न जर आम्हांस विचारण्यांत आला, तर या दिसण्यांत अवघड पण उत्तर देण्यास सोप्या प्रश्नाचें उत्तर आम्ही थोडक्यांत असें देऊं की, जो इसम वेदांचें प्रामाण्य व अपौरुषेय कबूल करतो, तो हिंदु होय. आमच्या या उत्तराने अव्याप्ति किंवा अतिव्याप्ति होण्याचा संभव नाही. वेदांचें ईश्वर-

प्रणीतत्व मान्य न करतां ज्या झोंडांना हिंदु म्हणवून घेण्याचें असेल त्यांनी स्वतःला हिंदु खुशाल म्हणवून घ्यावें, पण हिंदुत्वाच्या वरील लक्षणाने त्यांची गणना हिंदूंत कधीहि करतां यावयाची नाही.

वेदप्रामाण्य हे एकच हिंदुत्वाचे लक्षण आहे. एवढें लक्षण अंगीं असल्यावर मी हिंदु आहें असें जाहीर करण्यास कोणतीहि हरकत नाही. धर्माच्या बाबतींत मुख्य श्रद्धा लागते. धार्मिक बाबतींत चिकित्सक बुद्धीचा अवलंब करणें धोक्याचें म्हणून मूर्खपणाचें आहे. वेद प्रमाणभूत कां, असा प्रश्न कोणी आम्हांस केल्यास त्याचें ताबडतोब उत्तर असेंच आम्ही देऊं की, ते तसे अनादिकालापासून आजपर्यंत समजण्यांत आले आहेत. म्हणून वेदांचा कर्ता साक्षात् परमेश्वर असो किंवा नसो, त्यांचा अर्थ लागो किंवा न लागो, त्यांतील तत्त्वें मान्य होवोत किंवा न होवोत, श्रद्धावान् हिंदूने या प्रश्नाच्या चर्चेच्या यातायातींत न पडतां, वेद हे ईश्वरप्रणीत आहेत व म्हणून ते प्रमाणभूत आहेत, असेंच धरून चाललें पाहिजे. मुसलमानांना ज्याप्रमाणे कुराण, ख्रिश्चन लोकांना ज्याप्रमाणे बायबल, त्याप्रमाणेच हिंदूंना वेद होत. वेदांच्या गुणावगुणांत किंवा उपयुक्तानुपयुक्ततेंत शिरण्याचा अधिकार श्रद्धावान् हिंदूला नाही. वेदांचें प्रामाण्य गृहीत धरून मगच पुढे त्याने आपल्या अकलेचा उपयोग करावा. हिंदुत्वाचें वरील लक्षण सांगितल्यावर त्यांच्या बाह्यांगा-बद्दल थोडासा मतभेद उत्पन्न झाला, तरी तिकडे कानाडोळा करण्यास हरकत नाही.

हिंदु धर्माचीं बाह्यांगें अनंत आहेत, पण त्यांत तीन अंगें प्रमुख आहेत. तीं तीन बाह्यांगें म्हणजे "गो-गायित्री-गजानन" होत. वेदप्रामाण्य व हीं तीन बाह्यांगें मान्य असल्यावर असा इसम शंभरनंबरी व बावन्नकशी हिंदु होय, हें आम्ही सांगावयास नको. गो म्हणजे गाय, गायित्री म्हणजे चातुर्वर्ण्य व गजानन म्हणजे मूर्तिपूजा, हीं हिंदु धर्माचीं तीन बाह्यांगें आहेत. चातुर्वर्ण्य गाळल्यावर हिंदु धर्माचें स्थैर्य व शाश्वतत्व गाळल्यासारखें आहे. मी हिंदु आहें, या वाक्यावरून कांहीच बोध होत नाही. जातीशिवाय हिंदुत्व नाही. मी हिंदु आहें व माझी जात अमुकतमुक आहे, असें पूर्ण वाक्य उच्चारल्यावरच अशा मनुष्याची नीट ओळख होते. पण चातुर्वर्ण्य हा हिंदु धर्माचा भक्कम पाया उखडून टाकून त्यावर आधारलेली हिंदु धर्माची इमारत पाडून टाकण्याची सैतानी हाव कांही लोकांनी धरली आहे. अशा लोकांना आम्ही असें स्पष्ट सांगतों की, एक वेळ मुसळांना अंकुर फुटतील, एक वेळ वांझेला पोर होईल किंवा एक वेळ ऊन पाण्याने घरें पेटतील, पण अनादि काला-पासून चालत आलेलें स्वयंभू व सनातन चातुर्वर्ण्य कधीहि नष्ट होणार नाही. जाति व त्यांच्या पोटजाति कालेंकरून एक होतील, पण ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य व क्षुद्र हे चार वर्ण त्रिकालाबाधित राहणारच राहणार. वरीलप्रमाणे आमची बालंबाल खात्री आहे; तरी पण घटकाभर आपण असें धरून चालू की, वर्णसंकर करण्याचा भगीरथ प्रयत्न करण्यांत येऊन, चार वर्णांऐवजीं फक्त दोनच वर्ण म्हणजे ब्राह्मण-

ब्राह्मणेतर शिल्लक राहिले तरी पण जर अशा दोन वर्णांतील लोकांना वेदप्रामाण्य मान्य असेल, तर हा बाह्य स्वरूपांतील फरक फारसा बाधक नाही. चातुर्वर्ण्याबरोबर हिंदु धर्माचें दुसरें लक्षण म्हणजे मूर्तिपूजा होय.

डोळे मिटून आकाशांतील बाप्पाच्या नांवाने हाक मारण्याची कला आम्हां हिंदु लोकांना साधत नाही. निराकार परमेश्वराचें ध्यान करतांना त्याची साकार मूर्ति डोळ्यासमोर नसली म्हणजे आम्हां हिंदूंची मनोवृत्ति शून्याकार होते. अन्य धर्मीयांना निराकार परमेश्वराचें ध्यान कसें करतां येतें, हें एक आम्हांस गूढ आहे. डोळे मिटून परमेश्वराचें ध्यान करूं लागल्याबरोबर, अंतर्मुख झालेलें मन कशाला चिकटतें, हें उघड करून सांगण्याची तसदी निराकार परमेश्वराचें ध्यान करणाऱ्या भक्तांनी घ्यावी, अशी त्यांना आमची आग्रहाची विनंती आहे. इतरांना तें साधत असेल तर साधो. आम्ही साधे-भोळे हिंदु लोक प्रतिमेच्या साध्या मार्गाने आजपर्यंत जात आहों व त्याच सिध्या मार्गाने यापुढे जात राहणार. सारांश, मूर्तिपूजा व प्रतिमापूजा हें आमच्या हिंदुत्वाचें दुसरें बाह्य लक्षण आहे. वेदांचें प्रामाण्य मान्य असून फक्त मूर्तिपूजा नको म्हणणारे लोक हिंदु होत, असें म्हणण्यास आम्ही तयार आहोंत. आर्यसमाजिस्टांना वेदप्रामाण्य कबूल आहे, पण त्यांना प्रतिमापूजा मान्य नाही. आर्यसमाजिस्टांमध्ये हें वैगुण्य आहे व तें त्यांनी घालविलें, तर त्यांच्यासारखे दमदार हिंदु या मितीला दुसरे नाहीत.

हिंदु धर्माचें तिसरें बाह्यांग म्हणजे गोपूजन होय. या बाह्य लक्षणासंबंधाने मात्र अल्पहि सवलत मिळण्यासारखी नाही. एक वेळ एक वर्ण्य घडवून आणा, एक वेळ प्रतिमापूजन करण्याचें सोडून द्या, पण गोपूजनासंबंधाने मात्र कांही एक कमी-जास्त करतां यावयाचें नाही. वेदांचें प्रामाण्य जसें प्रत्येक हिंदूला मान्य असलेंच पाहिजे त्याचप्रमाणे गोमातेचें पावित्र्य प्रत्येक हिंदूला संमत असलेंच पाहिजे. अन्य धर्मीय लोक गाईला नुसतें जनावर समजोत, पण गोमातेसंबंधाने आम्हां हिंदूंची कल्पना अशी आहे की, गाय हें अदृश्य हिंदु धर्माचें दृश्य स्वरूप आहे. तुमचा हिंदु धर्म सजीव स्वरूपांत दाखवा असें कोणी आम्हांस म्हटल्यास आम्ही गोमातेकडे बोट करूं. गाय ही चालता-बोलता हिंदु धर्म होय. उपयुक्ततेच्या दृष्टीने किंवा इतर स्वार्थी दृष्टीने नव्हे, तर फक्त धार्मिक दृष्टीने आम्ही हिंदु लोक गोमातेकडे पाहत असतों. गाय ही सदैव पवित्र व कधीहि अपवित्र न होणारी वस्तु आहे. सदासर्वकाळ स्वत: पवित्र राहून इतरांना पवित्र करणारी गाय ही एक पावनशक्ति आहे. गाईच्या पावित्र्याबद्दल आम्हां हिंदु लोकांची इतकी उत्कट भावना आहे की, सुतकी माणसाचा विटाळ झाल्यास गाईचें शेपूट तोंडावरून फिरविल्यावर तो दोष परिहार होतो व एखादें अभक्ष्य भक्षण केल्यास किंवा अपेयपान केल्यास गोमूत्राचीं तीन आचमनें केल्यास तें पाप नाहीसें होतें. हिंदु धर्मांत श्रेष्ठत्वास पावलेल्या अशा गाईला मुसलमानांनी केवळ जनावर समजून तिचा वध करावा, ही अत्यंत दु:खाची गोष्ट

आहे. मुसलमानांनो, गाय तुमच्या डोळ्याला फक्त जनावराच्या रूपाने दिसते, पण तीच गाय आमच्या हिंदूंच्या डोळ्यांना प्रत्यक्ष माय वाटते. जन्म देणारी माय आणि दूध देणारी गाय या दोघींत हिंदूंना फरक करतां येत नाही. अशा गाईचा धर्माच्या नांवाखाली निष्कारण वध करून तुम्ही हिंदूंचीं मनें कां दुखवितां बरें ?

बकरीदच्या दिवशीं बकरीं मारणें हेंच योग्य आहे. पण केवळ हट्टामुळे व आपले शेजारी जे हिंदु त्यांचीं मनें मुद्दाम दुखविण्याच्या आसुरी इच्छेने तुम्ही मुसलमानांनो, बकरीदच्या दिवशीं गाईचा वध करीत आहांत ! गाई मारून तुमचा रहीम संतुष्ट होत असेल, तर त्याच वेळीं आमचा राम रुष्ट होत आहे. आमच्या रामाची तुम्हांला पर्वा नाही, तर तुमच्या रहीमचीहि आम्हांस पर्वा नाही. बकरीदच्या दिवशीं तुम्ही गाई मारीत राहणारच ना ? बरें आहे, मारा. आम्हांसहि तोडीस तोड म्हणून एखादा मार्ग सापडूं शकेल. मुसलमान बकरीदच्या दिवशीं गाई मुद्दाम मारतात., या आमच्या विधानाला आधार आहे. हिंदुस्थानाशिवाय इतर देशांत मुसलमान आहेत, पण तेथे बकरीदला गाई मारीत नाहीत. खुद्द हिंदुस्थानांत निजाम हद्दींत गोवधाला बंदी आहे. गाई मारल्याशिवाय हैदराबादला बकरीद होऊं शकते, पण गोवधाशिवाय दिल्लीला बकरीद साजरी होऊं शकत नाही, हें कशाचें द्योतक आहे ! हा केवळ हिंदूंच्या धार्मिक भावना दुखविण्याचा हट्ट आहे.

शुक्रवारीं तारीख तीन जुलै रोजीं दिल्ली शहरीं पहारीधिराज रस्त्यावरून वधस्तंभाकडे नेत असलेल्या गोमाते, कसायाच्या सुरीपासून आपलें संरक्षण कोणी तरी करील म्हणून आशाळभूत डोळ्यांनी तूं बावीस कोटि हिंदूंकडे पाहिलें असशील ! पण तुझा पालनवाला हा लोक सोडून परलोकीं सन १६८० सालीं निघून गेला. सन १९२५ सालचे दीन व दुबळे, हीन व हताश झालेले आम्ही, तूं आमच्याकडे पाहिल्याबरोबर आम्ही वरती परमेश्वराकडे पाहिलें. त्या दीनदयाळू परमेश्वराला तुझी करुणा आली नाही, तेथे आम्ही काय करणार ? मशिदींत नेल्यावर चारी पाय बांधून व जमिनीवर पाडून ज्या वेळीं कसायाने कंठनाळावर कापण्याकरिता सुरा ठेवला असेल त्या वेळीं "माझा जीव वांचवा" असा हृदयद्रावक हंबरडा बावीस कोटि हिंदूंना ऐकूं जाईल इतक्या मोठ्याने तूं फोडला असशील ना ! तुझा हंबरडा ऐकून चार लाख स्वार बरोबर घेऊन दिल्लीकडे दौडत जाणारा ब्राह्मणवीर सन १७६१ सालीं पानिपत मुक्कामीं गारद झाला. गोमाते, त्या दिवशीं तूं हंबरडा फोडलास व तो ऐकून जागजागच्या हिंदूंनी दुःखाश्रु गाळले. यापलीकडे त्यांना हल्लीच्या परिस्थितींत जास्त काय करतां येण्यासारखें आहे ?

मुसलमानांनो, तुम्ही त्या दिवशीं पहारीधिराज रस्त्यावरून मिरवीत नेलेल्या गाईचें शिर तिच्या धडापासून ज्या वेळीं वेगळें केलेंत, त्याच वेळीं तुम्ही हिंदु-मुसलमानांच्या एकीचें शिर धडापासून वेगळें केलें, हें नीट लक्षांत धरा. आता यापुढे तुमची व आमची एकी होणें शक्य नाही. गायखाऊ मुसलमान व

सायखाऊ हिंदु इतःपर राजकारणांत सुद्धा जवळ बसणें अशक्य आहे, मग एकीचें नांव सुद्धा घ्यावयास नको. मिरवीत नेलेल्या गाईचें शिर व धड निराळें करण्यांत आलें, तेव्हाच एकजीव बनवीत आणलेल्या हिंदी जनतारूपी गाईचें शिर व धड वेगळें करण्यांत आलें. आता हिंदूंची व मुसलमानांची बेकी कायम राहणार. मग एखादा महात्मा एकवीस दिवस उपाशी राहो किंवा एखादा महामन्य एकतीस दिवस उन्हांत उभा राहो. "सबसे धरम प्यारा है" याच तत्त्वाचा अवलंब हिंदु लोक यापुढे करीत राहणार.

गाई मारण्याचा आपला हक्क आहे, असें ज्याप्रमाणे मुसलमान म्हणतात, त्याचप्रमाणे व तितक्याच जोराने आम्ही असें ठासून सांगतों की, गाई जगविण्याचा हिंदूंचा हक्क आहे. तुम्ही गाई मारणार तर आम्ही गाई तारणार. अशा या परस्परविरोधी मनोवृत्ति असलेल्या लोकांत प्रेमळ एकी असणें अशक्य आहे. हिंदु-मुसलमानांत त्या दिवशीं खरी एकी होईल की, ज्या दिवसापासून ते गोवध बंद करतील. जोंपर्यंत गोवध चालू राहील, तोंपर्यंत हिंदु-मुसलमानांची बेकी कायम राहील. राजकारणांत एकी, पण धर्मकारणांत बेकी, हा योगायोग अजब आहे. तो घडवून आणणें कोणालाहि यापुढे शक्य नाही. गोवध ही हिंदूंच्या इतकी जिव्हारीं लागणारी व मर्मस्थानीं झोंबणारी गोष्ट आहे की, तिच्यापुढे दुसरी कोणतीहि गोष्ट फिकी पडते. म्हणून ज्या कोणाला हिंदु-मुसलमानांत खरी जिव्हाळ्याची एकी घडवून आणण्याची उमेद असेल त्यांनी पहिल्या प्रथम मुसलमानांकडून होणारा गोवध बंद करावा व मग एकीच्या बाता झोडाव्यात. मुसलमान गोवध कधीहि बंद करणार नाहीत व म्हणून हिंदु-मुसलमानांची एकी कधीहि होणार नाही. हिंदूंनो, तुम्ही असें मठ्ठ व निगरगट्ट कसें झालांत ? काय झालें म्हणजे तुमची धार्मिक भावना उद्दीपित होईल ? तुमच्या मूर्ति फोडल्या तरी तुम्ही आपले स्वस्थ आहांत ! तुमच्या गाई मारल्या तरी तुम्ही आपले बेगुमान आहांत ! तुमच्या धर्मबंधूंना इस्लामी धर्माची दीक्षा देण्यांत येत आहे, तरी तुम्ही पूर्ण उदासीन आहांत ! वरील तीन गोष्टी भरदिवसा मुसलमान करीत असतां, त्यांची कांही एक लाज न धरतां, तुम्ही त्यांचे ताबूत करतां, त्यांच्या पिरांना मलिदा नेतां व मोहरममध्ये तुम्ही आपल्या पोराबाळांना फकीर करतां !

गणेशोत्सवाला तीस-बत्तीस वर्षांच्यावर वर्षें झालीं, तरी एकाहि मुसलमानाने गणपति बसवला नाही; पण त्याच अवधींत एकाहि हिंदूने एकहि ताबूत कमी केला नाही ! ताबूत करण्याची सक्ती हिंदूंनो, तुमच्यावर कोणाची नाही ना ! कत्तलच्या रात्रीं पिराला कंदुरी नेलीच पाहिजे असा जुलूम तुमच्यावर कोणी करीत नाही ना ! मग हिंदूंनो, तुम्ही ताबूत कां करतां ? इकडे बकरीदला मुसलमान गाई मारतात आणि तिकडे तुम्ही बेशरमपणाने ताबूत बसवितां ! हसन-हुसेन मेले, पण त्यांत हिंदूंचें काय गेलें ? त्यांच्या निधनाबद्दल मुसलमानांनी रडावें

पण आम्ही हिंदूंनी कशासाठी टाहो फोडावा ? मोहरम मुसलमानांचा, तर मोरया महाराष्ट्रियांचा. तुमचा 'मोरया' तुम्हांला पुरा दहा दिवस असतांना, हिंदूंनो तुम्ही मोहरमांत कां नाचतां-बागडतां व ताबूत कशाकरिता करतां ? बादशाही अंमल असतांना बादशहांना खूष करण्याकरिता तुमच्या वाडवडिलांनी त्या वेळच्या परिस्थितीपुढे वाकून त्या वेळीं ताबूत बसविले, तर ते एकार्थी क्षम्य आहे. पण हल्ली मुसलमानी अंमल नसतांना, परंपरेचे गुलाम बनून तुम्ही कोणतेंहि कारण नसतां ताबूत बसविण्याची आपली नादान वृत्ति अजून सुद्धा सोडीत नाही ना ? मुसलमानांनो, तुमचें धर्मवेड पाहून आम्हांस एकपरी आनंद होतो. केवढा तुमचा हट्ट !

गेल्या वर्षी पहारीधिराज रस्त्यावरून ज्या गाईला मिरवत नेण्यास तुम्हांला हिंदूंनी अटकाव केला, तीच गाय—दुसरी नव्हे—वर्षभर पोसून त्याच रस्त्यावरून हिंदूंच्या नाकावर टिच्चून यंदा तुम्हीं नेलीत, ही गोष्ट तुमच्या दृष्टीने तुम्हांला भूषणावह आहे. मुसलमानांनी आपला हट्ट व हेका पुरा केला, तरी सुद्धा हिंदु आपले खुळचा परंपरेला चिकटून राहिलेलेच आहेत. मुसलमानांनी बकरीदच्या दिवशीं गेल्या वर्षीचीच गाय टिच्चून कापली, तर ताबूत बसविण्याची आजपर्यंतची वहिवाट त्यांच्याचप्रमाणे तुम्ही टिचून कापून काढा. हिंदूंनो, जेथे तुम्ही आजपर्यंत ताबूत बसवीत आला आहांत, तेथे तुम्ही गजाननमहाराजांची स्थापना करा. मोहरम सोडून मोरया सुरू करा. ताबूत बसविण्याची चाल विशेषेंकरून ब्राह्मणेतरांत आहे. म्हणून ब्राह्मणेतर हिंदूंनो, मुसलमानांच्या धार्मिक गुलामगिरींतून सुटण्याची इच्छा तुम्हांस होत नाही काय ? सत्यसमाजिस्टांनो, वेळीअ-वेळीं ब्राह्मणांच्या नांवाने ठोकीत बसण्याच्या ऐवजीं तुम्ही तुमच्या जलशाच्या दांडक्याने आपल्या ब्राह्मणेतर बंधूंना ठोकून नीट शुद्धीवर आणा. ब्राह्मणांची धार्मिक गुलामगिरी तुम्हांस असह्य होते, तर मुसलमानांची गुलामगिरी तुम्हांस गोड वाटते काय ! ब्राह्मण-ब्राह्मणेतरांनो, सत्यसमाजिस्टांनो व सनातनियांनो, स्पृश्यांनो व अस्पृश्यांनो, सारांश, सर्व हिंदूंनो आपण सर्व सायखाऊ आहोंत. गाय ही आपणां सर्वांना सारखीच पूज्य आहे. यासाठी तिची हत्या बंद करण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक धर्मप्रेमी हिंदूचें आद्य कर्तव्य आहे. म्हणून गोवधाबद्दल निषेध व तिटकारा दाखविण्याचा एकच एक मार्ग म्हणजे तुम्ही कोणत्याहि तऱ्हेचा भाग मोहरमांत घेऊं नका. हिंदूंनो तुम्ही हें नीट लक्षांत धरा व कधीहि विसरूं नका की, "मुसलमानांचा मोहरम तर हिंदूंचा मोरया ऊर्फ मनोरम."

— भाला, दि. २० जुलै १९२५

---

## ५७. लाल - बाल - पाल

सन १९२० सालापूर्वी हिंदुस्थानच्या राजकीय अस्मानांत जे अनेक लहान-मोठे तारे चमकत होते, त्यांपैकी वरील तीन तारे इतरांपेक्षा जास्त तेजस्वी व तेजःपुंज होते. ते तीन तारे म्हणजे लाल-बाळ-पाल होत. बाळ म्हणजे लो. बाळ गंगाधर टिळक होत. हे त्याच सालीं दिवंगत झाले व त्यांच्या अकालिक मृत्यूमुळे महाराष्ट्रभूमीच्या पृष्ठभागावर गाढ अंधकार पसरला आहे. पाल म्हणजे देशभक्त बिपिनचंद्र पाल होत. हे सुधारणेचा कायदा पसार झाल्यापासून जे हिंदी जनतेच्या दृष्टिआड एकदा झाले आहेत, ते कांही केल्या त्यांच्या पूर्वीच्या धडाडीने हिंदी जनतेपुढे हल्ली येत नाहीत. त्यांच्या स्वभावांत व अवसानांत हा अधःपात कां झाला, हें एक कोडेंच आहे. लाल म्हणजे लाला लजपतराय होत. हे पूर्वीप्रमाणे हल्लीहि भरतभूमीला ललामभूत आहेत. सन १९०७ सालीं जेव्हा लाला लजपतराय यांना तात्पुरते हद्दपार करण्यांत आलें, त्या वेळीं निषेधप्रदर्शनार्थ भरलेल्या सभेंत वरील छोटचा नांवांनी या त्रयीचा आम्हीं जाहीर सभेंत उल्लेख केला व आम्हांस अभिमानाची गोष्ट वाटते ती ही आहे की, त्या दिवसापासून ही त्रयी लोकांच्या तोंडांत बसून गेली आहे. सदर त्रयीपैकी लाला लजपतराय हे मुंबई शहरांत नुकत्याच भरून गेलेल्या प्रांतिक हिंदु महासभेचे अध्यक्ष होते. अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या सर्वांगसुंदर भाषणाचा सारांश आम्हीं या अंकांत शेजारींच दिला आहे, व आमची वाचकांना अशी विनंती आहे की, त्यांनी तें भाषण लक्षपूर्वक व मननपूर्वक वाचावें. त्यांच्या भाषणांतील तीन-चार मुद्दे तर इतके जिव्हाळचाचे आहेत की, त्याबद्दल यापुढे हेळसांड केल्यास हिंदु समाजाची धडगत राहणार नाही.

लाला लजपतराय हे हिंदु महासभेचे अध्यक्ष आहेत. या एकाच गोष्टीवरून त्यांच्याबद्दल हिंदु लोकांच्या मनांत किती आदर वसत आहे याची कल्पना आमच्या वाचकांना येईल. या ठिकाणीं आम्ही हेंहि नमूद करून ठेवतों की, लालाजी हे सनातनधर्मीय नसून ते आर्यसमाजिष्ट आहेत, आर्यसमाजाविषयी व आर्यसमाजिष्टांविषयी कांहीकांच्या मनांत गैरसमज आहे, म्हणून त्यांच्यासंबंधाने या प्रसंगीं दोन शब्द आम्ही लिहिणार आहोंत. आर्यसमाज वेदांना ईश्वरप्रणीत मानीत असून वेदांविषयी त्यांचा पूर्ण आदर व पूज्य भाव आहे. ज्या अर्थी ते पूर्णपणें हिंदु

आहेत त्या आर्यसमाजी लोकांत व सनातनधर्मीय लोकांत मुख्य भेद हा आहे की, आर्यसमाजी लोक मूर्तिपूजा मानीत नाहीत, तर सनातनधर्मीयांची मूर्तिपूजा जिवाचा कलिजा आहे. या एका ठळक फरकाशिवाय त्यांच्यात व आपल्यांत इतर धार्मिक बाबतींत म्हणण्यासारखा फरक नाही. अशी जर वस्तुस्थिति आहे, तर आर्यसमाजाविषयी तिरस्कारबुद्धि किंवा तेढाभाव दाखविण्यांत शहाणपणा नाही. एवढेंच नव्हे, तर हल्लीच्या शुद्धीकरणाच्या चळवळीच्या दिवसांत या आर्यसमाजाची आपणांस अत्यंत जरुरी आहे. पावन करून घेतलेल्या ज्या माणसांना कोणतीच जात निश्चितपणें देतां येत नाही, अशांची सोय आर्यसमाजी लोकांत लागण्यासारखी आहे. उदाहरणार्थ, सात पिढ्यांपूर्वी गोव्यांत बाटून गेलेला एक इसम हिंदु धर्मांत येऊं इच्छित आहे. अशा इसमाला हिंदुसभा फार झालें तर शुद्ध करील, पण पुढे त्याची सोय काय ? त्याने कोणत्या जातींत शिरावें, हा एक नाजूक व अवघड प्रश्न आहे. अशा प्रसंगीं त्याला आर्यसमाजी हिंदु खुशाल बनतां येईल व तेथे त्याच्या मुलांना बायका मिळतील व त्यांच्या मुलींना नवरे मिळतील. ही तीव्रतेने भासत असलेली उणीव आर्यसमाजाने भरून काढली हा हिंदु समाजावर त्याचा थोडाथोडका उपकार नाही. पण आर्यसमाजी मूर्तिपूजक नाहीत, हें त्यांच्यांत वैगुण्य आहे असा कोणी आक्षेप घेईल, तर त्यांना आमचें इतकेंच उत्तर आहे की, अप्रत्यक्ष रीतीने त्यांच्यांतहि मूर्तिपूजा आहे. आपल्याप्रमाणे धातूच्या, दगडाच्या किंवा मातीच्या प्रतिमा करून आर्यसमाजी लोक त्यांची पूजा-अर्चा करीत नाहीत, ही गोष्ट खरी आहे. पण आम्ही अशी ग्वाही देतों की, त्यांचें व आपलें जसेजसें जास्त संघटन वाढेल, तसेतसें त्यांच्यांतहि हळूहळू मूर्तिपूजा घुसेल व ते आर्य सनातन धर्माचे आपल्याप्रमाणेच घटक होऊन जातील.

हिंदु समाजांत अशी एक जात हवीच होती की, जी जात वाटेल त्या परधर्मीय व्यक्तीला पावन करून घेऊन आपल्यांत आत्मसात करून टाकील. आर्यसमाज मुस्लिम धर्माला व ख्रिश्चन धर्माला तोडीस तोड आहे. जसा वाटेल तो मुस्लिमेतर मुसलमान होऊन मुसलमान समाजांत मिसळूं शकतो, तसेंच वाटेल तो हिंद्वेतर आर्यसमाजी होऊन हिंदु समाजांत मिसळून त्या समाजाशीं तादात्म्य पावूं शकतो. असो; आमच्या लिहिण्याचा भावार्थ एवढाच आहे की, आर्यसमाज ही संस्था हिंदु धर्माला विघातक संस्था नसून, उलट ती त्याला पूर्णपणें पोषक आहे. लालाजी या अशा हिंदु धर्मपोषक आर्यसमाजाचे पंजाबांतील मुख्य आधारस्तंभ आहेत. मुसलमान मौलानांच्या हृदयांत किंवा ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या अंतःकरणांत आर्यसमाजी पंडितांची जितकी धडकी भरते, तितकी धडकी समातनधर्मीय महंतांची त्यांच्या अंतःकरणांत भरत नाही या फरकाचें कारण उघड आहे; कारण शुद्धिकरणाच्या बाबतींत आम्ही जातिनिर्बंधाने पूर्णपणें जखडलें गेलों आहोंत, तशी स्थिति आर्य-समाजाची नाही.

लालाजींनी आपल्या व्याख्यानांत ज्या अनेक मुद्द्यांवर विवेचन केलेलें आहे त्यांपैकी दोन-तीन मुद्द्यांसंबंधानेच आम्ही आज लिहिणार आहोंत. त्यांचें सर्वच भाषण विचारपरिप्लुत व परिणामकारक झालें, पण त्यांतल्या त्यांत त्यांनी दोन-तीन जिव्हाळ्याच्या गोष्टी फारच मार्मिक रीतीने मांडल्या आहेत. पहिला मुद्दा हिंदुसंघटनाविषयी होय. मुसलमान लोक आपल्या समाजाचें संघटन करीत असतांना जर हिंदु लोक स्वस्थ हात जोडून बसले, तर आपल्या निष्काळजीपणामुळे त्यांना पुढे रडत बसण्याची पाळी खात्रीने येईल. मुसलमानांना राष्ट्रप्रेमापेक्षा धर्मप्रेम जास्त आहे.

खिलाफत चळवळीच्या पूर्वी ते राजकारणांत पडत नसत व सन १९२१ सालापासून त्यांची राजकारणांत जी लुडबुड चालू झाली आहे, ती खिलाफत वांचविण्याच्या हेतूनेच होय. केमालपाशाने खिलाफतीची खिरापत करून ती जगाला वाटून टाकल्याबरोबर हिंदुस्थानांतील मुसलमानांचा राष्ट्राभिमान मावळूं लागला व हल्लीची स्थिति अवलोकन केल्यास असें आढळून येतें की, त्यांना जात्यभिमानाशिवाय राजकारणांत दुसरें-तिसरें कांही दिसत नाही. राजकारणांत जातवार प्रतिनिधि या तत्त्वासारखें दुसरें घातक तत्त्व नाही. या तत्त्वामुळे कोणत्याहि राष्ट्रांतील निरनिराळ्या समाजांत एकी घडवून आणणें शक्य नाही. एकदा का या जातवार प्रतिनिधित्वाचें खूळ सुरू झालें म्हणजे त्याच्या फांद्या कोठपर्यंत लांब पसरतील याचा नेम नाही. आज मुसलमानांना जातिवार प्रतिनिधि दिले, तर उद्या ख्रिश्चन लोक आपले जातवार प्रतिनिधि मागतील, तर परवा पार्शी लोक तेंच करतील. मग त्यांचें उदाहरण पाहून पोटजातीहि तसेच करूं लागतील. म्हणून जातिवार प्रतिनिधींचें तत्त्व हें राष्ट्रांतील अनेक लहानमोठ्या समाजांत निष्कारण फूट पाडण्यास एक बलवत्तर कारण आहे. या तत्त्वामुळे राष्ट्राची एकमुखी व एकसारखी प्रगति होण्यास खो पडणार आहे. लालाजींचें हें म्हणणें अक्षरशः खरें आहे. राजकीय किंवा इतर राष्ट्रीय प्रश्नांसंबंधाने विचार करावयाचा असल्यास, त्यांत धर्माचें किंवा जातीचें तट्टू मधे घुसडण्यांत येऊं नये. राजकारणांत आपण सर्व हिंदी आहोंत, ही मुख्य मुद्द्याची गोष्ट विसरतां कामा नये. त्या प्रसंगीं, मीं हिंदु, मी ब्राह्मण, मी ब्राह्मणेतर, मी मुसलमान, मी पार्शी, मी ख्रिश्चन, अशी भावना धरण्यांत आली की जुटीची फूट होऊन राष्ट्राचें म्हणजे सर्वांचेंच नुकसान होणारें आहे. यासाठी लालाजी असें प्रतिपादन करतात की, राजकारणांत जातीचा अभिमान विसरला गेला पाहिजे. लालाजींचें हें मत आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. ज्या अर्थी मुसलमान लोक हें तत्त्व मान्य न करतां, आपल्या जातीचा सवता सुभा करण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्या अर्थी हिंदूंनीहि आत्मरक्षणासाठी त्याच मार्गाचा अवलंब तोडीस तोड म्हणून केला पाहिजे. हिंदूंच्या राजकीय हक्कांचें संरक्षण करण्यासाठी व हिंदु समाजाच्या धार्मिक संरक्षणासाठी, अशा दुहेरी हेतूने हिंदुमहासभा स्थापन करण्यांत

आली आहे. त्या सभेचे सभासद होणें हें प्रत्येक हिंदूचें आद्य कर्तव्य आहे. हिंदु लोकांची संघटना केल्याशिवाय यापुढे त्या समाजाला दुसरा तरणोपाय नाही. विस्कळित पडलेला हिंदु समाज वेळींच एके ठिकाणीं जुळवून एकाच ठिकाणीं घट्ट बांधला गेला नाही, तर त्या समाजांतील एकेक फळी बाहेर ओढली जाईल व कालेंकरून जागेवर कांहीच शिल्लक राहणार नाही. यासाठी संघ व संघटन यांच्याद्वारें हिंदु समाजाची एकीची गोळी घट्ट बांधण्यांत लौकर आली पाहिजे. यामुळे असें कोणी समजूं नये की, हिंदु समाजांतील निरनिराळ्या जाति मोडून टाकून हिंदूंची एक जात करण्यांत यावी. संघटन या शब्दाचा अर्थ असाच घेतला पाहिजे की, हिंदु समाजांतील निरनिराळ्या जातींना हिंदु धर्मभावनेच्या दोरीने घट्ट आवळून टाकलें पाहिजे. तें इतकें घट्ट आवळलें पाहिजे की, निरनिराळ्या जातींचें एकमेकांना साहाय्य मिळून या धार्मिक मोळींतून कोणतीहि जातकाटी कोणत्याहि हिंद्वेतराला बाहेर हिसकतां येऊं नये. हिंदु संघटनेचा मुख्य हेतु हा आहे व तो प्रत्येक हिंदूला मान्य होईल, अशी आम्हांस बळकट आशा आहे.

देशभक्त लाला लजपतराय यांचा दुसरा मुद्दा म्हणजे अस्पृश्यतानिवारण होय. हिंदु समाजांत अस्पृश्यता कशी आली याबद्दल काथ्याकूट करीत बसून आपल्या पूज्य पूर्वजांना गालीप्रदान देण्यांत शूरपणा नाही व शहाणपणाहि नाही. हिंदु समाजांत अस्पृश्यता आहे, पण ती विद्यमान स्थितींत असूं नये, याबद्दल आता दुमत नाही. पण याहि बाबतींत कांही विघ्नसंतोषी लोक आपलें घोडें मधे दामटीत आहेतच. सार्वजनिक पण बिनधार्मिक बाबतींत अस्पृश्ता धरूं नये, असें बहुमत आहे. पण यावरून या पिढींत तरी पुढे उडी मारण्यांत येऊं नये. शाळा, कॉलेजें, नाटकगृहें, कोर्टकचेऱ्या, क्रीडास्थानें वगैरे सर्व सार्वजनिक जागीं सर्वांना जाण्यास मोकळीक असावी. पण यापुढे उडी मारून पाणवठे, देवळें, मंदिरें, तीर्थे वगैरे धार्मिक जागींहि अस्पृश्यांना परवानगी असावी याबद्दल तूर्त तरी एकवाक्यता नाही. आम्ही या बाबतींत अस्पृश्यांना असें सूचवून ठेवतों की, त्यांनी या कामीं भलत्याच लोकांच्या नादीं लागून घिसाडघाई करूं नये. तीन पिढ्यांनंतर योग्य दिसणारी मागणी याच पिढींत करूं नये. अशा वेताल मागणीने पूर्वग्रहाचा वेताळ जागृत होतो व त्यामुळे सुधारणा होण्याच्या ऐवजीं जिकडे-तिकडे सावळागोंधळ माजून जातो. जेवढ्या बाबतींत अस्पृश्यता मिळत आहे, तेवढी आपलीशी करा व ती पचली म्हणजे इतर बाबतींत ती मागा. अस्पृश्यतेच्या निवारणाला काळ अनुकूल आहे, पण त्याची स्वारी आपल्या सर्व लवाजम्यानिशीं येऊन अजूनपर्यंत ठेपली नाही. त्या काळाचे बिनीचे स्वार ठेपले आहेत, तरी त्यांच्याशीं संगनमत करून जेवढें कांही हातीं लागेल तेवढें अस्पृश्यांनी खिशांत टाकावें यांतच मुत्सद्देगिरी आहे.

देशभक्त लालाजींचा तिसरा मुद्दा स्त्रियांच्या शिक्षणासंबंधाने आहे. स्त्रीशिक्षण म्हणजे पुरुषांप्रमाणे कॉलेजांत जाऊन पदव्या पटकावणें नाही. स्त्रियांचें

मुख्य भूषण 'मूल' आहे, पदवी नाही. जी स्त्री पदवीधर आहे, पण वांझ आहे, अशा स्त्रीला स्त्री म्हणण्यांत स्वारस्य नाही. अशी स्त्री म्हणजे एक निराळ्या तऱ्हेचा 'बाप्या' होय. स्त्रियांना शिक्षण अशा हेतूने द्यावयाचें की, त्यामुळे भावी पिढी देशोन्नतीच्या कामांत जास्त आग्रही होईल. हिंदु स्त्रिया स्वभावाने व अन्य कारणांनी ढिसूळ स्वभावाच्या असल्याकारणाने त्यांच्यापासून जन्मास येणारी पिढीहि धर्म-कारणांत काय किंवा राजकारणांत काय, दिसूळ व लिबलिबीत होते. हा ढिसूळपणा जाऊन त्याच्या जागीं कणखरपणा यावा, यासाठी मुलींकरिता निराळ्या राष्ट्रीय शाळा काढण्यांत याव्यात. मुलांमुलींना एकत्र व एकच शिक्षण देण्यापासून नफ्या-ऐवजीं तोटाच जास्त होतो. लालाजींचें हें मत आम्हांस मान्य आहे. जर मुलांमुलीं-मध्ये निसर्गाने जन्मतःच भेद उत्पन्न केला आहे, तर तो अविनाशी भेद लक्षांत घेऊनच त्यांच्या सर्व वागणुकींत फरक ठेवण्यांत आला पाहिजे. सुधारक चुकतात तें येथेच होय. संसारगाड्याचीं स्त्री-पुरुष हीं दोन समसमान चाकें आहेत, ही उपमा मुळांत चुकीची आहे व त्यामुळेच हा ब्रह्मघोटाळा माजला आहे. असो; लालाजींचें भाषण सर्व बाजूंनी यथोचित झालें. त्यांच्या भाषणाच्या प्रारंभापासून तों शेवटपर्यंत रसरशीत व उकळी आलेला धर्माभिमान दृग्गोचर होत होता. मुंबई प्रांतिक हिंदुसभेचें अध्यक्षस्थान स्वीकारून व निर्दोष भाषण करून त्यांनी हिंदु धर्माची अमोल सेवा केली आहे. ईश्वर त्यांना उदंड आयुष्य व आरोग्य देवो.

— भाला, दि. १४ डिसेंबर १९२५

## ५८. माघ वद्य नवमी

देशसेवेसारखें पुण्य नाही व देशद्रोहासारखें पाप नाही. देवालयें बांधणें, रुग्णालयें स्थापणें, वेदशाळा काढणें वगैरे कृत्यें पुण्यकृत्यें आहेत; पण त्या पुण्य-कृत्यांना देशसेवेच्या पुण्यकृत्याची सर कधीहि येणार नाही. ज्या जन्मभूमीने आपल्याला जन्म देऊन आपलें पालनपोषण केलें, तिची सेवा आमरण मनोभावें व इमानेइतबारें करणें यालाच देशसेवा म्हणतात. अशी देशसेवा करणाऱ्या माहात्म्याला इहलोकीं सत्कीर्तीचा लाभ होऊन परलोकीं त्याला सद्गति मिळते. देशसेवेचें पुण्य अखंड व अंतरहित आहे. एकदा का देशसेवेच्या पुण्याची जोड झाली म्हणजे असा पुण्यात्मा "पुनरपि मरणं पुनरपि जननं," या दगदगीपासून कायमचा मुक्त होतो. देशसेवेचें पुण्य पदरीं पडण्यास पैसा किंवा विद्वत्ता लागत नाही. देश-सेवेचें पुण्य संपादण्यास उत्तम कुलांत जन्म यावा लागत नाही किंवा हातांत मोठा

अधिकार असावा लागत नाही, तर देशप्रेमाच्या उदकाने अंतःकरण थबथबलेलें असलें म्हणजे झालें. ज्यांनी आपल्या आयुष्यांत हें देशसेवेचें पुण्य संपादन केलें ते खरोखर भूदेव होत. त्यांच्या देशसेवेच्या कथा गंगायमुनांप्रमाणे पवित्र व पावन आहेत. त्यांच्या कथासरितांत गाढ अवगाहन करून भेकड मनोवृत्तीच्या माणसांनी आपल्या भीरुत्वरूपी दोषांचें क्षालन करून घ्यावें. देशसेवारत माहात्म्यांच्या उत्तेजक कथाश्रवणाने प्रत्येकाने आपले कर्ण व हृदय पुनीत करून घ्यावें व त्यांच्या कथामृताने अमर झालेलें हृदय देशसेवेंत झिजवून आपल्या क्षणभंगुर नरदेहाचें सार्थक्य करावें. देशभक्तांचीं जीवनचरित्रें जितकीं गोड आहेत, त्यापेक्षा देशभंजकांचीं जीवनचऱ्हाटें जास्त कडू आहेत. पहिलीं मनें रिझवितात तर दुसरीं मनें झिजवितात. पहिलीं अंतःकरणें तोषवितात तर दुसरीं अंतःकरणें दूषवितात. सारांश, देशभक्तांचीं जीवनचरित्रें भावी पिढ्यांना तारक होतात, तर देशभंजकांचीं जीवनचऱ्हाटें त्यांच्या वंशजांना मारक होतात. म्हणून प्रत्येकाने पहिलीं चरित्रें वाचावींत व दुसरीं चरित्रें टाळावींत. सतराव्या शतकांत या महाराष्ट्रभूमींत जे शेकडो मर्दानी देशभक्त चमकून गेले, त्यांपैकी एका अद्वितीय मोहऱ्याच्या पराक्रमाची माहिती आम्ही आमच्या वाचकांना सादर करीत आहोंत. ती माहिती त्या नरवीराच्या पुण्यतिथीच्या दिवशीं प्रसाद म्हणून वांटण्यांत आलेली आहे, म्हणून तिचा स्वीकार त्यांनी अवश्य करावा.

तो शके १५९२ च्या माघ वद्य नवमीचा दिवस होता. मराठा स्वराज्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्रांत ठोकून अजून पाव शतक झालें नव्हतें. महाराष्ट्राच्या राजकीय नभोमंडळाच्या क्षितिजावर मराठ्यांचा स्वातंत्र्यरवि आपल्या बालकिरणांनी नुकताच प्रकाशूं लागला होता व इस्लामी सत्तारूपी मेघावडंबर या बालरवीच्या होऊं लागलेल्या चंड-किरणांनी वितळूं लागलें होतें. अशा वेळीं आनंदवनभुवनांत भीमा व कृष्णा यांच्या दुआबांत जागजागीं ठिय्या देऊन बसलेल्या गडांत मोंगली सत्ता लपून बसली होती. या सत्तेला तेथून हुसकावून देऊन ते गड एकामागून एक हस्तगत करून घेण्याचा सपाटा शिवाजीमहाराजांनी चालविला होता.

मोंगलांच्या ताब्यांत असलेले गड काबीज करण्याच्या कामीं ज्या अनेक मराठी वीरांनी आपल्या पराक्रमाची शर्थ केली, त्या सर्वांमध्ये नरवीर तानाजी मालुसरे हे अग्रगण्य होते. त्यांच्या पराक्रमाला जगाच्या इतिहासांत तोड नाही. तानाजी व सूर्याजी हे कलियुगांतील राम-लक्ष्मण निःसंशय होत व त्या दोघा भाच्यांवर अलोट प्रेम करणारे वृद्धकपि शेलारमामा हे खात्रीने हनुमान होत. छातीठोक साहस, कल्पनातीत शौर्य व अवर्णनीय प्रसंगावधान या गुणत्रयीने हा "सिंहगडावरील हल्ला" हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहील. माघी पौर्णिमेला खोकड होळीच्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं चार वाजतां रायगडाच्या तटावर मातोश्री जिजाबाई दूरवर न्हाहाळीत उभ्या होत्या व शेजारीं त्यांचे बोल झेलण्यास व कोड

पुरविण्यास सदासर्वदा तत्पर असलेला शिवबा उभा होता. इतक्यांत जिजाबाई-साहेबांच्या नजरेस पुण्याच्या बाजूला एक भव्य गड दिसला. "शिवबा, त्या लांब दिसणाऱ्या गडाचें नांव काय बरें ?" "आई, त्याचें नांव कोंडाणा." "तेथे कोण किल्लेदार आहे ?" हा प्रश्न कानीं पडतांच शिवबाचें तोंड आंबट झालें व त्यांचा चेहरा फिका पडला. "बोल. लवकर सांग की, तेथील किल्लेदाराचें नांव काय ?" उदेभान हें परकी नांव ऐकतांच त्या वीरप्रसू माउलीचें देहभान नाहीसें झालें व रागाने लाल होऊन त्यांनी शिवबाला उलट प्रश्न केला की, "हा कोण, कोठला व कोणाचा ?" लज्जेने खाली मान घालून महाराजांनी उत्तर दिलें की, "उदेभान हा एक बाटून मुसलमान झालेला रजपूत असून तो मोंगलांचा ताबेदार आहे." आपल्या पराक्रमी मुलाचें वरील उत्तर ऐकून त्यांना महदाश्चर्य वाटलें व महाराष्ट्रभूमीच्या छातीवर असलेला तो किल्ला परक्यांच्या स्वाधीन असावा ही गोष्ट त्यांच्या मनाला रुचली नाही. "तर मग येता रंगपंचमीचा सण मी तेथे करणार" असें त्या म्हणाल्या. "अलबत. पंचमी तेथेच होईल" असें आत्मविश्वासाचें उत्तर महाराजांनी आपल्या मातोश्रीस ताडकन् देऊन टाकलें.

महाराजांनी दुसऱ्या दिवशीं आपल्या सरदारांपैकी अतिशूर व अतिधाडसी सरदार जो सुभेदार तानाजी, त्याला तांतडीने बोलावून घेतलें व पंधरा दिवसांत कोंडाणा किल्ला सर करण्याची त्याला आज्ञा केली. सतराव्या व अठराव्या शतकांत धन्याकडून मर्दुमकीचीं कृत्यें करण्यास आज्ञा झाली असतां, मराठी वीरांना इतका आनंद दुसऱ्या कशानेहि होत नसे. इतर शेकडो कामें एकीकडे सारून मराठी वीर मर्दुमकीचीं कामें करण्यास उडचा घेत. त्या दिवसांत मराठीं मर्द एक तर मर्दुमकी गाजवून विजयश्रीची माळ गळयांत लटकावून धन्याची भेट घेत, नाही तर असिधारातीर्थीं रक्तसमाधि घेऊन आपला व आपल्या बेचाळीस पिढयांचा उद्धार करीत. कोंडाणा हस्तगत करण्याची आज्ञा महाराजांकडून झाल्याबरोबर चारच दिवसांनी होणारें आपल्या मुलाचें लग्न तहकूब करून तानाजीने माघ वद्य नवमीला मध्यरात्रीं हल्ला चढवून गड सर करण्याचा निश्चय केला. आपल्या सैन्याचे दोन भाग करून, एका टोळीचें आधिपत्य त्याने आपणाकडे घेतलें व दुसऱ्या टोळीचें नायकत्व त्याने आपल्या सूर्याजी नांवाच्या धाकटया भावाकडे दिलें व आपला ऐंशी वर्षांचा वृद्ध शेलारमामा याला सूर्याजीला मदत करण्यास बरोबर दिलें. ती काळोखी रात्र होती, तरी पण काळोखांतून जलदीने मजल मारून मध्यरात्र उलटून गेल्यावर तानाजीने कोंडाणा किल्ल्याचा पायथा गाठला. जयवंती नांवाच्या घोरपडीच्या साह्याने तटावर चढून आपल्या हाताखालील वीर त्याने किल्ल्यांत घेतले. पण इतक्या लोकांची चाहूल किल्ल्यावरील रखवालदारास लागली व त्यांनी भयसूचक कर्णे फुंकले. थोडयाच वेळांत किल्ल्यावरील मोंगली शिबंदीचें व तानाजीच्या तुकडीचें तुमुल युद्ध जुंपलें. उभय बाजूंच्या वीरांच्या मुखावाटें रणगर्जना निघूं

लागल्या. समरेशेरीवर समशेरी खणखणूं लागल्या व वीरांचीं मस्तकें धडापासून वर हवेंत चेंडूप्रमाणे उडूं लागलीं. एकच रणधुमाळी माजून राहिली. 'दीन' 'दीन' या रणगर्जनेला 'हर हर महादेव' या सिंहनादाचें प्रत्युत्तर मिळूं लागलें. 'कापा' 'मारा' 'ठोका' या शब्दांनी गडावरील रणमैदान दुमदुमूं लागलें. थोड्याच वेळांत उदेभानची व तानाजीची गाठ पडली. व दोघेहि एकमेकांवर चित्त्याप्रमाणे तुटून पडले. दोघेहि हाडाचे अस्सल शूर सिंह होते. उदेभान मूळचा अस्सल रजपूत असून, इस्लामी धर्मांत बाटल्यामुळे स्वधर्मद्रोह करण्याच्या आसुरी लालसेने बेहोष झाला होता, तर तानाजी सह्याद्रीच्या डोंगरांतील अस्सल मराठा असून, स्वधर्मप्रेमाने वेडावला जाऊन, कोंडाण्याच्या रणकुंडांत आपल्या आवडत्या जिवाचा स्वाहाकार करण्यास आतुर झालेला होता. प्रत्येक बाबतींत दोघे समसमान होते. दोघेहि तरुण, दोघेहि शूर, दोघेहि लढण्याच्या कलेंत तरबेज, पण दोघांत एक मोठा फरक होता. तो हा कीं, उदेभान स्वार्थलोलुप तर तान्हाजी स्वातंत्र्यलोलुप. अशा या दोन वीरांत "मारूं नाही तर मरूं" या अटीतटीचें खड्गयुद्ध जुंपलें. ते एकमेकांवर जोराने, पण खुबीने तलवारीचे वार करूं लागले. समशेरीच्या प्रत्येक वाराला प्रतिपक्षाच्या शरीराच्या निरनिराळ्या भागांतून रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या. कोणी न सांगतां बाकीचे लढणारे वीर आपोआप जागच्या जागीं स्तब्ध झाले व प्रत्येकजण या अभूतपूर्व द्वंद्वयुद्धाकडे गडाच्या भावी आशेने पाहूं लागला. दोघांनी एकमेकांना अनेक वारांनी रक्तबंबाळ केल्यावर, उदेभानने शेवटचा निर्वाणीचा वार म्हणून आपल्या समशेरीचा एक मोठा वार तानाजीवर केला, पण तानाजीने तो आपल्या ढालीवर झेलला, त्यामुळे तान्हाजी वांचला, पण ढाल फाटली. ऐन वेळीं तानाजीला हा मोठा दगा झाला. त्याचा डावा हात मोकळा पडला व त्याच्यावर उदेभानने एकामागून एक वार करण्याचा सपाटा चालविला. दुसरी ढाल घेण्यास वेळ नव्हता. अशा ऐन घातवेळीं कंबरेचा शेला सोडून तो तानाजीने डाव्या हाताला गुंडाळला, पण ढालीचें काम शेला कसें करणार! आता मात्र तानाजी गांगरला व त्याच्याभोवतालील मराठी मर्दांच्या तोंडचें पाणी पळालें. थोड्याच वेळांत जें होऊं नये तें झालें. उदेभानच्या समशेरीने तानाजीच्या मस्तकाचा बळी घेतला. मराठी मावळ्यांत एकच हाहाकार उडाला व जो तो सैरावैरा धांवूं लागला. इकडे हे द्वंद्वयुद्ध चाललें आहे, तो कोंडाण्याच्या दक्षिण बाजूकडील कल्याण दरवाज्याने सूर्याजीने व शेलारमामाने प्रवेश केला व तेहि रणगर्जना करीत तानाजी व उदेभान लढत होते त्या दिशेने धांवूं लागले. पण कांही अंतर चालून गेल्यावर सूर्याजीच्या व शेलारमामाच्या दृष्टीला कोणता भयंकर देखावा दिसला बरें!

शेकडो मराठे वीर चारी दिशा पळताहेत व त्यांचा पाठलाग मोंगली शिपाई करीत आहेत. हें असें कां झालें हें पहिल्या प्रथम त्या दोघांनाहि कळेना. मावळी वीर

शत्रूसमोर पळतांना त्या दोघांनी यापूर्वी कधीहि पाहिलें नव्हतें. मग हें असें कां होत आहे, हें त्यांच्यापैकी कोणाच्याहि लक्षांत येईना. म्हणून त्या पळपुटयांपैकी एकाचें मनगट धरून त्याच्या तोंडांतून त्या दोघांनी झटदिशीं खरी हकीगत ऐकली. सुभेदार पडले म्हणून ही पळापळी चालली आहे, हें त्यांच्या दोघांच्या तावडतोब लक्षांत आलें. त्या दोघांनी एकमेकांकडे एक क्षणभर पाहिलें व एकमेकांशीं एक शब्द न बोलतां त्यांनी पुढला बेत ठरविला. दोघांनीहि आपल्या तलवारी आपल्या डोक्या-भोवतीं फिरविल्या व दोघेहि विरुद्ध दिशेला धांवून गेले. पाठलाग करणाऱ्या उदेभान-वर शेलारमामा तिराप्रमाणे चालून गेले, तर सूर्याजीने तोंड फिरवून तटावरील शिडयाकडे पळत जाणाऱ्या मावळ्यांच्या अगदी पुढे सूर्याजी पळूं लागला. हा काय प्रकार आहे ? वडील भाऊ प्रेत होऊन गडावर पडला असतां धाकटचा भावाने त्याच्या मरणाचा सूड घेण्याऐवजीं पळून जावें, हें निःसंशय भूषणास्पद नाही. ऐंशी वर्षांचा वुद्ढा शेलारमामा उदेभानवर चाल करून जातो, तर तिशीच्या आंतील ताजा तरुण सूर्याजी त्या पळपुटयांच्या अग्रभागीं तटाकडे जोराने पळतांना दिसतो, हें गौडबंगाल आहे तरी काय ?

मराठे हे स्वभावतः पळपुटे आहेत, अशी त्यांची निंदा मोंगल सरदार करीत असत, तें मग अक्षरशः खरें आहे तर ! होय, तें खरें आहे, पण अर्धें खरें आहे. मराठे पळतात, पण त्याचप्रमाणे योग्य वेळ व स्थळ मिळतांच ते पुन्हा परत वळतात. मराठे वळण्याकरिता पळतात, जगण्याकरिता पळत नाहीत. मराठे वीर पळपुटे तर खरेच. पण त्याचप्रमाणे ते 'वळपुटे'हि आहेत. पळणें व वळणें यांतच खरें मराठेपण आहे. यालाच गनिमी कावा म्हणतात. सूर्याजी सर्वांच्या अगोदर तटाला जाऊन पोहोचला व आपल्या तलवारीने त्याने तटाच्या शिडचा कापून टाकल्या व तटावरून खाली जाण्याची वाट बंद करून टाकली. सर्व शिडचा कापून झाल्यावर, त्याचा चेहरा एकदम प्रफुल्लित झाला. हातांत नागवी समशेर घेऊन त्या काळोख्या रात्रीं आपल्या शौर्याने सर्वांपुढे सूर्याप्रमाणे चकमकणारा तो सूर्याजी मागे वळला व समोरून पळत येणाऱ्या मराठी वीरांना दोन्ही हातांनी थोपवून तो सिंहनादाने ओरडला की, "भेकडांनो, नामर्दांनो व निमकहरामांनो, तुमचा बाप गडावर पडला असतां, तुम्ही पळतां कुठे ! शिडचा उतरून खाली जात असाल, तर मग मीं त्या केव्हाच कापून टाकल्या आहेत." शाबास सूर्याजीराव ! तुमच्या पळण्याचें कारण आता लक्षांत आलें. लढाईत पुढारी शूर व प्रसंगावधानी लागतो तो याचसाठी. तान्हाजी पडल्याची बातमी ऐकून तुम्ही पळालांत याचें मर्म आता कळलें. शिडचा शाबूत असत्या तर तुमच्या निर्भर्त्सनेकडे कोणीहि लक्ष दिलें नसतें. असो; सूर्याजीच्या निर्भर्त्सनायुक्त शब्दांचा तत्काल परिणाम होऊन जीव बचावण्याकरिता पळत चाललेले मावळे एकदम थांबले, त्यांनी 'हर हर महादेव' या रणगर्जनेचा घोष केला व सर्वच सूर्याजीरावा-बरोबर उलटून पाठलाग करणाऱ्या मोंगली शिपायांवर चित्त्याप्रमाणे तुटून पडले.

वाचकहो, उलटलेला नाग दंश न करतां एक वेळ पुन्हा पळून जाईल, उलटलेला वाघ आपल्या भक्ष्याला ठार न करतां पुन्हा भीतीने पळेल, पण पळतांना एकदा उलटलेला मराठा वीर कुडींतून प्राणज्योति निघून जाईपर्यंत पळणार नाही. विजयश्रीने वेहोष झालेले मोंगली मर्द व चिडविल्यामुळे उलटलेले मराठे मर्द यांची त्या वेळीं जी हातघाई झाली तिचें वर्णन करण्यास आमची लेखणी पूर्णपणें असमर्थ आहे. वीराला वीर भिडला. समशेरींत समशेर गुंतली. कांही काळ कोणीहि एक रेसभर मागे हटेना. एकच रणधुमाळी माजून राहिली. इकडे भाच्याच्या मरणाची बातमी ऐकून शेलारमामा जे निघाले ते थेट उदेभानजवळ आले व त्यांनी त्याला युद्धाला आव्हान दिलें. त्या वेळीं सबंध मराठी राज्यांत पट्टा फिरविण्याच्या कलेंत शेलारमामांची बरोबरी करणारा दुसरा वीर नव्हता. मामांनी पट्ट्याच्या एका वारांत दोन-दोन वाघ कित्येक वेळा एकदम ठार केलेले होते. शत्रूकडील पांच-पांचशेच्या टोळींतून पट्टा फिरवीत त्यांनी पुष्कळ वेळा वाट काढलेली होती. आपला दुधारी पट्टा फिरवीत ते शिवकालीन भीष्माचार्य उदेभानवर चालून जातांच तोहि पुढे सरसावला. एकीकडे ऐंशी वर्षांचा बुढ्ढा पण शूर शेलारमामा, तर दुसरीकडे ऐन तिशीच्या जवानींतील उमदा उदेभान. ही जोडी बरोबरीची नव्हती, तरी पण तें युद्ध अपूर्व झालें. शेलारमामाचा तान्हेलेला पट्टा प्रतिक्षणीं उदेभानचें ताजें रक्त पिऊं लागला. युक्तीपुढे शक्तीचें कांही चालेना. शेलारमामा पटाईत, तर उदेभान धिटाईत; पण नुसती धिटाई काय करणार ! योग्य संधि साधून मामांनी पट्ट्याचा एक असा सफाईदार वार केला की, उदेभानचा उजवा हात समशेरीसह तुटून पडला व 'तोवा तोवा' करीत त्याने स्वर्गाची वाट धरली. उदेभान मेल्याची बातमी पसरताच मोंगली वीर दशदिशा पळूं लागले व मग शेतांतील कणसाप्रमाणे मराठी वीरांनी त्यांची कत्तल केली व गड सर केला. सुभेदार पडले, पण सूर्याजीला व शेलारमामांना विजयश्रीने माळ घातली. शके १५९२ ची माघ वद्य नवमी शुभदायक झाली.

दुसऱ्या दिवशीं रायगडावर महाराजांच्या कानावर ही बातमी घालण्याकरिता एक घोडेस्वार मुद्दाम पाठविण्यांत आला. त्याच्या चेहऱ्यावर दुःख व आनंद यांची मिश्र छटा दिसत होती. त्याच्या फुरफुरणाऱ्या ओठावर किंचित आनंद विलसत होता, तर त्याचे डोळे पाण्याने डबडबलेले होते. त्याचा हा असा विचित्र चेहरा अवलोकन करून महाराजांच्या हृदयांत एकदम चर्र झालें. महाराज तातडीने त्या जासुदाला म्हणाले की, "बोल, एकदम चटदिशीं काय बातमी असेल ती सांग. गड सर झाला काय !" "होय महाराज" असें त्या जासुदाने कष्टाने उत्तर दिलें. मग तुझे डोळे पाण्याने कां भरले आहेत ?" यावर त्या जासुदाने असें उत्तर दिलें की, "महाराज, फार वाईट झालें, बोलण्याची माफी असावी. गड आला, पण सुभेदार गेले." जासुदाच्या तोंडचें हे काळीज कापणारे शब्द ऐकतांच महाराज

ओक्साबोक्सी रडूं लागले व त्यांना रडूं कां बरें येणार नाही ! तानाजी महाराजांचा बालपणचा सवंगडी होता. स्वराज्य स्थापन करण्याची शपथ त्याने रोहिडेश्वराच्या देवळांत महाराजांबरोबर घेतली होती व हा मर्त्य देह येथे ठेवीपर्यंत त्याने ती शपथ इमानेइतबारें राखली. दुःखाचा आवेग ओसरल्यावर महाराजांनी असा हुकूम सोडला की, तानाजीसारख्या सिंहाचें स्मारक करण्याकरिता ज्याच्या अतुल स्वार्थत्यागामुळे कोंडाणा किल्ला सर झाला, त्या किल्ल्याला यापुढें 'सिंहगड' या नांवाने संबोधण्यांत यावें.

महाराष्ट्रियांनो, तानाजीच्या वंशजांनो, महाराजांनी सुभेदाराचें स्मारक आपल्या हयातींत केलेंच आहे; तरी पण तुम्हीं सुद्धा आपलें कर्तव्य केलें पाहिजे. म्हणून आधुनिक कवींनो, तुम्ही आपल्या कवित्वशक्तीला प्रेरणा देऊन तानाजीच्या या पराक्रमावर लहानमोठीं काव्यें रचा. कादंबरीकारांनो, तुम्हीहि या चिरस्मरणीय प्रसंगावर रसभरीत व भावनोद्दीपक कादंबऱ्या लिहा व शाहिरांनो, तुमच्या प्रतिभाशक्तीला स्फुरण देऊन तुम्ही या हल्ल्यावर नानाविध चालींत पोवाडे गा व बाकी राहिलेल्या सर्व मराठ्यांनो, आयुष्यांत एकदा तरी सिंहगडाचें दर्शन घेऊन तेथे गतगोष्टींची आठवण होऊन अंतःकरणांत उचंबळलेल्या भावनांमुळे थरथरलेल्या जिव्हेने असें एकदा मोठ्याने म्हणा की, "सुभेदार तानाजीकी जय."

– भाला, दि. १ फेब्रुवारी १९२६

---

## ५९. एकशाही व लोकशाही तितक्याच वाईट

कोणती शासनपद्धति सर्वांत चांगली आहे, या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आम्हीं हा विषय या लेखांत घेतला आहे. कोणताहि समाज सुव्यवस्थित झाल्याबरोबर त्याला कोणत्या ना कोणत्या तरी शासनपद्धतीची जरुरी भासूं लागते. अजीबात कोणतीच शासनपद्धति नसण्यापेक्षा सर्वांत अत्यंत वाईट अशी एकशाहीची शासनपद्धति त्या मानाने बरी होय. मुळीच मामा नसण्यापेक्षा तिरळ्या डोळ्याचा मामा बरा, या न्यायाने झोटिंगशाहीपेक्षा एकशाही पुष्कळ बरी होय. याच तत्त्वाला अनुसरून जगावरील कोणताहि पूर्वेतिहास वाचला, तर आपणांस असेंच आढळून येईल की, बहुतेक सर्व प्राचीन राष्ट्रांत एकशाही ऊर्फ राजशाही सुरू होती. कोणी तरी एक राजा होऊन त्याच्या हातीं सर्व सत्ता एकवटलेली होती, असाच प्रकार ज्या त्या राष्ट्रांत दृग्गोचर होत होता. अशी सत्ता एका व्यक्तीच्या हातांत पूर्वी कां असे, याला एकच कारण असे. सर्वांत

शक्तीने बलिष्ठ अशी व्यक्ति राजपदाला चढत असे, तर सर्वांत बुद्धीने श्रेष्ठ अशीहि विभूति सिंहासनावर बसविली जाई. कोणत्याहि कारणाने एकदा एखादा मनुष्य राजा झाला म्हणजे त्याचा परिणाम मात्र हमखास असा होत असे की, त्याच्या एकटयाच्या हातांत सर्व सत्ता एकवटली जात असे. प्रजेवर मन मानेल त्याप्रमाणे कर बसविण्याचा अधिकार, प्रजाजनांपैकी वाटेल त्याला शिक्षा ठोठावण्याची अनियंत्रित सत्ता व सरकारी पैशाची इच्छेप्रमाणे खर्च करण्याची पूर्ण मुभा वगैरे हक्क अशा व्यक्तीला लाभत असत, व शंभरांत नव्व्याण्णव वेळा अशा अनियंत्रित सत्तेचा दुरुपयोग करण्यांत येई. राजेलोकांत कांही कांही अपवादात्मक विभूति जन्मास येत असत, पण त्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच होत. बाकी बहुतेक भरणा वाईट राजांचाच असे.

पौराणिक काळीं राम-युधिष्ठिरासारखे सुवृत्त नृपति किंवा ऐतिहासिक काळांत श्रीशिवाजीमहाराज, थोरले माधवराव यांच्यासारखे सुशील राजे अपवादात्मक म्हणून सोडून दिले, तर बाकीच्या सर्वांचा नमुना म्हणजे संभाजीमहाराज किंवा दुसरे बाजीराव यांच्याच आवृत्त्या आढळून येतात. एकशाहीचा मुख्य दोष हा आहे की, राजसत्तेला मिळकतीचा दर्जा कालेंकरून प्राप्त होत जातो व त्यामुळे इतर स्थावर-जंगम मिळकतीप्रमाणे वारसाच्या हक्काने एक राजा मेल्यावर त्याच्या वारसाकडे जाऊं शकते. एकशाहींत हें वैगुण्य असल्यामुळे ती केव्हाहि चांगली नाही. मुख्य नृपति वारल्यावर जर त्या वेळीं युवराज अल्पवयी असेल, तर प्रधानमंडळींचें अनायासें फावतें. अशा वेळीं युवराज ऐन पंचविशींत असेल, तर इतर छंदीफंदी लोकांचें उखळ पांढरें होतें. सारांश, कांही एक श्रम न करतां व अंगांत कोणतीहि पात्रता नसतां, पिढीजाद राजसत्ता आपण होऊन एखाद्याच्या अंगावर पडते. मग विनश्रमाने प्राप्त झालेल्या वस्तूंची खरी किंमत अशा व्यक्तीला समजत नाही. राजसत्ता ही हातांतल्या काठीप्रमाणे गणली गेल्यामुळे ती वाटेल त्याला दान करतां येतें. अर्धें राज्य किंवा सगळें राज्य याचकाला अर्पण केल्याचीं उदारहणें पुष्कळ आढळून येतात. हरिश्चंद्राने आपलें राज्य विश्वामित्राला देऊन टाकून आपण स्वतः काशीक्षेत्राला चालता झाला. पदरीं औरस मुलगा नसल्यास एखादा मुलगा दत्तक घेऊन त्याला युवराज पदवीला चढवितां येतें.

सारांश, स्वारीची घोडी व हातांतील राजसत्ता या एकाच जातीच्या वस्तु एकशाहींत होऊं शकतात; परंतु ही पद्धत सर्वांत अत्यंत घातुक होय. कारण प्रजाजनांनी आपल्या वित्तावर व जीवितावर हुकमत चालविण्याची सर्व सत्ता एका मनुष्याच्या हातीं देणें व अशा एकटया व्यक्तीने ती आपल्या लहरीप्रमाणें गाजविणें, हा प्रकार अत्यंत शोचनीय आहे. एकशाहींत प्रजाजनांपैकी कोणाचें वित्त किंवा जीवित सुरक्षित नसतें. केव्हा राजाची अवकृपा आपल्यावर होईल व केव्हा आपल्या घरादारावर नांगर फिरेल याचा नेम राजशाहींत नसतो. जगांतील बहुतेक सर्व राष्ट्रांतून

राजशाही नष्ट झालेली आहे. गेल्या दहा वर्षांत विद्यमान तीन बलिष्ठ राजशाह्या नामशेष होऊन त्यांच्या जागीं लोकशाह्या स्थापन झाल्या आहेत. जर्मनीचा कैसर, रशियाचा झार व टर्कीचा सुलतान हे तीन अगडबंब सम्राट् धुळीला मिळाले असून, त्यांच्या जागीं लोकनियुक्त अध्यक्ष आले आहेत. आमच्या हिंदुस्थानांत असे सातशे सम्राट् आपली सत्ता हल्ली गाजवीत आहेत. हे हिंदी सम्राट् म्हणजे संस्थानिक होत.

इंग्रज सरकारच्या दृष्टीने संस्थानिक कितीहि दुबळे असोत, पण संस्थानच्या चतुःसीमेंत त्यांची राजसत्ता इतकी कलबती आहे की, त्यांना सम्राट् म्हणण्यास कोणतीहि हरकत नाही. या विसाव्या आधुनिक सुधारलेल्या शतकांत शासनपद्धतीचा हा अनिष्ट प्रकार येथे टिकावा, हें एक आश्चर्य होय. जोंपर्यंत संस्थानिकांच्या हातां-तील राजसत्ता घेण्यांत येऊन ती तेथील प्रजाजनांच्या हातीं आली नाही तोंपर्यंत हिंदी लोकांची राजकीय उन्नति झाली असें कधीहि म्हणतां येणार नाही, गव्हर्नमेंट ऑफ इंडियन स्टेट्स नांवाचा कायदा पास होऊन त्याच्या प्रभावामुळे ज्या दिवशीं संस्थानिक फक्त पोलिटिकल पेन्शनर बनतील तो दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांत सोनेरी अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे.

एकशाहीच्या जागी लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा सुधारलेल्या राष्ट्रांत झालेली आहे. पण या लोकशाहीला जें हिडीस स्वरूप अलीकडे येऊं लागलें आहे, तें पाहून आम्हांस असें वाटतें की, हल्लीच्या स्वरूपाची लोकशाही राजशाहीइतकीच घातुक आहे. एकाच्या हातांत राजसत्ता एकवटणें जसें घातुक आहे, त्याचप्रमाणे ती सर्वांच्या हातांत जाणें हेंहि तितकेंच घातुक आहे. जसा राजा लहरीबाज बनतो तसे सर्व-साधारण सामान्य लोकहि लहरीबाज बनतात व मग त्यामुळे कोणत्याच गोष्टीला स्थिरता नसते. धामधुमीच्या काळांत एक राजा नाहीसा होतो व त्याच्या जागीं दुसरा येतो, त्याचप्रमाणे एक पक्ष कमजोर होतो व त्याच्या जागीं दुसरा पक्ष शिरजोर होऊन तो त्याची जागा पटकावतो. या असल्या अस्थिरतेमुळे राष्ट्राच्या चिरस्थायी प्रगतीला अनेक अडथळे उत्पन्न होतात व त्यामुळे राष्ट्राचें भयंकर नुकसान होतें. यासाठी लोकशाही ही कांही विवक्षित लायक लोकांना मर्यादित असावी असें आमचें मत आहे. ज्याच्या किंवा जिच्या वयाला अठरा वर्षें परिपूर्ण झालीं आहेत, अशा प्रत्येक मुलाला व मुलीला मतदानाचा हक्क असावा, असें एक खुळचट मत अलीकडे प्रसार पावूं लागलें आहे.

राष्ट्रांतील व्यक्तीला, मग ती व्यक्ति लायक असो वा नसो, मत असणें ही गोष्ट हितकर नाही. मतदार होण्यास अंगीं विवक्षित पात्रता पाहिजे. नाही तर मतदारांच्या जोरावर भलतेच उमेदवार निवडून देऊन त्यांच्या हातीं राजसत्ता जाण्याचा संभव आहे. निरक्षर लोकांना मतांचा अधिकार देणें हें केव्हाहि हितकर नाही. सही निशाणी डाव्या हाताचा अंगठा, अशी ठाशीव सही करणाऱ्या मानवी बैलांना मतदार होण्याच्या बाबतींत अंगठा दाखविणें हाच

खरा न्याय्य मार्ग आहे. ज्याला स्वतःची मायभाषा लिहितां-वाचतां येत नाही, अशा ज्ञानांध मनुष्याच्या हातीं राजसत्ता अल्पांशाने का होईना देणें धोक्याचें आहे. मतदार नेहमी लिहितां-वाचतां येणारा असावा. मतदार होण्याचा हा मूळ पाया आहे. पण एवढ्याने भागत नाही. नुसते लिहितां-वाचतां येऊन राजकारणांत बरें-वाईट कळण्याची पात्रता अंगीं येत नसते. साक्षरता असलीच पाहिजे, पण ती इतक्या प्रमाणांत असली पाहिजे की, तिच्यामुळे मतदारांना आपली बुद्धि खर्च करून योग्य उमेदवार कोणता व अयोग्य उमेदवार कोणता, याची निवड करतां येईल. नुसतें त्याला वाचतां आलें म्हणजे तेवढ्याने ज्ञानसंपन्नता प्राप्त होत नाही. यासाठी लायक मतदारांची यादी तयार करण्यासाटी आमच्या मताने मतदारांच्या अंगीं पुढील तीन गुणांपैकी एक तरी गुण अवश्य असला पाहिजे.

तीन व दोन गुण असल्यास धारोष्ण दुधांत साखर पडल्यासारखें होईल. लायक व सत्पात्र मतदार म्हणजे ते वयोवृद्ध ज्ञानवृद्ध किंवा वित्तवृद्ध असावेत. या तीन वृद्धावस्थांपैकी एक तरी वृद्धता अंगीं, असल्याशिवाय मत देण्याचा अधिकार एखाद्याला देणें धोक्याचें होईल. या वरील तीन वृद्धावस्था थोड्या जास्त स्पष्ट केल्या पाहिजेत. तेच मतदार ज्ञानवृद्ध होत की, ज्यांनी विशेष शिक्षण मिळवून आपल्या अंगीं विशेष पात्रता आणली आहे. अशी ज्ञानवृद्धता अंगीं आणण्याचे हल्लीचे मार्ग म्हणजे निरनिराळ्या शाखांतील शिक्षणक्रमाच्या परीक्षा पास होणें होय. वस्तुस्थितीला धरून थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे जो इसम निदानपक्षीं मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालेला आहे, अशा इसमाला मताचा अधिकार देण्यांत यावा. ज्ञानाची ही मर्यादा अलीकडे-पलीकडे थोडीशी केल्यास त्याबद्दल आमचा आग्रह नाही. आमचा आग्रह एवढाच आहे की, ज्ञान-वृद्धत्वाच्या जोरावर मतदार होण्यास कोणत्या तरी परीक्षेची अट घाला. सर्वांत कमी दर्जाच्या परीक्षेची अट आम्हीं घातली आहे व त्यांत आम्ही फारसें चुकलों आहों असें नाही. ज्यांना मायभाषा लिहितां येते, पण शिक्षणाचा विशेष लाभ झालेला नसतो, तरी ज्यांना जगाचा अनुभव बराच आलेला असतो, अशा पन्नाशी उलटलेल्या वयोवृद्ध गृहस्थांना मताचा अधिकार देण्यांत यावा. मतदारांचा तिसरा वर्ग म्हणजे वित्तवृद्धांचा होय. जवळ पुष्कळशी संपत्ति असणें हा एक गुण आहे. एखादी परीक्षा पास न होता, केवळ नैसर्गिक बुद्धीच्या जोरावर कांही लोक शेतींत किंवा व्यापारांत अलोट संपत्ति पन्नाशीच्या आंत मिळवूं शकतात. अशा लोकांनाहि मत देण्याचा अधिकार असावा. म्हणजे इन्कमटॅक्स देणाऱ्या लोकांना दरसाल कमींत कमी इन्कमटॅक्साइतकी रक्कम साऱ्याच्या रूपाने देणाऱ्या शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार असावा.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे लायक मतदार निवडून काढून त्यांनाच निरनिराळ्या निवडणुकींत उमेदवार निवडून देण्याचा अधिकार असावा. नाही तर

तीन रुपये भाडें देणाऱ्या इसमाला मताचा अधिकार देण्यांत आल्यावर एकट्या पुणें शहरांत सोळा हजार मतदारांची यादी फुगूं लागते व तींत रस्ते झाडणाऱ्यांचीं, हमाली करणाऱ्यांचीं, गटारें साफ करणाऱ्यांचीं, टांगे हाकणाऱ्यांचीं व इतर अलवते-गलबते लोकांचीं नांवें चमकूं लागतात. नालायक व अपात्र लोकांना मतदार करण्यांत आल्यास लाचलुचपतीस प्रारंभ होतो, भलतेच वशिले सांगूं लागतात व निवडणुकीचा खर्च निष्कारण भलतीकडेच जातो. सारांश, आमच्या मताने एकशाही ज्याप्रमाणे सर्व बाजूंनी जाचक आहे, तितकीच भरमसाट लोकशाहीहि घातुक आहे. शासनपद्धतीचीं हीं दोन शेवटचीं टोकें सोडून देऊन सौवर्णिक मध्यम धरण्यांत यावा. आयुष्याच्या पन्नास वर्षांच्या अनुभवाने सुशिक्षित बनलेले, नैसर्गिक बुद्धिमत्तेमुळे सामान्य मनुष्याच्यापेक्षा जास्त पैसा मिळविल्यामुळे सुशिक्षित गणलेले व प्रत्यक्ष शाळांत किंवा कॉलेजांत शिक्षण घेऊन परीक्षांमुळे सुशिक्षित झालेले असे तीन प्रतींचे सुशिक्षित मतदार आमच्या योजनेंत असल्यामुळे आम्ही शाहीला 'शिकशाही' म्हणजे शिकलेल्यांची शाही असें म्हणतों. एकलकोंड्या एकशाहीपेक्षा व लांबलचक लोकशाहीपेक्षा आमची सुटसुटीत शिकशाही अनेक पटींनी बरी होय. नाही तर लांबच लांब अमर्याद लोकशाहीमुळे एखादे वायाळ निवडून येऊन त्यांच्या परा-क्रमामुळे कौन्सिलें मात्र घायाळ होऊन जावयाचीं.

— भाला, दि. १५ नोव्हेंबर १९२६

---

## ६०. बाप राष्ट्रवीर तर लेक धर्मवीर

इतिहासज्ञांनो, सर्व जगाच्या ज्ञात इतिहासांत अशी दुसरी विभूति दाखवून द्या की, जिची तुलना श्रीशिवाजीमहाराजांशीं केली असतां ती विभूति समगुण ठरूं शकेल ? हें आम्हांस कबूल आहे की, या पृथ्वीतलावर आजपर्यंत शेकडो राष्ट्रवीर जन्मास येऊन त्यांनी आपआपल्या मायदेशांना स्वातंत्र्यगिरीच्या उच्च शिखरावर नेऊन बसविलें होतें. तसे राष्ट्रप्रेमी व निःस्वार्थी देशभक्त कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांना पूज्य व वंदनीय आहेत. अशा पहिल्या प्रतीच्या देशभक्तांत मुख्यत्वेंकरून अमेरिकेचे जॉर्ज वॉशिंग्टन, इटालीचे गॅरीबाल्डी, रशियाचे लेनिन, चीनचे चँग-कै-शेक वगैरेंचीं नांवें घालण्यांत येतात व तें कांही अयोग्य नाही. वरील देशभक्तांनी आपल्या अंगच्या अलौकिक गुणांनी आपल्या देशबांधवांचें पुढारीपण कमावून त्यांनी आपल्या जन्मभूमीच्या कपाळावर सौभाग्यकुंकुमाचा ठळठळीत टिळा लावून दिला. जगांतील इतर देश-

भक्तांच्या असामान्य कृतीमुळे त्यांच्याबद्दल आदर व पूज्य भाव वाटावा हें साहजिक आहे. तरी त्या सर्व देशभक्तांत आमच्या शिवाजीमहाराजांचें स्थान हातभर जास्त उंचीचें आहे. वरील सर्व देशभक्तांची परिस्थिति अगदी निराळी होती. त्यांच्या भोवतालील संबंध राष्ट्रस्वातंत्र्याच्या लालसेने एकसारखे रसरसत, होते त्यांनी देशबांधवांच्या अंतःकरणांत उचंबळणाऱ्या स्वातंत्र्येच्छेला फक्त तोंड फोडण्याचें काम केलें. देशभक्त जॉर्ज वॉशिंग्टनचेंच उदाहरण घ्या. सर्व अमेरिका त्या वेळीं स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्यास एका पायावर तयार होती व जॉर्ज वॉशिंग्टनने राष्ट्राने हाक मारल्याबरोबर तिला तातडीने ओ दिली व इच्छित कार्य सिद्धीस गेल्यावर पुन्हा आपल्या घराची वाट धरली. अशी वागणूक करण्यांत कमालीचा स्वार्थत्याग आहे; पण त्याबरोबर हीहि गोष्ट खरी आहे की, देशभक्त वॉशिंग्टनने राष्ट्र स्वतः तयार केलें नसून, तयार झालेल्या राष्ट्राचें वाटाडेपण केलें, पण महाराजांची गोष्ट अगदी निराळी होती.

त्या वेळीं सतराव्या शतकांत दक्षिणेंत दोन शाह्या गर्जत होत्या. तर उत्तरेकडून मोंगली सत्तेचा लोंढा फों फों करीत नर्मदा ओलांडून एकसारखा अखंड दक्षिणेकडे वाहूं लागला होता. महाराजांच्या भोवतीं त्या वेळीं चार शाह्या आ करून बसल्या होत्या. खुद्द महाराष्ट्रांतील पिढीजाद मराठे सरदार महाराजांना सदैव पाण्यांत पाहत होते. तशा बिकट परिस्थितींत कोणता वीर तोंड उघडून स्वराज्याचें नांव उच्चारूं शकला असतां किंवा हातांतील तलवार म्यानांतून बाहेर काढण्यास धजला असतां बरें ? महाराज तसेच निधड्या छातीचे म्हणून सह्याद्रीच्या माथ्यावर तोरणा किल्ल्यांत स्वातंत्र्याचें शिंग ते फुंकूं शकले. ज्या वेळीं रोहिडेश्वराच्या देवळांत पांच हजार मावळ्यांनी शंकराच्या पिंडी-वरील बिल्वपत्रें उचलून शपथा घेतल्या, त्या वेळीं तेथे जमलेल्या मावळी वीरांची स्थिति कोणीं अवलोकन केली असती, तर त्याला गदगदा हसूं आलें असतें. महाराजांच्या प्रेरणेने तेथे जमलेल्या मावळ्यांजवळ धड वस्त्र, ना शस्त्र, अंगाने रोडके व संख्येने थोडके, असा तो वानर मेळा जमवून महाराजांनी स्वातंत्र्य-स्थापनेच्या कार्याला सुरुवात केली व त्यांना जगदंबेने यश दिलें. विद्यमान चार बलाढ्य सत्तांशीं एकदम चौफेर लढणारा वीर साऱ्या अलम दुनियेंत महाराजां-शिवाय दुसरा कोणी झाला नाही. म्हणूनच आम्ही महाराष्ट्रीय लोक महाराजांना 'अद्वितीय' म्हणणार.

महाराजांच्या अंगीं एकंदर छत्तीस सद्‌गुण होते. अशा या गुणी बाळाला ज्या महाराष्ट्रभूने जन्म दिला तिचा कुसवा खरोखर धन्य होय. महाराजांचा जन्म मराठा जातींत झाला तरी महाराज महाराष्ट्राचे होते. त्यांच्या ठिकाणीं हा ब्राह्मण, हा मराठा व तो महार हा भेदभाव नव्हता. मराठी बोली बाल-पणापासून बोलणारा तो महाराष्ट्रीय होय व त्या सर्वांवर महाराजांचें बापा-

प्रमाणे प्रेम होतें. महाराजांच्या अंगच्या छत्तीस गुणांचें वर्णन करण्यास एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. तरी त्या छत्तीस गुणांपैकी पुढील चार गुण त्यांच्या ठिकाणीं कमालीने वसत होते. ते चार गुण म्हणजे धैर्य, धारिष्ट, धडाडी व धर्मपरायणता होत. या चारी गुणांतहि महाराजांच्या अंगीं अत्यंत उत्कटतेने वसत असलेला सद्‌गुण म्हटला म्हणजे महाराजांची धर्मपरायणता होय. "हिंदु धर्मासाठी आम्हीं फकिरी घेतली आहे" असें महाराज वारंवार म्हणत असत. फकिरी म्हणजे कमालीचा स्वार्थत्याग होय व त्याच सद्‌गुणाच्या प्रेरणेने त्यांनी श्रीसमर्थांच्या झोळींत स्वराज्याच्या सनदा टाकल्या. अशा या अद्वितीय विभूतीचा पुतळा उशिरा का होईना, उभारण्यांत आला याबद्दल आम्ही स्मारक कमिटीचें व विशेषत: छत्रपति राजाराममहाराजांचें मन:पूर्वक अभिनंदन करतों.

महाराष्ट्रियांनो, सबंध आयुष्यांत तुम्ही एकदा तरी पुण्यनगरींत येऊन महाराजांच्या पूज्य व प्रेरक पुतळ्याचें पुण्य दर्शन घ्या. तो पुतळा आपल्या न हलणाऱ्या पण सदैव बोलणाऱ्या ओठांनी तेथे जाणाऱ्या प्रत्येक महाराष्ट्रियाला असा बहुमोल उपदेश करील की, "बाळांनो, तुम्हीहि धर्मासाठी माझ्या-प्रमाणेच फकिरी घ्या." प्रतिकूल परिस्थितीमुळे नाउमेद झालेल्या महा-राष्ट्रियांनो, तुमच्या निराश झालेल्या अंत:करणांत तो पुतळा मूक उपदेशाचें नवजीवन ओतून तुम्हांस मर्द करील. जा, महाराजांच्या पुतळ्यासमोर हात जोडून महाराजांकडे टक लावून बसा व महाराजांनी दिलेल्या, पण तुम्हीं गमावलेल्या स्वातंत्र्याकरिता तेथे पोटभर रडा. कारण गतइतिहास असें सांगतो की, जो स्वातंत्र्याकरिता रडतो तोच त्याच्या प्राप्तीकरिता झगडतो. पण फक्त महाराजांचा पुतळा पाहून प्रेक्षकांच्या अंत:करणाचें समाधान होत नाही, त्याला आणखी कांही तरी पहावेंसें वाटतें. महाराजांचा पुतळा पाहिल्यावर तो त्या सभोवतील पटांगणावर इकडे-तिकडे कावऱ्या-बावऱ्या मुद्रेने पाहूं लागतो. तेथे गेलेल्या प्रेक्षकाची मन:स्थिति अशा प्रकारची कां होतें बरें ? याचें कारण अगदी उघड आहे. "धर्मासाठी आम्हीं फकिरी घेतली आहे" या वडिलांपासून मिळालेल्या उपदेशाचें अक्षरश: परिपालन करणाऱ्या लेकांचा पुतळा त्या पटांगणावर प्रेक्षकाच्या डोळ्यांना कोठेहि दिसत नाही, म्हणूनच तो असा कावरा-बावरा होऊन चौफेर पाहत राहतो.

खरोखर श्रीशिवाजीमहाराजांच्या पुतळ्यामागोमाग त्या पटांगणावर श्रीसंभाजीमहाराजांचा पुतळा बसविण्यांत आला पाहिजे. बापाने "हिंदु धर्मासाठी फकिरी घेतली" तर लेकाने "हिंदु धर्मासाठी बेफिकिरी दाखविली." आमची तर मति गुंग झाली आहे की, या अपूर्व बापलेकांच्या जोडींत वरिष्ठ कोण व कनिष्ठ कोण हें ठरविण्यास आम्ही पूर्णपणें असमर्थ आहोंत. केवढें तें मोहक आमिष !

ज्याच्या तोंडांतून पडणारा प्रत्येक शब्द झेलण्यास मोठमोठे रजपूत राजेहि सदा तत्पर असत, तो अलमगीर बादशहा स्वतः जातिनिशीं सिंहासनावर बसून नव्हे, तर समोर उभा राहून, संभाजीमहाराजांना असें विनवीत आहे की, "बारा कोटींची दख्खनची सुभेदारी देतों, पोटची पोर लग्न करून देतों व सर्वांत प्यारा असा जो जीव तो वांचवितों; पण, पण काय, तर तूं मुसलमान हो." बादशहाचे ते कर्णभेदक शब्द कानीं पडतांच एखाद्या खिजवलेल्या सिंहाप्रमाणे संभाजीमहाराज चवताळून गेले व त्यांनी पैगंबर महंमदाची बेसुमार निंदा करण्यास प्रारंभ केला. बादशहा जर कडवा मुसलमान, तर संभाजीमहाराज तितकेच हिंदु धर्मासाठी स्वतःच्या देहाबद्दल बेगुमान ! "स्वधर्मे निधनं श्रेयः" हें मर्दानी तत्त्व उपदेशणारी गीता ज्या धर्मवीराने ऐकली होती, तो मर्द तें गीता-तत्त्व झुगारून देऊन स्वतःची सुंता होऊं देण्यास कसा तयार होईल बरें !

दिल्लीचा मुसलमानी बादशहा व महाराष्ट्राचा हिंदु राजा, या दोघांत तें धर्मयुद्ध होऊन संभाजीमहाराजांच्या गळयांत विजयश्रीने माळ घातली. दुसरा एखादा लेचापेचा संभाजीमहाराजांच्या जागीं असता तर त्याने स्वार्थासाठी व जीवासाठी केव्हाच झटकन् कबुली दिली असती व रायगडावर संभाजी या नांवाच्या ऐवजीं शाबुद्दीन म्हणून बादशहा मिरवला असता. पण नाही, तसें कधीहि झालें नसतें. महाराजांच्या पोटीं तसे स्वधर्मत्यागी मर्कट कधीहि जन्मास आलें नसतें. शिवाजीमहाराजांना रायगडीं राज्याभिषेक झाला, तर तुळापुरीं संभाजीमहाराजांना धर्माभिषेक झाला. बापलेकांची अशी अपूर्व जोडी जगाच्या पाठीवरील दुसऱ्या कोणत्याहि देशांत जन्मास आलेली नाही. बाप जर राष्ट्रवीर तर लेक धर्मवीर होय. ज्या धर्मवीराने ऐन तिशीच्या उमरींत आपल्या पंचप्राणांची पूर्णाहुति धर्मकुंडांत आनंदाने दिली, त्या हुतात्म्याचें यथातथ्य वर्णन करण्यास आमच्याजवळील मराठी भाषेंतील शब्दांचा साठा अपुरा पडत आहे. तरी पण जवळील सबंध साठा शोधून शोधून आम्ही संभाजी महाराजांच्या अंगच्या या अद्वितीय गुणाच्या गौरवार्थ धर्मवीराच्या ऐवजीं 'धर्मशार्दूल' ही पंचाक्षरी पदवी त्यांच्या चरणीं अर्पण करतों. अशा या धर्मशार्दूलाचा पुतळा स्मारक कमिटीच्या पटांगणावर अवश्यमेव पाहिजे. नाही तर शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याच्या दर्शनार्थ जाणाऱ्या महाराष्ट्रियांच्या अंतःकरणाची तळमळ शांत होणार नाही. म्हणून छत्रपति राजाराममहाराजांना सर्व महाराष्ट्रियांतर्फे आमची अशी नम्र विनंती आहे की, त्यांनी मन मोठें करून एक लाख रुपये स्वतःच्या पदरचे खर्चून धर्मशार्दूल संभाजीमहाराजांचा पुतळा तेथेच बसविण्याचा संकल्प करावा. संभाजीमहाराजांचा पुतळा राजाराममहाराजांनी बसवावयाचा नाही, तर मग तो दुसऱ्या कोणी बसवावयाचा बरें ! वार्षिक पस्तीस लाख रुपये उत्पन्नाच्या महाराजांनी मनांत आणल्यास एक लाखाची रक्कम कांही जड नाही.

पूर्वजप्रेम कोल्हापूरच्या महाराजांना धर्मशार्दूल संभाजीमहाराजांचा पुतळा करण्याची प्रेरणा करील अशी आम्हांस आशा, नव्हे आशाळभूतपणा आहे.

– भाला, दि. २५ जून १९२८

---

## ६१. पंढरी व परळी

सोलापूर जिल्ह्यांत भीमेच्या काठीं पंढरपूर नांवाचें एक शहर असून, तेथे पुरातन काळापासून श्रीविठ्ठलाचें, श्रीरखुमाईचें व श्रीपुंडलिकाचें अशीं तीन देवळें आहेत. पंढरपूर शहरानजीक भीमेने चंद्राच्या कोरीप्रमाणे वळण घेतल्यामुळे तिला त्या क्षेत्रापुरतें चंद्रभागा असें दुसरेंहि गोड नांव आहे. पुंडलिकाच्या भक्तीसाठी साक्षात् परमेश्वर तेथे आले व आज अठ्ठावीस युगें त्या ठिकाणीं विटेवर उभे राहिले आहेत. श्रीविठ्ठलाची भक्ति करण्याकरिता दरवर्षी आषाढीला व कार्तिकीला लाखो वारकरी पंढरीला जमत असतात व तेथे विठ्ठलनामाच्या भजनापासून उत्पन्न होणाऱ्या आनंदाची लूट करीत असतात. पंढरीच्या पवित्र क्षेत्रांत भगवंताची अखंड सेवा भजनाच्या द्वारें चालली असल्यामुळे, त्या पंथाला भागवत धर्म असें नांव पडलें असून, तो मार्ग चोखाळणाऱ्या भक्तांना वारकरी असें म्हणतात. या भागवत धर्माच्या आद्य संस्थापकाचा मान श्रीज्ञानेश्वरमहाराजांना असून, त्यांच्यानंतर श्रीनामदेव-महाराज, श्रीएकनाथमहाराज वगैरे अनेक संत होऊन, शेवटले कळसाचे संत श्रीतुकारामहाराज होत. "ज्ञानदेवें रचिला पाया" यापासून भागवतपंथाला प्रारंभ होऊन "तुका झालासे कळस" यापर्यंत या पंथाची उभारणी झाली आहे.

या भागवत ऊर्फ वारकरीपंथाने वैदिक धर्माची सेवा उत्तम तऱ्हेने केली. तेराव्या शतकांत या पंथांची स्थापना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी करून तो पंथ आज सुमारे सातशे वर्षे अव्याहत रीतीने चालू आहे. या पंथांचें मुख्य दैवत श्रीविठ्ठल असून पारमार्थिक मोक्षाचें मुख्य साधन 'भजन' आहे. अनन्यभावाने श्रीपांडुरंगाचें भजन-पूजन करा व त्यामुळे तुमच्या चरणीं चारी मुक्ति लोळत येतील, अशी या पंथाची श्रद्धा आहे व तें अगदी बरोबर आहे. तेराव्या शतकापासून देवगिरीच्या यादव घराण्याची राजसत्ता नष्ट होऊन, महाराष्ट्रांत यावनी अंमल सुरू झाला व त्यामुळे मूर्तिपूजेवर एक भयंकर संकट ओढवलें. इस्लामी धर्म मूर्तिपूजेच्या विरुद्ध असल्या-मुळे त्यांच्या आक्रमणाबरोबर जागजागीं मूर्तींचे भंग होऊं लागले. तशा कठीण समयीं हिंदु लोकांना आपल्या आराध्यदैवतांची उघडपणें पूजा-अर्चा करण्याची बंदी झाली होती. तशा प्रसंगीं ज्या साधुसंतांनी आपल्या जिवाचा धडा करून केवळ

शांततेच्या मार्गानें हिंदुधर्मीय देवदेवतांच्या मूर्तींचें संरक्षण केलें त्या साधुसंतांचे जेवढे उपकार मानावेत तितके थोडेच होत. एकदा एखादी गोष्ट घडून गेल्यावर तिची किंमत पुढील काळच्या लोकांना फारशी वाटत नाही. पण तीच गोष्ट एखाद्या विशिष्ट काळीं करण्यास किती कठीण जाते याची जाणीव ज्या लोकांना होत असते. तेच लोक तेराव्या शतकापासून तों सतराव्या शतकापर्यंत महाराष्ट्रांत साधु-संतांनी केवढी अजब कामगिरी केली याची किंमत जाणतील. आम्ही तर हे स्पष्टपणें कबूल करतों की, जर त्या चार शतकांच्या धामधुमीच्या काळांत वारकरीपंथाची स्थापना महाराष्ट्रांत झाली नसती, तर कदाचित् झाडून सर्व हिंदु पीर-पैगंबरांच्या भजनी लागले असते. त्यामुळे हिंदु धर्माचें कधी भरून न येणारें नुकसान झालें असतें.

सारांश, वारकरीपंथीय साधुसंतांनी हिंदु धर्माचें संरक्षण त्या कठीण प्रसंगीं योग्य रीतीने केलें याबद्दल ते नेहमी आदरास पात्र आहेत. या दृष्टीने विचार केल्यास वारकरीपंथ हल्लीहि एका विशिष्ट प्रकारची धर्मसेवा करीत आहे, असेंहि म्हणावयास हरकत नाही. पण सतराव्या शतकांत महाराष्ट्रियांच्या अंतःकरणांत विठ्ठलभक्ति ओतप्रोत होऊन ती इतकी उतूं जाऊं लागली की, त्या विठ्ठलभक्तीला एकांगीपणा येऊन ऐहिक उन्नतीकडे दुर्लक्ष होऊं लागलें. सर्व भूतांच्या ठायीं समता-बुद्धि इतकी उत्कट झाली की, अंगावर एकवीस वेळा थुंकणाऱ्या यवनाकडेहि प्रेम-दृष्टि अखंड राहिली व चोराने म्हैस चोरली असतां, तिचें पारडें घेऊन जा, असें ओरडत म्हशीचा मालक चोराच्या पाठीमागे धांवूं लागला. ही विचारसरणी ऐहिक उन्नतीला घातुक आहे, हें मर्म सतराव्या शतकांत ज्या महात्म्याच्या पहिल्या प्रथम लक्षांत आलें तो महात्मा म्हणजे श्रीसद्‌गुरु रामदासस्वामी होत. श्रीसमर्थांनी भागवत धर्माचें परिस्थितीप्रमाणे अल्पसें रूपांतर करून त्याला राजकारणाची पुस्ती जोडली. ईशभक्ति सर्वांना सर्वांच्या अगोदर हवी हें वारकरीपंथाचें तत्त्व मान्य करून श्रीसमर्थ असें प्रतिपादितात की, धर्माची उन्नति होण्यासाठीच धर्मकारणाला राजकारणाची जोड देण्यांत आली पाहिजे. ही जी नवीन शिकवण श्रीसमर्थांनी सुरू केली तिलाच महाराष्ट्रधर्म म्हणतात व तिलाच वारकरीपंथ असें नवीन नांव आम्ही देत आहोंत.

बाराव्या वर्षी लग्नाच्या बोहोल्यावरून पलायन करून त्यांनी पंचवटी येथे बारा वर्षे त्रयोदशाक्षरी राम-मंत्राचा तेरा कोटि जप केला. नंतर बारा वर्षे तीर्थ-यात्रा करून त्यांनी सारा भरतखंड हिंडून काढला व मग श्रीसमर्थांनी आपलें कायमचें वास्तव्य कृष्णेच्या काठीं करून महाराष्ट्राला राष्ट्रधर्माची शिकवण देण्यास सुरुवात केली. ही शिकवण श्रीशिवाजीमहाराजांना पटून त्यांनी दासांचें शिष्यत्व पत्करलें व दोघा गुरु-शिष्यांनी ईशसेवेबरोबर देशसेवेलाहि तत्कालीन परिस्थिती-प्रमाणे सुरुवात केली. ज्याप्रमाणे वारकरीपंथाचें मुख्य क्षेत्र पंढरी बनलें त्याच-प्रमाणे धारकरीपंथाचें मुख्य ठाणें साताऱ्याजवळील पंढरी झालें. श्रीसमर्थांनी

उपदेशिलेल्या महाराष्ट्रधर्माचीं तत्त्वें पुढील दोन ओव्यांत गोवलेलीं आहेत. "मुख्य तें हरि कीर्तन। दुसरें तें राजकारण। तिसरे तें सावधान। सर्व विषयी ।। चवथा तो अत्यंत साक्षेप। फेडूनी नाना विकल्प। अपराध घोर अथवा अल्प। क्षमा करीत जावें ।।" राष्ट्रोन्नतीला मुख्य पाया हरिकीर्तनाचा आहे, या बाबतींत वारकरीपंथाची व धारकरीपंथाची एकवाक्यता आहे. पण हरिकीर्तनापुढे वारकरी संत जात नाहीत, ही मोठी उणीव त्या पंथांत आहे. धर्माचें संरक्षण योग्य रीतीने होण्यास अंतःकरणांत नुसती दृढ श्रद्धा असून भागत नाही, तर त्याबरोबरच मनगटांत राजकीय सत्ता पाहिजे. म्हणजे तें धर्मरक्षण उत्तम तऱ्हेने होतें. हें तत्त्व श्रीसमर्थांनी पूर्णपणें जाणून ते असें पुढे उपदेशितात की, दुसरें तें राजकारण केलें पाहिजे व येथेच थांबून न राहतां प्रत्येक विषयांत प्रावीण्य मिळविण्यासाठी हरएक प्रकारचा साक्षेप म्हणजे प्रयत्न करण्यांत आला पाहिजे. असा हा चतुरंगी धारकरीपंथ वारकरी-पंथापेक्षा काकणभर जास्त नाही असें कोण म्हणेल बरें ! आमच्या अल्प समजुतीने या दोन पंथांत विरोध नसून ते एकाच इमारतीचे दोन मजले आहेत. सर्वांगीण उन्नतीचा तळमजला जर वारकरीपंथ आहे, तर त्यावरील दुसरा मजला धारकरी-पंथ होय. वारकरीपंथाशिवाय धारकरीपंथाला दुसरा आधार नाही, तर धारकरी-पंथाशिवाय नुसत्या वारकरीपंथांत सामर्थ्य नाही. म्हणून दोन्ही पंथांतील लोकांनी एकमेकांबद्दल अनादरबुद्धि न बाळगतां एकमेकांच्या हातांत हात घालून धर्मोन्नतीच्या व राष्ट्रोन्नतीच्या मार्गाची वाट चालली पाहिजे, तरच त्यांत सर्वांचें सारखें हित आहे. वारकरीपंथाचे संत व धारकरीपंथाचे महंत यांनी एकजुटीने निदान परस्परांस विरोध न करतां जर आज आपलीं कर्तव्यें केलीं तरी सुद्धा महत्कार्य होण्यासारखें आहे.

सारांश, प्रत्येक हरिभक्ताने व देशभक्ताने पंढरपुराला आषाढीची वारी व दासनवमीला परळीची वारी, अशा दोन्ही वाऱ्या केल्याशिवाय त्याच्या अंगीं पूर्णता यावयाची नाही. वारकरीपंथाची व धारकरीपंथाची एकी घडवून आणण्यासाठीच लोकमान्यपंथ निघाला आहे. लोकमान्यपंथीय महाराष्ट्रियांना श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रिय आहेत व त्याप्रमाणे श्रीरामदासस्वामीहि त्यांना पूज्य आहेत. लोकमान्यपंथीय लोक आळंदीलाहि जातील व परळीलाहि जातीलच जातील. लोकमान्यपंथीय श्रीमारुतिरायाची भक्ति अगोदर करतील, पण ते श्रीपांडुरंगाचें भजन करण्यास कां-कूं करणार नाहीत. लोकमान्यपंथीय लोक "सुंदर तें ध्यान उभें विटेवरी" हा तुकारामी अभंग आनंदाने गातील व तितक्याच भक्तिभावाने ते रामदासांचे मनाचे श्लोक म्हणत राहतील. सारांश, लोकमान्यपंथीय लोक कोणत्याच एका पंथाचे कट्टर अनुयायी नाहीत; तरीपण त्यांचा विशेष ओढा रामदासीपंथाकडे आहे. वारकरीपंथीय संतांनी राजकारणांत थोडेंबहुत लक्ष घालूं लागल्याशिवाय त्या पंथाची छाप सुशिक्षित लोकांच्या मनावर बसणार नाही एवढी सूचना करून, आम्हांस जर

कोणीं असा प्रश्न केला की, "पंढरी का परळी" तर या प्रश्नाला आमचें उत्तर असें आहे की, "पंढरी व परळी."

— भाला, दि. १० फेब्रुवारी १९३०

---

## ६२. बहिष्कार कशावर ! विदेशी का विलायती कापडावर ?

अलीकडे सत्याग्रहाची भाषा मागे पडूं लागली असून, बहिष्काराची भाषा ज्याच्या त्याच्या तोंडावाटे निघूं लागली आहे. "सत्याग्रहापेक्षा बहिष्कार शतपटींनीं वरा !" या मथळ्याखाली आम्हीं या प्रश्नाची सांगोपांग चर्चा एकदा केली आहे, तरी पण त्याच विषयाबद्दल पुन्हा एकवार आम्ही दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे. सत्याग्रहाच्या चळवळीचें जनकत्व म. गांधींना हक्काने प्राप्त होत आहे. राष्ट्रीय सभेचीं सूत्रें सन १९२० सालीं त्यांच्या हातीं जाण्यापूर्वी सत्याग्रह हा शब्द वर्तमानपत्री लेखांत आढळत नसे. पण लोकमान्य सन १९२० सालीं वारल्यावर हा एकच शब्द सर्वतोमुखीं होऊन बसला आहे. सत्याचा आग्रह धरून कायदेभंग करा व निमुटपणें तुरुंगांत जा म्हणजे स्वराज्यच नव्हे, तर स्वातंत्र्य सुद्धा तुमच्या पायांवर लोटांगण घालीत येईल, असें महात्माजींचें नवीन मत आहे व त्या मताला सक्रिय मान्यता देणारे कमींत कमी दहा हजार स्वयंसेवक गुजरातेंत व एक हजार स्वयंसेवक महाराष्ट्रांत निघाले आहेत. इतर प्रांतांत थोडाबहुत सत्याग्रह होत आहे, पण त्यांत विशेषसा जोम नाही. सत्याग्रहाची चळवळ चालू ठेवण्याची शर्त अशी आहे की, सत्याग्रह्यांनी व पोलिसांनी शांततेच्या मार्गाने आपआपलीं कर्तव्यें करावयाचीं, पण ज्या वेळेपासून सत्याग्रही वीर मिठागरावर आपले हल्ले चढवूं लागले, त्या दिवसापासून पोलिसांनी शांततेची अट झुगारून देऊन व हातांत सोटे घेऊन सत्याग्रह्यांना बडविण्यास सुरुवात केली. पोलिसांनी सोटाग्रह सुरू केल्याबरोबर सत्याग्रह थांबावयास पाहिजे होता, पण मार खाऊनहि सत्याग्रह्यांनीं आपला सत्याग्रह अद्यापपर्यंत चालू ठेवला आहे. यामुळे पोलिसांच्या लाठीमाराने पुष्कळ सत्याग्रही घायाळ झाले असून, अशा जखमी झालेल्या सत्याग्रह्यांपैकी तीन सत्याग्रही हा मर्त्यलोक सोडून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी परमेश्वरी दरबारांत सत्याग्रह सुरू केला आहे.

सत्याग्रह्यांच्या उत्कट देशभक्तीबद्दल व शारीरिक स्वार्थत्यागाबद्दल इतरांप्रमाणे आम्हांलाहि कौतुक वाटत आहे, पण दुःखाची गोष्ट एवढीच आहे की, त्यांच्या ठिकाणीं व्यावहारिक तारतम्यबुद्धीचा पूर्ण अभाव आहे. सत्याग्रही लोक

जो एकदा सत्याग्रहाचा हेका धरून बसले आहेत, तो ते तसाच धरून बसले आहेत. जशी परिस्थिति बदलेल तसे सत्याग्रह्यांनीहि आपले पवित्रे टाकले पाहिजेत. सत्याग्रही हे व्यावहारिकपणा दाखवीत नाहीत, म्हणूनच त्यांच्या चळवळीला यश येत नाही. कांही कांही वेळा ते भलत्याच क्षुल्लक गोष्टीचा आग्रह धरून बसतात व त्यामुळे ते स्वतःला निष्कारण विरोध करून घेतात. उदाहरणार्थ, टोप्यांचीच क्षुल्लक बाब घ्या. गांधी-टोपीच घातली पाहिजे असा हट्ट धरून पुणेरी सत्याग्रह्यांनी जर एप्रिलच्या पंधराव्या तारखेला पुण्यांत पांच हजार टिळक-टोपी जाळली नसती, तर पुणें शहरांत सत्याग्रहाची चळवळ दसपट जास्त फोफावली असती. सत्याग्रही डोक्या-वरच्या गांधी-टोपीच्या कापडावरून त्यांच्या रंगावर येऊन बसले आहेत. जपानी म्हणजे विदेशी कापडाच्या, पण पांढऱ्या रंगाच्या गांधी-टोप्या चालतील, पण स्वदेशी कापडाच्या पण काळ्या रंगाच्या टिळक-टोप्या किंवा भगव्या रंगाच्या 'शिवाजी-टोप्या' त्यांना चालत नाहीत.

महाराष्ट्रियांच्या परंपरेकडे पाहिलें, तर त्यांना भगवा रंग जितका पवित्र आहे, तितकाच पांढरा रंग अशुभ आहे. पांढरी गांधी-टोपी व भगवी शिवाजी-टोपी कोणत्याहि दहा महाराष्ट्रियांपुढे केली, तर ते दहाचे दहा भगव्या टोप्या ताबडतोब उचलतील हें आम्ही छातीठोकपणें सांगतों. पांढरा रंग गुजरात्यांना जितका प्रिय आहे त्याच्या दसपट प्रिय भगवा रंग महाराष्ट्रियांना आहे. भगव्या रंगाच्या पाठी-मागे महाराष्ट्रियांचा दीडशे वर्षांचा उज्ज्वल इतिहास आहे, ही गोष्ट विसरून जर पांढऱ्या रंगाची गांधी-टोपी महाराष्ट्रियांवर कोणी बळेंच लादूं पाहतील, तर त्यांना केव्हाहि यशाची प्राप्ति होणार नाही. असो; स्वातंत्र्य कमावण्याच्या बाबतींत सत्याग्रह हा पंगु मार्ग आहे. सत्याग्रहाचा मार्ग दीनांचा आहे, तो दणदणितांचा नाही. सामनेवाल्यांच्या अंतःकरणांत सत्याची ज्योत पेटवून तिच्या प्रकाशांत स्वातंत्र्य-मंदिराचा रस्ता सत्याग्रह्यांना आक्रमावयाचा आहे. पण हें गोंडस तत्त्व राजकारणांत अगदी निरुपयोगी होतें. म्हणून सत्याग्रहाचा मार्ग सोडून सत्याग्रह्यांनी बहिष्काराचा मार्ग स्वीकारावा. बहिष्काराचा मार्ग सत्याग्रहाच्या मार्गाप्रमाणे खडबडीत व खडकाळ नसून, तो अगदी सरळ व सुखकर आहे. अलीकडे सत्याग्रही बहिष्काराच्या मार्गाचा अवलंब करूं लागले आहेत, पण त्यांच्या डोक्यांतून खादीचें वेड पूर्णपणें निघालेलें नाही. खादीच्या जोरावर त्यांना विलायती कापडावर बहिष्कार घालावयाचा आहे.

अलीकडे खादीखालोखाल ते स्वदेशी कापडाला किंमत देऊं लागले आहेत, पण त्यांनी त्यांत सतरा प्रकार व अठरा श्लेष काढले आहेत. स्वदेशी कापड म्हणजे जें कापड हिंदुस्थानांत विणलें जातें, मग त्यांतील सूत स्वदेशी असो किंवा विदेशी असो. 'हिंदुस्थानमें बनेलो माल' हीं दहा अक्षरें ज्या कापडावर असतील तें कापड स्वदेशी समजून बेशक विकत घ्यावें. यामुळे परदेशी व्यापारी वरील शिक्का मारून विदेशी कापड हिंदुस्थानांत पाठवून हिंदी लोकांना फसवतील अशी शंका कांहींकांनी काढली.

आहे, पण तींत अर्थ नाही. कापडाच्या ताग्यावर गिरणीचें नांव असतें, त्यावरून कोणतेंहि कापड हें स्वदेशी आहे की विदेशी आहे तें तेव्हाच कळून येण्यासारखें आहे. यावरहि अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे की, येथील गिरणीवाल्यांनी विदेशी गिरणीवाऱ्यांशीं संगनमत करून परदेशी कापडावर स्वदेशी शिक्का मारून तें तसलें कापड बाजारांत विकण्यास मांडलें तर मग पुढे काय! पण असें घडून येण्यास एक गोष्ट गृहीत धरण्यांत आली आहे ती ही की, असें लबाड गिरणीवाले अगोदर आहेत व त्यांच्या लुच्चेगिरीचा स्फोट करण्यास मुंबईत कोणी नाही. अशी लबाडी होऊं नये एतदर्थ एक कमिटी नेमण्यांत यावी व तिच्यामार्फत अशा लबाडीचा बंदोबस्त करण्यांत यावा. आम्ही घटकाभर असें धरून चालतों की, वरील लबाडीगिरी करण्यांत येऊन कांही व्यापारी परदेशीं कापड स्वदेशीच्या नांवाखाली विकूं शकतील; पण अशा कापडाचें प्रमाण इतकें क्षुल्लक राहील की, तें हिशोबांत घेण्याची जरुरी राहणार नाही. या गोष्टी इतक्या उघडपणें व राजरोसपणें चालतात की, त्या फार दिवस लपवून छपवून करतां येण्यासारख्या नाहीत. अशी लुच्चेगिरी करून जो गिरणीवाला परदेशीं कापड आपल्या गिरणीच्या नांवाखाली विकतांना सापडेल त्या गिरणीवर बहिष्कार टाकावा म्हणजे झालें. सर्वच गिरणीवाले अशी लुच्चेगिरी करणार नाहीत; पण तसेंच अघटीत घडून आल्यास, मग कपाळाला हात लावून स्वस्थ बसावें. म्हणून भलत्याच कुशंका काढून बहिष्कारापासून परावृत्त होऊं नये. बहिष्काराच्या बाबतींत पुष्कळांची गैरसमजूत झाली आहे. ती दुरुस्त करण्याच्या हेतूने आम्ही पुढील खुलासेवार स्पष्टीकरण करीत आहोंत.

ज्यांना खादीच वापरावयाची असेल त्यांनी ती सुखेनैव वापरावी, त्याला कोणाची ना नाही. एकाच तऱ्हेच्या कापडावर आपली हरएक तऱ्हेची गरज भागविणारा इसम शंभर-नंबरी राष्ट्रभक्त होय. पण राष्ट्रभक्तींत या पहिल्या वर्गांत सर्वच येतील अशी अपेक्षा करणेंहि खुळेपणाचें आहे. परीक्षेच्या निकालांत ज्याप्रमाणे कांही पहिल्या, कांही दुसऱ्या व पुष्कळसे पासवर्गांत येतात, त्याचप्रमाणे राष्ट्रभक्तीच्या परीक्षेंतहि तसलीच वर्गवारी लागते. नखशिखान्त खादी व खादीच वापरणारे देशभक्त पहिल्या वर्गांतील होत. खादी न वापरतां स्वदेशी कापड वापरणारे इसम दुसऱ्या प्रतीचे देशभक्त होत व स्वदेशी कापड वापरीत नाहीत, पण त्याचबरोबर विलायती कापडहि वापरीत नाहीत असे इसम तिसऱ्या वर्गाचे देशभक्त होत. विदेशी कापड वापरल्यामुळे पैसा परदेशीं जातो, पण निदान तो विलायतेंत तरी जात नाही, ही त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट आहे. मुख्यत्वेंकरून स्वदेशी व अल्पांशाने विदेशी कापड वापरणाऱ्या इसमांना आम्ही बहिष्कारी म्हणतों व हा मार्ग सर्वांत श्रेष्ठ आहे. या वेळीं हें लक्षांत नीटपणें धरलें पाहिजे की, विदेशी व विलायती हे शब्द समानार्थक नाहीत. विलायती कापड म्हणजे इंग्लंडांत तयार होणारें कापड होय. या अशा विलायती कापडा-

वर बहिष्कार सर्वांनी टाकलाच पाहिजे त्याबद्दल दुमत नाही. जोंपर्यंत ब्रिटिश पार्लमेंट हिंदी लोकांना स्वराज्य म्हणजे ' डोमिनियन स्टेटस ' देणार नाही तोंपर्यंत आम्ही हिंदी लोक विलायती कापड घेणार नाही, असा निश्चय सर्व हिंदी लोकांनी केलाच पाहिजे. पण विलायती कापड अजीबात वगळून इतर परदेशांत तयार झालेलें कापड कोणीं अल्पांशाने घेतल्यास त्याबद्दल हाकाटी माजविण्यांत अर्थ नाही.

उदाहरणार्थ, एखाद्या इसमाला वर्षाचें शंभर रुपयांचें कापड लागतें तर अशा इसमाने त्यांतलें दहा रुपयांचें कापड विदेशी, पण विलायती नसलेलें विकत घेऊन आपली हौस पुरी केली, तर अशा बहिष्कारी माणसाला नांवें ठेवण्यांत येऊं नये. पन्नास टक्के स्वदेशी व पन्नास टक्के विदेशी कापड विकत घेणारा इसमहि बहिष्कारी होय. वावडें काय तें फक्त विलायती कापडाचें असावें म्हणजे झालें. सद्य:स्थितीत हा बहिष्कार अत्यंत जरुरीचा आहे. असा बहिष्कार न ठेवल्यास महायुद्धाप्रमाणे तेथील गिरणीवाले स्वदेशी कापडाच्या किंमती दुपटी-चौपटीने वाढवतील व गिऱ्हाइकांना थक्क करून सोडतील. त्यांच्यावर दाब बसविण्यासाठी पूर्ण स्वदेशीच्या ऐवजीं बहिष्कारमिश्रित स्वदेशी चालू परिस्थितींत जास्त हितकर आहे. विदेशी कापड विकत घेण्याच्या वेळीं त्यांतल्या त्यांत चिनी व जपानी कापडाला जास्त पसंती द्यावी. किती झालें तरी चिनी व जपानी लोक हिंदु लोकांचे चुलत बंधु आहेत. भगवान् गौतमबुद्ध हे हिंदुस्थानांत जन्मले असून त्यांचे आईबाप आर्य होते. त्यांची मुंज वैदिक पद्धतीने एका आर्य ब्राह्मणाने लावली होती ही गोष्ट निर्विवाद आहे. भगवान् गौतमबुद्धाचे शिष्य चिनी व जपानी लोक आहेत. त्यामुळे हिंदु लोक, चिनी व जपानी लोक एकमेकांचे बंधु बंधु आहेत. यासाठी हिंदुस्थानांत पैदा होणाऱ्या स्वदेशी कापडाच्या खालोखाल जपानी सुती कापडाची व चिनी रेशमी कापडाची किंमत आहे. सारांश, विलायती कापडावरील बहिष्कार यशस्वी होण्यास लोकांना विदेशी कापड घेण्याची सवलत देण्यांत आली पाहिजे. लोकमान्यांनी हेंच सांगितलें व त्याचाच अनुवाद आम्ही करीत आहोंत.

— भाला, दि. २३ जून १९३०

---

## ६३. बोलण्यांत गोड, पण वागण्यांत खोड

या जगांत अनेक देश आहेत व त्यांत नाना वृत्तीचे लोक राहत आहेत. त्या सर्वांत वरील म्हण जर कोणाला पूर्णांशाने लागू पडत असेल, तर ते इंग्रज लोक होत. त्यांच्यासारखी गोड जिव्हा इतर कोणाची नाही. त्यांच्याशीं भाषण करण्याचा प्रसंग

आल्यास अशा भाषणांत 'प्लीज', 'एक्स्क्यूज' 'थँक यू' 'आय् ॲम सॉरी' वगैरे शब्दांची व वाक्यांची रेलचेल ऐकूं येते. इंग्रज मनुष्य निष्कारण कोणालाहि कुशब्दाने दुखवावयाचा नाही; पण त्याचप्रमाणे त्याच्या हातांत जें एकदा पडलें तें तो जीव जाईपर्यंत हातचें सोडावयाचा नाही. इंग्रजांचा हा सद्‌गुण म्हणा वा दुर्गुण म्हणा राजकारणांत पदोपदीं दृष्टीस पडतो. कोणत्याहि इंग्रजी अंमलदाराच्या भेटीस जा, तो शाब्दिक आगतस्वागतांत व आश्वासनांत उपरांडून जाईल, पण प्रत्यक्ष कृतींत पहाल तर तो नेहमी कोरडा ठणठणीत असतो. हा दुर्गुण वैयक्तिक नसून तो त्यांचा राष्ट्रीय दुर्गुण आहे. हिंदी लोकांच्या दुर्दैवाने अशा वस्ताद लोकांशीं हिंदी लोकांची गाठ पडली आहे.

सन १८१८ सालीं पेशवाई बुडाल्यानंतर त्यांचे पाय हिंदभूमींत कायमचें रोवले गेले. त्या दिवसापासून आज १०० वर्षें इंग्रज सरकार हिंदी लोकांना स्वराज्यदानाच्या थापा देत आले आहे व हिंदी प्रजा त्या थापा ऐकत आली आहे. महायुद्धानंतर जेव्हा हिंदी प्रजेने स्वराज्याची मागणी जोराने केली तेव्हापासून हिंदुस्थान सरकारच्या पोटांत धडकी भरली आहे. आता नुसत्या गोड गोड थापांनी भागावयाचें नाही. हे पूर्णपणें जाणून हिंदी लोकांच्या हातांत सुधारणेच्या कायद्याचें कडबोळें ठेवण्यांत आलें. पण शंभर वर्षांच्या अनुभवाने शहाणे झालेल्या हिंदी लोकांनी त्या कडबोळ्याची किंमत ओळखली व तें त्यांनी दूर फेकून दिलें. आता यापुढे हिंदी प्रजा पूर्वीप्रमाणे दुधखुळी राहिली नसून, तिच्या तोंडांत कांही तरी गोड साखरेचा पदार्थ घातलाच पाहिजे हें ओळखून त्यांनी सायमन प्रभृति सात तज्ञ आचारी हिंदुस्थानांत पाठवून दिले व त्यांनी वरून साखर पेरलेला, पण आंतून बिनतुपाचा व बिनसाखरेचा एक पदार्थ तयार करून तो हिंदी जनतेपुढे ठेवला. या पदार्थाचें प्रदर्शन गेल्या जून महिन्याच्या चोविसाव्या तारखेस मांडण्यांत आलें, पण सर्व हिंदी पुढाऱ्यांनी त्या पदार्थाचा एकमताने अव्हेर केला आहे. कांही एक न देतां शब्दजाल पसरून पुष्कळ दिल्याचा आव घालण्याची कला एका इंग्रज मुत्सद्द्यांनाच माहीत होय. सायमन कमिशनने मध्यवर्ती सरकारच्या अधिकाराला यत्किंचितहि काट मारलेला नाही. जें कांही देण्याचा घाट घातला आहे तो फक्त प्रांतिक सरकारच्या राजकारणांत होय. हिंदी लोकांनी एकमताने सायमन रिपोर्टाचा निषेध केल्यामुळे ब्रिटिश कॅबिनेटचे डोळे उघडले असून, ब्रिटिश मंत्र्यांनी येत्या ऑक्टोबरांत एक गोलपरिषद लंडन येथे भरविण्याचें ठरविलें आहे. या गोलपरिषदेला जावें किंवा न जावें, हाच राष्ट्रापुढे सध्या महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाला आम्हीं आपलें उत्तर यापूर्वी अनेकदा दिलें आहे व त्याचा पुनरुच्चार आम्ही पुन्हा एकवार करीत आहोंत. आमच्या मताने गोलपरिषदेला काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी अवश्य जावें.

ज्या सहा काँग्रेसच्या पुढाऱ्यांना आमंत्रणें यावयाचीं असतील व जे सहा पुढारी काँग्रेसतर्फे परिषदेला जावयास निघतील त्यांत म. गांधी हे असलेच पाहिजेत. म.

गांधींशिवाय गोलपरिषद भरविणें म्हणजे नवरामुलगा गैरहजर असतां लग्नमंडपांत गर्दी करण्यासारखें आहे. या बाबतींत महात्माजींनी आपला हट्ट सोडून इतरांचें थोडें तरी ऐकावें. मागील शंभर वर्षांच्या अनुभवावरून आम्ही परिषदेचा निकाल अगोदरच सांगूं शकूं, तरी पण भावी पिढ्यांचा दोष महात्माजींवर येऊं नये म्हणून त्यांनी दोन अटींवर गोलपरिषदेला जरूर जरूर जावें. पहिली अट त्यांनी अशी घालावी की, जे राजकीय कैदी हल्ली तुरुंगांत आहेत त्यांची सुटका अगोदर झाली पाहिजे व परिषद भरून जाईपर्यंत त्यांनी सत्याग्रहाची आत्मघातकी चळवळ तात्पुरती बंद ठेवावी. परिषदेच्या निकालावर सत्याग्रहाची चळवळ पुन्हा सुरू करणें किंवा न करणें हें अवलंबून राहील. अशा तऱ्हेने वागल्यास महात्माजींना कोणत्याहि प्रकारचा कमीपणा येणार नाही. उलट त्यांना आपल्या चळवळी पुन्हा चालविण्याचा हक्क राहून गोलपरिषदेंत एवढें मोठें महत्त्वाचें काय आहे हें तरी प्रत्यक्ष पाहवयास मिळेल. मुसलमान पुढारी गोलपरिषदेला जाण्यास हुरळलेले आहेत व त्यांची अंतःस्थ इच्छा आपल्या संस्थेच्या प्रमाणाबाहेर जास्त सभासद असेंब्लींत मिळविण्याची आहे. मवाळ सभासद तर बोलूनचालून सरकारच्या कृपेंतील माणसें होत. मवाळ पुढाऱ्यांत असा पुढारी विरळा होय की, ज्याला 'सर' ही पदवी मिळाली नाही. सायमन कमिशनवर बहिष्कार घातला तो तत्त्वनिष्ठेमुळे नसून तो रागामुळे होय. सायमन कमिशनवर एखादा सप्रू नाही तर कुंझरू असता, तर त्याच सायमन कमिशनला डोक्यावर घेऊन नाचावयास मवाळांनी सुरुवात केली असती, म्हणून मवाळ पुढाऱ्यांकडून दणदणीतपणें हिंदी लोकांची मागणी परिषदेंत मांडली जाणार नाही. या कामीं महात्माजी व त्यांतल्या त्यांत पं. मोतीलाल व बॅरिस्टर सेनगुप्त यांसारखीं नेटाचीं व धिटाईचीं माणसें हवींत. मदतीला श्री. विठ्ठलभाईंना अवश्य नेण्यांत यावें. महात्मा गांधी, पं. मोतीलाल, बॅ. सेनगुप्त, दे. विठ्ठलभाई व दे. नरीमन हे पांच पंडित जर गोलपरिषदेला गेले तर ते त्या परिषदेंत स्वराज्याचा बराचसा मोठा लचका घेऊन येतील, असें आम्ही खात्रीपूर्वक सांगतो. यंदा कदाचित् त्यांच्या प्रयत्नांना यश आलें नाही, तरी सुद्धा चालू कार्यक्रमाला बाध येत नाही. तोटा काय तो फक्त पांच-सहा महिन्यांचा काळ घालविण्याचा होय.

राष्ट्राच्या आयुष्यांत हा काळ मोठासा नाही म्हणून पूर्ण विचारांतीं आमचें असें प्रामाणिक मत आहे की, गोलपरिषदेचें निमंत्रण काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी अवश्यमेव स्वीकारून तिला कोणत्याहि कारणास्तव गैरहजर राहूं नये. आमची ही सूचना राष्ट्रीय पुढाऱ्यांना अमान्य होऊन जर ते सत्याग्रहाच्या चळवळीलाच बिलगून बसतील, तर त्यांच्यावर शेवटीं पस्तावण्याचीच पाळी आल्यावांचून राहणार नाही. रबर फार ताणण्यांत अर्थ नाही. संधि आली आहे, मग ती सोन्याची असो किंवा चांदीची असो. पूर्ण डोमिनियन स्टेटस न मिळून जरी अर्धे-अधिक मिळालें, तरी सुद्धा तो सत्याग्रहाच्या चळवळीचा विजय आहे. पहा बुवा ! आम्हांस जें प्रामाणिकपणें

वाटतें तें आम्हीं खुल्या अंतःकरणाने लिहिलें आहे. आमचा असा आग्रह नाही की, काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी आमच्या म्हणण्याप्रमाणे वागलेंच पाहिजे. पण जर कोणाची अशी समजूत असेल की, सत्याग्रहाने स्वराज्य मिळेल, तर मात्र ती समजूत साफ चुकीची आहे.

– भाला, दि. १४ जुलै १९३०

---

# ६४. हिंदु एकत्र कुटुंब व विधाधन

हिंदु समाजाचीं जीं तीन वैशिष्टचें आहेत, त्यांपैकी एकत्र कुटुंबपद्धति हें एक आहे. रशियांत अलीकडे राष्ट्रीय एकत्र कुटुंबपद्धतीचा जो प्रयोग चालू आहे, तो कितपत यशस्वी ठरतो हें जरी निश्चितपणें सांगतां येत नसलें, तरी एका विशिष्ट कुटुंबापुरता असा प्रयोग कांही पिढ्या चालू शकतो, हें हिंदु समाजाने सिद्ध करून दाखविलें आहे. म्हणून 'राष्ट्रीय बोल्शेव्हिझम'चा प्रयोग रशियांत सध्या चालू आहे, तर कौटुंबिक 'बोल्शेव्हिझम' हिंदु समाज आज कित्येक शतकें उपभोगीत आला आहे. एका विशिष्ट राष्ट्रांतील व्यक्तींनी आपल्या बौद्धिक व शारीरिक सामर्थ्याप्रमाणे कष्ट करून जी कांही प्राप्ति होईल, ती राष्ट्राकरिता मिळवावयाची व स्वपोषणार्थ व कुटुंबपोषणार्थ जें जें कांही लागेल तेवढेंच घेऊन संतुष्ट राहवयाचें याच समाजपद्धतीला 'बोल्शेव्हिझम' या नांवाने संबोधतात. सबंध जगांत ही असली समाजपद्धति तूर्त रशियांत चालू आहे व तिला कायमचें स्वरूप येईल किंवा नाही हें अजून नक्की ठरलें नाही. आमच्या मताने असली समाजरचना अस्वाभाविक असल्यामुळे ती नेहमी टिकणें शक्य नाही. वकिलाला व त्याच्या कारकुनाला, डॉक्टराला व त्याच्या काम्पाऊंडरला, अधिकाऱ्याला व त्याच्या चपराशाला, सारांश, सर्वांची एकच प्रकारची राहणी करण्याचा प्रयत्न समतेच्या दृष्टीने कितीहि स्तुत्य असला, तरी तो यशस्वी होणें शक्य नाही.

मानवी स्वभाव स्वार्थी व लोभी आहे. आपल्या कष्टाच्या पैशाची मालकी आपल्या स्वतःला मिळेल याच एका प्रेरक इच्छेच्या प्रभावाने मनुष्य कष्ट करण्यास प्रवृत्त होतो. ती इच्छा बोल्शेव्हिझममुळे एकदा नष्ट झाली म्हणजे जो तो अंगचोरपणा करूं लागेल. तशीच कांहीशी मनोवृत्ति एकत्र कुटुंबांत असलेल्या समाईक भागीदारांची होते; पण एकत्र कुटुंबांत समाविष्ट असलेल्या भागीदारांत प्रेमाचा ओलावा असल्यामुळे ही एकत्र कुटुंबपद्धति कांही पिढ्या टिकूं शकते व मग तिचीं शकलें होऊन जातात. बाप, आजा व पणजा आणि

मुलगा, नातू व पणतू याच एकत्र हिंदु कुटुंबाच्या अंतिम सीमा आहेत. हे चार पिढ्यांचें कुटुंब एकत्रित असलेलें क्वचितच पाहण्यांत येतें. आई-बापांच्या पश्चात सख्खे भाऊ एकत्र राहिलेले व एकत्रपणांत मेलेले दृष्टीस पडतात; पण चुलत भावांची समाईक कुटुंबें फारच थोडीं पाहण्यांत येतात. असें होण्याचें कारण अगदी उघड आहे. जें प्रेम बाप-लेकांत व सख्ख्या भावांत नैसर्गिकरीत्या असूं शकतें परंतु चुलत भावांत निरनिराळ्या मगदुराच्या पायऱ्या असल्याने स्वार्थबुद्धीमुळे त्यांचें पुढे जमेनासें होतें. माया पाण्याप्रमाणे नेहमी अधोमुख असते. म्हणून सख्खे भाऊहि संसारी बनून स्वतः पितृपदाला पोहोचले म्हणजे पाठचा भाऊ व पोटचा मुलगा या दोहोंत अंतर पडून, पोटच्या मुलाकडे मायेचा प्रवाह नैसर्गिकरीत्या वाहूं लागतो. हें समाईक अविभक्त हिंदु कुटुंब विभक्त होण्याचें मुख्य कारण आहे व कोणत्याहि कृत्रिम उपायाने हें नैसर्गिक कारण नाहीसें करतां येणें शक्य नाही. वैयक्तिक लोभामुळे एकत्र हिंदु कुटुंबपद्धति नामशेष होण्याच्या पंथाला केव्हाच लागली आहे व त्या उच्चाटनाला जास्त गति मिळण्यासारखे नवीन नवीन कायदेहि होऊं लागले आहेत. अशाच कायद्यांपैकी नुकताच जो एक कायदा पसार झाला आहे, त्याचें नांव 'विद्याधनाचा कायदा' होय. या कायद्याचें जनकत्व बॅ. जयकरांकडे येत आहे.

या नवीन कायद्यामुळे असें ठरविण्यांत आलें आहे की, समाईक कुटुंबांतील एखाद्या व्यक्तीने आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर जर पैसा मिळविला, तर त्या पैशावर कुटुंबातील इतर भागीदारांचा हक्क असूं नये. मग तशा विशिष्ट ज्ञानाच्या अर्जनासाठी लागणारा पैसा एकत्र कुटुंबांतील इतर व्यक्तींच्या हिश्शशांतून झालेला असला तरी चालेल. या बाबतींत विद्यमान कायदा असा होता की, जर एकत्र कुटुंबांतील एखाद्या व्यक्तीला फक्त प्राथमिक किंवा दुय्यम प्रतीचें शिक्षण समाईक मिळकतींतून मिळालेलें असेल, तर त्या व्यक्तीने तेवढ्याच शिक्षणाच्या जोरावर पुढे मिळविलेला पैसा त्याचा स्वसंपादित होऊन इतर भावांना हिस्सा मिळत नव्हता. पण जर एखादें विशिष्ट प्रकारचें शिक्षण एखाद्या भावाला समाईक मिळकतींतून देण्यांत आलें तर मात्र गोष्ट निराळी होती. उदाहरणार्थ, एखाद्या भावाला फक्त मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण एकत्र कुटुंबाच्या पैशांतून मिळालें असून पुढे त्याने नोकरी किंवा शिकवण्या धरून वकिलीचा अभ्यास केला व अलोट पैसा मिळविला, तर अशा पैशावर त्याच्या इतर भावांना हक्क प्राप्त होत नसे व तें अगदी रास्त आहे. पण एखाद्या तरतरीत भावाला इंग्लंडांत पाठवून बॅरिस्टर किंवा आय्. सी. एस्. करून आणला व त्या शिक्षणाप्रीत्यर्थ समाईक पैसा खर्च करण्यांत आला, तर अशा भावाची कमाई म्हणजे विद्याधन समाईक धरण्यांत येत असे व त्यांत कोणत्याहि प्रकारचा अन्याय नाही.

समजा, समाईक पैशांतून वीस हजार रुपये व्यापारांत घातले व त्या रक्कमेची वाढ वीस लाखांपर्यंत गेली, तर मूळ रक्कम समाईक असल्यामुळे पुढील वाढहि समाईक होते. तीच वीस हजारांची रक्कम एखाद्या भावाच्या तरतरीतपणाच्या

व्यापारांत गुंतविली व त्या कामीं यश आलें, तर तोहि एक प्रकारचा व्यापार होतो व त्यामुळे अशा भावाची पुढील कमाई समाईक ठरते. अशा यशस्वी भावाने मनांत आणल्यास त्याला इंग्लंडांतून परत आल्यावर आपल्या इतर भावांपासून विभक्त होण्याचा मार्ग खुला आहे. पण त्याला त्याच्या शिक्षणाप्रीत्यर्थ झालेल्या खर्चाचा बोजा उचलावा लागतो; तरी त्यापासून इतरांचा तोटा तरी नाही. पण या नवीन कायद्यामुळे विद्याधन हें स्वसंपादित व अविभाज्य ठरविण्यांत आलें असून, अशा भावावर एकत्र मिळकतींतून त्याच्या विशिष्ट शिक्षणाप्रीत्यर्थ केलेल्या खर्चाचा बोजा टाकण्यांत आला नाही. एवढा बोजा त्याच्यावर टाकण्यांत आला असता म्हणजे मग या बिलाविरुद्ध आमची कोणत्याहि प्रकारची तक्रार नव्हती. अशा स्थितींत आम्ही फार तर एवढेंच म्हणूं की, अशा तरतरीत बुद्धीच्या भावाच्या अंतःकरणाला स्वार्थाने पूर्णपणें ग्रासलें आहे. पण विशिष्टि शिक्षणाचें सांपत्तिक फळ खाण्याची मालकी एकटयाची, पण तें फळ ज्या झाडावर आलेलें आहे तें झाड वाढविण्याला लागणाऱ्या खर्चाचा बोजा मात्र इतर भावांवर पडावा, हा 'जयकरी' न्याय कांही और आहे.

या बिलाचा परिणाम एवढाच होईल की, अशा हुषार भावासाठी समाईक पैसा खर्चण्यास इतर भाऊ व भागीदार तयार व्हावयाचे नाहीत. यदाकदाचित् ते तयार झाल्यास ते त्याच्याजवळून खर्च होणाऱ्या रकमेची परतफेड करण्याचा कबुली करार घेतल्याशिवाय आपला पैसा खर्च करणार नाहीत. असा कबुली करार झाल्यावर मग कुटुंबाचा एकत्रपणा राहिला कोठे ! सारांश, या नवीन कायद्याने एकत्र हिंदु कुटुब-संस्था रसातळास मिळविली आहे. परदेशांतील शिक्षण राहूं द्या, पण येथल्या येथे मिळणारें शिक्षण देतांना इतर भावांच्या मनांत अनेक किंतु उद्भवणार. या बिलामुळे सख्ख्या भावांचीं वयें अठरा वर्षांच्या पुढे गेलीं की ते एकमेकांकडे संशयग्रस्त मुद्रेने पाहूं लागतील व जो तो आपला विचार करूं लागेल. सारांश, शारदा कायद्याच्या भरीला हा एक नवीन कायदा आला आहे. आता बॅरिस्टर जयकरांना आमची अशी सूचना आहे की, पुढील खेपेस ते असेंब्लींत निवडून आल्यास त्यांनी हिंदु विधवेला नवऱ्याच्या इस्टेटीवर पूर्ण मालकी हक्क देणारें एक बिल जरूर जरूर आणून त्या गरीब गायांना उपकृत करावें.

— भाला, दि. २८ जुलै १९३०

---

# ६५. सांगलीची गिरणी

सांगली येथे तीस लाख भांडवलाची एक नवीन गिरणी काढण्याची योजना तयार झाली असून, तिच्या जाहिराती वर्तमानपत्रांतून फडकूं लागल्या आहेत.

हल्लीच्या खळबळीच्या दिवसांत जितक्या पूर्ण स्वदेशी किंवा अर्धपूर्ण स्वदेशी गिरण्या निघतील तितक्या हव्याच आहेत. हिंदुस्थानांतील लोकांना जितकें कापड दरवर्षी लागतें, त्याच्या फक्त निम्में कापड येथील गिरण्यांत तयार होऊन बाकीचें निम्में कापड परदेशांतून व मुख्यत्वेंकरून इंग्लंडांतून आणावें लागतें. म्हणून मागणीच्या दृष्टीने स्वदेशी कापडाच्या खपाला मनमुराद वाव आहे. म्हणून ज्या ज्या ठिकाणीं कापसाची पेर होत आहे, त्या त्या सर्व ठिकाणीं नवीन गिरण्या काढण्यांत याव्यात. स्वदेशीच्या किंवा बहिष्काराच्या दृष्टीने नवीन स्वदेशी गिरण्यांची जरुरी निकडीची असल्यामुळे आम्ही सांगलीच्या नवीन गिरणीचें स्वागत आनंदाने करतों. हिंदी लोकांची कापडाची वाढती मागणी पुरी करण्यास चरखा समर्थ नाही, हें जेव्हा महात्माजींना कळेल तो दिवस भाग्याचा होय, पण तो सुदिन उगवेल असें आम्हांस वाटत नाही. म्हणून या बाबतींत महात्माजींच्या खादीच्या चळवळीकडे दुर्लक्ष करून इतरांनी शक्य तेथे व शक्य तितक्या नवीन गिरण्या काढण्याची खटपट करणें जरूर आहे. पण हें सर्व कबूल केल्यावरहि काढलेली गिरणी कायमपणें चालावी अशी इच्छा असल्यास, आम्ही पुढे करणार आहोंत त्या पांच सूचना पूर्णपणें लक्षांत धरल्या पाहिजेत.

लोक शंभर-शंभराचे भाग विकत घेतील, संकलिपत भांवडल जमेल, पण इतकें करूनहि नवीन काढलेली गिरणी किफायतशीरपणाने चालावी अशी इच्छा असल्यास, तिच्या व्यवस्थेंत पुढील खबरदाऱ्या अवश्य पाळल्या पाहिजेत. आमची पहिली सूचना अशी आहे की, कोणत्याहि इसमाने कितीहि भाग खरेदी केले, तरी त्या इसमाला एकच मत असावें. "जितके भाग तितकीं मतें" हें तत्त्व इतकें घातुक आहे की, सरतेशेवटीं बहुभागी इसम आपला स्वतंत्र पक्ष करतात व हळूहळू सर्व व्यवस्था आपल्या हातांत घेऊं लागतात. याचा परिणाम असा होतो की, शेवटीं ते वैयक्तिक लोभाला बळी पडून, गिरणीचें तीन-तेरा करून टाकतात. यासाठी पहिला कडक नियम असा असावा की, कोणत्याहि कारणास्तव एका भागदाराला एकापेक्षा जास्त मतें असणार नाहीत. हा एक हितकर नियम न केल्यामुळेच कांही कारखाने व गिरण्या भागदारांच्या हातांतून निसटून त्या व्यक्तींच्या होऊन बसल्या आहेत. एकापेक्षा जास्त मतें देण्याचा अधिकार एकदा देण्यांत आला की, गिरणीच्या भागांची किंमत उतरत जाते व मग असले खालावलेले भाग बहुमती भागदार आपसांत विकत घेऊन अनेक भागदारांची गिरणी अल्प काळांत थोड्या भागदारांची होऊन बसते. हा परिणाम इष्ट नसून तो राष्ट्राच्या दृष्टीने अनिष्ट आहे.

ज्या नशीबवान इसमाजवळ परमेश्वरी कृपेने अलोट संपत्ति आहे, त्याने स्वतःच्या एकट्याच्या भांडवलावर एक एक नव्हे, तर अकरा गिरण्या काढाव्यात, पण लोकांच्या भांडवलावर उभारलेली गिरणी एकट्याची करण्याचा खात्रीचा कोणता एखादा मार्ग असेल, तर तो एका व्यक्तीस किंवा व्यक्तिसमुदायास एकापेक्षा जास्त

मतें देण्याचा अधिकार देणें होय. आमची दुसरी सूचना अशी आहे की, मतें देण्यास भागदारांनी स्वतः सभेस हजर राहिलें पाहिजे. आपल्या प्रतिनिधीमार्फत मतें देण्याची सवलत असूं नये. जिला इंग्रजींत "व्होटिंग बाय् प्रॉक्सी"ची पद्धत म्हणतात ती अत्यंत वाईट आहे. प्रत्येक भागदार सभेंत हजर राहिल्यास उलट बाजूला त्यांचें मन आपल्या बाजला वळविण्यास संधि मिळते. ही संधि गुमास्त्यामार्फत मतें देण्याची पद्धति सुरू केल्यास उपलब्ध होत नाही व अशा सवलतीमुळे खटपटी इसमांचें चांगलेंच फावतें. तो खटपट करून आपल्या बगलेंत बरींच मतें मारून बसतो. कोणत्याहि प्रश्नावर मतें देण्याचा हाहि प्रकार आमच्या मतें घातुक आहे. सारांश, एकास एकापेक्षा अधिक मतें नसावींत व भागदाराने आपलें मत स्वतः हजर राहून दिलें पाहिजे. हे दोन नियम कडकपणें अमलांत आणल्यास समाईक भांडवलावर उभारलेल्या कोणत्याहि गिरणीचें समाईकत्व अबाधित राहून, तिच्या उत्कर्षापकर्षाबद्दल भागदारांच्या मनांत कळकळ वाटूं लागते. नाही तर भाग घेऊन आपण चूक केली असा पश्चात्ताप करण्याची पाळी त्यांच्यावर येते.

आमची तिसरी सूचना अशी आहे की, भागदारांना किमान फायदा सहा टक्के पडूं लागेपर्यंत मॅनेजिंग एजंटांना ठराविक पगार देण्यांत येऊं नये. खर्चवेच वजा जातां तो निवळ नफा उरेल त्याचा कोणताहि भाग त्यांना देण्यांत यावा; मात्र त्यांना मिळणाऱ्या वेतनाची कमाल मर्यादा ठरविण्यांत यावी. मॅनेजिंग एजंटांना ठराविक पगार देण्यांत आल्यास त्यांचें गिरणीच्या कामाकडे दुर्लक्ष होऊं लागतें, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. म्हणून मॅनेजिंग एजंटांचें पूर्ण व निरपेक्ष लक्ष गिरणीच्या कामांत लागावें म्हणून त्यांचें वेतन ठराविक न करतां तें निवळ नफ्यावर अवलंबून ठेवावें. पहिल्या प्रथम त्यांना शेकडा पन्नास किंवा पाऊणशे टक्के नफ्याची रक्कम देण्यांत यावी. या व्यवस्थेंत उभयतांचेंहि हित आहे. जितकी निवळ नफ्याची रक्कम वाढेल तितका मॅनेजिंग एजंट आपला पगार अगोदर काढून घेतील. भागदारांना नफा न झाल्यामुळे थापा मारीत बसण्याची पाळी येईल. ज्या कारखान्यांत किंवा गिरणींत निदानपक्षीं सहा टक्के डिव्हिडंड म्हणजे नफा पडण्याचा संभव नाही, अशा कारखान्यांत किंवा गिरणींत आपलें भांडवल घालण्यास कोणी साधारण मनुष्य तयार होणार नाही. शेकडा सहा टक्के भागदारांना मिळालेच पाहिजेत. यांत घट आली की, त्या मानाने मॅनेजिंग एजंटांच्या पगारांत व कमिशनांत म्हणजे दलालींत घट आलीच पाहिजे.

सारांश, आमच्या लिहिण्याचा हेतु एवढाच आहे की, भागदारांच्या नफ्यातोटयावर मॅनेजिंग एजंटांचें वेतन बसविण्यांत यावें. आमची चौथी सूचना अशी आहे की, जो इसम एकदा डिरेक्टर होता त्याला ठरविक मुदतीपर्यंत पुन्हा डिरेक्टर होतां येऊं नये. डिरेक्टरांची मुदत जास्तींत जास्त तीन वर्षांची असावी

व एवढ्या मुदतीपर्यंत जो इसम एकदा डिरेक्टर राहिला असेल, त्याला तितकीच मुदत गेल्याशिवाय पुन्हा डिरेक्टर होता येऊं नये. नाही तर 'डिरेक्टरी' ही एक कांही भागदारांची वतनदारी होऊन बसते. नाही म्हणावयास असा एक नियम करून ठेवण्यांत येतो की, डिरेक्टरांपैकी विवक्षित संख्येपर्यंत कांही जणांना दरवर्षी राजीनामे द्यावे लागतात; पण राजीनामे दिलेल्या डिरेक्टरांना पुन्हा निवडून येण्याचा हक्क देण्यांत येतो. आमच्या मताने ही सवलतच शेवटीं जाचक होऊन वतनदारी उत्पन्न करतें. पाटलांप्रमाणे कोणत्याहि सार्वजनिक संस्थेंत ही नवीन तऱ्हेची वतनदारी अस्तित्वांत येऊं लागली आहे. ही वतनदारीच सरतेशेवटीं मारक होते. म्हणून असा एक नियम करण्यांत यावा की, जो एकदा डिरेक्टर झाला त्याला अमुक विवक्षित मुदत गेल्याशिवाय पुन्हा डिरेक्टर कोणत्याहि कारणास्तव होतां येणार नाही. हा नियम न केल्यास कोणतीहि संस्था – मग ती कोणत्याहि स्वरूपाची असो – थोड्याच दिवसांत लयाच्या पंथाला लागते.

आमची पांचवी सूचना अशी आहे की, गिरणीला लागणारा हरएक प्रकारचा माल मॅनेजिंग एजंटांनी स्वतः विकत आणावा. त्यासाठी पोटकंत्राटें देण्यांत येऊं नये. त्यामुळे गिरणीला माल निष्कारण महाग पडतो. त्याचप्रमाणे गिरणींतून तयार झालेला माल एकाच विवक्षित माणसाला विकत देण्याचा करारहि करण्यांत येऊं नये. अशा करारामुळे असा मधला दलाल गैरवाजवी नफा घेतो व त्यामुळे मालाचा उठाव मंद पडतो. म्हणून होताहोईतों गिरणीने आपला माल गिऱ्हाइकांना स्वस्त मिळेल यासाठी मोठमोठ्या शहरीं आपलीं स्वतःचीं दुकानें उघडावींत, पण हे मधले दलाल टाळावेत. आमच्या वरील पांच सूचना कोणताहि नवीन कारखाना किंवा गिरणी काढतांना अमलांत आणल्यास, त्यापासून तसा कारखाना किंवा गिरणी डबघाईस येण्याचा संभव नाही. लोकांची स्वदेशी माल घेण्याकडे प्रवृत्ति झाली आहे व ती तिकडे जास्त वळविण्याची खटपट पुढारी व संपादक करतीलच, पण त्याच वेळीं स्वदेशी माल सुबक व स्वस्त देण्याची खटपट कारखानदारांनी व गिरणीवाल्यांनी केली पाहिजे.

– भाला, दि. १० नोव्हेंबर १९३०

# ६६. हिंदु कोण ?

आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारत भूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥ १ ॥
— देशभक्त सावरकर

धेनुर्यस्य महामाता वेदा धर्मस्य जीवनम् ।
प्रतिमापूजनं चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥ १ ॥
— भालाकार भोपटकर

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियमः एतत् धर्मस्य लक्षणम् ॥ १ ॥
— लोकमान्य टिळक

हिंदु धर्माच्या वरील तीन व्याख्या हल्ली प्रचलित आहेत. या तीन व्याख्यांपैकी कोणती व्याख्या सर्वांत जास्त ग्राह्य आहे त्या विषयाची चर्चा करण्याचें आम्हीं या अग्रलेखांत योजिलें आहे. केसरीच्या तारीख सहाच्या अंकांत दे. भ. सावरकरांनी या प्रश्नाची चर्चा करून सरतेशेवटीं त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, त्यांचीच व्याख्या निर्दोष असून तीच सध्याच्या परिस्थितींत इष्ट व हितकर आहे. "हिंदु कोण" हा प्रश्न आताच प्रामुख्याने उद्भवण्याचें कारण असें आहे की, येत्या फेब्रुवारी महिन्यांत हिंदुस्थानची खानेसुमारी होणार आहे. तीवरून हिंदूंची, मिंदूंची, ख्रिश्चनांची वगैरे नाना धर्मीयांची संख्या निश्चित होणार आहे. कदाचित् त्या आकड्यांवरून भावी राज्यघटनेंत त्या त्या धर्मीयांना सभासदाची प्राप्ति होणार आहे. ही राजकीय महत्त्वाकांक्षा डोळ्यापुढे ठेवून दे. भ. सावरकर यांनी 'हिंदु' या शब्दाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा हेतु धार्मिक बाबतींत अप्रस्तुत आहे, एवढी साधी गोष्ट त्यांनी लक्षांत ठेवली असती, तर हिंदूंचें लक्षण करतांना त्यांच्या हातून अक्षम्य चूक झाली नसती. त्यांची अशी गैरसमजूत झाली आहे की, हिंदु ही महाजात आहे. या चुकीमुळेच त्यांची व्याख्या सदोष झाली आहे. आम्ही हिंदु ही जात समजत नसून तो धर्म आहे असें मानतों. कोणाचीहि कोणती जात असो, त्याचा धर्म हिंदु असला की तो किंवा तशी व्यक्ति हिंदुधर्मीय होय.

म्हणून तोच पुरुष किंवा तीच स्त्री हिंदु होय, की जो पुरुष किंवा जी स्त्री हिंदु धर्मात जन्मलेली किंवा ओढलेली आहे.

या हिंदु धर्माची पहिली व्याख्या लोकमान्यांनी केली असून, ती सर्वथैव निर्दोष आहे. लोकमान्यांची व्याख्या तात्त्विक स्वरूपाची आहे. त्यांच्या व्याख्येप्रमाणे हिंदुत्वाचें पहिलें लक्षण म्हणजे 'वेदप्रामाण्य' होय. आमच्याहि लौकिक व्याख्येंत एवढेंच लक्षण गोवलें आहे. लोकमान्यांनी 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' असें म्हटलें आहे, तर आम्ही 'वेदा धर्मस्य जीवनं' असें म्हटलें आहे. म्हणजे ज्या धर्माचा पाया चारी वेद आहेत तो हिंदु धर्म होय. वेदांचें प्रामाण्य व जीवनत्व ज्यांना मान्य नसेल ते सर्व न-हिंदु होत. मग ते तसले न-हिंदु बाह्यतः हिंदूंसारखे दिसोत किंवा या भरतभूमींत अनादि वर्षांपासून राहत असलेले असोत. हिंदु धर्माची व्याख्या करतांना तींत राजकीय दृष्टि कोंबणें अगदी गैरशिस्त आहे. राजकीय स्थिति कालमानाप्रमाणे बदलत जाते, म्हणून तिच्यासाठी हिंदु धर्माची व्याख्या ढिली करून हिंदु धर्मांत वेदप्रामाण्य न मानणाऱ्या न-हिंदूंचा अंतर्भाव करणें इष्ट नाही. दे. भ. सावरकरांच्या व्याख्येंत वेदप्रामाण्याचा अस्पष्टहि उल्लेख नसल्यामुळे ती हिंदु धर्माची व्याख्या होऊं शकत नाही. त्यांच्या व्याख्येचा अर्थ आम्ही त्यांच्याच शब्दांत देतो. तो असा की, "ज्यांचे पितर म्हणजे वाडवडील या सिंधु नदीपासून त्या भारत-सिंधूपर्यंत पसरलेल्या भरतखंडांत म्हणजे हिंदुस्थानांत वसत आले आणि म्हणूनच ती ज्यांची पितृभू आहे व ज्यांचे धर्मसंस्थापक ह्याच भूमींत व त्याच पितरांच्या उदरीं उत्पन्न होऊन, आपआपले धर्म स्थापिते झाले म्हणूनच ती ज्यांची पुण्यभू आहे, तो हिंदु होय."

दे. भ. सावरकरांच्या लक्षणांनी युक्त अशी व्यक्ति हिंदु होणार नसून ती व्यक्ति 'हिंदी' किंवा भारतीय होय. या भारतभूमींत आजपर्यंत कित्येक धर्म स्थापन झाले आहेत व पुढेहि होतील. उदाहरणार्थ, बौद्ध धर्मच घ्या. या धर्मीयांची संख्या हल्ली हिंदुस्थानांत फारच थोडी आहे. पण जी थोडीबहुत आहे ती अगदी बौद्ध कालापासून आहे. दे.भ. सावरकरांच्या व्याख्येप्रमाणे हिंदुस्थानांतील विद्यमान बौद्धांचे पितर येथेच राहून मेले व त्यांचा धर्मसंस्थापक गौतमबुद्ध याच भूमींत जन्मास येऊन निर्वाणपदाला जाऊन पोहोचला. म्हणून त्या बौद्धांना हिंदुधर्मीय असें कधीहि म्हणतां यावयाचें नाही. कारण त्यांना वेदप्रामाण्य मान्य नाही. खुद्द श्रीगौतमबुद्धहि आपल्या योगबलाने या मितीपर्यंत जिवंत असते तर त्यांनाहि हिंदुधर्मीय म्हणतां आलें नसतें. तीच स्थिति जैनांची, शीखांची व वेदप्रामाण्य मान्य न करणाऱ्या इतर समाजांची आहे. मग ते तसले समाज फारा दिवसांपासून येथे राहणारे असोत किंवा अन्य कारणांमुळे नुकतेच येथे आलेले असोत. जो कोणता समाज वेदांना अपौरुषेय व ईश्वरप्रणीत मानतो व त्या वेदांपासून हिंदु धर्माची उत्पत्ति झाली आहे असें समजतो

तो, तो प्रत्येक समाज हिंदुधर्मीय होय. तर मग दे. भ. सावरकरांना आमचा असा प्रश्न आहे की, ज्या समाजांना हिंदु धर्मांत ओढून घेण्याची त्यांची एवढी खटपट व खटाटोप चालू आहे, ते समाज वेदप्रामाण्य मानण्यास कबूल आहेत काय ? ते समाज तसें मानण्यास तयार झाल्यास त्यांना हिंदुधर्मीय म्हणण्यास आमची मुळीच हरकत नाही. पण जोंपर्यंत ते समाज वेदप्रामाण्याला संमति देणार नाहीत तोंपर्यंत त्यांना हिंदु धर्माच्या बाहेरच उभे राहवें लागेल. सारांश, हिंदु हा धर्म असून ती एक महाजात नाही. हिंदु धर्मांत चार महाजाति आहेत व त्या चार महाजातींत अनेक पोटजाति आहेत. जी सोपी गोष्ट आमच्या 'बैली' बुद्धीला सहज कळली ती त्यांच्या 'टोणगी' बुद्धीला आकलन करतां येऊं नये हे अगदी साहजिक आहे. कारण टोणग्यापेक्षा बैल जास्त चपळ व हुषार असतो. आम्ही वरती लिहिल्याप्रमाणे लोकमान्यांची व्याख्या तात्त्विक आहे, तर भालाकारांची व्याख्या लौकिक आहे.

लोकमान्य आपल्या व्याख्येंत पुढे असें म्हणतात की, हिंदु धर्मांत मोक्षाची साधनें अनेक असून, उपास्यदेवतांची विपुलता आहे. लोकमान्यांचें हें मत अगदी बिनचूक आहे. आम्ही आपल्या व्याख्येंत त्या अनेक साधनांपैकी एक प्रधान व सर्वसुलभ साधन जें प्रतिमापूजन, तें अंतर्भुत केलें आहे. कोणताहि महाज्ञानयोगी सिद्ध पुरुष घेतला, तरी त्याला प्रतिमापूजनाच्या साधनाचा उपयोग केल्याशिवाय ज्ञानाची प्राप्ति होत नाही. म्हणून प्रतिमापूजन हे हिंदु धर्माचें वैशिष्टच असल्यामुळे तेंहि त्यांचें लक्षण होऊं शकतें. प्रतिमापूजनाशिवाय कोणताहि हिंदु सापडावयाचा नाही. साकार परमेश्वराचें पूजन-अर्चन करणें हेंच तर हिंदु धर्माचें बाह्य स्वरूप आहे. म्हणून वेदप्रामाण्य मानणारा, पण प्रतिमापूजनाची निंदा न करणारा तोच हिंदु होय. त्याचप्रमाणे गोमातेच्या ठिकाणीं पूज्य भाव धारण करणें हेंहि हिंदु धर्माचें तिसरें लक्षण आहे. हें लक्षण कांहींकांना अगदी हलक्या प्रतीचें वाटत असेल, पण या बाबतींत इतरांप्रमाणे आमचें मत नाही. गाईच्या ठिकाणीं आमची पूज्य बुद्धि आहे. आम्ही गाईला जनावर समजत नाही, तर हिंदु धर्माचा तो चालता-बोलता अवतार मानतों. गाईच्या हंबरण्यावाटे प्रत्येक क्षणीं वेदवाणी बाहेर पडत असते. पंचगव्य ही हिंदु धर्माची संजीवनी आहे. तें पंचगव्य हिंदूंना हिंदु ठेवते व न-हिंदूंना शुद्ध करून परत हिंदु धर्मांत ओढून घेतें. असें हें पंचगव्य ज्या धेनुरूपी महामातेपासून उत्पन्न होतें, त्या गोमातेला जो पूज्य मानतो तोच हिंदु होय. वेद-प्रामाण्य मान्य करणारा व प्रतिमापूजनेला संमति देणारा इसम जर तो गोमांस-भक्षक असेल, तर त्याला हिंदु म्हणण्यांत चूक आहे. म्हणून जरी येत्या शिरगणतींत हिंदूंची संख्या कोटि दोन कोटींनी कमी दिसली, तरी त्या अल्प राजकीय लाभासाठी हिंदुत्वाच्या व्याख्येंत कोणताहि बदल करण्यास आम्ही तयार नाही. सारांश, थोड-क्यांत लिहावयाचें म्हणजे तोच हिंदु होय की, जो " गाय, गायत्री व गजानन "

ही त्रयी मान्य करतो. ही त्रयी अमान्य करणारे ते सर्व न-हिंदु होत. त्यांचा समावेश हिंदु लोकांत केव्हाहि होणें शक्य नाही.

– भाला, दि. १९ जानेवारी १९३१

---

## ६७. संत व महंत

संत व महंत हे दोन शब्द समानार्थी नाहीत. जे सत्पुरुष नुसत्या धार्मिक मोक्षासाठीच रात्रंदिवस झटतात ते संत होत व जे सत्पुरुष धार्मिक व राजकीय मोक्षासाठी अहर्निश प्रयत्न करतात ते महंत होत. संतांचा जो धर्म तो भागवत धर्म होय, तर महंतांचा जो धर्म तो महाराष्ट्रधर्म होय. हे दोन्ही धर्म महाराष्ट्रांत अस्तित्वांत येऊन त्यांनी आपआपलें कार्य करून त्या त्या वेळीं महाराष्ट्राची संकट-काळीं मोठी कामगिरी बजावली. तेराव्या शतकापर्यंत महाराष्ट्रांत मराठ्यांची सत्ता चालत होती, पण देवगिरीच्या शेवटच्या राजाचा पराभव झाल्यावर, महाराष्ट्रांत मुसलमानांची सत्ता स्थापन होऊन, त्या सत्तने आपला करडा अंमल त्यानंतर तीन शतकें अखंड रीतीने चालविला. तेराव्या शतकांत मुसलमानांची सत्ता महाराष्ट्रांत स्थापन झाल्यापासून त्यांनी महाराष्ट्रांतील त्या वेळच्या लोकांचे जे अनन्वित हाल केले त्या सर्वांत मोठा जुलूम म्हणजे मुसलमानांनी सुरू केलेला मूर्तिभंग होय. हिंदु मूर्तिपूजक तर मिंदु मूर्तिभंजक आहेत. या भिन्नधर्मीय लोकांच्या समजुतींत हा भयंकर फरक असल्यामुळे मुसलमानांचा डोळा हिंदूंच्या मूर्तीवर असावा हें अगदी साहजिक आहे. चौदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांत महाराष्ट्रांत शेकडो मूर्ति फोडल्या गेल्या व उघडपणें मूर्तिपूजेचा पुरस्कर्ता कोणी राहिला नाही. अशा संकटसमयीं महाराष्ट्रांत भागवत धर्माची संस्थापना साधु-संतांनी करून पंढरपूरला काशीचें पावित्र्य आणून, काशीची गंगा व पंढरीची चंद्रभागा या दोन्ही नद्या एक-सारख्याच पवित्र व पावन आहेत, अशी धार्मिक भावना महाराष्ट्रांत उत्पन्न केली. त्या पंढरपूर क्षेत्रांत दरवर्षी आषाढीला व कार्तिकीला साधु-संतांनी जमून चंद्र-भागेच्या वाळवंटावर विठ्ठलनामाचा अहोरात्र गजर उडवून दिला व त्याच्या द्वारें त्यांनी मूर्तिपूजेची परंपरा कायम ठेवली. महाराष्ट्रांत इतके कडवे इस्लामी बादशहा होऊन गेले, तरी पण कोणत्याहि बादशहाची पंढरीनाथाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची छाती झाली नाही.

यवनांकडून साधु-संतांचा व वारकऱ्यांचा दुसऱ्या अनेक प्रकारांनी छळ झाला व दुसऱ्या अनेक मूर्ति भंगल्या गेल्या, तरी पण पंढरीच्या राण्याची मूर्ति वरील

तिन्ही शतकांत अभंग राहिली. सदर मूर्तीवर हात टाकण्याचा पहिला व शेवटला प्रयत्न अफजुलखानाने केला; पण तो पुजाऱ्यांच्या सावधगिरीमुळे सपशेल फसला. असो; थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे मुसलमानांच्या अमदानींत भागवत-धर्मीय साधु-संतांनी हिंदु धर्माची अमोल सेवा करून निराकार परमेश्वराच्या साकार मूर्तीचें पूजन करण्याचा पूर्वापार प्रघात कायम ठेवला. साधु-संतांचा हा एकच प्रयत्न विचारांत घेतला तरी आम्हांस असें लिहावें लागतें की, ते आपल्या आदरास व कृतज्ञतेस पात्र आहेत. साधु-संतांनी हिंदु धर्माच्या बचावाचें काम तीन शतकें उत्कृष्टपणें केलें याबद्दल वाद नाही, पण तेवढें बचावाचेंच काम करून सतराव्या शतकांत भागण्यासारखें नव्हतें. महाराष्ट्रांत ज्या पांच पातशाह्या नांदत होत्या त्यांतील बहुतेक बादशहा 'हिंदवलेले' असल्यामुळे पुढे पुढे त्यांच्याकडून हिंदु धर्माला त्रास पोहोचत नसे. त्यांतल्या त्यांत ज्या वेळीं उत्तरेकडील मोंगली सत्ता बळावून तिचा उपसर्ग महाराष्ट्राला पोहोचूं लागला, त्या वेळेपासून तर दक्षिणे-कडील मुसलमानी राजांना हिंदु लोकांच्या मदतीची गरज जास्त प्रमाणांत भासूं लागली व पुढे पुढे तर निजामशाहीसारख्या मोडकळीस आलेल्या बादशाह्या मराठी सरदारांच्या बहुतेक हातांत गेल्या. पण ते सुखाचे दिवस महाराष्ट्राला फार दिवस लाभले नाहीत.

शहाजहान बादशहा कैदेंत पडून अवरंगजेबाच्या कारकीर्दीस सुरुवात झाली व हिंदु लोकांच्या धार्मिक छळाला पुन्हा उकळी फुटली. दक्षिणेंत औरंगाबादेंत मोंगली सुभेदाराची गादी स्थापन होऊन तिच्यावर बादशाही घराण्यांतील शहाजादे बसूं लागले. अवरंगजेब आपल्या तारुण्यांत औरंगाबादेच्या सुभेदारीवर होता. त्या वेळीं त्या पठ्ठयाला विशेषसें करतां आलें नाही. तरी त्याचा स्वभाव तत्कालीन महाराष्ट्रियांनी पूर्णपणें ओळखला व त्याबद्दल महाराष्ट्रांत जागजागीं चर्चा होऊं लागली. कमनशिबाने चारी भावांतून हाच कट्टा हिंदुधर्मद्वेष्टा दिल्लीच्या तख्तावर आरूढ झाला व त्या दुष्ट बादशहाने आपल्या अंतःकरणांत दडवून ठेवलेली इच्छा परिपूर्ण करण्यास तयारी चालविली. पण महाराष्ट्रियांच्या पूर्वपुण्याईने सतराव्या शतकांत दोन विभूति जन्मास आल्या व त्यांनी महाराष्ट्राचें 'आनंदवनभुवन' करून सोडलें. त्या दोन विभूति म्हणजे श्रीरामदासस्वामी व श्रीशिवाजीमहाराज होत. सन १६०८ सालीं श्रीसमर्थांचा जन्म झाला, तर सन १६२७ सालीं शिवाजीमहाराज मातोश्री जिजाबाईच्या पोटीं शिवनेरीस जन्मास आले. दोन्ही विभूति स्वयंप्रकाशित होत्या. दोघांच्याहि मनांत स्वराज्यस्थापनेची कल्पना स्वतंत्रपणें आली. इतर बाबतींत कोणताहि मतभेद असला, तरी ही गोष्ट निर्विवाद आहे की, महाराजांनी एकोणिसाव्या वर्षीं तोरणा किल्ला घेतला, तोंपर्यंत त्यांची व श्रीसमर्थांची गाठ एकदा सुद्धा पडली नव्हती. पुढे महाराजांनी श्रीसमर्थांना आपले गुरु केले ही गोष्ट वेगळी होय; पण महाराज स्वराज्यस्थापनेची कल्पना श्रीसमर्थां-

पासून शिकले हे मात्र संभवत नाही. या कामीं त्यांना मुख्य शिकवण दादोजी कोंडदेव यांची असावी किंवा ती कल्पना महाराजांची स्वयंभू असावी. तो वाद भांडत न बसतां, आम्ही एवढेंच लिहितों की, सतराव्या शतकांत हिंदु धर्माचें संरक्षण बचावाच्या धोरणाने होण्यासारखें नव्हतें. ही गोष्ट श्रीसमर्थांनी ओळखून त्यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून चालत आलेल्या भागवत धर्माला एका अत्यंत आवश्यक गोष्टीची पुस्ती दिली व त्यामुळे महाराष्ट्रियांचा तीन शतकें चालत आलेला पडका नूर एकदम व एकाएकी पालटला व ते मर्दानीच्या व शौर्याच्या गोष्टी बोलूं लागले.

थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे भागवत धर्माच्या सहिष्णुतेला चाट बसून तिच्याऐवजीं महाराष्ट्र धर्माच्या जयिष्णुतेचा थाट चमकूं लागला. हातांतले टाळ फेकून देऊन महाराष्ट्रियांनी आपल्या हातांत भाले घेतले व ते घोड्यावर स्वार झाले. चंद्रभागेच्या वाळवंटावर विठ्ठलनामाचा गजर थांबून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून "हर हर महादेव"च्या वीर गर्जना बाहेर पडूं लागल्या. स्वराज्याशिवाय नुसत्या नामसंकीर्तनाने हिंदु धर्माचें कायमचें संरक्षण होणें शक्य नाही अशी विचारसरणी जन्मास आली व ती विचारसरणी महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत नेऊन भिडविण्याचें काम सतराव्या शतकांत जर कोणीं केलें असेल तर तें श्रीसमर्थांनी व त्यांच्या अनेक शिष्यांनी होय. या विचारसरणीलाच महाराष्ट्रधर्म म्हणतात. त्या धर्माच्या उपदेशकांना महंत अशी समर्पक संज्ञा प्राप्त झाली आहे. या महाराष्ट्रधर्माच्या शिकवणीचें गोड फळ त्याच सतराव्या शतकांत महाराष्ट्रियांना मिळालें. सन १६७४ सालीं रायगडावर हिंदुपदपातशाहीची स्थापना श्रीसमर्थांच्या डोळ्यासमक्ष होऊन तीन शतकें गांजलेल्या महाराष्ट्राचें 'आनंदवनभुवन' झालें.

भागवत धर्माची व महाराष्ट्रधर्माची रूपरेषा आम्ही याप्रमाणे देत आहोंत. दोन्ही पंथ परस्परविरुद्ध नसून, उलट ते परस्परपूरक आहेत. भागवत धर्मांत नुसतें धर्मकारण आहे, तर महाराष्ट्रधर्मांत धर्मकारण व राजकारणहि आहे. ज्या माहात्म्याने किंवा महंताने महाराष्ट्रधर्माची स्थापना करून त्याच्या द्वारें महाराष्ट्रियांना राजकीय मोक्षाची जोड करून दिली, त्या समर्थ रामदासांची पुण्यतिथि माघ वद्य नवमीला दरवर्षी सज्जनगडावर साजरी केली जाते. तरी ज्या महाराष्ट्रियांना शक्य असेल त्यांनी दासनवमीला गडावर जाऊन व श्रीसमर्थांचें दर्शन घेऊन त्यांच्या उपकारांची फेड अल्पांशाने तरी करावी.

– भाला, दि. २ फेब्रुवारी १९३१

## ६८. खेड्यांची संघटना

कोणत्याहि राष्ट्रांतील, मग तें राष्ट्र पौर्वात्य असो किंवा पाश्चिमात्य असो, शेकडा शंभर लोक राजकारणांत भाग घेतात असें कधीहि मागे घडून आलें नाही व पुढेहि घडून येणार नाही. राजकारण हें साधे चणे नसून तें लोखंडाचे चणे आहेत. म्हणून ज्या कोणाचे दात भरभक्कम असतील तेवढेच राजकारणांत भाग घेतात व बाकीचे एक सहानुभूतिक बनतात, नाही तर बोलूकाका होतात. "शतेषु जायते शूरः" या नियमाप्रमाणे शंभरांत जसा एक वीर निपजतो त्याचप्रमाणे शंभरांत एक खरा जातिवंत देशभक्त निपजतो. जे आपल्या मायभूमीसाठी पडेल तो आंगिक व आर्थिक स्वार्थत्याग करण्यास तयार होतात तेच खरे देशभक्त ऊर्फ 'देशाळ' होत, बाकी राहिलेले सर्व पोटाळ होत. मनुष्यमात्राची स्वाभाविक प्रवृत्ति पोटाळ आहे. खावें, प्यावें, विवाह करून संसार करावा व आयुष्याची मर्यादा संपली की, हा लोक सोडून परलोकीं गमन करावें. ही मनोवृत्ति ज्या इसमांची असते ते सर्व पोटाळ होत. अशा लोकांना नांवें ठेवण्यांत अर्थ नाही व त्यांच्या कानींकपाळीं देशभक्तीचीं गाणीं गाण्यांत हित नाही. देशभक्त जन्मावा लागतो व जर एखाद्याच्या अंतःकरणांत देशभक्तीचें बीज उपजत असेल तर त्या बीजाला उपदेशामृताच्या सिंचनाने अंकुर फुटेल. पण ज्या हतभाग्याच्या अंतःकरणांत तसें बीज नसेल, तो देशभक्तीचा टाहो घसा फुटेपर्यंत करील, पण खरी कसोटीची वेळ आल्याबरोबर पळता पाय काढील. अशा लोकांना आम्ही बोलूकाका म्हणतों. एक वेळ पोटाळ पत्करतील, कारण ते राजकारणांत पडण्याची आपली अनिच्छा उघडपणें व्यक्त करतात; पण बोलूकाकांचें तसें नाही. रिकाम्या डब्याप्रमाणे ते फक्त आवाज करतात, पण त्यांच्या अंतःकरणांचें झाकण उघडून आंत डोकावून पाहिलें असतां, त्यांत देशभक्तीचा एकहि कण सापडावयाचा नाही. म्हणून कोणत्याहि देशभक्ताने अशी हाव केव्हाहि धरूं नये की, मी आपल्या वाणीने किंवा लेखणीने सर्वांनाच सरसकट देशभक्त बनवीन व त्यांना देशकार्य करण्यास लावीन. शंभरांत एक हें प्रमाण जरी पडलें तरी ती गोष्ट आनंद मानण्यासारखी आहे.

राजकारण म्हणजे धक्काबुक्कीचें राजकारण होय. सुरक्षित राजकारणांत भाग घेण्यास पुष्कळ लोक तयार होतील, पण त्यांच्या संख्येलाहि मर्यादा आहेच. अशा लोकांना मवाळ म्हणतात, पण त्यांचीहि संख्या बेतावाताचीच आहे.

पोटाळांच्या अगडबंब संख्येंत कोणता देशाळ बुडून गेला आहे हें पारखण्यासाठी व त्याला हात देऊन त्या गर्दीतून बाहेर ओढण्यासाठी लेखांची व व्याख्यानांची आवश्यकता आहे. पण त्यामुळे असें कोणींहि समजूं नये की, लेखांनी किंवा भाषणांनी जन्मतः उपजलेला पोटाळ देशाळ होऊं शकेल. देशाळी मनोवृत्ति ही उपजत असते, मात्र तिचा परिपोष उपदेशाने होतो. देशाळ किंवा पोटाळ निपजणें पूर्वपुण्याईचें फळ आहे. म्हणून देशाळांनी पोटाळांना झिडकारूं नये किंवा त्यांच्यावर रागावूं नये. कुटुंबांत जसे पंगु बंधु असतात, त्याचप्रमाणे राष्ट्राच्या कुटुंबांत हे आंधळे-पांगळे होत. आंधळ्या-पांगळ्यांना खावयास लागतें, त्याप्रमाणे पोटाळांनाहि खाण्यापिण्यास लागतें, म्हणून त्यांना आपलीं पोटें खुशाल भरूं द्यावींत. अशा पोटाळांजवळून आंगिक मदतीची अपेक्षा केव्हाहि करूं नये. पोटाळांच्या अंतः-करणांत सहानुभूति उत्पन्न होऊन त्यांनी सहानुभूतिपूर्वक आर्थिक मदत केली, तर ती घ्यावी. कोणत्याहि समाजांत वरीलप्रमाणे पोटाळ व राष्ट्राळ असे दोन वर्ग उपजत असल्यामुळे पोटाळांना वगळून राष्ट्राळांनी आपला वर्ग एकत्रित व संघटित करण्यासाठी प्रयत्न करावेत.

हिंदुस्थानची रचना लक्षांत घेतां, येथे नागरिकांपेक्षा ग्रामिकांची म्हणजे खेड्यांतून राहणाऱ्यांची संख्या चौपट आहे. शेकडा ऐंशी वस्ती खेड्यापाड्यांतून आहे व आजपर्यंत राष्ट्रभक्तीचें लोण खेड्यांपर्यंत गेलेले नाही. गेल्या वर्षी ग्रामिकांनी कांही कांही ठिकाणीं कायदेभंग केला, पण तो देशभक्तीने प्रेरित होऊन त्यांनी केला नसून, तो स्वार्थबुद्धीने करण्यांत आला आहे. जंगलचा कायदा रद्द होऊन आपलीं गुरें जंगलांत मोफत चारण्यास मोकळीक झाली आहे या चुकीच्या समजुतीमुळे महाराष्ट्रांत जागजागीं जंगलसत्याग्रह झाले, पण त्यांची खरी उपपत्ति वरच्याप्रमाणे आहे. आता यापुढे खेड्यापाड्यांतून खरी जागृति करून निदान प्रत्येक खेडेगावीं देशभक्तांचे पांच पांडव पुढे येतील अशी योजना करणें आवश्यक आहे. सारांश, थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे यापुढे शहरांतील व्याख्यानें कमी करून ती चळवळ खेड्यांत नेली पाहिजे. अशी चळवळ करण्यास आमरण वाहिलेली मंडळी नकोत, तर शहरी पुढाऱ्यांनी भाग घेतल्यास हें काम बिनखर्चाने आपोआप घडून येईल. पोटाळांना या कामीं कोणत्याहि प्रकारची भीड घालूं नये. तसें करण्यांत काळाचा अपव्यय निष्कारण होणार आहे. हें घडून येण्यास पगारी पण बोलके ग्रामप्रचारक नेमण्यांत येऊन, त्यांना उत्तेजनार्थ व मदतीदाखल म्हणून पुढाऱ्यांनी मधून मधून त्यांच्याबरोबर व्याख्यानें द्यावींत. अशा पगारी प्रचारकांचा पगार वेळेवर दिला जावा यासाठी, प्रत्येक जिल्ह्यांत एक स्वतंत्र सार्वजनिक सभा स्थापन करण्यांत येऊन, तिचा कायम निधि जमविण्यांत यावा. कोणत्याहि सबबीवर मुद्दलाचा चट्टामट्टा करण्यांत येऊं नये. याप्रमाणे ग्रामसंचार करून खेड्यापाड्यांतून काँग्रेसची चळवळ नेऊन भिडविल्याशिवाय स्वराज्याची आशा धरणें व्यर्थ होय.

हिंदुस्थानची संख्या पस्तीस कोटि झाली आहे. शंभरांत एक या प्रमाणांत पस्तीस लाख देशभक्त बनविल्याशिवाय राष्ट्रीय सभेच्या शब्दाला जोर येणार नाही. हिंदुस्थानांत एकंदर सात लक्ष खेडीं आहेत. त्या प्रत्येक खेड्यांत किमान पांच देशभक्त तयार झाल्याशिवाय राजकारणी चळवळ यशस्वी होण्यास फारशी आशा नाही. या खऱ्या व हितकर मार्गाने न जातां, सध्या सर्व राजकीय चळवळ शहरांपुरतीच चालू आहे. हिंदी लोकांच्या चळवळीला यश न येण्याचें खरें कारण हें आहे की, कांही ठळक शहरें सोडल्यास बाकी सर्व सामसूम आहे. राजकारणाला दिवसेंदिवस रंग चढण्यास चळवळ अखंड चालू ठेवावी लागते. दोन दिवस गडबड व मग सर्व सामसूम, असा हल्लीचा प्रकार आहे. अशा प्रकाराला आम्ही चळवळ म्हणत नाही, तर ती तात्पुरती खळबळ होय. वळवी पावसाने जसा एखादा ओढा कांही काळ गरजतो व वहातो, पण थोड्याच वेळांत खडखडतो, त्याचप्रमाणे आपली राजकीय चळवळ कांही काळ गरजते, पण थोड्याच वेळांत ती गार पडते. हा चढउतार राजकारणांत निरुत्साहजनक आहे. नदीच्या पात्राप्रमाणे राजकीय चळवळीचा प्रवाह अखंडपणें बारा मास वहात राहिला पाहिजे. सारांश, राजकीय चळवळ अखंड चालू ठेवून ती खेड्यापाड्यांत नेली पाहिजे. तरच राजकीय प्रगतीची कांही आशा आहे.

– भाला, दि. १३ जुलै १९३१

---

## ६९. कायद्भंग का फायदेभंग

गोलपरिषदेचा भ्रमाचा भोपळा एकदा फुटला. फार झालें तर प्रांतिक स्वायत्तता मिळेल, पण मध्यवर्ती सत्तेचा कोणताहि अंश मिळण्याची आशा उरली नाही. सारांश, गोलपरिषद हा एक नुसता फार्स उडाला. या सर्व प्रकारावरून आम्हांस एका गोष्टीची आठवण होत आहे. ती गोष्ट अशी की, एक होता शेतकरी. दुर्दैवाने त्याच्यावर एक फौजदारी खटला झाला. पदरची फी तर जाऊं नये व दोषमुक्त तर व्हावें म्हणून त्याने बक्षिसाची नवी युक्ति आपल्या सुपीक मेंदूतून काढली. तो एका नामांकित वकिलाकडे गेला व त्याने खटल्याची सर्व हकीगत त्या वकिलाला सांगितली. फीचें बोलणें निघाल्यावर त्याने मोठ्या हसऱ्या चेहऱ्याने वकिलाला सांगितले की, "वकीलसाहेब या खटल्यांत तुम्ही पाच-पन्नास रुपयांच्या फीवर नजर देऊन समाधान मानूं नका. तूर्त तुम्ही एक रुपया बयाण्यावर काम करा व मला दोषमुक्त करून घेतल्यावर माझ्याजवळून दणदणीत बक्षीस घ्या. वकीलसाहेबांच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यांनी फीची रक्कम न ठरवितां बक्षिसाची रक्कम ठरविली.

"काय बक्षीस देशील बुवा" असा वकीलसाहेबांनी त्या शेतकऱ्याला प्रश्न केला तेव्हा हसतमुखाने त्या शेतकऱ्याने असें उत्तर दिलें की; मी आईसाहेबांच्या गळ्यांत शेरभर वजनाची सोन्याची सरी घालीन. शेरभर सोनें म्हणजे चोवीस तोळे सोनें फीबद्दल मिळणार, हें ऐकून वकीलसाहेबांचा चेहरा आनंदाने प्रफुल्लित झाला व ते ताबडतोब स्वयंपाकघरांत गेले व त्यांनी ही गोष्ट आपल्या कुटुंबाला सांगितली. त्या दिवशीं वकीलसाहेबांच्या घरांत जिकडे-तिकडे आनंदीआनंद झाला. रीतीप्रमाणे खटला संपला व कोर्टाने त्या शेतकऱ्याला दोषमुक्त ठरवून सोडून दिलें. नंतर तो शेतकरी कोर्टाबाहेर आला. त्याने वकीलसाहेबांच्या पायावर डोकें ठेवून त्यांचे सद्गदित अंतःकरणाने आभार मानून तो जाऊं लागला. त्याने पाठ वळविल्यावर वकीलसाहेबांनी हाक मारून त्याला परत बोलावलें. "अरे, आमच्या बक्षिसाच्या सरीची वाट काय" असा प्रश्न त्यांनी त्याला केला. साहेब, आठ दिवसांत आपल्या पायाजवळ सरीसकट हजर होतो. असें उत्तर देऊन त्याने आपल्या गावची वाट धरली.

हा निकाल वैशाख महिन्यांत झाला. पुढे तो शेतकरी आला नाही व गेला नाही. इकडे वकिलीणबाई सरीची चातकासारखी वाट पाहत होत्या व त्यांचें टुमणें वकीलसाहेबांच्या पाठीमागे एकसारखें चाललें होतें. कर्मधर्मसंयोगाने पुढे पौष महिन्यांत त्या शेतकऱ्याची व वकिलाची अचानक गाठ पडली. त्यांनी त्याला हटकला व आपल्या बक्षिसाच्या सरीची आठवण दिली. त्यावर त्या शेतकऱ्याने काकुळतीला येऊन सरी देण्याची आपली सांपत्तिक ऐपत नाही, पण वकीलसाहेबांना कांही तरी भरीव देण्याची आपली इच्छा पुन्हा प्रदर्शित केली. सरी हातची गेली तरी पोक्त विचार करून पुन्हा त्या पक्षकाराला वकीलसाहेबांनी विचारलें की, "अरे, सरी नाही, तर मग तिच्या ऐवजीं दुसरें काय देशील ?" हा प्रश्न ऐकून त्याने ताडदिशीं उत्तर दिलें की, "येत्या शिमग्याच्या महिन्यांत तुम्हास मणभर तुरी देईन." सरीच्या मणभर तुरी झाल्या हें पाहून वकीलसाहेब आश्चर्याने थक्क झाले, पण कांही नाहीपेक्षा 'कांही तरी बरें' या न्यायाने त्यांनी तुरी आणण्यास त्या शेतकऱ्यास सांगितल्या.

पुढे शिमग्याचा महिना गेला व सबंध उन्हाळा संपला, पण मणभर तुरी आल्या नाहीत. एके दिवशीं वकीलसाहेबांची व त्या पक्षकाराची पुन्हा गाठ पडली. त्यावर त्यांनी त्याच्याजवळ तुरी मागितल्या. "दादा, यंदा तूर पार बुडाली," ही रडकथा त्याने वकीलसाहेबांजवळ गायली. पण त्याने त्यांना काही तरी देण्याची इच्छा प्रदर्शित केली. मग तूं देणार तरी काय, असा प्रश्न वकीलसाहेबांनी त्रासून त्याला विचारला. त्यावर गंभीरपणाने विचार करून तो म्हणाला, "वकीलसाहेब, तुमची आम्हांला गरज आहे, तेव्हा तुम्हांला फसवून आमचें चालणार नाही. म्हणून तुरी नसल्या तरी मी तुम्हास धोतरें वाळत घालण्यास एक दहा हात लांबीची दोरी आणून देईन." वकीलसाहेब त्याहि बक्षिसाला कबूल झाले. पण दोन-तीन महिने झाले तरी दोरीलाहि पत्ता नाही. शेवटीं एका जत्रेंत त्यांची व त्या पक्षकाराची

अचानकपणें गाठ पडली व त्याबरोबर त्यांनी त्याच्या धोतराचा पदर धरून त्याला निक्षूनपणें विचारलें की, दहा हात दोरी कोठे आहे? आत्ताच्या आत्ता ती मला दे. यावर त्या शेतकऱ्याने अत्यंत शांतपणें वकीलसाहेबांना असें उत्तर दिलें की, "साहेब, सरी कसची व दोरी कसची, माझें बोलणें उगीच थेरी." या उत्तराने वकीलसाहेबांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन पडून त्यांनी पुढे बक्षीस मागण्याचा नाद सोडून दिला. असलाच तंतोतंत प्रकार गोलपरिषदेचा झाला आहे. पूर्ण स्वराज्य गेलें व त्याच्या जागीं अर्धवट स्वराज्य आलें. तेंहि पुढे गेलें. मग प्रांतिक स्वायत्तता आली, पण ती हातांत येण्यापूर्वीच इकडे हिंदुस्थानांत दडपशाहीला सुरुवात झाली आहे. अशा स्थितींत पुढील कोणता मार्ग अवलंबावा याबद्दल प्रामाणिक मतभेद आहे. "जर पूर्ण स्वराज्य मिळालें नाही, तर मी हिंदुस्थानांत गेल्यावर सत्याग्रह पुकारून कमींत कमी दहा लाख लोकांस तुरुंगांत घालीन" असें निर्वाणीचे उत्तर महात्माजींनी ब्रिटिश जनतेला दिलें आहे.

महात्माजींच्या शब्दाला इतका मान आहे की, दहा लाखच काय, पण पन्नास लाख लोक सत्याग्रह करण्यास तयार होतील. प्रश्न किती लाख लोक सत्याग्रह करण्यास तयार होतील हा नसून, कायदेभंगापासून किती नफा व किती तोटा होईल हा आहे. पूर्ण विचारांतीं आमचें असें ठाम मत झालें आहे की, कायदेभंग व करबंदी या दोन चळवळी नफेशीर नसून त्या तोटेशीर आहेत. त्या प्रतिपक्षाला जाचक न होतां त्या चळवळी त्या करणाऱ्यांसच मारक होतात. कायदेभंगाबरोबर दंड ठोठावण्यांत आल्यास कायदेभंगी आपली जेवण्याची सोय स्वखर्चाने करून निष्कारण तुरुंगांत जातात असेंच शेवटीं अनुभवास येतें. ऐपतदार माणसांनी कायदेभंग केल्यास त्यामुळे सरकारच्या तिजोरींत दंडाद्वारें पैशाची भर पडूं लागते. सारांश, कायदेभंग व त्याचप्रमाणे करबंदी हे दोन्ही मार्ग साफ चुकीचे आहेत. यापेक्षा लोकमान्यांचा फायदेभंगाचा म्हणजे बहिष्काराचा मार्ग अत्यंत सुलभ व शीघ्रपरिणामी आहे. फायदेभंग म्हणजे ब्रिटिश जनतेला व्यापाराच्या द्वारें जो आर्थिक फायदा हिंदी जनतेपासून मिळतो त्याचा भंग करणें, म्हणजे तो बंद पाडणें होय. कायदेभंग कांहींनाच करतां येईल, तर फायदेभंग सर्वांना करतां येईल. कायदेभंगापासून शारीरिक क्लेश आहेत, तर फायदेभंग घरबसल्या करतां येतो. फायदेभंगाने कोणताहि माल विकत घेण्यापूर्वी एवढीच खबरदारी घ्यावयाची आहे की, तो कोठे पैदा झाला आहे, जगांतील कोणत्याहि राष्ट्रांत तो पैदा झाला असला, तरी तो घेण्यास हरकत नाही. मात्र तो ब्रिटनमध्ये तयार झालेला नसला म्हणजे झालें.

इंग्रज लोकांच्या सर्व उड्या त्यांच्या व्यापारावर आहेत. त्यांचा व्यापार फायदेभंगामुळे गेल्या वर्षापासून घटत चालला आहे. ब्रिटिश पार्लमेंट तो कसा वाढेल या विवंचनेंत तूर्त आहे. अशाच वेळीं जर महात्माजी आपल्या अधिकारवाणीने फायदेभंग

पुकारतील तर आमच्या मताने तिसरी गोलपरिषद पुढील वर्षाच्या आंत दिल्ली येथे भरून तींत पूर्ण नाही तरी भरीव स्वराज्य हिंदी लोकांना हमखास मिळेल. कायदे-भंगाची चळवळ हाणून पाडण्यासाठी सरकार नाना तऱ्हेचे ऑर्डिनन्स काढील, पण कोणत्याहि ऑर्डिनन्समुळे सरकारला हिंदी प्रजेला अमुकच माल खरेदी करा, अशी सक्ती करतां यावयाची नाही. फार झालें तर, ब्रिटिश माल स्वस्त मिळूं लागेल, पण तसा तो नेहमीच मिळूं शकणार नाही. तोटचावर माल विकणें म्हणजे त्याला व्यापार म्हणत नाहीत. कोणत्याहि व्यक्तीला किंवा राष्ट्राला आपला माल सदोदित तोटचावर विकणें शक्य नाही. म्हणून विलायती माल नेहमीच स्वस्तच विकला जाईल हें संभवत नाही. आपण घटकाभर असें धरूं की, विलायती माल स्वस्त मिळूं लागला, तर तशा परिस्थितींत तो न घेण्याची प्रवृत्ति लोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न करणें यालाच स्वदेशी म्हणतात. स्वदेशी माल हौसेप्रमाणे मिळत असल्यास तो पहिल्या प्रथम घ्या. तसा तो मिळत नसल्यास तो परदेशी घ्या. पण स्वराज्य मिळाल्याशिवाय कोणत्याहि कारणास्तव विलायती माल एक पैचा विकत घेऊं नका.

हें बहिष्काराचें व्रत फक्त एकच वर्ष आचरल्याबरोबर ब्रिटिश पार्लमेंटांत केवढी गडबड उडून जाते तें तरी एकदा पाहा. पण फायदेभंगाची व कायदेभंगाची सांगड बांधण्यांत येऊ नये. त्यामुळे दोन्ही चळवळी एकमेकांना पोषक न होतां त्या मारक होतात. फायदेभंग प्रत्येकाला थोडाबहुत करतां येण्यासारखा असल्यामुळे ही चळवळ सार्वजनिक होण्याचा संभव आहे. म्हणून महात्माजींना व त्यांच्या अनुयायांना आमची अशी विनंती आहे की, त्यांनी कायदेभंगाचें भूत उठवून हजारो लोकांना निष्कारण तुरुंगांत कोंबूं नये. भावनेने प्रेरित होऊन कांही तडफदार लोक हौसेने तुरुंगांत जातील हें आम्ही समजून आहों. पण त्या त्यांच्या स्वार्थत्यागाचा परिणाम व्हावा तसा होणार नाही. आपल्या चळवळीची आच ब्रिटिश जनतेला व विशेषतः ब्रिटिश मजुरांना लागली पाहिजे. कायदेभंग व फायदेभंग या दोन चळवळींतून कोणत्या चळवळीचा प्रत्यक्ष परिणाम ब्रिटिश मजुरांवर होईल बरें ! या मुद्द्याचा नीटपणें विचार करून मग कायदेभंगाचें भूत पुरनपि उठविण्यांत यावें. या दोन चळवळींत आमच्या मताने फायदेभंगाची चळवळ जास्त टिकाऊ व जास्त परिणामी आहे, म्हणूनच तिचाच पुरस्कार करण्यांत यावा. याउपर गांधी यांची मर्जी.

— भाला, दि. ३० नोव्हेंबर १९३१

---

## ७०. वारकरी व धारकरी

आज कार्तिक वद्य त्रयोदशी आहे. याच दिवशीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आळंदी क्षेत्रांत वयाच्या बाविसाव्या वर्षीं जिवंत समाधि घेतली. संन्यास घेऊन पुन्हा गुरूच्या आज्ञेप्रमाणे गृहस्थाश्रम पत्करल्यावर विठ्ठलपंतांना निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई अशीं चार मुलें झालीं. पैठणचे ब्राह्मण मुलांच्या मुंजी करीत नाहीत या गोष्टीने वैतागून विठ्ठलपंतांनी गोदावरींत आत्महत्या केली व त्यामुळे तीं चारी मुलें पोरकीं झालीं. त्या चौघांत ज्ञानेश्वरमहाराज अत्यंत कुशाग्रबुद्धीचे व प्रेमळ अंतःकरणाचे असल्यामुळे त्यांनी कुटुंबपोषणाचा भार वाहून बाकी सर्व वेळ ईशभजनांत घालविला. श्रीपांडुरंगाची त्यांच्यावर कृपा झाली व त्यांना श्रीमत् भगवद्गीतेवर मराठी बोलींत टीका करण्याची स्वप्नांत प्रभूची आज्ञा झाली. त्या आज्ञेप्रमाणे श्रीमत् गीतेवर ज्ञानेश्वरी नांवाचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहून, त्यांनी संस्कृत गीतेंतील ज्ञान महाराष्ट्रियांसाठी मराठींत लिहून काढलें. श्रीज्ञानेश्वरी हाच वारकरी पंथाचा मूळ ग्रंथ होय. श्रीतुकारामबुवांनी आपल्या एका अभंगांत असें म्हटलें आहे की, "ज्ञानेश्वरें रचिला पाया, बांधियेल देवाळचा" श्रीतुकारामबुवांचा हा अभिप्राय अक्षरशः खरा आहे. तेराव्या शतकांत देवगिरीच्या यादव कुलाचा पूर्ण उच्छेद होऊन जिकडे-तिकडे यावनी अंमल सुरू झाला. तेराव्या शतकापासून तो सतराव्या शतकापर्यंत चार शतकें महाराष्ट्रांत यावनी अंमल कमी-जास्ती कडकपणाने चालू होता.

महाराष्ट्रांत त्या काळांत ज्या पांच बादशाह्या अस्तित्त्वांत होत्या, त्यांतील दोन बादशाह्या मोडून त्याच्या तीन झाल्या व त्या तिन्हींत विजापूरची आदिलशाही जास्त बलाढ्य झाली व ती कडवी होती. मुसलमानांना मूर्तीचा भयंकर तिटकारा, तर हिंदूंना त्याच मूर्तीचा अतिशय जिव्हाळा. या परस्पर-विरुद्ध मनोवृत्तीमुळे व त्या वेळीं राजसत्ता मुसलमानधर्मीय बादशहांच्या हातीं असल्यामुळे महाराष्ट्रांत अनेक मूर्तीचा उच्छेद झाला व उघडपणें जमून नाम-संकीर्तन करण्यासहि प्रतिबंध झाला. तशा कष्टमय स्थितींत महाराष्ट्रांतील साधु-संतांनी पंढरपूर क्षेत्रांतील श्रीपांडुरंगाच्या दर्शनास दरवर्षीं आषाढी एकादशीला एकत्र जमण्याचा प्रघात पाडून, चंद्रभागेचें सर्व वाळवंट विठ्ठलनामाच्या गजराने दणाणून सोडलें. पंढरपूर त्या वेळीं बेदरच्या बादशाहींत असून, बादशाही अंमल-

दाराचें मुख्य ठाणें मंगळवेढयास होतें. मुसलमान अंमलदारांकडून होईल तितका त्रास सोसून, महाराष्ट्रीय साधु-संतांनी हिंदु धर्माचें मुख्य बाह्यांग जी मूर्तिपूजा तिचें संरक्षण व संवर्धन केलें. महाराष्ट्रावर तत्कालीन साधु-संतांचा हा मोठा उपकार झाला आहे. हा जो नवीन पंथ तेराव्या शतकापासून महाराष्ट्रांत अस्तित्वांत आला आहे त्याला वारकरीपंथ म्हणतात. आषाढी-कार्तिकीची पंढरीला वारी करणारे ते वारकरी होत. या पंथाचे आद्य संस्थापक श्रीज्ञानेश्वरमहाराज असून, त्या पंथाचा आद्य ग्रंथ श्रीज्ञानेश्वरी होय. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदीय ब्राह्मण होते ही गोष्ट त्या शाखेंतील ब्राह्मणांना विशेष अभिमान वाटण्यासारखी आहे.

तेराव्या, चौदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांत महाराष्ट्रियांची जी दुबळी स्थिति होती ती सतराव्या शतकाच्या प्रारंभीं उरली नाही. महाराष्ट्रियांची संघटना होऊन बादशाही अमलाखाली मराठी बारगीर व शिलेदार मोहिमा करूं लागले व जहागिरी कमावून छोटे छोटे बादशहा झाले. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत हा राजकीय मनु पालटत असतां, श्रीसमर्थांचा गोदावरीच्या काठीं असलेल्या गावीं जन्म होऊन त्यांनी आपल्या वयाच्या छत्तिसाव्या वर्षीं दुसऱ्या एका पंथाची कृष्णेच्या काठीं चाफळ गावीं स्थापना केली. त्या पंथाला धारकरीपंथ म्हणतात. दोन्ही पंथ एकाच हिंदु धर्माचे डावे-उजवे हात आहेत. वारकरीपंथाने जेथे मुक्काम केला त्याच्यापलीकडे धारकरीपंथ गेला, एवढाच या दोन पंथांत फरक आहे. वारकरीपंथ धर्मकारणापलीकडे जात नाही, तर धारकरीपंथ धर्मकारण करून, त्यांच्यापुढे एक पाऊल टाकून, राजकारणहि करूं लागतो. धर्माचें योग्य संरक्षण होण्याकरिता राजसत्ताहि हातीं असली पाहिजे हें जाणून, समर्थांनी धर्मकारणाला राजकारणाची जोड लावून दिली. वारकरीपंथ असें म्हणतो की, "पहिलें तें विठ्ठल भजन, दुसरेंहि विठ्ठल भजन." पण धारकरीपंथाने या ध्येयांत दुरुस्ती करून महाराष्ट्रियांना असें आदेशिलें की, "पहिलें तें धर्मकारण, दुसरें तें राजकारण." धारकरीपंथांच्या उपदेशांतील या योग्य फरकामुळे तत्कालीन महाराष्ट्रियांच्या अंतःकरणांत नवचैतन्य ओतलें गेलें व त्यामुळेच अवघ्या अर्ध्या शतकांत रायगडावर हिंदवी स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा झाली. कालमानानुसार धारकरीपंथीय महाराष्ट्रीय राजकारणांत यथाशक्ति भाग घेत आहेत, पण वारकरीपंथीय लोक मात्र तसें करीत नाहीत.

वारकऱ्यांची संख्या जवळ जवळ दहा लक्ष असून, एकहि वारकरी नाही असें एकहि खेडेगाव महाराष्ट्रांत सापडावयाचें नाही. वारकरी झाला की तो वर्षांतून एकदा तरी पंढरीला जाऊन यावयाचाच. प्रत्येक वारकरी कोणत्या ना कोणत्या तरी बुवाचा शिष्य असावयाचा. म्हणून या कामीं वारकरीपंथीय बुवांनी मनांत आणल्यास त्यांच्या हातून महाराष्ट्रांत पुष्कळशी जागृति होण्यासारखी आहे. यासाठी आमची वारकरीबुवांना अशी आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी आपल्या प्रवचनांत ब्रह्म-

मायेवर झोड उठविण्याचें थोडे कमी करून, प्रचलित निर्भय राजकीय विषयांचेहि अल्पसें विवेचन करावें. उदाहरणार्थ, स्वदेशीचा उपदेश बुवांनी केल्यास त्यामुळे धर्मकारणहि साधतां येईल. एकादशीच्या दिवशीं परदेशी साखर किंवा परदेशी खजूर या धर्मबाह्य पदार्थांनी आपली जिव्हा न विटाळतां शुद्ध वाणीने विठ्ठलनामाचा गजर करावा, असा उपदेश बुवांनी आपल्या श्रोत्यांच्या मनावर बिंबवल्यास, तितकीच राजकीय जागृति केल्यासारखें होईल. असा उपदेश केल्यास त्यापासून भिण्यासारखें कांही नाही. पण खेदाची गोष्ट अशी आहे की, कोणताहि वारकरी बुवा चुकून सुद्धा असा उपदेश करीत नाही. पांडुरंगापुढे परदेशी साखरेचा नैवेद्य दाखविणारे बुवा आमच्या पाहण्यांत आहेत. त्याचप्रमाणे परदेशी कापडाचे कपडे घालणारेहि बुवा आमच्या अवलोकनांत आहेत. ही गोष्ट झाली इंग्रजी शिक्षण नसलेल्या लोकांची. पण जे पदवीधर वारकरीपंथांत शिरले आहेत त्यांची प्रवचनें ऐकलीं म्हणजे क्षणभर असें वाटतें की, हे पदवीधर नसावेत.

असो; मागे होऊन गेलें तें गेलें, पण आता वारकरीबुवांनी आपल्या प्रवचनांत कालमानाप्रमाणे थोडासा तरी फरक करावा. त्याचप्रमाणे श्रीसमर्थांनंतर त्यांच्या सर्व शिष्यांनी आपलें अंग राजकारणांतून काढून घेतलें आहे. श्रीसमर्थांनंतर राजकारणाला विशेष रंग भरला होता. श्रीसमर्थ सन १६८१ सालीं वारले व त्यानंतर सन १७०७ पर्यंत सव्वीस वर्षें महाराष्ट्रीय राजकारणाला विशेष रंग आला होता. पण त्यांत श्रीसमर्थांच्या एकाहि शिष्याचें किंवा प्रशिष्याचें चुकून सुद्धा नांव आलेलें नाही. श्रीसंभाजीमहाराजांच्या वधानंतर म्हणजे १६८९ पासून सन १७०७ पर्यंत पुरीं अठरा वर्षें ही महाराष्ट्रभूमि शस्त्रास्त्रांच्या दणदणाटाने गर्जून गेली असतां " समर्थाचिया सेवका वक्र पाहे. असा सर्व भूमंडळी कोण आहे " अशी गर्जना करणाऱ्या एकाहि समर्थशिष्याचें नांव आम्हांस माहीत नाही. हल्ली तरी दोन्ही पंथ जवळ जवळ एकाच तऱ्हेचे बनले आहेत. दोन्ही पंथांनी धर्मकारणानंतर पूर्णविराम केला आहे. नाही म्हणावयास मसूरचे श्रीविनायकमहाराज व वाईचे श्रीचौंडेमहाराज राजकारणांत अप्रत्यक्षपणें थोडीबहुत चळवळ करीत आहेत. म्हणून दोन्ही पंथांनी आपली अनास्था झुगारून देऊन व सद्यःस्थिति लक्षांत घेऊन शक्य तितकी रायजकीय चळवळ करण्याचा प्रारंभ करावा. जरी वारकरी व धारकरी पंथांत बारीकसारीक भेद असले तरी, अखिल महाराष्ट्रियांना भागवत धर्माचे आद्य संस्थापक श्रीज्ञानेश्वरमहाराज व महाराष्ट्र धर्माचे आद्य संस्थापक श्रीसमर्थमहाराज हे सारखेच पूज्य व वंदनीय आहेत. योग्य अधिकारी पुरुष भेटल्यास तो दोन्ही पंथांचें संमीलन हां-हां म्हणतां घडवून आणील.

– भाला, दि. ७ डिसेंबर १९३१

---

## ७१. विद्यार्थी व धंद्यार्थी

यंदा मॅट्रिकच्या परीक्षेला पंधरा हजारांवर विद्यार्थी बसले आहेत. नुसत्या शिक्षण प्रसाराच्या दृष्टीने विचार केल्यास या अगडबंब संख्येमुळे कोणाला घाबरावयास नको, उलट तीमुळे आनंदच व्हावयास पाहिजे. यांपैकी शेकडा पन्नास विद्यार्थी पसार होतील व ते कॉलेजांत जातील. त्यांपैकी दरवर्षी कांही विद्यार्थी गळत गळत जाऊन आणखी चार वर्षांनी या विद्यार्थ्यांपैकी कमींत कमी एक हजार विद्यार्थी पदवीधर होऊन तितकीच भर सुशिक्षितांत पडेल. येथपर्यंत सर्व ठीक झालें, पण पुढे काय, हा विचार मनांत आल्यावर मनाची प्रसन्नता टिकत नाही. दरवर्षी एक हजार पदवीधर मुंबई विद्यापीठांतून बाहेर पडूं लागल्यावर एवढ्या विद्यार्थ्यांची सोय सरकारी नोकरींत होणें शक्य नाही. गरजेपेक्षा ही संख्या दरवर्षी जास्त निपजत असल्यामुळे सर्व पदवीधरांचा समावेश सरकारी खात्यांत होणें शक्य नाही. उलट प्रत्येक सरकारी खात्यांत नोकरांची दहा टक्के काट होत असल्यामुळे वरील अडचण कमी होण्याऐवजीं ती वाढतच राहणार आहे, म्हणून जेवढ्यांचा समावेश सरकारी नोकरींतच होण्याचा संभव आहे, तेवढीच पदवीधरांची संख्या दरवर्षी बाहेर पडेल, अशी उपाययोजना व्हावयास पाहिजे. आम्हीं ही गोष्ट साधण्यास मागील एका अग्रलेखांत एक उपाय सुचविला होता. तो उपाय असा आहे की, जितक्या पदवीधरांची जरुरी असेल तेवढीच नेमकी संख्या पास करून, बाकीच्या हतभाग्यांना कोणता तरी धंदा पत्करण्यास अप्रत्यक्षपणें भाग पाडण्यांत यावें. या एका उपायाशिवाय पदवीधरांची संख्या कमी करण्याचा व सर्व यशस्वी पदवीधरांच्या पोटापाण्याची सोय हटकून लावण्याचा उपाय दुसरा आम्हांस तरी सुचत नाही. ही गोष्ट लक्षांत न धरतां दरवर्षी पदवीधरांची पलटण विद्यापीठांतून बाहेर पडत आहे व त्यामुळे सुशिक्षितांच्या बेकारीला बाळसें येऊं लागलें आहे. आम्ही असें म्हणत नाही की, ज्यांना सरकारी नोकरी नको असून, फक्त ज्ञानप्राप्तीसाठी पदवीधर व्हावयाचें आहे, त्यांनी पदवीधर होऊं नये. पण अशा ज्ञानलोलुप पदवीधरांची संख्या केव्हाहि बेताबाताचीच असणार. असे संपन्न पण ज्ञानेच्छु पदवीधर वगळून, बाकीच्यांची सोय सरकारी नोकरींत किंवा तत्सम धंद्यांत लागावयास पाहिजे. अशी सोय लागत नसल्यास, एवढे अनावश्यक पदवीधर केल्याचें पाप, विद्यापीठाच्या माथ्यावर येऊन

आदळेल. म्हणून आम्हांस असें सुचवावयाचें आहे की, मॅट्रिकपर्यंत सर्वांना सरसे शिक्षण देण्यांत यावें, पण पुढलें कॉलेजी शिक्षण मात्र त्यांच्यापैकी पहिल्या प्रतीच्या किंवा दुसऱ्या प्रतीच्या विद्यार्थ्यांना देण्यांत येऊन, बाकीच्यांची सोय धंदेशिक्षणांत करण्यांत यावी.

मॅट्रिक परीक्षा पास झाल्यावर जे तरुण आर्टस् कॉलेजांत जातील त्यांना 'विद्यार्थी' म्हणण्यांत यावें व एखाद्या धंदेशिक्षणाच्या कॉलेजांत जातील त्यांना 'धंद्यार्थी' संबोधण्यांत यावें. धंद्यार्थी हा शब्द व्याकरणदृष्टचा चुकीचा आहे, ही जाणीव असतांहि, आम्हीं ती चूक उच्चारसाम्यतेसाठी जाणूनबुजून केली आहे. भावी राज्यघटनेंत पूर्ण स्वराज्याचीं पांच खातीं हिंदी लोकांच्या स्वाधीन करण्यांत येणार नाहीत, तरी बाकीचीं सर्व खातीं त्यांना मिळणार आहेत. त्या खात्यांपैकी शिक्षणखातें हें एक आहे. तसें झाल्यावर जितकीं आर्टस् कॉलेजें आहेत, तितकीं तरी धंदे-कॉलेजें काढावयास पाहिजेत. विद्यार्थी व धंद्यार्थी हे दोन्ही परिपक्व होऊन आपआपल्या विद्यापीठांतून बाहेर पडल्यावर त्यांच्या शारीरिक व बौद्धिक शक्तींत फरक पडणार हें उघडच आहे. बुद्धीचें जें काम विद्यार्थी-पदवीधर करूं शकेल तें काम धंद्यार्थी-पदवीधर करूं शकणार नाही. पण जे शक्तीचें काम धंद्यार्थी-पदवीधर करूं शकेल तें काम विद्यार्थी-पदवीधर करूं शकणार नाही. सारांश, विद्यार्थी व धंद्यार्थी असे दोन वेगवेगळे वर्ग, मॅट्रिक पास झाल्यावर, केल्याशिवाय बेकारीचा प्रश्न कायमचा समाधानकारक रीतीने सुटावयाचा नाही.

विद्यार्थी-पदवीधराला धंदे करावयास व त्यांतहि खेड्यांतील शेतकी करावयास सांगणें यासारखा बेअकलीपणा नाही. अशी म्हण आहे की, "व्यापार करतां सोळा वारा, न शेती करतां डोईवर मारा." या म्हणीचा अर्थ असाच घ्यावयाचा की, शेतीचा धंदा करणाऱ्या इसमाला वेळ पडल्यास आपल्या डोक्यावर गवताचा भारा घेऊन शेतांतून घरीं आलें पाहिजे. जर पदवीधर शेतीचा धंदा करूं लागले तर त्यांना शेतांतील गवताचा भारा स्वतःच्या डोईवर ठेवून घरीं आणण्याइतकी शारीरिक शक्ति असूं शकेल काय ? शारीरिक ताकदींत पदवीधराइतका नादान दुसरा कोणी नाही, पण त्याबद्दल त्याला दोष देण्यांत अर्थ नाही. मेंदू वाढला की शरीर त्या प्रमाणांत कमजोर झालेंच पाहिजे. पदवीधरांच्या मेंदूचा उपयोग शेतीच्या धंद्यांत नसल्यामुळे त्याला त्या धंद्यांत न ढकलणें हेंच बरें होय. या दृष्टीने विचार केल्यास येत्या जनमध्ये पुण्यांत निघणारें नवीन कॉलेज 'आर्टस् कॉलेज' न निघतां तें जर 'धंदे-कॉलेज' निघालें असतें, तर तो नवीन मार्ग सर्वांना पसंत पडला असता. ह्या नवीन कॉलेजामुळे बेकारीचा प्रश्न सुटला नसून, तो अधिक कठीण झाला आहे. सारांश, सुशिक्षितांची बेकारी कमी करण्याचा रामबाण उपाय म्हणजे मॅट्रिक परीक्षा पसार झाल्यावर, यशस्वी तरुणांत विद्यार्थी व धंद्यार्थी असे दोन भाग पाडून, ज्यांची बुद्धि विशेष तरतरीत आहे, त्यांना आर्टस कॉलेजांत घेण्यांत यावें व बाकीच्यांची

धंदेशिक्षणाच्या कॉलेजांत जाण्याची सोय करण्यांत यावी. अशी कांही तरी सोय केल्याशिवाय हा बेकारीचा प्रश्न सुटणार नाही.

— भाला, दि. १८ एप्रिल १९३२

---

## ७२. बाल, लाल व पाल

बाल म्हणजे बाळ गंगाधर टिळक, लाल म्हणजे लाला लजपतराय व पाल म्हणजे बिपिनचंद्र पाल होय. सन १९०५ पासून तों सन १९१० पर्यंत बंगालच्या फाळणीमुळे सबंध हिंदुस्थानभर जी जागृतीची व खळबळीची लाट उसळली, त्या खळबळीचे वरील तीन देशभक्त तीन प्रांतांतील पुरस्कर्ते होते. बालांनी मोठ्या महाराष्ट्रांत, लालांनी पंजाबांत व पालांनी बंगाल्यांत आपल्या देशभक्तीच्या व कर्तृत्वशक्तीच्या जोरावर, मुख्यत्वेंकरून वरील तीन प्रांतांत कल्पनातीत खळबळ उडवून दिली. त्या वेळीं आमचा भाला अस्तित्वांत होता. कारण भाल्याचा जन्म सन १९०५ च्या एप्रिलच्या महिन्यांत झाला होता. त्या वेळीं वरील तीन देश-भक्तांचीं नांवें आम्हीं वरील शब्दत्रयींत प्रथम गोवलीं व तींतील शब्दसौष्ठवामुळे तीं महाराष्ट्रांत व इतर प्रांतांत सर्वमान्य झालीं. आम्ही त्या वेळेपासून लोकमान्य बळवंतरावजींच्या विचारसरणीचे एकनिष्ठ अनुयायी आहोंत. कारण त्यांच्या व बाकीच्या दोघांच्या विचारसरणींत, राजकारणांत अत्यंतावश्यक गुण जो व्यावहारिकपणा तो तींत भरपूर साठवलेला आहे.

राजकीयदृष्टचा हिंदुस्थानांतील चळवळीचे चार भाग पाडतां येतील. पहिला भाग सन १८५८ पासून तों राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपर्यंतचा म्हणजे सन १८८५ चा काळ होय. हा सत्तावीस वर्षांचा काळ निवळ बेशुद्धींत गेला. हळूहळू गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी पदभ्रष्ट झालेल्या हिंदी राजांनी केलेला प्रयत्न फसल्यावर राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला व त्या वेळेपासून इंग्रज सत्तेच्या प्रखर तेजामुळें एक सबंध पिढी बेशुद्धावस्थेंत निपचित पडली. पण त्यानंतर हळूहळू पुढील पिढी शुद्धींवर येऊं लागून व तिचे डोळे किलकिले होऊन ती सभोंवार पाहूं लागली. बदललेल्या परिस्थितींत उन्नतीचा मार्ग शोधून काढण्यासाठी त्या पिढींतल्या पुढाऱ्यांनी निरनिराळ्या राजकीय संस्था काढण्यास सुरुवात केली. अशा संस्थांमध्ये राष्ट्रीय सभा सन १८८५ सालीं जन्मास आली. ज्या पुढाऱ्यांनी राष्ट्रीय सभेचें धुरीणत्व त्या वेळीं आपल्या हातीं घेतलें त्यांचा

इंग्रज मुत्सद्द्यांनी वेळोवेळीं दिलेल्या आश्वासनांवर पूर्ण विश्वास असल्यामुळे त्यांनी आपल्या देशबांधवांची सर्वांगीण उन्नति करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांची अशी प्रामाणिक समजूत होती की, ब्रिटिश मुत्सद्दी जें कांही बोलतात व लिहितात तें अगदी बेंबीच्या देठापासून होय. वरील विचारसरणीचे महाराष्ट्रांतले पुढारी म्हणजे फेरोजशहा मेथा, ना. गोखले वगैरे होत. त्यांच्या पक्षाला आम्हीं मवाळ पक्ष असें नांव दिलें व तें त्या वेळेपासून पक्कें रूढ झालें आहे.

मवाळांची मऊ विचारसरणी कांही काळ लोकांना पटली, पण वाढत्या ज्ञानापुढे तिचा टिकाव लागेना. नुसते अर्ज व आर्जव करून स्वाराज्याची प्राप्ति होणार नाही. तर त्याची प्राप्ति होण्यास शारीरिक क्लेश भोगण्यापर्यंत तयार असलेल्या लोकांचा एक पक्ष जन्मास आला व त्यांचें धुरीणत्व लो. टिळकांकडे गेलें. या नवीन पक्षाचें अस्तित्व लोकमान्यांवर सन १८९७ सालीं झालेल्या राजद्रोहाच्या पहिल्या खटल्यापासून लोकांच्या दृष्टीस स्पष्टपणें पडलें. या नवीन पक्षाला आम्हीं जहाल हें नवीन नांव दिलें व तेंहि लोकांना पूर्णपणें पटलें. या नवीन पक्षाच्या तेजापुढे पूर्वीचा मवाळ पक्ष व त्याचे पुढारी फिक्के पडत चालले. या जहाल पक्षाचा काळ सन १८९७ पासून तों सन १९२० पर्यंतचा होय. या तेवीस वर्षांच्या काळांत जे तीन पुढारी तीन प्रांतांत सिंहाप्रमाणे गर्जत होते ते बाल, लाल व पाल होत. लोकमान्यांनी आपल्या केसरीच्या साप्ताहिक गर्जनेने बृहन्महाराष्ट्र हादरून टाकला, तर तिकडे पंजाब प्रांत दे. भ. लाला लजपतरायांनी आपल्या अतुल स्वार्थत्यागाने आपलासा करून घेतला, तर पलीकडे दे. भ. बिपिनचंद्र पालांनी सबंध बंगाल आपल्या दणदणीत वक्तृत्वाने दणाणून सोडला. त्या वेळीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत मवाळ पुढारी व जहाल पुढारी यांची आपसांत अहमहमिका सुरू झाली व तींत मवाळ पुढाऱ्यांस हार खावी लागली.

स्वराज्य मिळविण्याचें मवाळांचे दोनच मार्ग म्हणजे – अर्ज व आर्जव शिष्टमंडळें पाठविणें हें होते, तर जहालांनी आपल्या मनोवृत्तीप्रमाणे स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे तीन स्वराज्यप्राप्तीचे मार्ग शोधून काढले. जहालांच्या वरील तीन मार्गांचें परिणामकारकत्व त्या काळच्या पिढीला पटलें व त्यामुळे मवाळांनी स्थापलेल्या राष्ट्रीय सभेंतून त्यांची हकालपट्टी होऊन, ती सभा जहालांच्या ताब्यांत आली. सन १९०५ सालीं बंगालची फाळणी झाली व तीमुळे पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल असें बंगाल डलाख्याचे दोन भाग पाडण्यांत आले. ती फाळणी कांही केल्या रद्द करण्यांत येणार नाही अशी प्रतिज्ञा त्या वेळचे भारतमंत्री मोर्ले यांनी केली असतां त्यांना वरील तीन जहाल भक्तांनी ती फाळणी स्वदेशी व बहिष्कार या दोन साधनांनी रद्द करण्यास भाग पाडलें. या सहा वर्षांच्या काळांत म्हणजे सन १९०५ पासून तों सन १९१० सालापर्यंतच्या काळांत कै. पाल हे लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झाले होते. दे. भ. अरविंदबाबू यांच्यावर झालेल्या राजद्रोहाच्या खटल्यांत

त्यांनी साक्ष देण्याचें नाकारल्यावरून त्यांना सहा महिन्यांची कैद झाली होती व त्यानंतर त्यांना राजद्रोहाबद्दल एक वर्षाची सक्तमजुरीहि झाली होती. त्या वेळीं बंगाल्यांत मवाळ पुढारी सुरेंद्रनाथ बानर्जी व जहाल पुढारी बिपिनचंद्र पाल यांचा चुरशीचा सामना लागून राहिला होता व त्यांत कै. सुरेंद्रनाथ मागे पडले. याप्रमाणे हे तीन जहाल वीर हिंदुस्थानच्या राजकीय नभोमंडळांत आपल्या देशभक्तीच्या तेजाने चमकत असतां, एकाएकीं लोकमान्य मुंबईत सरदारगृहांत नवज्वराने आजारी पडले व भरतभूमीच्या कमनशिबाने त्या दुखण्यांत त्यांचा अंत झाला. लोकमान्य दे. भ. पालांप्रमाणे सन १९३२ च्या मेअखेर जगते, तर हिंदुस्थानवर हल्ली आलेला कठीण प्रसंग खात्रीने ओढवला नसता. वरील तीन जहाल पुढाऱ्यांत पहिलें स्थान लोकमान्यांचें होतें हें लिहिण्याची जरुरी नाही.

लोकमान्य सन १९२० सालीं वारले व त्या आपत्तीमुळे बाकीचे दोघे जहाल पुढारी हतबल व निस्तेज झाले. लोकमान्य मावळले व महात्माजी उगवले आणि त्यामुळे लाल व पाल निस्तेज झाले. या स्थित्यंतराचा परिणाम असा झाला की, जहाल पक्ष बहुतेक नामशेष झाला असून, त्याची जागा महात्माजींच्या पक्षाने पटकावली आहे. त्या गांधी-पक्षाला आम्ही सुताळ-पक्ष म्हणतों. खादी वापरा म्हणजे स्वराज्य तिच्यामागे आपोआप चालत येईल. ही महात्माजींची पहिली महत्त्वाची शिकवण आहे. त्या शिकवणीला लालाजी बळी पडले व त्यांनीं आपल्या डोक्यावरील स्वदेशी फेटा भिरकावून देऊन खादीची गांधी टोपी घालण्यास सुरुवात केली व महात्माजींचें सक्रिय शिष्यत्व पत्करलें. पण लालाजी तितक्या बिळबिळीत मनोवृत्तीचे नसल्यामुळे, त्यांनी राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें; परंतु ही त्यांच्या हातून चूक झाली. महात्माजींची खादी मागे पडून स्वदेशी कापड पूर्वी-प्रमाणे पुढे येऊं लागलें आहे. अलीकडे खादी-संघाच्या ऐवजीं स्वदेशी संघ स्थापन होऊं लागले आहेत, हें कशाचें द्योतक आहे बरें! तें कांही असो, कै. पाल यांनी एके काळीं आपल्या मायभूमीची सेवा दणदणीतपणें केली याबद्दल दुमत नाही. त्यांच्या मृत्यूमुळे लोकमान्यांचा एक समकालीन सहकारी मित्र नाहीसा झाला. बाळ गेले, लाल मेले व पाल वारले म्हणजे जहाल पक्ष नामशेष झाला.

– भाला, दि. ३० मे १९३२

---

## ७३. राष्ट्रीयत्व व जातीयत्व

राष्ट्रीयत्व म्हणजे नॅशनॅलिझम व जातीयत्व म्हणजे कम्युनॅशिलझम होय. इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करून केवळ राष्ट्रीय हित साधेल अशी मनोवृत्ति धारण करणें

याला राष्ट्रीयत्व म्हणतात, तर राष्ट्रीय हिताला दुय्यम प्रतीचें महत्त्व देऊन स्वजातियांचें हित साधेल अशी विचारसरणी अंगीकारणें याला जातीयत्व म्हणतात. हल्लींचा राजकीय मनु प्रादेशिक राष्ट्रीयत्वाचा आहे. अमुक चतु:सीमेच्या हद्दींत अंतर्भूत झालेल्या भूभगाला देश ही संज्ञा मिळते. त्या देशांत राहणाऱ्या सर्व लोकांना तद्देशीय म्हणण्यांत येतें. मग त्यांचा धर्म, जात, रंग वगैरे इतर गोष्टी भिन्न स्वरूपाच्या असल्यास कांही हरकत नाही. उदाहरणार्थ, अमेरिका देश घ्या. त्या देशांत भिन्नधर्मीय व भिन्नरंगीय लोक अनेक आहेत, पण त्या सर्वांना अमेरिकन हें एकच सर्वसाधारण नांव आहे. त्याच्या खालोखाल आपल्या हिंदुस्थानचें उदाहरण घ्या. या देशांत अनेक धर्मांचे, अनेक जातींचे व अनेक रंगांचे लोक आहेत, तरी पण राजकीयदृष्टचा त्या सर्वांना 'इंडियन' अथवा हिंदी असें म्हणतात. कारण ते सर्व हिंदुस्थानच्या चतु:सीमेंत राहणारे आहेत. राजकीय बाबतींत ही नवीन दृष्टि उत्पन्न झाल्यापासून प्रत्येक हिंदी गृहस्थाच्या विचारांत विलक्षण क्रांति घडून आली आहे. मी एक हिंदुस्थानचा रहिवासी असून, माझ्या देशबांधवांचें कल्याण जेणेंकरून होईल अशी प्रत्येक गोष्ट मी करीन. अशी भावना सुशिक्षितांच्या अंत:करणांत जन्मास आली आहे व त्या भावनेलाच राष्ट्रीयत्व म्हणतात. ही राष्ट्रीय भावना जितकी तीव्र व्हावयास पाहिजे तितक्या प्रमाणांत ती झालेली नसली, तरी तिचा जन्म झालेला आहे, याबद्दल दुमत नाही. पण खेदाची गोष्ट ही आहे की, कांही मुसलमानांच्या अंत:करणांत हें राष्ट्रीयत्व जन्मास न येतां त्याच्या जागीं जातीयत्व जन्मास आलें आहे.

भावी राज्यघटनेच्या बाबतींत जर कोणत्या एका गोष्टीची भीति आम्हांस वाटत असेल, तर हे जातीयत्व होय. हें राष्ट्रीयत्वाला सर्वथैव मारक आहे. मी माझ्या सजातियांचें हित अगोदर पाहणार ही मनोवृत्ति एकदा अंत:करणांत शिरली म्हणजे अशा जातिनिष्ठ अंत:करणांत प्रवेश करण्यास राष्ट्रीयत्वाला मार्ग उरत नाही. अशी मनोवृत्ति कांही अपवाद सोडून बाकीच्या मुसलमान पुढाऱ्यांत शिरल्यामुळे त्यांनी आपल्या चौदा मागण्या केल्या आहेत व त्या मागण्या भावी स्वराज्यांत पुऱ्या केल्या जातील, अशी हमी मिळाल्याशिवाय मुसलमान समाज भावी राज्यघटनेस आपली संमति देऊं इच्छित नाही. भावी राज्यघटना प्रातिनिधिक स्वरूपाची असल्यामुळे तिचा मुख्य पाया म्हणजे मतदार-संघ होय. कांही विवक्षित पात्रता अंगीं असली म्हणजे तो मतदार होय, मग त्याचा धर्म किंवा जात कोणतीहि असो. असे सर्रास मतदार-संघ बनविल्याशिवाय एकराष्ट्रीयत्वाची कल्पना जन्मास यावयाची नाही व यदाकदाचित् ती जन्मास आली तरी वाढीस लागावयाची नाही. म्हणून मतदार-संघ निर्माण करण्याच्या बाबतींत एकाच तऱ्हेची साधारण पात्रता ठेवण्यांत यावी व ते संघ 'एकगटी' असावेत. प्रत्येक लहानमोठ्या समाजाला निरनिराळे मतदार-संघ दिल्यास, त्यांच्या मनोवृत्तींत संकुचितपणा उत्पन्न होईल व त्यामुळे त्यांचा एकजीव

होण्यास बरीच अडचण पडेल. "मी हिंदी आहे" ही भावना उत्पन्न करावयाची असल्यास त्याला अचूक उपाय म्हणजे संयुक्त मतदार-संघ होत.

या दृष्टीने विचार केल्यास मुसलमानांचे किंवा ख्रिश्चनांचे अथवा अस्पृश्यांचे निरनिराळे मतदार-संघ असणें हें राष्ट्रहिताला विघातक आहे. त्यामुळे त्या समाजांत तुटकपणा उत्पन्न होऊन त्यांची दृष्टि राष्ट्रीय न बनतां ती जातीय होते. म्हणून जर भावी काळांत हिंदुस्थान हें खरेखुरें एकराष्ट्र करावयाचें असेल, तर सर्वांचा एकच मतदार-संघ निर्माण करावा. अशा संयुक्त मतदार-संघाच्याच पोटीं राष्ट्रीयत्वाचें बाळ जन्मास येईल, नाही तर केव्हाहि नाही. असे संयुक्त मतदार-संघ निर्माण केल्यावर प्रत्येक मोठ्या समाजाला तुटक प्रतिनिधि दिल्यास त्यामुळे फारसें बिघडणार नाही. उदाहरणार्थ, भावी राज्यघटनेंत पुणें जिल्ह्याच्या वांटणीला पांच प्रतिनिधि आले आहेत असें समजूं व त्यांपैकी एकजण मुसलमान असावा असा निर्बंध घालण्यांत आला.

अशा परिस्थितींत आमचें मत असें आहे की, पुणें जिल्ह्यांतील मतदार-संघ एकच असावा म्हणजे त्या संघांत हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन सर्व मतदार असावेत; पण जे उमेदवार निवडून येतील त्यांतील पहिले चार हिंदु घ्यावेत व पांचवा मुसलमान घ्यावा. मग तो यशस्वी उमेदवारांच्या यादींत अकरावा आला असला, तरी सुद्धा या धर्तीमुळे मुसलमानांना राखीव जागा मिळतील व मुसलमान उमेदवारांना हिंदु मतदारांची व हिंदु उमेदवारांना मुसलमान मतदारांची मनधरणी करावी लागेल म्हणजे पर्यायाने त्या सर्वांचा एकजीव होईल. तेच स्वतंत्र मतदार-संघ झाल्यास कोणाची कोणास पर्वा राहणार नाही. सारांश, थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने पाहतां संयुक्त मतदार-संघ पण संख्येच्या प्रमाणांत राखीव जागा, हाच उपाय सर्व बाजूंनी निर्दोष दिसतो. म्हणून मुसलमानांना स्वतंत्र मतदार-संघ न देतां फक्त प्रमाणशीर राखीव जागा देण्यांत याव्यात. मुसलमान समाज हिंदु समाजापासून संस्कृतीच्या दृष्टीने अगदी भिन्न असल्यामुळे त्या समाजाला राखीव जागा दिल्यामुळे हिंदु समाजाचें काडीचेंहि नुकसान नाही. पण अस्पृश्यांसंबंधाने मात्र तसें म्हणतां यावयाचें नाही. अस्पृश्य लोक धर्माने हिंदु आहेत. त्यांच्या व स्पृश्यांच्या देवदेवता व बऱ्याच चालीरीति एकच आहेत. अशा स्थितींत त्यांना स्वतंत्र मतदार-संघ देणें म्हणजे त्यांना हिंदु समाजांतून बाहेर ढकलून देण्यासारखें आहे.

अस्पृश्यांना राखीव जागा कांही वर्षें द्या, पण कोणत्याहि कारणास्तव त्यांना स्वतंत्र मतदार-संघ देण्यांत येऊं नये, त्यामुळे हिंदु धर्माची भयंकर हानि होण्याचा संभव आहे. अस्पृश्यांच्या डोक्यांत भलतीच खुळें भरवून देण्याचा प्रयत्न डॉ. बाबा-साहेब आंबेडकरांनी चालू ठेवला आहे. तो प्रयत्न हरतऱ्हेने हाणून पाडण्यासाठी स्पृश्य हिंदूंकडूनहि जोराची चळवळ व्हावयास पाहिजे. अस्पृश्य समाजांत रा. ब. राजे, श्री. गवई ,श्री. राजभोज वगैरे धोरणी व समजूतदार पुढारी आहेत ही

त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट आहे. डॉ. मुंज्यांनीहि या कामीं कंबर कसली आहे. म्हणून त्या अस्पृश्य पुढाऱ्यांच्या साहाय्याने डॉ. बाबासाहेबांची हिंदुधर्मघातकी, चळवळ चीत करण्यांत आली पाहिजे. आम्ही कोठे असें म्हणतों की, अस्पृश्यांस राखीव जागा देऊं नका ! आमचा आग्रह एवढाच आहे की, अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार-संघ देण्यांत येऊं नयेत. त्यामुळे अस्पृश्यांचेंच जास्त नुकसान होणार आहे. अस्पृश्यांना स्पृश्य समाजांतून फुटून बाहेर जाऊं न देतां, त्यांचाहि स्पृश्य समाजांत एकजीव व्हावा याठीच अस्पृश्यता निवारण्याची चळवळ चालू आहे. हळूहळू त्यांना मंदिर-प्रवेशाचाहि हक्क बिनबोभाट मिळेल.

सारांश, चातुर्वर्ण्यांत अस्पृश्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न एकीकडे स्पृश्य पुढारी करीत असतां, तिकडे हिंदु समाजांतून तुटक होण्याचा आत्मघातकी प्रयत्न डॉ. बाबासाहेब करीत आहेत व यासाठी ते गुपचुपपणें विलायतेला निघून गेले आहेत. पण डॉ. मुंजे कोठे स्वस्थ बसले आहेत ? त्यांनीहि विलायतेला प्रयाण केलें असून, त्यांना मदत करण्यासाठी रा. ब. राजा वगैरे समंजस अस्पृश्य पुढारीहि थोड्याच दिवसांत विलायतेला जाणार आहेत. त्या सर्वांच्या प्रयत्नाने डॉ. बाबा-साहेबांचा बेत ढासळून पडो व अस्पृश्यांचा तुटक मतदार-संघ न होवो, एवढीच आमची अंतर्यामीची इच्छा आहे. अस्पृश्यांना राखीव जागा देण्यास आमची ना नाही, पण त्यांना स्वतंत्र मतदार-संघ देण्यास आमची जोराची हरकत आहे. कारण तसें घडून आल्यास हिंदु समाज विभंगला जाईल.

– भाला, दि. २० जून १९३२

---

## ७४. शाबास भीमराव !

अलीकडे राजकारणाला भलतेंच स्वरूप येत चाललें आहे ही अत्यंत अनिष्ट गोष्ट आहे. एका व्यक्तीच्या लहरीसाठी हिंदुस्थानांतील अखिल जनतेची मुस्कट-दाबी व्हावी ही गोष्ट दुसऱ्यांदा कोणासहि पटणार नाही. तो पहिलाच प्रसंग होता म्हणून स्पृश्य हिंदूंनी महात्माजींची लहर सांभाळली. पण जरकरिता गांधीजी आपले प्राण पुन्हा एकदा पणास लावतील, तर गेल्या प्रसंगाप्रमाणे स्पृश्य हिंदु त्यांचे लाड हटकून पुरे करतीलच असें नाही, असें आम्ही निश्चितपणें सांगतों. अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदार-संघ नामशेष न झाल्यास मी मरेपर्यंत उपवास करीन, अशी घोर प्रतिज्ञा करून महात्माजींनी अन्नत्याग केला. हा असला त्रागा राजकारणांत करणें सूज्ञपणा नाही. राजकारणांत जी कोणती सुधारणा हवी असेल, ती घडवून आण-

ण्याचा खरा मार्ग म्हणजे त्या गोष्टीकडे जनतेचें मत वळवून आणणें होय. हा सरळ मार्ग सोडून देऊन गांधीजींनी भलत्याच वाग्याचा अवलंब केला व त्यांच्या अलौकिक लोकप्रियतेमुळे स्पृश्य हिंदूंनी त्यांचा वागा चालू दिला; पण या खुळ्या मार्गाचा अवलंब महात्माजींनी पुन्हा करूं नये अशी त्यांना आमची नम्र विनंती आहे.

असें म्हणतात की, महात्माजी अस्पृश्यतानिवारणासाठी असेंच एक दुसरें प्राणांतिक प्रायोपवेशन करणार आहेत. जर त्यांच्या कमनशिबाने महात्माजींना ही असली कमबुद्धि झाली, तर अस्पृश्यतानिवारणासारख्या धार्मिक बाबतींत स्पृश्य हिंदु त्यांचा हट्ट पुरा करतीलच, या पोकळ भ्रमांत महात्माजींनी राहूं नये. परवाच्या प्रायोपवेशनांत फक्त राजकारणाचा संबंध होता व तो फक्त कांही जागांसंबंधी होता. तो एक राजकारणांतील अप्रत्यक्ष तोटचाचा एक क्षुल्लक प्रश्न होता. अस्पृश्यांना एकाहत्तर जागा मिळाल्या काय किंवा एकशेआठ्ठेचाळीस मिळाल्या काय, त्या हिंदूंतच राहिल्या. ही एक गेल्या प्रायोपवेशनांत समाधान मानण्याची बाब होती; पण अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न तितका सोपा नाही. तो प्रश्न धर्माचा आहे. स्पृश्य हिंदु धर्मकारणाला जितकें महत्त्व देतात तितकें तें राजकारणाला देत नाहीत. म्हणून अशा धार्मिक बाबतींत महात्माजींनी दुसऱ्या प्रायोपवेशनाची दहशत स्पृश्य हिंदूंना घालूं नये.

पहिल्या प्रायोपवेशनांत मिळालेल्या यशामुळे हुरळून जाऊन जर महात्माजी दुसरें प्रायोपवेशन सुरू करतील, तर त्या कामीं त्यांची निराशा होण्याचा हटकून संभव आहे. महात्माजींना अफाट बोलण्याची व लिहिण्याची घातुक खोड आहे. एका वर्षांत मी स्वराज्य मिळवून देतों, अशी प्रतिज्ञा त्यांनी नागपूरच्या राष्ट्रीय सभेंत केली, पण पुढे त्या भीष्मप्रतिज्ञेचें पुढल्या वर्षीं भस्म झालें. त्याचप्रमाणे अवघ्या सहा महिन्यांच्या आंत मी अस्पृश्यतेचें समूळ उच्चाटन करतों, अशी दुसरी प्रतिज्ञा त्यांनी जवळ जवळ केली आहे. त्या प्रतिज्ञेला निश्चित व जाहीर स्वरूप येण्यापूर्वी आम्ही महात्माजींना असें सुचवितों की, अस्पृश्यता सहा महिन्यांत नाहीच नाही, सहा वर्षांत मुळीच नाही, पण सहा पिढ्यांत तरी नाहीशी होईल किंवा नाही याची सुद्धा खात्री देववत नाही. अस्पृश्यतानिवारणाच्या मागोमाग सहभोजनें येतात. हा अनिष्ट परिणाम दिसूं लागल्यापासून पुष्कळ स्पृश्य हिंदूंचीं मनें प्रतिकूल होऊं लागलीं आहेत. म्हणून महात्माजींनी अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतींत कोणतेंहि दिव्य करण्याच्या भरांत यापुढे पडूं नये, अशी त्यांना आमची धोक्याची सूचना आहे.

असो; गेलें प्रायोपवेशन महात्माजींनी कशाकरिता केलें व तो इष्ट हेतु सिद्धीस गेला किंवा नाही यासंबंधाने आम्ही दोन शब्द लिहीत आहोंत. आमच्या कोत्या समजुतीप्रमाणे आम्हांस एवढेंच कळलें आहे की, मुख्य प्रधान मि. मॅक्डोनाल्ड यांनी जो जातिविषयक निवाडा दिला आहे, त्यांत अस्पृश्य हिंदूंसंबंधाने त्यांनी जी व्यवस्था केली आहे, ती महात्माजींना पसंत न पडल्यामुळे त्यांनी प्रायोपवेशनाला सप्टेंबर

महिन्याच्या वीस तारखेला सुरुवात केली. मुख्य प्रधानांच्या योजनेंत अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार-संघ देण्यांत येऊन त्या संघामार्फत त्यांच्या जातवार निवडणुकी होऊन, आठ प्रांत मिळून त्यांना एकंदर एकाहत्तर राखीव जागा देण्यांत आल्या आहेत. ही योजना कोणत्या दृष्टीने टाकाऊ हेंच आम्हांस कळत नाही. या मॅक्डोनाल्डी योजनेंत अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या मानाने जितक्या जागा मिळूं शकल्या असत्या त्यापेक्षा किती तरी कमी देण्यांत आल्या आहेत. संयुक्त मतदार-संघ व लोकसंख्येच्या प्रमाणांत राखीव जागा, असा जो राजा-मुंजे करार ठरला होता, त्याप्रमाणे अस्पृश्यांना दोनशेत्रेपन्न जागा गेल्या असत्या किंवा पुण्याच्या कराराप्रमाणे त्यांना एकशेअठ्ठेचाळीस जागा मिळाल्या आहेत. या दोन्ही योजनांपेक्षा मॅक्डोनाल्डी योजनेंत अस्पृश्यांना कमी जागा देण्यांत आल्या आहेत. फक्त अस्पृश्य उमेदवारांना संयुक्त मतदार-संघातर्फेहि निवडून येण्याची सवलत ठेवण्यांत आली. या सवलतीमुळे अस्पृश्यांना जादा जागा किती मिळतील हें प्रत्येक निवडणुकीवर अवलंबून असल्यामुळे तो आकडा नेहमी अनिश्चित राहणार आहे.

अस्पृश्यांना स्वतंत्र जागा राखून दिल्यावर स्पृश्य हिंदु अस्पृश्य उमेदवारांना आपलीं मतें देतील हें एखादे वेळीं विशिष्ट कारणामुळे शक्य असतें, तरी ती नेहमी घडून येण्यासारखी गोष्ट नाही. म्हणून तूर्त असें धरून चालण्यास हरकत नाही की, मॅक्डोनाल्डी योजनेंत अस्पृश्यांना फक्त एकाहत्तर जागा मिळाल्या असत्या, तर पुण्याच्या योजनेंत त्यांना एकशेआठ्ठेचाळीस म्हणजे सत्याहत्तर जागा जादा मिळाल्या आहेत. हा अस्पृश्यांचा केवढा मोठा फायदा झाला आहे वरें ! स्पृश्य हिंदूंच्या या सत्याहत्तर जागा जाण्याचें कारण महात्माजींचा प्राणांतिक उपवास होय. एवढें संकट स्पृश्यांवर घालण्याचें महात्माजींना कोणतें कारण सयुक्तिक वाटलें ? म्हणे स्पृश्य हिंदु व अस्पृश्य हिंदु, ही भावना त्यामुळे कायम राहून, भावी काळांत हिंदु समाजाचें भयंकर नुकसान होण्याचा संभव आहे. घटकाभर हा मुद्दा भरीव आहे असें आपण धरून चालू. मग नवीन पुणेरी करारामुळे हा भेदभाव नष्ट झाला आहे का ? या प्रश्नाचें उत्तर 'नाही' असेंच कोणी देईल. मॅक्डोनाल्डच्या योजनेंतले दोन मतदार-संघ पुणेरी योजनेंत कायम आहेत; फक्त फरक एवढाच करण्यांत आला आहे की, मॅक्डोनाल्डी योजनेंत एकच निवडणूक व्हावयाची होती, तर पुणेरी करारांत दोन निवडणुकी व्हावयाच्या आहेत. प्रत्येक उमेदवाराला चार उमेदवार या प्रमाणांत फक्त अस्पृश्य मतदारांनी पहिल्या निवडणुकींत आपले अस्पृश्य उमेदवार निवडून द्यावयाचे व त्यांपैकी एक उमेदवार संयुक्त मतदार-संघानी निवडावयाचा आहे.

ज्या स्वतंत्र मतदार-संघाच्या अस्तित्वाविरुद्ध महात्माजींनी एवढा प्राणांतिक उपवास सुरू केला, तो स्वतंत्र मतदार-संघाचा भस्मासुर कायम राहून, त्याला एका हाताचे चार हात मात्र प्राप्त झाले आहेत. स्पृश्यास्पृश्यत्वाची भावना पुणेरी करारा-

मुळे यापुढे दहा वर्षें राहवयाची आहे, तर मग असा प्रश्न उत्पन्न होतो की, या नवीन करारामुळे स्पृश्य हिंदूंनी मिळविलें काय ? हातच्या सत्याहत्तर जागा गमावल्या व स्वतंत्र मतदार-संघ पूर्वीप्रमाणेच कायम राहिले. दहा वर्षांनंतर पुढे काय घडून येईल तें आताच कोणीं सांगावें ! तूर्त स्पृश्य हिंदूंच्या सत्याहत्तर जागा सुखासुखी गेल्या व हें सर्व कशामुळे घडलें, तर महात्माजींच्या लहरीमुळे होय. महात्माजींचें अवास्तव स्तोम अलीकडे बारा वर्षें लोकांनी माजविलें आहे व त्यामुळे ते असलीं खुळें उठवून देतात. अस्पृश्यांचें स्वतंत्र मतदार-संघ राहिले असते, तर हिंदु समाजावर एवढें कोणतें अगडबंब संकट कोसळलें असतें बरें ! पण आपल्या रोडावत चाललेल्या कीर्तींत येत चाललेली तूट भरून काढण्याच्या हेतूने महात्माजींनी प्राणांतिक प्रायोपवेशनाची हूल उठवून दिली व त्याप्रमाणे त्यांच्या नांवाचा गजर सहा दिवस जगभर वाजला; पण सरतेशेवटीं स्पृश्य हिंदूंच्या हातांत गाजर मात्र आलें व तेंहि कुचकें आलें. बेहेत्तर होती अस्पृश्यांना सत्याहत्तर जास्त जागा गेल्या तरी, पण जर स्वतंत्र मतदार-संघ अजीबात नष्ट झाले असते तर ! स्पृश्यांच्या सत्याहत्तर जागा गेल्या, अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदार-संघ कायम राहिले व महात्माजी मात्र जीजस किंवा बौद्ध होण्याच्या मार्गाला लागले.

महात्माजी कीर्तीच्या अत्युच्च शिखराला जाऊन पोहोचले आहेत. यापुढे त्यांनी अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतींत एक पाऊल पुढे टाकल्यास, ते उतरंडीवर पडेल हे निश्चित होय. मंदिर-प्रवेश व विहिरी-पाणवठे या दोन बाबतींत अस्पृश्यतेचें निवारण होईल. पण तें मुंगीच्या पायानेच होय; मग त्याचें नेतृत्व महात्माजी घेवोत नाही तर मालवीयजी घेवोत. हा पुण्याचा करार घडवून आणण्याच्या बाबतींत डॉ. भीमराव आंबेडकर यांनी जी स्वमताची चिकाटी व पदरचें कांही एक न देतां प्रतिपक्षाकडून उलटें जास्त लुंगविण्याची मुत्सद्देगिरी दाखविली याबद्दल आम्ही डॉक्टरसाहेबांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. पुण्याच्या करारांत ज्या लहानमोठ्या पुढाऱ्यांनी भाग घेतला, त्या सर्वांत डॉ. आंबेडकरांचा पहिला नंबर लागला हें आम्ही बिनतक्रार कबूल करतों.

— भाला, दि. ३ ऑक्टोबर १९३२

---

## ७५. महात्माजींचा कबुलीजबाब

महात्माजींना आम्हीं पहिल्या प्रथम सन १९१४ सालीं पुण्यास पाहिलें. त्या वेळीं ते आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत आले होते. पुणें येथील सार्वजनिक सभेमार्फत

लोकमान्यांच्या अध्यक्षतेखाली महात्माजींना अल्पाहार देऊन त्यांचा गौरव करण्यांत आला. त्या प्रसंगीं त्यांचा पोषाख म्हणजे दहावारी धोतर, अंगांत सदरा व लांब अंगरखा, त्याच्यावर उपरणें व डोक्याला काठेवाडी फेटा होता. त्यानंतर आम्हीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें नाही, तरी त्यांचे निरनिराळ्या वेळांचे निरनिराळे पोषाख आम्हीं त्यांच्या छायाचित्रांत पाहिले आहेत. त्यावरून आम्ही असें लिहितों की, त्यानंतर महात्माजींच्या पोषाखांत पुढीलप्रमाणे फेरफार होत गेला. फेटा जाऊन त्याच्या जागीं टोपी आली व अंगरखा व उपरणें जाऊन त्यांच्या जागीं फक्त एक सदरा राहिला. नेसत्या धोतराऐवजीं एक पंचा आला. त्यानंतर तिसरा बदल करून गांधीजी महात्माजी बनले आहेत. कोणी पाहिल्याबरोबर स्वतः न बोलतां व दुसऱ्यांनी न सांगतां, आपल्या त्यागवृत्तीची कल्पना प्रेक्षकांच्या लक्षांत तावडतोब यावी अशी इच्छा कोणाची असल्यास त्याने दाढी वाढवावी व उघडें वावरण्याचा प्रघात पाडावा. ही गोष्ट महात्माजींच्या लक्षांत येऊन त्यांनी सदऱ्याला व टोपीला काट दिला.

बारा महिने उघडें-नागडें हिंडणाऱ्या देशबांधवांना तितकेंच जास्त कापड वापरण्यास मिळेल. महात्माजींच्या तोंडावाटे निघालेले हे परोपकारी उद्‌गार ऐकून व वाचून त्यांच्याबद्दल लोकमत इतकें बेसुमार उत्कृष्ट झालें आहे की, ते परमेश्वरा-प्रमाणे लोकांना वाटूं लागलें. " केवढी ही त्यागवृत्ति " असें जो तो आ करून उद्‌गारू लागला. आपली छाप लोकांवर बसलेली पाहून, त्यांनी मी 'दरिद्रीनारायणा'चा सेवक आहे, अशी नवीन सुंदर शब्दयोजना करून, आपल्या वजनांत दुप्पट भर घातली. ज्याला कोणाला झटपट लोकप्रियता खाकोटीला मारावयाची असेल, त्याने मोटारींतून यावें, पण सभेंत मी गरिबांसाठी झटत आहे, असें फक्त तोंडाने म्हणावें की, तो गरिबांचा कैवारी झालाच. तशांतला तंतोतंत प्रकार महात्माजींचा झाला आहे. सदरा-टोपी त्यांनी गरिबाकरिता सोडून वर्षाची किती बचत केली, तर वर्षाचें बारा सदरे व बारा टोप्या मिळून अवघा पंधरा रुपयांचा स्वार्थत्याग केला. पण त्याचा पुरा वचपा त्यांनी खाण्यापिण्यांत काढला. ही गोष्ट आमच्या लक्षांत पहिल्या प्रथम आली व ती कोणाची भीडमुर्वत न धरतां आम्हीं ती भालापत्रांत प्रसिद्ध केली.

महात्माजींचा खाण्यापिण्याचा खर्च दररोजचा अडीच रुपयांचा आहे हें आम्हीं तपशीलवार माहिती देऊन प्रसिद्ध केल्याबरोबर त्यांच्या अनुयायांचा आमच्यावर प्रकोप झाला; पण आम्हीं खोटें असें कांहीच न लिहिल्यामुळे आम्हीं त्यांच्या रागाची मुळीच पर्वा केली नाही. महात्माजींचे मानसपुत्र जागजागीं पसरले आहेत. ते म्हणजे श्री. हरिभाऊ फाटक होत. आम्हीं वरील विधान केल्यापासून व खजूर हा परदेशी जिन्नस आहे असें लिहिल्यावर ते आमच्या घरीं आले व त्यांनी ही गोष्ट महात्मा-जींच्या कानावर घालून, त्याचें उत्तर मागविण्याचें आश्वासन आम्हांस दिलें. त्या-प्रमाणे त्यांनी हल्ली महात्माजी खातात त्या खजुराचा एक डबाहि आम्हांस दिला.

आम्हीं तसा डबा असलेला खजूर मिळविण्याचा प्रयत्न बाजारांत केला; पण पुण्यांतील व्यापाऱ्यांनी तसा डबा "आम्ही प्रथमच पाहतों" असा आम्हांस जबाब दिला. मग महात्माजी हा पंजाबी खजूर आणतात तरी कोठून, अशी आम्हांस शंका आली व ती आम्हीं श्री. हरिभाऊ फाटकांना कळविली. यानंतर महात्माजींचें एक जाहीर पत्रक 'फ्री प्रेस जर्नल'च्या एप्रिल महिन्याच्या वीस तारखेच्या अंकांत प्रसिद्ध झालें असून, त्यांत महात्माजींनी आम्हीं त्यांच्यावर केलेले सर्व आरोप प्रांजलपणें कबूल केले आहेत. तें पत्रक आम्हीं दुसरीकडे समग्र छापलें आहे. त्या पत्रकांत महात्माजी असें म्हणतात की, ते दरिद्रीनारायणाच्या सेवकाला न शोभेल असें उच्च दर्जाचें व भारी किंमतीचें अन्न खात आहेत. एका खादीशिवाय आपल्या हातून दरिद्रीनारायणाची दुसरी सेवा घडत नाही, असा स्पष्ट कबुलीजबाब त्यांनी दिला आहे. आमची खरी तक्रार तेवढीच होती. एकदा चूक कबूल केल्यानंतर मग यापुढे महात्माजींनी कांही खाल्लें अथवा प्यालें तरी आमचें कांही म्हणणें नाही.

अहो महात्माजी, तुम्ही मोसंब्याचा रस नुसता पिऊन कां थांबतां, तर तो घंगाळभर काढून त्याने तुम्ही स्नानहि करा. फक्त "मी दरिद्रीनारायणाचा सेवक आहे" अशी भाषा मात्र तुम्ही तोंडावाटे काढूं नका. माझी मित्रमंडळी माझ्या खाण्यापिण्याचा खर्च परस्पर भागवितात म्हणून मी महाग व भारी किंमतीचे पदार्थ खातों, हा महात्माजींचा मुद्दा पोकळ आहे. या मुद्द्याच्या आधारावर दुसरा कोणी असेंच म्हणेल की, माझ्या भारी पोषाखाचा खर्च माझे मित्र परस्पर देतात म्हणून मी तो वापरतो. दुसऱ्याने दारूच्या बाटल्या फुकट दिल्या म्हणून दारू प्यावी की काय! हा महात्माजींना आमचा सवाल आहे. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे महात्माजींची जीभ उत्तम उत्तम पदार्थ खाण्यास व पेयें पिण्यास चटावल्यामुळे हें भलतेंच कारण त्यांनी पुढे केलें आहे. यानंतर महात्माजींनी स्वदेशीची जी व्याख्या केली आहे ती वाचून तर आम्ही थक्क झालों आहों. जी वस्तु स्वदेशांत होत नाही ती परदेशी वापरण्यास हरकत नाही, अशी सोयिस्कर व्याख्या त्यांनी स्वदेशीची केली आहे व या व्याख्येच्या जोरावरच ते परदेशी खजुराच्या सेवनाचें समर्थन करीत आहेत.

खजूर हा परदेशी जिन्नस असून, तो अरबस्तानांतून येतो, असा आरोप आम्हीं पहिल्या प्रथम केला व तो आमचा आरोप अक्षरशः खरा आहे, हें महात्माजींच्या लेखणीवाटे वाचून, पांढऱ्या टोपीवाल्यांच्या मनाची कशी स्थिति झाली असेल, याची कल्पना इतरांना होणें शक्य नाही. परदेशी यंत्रावर 'सुतावलेलें' व विणलेलें महाग कापड महात्माजींना चालत नाही, पण त्याच महात्माजींना परदेशी खजूर मात्र चालतो. ही विसंगतता त्यांची त्यांनाच लखलाभ होवो. महात्माजी परदेशी खजूर कां खातात, तर तो हिंदुस्थानांत तयार होत नाही म्हणून. मग त्याच न्यायाने परदेशी बिस्किटें खाण्यास कोणती हरकत आहे? महात्माजींची स्वदेशीची व्याख्या

चुकीची आहे. आम्ही स्वदेशीची व्याख्या पुढीलप्रमाणे करतों. जी वस्तु हिंदुस्थानांत पैदा होते, तीच वापरणें म्हणजे स्वदेशी व्रत आचरणें होय. पण जी वस्तु स्वदेशांत पैदा होत नाही, पण जिच्यावांचून मुळीच गत्यंतर नाही, तेवढीच फक्त परदेशी वस्तु वापरल्यास स्वदेशी व्रताला बाध येत नाही. उदाहरणार्थ, परदेशी यंत्रें वापरण्यास हरकत नाही. कारण तीं हिंदुस्थानांत पैदा होत नाहीत व त्यावांचून गत्यंतर नाही. पण खजुरासंबंधाने तसें म्हणतां यावयाचें नाही. खजूर अजीबात हिंदुस्थानांत यावयाचा बंद झाल्यास महात्माजी काय करतील ? खजूर खाल्ल्याशिवाय शरीराचें पोषण होत नाही काय ? खजूर न खातां टुणटुणीत असलेले किती तरी साठी उलटलेले म्हातारे गुजरातेंत आहेत. खजूर खाण्याची वाईट खोड महात्माजींना लागली आहे. ज्या पुरुषाने खादीचा आग्रह एकीकडे धरावयाचा, त्याने परदेशी खजूर बेशक खावयाचा, हा शुद्ध नंगेपणा आहे.

दररोज व बारा महिने परदेशी खजूर खाणाऱ्या व्यक्तीला तुम्ही खादी वापरा असा उपदेश करण्याचा हक्क प्राप्त होत नाही. खजुराच्या ऐवजीं एखादा खव्याचा पदार्थ खा व तो सोसत नसल्यास खिचडी खा, पण परदेशी खजूर, अहो महात्माजी, तुम्ही केव्हाहि खाऊ नका. एकादशीच्या पवित्र दिवशीं तरी परदेशी खजूर व परदेशी साबुदाणा कोणत्याहि वैष्णवाने खाऊं नये. पण महात्माजींची दिनचर्या पाहावी तर ती उलटया प्रकारची आहे. एक वेळ परदेशी कापड वापरलेलें चालेल, पण परदेशी पदार्थ खाणें म्हणजे बुद्धीची व अंतःकरणाची अवनति करून घेणें होय. "जसें अन्न तसें मन" हा सिद्धान्त त्रिकालाबाधित आहे. सात्त्विक अन्नाचा परिणाम सात्त्विक होतो व परदेशी अन्नाचा परिणाम परदेशी होतो. खजूर अरबस्तानांत म्हणजे इस्लामी देशांत होतो. म्हणूनच महात्माजींना हिंदूंपेक्षा मुसलमान जास्त आवडतात. ते दिल्लीला गेले तर आपल्या हिंदु मित्राकडे न उतरतां, ते आपल्या मुसलमान मित्राकडे उतरतात. ही मनःप्रवृत्ति महात्माजींची कां होते याची मीमांसा आम्हांस आजपर्यंत लागत नव्हती, पण त्या शंकेचें समाधान आता पूर्णपणें झालें आहे. हा सर्व अरबस्तानांत होणाऱ्या खजुराचा परिणाम होय. असो; महात्माजी परदेशी खजूर खातात व ही गोष्ट त्यांच्या नजरेला आम्हीं आणल्यावरहि ते खाण्याचें सोडण्यास तयार नाहीत. त्याचप्रमाणे ते खादी वापरून महिन्याचा सव्वा रुपया वाचवीत असले, तरी त्यांच्या खाण्यापिण्याप्रीत्यर्थ दरमहा शंभर रुपये खर्च होतात. मग महात्माजी दरिद्रीनारायणाचे सेवक, का लक्ष्मीनारायणाचे युवराज आहेत, याचें उत्तर गांधी यांनी द्यावें. आमचें उत्तर दुसरें आहे व पहिलें नाही.

– भाला, दि. २० एप्रिल १९३३

---

# ७६. वेताळ पूर्वपदाला आला

राजकारणांत गांधीजींचे वर्तन आग्यावेताळाप्रमाणे झालें आहे. कधी कोणास माहीत नव्हतीं अशीं पांच हत्यारें त्यांनी आपल्या म्यानांतून उपसून तीं आपल्या अनुयायांच्या हातीं दिलीं. या पांचहि हत्यारांचा गेल्या बारा वर्षांत वाटेल तसा मनसोक्त उपयोग करून त्यांनी हिंदुस्थानची जनता हादरून सोडली. प्रत्येक हत्याराचा उपयोग प्रचारांत आणण्यापूर्वी "लोकहो, हें नवीन हत्यार वापरण्यास सुरुवात करा म्हणजे तुम्हांस अवघ्या बारा महिन्यांत पूर्ण स्वराज्याची प्राप्ती होईल." भोळीभाबडी हिंदुस्थानची प्रजा, तिला काय माहीत या मोहात्म्याचे आंतले डाव ! लोकांनी खादी वापरली, कौन्सिलावर बहिष्कार घातले, आपलीं मुलें शाळा-कॉलेजांतून काढलीं, कांही शेतकऱ्यांनी करबंदी व पुष्कळांनी कायदेभंग केला.

सन १९३० सालीं सुरू झालेल्या पहिल्या सामुदायिक कायदेभंगांत एक लाख तरुणांनी भाग घेतला व त्यांपैकी कांहीकांनी आपली डोकीहि पोलिसांच्या दंडुक्यांनी फोडून घेतलीं. हें सर्व लोकांनी केवळ मोहात्माजींच्या नादीं लागून केलें. त्यांच्या चेहऱ्यांत अशी कांही आकर्षक जादू भरली आहे कीं, कोणीहि त्यांच्या पाठीमागे त्यांना कितीहि नांवें ठेवलीं, तरी प्रत्यक्ष मत देण्याची वेळ येऊन ठेपल्यावर जो तो त्यांना अनुकूल मत तरी देतो, नाही तर तटस्थ राहतो. गेल्या बाराव्या तारखेस भरलेल्या परिषदेच्या तिसऱ्या दिवशीं मतें घेण्याच्या वेळीं आमच्या विधानाची सत्यता सर्वांना पटली. त्या परिषदेंत एकंदर दोनशे प्रतिनिधि आले होते, पण त्यांपैकी शंभराच्या वर प्रतिनिधि तटस्थ राहिले. ही तटस्थ वृत्ति उत्पन्न होण्याचीं कारणें दोन आहेत. हृदयांतील सदसद्विवेकबुद्धि खोटें सांगूं देईना, तर बाहेरील गांधीजींची मूर्ति त्यांना प्रतिकूल मत देऊं देईना. अशा ओढाताणींत या बिचाऱ्यांनी तिसरा भेकडपणाचा मार्ग म्हणजे तटस्थ राहण्याचा मार्ग स्वीकारला. या एकाच गोष्टीवरून असें सिद्ध होतें की, लोक पोटांतून मोहात्माजींच्या विरुद्ध कितीहि असले, तरी त्यांच्या समोर उलट मतें देण्याची पुष्कळांची छाती होत नाही. या विशिष्ट गुणामुळेच गांधीजींना आम्ही 'मोहात्मा' ही नवीन पदवीं अर्पण केली आहे. आपल्या कक्षेंत येणाऱ्या इसमावर ते भुरळ पाडूं शकतात, पण त्यांनी

आजपर्यंत सुचविलेले पांचहि मार्ग अव्यवहार्य असल्यामुळे, त्यांचा राजकारणांत व धर्मकारणांत पूर्ण फज्जा उडाला आहे. कोणीं त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली आहे ती देवो, पण आम्हांस ते तर पहिल्यापासून महात्मा दिसत नसून 'मोहात्मा'च दिसत आले आहेत व आमच्या विचाराची सत्यता सर्वांच्या प्रत्यक्ष अनुभवास आलेली आहे. हा मताचा प्रश्न नसून, प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा प्रश्न आहे.

गांधीजी कायदेभंगाच्या जोरावर किती लंब्या लंब्या वाता सन १९३० सालीं झोडीत असत बरें! एक वेळ तर त्यांना अशी आशा वाटत होती की स्वराज्याचा आंबा त्यांच्या हातांत पडला असून, फक्त तो तोंडांत टाकावयाचाच राहिला आहे. चूक होणें हें मानवी आहे, पण ती न सुधारणें हें सैतानी आहे. कायदेभंगाचा मार्ग चुकला किंवा नाही, हें अजमावण्याकरिता त्यांनी गेल्या बारा तारखेस प्रांताप्रांताच्या कार्यकर्त्यांची परिषद भरविली, पण तिचा काडीचाहि उपयोग करून घेण्यांत आला नाही. तें सर्व तीन दिवसांचें नाटक झालें, मग असा प्रश्न उद्‌भवतो की, ती एवढी दगदग घेतली तरी कशाला? परिषद संपल्यानंतर श्री. माधवराव अणे यांनी एक पत्रक काढलें असून, त्यांत वैयक्तिक कायदेभंगाची सवलत ठेवण्यांत आली आहे. ज्याला कायदेभंग स्वतःच्या मताच्या जोरावर करावयाचा असेल, तो काँग्रेसच्या हुकमाची वाट पाहात नाही. पण प्रश्न असा आहे की, काँग्रेस या राजकीय संस्थेने वैयक्तिक किंवा सामुदाकि कायदेभंगाला आपली संमति द्यावी किंवा नाही. परिषदेंत सर्वसाधारण मत असें दिसून आलें की, दोन्ही प्रकारचा कायदेभंग तूर्त बंद ठेवण्यांत यावा. पण त्या मताला काडीचीहि किंमत न देतां वैयक्तिक, कायदेभंगाला काँग्रेसची मान्यता देण्यांत आली व हीच गोष्ट ना. व्हाइसरॉय-साहेबांच्या भेटीच्या आड आली. जर कायदेभंग पूर्णपणे बंद करण्यांत आला असता तर लाटसाहेबांनी मुलाखत दिली असती व हल्ली तुरुंगात कुजत पडलेल्या राज-बंद्यांची मुक्तता झाली असती. पण हा सिधा मार्ग न पत्करतां वैयक्तिक कायदेभंग मंजूर करण्यांत आला व त्यामुळे सन १९३२ ची पुनरावृत्ति होते की काय, अशी भीति वाटूं लागली आहे. गांधीजींच्या या आचरटपणामुळे त्यांचें डोकें फिरल्याचा जबर संशय आम्हांस येऊं लागला आहे.

पुन्हा ही वेताळाची स्वारी पूर्वपदावर आली असून, तो स्वतःला व इतरांना कोणत्या पाशांत नेऊन अडकवितो याची नीटशी कल्पना आम्हांस तूर्त तरी होत नाही. आजच अशी बातमी येऊन थडकली आहे की, गांधीजी सत्याग्रहाश्रम बंद करून शेवटचा वैयक्तिक कायदेभंग करून तुरुंगांत जाणार आहेत. आपल्या कायदेभंगाच्या चळवळीमुळे हजारों तरुणांचें व शेतकऱ्यांचें भयंकर नुकसान झालें आहे याची जाणीव त्यांच्या अंतःकरणाला अलीकडे होऊं लागली आहे. आम्ही तरी गेलीं तीन वर्षें हेंच लिहीत व सांगत आलों आहोंत. कायदेभंग करणाऱ्यालाच तो फक्त जाचक होतो व त्यामुळे सरकाराला काडीचीहि

दहशत वसत नाही. पण ही साधी गोष्ट कळण्यास गांधीजींना तीन वर्षे लागलीं याचेंच आम्हांस आश्चर्य वाटतें. त्यांच्याभोवतीं जमणारे सारे लहानमोठे पुढारी त्यांच्या उघडच्या देहाला पाहून मोहून जातात व त्यामुळे त्यांची चूक त्यांच्या तोंडावर सांगण्यास कचरतात. हा अंधभक्तांचा तांडा त्यांनी आपल्याभोवतीं जमवून त्यांच्याच तंत्राने ते आजपर्यंत वागत आले, हेंच त्यांच्या अधःपाताचें मुख्य कारण आहे.

असो; जें झालें तें होऊन गेलें. या कामीं त्यांनी कोणत्याहि प्रकारचा त्रागा करूं नये, अशी त्यांना आमची आग्रहाची विनंती आहे. आश्रम पूर्वीप्रमाणेच चालू ठेवण्यांत यावा व त्यांत त्यांनी पूर्वी केलेल्या प्रतिज्ञेची पर्वा न करतां कांही महिने आराम घ्यावा व इतरांनाहि घेऊं द्यावा. गांधीजींना अगदीच रिकामे बसवत नसेल तर त्यांनी खादीची मेलेली चळवळ पुनरपि जिवंत करण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे वेळ जाऊन करमणुकीला तें एक सतत साधन होईल. स्वराज्याचा कायदा पसार झाल्यावर त्यापासून कोणते भरीव हक्क हातांत पडले हें पाहून, मग पुढे इष्ट व शक्य ती चळवळ हातीं घ्यावीं. तोंपर्यंत गांधीजींनी स्वस्थ बसण्यांतच त्यांचा खरा मुत्सद्दीपणा आहे. आमचा हा हितकर सल्ला झिडकारून जर ते ऑगस्टच्या पहिल्या तारखेस कायदेभंग करतील, तर आम्ही बेशक म्हणूं की, गांधीजींसारखा मूर्ख अलम दुनियेंत ते एकटेच होत. राजकारणांत कधी कोणी कोणाच्या त्राग्याला भीक घालीत असतो काय? त्यांनी आपल्या आश्रमाला स्वतःच्या हाताने काडी लावून दिली, तरी त्याचा अल्पहि परिणाम सरकारवर होणार नाही. त्याचप्रमाणे त्यांनी व त्यांच्या कट्टर अनुयायांनी आमरण कायदेभंग केला, तरी सरकार त्याची पर्वा करणार नाही. फार झालें तर, अशा खुळ्यांच्या राहण्या-खाण्याची सोय जरा जास्त चांगली करण्यांत येईल, पण त्यामुळे सरकार गहिवरून कांही जास्त राष्ट्रीय हक्क बहाल करील अशी जर कोणाची कल्पना असेल, तर ती सपशेल चुकीची आहे.

राजकारणांत मायाममतेला किंवा तापत्राग्याला कोणी भीक घालीत नसून, जर विलायत सरकार कोणत्या एखाद्या गोष्टीला वंगलें, तर फक्त प्रचंड व प्रभावी लोकमताला होय. यासाठी कायदेभंगाच्या चळवळीला कायमची मूठमाती देऊन, खेड्यांपाड्यांतून राष्ट्रीय जागृति करण्याच्या मार्गाचा अवलंब गांधीजींनी करावा. विद्यमान काळीं त्यांच्याइतका वजनदार पुढारी अखिल भरतभूमींत दुसरा कोणी नाही. हिंदुस्थानांतील सात लाख खेडीं जागीं करण्याव्यतिरिक्त दुसरी कोणतीहि चळवळ त्यांनी तूर्त हातीं घेऊं नये. हा मार्ग तडकाफडकीचा नसून तव्वल एका पिढीचा आहे, पण गांधीजींना एवढा दम आहे कोठे! "आज तूप, उद्या रूप" अशी घिसाडघाईची मनोवृत्ति त्यांची बनली असल्यामुळे, त्यांना कायदेभंगाशिवाय दुसरें कोणतेंहि साधन मान्य होणार नाही.

जर गांधीजी कायदेभंगाच्या तहकुबीची मुदत संपल्याबरोबर ऑगस्टच्या पहिल्या तारखेस वैयक्तिक कायदेभंगाला सुरुवात करतील, तर त्यांना राष्ट्रनायक म्हणण्याऐवजीं आम्ही राष्ट्रघातक म्हणूं. त्यांचें उदाहरण पाहून कांहीं तरुण लोक त्यांचा कित्ता गिरविण्यास तयार झाल्यास, त्या पापाचें खापर त्यांच्या डोक्यावर फुटणारें आहे. गांधीजींचा मागील इतिहास पाहतां ते परमावधीचे हट्टी आहेत. ते लोकांचें मत ऐकण्याचा आव आणतात, पण सरतेशेवटीं आपलाच हट्ट घेऊन बसतात. म्हणून आम्हांस अशी भीति वाटत आहे की, हा वेताळ पूर्वपदावर येण्याचा हटकून संभव आहे. परमेश्वर करो व ही राष्ट्रीय आपत्ति टळून कायदेभंगाच्या होमांत तरुणांच्या आहुति पडण्यास पुन्हा प्रारंभ न होवो.

– भाला, दि. २७ जुलै १९३३

---

## ७७. मालक, मजूर व मालघेते

कोणत्याहि प्रकारचा पक्का माल घ्या. तो बिनभांडण तयार होऊन गिऱ्हाइकांनी आपखुषीने व हौसेने घ्यावा अशी इच्छा असल्यास, तो ज्या गिरण्यांतून किंवा कारखान्यांतून तयार झाला असतो त्यांचे मालक, त्यांतून काम करणारे मजूर व तो विकत घेणारे गिऱ्हाईक, या तिन्ही वर्गांच्या नफानुकसानीकडे लक्ष ठेवूनच त्याची किंमत ठरवावी लागते. स्वदेशी माल म्हणजे हिंदुस्थानांत तयार झालेला कोणताहि माल घ्या. तो खुल्या बाजारांत आपल्या आंगिक गुणांच्या जोरावर विकला जाणें शक्य नाही. खुल्या बाजारांत कोणताहि माल विकला जाण्यास त्याच्या अंगीं तीन नैसर्गिक गुण असावे लागतात. ते गुण म्हणजे दिखाऊपणा, टिकाऊपणा व स्वस्ताऊपणा होत. हे तिन्ही गुण स्वदेशी मालांत नसून, जो कोणता स्वदेशी माल हिंदुस्थानांत विकला जातो, तो लोकांनी पाळलेल्या स्वदेशी व्रतामुळे होय. हें व्रत हिंदी गिऱ्हाइकांनी एक वर्षभरच सोडून दिल्यास स्वदेशी मालांचे पर्वतप्राय ढीग कुजत पडून, मालक व मजूर या दोघांवरहि उपाशी मरण्याची पाळी खात्रीने येईल.

बाजारांत स्वस्त व सुलभ माल विकत मिळत असतां, तो न घेतां पदरचे दोन पैसे जास्त देऊन व कमी दर्जाचा माल स्वदेशी म्हणूनच विकत घेऊन, आपल्या मनाचें कसेबसें समाधान करून घेणाऱ्या हिंदी गिऱ्हाइकांच्या स्वार्थत्यागाचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच होय. वास्तविकपणें पाहतां, कुरकुर करण्याचें खरें कारण गिऱ्हाइकांचें आहे, तें मालक-मजुरांचें नाही. वास्तविक प्रकार असा असतां, मालक व मजूर यांनी संप होईपर्यंत कां भांडावें हेंच आम्हांस कळत नाही. यापुढे संप मोडावयाचे असल्यास, सरकारकडे धांव न

घेतां, परदेशी माल कांही विवक्षित मुदतीपर्यंत घेण्याचें ठरवावें, म्हणजे हे संप घडोघडी उद्भवणार नाहीत. उदाहरणार्थ, हल्ली चालू असलेला मुंबईचा संपच घ्या. या संपाचें आदिकारण म्हणजे मजुरांच्या मजुरींत गिरणी-मालकांनी केलेली कपात होय.

मुंबईच्या मजुरांनी आपल्या तेरा मागण्या मालकांपुढे मांडल्या आहेत व त्या मालक मंजूर करीपर्यंत हा संप असाच चालू ठेवण्याचा निर्धार आहे. पण या वेळीं आम्ही गिऱ्हाइकांच्यातर्फे दोघांनाहि असा सवाल टाकतों की, तुम्ही आम्हां गिऱ्हाइकांस विचारल्याशिवाय आपसांतलें भांडण मिटविणारे कोण? मालक-मजुरांनी ही गोष्ट पक्की लक्षांत धरावी की, गिऱ्हाइकांना आपली कापडाची गरज भागविण्याइतका परदेशी माल हिंदुस्थानांत सध्या आहे व पुढेहि येत राहील. मालक व मजूर यांच्यांतील भांडणामुळे गिऱ्हाइकांचा सतत तोटा होत आहे त्याची वाट काय? गेलीं चाळीस वर्षे हिंदी कापडाला हिंदी गिऱ्हाईक झीज सोसून आर्थिक मदत करीत असतांहि, तें कापड परदेशी कापडापेक्षा गिऱ्हाइकांना महाग पडावें. यावरून हिंदी गिरणी-मालकांच्या व मजुरांच्या अंगीं गिरण्या चालविण्याचा वकूब नाही, हेंच यावरून सिद्ध होत आहे.

जपानांत कापसाचें एक बोंडहि पिकत नसतां, जपानी गिरणी-मालक हिंदुस्थानांत कापूस खरेदी करतात, तो येथून जपानांत नेऊन तेथील गिरण्यांत त्याचें कापड बनवितात व तें जपानांतून मुंबईस आणून येथील कापडापेक्षा स्वस्त विकतात. यावरून हेंच सिद्ध होत नाही काय, की हिंदी गिरणीवाले व त्यांत काम करणारे मजूर या दोघांनी संगनमत करून, ते हिंदी गिऱ्हाइकांना फसवून त्यांच्या खिशांतून वाजवीपेक्षा जास्त पैसे काढीत आहेत! आम्हां गिऱ्हाइकांची अशी तक्रार आहे की, बाजारांत जो भाव चालू असेल, त्याप्रमाणे जें कापड आम्हांस परवडेल तें आम्ही विकत घेऊं, मग ते स्वदेशी असो वा परदेशी असो. स्वदेशी कापडाचे गिऱ्हाईक मजुरांइतकेंच गरीब आहे. हिंदुस्थानांत शेकडा नव्वद कुटुंबांची मासिक प्राप्ति शंभराच्या खाली आहे व हेच नव्वद लोक मुख्यत्वेंकरून स्वदेशी कापड विकत घेतात. ज्यांचें मासिक उत्पन्न तीन-चार आकड्यांत गेलेलें असतें, त्यांचीं शरीरें नाजूक झाल्यामुळे ते स्वदेशी कापडाकडे ढुंकूनहि पाहत नाहीत.

गिरण्यांतील मजुरांना जास्त मजुरी दिल्यास तिचा बोजा मालकांवर न पडतां तो गिऱ्हाइकांवर पडतो, म्हणजे गिरण्यांतील मजुरांची चैन चालविण्याकरिता इतर मजुरांना लुबाडावें लागतें. या मुद्द्याचा विचार कोणताहि मजुरांचा पुढारी करीत नाही. जर मालक नफेबाजी करतात, तर मजूरहि मजुरीबाजी करून दोघे गिऱ्हाइकांना नागवितात, अशी गिऱ्हाइकांची तक्रार आहे. स्वदेशीचें व्रत पाळून पाळून हिंदी गिऱ्हाईक थकलें आहे. त्या व्रताचें पारणें करून यापुढे गिऱ्हाईक आपला स्वार्थ साधण्याच्या पंथाला हळूहळू लागलें आहे. गिऱ्हाइकांनी स्वदेशीचें व्रत सोडूनच स्वहिताचें व्रत आचारण्यास सुरुवात

केली, तर दरमहिना एक एक गिरणी बंद पडून, पुढील पांच वर्षांत संप होण्याचें अजीबात बंद पडेल. म्हणून या संपाच्या बाबतींत समाजवादी कम्युनिस्टांना आमची अशी सूचना आहे की, तुम्ही भलत्यासलत्या कल्पना विचारशून्य मजुरांच्या डोक्यांत भरवून त्यांचा सर्वस्वीं नाश करूं नका. मजुरीचा अजीबात नायनाट बरा किंवा तींतील काट बरा ! अजीबात फाका मारीत बसणें वगैरे बरें किंवा भाकरीचा अर्धा तुकडा बरा ! हा व्यावहारिक प्रश्न आम्ही मजुरांपुढे व विशेषतः त्यांच्या पुढाऱ्यांपुढे ठेवीत आहोंत. मजुरांनी हट्टानें संप असाच चालू ठेवल्यास त्याचे तात्कालिक परिणाम त्यांनाच भोगावे लागतात. अन्नाच्या अभावीं मरेल कोण, ते का मालक ? सामान्य तिऱ्हाईत जनता मजुरांना मदत करण्यास तयार नाही. लोक कशासाठी मजुरांना संपाच्या दिवसांत पोसतील ! त्यांची मजुरी वाढवून कापडाच्या किमती वाढवून घेण्यासाठी ? मजुरींत वाढ म्हणजे कापडाच्या किमतींत वाढ व किमतींत वाढ म्हणजे गिऱ्हाइकांच्या खर्चांत वाढ. जगाचा कायमचा व्यवहार या तत्त्वावर सदोदित चालत नाही.

संपवाल्या मजुरांच्या तेरा मागण्यांत अशी एक मागणी आहे की, त्यांना किमान मजुरी पंचेचाळीस रुपये पडली पाहिजे. पंचेचाळीसच्या आंतील मासिक उत्पन्नावर किती तरी कुटुंबें खुद्द मुंबईस व मुंबईबाहेर आपला निर्वाह करीत आहेत बरें ! मग इतर मजुरांना कमी मजुरी चालते, मग गिरणींतल्याच मजुरांना जास्त मजरी कां द्यावी ? जर मजुरी जास्त हवी, तर मालकांनाहि काम जास्त हवें. जास्त काम करावें व जास्त मजुरी कमवावी. अमुकच माग चालवीन व अमुकच तास काम करीन, अशा अटी न घालतां, "हातभर काम व भाराभर दाम" या म्हणीप्रमाणे मजुरांनी चालावें. याच म्हणीप्रमाणे जपानी मजूर गिरण्यांतून काम करतात तेव्हाच त्यांना पोटभर खावयास मिळतें. मजुरांचा जन्म सुखासाठी नसून जन्मभर कष्टासाठी आहे.

हल्लीच्या चढाओढीच्या कठीण काळांत मजुरांनी एक तर मरेपर्यंत काम केलें पाहिजे, नाही तर अन्नावांचून मेलें तरी पाहिजे. याशिवाय त्यांना तिसरें गत्यंतर नाही. हा झाला मजुरांना उपदेश; पण मालकांनाहि आमची अशी खडखडीत बजावणी आहे की, त्यांनीहि आपल्या नफेबाजीला आळा घातलाच पाहिजे. शंभर रुपयांच्या भागाला सहा टक्क्यांपेक्षा जास्त नफा घेणें याला आम्ही विद्यमान स्थितींत नफेबाजी म्हणतों. ही नफेबाजी भागाच्या चढत्या भावावरून ताबडतोब कळते. शंभर रुपये किमतीच्या भागाची किंमत सातशे रुपयांपेक्षा जास्त चढूं लागली की नफेबाजीला सुरुवात झालीच म्हणून समजावें. नफेबाजीवर तयार झालेलें कापड स्वदेशी नसून तें परदेशीइतकेंच त्याज्य आहे. गिरणी-मालकांनी नफेबाजी करून मिळविलेला पैसा देशांतच राहतो हा मुद्दा फशाळपणाचा आहे. नफेबाजीचा पैसा देशांतच राहतो असें म्हणतां येत नाही. तो मोटारगाड्या व

इतर परदेशी वस्तूंच्या द्वारा परदेशांत जातो. पण घटकाभर असें धरून चालू की, तो स्वदेशांतच राहतो, पण तो एकाच्या खिशांतून दुसऱ्याच्या खिशांत जातो, त्याची वाट काय? वाटेल त्याने वाटेल तितकी नफेबाजी खिशांत भरावी, पण ती दुसऱ्यांच्या स्वार्थत्यागावर अवलंबून नसावी. भरबाजारांत हिंदी गिऱ्हाइकवाल्यांनी वाटेल तितका फायदा मिळवावा, पण मग गिऱ्हाइकांवरहि स्वदेशीच कापड विकत घेण्याचें राष्ट्रीय बंधन नसावें. गिऱ्हाइकांवर तेवढें स्वदेशीचें बंधन असावें व मालक-मजुरांना नफेबाजी व मजुरीबाजी मोकाटपणें करण्याची पूर्ण मुभा असावी, हा मोंगली न्याय झाला.

ज्यामुळे तिन्ही वर्गांचे सारखें हित होईल असेंच स्वार्थत्यागी वर्तन तिघांनी ठेवल्यास हा तंटा कायमचा मिटेल. नाही तर संपाचा रोग कांही काळ दबेल, पण पुन्हा तो मागल्याप्रमाणेच उसळी मारल्याशिवाय राहणार नाही. सारांश, संप मिटवितांना गिऱ्हाइकांच्या हिताहिताचाहि विचार करण्यांत यावा. असें न करतां मालक-मजूर एक होऊन दोघेहि आपलाच तेवढा नफा करून घेतील, तर मग गिऱ्हाइकांनीहि आपला वैयक्तिक नफा तूर्तातूर्त साधावा. मग तिकडे राष्ट्राचें कांही होवो, असें भलतेंच लिखाण लिहावें लागेल. स्वदेशीचें व्रत पाळणें कठीण आहे, तें मोडणें व मोडण्यास सांगणें यांत फारसें कठीण नाही.

— भाला, दि. १० मे १९३४

---

## ७८. बळी तो गिळी

या विसाव्या शतकांत सुधारणेची परमावधि झाली आहे असें म्हणतात. कांही बाबतींत हें विधान सत्य व बिनचूक आहे. भौतिक सुधारणा पूर्णावस्थेस पोहोचली आहे असें म्हटल्यास त्यांत फारसें वावगें होणार नाही. ताशी ऐंशी मैल पळणाऱ्या आगगाड्या, कितीहि समुद्र खवळला तरी त्याला दाद न देतां, इच्छित बंदरांत वेळेवर पोहोचणाऱ्या आगबोटी, पृथ्वीच्या या टोकापासून तों त्या टोकापर्यंत एका आठवड्यांत उडणारीं विमानें, बटन दाबल्याबरोबर सबंध शहरांत प्रकाशाचा लखलखाट करून देणारी विजेची रोषणाई व दहा-पंधरा मैलांच्या अंतरावरून अचूक गोळे फेकणाऱ्या तोफा वगैरे आधुनिक भौतिक सुधारणा पाहिल्यास असा भास होतो की, खरोखर या विसाव्या शतकांत सुधारणेची कमाल आहे. आता यापलीकडे कोणकोणते नवीन शोध लागताहेत, इकडे लोकांचें लक्ष लागून राहिलें आहे. हल्ली उपलब्ध आहेत त्या सुधारणांपलीकडे एकहि नवीन सुधारणा घडून आली नाही, तरी आता चालण्यासारखें आहे; पण प्रश्न हा नसून

तो निराळाच आहे. या सर्व भौतिक सुधारणा झाल्या व त्यामुळे माणसांच्या सुखांत व सोयींत जादा भर पडली. पण शिक्षणामुळे माणसाच्या अंतःकरणांत सुधारणा झाली आहे किंवा नाही, हाच मुख्य व महत्त्वाचा प्रश्न आहे. भौतिक सुधारणा झाली, पण हार्दिक सुधारणा झाली आहे किंवा नाही, या प्रश्नाचें उत्तर नकारात्मक येईल.

या विसाव्या शतकांत मानवी हृदय जास्त लोभी, स्वार्थी व आपमतलबी झालें आहे व त्यामुळे भौतिक सुधारणांचा उपयोग वाईट मार्गाने होत चालला आहे. कोणतेंहि सुधारलेलें राष्ट्र घ्या, त्याच्या पोटांतील अंतरहेतु हाच असतो की, मला शेजारचें राष्ट्र गिळावयास कसें मिळेल ? जें तें सुधारलेलें राष्ट्र शेजारच्या राष्ट्राकडे प्रेमभावाने न पाहतां लोभी नजरेने पाहत आहे. सारांश, भौतिक सुधारणांची पूर्णता होत असली, तरी त्याच प्रमाणांत अंतःकरणाची कुधारणा होत चालली आहे. या हार्दिक कुधारणेमुळे आधुनिक शस्त्रास्त्रांचा भरपूर पुरवठा नसलेल्या राष्ट्रांची मोठी भयप्रद स्थिति झाली आहे. हे विचार सुचण्याचें कारण म्हणजे इटाली व जपान या दोन राष्ट्रांनी सध्या चालविलेलें राजकीय आक्रमण होय. आशियांत जपानने चीनचे लचके तोडण्याचा एकसारखा सपाटा चालविला आहे. उत्तरेकडील भिंतीच्या पलीकडील चीनचा सर्व भाग गिळल्यावर, जपानची भूक शांत न होता, ती जास्तच चेतली असून, तिच्या शांती-करिता त्याने भिंतीअलीकडील प्रांतांत शिरकाव केला आहे. जपानच्या या आक्र-मणाकडे पाहिलें म्हणजे आम्हांस अशी साधार भीति वाटू लागली आहे की, जी गत अठराव्या शतकांत हिंदुस्थानची झाली, तशीच गत या विसाव्या शतकांत चीनची होण्याचा पूर्ण संभव आहे.

जपानचें हें आक्रमण आस्ते आस्ते वाढून सरतेशेवटीं यांगत्सी नदीच्या उत्तरेकडील सर्व उत्तर-चीन देश जपान थोड्याच वर्षांत गट्ट करून टाकील. हा भावी परिणाम चिनी सरकारला कळत नाही असें नाही, पण चिनी लोकांना त्यांचा एकोणिसाव्या शतकांतील आळस भोवत आहे. जपानी सरकारबरोबर चिनी सरकारने आपली सुधारणा केली असती, तर चिनी लोकांवर हा नामुष्कीचा प्रसंग खात्रीने ओढवला नसता. कोणत्याहि दोन राष्ट्रांत एखादें भांडण उपस्थित झाल्यास, त्याचा निकाल शांततेच्या मार्गाने करण्यासाठी, राष्ट्रसंघ स्थापन करण्यांत आला आहे; पण त्याचा प्रत्यक्ष उपयोग ऐन वेळीं होऊं शकत नाही, असा अनुभव चीनला येत चालला आहे. मँच्युरिया प्रांत चीनचा आहे असा ठराव राष्ट्रसंघाने केला आहे, पण त्याची पुढील अंमलबजावणी त्या राष्ट्रसंघाने न केल्यामुळे जपानी सरकार शेफारून गेलें व त्याने चीनचे जास्त जास्त लचके तोडण्यास प्रारंभ केला. राष्ट्रसंघाला आपला मँच्युरिया चीनचाच वाटावा अशी इच्छा असल्यास, त्याने चोहोकडून जपानवर गहजब उडवून द्यावा म्हणजे तो एकटा काय करील ?

इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इटाली व अमेरिका या पांच राष्ट्रांनी एकजूट करून संगनकार्य केल्यास, जपान ताबडतोब वठणीस येईल; पण असें होणार कसें, हाच मुख्य प्रश्न आहे. राष्ट्रसंघ ठरावापलीकडे कांही एक जास्त करावयास तयार नसल्यामुळे जगांतील शक्तिहीन राष्ट्रांवर दुर्दैवाचा फेरा आला आहे. इकडे आशियांत चीन देश जपानी अगजर हळूहळू गिळूं लागलें आहे, तर तिकडे आफ्रिकेंत सरदार मुसोलिनीनें दंड ठोकण्यास उघडपणें सुरुवात केली आहे. आफ्रिकेंत स्वतंत्र असें एकच राष्ट्र निग्रो लोकांचें उरलें आहे. तें राष्ट्र ॲबिसिनिया होय. ॲबिसिनियाला लागूनच इटालीचा सोमालीलँड आहे. या दोन्ही प्रदेशांच्या सीमा एकमेकांना लागून असल्यामुळे त्यांच्या सरहद्दीवर नेहमीं बारीकसारीक तंटे उद्भवतात. असले तंटे एखादें कमिशन नेमून सामोपचाराने मिटविण्यासारखे असतात; पण हा सामाचा मार्ग न स्वीकारतां, केव्हा केव्हा अशीं राष्ट्रें वर्दळीवर येतात. त्यांत जरा एक राष्ट्र सबळ व दुसरें राष्ट्र कमबळ असलें म्हणजे मग युद्धाशिवाय दुसरी बात नाही. असाच प्रकार ॲबिसिनियाच्या बाबतींत होण्याचा रंग दिसत आहे.

सरदार मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली इटालीची लष्करी तयारी पूर्णावस्थेस गेली असून, त्यांच्या बाहूंना युद्धाचा कंडू सुटला आहे. हा कंडू शमविण्यास त्यांना संधि पाहिजे होती व ते तिची चातकाप्रमाणे वाट पाहत होते. इतक्यांत ॲबिसिनियाच्या सरहद्दीवर लहानसा तंटा झाला व तें क्षुल्लक कारण सरदार मुसोलिनीला पुरेसें झालें. ताबडतोब पाऊण लाख इटालियन सैन्य सर्व सामग्रीसह इटालियन सोमालीलँडला पाठविण्यांत आलें. हल्ली तेथे पावसाळा असल्यामुळे चार महिन्यांनंतर हिवाळ्यांत तेथे लढाईला तोंड लागलें. मध्यंतरीं इंग्लंडने हा तंटा शांततेने मिटविण्याचा प्रयत्न चालविला आहे, पण त्याला यश येत नाही. आपल्या सोमालीलँडपैकी कांही भाग इटलीला देण्यास इंग्लंड तयार असतां, तो भाग घेण्यास मुसोलिनी तयार नाही. उलट ते आता असें म्हणूं लागले आहेत की, आम्हांला ॲबिसिनियाची सुधारणा करावयाची असल्यामुळे त्यावर इटालीची सार्वभौम सत्ता असणें आवश्यक आहे. याचा अर्थ असा सरळ होतो की, सरदार मुसोलिनीला ॲबिसिनिया जिंकून तेथे इटालीची सार्वभौम सत्ता स्थापावयाची आहे.

या बाबतींत ॲबिसिनियाच्या राजाकडे अल्पहि दोष नाही! जर एखादा असेलच, तर तो कमजोरपणाचा होय. अशा प्रकारचा तंटा इंग्लंडशीं उपस्थित याकरण्चीं मुसोलिनीची छाती नाही. कारण इटाली शेरभर तर इंग्लंड दीडशेर लष्करी तयारींत आहे. पण तेंच ॲबिसिनियाकडे पाहा, त्याची लष्करी तयारी पुरी पावशेर नाही. अशा विषम स्थितींत ॲबिसिनियावर कठीण प्रसंग यावा हें साहजिक आहे. सारांश, या विसाव्या शतकांतहि जगाचा न्याय पूर्वीचाच आहे व तो म्हणजे "बळी तो पिळी."

— भाला, दि. ८ जुलै १९३५

---

निबंध २०५८४ २०८६५

REFBK-0022744